म. ग्रं सं ठाणें
विषय निबंध.
सं. क्र. ६७०




REFBK-0004605

# साहित्य-तोरण

अर्थात्

भोर-संस्थान-लेखसंग्रह

संपादक:

नारायण महादेव भिडे, बी. ए.
नारायण विनायक देव, बी. ए.

REFBK-0004605

शके १८५४)      किंमत अडीच रुपये      (सन १९३२

प्रकाशकः—
रामचंद्र गोविंद कानडे,
५४ शुक्रवार, पुणें २.

मुद्रकः—
सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी. ए., एलूएल्. बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत'
छापखाना, १४७ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

# संपादकीय निवेदन

भोर-संस्थानांतील महाराष्ट्र-शारदा-मंदिराच्या प्रवेशद्वाराला हें 'साहित्यतोरण' बांधतांना कृतसंकल्प आज इतक्या यशस्वी रीतीनें तडीस जात आहे, हें पाहून आमचीं अंतःकरणें आनंदातिशयानें भरून येत आहेत. इतक्या थोड्या अवधींत एका कल्पनाबीजाचा प्रचंड वृक्ष होऊन त्यास मधुर फुलेंफळें आलेलीं पाहून कोणास धन्यता वाटणार नाहीं? खरोखर ही जी सेवा आमच्या हातून झाली ती केवळ 'शारदागुणें'च झाली असें आम्ही समजतों.

पण नुसती कल्पना कोणास येत नाहीं. कल्पनेप्रमाणें कार्य घडून येण्यास मात्र सहानुभूतीसारख्या अनेक प्रेरक गोष्टींची आवश्यकता असते. या सर्व गोष्टी ज्या-वेळीं एकत्र जमून येतात, त्या वेळीं कल्पनेचें कार्य सफल होतें. ही गोष्ट 'साहित्य-तोरण'च्या बाबतींतहि आम्हांस दिसून आली. प्रस्तुतसारखा ग्रंथ संपादित करण्याच्या कल्पनेस श्रीमंत युवराज सदाशिव रघुनाथ ऊर्फ भाऊसाहेब पंतसचीव यांचें सर्वतो-परी मोठें साहाय्य झालें आहे, ही गोष्ट आह्मां प्रजाजनांना अतीशय अभिमानाची वाटते. हा ग्रंथसंग्रह त्यांच्या मदतीनें निर्माण होणें हें त्यांच्या सुसंस्कृत व प्रगमन-शील मनाचें द्योतक आहे यांत शंका नाहीं. यामुळें आमच्या 'साहित्यतोरणा'चें सर्व श्रेय त्यांनाच दिलें पाहिजे असें आम्ही येथें मोठ्या आनंदानें नमूद करतों.

आमच्या संस्थानांत वाङ्मयसेवक किती आहेत व कितीजण साहित्यसेवा करावयास तयार होतील यांविषयीं प्रथम आम्ही बरेच साशंक होतों. प्रसिद्ध लेख-कांचीं काय तीं दहापांचच नांवें आरंभीं आमच्या दृष्टीपुढें आलीं. त्यामुळें आमचा संकल्प कसा काय सिद्धीस जातो याची आम्हांस विवंचनाच होती. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, आम्ही आपली योजना जाहीर करण्याचाच काय तो अवकाश, निर-निराळ्या दिशांनीं निरनिराळ्या स्वरूपांचे व निरनिराळ्या विषयांवरील हरतऱ्हांचे लेख येऊं लागले व ते इतक्या जलद येऊं लागले कीं, नाइलाजास्तव कांहींतरी स्थलमर्यादा व कालमर्यादा घालणें आम्हांस भाग पडलें. आम्ही जर अशी मर्यादा घातली नसती तर या संग्रहाची पृष्ठसंख्या हजारावर गेली असती, व आज पुस्तक रसिकांच्या हातीं देणेंहि शक्य झालें नसतें अशा अडचणींत सांपडल्यामुळें आम्हांस

कित्येकांचे लेख ते चांगले असतांना सुद्धां मोठ्या निरुपायानें मागें ठेवावे लागले, याबद्दल आम्हांस अत्यंत दिलगिरी वाटते. आमचा या कार्यापासून असा एक मोठा फायदा झाला आहे कीं, आतांपर्यंत संस्थानांतील विखुरलेला लेखकवर्ग एकत्र आणतां आला. सान्निध्यानें उज्ज्वल होणारी स्नेहज्योत आज स्पष्टतेनें प्रकाशमान झाली. संस्थानच्या छत्राखालीं उभें राहून साहित्याच्या क्षेत्रांत पुढें पाऊल टाकण्यास सर्वांसच नवी उमेद उत्पन्न झाली. या दृष्टीनें विचार करतां आमच्या श्रमाचें चीज झालें असें आम्हांस वाटतें.

भोर-संस्थानांतील लेखक–लेखिकांच्या या लेखसंग्रहाला प्रस्तावना लिहून आमच्या 'साहित्यतोरणा'ची ओळख करून देण्याचें सर्व श्रेय केसरीचे विद्वान संचालक व विशेषतः भोर संस्थानशीं अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध असलेले सुप्रसिद्ध साहित्य-सेवक श्रीयुत नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांना आहे. सदर प्रस्तावनेबद्दल आम्ही त्यांचे हार्दिक आभार मानितों. त्याचप्रमाणें सदर लेख-संग्रहां-करितां अत्यंत अनुरूप असें 'साहित्य तोरण' हें नांव सुचवून आम्हांला महत्त्वाची मदत केल्याबद्दल आमचे हितचिंतक सन्मित्र प्रो. श्रीकृष्ण निलकंठ ऊर्फ बापूसाहेब चापेकर यांचे मनःपूर्वक आभार मानणें हें आमचें कर्तव्य होय.

या संग्रहांतील लेखांचे कोणत्याहि दृष्टीनें अनुक्रम व वर्गीकरण न करतां ते जसजसे हातीं आले, तसतसे छापावयास दिले या पलीकडे आम्ही कांहीं केलें नाहीं. त्यामुळें कोणाचेहि लेख कोठें आले तरी त्याद्दबल लेखकांचा आमच्यावर रोष होणार नाहीं असें आम्हांस वाटतें. लेखांच्या विषयांबद्दल बोलावयाचें तर एकंदर लेखसंख्या ७७ असून त्यांचें वाङ्मयात्मक, कथात्मक वगैरे वर्गीकरण होऊं शकेल. तसें वर्गीकरण आम्ही विषयानुक्रमणिकेमध्यें दिलें असून शिवाय सोयीकरितां लेखकांची अकारविल्हेनें सूची दिली आहे. पुस्तकाला सर्वतोपरी प्रातिनिधिक स्वरूप यावें म्हणून कै. माधवानुज, कै. प्रो. हरि गोविंद लिमये. व कै. स. र. चित्रे यांचेहि लेख घेतले आहेत. अशा तऱ्हेनें प्रकृत ग्रंथास सर्वसंग्राहक स्वरूप प्राप्त झालें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. या लेखसंग्रहांतील कै. हरिभाऊ लिमये व कै. माधवानुज यांचे लेख दाभोळकर ग्रंथमाला व माधवानुज यांची कविता यांमधून घेतल्याबद्दल आम्ही त्या ग्रंथांच्या संपादकांचे ऋणी आहोंत.

यानंतरची महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमचे प्रजाहिततत्पर श्रीमंत सरकार

रघुनाथराव शंकरराव ऊर्फ बाबासाहेब पंडित पंतसचिव यांनीं प्रजावात्सल्यानें प्रेरित होऊन आम्हां सर्वांच्या राजनिष्ठेचा दर्शक असा हा वाङ्मयोपहार श्रीमंतांच्या चरणीं सादर करण्याची सुसंधी आणून दिली याबद्दल आम्ही श्रीमंत सरकारचे अत्यंत ऋणी आहोंत. त्याचप्रमाणें आमच्या विनंतीप्रमाणें लेखकांनीं लेख पाठवून हें पुस्तक मूर्त स्वरूपांत आणण्यास मदत केली, याबद्दल आम्ही सर्वत्रांचे आभारी आहोंत. विशेषतः ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध गुरुवर्य माधवरावजी मोडक यांनीं प्रकृतीचें अस्वास्थ्य असूनसुद्धां आपला लेख दिला, तसेंच प्रो. रंगाचार्य रड्डीशास्त्री, डॉ. वैद्य, प्रि. कुळकर्णी, न. र. फाटक वगैरे विद्वानांनीं वेळांत वेळ काढून आपापले लेख पाठविले याबद्दल त्यांचे आम्हीं आभार मानितों. या पुस्तकाच्या कामीं ज्या आमच्या अनेक स्नेह्यांनीं विशेषतः श्री. रा. प्र. कानिटकर, एम् ए., संपादक 'चित्रमयजगत्', पुराणरत्न शेषाद्रि गोविंद कानडे, एम्. ए. व श्रीयुत गजाननराव सबनीस यांनीं जी निरपेक्षपणें मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. सरतेशेवटीं मुंबईचे सुप्रसिद्ध चित्रकार कृ. र. केतकर, ए. एम. यांनीं तोरणाचें सुबक व कल्पक चित्र तयार करून देऊन ग्रंथाच्या बाह्यांगास शोभा आणली याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत.

भोर<br>
रामनवमी शके १८५४

ना. म. शिंदे<br>
ना. वि देव<br>
संपादक.

# प्रकाशकाचे चार शब्द

भोर संस्थानांतील लेखकांच्या साहित्यानें सजलेलें हें साहित्य-तोरण आजच्या रामनवमीच्या सुमंगलदिनीं प्रगट होत आहे याबद्दल साहित्य-तोरणांतील लेखकांप्रमाणेंच प्रकाशकालाहि आनंद आणि समाधान वाटत आहे. 'तोरण्या'जवळच्या परमपावनभूमींत आजच्या या मंगल प्रसंगीं आमच्या साहित्याचें हें तोरण लागतें कीं नाहीं याबद्दल प्रकाशकालाहि संदेह वाटत होता; पण श्रीरामप्रभूच्या कृपेनें आणि अनेक साहाय्यकांच्या सहकार्याच्या भावनेनें आज हें साहित्य-तोरण श्रीरामदरबारांत उभारलें जात आहे.

साहित्य-तोरणाच्या प्रकाशनासाठीं जर खरोखरच कोणाला अधिक परिश्रम आणि त्रास पडला असेल तर ते आमचे चिरपरिचित मित्र आणि एका वेळचे सहकारी श्री. स. रा. सरदेसाई यांनाच होय. त्यांनीं आत्मियतेनें रात्रीचा दिवस करून मुद्रणकार्य केलें म्हणून आज हा 'ग्रंथराज' इतक्या अल्पावधींत छापून झाला. म्हणून येथें त्यांचे जाहीर रीतीनें आभार मानणें हें आमचें कर्तव्य आहे. साहित्य-तोरणाचीं निरनिराळीं अंगें-उपांगें नीट रीतीनें सजवितांना आम्हांस कित्येक मित्रांचें ऋणी व्हावें लागलें आहे. त्यांतच श्री. शंकरराव जोशी ( चित्रशाळा ), श्री. ग. म. वीरकर (गणेश महादेव आणि कंपनी) श्री. रा.गो. पोतनीस (ब्लॉक मेकर्स) आणि तिरंगी चित्रें तयार करून देणारे चित्रकार श्री. केतकर यांचा येथें प्रामुख्यानें उल्लेख करणें जरूर आहे.

सदर ग्रंथ छापतांना कल्पनातीत घाई झाल्यामुळें कांहीं ठिकाणीं थोडेसे मुद्रणदोष राहिले आहेत त्यांबद्दल सहृदय वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

हें साहित्य-तोरण रसिकांच्या आदरास प्राप्त होवो, अशी श्रीशारदाचरणीं विनंति आहे.

ता. १५-४-३२
५४ शुक्रवार, पुणें

(स्वाक्षरी)

भोरसंस्थानाधिपति

श्रीमंत सरकार रघुनाथराव शंकरराव

ऊर्फ

बाबासाहेब पंडित पंतसचिव

यांचे

प्रजावात्सल्य, विद्वज्जन-गुणग्राहकत्व, सौजन्य, विद्या-
भिरुचि, साहित्यप्रेम वगैरे गुणांवर लुब्ध होऊन
आम्ही, भोर-संस्थानांतील नम्र
साहित्य-सेवक हा

साहित्योपाहार

श्रीमंतांचे चरणीं सादर समर्पण करीत आहोंत.



अस्मदीयैर्लेखकैर्यद्राचितं नवतोरणम् ।
मयात्र पूज्यपितृभ्यः पश्यतोति समर्पितम् ॥

स. र. पंतसचिव. चैत्र शु० ९ शके १८५४

स. ग्रं. नं. ९७५४१३२

# प्रस्तावना

मी या ' साहित्य-तोरणा'ला आज प्रस्तावना लिहावयास बसलों तों, अपूर्व असाच एक अनुभव मला आला. तो हा कीं, नेहमींप्रमाणें पुस्तकाच्या नांवावरून लक्ष घसरून तें त्यांतील विषयविवेचनांत एकदम घुसावयाचें, तसें न होतां माझें लक्ष या पुस्तकाच्या नांवावरच कितीतरी वेळ खिळून बसलें. याचें कारण खरो-खरच ' साहित्य–तोरण ' हें नांव मोठें मनोहर आहे. असल्या पुस्तकांना नांवें दिलीं जातात तीं, प्रायः मुलांच्या बारशाला ठेवलेल्या नांवासारखीं, केवळ आईबापांच्या शब्दमाधुर्याच्या अभिरुचीचीं द्योतक असतात. म्हणजे तीं सहसा सार्थ किंवा सूचक नसतात. मुलांचीं नांवें सार्थ नसतात याचें कारण उघडच आहे. कां कीं, नांव ठेवलेल्या मुलाचे गुण प्रगट होऊन, त्या गुणांच्या विकासानें त्या मुलाच्या जीवनाचा बनाव बनावयाचा तो पुढेंच असतो. नांवाचा व गुणांचा मेळ कितपत पडला, हें मुलाची जीवनयात्रा समाप्त होण्याच्या वेळींच खरें ठरावयाचें ! बरें, नांव सूचक असावें म्हटलें तरी अडचणच. आईबापांना मुलगा सर्वगुणसंपन्न असावा असें वाटतें. पण त्यांतला कोणता गुण त्याजमध्यें विशेष प्रगट होईल, याचें भविष्यज्ञान त्यांना नसतें. आणि सर्व सद्गुण सारख्याच मोलाचे असल्यामुळें त्यांतला कोणता निवडून पसंत करावा याचीहि त्यांना पंचाईतच पडणार. म्हणून एका जुन्या लोकभ्रमात्मक समजुतीप्रमाणें तो मुलगा जगावा, वाचावा एवढ्याच बुद्धीनें, म्हणजे त्याच्या आयुष्याचा एक प्रकारें विमा उतरण्याचा भोळा श्रद्धाळूपणाचा तोडगा करण्याकरितां, 'दगड्या' 'धोंड्या' असलें वाईट नांवहि ते मुद्दाम ठेवतात. किंवा सर्व भार देवावर टाकल्यासारखें करून एखाद्या आवडत्या देवाचें तरी नांव ठेवतात. तात्पर्य, अशा दुहेरी कारणांमुळें पाळण्यांत ठेवलेलीं मुलांचीं न वें सार्थ किंवा सूचक असूं शकत नाहींत.

पण प्रस्तुत पुस्तकाला ठेवण्यांत आलेलें **'साहित्य-तोरण'** हें नांव व त्यांतल्या त्यांत ' तोरण ' हा शब्द, सार्थ व सूचक अशा दोन्ही प्रकारचा साधला आहे. निदान मला तरी तें नांव तसें भासतें, मग योजकांचा विचार कसाहि असो. तोरण या शब्दांत मंगलमय भावना खेंचून भरलेल्या आहेत. घरीं शुभकार्याकरितां मंडप घाला किंवा न घाला, प्रवेशद्वाराशीं तोरण हें बांधलेंच पाहिजे आणि मग सर्व कार्य

होईपर्यंत, कार्यसिद्धीला नेण्याला व त्यांत अंशभागी होण्याला जमलेल्या सर्व स्त्री-पुरुषांनीं, बालवृद्धांनीं, त्या तोरणाखालूनच जावयाचें असतें. तोरणांच्या रचनेंत शोभेच्या व सुखानंदाच्या कल्पनांकडे दृष्टी दिलेली असते. शहरगांवांतलीं तोरणें केव्हां जरतारी तर केव्हां मखमली असतात. केव्हां तीं निव्वळ आरसपानी असतात, तर केव्हां त्यांत चित्रांचा कुशलपणानें उपयोग केलेला असतो. केव्हां त्यांत मुग्धार्थ-व्यंजक वेलबुट्टी असते, तर केव्हां त्यांत स्पष्टार्थदर्शक बोधवचनें किंवा आशीर्वचनें लिहिलेलीं असतात. याच्या उलट बिचाऱ्या खेडेगांवांतल्या तोरणांना असल्या श्रीमंतीचीं किंवा संस्कृतीदर्शक अशीं साधनें कोठून मिळणार ? म्हणून तेथील तोरणें केव्हां निव्वळ केळीच्या खांबांचीं, तर केव्हां पालेदार उंसाचीं, केव्हां गव्हातांदळांच्या लोंब्यांचीं तर केव्हां नुसत्या आंब्यांच्या फळाटहाळ्यांचीं असतात. पण हीं दुसऱ्या प्रकारचीं तोरणेंहि पहिल्या प्रकारच्या तोरणांना हार जाणारीं नव्हत. कारण पहिलीं तोरणें केवळ डोळ्यांना आनंद देणारीं असलीं, तर हीं दुसरीं प्रथम डोळ्यांना आनंद तर देतातच पण त्यांचें तें कार्य संपल्यावर जिव्हेलाहि आनंद देतात. असो. मुद्दा इतकाच कीं, तोरण म्हटलें म्हणजे ती आनंद व सौख्य देणारी अशीच एक वस्तु आहे.

'तोरण' या नांवाचें दुसऱ्या एका दृष्टीनें औचित्य वाटतें तें असें कीं, तोरण उभें करण्यास कारणीभूत झालेल्या मंगल प्रसंगीं जसे अनेक प्रकारचे लोक एकत्र जमलेले दिसतात व तोरणाखालून जातात, तसेंच या पुस्तकांत अनेक प्रकारचे लेखक एकत्र येऊन कार्यव्यापृत झालेले आढळत आहेत. मंगलकार्याचा प्रकारच असा असतो कीं, तें साजरें करणारांची हौस, शक्य तितके आपले आप्त, इष्ट, स्नेही व ऋणानुबंधी एकत्र केल्याशिवाय, भागत नाहीं. असतीलनसतील ते नात्यागोत्याचे संबंध या वेळीं आठवतात. आणि उलट हे संबंधीहि असेंच मानितात कीं, ही वेळ अशीच आहे कीं जेव्हां आपण जाऊन हजर राहून, आणि यथाशक्ति अहेर करून, मंगलकृत्य उभें करणाराचा आनंद वृद्धिंगत करावा. आपलेपणाची भावना केव्हांहि कोणीहि प्रगट केल्यास उभयपक्षीं बरेंच वाटतें. प्रस्तुत पुस्तकाला आधार आपलेपणाचाच घेतलेला असून, त्या आधारावर त्यांतील सर्व लेखक अधिष्टित झाले आहेत. मात्र हा आधार नांवाचा नसून स्थानाचा आहे, व हें स्थान म्हणजे भोर संस्थान हें होय. फार जुन्या काळीं कुल व गोत्र हीं आपलेपणाची मर्यादा असे. स्थानमर्यादा ही त्यानंतरची होय. पण हल्लींच्या व्यापक दृष्टीनें कुलाभिमानापेक्षां देशाभिमान हाच

अधिक प्रशस्त, व्यवहार्य व श्रेयस्कर असा मानण्यांत येतो. या पुस्तकांत पांचपन्नास आडनांवांचे लेखक आहेत. त्यांचीं एकंदर गोत्रें अर्थात् कमी भरतील. कारण त्यांत एकेका गोत्राचे अनेक असतील. पण जें समानाधिष्ठान नांवाला किंवा गोत्राला इतक्यांना पुरवितां आलें नसतें तें देशानें पुरविलें आहे. " कां हो, भोर संस्थान हें तुमचें कसें ? " असा प्रश्न या अनेक लेखकांना केला तर त्याचीं निरनिराळीं उत्तरें मिळतील. अर्थात् हीं इतकीं उत्तरें म्हणजेच भोर संस्थान उत्पन्न करूं शकतें असे हे निरनिराळे संबंध होत. असे प्रश्न व अशीं उत्तरें होण्यास दुतर्फी आपले-पणाची भावना लागते; व या पुस्तकाचे योजक व त्यांतील लेखक या दोघांनींहि ती दाखविल्यामुळें हें पुस्तक सिद्ध झालें आहे. भोर संस्थानचे अधिपति व युवराज यांना इतक्या अनेक रसिक व विद्वान लोकांनीं आपलेपणाच्या भावनेचा व प्रेमाचा जो हा करभार दिला, तो त्यांच्या राजकीय प्रजेनें दिलेल्या नित्य किंवा नैमित्तिक करभारापेक्षां खचित अधिक स्पृहणीय वाटेल!

या पुस्तकाच्या नांवांतील 'तोरण' या नांवानें आणखीहि एक कल्पना सुचते म्हणून तिचाहि उल्लेख करितों. ती अशी कीं, तोरण हें नांव 'तोरणा' या सुप्रसिद्ध किल्ल्याच्या नांवावरून सुचलें असावें. तसें असल्यास सहृदयत्वाबद्दल ग्रंथयोजकांचें अभिनंदनच केलें पाहिजे. आणि तसें नसलेंच तरीहि मी सुचविलेली कल्पना अप्र-योजक ठरत नाहीं. तोरणा किल्ला हस्तगत करून श्रीशिवाजीमहाराजांनीं आपल्या स्वराज्यस्थापनेची मुहूर्तमेढ रोंवली असें इतिहास सांगतो. आणि त्याला जुन्या कागदोंपत्रीं स्पष्ट आधार मिळत नसला तरी, ती गोष्ट सर्वस्वी संभाव्य अशीच आहे. कारण आधीं तोरणा घेऊन मग राजगड घेण्याऐवजीं आधीं राजगड घेऊन मग महा-राजांनीं तोरणा घेतला असेल इतकाच काय तो फरक. पण दोन्ही किल्ले इतके जवळ-जवळ आहेत कीं महाराजांनीं आगेमागें कां होईना ते हस्तगत केले होते यांत शंका नाहीं. राजगड किल्ला ही तर शिवाजीमहाराजांनीं स्थापलेल्या स्वराज्याची पहिली राजधानीच होती! आणि खचित भोर संस्थानचें भाग्य थोर म्हटलें पाहिजे; कां कीं, या संस्थानच्या मुलुखांतच हिंदवी स्वराज्याचें पहिलें तोरण बांधलें गेलें व पहिली राजधानी स्थापली गेली.

मराठी स्वराज्याप्रमाणें भोर-संस्थानचा मराठी साम्राज्याशींहि संबंध पोहोंचतो. कारण भोरकर हे स्वराज्यांतल्या प्रधानमंडळांतले सचिव होते व भोरकर हेच

पुनः दिल्लीच्या बादशहांपासून शाहुमहाराजांना चौथाईसरदेशमुखीच्या सनदा मिळवून देण्याच्या कामीं यशस्वी मध्यस्थ झाले. शहाजीमहाराजांची जुनी जहागिर कांहीं भोर संस्थानच्या हद्दींत होती. तसेंच श्रीरामदासांच्या तपोनुष्ठानाची घळहि याच हद्दींत आहे. तात्पर्य, जुन्या व स्मरणयोग्य अशा मराठीस्वराज्याचा संबंध भोर संस्थानाशीं कितीतरी रीतींनीं निगडित झालेला आहे. म्हणून तोरण्याची आठवण करून देणारा तोरण हा शब्द या पुस्तकाच्या नांवांत फार चांगला पडला आहे असें मला वाटतें.

असो. या लेखसंग्रहांतील सर्व लेख वाचनीय आहेत. ज्यानें त्यानें आपला लेख-विषय हौसेनें निवडलेला दिसतो व त्याचें विवेचनहि परिश्रमपूर्वक केलेलें आहे. कांहीं स्थलवाचक कालवाचक नामवाचक प्रसंग साधून वाङ्मय-खंड-संग्रह छापण्याची टूम अगदीं अलिकडे निघालेली असली तरी ती चांगली फैलावली आहे. तिजमुळें साहित्य-संबंधीं उपसंमेलनाचें काम होतें. मराठी वाङ्मयाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असल्यानें, दरवर्षी कोठेंतरी सर्व महाराष्ट्राचें मिळून एक साहित्य संमेलन भरण्यानें त्या व्यापाचा निर्वाह लागणें शक्य नाहीं. अर्थात् अधिकारविभागणीप्रमाणें कार्य–विभागणी झालीच पाहिजे. मी तर, या ' साहित्य–तोरण ' ग्रंथाच्या रूपानें हें एक पउ साहित्य-संमेलनच भोर येथें भरत आहे असें समजतों व तें यशस्वी होवो अशी प्रार्थना श्रीरामचरणीं करितों.

पुणें

नरसिंह चिंतामण केळकर

# अनुक्रमणिका

## १. कथात्मक [ ९ ]


आतां पुढें काय ? ( ग. ह. काळे ) ... ... ... २६९
कलेची कला ( स. वि. पुरोहित ) ... ... ... १६९
खरें सौंदर्य ( सौ. ताईसाहेब पुरंदरे ) ... ... ४३६
लक्ष्मीपूजन ( वि. बा. आंबेकर ) ... ... ... ४६०
वर्तुलाचें वर्चस्व ( न. का. बावडेकर )... ... ... २९८
विद्युलाप्रबोध ( गो. वि. चिपळूणकर ) ... ... २२०
सजीव मनुष्याचा यमलोकीं प्रवास (सौ. मालतीबाई भिडे)... ५५०
समाचार ( वा. वि. जोशी ) ... ... ... ८२
हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं
( डॉ. कमलाबाई देशपांडे ) ... ... ... ५६८


## २. कविता [ १० ]


उषा ( विपिनविहारी ) ... ... ... ... ८०
कृष्णाकोयनासंगम ( माधवानुज ) ... ... ... ४५४
फुलांची हौस ( डॉ. वा. रा. दिवेकर ) ... ... ५४३
“ मम सुमन मृत्युच्या द्वारीं ” (कु. कृष्णाकुमारी डबीर) ... २९६
माझा प्रणाम ( श्री. के. भिडे ) ... ... ... ६२६
मार्गप्रतीक्षा ( अ. ह. जोशी ) ... ... ... ३९३
वीरपत्नी येसूबाई पंतसचिव ... ... ... १२८
शारदास्तवन ( मा. ना. आचार्य ) ... ... ... १
शुकास ( के. का. आंबेकर ) ... ... ... १६३
सुधागडवर्णन ( वा. पु. डोंगरे ) ... ... ... ४७३


## ३. चरित्रात्मक [ ५ ]


इतिहाससंशोधक राजवाडे ( ल. मा. देवी ) ... ... १५८

जॉर्ज बर्नार्ड शॉ ( मा. का. देशपांडे )... ... ... ३२५
सौ. वत्सलावहिनी यांचा अल्प परिचय (ना. वा. महाजनी)... ५७९
सरदार वीररत्न बाजी प्रभू देशपांडे व त्यांचे वंशज
( स. र. चित्रे ) ... ... ... ... ४९३
हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचा दुवा अर्थात् संत कबीरदास
( न. र. फाटक ) ... ... ... ... ५११

## ४. चर्चात्मक [ १० ]

आधुनिक कवितेचें नवीन वळण ( रा. प्र. कानिटकर ) ... ३०३
आपली विवाहसंस्था ( बा. पां. पागे )... ... ... ३९०
प्रचलित कायद्यांचा नीतीवर परिणाम (वा. स. पाटणकर) ... १९७
रवींद्रवाङ्मयांतील स्त्रीस्वभावपरिपोष (रा. गो. कानडे) ... ६४४
रसामोद ( प्रो. रंगाचार्य रड्डी ) ... ... ... ६३२
वतन विरुद्ध वेतन ( बा. मा. आंबेकर ) ... ... ४४५
विडंबन काव्य ( दि. वि. देव ) ... ... ... ६०४
शाहीर कवि व राष्ट्रीय कवि ( ना. म. भिडे ) ... ... ६५३
श्रेष्ठपुरुषमीमांसा ( ल. के. भावे ) ... ... ... ११९
हरिभाऊंची बालसृष्टी ( वा. ना. देशपांडे ) ... ... १८५

## ५. तात्त्विक [ ९ ]

अर्जुनाचें अज्ञान व कर्मयोग ( म. ह. मोडक )... ... २
आपला धर्म ( पु. र. आवस्थी ) ... ... ... ५६५
एकराष्ट्रीयत्वाची कल्पना ( चिं. द. आंबेकर ) ... ... ५४५
देवत्वविकास हेंच मानवी जीविताचें साध्य
( ग. धों. देशपांडे ) ... ... ... ... ४९९
ध्येयनिष्ठा ( त्रिं. का. मोडक ) ... ... ... ३४
नीतिबोध ( सौ. राधाबाई भिडे ) ... ... ... ३४९
प्रेममीमांसा व कौटुंबिक सुख ( न. न. भावे ) ... ... २१३
राजाभाऊंची त्राटिका ( के. रा. दिवेकर ) ... ... २२९
विदुराच्या कण्या ( चं. गो. आगाशे ) ... ... ६४२

६. प्राचीन वाङ्मयात्मक [ ५ ]

आमचीं पुराणें ( वा. पां. ठकार ) ... ... ... ३८
ऋग्वेदांतील औषधींचीं १०७ धामें ( महा म० सीतारामशास्त्री) १११
कृत्तिवासी रामायण ( वि. के. सामक ) ... ... २७७
प्राचीन प्रजासत्ताक राज्यें व त्यांचीं राज्यघटना
( शं. वि. बावडेकर ) ... ... ... ... ५०
वात्स्यायन कालीन आदर्शभूत गृहिणी (प्र. धों. कानिटकर)... १४०

७. भाषाविषयक [ ३ ]

अपभ्रंश भाषा आणि ज्ञानेश्वरीपूर्वकालीन अपभ्रंश वाङ्मय
( डॉ. प. ल. वैद्य ) ... ... ... ... ४०८
मराठी व संस्कृत ( गो. कृ. मोडक )... ... ... ९४
विष्णुशास्त्री चिपळुणकरांची लेखनशैली ( ग. मा. पानसे )... ४५५

८. ललितकलात्मक [ ६ ]

अध्यात्म व ललितकला ( शे. गो. कानडे ) ... ... ४७६
आमची चित्रकला ( कृ. र. केतकर )... ... ... ३४४
काव्यप्रवेश ( मा. ना. आचार्य ) ... ... ... ३७४
नाटकांतील संगीत ( शं. बा. आंबेकर ) ... ... २०६
साहित्य आणि संगीत ( रा. ब. आठवले ) ... ... ४२०
सौंदर्यमीमांसा ( ना. वि. देव ) ... ... ... ३०९

९. वर्णनात्मक [ १० ]

दोघां साधुपुरुषांच्या समागमांत ... ... ... ६६५
वि. गो. भिडे; सौ. वत्सलाबाई कानडे; वि. ब. देशपांडे; अ. कृ.
गांडेकर; ग. मा. पानसे; शं. र. दबडगे ) ... ...
पॅरिसजवळील दोन राजवाडे ( शं. स. महाशब्दे ) ... ६२७
भोरसंस्थान-परिचय ( स. भ. भिडे )... ... ... ६१२
भोर संस्थानांतील लेखक व कवि ( गो. म. भिडे ) ... ५१९
युरोपांतील मौजा ( दि. द. क्षीरसागर ) ... ... ५९६

रणजितसिंगाची राष्ट्रीय फौज ( कै. प्रो. इ. गो. लिमये ) ... ५५६
विसाव्या शतकांतील नमुनेदार ग्रंथालय (र. श. पारखी) ... ३६०
सिंधी स्त्रियांची रहाणी ( सौ. सरलाबाई जोशी )... ... १७५
सुवेझ कालवा कंपनीचा कारभार ( अ. रा. जोशी ) ... ३५२
हिंदी सैन्याची घटना ( लेफ्टनंट रा. ह. लिमये ) ... ५७२

## १० शास्त्रीय [ ३ ]

आजचें आरोग्य ( पु. पां. भडकमकर ) ... ... ४८८
आयुर्वेदाचें वैशिष्ट्य ( पां. ह. देशपांडे ) ... ... ३३४
भारतीय धर्मशास्त्राचें वैशिष्ट्य (वासुदेवशास्त्री कोनकर ) ... ३९५

## ११. शैक्षणिक [ ८ ]

खेडीं कशीं सुधारतील ? ( गो. रा. लिमये ) ... ... ६२३
खेड्यांतील प्राथमिक शाळा ( वा. ना. जोशी ) ... ... ५४७
ग्रामोद्धार ( रा. स. पुरंदरे ) ... ... ... ३६९
बालवीर ( मो. ना. नातू )... ... ... ... ५८९
मद्रासची एक व्यायाम संस्था ( गो. श्री. नेने ) ... ... ६३०
विद्यार्थिनी व गृहिणी ( सौ. स्नेहलताबाई जोशी ) ... ४०२
शारीरिक शिक्षणाची आवश्यकता ( न. गो. आंबेकर ) ... ५६१
शिक्षणांतील दोन मुख्य दोष ( त्रिं. आ. कुलकर्णी ) ... १६४

---

# ग्रंथकारनामसूची


चिं. गो. आगाशे ६४२
मा. ना. आचार्य १,३७४
रा. ब. आठवले ४२०
के. क. आंबेकर १६३
चिं. द. आंबेकर ५४५
न. गो. आंबेकर ५६१
बा. म. आंबेकर ४४५
वि. बा. आंबेकर ४६०
शं. बा. आंबेकर २०६
पु. र. आवस्थी ५६५
रा. गो. कानडे ६४४
शे. गो. कानडे ४७६
सौ. वत्सलाबाई ,, ६६७
प्र. धों. कानिटकर १४०
रा. प्र. कानिटकर ३०३
ग. ह. काळे २६९
त्रिं. आ. कुलकर्णी १६४
कृ. र. केतकर ३४४
वा. वि. कोनकर ३९५
दि. द. क्षीरसागर ५९६
अ. कृ. गांडेकर ६६८
स. र. चित्रे ४९३
गो. वि. चिपळूणकर २२०
अ. र. जोशी ३९३
अ. वा. जोशी ३५२
वा. ना. जोशी ५४७
वा. वि. जोशी ८२
सौ. सरलाबाई जोशी १७५
सौ. स्नेहलताबाई ,, ४०२
बा. पां. ठकार ३८
कु. कृष्णाकुमारी डबीर २९६
वा. पु. डोंगरे ४७३
शं. रं. दबडगे ६६९
दि. वि. देव ६०४
ना. वि. देव ३०९
के. रा. दिवेकर २२९
वा. रा. दिवेकर ५४३
ल. मा. देवी १५८
डॉ. कमलाबाई देशपांडे ५६८
ग. धों. देशपांडे ४७९
पां. ह. देशपांडे ३३४
मा. का. देशपांडे ३२५
वा. ना. देशपांडे १८५
वि. ब. देशपांडे ६६७
मो. ना. नातू ५८९
गो. श्री. नेने ६३०
बा. पां. पागे ३९०
वा. स. पाटणकर १९७
गं. मा. पानसे ४५५
र. शं. पारखी ३६०
सौ. ताईसाहेब पुरंदरे ४३६
रा. स. पुरंदरे ३६९
स. वि. पुरोहित १६६
न. र. फाटक ५११
न. का. बावडेकर २९८
शं. वि. बावडेकर ५०
पु. पां. भडकमकर ४८८
ना. न. भावे २१३
ल. के. भावे ११९
गो. म. भिडे ५१९
ना. म. भिडे ६५३
सौ. मालतीबाई भिडे ५५०
सौ. राधाबाई भिडे ३४९
वि. गो. भिडे ६६७
श्री. के. भिडे ६२६
स. म. भिडे ६१२
ना. बा. महाजनी ५७९
शं. स. महाशब्दे ६२७
माधवानुज ४५४
गो. कृ. मोडक ९४
त्रिं. का. मोडक ३४
म. ह. मोडक २
रंगाचार्य रड्डी ६३२
गो. रा. लिमये ६२३
लेफ्ट. रा. ह. लिमये ५७२
ह. गो. लिमये ५५६
विपिनविहारी ८०
प. ल. वैद्य ४०८
वि. के. सामक २७७
सीतारामशास्त्री ११९

प्रेमग्रन्थियुतं बद्धमिदं साहित्यतोरणम् ।
प्रेमरज्जुनिबद्धानां संभवेद्धि कुतो रणम् ॥


साहित्यतोरण
तोरण

# साहित्य-तोरण

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ८२८७
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. नि. नं. [redacted]
ता. ३०/५/३२
ठाणे

पुस्तक भेट

ना. क्र. ६४८७
सं. नि. नं. [redacted]

# शारदास्तवन

कवि—मा. ना. आचार्य

( चालः—चुनरिया दे दे मोरी० )

नमन त्या शारदेला । विविधाकारीं नटवुनि विलसवि
एकचि जी वाक्‌चतुष्टयाला ॥ धृ० ॥
श्रुतिस्मृतींसह शास्त्रपुराणें । प्रगट जगीं या जिच्या कृपेनें ।
यथार्थ ती वर्णवे कुणाला ॥ १ ॥
शुभ्रवसन कीं करधृतवीणा । ही व्यवहारीं रम्य कल्पना ।
अगम्य परि तत्त्वतां मनाला ॥ २ ॥
रूपधरा वा रूपातीता । त्रिकालज्ञ ती अक्षरमाता ।
स्फूर्तिकरी हो सकळजनांला ॥ ३ ॥
प्रबंध रसमय-समाराधनीं । शब्दागारद्वार विवरणीं ।
प्रार्थितसों त्या महेश्वरीला ॥ ४ ॥
विद्वज्जनयुत भूपतिनंदन । इच्छि शब्दमय नवनंदनवन ।
सफल करो ती शुभेप्सिताला ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
ना. क्र. ४६०५
ग्रंथ शाखा

# अर्जुनाचें अज्ञान व कर्मयोग

**प्रपन्नपारिजाताय। तोत्रवेत्रैकपाणये।**

**ज्ञानमुद्राय कृष्णाय। गीतामृतदुहे नमः ।।**

लेखक : **महादेव हरी मोडक**, बी. ए.; पडघवली.

[ यांचा जन्म सुधागड तालुक्यांत पडघवली येथें सन १८६४ सालीं झाला. न्यू इंग्लिश स्कूलमधून सन १८८४ सालीं प्रवेश परीक्षा पास झाले व त्याच वर्षीं स्थापन झालेल्या फर्ग्युसन कॉलेजमध्यें पी. ई.चा अभ्यास केला. पुढील दोन वर्षें डेक्कन कॉलेजमध्यें काढून १८८६ सालीं बी. ए. झाले. त्यानंतर तीन वर्षें मुंबईस लॉ टर्म्स भरण्यांत घालविलीं. पण हवा न मानवल्यामुळें तेथून नगर हायस्कूलमध्यें कांहीं दिवस अध्यापक म्हणून व इतर ठिकाणीं खाजगी शिक्षक म्हणून होते. यांनीं लिहिलेलीं पुस्तकें:—भारताचें—( सुरस मराठी भाषांतराचें ) ग. वि. चिपळूणकर कंपनीचें—सुमारें एकतृतीयांशचें भाषांतर; सुख आणि शांति; खडे तात्त्विक बोल; लँब्स टेल्सचा मराठी तर्जुमा असलेलें नाट्यमकरंद. सध्यां हे पडघवलीसच राहतात. ]

या चतुःखंड पृथ्वीतलावर आजपर्यंत अनेक धर्मस्थापक होऊन गेले व अशांनीं आपापल्या अनुयायांचे उन्नत्यर्थ केलेले बोधग्रंथ त्या त्या स्थानीं विद्यमान असून त्यांचे अनुयायी त्या ग्रंथांस पूज्य व पवित्र मानितात, हें उचितच आहे. तथापि द्वापरांतीं कुरुक्षेत्राचे रणगर्जनेंत प्रत्यक्ष पूर्णावतार श्रीकृष्ण परमात्म्यांनीं आपले भक्त अर्जुनाला सांगितलेला बोध ऊर्फ श्रीमद्भगवद्गीता या ग्रंथासारखा सर्व प्रकारें अद्भुत ग्रंथ अखिल भूतलावर—नव्हे, त्रैलोक्यांत म्हटलें तरी चालेल—तत्पूर्वीं झाला नव्हता व पुढेंहि होणार नाहीं. या ग्रंथाचे अखेरीस संजयानें जें म्हटलें आहे—“ राजन् संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतं। केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ”—तें अक्षरशः खरें आहे. प्रस्तुत लेखकाला तरी या ग्रंथाचें अद्भुतत्व अनेक प्रकारें दिसतें—

१. इतर सर्व धर्मग्रंथ, ज्ञानग्रंथ अत्यन्त प्रशान्त अशा काळींस्थलीं लिहिले किंवा बोलले गेलेले आहेत, व कित्येकांतील संवादरूप शिष्यप्रबोधनार्थ म्हणून कल्पित असतें. परंतु प्रस्तुत संवाद हा कल्पित नसून खराखुरा

घडलेला. पण कोठें? नैमिषारण्यांत किंवा काम्यक वनांत नसून रणधुमाळीनें दशदिशा दुमदुमून गेलेल्या, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत म्हणतात तशांतली एकच गर्दी माजून राहिलेली, अशा परिस्थितींत; व स्थान तरी एकान्त? तेंहि नाहीं—दुचाकी रथ—आणि तेथें हा तास सव्वातासांचा शंकासमाधानरूपी संवाद! ही गोष्ट एका योगेश्वरासच साध्य! इतकें ऐकाग्र्य आणि तेंहि केवळ उन्मनी स्थितींतलें नव्हे, जागृतींत, दुसऱ्याशीं बोलत असतां—नव्हे, खंडनमंडनात्मक भाषण करितांना इतकें ऐकाग्र्य हें पुरुषोत्तम नारायण व नरोत्तम अर्जुन यांसच शक्य आहे.

२. बरें, अशा या घाईगर्दींत निपजलेला हा ग्रंथ तात्पुरत्या कामाचा का? मुळींच नाहीं. तो इतका सुपूर्ण कीं, खुद्द भगवंतांनींच अनुगीतेचे आरंभीं अर्जुनालाच सांगितलें कीं, मला तूं पुनः गीतेंतला बोध त्याच शब्दांनीं सांगा म्हणतोस, पण तें कालत्रयीं शक्य नाहीं. वेळेचे गुणानें बनून गेली ती गेली. पुनः ती होणें नाहीं. भगवंतांनीं सप्तमाध्यायांत अर्जुनाला म्हटलें कीं, "ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः। यज्ज्ञात्वा नेहभूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते।" तें अक्षरशः खरें आहे. गुरुजींनीं आपली सर्व जडीबुट्टी आपल्या प्रिय शिष्याच्या स्वाधीन केली आहे खास. या जडीबुट्टीसंबंधांत गुरुजीच वराहपुराणांत पृथ्वीला सांगतात, "गीता मे परमा विद्या ब्रह्मरूपा न संशयः। अर्धमात्राक्षरानित्या स्वानिर्वाच्यपदात्मिका॥ गीताज्ञानमुपाश्रित्य त्रींल्लोकान्पालयाम्यहम्॥" हें किती कितीवार म्हणून सांगावें? इतकें अकपट वर्तन एका जगत्पित्याचेंच. लौकिकी पिते तोंडानें 'आत्मा वै पुत्रनामासि' म्हणून कितीहि म्हणाले, तरी कुडींत प्राण आहे तों अशेष गुह्य पुत्राला सांगणारे विरळ. पण येथें तसला कप्पा खिसा नाहीं. एकदां आपला म्हटला कीं, त्याला प्रति-आपण करून सोडणें हें येथील अनन्यसाधारण औदार्य. श्रीसद्गुरु नृसिंहसरस्वतीमहाराजांनीं म्हटलें आहे, "देऊनि निजसुख पदवी। कृतार्थ करूनी भक्तिलावी। त्रैलोक्यांमाजिं गोसावी। तोचि एक॥" अर्जुनाला आपला

म्हटला, तेव्हां अर्जुन हा फाल्गुन होता, पण अखेर त्याला धनंजय करून सोडिला, नव्हे, कृष्ण बनविला.

३. हिचे अद्‌भुतत्वाची किंवा अपवादात्मक स्वरूपाची तिसरी निशाणीः हिला 'अंब त्वामनुसंदधामि भगवद्गीते **भवद्वेषिणीं**' असें म्हटलें आहे. गीतेला 'अंब' (माता) म्हटलें आहे. ठीकच; पण तिचें वैलक्षण्य असें कीं, ती संसाराचा उच्छेद करूं पाहते आणि लौकिकी माता संसाराचा विस्तार इच्छितात. पण ही संसारावर घाव घालणारी असून ती तिच्या जन्मापासून आजवर अधिकाधिक प्रिय होते आहे. डॉन क्विसोनें आपल्या ग्रंथाविषयीं म्हटलें आहे:—

"Children thumb it, boys read it, men understand it, old folks admire it."

त्याचप्रमाणें पोर थोर, जाणते अजाणते, आबालवृद्ध आपापल्यापरी या मातेचे प्रेमी आहेत. यांहिपेक्षां एका गीताप्रेमी गृहस्थाचें स्तोत्र गीतेचे अद्‌भुतत्वाची अथवा लोकोत्तरत्वाची साक्ष अधिकच पटवीत आहे. यास्तव वाचकांची माफी मागून त्याचा पूर्ण उतारा देतों:--

The song celestial, the Bhagvadgita, *is the one book* in which every human being, from the lowest to the highest, the acutest as well as the most superficial thinker, the young and the old, the saint and the sinner, the wealthy and the poor, the man who works for others and the one who works for himself, the pure and the passionate, the devotee, the student, the philanthropist, the searcher after comfort and the searcher after wisdom, the philosopher and the irreligious, the lover of the world and the lover of God, he who tries to live in the noumenon and he who lives in the phenomena, the sanctified and the sanctimonious, the sage and gambler, in short, each and every human being has something to learn, something to guide, something to know and appreciate the true value of the surroundings amidst which he finds himself. He masters the illusions around him and apprehends that there is an end and aim for his existence; and that his own situation, whatever it

be, is not above remedy and solution. *The sphinx of human life has never been so successfully tried and solved as in this immortal and monumental work of the human mind.*" (Seeker)

अनुष्ठानचंद्रिकेंत नारद महर्षि हे चर्भांटि नामक सिद्धाशीं संवाद करितांना सांगतात कीं, बाबारे, इतिहासाप्रमाणें शास्त्रेंहि अनेक आहेत. तथापि तुला जर सर्वदा एकरूप, सर्व समयांस मूलभूत, सनातनवस्तुबोधक, सर्वसम, सर्वाधिकारि वेद्य असें एकच एक शास्त्र पाहिजे असेल तर परमात्मा कृष्णरूपी नारायणानें अर्जुनास सांगितलेली 'भगवद्गीता' हेंच असें एक शास्त्र होय, हा सिद्धान्त समज. कारण, ज्ञाते म्हणतात,

**" आजन्ममरणं यश्च शास्त्रं वै मनुजान्पुनः ।**
**" यथादेशं यथाकालं यथावस्थं च शिक्षयेत् ।**
**" धर्मं सनातनं शुद्धं प्रत्यक्षं सार्वलौकिकं ।**
**" समभावैक्यफलदमिहामुत्र च शं-करं ।**
**" तद्धि शास्त्रं महात्मानः 'गीते-'त्याहुर्विचक्षणाः ।**
**" न वैष्णवमिदं शास्त्रं न शाक्तं न च शांभवम् ।**
**" न बौद्धं न च काणादं न सांख्यं न च यौगिकम् ।**
**" न तंत्रं न च वेदांतं विशेषसमयं न च ।**
**" शुद्धं च तदिदं शास्त्रं स्तुवंति पूर्वसूरिणः ।**
**" तस्मात् संसारिभिर्नित्यं संसेव्यं तदिदं भुवि ।"** इति.

( म्हणूनच "गीता सुगीता कर्तव्या, किमन्यैः शास्त्रसंग्रहैः" असें म्हटलें आहे ).

**भावार्थ**—मनुष्यमात्राला जन्मापासून मरणापर्यंत सर्व देशांत, सर्व कालांत व सर्वावस्थांत शुद्ध व अनुभवसिद्ध अशा इहपरलोकीं कल्याणकारक व सर्वत्र 'समभाव' हेंच एक प्रधान फल देणारा जो एकच एक ग्रंथ तोच हें भगवद्गीतानामक शास्त्र होय. हें सार्वलौकिक असून कोणत्याही एका विशिष्ट पंथाचें नाहीं इ.—आणि याचा प्रत्यय हाच कीं, या ग्रंथाच्या उपदेशानें स्त्रिया, वैश्य, शूद्र अतिशूद्रहि तरले. चोखामेळा, रोहिदास, सेनान्हावी, पिंगला,

जनाबाई, बहिणाबाई, गोणाई, राजाई, कान्हुपात्रा इ. अमेरिकन थोरो, इमर्सन इ. परके वेडावले. अशी ही विश्वव्यापिनी, विश्वोद्धारिणी व विश्वमोहिनी आहे. आणि ती अशी असणें स्वाभाविकच आहे. विश्वव्यापी आणि विश्वमोही विराटस्वरूपी परमात्म्याची मुख्य प्रसूतीच ती, ती 'पितुरनुकरोति वत्सो' या न्यायाला अनुसरणारच.

परंतु या द्वंद्वात्मक जगांत गुण म्हटला कीं, त्याचा प्रतिद्वंद्वी जवळ उभाच. त्याचप्रमाणें हिचे विश्वव्यापित्वाचा परिणाम असा झाला आहे कीं, घरचे, दारचे, दूरचे, जवळचे, आर्य, अनार्य, शिवेवारस, तेडेवारस, सर्वच हक्क सांगणार व तिशीं लगट करणार आणि त्यामुळें जशा एकाद्या बहुपत्य सुभगेचीं लहानमोठीं चिलींपिलीं आईच्या अंगावर हक्कानेंच पण मन मानेल तशी मळणी घालितात व अंगावरील वस्त्राची ओढाताण करितात, तशी या माउलीचे अंगाची मळणी अखंड चालू असून तिचे पदराची ओढाताण चालू आहेच. आणि तिचे विश्वमोहिनित्वाचा गौरव तर याहून अधिक मजेचा होत असतो. या मोहिनीमुळें मूढ झालेल्यांचे दोन वर्ग आहेत. एक वर्ग, शुद्ध, सात्त्विक, निरहंकार परंतु रूपलुब्ध. त्याचा हेतु एका सुंदर हायलंड गर्ल ( अधित्यकानिवासी ) कुमारीला पाहून वेडावलेल्या वृद्ध कवि वर्डस्वर्थप्रमाणें कोणा ना कोणा नात्यानें आपलेकडे तिचें प्रेम जडावें, एवढ्याच शुद्ध भावनेनें तिची यथाज्ञानेन यथामीलितोपचारैः सेवा करण्यांत धन्यता मानणारा आहे. अशांतला कोणी झोंपाळ्यावरची गीता लिहितो, कोणी मुलांकरितां लिहितो, कोणी तिची नाटिका बनवितो, कोणी गाणींच करितो इ. इ. दुसरा याहून वडा महत्त्वाकांक्षी विद्वानांचा. या वर्गातल्यांची सुंदोपसुंदी वर्णनीय आहे. ऐतिहासिक आहेत त्यांत कित्येकांच्या मतें कृष्णहि खरा नव्हे, अर्जुनहि नव्हे, धार्तराष्ट्रहि कुठले आणि पांडव तरी कोण ? हें सर्व जीवशिव व मनुष्याच्या सद्वृत्ति व असद्वृत्ति यांना धरून केलेलें एक रूपक आहे. राजारामशास्त्री भागवत म्हणून गेले पिढींत एक इतिहासज्ञ झाले, त्यांनीं या गीतेचे एकंदर सात अवतार ठरविले. पहिला अवतार ६० श्लोकांचा; दुसरे अवतारांत ११४ श्लोक अधिक पडले; तिसऱ्यांत आणखी १३; चवथ्यांत ४०; पांचव्यांत १६; सहाव्यांत ८ व सातव्यांत २१ इतके

श्रीकृष्णाचे खास श्लोक असून बाकींचे श्लोक क्षेपक आहेत. ते योगद्वेष्टे वैष्णव, उपनिषत्संप्रदायी, प्राणायामपरयोगी, निरीश्वरसांख्य, मूर्तिपूजक, अवतारवादी, अशांनीं घुसडले आहेत! यांशिवाय द्वैती, अद्वैती, विशिष्टाद्वैती, कर्मयोगी, भक्तियोगी, संन्यासमार्गी, सगुणोपासक, निर्गुणोपासक अशा भिन्न-भिन्नवाद्यांचे तिचेवर हल्ले आहेतच. अशा प्रकारची दंगल दुसऱ्या कोणत्याहि पूज्य व सर्वमान्य ग्रंथाची झालेली पाहण्यांत नाहीं. ज्योतिषशास्त्राप्रमाणें प्रत्येक जातकावर जन्मकालीन कालस्थलांचा परिणाम असतो आणि गीतेचा जन्म वीरसंमर्दांत रणभूमीवर झाला असल्यानें तिच्या भोंवतीं एकाहून एक अतिरथी महारथी यांचा गराडा पडून हें अखंड युद्धकांड चालू आहे असें वाटतें. ती माउली प्राणिमात्राला निर्वाण–परम अशी नैष्ठिकी शांति देण्यासाठीं उभी आहे, पण तिला मात्र कशी ती शांति कोणीहि मिळूं देत नाहीं; असा कांहीं योगायोग आहे. जगन्माता जानकीला उद्देशून कवीनें म्हटलें आहे, ‘ नाथवंतस्त्वयालोकास्त्वमनाथाविपत्स्यसे । ’ तद्यांतलाच हा न्याय म्हणायाचा किंवा ‘ गुणानामेवायं तव जननि दोषः परिणतः । ’ असें म्हणावें.

४. **चवथा विशेषः**—प्रत्येक अध्यायाच्या अखेरचा शेरा ‘ **ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे०** ’ असा आहे. अर्थात् उपनिषदांतून विखुरलेली जी ब्रह्मविद्या म्हणजे आत्मविषयक ज्ञान आहे तें अधिगत करण्याच्या पद्धतवार युक्त्या किंवा उपाय सांगणारा हा ग्रंथ आहे, हें स्पष्टच, व तो अध्यात्मज्ञानाचा शिरोग्रंथ असें म्हटल्यासहि हरकत नाहीं. पण ‘ मुरारेस्तृतीयः पंथाः ’ म्हणून म्हण आहे, त्याप्रमाणेंच या मुरारिमुखनिर्गत उपनिषदांतला ज्ञानाधिगमाचा मार्ग व वेदांताची परिभाषा इतर वेदान्तग्रंथांहून अगदीं भिन्न आहे. चित्तशुद्ध्यर्थच कां होईना, यांत जें कर्म सांगितलें आहे तें कर्म म्हणजे कर्ममीमांसकांचें केवळ तीळतांदूळ होमहवन कर्म नव्हे—यांत तत्त्वमसि हें सत्य दाखविलें आहे. पण त्या कामीं वेदान्त्यांची नेहमींची सरणी स्थूल, सूक्ष्म, कारणादि देहत्रयनिरास नाहीं; जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या व उन्मनी या अवस्थापंचकांचा उल्लेख नाहीं; यांत पंचीकरण नाहीं;

पंचतन्मात्रांचें नांव नाहीं; 'परापश्यन्ती—मध्यमावैखरी 'तसेंच ॐकाराचें पादशः विवरण नाहीं; पिंडब्रह्मांड हे शब्द नाहींत; चतुर्दश ब्रह्में नाहींत; चार शून्यें नाहींत; वेदान्त्यांची मुख्य मदार ज्या मायावादावर तोहि त्यांच्या भाषेनें नाहीं. कारण, त्यांत जग हें मरुमरीचिका, खपुष्प किंवा शशशृंगवत् मिथ्या असें कोठेंहि म्हटलें नाहीं; तसें असतें तर, ' उत्सीदेयुरिमे लोकाः ' अशी परमात्म्याला असल्या मिथ्याभासाची तळमळ वाटतीना. यांत योग शब्द अनेक वेळां आला आहे; पण त्यांत धौती, पोती, नौली, भस्त्रिका वगैरे क्रिया किंवा शीर्षासन, पश्चिमतानासन इत्यादि आसनें नाहींत. ज्ञानयोग आहे; तरी भूचरी, खेचरी, चांचरी, अगोचरी वगैरे मुद्रा नाहींत. चातुर्वर्ण्याचा स्पष्ट उल्लेख आहे; परंतु 'गृही भूत्वा वनी भवेत्' अशा आश्रमक्रमबोधक किंवा ' यदहरेव विरजेत्, तदहरेव प्रव्रजेत् ' अशा संसारत्यागोत्तेजक आज्ञा नाहींत. अवधूत-गीतेप्रमाणें यांत स्त्रीनिंदा नाहीं. या गीतेला ' स्मृति ' म्हटलें आहे, तरी तींत स्मार्त ग्रंथांप्रमाणें अंत्यजादिकांची अवज्ञा नाहीं; त्यांत उत्कट भक्ति सांगितली आहे, तरी केवळ टाळकुटी किंवा आळंदीपंढरीचे खेटे किंवा यात्राभ्रमणहि नाहीं. हा मुरारीचा तृतीय पंथ अगदींच वेगळा. तो प्रत्यक्षावगम, धर्म्य व अव्यय असून ' कर्तुं सुकर ' असा आहे. येथें स्त्रिया, वैश्य, शूद्र, अन्य कोणी पापयोनि यांतून कोणास मज्जाव नाहीं. येथें तपाचें महत्त्व गाइलें आहे, तरी तें स्मृतिग्रंथांतील कृच्छ्र, चांद्रायण, सांतपनादि किंवा पंचाग्निसाधनासारखें देह कष्टविणारें नव्हे. तुकाराम म्हणतात, ' नलगे सायास जावें वनांतरा। सुखें येतो घरा नारायण। ठायींच बसोनि करा एक चित्त। आवडी अनंत आळवावा। तुका म्हणे आहे सोपें सर्वांहूनी। शाहणा तो धणी घेत असे।' अशांतलाच हा तृतीयः पंथ आहे. यांत भागवतांतील भक्तीच्या नवविधा शब्दशः दिल्या नाहींत. मात्र भक्तांच्या आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी अशा चार विधा सांगितल्या आहेत. आणि अर्जुन हा जगापुढें नमुना म्हणून ठेवणें असल्यामुळें

त्याला या चारी अवस्थांतून नेऊन दाखविला आहे. पहिल्या व दुसऱ्या अध्यायांत तो विषादी म्हणजे आर्त; ३–९ जिज्ञासु (आर्तिहरणाचे उपाय पुसणारा); १०–११–१२ अर्थार्थी–अर्थ म्हणजे इष्ट वस्तु तिचे प्रत्यक्ष प्राप्तीविषयीं सोत्कंठ (विभूति, विराट्स्वरूप) आणि १८ वे अध्यायांत 'नष्टो मोहः इत्यादि.' म्हणून 'करिष्ये वचनं तव' म्हणण्याचे वेळीं पूर्ण ज्ञानी. याच चार अवस्थांतून प्रत्येक मुमुक्षूला जावें लागतें व सद्गुरु नेतातहि.

## भगवद्गीतासूपनिषत्सु

श्रीभगवद्गीता हें गान नसून उपनिषद् आहे. अर्थात् ही सद्गुरुसान्निध बसून सद्गुरुमुखानें समजून घेण्याची आहे. ती पंधरा टीका आणि सतरा भाष्यांनीं समजणारी नव्हे. राजम् अय्यर म्हणतात:—

One is required to study the Gita under proper guidance. It is not a mere theoretical book offering hypothetical solutions of the problems of life, but a practical book wherein the reader is asked to *realize* what is taught and see for himself whether it is true or not. When studied under a teacher, what appeared to be a bundle of tautologies and contradictions unfolds itself to view as a beautiful consistant whole, where idea follows idea in wonderful sequence and a grand philosophy is evolved in all its fullness and the previously despair-filled, doubting and bewildered mind is feasted with a rich promise of boundless bliss where all things, mortality, finiteness and change will disappear though the physical may subsist as ever. It has been said that the Gita is divine commentary upon the Vedas but it is nearer the truth, as a great sage remarked that 'it is a divine compendium of the Vedas (श्रुति).' Every word in it stands for a number of texts and often a single expression epitomises a whole Upanishad. All this beauty can be perceived *when only one studies it under a great Acharya*, who, besides teaching him the text, has initiated him into the mysteries and there-

by placed him in an attitude at least to understand what is taught."

म्हणजे 'तज्ज्ञानार्थं गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्' हेंच खरें. बहुतेक उपनिषदें म्हणजे ब्रह्मनिष्ठ गुरु किंवा आचार्यांनीं समक्ष शिष्यांस केलेले सप्रत्यय बोध आहेत. मात्र हे प्रगट गुप्त असे आहेत. सद्गुरु नृसिंहसरस्वती म्हणतातः—' निवेदन करी सर्वांसीं। (परंतु) प्रतीति दावी निजभक्तासि' असा हा गीताबोध आहे.

५. **पांचवें वैशिष्ट्यः**—' गीता हें सर्वोपनिषत्सार' आहे ही गोष्ट सर्वसंमत आहे. अर्थात् गीतेंतील विषय औपनिषदिक; फक्त निवड आणि मांडणी गीताकाराची–पण गीता तपासून पाहतां गीता म्हणजे केवळ संकलन नाहीं–तींत भगवंताचे पदरचें पुष्कळ आहे. उ० कर्मयोगच घ्याना. उपनिषदांत कर्मयोगाचा इदरउदर तुरळक उल्लेख आहे. परंतु गीतेसारखी कर्मांची शास्त्रीय मांडणी अन्य कोठेंच नाहीं. प्रबुद्धभारतकार म्हणतोः—

Although the germs of Karmayoga are contained in the Upanishadas, yet we owe it to the genius of Shri Krishna that *action* which is a necessity of our nature has been shown, if performed properly, to go a great way towards liberating us from the thraldom of Maya. (Thus) The *Bhagvadgita is the book on Karmayoga*, and nowhere else do we find the path of action indicated with so much of clearness and beauty. Indeed, it was *Shri Krishna who elevated action to the dignity of Yoga*.

फलतः पोळ्यांतला मधु म्हणजे जरी विविध पुष्पकोशांतील मधुर रसबिंदूचा संग्रहच, तथापि आपण तीं पुष्पें मिळवून रसाचें एकीकरण केल्यानें असला पदार्थ होणें कठिण. तो मधुमक्षिकेच्या मुखानेंच मिळाला पाहिजे. किंवा जलनिधी समुद्राचें पाणी म्हणजे सर्व महानद्यांचे पाण्याची बेरीज असें आपणांस वाटतें, परंतु त्यांतलें क्षारत्व तरी खास समुद्राचें आहे.

६. **सहावें वैशिष्ट्य**—गीता किंवा गीतार्थ हा भारतरूपी पंकजाचा सुगंध आहे असें म्हटलें आहे. हें म्हणणें फार मार्मिक व समर्पक

आहे. सुगंध खराच. पुष्पापेक्षां त्याचा गंधच दिगंतव्यापि असतो. त्याचप्रमाणें गीतेनें चतुःखंड व्यापिले आहेत, तितके भारतानें नाहींत. शिवाय गंध म्हणजे पृथ्वीची 'तन्मात्रा.' लक्ष श्लोकात्मक भारताचें सौभाग्यसर्वस्व पांचशें श्लोकांचे गीतेंत सांठविलें आहे. म्हणजे गीता हें अखिल भारताचें मंगळसूत्र आहे. लाख गुलाबांचीं फुलें आणि एक तोळा ओटो हाच न्याय.

७. **सातवें वैशिष्ट्य**—गीतेची भाषा: एकूण भारताची भाषा आणि गीतेची भाषा पाहतां फार फरक वाटतो. 'व्यासेन ग्रथितां—मध्ये महाभारतम्' म्हटलें आहे तेंच खरें. येथें भाव भगवंताचा आणि भाषा व्यासांची असें नसून शब्दनि-शब्द खुद्द भगवंताचे साक्षात् मुखांतला. प्रपन्न पारिजाताचीं तीं शब्दरूपीं पुष्पें आणि तीं सूत्रांत ओंवणारे व्यास इतकेंहि नव्हे. तर गळ्यांतील रत्नजडित पेट्या, हें हिरे कोंदणासकट काम जड्या सोनाराचें आणि तो दागिना कंठ-धारणयोग्य होण्यासाठीं पटवेकरी त्याला रेशमी छड्यांत बांधतो त्याच-प्रमाणें हा आयता घटित घाट घेऊन व्यास मुनींनीं भारतांत पटवून दिला आहे. इतर प्रकरणांप्रमाणें हें व्यासांचे लोकमान्य गिरणींतून ओढलेलें नसून केवळ आयतें गांठलें आहे. पाणिनीसूत्रांत देखील एकादी अर्धमात्रा कोणी कमी करून दाखवील, पण गीतेंतील भग-वद्वाणींतून आलेल्या शब्दांपैकीं एक शब्द, एक अक्षर देखील फिर-वितां किंवा कमी करतां येणें शक्य नाहीं. इतक्या कसोशीनें प्रत्येक पद योजिलें आहे, असें विचार करतील त्यांस पटेल. शिवाय एकादे सिद्धौषधीप्रमाणें, बहुकल्पं, बहुगुणं, संपन्नं, योग्य असें प्रत्येक वाक्य आहे.

अशा प्रकारचा हा अद्भुत ग्रंथ किंवा बोध ज्या प्रसंगीं निर्माण झाला तो प्रसंग अद्भुत होताच. पण ज्याला उद्देशून हा बोध बाहेर आला तो शिष्य अर्जुनहि अद्भुत म्हणजे अनन्यसाधारणच होता. गुरूचें व त्याचें प्रेम निःसीम व पांचाहि बंधूंत अर्जुनाचा बहुरंगीपणा कोणाचेच अंगीं नव्हता. तो खराखराच नरोत्तम होता. तो निःस्तन होता. हें लक्षण इतर

नरांत केव्हांच नाहीं. दुसऱ्याहि अर्थानें तो नरोत्तम होता. कारण, यास्कानें नर शब्दाची व्युत्पत्ति 'नृत्यंति उच्चावचेषु कर्मसु ते नराः' अशी केली आहे. ती त्याला तंतोतंत लागू पडत होती. विराटाचे घरीं तो प्रत्यक्षच बृहन्नडारूपानें नाच्या नटवा झाला होता. एरव्हीं तरी तो मोठा फक्कड इष्की प्रमदाप्रिय होता. अश्वमेधांत यज्ञीय अश्व स्त्रीराज्यांत गेला असतां तेथील राणी प्रमिला ही आनंदानें त्याची अर्धांगी झाली. त्यामागें तीर्थयात्रेस गेला असतां वाटेंत गंगाद्वारीं स्नानार्थ गंगेंत उतरलेला पाहून उलूपी नागकन्या त्याचे रूपास मोहित होऊन गळ्यांत पडली. मणिपूर नगरांत गेला असतां तेथील राजकन्या चित्रांगदा हिला पाहून हा मोहित झाला, तेव्हां तिच्या बापानें तो अनुरूप पाहून पुत्रिकाधर्मानें ती त्याला दिली. इंद्राचे नंदनवनांत निद्रिस्त असतां त्याचें रूप पाहून प्रत्यक्ष उर्वशी वेडावली. शिवाय स्वारी द्वारकेस आली असतां कृष्णोपदेशानें गुलजार मस्करी (यति) बनून, हलधरदादांस भूल पाडून, सुभद्राताई सेवापरायण झाल्यानें यांच्याच रथांत बसून रैवतक गिरीवर नगरयात्रा निघाली असतां त्या धांदलींत इंद्रप्रस्थाची वाट धरून दादांची बहीण पदरांत पाडली. प्रायश्चित्तार्थ म्हणून तीर्थयात्रेसारख्या पवित्र कामास निघाले ते चार नायिका कमवून यात्रेचें संपूर्ण केलें. या इष्कबाजीला दुसरा मोकाबला आहे काय? बरें, हें इष्काचें वर्णन झालें; म्हणून हा झनान्यांतच कालक्षेप करणारा होता काय? नव्हे. क्षात्रधर्माभिमानीहि पराकाष्ठेचा होता, आणि म्हणूनच 'चोरांनीं यज्ञधेनु चोरिल्या, धांवा' म्हणतांक्षणीं रहस्यभंगाबद्दल माथीं बसणारें द्वादशवार्षिक तीर्थभ्रमण पत्करूनहि स्वारीनें धनुर्बाण एकान्तांतून आणून विप्रधेनुरक्षण केलें. बरें, नुसता अभिमानी नव्हता; तर त्रिभुवनैक धनुर्धर होता आणि राजसूयांत अनेक मानवी राजे पादाक्रांत केले, एवढेंच नव्हे, तर देवगंधर्वांना देखील हारविलें, किरातवेषधारी शंकरास युद्धांत तोषवून त्यापासून पाशुपतअस्त्र संपादन केलें. अंगारपर्ण गंधर्वाला जिंकून त्याला स्नेही केलें. असलें त्याचें मोहक शौर्य, मोहक रूप. बरें, व्यावहारिक वर्तनहि तसेंच. त्याबद्दल एका ठिकाणीं म्हटलें आहे:—

He was indeed a polished gentleman, with a sweet dis-

position, gentle manner, refined tastes, gentle accomplishments. He would sing and dance and ladies ( and a decent lot they were) madly fell in love with him·

पण, हे सर्व गुण प्रवृत्तिपर झाले. त्याला, संन्यासमार्गीयांना अभिमत अशा ज्ञानवैराग्याचा अधिकारी बनायला जरूर त्या आत्मानात्मविवेक, इहामुत्रफलभोगविराग, शमदमादिषट्क वगैरे गोष्टींचा कसा तो गंध नव्हता. इष्की झाला, धनुर्धर झाला तरी **राजस** प्रवृत्तीचा म्हणजे **कर्मसंगी**. आणि ब्रह्मज्ञानाला अधिकारी म्हणजे गुणातीत, निर्द्वंद्व, नित्यसत्त्वस्थ, आत्मवान् होणारा, अर्थात् सत्त्वगुणी तरी पाहिजे होता. मग जगद्गुरु व क्षेत्रज्ञ अशा श्रीकृष्णानें ज्ञानदानाला हाच विद्यार्थी निवडला हें काय ? 'पात्र पाहून दान' अशी म्हण आहे. व्यवहारीं देखील पात्रापात्र-विचार ठेवितात. सुतार झाला तरी कोणत्या कामीं कोणतें लांकूड वापरावें हें पहातो. सोनार कोणत्या अलंकाराला किती नंबरी सोनें घ्यावें हें पहातो. शेतकरीहि कोणत्या प्रकारचें बीज कोणत्या क्षेत्रांत घालावें हा विचार करितो. कारण क्षेत्राचा गुणच या कामीं मुख्य. 'चीयते बालिशस्यापि **सत्क्षेत्रपतिताकृषिः** ।' यावरून बीजोत्कर्षाला क्षेत्रच अधिक महत्त्वाचें. असें असतांना परमात्म्यानें ही निवड काय केली ? ज्ञानदानाला योग्य क्षेत्र म्हणजे भगवंतांनींच केलेल्या गुणकर्मविभागामुळें 'शमो दमस्तपः शौचं शांतिरार्जवमेव च । **ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं** ( ब्रह्मकर्मस्वभावजं )" हे ब्रह्मविद्यादानाला अनुकूल असे गुण स्वभावतःच ज्यांच्या ठिकाणीं असून जे ज्ञानप्राप्त्यर्थ वातांबुपर्णाशन होऊन गिरिगव्हरें धुंडणारे अशा दाढीवाल्यांपैकीं कोणी पहावयाचा होता, त्यांचा काय दुकाळ होता ? बरें, श्रीकृष्णाचा स्वजातीकडे ओढा असला तरी या कामीं प्रत्यक्ष धर्ममूर्ति जो परमात्म्याप्रमाणेंच 'समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योस्ति न प्रियः ।' अशा वृत्तीचा सत्त्वस्थ धर्मराज तो काय दृष्टिआड होता ? बरें, हें आत्मज्ञान सर्वभुतानुजिघृक्षेनें अर्जुनाला केवळ निमित्त करून दिलेलें आहे. खुद्द अर्जुनाचा त्यासंबंधीं मूळ प्रश्नहि नव्हता. परमात्म्यानें स्वतः होऊन हा ब्रह्मज्ञानाचा मुद्दा काढला. अर्जुनाचा प्रश्न लौकिकी होता. 'बंधुवधाचें पाप' एवढेंच त्याचें कोडें होतें. तें उलगडण्याला एवढ्या खोलांत शिरावयाचें

कांहींएक कारण नव्हतें. त्याला सहज असें सांगतां आलें असतें कीं, " धारातीर्थे धरणिपतयः पातकं क्षालयंति असें शास्त्र आहे. धृतराष्ट्राकडून संजय[1] शिष्टाईला आला असतां, हा प्रश्न तुझ्या मान्यतेनेंच उलगडला आहे. आतां खुळा होऊं नकोस, ऊठ. तुला शास्त्र[2] समजतें (कथं न ज्ञेयमस्माभिः) तर समोरचे पितामह, द्रोणगुरु, कृपाचार्य यांहून तूं अधिक शास्त्रज्ञ आहेस काय ? शिवाय तूं कोण ? तूं युधिष्ठिराचा केवळ हस्तक–' स्वामिपापेन लिप्यते' हें शास्त्र. तुला दोषच नाहीं, हें मी तुला साधार सांगतों. याउपर तूं न उठशील, तर तुला जर असा अवसान-घात करायचा होता तर मी आपल्या घरीं सुखशय्येवर स्वस्थ पडलों असतां, व मी शस्त्र धरणार नाहीं असें तुला बजाविलें असतां, हातींपायीं पडून मला आणिलेंस कां ? तुझी अपकीर्ति दूर राहो, पण ' ओढाळाचे संगें सात्विक नाडिलें,' त्या न्यायानें माझीच विनास्वार्थ दुष्कीर्ति होईल. लोक म्हणतील, हे बोवा आपण बुधग्रह–आणखी अर्जुन गाजलेला वीर; पण त्याच्या संगतीस येतांच त्यालाहि आपणासारखा बनविला. खाशी. एकरात्रप्रसंगेन काष्ट-घंटा विटंबना ! तेव्हां बरे बोलानें युद्धाला ऊठ. नाहींतर माझ्याशीं गांठ आहे. " इत्यादि मुद्यांनीं अर्जुन निरुत्तर होऊन युद्धास खास उठता. मग भगवान् आपण होऊन एवढ्या आडबळणांत कां शिरले ? हा एक मोठा प्रश्न–गूढ प्रश्न आहे. इतकाच गूढ प्रश्नः केवळ जीवोद्धारार्थच आत्मज्ञान प्रकट करणें तर त्याला अन्य प्रसंग काय थोडे होते ? या ढोलपिटीचे कट-कटींत हा विषय कशाला घ्यावा ? घेणारा भलता नव्हे, तर तो ' क्षेत्रज्ञ ' तसाच ' समयज्ञ[3] 'हि होता खास. तर प्रस्तुत विषयांतहि दोन्ही विशेषणें सार्थ कशीं होतीं तीं पाहूं.

## भगवंतांची क्षेत्रज्ञता

ज्ञानाधानाला स्वभावसुलभ अशीं क्षेत्रें सोडून अर्जुनासारखा केवळ कर्म-संगी असें क्षेत्र–असा विद्यार्थीच–कां पसंत केला ? त्याचें उत्तर अर्जुनाला

---

१. हो कां स्वधर्मचि तूं पुससी । तरी ऐक क्षात्रधर्मासि । समरांगणीं पित्या पुत्रासि । वधितां क्षात्रियासि दोष नाहीं ॥१॥ युद्धम्हणजे स्वधर्मतीर्थ । समरांगणीं निमे तो नित्यमुक्त ॥२॥

२. **क्षेत्रज्ञं** चापिमां विद्धि सर्वक्षेत्रेषुभारत । ३. **समयज्ञो** हविर्हरिः। श्रीविष्णुसहस्रनाम

निमित्त करून या जगांतील मंदतमापासून तीव्रतमापर्यंत सर्वच अधिकाऱ्यां-कडे दृष्टि राखून हा उपदेश असल्यामुळें जगद्गुरूनें मंदतमच विद्यार्थी स्वीकारला. कारण वर्गांमधील शेवटल्या जागचा मठ्ठाड मुलगा हातीं धरून त्याला अग्रयायी करून सोडील तोच सद्गुरु. आणि अशासाठींच जिज्ञासु विप्र किंवा धर्मबुद्धि युधिष्ठिर सोडून पार्थासारखा मंद शिष्य पत्करिला. शिवाय भगवंतांना अर्जुनाला कर्मयोगच पढवायचा होता. म्हणूनच त्याजसारखा निःसीम कर्म-संगी शिष्य शोधिला. आतां एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवावी. हें समर्थांचें देणें तें ग्रहीत्यापेक्षां दात्याचे लायकीला शोभेसेंच असतें आणि त्याप्रमाणें भग-वंतांनीं अर्जुनास कर्मयोग दिला. पण तो कर्मयोग म्हणजे लोहार शाळेंतील घिसाड कामाची दीक्षा नव्हे. तो पार्थिव किंवा मर्त्य कर्म-योग नसून स्वतोनु-भूत दिव्यकर्म-योग ऊर्फ ज्ञानोत्तर कर्मयोग द्यावयाचा होता. आणि म्हणून अर्जुनाचा प्रश्न केवळ व्यावहारिक असतां श्रीकृष्णांनीं त्याला अतिगहन अशा ज्ञानयोगाची ओळख करून देऊन 'अभयं वैजनक प्राप्तोसि' असें याज्ञ-वल्क्यांनीं जीवन्मुक्ततेचें पसंतीपत्र दिल्यावर आजीव कर्मच करीत राहणाऱ्या जनकाप्रमाणें ज्ञानोत्तर कर्मदीक्षा दिली. हिचा पुरावा आप्तवाक्यांनींच पुढें दिला आहे, तेव्हां पल्लव नको. ज्ञानोत्तर कर्म सांगण्यानें ज्ञानाचा दर्जा कमी होतो असें कोणीं मानू नये. दर्जा व्यक्तीवर आहे, स्थानावर नाहीं. पांचशें रुपयांचा मुनसफ प्रसंगीं भिकार तालुक्याला नेमला म्हणून किंमतीला उतरला नाहीं. त्याचप्रमाणें ज्ञान हें केव्हांहि कर्मापेक्षां श्रेष्ठ आहे. पिता हा पुत्रापेक्षां अधिक मानाचा; तथापि विवाहप्रसंगीं पुत्राला 'विष्णुस्वरूपिणे वराय' म्हणून त्याच्या वडिलांपेक्षांहि उच्चासनावर बसवावें लागतें. त्याचप्रमाणें हेतु-विशेषास्तव येथें ज्ञानास कर्माचें साचिव्य दिलें आहे.

## भगवंतांची समयज्ञता

ही वेळ कोणती ? 'तर वेळेवर वेळ आणि शिमग्यावर खेळ, किंवा 'Strike the iron while it is hot,' 'तापलें आहे तों ठोका,' ह्या न्यायानें अर्जुनविषादाचा फायदा घेऊन भगवंतांनीं आपलें इष्टकार्य साधिलें. कारण, अंतर्दृष्टि अशी आहे कीं, परमात्म्याचा देहावसानकाल

जवळजवळ येत होता. कृष्ण हा पूर्ण परब्रह्मावतार होता. पुढील अवतार बुद्ध आणि कलंकी ह्यांकडून असलें उपदेशकर्म होणें नाहीं. बुद्ध–मौनी व बिरागी–आणि कलंकी कृपाणपाणी, तेव्हां भावी प्रजेच्या कल्याणाचा मार्ग स्वहस्तें आंखून द्यावा या हेतूनें परमात्म्यांनीं गीतामिषानें जनाचे भिन्न रुचित्वास्तव नानाविध योग प्रकट करून कर्मयोग, भक्तियोग, राजयोग, ज्ञानयोग इत्यादिकांची पूर्ण समज दिली. कोणी म्हणतील, अवतारसमाप्तीची वेळ झाली तरी अठरा दिवसच काय तें भारतीयुद्ध. तें संपतांच कांहीं दुसरे दिवशींच अवतार संपत नव्हता. मग या युद्धकर्माचे खटपटींतच भगवंताला काय साध्य? त्याचें उत्तर. भगवंताला **कर्मयोगदीक्षा** द्यावयाची होती व तिला कुरुयुद्धभूमी हेंच परमोचित स्थान. कारण युद्ध हें यावत् मानवीकर्मांत सर्वातिशायी, सर्वव्यापी असें महत्कर्म आहे. ‘ सर्वं कर्माखिलं पार्थ युद्धे परिसमाप्यते ’ असें म्हटलें तरी शोभेल. डॉ० बिझांटबाई म्हणते ‘ *War is the* greatest of human actions.’ तें समष्टिकर्म आहे. ताजें जर्मनयुद्ध आपल्या डोळ्यांपुढें आहेच. दिसायला युद्ध ही एक क्रिया दिसली, पण तिच्या पोटांत साक्षात् व परंपरेनें पाहतां आजच्या चतुःखंड पृथ्वींतील सर्व प्राण्यांच्या भिन्न भिन्न क्रियाचक्रांना कशी किल्ली मिळाली, असंख्य जीवांचीं सुखदुःखें त्यापायीं कशीं उद्भवलीं, व आज सतरा वर्षें झालीं तरी अजूनहि त्याचे परिणाम कसे कसे व कितीकांना भोंवत आहेत? एका **कायसर**चे साहसकर्माचे, भीषण कर्माचे परिणाम निखिल मानवजातीचे बोकांडीं बसले–रक्ताचे नद, पापांचे डोंगर, अनर्थाचे दावानल कुठवर पसरले व अजूनहि पसरत आहेत, हें ज्यांच्या डोळ्यांपुढें आहे त्यांना युद्ध हें मानवीकर्मांतील महिष्ठ भीमकर्म आहे असें कबूल करावें लागेल. आणि असल्या विश्वव्यापी दारुण कर्मयोगाची दीक्षा रडक्या अर्जुनाला हंसत पत्करावयास लावल्यावर कोणाहि मानवी जीवाला कोणात्याहि कर्माबद्दल शंकाच उरावयास नको. म्हणून हीच वेळ साधून अर्जुनास कर्मोपदेश केला व अखिल जनांना शास्त्रीय कर्मयोगाचा,– बंधातीत कर्मयोगाचा,– हमरस्ता कायमचा खुला करून त्यांना मार्गदर्शन म्हणून आपले विश्वासांतला हा अर्जुनरूप दिवटा रोंवून ठेविला. नंतर जीवांना तितक्याच जरुरीचा दुसरा महामार्ग म्हणजे ज्ञानमार्ग

तोहि चोखाळून त्या मार्गावरहि अर्जुनाइतकाच आपले विश्वासांतला इसम ' उद्धव ' हा दिवटा डांबून आणि याप्रमाणें अवतारकार्य संपवून परमकारुणिक भगवान् स्वरूपानुसंधान साधून निजधामास गेले.

या प्रकारें जगत्कार्यासाठीं दोघांस दोन अधिकारांवर योजिलें. पण दोघांसहि एकाच योग्यतेस आणून–अर्जुन कर्ममार्गदिवटा केला. पण तो ज्ञानपूर्ण करून नंतर. आगरकर कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले, आपटे न्यू. स्कूलचे, हे केवळ सोईसाठीं; पण ते दोघेहि एम्.ए.च होते. तशांतलाच हा प्रकार. अर्जुनास कर्मयोगीं योजिला, कारण तो स्वभावतः कर्मप्रवण असल्यानें त्याची ती योजना केली. पण ज्ञानी करून मग. आमचे एका खेड्यानें मुलाला शेतांत घालावयाचा म्हणून घरचे गड्याबरोबर लुमणें धरण्यास प्रथम न सांगतां शेतकी क्लासचा पदवीधर करून मग शेतकींत घातलें. म्हणजे शास्त्री नांगऱ्या बनाविलें. 'पुनर्मोहं न यास्यसि' हें वचन पुरें करणें तर आत्मज्ञान देणेंच प्राप्त, हें जाणून भगवंतांनीं अर्जुनास आत्मज्ञान देऊन आत्मरूप केल्यावरच त्यानें 'करिष्ये वचनं तव' म्हणून धनुष्य उचलिलें. आचार्यभक्त म्हणतात त्याप्रमाणें केवळ परोक्ष ज्ञानानें तृप्त होऊन नाहीं. या कामीं श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीएकनाथमहाराज व श्रीसद्गुरु नृसिंहसरस्वतीमहाराजांचेच उतारे देतों. याउपर अर्जुन गीतेपुरता तरी अथपासून अखेरपर्यंत अज्ञानीच होता असें ज्यांना म्हणावयाचें असेल त्यांनीं खुशाल म्हणावें. ' तान् प्रति नैष यत्नः ।' असें म्हणून स्वस्थ बसूं.

श्रीज्ञानेश्वरमहाराजः—अध्याय १८ श्लोक ६६.

अगा प्राकृताही राया । आंगीं पडे जें धनंजया ।
तें दासिरूंहि कीं तया । समान होय ॥
मा मी विश्वेश्वर भेटें । आणि जीवग्रंथी न सुटे ।
हे बोल नको वोखटे । कानीं लाऊं ॥
म्हणौनि मी होऊनि मातें । सेविणें आहे आयितें ।
तैसें करीं हातां येतें । ज्ञानें येणें ॥

* * * *

ऐसें सर्वरूपरूपसें । सर्वदृष्टिडोळसें ।
सर्वदेशनिवासें । बोलिलें श्रीकृष्णें ॥
मग सांवळा सकंकणु । बाहु पसरोनी दक्षिणु ।
आलिंगिला स्वशरणु । भक्तराजु तो ॥
हृदया हृदय येक जालें । जें हृदयीचें तें हृदयीं घातलें ।
द्वैत न मोडितां केलें । आपणाऐसें अर्जुना ॥
दीपें दीपू लाविला । तैसा परिष्वंगु तो झाला ।
द्वैत न मोडितां केला । आपणें पार्थ ॥
सिंधु सिंधुतें पावों जाये । तें पावणें ठाके दुणा होये ।
वरी रिगे पुरवणिये । आकाशहि ॥
तैसें तया दोघांचें मिळणें । दोघां नावरे जाणावें कवणें ।
किंबहुना श्रीनारायणें । विश्व कोंदलें ॥
एवं वेदान्तें मूळसूत्र । सर्वाधिकारैकपवित्र ॥
श्रीकृष्णें गीताशास्त्र । प्रकट केलें ॥

आतां श्रीएकनाथमहाराजः—

अर्जुनासि देऊनि समाधी । सवेंचि घातला महायुद्धीं ।
परी कृष्ण कृपानिधी । तटस्थ त्रिशुद्धी न करीच ॥
आसनीं बैसल्या स्वरूपस्थिति । आसन सोडिल्या प्रपंचस्फूर्ति ।
ऐशी एक देशस्थिती । निजयोगी ना तळती ।
तेवी पावोनी स्वरूपप्राप्ती । योगी प्रारब्धाच्या स्थिती ।
नानाकर्में करितां दिसती । तरी आत्मस्थिती भंगेना ।
समाधि आणि व्युत्थान । या दोही अवस्थांचें लक्षण ।
अपकासि घडे जाण । परिपूर्णासि लक्षण तें कैसें ॥
म्हणाल काष्ठाचे परी त्यासि । पडला असेल अहर्निशी ।
हेंही घडेना तयासी । सांडूनि हेतूसीं देहीं वर्तें ॥

[ ज्ञानोत्तर कर्मच शक्य नाहीं म्हणणारांनीं अनुभवी नाथांचे हे बोल वाचावे. ]

यापुढें श्रीसद्गुरु नृसिंहसरस्वतीमहाराजः—

अर्जुन मायेनें वेष्टिला। तेव्हां कर्माधार बोधिला।
क्षेत्रीं शूरत्व पावविला। श्लाघ्य केला नरदेहीं। (स्वात्मसौख्य)

(श्लाघ्य केला नरदेहीं = आत्मज्ञानी केला, एरवीं नरदेहाची श्लाघ्यता नुसतें क्षेत्रांत शूरत्व पावण्यांत नाहीं.)

या आप्तत्रयींचे वाक्यांनीं ज्यांचें समाधान होत नसेल, त्यांसाठीं स्वतः अर्जुन काय म्हणतो तें पाहूं.

"श्रीकृष्ण निजधामास गेल्यावर क्षणैक शोकाच्या झटक्यांत सांपडलेला अर्जुन तत्काल ठिकाणीं येऊन म्हणतो:—

अक्षरब्रह्म परम। स्वयें बोलिला पुरुषोत्तम।
त्या कृष्णासि जन्ममरण। मूर्ख मनोधर्म कल्पिती।
माझे स्वरूपाचेनी बळें। मीच कृष्णरूपें खेळ खेळें।
अंतीं मजमाजीं मीच मिळें। निजात्ममेळें निजनिष्ठा।
"एक नर एक नारायण। परस्परें ते अभिन्न।
"यालागीं पूर्णत्वें अर्जुन। आपणा आपण स्वयं देखे।"

या सर्वांवर नाथांचा अखेरचा शेराः—

बाप कृपाळु कृपानिधि। उपदेशिला युद्धसंधीं।
परी लाविली जे समाधि। ते न मोडे त्रिशुद्धी कल्पांतकाळीं॥

यापलीकडे अर्जुन ज्ञानी न होतां, युद्धप्रवृत्त झाला, अशांस लेखकाजवळ एकच उत्तर आहे, तें असें. या भूमींत आजचे मितीसहि श्रीएकनाथ, नामदेव, रामकृष्णपरमहंस यांच्या कोटींतले म्हणजे प्रत्यक्ष देवाशीं प्रश्नोत्तरें करणारे साधुसंत असणारच (शोध पाहिजे); अशांचे मुखें नरनारायणांसच विचारून निःशंक व्हावें. आम्हांला वरील पुराव्यांहून अधिक पुराव्याची अपेक्षा नाहीं. परमहंसांनीं प्रिय परंतु संशयी नरेंद्राला केवळ स्वचरणस्पर्शाबरोबर 'शक्तिपात' करून सविकल्प समाधी दिली. (चरित्र पहा). मग प्रत्यक्ष भगवंत आलिंगनानें अर्जुनास स्थितप्रज्ञ ज्ञानी करून सोडतील यांत काय आश्चर्य?

## उद्धव आणि ज्ञानयोग

वास्तविक पाहतां प्रतिज्ञात विषयांत उद्धवाचा विचार संकल्पित नव्हता. परंतु अर्जुनाच्या कर्मयोगाचा पूरक म्हणून उद्धवाचे ज्ञानयोगाचा थोडासा उल्लेख करतों. अर्जुनाचे कर्मयोगाबद्दल वर जी श्रीसद्गुरु नृसिंहसरस्वतींचे स्वात्मसौख्यांतील ओंवी दिली आहे, तिच्या पुढलीच ओवी: 'भागवतामाजी एकादशु। उद्धवासि केला उपदेशु। चुकवून त्याचा शापपाशु। ज्ञानसारांशु प्रेरिला।' अशी आहे. याच संबंधीं नाथ लिहितात:—

ब्रह्मशापाचें निर्दळण। उद्धवाचें चुकवाया जाण।
श्रीकृष्णें प्रबोधोनि पूर्ण। करवी गमन बदरिकाश्रमा।
उद्धव ज्ञानियांचें रत्न। त्यासि वांचवूनी श्रीकृष्ण।
विस्तारावया निजज्ञान। करवी गमन बदरिकाश्रमीं।
स्वयें तरोनी जनां तारी। हे ज्ञानाची अगाध थोरी।
ते म्यां दिधली तुझ्या करीं। जन उद्धरीं उद्धवा।
उद्धवा तुझें जें आचरण। तोचि जनासि उपदेश जाण।
यालागीं वैराग्य भक्तिज्ञान। स्वधर्माचरण सांडूं नको।
अभेदभक्ति वैराग्यज्ञान। स्वयें आचरोनी आपण।
देखीं लावावें इतर जन। लोकसंग्रह जाण या नांव।

सारांश, परमात्म्यांनीं जगताचे प्रवाहाला अवश्य असे जे मुख्य दोन मार्ग—कर्म ( मार्ग ) आणि ज्ञान ( मार्ग )—या दोन मार्गांवर अर्जुनरूप व उद्धवरूप दोन दीपस्तंभ डांबून आपलें अवतारकार्य संपविलें.

## गीता व शांकरभाष्य

गीतेवरील जगन्मान्य टीकांत शांकरभाष्य हें सर्वमान्य आहे आणि अद्वैत दृष्टीनें तें ठीकच आहे. पण आचार्यभाष्याप्रमाणें ज्ञानोत्तर कर्मनिवृत्ति हेंच मुख्य ध्येय आहे आणि अर्जुनानें युद्ध केलें तें तो अज्ञानी म्हणून, ज्ञानी असता तर करिताच ना, असेंहि आचार्यभक्त विधान करितात. श्रीमत् शंकराचार्यांचा ओढा निवृत्तीकडे. पण गीताग्रंथ तर संसारी जीवांस पंचप्राणापलीकडे अगदीं उराशीं घट्ट आंवळून इतका आवडतो. तो जर

आचार्यांप्रमाणें संसारावर धोंडा घालणारा असता तर इतका लोकप्रिय झाला नसता. अर्थात् गीतोपदेश प्रवृत्तिक्षम असला पाहिजे, याला हेंच गमक बस आहे. 'Vox populi vox dei' कोणी म्हणतील. आचार्यांचे भाष्यापेक्षां लोकप्रवृत्तीची महती अधिक कशी व्हावी ? त्याचें उत्तरः— आचार्यभाष्य हें ज्ञानेश्वरीसारखें स्वानंदानें व स्वप्रेमानें लिहिलें नसून वादिजयार्थ लिहिलें असल्यानें व प्रतिपक्षी आत्यंतिक कर्मकांडी असल्या-मुळें त्याला पुरापूर चीत करण्यासाठीं आचार्यांना तितक्याच, किंबहुना अधिक जोरानें कर्मप्रतिगामी दिशेला ओढ घरावी लागली. एरवीं या Tug-of-war मध्यें जय यावा कसा ? Self-defence आत्मरक्षणाचे वेळीं साधेल तें शत्रूच्या डोक्यांत हाणून आपला जय साधणें हेंच व्यवहार-चतुराचें लक्षण आहे आणि या कारणानेंच आचार्यांनीं तसें भाष्य केलें. हें एक आणि दुसरें कारण याहूनहि खोल आहे. आचार्य हे श्रीशंकराचे अवतार होते, ही गोष्ट भाविकांस तरी पूर्ण मान्य आहे; आणि शंकर हे पक्के बैरागी, योगी, अविषयमनस्क यतींचे पुरोवर्ती; महोक्ष, खटवांग, परशु, अजिन, भस्म, फणि इ० त्यांचीं उपकरणें; स्मशानीं वास, भिक्षावृत्ति, कृत्तिवास हें सर्वश्रुतच आहे. त्यांनीं अवतार जरी घेतला तरी 'स्वभावो दुरतिक्रमः' किंवा 'मनोहि जन्मांतरसंगतिज्ञम्' या न्यायानें त्यांचा ओढा निवृत्तिपरच असणार. येथें त्यांचा स्वतःचा उपाय चालणारा नाहीं. नाथ म्हणतात, ज्ञानी झाला तरी त्याला स्वभावधर्म सुटत नाहीं:—

हनुमंत ज्ञाता परम । त्यासि वानरकर्म सोडीना ।
नारद ज्ञातेपणें मोठा । सत्य मानला श्रेष्ठ श्रेष्ठा ।
तोही कळिलावा कळिकटा । स्वभाव चेष्टा अनिवार ।
गरुड देवाचें वाहन । सदा तिष्ठे हात जोडून ।
तोही करी सर्प भक्षण । ऐसें कर्म जाण स्वाभाविक ।"

ए. भा. अ. २८ ( ब्रह्मस्थिति )

उलटपक्षीं, गीताचार्य श्रीगोपालकृष्ण हा पक्का संसारी, पक्का मंडळींतला, कितीक बायका, कितीक नायिका, गुरेंढोरें व बायकापोरें यांत रमलेला. ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या कामगिरीचे वांटणीप्रमाणें पाहिलें तरी,—विष्णु-

रूपें प्रतिपाळिशी—शिवरूपें संहारिशी अर्थात् पालन करणें हेंच त्याचें स्वकर्म. तो शंकरासारखा लोकांस लंगोटी कसा फाडायला सांगणार? उलट बैरागी असला तरी संसारांत बसविणार. म्हणून तीर्थमार्गी अर्जुनाचे गळ्यांत कपटव्यूह रचून सुभद्राताई घातली. शिवाय द्रौपदी-स्वयंवराचे समयीं मदत होतीच. एवंच, असला गुरु आपल्या शिष्यास दिगंबर अवधूत होण्याला सांगणार नाहीं. शंकर **योगीश्वर** कामरिपु. श्रीकृष्ण हे **योगेश्वर**. त्यांच्या बगलेंत अनेक योग ( युक्त्या ). ते कामरिपु नसून कामजनक ( प्रद्युम्नतात )—एवंच, गीताचार्य ( कृष्ण ) आणि भाष्यकृत् आचार्य हे दोन ध्रुवांप्रमाणें थेट उलट. यांचे पंथसांप्रदायहि तसेच. श्रीशंकर हे आदिनाथ म्हणजे नाथपंथाचे ( निवृत्ति-मार्गांचे ) **गुरु**; आणि आदिनारायण हे भागवतधर्मांचे म्हणजे प्रवृत्ति-पंथाचे **गुरु**. मात्र हे गुरु एकजीव आहेत; अनुयायांप्रमाणें विरोधी नाहींत. आणि म्हणूनच ते ( कृष्ण ) आपले शिष्यांस संसारांत राहून आत्मज्ञान संपादून ज्ञानोत्तरहि स्वतःप्रमाणें कर्मयोगच सांगतात. नाथ म्हणतात:—

" **स्त्रीपुत्रादि गृहवासी, असोनि नित्य संन्यासी ।**
" **हेंही लक्षण हृषीकेशी, येणें अवतारें दावितसे ।**
" अंगीं दाविलें गोवळेंपण । सर्वेचि स्वामित्व आलें पूर्ण ।
" शेखीं सेवक जाहला आपण । तरी **पूर्णत्वपण मळेना ।**
" एकाचे घरीं उच्छिष्टें काढी । एकाचीं अंगें धूतसे घोडीं ।
" तरी **पूर्णत्वाचिये जोडी । उणी कवडी नव्हेची ।**
" एकाचीं निमालीं, आणिलीं बाळें । एकाचीं समूळ निर्दाळिलीं कुळें ।
" **इहीं दोहीं परी ज्ञान न मैळे** । हेंहि प्रांजळें प्रकाशिलें ।
" एकाचा जाहला कैवारी । एकाचा जाहला पूर्ण वैरी ।
" परी एकात्मता चराचरीं । अणुभरी ढळेना ।
" एकीं उद्धरिलीं चरणीं लागतां । तोही एकाचे चरणीं ठेवी माथा ।
" बाप ज्ञानाची उदारता । न्यूनपूर्णता तरी न घडे ।
" इतर ज्ञाते ज्ञानस्थिति । बोलें बोलोनि दाविती ।
" **तैशी नव्हे कृष्णमूर्ति । आचरोनि रीति दावीं अंगें ॥**

हा उतारा वाचून निवृत्ति किंवा संन्यासमार्गी यांची खात्री होईल कीं, गीतावाचस्पति श्रीकृष्ण तरी गिरिगुहा शोधावयास सांगत नाहीं. संसारांत राहून आत्मज्ञान संपादा व स्वार्थी कर्म संपल्यामुळें परार्थी ऊर्फ लोकसंग्राहक कर्म करीत जा, असेंच बोधानें, कृतीनें व अर्जुनासारख्या लोकविख्यात शिष्याच्या आचरणानें अखिल प्रवृत्ति-प्रियांस घोषणापूर्वक सांगतो आहे. आणि गुरुवर्य लोकमान्य तरी हेंच सांगतात. ते अज्ञान्यांचा भाकड कर्मयोग सांगत नाहींत. त्यांचें वाक्य **ज्ञानमूलक–भक्तिप्रधान कर्मयोग** असें आहे. कारण कर्म, भक्ति आणि ज्ञान हीं परस्परसंबद्धच आहेत.

राजम् अय्यर म्हणतात:—

" The course of evolution begins with Karmayoga and ends with Gnana Yoga. It is not, however, for a moment asserted that Karma ceases as soon as Bhakti begins, and *Bhakti* as soon as (Raj) Yoga begins and that Karma, Bhakti and Raj Yoga are all absent in Gnani. [No!] The *Gnani is the best Karmayogin and that thoroughly motiveless action is possible only in the case of the Gnani.*

**भावार्थः**—ज्ञान ही कर्माची परिणति खरी. पण ती लाभली म्हणजे ज्ञानी कर्मशून्य झाला असें नव्हे. कारण उत्तम कर्मयोगी जर कोणी शक्य असेल तर तो ज्ञानीच होऊं शकतो. कारण पूर्ण **निष्कामता ज्ञान्यावांचून** अन्यास अशक्यच आहे.

बाबू अरविंद घोष तेंच म्हणतात:—

" Lokasangraha is a divine obligation and not social concept and it is only when you have attained to the peace of soul can you become capable of a free and divine action.—The Kinetic side of your nature must first seek to unite itself with the Quietist. "—*Essays on Gita.*

श्रीसद्गुरु नृसिंहसरस्वति म्हणतात:—

' कर्में होय स्वरूपप्राप्ती । कर्मत्यागें कवणगति ।
' जैं देहेंद्रिय विषय सूटति । तैच त्यजिजेति कर्मातें ।

' ब्रह्मा जरी सिद्ध झाला । कर्में ब्रह्मत्व पावला ।
' वेद साक्षात् निर्मिला । प्रतीति बोला मानिजे ।
' जोंवरि देहपाशें बांधिला । तोंवरी कर्म न चुके वहिला ।
' श्रीसद्गुरुचा अगाध महिमा । भरुनि उरला असे कर्मा ।
' त्यातें त्यागोनि विशेष महिमा । काय आम्हा होईजे ।
' सृष्टी कर्मारंभ झाली । कर्मयोगें सिद्धता झाली ।
' प्रजापाळें निर्माण केली । कर्म बळी बळवंत ।
' ब्रह्मार्पण कर्म करणें । गीता बोले व्यासवचनें ।
' कर्म समाधी आचरणें । साक्षेप करणें ययाचा ।

श्रीज्ञानेश्वरमहाराज स्वतः निवृत्तियोगी व नाथसंप्रदायी असतांहि लोकांस सांगतात,

' देखें, प्राप्तार्थ जे जाहले । जे निष्कामता पावले ।
तयांहि कर्तव्य असें उरलें । लोकांलागीं ॥
(ज्ञा० अ. ३, ओ. ५५)

येथें ' प्राप्तार्थ ' म्हणजे कृतकृत्य झालेल्या ज्ञानयोग्यास स्वतः योगारूढ ज्ञानेश्वर दडपून कर्तव्य समजून ज्ञान्यानें कर्म (अर्थात् जनाकरितां ) करावें. तें ' चिकीर्षुर्लोकसंग्रहं ' या ठिकाणीं बापटशास्त्रीबोवांप्रमाणें ' चिकीर्षु ' या इच्छार्थकाचा फायदा घेऊन ज्ञानानें इच्छेस आलें तर कर्म करावें, त्यावर सक्ति नाहीं, अशी पळवाट काढीत नाहींत. ते तर साफ ' कर्तव्य ' हाच शब्द योजितात. आणि खुद्द शंकराचार्यहि 'आत्मनः कर्तव्याभावेऽपि परानुग्रह एव कार्यः—'असें एवकारानें निर्धारण करितात. " लोकसंग्रहं चिकीर्षुः " हें विद्वानाचें लक्षणच, वृत्तिविशेष नव्हे. श्रीगणेशगीता ( अ. १, श्लो. १५–१८ ) जीवन्मुक्तलक्षणांतः—

' जीवन्मुक्ता ऱ्हदे मग्ना परमानंदरूपिणि ।
' येनकेनचिदाच्छन्ना येनकेनाचिदाशिताः ।
' करुणापूर्णहृदया भ्रमंति वसुधातले । अनुग्रहाय लोकानां० ।

" यस्त्वात्मरति—तस्य कार्यं न विद्यते.' या वाक्याच्या बळावर ज्ञान्याला वाटल्यास त्यानें लोकसंग्रह करावा असें ज्ञानपक्षी म्हणतात. पण गणेशगीता

शब्दपर्यायानें ज्ञान्याचें स्वातंत्र्य कबूल करिते, पण अखेर ' लोकानां संग्रहायैतद्विद्वान् कुर्यादसक्तधी: ' असें निर्मळ सांगते. तेथें ' चिकीर्षुःचेत् ' असें म्हणत नाहीं. ( गणेशगीता अ. २, १५–२५ ).

## राजर्षींच कां ?

भगवद्गीता हें स्वत:सिद्ध एक शास्त्र आहे; असा भगवंतांचाहि शेरा आहे (.अ. १५ ) आणि लोकांनाहि तो मान्य आहे. प्रश्न असा कीं, शास्त्र म्हटलें म्हणजे त्यांत कांहींतरी 'अपूर्व ' म्हणजे ' नवें ' असावें लागतें. अखेरचा शेरा पाहतां ' ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे ' असा आहे. शंका अशी कीं, येथील प्रतिपाद्य ' ब्रह्मविद्या आणि योग ' या दोहोंपैकीं ' अपूर्व ' कोणतें ? ब्रह्मविद्या (ब्रह्मशास्त्र असा शब्द नाहीं ) अपूर्व ?–कशी म्हणावी ? कारण, इतिहास पाहतां या आर्यावर्तांत ' ब्रह्मविद्या ' ही कृतयुगापासून किंबहुना विधात्यापासून अखंड गुरुपरंपरेनें चालू असून, तिचे प्रापक उपनिषद्ग्रंथ व प्रत्यायक असे देशिकहि सदैव आहेत. भगवंतांनीं गीतेचा पहिला श्लोक उच्चारीपर्यंतहि ब्रह्मवेत्ते अनेक ऋषिमुनि होते ही गोष्ट 'उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन:।' या शब्दांनीं कबूल केली आहे. शिवाय स्वत: त्यांनीं सांदीपनी गुरूपासून ब्रह्मोपदेश घेतला होता. अर्थात् ' ब्रह्मविद्या ' हा कांहीं गीताशास्त्राचा अपूर्व विषय नव्हे. उरलें ' योगशास्त्र. ' ( आणि ' शास्त्र ' शब्द येथें योगालाच जोडला आहे. अर्थात् ' कर्मयोग'–(निष्काम कर्म ) हेंच अर्जुनापुरतें तरी गीताशास्त्राचें 'अपूर्व'–आहे; व तें तसें आहे असें चतुर्थाध्यायारंभीं कृष्णांनीं आपण होऊनच उकरून काढून सांगितलें आहे. कोणी म्हणतील, ब्रह्मविद्येप्रमाणें कर्मयोगहि पूर्वयुगीं होता असें भगवंतांनींच सांगितलें आहे. होय, पण पूर्वयुगीं असलेला हा योग साफ नष्ट झाल्यामुळें तो मी जसा अपूर्व असाच सांगतों, असें ते म्हणाले. तरीहि पूर्वी तो योग होता म्हणणें अर्जुनाला खरेंच वाटेना, इतका तो नामशेष झाला होता. ब्रह्मविद्या अशी मध्यंतरीं नष्टांश झाल्याचें त्रिकालज्ञ भगवान् कोठेंहि म्हणत नाहींत. याखेरीज श्रीकृष्ण हे जरी साक्षात् ब्रह्मज्ञान होते तरी त्यांनीं आपणा स्वत:स ज्ञानगुरु असें येथें म्हटलें नाहीं. किंवा इतरांनींहि म्हटलें

नाहीं. अर्जुनानें ( ११-४ ) व संजयानेंहि ( १८-७५-७८ ) त्यांस ' योगेश्वर ' असें म्हटलें आहे. ' **ज्ञानेश्वर** ' असें म्हटलें नाहीं. शिवाय संजयानें गीताशास्त्राची जी फलश्रुति सांगितलेली आहे तिचें महत्त्व ' तस्य कार्य न विद्यते ' असल्या निःखळ ' आत्मारामास ' काय असणार ? तेथें श्री कशाला ? विजय कोणावर ? विभूतीपुढें भूतीची काय मातब्बरी ? निस्त्रैगुण्यापुढें नीतीची तरी कडसणी कशाला ? या सर्व गोष्टींचें महत्त्व **कर्मयोग्यालाच** आहे.

दुसरा पुरावा. हा निष्काम कर्मयोग विवस्वान्, मनु, इक्ष्वाकुं, यांस सांगितली. पण हे सर्व राजर्षि होते[1], असें भगवानांनींच म्हटलें आहे; ब्रह्मर्षि म्हटलें नाहीं. न्याय उघडच आहे कीं, हे सर्व क्षत्रिय असल्यानें त्यांना 'नैष्कर्म्य योग ' पढवून त्यांचें प्रजापालनरूपी क्षात्रकर्म कोणीं करावें ? असले लोक ' **कर्मयोगी** 'च असले पाहिजेत. आणि अर्जुनहि क्षत्रियच असल्यानें तो कर्मयोगोपदेशालाच योग्य असें पाहून त्याला भगवंतांनीं कर्म ( निष्काम )-योगच सांगितला. मात्र ज्ञानी झाला म्हणजे कर्मबाह्य अशी भगवंतांची समजूत व स्वानुभवहि नसल्यानें, व **खराखरा निष्कामयोग पूर्ण ज्ञान्यांवांचून होणेंच नाहीं**, हें त्यांस स्पष्ट दिसत असल्यानें श्रीज्ञानेश्वर, श्रीएकनाथप्रभृति संतांचे साक्षींप्रमाणेंच भगवंतांनीं त्यास आत्मप्रतिमपूर्णप्रज्ञ करून मग कर्मच कर असें सांगितलें व शिष्यानेंहि वर्म ओळखून एकरूपतेस्तव ' गुरो, तुमचीच-तुम्ही सांगितलेलीच-कामगिरी मी करितों,' असें म्हणून धनुष्य उचलिलें.

पण असें असतां रा. सा. चापेकर[2] व वे. शा. आचार्यभक्त अर्जुनाला अज्ञानीच म्हणतात. परंतु, भगवान् तर, जो योग, सूर्य, मनु, इक्ष्वाकुप्रभृति राजर्षींस मी सांगितला व जनकादिकांनींहि अभ्यासिला, तोच तुला तूं माझा

---

१. ऋषि म्हणजेच साक्षात्कृतधर्मा अर्थात् आत्मज्ञ, आणि सूर्य, मनु हे अनात्मज्ञ होते असें कोण म्हणेल ?

२. महात्मा गांधींच्या 'अनासक्तियोगाचें परीक्षण' रा.सा. चापेकर यांनीं म० सा० पत्रिका, वर्ष ४, अंक १२, यांत केलें आहे. त्यांत 'अर्जुन हा ज्ञानी होता, अथवा भगवंतांच्या उपदेशानंतर तसा झाला असें म्हणण्यास यत्किंचितहि आधार नाहीं. उलट' असें विधान केलें आहे व पुढें ते म्हणतात, ' ज्ञानोत्तर कर्माला कोठेंच जागा नाहीं. '

भक्त आणि मित्र असल्यामुळें सांगतों, असें म्हणतात. आणि सूर्य, मनु, इक्ष्वाकु, हे आत्मज्ञानी असून कर्मयोगी होते, तर अर्जुनाला तो योग सांगतांना, लोकमान्यांचे चिरंजीवांनीं जशी पश्चात् ' रहस्य ' वजा करून सामान्यांसाठीं गीतेची एक आठ आणेआवृत्ति काढली, तशी अर्जुनासाठीं भगवंतांनीं अज्ञान्यांचा निष्कामयोग, अशी निष्कामाची संक्षिप्त एडिशन काढली असें म्हणणें कीं काय? असेंहि कोणी म्हणतील; परंतु त्या पक्षांत मूर्त, सत्य किंवा सत्यस्य सत्य, ज्याला श्रुतिस्मृति म्हणतात त्या भगवंताकडे ठकबाजी येते. असें पहा कीं, ब्रह्मविद्या काय किंवा योग्य काय, दोन्हीहि देवानेंच उभे केले. अर्जुनाचा साक्षात् प्रश्न केवल ' काय करूं?' पाप कसें टळेल?' एवढाच. त्यावर उपाय सुचविले देवानें. बरें, ते सांगतांना उठाउठी बोलून सोडिले काय? नाहीं. प्रत्येक वेळीं केवढें चंद्रबळ आणिलें! 'तूं माझा लाडका, तूं माझा जिवलग, तूं माझा दोस्त म्हणून मी तुला अगदीं गुपित, केवळ गुपित, फार फारच गुपित, अगदीं एकांतांतली, गुलदस्तांतली ' नव्हे खोलींतली, मच्छरदाणींतली, लेपांतली, कुशींतली अशी गोष्ट सांगतों. ही भलत्यास ( इदं ते नातपस्काय० ) सांगशील तर अळीमिळी, खबरदार, ' इतकें हडसून-खडसून अखेर सांगितलें काय? तर अपरोक्षानुभव विधुर असा कर्मयोग ऊर्फ सांख्यकर्मयोग. वारे गुरु. यांस तारक म्हणावें कीं प्रतारक म्हणावें लागेल याचा आक्षेपकांनीं विचार करावा. लेखकास तर वाटतें 'कुतर्कोयं तान्प्रत्यभिभवति मोहाय जगतः.'

## एक शास्त्रीय कोटी

ज्ञानपक्षीयांची आणखी एक कोटि अशी आहे कीं, जो आत्मक्रीड आत्मरति ऊर्फ पूर्ण ज्ञानी झाला, तो ईश्वराचा आत्माच अर्थात् त्याशीं एकीभूत झाला. यामुळें 'तूं कर्म कर,' अशी प्रेरणा ईश्वराचे मनांत करणें आलें तरी तें शक्यच नाहीं. कारण ' प्रेरणा ' म्हटली कीं, ' प्रेरक ' आणि ' प्रेर्य ' अशा दोन पृथक् व्यक्ती पाहिजेत. पण ज्ञानी हा ईश्वराशीं अभिन्न झाला–' यथा नद्यः स्यंदमानाः समुद्रे ' या न्यायानें समरस झाला, आतां

१. वे. शा. सं. विष्णुशास्त्री बापटकृत **बालबोधिनी** भगवद्गीता, पान ८५ पहा.

त्याला प्रेरणाच शक्य नाहीं. खरें आहे. पण यावर एक शंका अशी आहे कीं, येथें प्रेरणेची अपेक्षाच कोठें आहे? गांवचा ओढा एकदां नदींत मिळाल्यावर त्याला भिन्न गतीच उरत नाहीं. मग या सिंधूची जी गति तीच त्याची गति. हें जर खरें तर येथें ज्ञानी ज्या भगवंतांशीं समरस किंवा एकीभूत होणार, तो भगवंत जर विशेष जोरानें 'वर्ते एवच कर्मणि' म्हणून आपली दिशा दाखवितो. अर्थात्, तो जर अनवरत कर्मपरायण आहे, तर आतां ज्ञानी अंग झाडून वेगळा कर्मशून्य कसा राहील? भिन्न असेल तर प्रेरणा शक्य आहे. अभिन्न आहे तर प्रेरणेची अपेक्षाच नाहीं!

गीतेंतला अर्जुन अथ ते इति अज्ञानीच होता, असें आचार्यभक्त म्हणतात. पण शंकराचार्य आपले भाष्यारंभींच स्पष्ट म्हणतात कीं, लोकसंग्रहेच्छु भगवंतांनीं हा गीताधर्म लोकोद्धारार्थ म्हणून सांगितला. अर्जुनाला पुढें केला याचा हेतु 'गुणाधिकैर्गृहीतोऽनुष्ठीयमानश्च धर्मप्रचयं गमिष्यतीति' गुणिश्रेष्ठांनीं कोणतीहि गोष्ट मान्य करून स्वत: आचरून दाखविलेली गोष्ट उत्तरोत्तर बळावते. म्हणून ठीक. लोकांचा उद्धार ज्ञानावांचून शक्यच नाहीं. हें ज्ञानी पक्षास कबूल आहेच. पण ज्याचें अनुकरण करावें म्हणून भगवंतांनीं स्वत: नमुना बनवून प्रदर्शनांत ठेविला तो तर, यांचें म्हणणें, साफ अज्ञानी. अज्ञाचे अनुकरणानें लोक ज्ञानी होऊन उद्धरणार कसे हें कोडें आहे. नमुना म्हणून कोणीहि कारागीर जें चित्र जगतापुढें मांडतो तें अधुरें नसून आपली शिकस्त करून सर्वांगपरिपूर्ण असेंच मांडतो. आणि येथें तर ज्ञानाचे नांवानें फाल्गुनवाद्य. केवळ कर्माचा हमाल. हाच अज्ञान्यांना ज्ञानगुरु होणार तो कसा?

दुसरी गोष्ट, अठरा अध्यायांपर्यंत वेळोवेळां स्वत: होऊन अर्जुनाला भगवंतांनीं आपलें प्रेम, ऐश्वर्ययोग व दिव्य ज्ञान यांचें लांबलचक वर्णन करून ठिकठिकाणीं त्या गोष्टींची चमकहि दाखविली. बरें, अर्जुन कितीहि मूढ झाला तरी, विश्वरूप पाहतांच चाकाटला व गुरूंचे पोतडींत कांहीं अलौकिक वस्तु आहे खरी अशी त्याची पक्की खात्री झाली. इतकें झाल्यावर आणि गुरुजी म्हणजे अरेतुरेचे दाटींतले असतांना त्यांचेपासून असली दुर्मिळ दिव्य वस्तु हिसकल्याशिवाय गप्प बसेल हें संभवतें काय? आपण पहातों कीं, बापानें शहरांतून एकादें उत्तम खेळणें किंवा खाऊ आणून तो लाडक्या

मुलाचे नजरेस पाडून त्याला न देतां आपले पाकिटांतच कुलपबंद ठेविला तर तो अज्ञान पोर ती वस्तु हातीं येईतों आपल्या आणि बापाचेंहि जिवाचें रान करून सोडितो; आणि शेवटीं ती हस्तगत करितो तेव्हां राहतो. मग नरोत्तम अर्जुन या पोरापेक्षांहि मूढ होता कीं काय ? पण असल्या कोटीस प्रतिकोटी लढविण्यापेक्षां अर्जुनाच्या ज्ञानवत्तेबद्दल व तदुत्तर लोकसंग्रहबुद्ध्या कर्मपरतेबद्दल भाष्यकारासी वाट पुसत जाणारे भगवंताचे अकरावे अवतार श्रीज्ञानेश्वर, ज्यांचे घरीं भगवान् कावडीनें पाणी भरीत होते, ते ज्ञानेश्वरांचे पुन: संस्कारकर्ते श्रीएकनाथ, अशांचीच साक्ष दिली आहे व तिचे बळावर नि:शंक असें ठरतें कीं, अर्जुनानें पूर्ण ज्ञानी होऊन केवळ लोकसंग्रहार्थ (निष्काम) युद्धकर्म केलें. अर्थात् तो ज्ञानोत्तर कर्मयोगी होता, हाच पक्ष सबळ.

## ज्ञान्यानें कसें वागावें ?

ज्ञान्यानें कसें वागावें याबद्दल शांतानंद नामक आत्मज्ञांचें म्हणणें:- ‘क्रिया द्वैतं न कर्तव्यं, भावाद्वैतं सदा कुरु’-बाह्यकृतींत अद्वैत नको, मनोभावनेंत मात्र तें अखंड असावें.

"The outward conduct of such wise men is in no way different from that of others, except that it is regulated by the loftiest ethics and by a love which is as spontaneous as it is universal. They are *conscious actors* in the drama of the world, having merged their little narrow selves in the ocean of universal self-hood and are the freest and the most fearless men and the greatest benefactors that by example and precept bless our sad planet."

"The Gnani should act in life just as other men do, but all the while he should himself never forget that even his action is real only on the phenomenal plane. His narrow personality is a thing of the past, and he has become *impersonal* even in life—God himself; and that is why it is said that ‘Killing, he killeth not’ That is why it is said that Gnani does not really do Karma."

**सनातनधर्म** Text-book—"It must not be supposed that the Gnani is an abstainer from action. On the contrary he best

understands action and has the best reason for engaging in it. And therefore it is said:

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत। कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥

स्वामी विवेकानंद यांची शिष्या **निवेदिता** हिनें "My Master as I find Him" या ग्रंथांत म्हटलें आहे कीं, आमचे गुरुमहाराज जरी उपदेशकालीं आम्हांस ज्ञानवैराग्याचा उपदेश करीत, तरी आम्ही तीर्थयात्रेला निघालों असतां, मीं पाहिलें कीं, ज्या ज्या यात्रेस आम्ही गेलों त्या त्या ठिकाणीं सामान्य जनांचा जो यात्राविधि असेल त्याप्रमाणें ते पुरापूर स्वतः वागत. हें पाहून मला हंसूं येई कीं, हे ज्ञानी होऊन प्राकृतांसारखें वागतात हें काय?

सारांश, ज्ञाते कर्मातीत झाले म्हणून त्यांनीं कर्मशून्य व निस्तब्ध बसावें असें समंजस लोक म्हणत नाहींत—भगवंतांनीं 'तस्य कार्यं न विद्यते' हें हिशेबी बोलणें बोलून त्यांना पेन्शनींत काढिलें; परंतु 'कुर्यात् विद्वान्' इत्यादि शब्दांनीं त्यांनीं अनासक्तीनें लोकसंग्रहार्थ कर्म करावें असेंच म्हटलें आहे; तर येथील लिङ्, केवळ विध्यर्थक नाहीं. मानिला तरी निमंत्रण, आमंत्रण, अधीष्ठ, प्रार्थना यांपैकीं कोणत्या तरी अर्थानें भगवद्वाणीचा आदर त्यांना करण्याचें कारण नाहीं; असें स्वतः ते—ज्ञाते—म्हणत नसतां त्यांचे वकिलांनीं म्हणावें हें नवल आहे. प्रभूच्या उदार हेतूचा असा अनुदार उपयोग करणाराचें हें कार्पण्य अनुकंपनीय आहे. खुद्द श्रीशंकराचार्यांकडे पहावें तर ते आपणांस **'सर्वतंत्र-स्वतंत्र'** असें न्यायतः म्हणवीत असतांहि त्यांनीं आपलें उभें आयुष्य 'लोकसंग्रहांतच' घालविलें व अजूनहि त्यांचे मठ, सांप्रदायिक आचार्यामागें कर्माचें लिगाड इतकें असतें कीं, नैष्कर्म्याची गादी आहे असें म्हणणें साहस होतें. यावर वकिलांची कोटी अशी कीं, श्रीकृष्णाप्रमाणें ते कामगार होते. यामुळें ज्ञातेपणींहि बांधले होते. ठीक. पण त्यांचे वादिपीठावरचे सिद्धान्त सोडून जगद्गुरुपीठावरूनचा उपदेश ज्ञान्यानें लोकसंग्रह करावा असाच दिसतो. प्रश्नोत्तर रत्नमालिकेंत आचार्य म्हणतातः— 'किं संसारे सारं? बहुधा विचिंत्यमानमिदमेव। मनुजेषु दृष्टतत्त्वं स्वपरहितायोद्यतं जन्म।' येथें 'दृष्टतत्त्वं आणि परहितायोद्यतं' हे शब्द काय सांगतात तें पहावें.

अखेर सद्गुरुकृपेनें स्वतः जीवन्मुक्ति लाभलेले राजम् अय्यर या मुद्यावर काय म्हणतात तें वाचकांसाठीं देतों.

" It cannot be denied that Krishna lays special stress that Gnana instead of unfitting a man for the world, as it is *vulgarly* supposed to do, brings about the best adjustment to its ways. A Gnani need not be a recluse, he need not fly away from the haunts of men and live in lonely forests and mountain caves, and be dead to the world, but he is to live in the world and be out of it. He should perform actions, though not for himself, yet for the sake of others, for the world follows whatever example the wise men set ..... The Gnanis should themselves perform actions in the regular way and make others also do the same."

"This is the essence of Shri Krishna's teaching in the first few chapters, and thus he first taught to Surya, the Sun God. Surya taught in his turn to Manu, Manu taught to Ikshwaku and then it descended traditionally to kings and sages."

निष्कर्ष; ज्ञान्यानें माणुसघाणेपणा न करितां लोकांतच राहून स्वतःसाठीं नाहीं तरी लोकसंग्रहार्थ म्हणून यथावत् कर्मच करावें आणि उपदेशानें व स्वकृतीनें जन सन्मार्गास लावावे. " हाच म्हणजे ज्ञानोत्तर निष्काम कर्माचा—नैष्कर्म्याचा नव्हे " श्रीकृष्ण म्हणतात, " मी प्रथम सूर्याला उपदेश दिला, त्यानें मनूला, इत्यादि."

## लोकमान्यांचा ' ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोग '

गीता अर्जुनापुरती तरी कर्मयोगपर—ज्ञानोत्तर-कर्मयोगपर आहे, हें या लेखांत दाखविलें आहे. पण तो कर्मयोग भक्तिप्रधान आहे असेंहि खरेंच आहे. यांतलें एक कारण जागजागीं ' तूं भक्त आहेस म्हणून तुला हें सांगतों. ' ' वेदानें, दानानें, तपानेंहि ' जें मिळणार नाहीं, तें भक्तिगम्य आहे, असें भगवंतांनीं अर्जुनासमक्ष सांगितलें. शिवाय ' किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ' असें म्हटलें आहे आणि सांप्रतचा कर्मयोग हा क्षत्रिय

राजर्षींसाठींच सांगितलेला व क्षत्रियांना ' भक्ता ' हें विशेषण जाणूनच दिलें आहे. कारण, क्षत्रियांना नाक धरून बसावयाला वेळ नाहीं. पण भक्ति हा अन्यसाधननिरपेक्ष केवळ भावनामय धर्म असल्यामुळें क्षत्रियांना तो अधिक सुलभ म्हणूनच भक्तिमार्गाला भगवंतांनीं **' राजविद्या '** ' राजगुह्य ' असेंच विशिष्ट नांव दिलें आहे. तेव्हां हा कर्मयोग भक्तिप्रधान असणारच. शिवाय, कोणतेंहि कर्म म्हटलें तरी त्याची हीच प्रणाली असते. कारण, काय करावयाचें व कसें करावयाचें याचें स्वरूप म्हणजे चिकीर्षित कार्याचें **स्वरूपज्ञान** प्रथम, तेव्हां पुढें कार्य. बरें, नुसती ज्ञानशक्ति अकिंचित्कर. तिला इच्छाशक्तीची जोड मिळेल तेव्हांच क्रिया ( कर्म ) सिद्ध होईल. आणि हीच इच्छाशक्ति जितकी अधिक तीव्र असेल तितकी क्रियासिद्धि यथाज्ञानपूर्ण उतरेल. अर्थात् इच्छाशक्ति हीच ज्ञान व क्रिया यांची सांगड घालणारी प्रबळ शक्ति आहे. शरिरांत जसें ' पित्तं पंगु, कफः पंगु, वायुः तत्र प्रचारकः' त्याचप्रमाणें इच्छाशक्ति हीच चालक आणि उत्कट इच्छा हीच **भक्ति.** एतावता कोणतेंहि कर्म ज्ञानमूलक भक्तिप्रधानच असल्यानें लोकमान्यांचें हें वाक्य एक महावाक्यच आहे असें लेखकास तरी वाटतें. मात्र गीतेंत सर्वच कर्म ज्ञानोत्तर नसून ज्ञानपूर्व व ज्ञानोत्तर असे दोन प्रकार आहेत; भक्तीहि तशीच पूर्वउत्तर आहे. ज्ञानपूर्व व वैयक्तिक-नियत कर्म. आणि ज्ञानोत्तर ते लोकसंग्राहक. ज्ञानपूर्व हें उपकुर्वाण व ज्ञानोत्तर तें नैष्ठिक. पण उभयहि शास्त्रीय;[1] उच्छास्त्र नव्हत. आणि ' चातुर्वर्ण्यं मया सृष्टं ' असें आपण होऊन जनास सांगणाऱ्याला नैष्ठिक कर्मयोगी जितके अधिक तितका संतोष अधिक. कारण, हे योगी समष्टिहितार्थच उद्युक्त असणार व केव्हांहि एकापेक्षां अनेकांचें हितकर्ताच अधिक मान्य. यावरून अर्जुनाला—उदाहरणीभूत अर्जुनाला शुष्क कर्मयोगदीक्षा दिली नसून ज्ञानोत्तर कर्माचीच दिली हें सुज्ञांचे ध्यानांत येईल.

एतावता, अर्जुनानें कर्म केलें, याचें कारण तो अखेरपर्यंत **अज्ञानीच**

---

१. व्याकरणांत ( भाषाशास्त्रांत ) असें ' पद ' म्हटलें कीं, ' सुबंत ' तरी नाहींतर ' तिङन्त ' तरी, दोन्हींहि संस्कृत–फार काय, पण सामान्यांना संन्याशासारखें स्वतंत्र वाटणारें ' अव्यय ' तें देखील संस्कारयुक्त; त्याप्रमाणेंच येथें.

होता, हें म्हणणारांनीं आपलें दुराग्रह पारुष्य सोडावें व अर्जुन हा पूर्णज्ञानी, किंबहुना दुसरा कृष्णच होऊन तसाच स्वकर्तव्यशून्य होऊन लोकसंग्रहार्थ युद्धार्थ सज्ज झाला व ज्ञानोत्तर कर्ममार्गाचा भगवदादेशास्तव दिवटा होऊन बसला हें ध्यानीं घ्यावें. आणि सांख्य व योग हे परस्परविरोधी नसून साहाय्यक आहेत. मात्र जगताचे शुक्लकृष्ण या गतींप्रमाणेंच प्रवृत्ति व निवृत्ति हेही शाश्वत[1] मार्ग असल्यामुळें व जगत्पित्याला उभय मार्गांनींहि निःश्रेयःप्राप्ती करून देणें असल्यामुळें त्यांनीं कर्म व ज्ञान हे दोन हमरस्ते आंखून टाकिले आहेत. पण हे परस्परांशीं फाटून नसून एकान्तिक आहेत, हें पूर्ण ध्यानीं घेतलें असतां, आजकाल कर्मयोगपक्षपाती व ज्ञानयोगपक्षपाती यांचा ( गैरसमजानें ) अहिनकुलवत् विरोध माजला आहे व ज्ञान्याला कर्म कर म्हणणें म्हणजे ' अब्रह्मण्यम् ' असें वाटतें, तें दूर होऊन परस्पर अज्ञान असल्यानें एकमेकांचे प्रतिभट बनलेले उभय राघववीर—लव आणि चंद्रकेतु-हे प्रभु रामचंद्र येतांच त्यांचे दर्शनसमकालच—"शांतो लवः प्रणत एव च चंद्रकेतु." असा प्रकार होऊन,

विरोधो विश्रान्तः प्रसरति रसो निर्वृतिघनः ।
तदौद्धत्यं क्वापि व्रजति, विनयः प्रव्हयति माम् ।
झटित्यस्मिन्दृष्टे किमपि परवानस्मि ।।

असे लवाचे तोंडून उद्गार आले, त्याचप्रमाणें दोन्हीहि पंथ भगवंतांनीं एकाच अंतिमासाठीं आंखले आहेत हें ध्यानीं घेऊन परस्परदर्शनाबरोबर वरील लवाचे उद्गार तोंडून येतील, तर लेखकाला परमानंद होईल.

यस्य देवे पराभक्तिः । यथा देवे तथा गुरौ।
तस्ये ते कथिता ह्यर्थाः । इति दिक्.

---

१. अजोह्येकोजुषमाणोनुशेते । जहासेनां भुक्तभोगामजोन्यः । या श्रुतीप्रमाणें ' जुषमाण 'ते प्रवृत्तिप्रेमी व ' भुक्तभोग ' ते निवृत्तिप्रेमी असें सृष्टींत सदा असावयाचेंच आणि उत्क्रांतीच्या साखळींतले हे अवश्य दुवे आहेत.

# ध्येयनिष्ठा

लेखक—चिंतामण काशिनाथ मोडक, बी.ए., एल्‌एल्‌.बी., कल्याण

[ प्रसिद्ध कवि 'माधवानुज' यांचे हे चिरंजीव असून यांनीं वडिलांचे कवितासंग्रहास प्रस्तावना लिहिली आहे. ]

**देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥**

संतशिरोमणि तुकाराममहाराज यांचें ब्रीदवाक्य वर दिलेलें आहे. कोणाहि ध्येयनिष्ठ पुरुषाचें हेंच ब्रीदवाक्य असतें, व मानवी जीवितामध्यें कांहींतरी एक निश्चित ध्येय असल्याशिवाय, सुकाणूं नसलेल्या व कर्णधार नसलेल्या तारवाप्रमाणें तें कोठेंतरी व कसेंतरी वाहत जाण्याचा फार मोठा संभव असतो व मग ती मोठीच हानि समजावी.

प्रत्येक मनुष्यास लहानपणापासून शिशु अवस्था, पौंगडावस्था, तारुण्यावस्था इत्यादि अवस्था प्राप्त होत असतात व त्यांमध्यें लहानपणीं आई, त्याच्याहून जरा मोठें झाल्यावर खेळ व इतर आपल्या सभोंवार दिसणाऱ्या प्रत्येक पदार्थाबद्दलची जिज्ञासा व तारुण्यामध्यें त्या अवस्थेला सहज व स्वाभाविक असणारे मनोविकार असतात. हा स्वाभाविक व सर्वसाधारण सिद्धान्त समजला जातो. पण या काळांतहि किंवा तारुण्यावस्थेचा भर ओसरण्याचे सुमारास प्रत्येक व्यक्तीला आपल्याला या आयुष्यांत कांहींतरी ध्येय असलें पाहिजे ही जाणीव उत्पन्न झालेली असावी. एकदां ही जाणीव उत्पन्न झाली म्हणजे मग आपल्या सभोंवतालची परिस्थिति ज्याप्रमाणें असेल, आनुवंशिक संस्कार ज्याप्रमाणें असतील, एखाद्या थोर व्यक्तीच्या उदाहरणाचा आपल्या मनावर ज्याप्रमाणें ठसा उमटला असेल त्याप्रमाणें कोणचें तरी एकच एक ध्येय प्रत्येक व्यक्तीस ठरविण्याचें जमतें. पण अशाहि कांहीं व्यक्ति आपण पहातों कीं, त्यांची वृत्ति म्हणजे जशी कांहीं एखाद्या विटलेल्या जुनेराप्रमाणें कळाहीन, रंगहीन असते. त्यांस या जगामध्यें असा एकहि विषय आढळत नाहीं कीं, त्या विषयाची त्यांच्या अंतःकरणास ओढ बसावी. त्यांचा चेहरा पाहिला म्हणजे एखाद्या सुतक्यासारखा दिसावा व जणूं कांहीं यांस व्यर्थ जन्मास घातलें अशाबद्दल प्रत्यक्ष ब्रह्मदेवासहि

पश्चात्ताप करावयाची पाळी यावी. पण अशा अपवादात्मक व्यक्तींबद्दल आपणांस येथें विचार करावयाचा नाहीं. इतरांस आयुष्याच्या मध्यकाळापर्यंत, जगासंबंधीं जे निरनिराळे अनुभव आलेले असतात, त्यांच्या मनावर शिक्षणाचा जो परिणाम झालेला असतो व मानवी जीविताचें महत्त्व त्यांस ज्या प्रमाणांत पटलेलें असतें, त्याप्रमाणें कोणच्या तरी एका ध्येयाची अस्पष्ट अशी कल्पना तरी त्यांस आलेली असावी. अर्थात्च अशा कांहीं व्यक्ती आहेत कीं, त्या जणूं कांहीं एका विशिष्ट ध्येयाकरितांच जन्मास आलेल्या असतात व त्या ध्येयध्रुवाकडेच त्यांच्या जीविताची नौका सारखी जात असते. पण आपणांस अशा अद्वितीय, अलौकिक व प्रेषित म्हणून अवतरलेल्या विभूतींचा येथें विचार करावयाचा नसून, सामान्य माणसांबद्दल विचार करावयाचा आहे. कारण सामान्यांतूनच प्रत्येकास असामान्य व्हावयाचें असतें.

लहानपणापासून प्रत्येकाचे कानावर आपल्या समाजांतील, देशांतील आदर्शभूत समजल्या जाणाऱ्या व्यक्तींचीं नांवें पडत असतात. त्यांपैकीं अज्ञेय अशा कारणांकरितां प्रत्येकास एखाद्या विशिष्ट थोर माणसांबद्दल विशेष अभिमान व आदर हीं वाटूं लागतात. साधारणपणें त्या थोर व्यक्तींच्या सहवासाचा, संभाषणाचा व मार्गदर्शकपणाचा एखाद्यास लाभ झाला म्हणजे त्याचें उदाहरण आपल्या डोळ्यांसमोर ठेवून त्याप्रमाणें आपण होण्याचा प्रयत्न प्रत्येकजण करूं लागतो. नामांकित चित्रकार, कवी, गायनवादनकुशल, शिल्पकार, त्याचप्रमाणें धीरोदात्त वीरपुरुष, जगामध्यें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें अचाट घडामोडी करणारे मुत्सद्दी, राज्यकर्ते, स्वातंत्र्याकरितां आत्माहुति देणारे असामान्य हुतात्मे, आपल्या तेजस्वी, अमोघ व परिणामकारक वक्तृत्वानें हजारों माणसांचीं अंतःकरणें हलवून तीं काबीज करणारे वक्ते, लेखणीच्या जोरावर समाजामध्यें प्रचंड खळबळ उडवून देणारे खंदे लेखक, आपल्या उदाहरणानें जगांतील विवेकी लोकांना सत्त्वान्वेषणाच्या कामीं आदर्शवत् होणारे महानुभाव व "ज्यांसी आपंगिता नाहीं। त्यांसी धरी जो हृदयीं।" या श्रीतुकाराममहाराजांच्या उक्तीप्रमाणें अखिलवस्तुजाताबद्दल ज्यांस पूर्ण कळवळा असतो, असे समदृष्टीचे संत यांपैकीं प्रत्येकाबद्दल जरी आपणांस आदर वाटत असला तरी एखाद्या विशिष्ट व्यक्तीबद्दल प्रत्येकास विशेष आदर

व ओढा वाटणें साहजिक असतें व त्याच्याप्रमाणें आपण होण्याची इच्छा प्रत्येकास होणें जरूर आहे.

आपण अमुकासारखें व्हावें अशी इच्छा उत्पन्न झाली म्हणजे मग त्याच्या कार्याची विशेष आवड आपणांस उत्पन्न होते व विचारपूर्वक ही आवड कायम झालेली असली म्हणजे तें आपलें आयुष्याचें ध्येय ठरतें व त्याच्या ठिकाणीं आपली निष्ठा बसते व आपण ध्येयनिष्ठ होतों.

ध्येयावरील निष्ठा मात्र अशी तीव्र असावी कीं, ती बाब पुढें आली असतां, बाकी सर्व गोष्टींना फांटा देऊन क्षणमात्र सर्व जगाशीं आपला संबंध तात्कालिक तरी सोडून देऊन—इतर प्रसंगीं मोह पाडणारे असे सर्व विषय दूर करून—आपल्या कामांत तत्पर असणारा लष्करी शिपाई ज्याप्रमाणें हुकूम झाल्याबरोबर तट्कन् उभा राहून, सर्व बाजूंस सारून तडफेनें व तत्परतेनें आपल्या कर्तव्याकडे धांवतो, त्याप्रमाणें मनासह देहानें ध्येयाकडे इतक्या एकदम ओढ घ्यावी कीं, मग त्यामुळें मानेला ओढ बसली तरी त्याची फिकीर नाहीं.

अशी आपल्या ध्येयावर निष्ठा असल्याशिवाय त्याचे प्राप्त्यर्थ दीर्घ परिश्रम करणें, त्या विषयांत निष्णात असलेल्या व्यक्तींशीं सहवास करणें, त्याबद्दल जेथें चर्चा होत असेल व माहिती मिळेल अशा प्रत्येक प्रसंगास हजर रहाणें व शक्य तर अशा विषयाबद्दल ऊहापोह घडेल असे प्रसंग मुद्दाम घडवून आणणें हें आपल्या हातून होणार नाहीं. अर्थात्च या बाबतींत महत्त्वाची मुख्य बाब म्हणजे आपल्या ध्येयाबद्दल तीव्र निष्ठा उत्पन्न होणें ही आहे. प्रत्येकाचें ध्येय काय आहे हें पाहून त्याचे स्वरूपावरून त्या माणसाचे स्वभावाची सात्त्विक, राजस व तामस अशी वर्गवारी होईल. पण कोणता विषय त्याचें ध्येय आहे, हा सर्वस्वीं मुख्य प्रयत्न नसून कोणत्याहि कां असेना ध्येयाबद्दल त्याचे ठिकाणीं निष्ठा उत्पन्न झाली म्हणजेच बहुतांशीं कार्यभाग होत असतो. कारण शीघ्र गतीनें वाटोळें फिरणाऱ्या यंत्रांत वस्त्राचें जरी एखादें टोंक सांपडलें तरी मग सर्वच्या सर्व वस्त्र ज्याप्रमाणें तेथें ओढलें जातें, त्याप्रमाणें एकदां ध्येयाबद्दल निष्ठा उत्पन्न झाली म्हणजे मग स्वाभाविकच कांहीं काळानें तरी आपण ध्येयस्वरूप होणें ओघप्राप्तच आहे.

कांहीं व्यक्तींचे ठिकाणीं आपल्या ध्येयाबद्दल इतकी तीव्र निष्ठा आढळते कीं, त्या ध्येयाचा प्रश्न आला म्हणजे मग त्याचे पुढें इतर सर्व विषय त्यांस टाकाऊ व तुच्छ वाटतात. हें ध्येय अर्थात् जितकें उज्ज्वल, दिव्य, सात्त्विक व लोकमान्य असेल तितकी त्या ध्येयप्राप्तीची खटपट करणाऱ्यांची लवकर उन्नति होते व ते कमीअधिक लोकादरास पात्र होतात. पण या बाबतींत देखील एखाद्यास त्याच्या ध्येयाच्या उच्चनीचपणावरून कमीअधिक मानणें अन्यायाचें होणारें असतें. कारण ज्याच्या मनाची, स्वभावाची, आनुवंशिक संस्कारांसह बुद्धीची जशी ठेवण, त्याचप्रमाणें त्या वृत्तीस पोषक व अनुकूल अशाच विषयाकडे तो ओढला जातो. •

आपल्या ध्येयाबद्दल जितकी अधिक तीव्र निष्ठा तितकी ती अधिक परिणामकारक होत असते. तीव्रतेशिवाय निष्ठा पुरीच होऊं शकत नाहीं. आपलें तन, मन, धन आपण आपल्या ध्येयप्राप्तीच्या कामीं खर्च करण्यास तयार असल्याशिवाय भागत नाहीं व तशी तयारी झाल्यानंतरच आपला कार्यभाग होतो. सर्वस्वाची आहुति देण्याची आपली तयारी असल्याशिवाय आपल्या ठिकाणीं ध्येयाबद्दल तीव्र निष्ठा उत्पन्न झाली आहे असें मानतांच येणार नाहीं. ही मनाची तयारी होणें, वृत्ति ध्येयाकार होणें, किंबहुना एक-कल्ली असें म्हणवून घेण्यास तयार होणें हेंच ध्येयाबद्दल तीव्र निष्ठा उत्पन्न होण्यांत मुख्य कार्य घडत असतें व हाच चिरकाल टिकणारा लाभ होत असतो. अशा प्रकारच्या मनाच्या तयारीच्या जोरावरच जगांत आजपर्यंत निरनिराळे जिवावर उदार होणारे शोधक, ध्येयसिद्धीकरितां आत्मार्पण करणारे वीर व सर्व जगास वंदनीय होऊन बसलेले महात्मे निर्माण झालेले आहेत.

ध्येयप्राप्तीचे प्रयत्न करीत असतांना वृत्ति तदाकार बनून मीपणाचा, कर्तेपणाचा विसर पडणें ही ध्येयनिष्ठेची परमावधि होय. थोर विभूतींच्या हातून जी लोकोत्तर कामगिरी होते, ती याच भूमिकेवरून होते. ध्येय-निष्ठेच्या जोरावर जेव्हां मनुष्य आपल्या अभिमानाच्या, एकदेशीपणाच्या मर्यादा ओलांडतो व पूर्णपणें निरभिमानी होतो, तेव्हांच त्याचें अनंताशीं तादात्म्य होतें व तेव्हांच त्याच्याकडून उज्ज्वल व अलौकिक कार्यें घडतात.

यासंबंधीं तुकाराममहाराज म्हणतात, " गोविंद गोविंद ! मना लागलिया छंद ॥ मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ १ ॥ ' हा जो छंद, तीच ध्येयनिष्ठा होय व आपल्या ध्येयाचा छंद, त्याचें वेड लागल्याशिवाय, तन्मय झाल्याशिवाय, वृत्ति तदाकार बनल्याशिवाय खरी ध्येयप्राप्ति होणार नाहीं. तेव्हां ध्येयनिष्ठा जितकी अधिक उज्ज्वल व तीव्र असेल तितके आपण ध्येयाच्या अधिक जवळ आलों असें समजावें व जेव्हां आपल्या निष्ठेची तीव्रता वाढत जाऊन स्वतःचा पूर्णपणें विसर पडेल, पूर्ण आत्मार्पण होईल, तेव्हांच ध्याता, ध्यान व ध्येय ही त्रिपुटी नाहींशी होऊन मनुष्य ध्येयरूपच बनेल.

---

# आमचीं पुराणें

लेखक : बाळकृष्ण पांडुरंग ठकार, भोर

[ जन्म शके १७८६ सातार्‍यास, शिक्षण भोरास विनायकशास्त्री गोखले वैद्य यांच्या संस्कृत पाठशाळेंत; चिपळूणकर आणि मंडळीचे मालक; पंत सचिवांचे पिढीजाद आश्रित. ]

पूर्वकाळापासून तों इकडे इंग्रजी विद्येचा प्रसार होईपर्यंतच्या काळांत प्राचीन पुराणांविषयीं आमचा परंपरागत असा दृढ समज होता कीं, सर्व वेद, सर्व स्मृति व सर्व उपनिषदें इत्यादि वाङ्मयानंतर लागलींच पौराणिक वाङ्मयाची निर्मिति झाली; आणि अद्यापिहि श्रद्धाळू माणसाच्या अंतःकरणांत तीच भावना जागृत आहे. त्यांच्या मतें वरील ग्रंथाइतकेंच पुराणांनाहि महत्त्व आहे. तीं सर्वत्र आदरणीय व उदाहरणीय मानलीं जात असून त्यांची हिंदुसंस्कृतीवरील छाप अव्याहतपणें कायम आहे. ' इति पौराणिका वदन्ति स्मृतिकाराः पुराणेषु एवं दृश्यते ' अशा प्रकारें त्या ग्रंथांसंबंधीं पूर्वकालीन लोकांचें मत दिसून येतें. तथापि मोठ्या खेदाची गोष्ट ही कीं, पश्चिमेकडून आलेल्या नवमतवादी सुधारणेचें पाऊल भारतवर्षाच्या किनार्‍यावर पडतांच तिच्या दर्शनानें त्या काळचे आमचे विद्वान् इतके दिपून गेले कीं, श्रुतिस्मृतींनीं ज्यांचा बरोबरीच्या नात्यानें आदरपूर्वक गौरव केला आहे, त्याच

पुराणग्रंथांना भाकडकथा समजून त्यांच्या प्राचीन ऐतिह्याविषयींची ते शंका घेऊं लागले. इतकेंच काय पण तें सर्व अश्लील अतएव अनादरणीय वाङ्मय असून 'व्यासो नारायणः साक्षात्' अशा श्रीवेदव्यासांसारख्या अवतारी पुरुषाच्या नांवावर विकणाऱ्या अर्वाचीन अनंत वेड्यांच्या विकृत मेंदूचाच तो एक परिपाक होय; पुराणें म्हणजे निव्वळ असंभाव्य कल्पनांनीं भरलेल्या कादंबऱ्या असून त्यायोगानें भटाभिक्षुकांच्या पोटापाण्याची सोय लावणाऱ्या त्यांच्याच कांहीं बड्या जातभाईनीं अज्ञान जनतेची दिशाभूल करून व तिच्यापुढें अनिश्चित स्वर्गाचें आणि विमानांचें आमिष ठेवून देवाधर्माच्या नांवानें आपली व आपल्या पुढच्या अनंत पिढ्यांची हमखास तरतूद करून ठेविली आहे; हे व अशाच तऱ्हेचे विकृत विचार फैलावण्यास आमच्या नव्या सुशिक्षितवर्गाकडून सुरुवात झाली. चिकित्सेच्या नांवाखालीं तीच परंपरा पुष्कळ काळपर्यंत टिकून राहिली.

परंतु सुदैवाची गोष्ट ही कीं, गेल्या शतकांत प्राचीन ग्रंथांच्या बाबतींत दूषित झालेलें वातावरण हल्लीं बरेंच निवळलेलें दिसून येतें. सुशिक्षित व सुसंस्कृत समाजांतून दोषैकप्रवृत्तिमय निष्ठुर चिकित्सेचा लोप होऊन श्रद्धामूलक सहृदय चिकित्सा उदित झाली आहे. या नव्या क्रांतीला चालू शतकापासून प्रारंभ होऊन तिचा प्रतिध्वनि सर्वत्र उमटूं लागला आहे. 'आपले घरांत आहे तरी काय? व तें घर कशा प्रकारचें आहे?' या गोष्टींकडे समाजाचें लक्ष वेधून संशोधनाच्या दिशेनें त्याच्या प्रयत्नास सुरुवात झाली व परिस्थितीच्या अनुकूलतेनें त्या प्रयत्नास जोरहि आला आहे. हल्लीं ग्रंथप्रकाशनास लागणाऱ्या साधनविपुलतेमुळें पूर्वकालीन सगळ्याच संस्कृत वाङ्मयाचें चिकित्सापूर्वक संशोधन होऊन अव्वल इंग्रजी पिढीच्या लोकांनीं टाकाऊ ठरविलेल्या वाङ्मयिक रत्नांचा भारतवर्षांतील प्रतिभावान् लेखकांकडून आपापल्या मातृभाषेंत प्रस्तुतपेक्षांहि जास्त प्रमाणानें सादर गौरव होईल व उत्तरोत्तर या रत्नांची चमक आम्हां हिंदवासियांच्या डोळ्यांत भरूं लागेल याविषयीं आम्हांस पूर्ण खात्री वाटते.

आमचे प्राचीन ऋषिप्रणीत ग्रंथ हेंच आमच्या आर्यधर्माचें खरें महत्त्व होय. अनंतकालापासून त्यांच्या हक्काचें ठरलेलें अधिकारयुक्त स्थान त्यांना

पुन्हां प्राप्त होत असलेलें पाहून आमच्या श्रद्धाळु अंतःकरणाला त्यांतील सत्तत्त्वाचें व तत्प्रणेत्यांचें तेज पटूं लागतें. सनातन वैदिक धर्मावर व तत्संबंधींच्या सर्व वाङ्मयावर आजवर परकीय संस्कृतीचे कितीतरी आघात झाले व अजून देखील ते होत आहेत. एकादे वेळीं ते इतके तीव्र असत कीं, आमच्या संस्कृतीचें अस्तित्व स्फुलिंगमात्र उरावें. तथापि पुढें त्याच स्फुलिंगाचा उत्कर्ष झालेला दिसून येतो. हें ऐतिहासिक सत्य म्हणजे आम्ही तो एकप्रकारें आर्य संस्कृतीच्या उच्चतेचा व अनंतकालावधीचा विजय समजतों. याच ऐतिहासिक सत्याचा पुरावा आपणांस पुराणांतूनसुद्धां मिळण्यासारखा आहे. राक्षस, दैत्य इत्यादिकांनीं वेदांचें हरण केलें, यज्ञयागादिकांचा व तदनुरूप आचरण करणारांचा त्यांनीं विध्वंस केला; आणि त्यामुळें धर्माचा लोप झाला, अशा प्रकारच्या कथा त्या ग्रंथांत आहेत. सारांश, 'इतिहासाची पुनरावृत्ति' होत असल्याकारणानें पुराणवाङ्मयाच्या जीर्णोद्धाराकडे आज सर्वांचें लक्ष लागलें आहे ही आनंदाची गोष्ट होय. सत्यज्ञानाची लालसा समाजांत उत्पन्न झाल्यामुळें, आपण सुसपन्न पूर्वजांचे वंशज आहोंत तेव्हां त्यांचें पैतृक गुप्त धन शोधावें व तें आत्मसात् करावें, हा व्यावहारिक पण स्वाभिमानपर कृतीचा अवलंब वरील प्रयत्नाच्या द्वारें झालेला स्पष्ट दिसतो.

जुन्या वाङ्मयाचा कालक्रम ठरवितांना श्रुति, स्मृति, वाकानुवाक, आरण्यकें, उपनिषदें, रामायण व महाभारत या ग्रंथांनंतर पुराणांचा उल्लेख केला जातो. म्हणजे पुराण हें शेवटचें वाङ्मय असून त्यांची रचना दुसऱ्या-तिसऱ्या शतकापासून तों बाराव्या शतकाअखेर होत होती, असें पाश्चात्य पंडितांचें मत आहे, तें इकडील पंडितांनाहि बहुतांशीं ग्राह्य आहे. परंतु वरील सिद्धान्त मांडतांना एक गोष्ट गृहीत धरली जाते कीं, उपरिनिर्दिष्ट ग्रंथ हिंदु समाजाला जरूरीचे म्हणून लिहिले गेले नसून ते त्यांच्या उत्क्रांत विचारांचे निदर्शक होत. परंतु आमच्या चातुर्वर्ण्यविशिष्ट संस्कृतीला 'स्त्रीशूद्रद्विजबंधूनां त्रयी न श्रुतिगोचरा:' या वचनानुसार स्त्रियादिकांना वेदादिक ग्रंथांचें पठणपाठण, किंबहुना नुसतें श्रवण देखील मान्य नाहीं. तथापि त्या वर्गाला वरचा नियम पाळूनहि आपलें ऐहिक व पारमार्थिक कल्याण साधतां यावें या हेतूनें वेदांच्याच पायांवर उभे राहून श्रीवेदव्यासांनीं पौराणिक वाङ्मयाची रचना केली. या

दृष्टीनें विचार केला तर वैदिक वाङ्मय व पुराणें यांच्यांतील पौर्वापर्याभाव कबूल करूनहि दोन्ही प्रकारांची रचना जवळ जवळ समकालीन असावी, यांत शंका नाहीं. वैदिक वाङ्मयाला आधारून पुराण-ग्रंथांची रचना जरी तयार झाली असली, तरी त्याचा अर्थ असा नव्हे कीं, पूर्व ग्रंथांच्या त्या केवळ नकला होत. हिंदु संस्कृतीचें वैशिष्टय असलेल्या आध्यात्मिक विचारांचा पगडा पुराणांवर पूर्णत्वानें दिसून आला तरी तो दूर सारून जर त्या वाङ्मयाचें सूक्ष्म निरीक्षण केलें, तर तेथेंहि ऐतिह्य परिस्थितीची जाणीव झाल्यावांचून राहत नाहीं. त्याप्रमाणें पौराणिक वाङ्मय हें सुद्धां जुन्यांतील जुन्या काळचें पण निरनिराळ्या वेळीं लिहिलेलें असल्याकारणानें पुराणांना त्या त्या काळचे स्वतंत्र ऐतिह्य ग्रंथ म्हणून महत्त्व आहे. त्यांतून जी हकिकत वर्णिली आहे, तीवरून त्या त्या कालच्या परिस्थितीचें सामान्य अनुमान काढतां येतें. चारी वर्ण, चारी आश्रम, तसेंच सामाजिक, नैतिक, धार्मिक, बौद्धिक, शैक्षणिक व राजकीय इत्यादि वर्णाश्रमधर्मातील कर्तव्यें, आचार, विचार, तत्कालीन देवता व त्यांची पूजाअर्चा व विधि या सगळ्या गोष्टींचें विवेचन त्यांत सांपडणारें आहे. ' पुराणं पंचलक्षणम् ' या वचनान्वयें सर्व पुराणांत पुरातन वृत्तें, सर्ग, प्रतिसर्ग, चंद्रसूर्यांचे वंश अगर वंशावलि, त्या त्या वंशांत जन्मास आलेले अनेक थोर राजे, त्यांची स्थिति, गति, त्यांचे आचारधर्म, राजधर्म व प्रजाधर्म या उभयतांमधील आदरभाव यासंबंधींचें जें सोदाहरण व सुंदर विवरण केलें आहे, तें त्या कालच्या ऐतिहासिक वस्तुस्थितीचें पोषक नाहीं असें कसें म्हणतां येईल ? पुराणांचें प्राचीनत्व वेदांइतकेंच जुनें असूनहि ते फार प्राचीन काळचे इतिहासग्रंथ होत असें वरील विवेचनावरून मानणेंच समुचित होईल. ' पुराण ' शब्दाची व्युत्पत्तीहि त्याच भावनेला पोषक आहे.

आमच्या सांस्कृतिक भावना व श्रद्धा या आमच्या पूर्वजांप्रमाणेंच होत. अशा स्थितींत आमची पुराणविषयक श्रद्धा त्यांच्यासारखीच असल्यास नवल कसचें ? शिवाय पुराणांच्या आत्यंतिक उपासनागुणानें त्या श्रद्धेला दार्ढ्य आलें आहे. या श्रद्धेला आणखी एका दृष्टीनें बळकटी येण्याचें कारण आमच्या मतें हें कीं, समग्र पुराणग्रंथांची श्लोकसंख्या चार लक्षांवर आहे.

हा चार लक्ष ग्रंथ लिहिणारा किंवा लिहिणारे बडे लेखक, अज्ञानी, निरुद्योगी किंवा अव्यापारेषु व्यापार करणारे होत असें मानणें म्हणजे आपल्याच बुद्धिमत्तेवर फाजील विसंबून राहण्यासारखें होईल. हीच विचारसरणी आमच्या दृढ श्रद्धेला—हिला अंधविश्वास म्हणतां येणार नाहीं—कारण होय.

पुराणांचा विचार करतांना प्रथम पुराण शब्दाची व्युत्पत्ति पाहणें जरूर आहे. ' पुराण ' शब्द नपुंसकलिंगी होय. ' पुरा भवमिति पुरा ' अथवा ' पुरा नीयते ' याप्रमाणें त्याच्या दोन व्युत्पत्ती आहेत. पाणिनीय अष्टाध्यायीमध्यें पुराणांची व्युत्पत्ति दिली असली तरी तीवरून त्यांत नवीनतेचा भाव दिसत नाहीं. त्यांचें प्राचीनत्व वैदिक ग्रंथांवरूनच सिद्ध होणारें आहे. ' पुराण ' शब्दाचा अर्थ ' फार जुनें ' असा आहे. ' पुराण ' शब्द उच्चारतांच प्राचीन आख्यायिकांनीं भरलेले विशिष्ट ग्रंथच डोळ्यांपुढें उभे राहतात. अथर्ववेद, शतपथ ब्राह्मण, बृहदारण्यक, छांदोग्य, तैत्तिरीयारण्यक, महाभाष्य, आश्वलायन-गृह्यसूत्रें, आपस्तंभ-धर्मसूत्रें, मनुसंहिता, रामायण व महाभारत इत्यादि सनातन आर्यधर्मीयांच्या ग्रंथांवरूनच पुराणांचें प्राचीनत्व सिद्ध होतें.

पुराणांच्या उत्पत्तीचा उल्लेख अथर्ववेदांत सांपडतो.

' ऋचः सामानि छंदांसि पुराण यजुषासह,
उच्छिष्टाज्जज्ञिरे सर्वे दिवि देवा दिवि श्रिताः'—अथर्ववेद, ११-७-२४.

या उताऱ्याचा अर्थ हा कीं, यज्ञाच्या उच्छिष्टद्वारां ईश्वरापासून यजुर्वेदासहित ऋक्, साम, छंद आणि पुराणें हीं प्रगट झालीं. ' गोपथब्राह्मणां 'तहि असाच उल्लेख आहे.

' एवमिमे सर्वे वेदा निर्मितास्सकल्पाः सरहस्याः सब्राह्मणाः
सोपनिषत्काः सेतिहासाः सान्वयाख्याताः सपुराणाः सस्वराः '

म्हणजे संपूर्ण वेद हे कल्प, रहस्य, ब्राह्मण, उपनिषद्, इतिहास, वंश व पुराण यांसहवर्तमान प्रगट झाले. वरील उताऱ्यांत ब्राह्मणभागापासून पुराणांच्या पृथक्पणाला मान्यता मिळाली आहे. शतपथब्राह्मणांतहि ' पुराण हा वेद असून त्याचें कीर्तन यज्ञांत दहावे दिवशीं अध्वर्यु करीत असतो, '

( श. १३-४-३-१३ ) असें लिहिलें आहे. या सगळ्या उताऱ्यांवरून एवढा निष्कर्ष निघतो कीं, पेटलेल्या ओलसर लांकडांपासून ज्याप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचा धूर निघतो, त्याप्रमाणें परमात्म्याच्या निश्वासापासूनच ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वाङ्गिरस, इतिहास, पुराणें, विद्या व उपनिषदादि ग्रंथ प्रगट झाले असल्यानें ते सगळेच निश्वासभूत होत. श्रीमच्छंकराचार्यांनीं आपल्या बृहदारण्यकभाष्यामध्यें ' निश्वासमकामतः निश्वासमत् ' असें सांगितल्याप्रमाणें, मनुष्यमात्राची श्वासोच्छ्वासक्रिया जशी आपोआप यत्नाशिवाय चालू आहे तसेंच यत्नांशिवाय महापुरुषांच्या निश्वासांतून वेदादिक प्रगट झाले आहेत. यापेक्षांहि छान्दोग्योपनिषदांतील वचन जास्त स्पष्ट आहे. ' इतिहासपुराणं पंचमं वेदानां वेदमिति ' ( छां. प्र. ७ ख. १ ) म्हणजे इतिहास व पुराणें हे ग्रंथ वेदांतील पांचवा वेद होत. शतपथब्राह्मणानें तर यापुढें जाऊन त्या ग्रंथांचा स्वाध्याय म्हणजे आपल्या कामनापूर्तीसाठीं त्यांचा नित्य पाठ करण्याविषयीं सांगितलें आहे ( शत. ११।५।७।९ ).

येथवर दिलेल्या वैदिक प्रमाणांवरून ही गोष्ट निश्चित होते कीं, वेदांप्रमाणें पुराणें देखील सनातन व अपौरुषेय मानलीं जात असून त्यांस वेदांचा अधिकार आहे. चारी वेदांप्रमाणें पुराणें प्रयत्नसाध्य नसून तीं आपोआप प्रगट झालेले परमेश्वराचे निश्वास होत. त्या ग्रंथांत सृष्ट्युत्पत्तीचें विवरण असून तें वैदिक काळांत प्रचलित होतें. महाभाष्यांतहि पुराणांचें निराळें अस्तित्व मानलें आहे. प्रमाणभूत असलेले वेदादि ग्रंथ इतिहास व पुराणें यांचें प्रामाण्य मान्य करतात. मंत्रद्रष्टे ऋषि हेच धर्मशास्त्र, इतिहास व पुराणें या ग्रंथांचे कर्ते होत. त्यांच्यांत निरनिराळ्या विषयांचें विवरण झालें असल्यानें त्या त्या विषयापुरतें त्यांचें प्रामाण्य मानलें जातें. उदाहरणार्थ, यज्ञमंत्र हे जसे ब्राह्मणग्रंथाचे विषय होत किंवा लोकव्यवहार हा देखील जसा धर्मशास्त्राचा विषय आहे, तसा लोकवृत्तांत हा इतिहासपुराणांचा विषय होय. थोडक्यांत सांगावयाचें तर सृष्टीच्या उत्पत्तीची हकिकत सांगणें एवढाच पुराणांचा हेतु आहे. विष्णु व ब्रह्मांड या आद्य पुराणांनीं पुराणांचें लक्षण सांगतांना—

' सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च ।
वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणम् ।।

म्हणजे—१. सृष्ट्युत्पत्ति (सर्ग), २. पुन्हा सृष्ट्युत्पात्ति व लय (प्रतिसर्ग), ३. देवता आणि पितर् यांच्या वंशावलि ( वंश ), ४. सगळीं मन्वन्तरें म्हणजे कोणता मनु किती दिवस अधिकार चालवीत होता व ५. चंद्रवंशी व सूर्यवंशी राजांचीं वर्णनें, अशीं पांच लक्षणें नमूद केलीं आहेत. हीं पांचहि लक्षणें पुराणांच्या बाबतींत अनन्यसाधारण समजलीं जातात. शंकराचार्यांच्या उपनिषद्भाष्यांमध्यें नुसत्या सृष्ट्युत्पत्तीचें निरूपण केलें आहे, पण त्यांत बाकींचीं चार लक्षणें नाहींत. पुराणांत वरील विषयांखेरीज दुसरे चारी विषय वर्णिले असतात. रामायणाच्या बालकांडांत सुमंताच्या तोंडीं दशरथ राजाला उद्देशून घातलेला एक श्लोक आहे तो असा—

' एतच्छ्रुत्वा रहः सूतो राजानमिदमब्रवीत् ।
श्रूयतां यत्पुरावृत्तं पुराणेषु मया श्रुतम् '

म्हणजे सूत म्हणाला, " हे राजा, मीं जी पुराणांतून तुझ्या कुलपरंपरेविषयींची हकीकत ऐकली आहे, ती ऐक !' असें बोलून त्यानें दशरथाला पुराणांमध्यें जशी वर्णिली होती तशीच सर्व कथा निवेदन केली.

महाभारताच्या आदिपर्वांत शौनक सांगतो कीं—

' पुराणे हि कथा दिव्या आदिवंशाश्च धीमताम् ।
कथ्यन्ते ये पुरास्माभिः श्रुतपूर्वाः पितुस्तव ' ।। आदि. अ. ५।२

म्हणजे पुराणांमध्यें थोरथोर महात्म्यांच्या ज्या दिव्य कथा व जे श्रेष्ठ वंश प्रतिपादन केलेले आहेत ते आम्हीं पूर्वीं तुझ्या पित्यापासून श्रवण केले आहेत. ( चि. भाषांतर, मा. १ –५४ ). उग्रश्रवा याचे तोंडून असेच उद्गार निघाले आहेत. ' हे महामुनि, हा भार्गववंश उत्कृष्ट प्रकारचा आहे, त्याची प्रथम पुराणांत वर्णिलेली कथा मी तुम्हांस सांगतों ' ( चि. भा. भाग १ पहा ). मनुस्मृतींत देखील 'श्राद्धाचे वेळीं पितरांना वेद, धर्मशास्त्रें, आख्यानें, इतिहास व पुराणें हीं सर्व ऐकवावींत, ' ( मनु ३–२३२ ) असा उल्लेख आहे.

वर दिलेल्या रामायण, महाभारत व मनुस्मृति या सर्वांतील उताऱ्यांवरून हें स्पष्ट दिसून येतें कीं, ते ग्रंथ निर्माण होण्यापूर्वीच निरनिराळ्या कवींनीं रचलेलीं भिन्न भिन्न पुराणें अस्तित्वांत होतीं व त्यांत श्रेष्ठ महात्म्यांच्या कथा निवेदिल्या होत्या.

आतां या ‘ पुराण ’ नामक प्राचीन ग्रंथांचे कर्ते कोण यासंबंधीं विचार करतां बृहदारण्यक, शतपथादि ग्रंथांतील उल्लेखांवरून असें म्हणतां येईल कीं, ज्या ब्रह्मवेत्त्या महर्षींना वेदांची स्फूर्ति झाली त्यांनींच हे पुराण ग्रंथ ईश्वराच्या प्रेरणेनें निर्माण केले. पुराणें अगोदर किती होतीं व नंतर तीं किती झालीं याविषयीं ‘ रेवामाहात्म्य ’ या ग्रंथांतील उतारा पहाण्यासारखा आहे ( रेवा. १।२३।३० पहा ). त्याचा अर्थ इतकाच कीं, अति प्राचीन काळीं धर्मार्थकाम प्राप्त करून देणारें एकच पुराण असून त्याची श्लोक-संख्या शंभर कोटी होती. ब्रह्मदेवानें तें मनांत आठवून ऋषींना कथन केलें. नंतर सर्व शास्त्रें व पुराणें निर्माण झालीं. पुढें कालावधीनें एवढा प्रचंड पुराणग्रंथ लोकांना समजणें कठीण जाईल म्हणून ईश्वरानें प्रत्येक द्वापरयुगांत व्यासाचें रूप धारण करून त्या ग्रंथाचा चार लक्ष श्लोकांत संक्षेप केला व त्याचीं अठरा पुराणें रचलीं. अद्यापि तें मूळचें शतकोटिप्रविस्तर पुराण देवलोकीं उपलब्ध आहे! अठराहि पुराणांचा कर्ता सत्यवतीचा मुलगा महर्षि व्यास हाच एकटा आहे, या विधानाला पद्मपुराणांतील सृष्टिखंडांत आधार मिळतो. ‘अष्टादश पुराणानां वक्ता सत्यवतीसुतः ’ या प्रमाणावरून सर्व पुराणें व्यासांनींच रचलीं हा निष्कर्ष निघतो. आतां विष्णु, भागवत व ब्रह्मवैवर्त या पुराणांची रचना भिन्न भिन्न प्रकारांची आहे, एवढ्याच आधारावर सगळीं पुराणें एका व्यक्तीकडून रचलीं गेलीं नाहींत असें पाश्चात्य विद्वानांचें मत बनलें. परंतु मत्स्यपुराणाच्या ५३ व्या अध्यायांत ‘ तीं सर्व व्यासांचीच कृति होय,’ हें स्पष्ट नमूद केलें आहे. ‘त्रिवर्गाचें साधन करून देणारें व शत-कोटी विस्तार असलेलें असें एकच पुराण होतें. सर्व विश्वाचा लय झाल्यानंतर परमेश्वरानें घोड्याचें रूप घेऊन अंगापडंगांसहित चारी वेद, पुराणें, न्याय, मीमांसा व धर्मशास्त्र हीं निर्माण केलीं. पुन्हा त्यांचा नाश झाला असतांना परमेश्वरानें कल्पारंभीं मत्स्यरूप घेऊन तीं ब्रह्मदेवास निवेदन केलीं व त्यानें तीं ऋषींना

सांगितलीं.' असें त्या अध्यायाचें सार होय. तेथेंच आणखी असाहि उल्लेख सांपडतो कीं, 'ब्राह्मपुराणाची श्लोकसंख्या तेरा हजार असल्याबद्दल मरीचीला ब्रह्मदेवानें सांगितलें. वाराहकल्पाचा वृत्तान्त लिहितांना पराशरानें जें धर्मवर्णन केलें आहे, तेंच विष्णुपुराण होय. श्वेतकल्पाच्या प्रसंगानें वायूनें जें रुद्राचें माहात्म्य वर्णन केलें तेंच वायुपुराण झालें. ज्यामध्यें नारदानें अनेक धर्मांचें वर्णन करण्याकरतां बृहत्कल्पाचा आश्रय करून पंचवीस हजार श्लोकसंख्या रचली तेंच नारदपुराण ठरलें. नऊ हजार श्लोकांत जें मार्कंडेयानें सांगितलें तें मार्कंडेयपुराण झालें. अग्नीनें जें वसिष्ठाला सांगितलें त्यास अग्निपुराण हें नांव मिळालें.'

पुराणें अनादि असून तीं ब्रह्मदेवानें रचलीं व ऋषींना सांगितलीं. त्यांच्यांत वैचित्र्य असण्याचें कारण इतकेंच कीं, निरनिराळ्या कल्पांत प्रचलित कथा त्यांत समावेशिल्या आहेत. व्यासांनीं ऋषींच्या तोंडून जशा कथा ऐकल्या तशा त्यांनीं लिहिल्या. यावरून व्यासांच्याहि अगोदर पुराणांचें अस्तित्व सिद्ध होतें. प्रत्येक द्वापरयुगांत पुराणांचा संक्षेप होऊन त्या प्रत्येकांत अठराहि पुराणांचीं नांवें येतात. याविषयीं मत्स्यपुराणांत आधार सांपडतो. 'इहलोकहितार्थाय संक्षिप्तं परमर्षिणा।' (मत्स्य-अ. ५-५८).- इहलोकींच्या हितासाठींच व्यासांनीं पुराणांचा संक्षेप केला. पुराणांत वैचित्र्य असण्याला कदाचित् हेंहि कारण असूं शकेल कीं, सर्व पुराणें गेल्या द्वापरयुगांतलीं नसून पूर्वींच्या द्वापरयुगामधील असावींत. प्रत्येक द्वापरयुगांत व्यास जन्मास येतो. या हिशेबानें चालू कल्पांतापर्यंत एकंदर अठ्ठावीस व्यास झाले आहेत. द्वैपायन व्यासानेंहि पुराणांची रचना जशीच्या तशीच कायम ठेविली. यास्तव रचनेंत वैचित्र्य दिसून येणें स्वाभाविक होय.

एकंदर पुराणें अठरा आहेत. याविषयींचा उल्लेख जरी प्रत्येक पुराणांत आढळतो तरी प्रत्येकानें त्या अठरा पुराणांचा जो क्रम दिला आहे तो एकसारखा दिसून येत नाहीं. सर्वांत जुनें ठरलेलें जें विष्णुपुराण त्यामध्यें अठरा पुराणांचा जो क्रम दिला आहे तो असाः-१ ब्रह्म, २ पद्म, ३ विष्णु, ४ वायु, ५ श्रीमद्भागवत, ६ नारदीय, ७ मार्कंडेय, ८ अग्नि, ९ भविष्य, १० ब्रह्मवैवर्त, ११ लिंग, १२ वाराह, १३ स्कंद, १४ वामन,

१५ कूर्म, १६ मत्स्य, १७ गरुड व १८ ब्रह्मांड. सगळ्यांमध्यें सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वंतर व वंशानुचरित या गोष्टी सामान्य आहेत. याप्रमाणें पुराणास लागणारीं पंचलक्षणें जरी सर्वांत आढळून येतात, तरी एखाद्याच विषयाचें सविस्तर वर्णन करावें हें मुख्यतः प्रत्येक पुराणाचें उद्दिष्ट दिसतें. इतकेंच नाहीं तर निरानिराळ्या पुराणांत निरानिराळ्या उपास्य देवतांचा पुरस्कार केला आहे. उदाहरणार्थ–ब्राह्म, शैव, भागवत व वैष्णव इत्यादि पुराणांच्या नांवांवरूनच त्या त्या पुराणांत शिवादिक देवतांची उपासना मुख्य करून व तिचेंच वर्णन करून त्या ग्रंथांना सांप्रदायिकपणाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. यावरून त्या काळांत अनेक देवतांच्या उपासकांचे अनेक सांप्रदाय प्रचलित होते हें उघड दिसतें. अठरा पुराणांची विभागणी पुढीलप्रमाणें केली आहे. शिव, भविष्य, मार्कंडेय, लिंग, वाराह, स्कंद, मत्स्य, कूर्म, वामन व ब्रह्मांड हीं दहा पुराणें शैव असून त्यांची श्लोकसंख्या तीन लक्ष भरेल. विष्णु, भागवत, नारद व गरुड हीं चार वैष्णवमतवादी पुराणें होत. ब्राह्म व पद्म यांमध्यें ब्रह्मयाचें माहात्म्य आहे. बाकींच्या दोन्हींपैकीं अग्निपुराणांत अग्नीचें व ब्रह्मवैवर्तपुराणांत सूर्याचें माहात्म्य वर्णिलें आहे. स्कंदपुराणाच्या केदारखंडांत ही वांटणी जरा निराळी आहे. म्हणजे दहा शिवस्तुतिपर, चार ब्रह्मदेवाचीं, दोन देवीचीं व दोन विष्णूचीं स्तुतिविषयक अशीं उल्लेखिलेलीं आहेत. सगळ्या पुराणांमधून त्या त्या इष्ट देवतांना श्रेष्ठ स्थान दिलें आहे. शिवपुराणांत ब्रह्मा आणि विष्णु यांना शिवानें, विष्णुपुराणांत ब्रह्मा आणि शिव यांना विष्णूनें, देवीभागवतांत ब्रह्मा, विष्णु व शिव यांना भगवती देवीनें व सूर्यपुराणांत वरील सर्वांना आदित्यदेवतेनें निर्माण केल्याच्या कथा आहेत. अशा रीतीनें आपापल्या इष्ट देवतांचें महत्त्व जरी प्रत्येक पुराणानें गाइलें असलें, तरी आपल्या उपास्यदेवतेशीं बाकींच्या देवतांचेंहि त्यांना साम्य दिसतें. शैवपंथी पुराणांत जरी शिवदेवतेला श्रेष्ठता दिली असली तथापि त्यांत विष्णूचेंहि माहात्म्य आढळून येतें. वैष्णवपुराणामधून जगत्पति जो विष्णु यास श्रेष्ठ मानिलें असलें तरी त्यांत विष्णु व शिव यांचें ऐक्य वर्णिलें आहे. ब्राह्मपुराणांत ब्रह्मदेवास श्रेष्ठत्व दिलें असूनहि त्यांत ब्रह्मा, विष्णु व महेश या देवता एकच होत असा उल्लेख आहे. सूर्यदेवतेविषयीं भविष्य-

पुराणांत असें लिहिलें आहे कीं, 'भूतग्रामस्य सर्वस्य सर्वहेतुर्दिवाकरः। अस्येच्छया जगत्सर्वमुत्पन्नं सचराचरम्' (अ. ४७), म्हणजे सर्व भूतमात्रांचें आदिकारण सूर्यनारायण असून त्याच्याच इच्छामात्रेंकरून चराचर विश्व उत्पन्न झालें. निरनिराळ्या पुराणांमधून संप्रदायविशिष्ट अशी निरनिराळी फलश्रुति सांगितली आहे. तथापि त्याबरोबरच अठराहि पुराणांच्या फलश्रुतींचें सामग्र्यानें वर्णन केलें आहे. आपलें ऐहिक कल्याण साधण्याकरितां त्यांचा तिन्ही काल जप सुचविला आहे. इतकेंच काय पण 'जो कोणी अठरा पुराणांचा नित्य पाठ करील तो जगांत सर्वज्ञ होईल,' अशी भविष्यपुराणानें ग्वाही दिली आहे.

पुराणग्रंथांमधून कोठें कोठें विरोध दिसून येतो. परंतु खरोखरच तो विरोध नसून 'नमोस्त्वनंताय सहस्रमूर्तये' या वचनानुसार एकाच परमात्म्याच्या अनेक स्वरूपांचें तें चरित्रवर्णन आहे. तो वस्तुभेद नसून शब्दमात्रभेद होय. ब्रह्मा, विष्णु व महेश यांना पाखंडी लोक निरनिराळे समजतात. परंतु त्या सर्व देवता एकत्र होत. पुराणांचें संकलन करणाऱ्या व्यासांनींच पांची देवता व सगळे संप्रदाय यांची श्रेष्ठता उत्कृष्ट रीतीनें दाखवून दिली आहे. या कारणानें कोणत्याहि उपासकानें आपण श्रेष्ठ, दुसरे कनिष्ठ अशी मिथ्या भावना करून घेऊं नये, हेंच पुराणांच्या शिकवणीचें थोडक्यांत सार होय.

पुराणांत अवतारकार्याचें वर्णन केलें आहे. म्हणजे शिवपुराणांत जसें शिवाच्या अनेक अवतारांचें वर्णन आहे, तसेंच वैष्णवपुराणामध्येंहि विष्णूच्या अवतारांचें आहे. याविषयीं कोणी असें म्हणतील कीं, बुद्धाच्या पूर्वी अवतारांची कल्पना नव्हती, ती पुढें बुद्धोत्तरकालांत प्रचलित झाली. तथापि ही शंका बरोबर नाहीं. कारण वैदिक ग्रंथांतच अवतारवर्णनाचा आढळ होतो. शतपथ ब्राह्मणांत अशी एक कथा आहे कीं, 'एके दिवशीं मनूनें नदीतीरावर जाऊन अर्घ्यप्रदानासाठीं ओंजळींत जल घेतलें असतांना त्यांत अकस्मात् एक लहान मासा आला. त्यास पाहून मनु स्वगत विचार करूं लागला. तेव्हां मासा बोलला, 'तूं माझें पोषण कर, मीहि तुझें रक्षण करीन.' मनूला त्या बोलण्याचें भारी आश्चर्य वाटलें व तो म्हणाला, 'तूं माझें कशापासून रक्षण करणार?' मासा म्हणाला, 'तुला

दिसत असलेली ही सर्व प्रजा महाप्रलयाचे वेळीं पाण्यांत बुडून नाश पावेल त्या वेळीं त्या प्रलयापासून मी तुझें रक्षण करीन.' नंतर नदींत माशाची अतिवाढ झाल्यानें त्यास समुद्रांत सोडलें. ही जी प्रलयकाल होण्या-विषयींची हकीकत आहे तीच मत्स्यावताराची कथा होय. अशा तऱ्हेची कूर्मावताराची कथा तैत्तिरीयारण्यकांत आहे. वाराह, विष्णु, महादेव, सूर्य, शक्ति इत्यादि देवतांच्या कथा वेदांत आढळून येतात.

सर्व पुराणांचा मुख्य उद्देश हा कीं, ब्रह्मा, विष्णु व शिव या त्रयींच्या उपासनेचा प्रचार वाढविण्याचा आहे. प्रत्येक पुराणाचें पठन केलें तर त्या योगानें त्या पुराणाचें वैशिष्ट्य, त्याचा ऐतिहासिकपणा व सांप्रदायिकपणा यांचें यथार्थ ज्ञान होईल. पुराणांमधल्या निरनिराळ्या कथांच्या रूपांनीं वेद, वेदांतांत सांगितलेलें सर्व ज्ञान व विद्या यांचें विवरण मोठ्या हृदयंगम आकर्षक रीतीनें केलें आहे. मनुष्याला सन्मार्गवर्ति करून त्यास मोक्ष मिळवून देणें हाच खरोखर अखिल पुराण ग्रंथांचा मुख्य उद्देश होय.

प्रकृत लेख संपविण्यापूर्वी एका गोष्टीचा उल्लेख करणें जरूर आहे. वरील लेखांत विवरण केलेलीं पुराणें संस्कृत भाषेंत आहेत. त्यांतील बरींच पुराणें मराठी भाषेला अद्याप अज्ञात आहेत. अठरापैकीं विष्णु, मार्कंडेय, स्कंद, पद्म, मत्स्य व भागवत एवढीं सातच पुराणें मराठींत भाषांतररूपानें ( कांहींचें साररूप व कांहींचें समग्र ) उतरलीं आहेत. हीं पुराणें मराठीला परिचित करून देण्याचें श्रेय विशेषेंकरून वांईचे काशिनाथशास्त्री लेले यांना दिलें पाहिजे. त्यांचे बरेचसे प्रयत्न अपूर्ण राहिले असले तरी मराठी पुराणांच्या बाबतींत त्यांची धडाडी कौतुकावह होती याबद्दल वाद नाहीं. राशिवडेकर-शास्त्री, दातारशास्त्री, बापटशास्त्री, उपासनीशास्त्री, तसेंच आचार्य बळे व जोगळेकर यांचे या बाबतींत झालेले प्रयत्न प्रशंसनीय होत. आमच्या चिपळूणकर आणि मंडळीकडूनहि भारत, भागवत, रामयण व बृहद्योगवासिष्ठ हे ऐतिहासिक व आध्यात्मिक ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर पुराणविषयक कामगिरींतहि एक अल्पसा प्रयत्न झाला आहे. श्रीमद्भागवत व देवीभागवत हे पौराणिक ग्रंथ प्रसिद्ध करून चिपळूणकर मंडळीनें आपल्या कर्तव्याचें एक पाऊल पुढें टाकलें आहे. अठराहि पुराणांचें लेणें मराठीच्या अंगावर चढवून तें

वाङमय सुसमृद्ध व्हावें याविषयीं मराठी भाषेच्या अभिमान्यांप्रमाणें आमच्याहि अंतःकरणाची तळमळ चालू आहे. ती केव्हां शांत होणार हें ज्या एका कर्त्याकरवित्या पुराणपुरुषालाच माहित आहे, त्याला अनन्यभावानें शरण जाऊन मी हा लेख पुरा करतों. इति शम् ।

---

# प्राचीन हिंदुस्थानांतील प्रजासत्ताक राज्यें व त्यांची राज्यघटना

श्री. शं. वि. बावडेकर, बी.ए., एलएल्.बी., सातारा.

[ यांचा जन्म सन १८८७ सालीं भोर संस्थानांतील पिरंगुट या गांवीं झाला. भोर हायस्कूलमध्यें मॅट्रिकपर्यंत शिक्षण होऊन १९१२ मध्यें फर्ग्युसन कॉलेजमधून बी ए. झाले. पुढें एल्एल्. बी. झाल्यावर कांहीं दिवस भोर संस्थानमध्यें वकिली केल्यावर ते साताऱ्यास रहावयास गेले. ]

## काल–इ. स. पूर्वी १००० वर्षें–इ. स. नंतर ५०० वर्षें

**विषयाचें नाविन्य व अपूर्वत्व**

प्रस्तुत विषय मराठी वाचकांस सर्वस्वीं नवीन स्वरूपाचा आहे. पाली भाषेंतील बुद्धकालीन वाङ्मयाचें संशोधन व परिशीलन होण्यापूर्वी या विषयाची माहिती प्राच्यभाषाकोविदांस व पुराणवस्तुसंशोधकांसहि नव्हती. लोकशाहीच्या कल्पनांचा उदय प्रथम पाश्चात्य राष्ट्रांतच झाला असून पौर्वात्य राष्ट्रें सर्वस्वीं वेदकालापासून राजसत्ताप्रवर्तक आहेत, ही कल्पना दृढमूल झालेली होती. अशा परिस्थितींत प्रो. ऱ्हिस डेव्हिड्स् यांचें Buddhist India हें पुस्तक प्रसिद्ध झालें व त्यांत प्राचीन कालीं हिंदुस्थानांत प्रजासत्ताक राज्यें अस्तित्वांत होतीं ही गोष्ट प्रथमतः जगापुढें आली. त्यानंतर या विषयाकडे संशोधकांचें

---

प्रस्तुत विषयावर लेखकानें सन १९२८ सालीं सातारा येथील आर्यांग्ल वैद्यक शाळेच्या गजाननोत्सवांत व्याख्यान दिलें होतें व त्याचाच अनुवाद या लेखांत केलेला आहे.

[library stamp]

व विद्वानांचें लक्ष वेधून या विषयाच्या अभ्यासास व परिशीलनास चालना मिळून, पाटणा हायकोर्टचे ॲडव्होकेट व बिहार आणि ओरिसा संशोधक-मंडळामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या मासिकाचे विद्वान् संपादक, श्री. के. पी. जयस्वाल यांनीं मॉडर्न रिव्ह्यूमधून एक लेखमाला लिहून या विषयाच्या अभ्यासास चालना दिली व स्वतः परिश्रम करून " Hindu Polity " नामक एक ग्रंथ लिहून त्यांनीं आपलें संशोधन व प्रस्थापित केलेले सिद्धान्त जगापुढें मांडले आहेत. तसेंच प्रो. विनयकुमार सरकार यांच्या ' तुलनात्मक राजकारणाचा अभ्यास ऊर्फ हिंदूंच्या राजकीय संस्था व सिद्धांत ' या ग्रंथांत वरील विषयाच्या सांगोपांग अध्यनास चालना दिली आहे. प्रो. रमेशचंद्र मुजुमदार या विद्वान् गृहस्थांनीं व दुसऱ्या अनेक संशोधकांनीं गेल्या दहापांच वर्षांत या विषयावर बरीच उपयुक्त माहिती प्रकाशित केली आहे. वर दर्शित केल्याप्रमाणें हा विषय अगदींच नवीन असून तो नवीनच जगापुढें आलेला आहे. प्राचीन शिलालेख व पुरातन नाणीं यांच्या अभ्यासकांनीं केलेल्या शोधांनीं या विषयावर नवीन प्रकाश पडत आहे व अद्यापिहि हें संशोधन पूर्ण झालेलें नाहीं. सांप्रत हिंदुस्थानची नवीन राज्यघटना प्रातिनिधिक स्वरूपाची असावी याबद्दल ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदुस्थानांतील संस्थानें यांच्या प्रतिनिधींमध्यें लंडन येथील गोलमेज परिषदेंत बाटाघाट झाली व आतां यापुढें ती हिंदुस्थानांत सध्यां होत आहे. अशा वेळीं प्राचीन आर्यांच्या प्रातिनिधिक संस्थांची माहिती उद्बोधक व विचारप्रवर्तक होईल म्हणून ती या लेखांत देण्याचें योजिलें आहे.

**संज्ञा-गण विशिष्ट अर्थ**

प्रथमतः या विषयाचें आकलन वाचकांस व्हावें म्हणून प्राचीन काळीं प्रजासत्ताक राज्यास आर्य लोक काय विशिष्ट शब्दप्रयोगानें संबोधित असत त्याबद्दल त्यांना माहिती देणें अवश्य आहे. प्राचीन काळीं " गण " ही संज्ञा प्रजासत्ताक राज्यास योजीत असत. गण याचा धातुसाधित अर्थ संख्या हा आहे व गणराज्य म्हणजे " संख्याराज्य " ( Rule of numbers ), अर्थात् जें राज्य एका व्यक्तीचें नाहीं, बहुव्यक्तींचें आहे, असा अर्थ यांतून निष्पन्न होतो. या

ठिकाणीं विशेष स्पष्टीकरणार्थ आपणांस पाली वाङ्मयांतील बुद्धाच्या महा वाक्याकडे पाहिलें पाहिजे. एकदां कांहीं बुद्धभिक्षु भिक्षा मागण्याकरितां गेले असतां त्यांना कोणी एकानें प्रश्न केला कीं, "तुम्हीं किती जण आहांत?" त्या प्रश्नाचें उत्तर त्या भिक्षूंना देतां आलें नाहीं. त्यामुळें लोकांना राग आला व त्यांनीं हा वृत्तान्त भगवान् बुद्धास कळविला. तेव्हां भगवान् बुद्धानें आज्ञा केली कीं, उपवासाच्या दिवशीं सर्व भिक्षूंची संख्या "गणांमध्यें जसें मत( शलाका )पत्रिका घेऊन सभासदांची संख्या निश्चित करितात, त्याप्रमाणें मोजून भिक्षूंची संख्या निश्चित करावी." "शलाकाग्रहणेन गणमार्गेण गणेतुम्" या वाक्यांतील शलाका याचा अर्थ मतपत्रिका असा आहे व गण याचा अर्थ लोकसभा (Parliament or Assembly) असा आहे. यावरून गणराज्य म्हणजे लोकसभेनें चालविलेलें राज्य असा अर्थ होतो व प्रजासत्ताक राज्यें हीं लोकसभेच्या नियंत्रणानें चालविलीं जातात, म्हणून गण याचा अर्थ प्रजासत्ताक राज्य असा आहे व पूर्वीच्या संस्कृत वाङ्मयांत व भाषेंत याच अर्थानें गण या शब्दांचा प्रयोग केलेला आहे. पाली भाषेंत गणपूरक असा एक शब्दप्रयोग आहे त्याचा अर्थ आपण पाहिला पाहिजे. गणपूरक हें एका अधिकाऱ्याचें नांव आहे व त्यांचें काम लोकसभेमध्यें सर्व सभासद उपस्थित झाले आहेत किंवा नाहीं हें पहाण्याचें असे. यावरून हल्लींचा Quorum चा नियम पूर्वीच्या लोकसभेंतहि असावा असें वाटतें.

**संज्ञासंघ विशिष्ट स्वरूप**

गण शब्दाप्रमाणें प्राचीन काळीं संघ ही संज्ञा प्रजासत्ताक राज्यास लावीत असत. धात्वर्थानें 'संघ' याचा अर्थ समूह (Collection) असा आहे, व पाणिनीनें तो गणांशीं समानार्थक म्हणून आपल्या ग्रंथांत योजिलेला आहे व त्याच अर्थानें तो संस्कृत वाङ्मयांत वापरण्यांत आला आहे. 'गण' व 'संघ' या दोन संज्ञांत सूक्ष्म फरक आहे. गण या संज्ञेनें प्रजासत्ताक राज्य असा बोध होतो. संघ या शब्दानें प्रजासत्तेचा बोध होतोच व शिवाय अशा दोन किंवा अनेक गणांच्या संयोगाचाही बोध होतो. हल्लींच्या काळांतील उदाहरण द्यावयाचें झालें तर फ्रान्स राष्ट्रास गणराज्य ही संज्ञा लावितां येईल व युनायटेड स्टेट्स ऑफ् अमेरिका हें

संघराष्ट्र म्हणून म्हटलें पाहिजे. पूर्वी शाक्यराष्ट्र हें गणराज्य होतें व तें शाक्यगण म्हणून ओळखण्यांत येत असे. तसेंच वैशालीचें लिच्छवीराष्ट्र व मिथिलेचें विदेहराष्ट्र हीं केवळ गणराज्यें होतीं. परंतु पुढें तीं संयुक्त होऊन त्यांचा "व्रजिनसंघ" झाला. तसेंच अंधक व वृष्णी हीं गणराज्यें होतीं. पण पुढें त्यांचा संयुक्त अंधक-वृष्णी-संघ झाला. हा सूक्ष्म फरक लक्षांत घेतां पाणिनी व महाभारतकार यांनीं या दोन्ही भिन्न संज्ञा समानार्थक ठरविल्या असून त्या दृष्टीनें आपले ग्रंथांत त्यांचा उपयोग केलेला आहे.

पाली भाषेंतील अवधान जातकांतील खालीं उद्धृत केलेल्या उताऱ्यांमध्यें

**अवधान जातकांतील गणराज्याचा उल्लेख**

प्राचीन काळीं उत्तर हिंदुस्थानांतील मध्यदेशांत गणसत्ता व राज्यसत्ता असे दोन भिन्न सत्ताप्रकार प्रचलित होते, हें स्पष्ट रीतीनें आपले दृष्टोत्पत्तीस येतें. "अथ मध्यदेशाद्वणिजो दक्षिणापथं गताः । तैः राज्ञो महाकप्फिणस्य प्राभृत्तमुपनीतम् । राज्ञा उक्तं भो वणिजः कस्तत्र राजेति । वणिजः कथयन्ति। भो देव केचिद्देशा गणाधीनाः केचिद्राजाधीनाः इति । " (मध्यदेशांतील कांहीं वाणिग्जन दक्षिणदेशांत गेले असतां त्यांना तेथील राजा महाकप्फिण यानें 'तुमचे देशाचा कोण राजा आहे?' असा प्रश्न केला असतां वणिग्जनांनीं उत्तर दिलें कीं, महाराज, आमचे देशांत कांहीं देशांवर गणांची सत्ता आहे, व कांहीं देशांवर राजांची सत्ता आहे).

**महाभारतांत गणाचा निर्देश**

महाभारतांत शांतिपर्वांत अध्याय १०७ मध्यें गण या संज्ञेचा स्पष्ट अर्थ काय आहे याचें विवेचन केलें आहे. युद्धिष्ठिरानें भीष्मास गणांचे विषयीं माहिती विचारली असतांना भीष्मानें ती सांगितली आहे. हे सर्व श्लोक अत्यंत महत्त्वाचे असून त्यांतील वर्णवानस्त गणराज्य म्हणजे लोकशासित राष्ट्र हें स्पष्ट होत आहे.

जैनांचे आचारंगसूत्रांत 'द्वो-राज्याणि, गणरायाणि' हे शब्दप्रयोग आहेत त्यांवरून द्विमुख राजसत्ता व बहुसत्ताक राजसत्ताद्योतक हे शब्दप्रयोग आहेत. यावरील सर्व विवेचनांवरून पूर्वीं हिंदु प्रजासत्ताक राज्यांत काय विशिष्ट संज्ञा होत्या याचा बोध आपणांस होतो.

आतां राजसत्ता म्हणजे एकमुखी राज्यपद्धति ही होय. प्राचीन काळीं हल्लींच्या काळच्या नियंत्रित राजसत्तेची कल्पनाहि नसेल, नियंत्रित सत्तेचा ( Limited monarchy ) उल्लेखहि प्राचीन हिंदुराज्यघटनेमध्यें नाहीं. प्राचीन काळीं प्रचलित असलेल्या सर्व राजसत्ताक आणि लोकसत्ताक राज्यघटनांचा उल्लेख एका वैदिक प्रार्थनेंत केलेला आढळतो व ती वैदिक प्रार्थना आपल्या सर्वांच्या, निदान हिंदुमात्रांच्या तरी नित्य परिचयाची आहे. देवतांच्या पूजनानंतर सर्व भक्तजन मिळून देवतांस ज्या वेळीं मंत्रपुष्पसमर्पण करितात त्या प्रसंगीं ती नित्य गायिली जाते. पण आश्चर्य असें वाटतें कीं आपणांस त्यांतील विशिष्ट अर्थ कळला नसल्यामुळें आपणांस त्यांतील रहस्याचा बोध होत नाहीं. या वैदिक प्रार्थनेंतील लागूपुरता भाग आम्हीं उद्‌धृत करितों.

**विशिष्ट राज्यघटना**
Technical Constitutions.

**" साम्राज्यं भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठ्यं राज्यं "**

या प्रार्थनेंत भौज्य, स्वराज्य, वैराज्य, ह्या राज्यघटना विशिष्ट स्वरूपाच्या असून त्या गणराज्यांत प्रचलित असत, शिवाय द्वैराज्य व अराजक अशा आणखी दोन राज्यघटना अस्तित्वांत होत्या. आतां या वर वर्णन केलेल्या राज्यघटनांचें थोडक्यांत विवेचन करून त्या कोणत्या देशांत अस्तित्वांत होत्या याचा आपण विचार करूं.

भौज्य राज्यघटनेमध्यें राज्यांतील विशिष्ट अभिजात कुलांतील व्यक्तींसच अध्यक्ष म्हणून निवडून येण्याचा हक्क असे. देशांतील प्रत्येक व्यक्तीस तसा हक्क नसे; ही राज्यघटना अंधकवृष्णीसंघाची होती. अन्धकवृष्णी लोक हे पूर्वींचे मथुरेस राहणारे होते. परंतु कालान्तरानें त्यांनीं उत्तर-हिंदुस्थानांतून समुद्रकाठीं द्वारकेस स्थलांतर केलें. आणि गुजराथ, काठेवाड, कच्छ या भागांवर त्यांचाच अंमल चालत होता. यांनाच महाभारतांत यादव असें म्हणतात. या दोन राष्ट्रांनीं प्रत्येकीं एक कुलपुत्र ( अध्यक्ष ) निवडून देऊन त्या दोन अध्यक्षांनीं सर्व राज्यकारभार पहावयाचा असे. पूर्वींची यांची भौज्य राज्यघटना होती; परंतु पुढें संघाची राज्यघटना द्वैराज्य ( rule by two ) स्वरूपाची झाली. द्विमुखी राज्यसत्ता

अन्धक-वृष्णी-संघाची असतांना, बभ्रुउग्रसेन हा अन्धक राष्ट्रातर्फ अध्यक्ष निवडला असून, श्रीकृष्णास वृष्णी राष्ट्रानें अध्यक्ष निवडलें होतें; व या दोन अध्यक्षांचे अनुमतीनें संघाचें राज्य चालत असे. महाभारतांत शांतिपर्व अध्याय ८१ मध्यें या अंधक-वृष्णी संघाच्या राज्यकारभारांतील अडचणीचें स्वरूप रेखाटलें आहे. तें थोडें विषयान्तर करूनही आम्ही येथें देत आहोंत. ज्या वेळीं बभ्रुउग्रसेन व श्रीकृष्ण हे संघाचे अध्यक्ष होते त्या वेळीं संघाच्या लोक-सभेमध्यें आहुक वृष्णींचा पुढारी ( Leader of opposition ) व अक्रूर अन्धकांचा पुढारी ( Leader of opposition) होता. या दोन पुढाऱ्यांनीं, लोकसभेंत अध्यक्षांच्या राज्यकारभारावर व धोरणावर वारंवार कडक टीका करून आपआपल्या राष्ट्रांचें वर्चस्व लोकसभेंत प्रस्थापित करण्याचा यत्न चालविला होता. या दोन पुढऱ्यांचे टीकेनें श्रीकृष्ण विव्हळ झाला होता. व त्यानें या प्रसंगांतून पार पडण्यास काय करावें हें नारदास विचारिलें असतां, नारदानें श्रीकृष्णास सामोपचाराचें धोरण ठेवण्यास सुचाविलें आहे. अर्जुनाला संभ्रम झाला, तेव्हां त्यानें श्रीकृष्णास कर्तव्यनिर्णयाचा प्रश्न विचारला; पण श्रीकृष्णावर तो प्रसंग जेव्हां आला त्या वेळीं यानें नारदाकडे धांव घेतली. नारद व श्रीकृष्ण यांचें हें संभाषण फारच उद्बोधक असून त्यांतील महत्त्वाचा भाग आम्ही खालीं देत आहोंत.

दास्यमैश्वर्यवादेन ज्ञातीनां वै करोम्यहम् ।
अर्धभोक्तास्ति भोगानां वाक्दुरुक्तानि च क्षमे

श्रीकृष्ण म्हणतात "मला अध्यक्ष म्हणून समजतात; वस्तुतः खरोखरी मी लोकांचा ( आप्तांचा ) सेवक आहें. माझेकडे जरी राज्याची अर्धी मुखत्यारी सोंपविली आहे, तरी मला फक्त कटु भाषणाचाच प्रसाद मिळत आहे." नारदांनीं श्रीकृष्णास खालील उपाय सुचविला आहेः—

अनायासेन शस्त्रेण मृदुन हृदयच्छिदा
जिह्वामुद्धर सर्वेषां परिमृज्यानुमृज्य च ॥
ज्ञातीनां वक्तुकामानां कटुकानिलधूनि च ।
गिरा त्वं हृदयं वाचं शमयस्व मनांसि च ॥

नेहमीं सभासदांच्या टीकास्त्रापासून आपलें संरक्षण करण्याकारितां जें पोलादाचें नसून अत्यंत कोमल आहे व जें मनुष्याच्या हृदयांत प्रवेश करतें अशा शस्त्राचा उपयोग करावा. (श्रीकृष्णानें असें कोणतें शस्त्र हें विचारलें असतां नारदानीं सांगितलें) सभासदांनीं जरी दुरुत्तरें व टीका केली तरी तुमचें उत्तर त्यांची भावना व मन हीं जेणें करून संतुष्ट होतील असेंच असावें व यालाच बिनपोलादी शस्त्र म्हणतात. नारदानें श्रीकृष्णास सुचविलेला उपाय प्रत्येक जबाबदार संस्थेच्या अध्यक्षानें नेहमीं मनांत ठेविण्याजोगा आहे.

स्वराज्य ही राज्यघटना पश्चिम हिंदुस्थानांत चालू असल्याचें ऐतरेय ब्राह्मणांत लिहिलें आहे. यांतील अध्यक्षास स्वराट् ( Self-ruler ) हें उपपद लावितात. जो विद्वान् वाजपेय यज्ञ करितो, तो स्वराट्पदवीस योग्य होतो. "समानां पर्यैति तिष्ठेति जेष्ठाय" ( He becomes the leader among equals ) 'त्यास सर्व बरोबरीच्या मंडळींत पुढारीपण मिळतें' असा याचा अर्थ आहे. ही राज्यघटना पंजाब प्रांतामध्यें प्रचलित होती.

वैराज्य ( Kingless ) राज्यघटना ही खरी लोकशाहीची दर्शक आहे. यांत सर्व राष्ट्रांतील प्रजाजनांकडे सर्व राष्ट्राची मुख्त्यारी सोंपविलेली असते. त्यांचे संमतीन राज्यकारभार चालविला जातो. यांत अध्यक्षांस विराट् म्हणाबयाचा प्रघात होता; परंतु त्यांचे हातांत कांहीं सत्ता नसून ती लोकसभेंत एकवटलेली होती व लोकसभेंत देशांतील लहानथोर मिळून सर्व व्यक्तींचा समावेश होत असे. उत्तरमद्र व उत्तरकुरु या देशांत ही घटना प्रचलित होती. काश्मिरांत व हिमालयाचे पायथ्याचे प्रदेशावरहि या राष्ट्राचा अंमल होता.

अराजक घटना ( Non-ruler state )—हिंदुधर्मशास्त्रकारांनीं ज्या राज्यघटना निर्माण केल्या, त्यांपैकीं ही राज्यघटना म्हणजे लोकशाहींतील आत्यंतिक स्वातंत्र्याचें ध्येयस्वरूप होय असें म्हणावें लागतें. या राज्यघटनेंत अध्यक्ष म्हणून कोणी व्यक्ति नसते; फक्त प्रजाजनांनीं परस्परांच्या अनुमतीनें केलेल्या नियमांप्रमाणें वर्तावयाचा संकल्प करून त्याप्रमाणें वागावयाचें. आपण केलेल्या नियमांचा मान आपणच राखून ते अंमलांत आणावयाचे; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कायदा हीच सर्वश्रेष्ठ प्रेरक शक्ति ( Law is the

supreme ruler ) व परस्परांची अनुमति हेंच शासन ( Sanction ), ही पद्धति कांहीं अंशीं हल्लींच्या समाजसत्तावादी विचारपरंपरेस धरून आहे. ही राज्यव्यवस्था कोणत्या विशिष्ट देशांत चालू होती व कोणतीं राष्ट्रें तिचा पुरस्कार करणारीं होतीं याबद्दल माहिती उपलब्ध नाहीं. पण जैन सूत्रां-मध्यें ही राज्यघटना हिंदुस्थानांत अस्तित्वांत होती व एकदोन राष्ट्रांत ती प्रचलित असल्याचा स्पष्ट उल्लेख असल्यामुळें तिचा नामनिर्देश येथें करावा लागला आहे. " अरायाणि वा गणरायाणि वा जुवरायाणि वा दोरज्जाणि वा वेरज्जाणि वा विरुद्ध रज्जाणि वा " आचारांग जैनसूत्र यांत अराजक घटनेचा उल्लेख प्रथमतः केलेला आहे.

**ऐतिहासिक विवेचनास सुरुवात**

इतकें विवेचन, संज्ञा ( Terms ) व घटने( Constitution) बद्दल केल्यानंतर हीं प्रजासत्ताक राज्यें कोणत्या कालविभागांत अस्तित्वांत आलीं, कोणत्या प्रदेशावर त्यांचा अंमल चालत होता, यांबद्दल दिग्दर्शन करून नंतर त्या राष्ट्रांची ऐतिहासिक माहिती देणें जास्त सोईचें होणार आहे. गणराज्यें हीं वेदकालीं अस्तित्वांत नव्हतीं; परंतु तीं वेदकालानंतर अस्तित्वांत आलीं, याबद्दल आतां बहुतेक विद्वानांचें मतैक्य झालें आहे. पाणिनीच्या ग्रंथांत याचा उल्लेख आहे. केवळ गण म्हणजे संख्या व संघ म्हणजे समूह या धात्वर्थापेक्षां या संज्ञा कांहीं विशिष्ट संख्यावाचक असून त्यांची विशिष्ट नियमघटना आहे हें सर्वत्र ज्ञात होतें. त्यानंतर बौद्ध ग्रंथांत त्यांची माहिती दिली असून ग्रीक ग्रंथांत व कौटिलीय अर्थशास्त्रांत त्यांच्या अस्तित्वाचा भरपूर पुरावा आहे. सामान्यपणें तीन भिन्न कालीं तीन निरनिराळ्या प्रदेशांत या गणराज्यांची स्थापना झाली असून त्यांचे स्वाभाविक तीन विभाग पडतात. त्यांतील पहिल्या विभागाचा आपण विचार करूं.

## प्रथम विभाग ( इ. स. पूर्वी ६००–४५० )

हिंदुस्थानांत प्रथमतः जीं प्रजासत्ताक राज्यें स्थापन झालीं तीं हल्लींच्या बिहार प्रांतानें व्यापिलेल्या प्रदेशांत होत. बुद्धकालीन वाङ्मयावरून यांच्या अस्तित्वाचा काल इ. स. शकापूर्वी ६०० वर्षांपासून इ. स. शकाच्या पूर्वी ४५० वर्षांपर्यंत स्थूल मानानें दर्शित होतो. या वेळीं हिंदुस्थानांतील अत्यंत

बलाढ्य मगध साम्राज्यावर शैशुनाग वंशांतील राजे राज्य करीत होते. मेग्यास्थेनिसच्या प्रवासवर्णनांत " हिंदुस्थानांत तीन वेळ प्रजासत्ताक राज्यें स्थापन झालीं व तीनदां नाश पावलीं. " असा मजकूर आढळतो व त्यावरून या प्रजासत्ताक ऊर्फ गणराज्याचे इतिहासकार तीन कालविभाग कल्पितात. त्यांपैकीं प्रथम विभागाचा काळ वर दर्शित केलेला आहे. ह्या वेळीं प्रजासत्ताक राज्यपद्धति अमलांत असलेलीं अकरा गणराज्यें उत्तर-हिंदुस्थानांत पूर्व बाजूस गंगा नदीजवळील हल्लींचे बिहार प्रांतांतील प्रदेशांत होतीं; त्यांपैकीं आठ गणराज्यांची माहिती इतिहासज्ञांस फारच त्रोटक स्वरूपाची आहे. भाग जातीच्या लोकांची राजधानी सुंसुमार पर्वतावर होती. बुली नांवाचे लोक आलकापामध्यें राज्य करीत होते. कोलीय हे रामग्रामावर आधिपत्य चालवीत होते. मौर्य व त्रिवर्ग मल्ल या लोकांचा अंमल अनुक्रमें पिषळवन, व कुशिनरापावाळ काशी या प्रदेशांवर चालत असे. ह्या अकरा गणराज्यांपैकीं सर्वांत महत्त्वाचीं व बलिष्ठ अशीं तीन गणराज्यें होतीं. तीं म्हणजे कपिलवस्तूचें शाक्य, मिथिलेचें विदेह व वैशालीचें लिच्छवी हीं होत. ह्यांपैकीं विदेह व लिच्छवी ह्या दोघां जातींनीं एकत्रित होऊन एक संयुक्त संघ स्थापन करून त्याचें नांव वजिनसंघ असें ठेविलें.

कुनाळ जातकामध्यें शाक्य व कौलिय या दोन राष्ट्रांमध्यें त्यांच्या सरहद्दीवरील रोहिणी नदीच्या वर्चस्वाबद्दल झालेल्या तुमुल युद्धाचा वृत्तान्त दिलेला आहे. तसेंच गणराज्याच्या अध्यक्षाच्या कन्यका राजपुत्रांशीं विवाहास योग्य समजल्या जात व इतर राजेहि आपल्या कन्यका गणराज्याच्या अध्यक्षाचे पुत्रास देण्यांत कमीपणा मानीत नसत. भद्रशाळ जातकामध्यें पसनेदी राजानें शाक्य कुलांतील कन्यकेची विवाहार्थ मागणी केल्याची कथा आहे व कोसल राज्याच्या सेनापतीशीं मानभंगाबद्दल लिच्छवी लोकांनीं केलेल्या संग्रामाचा वृत्तांतहि साद्यंत दिलेला आहे. लिच्छवीच्या वैशाली राजधानीचें ऐश्वर्य-वर्णन व वैशाली नगरीसभोंवार विस्तीर्ण प्राकारभित्तीचें, महाद्वाराचें, गुल्म-स्थानाचें विस्तृत वर्णन एक पन्नाजातकामध्यें आढळतें. वैशाली नगरींत एक विशाल पुष्करिणी निर्माण केली असून तींतील मंत्रपूतजलाचें अभिमंत्रण करण्याचा हक्क फक्त लिच्छवी लोकसभेच्या सभासदांसच होता; व लिच्छवी

लोकसभेचा प्रत्येक सभासद या मंत्रपूतजलाचे अभिषेचन-संस्काराव्यतिरिक्त लिच्छवी लोकसभेमध्यें प्रवेश करण्यास योग्य व लायक समजण्यांत येत नसे. ही पवित्र पुष्करिणी वैशालीनगरीचें सौभाग्य असून तिचें संरक्षण अत्यंत निग्रहानें करण्यांत येत असे. चारहि बाजूंनीं पुष्करिणी प्राकारभित्तीनें वेष्टित असून, पक्षिगणांचा दूषितस्पर्श मंत्रपूतजलास होऊं नये म्हणून वरील बाजूस लोहशलाकावेष्टन होतें. या पुष्करिणींतील जलाभिषेकाचा अपूर्व सन्मान फक्त लिच्छवी गणराजांनाच प्राप्त होत असे व त्यामुळें जातकामध्यें या पुष्करिणीचा "वैशालीनगरे गणराजराजकुलानामभिषेकपुष्करिणीम्" असा आदरपूर्वक उल्लेख केला आहे. कोसल देशाच्या सेनापतीच्या भार्येनें या जलाशयाचें महत्त्व कमी करण्याकरितां व लिच्छवी सभेचा मानभंग करावा या उद्देशानें द्वाररक्षकाच्या निग्रहाकडे दुर्लक्ष करून या पुष्करिणींत स्नान केलें व ती भ्रष्ट केली. त्यामुळें लिच्छवी राजसभेस मोठा क्रोध येऊन त्यांनीं ५०० गणराजांना या मानभंगाचा सूड घेण्याकरितां कोसल सेनापतीविरुद्ध संग्रामास पाठविलें होतें. दोनशें राजांनीं सेनापतीचा पाठलाग करून त्यास जेरीस आणलें व या लोकसभेच्या अपमानाची भरपाई केली.

**संयुक्त व्रजियन अथवा व्रजासंघ**

संयुक्त व्रजियन संघ हा युनायटेड स्टेट्स ऑफ् अमेरिकेप्रमाणें आठ लहान लहान स्वतंत्र व स्वयंशासित लोकांचा संयुक्त संघ होता. त्याची राजधानी वैशाली नगर होतें. या आठ राष्ट्रांपैकीं बलिष्ठ व प्रमुख, लिच्छवी व विदेह हीं दोन राष्ट्रें होतीं. विदेह राष्ट्र पूर्वी राजशासित असून २३०० मैलांच्या विस्तीर्ण प्रदेशावर त्याचें आधिपत्य चालत होतें. संयुक्त प्रांत स्थापण्यापूर्वी लिच्छवी राष्ट्रांत लोकसभेपैकीं तीन सभासदांस अध्यक्ष निवडून त्यांचे हुकुमतीनें सर्व राज्यकारभार चालत असे. लिच्छवी राज्याच्या लोकसभेंत ७७०७ सभासद असत व त्या सर्वांना 'राजा' असा किताब असे. हल्लीं आपले कायदेकौंसिलांतील सभासदांस जसें Honourable, M. L. C., M. L. A. संबोधण्याची पद्धति आहे, तद्वत् त्यांना 'राजा' असें म्हणण्यांत येत असे. या प्रचंड लोकसभेंत सर्व लहानथोर लिच्छवी राष्ट्रांतील प्रजाजन निवडून येऊन आपल्या राष्ट्राचें संरक्षण, सुस्थिति, न्यायदान, युद्ध, शांतता,

व्यापार व सांपत्तिक स्थिति यांबद्दल वादविवाद व चर्चा करून धोरण निश्चित करीत असत. जरी लोकसभा एवढी प्रचंड होती तरी त्यांपैकीं कार्यकारी मंडळ म्हणजे हल्लींचें कॅबिनेट हें फक्त या लोकसभेपैकीं नऊ सभासदांचें असून त्यांना "नवगण रायाणाः" असें संबोधण्याचा प्रघात असे. यांत एक अध्यक्ष (राजा), एक उपाध्यक्ष (उपराजा), एक युद्धमंत्री (सेनापती), एक कोषाधीश (भांडागारिक) असे चार वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश होत असे. या ७७०७ सभासदांपैकीं प्रत्येकास वरील चार अधिकारांच्या जागांवर निवडून येण्याचा हक्क असे. लोकसभेंत लहानथोर, उच्चनीच असा भेदभाव मुळींच पाळण्यांत येत नसे. सर्वांना सारखा अधिकार, मताधिकार, भाषणस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य असून प्रत्येकास वरिष्ठ जागेवर निवडून येण्याचा हक्क असे. अष्ट जातकांत,

"नीच-मध्य-वृद्ध-जेष्ठानुपालिता, एकैकमेव मन्यतेऽहं
राजाऽहं राजेति । नच कस्यचित् शिष्यत्वमुपगच्छति ।"

याप्रमाणें सभासदांचें वर्णन केलेलें आहे.

**लिच्छवी न्यायपद्धति**

लिच्छवी राष्ट्राच्या लोकसभेचें वर्णन वर केलें आहे; त्यावरून लिच्छवी लोकांचे आचार व विचार यांच्या स्वातंत्र्याबद्दल वाचकांस कल्पना येईल व लोकशाहीच्या तत्त्वांचा विकास किती पूर्णत्वानें झाला होता हेंहि कळेल. परंतु यापेक्षांहि लिच्छवी न्यायदानपद्धति ही नितांत लोकमतानुवर्ति (Ultra-democratic) होती. अर्वाचीन प्रचलित लोकशाहीच्या काळांत त्या न्यायदानपद्धतीची बरोबरी करणारी पद्धति कोणत्याहि सुधारलेल्या राष्ट्रांत आढळणार नाहीं. आतां ही पद्धति चांगली होती कीं वाईट होती हा प्रश्न प्रस्तुत गौण असून हिंदुस्थानांत लोकशाहीच्या तत्त्वांचा परमोत्कर्ष लिच्छवी राष्ट्रांत प्रचलित असलेल्या न्यायदानपद्धतींत झालेला आपणांस दिसतो एवढेंच येथें सांगावयाचें आहे.

हल्लींच्या प्रचलित असलेल्या न्यायदानपद्धतींत आरोपी हा सकृद्दर्शनीं निर्दोषी असून त्यावर योग्य पुरावा झाला तरच त्यास अपराधी समजावा असा नियम आहे. (The innocence of the accused should be pre-

sumed ) व शंभर अपराधी सुटले तरी हरकत नाहीं, परंतु एकाहि निरपराध्यास शिक्षा होऊं नये असा साक्षात् नियम नसला तरी वरील उक्तींतील तत्त्व शिष्टसंमत व न्यायसंमत आहे. आरोपीविरुद्ध पुराव्याचा विचार करितांना ( Benefit of doubt must go to the accused ) संशयाचा फायदा नेहमीं आरोपीस दिला पाहिजे असा नियम आहे, व हे सर्व नियम प्रजाजनांचें व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राखण्याकरितां अर्वाचीन न्यायपद्धतींत समाविष्ट केलेले आहेत. आतां आपण लिच्छवी व तदनंतर संयुक्त व्रजियन संघांमध्यें प्रचलित असलेल्या न्यायदानपद्धतीचा विचार करूं. वैजियन संघांमध्यें एकापेक्षां एक श्रेष्ठ अशीं सात न्यायासनें असून अपराधी प्रजाजनांची चौकशी त्यांस शासन करण्यापूर्वी प्रत्येक सात न्यायासनांसमोर व्हावी अशी योजना होती. प्रथमत: 'विनिश्चय महामात्र' या अधिकाऱ्यापुढें अपराध्यास चौकशीस न्यावयाचें. त्यानें अपराधी प्रजाजनास दोषी ठरविलें तर त्या प्रजाजनास 'व्यवहारिका'पुढें चौकशीस न्यावें लागत असे. प्रजाजन निरपराधी ठरला तर त्यास दोषमुक्त करण्याचा अधिकार प्रत्येक न्यायासनास असे. परंतु अपराध स्थापन झालेल्या प्रजाजनास पुन्हां सूत्राधार न्यायासनापुढें चौकशीस नेत होते. तदनंतर अष्टकुलक अपराधी इसमाची चौकशी करीत व तेथें तो अपराधी ठरला तर त्यास अनुक्रमें सेनापती, उपराजा व राजा ( अध्यक्ष ) यांच्या पुढें चौकशीसाठीं न्यावें लागत असे. अपराध स्थापन करण्याचा या सातहि न्यायासनांस अधिकार असे. परंतु या सात न्यायासनांनीं, सर्वांनीं मिळून एकमुखानें दोषी ठरविल्याखेरीज प्रजाजन शिक्षेस पात्र होत नसे. अपराधी इसमास शिक्षा देण्याचा अधिकार फक्त राजास ( अध्यक्षास ) असे व तो वरील नियमानुरूप प्रजाजन दोषी ठरला तर, हल्लींच्या लॉ रिपोर्टरप्रमाणें तत्काळीं असलेल्या " प्रवेणी पुस्तक " नांवाच्या एका प्राचीन न्यायसभानिर्णयाच्या पुस्तकाच्या (The Book of Precedents) आधारें अपराधी प्रजाजनास शिक्षा फर्मावावी असा नियम असे. अपराधी प्रजाजन जर कोणत्याही प्रथम पासूनच्या न्यायासनाकडून निर्दोषी ठरला तर त्यास लागलीच निर्दोषी म्हणून सोडून देण्यांत येत असे व त्यानंतर त्यास फेरचौकशीकरतां वरिष्ठ न्यायासनाकडे नेण्यांत येत नसे. यावरून व्रजियन

संयुक्त संघांत प्रजाजनांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचें किती दक्षतेनें रक्षण करण्यांत येई याची वाचकांस चांगली कल्पना येईल.

सांप्रत, महात्मा गांधींप्रमाणें तत्कालीन हिंदु राष्ट्रास स्वातंत्र्याचा प्रणेता, अहिंसातत्त्वज्ञानी, दीनांचा कैवारी, प्रजासत्ताक राज्याचा पुरस्कर्ता या नात्यानें अखिल मानवजातीस वंद्य अशी भगवान् बुद्ध ही विभूति होती. भगवान् बुद्ध हा राजपुत्र होता व त्यानें निर्वाणप्राप्तीस्तव राज्यत्याग केला ही मिथ्या समजूत आहे. शाक्य प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्षास "राजा" ही पदवी होती, त्यामुळें ही समजूत झालेली आहे. बुद्ध हा अध्यक्ष शुद्धोदन याचा पुत्र होय. व भदीय हा बुद्धाचा चुलता असून पुढें तोहि शाक्य राष्ट्रांचा अध्यक्ष झाला होता. प्रजासत्ताक राज्याचा प्रथमपासून अभिमानी असल्यामुळें व त्या परंपरेंत बुद्धाचा जन्म झाल्यामुळें तो राजसत्तेचा कट्टा शत्रू होता. ईश्वरी प्रेरणेनें शांततेचा, समतेचा व विश्वबंधुत्वाचा दिव्य संदेश त्यास अखिल मानव जातीस द्यावयाचा असल्यामुळें कुटुंब, गृह, आप्तेष्ट यांचे मोहापासून अलिप्त राहून त्यानें स्वेच्छेनें 'दरिद्री नारायणाची दीक्षा' घेतली होती ( Vow of voluntary poverty ). तेव्हांपासून यावज्जीव त्यानें आपल्या दिव्य उपदेशांत ज्याप्रमाणें दुःखविमोचनाचा, निर्वाणप्राप्तीचा मार्ग सांगितला, त्याप्रमाणेंच लोकसभा, न्यायपद्धति, लोकसभेचें नियंत्रण व महत्त्व व लोकमतानुवर्ति राज्यपद्धतीचा पुरस्कार केलेला आपणांस बौद्धजातकामध्यें पहावयास सांपडतो. हल्लीं महात्मा गांधींनीं ज्याप्रमाणें अहिंसेच्या तत्त्वाचा अवलंब राजकारणांत करून अखिल जगास थक्क करून सोडलें आहे, त्याप्रमाणें भगवान् बुद्धानें अहिंसातत्त्वाचा पुरस्कार धर्मकारणांत केलेला आहे. व तसेंच त्यानें स्वतः जो भिक्षुसंघ धर्मकार्यार्थ निर्माण केला होता, त्यांतील अंतर्व्यवस्थेंत व कार्यपद्धतींत तत्कालीन प्रजासत्ताक राज्यांतील लोकमतानुवर्ति कार्यपद्धतीचा अवलंब केला होता. भिक्षुसंघाची कार्यपद्धति आपणांस जातकामध्यें वर्णिलेली सांपडते व गणराज्यांतील कार्यपद्धति काय असावी याचें अनुमान आपणांस त्यावरून करितां येतें, असें जयस्वाल वगैरे विद्वद्वर्यांचें मत आहे.

त्या वेळच्या लोकशासित व राजशासित उभय राष्ट्रांची भगवान् बुद्धाच्या

ठिकाणीं अत्यंत निष्ठा असून उभय राष्ट्रांत बुद्धाबद्दल फार आदरभाव होता. उभयविध राष्ट्रें बुद्धाचें उपदेशामृत श्रवण करीत असत व महत्त्वाच्या कार्यांत बुद्धाचा आदेश नित्य घेत असत. व्रजियन संघाबद्दल भगवान् बुद्धाची विशेष प्रेमबुद्धि असून व्रजियन संघाचा तो पक्षपाती होता व संघ धार्मिक व राजकीय महत्त्वाच्या कार्यांत बुद्धाची आज्ञा प्रमाण मानीत असे. ऐश्वर्यसंपन्न व बलिष्ठ मगध सम्राट् अजातशत्रु हा भगवान् बुद्धाचे चरणीं लीन होत असे. एकदा व्रजियन संयुक्त संघाच्या अत्यंत भरभराटीचें व ऐश्वर्यसंपन्नतेचें सम्राट् अजाशत्रूस वैषम्य वाटून त्यानें त्याच्या समूळ नाशाची प्रतिज्ञा केली. त्या वेळीं भगवान् बुद्ध हा राजगृह येथें होता. अजातशत्रूनें या बाबतींत भगवान् बुद्धाचें काय मत आहे हें कळण्याकरितां आपला मंत्री भगवान् बुद्धाकडे पाठविला होता. अजातशत्रूनें व्रजियन संघाच्या निःपाताची प्रतिज्ञा केली असून, त्याबद्दलचें मत विचारण्याकरितां आपण आलों आहोंत असें अजातशत्रूच्या मंत्र्यानें बुद्धास कळविलें. बुद्धानें मंत्र्यास कांहींच उत्तर दिलें नाहीं. पण त्यानें व्रजियन संघाचें कार्य पूर्व परंपरेस अनुसरून व योग्य तऱ्हेनें करीत असल्याची आपली खात्री, त्याचा शिष्य आनंद तेथें होता, त्यास अजातशत्रूच्या सचिवाचे देखत आठ प्रश्न विचारून, करून घेतली व तदनंतर त्यानें जोंपर्यंत व्रजियन राष्ट्रसंघांतील महत्त्वाचीं कार्यें व्यवस्थित करीत आहे तोंपर्यंत त्याचा नाश तर होणें शक्य नाहींच, परंतु उत्तरोत्तर तें राष्ट्र ऐश्वर्य-संपन्न होत जाईल असा निर्णय दिला. अशा रीतीनें भगवान् बुद्धानें सम्राट् अजातशत्रूच्या प्रधानास प्रश्नोत्तरपद्धतीनें उत्तर दिलें. त्या वेळीं " मिथः भेद " ( Secret disunion ) केल्याखेरीज व्रजियन संघावर विजय मिळणार नाहीं असा त्यानें मनांत निश्चय करून सम्राट् अजातशत्रूस बुद्धाचा निरोप विदित केला. भगवान् बुद्धाचें भविष्य तंतोतंत खरें ठरलें व समरांगणावर मगधसम्राटास व्रजियन संघाचा विनाश करितां आला नाहीं व शेवटीं अजात-शत्रूनें वाममार्गाचा अवलंब करूनहि अखेर त्यांत त्यास यश मिळालें नाहीं.

**शाक्य राष्ट्र**

भगवान् बुद्धाचा जन्म भाग्यशाली शाक्य राष्ट्रांत झाला. शाक्य गण हा कोसल राज्याच्या आधिपत्याखालीं होता व शाक्य-राष्ट्राचें स्वातंत्र्य गौतम बुद्धाच्या जीवनकालांतच कोसला-

विपतीनें नष्ट केलें. शाक्य राष्ट्राची राज्यव्यवस्था लोकसभेच्या नियंत्रणाखालीं होती. लोकसभेंत पांचशें सभासद असत. लोकसभा, शाक्यराष्ट्राच्या कपिलवस्तु राजधानीमध्यें भरत असे. लोकसभेच्या अधिवेशनाकरितां संस्थागार नांवाचें एक " नगरभवन " कपिलवस्तु नगरांत होतें. लोकसभेनें निवडलेल्या अध्यक्षाला " राजा " ही पदवी असे. ही पदवी राजपदसूचक नसून रोमन राष्ट्रामध्यें अध्यक्षास " कॉन्सल " म्हणत असत व ग्रीक लोक आपले अध्यक्षास " आर्चन " म्हणत होते, त्याप्रमाणें "राजा" ही पदवी अध्यक्षपदसूचक असावी. कारण जातकांत बुद्धाच्या पित्यास कांहीं वेळीं शुद्धोधन शाक्य या नांवानें व कांहीं वेळीं शुद्धोदन राजा या विशिष्ट नांवानें संबोधिलें आहे. आपण ' राजा ' हें उपपद ज्या विशिष्ट अर्थानें वापरतों त्या अर्थानें शाक्य राष्ट्रांत तें वापरीत नसून ज्या वेळीं एखादा प्रजाजन शाक्य लोकसभेंत निवडून येत असे, त्या वेळीं त्यास हें उपपद आपल्या नांवापुढें लावण्याचा सन्मान शाक्य राष्ट्र त्या सभासदास देत असे. शाक्य राष्ट्रांतील प्रजाजनास फक्त शाक्य या नांवानें संबोधीत. परंतु लोकसभेच्या सभासदास शाक्यराज असें म्हणण्याचा प्रघात होता. शाक्य राज्यांत एकपत्नित्वाचा कायदा प्रचलित होता. प्रो. विनयकुमार सरकार यांनीं ' शाक्यराजा ' या उपपदानें शाक्यगण हा प्रजाशासित नसून राजशासित असावा या सिद्धांताचें वैय्यर्थ सिद्ध करण्याकरितां रोमन इतिहासांतील एक उदाहरण दिलें आहे. ते म्हणतात, एपिरसचे पिन्हस राजाचे दूत रोमन लोकसभेंत ( Senate ) गेले त्या वेळीं त्यांनीं त्या सभेचें वर्णन ' राजांची सभा ' असें केल्याचें आढळतें. तर शाक्यलोकसभेंतील सभासदांस 'राजा' हें उपपद लाविल्यानें त्या सभेचें लोकमतानुवर्तित्व किंचित्‌ही नष्ट होत नाहीं. राजा पसेनदीचे निरोपाची चर्चा शाक्य लोकसभेंत झाली व ज्या वेळीं अंभष्ट कपिलवस्तु नगरींत गेला त्या वेळीं तो लोकसभेची बैठक चालली असतांना संस्थागारांत गेला होता असें वर्णन बौद्ध जातकांत आढळतें. शाक्य व लिच्छवी गणांची राज्यपद्धति जवळजवळ एकाच स्वरूपाची दिसते, व भगवान् बुद्धाच्या निकटवर्तित्वानें बौद्ध जातकामध्यें या दोन राष्ट्रांबद्दल वारंवार महत्त्वाचे उल्लेख सांपडतात. लिच्छवी गणांत कांहीं प्रजाजन जैन-

धर्मानुयायी होते. प्रसिद्ध जैन तीर्थंकर महावीर हा लिच्छवी गणांचा प्रजाजन असून जैनधर्मानें जो अहिंसातत्त्वाचा पुरस्कार केला त्याचें कारण भगवान् बुद्धाचा उपदेश व सान्निध्य हें असावें असा आमचा तर्क आहे.

प्रथम विभागांतील बुद्धकालीन प्रजासत्ताक राष्ट्रांबद्दल वर दिलेल्यापेक्षां जास्त माहिती उपलब्ध नाहीं व ती सर्व बुद्धजातकांतून मिळवावी लागते. यांपैकीं, कांहीं राज्यें मगध साम्राज्य व कोसल राज्य यांनीं भेदनीतीचा अवलंब करून उध्वस्त केलीं. परंतु हीं विशिष्ट गणराष्ट्रें जरी नाश पावलीं तरी ज्या तत्त्वावर तीं स्थापन झालीं होतीं तें तत्त्व मात्र नाश पावलें नाहीं व मगध साम्राज्य अस्तित्वांत असतां पुन्हां जीं नवीन नवीन प्रजासत्ताक राष्ट्रें निर्माण होऊन उदयास आलीं त्यांचें विवेचन द्वितीय भागांत केलें आहे.

## द्वितीय विभाग ( इ. स. पूर्वी ३५०–३० )

प्रथम विभागासंबंधीं माहिती जशी आपणांस बुद्धजातकें व जैनसूत्रें यांपासून मिळते तशी या विभागामध्यें निर्माण झालेल्या गणराज्यांची माहिती आपणांस ग्रीक ग्रंथकारांच्या ग्रंथांतून मिळते. ग्रीक लोक स्वभावतः स्वातंत्र्यप्रिय व लोकसत्ताक राज्यपद्धतीचे भोक्ते होते; व त्यांना लोकसत्ताक व प्रजासत्ताक राज्यपद्धति ह्या दोन्ही पद्धति भिन्न आहेत हें माहिती होतें. तेव्हां त्यांच्या लिखाणावरून या विभागांतील लोकसत्ताक व राजसत्ताक राज्यांची सुसंगत माहिती आपणांस मिळते व त्यावरूनच निश्चित रीतीनें हिंदुस्थानांत प्रजासत्ताक राज्यें अस्तित्वांत होतीं हें आपणांस कळून येतें. पहिल्या विभागांतील गणराज्यांसंबंधीं प्रो. -हिस् डेव्हिडस्, भांडारकर यांची " राजा, " "गण " व "संघ" या शब्दसमुच्चयाच्या विशिष्ट व पारिभाषिक अर्थान्तरानें संशयित वृत्ति झाली असून त्यांनीं गणसंघ या शब्दाचे अर्थ Guild (श्रेणी), Corporation(संघ), Tribe (जाति), Clan(कुल)अशा शब्दांत जुन्या संस्कृत व पाली भाषेंतील लेखांचें भाषांतर करून आपलें संशोधनकार्य समाप्त केलें आहे. या शब्दांनीं लोकशाही( democracy )च्या सत्तेचा बोध होतो इतका व्यापक अर्थ या शब्दांत सांठविला आहे. याचें साकल्यानें आकलन त्यांस पूर्वग्रहदोषामुळें करितां आलें नाहीं; असाच गैरसमज मॅक्मिलन या लेखकाचा झालेला

दिसतो. कारण या लोकांचें वर्णन करितांना ते स्वतंत्र होते व त्यांच्या राज्यांत ग्रामसंघटना ( Village system ) अंमलांत होती असें तो लिहितो. परंतु आपण एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ग्रीक लोकांनीं जे ग्रंथ लिहिले आहेत त्यांत त्यांनीं त्यांच्या लोकसभेचीं वर्णनें साद्यंत दिलीं आहेत, त्या राष्ट्रांशीं तह केले आहेत व उभय राष्ट्रांमध्यें रणसंग्रामहि झालेले आहेत. शिकंदर ( Alexander ) बादशहाबरोबर आलेल्या फिरत्या ग्रीक लोकांच्या वृत्तांतापेक्षां मेग्यास्थेनीसचे ग्रंथ आपण प्रमाणभूत मानिले पाहिजेत. मेग्यास्थेनीस हा चंद्रगुप्त मौर्य याचे दरबारीं बरींच वर्षें ग्रीक वकील होता. त्यानें अखिल हिंदुस्थानांत प्रवास करून लोकस्थिति व राज्यपद्धति प्रत्यक्ष अवलोकन केलेली आहे. मेग्यास्थेनीस हिंदुस्थानांत राजशासित व लोकशासित अशा दोन भिन्न स्वरूपांच्या राज्यघटना ( Forms of government ) अस्तित्वांत होत्या असें लिहितो. शिवाय राजशासित राष्ट्रांमध्यें महत्त्वाच्या वार्ता राजांना निवेदन करतात व लोकशासित राष्ट्रांत त्या नियुक्त अधिकाऱ्यांस निवेदन करतात, असें तो म्हणतो. ( To report everything to the king where the people have a king, and to the magistrates where the people are self-governed ). ग्रीक ग्रंथांमध्यें ज्या प्रजासत्ताक राष्ट्रांची माहिती दिलेली आढळते तीं राष्ट्रें मौर्य सम्राट् चंद्रगुप्त याचीं समकालीन नसून तीं तत्पूर्वी अस्तित्वांत आलेलीं होतीं व चंद्रगुप्त मौर्याचा विख्यात मंत्री चाणक्य यानें आपल्या कुटिल नीतीनें केवळ आपल्या धन्याची विजयेच्छा पूर्ण करण्याकरितां व त्यास सार्वभौमपदप्राप्ती व्हावी या उद्देशानें तीं पूर्णपणें उध्वस्त करून टाकलीं. चंद्रगुप्त मौर्यास पाश्चात्य राष्ट्रांत The great Commoner असें म्हणण्याचा प्रघात आहे. परंतु इंग्लिश मुत्सद्दी वुइलिअम पिट यासहि त्याचें राष्ट्र The great Commoner या बहुमानवाचक पदवीनें भूषवितें. इंग्लिश लोकशाहीचा उत्कर्ष त्याचे प्रयत्नानें झाला यामुळें त्यास हें उपपद सार्थ लागू पडतें. परंतु चंद्रगुप्त मौर्याचे कारकीर्दींत लोकशाहीचा नाश होऊन साम्राज्यशक्तीचा उदय झाल्यामुळें त्यास हें उपपद कितपत लागू पडतें हें वाचकांनींच पहावयाचें आहे.

**कठगण (Kathians)**

पंजाबमध्यें हल्लींचे लाहोर व अमृतसर हे जिल्हे व रावी नदीचे पूर्वेकडील प्रदेश यांवर कठ नांवाच्या लोकांचें गणराज्य होतें. कठ हे पहिल्या प्रतीचे युद्धशास्त्रविशारद असून त्यांचे अलोट धैर्याची सर्वत्र प्रशंसा होत होती. शिकंदर बादशाहाच्या स्वारीपूर्वी त्यांनीं व इतर गणराज्यांनीं संघ करून अभिसाराचा राजा व पौरस या दोन राजांशीं तुमुळ युद्ध करून त्यांस पराभूत केलें होतें. शिकंदरचे स्वारीचे वेळीं ते अत्यंत उल्हासानें लढले व शिकंदरचे अफाट सेनासागरापुढें जरी त्यांचा टिकाव लागणें शक्य नव्हतें, तरी त्यांनीं शिकंदरचें अधिराज्य कबूल केलें नाहीं. शिकंदर बादशहाशीं झालेल्या युद्धांत त्यांनीं 'शकटव्यूह' निर्माण करून कांहीं काळ शिकंदरचे सेनानीस चकित करून सोडलें. भारतीय युद्धशास्त्राची ग्रीक लोकांस माहिती नसलेमुळें त्यांना 'शकटव्यूहाचा' भेद करितां येईना व युद्धांतील डावपेचांपेक्षां त्यांना संख्याबलावर भिस्त ठेवावी लागली. कठ राष्ट्रांतील विवाह 'स्वयंवर' पद्धतीनें होत असत. ते शारीरिक अनुपम सौंदर्याचे भोक्ते होते व स्ट्राबोच्या मतें त्यांच्यांतील अध्यक्षाची निवड याच तत्त्वानें होत असे (The handsomest man chosen as a king). सांकळ ही कठराष्ट्राची राजधानी होती.

**सौभुति-गण**

कठ राष्ट्राचे प्रदेशास लागून सौभुती राष्ट्र होतें. त्याचे कायदे अत्यंत प्रगमनशील असून त्याची राज्यघटना लोकमतानुवर्ति असल्यानें तिची सर्वत्र प्रशंसा होत असे. ते कठ राष्ट्राप्रमाणें शारीरिक सौंदर्याचे भोक्ते असून, त्या राष्ट्रांत विवाहस्वातंत्र्य होतें व शुल्क (dowry) घेण्याचा प्रघात नसे. ही सौंदर्याची आवड फक्त कठ व सौभुती राष्ट्रांतील लोकांत विशेष रीतीनें दृग्गोचर होत असे असें नाहीं. अंधक-वृष्णी संयुक्त संघांत देखील लोकशाहींतील प्रमुखाची निवड विशेषतः शारीरिक सौंदर्य व मोहक चेहरेपट्टीवर केली जात असे. या संघाबद्दल पुढें विवेचन करावयाचें आहेच. परंतु आतां एवढें सांगितलें असतां पुरें होईल कीं, ह्या संघांपैकीं वृष्णीगणाचा अध्यक्ष श्रीकृष्ण होता. व महाभारतांत शांतिपर्वामध्यें या अंधकवृष्णी संघाबद्दल उद्बोधक वृत्तान्त भीष्मानें कथन केला आहे; त्याबद्दल विवेचन मागें केलेंच आहे. सौंदर्याबद्दल विशेष कटाक्ष

या दोन लोकांमध्यें असण्याचें कारणहि त्यांच्या राज्यघटनेंत आपणांस सांपडतें. या उभय राष्ट्रांमध्यें नूतन उपजलेल्या अर्भकाची त्याचे जन्माचे दुसऱ्या महिन्यांत अधिकारी लोकांकडून वैद्यकीय तपासणी होत असे; व त्यांत कोणत्याहि अर्भकांत कांहीं शारीरिक व्यंग अगर दोष दिसल्यास त्याबद्दल चौकशी होऊन त्या अर्भकाचा नाश करण्यांत येत असे व फक्त धष्टपुष्ट व शारीरसौष्ठवसंपन्न असलेल्या बालकांचें संगोपन करीत. एका दृष्टीनें राष्ट्राचे प्रजाजन शारीरिक बलसंपन्न व कार्यक्षम असावेत या तत्त्वाकडे लक्ष देऊन ही बालहत्या करण्यांत येत असे; व त्याचें कायदेशीर समर्थन करितां येईल. परंतु भूतदयेच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या दृष्टीनें व लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वानें ही हत्या सर्वथैव असमर्थनीय व निंद्य ठरेल. व आतांच्या आपल्या प्रगमनशील कल्पनांचे दृष्टीनें ही बालहत्या अघोर व निंद्य पातक ठरेल. भगवान् बुद्धाचा शांतीचा व भूतदयेचा संदेश त्या कालीं अवगत असतांना असा क्रूर नियम या राष्ट्राचे कायद्यांत कां राहिला हें चिंतनीय आहे. या राष्ट्राचे समकालीन पाश्चात्य राष्ट्रांतील प्रसिद्ध स्पार्टा या लोकशासित राष्ट्रांत असाच नियम होता, त्याचा उल्लेख केल्यावांचून आम्हांस राहवत नाहीं. शिवाय, त्यांचें शरीरसौष्ठव व सौंदर्य यांबद्दल अर्भकाची तपासणी त्याच्या जन्माच्या द्वितीय मासांत करणें हें या राष्ट्रांतील लोकांच्या प्रगमनशीलतेचें लक्षण नसून मूर्खत्वाचें व विवेकभ्रष्टतेचें लक्षण समजलें पाहिजे. आपल्या उपनिषदांमध्यें कठोपनिषद् प्रसिद्ध आहे. त्याचा प्रणेता या कठराष्ट्रांतील ऋषि होता. सदर कठोपनिषदांतील तत्त्वज्ञान हें या राष्ट्रांत प्रचलित असलेल्या बालवधाचे तत्त्वाविरुद्ध निर्माण होणाऱ्या विचारप्रणालिकेचें द्योतक होय. यांत वर्णिलेली नाचिकेताची कथा, शारीरिक सौंदर्यापेक्षां शाश्वत सत्य तत्त्वांचें ज्ञान हेंच जास्त प्रभावशाली आहे, ही गोष्ट प्रामुख्यानें दर्शवीत आहे, असा आमचा तर्क आहे. नाचिकेत हा कुरूप युवक असून कठ राष्ट्रांतील कानूप्रमाणें वधार्ह होता म्हणून त्यास यमाकडे पाठविला असतां त्यानें आपल्या शहाणपणानें आपली मुक्तता करून घेतली, ही लौकिक कथा दिलेली आहे. कठोपनिषद् हें कठ राष्ट्राचें प्रगमनशीलतादर्शक असून त्यांतील वेदान्त हा उद्बोधक व मननीय आहे.

**मालवशुद्रक संघ**

या दोन राष्ट्रांनंतर शिकंदर बादशहाचे स्वारीचे वेळीं मालव (The Malloi) व शुद्रक (Oxydrokai) राष्ट्रांचा एक संयुक्त संघ हल्लींच्या पंजाबांतील झेलम व रावी नदींचा संगम झालेल्या प्रदेशांत अस्तित्वांत होता. हीं राष्ट्रें प्रजासत्ताक होतीं. एरीयनच्या मतें यांचेसारखे युद्धप्रवीण लोक अखिल हिंदुस्थानांत नव्हते. मालवराष्ट्रशासित प्रदेश चिनाब नदीचे कांठास लागून होता व राजधानी रावी नदीचे कांठीं होती. या मालवशुद्रक संघाचे राजधानीस वेढा चालू असतांना शिकंदर बादशहावर जिवावरचें संकट ओढवलें होतें. या संघाचें एक लक्ष सैन्य असून शिकंदर बादशहाचे सैन्यास त्याचे शौर्यानें विलक्षण वचक बसला होता व या संघाचे सैन्याचे आगमनाची वार्ता कळतांच शिकंदरचें सैन्य धीर सोडून पलायन करीत असे.

ग्रीक ग्रंथकार शिकंदर बादशहाचे उज्ज्वल यशोवर्णनाचे भरांत हीं दोन्ही राष्ट्रें शिकंदर बादशाहानें पूर्णपणें जिंकून त्यांचा विध्वंस केला, अशी प्रौढी मारतात पण तें वस्तुस्थितीस धरून नाहीं. महाभाष्यकार पतंजलीनें सर्वस्वीं भिन्न वृत्तान्त दिलेला आहे. त्याच्या मतें हा संघ तसाच अबाधित राहिला व यांपैकीं शुद्रक राष्ट्र या युद्धांत विजयसंपन्न झालें. युद्धानंतर देखील या राष्ट्राचें महत्त्व यत्किंचित् कमी झालें नव्हतें व या संघातर्फे शंभर प्रतिनिधींचें एक शिष्टमंडळ बादशाहाकडे आलें होतें, असें मॅसिडोनियन लेखक कबूल करतात. व या शिष्टमंडळाचें आदरपूर्वक वर्णन त्यांनीं आपल्या लेखांत केलें आहे. या शिष्टमंडळांतील सर्व प्रतिनिधींचें शरीरसौष्टव अप्रतिम होतें. सर्वांनीं सुवर्णचिन्हांकित बहुमोल वस्त्रें धारण केलीं असून त्यांचें वर्तन धीरोदात्त होतें. मौल्यवान् व भव्य रथांत बसून ते आले होते. शिकंदर बादशाहानें त्यांचें आगतस्वागत अप्रतिम थाटानें केलें. त्यानें या सर्व प्रतिनिधींस अत्यंत आग्रहानें व अगत्यपूर्वक भोजनास पाचारण केलें व त्या वेळीं त्यांची उत्कृष्ट व्यवस्था ठेविली होती. शंभर बहुमोल सुवर्णखचित पर्यंकासनांवर प्रतिनिधींना आदरानें बसवून अनेकविध पक्वान्नें व मदिरापानानें त्यांना संतुष्ट केल्यानंतर त्यांना निरोप दिला. हें शिकंदर बादशाहाचें वर्तन ग्रीक ग्रंथकारांचे वर्णनाशीं विसंगत दिसतें. जित राष्ट्रास कोणीहि इतक्या बहुमानानें

वागविणार नाहीं. या संघाचे अलोट धैर्यानें विस्मित होऊन युद्धानें हीं राष्ट्रें आपणांस पादाक्रान्त करितां येणार नाहींत, अशा अंतःस्थ भावनेनें प्रेरित होऊन सामोपचारानें त्यांचेशीं सख्य करावें असा शिकंदराचा हेतु असला पाहिजे. या शिष्टमंडळास संधि करण्याचे सर्व अधिकार संघानें दिले होते. एका मालव शिष्टानें या प्रसंगीं, यादवश्रेष्ठ बलरामापासून (From the time of Dionysius ) आम्हीं आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण केलें आहे व लोकसत्ता व स्वातंत्र्य यांखेरीज कोणतीच इतर गोष्ट आपल्याला जास्त प्रिय नाहीं, असे उद्गार काढिल्याचें एरियननें आपले लेखांत नमूद केलें आहे. या संघाचे राज्यघटनेची व न्यायपद्धतीची माहिती ग्रीक ग्रंथकारांनीं दिलेली नाहीं तसेंच यांची लोकसभा किंवा देशाचे अधिपतीबद्दल कांहीं माहिती दिलेली नाहीं. शिकंदर बादशाहाचे स्वारीचे पूर्वी हीं राष्ट्रें यूरोपांतील स्पार्टा व अथेन्सप्रमाणें एकमेकांशीं शत्रुभावानें वागत होतीं. त्यांच्यांत खाजगी द्वेष व वैमनस्यें हीं अव्याहत चालू होतीं. परंतु शिकंदरचे या स्वारीनें त्यांनीं परस्परांतील वैरभाव सोडून देऊन, संघ स्थापन करून संकटांस तोंड दिलें म्हणूनच त्यांचा निभाव लागला. या वेळीं परस्परांनीं आपल्यामधील स्नेहभाव कायम टिकविण्याकरतां फार मोठ्या प्रमाणांत उभय राष्ट्रांमध्यें लग्नसंबंध घडवून आणले.

**अग्रश्रेणी गण**

या क्षुद्रकमालव संघानंतर महत्त्वाचें असें गणराज्य म्हणजे अग्रश्रेणीचें (Agalassois ) राष्ट्र होय. याचें अधिपत्य हल्लींच्या पंजाब प्रांतांत होतें. अग्र ( front ) हें उपपद श्रेणी राष्ट्रास लाविलें असल्यामुळें प्रथम विभागांत वर्णन केलेल्या मल्लराष्ट्राप्रमाणें याच्या कांहीं शाखा असाव्यात व त्यांत प्रमुख म्हणून हें उपपद धारण करण्यांत येत असावें. या लोकांचा विशेष म्हणजे हे अत्यंत धाडसी व शूर असून पराकाष्ठेचे अभिमानी होते. ते उज्ज्वल भावनाप्रधान ( highly sentimental ) लोक होते. ते अत्यंत निकरानें शत्रूंशीं लढत; परंतु इलाज चालेनासा झाला म्हणजे शत्रूचे हातीं सांपण्यापेक्षां आपले घरादारांस आग लावून त्यांत सर्व बायकामुलें निधड्या छातीनें उड्या टाकून आत्मघात करून घेत. या त्यांचे रूढीवरून कांहीं विद्वानांनीं त्यांचा प्राचीन

क्षत्रियांमध्यें अंतर्भाव केला आहे. रजपुतांमध्यें प्राचीन कालीं रूढ असलेला ' जोहार ' हा या प्राचीन रूढीची पुनरावृत्ति होय असें आम्हांस वाटतें. तसेंच मोंगल सैन्यामध्यें अगदीं आघाडीवर असण्याचा मान असलेल्या सय्यद् ऑफ् बहाराची आठवण झाल्यावांचूनहि रहात नाहीं. हे सय्यद मरणास कस्पटाप्रमाणें मानून वीरोचित मरण स्वीकारण्यास सदैव तयार असत. परंतु मोंगल सैन्याचे अग्रश्रेणीवर ( Vanguard ) लढण्याचा त्यांचा मान असे. जपानांतील ' हारिकेरी ' किंवा हिंदुस्थानांतील ' सती ' हीं या प्राचीन रूढीचींच अवशिष्ट स्वरूपें असावींत.

यांखेरीज पातालराष्ट्र हें हल्लींचे सिंध प्रांताचे ( हैद्राबाद ) प्रदेशांत प्राचीन काळीं आस्तित्वांत होतें. या राष्ट्रांत दोन भिन्न राजकुलें असून त्यांतीलच व्यक्तीस अध्यक्ष निवडून राज्यकारभार चालत असे. तसेंच एक स्थविर ( Elder ) लोकसभाहि त्या राष्ट्रांत होती. या राष्ट्रास हिंदुस्थानांतील स्पार्टी राष्ट्र असें कर्टिसनें संबोधिलें आहे. त्याची वसाहत प्रथम सिंधुनदाचे मुखापाशीं होती. शिकंदराचे स्वारीचें वृत्त ऐकल्यानंतर त्यांनीं सध्यांच्या सिंध प्रांतांत देशांतर केलें. जरासंधाचे भयानें वृष्णीसंघानें मथुरा सोडून द्वारकेस देशांतर केलें. पंजाबांतील मूळचे मालव लोक अशाच परिस्थितींत हल्लींच्या माळव्यांत आले असले पाहिजेत. न्यास (Nysaians), अंभष्ट (Sarbance), अराजक (Grattas) वगैरे प्रजासत्ताक राज्यें होतीं व कांहींचीं नांवें ग्रीक ग्रंथकारांस समजलीं नाहींत. परंतु एवढें निश्चितपणें म्हणतां येतें कीं, ग्रीक लोकांनीं हल्लींचा सर्व पंजाबप्रांत व सिंधप्रांत पाहिला होता व त्या प्रदेशांमध्यें पोरस व अभिस्मरांचा राजा या दोन राजांखेरीज बाकीचे प्रदेश प्रजाशासित होते. प्लुटार्कनें पोरसचे चरित्रांत "Alexander then not only reinstated Poras in his kingdom with the title of Satrap but added a large province to it........whose form of government was the republican." (शिकंदरानें पोरस राजाची त्याचे राज्यावर पुनः स्थापना त्याला क्षत्रप असा किताब देऊन केली, इतकेंच नाहीं, परंतु ज्या लोकांची राज्यघटना प्रजासत्ताक होती, अशा राष्ट्रांना जिंकून तीं पोरसचे राज्यांत सामील केलीं ) असें वर्णन केलें आहे.

आतांपर्यंत पंजाब व सिंध या प्रांतांत असलेल्या प्रजासत्ताक राज्यांसंबंधीं ग्रीक ग्रंथांतील हकीगतीचा आपण विचार केला. परंतु त्या वेळीं अखिल उत्तर हिंदुस्थानांत जीं प्रजासत्ताक राज्यें अस्तित्वांत होतीं त्यांचा आपणांस विचार करावयाचा आहे. त्याकरितां आपणांस मौर्य साम्राज्याचा विख्यात मंत्री आर्य चाणक्य याच्या कौटिलीय अर्थशास्त्राचें अवलोकन केलें पाहिजे. कौटिलीय अर्थशास्त्र हा राजनीतीवर आर्य चाणक्यानें लिहिलेला ग्रंथ आहे व त्यांत एका स्वतंत्र प्रकरणांत संघाबद्दल विचार केलेला आहे. कौटिलीय अर्थशास्त्रांत या संघाचे दोन विभाग पाडले आहेतः—

" काम्भोज–सुराष्ट्र–क्षत्रिय-श्रेण्यादयो वार्ताशस्त्रोपजीवनः लिच्छविक-वृजिक–मल्लक मद्रक–कुकुर–कुरू पांचालादयो राजशब्दोपजीविनः"

पहिल्या ओळींत व्यापार, कृषिकर्म व युद्धकर्मांत प्रवीण असलेल्या क्षत्रियसंघांचा उल्लेख आहे, व दुसऱ्या ओळींत आपल्यांतील सभासदांस 'राजा' हें उपपद धारण करणाऱ्या संघांचें दिग्दर्शन केलें आहे. लिच्छवी व शाक्य गण हे " राजा " या उपपदाचा उपयोग करीत असत. याबद्दलचें विवेचन मागें येऊन गेलेंच आहे. येथें एवढेंच सांगितलें पाहिजे कीं, मगध सम्राट् अजातशत्रू याच्या भेदनीतीस यश न येतां वजियन संघ हा इ. स. पूर्वी तृतीय शतकाचे आरंभापर्यंत अस्तित्वांत होता. या सर्व संघांना स्वतंत्र राजकीय जीवन (Existence) असून त्यांचे कार्यकारी अधिकारी (गणमुख्य) हे लोकसभेस जबाबदार असून त्या सभेचे आज्ञेप्रमाणें त्यांना वागावें लागत असे.

संघमुख्यश्च संघेषु न्यायवृत्तिहितः प्रियः
दान्तो युक्तजनस्तिष्ठेत् सर्वचित्तानुवर्तकः।

असें संघमुख्याचें वर्णन केलें आहे. 'सर्वचित्तानुवर्तकः' हा शब्दप्रयोग महात्त्वाचा आहे व त्यावरून संघमुख्यांना लोकसभेंतील सभासदांचें अनुरंजन करणें भाग होतें, हें स्पष्ट आहे.

कौटिल्याचे काळांत उत्तर हिंदुस्थानांत अनेक प्रजासत्ताक राज्यें अस्तित्वांत होतीं. कौटिल्याचे माहितीवरून पूर्वेस व्राजिका, मल्लक व लिच्छवीक राष्ट्रें होतीं. कुरू व पांचाल हीं मध्य देशांत, कुकुर हें आग्नेय दिशेला व मद्रक

हें नैर्ऋत्य दिशेला होतें. हीं गणराज्यें वैभवसंपन्न असून अत्यंत बलिष्ठ होतीं. या राष्ट्रांशीं राजानें मैत्री संपादणें हें मोठें सैन्य ठेवण्यापेक्षां जास्त हिताचें आहे असें त्याचें मत होतें.

आर्य चाणक्य–विष्णुशर्मा–कौटिल्य हीं तीन भिन्न नांवें एकाच प्रख्यात व्यक्तीचीं होतीं, हें सांगावयास नको. आपला पुत्र कृतक व शिष्योत्तम चंद्रगुप्त मौर्य याचे राज्याचा विस्तार व उत्कर्ष होऊन त्यास सार्वभौमपदप्राप्ती व्हावी हें कौटिल्य याचें जीवितसाफल्य, नव्हे अंतिम ध्येयच होतें. साम्राज्याचे उत्कर्षास या बलिष्ठ व ऐश्वर्यसंपन्न गणराज्यांचाच मोठा प्रत्यवाय आहे, ही गोष्ट कौटिल्याच्या सर्वगामी व कुशाग्र बुद्धीस पटली होती. म्हणून या बलिष्ठ राष्ट्रांवर अधिराज्य स्थापन करणें अगर तें शक्य नसल्यास त्यांचा सर्वस्वीं निःपात करणें हें कार्य त्यास करावयाचें होतें. या गणराज्यांचें व संघाचें शक्तिसर्वस्व त्यांच्यांतील एकीमध्यें आहे हे गौतम बुद्धानें प्रतिपादिलेल्या तत्त्वाचें आकलन करून या गणराज्यांतील सभासदांत मत्सराचें व शत्रुत्वाचें बीज पेरण्यांत त्यानें आपलें बुद्धिसर्वस्व खर्च केलें. कोणत्याहि योग्य अथवा अयोग्य मार्गाचा अवलंब करण्याचें त्यानें सोडिलें नाहीं. या त्याच्या कुटिल नीतीवरूनच त्यास हिंदी मॅकियाव्हिली हें सार्थ नांव यूरोपियन ग्रंथकार देतात. त्याच्या कुटिल-कारस्थानांची साद्यंत माहिती त्याचे अर्थशास्त्रांत आपणांस पहावयास सांपडते. या गणराज्यांत त्यानें आपले गुप्त हेर पाठविले होते व त्यांचें कार्य संघांतील प्रमुख व्यक्तींमध्यें असलेल्या परस्परांतील व्यक्तिद्वेषाची माहिती मिळवून त्या आधारें त्यांच्यांत कलह उत्पन्न करून व्यक्तिद्वेष जास्त प्रज्वलित करावा हें असे. याप्रीत्यर्थ नाना तऱ्हेच्या युक्त्या हेरांनीं योजाव्यात. संघाचे कोणा मोठ्या अधिकाऱ्यांकडे जाऊन अमका तमका अधिकारी गुप्तपणें आपला द्वेष करितो, असें बेधडक त्यास सांगावें; शिक्षकाचा वेष घेऊन संघराज्यांत जाऊन जनरीतींविरुद्ध व रूढाचारांविरुद्ध नास्तिक मतांचा प्रचार करून कलह उत्पन्न करावा; उग्र (Fiery) हेरांनीं सार्वजनिक भोजनालयांत किंवा नाटकगृहांत जाऊन, वरिष्ठ अधिकाऱ्यांची निंदा व कनिष्ठ अधिकाऱ्यांची स्तुति करून त्या अधिकाऱ्यांचे मनांत ईर्ष्या जागृत करावी; कनिष्ठ अधिकाऱ्यांस गुप्त रीतीनं पैशाची व सैन्याची मदत करून

त्यांस वरिष्ठांविरुद्ध कारस्थान उभारण्यास प्रोत्साहन द्यावें; इतकेंच नाहीं तर मदिरा आणि मदिराक्षी यांचीहि योजना आपला हेतु साधण्याकरितां हेरांनीं करावी; तसेंच नयनमनोहर सौंदर्यशाली युवतींना बरोबर घेऊन मुद्दाम गणमुख्याचे दृष्टीस तिला पाडून त्याचे मनांत तिचेविषयीं प्रेमभाव उत्पन्न होईल अशा स्थळीं न्यावें व तेथून कोणातरी आपल्यांपैकीं हेराबरोबर तिला दुसऱ्या स्थळीं नेऊन तिचेकडून आपल्याला जबरदस्तीनें त्या पुरुषानें नेलें असें खोटेंच वदवावें; या रीतीनें गणमुख्यांमध्यें परस्परांत कलहाची उत्पत्ति करावी. या व अशाच प्रकारच्या अनेक युक्त्या, प्रतियुक्त्या योजून हेरांनीं आपला कार्यभाग साधावा असें कौटिल्याचें मत होतें. या कुटिल नीतीची मजल इतकी गेली होती कीं, एखादे संघाचा अधिपति आपले स्त्रीवर अत्यंत प्रेम करीत आहे ही गुप्त बातमी काढून त्या अधिकाऱ्याकडे भिक्षुक स्त्रीच्या वेषानें एखादा गुप्त स्त्री-हेर पाठवावा व त्या स्त्रीनें त्यास एकांतांत 'अमुक एक अधिकाऱ्यास स्वत:चे यौवनाचा अभिमान असून त्यानें मजला तुमचे प्रियपत्नीस वश करून गुप्त रीतीनें घेऊन येणेस पाठविलें आहे. तरी गुप्त रीतीनें आपण त्यांचा कांटा काढावा.' अशी खोटी बतावणी करावी. पुढें काय परिणाम होणार याची कल्पना स्पष्ट येईलच. येणेंप्रमाणें अनेक कारस्थानें उभारून कौटिल्यानें आपलें अंतिम ध्येय साध्य केलें. मौर्य साम्राज्याचे वेळीं हीं गणराज्यें अस्तित्वांत नव्हतीं. पण मौर्य साम्राज्याच्या विनाशकालीं पुन्हा हीं गणराज्यें प्रस्थापित झालीं. चंद्रगुप्ताच्या पराक्रमास किंवा चाणक्याचे कुटिलनीतीस त्यांचा कायमचा नि:पात करतां आला नाहीं. चाणक्याची कुटिलनीति कांहीं काळ कल्पनातीत यशस्वी झाली खरी; पण सर्व काळ तिचा विजय होणें शक्य नव्हतें. लवकरच नवीन नवीन राजकीय कल्पनांचा राष्ट्रांत उदय होऊन त्या विचारपरंपरा कौटिल्याच्या धोरणास प्रतिकूल व आगामी लोकसत्तेस पोषक बनल्या. चाणक्याचें राजकारण मागें पडलें; मौर्य साम्राज्य रसातळास गेलें; पण लोकशाहीचें बीज अजिबात नष्ट झालें नाहीं. कांहीं काळ तें सुप्तावस्थेंत होतें, तरी तें पुन्हां नवीन जोमानें प्रगट झालें व वैशालीचे लिच्छवी, कुरु, व्रजक व पांचाल हीं वैयक्तिक राष्ट्रें जरी नष्ट झालीं तरी त्यांचे मुळाशीं निगडित झालेलें लोकशाहीचें तत्त्व नवीन

स्वरूपांत व भिन्न नांवानें कसें प्रगट झालें याचें विवेचन तृतीय विभागांत केलें आहे.

### तृतीय विभाग ( इ. स. पूर्वी १५०–इ. स. नंतर ३५० )

मौर्य साम्राज्याच्या अस्तानंतर व गुप्त साम्राज्याच्या उदयापूर्वी जवळजवळ ५०० वर्षांचे कालविभागांत पुन्हां तिसऱ्यांदा प्रजासत्ताक गणराज्यांचा उदय झाला. व उत्तर हिंदुस्थानांत वायव्य भागांत कुशानाचें राज्य व दक्षिण हिंदुस्थानांत आंध्रांचें राज्य प्रस्थापित झालें. इ. स. पूर्वी प्रथम शतकांत मध्य देशांतील व्यापारी दक्षिणेस आंध्र सम्राट् महाकप्फिण याचे राज्यांत गेले असल्याचा अवधानशतकांतील उल्लेख मागें आलाच आहे व त्या वेळीं त्या व्यापारी लोकांनीं उत्तर हिंदुस्थानांत दोन भिन्न राज्यपद्धति आहेत, असें सम्राटास सांगितलें आहे. या कालाचा विशेष म्हणजे पंजाबमधील प्रजासत्ताक राष्ट्रें शकांच्या स्वाऱ्यांनीं जर्जर होऊन आपलें स्वातंत्र्य व राज्यपद्धति कायम राखण्याकरितां आपल्या घरादारावर पाणी सोडून माळवा व राजपुताना या नवीन प्रदेशांत येऊन तेथें त्यांनीं आपलीं राज्यें स्थापन केलीं. पंजाबांतील या शूर व पाणीदार लोकांनीं स्वातंत्र्याकरितां देशत्याग व स्थानत्याग केला; पण आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण केलें. या कालचीं प्रजासत्ताक राष्ट्रें दक्षिण पंजाब, राजपुताना व माळवा या भागांत प्रामुख्यानें भरभराटीस आलीं. या कालीं उदयास आलेल्या राष्ट्रांची विश्वसनीय माहिति आपणांस या राष्ट्रांनीं पुरातन नाण्यांवरून व गुप्त सम्राटांनीं अलाहाबाद, विजयगड ( भरतपूर संस्थान ) येथें उभारलेल्या विजयस्तंभांवरील शिलालेखांवरून उपलब्ध होते.

**यौधेयगण**

या काळच्या लोकशासित राष्ट्रांत अत्यंत महत्त्वाचें राष्ट्र म्हणजे योधेयांचें होय. त्यांची वसति सतलज नदीचे कांठावर असून त्यांचें राज्य पूर्वेस यमुना नदीपर्यंत व दक्षिणेस राजपुतान्यापर्यंत पसरलेलें होतें. शिलालेखांवरून व त्यांनीं पाडिलेल्या नाण्यांवरून इ. स. पूर्वीचे पहिले शतकांत ते उदयास आले असावेत. त्यांच्या शौर्याचें यशोवर्णन गिरीनार येथील रुद्रदामन् याचे शिलालेखांत "सर्वक्षत्राविष्कृतवीरशब्दजातीलोकाविधेयानां यौधेयानाम्" असें आदरानें

केलें आहे. ( सर्व क्षत्रियांमध्यें वीर उपपद ज्यांनीं सार्थ केलें आहे अशा यौधेयांचा ) रुद्रदामन्नें आपण अशा श्रेष्ठतम योध्यांचा निःपात केला अशी प्रौढी मिरविली आहे, परंतु तें खरें नाहीं. त्यांनीं पाडिलेलीं नाणीं व त्यांचे सांपडलेले मातीचे शिक्के (clay seals) यांवरून व वरील शिलालेखांतील उल्लेखांवरून इ. स. नंतर निदान ४०० वर्षें पर्यंत त्यांच्या राज्याची भरभराट होत असावी असें वाटतें. त्यांचे नांवांचा उल्लेख सम्राट् समुद्रगुप्ताचे अलाहाबाद येथील विजयास्तंभावर कोरलेल्या शिलालेखांतहि सांपडतो. त्या लेखांत " यौधेय राष्ट्र हें सम्राटाच्या आज्ञा मानितें व त्यास कारभार देतें. " असा मजकूर आहे. भरतपूर संस्थानांतील विजयगड येथील शिलालेखांत त्यांचे राजपद्धतीबद्दल उल्लेख सांपडतो. त्यांचा राज्यकारभार लोकनियुक्त अध्यक्षामार्फत चालत असे व तोच त्यांचा युद्धाचे वेळीं सेनापती असे. " यौधेयगणपुरस्कृतस्य महाराजमहासेनापतेः " याचें फ्लीटनें भाषांतर "Success of Maharaja Mahasenapati who had been made President ( leader) by the Youdheya Parliament" असें केलें आहे. ह्या गणांनीं पाडिलेलीं तीन प्रकारचीं नाणीं सांपडलीं आहेत. " यौधेयानां " असें एका प्रकारच्या नाण्यांवर कोरलें आहे व त्यांवर हत्तीचें व बैलाचें चित्र कोरलें आहे. दुसऱ्या प्रकारचे नाण्यांवर कार्तिकेयाची प्रतिमा कोरलेली आहे ( कार्तिकेय हा हिंदूंचा God of War आहे). तिसऱ्या प्रकारचे नाण्यांवर 'यौधेयगणस्य जय' अशीं अक्षरें कोरलीं असून त्यांवर हातांत त्रिशूल घेतलेल्या वीराचें चित्र आहे. प्राचीन यौधेयांचे वंशज हल्लीं भावलपूरजवळ सतलज नदीचे कांठीं रहात असलेले अर्वाचीन "जोहीया रजपूत" हे आहेत. प्राचीन यौधेयांचें वर्चस्व इ. स. चवथे शकापासून पुढें कमी होत चाललें व इ. स. ७०० नंतर त्यांचें नांव पुढील इतिहासांत आढळत नाहीं.

**मालवगण**

पूर्वी मालव-शुद्रक संयुक्त संघाचें वर्णन आलें आहे. ते प्रथमतः पंजाबांत रहात होते. मालव या नांवाचे लोक चंबळा व बटवा या नद्यांचे मध्यें रहात असल्याचें आपणांस आढळतें व त्यांनीं या प्रदेशास माळवा हें नांव दिलें असावें. जयपूर संस्थानांत करकोटा नगर येथें सांपडलेल्या नाण्यांवरून इसवी

सनापूर्वी पहिले अथवा दुसरे शतकांत त्यांनीं माळव्यांत प्रवेश केला असावा. त्या वेळीं पंजाब प्रांतावर शकांनीं स्वारी केली होती. ते बहुधा पतियाळा संस्थानांतील भातिंडा बाजूनें माळव्यांत उतरले असावेत. कारण फेरोजपूरपासून भातिंडा भागांत अद्याप माळवाई भाषा सुरू आहे. " मालव जय, " " मालवानां जय, " " मालवगणस्य जय " अशीं अक्षरें त्या नाण्यांवर असून कित्येकांवर " मापया, " " मजुपा, " " मागजस, " अशीं नांवें कोरलेलीं आहेत. कदाचित् त्यांचे अध्यक्षांचीं हीं नांवें असावींत. उषवदात्त हा नहपान क्षत्रपाचा जांवई होता. कित्येक ठिकाणीं तो नहपानचा सेनापती असून त्यानें, मालव लोकांनीं ज्या वेळीं उत्तमभद्रावर स्वारी केली त्या वेळीं त्यांच्याशीं युद्ध केलें. नाशिक येथील शिलालेखांत आपण मालवांवर विजय मिळविला अशी प्रौढी त्यानें मिरविली आहे. उत्तमभद्र हा नहपानाचा मांडलिक होता. नहपान व मालव राष्ट्र यांचें शत्रुत्व या युद्धापासून जें सुरू झालें त्याचा शेवट इ. स. शकापूर्वी ५८ वे सालीं, गौतमीपुत्रानें नहपानाचा लढाईत पराभव करून त्यास ठार मारलें, तेव्हां झाला व त्या वेळेपासून एक नवीन शक सुरू केला. तो संवत् विक्रमशक अद्यापपावेतों चालू आहे. या विक्रमशकाचे सुरुवातीबद्दल मोठमोठ्या विद्वानांमध्यें मतभेद आहे व प्रो. मुजुमदार यांचे मतें ज्या वेळीं मालव लोकांनीं पंजाबांतून माळव्यांत देशांतर केलें त्या प्रसंगाची आठवण ठेवण्याकरितां मालव राष्ट्रांनीं हा शक सुरू केला असावा. सम्राट् समुद्रगुप्ताचे शत्रुवर्गांत यौधेया, मद्र, अर्जुनायणांमध्यें मालवांचा समावेश करण्यांत आला आहे. इ. स. शकानंतर चवथे शतकांपर्यंत त्यांचें राजकीय वैशिष्ट्य कायम टिकलें. समुद्रगुप्ताचे द्विग्विजयाचे वेळीं यौधेयाप्रमाणेंच ते गुप्तसाम्राज्याचे अंकित झाले. हल्लींचे काळीं अलाहाबाद जवळचे प्रदेशांत मालयी अथवा मालवीय ब्राह्मण हे त्यांचे वंशज आहेत. शिबी नांवाचे लोक त्यांचे बरोबरच माळव्यांत आले. त्यांचीं, इ. स. पूर्वी दुसरे शतकांतील नाणीं सांपडलीं आहेत. चितोडजवळ नागरी येथें त्यांचीं नाणीं सांपडलीं आहेत. त्यांवर " माध्यत्रिक शिबी जनपदस्य " असा शिक्का आहे. परंतु त्याचेसंबंधीं विशेष माहिती उपलब्ध नाहीं.

तसेंच इ. स. पूर्वी पहिले शतकांतील व दुसरे शतकांतील बाजूस

उल्लेखिलेल्या राष्ट्रांचीं नाणीं सांपडलीं आहेत. त्यांवरून त्यांच्या राज्यपद्धतीचा व निवासस्थानांचा बोध होतो. हीं सर्व नाणीं समकालीन असून या राष्ट्रांचे उल्लेख सम्राट् गुप्तांचे शिलालेखांत एकत्र केलेले आढळतात. अर्जुनायणांचीं नाणीं कोठें सांपडलीं त्याचा स्थाननिर्देश केलेला नाहीं. समुद्रगुप्ताचे अलाहाबाद येथील विजयस्तंभावरील शिलालेखांत त्याचा उल्लेख मालव-अर्जुनायण-यौधेय-मद्रक अशा रीतीनें केलेला आहे. समुद्रगुप्तानें या राष्ट्रांचा उल्लेख आपले शिलालेखांत त्यांचे महत्त्वानुक्रमें न करितां भौगोलिक दृष्टया त्यांचे निवासस्थानानुक्रमें केला असला पाहिजे व या दृष्टीनें विचार केला तर अर्जुनायणीयांचें निवासस्थान भरतपूर व नागर यांचे दरम्यान असलें पाहिजे.

**अर्जुनायण गण, कुनिंद गण, औदुंबर गण**

कुनिंद राष्ट्र यौधेयाचे शेजारीं गंगायमुना नद्यांचे उत्तर बाजूस थेट हिमालय पर्वताचे पायथ्यापर्यंत पसरलें होतें. ते हिमालय पर्वताचे पायथ्याशीं रहात होते, असा मजकूर टॉलेमीचे प्रवासवर्णनांत आहे. विष्णुपुराणामध्यें, डोंगर-पठारावर राहणारे लोक, असा त्यांचा उल्लेख आहे. त्यांचीं कांहीं नाणीं फक्त "कुनिंदाचीं" अशा शिक्क्याचीं असून नंतरचीं नाणीं कांहीं राष्ट्रांचे नांवासहित व कांहीं राजांचीं नांवें कोरलेलीं आहेत. यांवरून प्रथम तें लोकशासित राष्ट्र असून पुढें राजशासित झालें असावें. औदुंबर राष्ट्र हें पंजाबांत रावी नदीचे जवळ हल्लींच्या कांगरा व अंबाला यांचे दरम्यान अस्तित्वांत असावें. पाणिनीचे ग्रंथांत त्याचा उल्लेख आहे. त्यांचीं तीन प्रकारचीं नाणीं सांपडलीं आहेत. ( १ ) पहिले प्रकारचे नाण्यांवर फक्त "औदुंबर" हें नांव कोरलेलें आहे. ( २ ) दुसरे प्रकारचे नाण्यांवर राष्ट्रांचें नांव व राजाचें नांव कोरलेलें आहे. ( ३ ) तिसऱ्या प्रकारच्या नाण्यांवर फक्त राजांचेंच नांव कोरलेलें आहे. त्यांचे नाण्यांवर वृक्षाचे उंच स्तंभ असलेल्या गृहाचें चित्र आहे. कदाचित् तें चित्र त्यांचे लोकसभेच्या मंदिराचें असावें. "विश्वामित्र" अशीं अक्षरें खालीं कोरलेलें व वर एक ऋषीचें चित्र त्यांचें नाण्यांवर असें. कदाचित् विश्वामित्र ही त्यांची राष्ट्रीय विभूति असावी. त्याची एक शाखा कच्छ प्रांतांत वास्तव्य करीत होती व त्यांचे हल्लींचे वंशज "औदुंबर" जातीचे गुजराथी ब्राह्मण आहेत.

वर वर्णन केलेलीं सर्व राष्ट्रें सम्राट् समुद्रगुप्ताचे दिग्विजयाचे वेळीं नामशेष झालीं. हीं गणराज्यें ऐश्वर्यसंपन्न असून त्यांचा अंमल विस्तृत व सुपीक प्रदेशांवर चालत होता. त्यांची सांपत्तिक स्थिति चांगली असून यौधेयगण पंजाबांतील सुपीक व विस्तृत प्रदेशांवर अप्रतिहत सत्ता चालवीत होता. मालवगणानें पंजाबच्या सुपीक प्रदेशाचा त्याग करून राजपुतान्यांतील रूक्ष प्रदेशांत केवळ स्वातंत्र्यरक्षणार्थ स्थलांतर केलें व आपलें नांव त्या प्रदेशास देऊन स्वराष्ट्रास अजरामर केलें. नहपान, रुद्रदामन, उषवदात वगैरे शक अगर पार्थिव राजांनीं अलोट धैर्यानें घनघोर संग्राम करून त्यांना जेरीस आणलें व त्यांचें पुढें पाऊल पडूं दिलें नाहीं. परंतु यांत त्यांचें शक्तिसर्वस्व खर्चिल्यामुळें तीं मोडकळीस आलीं. या परकीय स्वाऱ्या वारंवार होऊं लागल्यामुळें त्यांची घटना विस्कळित होऊं लागली व अशा प्रसंगाचा फायदा घेऊन कांहीं पराक्रमी व स्वार्थी लोकांनीं लोकशाहीचें पर्यवसान राजशाहींत केलें. बाहेरून या परकीय स्वाऱ्या व आंतून गुप्त साम्राज्याचा अप्रतिहत विस्तार यायोगें हीं गणराज्यें अगदीं मृत्युपंथास लागलीं होतीं. अगदीं प्रथमपासून तीन वेळ प्रजासत्ताक राज्यांनीं डोकें वर काढिलें व तिन्ही वेळां त्यांचे नाशास अंतस्थ व बहिस्थ अशीं कारणें उपस्थित झालीं. या दरम्यानचे कालांत दोन अगदीं परस्परविरुद्ध अशा राजकीय कल्पनांचा उदय झाला. एकीकडे साम्राज्यवादी विचारपरंपरेचे अध्वर्यु या गणराज्यांचे अस्तित्वास सर्वस्वीं प्रतिकूल असून त्यांचे नाशाचे उपायचिंतनांत मग्न झाले होते, तर दुसरीकडे विरुद्ध विचारपरंपरेचे जनक हीं गणराज्यें चिरस्थायी कशीं होतील याचा विचार करीत असून त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष कसा होईल या विवंचनेंत होते. इ. स. ६ वे शतकानंतर हिंदी राजकारणांतून त्यांचें अस्तित्व अजिबात नष्ट झालें. पुढील इतिहासांत त्यांचें नांव सांपडत नाहीं. पुढील राजनीतिविशारदांनीं आपले ग्रंथांत या गणराजांना अजिबात वगळलें आहे. पुराणांत व धर्मशास्त्रांत या गणराज्यांचा नामनिर्देशहि नाहीं. या पुराणग्रंथकारांना व धर्मशास्त्रकारांना फक्त राजशासितपद्धतीच माहिती होती. केवळ राजनीतिशास्त्रावरच शुक्रनीतिसार नांवाचा ग्रंथ लिहिणारा शुक्र यानें आपले ग्रंथांत या संघांचा नामनिर्देशहि केला नाहीं. मग त्यांचेबद्दल

उल्लेखिलेल्या राष्ट्रांचीं नाणीं सांपडलीं आहेत. त्यांवरून त्यांच्या राज्यपद्धतीचा व निवासस्थानांचा बोध होतो. हीं सर्व नाणीं समकालीन असून या राष्ट्रांचे उल्लेख सम्राट् गुप्तांचे शिलालेखांत एकत्र केलेले आढळतात. अर्जुनायणांचीं नाणीं कोठें सांपडलीं त्याचा स्थाननिर्देश केलेला नाहीं. समुद्रगुप्ताचे अलाहाबाद येथील विजयस्तंभावरील शिलालेखांत त्याचा उल्लेख मालव-अर्जुनायण-यौधेय-मद्रक अशा रीतीनें केलेला आहे. समुद्रगुप्तानें या राष्ट्रांचा उल्लेख आपले शिलालेखांत त्यांचे महत्त्वानुक्रमें न करितां भौगोलिक दृष्ट्या त्यांचे निवासस्थानानुक्रमें केला असला पाहिजे व या दृष्टीनें विचार केला तर अर्जुनायणीयांचें निवासस्थान भरतपूर व नागर यांचे दरम्यान असलें पाहिजे. कुनिंद राष्ट्र यौधेयाचे शेजारीं गंगायमुना नद्यांचे उत्तर बाजूस थेट हिमालय पर्वताचे पायथ्यापर्यंत पसरलें होतें. ते हिमालय पर्वताचे पायथ्याशीं रहात होते, असा मजकूर टॉलेमीचे प्रवासवर्णनांत आहे. विष्णुपुराणामध्यें, डोंगर-पठारावर राहणारे लोक, असा त्यांचा उल्लेख आहे. त्यांचीं कांहीं नाणीं फक्त "कुनिंदाचीं" अशा शिक्क्याचीं असून नंतरचीं नाणीं कांहीं राष्ट्रांचे नांवांसहित व कांहीं राजांचीं नांवें कोरलेलीं आहेत. यांवरून प्रथम तें लोकशासित राष्ट्र असून पुढें राजशासित झालें असावें. औदुंबर राष्ट्र हें पंजाबांत रावी नदीचे जवळ हल्लींच्या कांगरा व अंबाला यांचे दरम्यान अस्तित्वांत असावें. पाणिनीचे ग्रंथांत त्याचा उल्लेख आहे. त्यांचीं तीन प्रकारचीं नाणीं सांपडलीं आहेत. ( १ ) पहिले प्रकारचे नाण्यांवर फक्त "औदुंबर" हें नांव कोरलेलें आहे. ( २ ) दुसरे प्रकारचे नाण्यांवर राष्ट्रांचें नांव व राजाचें नांव कोरलेलें आहे. ( ३ ) तिसऱ्या प्रकारच्या नाण्यांवर फक्त राजांचेंच नांव कोरलेलें आहे. त्यांचे नाण्यांवर वृक्षाचे उंच स्तंभ असलेल्या गृहाचें चित्र आहे. कदाचित् तें चित्र त्यांचे लोकसभेच्या मंदिराचें असावें. "विश्वामित्र" अशीं अक्षरें खालीं कोरलेलें व वर एक ऋषीचें चित्र त्यांचें नाण्यांवर असें. कदाचित् विश्वामित्र ही त्यांची राष्ट्रीय विभूति असावी. त्याची एक शाखा कच्छ प्रांतांत वास्तव्य करीत होती व त्यांचे हल्लींचे वंशज "औदुंबर" जातीचे गुजराथी ब्राह्मण आहेत.

**अर्जुनायण गण, कुनिंद गण, औदुंबर गण**

वर वर्णन केलेलीं सर्व राष्ट्रें सम्राट् समुद्रगुप्ताचे दिग्विजयाचे वेळीं नामशेष झालीं. हीं गणराज्यें ऐश्वर्यसंपन्न असून त्यांचा अंमल विस्तृत व सुपीक प्रदेशांवर चालत होता. त्यांची सांपत्तिक स्थिति चांगली असून यौधेयगण पंजाबांतील सुपीक व विस्तृत प्रदेशांवर अप्रतिहत सत्ता चालवीत होता. मालवगणानें पंजाबच्या सुपीक प्रदेशाचा त्याग करून राजपुतान्यांतील रूक्ष प्रदेशांत केवळ स्वातंत्र्यरक्षणार्थ स्थलांतर केलें व आपलें नांव त्या प्रदेशास देऊन स्वराष्ट्रास अजरामर केलें. नहपान, रुद्रदामन, उषवदात वगैरे शक अगर पार्थिव राजांनीं अलोट धैर्यानें घनघोर संग्राम करून त्यांना जेरीस आणलें व त्यांचें पुढें पाऊल पडूं दिलें नाहीं. परंतु यांत त्यांचें शक्तिसर्वस्व खर्चिल्यामुळें तीं मोडकळीस आलीं. या परकीय स्वाऱ्या वारंवार होऊं लागल्यामुळें त्यांची घटना विस्कळित होऊं लागली व अशा प्रसंगाचा फायदा घेऊन कांहीं पराक्रमी व स्वार्थी लोकांनीं लोकशाहीचें पर्यवसान राजशाहींत केलें. बाहेरून या परकीय स्वाऱ्या व आंतून गुप्त साम्राज्याचा अप्रतिहत विस्तार यायोगें हीं गणराज्यें अगदीं मृत्युपंथास लागलीं होतीं. अगदीं प्रथमपासून तीन वेळ प्रजासत्ताक राज्यांनीं डोकें वर काढिलें व तिन्ही वेळां त्यांचे नाशास अंतस्थ व बहिस्थ अशीं कारणें उपस्थित झालीं. या दरम्यानचे कालांत दोन अगदीं परस्परविरुद्ध अशा राजकीय कल्पनांचा उदय झाला. एकीकडे साम्राज्यवादी विचारपरंपरेचे अध्वर्यु या गणराज्यांचे अस्तित्वास सर्वस्वीं प्रतिकूल असून त्यांचे नाशाचे उपायचिंतनांत मग्न झाले होते, तर दुसरीकडे विरुद्ध विचारपरंपरेचे जनक हीं गणराज्यें चिरस्थायी कशीं होतील याचा विचार करीत असून त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष कसा होईल या विवंचनेंत होते. इ. स. ६ वे शतकानंतर हिंदी राजकारणांतून त्यांचें अस्तित्व अजिबात नष्ट झालें. पुढील इतिहासांत त्यांचें नांव सांपडत नाहीं. पुढील राजनीतिविशारदांनीं आपले ग्रंथांत या गणराजांना अजिबात वगळलें आहे. पुराणांत व धर्मशास्त्रांत या गणराज्यांचा नामनिर्देशहि नाहीं. या पुराणग्रंथकारांना व धर्मशास्त्रकारांना फक्त राजशासितपद्धतीच माहिती होती. केवळ राजनीतिशास्त्रावरच शुक्रनीतिसार नांवाचा ग्रंथ लिहिणारा शुक्र यानें आपले ग्रंथांत या संघांचा नामनिर्देशहि केला नाहीं. मग त्यांचेबद्दल

विवेचन करण्याचें बाजूसच राहिलं. कालान्तरानें हळुहळू अशी परिस्थिति निर्माण होत चालली कीं, ज्या संस्था पाश्चात्य संकृतीचें फळ आहेत असें आपण आज मानितों, त्या प्रकारच्या संस्था प्राचीन काळीं हिंदुस्तानांत अस्तित्वांत होत्या, या विधानाव सबळ व विश्वसनीय पुरावा पुढें येत आहे तरी आपला विश्वास बसत नाहीं.

---

## उषा !

कवि : विपिनविहारी, कवि-मित्र-मंडळ, मुंबई.

[ वृत्त–द्रुतविलंबित ]

विमल सुंदर ही प्रगटे उषा ।
दिसति हेममया नयनां दिशा ॥
चढविते जणुं यामिनि भूषणां ।
सुखविते किति ही सुषमा मना ! ॥ १ ॥

ललितरूप समन्वित शर्मदा ।
प्रगटली वरदा शुभ शारदा ॥
हंसत वा कमला कमलेक्षणी ।
गगनिं पातलि विश्वविमोहिनी ॥ २ ॥

उधळि हर्ष सलज्ज सुलोचनीं ।
सुरनरी अलकावातिची कुणी !॥
रतिच रूपवती कमनीय ही ।
प्रगट विश्वविमोहक वा नवी ॥ ३ ॥

दशदिशीं भरुनी जणुं वर्षला ।
परम हर्ष इथें जगतीतला ॥

स्थिरचरीं भरि नूतनचेतना ।
सुख नवोनव देइ प्रतिक्षणा ! ॥ ४ ॥

रजतरंगरसींच निमज्जली ।
सरसिं हांसत ही कुमुदावली ॥
मुद्भरें वनिं या ललितालता ।
सुममिषें हंसताति मधुव्रता ! ॥ ५ ॥

समयिं या सुमनावरुनी अहा ! ।
अनिल मंद सुशीत वहात हा ॥
सुम-पराग-समन्वित मारुत ।
सुख जनां स्पृहणीय समर्पित ॥ ६ ॥

सुमन-सौरभिं लोल मधुव्रत ।
करित हे वनिं मञ्जुल गुञ्जित ॥
समुद एकसरें विपिनांतुनी ।
खगहि हे रमती मधु गायनीं ॥ ७ ॥

हिमकणांवरि ही सुषमामयी ।
विलसते रुचिरा सवितोदयीं ॥
करि पराजित कीं शुभ मौक्तिकां ।
अतुल दावि उषा किमयाच कां ? ॥ ८ ॥

अयि उषे ! भुवनत्रयमोहिनी ! ।
अखिल विश्व-सुमंगल-कारिणी ! ॥
धृतिबलादि गुणाकरवर्धिनी ! ।
तुजशिं मी विनवीं अजि वंदनीं ॥ ९ ॥

---

# समाचार

लेखक : **वासुदेव विनायक जोशी**, बी. ए., एल्‌एल्. बी., बडोदें.

[ हे सुधागड तालुक्यांतील खवली गांवचे इनामदार आहेत. पुणें येथें इ. स. १८९५ मध्यें जन्म; न्यू इंग्लिश स्कूलमधून १९१३ सालीं मॅट्रिक व १९१८ मध्यें फर्ग्यूसन कॉलेजमधन बी. ए. पास; १९२० मध्यें एल्‌एल्. बी. सध्यां बडोद्यास वकिली करीत आहेत. ह्यांचे विनोदप्रचुर लेख व गोष्टी प्रसिद्ध असून "जन्माचा बंदिवान" ही कादंबरी व "स्त्रियांच्या हक्काची कायदेशीर विस्तारयोजना" हा प्रबंध नुकताच प्रसिद्ध झाला आहे. ]

आजारी माणसाची अगर मयताच्या मागें राहिलेल्या दुःखी कुटुंबाची विचारपूस करणें यास समाचार घेणें असें म्हणतात. या समाचार शब्दाला चांगला अगर खरपूस अशीं विशेषणें लाविलीं म्हणजे त्याचा स्पष्ट अर्थ नुसत्या समाचार या शब्दांतहि कधींकधीं व्यक्त होतो, नाहीं असें नाहीं. परंतु, सांप्रत आपणांस या दुसऱ्या अर्थाशीं फारसें कर्तव्य नाहीं. आज समाचार म्हणजे आजारी माणसाची विचारपूस एवढ्यापुरतेंच लिहावयाचें आहे.

क्लेश, मग ते शारीरिक असोत अगर मानसिक असोत, सहानुभूतीच्या वाऱ्यानें कमी होतात. आजारी माणसास आप्तस्नेही भेटण्यास आले म्हणजे क्षणैक बरें वाटतें व तो स्वतःचे शरीरक्लेश कांहीं काळपावेतों विसरतो. तसेंच निराशेच्या समुद्रांत गटांगळ्या खाणाऱ्या त्याच्या जीवास आप्तेष्टांचा धीराचा शब्द म्हणजे केवळ काडीचा आधार होय. पण त्या आधारावरच तो मृत्यूचा भोंवरा फोडून बाहेर पडण्याची हिंम्मत धरीत असतो. बरें, 'उत्सवे, व्यसने, राजद्वारे, स्मशाने,' पायास पाय बांधून उभा राहणारा खरा मित्र सोडला तरी त्र्यींतले, दशांतले, नातेवाईक यांना आजारी मनुष्याची खबर काढण्यासाठीं जावेंच लागतें. शिवाय विघ्नसंतोषी नातेवाईक, विशेषतः उभा दावा राखणारे भाऊबंद, परदुःखानें आनंदित होणारे महात्मे व नसत्या उठाठेवी करणारे लुडबुडे लोक आजारी मनुष्याभोंवतीं गिधाडांच्या उत्सुकतेनें घिरट्या घालीत असतातच. या सर्व प्रकारांच्या लोकांच्या स्वाभाविक मनोधर्माचें पोषण व्हावें म्हणून समाचारास जाण्याची पद्धति अमलांत आली

असावी व रूढीच्या शिक्क्यामुळें ही चाल आवश्यक शिष्टाचाराच्या यादींत दाखल झाली आहे.

इंग्रजी शिष्टाचार असा आहे कीं, आजारी मनुष्याच्या समाचारास जावयाचेंच तर रोग्यास न भेटतां बाहेरूनच तपास काढून परत फिरावयाचें व आपल्या सहानुभूतीची नोंद व्हावी अशी इच्छा असेलच तर पत्राच्या पेटींत स्वतःच्या नांवाची चिठ्ठी टाकली म्हणजे काम भागतें. आपल्यांत प्रत्यक्ष रोग्याच्या आंथरुणापर्यंत जाऊन, त्यास बोलण्यास लावून विचारपूस करण्याची सवलत आहे. तर गुजराथी लोकांत अशी चाल आहे कीं, आजारी मनुष्याच्या येथें त्याचे नातेवाईक व स्नेही हे आठआठ पंधरापंधरा दिवस पाहुणे म्हणून राहण्यास येतात व आजारी माणसाच्या भोंवतीं गराडा देऊन बसतात. गुजराथी लोकांत व्यक्तिमात्राचें मरण हा एक उत्सवप्रसंग मानीत असल्यास आजारी माणसाच्या भोंवतीं नातेवाइकांचा जो गराडा पडतो, याचा सहज उलगडा होईल. एकाद्या माणसाचा मृत्यु म्हणजे ज्ञातींतील सर्व लोकांना मेजवानीचा समारंभ. तेव्हां आजारी माणसाच्या आंथरुणाकडे ज्ञातिबांधव किती आशेनें आणि उत्सुकतेनें टक लावून बसत असतील याची कल्पनाच करावी.

समाचारास जाण्याची चाल कोणत्याही स्वार्थी वा परमार्थी बुद्धीनें पडली असेल, पण त्यामुळें उत्पन्न होणारे प्रसंग पाहिले म्हणजे ही चाल बालविवाहाच्या चालीइतकी वाईट ठरते. आजारी माणसाची विचारपूस करण्याच्या निमित्तानें त्याच्या धैर्याचा अगदीं अंत पाहण्याचा प्रयत्न इतर लोक करितात, फार काय पण हृदयाची क्रिया बंद पडून होणाऱ्या मृत्यूंची संख्या या समाचाराच्या घातुक पद्धतीस जबाबदार आहे असें म्हणावें लागेल. तेव्हां अशा या एक महत्त्वाच्या शिष्टाचाराविषयींचा माझा अनुभव नमूद करण्याचें ठरविलें आहे.

सुमारें पंधरा वर्षांवरची गोष्ट. पुण्याच्या मॅण्डी फीवरानें (लागवड करणाऱ्या महाशयांच्या नांवावर मोडणाऱ्या) म्हणजे हिंवतापानें मी अगदीं बेजार झालों होतों. रोज थडथडून येणाऱ्या हिंवानें माझा शिल्लक राहिलेला हाडांचा सांपळा खिळखिळा होऊन, त्यांतले सांधे निखळून पडूं लागले होते.

तापाच्या वणव्यानें डोक्यावरचेच नव्हे तर भिवयांवरचेहि केशवृक्ष जळून गळून पडले होते. माझी त्वचा दहनभूमीसारखी कळाहीन दिसूं लागली होती. माझा धीर सुटला होता व शेजारीपाजारी मला क्षयाची भावना झाली आहे असें कुजबुजूं लागले तें माझ्या कानावर आलें. माझ्या मनोराज्याचे स्तंभ उन्मळून पडले व मीं जगतों कसा ही एकच विवंचना माझ्या पुढें राहिली होती. माझी तरुण भार्या, लहान मुलें, म्हातारी आई व परत आलेली बहीण यांच्या अनाथ स्थितीचीं भेसूर स्वप्नें मला पडावींत आणि मी झोंपेंतून घाबरून जागें व्हावें. आप्तेष्टास हिंवताप लागला आहे येवढेंच लिहून माझी खरी स्थिति ( मानसिक व शारीरिक ) त्यांपासून आतां लपवून ठेवणें शक्य नव्हतें व प्रकृति काळजी करण्यासारखी आहे असे निर्वाणीचे खलिते लिहिणें भाग पडलें. माझे आप्तेष्ट जमा होतील, माझ्या औषधोपचाराची कांहीं व्यवस्था करतील, माझ्या खचत जाणाऱ्या मनाला धीर देतील, निदान माझ्या अनाथ कुटुंबाचा सांभाळ करण्याचें लटकें वचन देऊन मला या जगांतून निरोप देतील अशी मला आशा होती. पण जसजसे माझे दूरदूरचे नातेवाईक निरनिराळ्या गाड्यांच्या वेळांना उतरूं लागले, तसतसें आपण पत्रें पाठविण्यांत भलताच गाढवपणा केला असें मला वाटूं लागलें. माझे ज्येष्ठ मेहुणे ( बहिणीचे यजमान म्हणून ज्येष्ठ ), बहिण व तिचीं तीन मुलें अशीं प्रथम येऊन थडकलीं. माझे घरांत पुरुष मालक आणि गडी मीच काय तो एकटा. तेव्हां टांगा दाराशीं उभा राहतांच जीव मुठींत धरून सामानसुमान काढण्यासाठीं मलाच पुढें धांवावें लागलें. घरांत येतांच अवेळीं आलेल्या पाहुण्यांच्या चहासाठीं दूध आणावयालाहि मलाच दम टाकीत जावें लागलें. त्यांच्यासमवेत चहा घेतला आणि थोडी हुषारी आली. तशांत लग्नानंतर सात वर्षांत प्रथमच माहेरीं येणाऱ्या बहिणीच्या भेटीनें मला आनंद वाटला व मी दुखणें विसरलों. ‘ विनाकारण तुम्ही आम्हांला घाबरून सोडलेंत. माझी नाताळाला जोडून रजा मंजूर झाली होती, ती शेवटीं फिरवून अगोदर रजा घ्यावी लागली. नाताळचीं कन्सेशनें घेऊन आम्ही मित्रमंडळी उत्तर हिंदुस्थान पाह्यला जाणार होतों.’ (आपल्या पत्नीकडे कुर्यानें पाहून) ते म्हणाले, ‘ म्हटलं नव्हतं तुला कीं, मी एकटा जाऊन प्रकृति पाहून येतों. पण तुझा

हट्ट!' माझे मेहुणे गरम झालेले मी अनेक वेळां पाहिलें होतें. पण माझ्या अत्यवस्थ दुखण्याचें त्यांना कांहींच वाटेनासें पाहून मी खजील झालों. मेहुणे शिकलेले, तरीसुद्धां पत्नीस माहेरीं एक दिवससुद्धां धाडीत नव्हते. तें प्रेमातिशयानेंच असें मला आई म्हणे. त्याचा प्रत्यय मेहुण्यांनीं माझ्या बहिणीच्या अंगावर वस्कन ओरडून आणून दिला. बहिणीच्या डोळ्यांत चटकन् पाणी आलें. 'काय याची दशा झाली आहे! खरंच, इतके दिवस कसं कांहींच तूं कळविलं नाहींस? औषध कोणाचं घेतोस? काय सांगतात तरी काय डॉक्टर?' असें म्हणून पतिराजांच्या व्यवहारशून्यतेवर पांघरूण घालण्याचा तिनें प्रयत्न केला. 'बरं, मी बाहेर जातों बरं कां! आणखी हें पहा. माझी तुम्ही मुळींच वाट पाहूं नका. माझे कॉलेजांतले पुष्कळ स्नेही गांवांत आहेत. दहा वर्षांत भेटी झाल्या नाहींत. रात्रीं वाटलं तर येईन नाहीं तर नाहीं.' असे माझे मेहुणे म्हणाले व सूटकेसमधले परटीचे कपडे चढवून ते बाहेर पडले. बहीण ओशाळी होऊन म्हणाली, 'आमच्या येथें लहानांपासून थोरांपर्यंत एक कित्ता! दुसऱ्याच्या जिवाची पर्वाच कधीं करायची नाहीं. माणसं कसलीं हीं! दयामाया नाहीं.' तिचे ते हृदयस्पर्शी व वैवाहिक आयुष्याचें सूत्ररूपानें दिग्दर्शन करणारे शब्द ऐकून माझें मन उद्विग्न झालें. त्या संध्याकाळीं तापाची पाळी आली, बिचारी बहिण माझ्याजवळ बसून धडधडतांना मला दाबून धरीत होती. ताप भरला, मी बेफाम झालों; इतक्यांत चिंगूमावशी, तिचे यजमान व चिंगूमावशीची मुलगी अशीं येऊन थडकलीं. त्याचें मला भानच नव्हतें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी अंथरुणांत चहा घेत बसलों होतों; इतक्यांत आई म्हणाली, 'बाळा, चिंगूमावशी तुझ्या समाचाराला काल आली आहे,' व अंधेऱ्या कोपऱ्यांतून चिंगूमावशीची मूर्ति प्रगट झाली. थोड्याच वेळानें चिंगूमावशीचे यजमान अंथरुणावर येऊन बसले. कुशल प्रश्न विचारणें झाल्यावर आपल्या येण्याचें दुसरेंहि कारण त्यांनीं सांगितलें. 'आमच्या चिमीला स्थळं पाहण्यासाठीं पुढल्या महिन्यांत आम्ही येणार होतोंच. तशांत तुझं पत्र आलं. म्हटलं तुझा समाचार घेणं होईल, स्थळांचा कांहीं तपास काढूं. अशीं दोन्ही कामं अनायासें होतील.' असें म्हणून त्यांनीं स्थळांची सहस्रनामावळी म्हणण्यास सुरुवात केली. आपल्या

पतिराजांची माझ्याबद्दलची बेफिकिरी पाहून मावशी ओशाळी झाली व ती म्हणाली, 'बाळाला नुसता हिंवताप लागला आहे. अगोदर कळवलं असतं तर व्यंक्या गुरवाचा गंडा मंत्रून बरोबर आणला असता. चौथांत्राड हिंवहि थांबतं. नाहींतर असं करावं! आज पत्र लिहून पोष्टांतून गंडा मागवावा. नाहींतर मी गेल्याबरोबर पाठवून देईन. बाकी लग्नाचं जमलं तर उद्यां महिन्यांनीं तो तेथें वऱ्हाडी मंडळींत येईल.' मावशी व मावसा यांनीं दुखण्याबद्दल पुनः विचारपूस केलीच नाहीं. स्थळें पाहण्यांत, आणि चिमीला दाखविण्यांत त्यांना मुळीं फुरसतच झाली नाहीं. माझी खालावत जाणारी प्रकृति पाहून त्यांच्या तोंडांतून दिखाऊ सहानुभूतीचा शब्दहि निघाला नाहीं. पण चिमी नापसंत झाली म्हणजे तीं उभयतां दुःखानें हवालदील होत. मी तापानें फणफणत असतां मावशी ढुंकूनहि मजकडे पहात नसे. सांजसकाळ तुळशीबागेंत जाऊन लहानमोठी खरेदी तिनें चालविली होती. उलट श्रीमंतीचा बडेजाव मारून ती आईपुढें संपत्तीचें सकाळसंध्याकाळ प्रदर्शन मांडून तिचा वेळहि घेत असे. दोन दिवसांनीं माझी चुलताचुलती, चुलतभाऊ असे येऊन थडकले. ते जुन्नरहून घरची बैलगाडी घेऊन आले होते. आमच्या भाड्याच्या घरांत त्यांचे बैल बांधण्याची सोय होईना. रस्त्यावर गाडी सोडून ठेवूं देईनात म्हणून ते गरम झाले, घरमालकाशीं व कामिटीच्या शिपायांशीं त्यांनीं हुजत घालून पाहिली, परंतु कांहीं जमेना. तेव्हां गाडीबैल सोडण्याची सोय पाहण्यांतच त्यांचे तब्बल दोन तास गेले. त्यांच्याबरोबर एक गृहस्थ व एक पोक्त बाई असे दोघे पाहुणे होते. त्यांशिवाय एक गाडीवान व एक गडी इतकी मोजकी मंडळी होती. गाडीबैलांची व्यवस्था लावल्यावर ते लवाजम्यानिशीं घरीं परत आले. चाबूक, बैलाच्या शिवाळा, घुंगुरमाळा, गाडीचा नळा, भाकरींचें गांठोडें, गोणपाट आणि कांबळें असे जिन्नस खालीं ठेवण्यास गड्यास त्यांनीं खुणावलें व माझें आंथरूण गोळा करून मला जागा करून द्यावी लागली. हुश्श् करून त्यांनीं डोक्यावरचा रुमाल व अंगांतला लांडा कोट काढला व 'या पांडोबा बसा. हें आमच्या पुतण्याचें घर, तेव्हां तुम्हांला संकोच वाटण्याचें कारण नाहीं.' असें बरोबरच्या गृहस्थास ते म्हणाले. चुलत्यांना भेटण्यासाठीं माझी आई आशेनें बाहेर येऊन अंधेरांत

उभी राहिली होती. तरीहि चुलत्यांचें लक्ष तिच्याकडे अगर माझ्याकडे गेलें नव्हतें. तेव्हां ती म्हणाली 'पाह्यलीं ना ! बाळाची स्थिति काय झाली आहे ती !' 'हूं ! मी आतां सगळं पाहतों. माझं म्हणणं असं कीं, आतां नाहींतरी रंगूबाईंना दाखवण्यासाठीं मोठ्या इस्पितळांत जायचंच आहे. तेव्हां बाळालाहि घेऊन जाणार आहें. अनायासें घरची गाडी आहे. तुम्ही बरोबर चला. प्रकृति दाखवूं बरं. पांडोबा उठा, तुम्ही आपल्या कामाला लागा. हे आमच्या गांवचे कुलकर्णी आहेत. त्यांना पुणें पाह्यचं होतं. आमच्या मुलाचे डोळे बिघडले आहेत. त्याला आरशी घेऊन द्यावयाची आहे. या शेजारच्या रंगूबाईच्या पोटांत कसलीशी गांठ झाली आहे. त्यांना मोठ्या डॉक्टरला दाखवायचं आहे. अनायासें घरची गाडी निघत होती, चला म्हटलं बरोबर ! बाकी मी म्हटलं कीं, तुम्ही माझ्याबरोबर येताहां, पण माझ्या दाव्याच्या पुराव्याच्या तारखा या सोमवारपासून लागल्या आहेत. काम जर चाललं तर एक महिना सतत काम चालेल. मला जेवण्याससुद्धां फुरसत मिळणार नाहीं. खरंच आहे ! उद्यां माझे दहा साक्षीदार येऊन उभे राहतील त्यांची व्यवस्था तरी इथंच आपल्याला करावी लागेल ना !' चुलत्यांचा हा पोक्त विचार ऐकून मला त्या क्षणींच पाळीचा दिवस नसतांहि घडघडून हींव भरलें. माझ्या घरांत जमलेल्या पाहुण्यांपायीं होणारी लयलूट पाहून माझें धैर्य खचत होतें. त्यांत चुलत्यांचा परिवार—बरोबर आणिलेला व पाठीमागून येणारा पाहून मी हवालदील झालों. यांचा असाच कांहीं दिवस तळ पडला तर मीच काय पण माझ्या कुटुंबांतलीं सर्वच माणसें, दाणागोटा नाहींसा होऊन भुकेनें मृत्युमुखीं पडतील, या धास्तीनें माझ्या तोंडचें पाणी पळालें. चुलत्यांनीं बरोबर जोंधळ्याचें एक पोतें आणलें होतें. तेव्हां मला उघडपणें त्यांच्या पाहुण्यांना व गड्यांना खानावळींत जाण्यास सांगतां येईना. त्या वेळची पुण्याची महागाई प्राणिमात्राच्या धीराची परीक्षाच पहात होती. दुधाचा भाव दोन शेर तर तांदुळाचा दीड शेर अशा कडाडलेल्या भावामुळें उणींपुरीं पंचवीस माणसें माझ्या येथें तळ देऊन बसलीं असतां माझी काय स्थिति झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. मला डॉक्टरांनीं दुधावर राहण्यास सांगितलें होतें. पण महागाईचें

दूध परवडत नव्हतें; ही खरी गोष्ट इतरांपासून लपवून ठेवण्यासाठीं 'मला दूध आवडत नाहीं' असें म्हणून मी उपाशीं राहत असें, त्याच माझ्या घरांत सकाळसंध्याकाळ नुसत्या चहापायीं दोन रुपये दुधांत खर्च होऊं लागले. तशांत रंगूबाईंना दूध आणि फळें यांशिवाय दुसरें कांहींच खावयाचें नव्हतें. तिला रोजचें दीड रुपयाचें दूध पुरें पाडीत असतांहि 'घरच्या म्हशीच्या दुधाशिवाय व्यर्थ आहे!' असें म्हणत नाकतोंड मुरडीत तें ती गट्ट करी खरी, पण शक्तीबाहेर पाहुण्यांची बरदास्त योग्य प्रकारें ठेवल्याचें फुकें समाधानहि तिनें आमच्या वांट्यास येऊं दिलें नाहीं. माझ्या तान्ह्या मुलाला याच वेळीं दूध पचेनासें झालें म्हणून त्याला अन्न देऊं लागलों. आई, बहिण व बायको यांनीं चहा सोडण्याची याच वेळीं शपथ घेतली. तरी सुद्धां दुधाचा पुरवठा होईना. घरांतल्या मंडळींनीं चहा सोडला तरी आम्हांला आणखी दोन वेळां चहा घेण्यास मुळींच हरकत नाहीं असें थट्टेवारी बोलणारी पाहुणेमंडळी, काकूंच्या हातचा चहा चांगला होतो, अशी स्तुति करून खरोखरच तीन वेळां चहा घेऊं लागलीं. पुण्याच्या पाण्याला गोडी फार, त्यामुळें अन्नाला चव चांगली व हवेमुळें क्षुधा चांगली लागते, असे आपापसांत आग्रहाचे शब्द बोलून सांजसकाळ अन्नाचा फन्ना उडविण्याचा त्यांनीं जणूं चंगच बांधला होता. पुण्यानें आपली हवापाणी कशी काय आहे तें यांना एकदां दाखवावेंच असे सूडाचे विचारहि माझ्या मनांत येऊं लागले. एका आठ दिवसांतच माझी आजपर्यंतची पोष्टाच्या बँकेंतली शिल्लक खलास झाली. यापुढें सौभाग्यवतीच्या हातांतल्या पुरणाच्या पाटल्या, आईच्या हातांतली मोहरेची आंगठी, तान्ह्या मुलाच्या हातांतली बिंदली असे बाजारांत पाठविण्याच्या दागिन्यांचे नंबर आम्ही तात्पुरते ठरविले, पण त्यानंतरचेहि नंबर काढावे लागले तर माझी बाजाची पेटी, लग्नांत अहेरांत मिळालेल्या चांदीच्या फोटो-फ्रेमपासून तों अंगांत असलेला सद्रा आणि एक कोट-टोपी यांशिवायच्या जिनसांची यादी मीं आपल्या मनाशीं योजून ठेविली होती.

माझें घर म्हणजे लग्नघरच झालें. पाहुण्यांच्या गर्दींत माझें दुखणें गरीब नवरीप्रमाणें कोठच्याकोठें लपून गेलें. सकाळसंध्याकाळ भटारखाना पेटलेला

असे. शिवाय भाकऱ्यांची चळत बडवतांना माझ्या बहिणीला स्वयंपाकघरांतून बाहेर पडायला वेळ होत नसे, तर अतिथिधर्म, पतिव्रताधर्मासमान मानणाऱ्या आमच्या कुटुंबाचे तब्बल आठ तास जोंधळे खरडण्यांत जात. पाहुणे मंडळींचीं धुणीं धुणें, आल्यागेल्याला चहा देणें यांपुढें तिला जेवणास सुद्धां फुरसत सांपडत नसे. वृद्ध मातुश्रींना मावशींनीं लग्नाच्या कामांत राहून ठेविलें होतें, तर दुसरी बहिण जमदग्निस्वरूपी यजमानांची मनधरणी करण्यांत व्यग्र असे. परिणाम असा झाला कीं, माझें औषध आणण्याला, तें वेळेवर मला देण्यास, व माझ्या खाण्यापिण्यांची वास्तपुस्त करण्यास, कोणासच फुरसत मिळत नसे. आणि खरें पाहिलें तर माझ्यावर जें हें नवें संकट कोसळलें होतें त्यापुढें माझें दुखणें मीं पार विसरून गेलों होतों. फक्त माझें दुखणें मात्र मला विसरलें नव्हतें. माझ्यासाठीं आईनें एकादें संत्रें, मुसुंबें आणलेंच तर तें खाण्यासाठीं माझ्याभोंवतीं भाचे, चुलतभाऊ व मावसबहिण यांचा गराडा पडे. तेव्हां मुलांना एकेक फोड देतांहि माझ्या वांटयास कांहींच राहत नसे. लहानशा घरांत पाहुण्यांच्या धबडग्यांत पाऊल ठेवण्यासहि जागा नव्हती, तर माझें आंथरूण कसें मावणार? म्हणून मी वळकटीच्या कोंपऱ्यावर बसूनच दुखणें काढूं लागलों. मुलाबाळांच्या दांडगाईकल्ल्यांत माझें कण्हणें कधींच कोणांस ऐकूं येईनासें झालें. मी कल्ल्यानें इतका वैतागलों कीं, ताप असतांना सुद्धां मी बाहेर अंगणांत बसूं लागलों. आमच्या बहिणीचीं मुलें बापाप्रमाणेंच तापट, आणखी बापाइतकींच आजोळच्या मंडळीवर प्रेम करणारीं. तेव्हां बारीकसारीक खेळणीं काबीज करून त्यांनीं माझ्या कच्च्याबच्च्यांस केव्हांच नागविलें होतें. माझ्या पश्चात् यांना नात्याचीं लहान मुलेंच काय पण मोठालीं माणसेंहि अशींच लुबाडतील, या उद्वेगानें माझ्या रागावर विरजण घातलें. पण त्यांना गुरांसारखें बडविण्याचा त्यांनीं जेव्हां सपाटा चालविला, तेव्हां माझ्याच्यानें राहवेना. मी त्यांना रागें भरण्यास आणि आमच्या मेहुण्यांनीं तें ऐकण्यास एकच गांठ पडली व पुढें जो गहजब उडाला तो सांगतां पुरवत नाहीं.

त्यापुढें माझें एकादें मूलच काय पण तिन्ही मुलें, मारांत ठार झालीं असतीं तरी तें दुःख कांहींच नव्हतें. मेहुण्यांनीं माझी, माझ्या आईची,

बहिणींचीच काय पण ओळख नसलेल्या माझ्या सासऱ्यांची व कधींहि न पाहिलेल्या माझ्या दिवंगत वडिलांची अशी निर्भर्त्सना चालविली कीं, त्यामुळें आमचा वाडा दणाणून गेला. त्यांनीं आपल्या मुलांना एकापाठीमागून एकास पकडून बेशुद्ध होईतोंवर झोंडपलें आणि आसन्नमरण अशा त्यांना माझ्या पुढें टाकून म्हणाले, 'बाळासाहेब, तुम्ही यांच्या आतां माना कापा. ती कुठं आहे? बघ म्हणावं माहेरचं सुख! कुठं आहे!!' आईच्या तोंडचें पाणी पळालें, तिनें जावयांपुढें पदर पसरला, नाकधुऱ्या काढल्या, पण त्यांचा कोप अनिवार होऊं लागला. ते घरांतून निघून जाऊं लागले. जातांजातां ते म्हणाले, 'एक पळहि आतां इथं राहायचं नाहीं, मी गाडी आणण्यास जातों, तयारी करा!' उत्तराची वाट न पाहतां आमचे मेहुणे निघून गेले व पांच मिनिटांत दोन टांगे घेऊन परत आले. त्यांना पहातांच मी त्यांच्या पायांस मिठी मारली, कृतापराधाबद्दल काकुळती केली, पण व्यर्थ. माझे प्राण हरण करणाऱ्या यमाला सुद्धां कींव आली असती व बायकोची मदत न घेतां मी मृत्यूपासून सत्यवानाप्रमाणें सुटका करून घेतली असती; पण मेहुणे जास्त करारी ठरले. त्यांनीं मला जोरानें लोटलें; मीं जमीनीवर धाडकन् पडलों. त्यांनीं उघडींनागडीं मुलें उचललीं, टांग्यांत भरलीं, तसेंच सामानसुमान टांग्यांत भरलें, 'ट्रंका स्टेशनवर भरूं' असें म्हणाले. माझी बहिण थरथर कांपत आणि आसवें गाळीत घरांतून निघाली. माझ्याकडे तिनें नुसतें पाहिलें ऐवढेंच. तिची-माझी शेवटचीच भेट होती. मी दुखण्यांतून वाचलों तरी मेहुण्यांच्या तावडींतून ती जिवंत राहणें अशक्य वाटूं लागलें. गाडीला तब्बल सहा तास अवकाश होता, तेव्हां कांहीं फराळाचें तयार करून घेऊन माझी आई व बहिण स्टेशनवर गेल्या. पण असें समजलें कीं, त्या नराधमानें फराळासकट डबे आगगाडीखालीं भिरकावून दिले. घरीं आल्यावर आईनें आमच्या कुटुंबावर आग पाखडण्यास सुरुवात केली. तिला चुलतीचें साहाय्य मिळालें व बरेच दिवस थंडावलेलीं सासवासुनांचीं भांडणें सुरू झालीं. या धुमश्चक्रीमुळें तर मला दुखण्यांतून बरें होऊं नये असें वाटूं लागलें. चुलत्यांनींहि बायकोस फूस देण्याबद्दल माझी बरीच निर्भर्त्सना केली. सर्व बाजूंनीं झोडणाऱ्या संकटांच्या

पावसाचा प्रतिकार तरी मी काय करणार आणि दुर्दैवाला हात लावण्यापेक्षां दुसरें उत्तर तरी मी काय देणार होतों ?

याच सुमारास माझे श्वशुर आले. त्यांचें आणि त्यांच्या मुलीचें खलबत झालें. काय झालें तें मला समजण्यास मार्ग नव्हता. कारण पाहुणे आल्यापासून माझी आणि माझ्या बायकोची दृष्टादृष्टहि झाली नव्हती. तरी आईनें तिच्यावर नणंदेची चहाडी माझ्याजवळ केल्याचा आरोप सिद्ध केलाच होता. त्यांचें काय बोलणें झालें तें कळलें नाहीं; पण मला गांवीं घेऊन जाण्याचा त्यांनीं आग्रह चालविला. माझ्या चुलत्यांनाहि तसाच आग्रह करणें भाग पडलें. त्यांच्या कामाची पुढची तारीख पडल्यानें ते जाण्यास निघाले. तेव्हां ते म्हणाले, ‘ बाळ, येतोस कां जुन्नरला ? हवाफेर होईल ! बरं वाटेल. ऐकलं का ? (भार्येस उद्देशून) मी म्हटलं बाळाला म्हणतों आहें चल बरोबर. अनायासें घरची गाडी आहे. चला म्हणतों. ’ काकूंच्या स्पष्टोक्तीनें उत्तर काय द्यावें या पेचांतून मला सोडविलें. ‘ कुठं बोलणं झालं आहे ? प्रकृती ही या थराला गेलेली ! खेडेगांवांत नाहीं डॉक्टर ना वैद्य ! ! नसतं अपेशाला कारण ! ! ! आला म्हणून माझं काय जातं ? पण त्याची स्थिती तर बघा काय झाली आहे ? उगीच बोलायचं नाहीं. आपण आल्यापासूनसुद्धां अशक्तता जास्तच वाढली आहे. ’ ‘ मग बाळ, असं कर. तुला बरं वाटलं म्हणजे हवापालट करण्यास ये. बरं, आम्हीं जातों !’ चुलते परिवारासह गेले. माझें दुखणें निम्में बरें झाल्यासारखें वाटून मला हुशारी आली. मुसलमान गुंडांच्या हल्ल्यांतून बाहेर पडल्याप्रमाणें सगळ्यांनाच हायसें झालें. सासऱ्यांनीं आग्रह फार केला. परिस्थितीहि अशी येऊन ठेपली होती कीं, आपणहून श्वशुरांची मदत मागणें मला जरूर होतें. तेव्हां वरकरणीं आढेवेढे घेतां मी त्यांच्या बेतास रुकार दिला. व मी, माझे श्वशुर, कुटुंब व मुलें सुखरूप सासुरवाडीस येऊन पोहोंचलों.

माझी सासुरवाडी एका जिल्ह्याच्या गांवींच, रेल्वे स्टेशन असलेल्या शहरींच होती. तेथें गेल्यावर मला पूर्ण विश्रांति मिळेल, औषधोपचारानें बरें वाटेल अशी मला आशा होती. पण अनुभवानें ती फोल ठरली. माझे श्वशुर गांवांतील प्रतिष्ठित, तेव्हां त्यांच्या काळजींत हिस्सेदार होण्याची दिखाऊ चढाओढ करणारे आप्तस्नेही पुष्कळ. तेव्हां माझ्या नातेवाइकांच्या अव-

हेलनाचा तर सासुरवाडच्या मंडळीच्या फाजील आस्थेचा प्रकार परिणामाच्या दृष्टीनें सारखाच ठरला. एका मोठ्या दालनांत अर्ध्या भागाला पडदा लावून आंतल्या बाजूस माझा निजण्याचा पलंग व बाहेरच्या बाजूस येणाऱ्या-जाणाऱ्या माणसांना बसण्यासाठीं जागा केली होती, व माझे श्वशुर तेथेंच बसत. दालनाच्या लगत असलेल्या माजघराचें दार नेमकें माझ्या पायगतीच आलेलें होतें. पुरुषमंडळी दालनांतील बाहेरच्या बाजूस बसत, तर बायका मंडळी माजघराच्या दारांतूनच समाचार घेत. म्हणजे ह्या विचारपुशीचा आंतून बाहेरून असा माझ्यावर सारखा मारा होत होता. माझे दुखण्याशीं निकरानें लढणाऱ्या मनाला निराशेच्या भालाफेंकीनें घायाळ करून खालीं पाडण्याचा जणूं ज्यानेंत्यानें विडाच उचललेला होता. बाहेर आलेली पुरुषमंडळी, आमच्या श्वशुरांना ज्या निरवानिरवीच्या सल्ल्यानें धीर देत तें ऐकून बऱ्याच वेळीं मला घोंगडीवर उतरण्याची वेळ अगदीं समीप आली असें वाटे. 'हूंः सखूचं नुकतं असंच झालं! तात्यासाहेब, तुमच्यावर हा कठीण प्रसंग आहे,' असें बोलणाऱ्यानें माझ्या मेहुणीचा नवरा लग्नानंतर एका वर्षांत क्षयानें मेला या हकीगतीची आठवण देऊन, माझें दुखणें व त्याचा परिणाम याचा तर चित्रपट माझ्या डोळ्यांपुढें उभा केला. आंत अंथरुणाजवळ समाचारास लोक येत. 'खोकला आहे का?' म्हणून खोदूनखोदून विचारीत व 'नाहीं' असें म्हटलें तरी खोकला सुरुवातीला येतोच असा नेम नाहीं, असें सांगून क्षयाच्या धास्तीपासून बळेंच दूर राहाणाऱ्या माझ्या निराश मनाला रोगाची मूर्तिमंत ओळख पटवून देत असत. 'खाकरा एकदां तपासा, एरव्हीं ताप असा सारखा राहणार नाहीं,' असें सांगून नसत्याच काळजीची टोंचणी माझ्या काळजाला चोचावीत ठेवीत. त्या गांवांत माझे लांबचे एक चुलते होते. ते नेमानें समाचाराला येत. 'त्याचा बाप असाच तिशीच्या आंत क्षयानें गेला,' असें त्यांनीं तात्यासाहेबांना सांगून त्यांच्या काळजाचें पाणीपाणी केलें. त्यांची सांजसकाळ खेप असायचीच. चहाच्या रतिबामुळें ते येत असावेत असा आम्हीं तर्क केला होता, पण त्यांच्या येण्याचें कारण त्यांच्या तोंडांतून अचानक बाहेर पडलें. 'मुलीचं लग्न जमवून बसलों आहें. गेल्या महिन्यांत घरांत प्रसूतीची अडचण होती. मुहूर्त धरतां येईना. आतां बाळाच्या दुखण्या-

मुळें कसं काय करावें हा प्रश्न पडला आहे. नाहींतर शेवटीं विचार केला कीं, लांब गांवीं जाऊन कार्यभाग उरकून परत येऊं. मग येथें आल्यावर आहेच!' औषधोपचाराचें निष्फलत्व सिद्ध करणाऱ्या स्वानुभवाच्या गोष्टीहि कित्येक-जण सांगत. माझ्या सारखेंच दुखणें, पुण्यामुंबईचे डॉक्टर थकले, पांचगणी-देवळालींत राहून पैसा खर्च केला. पण शेवटीं प्राणी दगावल्याचीं निदान त्या प्रांतांतलीं तेवीस उदाहरणें नित्य उजळणीनें मला पाठ झालीं होतीं; त्या सर्वांचें निदान महादेव डोंगरा यानें सांगितलें तें कसें खरें ठरलें तेंहि मला पाठ झालें होतें. त्याच महादेव डोंगरा ( वय सुमारें ८० ) वैद्यास बोलावून माझ्या दुखण्याचा सोक्षमोक्ष लावून घ्यावा असा सर्वांचा आग्रह पडला. मुलींची व नातवंडांचीं पुढें काय व्यवस्था आहे? असा निष्ठुर सवाल कोणी श्वशुरांना करीत तर कांहीं युक्तीनें तीच गोष्ट सुचवीत. बायकामाणसें समाचाराला येत तीं तर डोळ्यांस चारदोन वेळां पाणी काढल्याशिवाय 'कसं आहे?' असें सुद्धां विचारीत नसत. बायकाहि आपल्यापरी गांवांत घडलेल्या व माहीत असलेल्या अपमृत्यूंचीं उदाहरणें आमच्या सासूबाईंना व कुटुंबाला सांगून पुढें वाढून ठेवलेल्या दृश्यासाठीं तयार करीत होत्या. याचा परिणाम असा होई कीं, त्या दोघींच्या डोळ्यांचें पाणी कधीं खळलेंच नाहीं. डॉक्टर दोन वेळां पाहण्यास येत व अलीकडे तर त्यांनीं इंजेक्शनें देण्यास सुरुवात केली होती, हें पाहून बऱ्याच नातेवाईकांना माझी कींव आली. भिमाताई (सासूबाई) 'कशाला ही यातायात तुमचे पुरुष करितात? डॉक्टरांना पैसे भरणें म्हणजे पाण्यांत टाकण्या-सारखें आहेत. जिवाला सुयांनीं भोंसकून कशाला थोडक्यासाठीं त्रास देतां? टोंचून टोंचून कां आयुष्य कोणीं वाढवितो? वरची दोरी बळकट असेल तर ना सगळे हे उपाय?' असें त्या म्हणत. असे एकनादोन प्रकार. माझीहि आतां खात्री झाली कीं, मी या दुखण्यांतून उठत नाहीं. गेले चार दिवस माझ्या अंगांतून ताप निघालाच नव्हता. माझी तळमळ सारखी चालली होती. माझ्याभोंवतीं आळीपाळीनें पहारे ठेवून माणसें जागत बसलीं होतीं. सर्वा-नांच ती वेळ समीप आली असें वाटलें. मी तर गुंगींतच होतों. तशांत माझ्या अंगाला दरदरून घाम फुटला. मी निपचित पडलों होतों. हें पाहून कुटुंबानें हातापायांवरून हात फिरवला. 'आई, तात्यांना हांका मार ग,' असा तिनें

विपलाप काढतांच बाहेर जागत बसलेलीं माणसें आंत आलीं. 'हं झालं,' असे ज्यानें त्यानें सुस्कारे सोडले. 'आतां डॉक्टरांना बोलावण्यांत काय अर्थ आहे!' अशी सल्लाहि श्वशुरांना बऱ्याच जणांनीं दिली. पण तशा अवेळीं माझा मेहुणा वायुवेगानें डॉक्टरांना घेऊन आला. तोंवर जमलेल्या मंडळींनीं उपरणीं डोक्याला गुंडाळून ठेविलीं होतीं. डॉक्टरानें शेवटचें इंजेक्शन दिलें, मला धुगधुगी आली. मी 'पाणी' असे हळू शब्द उच्चारले. डॉक्टरांच्या चेहेऱ्यावर आशा दिसूं लागली. भोंवतालीं जमलेल्या लोकांचे चेहेरे मात्र विनाकारण होणाऱ्या दिरंगाईनें उतरले. पांच मिनिटांनीं डॉक्टरांनीं दुसरें इंजेक्शन दिलें. 'समरप्रसंग' पार पडला, आतां धास्ती नाहीं, असें डॉक्टरांचें आश्वासन ऐकून मला किती धीर आला असेल बरें?

दोन दिवसांनीं मी डॉक्टरांना गळ घातली कीं, मला हॉस्पिटलमध्यें न्यावें. सर्वांचा विरोध असतांहि मीं इस्पितळांत गेलों. तेथेंहि संध्याकाळीं समाचारास मंडळी येत. तेव्हां संध्याकाळ ही माझी झोंपेची वेळ आहे असें मीं जाहीर करून टाकलें व समाचार काढणाऱ्यांपासून मीं आपला अशा युक्तीनें बचाव करून घेतला. अवघ्या पंधराच दिवसांत मी पूर्ण बरा झालों व इस्पितळांत येण्याची बुद्धि मला अगोदर कां सुचली नाहीं याचा खेद वाटला.

---

## मराठी व संस्कृत

लेखक : **गोविंद कृष्ण मोडक**, बी. ए.

[ यांचें मूळ गांव पाली, सं. भोर, असून हे सध्यां न्यू इंग्लिश स्कूल, पुणें, येथें संस्कृत शिक्षक आहेत. यांनीं इंग्लिश व मराठी या दोन्हीहि भाषांत बरींच पुस्तकें लिहिलीं असून त्यांत, १ धातुकल्पद्रुम, २ समास-मयूख, ३ भाषान्तर-मयूख, ४ रामायण-कथा-संदोह, ५ रामरक्षा (मराठींत भाषांतर), ६ संस्कृत अभ्यास, ७ स्तोत्र-चिंतामणी, Matriculation Sanskrit Guide वगैरे विशेष प्रसिद्ध होत. ]

१. **विषयाचें स्वरूप**—आज आपण उच्चनीच शाळांमधून मराठीचा अभ्यास चालू व्हावा म्हणून खटपट करीत आहों; व तदनुसार अभ्यासाचा कांहीं उपक्रमहि झाला आहे. अशा वेळीं असा प्रश्न उद्भवला आहे कीं,

मराठीचे अभ्यासाकरितां लागणारा वेळ कोठून आणावा? इंग्रजी ही तर राजभाषा व कांहीं अंशानें देशांतील व्यवहारभाषा असल्यानें अभ्यासाई आहेच. संस्कृत ही आपल्या पूर्वपरंपरेची व धर्माची भाषा म्हणून शिकली पाहिजेच. या दोन भाषांचे भरतीस मराठी तिसरी भाषा शिकावी, असा सरसकट नियम केल्यास तो साधारण विद्यार्थ्यास जडच जाणार. करितां सहजच मराठीस जागा देण्यासाठीं पूर्वोक्त भाषांतील एक गळणार. ती कोणती? इंग्रजी राजभाषा व व्यवहारभाषा म्हणून उपेक्षणीय नाहींच. तेव्हां गळण्याची पाळी येणार ती संस्कृतावर; व तदनुसार शाळांमधून हल्लीं मराठी ही संस्कृताबरोबर वैकल्पिक भाषा म्हणून ठरविली गेली आहे. ती अशी वैकल्पिक योजिली असली तरी, मातृभाषात्वामुळें आपणां मराठी बोलणारांस ती संस्कृतापेक्षां बरीच सोपी जात असल्यानें व सामान्य विद्यार्थ्यांत दिवसानुदिवस शारीरिक रगेबरोबर मानसिक रगहि घटत चालली असल्यानें, संस्कृताचे स्थानीं मराठीचा अभ्यास वाढत्या प्रमाणांत झपाट्यानें सुरू होत आहे. आतां मराठी ही बऱ्याच अंशानें संस्कृतोद्भव असल्यानें तिचे अध्ययनास संस्कृताची जोड असावी कीं काय? मराठीचे समीचीन उपयोगास संस्कृताचा अभ्यास आवश्यक मानावा कीं काय? मराठी भाषा घेणारानें सुद्धां मराठीचे अभ्याससौकर्यासाठीं, मासिका-परीक्षेस लागते इतक्या संस्कृताचें अध्ययन करावें कीं काय? असे प्रश्न उभे राहिले आहेत. या प्रश्नांवरून मराठी जनतेस असा प्रश्न सुचतो कीं, मराठीमध्यें अभिजात गणल्या जाणाऱ्या विद्वानांचा व्यवहार अथवा विचारविनिमय, लेखनवाचनादिद्वारां चालविण्यास, संस्कृताध्ययन अपरिहार्य आहे काय? या प्रश्नाचें उत्तर हेंच प्रस्तुत विषयाचें येथें चिंतलेलें स्वरूप होय. पुढील ओळींत आपण विचार करणार तो अभिजात व्यवहारास पुरेसें ज्ञान होण्यास संस्कृताध्ययनाची जरूर आहे काय? असल्यास किती?—अशा प्रकारचा होय. मराठीचे यथार्थ सर्वांगीण उपयोगास संस्कृताची अपेक्षा आहे म्हणणें म्हणजे, मराठींत व्यवहारदृष्ट्या कांहीं उणीवा आहेत, असेंच म्हणणें होय. या उणीवा कोणत्या यांचा विचार आतां करूं.

२. **वर्तमान मराठींतील मुख्य उणीव व तत्परिहार**—वर्तमानकाळीं मराठींत बऱ्याच उणीवा आहेत. ती लिहिणें, छापणें, वाचणें, इंग्रजीसारख्या

परकीय भाषेंतील विचार तींत व्यक्त करणें, प्रत्यहीं जगाचे व्यवहारांत उत्पन्न होऊन परिणत होत असलेल्या शास्त्रांतील प्रमेयें तिनें बोधित करणें, जगाच्या वाढत्या व्यवहाराबरोबर नवनव विचार व्यक्त करणें इत्यादि अनेक बाबतींत मराठींत पदोपदीं उणीवा भासतात. या विविध उणीवा पाहून आपण निराश होण्याचें मुळींच कारण नाहीं. इंग्रजी ही सांप्रत आदर्शभूत प्रगल्भ भाषा म्हणून गणली जाते; पण तींत (spelling = ) वर्णविन्यासाचे बाबतींत किती गोंधळ व अडाणीपणा प्रायः प्रतिशब्द भरला आहे, हें पाहिलें म्हणजे मराठींतील वैगुण्यें पाहून तिच्या अभिवृद्धीविषयीं साशंक होण्याचें कारण नाहीं. तरी पण दोष ते दोषच. ते मराठींतून काढून टाकण्यासाठीं आपण यथाशक्ति झटलेंच पाहिजे. वर्तमानकालीन मराठी लेखकास प्रतिक्षण भासणारी अडचण म्हणजे तींतील शब्दांची टंचाई. शास्त्राचे प्रगतीबरोबर व व्यवहाराच्या वाढत्या संकीर्णतेबरोबर असंख्य नवीन कल्पना नित्य प्रादुर्भूत होत आहेत. त्या व्यक्त करण्यास शब्द कोठून आणावे ? ते लिहावे कसे, किंवा वाक्यांत बसवावे कसे, ही अडचण मुळींच नाहीं. लेखन व वाक्यरचना या गोष्टी मराठींत बऱ्याच स्वकार्यक्षम अशा आहेत. मुख्य अडचण आहे ती शब्दांचीच होय. ती दूर न झाल्यास तेवढ्यापुरता मराठीच्या उत्कर्षास प्रतिबंध होणार. ही शब्दांची तूट कशी भरून काढावी ? याला दोन उपाय सुचविण्यांत येतात. ( १ ) परकीय शब्द यथालब्ध, किंवा मराठी पोषाख देऊन घ्यावे; किंवा ( २ ) तत्पर्याय म्हणून नवीन शब्द बनवावे. पैकीं पूर्वोक्त मार्ग स्वाभिमानास पारखा म्हणून प्रायः त्याज्यच होय. स्वाभिमानानें किंवा स्वराष्ट्राभिमानानें विशेषनामांची उलथापालथ होत असलेली आपण सर्वत्र पाहातों. रशियाच्या राजधानीचें नांव Petersberg हें बदलून त्याचे स्थानीं Petrograd प्रतिष्ठित झालें आहे. यावनी धर्माच्या फाजील अभिमानानें आपल्या पवित्र वाराणसी क्षेत्राचें बनारस व प्रयाग-राजाचें अलाहाबाद, अशीं नामांतरें झालीं आहेत. कांहीं नामांतरांचे मुळाशीं स्वाभिमान नसला तरी, कांहीं अन्य तामसी हेतु सांपडेल. आपण ज्यांत राहतों तें जग सांप्रत काळीं तरी तामसी विचारांनीं पूरित व प्रेरित असेंच आहे. आपणांस त्यांत टिकाव धरणें तर थोडेंसें तामसीच बनलें पाहिजे.

करितां नवीन कल्पना दर्शविण्यास इंग्रजी शब्द न योजितां यावच्छक्य सोईवार स्वकीय शब्द बनवून त्यांचीच योजना करावी. मात्र या अभिमानाचे भरांत मराठींत रूढपूर्व असलेल्या परकी शब्दांचा त्याग सहसा करूं नये. अशा त्यागापासून प्राकृत जनांचा घोंटाळा व गैरसोयच जास्त होणार. करितां स्वाभिमानाची दृष्टी नवीन शब्द बनवितांनाच विशेष जागृत ठेविली पाहिजे. हे नवीन शब्द बनविण्यास आपण कोणत्या भाषेची मदत घेणार ? इंग्रजी भाषा Latin वा Greek या भाषांतून शास्त्रीय वा तदन्य शब्द बनवून घेते; तसें मराठीनें लागणारे शब्द परंपरापूत अशा आपल्या संस्कृत भाषेंतून बनवून घ्यावे. Theosophy, Bicycle, Photograph इत्यादि असंख्य इंग्रजी शब्दांस लॅटिन किंवा ग्रीक याच भाषा आधारभूत आहेत. मराठीचें शब्ददारिद्र्य नाहींसें करण्यास जर संस्कृत भाषेचा आधार आपण घेणार, तर तदर्थ संस्कृताचें अध्ययन क्रमप्राप्तच ठरतें. **अशा रीतीनें मराठीचे उत्कर्षास येणारा मुख्य प्रतिबंध म्हणजे शब्दांची टंचाई; ही निवारण्यास संस्कृताध्ययन हा उपाय समीचीन वाटतो.** शब्दवृद्धीशिवाय मराठीचे उत्कर्षाचे मार्गांत येणारी दुसरी उणीव कोणती याचा आतां विचार करूं.

३. **परंपरापरिचय व तत्साधनोपाय**—मराठींतील पुष्कळशा म्हणी, दृष्टान्त, प्राकथानकें हीं संस्कृतांतून आलेलीं आहेत—कांहीं वेदांतून, कांहीं पुराणांतून, कांहीं शास्त्रांतून इ०. अशा म्हणी, दृष्टान्त इत्यादिकांनीं भाषेस प्रौढी व अलंकृती प्राप्त होते व या दोन गोष्टी भाषेच्या उत्कर्षास इष्टच आहेत, असेंच कोणीहि म्हणेल. करितां म्हणी इत्यादिकांचे यथार्थ ज्ञानासाठीं संस्कृताचें ज्ञान अवश्य आहे. कांहीं म्हणी, आपला अर्वाचीन इतिहास किंवा इतर गोष्टी यांपासून आलेल्या आहेत. त्या येथें विचारणीय नाहींत. 'आधीं होता वाघ्या, मग झाला पाग्या' इत्यादि म्हणी जशा इतिहासपरिचयानें ज्ञेय आहेत तशा 'नरो बा कुंजरो बा,' 'वादे वादे जायते तत्त्वबोधः', 'नेति नेति,' 'कर्मण्येवाधिकारस्ते,' 'भवति न भवति' इत्यादि म्हणी वा वाक्यें संस्कृतपरिचयानेंच ज्ञेय आहेत. यांचा अर्थ समजण्यास व मराठींत त्यांचा यथावत् प्रयोग करण्यास संस्कृताचें ज्ञान अपरिहार्य आहे.

हीं वाक्यें कोणीं, कोणत्या प्रसंगीं, कोणत्या अर्थानें प्रथम योजिलीं, हें कळल्याशिवाय त्यांचा यथार्थ प्रयोग नेहमींच करतां येईल असें नाहीं. हें प्रसंगादिकांचें ज्ञान प्रायः संस्कृत वाङ्मयांतच आढळणार. करितां त्याशीं परिचय व तदर्थ संस्कृतभाषाज्ञान हीं उपार्जनीय आहेत. उदाहरणार्थ:– ‘ मन:पूतं समाचरेत् ’ ही उक्ति आपण मराठींत अनेकवार योजितों. पण ती प्रायः भ्रांत अर्थानें. मुळांत मन हा शब्द सदसद्विवेकबुद्धि ( = Conscience) या अर्थीं प्रयुक्त आहे व तदर्थाश्रितच या म्हणींचा प्रयोग ज्ञाते लोक करितात. पण सामान्य जनांना हा मूलार्थ विदित नसल्यानें, तें मन याचा अर्थ ‘ वाटेल तसें, ’ लहरीप्रमाणें, स्वैर, निर्विचार असा अगदीं मूलविपरीत घेतात, व तदर्थगर्भ वरील म्हणीचा प्रयोग करितात. अशा रीतीनें तज्ज्ञ व अतज्ज्ञ यांकडून केल्या जाणाऱ्या प्रस्तुत म्हणीच्या प्रयोगांत विसंवाद उत्पन्न झाला आहे. हा विसंवाद टाळणें जरूर आहे. कोणत्याहि भाषेंत अमुक शब्दाचा किंवा उक्तीचा अमुक अर्थ हें निश्चित नसल्यास, व्यवहारांत अन-वस्थाप्रसंग प्राप्त व्हावयाचा. वक्ता एका अर्थानें बोलणार, तर श्रोता दुसराच अर्थ समजणार. हें भाषाशास्त्राच्या प्रधान तत्त्वाविरुद्ध आहे. हा विरोध टाळण्यास **या म्हणी इत्यादिकांचे उद्गमस्थानांचा म्हणजे परंपरेनें संस्कृत भाषेचा परिचय अवश्य वाटतो.** या परिचयानें मराठींतील पुष्कळशा वचनांचा अर्थ यथार्थ कळून येईल व वक्ता व श्रोता यांच्यामधील अर्थ-विसंवाद टळेल. मराठींतील शब्दांचा तुटवडा व परंपराप्राप्त शब्दादिकांच्या यथार्थ ज्ञानाचा अभाव, यांचा विचार आतांपर्यंत झाला. यापुढें तिचे उत्कर्षास एतदन्य कांहीं प्रतिबंध आहे काय, हें पहाण्याकरितां तिचा स्थूल-दृष्ट्या विचार करूं.

४. **वर्तमान मराठीचा स्थूलदृष्ट्या विचार**—इतर कोणत्याहि भाषे-प्रमाणें मराठीचीं मुख्य अंगें तीन आहेत—वर्ण, शब्द व प्रत्ययादि. पैकीं **यावदुच्चार वर्ण, यावदर्थ शब्द व यावत्प्रयोजन प्रत्ययादि**, असणें याच्या योगानें भाषेच्या अर्थबोधनशक्तीस (accuracy) सूक्ष्मवेधित्व येतें. (१) मराठींत कितीतरी उच्चार असे आहेत कीं, त्यांस स्वतंत्र वर्णलेख नाहींत. चरित्र व चटणी, कल्पांत व अल्पांत, सांसारिक व फांसावर, उद्यान

व उद्यां या शब्दांचे जोड्यांत च, पूज्य आणि द्य हे लेख प्रत्येकीं दोन उच्चारांबद्दल योजले जातात. पैकीं कोणता उच्चार कोठें, कोणत्या अर्थीं किंवा शब्दांत करावयाचा, हें मराठी उपजत बोलणारास ठाऊक असल्यानें, त्यास जरी येथें अडचण भासली नाहीं, तरी इतरांस ती जरूर भासते. अशा ठिकाणीं एकाचे जागीं दुसरा झालेला ऐकल्यास, मनास कशी चीड येते हें, जेवतांना चटणी या शब्दाचा उच्चार चरित्र यांतील च-चे उच्चारानें युक्त ऐकल्यास, कोणाचेहि प्रत्ययास येईल. उच्चारांच्या मानानें हा लेखांचा कोतेपणा टाळण्यास आपणांस संस्कृताचा उपयोग प्रायः मुळींच होत नाहीं. कारण हें उच्चारांचें द्वैविध्य आपल्या पूर्वजांच्या काळीं अस्तित्वांतच नव्हतें. या लेखांनीं केवळ एकविधच उच्चार त्या वेळीं दर्शविले जात. चटणी या शब्दांतील प्रथमाक्षराचा उच्चार जो हल्लीं आपण करितों तो त्यांच्या प्रचारांत नव्हता. अर्थातच जो उच्चारच शशशृंगवत् अविद्यमान, तदर्थ स्वतंत्र लेखचिन्ह योजण्याचें त्यांस कारणच नव्हतें. सारांश, आज मराठीच्या लिपींत ज्या म्हणून उणीवा आहेत, त्या आपल्या बोलींत नवीन उच्चार प्राविष्ट झाल्यानें आलेल्या आहेत. करितां त्यांचे दूरीकरणास, म्हणजेच यावदुच्चार लेख या तत्त्वाचा निर्वाह करण्यास, संस्कृत भाषेचा उपयोग आपणांस मुळींच होण्यासारखा नाहीं. (२) यावदर्थ शब्द—हें तत्त्व अमलांत आणण्यासहि संस्कृताचा उपयोग तादृश नाहीं. कारण आपला परिचय संस्कृताशीं आहे तो केवळ मृत संस्कृताशींच होय, सजीवाशीं नव्हे; आणि कोणत्याहि इतर भाषेप्रमाणें, आपली संस्कृत भाषाहि मृत असल्यानें पर्यायशब्दांतील भेद जाणवत नाहीं. एखाद्या भाषेंतील तुल्यप्राय अर्थ व्यक्त करणाऱ्या दोन शब्दांतील भेद ज्या वेळीं कानास भासेनासा होतो, त्याच वेळीं ती भाषा मृत झाली म्हणून समजावें. तुल्यप्रायार्थक शब्दांचें हें परीक्षण म्हणजेच भाषेच्या मृतामृतत्वाची प्रधान कसोटी होय. आपल्या संस्कृतांत पर्वत या अर्थाचे वाचक अनेक शब्द आहेत. पण त्यांचे श्रवणानें एकच सामान्य कल्पना मनांत येते, भिन्नभिन्न कल्पना मुळींच उद्भवत नाहींत. याचे उलट, आपल्या जिवंत मराठींत पुत्र, मुलगा, चिरंजीव, बाळ, पोर, इत्यादि तुल्य प्रायार्थक शब्द उच्चारल्या बरोबर निरनिराळ्या कल्पना मनांत प्रादुर्भूत होतात.

संस्कृताच्या मृतत्वामुळें तिच्या शब्दभांडाराची मदत मराठींतील पर्यायशब्द-निर्माणास होणार ती एवढ्याच पुरती कीं, पुष्कळशा शब्दांचें भांडवल आपले हातीं लागेल. परंतु, त्या शब्दांच्या बरोबर (Associations =) सहचरित कल्पना प्रायः मुळींच येत नसल्यानें, त्या सर्वांची किंमत अर्थदृष्ट्या एकच. हें शब्दबाहुल्य घेऊन, त्यांतील व्युत्पत्तीस साक्षी ठेवून मिळणाऱ्या अर्थभेदास धरून पर्यायशब्दविभाग आपणांस ठरविला पाहिजे. सारांश, यावदर्थ शब्द या संबंधांत संस्कृताची मदत आपणांस अंशतः होईल, व तदर्थ संस्कृत-कोशाचा परिचय करून घेणें आपणांस हितावह होईल. (३) प्रत्यया-दिकांचा विचार केल्यास, संस्कृतापासून मराठीस मदतीची आशा विशेषशी दिसत नाहीं. धातूंस व इतर शब्दांस लागणारे प्रत्यय बहुधा त्या त्या भाषें-तच पैदा होतात; ते एक भाषा दुसरीपासून घेतां दिसत नाहींत व तसे ते घेतल्यास शोभणारहि नाहींत. घोटीव, लिखाण, चकचकाट, करमणूक, दगडी, काळसर इत्यादि मराठी शब्दांतील प्रत्यय प्रायः संस्कृतोत्पन्न नाहींत. असे प्रत्यय भाषेचे वाढीबरोबर जरूरीप्रमाणें स्वयमेव वाढत जातात. तदर्थ अन्य भाषांची मदत विशेष होत नाहीं. करितां यावत्प्रयोजन प्रत्ययादी या बाबतींतहि संस्कृत मराठीस उपकारक ठरत नाहीं.

५. **मराठीची सरशी**--येथें जातां जातां एकदोन गोष्टींचा उल्लेख करावासा वाटतो. (१) (Participle) उपाख्यात याचे बाबतींत मराठी संस्कृताहून संपन्न आहे. जातां, जातांना, जात असतां, जाणारा, या अन्योन्यभिन्नार्थक चार मराठी धातुज शब्दांस संस्कृत प्रतिशब्द केवळ गच्छत् हा एकच आहे. यामुळें संस्कृतांत उत्पन्न होणारा प्रस्तुत उपाख्याताचे अर्थबोधांतील स्थूलपणा मराठींत शिरूं शकत नाहीं. बरोबर कोणता अर्थ विवक्षित आहे, हें धातु-जाच्या प्रत्ययद्वारां मराठी सांगूं शकते, तर या बाबतींत संस्कृत भाषेस केवळ संदर्भावर अवलंबून रहावें लागतें. मराठींत येथें भिन्न प्रयोजनांचा निर्वाह भिन्न प्रत्ययांनीं होतो, तर संस्कृतांत एकच प्रत्यय, प्रयोजनें भिन्न असतांहि, अवि-शेषानें योजिला जातो. म्हणजे प्रस्तुत बाबतींत यावत्प्रयोजनप्रत्यय या तत्त्वाचा निर्वाह मराठीच्या मानानें संस्कृतांत फारच कमी होतो. जशी या विशेषांत तशी अन्यहि एका विशेषांत मराठी संस्कृताहून श्रेष्ठ ठरते. (२) संस्कृतांत

क्रियाविशेषण अव्ययें किंवा विभक्त्यंत रूपें यांवरून विशेषणें साधणें फारच थोड्या ठिकाणीं शक्य आहे; पण मराठींत हा प्रचार प्रचुर आहे. वर-वरील मुळापासून-मुळापासूनचा, मनीं-मनींचा, विहिरींत-विहिरींतील, चार वाजतां-चार वाजतांची ( गाडी ) इत्यादि ठिकाणीं मराठींतील आढळणाऱ्या सुकर विशेषणसाधनिकेस संस्कृत बरीचशी पारखी आहे. सारांश, येथें एवढेंच सांगावयाचा मतलब आहे कीं, **मराठी संस्कृताहून सर्वस्वींच हीन नाहीं; उलट काहीं गोष्टींत वरचढ आहे.**

६. **मराठीचे उत्कर्षास संस्कृताचें साह्य कसें साधावें?** अनुवाक् २ मध्यें आपण पाहिलें कीं, मराठीचे वृद्धीस शब्दांची जरूरी आहे व ती भागविण्यास आपण संस्कृताची मदत घेतली पाहिजे. तसेंच अनुवाक् ३ मध्यें पूर्ण परंपरेचें ज्ञान मिळविण्यासहि संस्कृतांतील वाङ्मयाचा परिचय अवश्य आहे हेंहि आपण पाहिलें. या दोन्ही प्रकारची मदत संस्कृतापासून मिळविण्याचे दोन मार्ग आहेत. ( १ ) संस्कृताचें यथाविधि अध्ययन व ( २ ) तद्गत वाङ्मयाचा भाषांतरद्वारा परिचय. पहिला मार्ग हा मौलिक व अप्रमादी असल्यामुळें केव्हांहि प्रशस्त होय व अभ्यासकांनीं यावच्छक्य त्याचाच आश्रय करावा. परंतु दुसराहि मार्ग अभ्यासकाचें काम यावद्व्यवहार पार पाडण्यास उपयुक्त ठरेल. बुद्धिमान् व विद्याप्रेमी लोक पहिला मार्ग अवलंबितील. त्याविषयीं येथें कांहीं सांगण्याचें कारण नाहीं. सामान्य जनांसहि दुसऱ्या मार्गापासून कितपत कृतकार्य होतां येईल, हें पाहणें आहे. प्रस्तुतस्थळीं मराठी बोलणारास संस्कृतावरून प्राप्तव्य अशा गोष्टी दोन. ( १ ) पूर्वपरंपरापरिचय व ( २ ) शब्दसंपत्ति. परंपरापरिचयास संस्कृताप्रमाणें पूर्वेतिहासाचेंहि ज्ञान अपेक्षित आहे. पूर्वेतिहासामध्यें आपल्या पूर्वजांस विदित अशा अनेक शास्त्रांचाहि अंतर्भाव होतो. या इतिहासांतील गोष्टींचा किंवा शास्त्रांतील प्रमेयांचा व त्यांचा उल्लेख भाषेंत आल्यास त्या उल्लेखांचा तात्पुरता अर्थ आपण संदर्भानें किंवा तद्विषयक पुस्तकें किंवा तज्ज्ञ यांचे मदतीनें लावून आपलें काम भागवितों; प्रत्यक्ष इतिहासाच्या किंवा शास्त्राच्या ज्ञानाची अपेक्षा आपण करीत नाहीं. तसेंच संस्कृतांतील परंपराज्ञानहि त्या भाषेच्या ज्ञानाचे अभावीं आपणांस दुष्प्राप्यच राहील असें नाहीं. तें भाषांतरित

दा. क्र. ४६०५

वाङ्मयावरूनहि आपणांस साध्य करून घेतां येईल. उदाहरणार्थ, 'मूले कुठारः' ही म्हण वाचनांत आली असतां तिचा अर्थ समजणें व आपण स्वतः ती लेखांत योजणें या दोन्ही गोष्टी, त्या म्हणीच्या अर्थाचा परिचय कोशाच्या मदतीनें करून घेतल्यानें, आपणांस साधतील. तदर्थ संस्कृत भाषेचें साक्षात् अध्ययन आवश्यक नाहीं. Latin इ. प्राचीन भाषांतील शब्दप्रयोग व वाक्य-प्रयोग इंग्रजी वाङ्मयांत आलेले त्यांच्या कोशगत भाषांतरांवरून आपण समजून घेतों व तेवढ्यानें आपलें काम पुरेसें भागतें. तशीच व्यवस्था, संस्कृतांतील शब्दांचे व वाक्यांचे प्रयोग मराठींत जेथें जेथें येतील तेथें तेथें करितां येईल. इंग्रजी बोलणाराचें लॅटिन भाषेचे अध्ययनावांचून अडत नाहीं; तसेंच मराठी बोलणाराचेंहि संस्कृताध्ययनावांचून अडावयाचें नाहीं. 'शनी रामभाऊच्या उदरीं आला आहे,' 'त्याच्या तोंडावर नक्षत्र पडलें आहे,' इत्यादि प्रयोग आपण नित्यशः ऐकतों, वाचतों व करितों; व हें सर्व ज्योतिषाचे ज्ञानाचे अभावींदेखील. अशीच स्थिति मराठीगत संस्कृतांतील प्रयोगांची मानावी. मराठींत वारंवार उल्लिखित होणारी संस्कृत वाङ्मयांतील माहिती, मराठींत येणारे संस्कृत शब्दांचे शब्दयोग (=Phrase) व वाक्यांचे प्रयोग म्हणीवजा संस्कृतांतील उक्ति या सर्व गोष्टींचें ज्ञान म्हणजेच पूर्वपरंपरापरिचय भाषांतराचे द्वारां आपणांस व्यवहारदृष्ट्या पुरेसा प्राप्त होईल.

७. आतां दुसरी जरूर म्हणजे **शब्दसंपत्तीची वाढ**. ही संस्कृताध्ययनानें चांगली व लवकर हस्तगत होईल. संस्कृताचें अध्ययन करणें नसेल तर त्यांतील कृदंत, तद्धितान्त व समास या तीन शाखांचा विचार प्रामुख्यानें करणाऱ्या ग्रंथांचा परिचयहि प्रस्तुत कार्यास पुरेसा होईल. असले ग्रंथ कार्यक्षम होण्यास ते अर्थात् मराठीचे द्वारां संपादिलेले असावे. मराठीचे लेखकास पुढीलसारख्या शंका वारंवार येतात. 'वर्षास घडणारी' गोष्ट आपण वार्षिक म्हणतों, तर 'दोन वर्षांनीं घडणारी' अशा अर्थी कोणता शब्द बनवावा? दोन आणि **वर्ष** याच शब्दांवरून बनविला तर तो कानास अडाणी लागतो. तो कां बरें? दोन हा निवळ मराठी शब्द व वर्ष हा संस्कृत; फार तर दोन हा तद्भव व वर्ष हा तत्सम म्हणतां येईल. परंतु दोन्ही एकजातीय म्हणतां येत नाहींत. कोणी आग्रहानें म्हणेल कीं, याच शब्दांवरून शब्द

साधावा; पण तसा शब्द उचित भासत नाहीं, जसा घोंगडी-शालजोडीचा सांधा. कार्यनिर्वाह ही जरी मुख्य गोष्ट असली तरी औचिती सर्वथा बाजूस लोटितां येत नाहीं. यामुळें दोन व वर्ष या शब्दांचा सामासिक शब्द ( Extremists ) कोटिवादी सोडून इतर कोणी प्रशस्त मानीत नाहींत. अशा स्थितींत कोशांत पाहतां दोन या अर्थी संस्कृत शब्द द्वि असा सांपडतो. तो वार्षिक या मागें जोडावा म्हणजे इष्ट तो शब्द तयार होईल. परंतु तेथें शंका अशी उद्भवते कीं, द्वि हा अवयव निर्विकार, किंवा द्वै अशा रूपानें सविकार घ्यावा? समासावरून ताद्धित साधतांना, उत्तराबरोबर पूर्वपदाच्या आदिस्वराची वृद्धि करावी कीं नाहीं? सामासिक वा इतर शब्दांवरून ताद्धित शब्द साधितांना अशा अनेक प्रकारच्या शंका वारंवार उद्भवतात. इंग्रजींतहि हाच प्रकार. Royal असा शब्द रूढ असला तरी Vice-roy यावरून बनणाऱ्या Vice-regal या विशेषणांत तो (royal) अंतर्भूत न होतां, त्याचा भाऊ Regal असा अवयव आढळतो. मराठींतील या शंकांचें समाधान संस्कृतांतील साधित शब्दांच्या परीक्षणावरून किंवा शब्दसाधनिकेचा स्वतंत्र विचार करणाऱ्या मराठी ग्रंथांवरून, जिज्ञासूंस करून घेतां येईल. सारांश, **कृत्तद्धित समासाविषयक शब्दसाधनिका प्रतिपादणाऱ्या स्वतंत्र ग्रंथाची रचना करून मराठींतील शब्दसंपत्ती वाढविण्याचा मार्ग सुकर करितां येईल.** अशा ग्रंथाचें अध्ययन केल्यास मराठी सुशिक्षितांस संस्कृत भाषेच्या अध्ययनाची जरूर तादृश राहणार नाहीं.

८. **ज्ञान कसें वाढतें?**—आपल्या ज्ञानाची वाढ होते ती **ज्ञातांत अज्ञानाची भर** पडल्यानेंच होय. मितकूट ज्यानें खाल्लें आहे, त्यास श्रीखंड कसें ओळखावें हें समजावून सांगणें तर, इतर भानगडींत न पडतां, श्रीखंड म्हणजे मितकूटच, पण गोड; मितकूट खारट-तिखट असतें, तर श्रीखंड गोड-आंबट असतें; एरवीं वर्ण व घटना तीच; एवढी माहिती सांगितल्यानें काम भागेल. ऑस्ट्रेलियांतील लोकांना युरोपियनांनीं तेथें नेलेल्या कुत्र्यांचे दर्शनापूर्वी डुकरें ज्ञात होतीं. अर्थात् कुत्रा हा नवीन प्राणी पाहिल्याबरोबर त्यांनीं पूर्वपरिचित डुकराशीं त्याची तुलना केली; कारण चतुष्पादत्वादि धर्मसाम्य त्यांत आहे. यावरून त्यांनीं त्यास डुकरांतच गणिलें. मात्र तद्भेददर्शक म्हणून

कुत्र्याचा निर्देश करितांना भुकर एतदर्थक शब्दापूर्वी भोंकणारें अशा अर्थाचें भेदक विशेषण त्यांनीं लाविलें. त्यांचे भाषेंतील कुत्र्याची संज्ञा भोंकणारें भुकर ' एतदर्थक आहे. सारांश, मनुष्य नवीन ज्ञान मिळवितो तें **ज्ञानपूर्व वस्तूशीं तुलनाद्वारां** होय. म्हणून परिचित वस्तूशीं साम्य कोठें व विरोध कोठें हें पाहण्याकडे विचारशील मनुष्याचें लक्ष असतें, हें लक्ष किंवा दृष्टी सामान्य जनांमध्यें प्राय: सुप्त असते. ते तिला जागृत करून उपयोगांत आणूं शकत नाहींत.

**९. व्युत्पत्तीचें सामान्य महत्त्व**—भाषाशास्त्रांत, विशेषेंकरून शब्दार्थ-संबंधज्ञानांत ही दृष्टि विशेष उपयुक्त, मनोरंजक व बुद्धिविकासक आढळून येते. उदाहरणार्थ, इंग्रजींत खाऊ या अर्थीं Sweetmeat असा शब्द आहे. हा शब्द लहानपणीं मुलास बहुधा घोकण्याचे द्वारां साध्य करावा लागतो. हे घोकण्याचे श्रम, या शब्दाची फोड समजल्यास, सर्वस्वीं वांचतील. या शब्दाच्या उपयोगाचा प्रसंग येण्यापूर्वी sweet व meat हे दोन्ही शब्द त्यास व्यक्तिशः बहुधा ज्ञात असतात. मात्र शिक्षकानें, या दोहोंचा संयोग होऊन sweet-meat हा शब्द झाला आहे व त्याचा अर्थही, मूळ पाहतां घटकांच्या संयुक्त अर्थाबरोबरच आहे, एवढें मुलांस उघड करून सांगितलें पाहिजे. ज्ञात शब्दांच्या संयुक्त अर्थावरूनच या नवीन अज्ञात संयुक्त शब्दांचा अर्थ झाला आहे हें विद्यार्थ्यांस पटवून द्यावें. या स्पष्टीकरणापासून विद्यार्थ्यांस ऐतिहासिक व सामाजिक माहिती मिळून मनोरंजनाचाहि लाभ होतो. या शब्दांत इंग्रज लोकांची पूर्वकालीन रानटी स्थितींतील मांसखाऊ, लोलुप प्रवृत्ति निविष्ट झालेली आहे. अशा रीतीनें अवांतर माहिती मिळून शिकणाराची विचारशक्ति पदोपदीं वाढत जाते व ती बाह्य प्रेरणेनें नव्हे, तर अभ्यंतर अथवा स्वयंभू प्रेरणेनेंच होय. Holiday म्हणजे सण, असें विद्यार्थ्यांस वारंवार घोकावें लागतें. त्याला जर holy व day या घटकांनीं Holiday हा शब्द घटित आहे, असा नुसता परिचय करून दिला तर त्याचे घोकण्याचे श्रम वांचतील व ज्ञानाची वाढ होईल; कारण या घटनेचे ज्ञानावरून पाश्चात्यांत सुट्टी मूळ कशाकरितां दिली जाऊं लागली, हें त्यांस अनायासें कळून येईल.

१०. व्युत्पत्तीचें संस्कृतांतील महत्त्व—अशा रीतीनें व्युत्पत्तिज्ञान इंग्रजी भाषेंतहि उपकारक आहे, कीं जींत प्रकृतिप्रत्यय-विभागाची म्हणजेच शब्दघटनेची विशेष चिकित्सा नाहीं. मग मराठीसारख्या संस्कृतापासून निघालेल्या व संस्कृताच्या छायेंत वाढलेल्या भाषेची गोष्ट कशाला ? संस्कृतांतील अनेक शब्दांचा प्रत्येक अवयव, किंबहुना प्रत्येक अक्षर हें अर्थानें प्राणित असतें. जशीं काशीच्या वाळवंटांत जेथें पाहावें तेथें शिवलिंगें, तसा संस्कृतांत जो शब्द पहावा त्याचे अवयवांत अर्थ. कुक्कुट (कोंबडा) हा शब्द कोंबड्याच्या शब्दाच्या अनुकरणावरून बनला आहे; व्याघ्र हा शब्द धातुबोधित क्रियाविशिष्ट अर्थानें युक्त आहे. ( व्याघ्र आपलें भक्ष्य हुंगून पाहतो, व धातूचा अर्थ हुंगणें असा आहे, हें येथें सांगणें नकोच. ) मूषक हा शब्द उंदिराला लावण्यांतहि धात्वर्थाकडे दृष्टी आहेच. ( मुष् म्हणजे चोरणें ). वातायन म्हणजे खिडकी. कां ? हें शब्दाची फोड सांगते. खिडकीस गवाक्ष कां म्हणतात ? हेंहि गो म्हणजे किरण किंवा गाय-बैल व अक्ष म्हणजे डोळा अशा समासावयवांच्या अर्थाचे द्वारां पटतें. इंग्रजींतहि विशिष्ट खिडकीस Bull's eye अशी संज्ञा आहे. पृथ्वीस पृथ्वी, धरा, मही, स्थिरा, उर्वी वगैरे कां म्हणतात, हें त्या त्या शब्दांच्या मूलार्थावरून ध्यानांत येईल. स्था म्हणजे राहणें—न हलणें—हें ठाऊक झाल्यानें पृथ्वीची स्थिरा ही संज्ञा आपणांस साहजिक वाटते. (स्था व स्थिरा यांतील जन्यजनकसंबंध उघडच आहे ). ही अर्थसंगति लक्षांत घेतल्यानें स्थिरा म्हणजे पृथ्वी असें घोकायाचें कारण उरत नाहीं. अक्षर, वर्ण, लिपी, सभा, पक्षी, नदी, वर्ग असे हजारों नित्य प्रयुक्त शब्द आपापला अर्थ आपण होऊन सांगतात, मात्र तिकडे कान देणें हें अभ्यासकाचें काम आहे. हें कर्णदान किंवा अवधान व्युत्पत्तिशास्त्राचे परिचयानें, सुप्त असल्यास जागृत व जागृत असल्यास पटुतर होतें.

११. मराठींतील व्युत्पत्ति—मराठी भाषा संस्कृतोद्भव असल्यानें, तिच्यांतहि या अवधानाचा उपयोग बहुत होतो. मीठ, भाकरी, पाणी, मुलगा, मामा, डांस, बन्सी, जातें, बैल, बुंदी इत्यादि शतावधि शब्द, त्यांचेकडे आपण बारकाईनें कान दिल्यास, आपण होऊन आपापला अर्थ सांगून, आपले श्रम वांचवून, वर मनोरंजनहि करतील. शब्दांत असलेला

अर्थ यादृच्छिक नव्हे, लहरी नव्हे, काकतालीय नव्हे, तर तो नानाविध कल्पना, विचार व प्रसंग यांवर प्रतिष्ठित असतो, हा प्रत्यय दृढ झाला म्हणजे अभ्यासक या कल्पना-विचार-प्रसंगादिकांचा शोध लावून आपले ज्ञानांत भर टाकूं शकतो. याच्या स्पष्टीकरणार्थ कांहीं पूर्वोक्त शब्दांची परीक्षा करूं. मिठास **मीठ** कां म्हणावें ? त्याचे योगानें पदार्थ **मिष्ट** बनतो म्हणून. **पाणी** असें कां म्हणावें ? तें **पानीय** म्हणजे पिण्यास योग्य म्हणून. **भाकरी** कां ? **भास्कर** किंवा सूर्य यासारखी वाटोळी म्हणून. **मामा** कां ? तर तो **माम** म्हणजे माझा म्हणून. **मुलगा** कां ? तर त्याचे द्वारां बापाचें कुल कालक्षेत्रांत **मूळ** धरतें म्हणून. **डांस** कां ? **डसतो** म्हणून. **जातें** कां ? तर तें एक प्रकारचें **यंत्र** आहे म्हणून. **बुंदी** कां ? तो थेंब म्हणजे बिंदु किंवा **बुंद** पाडून बनवितात म्हणून. हीं सर्व उदाहरणें रोजच्या परिचयाचीं आहेत. अशीं आणखी कितीतरी देतां येतील. या व्युत्पत्तिदृष्टीचा उपयोग ज्ञात शब्दाच्या अर्थावरून अज्ञात शब्दाचा अर्थ हस्तगत करून घेण्याकडे होतो. आतां, मराठी भाषा वाढविणें म्हणजे तींतील शब्द वाढविणें. हे शब्द प्रायः संस्कृतांतून येणार. हे शब्द अर्थज्ञानद्वारां आत्मसात् करण्यास या व्युत्पत्तिशास्त्राची बहुमोल मदत होईल.

१२. **इंग्रजीचा दाखला**—इंग्रजी भाषेची वाढ आपणांसमोर आहेच. तीनचार शतकांपूर्वींच्या व हल्लींच्या इंग्रजी भाषेंत फरक काय दिसतो बरें ? वर्णमाला तीच आहे, (Inflection) पदसाधन तेंच आहे, वाक्यरचनेंत बदल नाहीं. फरक झाला आहे, तो फक्त शब्दांच्या संख्येंत. या तीनचार शतकांत ज्यांमध्यें विविधशास्त्रें, कल्पना, संस्था इत्यादि उदयास आल्या, तत्तच्छास्त्रविषयक शब्द भाषेंत प्रतिदिन शिरत आहेत व भाषेची कोशसंपत्ती सारखी वाढवीत आहेत. यावरून या काळांतील नाणावलेले लेखक म्हणजे सर्वच मोठे पुराणभाषाकोविद होते असें नाहीं. असलेच तर थोडेसेच असतील. सामान्य संख्या पाहिल्यास पुराण भाषेशीं परिचित नाहीं असेंच दिसून येईल. यावरून ही गोष्ट स्पष्ट आहे कीं, भाषा कांहीं यत्तेपुढें-ज्या वेळीं तिचें लेखन (Orthography), पदसाधन (Inflection) व वाक्यरचना (Svntax) हीं स्थिर

झालेलीं असतात अशा मर्यादेपुढें—जी वाढते ती केवळ शब्दसंख्येच्या रूपानें. अशा स्थितीला मराठी खास पोहोंचली आहे.

१३. **मराठीची वर्तमान स्थिति**—निबंधमालेसारखे सामाजिक व राजकीय विचार ओजस्वी भाषेंत मांडणारे प्रबंध, उषःकालासारख्या ऐतिहासिक, पण लक्ष्यांत कोण घेतो, हिच्यासारख्या सामाजिक कादंबऱ्या, कीं, ज्या इंग्रजींत उत्तमोत्तम कादंबऱ्यांशीं सर्वच बाबतींत स्पर्धा करतील; केळकर-खाडिलकरांसारख्यांचीं ऐतिहासिक, सामाजिक नाटकें, गीतारहस्यासारखे तत्त्वज्ञानप्रधान ग्रंथ, ज्ञानकोशासारखे विश्वज्ञान उदरांत सांठविणारे ग्रंथौघ, परांजपे यांच्या 'काळ' पत्रांतील लेखांसारखे तर्कशुद्ध, विनोदी, जोरदार, लाक्षणिक, गोंडस व अभिजात भाषेंत ग्रथित केलेले लेख, केशवसुत-गिरीशादि आधुनिक कवींनीं प्रणीत असे काव्यालाप इ० इ० लेखनसंपत्ति ज्या वर्तमान मराठींत पैदा झाली आहे व होत आहे, ती मराठी भाषा अजून स्वतंत्रतेनें वावरण्यास योग्य झाली नाहीं असें माझ्यानें म्हणवत नाहीं. अशा रीतीनें मराठी भाषा आपल्या पायावर उभी राहण्यास क्षम झाली असल्यानें, प्रायः कोणतीहि कल्पना आटपसर, निःसंदिग्ध अशा रीतीनें तिला व्यक्त करितां येऊं लागली असल्यानें—तिच्या अभ्यासकांनीं संस्कृत भाषेवर विशेष भर देण्याचें कारण नाहीं. मराठींतील अनेक संतकवी संस्कृताशीं अपाचित होते हें प्रसिद्धच आहे. हल्लींहि आपल्यांतील पुष्कळ स्त्रिया, संस्कृताभिज्ञ नसूनहि, उत्तम गाणीं रचूं शकतात, हें खालील उताऱ्यावरून दिसून येईल. सारांश, प्रस्तुत काळीं मराठींत उत्तम लेखन करण्यास मराठींतीलच लिखाणाचा परिचय प्रर्याप्त होऊं शकतो; तदर्थ संस्कृताध्ययन अत्यावश्यक नाहीं हें सिद्ध होतें. वाटल्यास कल्पनाविकासासाठीं व विचारसमृद्धीसाठीं इंग्रजीचें वाचन वाढवावें. एरव्हीं व्यवहाराकरितां इंग्रजीचा परिचय जरूर आहेच. तोच जास्ती केल्यानें विचाराचें भांडवल वाटेल तितकें वाढवितां येईल. आधुनिक काळांत इंग्रजींतील विचारच विशेष मार्गदर्शक होतील हें सांगणें नकोच.

येथें कोणी अशी शंका घेईल कीं, हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांच्या तोडीची कादंबरी कोणाहि संस्कृतानभिज्ञ लेखकानें लिहिली नाहीं, असें

कां ? यावरून असल्या अभिजात कादंबऱ्या लिहिण्यास संस्कृताध्ययन जरूर आहे असें ठरत नाहीं काय ? हरिभाऊ चांगलेच संस्कृताभिज्ञ होते, हें प्रसिद्धच आहे. यावर उत्तर–आपटेकृत कादंबरीसारखी कादंबरी संस्कृतानभिज्ञास कां लिहितां आली नाहीं ? असें तुम्ही विचारितां, यावर मीहि असें विचारितों कीं, असा संस्कृताभिज्ञ तरी कोण आहे कीं, जो तसली कादंबरी लिहूं शकला आहे ? या प्रतीची कादंबरी लिहिणें हें संस्कृताच्या अध्ययनापेक्षां लेखकाच्या वाचनविस्तारावर व विशेषतः व्यक्तिगत वैशिष्ट्यावरच जास्त अवलंबून आहे. संस्कृताभिज्ञ तशी कादंबरी खास लिहूं शकेल किंवा असंस्कृतज्ञ कधींच लिहूं शकणार नाहीं यांपैकीं कोणतेंच विधान खरें नाहीं. 'बळ ज्याचें त्यास तें ।' हेंच वचन येथें लागू पडतें. सांगण्याचा मुद्दा एवढाच कीं, वर निर्दिष्ट केलेल्या ग्रंथांच्या क्रमिकेवरून ( यादीवरून ) मराठीची अवस्था किती प्रौढतेला आली आहे, हेंच पहावयाचें आहे. ते ग्रंथ लिहिणारांची विद्वत्ता सांगण्याचा हेतु नाहीं.

१४. **आज मराठीसंबंधीं आपलें कर्तव्य**—येथें वर्णिलेली मराठीची ग्रंथप्रसवक्षमता पाहून कोणी असें विचारील कीं, अशा अवस्थेमध्यें मराठीचा उत्कर्ष सांप्रत बेताचाच कां आहे ? इंग्रजी इत्यादि भाषांतल्याप्रमाणें तींत ग्रंथनिष्पत्ती अधिक जोरानें कां होत नाहीं ? याचें उत्तर–' विनाश्रयं न वर्धन्ते पण्डिता वनिता लताः ' फक्त या उक्तींत पण्डिताः हें विद्येचें उपलक्षण घ्यावें. राजाश्रयाचा अभाव हेंच एक मुख्य कारण मराठीच्या उत्कर्षाच्या प्रतिबंधाचें होय. अशा स्थितींत इष्ट गोष्ट घडवून आणण्याचे उपाय दोन. ( १ ) स्वतः राजे होणें व मराठीस आश्रय देणें; पण हें जोंपर्यंत शक्य नाहीं तोंपर्यंत, ( २ ) यथासाधन राजसत्तेचा अंश मिळवून विद्याखात्यांत मराठीचा प्रवेश सार्वत्रिक करण्यास झटणें. असो. राजसत्तेच्या यावत्प्राप्त अंशाचे बळावर मराठी भाषा वाढवितांना आपणांस शब्दांची जरूर लागणार. ही जरूर संस्कृतांतील शब्द घेऊन–किंवा त्यांपासून नवीन बनवून, आपणांस भागविली पाहिजे. तदर्थ संस्कृताचें यथाविधी अध्ययन किंवा संस्कृत व्याकरणांतील निवडक शाखांचा अभ्यास अवश्य आहे. ( Specialists ) एकांग विद्वानांनीं संस्कृताचें अध्ययन केल्यास, तेवढ्यानें भाषेचें कार्य भागेल.

सर्वांनींच अध्ययन करण्याची जरूर नाहीं. यावर कोणी शंका घेईल कीं, तुकारामादि शुद्ध मराठी अशा अनेक कवींनीं ग्रंथरचना मराठी भाषेच्या अभ्यासावांचून केली नाहीं काय? मग आधुनिक मराठी लेखकांनीं तरी, मोजक्या कां होईना, संस्कृत व्याकरणांतील कांहीं भागांचा अभ्यास कां करावा? त्यावांचून काय अडणार आहे? यावर असें समाधान करितां येईल कीं, आपणांस वर्तमान काळीं मराठींत ज्या ज्या कल्पना व्यक्त करावयाच्या आहेत किंवा कराव्या लागतील, त्या त्या बहुतेक अन्य देशांत पैदा झालेल्या आहेत व त्या जगांत सर्वत्र सपाट्यानें वाढत जात आहेत. जगांतील जीवनकलहांत मागें पडणें आत्मघाततुल्य असल्यानें, या नव नव कल्पना आपण शीघ्र आत्मसात् केल्या पाहिजेत. अशा स्थितींत, त्यांना लागणारे शब्द हळुहळू आपोआप बनून प्रचारांत येतील अशी वाट पहाणें योग्य नाहीं. ते शब्द आपणांस प्रयत्नत: लवकर बनविले पाहिजेत. एखादी गोष्ट, संस्था किंवा योजना आपल्याच देशांत निर्माण झाली असली म्हणजे तद्वाचक शब्दहि स्वभावत:च आपल्या देशांत निर्माण झालेले असतात. तदर्थ अन्य भाषेकडे पहावें लागत नाहीं. वस्तु पैदा होते ती सशब्दच पैदा होते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशी स्थिति तुकारामादिकांचे काळीं होती; म्हणजे त्यांचे वेळीं शब्दद्वारां जें कांहीं ज्ञान जनतेंत प्रसृत करावयाचें होतें तें आपल्याच देशांत उत्पन्न झालेलें होतें. त्यामुळें त्यांना शब्दांची वाण कधींच भासली नाहीं. वर्तमान काळीं वाढत्या दळणवळणाच्या साधनांच्या योगानें नव नव कल्पना, आपणांस इच्छा असो वा नसो, आत्मसात् करणें प्राप्त झालें आहे. अशा स्थितींत स्वत्वरक्षणास्तव, आपणांस परदेशीय कल्पना जरी टाळतां आल्या नाहींत तरी, इतकें करितां येईल कीं, तत्तत्कल्पनावाचक शब्द जनतेस अडचण होणार नाहीं अशा बेतानें यावच्छक्य संस्कृतावरून तयार करून घेतां येतील. करितां एतदर्थ एकांग विद्वानांस यथापेक्ष संस्कृत भाषेचा यथाविधि परिचय व इतरेजनांस यथापेक्ष संस्कृत-व्याकरण-शाखांचा तात्पुरता परिचय उचित दिसतो. संस्कृत ही आपले पूर्वजांची भाषा आपण अवश्य अभ्यासू नये काय? अशा प्रश्नाचें उत्तर आतां देऊं.

१५. विकारवशता—पुष्कळ लोक असें म्हणणारे निघतात कीं, संस्कृत

ही आपले देवांची भाषा आहे. वेद तिजमध्येंच बोलतात. स्मृतिग्रंथांची भाषा तीच. पुराणें तीमध्येंच लिहिलीं आहेत. धार्मिक विधि व संस्कार तद्द्वारांच होतात. कालिदासादि कविश्रेष्ठांची काव्यवाणी तीच. आपले पुरातन पूर्वज हीच बोली बोलत आले. अशा स्थितींत आपण तिचा अभ्यास टाकून केवळ मराठीसच कवटाळावें काय ? केवढा हा स्वाभिमानाचा तुटवडा ! काय ही स्वत्वविमुखता ! कसला हा अधःपात ! अशा विकारप्रधान प्रश्नांस उत्तरहि तशाच प्रकारचें देतां येईल. संस्कृत ही पूर्वजभाषा, मान्य. वेदादिग्रंथांची तीच भाषा, मान्य. तीच मराठीची माता किंवा मातामही, सर्वथा मान्य. पण इतकें झालें म्हणून, मराठीनें निरंतर तिच्या मांडीवरच काय म्हणून लोळावें ? मराठीनें आपला संसार स्वतंत्रपणें कधींच थाटूं नये काय ? नित्य आजीचा कासोटा धरून तिच्या पायांत घोटाळावें काय ? स्वतःचे बुद्धीनें कोणताच व्यवहार कां करूं नये ? प्रत्येक कामांत आजीचें मत कशास विचारावें ? स्वतःची अक्कल कधींच कोणतेच कामांत चालवूं नये काय ? तुमची लेक मोठी आवडती असली म्हणून तिनें निरंतर माहेरींच रहावें, असें तुम्ही इच्छाल काय ? आईबापांनीं मुलीस पोसावें, वाढवावें, तिचें लालनपालन करावें, हें सर्व ठीकच; तरी पण ती मोठी झाल्यावर तिनें स्वतंत्रपणें नांदावें, फक्त सणावारींच माहेरीं यावें, आईआजींस भेटावें, असेंच कोणीहि म्हणेल. मुलीनें निराळा संसार न मांडितां नित्य माहेरीं राहणें हें जसें अप्रशस्त, तसेंच मराठीनें आज दोनतीन शतकें आपल्या पुत्रांकडून राज्यें चालविलीं असतां, महाभारतासारख्या आकरग्रंथांचें सार मराठींत अनेक कविमुखांनीं गाबविलें असतां, भक्तिरसोत्तर असें वाङ्मय,—कीं ज्याची तोड संस्कृतांतहि सांपडणें कठीण—ओंव्या, अभंग इ० स्वयंनिर्मित वृत्तांतून संतकवींकडून उत्पन्न करविलें असतां, अलीकडे तर कोणत्याहि भाषेस ललामभूत होतील असे गद्यग्रंथ आधुनिक विद्वानांकडून लिहविले असतां,—इतक्या प्रगल्भ अवस्थेंस ती पोहोंचली असतां, अजूनहि तिनें संस्कृताचा लळा कमी करूं नये, असें म्हणणें शोभेल काय ? फक्त एवढेंच म्हणणें चालेल कीं, तिनें संस्कृताशीं फारकत न करितां, वेळोवेळीं तिचा उपदेश घ्यावा. सारांश, मराठीचे अभ्यासकांनीं, शब्दसंपत्ति संस्कृतांतून

मिळविण्यास लागेल इतका संस्कृत व्याकरणाचा अभ्यास अवश्य करावा. तदधिक अभ्यास, यथारुचि, यथापेक्ष कोणीहि करावा; त्यास कोण दोष देणार ! पण संस्कृताचें यथाविधि अध्ययन प्रत्येक मराठीपुत्रास अवश्य मानणें हें अत्याग्रहदूषित दिसतें.

---

# ऋग्वेदांतील ओषधींचीं १०७ धामें

लेखकः महामहोपाध्याय पं. **सीतारामशास्त्री** (कलकत्ता युनिव्हर्सिटी)

[ महामहोपाध्याय पं. सीतारामशास्त्री यांचा जन्म भोर संस्थानांत सन १८८९ मध्यें झाला. पंडितजींचें उपनाम शेंडे असें आहे. पंडितजींचें घराणें वैदिक आणि शास्त्री असून त्यांचे वडील वे. शा. सं. नरहरशास्त्री हे भोर येथील चांगले पढीक व्युत्पन्न शास्त्री होते. पं. सीतारामशास्त्री यांनीं एक तपाहून अधिक काल काशी-क्षेत्रांत वास करून षट्‌शास्त्रांचें अध्ययन केलें. सध्यां ते कलकत्ता विश्वविद्यालयांत ' पोस्ट-ग्रॅज्युएट कोर्स ' शिकविणारे प्रमुख मीमांसाध्यापक आहेत. गेल्या वर्षी त्यांना **महामहोपाध्याय** ही पदवी देऊन सरकारनें त्यांच्या संस्कृत अध्यापनाचा गौरव केला आहे. महाराष्ट्रीय उत्कृष्ट मीमांसाध्यापक म्हणून त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या व्हाइसचॅन्सेलरनीं एकदां केला होता.]

वेदांमध्यें अशीं कांहीं स्थलें आहेत कीं, त्यांचा अर्थ लावण्यासंबंधानें अनेक लोकांनीं प्रयत्न केला असूनहि त्यांचा बरोबर अर्थबोध होत नाहीं. निरुक्तकारादिकांचें अनुकरण करून व्याकरणादि शास्त्रांच्या साहाय्यानें सायणाचार्यांनीं पुष्कळ ठिकाणीं केलेले अर्थ फारसे विरुद्ध दिसत नाहींत. परंतु संदिग्ध अर्थाचीं स्थलेंहि कांहीं कमी नाहींत. अशा स्थलांपैकीं दिसण्यांत सरळ अशी ओषधीसूक्तांतील एक ऋचा आहे. त्या ऋचेमध्यें उल्लेखिलेली संख्या बरोबर लागत नाहीं. निरुक्तकार वगैरेंच्या म्हणण्याप्रमाणें ही संख्या मुख्य औषधींची आहे. परंतु वैद्यशास्त्रांतसुद्धां असा मुख्य ओषधींच्या संख्येबद्दल उल्लेख नाहीं. म्हणून या ऋचेचा अर्थ दुसऱ्या एका दिशेनें लावण्याचा प्रयत्न केल्यास ऋचेचा बोध होण्याचा संभव आहे. म्हणून विचारासाठीं पुढील कल्पना मांडली आहे.

ऋग्वेदांतील ओषधीसूक्तांत-

या ओषधीः पूर्वा जाता देवेभ्यस्त्रियुगं पुरा।

मनै नु बभ्रूणामहं शतं धामानि सप्त च ॥ १ ॥

मं. १०. सू. ९७. ऋ. १

हा एक मंत्र आहे. यांत ओषधींचीं एकशेंसात धामें 'शतं धामानि सप्त च' या चरणांत सांगितलीं आहेत, तीं कोणतीं? या बाबतींत यास्काचार्यांनीं निरुक्तांत असें सांगितलें आहे कीं, धामें तीन प्रकारचीं आहेत. अर्थात् धाम शब्दाचे तीन अर्थ आहेत:-स्थान, नाम किंवा जन्म. पैकीं वरील मंत्रांत धाम शब्दानें 'जन्म' असा अर्थ घ्यावा. 'शतं सप्त' या पदांनीं सातशें असा अर्थ घ्यावा. अर्थात् सातशें ओषधी किंवा ओषधींचे सातशें जन्म असा वरील चरणाचा अर्थ समजावा. किंवा धाम शब्दानें 'स्थान' असा अर्थ घेऊन ओषधींच्या प्रयोगांचीं सातशें स्थानें असा वरील चरणाचा अर्थ मानावा. कारण मनुष्याचे शरिरांत सातशें मर्मस्थानें आहेत. त्यांवर औषधींचा उपयोग करतात म्हणून. 'धाम' शब्दाचा 'नाम' असा अर्थ करतां येईल किंवा नाहीं याबद्दल यास्काचार्यांनीं कांहीं उल्लेख केला नाहीं. निरुक्तटीकाकार दुर्गाचार्य यांनीं वरील चरणांत 'शतं सप्त' या पदांचा 'एकशेंसात' असा अर्थ मानून ओषधीं-पैकीं 'एकशेंसात औषधी मी उत्तम प्रकारें जाणतों.' असा वरील मंत्राच्या द्विती-यार्धाचा अर्थ केला आहे. तेव्हां असा प्रश्न उद्भवतो कीं 'सप्त शतं' या पदांचा खरा अर्थ कोणता? एकशेंसात किंवा सातशें? निरुक्तकारांच्या म्हणण्याप्रमाणें सातशें असा अर्थ मानावा तर शतशब्दाचा बहुवचनी 'शतानि' प्रयोग मंत्रांत असला पाहिजे. त्याच्या उलट मंत्रांत 'शतं' असा एकवचनी प्रयोग आहे. शिवाय मंत्रांत 'आणि' अशा अर्थाचें "सप्त च" यांतलें 'च' पदहि बरोबर लागत नाहीं. 'च' पदानें 'शंभर आणि सात' असा अर्थ होतो. यास्काचार्यांनीं आपल्या ग्रंथांत वरील पदांचा 'सातशें' असा अर्थ स्पष्ट जरी सांगितला नाहीं तरी तोच अर्थ त्यांना अभिमत असल्याचें त्यांच्या विवरणावरून दिसतें. ते आपल्या विवरणांत म्हणतात—"जन्मान्यत्राभिप्रेतानि, सप्तशतं पुरुषस्य मर्मणां तेष्वेना दधातीति वा"



गुरुवर्य महादेव हरी मोडक,



महामहोपाध्याय सीतारामशास्त्री शेंडे.



डॉ. परशुराम लक्ष्मण वैद्य.



श्री. बापूराव मार्तंड आंबेकर.



भिषग्रत्न भावे शास्त्री.



श्री. विनायक विश्वनाथ बाददेकर.



श्री. गहिनीनाथ माधव पानसे.



श्री. पुरुषोत्तम पांडुरंग भडकमकर.

अर्थात् वरील मंत्रांत ' धाम ' शब्दानें 'जन्म' असा अर्थ अभिप्रेत आहे किंवा पुरुषाचीं सातशें मर्में ( मर्मस्थानें ) ( आहेत किंवा असतात ) त्यांवर या वनस्पतींचा उपयोग करतात. याचेवरून असें स्पष्ट होतें कीं, सातशें मर्मांवर औषधींचा उपयोग होतो म्हणून, त्यांचीं तितकीं स्थानें असा मंत्रांतील ' सप्त शतं धामानि ' या पदांचा अर्थ यास्काचार्यांच्या मतें आहे. हा अर्थ 'धाम' शब्दाचा ' स्थानें ' असा अर्थ असतांना होईल. परंतु ' जन्म ' असा अर्थ घेण्याच्या वेळीं ' सप्त शतं ' सातशें किंवा एकशें सात या वेळेसहि ज्याअर्थीं निरुक्तकारांनीं 'जन्म' असा अर्थ घेतला त्या वेळेस हीच संख्या असें सांगितलें नाहीं व 'किंवा ' असें म्हणून 'स्थान' असा अर्थ घेतांना सातशें स्थानें दाखविलीं त्याअर्थीं त्यांनीं जन्म असा अर्थ घेतांना सुद्धां सातशें हीच संख्या गृहीत धरली असें होतें. दुर्गाचार्यांनीं वरील निरुक्तवाक्याचा अर्थ करण्याच्या वेळेस 'जन्म' असा अर्थ करतांना सातशें हीच संख्या गृहीत धरून म्हटलें; 'सप्त शतमोषधिजातय एकस्मिन्मंत्रे अभिप्रेता:' अर्थात् ( ओषधींचे सातशें जन्म म्हणजे ) सातशें प्रकारांच्या ओषधी या मंत्रांत अभिप्रेत आहेत. तात्पर्य, निरुक्तकारांनीं ' सप्तशतं 'या पदांचा ' सातशें ' असा अर्थ घेतला; परंतु त्यांच्या मताला ' शतं ' असा एकवचनी प्रयोग व ' च ' शब्द हीं जुळत नाहींत. दुर्गाचार्यांनीं आपल्या विवरणांत केलेला ' एकशेंसात ' ( ' सप्ताधिकं शतं ' ) असा अर्थ घेतला असतां वरील दोन्ही अडचणी नाहींशा होतात. परंतु त्या एकशेंसात ओषधी कोणत्या हा प्रश्न मात्र सुटत नाहीं. शिवाय सदर मंत्र ओषधींची स्तुति करण्याकरितां आहे. तेव्हां त्यांत ओषधींचें महत्त्व असलें पाहिजे. ' मी एकशेंसात ओषधी जाणतों ' ( मलाच एकशेंसात ओषधी माहित आहेत,) याच्यापेक्षां जास्त ओषधी कोणालाहि माहीत नाहींत.' असा अर्थ केला असतां महत्त्व मंत्रद्रष्ट्या ऋषीकडे येत असल्यामुळें हाहि अर्थ नीट जुळत नाहीं. तर मग मुळांतील ' शतं धामानि सप्त च' याचा अर्थ काय हा प्रश्न तसाच शिल्लक राहतो. म्हणून धाम शब्दाचा 'स्थान' असा अर्थ घेऊन खालीलप्रमाणें व्याख्या केली तर या मंत्राच्या अर्थाची अडचण राहात नाहीं व वेदांतील आणखी कांहीं वाक्यांच्या अर्थाचा उलगडा होऊन कांहीं वेदांतील वर्णनांचाहि बोध बरोबर होतो.

तो अर्थ लावण्याची पद्धति खालीलप्रमाणें होय. तथापि यांत प्रथम हें पाहिलें पाहिजे कीं, ओषधी शब्दानें येथें काय अर्थ घ्यावयाचा? लोकांत प्रसिद्ध असलेला उद्भिज जातिविशेष (ज्याला लोक ओषधि किंवा वल्ली म्हणतात) हा किंवा दुसरा कांहीं अर्थ आहे? निरुक्तकार यास्कांनीं लोकांत प्रसिद्ध असलेला अर्थ घेऊन त्या शब्दाची व्युत्पत्ति 'ओषद्धयन्ति, ओषत्येनाधयन्ति, दोषं धयन्ति' अशी तीन प्रकारांनीं दर्शविली आहे. दाह करणाऱ्या रोगांचा, रोगांच्या दाहाचा, किंवा रोगानें उत्पन्न झालेल्या दोषांचा नाश करतात म्हणून ओषधि. परन्तु असा अर्थ येथें घेतला तर कृष्णयजुर्वेदामध्यें 'देवा वा ओषधीष्वाजिमयुः' (देव ओषधींमध्यें शर्यत खेळले) असें वाक्य आहे त्याचा अर्थ लागत नाहीं. ओषधी असलेल्या जागेवर अशी अर्थ-लक्षणा मानावी लागते. शिवाय त्याच वेदांत 'देवा वै नक्षत्रेष्वाजिमयुः' (देव नक्षत्रांत शर्यत खेळले) सांगितलें आहे. ह्या वाक्याचा अर्थ, बाकी सर्व गोष्टी सारख्या असतां, केवळ नक्षत्र या शब्दामुळें मात्र नीट होत नाहीं. पूर्वीच्या वाक्यानें भूलोकावर व या वाक्यानें स्वर्गलोकांत आजि (शर्यत) खेळले, असा अर्थ केला तर याच ओषधिसूक्तांत ऋग्वेदामध्यें 'ओषधि सोमराजासारख्या आहेत' (ओषधयः संवेदन्ते सोमेन सह राज्ञो, ऋ. स.), असें आहे. 'जी वल्ली कुटून मनुष्य रस काढतो त्या वल्लीला अगर तिच्या रसास प्राशन करणारा मनुष्य सोम असें संबोधतो. पण ब्राह्मण ज्यास सोम म्हणतात तो तो नव्हे; कारण त्याला कोणी खात नाहीं.' या अवतरणाचा नीट उलगडा होत नाहीं. म्हणून ओषधि शब्दानें वल्ली असा अर्थ न घेतां नक्षत्र असा अर्थ घेतला तर कांहीं अडचण राहात नाहीं. ओषधि शब्दाचा हा अर्थ घेतल्यास 'ओषः दाहात्मकं तेजो धीयते स्थाप्यते यत्र सौषधिः' (जीवर उष्णरूप तेज ठेविलें जातें ती ओषधि) अशी व्युत्पत्ति करतां येईल. सोम हें नांव चंद्राचें आहे. चंद्र जसा सूर्याच्या किरणांनीं प्रकाशित होतो त्याप्रमाणें नक्षत्रेंहि सूर्याच्या किरणांनीं प्रकाशित होतात. म्हणून त्यांना सोमा-(चंद्रा)सारखीं म्हणणें बरोबर दिसतें. (सोम चंद्र) सूर्यकिरणांनीं प्रकाशित होतो ही गोष्ट 'अत्राह गोरमन्वत०' (ऋ. सं. अ. १ सू. २५ मं. २), ऋग्वेदांत 'सुषुम्णः सूर्यरश्मि०' (य. वा. सं. १८, ४०), यजुर्वेदांत

स्पष्ट सांगितली आहे. निरुक्तांतहि 'असमैकोरश्मिश्चन्द्रमसं प्रतिदीप्यते... आदित्यतोऽस्य दीप्तिर्भवतीति' (सूर्याचा एक किरण चंद्राला प्रकाशित करतो...सूर्यापासून त्याला तेज मिळतें) असें सांगितलें आहे. चंद्राचें नक्षत्रेश जसें नांव आहे तसेंच ओषधीश हेंहि नांव आहे. तेव्हां वरील सर्व कारणांवरून ओषधी शब्दाचा वरील मंत्रांत नक्षत्र असा अर्थ घेतां येईल. व तसा तो घेतला असतां ओषधींचीं धामें (स्थानें) म्हणजे नक्षत्रांचीं धामें असा अर्थ होईल, आणि हा असा अर्थ घेतला असतांच वरील मंत्राच्या प्रथमार्धांतील 'पूर्वाः, त्रियुगं, पुरा' या शब्दांचा सरळ अर्थ लागतो. आतां असा एक मंत्र आहे कीं, "या ओषधीः पूर्वा जाता देवेभ्यस्त्रीणि युगानि पुरा मन्येनु बभ्रूणामहं...शतं धामानि सप्त च" (ज्या औषधी पूर्वकाळीं कृत, त्रेता, द्वापर या तीन युगांपर्यंत देवांच्या आधीं उत्पन्न झाल्या त्या पिंगट वर्णाच्या ओषधींच्या सातशें स्थानांचा किंवा प्रकारांचा मी आदर करतों) असा या मंत्राचा यास्काचार्यांनीं अर्थ केला आहे. दुर्गाचार्यांनीं सातशेंच्या ऐवजीं एकशेंसात व 'आदर करतों' च्या ऐवजीं जाणतों असें घेऊन तोच अर्थ सांगितला. परंतु या अर्थांत 'पुरा' शब्दाची जरूरी नाहीं. 'देवांच्या पूर्वीं' म्हणण्यानेंच काम भागतें. म्हणून या मंत्राचा असा अर्थ करावा—'जीं (याः) पांच (त्रियुगं—तीन व दोन मिळून पांच—) नक्षत्रें (ओषधयः) पूर्वीं (पुरा) पूर्वेकडे (पूर्वाः) झालीं, पिंगट अशा त्या नक्षत्रांचीं (बभ्रूणां) एकशेंसात स्थानें (शतं धामानि सप्त च) त्यांचा मी आदर करतों.' अर्थात् जीं पांच नक्षत्रें पूर्वेकडे म्हणजे वसंत संपातस्थानीं झालीं, त्या सूर्यकिरणांमुळें पिंगट शोभणाऱ्या नक्षत्रांचीं स्थानें म्हणजे वसन्तसंपाताच्या जागा व त्या जागा एकशेंसात असें होतें. पूर्वेकडे होणाऱ्या अचल नक्षत्राला देवमानानें वसंतसंपात नक्षत्र असें, कृत्तिकेच्या वर्णनाच्या यजुर्वेदांतील 'एताहवे प्राच्यै दिशो न च्यवन्ते' त्या (कृत्तिका) पूर्वदिशेपासून कधीं ढळत नाहींत, इत्यादि वाक्यांचा अर्थ करतांना मानलें आहे व तें तसें मानलें म्हणजे वसंतसंपाताचीं पांच नक्षत्रें या मंत्रांत सांगितलीं हें ओघानेंच सिद्ध होतें. वसंतसंपात जर पांच नक्षत्रें फिरला तर त्याच्या विरुद्ध दिशेला शारदसंपातहि पांच नक्षत्रांत फिरेल हें अर्थसिद्ध

आहे. तशीं तीं शारदसंपाताचीं पांचच नक्षत्रें आहेत असें यजुर्वेदांत नक्षत्रिय प्रजापतिबर्णनानें स्पष्ट प्रतिपादिलें आहे. त्यांत हस्तनक्षत्रापासून घेऊन अनुराधानक्षत्रापर्यन्त पांच नक्षत्रांत नक्षत्रिय प्रजापतीची कल्पना 'यो वै नक्षत्रियं प्रजापतिं वेद। उभयोरेनं लोकयोर्विदुः। हस्त एवास्य हस्तः। चित्रा शिरः। निष्ट्या हृदयं। ऊरू विशाखे। प्रतिष्ठानुराधाः। एषवै नक्षत्रियः प्रजापतिः।' (तै.ब्रा.१.५.२.२.) (जो नक्षत्रिय प्रजापतीला जाणतो त्याला दोन्ही लोकांत जाणतात (दोन्ही लोकांत तो प्रसिद्ध होतो). या नक्षत्रिय प्रजापतीचा हस्तनक्षत्र हाच हात आहे, चित्रा डोकें आहे, स्वातिनक्षत्र हृदय आहे, विशाखानक्षत्र मांड्या आहेत, व अनुराधा नक्षत्र हे पाय आहेत.) प्रजापति म्हणजे संवत्सर तो या पांचच नक्षत्रांत आहे, ही कल्पना या नक्षत्रांना संपातनक्षत्रें मानल्याशिवाय चांगली बसत नाहीं. कै. शंकर बाळकृष्ण दीक्षितांनीं आपल्या भारतीय ज्योतिःशास्त्र ग्रंथांत 'स्वाती हें प्रजापतीचें हृदय' हें म्हणणें जमत नाहीं, असें म्हटलें आहे. परंतु वरीलप्रमाणें पांचच नक्षत्रांत संपात होतो व त्यामुळें हीं पांचच नक्षत्रें संपात नक्षत्रें व म्हणूनच प्रजापतिनक्षत्रें. त्यांत वर हात करून मनुष्य उभा राहिला म्हणजे त्याचा हात सर्वांगापेक्षां उंच असतो. त्याप्रमाणें संपाताचें अंतिम नक्षत्र हस्त तेंहि सर्वांत उंच असल्यामुळें हाताच्या जागीं व मध्यभागीं असलेलें स्वाती नक्षत्र शरिरांत मध्यभागीं असणाऱ्या हृदयाप्रमाणें म्हणून प्रजापतीचें हृदय असें म्हणतां येतें. व संपाताचें शेवटलें नक्षत्र अनुराधा म्हणून त्याची प्रतिष्ठा अर्थात् पायाची कल्पनाहि होऊं शकते. हीं पांच नक्षत्रें सोडून दुसऱ्या नक्षत्रांत संपात ( शारद ) होत नाहीं. असें झालें म्हणजे हीं पांचच नक्षत्रें व हींच पांच नक्षत्रिय प्रजापति कां हे प्रश्न उत्तम रीतीनें सुटतात. नाहींतर ते सुटत नाहींत. आजपर्यंत कोणींहि या प्रश्नाचें समर्पक उत्तर दिलेलें नाहीं. देवांचा वर्षारंभ वसतसंपाताला होत असल्यामुळें तेथून प्रारंभ झालेल्या संवत्सररूप प्रजापतीच्या उंच होण्याची मर्यादा शारद संपाताला होऊं शकते, चित्रा नक्षत्राला प्रजापतीचें शिर म्हणण्यानें हीं पांच नक्षत्रें शारद संपाताचीं नक्षत्रें असें होतें व हीं अशीं शारद संपाताचीं नक्षत्रें झालीं म्हणजे वसंत संपाताचीं हीं पांचच नक्षत्रें होतील. तीं पांच नक्षत्रें वरील मंत्रांत

अर्थ झोंपाळ्याचे झोंक्याप्रमाणें मागें पुढें होणें. म्हणजे रोहिणीपासून निघून पुन्हां रोहिणीपर्यंत येईपर्यंत संपातास सदर ५४ अंश दोन वेळां आक्रमावे लागतील. व तें तसें झालें म्हणजे संपाताची एक प्रदक्षिणा पुरी होईल. या एका प्रदक्षिणेंत ५४ अंश दोन वेळां येण्यानें ५४×२ = १०८ अंश होतात. या अंशांत सूक्ष्म मानानें कांहीं अंश कमी असण्याचा संभव, म्हणजे अपूर्ण अंश सोडून केवळ पूर्ण अंश घेतले असतां १०७ होतात. तेच १०७ अंश ( नक्षत्राचे संबंधाचे ) संपातीं येणें म्हणजे सूर्योदयानें ते पीतवर्ण अथवा पिंगट होणें असा अर्थ मानतां येणें स्वाभाविक आहे. तेव्हां हे असे १०७ अंश, नक्षत्राचे वरील मंत्रांत ' शतं सप्त च धामानि ' या पदांनीं विवक्षित आहेत. वरील ५४ अंशांत कांहीं कमी असण्यानें अक्ष सूक्तांतील ' त्रिपञ्चाशः क्रीडित व्रात एषाम् " या वाक्यांतील त्रिपञ्चाश शब्दाचा अर्थ ठीक जमतो. 'यासां तिस्रः पञ्चाशतोऽभिल्वं गैरपावपः।' यांतील 'तिस्र पञ्चाशत' यांचा अर्थ नीट लागतो. मूळनक्षत्राचें मूळबर्हणी नांव व अथर्ववेदांचे ' उदगातां भगवती...' या मंत्रांतील अर्थाची नीटपणें उपपत्ति लागते. भारतांतील अभिजिताबद्दलची कथाहि याप्रमाणें नीट जुळते. हें तत्व इतरत्र स्पष्ट सांगितलें आहे. सबब या छोट्या लेखांत त्याचा विस्तार केलेला नाहीं. प्राचीन भारतीय ज्योतिषानें संपाताची ५४° पर्यंत आंदोलनगति मानण्याचें मूळ या नक्षत्रिय प्रजापति वगैरे वैदिक वर्णनांत आहे. एकाष्टका वगैरेबद्दलचें वर्णनहि सदर प्रकारानें जमतें, इत्यादि गोष्टी विस्तारानें दुसरीकडे दाखविल्या आहेत. तेव्हां या किंवा अशा वाक्यांचा, वर्णनांचा ज्यामुळें बरोबर उलगडा होतो तीं ओषधींचीं एकशेंसात धामें म्हणजे संपात फिरण्याचे ते अंश होत.

तात्पर्य, वरीलप्रमाणें अर्थ केल्यास मंत्रांतील संख्या निरर्थक होत नाहीं किंवा कशीतरी जुळवण्याचीहि अडचण पडत नाहीं. म्हणून ह्या लहानशा लेखामध्यें ही कल्पना लोकांपुढें मांडण्याचा प्रस्तुत लेखकानें प्रयत्न केला आहे.

---

# ‘ श्रेष्ठ पुरुष ’ विषयक मीमांसा

लेखक : लक्ष्मण केशव भावे, बी. ए., एल्‌एल्. बी., पाली.

[ यांचा जन्म सन १८८८ मध्यें पाली, सं. भोर, येथें झाला. पुणें येथें न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज यांमध्यें शिक्षण होऊन १९११ सालीं ते बी. ए.ची परीक्षा पास झाले. दोन वर्षें पुण्यास न्यू. इंग्लिश स्कूलमध्यें व नंतर १९१८ पर्यंत दादर येथें जनरल एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश स्कूलमध्यें त्यांनीं शिक्षकांची नोकरी केली व त्याच वेळीं एलएल. बी.चा अभ्यास केला. पुढें महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळांत उपसंपादक या नात्यानें त्यांनीं काम केलें व इतिहास, भूगोल व इतर अनेक विषयांवर त्यांनीं लेख तयार केले. सन १९२० सालीं पुण्यास स्थापन झालेल्या ‘ सरस्वती मंदिर सोसायटी ’ या संस्थेचे नाइट हायस्कूल, पूना इंग्लिश स्कूल वगैरे शाळांच्या संस्थापकांपैकीं हे एक आहत. पाली यथ १९२७ सालापासून ते वकीलीचा धंदा करून सार्वजनिक कामांतहि प्रामुख्यानें भाग घेतात. ]

यद्यदाचरति श्रेष्ठः त्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥

—श्रीमद्भगवद्गीता.

या जगांत श्रेष्ठ पुरुष ज्या प्रकारें वर्तन करतात, त्याचें अनुकरण इतर लोक करीत असतात. ही सामान्य जनसमाजाची प्रवृत्ति असल्यामुळें इतर जनांना अनुकरणीय अशा श्रेष्ठ व्यक्ती कोण कोण होऊन गेल्या त्यांची निवड करून त्यांचें जीवितचरित्र सविस्तर लिहिणें हा चरित्रलेखकांचा व्यवसाय असतो. त्यास अनुसरून आजपर्यंत पुष्कळ पौरस्त्य व पाश्चात्य चरित्रलेखक होऊन गेले आहेत. त्यांत श्रेष्ठ पुरुषांच्या चारित्रांचें तात्त्विक गुणदोषविवेचन करणारे जे लेखक होऊन गेले त्यांनीं श्रेष्ठ पुरुषांची व्याख्या व त्यांच्या जीवनहेतूची मीमांसा ज्या प्रकारें केली आहे, त्याचा विचार या लेखांत करावयाचा आहे.

## प्राचीन ग्रीकरोमन काळ—प्लुटार्क

यूरोपमध्यें प्राचीन ग्रीक-रोमन राज्यांच्या वेळेपासून चालू काळापर्यंत जे थोर थोर कर्तृत्ववान् पुरुष होऊन गेले त्यांची निवड व गुणदोषविवेचन

अनेक लेखकांनीं केलेलें आहे. प्राचीन काळीं असा प्रयत्न 1 Plutarch, 2 Disgence, 3 Laertius, 4 Philostratus वगैरे ग्रीक लेखकांनीं केला. त्यांमध्यें Plutarch चें Parallel-Lives हें पुस्तक विशेष महत्त्वाचें आहे. त्या पुस्तकांत Plutarch नें योद्धे (Warrior), मुत्सद्दी (Statesman), वक्ते (Orator) आणि कायदेप्रवर्तक (Legislator) वगैरे कार्यक्षेत्रांतील थोर थोर ग्रीक पुरुष निवडून त्यांच्याच तोडीचे रोमन रियासतींत जे पुरुष होऊन गेले त्यांची तुलना केली आहे. Plutarch नें राज्यसंस्थापक अशा Theseus आणि Romulus ह्या दोन श्रेष्ठ पुरुषांची तुलना केली आहे. थोर कायदेप्रवर्तक म्हणून ग्रीक Lycurgus आणि रोमन Numa ह्या पुरुषांची निवड केली आहे. सुप्रसिद्ध योद्धे या सदराखालीं ग्रीक Alexander the Great आणि रोमन Julius Cæsar ही जोडी निवडली आहे. आणि ग्रीक Demosthenes या वक्त्याची तुलना रोमन Cicero ह्या वक्त्याशीं केली आहे. याप्रमाणें एकंदर ४६ जोड्या निवडून त्यांचीं तुलनात्मक चरित्रें Plutarch नें लिहिलीं आहेत. Plutarch हा स्वतः ग्रीक असल्यामुळें त्याचा स्वाभाविक ओढा ग्रीक व्यक्तींकडे आढळतो. त्यामुळें त्यानें केलेलें गुणदोषविवेचन सदोष व पक्षपातीपणाचें झालें आहे. तथापि Plutarchनें निरनिराळ्या कार्यक्षेत्रांतील श्रेष्ठ पुरुष विवेचनाकरितां घेतलेले असल्यामुळें त्याचें पुस्तक विविध प्रकारच्या माहितीनें व विचारांनीं भरलेलें अतएव फार वाचनीय झालें आहे.

दुसरा ग्रीक चरित्रलेखक Diogenes यानें फक्त ग्रीक तत्त्ववेत्त्या पुरुषांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. त्यांत Ionian आणि Italian या दोन तत्त्वज्ञानविषयक पंथांतील तत्त्ववेत्त्यांची माहिती बरीच बारकाईनें दिली असली तरी हें पुस्तक गुणदोषविवेचन किंवा तत्त्वज्ञानविषयक चर्चा यापैकीं कोणत्याही दृष्टीनें फारसें मोठ्या योग्यतेचें नाहीं. Philostratus ह्या ग्रीक लेखकानें Lives of Sophists हें पुस्तक लिहिलें आहे. यांतही फक्त सोफिस्ट पंथाच्या तत्त्ववेत्त्यांची माहिती दिली आहे; पण गुणदोषविवेचनात्मक चर्चा फारशी केलेली नांहीं. त्यामुळें हें पुस्तकहि एकदेशीय व सामान्य प्रतीचेंच आहे.

## आधुनिक काळ—कार्लाइल व इमर्सन

ग्रीक वाङ्मयामध्यें श्रेष्ठ पुरुषांच्या चारित्रपर लिखाण वरीलप्रमाणें झालेलें

आहे. रोमन वाङ्मयामध्यें अशाच प्रकारचें लिखाण लिहिणारे लेखक कोणी आढळत नाहींत. विशेषत: Plutarchनें ग्रीक व रोमन ह्या दोन्ही रियासतींतील श्रेष्ठ पुरुषांची निवड करून तुलनात्मक विस्तृत ग्रंथ लिहिल्यामुळें रोमन ग्रंथकारांनीं पुन्हां या विषयावर लिहिलें नसावें असें वाटतें. आधुनिक काळांत इंग्लिश व अमेरिकन वाङ्मयांत श्रेष्ठ पुरुषांची निवड करून तात्त्विक दृष्ट्या श्रेष्ठपणाची मीमांसा करणारे दोन सुप्रसिद्ध ग्रंथकार होऊन गेले. ते म्हणजे इंग्रज लेखक थॉमस कार्लाइल आणि अमेरिकन लेखक इमर्सन हे होत. कार्लाइलनें आपल्या ‘ हीरोज’ची आणि इमर्सननें आपल्या ‘ रिप्रेझेंटेटिव्ह मेन ’ची निवड ज्या प्रकारानें केली आहे, त्या प्रकाराकडे लक्ष देऊं. ‘ हीरो ’ व ‘ ग्रेट मॅन ’ हे शब्द कार्लाइलनें समान अर्थानें वापरले आहेत; आणि ‘ ग्रेट मॅन ’ तरी कोणाला म्हणावे ह्या प्रश्नाचें कार्लाइलचें उत्तर पुढीलप्रमाणें आहे:—

Universal History, the history of what man has accomplished in this world, is at bottom the history of the great men who have worked here. They were the leaders of men, these great men, the modellers, patterns, and in a wide sense creators of whatsoever the general mass of men contrived to do or to attain. All things that we see standing accomplished in the world are properly the outer material result, the practical realisation and embodiment of thoughts that dwelt in the great men sent into the world, the soul of the whole world's history, it may justly be considered, were the history of these.”
आज जी धार्मिक, नैतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक वगैरे बाबतींत स्थिति प्राप्त झाली आहे, ती प्राप्त करून देण्याला ज्या मुख्य व्यक्ती ( निरनिराळ्या काळांतल्या व निरनिराळ्या देशांतल्या ) कारणीभूत झाल्या आहेत त्यांना कार्लाइल ‘ ग्रेट मेन ’ म्हणतो.

इमर्सननें आपल्या ‘ रिप्रेझेंटेटिव्ह मेन’ची निवड निराळ्या प्रकारें केली आहे. कार्लाइलनें ‘हीरो अँड हीरोवर्शिप’ बद्दलचें स्वत:चे विचार प्रथम सहा व्याख्यानांच्या द्वारें सन १८४० मध्यें लंडनमधील श्रोत्यांपुढें मांडले; आणि

इमर्सननें ' रिप्रेझेंटेटिव्ह मेन 'बद्दलचे आपले विचार सात व्याख्यानें देऊन सन १८४५-४६ मध्यें बोस्टन ( अमेरिका ) येथील श्रोत्यांपुढें मांडले. कार्लाइल व इमर्सन यांच्यामध्यें पत्रव्यवहारहि होत असे. तात्पर्य, कार्लाइलनें केलेली ' हिरोज्'ची व्याख्या व निवड इमर्सनला माहित होती. इमर्सननें ' हिरो ' हा शब्द न वापरतां ' रिप्रेझेंटेटिव्ह मॅन ' हा शब्द वापरला आहे, पण ' रिप्रेझेंटेटिव्ह मॅन ' याला ' ग्रेट मॅन ' हाच प्रतिशब्द इमर्सननें वापरला असून त्याची व्याख्या त्यानें पुढीलप्रमाणें केली आहे:—

A great man is not an individual, who, by his unusual power, has raised himself above his fellows and is enabled to direct their thoughts and actions, but is a man of this spirit ( of the Diety ) than his fellows and thus enables them to know the possibilities of humanity. The genus ( spirit ) of humanity is the right point of view of history. The qualities abide; the men, who exhibit them have now more, now less, and pass away.

God is the all and in all. Man shares his nature, and hence is divine. ( This in his *i. e.* Swedenborg's teaching attracted Emerson so powerfully ).

जो मनुष्य आपल्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेनें मानव जातीच्या विचारांना आणि कर्तबगारीला दिशा दाखवितो तोच ' ग्रेट ' म्हणतां येत नाहीं; तर ज्या मनुष्या-मध्यें ईश्वरी अंश इतरांपेक्षां विशेष अधिक असेल तो मनुष्य 'ग्रेट' समजावा. ईश्वर सर्वत्र व सर्वांमध्यें आहे. तात्पर्य, जो मनुष्य ईश्वराचा अंश म्हणून शोभण्यासारखा आहे, तो ' ग्रेट ' होय, असें इमर्सनचें मत दिसतें.

कार्लाइल व इमर्सन यांनीं आपल्या ग्रंथांतील थोर पुरुषांची निवड कोणत्या तत्त्वानुसार केली हें वरील विवेचनावरून दिसून येतें; आणि या दोघांची निवड करण्याची दृष्टि निरानिराळी होती हें स्पष्ट दिसतें. तथापि निवड करण्याची दृष्टि निरानिराळी असूनहि दोघांनीं निवडलेल्या व्यक्तींपैकीं कांहीं व्यक्ती एकच आहेत, असें पुढील तुलनेवरून दिसून येईल.

| कार्लाइलचे हीरो | | | | इमर्सनचे रिप्रेझेंटेटिव्ह मेन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नांव | प्रकार | देश | काल | नांव | प्रकार | देश | काल |
| ओडिन | मुख्य देव | स्वीडन | | १ प्लेटो | तत्त्ववेत्ता | ग्रीस | खि. पू. ४२७-३४७ |
| पैगंबर | प्रॉफेट | अरबस्तान | ५६९-६३२ | २ स्वेडेनबर्ग | ,, | स्वीडन | १६८८-१७७२ |
| डांटे | कवि | इटाली | १२५६-१३२१ | | | | |
| शेक्स्पियर | नाटककार | इंग्लंड | १५६४-१६१६ | ३ शेक्सपियर | | | |
| लूथर | धर्मसुधारक | जर्मनी | १४८३-१५४६ | ४ मॉंटेन | ,, | फ्रान्स | १५३३-१५९२ |
| नॉक्स | धर्मसुधारक | स्कॉटलंड | १५०५-१५७२ | | | | |
| जॉन्सन | ग्रंथकार | इंग्लंड | १७०९-१७८४ | ५ गोएटे | कवि,नाटककार व तत्त्ववेत्ता | जर्मनी | १७४९-१८३२ |
| रूसो | तत्त्ववेत्ता | फ्रान्स | १७१२-१७७८ | | | | |
| बर्न्स् | कवि | स्कॉटलंड | १७५९-१७९६ | | | | |
| क्रॉमवेल | लॉर्ड प्रोटेक्टर | इंग्लंड | १५९९-१६५८ | | | | |
| नेपोलियन | बादशाहा | फ्रान्स | १७१-२१ | ६ नेपोलियन | | | |

## इतिहासकारांची ' धी ग्रेट ' पदवी

कार्लाइल व इमर्सन या प्रख्यात लेखकांखेरीज थोर पुरुषांची निवड करणारा आणखी एक लेखकांचा वर्ग आहे, तो इतिहासलेखकांचा होय. इतिहासकारांनीं प्राचीन व अर्वाचीन कालांतील ऐतिहासिक व्यक्तींपैकीं अत्यंत श्रेष्ठ पुरुषांना 'दी ग्रेट' ही पदवी देण्याचा क्रम सुरू केला आहे. त्यास अनुसरून पुढील ऐतिहासिक श्रेष्ठ पुरुष ठरले आहेत:—

| प्राचीन यूरोप | अर्वाचीन यूरोप | हिंदुस्थान |
| --- | --- | --- |
| १ अलेक्झांडर दी ग्रेट | ३ पीटर दी ग्रेट | ५ अकबर दी ग्रेट |
| २ आल्फ्रेड दी ग्रेट | ४ फ्रेडरिक दी ग्रेट | |

हे सर्व पुरुष शूर सेनापती असून त्यांनीं आपल्या राज्यांत सुधारणा करून राज्यकारभार चांगला म्हणजे लोककल्याणकारक रीतीनें चालविला होता. तथापि एकंदरीनें या पुरुषश्रेष्ठांचें ध्येय आपापल्या देशाच्या प्रजेचें कल्याण करणें इतकेंच मर्यादित असल्याचें दिसतें.

याप्रमाणें पाश्चात्य लेखकांनीं श्रेष्ठ पुरुषांची जी निवड केली आहे तिचा तत्त्वज्ञानदृष्ट्या विचार करूं. तत्त्वज्ञानांतले दोन प्रमुख पंथ उपयुक्ततावाद ( युटिलिटेरिॲनिझम् ) आणि अध्यात्मवाद हे होत. कार्लाइलची निवड Greatest good of greatest number या उपयुक्ततावादाच्या दृष्टीनें केलेली दिसते तर इमर्सनची निवड भारतीय तत्त्वज्ञानांतील अध्यात्मवादाप्रमाणें म्हणजे ईश्वरी अंशाची कसोटी लावून केलेली दिसते. इतिहासकारांची ' दी ग्रेट ' ही पदवी उपयुक्ततावादाच्या कसोटीसहि टिकत नाहीं; कारण त्यांनीं 'दी ग्रेट' ही पदवी दिलेले राज्यकर्ते आपापल्या राज्यांचें कल्याण पाहाणारे होते, जागतिक हित किंवा पुष्कळांचें पुष्कळ हित या तत्त्वानुसार वागणारे नव्हते. प्लुटार्कनें तर ग्रीस व इटली या दोन देशांतल्याच व्यक्ती निवडल्या आहेत. जगांतील इतर देशांकडे मुळींच पाहिलें नाहीं; किंवा श्रेष्ठ पुरुषांची निवड करतांना उच्च तत्त्वज्ञानाची दृष्टीहि वापरलेली दिसत नाहीं. पाश्चात्य लेखकांची दृष्टी पुरुषश्रेष्ठांची निवड करतांना कोणत्या प्रकारची होती हें पाहिल्यानंतर आपल्या भारतीय लेखकांच्या निवडीकडे वळूं.

## भारतीय संस्कृति–भगवद्गीतेंतील प्रतिपादन

पाश्चात्य लेखकांनीं श्रेष्ठ पुरुषांची निवड करतांना हिंदुस्थानांतला एकहि पुरुषश्रेष्ठ विचारांत घेतला नाहीं. कार्लाइलच्या दृष्टीला महंमद पैगंबर दिसले, परंतु हिंदुस्थानांतील श्रीराम, श्रीकृष्ण, पांडवांपैकीं धर्म, बुद्ध, शंकराचार्य, किंवा अशोक, शिवाजी वगैरे कोणीहि इसम दिसला नाहीं. पाश्चात्य इतिहासकारांनीं हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांपैकीं फक्त इस्लामी धर्मांतला अकबर याला ' दी ग्रेट ' पदवी दिली, आणि बौद्ध व हिंदु धर्मांत श्रीराम वगैरे राजांच्या प्राचीन काळापासून चालू काळापर्यंत एकालाहि 'दी ग्रेट' पदवी दिल्याचें दिसत नाहीं. हा भयंकर दृष्टिदोष होय. वास्तविक भारतीय संस्कृत वाङ्मय अलीकडे निदान शंभर वर्षे तरी इंग्रज पंडितांस ज्ञात असून वॉरन हेस्टिंगच्या वेळेपासून हिंदुस्थानचा मागील इतिहास इंग्रजांस ज्ञात झाला आहे. परंतु मॅकॉलेनें भारतीय वाङ्मयाबद्दल जे तुच्छतादर्शक उद्गार काढले त्याचप्रमाणें कार्लाइलनें सर्व हिंदुस्थानबद्दल पुढील मत प्रदर्शित केलें आहे. ' हीरो अँड हीरोवर्शिप ' या ग्रंथांत शेक्सपिअर या हीरोबद्दल लिहितांना असें मत दिलें आहे कीं, " Consider now, if they asked us, Will you give up your Indian Empire or your Shakespeare, you English; never have had any Indian Empire, or never have had any Shakespeare? Really it were a great question. Official persons would answer doubtless in official language; but we, for our part too, should not we be forced to answer: Indian Empire or no Indian Empire, we cannot do without Shakespeare! Indian Empire will go, at any rate, some day; but this Shakespeare does not go. He lasts forever with us; we cannot give up our Shakespeare! " शेक्सपिअर कीं हिंदुस्थान असा प्रश्न आल्यास हिंदुस्थान सोडण्यास आम्ही इंग्रज लोक तयार होऊं, पण शेक्सपिअरला गमावणार नाहीं. तात्पर्य, पाश्चात्य लेखकांना हिंदुस्थानांत जगांतल्या श्रेष्ठ पुरुषांच्या मालिकेंत बसविण्यासारखा एकहि इसम आढळला नाहीं. असो. श्रेष्ठ पुरुष किंवा पुरुषोत्तम कोणाला म्हणावें याबद्दल श्रीमदभगवद्गीतेंत फारच चांगली फोड केली आहे. भारतीय तत्त्वज्ञान पूर्ण अध्यात्मपर असल्यामुळें

सर्व भूतमात्रामध्यें ईश्वर आहे हें मूलतत्त्व गृहीत धरून श्रेष्ठ पुरुषाची मीमांसा गीतेंत केली आहे. त्यांपैकीं एक श्लोक असा आहे कीं,

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा।
तत्तदेवावगच्छ त्वं ममतेजोंऽशसंभवम्।

सामान्य जनांपेक्षां वरच्या दर्जाचे जे पुरुष असतात, ते 'मम तेजोंऽशसंभव' म्हणजे माझ्या तेजाचा अंश धारण करणारे असतात, असें श्रीकृष्ण सांगतात. पण त्याच्याहि वरची पायरी 'सर्वश्रेष्ठ पुरुषांची' होय. सर्वांत श्रेष्ठ पुरुष म्हणजे आमच्या भारतीय दृष्टीनें परमेश्वराचा प्रत्यक्ष अवतारच मानला जातो. कारण असा पुरुष परमेश्वराप्रमाणें सर्वगुणसंपन्न व निर्दोष असतो असें आम्ही मानतों. अशा पुरुषांचा अवतार केव्हां होतो त्याबद्दल गीतेंतच सांगितलें आहे तें येणेंप्रमाणें:—

यदायदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

भूतलावर जेव्हां जेव्हां अधर्म, अनीति माजते आणि दुष्ट लोक सज्जनांचा छळ करूं लागतात, तेव्हां ईश्वर अवतार घेतो, आणि दुष्टांचा नाश करून धर्माची संस्थापना करतो, असें गीता सांगते. याप्रमाणें मत्स्य, कूर्म, वराह इत्यादि दशावतार आपण हिंदू लोक मानतों. जो परमेश्वराचा पूर्ण अवतार व सर्व लोकहितरत असणें हें ज्याचें जीवनकार्य त्यास आपली भारतीय संस्कृति श्रेष्ठ पुरुष ठरविते आणि ही भारतीय दृष्टि वर उल्लेख केलेल्या सर्व पाश्चात्य लेखकांच्या दृष्टीपेक्षां अधिक उच्च प्रकारची आहे, असें मला वाटतें.

### भक्तिमार्गीयांचें मत

पण आपल्या हिंदु संस्कृतींत श्रेष्ठपणाची आणखी एक वरची प्रत आहे. ती साधुसंतांची होय. खुद्द परमेश्वरापेक्षांहि साधुसंत अधिक श्रेष्ठ होत, असें आपण मानतों. तुकाराम महाराजांनीं—

॥ जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥
॥ तोचि साधू ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥

असें म्हटलें आहे. म्हणजे साधू व देव एकाच पायरीवरचे व सारख्याच योग्यतेचे असल्याचें वरील अभंगांत म्हटलें आहे. ख्रिस्ती धर्म किंवा इस्लामी धर्म यांना ही कल्पना मुळींच मान्य होण्यासारखी नाहीं; कारण खुद्द जीझस् ख्राइस्ट यांना ख्रिस्ती लोक देवाचा पुत्र मानतात, देवाच्या बरोबरीचा मानीत नाहींत. इस्लामी धर्मांतहि महंमद पैगंबर यांना देवाचा प्रेषित (Prophet) मानतात; देवाच्या बरोबरीचा किंवा देवाचा अवतार मानीत नाहींत. उलटपक्षीं आपल्या भक्तिमार्गांत व वारकरी पंथांत साधुसंतांना ईश्वराहूनहि श्रेष्ठ मानतात; आणि याचें कारण असें आहे कीं परमेश्वराचें अवतारकार्य, साधुसंतांचें रक्षण आणि दुष्टांचें संहरण म्हणजे हिंसात्मक कार्य असल्याचें भगवद्गीता सांगते. पण साधुसंतांना "अहिंसा परमो धर्मः" हें वचन प्रमाण आहे व साधुसंतांचें या जगांतील कार्य ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीचे शेवटीं फार सुंदर तऱ्हेनें वर्णिलें आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथलेखनाचें कार्य पूर्ण झाल्यावर ज्ञानेश्वर अखेरीस लिहितात—

॥ आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ॥
॥ तोषोनी मज द्यावें । पसायदान हें ॥
॥ जें खळाची व्यंकटी सांडों । तया सत्कर्मीं रती वाढो ॥
॥ भूतां परस्परें पडो । मैत्र जिवाचें ॥

याचा अर्थ असा कीं, दुष्ट लोकांच्या मनांतील दुष्ट विचार नाहींसे व्हावेत, त्यांचीं चांगलीं कृत्यें करण्याकडे आवड वाढो आणि सर्व जीवमात्र परस्पर स्नेहभावानें या जगांत नांदोत; असें मागणें ज्ञानेश्वर देवाजवळ मागतात. याचा अर्थ स्पष्टच आहे कीं, दुष्टांच्या संहाराचें हिंसात्मक कार्य साधु-संतांना मान्य नाहीं; तरः—

॥ ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥

या तत्त्वानुसार जर ईश्वर सर्व भूतमात्रांत आहे तर केवळ दुष्ट लोकांचे दुष्ट मनोविकार नाहींसे करणें व त्यांना सन्मार्गाला लावणें हें कार्य अधिक श्रेष्ठ होय आणि साधुसंत हेंच कार्य करतात, म्हणून साधुसंतांचें जीवनकार्य ईश्वराच्या अवतारकार्यापेक्षां नीतिशास्त्रदृष्ट्या अधिक श्रेष्ठ प्रतीचें ठरतें. युनिव्हर्सल ब्रदरहुडपेक्षांहि हें आमच्या साधुसंतांचें ध्येय अधिक उच्च आहे;

कारण या ध्येयांत फक्त मानव जातीचाच समावेश होत नसून अखिल भूतमात्रांचा म्हणजे मानवेतर प्राण्यांचा, सिंह, व्याघ्र, सर्पादि हिंस्र प्राण्यांचाहि दुष्ट स्वभाव नष्ट करण्याच्या कार्याचा समावेश होतो व याप्रमाणें पुरातन काळापासून जे तपोधन महान् ऋषि, साधुसंत होऊन गेले त्यांना सिंह, वाघ, सर्प आदि दुष्ट प्राणी इजा न करतां ऋषीच्या तपोभूमींत परस्परांचा वैरभाव विसरून एकत्र राहतात असें आमचे ग्रंथ सांगतात, आणि अशा प्रकारचे ऋषि, साधुसंत हेच सर्वश्रेष्ठ पुरुष होत.

---

# *वीरपत्नी येसूबाई पंतसचिव

[ श्रीछत्रपति शाहूमहाराज बादशहाच्या कैदेंतून सुटून दक्षिणेंत येण्यास निघाले, इतकी बातमी राजाराममहाराज यांचें कुटुंब ताराबाईसाहेब यांस समजतांच त्यांनीं सर्वांचीं मनें आपल्या तर्फेला मिळवून घेण्याची खटपट केली. इतकेंच नव्हे तर " सर्वांपुढें दूधभाताचें ताट भरून आणून त्याच्यावर हात ठेवून शपथक्रिया करून घेतली." त्या वेळीं **शंकराजी नारायण** ( चालू घराण्यांतील पहिले पंतसचिव) यांनाहि ताराबाईसाहेबांकरितां शपथ घ्यावी लागली. तदनंतर "**शंकराजी नारायण** यांस शाहूमहाराजांनीं भेटीस येणें ( म्हणून ) पत्रें पाठविलीं होतीं. तेव्हां आईसाहेबांस इमान दिल्हें याजमुळें गेलें असतां क्रियाभ्रष्टता होती व महाराज धणी तख्ताचे व खावंद, न गेलें तरी हरामखोरी येती असें दोन्हीकडून संकट जाणोन आले नाहींत. यानंतर महाराजांनीं बोलावण्यास कांहीं फौज रवाना केली. त्यांचे स्वाधीन राजगड करून—

१–२०. आपण अंबवडे येथें नागनाथ तीर्थ आहे तेथें संन्यासग्रहण ( करून ) देहत्याग करावासा विचार करून, विष हिरकणी घेऊन, संन्यासग्रहण केलें. आणि जळसमाधि करून देहत्याग केला. त्या वेळीं त्यांचे पुत्र **नारो शंकर** ( दुसरे पंतसचिव) दोन वर्षांचे पाळण्यांत होते व रांझेकर त्यांचे

---

* ( प्रस्तुत लेखक संस्थानचे नोकर आहेत, परंतु त्यांची इच्छा अज्ञात रहाण्याची असल्यामुळें आम्हांस त्यांची माहिती देतां येत नाहीं.—सं., सा. तो.)



श्री. वाग्भट नारायण देशपांडे.



रावसाहेब अनंत रामचंद्र जोशी.



डॉ. केशव रामचंद्र दिवेकर.



डॉ. वासुदेव रामचंद्र दिवेकर.



माधवानुज ( मोडक )



चित्रकार कृष्णाजी रघुनाथ केतकर.



श्री. वासुदेव पुरुषोत्तम डोंगरे.



श्री. गोविंद विष्णु चिपळूणकर.

मुतालिक कारभारी होते." शंकराजी नारायणांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी येसूबाई यांचा विलाप वगैरे.

२१–४६. मुतालीक ( कारभारी किंवा दिवाण ), रांझेकर यांचें येसूबाईला उद्देशून सांत्वनपर कळकळीचें भाषण आणि उद्बोधक व उत्तेजनपर उपदेश वगैरे. कालगतीनें येसूबाईच्या शोकाग्नीचें उपशमन.

४७–५०. शंकराजी नारायण निवर्तल्याचें वर्तमान शाहूमहाराजांस समजलें तेव्हां त्यांस आश्चर्य वाटलें. त्यांनीं लागलींच नारो शंकर यांस सचिवपदाचीं वस्त्रें पाठवून त्यांच्या नांवची सनदहि पाठवून दिली.

५१–५८. नारो शंकर यांच्या नांवानें येसूबाई कारभार पहावयास लागल्यास उणीं पुरीं चार वर्षे झालीं नाहींत तोंच त्या वेळेस दमाजी थोरात नांवाच्या बंडखोरानें जी पुंडाई माजविली होती तिच्या बंदोबस्ताच्या कामगिरी-संबंधानें महाराजांचें पत्र येऊन पोहोंचलें. येसूबाईनीं आज्ञेप्रमाणें आपल्या मुतालिकाच्या संमतीनें फौजेची जमवाजमव करून, त्यांस, आपलें सहा वर्षांचें अर्भक नारो शंकर यांस बरोबर देऊन, थोरातावर रवाना केले वगैरे.

५९–७३. येसूबाईची पुत्राच्या सुरक्षितपणाबद्दल चिन्ताकुलता व त्यांचें मातृवात्सल्य.

७४–८०. मुतालिक व नारो शंकर दोन्ही बंधनांत पडल्याची खबर व त्यामुळें येसूबाईची अवस्था.

८१–८२. शाहूमहाराजांचा येसूबाईस धीर देणारा संदेश व नारो शंकर यांस बंधनांतून सोडविण्याच्या कामावर बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची रवानगी.

८३. बाळाजी विश्वनाथाकडून नारो शंकराची बंधनमुक्तता व त्याबद्दल येसूबाईकडून त्यांस पुरंदर किल्ल्याची देणगी.

८४–९१. येसूबाई संस्थानचा कारभार पहात होत्या तेव्हां परभु देशकुळकर्णी व गांवकुळकर्णी यांच्या वतनाचा एक तंटा सरकारांत आला. एका पक्षाच्या मंडळींनीं कारभारी वगैरे मंडळीचें संधान बांधून दुसऱ्या पक्षाचें वतन येसबाईकडन आपल्याकडे करून घेतलें. त्यांत दुसऱ्या पक्षाचें घरदार वगैरे सर्व जबरीनें घेतलें. त्या घराच्या आवारांत तेथील मालकाच्या हातचें डाळिंबाचें झाड होतें तेंहि त्याबरोबरच गेलें. " ज्या डाळिंबाच्या झाडास फळें फार आलीं होतीं, जबरदस्ती करून वतनाचा

कागद घेतल्यावर सहा महिन्यांनीं त्या झाडाचीं फळें उगीच झडून डाळिंबाचें झाड वाळलें हें वर्तमान येसूबाईस कळलें तेव्हां त्या वाडी तर्फ उत्रवली येथून स्वार होऊन कारीस झाड पहावयास आल्या. यऊन झाड वाळलें पाहून आक्रोश केला जे. परभुवतन बळेंच चवघांनीं भरीं भरून घेतलें हें झाडास देखील मानलें नाहीं. माझा वंश चालत नाहीं. ऐसें ह्मणून कारभारी यांस शिव्यागाळी देऊन गेल्या; पुढें तें वतन त्यांनीं नारो शंकर यांस सांगून सोडून दिलें."

९२–९८. "पुरंदर किल्ल्याखालीं (बेलसर) या नांवाच्या खेड्यांत एक कुळकर्णी रहात होता. त्याच्याजवळ रामाच्या मूर्ति होत्या. तो कुळकर्णी त्या मूर्तींचा रामनवमीच्या दिवशीं मोठा उत्सव करीत असे. पुढें त्याला दुर्दशा प्राप्त झाल्यानें तो त्या मूर्तींचा उत्सव करीनासा झाला. तेव्हां एके दिवशीं त्या कुळकर्ण्यास दृष्टांत झाला कीं, तूं आमच्या मूर्ति सचिवांकडे नेऊन दे; म्हणजे ते आमचा उत्सव करतील. इकडे त्याचप्रमाणें नारो शंकर यांस दृष्टांत झाला कीं, तुमच्याकडे कोणी रामाच्या मूर्ति आणून देईल त्या घेऊन त्यांचा उत्सव तुम्ही करीत जावा. नंतर त्या कुळकर्ण्यानें चैत्र शु. ८ च्या दिवशीं त्या रामाच्या मूर्ति नारो शंकर यांस भोरानजीकच्या ओढ्याजवळ दिल्या. त्यावरून त्या ओढ्यास रामबागचा ओढा असें नांव पडलें आहे." येणेंप्रमाणें

**श्रीरामजन्मोत्सवाचा उपक्रम**

होऊन हा उत्सव सचिवांचे येथें आज दोनशें वर्षें अव्याहत चालू आहे.

९९. येसूबाईंचें निर्याण.

१००. नारो शंकर यांचें देहावसान.

१०१. भरतभूमींत अशीं स्त्रीरत्नें पुन्हा निर्माण होण्याविषयीं लेखकाची उत्कंठा. ]

**टीप:**—वरील माहिती चिटणीसकृत "थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र" व भागवतकृत "भोर संस्थानचा इतिहास" यांवरून संकलित केली आहे.

पतिनें[1] इहलोक सोडितां करि आक्रोश सती यशोमती[2]!
तनुदाह अनंग पावतां करिती जाहलि जेंवि ती रती. १

" अजि सोडुनि नाथ! जातसां मजला आम्रवटींत[3] एकटी!
उपजे न विचार तो कसा निजभार्या करि काय संकटीं? २

जननीजनकांस सोडुनी अपुल्या सन्निध येउनी वसें.
निज आश्रित सोडितां कसें? करिती सज्जन कां कधीं असें? ३

न कळे अपराध कोणता घडला पाहुनि कोप जाहला.
इहलोकचि सोडणें तरी नच हें शासन योग्य हो मला! ४

चुकल्यें म्हणतें क्षमा करा चरणीं लोळण घेतसें पहा!
कर जोडुनि याचितें दया नच मातें सहवे वियोग हा! ५

मम एक असो अपात्रता नुपजे ज्यास्तव अंतरीं दया
तरि हो! निज अर्भकावरी धरिली निष्ठुर वृत्ति कासया? ६

अयि नाथ! बघा बघा तरी अजि हा! हाय! अनाथ पोरका!
त्यजुनी असला हिरा कसें दिधलें प्राणचि मोल हीरका?" ७

मग मूर्छित होउनी सती कदलीच्या सम भूवरी पडे
सचराचर वस्तुजातही अनुकंपावश होउनी रडे! ८

जलसिंचन तैं मुखावरी करिती सेवक येउनी जवें
करिं घेउनि वीजना जरी हलवीती नच मोह मालवे! ९

---

१. श्री. शंकराजी नारायण (चालू घराण्यांतील पहिले पंतसचिव). २. यशोमती—श्री. येसूबाईसाहेब पंतसचिव. ३. आम्रवटी=आंबवडें. हें ठिकाण भोरचे नैर्ऋत्येस ९ मैलांवर आहे. येथें शंकराजी नारायण यांची समाधि असून त्या ठिकाणीं दर कार्तिक शुद्ध द्वादशीस त्यांचे पुण्यस्मरणार्थ उत्सवसमारंभ साजरा करण्यांत येतो.

घडली न उपायसाध्य जी पतिच्या ये स्मरणेंच जागृती
"अरि मर्दुनि पातले गृहीं तरि कां हो ! मजला न भेटती ?" १०
वदुनी वच यापरी उठे परि तीतें नच तोल सावरे
धरितां परि सेवकें कळे तिज वस्तुस्थिति हाय हाय रे ! ११
असतां जणुं मूर्छनावश क्षण विश्रांतिसुखास पावली
परि होय विबोधिता सती फिरुनी शोकविवर्ती पातली ! १२
अनुशोचन तैं करावया जमले सेवक आप्त सोयरे
बघतां तिज मुग्ध जाहले नच यांतील कुणी पुढें सरे ! १३
बघुनी सकलांस तेधवां बहु वक्षःस्थल घेइ ताडुनी !
जणुं ये हृदिं दुःखसागरा भरती आप्तमुखेंदु देखुनी. १४
"फुटलें जन हो ! कपाळ हें, मुख झालें घनकज्जला सम !
पति मारुनि हो ! पहा कशी तनु राहे अविभग्न ही मम ! १५
पतिदुःख बघोनि दुःखिता सुखिनी हो पतिसौख्य पाहतां
मृत तो जरि होय ती मृता समजें मी तिजला पतिव्रता. १६
पतिनें परलोक गांठितां जगते ती कसली पतिव्रता !
पवनें तरु पाडिल्यावरी तगते काय तदाश्रिता लता ? १७
मम दर्शन होय यापुढें सकलां वर्ज्य अभद्रसूचक !
सहवे न मलाहि यापुढें जगणें हें अतिकष्टदायक ! १८
सति जाउनिया चुकेलना पतिमागें जगणें मृतासम ?
करितां मग कां विलंब हो ! रचणें सत्वर ती चिता मम. १९
जगिं या निवसेल कां कुणी सुरलोकीं पति हांक मारितां
समजे मज धन्य मी तरी असली संधि मिळे अयाचिता." २०
रडतां नयनाश्रु आटती वदतां तन्मुख शुष्क होतसे
बघुनी तंव संधि ही मुतालिक रांझेकर बोलती असें–२१

"अपुला नच शोक पाहवे म्हणुनी बोलतसें कसा तरी
तरि ऐकुनि दोन शब्द हे मज देवी! कृपया क्षमा करीं! २२
असती अपुले पती जसे असती ते अमुचे धनी तसे
अमुच्यापरि तें आम्हांसही लघुमोठें तरी दुःख होतसे. २३
जरि दुःख अम्हांस होतसे नच हो! आपुलिया समान तें
परि छत्र शिरावरी नुरे म्हणुनीया तरि चित्त फाटतें! २४
जरि चित्त विकार पावतें तरि सुज्ञें न विवेक सोडणें
मनुजापरि देवदानवां चुकतेंना कधिं भोग भोगणें! २५
वदतां अजि सर्व तें खरें नच सीमा खलु दुःखसागरा
परि गोष्ट घडूं नये घडे, करणें योग्य विचारही जरा. २६
जगिं धन्य अशा पतिव्रता पतिसंगें निजकाय होमिती!
परि धन्य तशाच योषिता पतिमागें स्वजनांस रक्षिती! २७
भलतें सलतें करूं नये असतां सत्सुत पाळण्यामध्यें
पतिसंगम पुण्य दे जसें घडतें तत्सुत पाळण्यामध्यें! २८
जपणें पतिलब्धवैभवा निजबाळावरि लक्ष देउनी
परिपालन आमुचें तसें करणें योग्यचि काळ पाहुनी. २९
अजि केवळ हो! असा पुढें मग देखा अमुचा पराक्रम!
अपुल्या वचनांत राहुनी पुढतीं चालवुं पूर्विचा क्रम ३०
अपुल्यावरि भिस्त आमुची जननी आपण तात आपण!
अपुल्याकरितां करीन ही तनु संतर्पण हा असे पण! ३१
जरि सोडुनि जाल हो तुम्ही मग तें कोण आम्हांस रक्षिल
जनदैवगती जशी असे तसली बुद्धि तुम्हांस होइल! ३२
सुजनां वदणें न याहुनी सुचला मार्गचि दाविला जरा
अधिकोत्तर बोललों असें तरि दासा जननि! क्षमा करा!" ३३

समयोचित भाषणें अशा सतिची वृत्ति जरा स्थिरावली
जणुं बोधसुधासुवर्षणें विरहाग्नी-झळ शांत जाहली ! ३४

वदनोत्सुक ती असे असें दिसलें स्पष्ट तिच्या मुखावरी
इतुक्यांतचि धात्रि पातली तनया[४] घेउनिया कडेवरी. ३५

कटिचें उतरोनि बालका जननीसन्निध ठेविलें तिनें
तनया बघुनीहि माय ती विसरो आधिस याच हेतुनें. ३६

धरणीवर लोळतां तनू जननीची क्षितिधूलिधूसरा !
शिरिं केश विकीर्ण तेंवि हो दिसली वास्तव मूर्ति भेसुरा ! ३७

असला अवतार तो तिचा बघुनी तें मनिं पावुनी भय
तिज सोडुनि पातलें पुन्हां निजधात्रीनिकटीं स्तनंधय ! ३८

"अयि कोन ग तांग ही तली ललते कां कुनि मालिलें हिला
अग तोलुं नको नको अशी तल गे येथुनि दूल ने मला." ३९

श्रवुनी मृदु बोल बोबडे बघुनी तद्भयसंकुलानना
करिती जन शोक ती करी जननी गद्गदकंठरोदना ! ४०

वदती जन तेधवां तिला " अपुला हा क्षण शोक आवरा
भयभीत दिसे पहा कसा ! तनयातें जवळीं जरा करा." ४१

उठुनी मग घट्ट पोटिशीं धरि चुंबी तनयांबुजानन !
गवसेल जगांत हो कुठें जननीच्या सम कोवळें मन ? ४२

बघुनी सुत मायसन्निधीं जननीच्या चरणांस वंदुनी
जन जाति निरोप घेउनी निजगेहाप्रति कष्टि होउनी ! ४३

मनुजां नच होय साध्य जें घडवीतो सहजीच काळ तें
अजि दुःख वियोग देइ जें दिन जातां नच तेंवि भासतें ! ४४

४. श्री. नारो शंकर ( दुसरे पंतसचिव ).

हलकें हलकें जसा जसा बसवी अंमल काळ आपुला
स्मरतो गतगोष्टिला सदा असला मानव कोण देखिला ? ४५

तरि याच रितीं यशोमती-हृदयीं काळ जसा पुढें सरे
उपजोनि विचारजागृती पतिमृत्यूद्भव शोक ओसरे. ४६

तिकडे गतवृत्त सर्वही कळलें छत्रपतीस जेधवां
बहु विस्मय पावले मनीं घडलें कोंवि असें नृपुंगवा ! ४७
करितीं बहुमान तत्क्षणीं सचिवस्थान सुतास देउनी
ह्मणती " करिं कारभार तूं जनकाच्या सम दक्ष राहुनी " ४८
वरुनी जरि अर्भकास ते वदले तज्जननीस लक्षुनी
म्हणुनी पतिकार्य चालवी मनिंचें दुःख मनांत ठेवुनी. ४९
सुतपालन राजकारणा करि कर्तव्यचि ती करावया
न च अन्य तयास कारण जगलीही नच जीविताशया. ५०
करितां पतिकार्य ती सती वरुषें चारहि तीं न लोटलीं
तंव संकट पातलें दुजें पहिल्याची स्मृति जों न लोपली. ५१

कळवी तिज शाहु भूपती " अरि थोरांत[६] बहूत मातले
धरुनीहि तयास शासना करणें प्राप्तचि आजि जाहलें. ५२
तरि धाडिं मुतालिकासवें स्वसुतातें अरिबंधनास्तव
करितां न विलंब कार्य हें करिं कर्तव्यचि हें असे तव." ५
तनयास वदे सती तदा "नृप–आज्ञा करणें प्रमाण ती
तनु देशहितार्थ वेंचिती नर तेव्हांच यशास पावती ! ५४
तरि होउनि सज्ज जा झणीं रिपुरक्तीं समशेर पाजवी
जगीं वीरसुतोचिता कृती करुनीया निजनाम गाजवीं ! ५५

५. श्रीछत्रपती शाहूमहाराज. ६. बंडखोर दमाजी थोरात.

रणिं संकट पाततां तुला जनकाच्या चरणांस आठवीं
स्मरणें प्रगटेल धैर्य हें वच माझें हृदयांत सांठवीं." ५६
श्रवुनी वच वीरवृत्ति ती तनयाच्या हृदयीं उचंबळे
मग जाऊनि सिद्ध होय तो निघतांना जननीकडे वळे. ५७
"करणें नच काळजी तुवां झणिं थोरात करीन बद्ध मी."
वच बोलुनि हें सुपुत्र तो जननीच्या चरणांस तैं नमी. ५८
सुत जाय निरोप घेउनी तंव चिंताकुल माय होउनी
स्मरुनी दिनयामिनी तया बसली तत्पथिं दृष्टि लावुनी! ५९
"किति पाहसि अंत ईश्वरा! न च ये रे! करुणा कशी तुला!
न मनीं नच कल्पनेंतही धरिलें म्या कधिं पाप हेतुला. ६०
घडलें तरि पाप जन्मि या अथवा मागिल जन्मि ना कळे
म्हणुनी न उसंत पावतां शिरिं दुःखावरि दुःख कोसळे! ६१
मम बाळ खुशाल होय नां? नच गेलें गृह सोडुनी कधीं!
भुजशौर्य अरीस दाऊनी जय पावेलचि कां रणामधीं? ६२
नुकतेंच तयास लागलें जगतीं जन्मुनि वर्ष साहवें
इतुक्यांत रणांत पातलें म्हणुनी तद्विरहा न साहवे. ६३
रिपु होय बलाढ्य पोर हें तरि, देवा! करिं तूंच रक्षण!
नच चैन पडे तयाविणें गमतो एक युगासम क्षण! ६४
लढतां लढतां थकेल कां मग हा! कोण तयास सावरी?
जरि केवळ कल्पनाच ही तरि होते मम वृत्ति बावरी! ६५
अथवा रिपुसैन्य पाहुनी पळसी शत्रुस पाठ दावुनी
परतोनि न ये परी घरीं निजनामास कलंक लावुनी! ६६
मम बाळ गुणी किती तरी, नच हो! त्या जगतीं असे तुला!
तिळतीळ तुटेच जीव हा कधिं रे पाहिन मी मुला! तुला? ६७

उदरीं नवमास वाहिलें म्हणुनी चित्त तयाकडे वळे
जननी-हृदयास जेंवि हें नच हो! तेंवि निपुत्रिका कळे ! ६८
नशिबीं तरि काय नाकळे लवतो दक्षिण नेत्र कां बरें ?
अवलक्षण यास मानिती ह्मणुनी मन्मन होय घाबरें ! ६९
जगतीं दुसरा न आसरा तनया यास्तव मीहि वांचतें
सुखरूप तयास ठेविजे, जगदंबे ! तुज हेंच याचितें ! ७०
जिकडे तिकडे रडारडी श्रवणीं कां अजि येतसे बरें ?
कळवी नच कां मला कुणी ! घडलें कां विपरीत हाय रे !" ७१
इकडे तिकडे फिरे तदा जणुं होतें तिज लागलें पिसें !
न च चित्त तिचें कुठें रमे मन भानावरती नसें दिसे ! ७२
दचके मधुनी पुन्हा उठे उठुनी ती फिरुनी पुन्हा बसे
तरि चाहुल लागतां उठे बघतां शोधुनि खिन्न होतसे ! ७३
तंव जासुद पातला पुढें मुजऱ्यातें करुनी निवेदित
" सअकाअ दिवानजी संगऽपडलै सम्दबि सम्द बांदित. " ७४
पडले श्रवणीं न शब्द हे पडली वीज शिरीं कडाडुनी
सुतनू-तनु कंप पावली शिरतां ती हृदयास भेदुनी ! ७५
नयनाश्रु पहा टपा टपा गळती ती हृदयास भेदिता
जणुं मौक्तिक ते पटा पटा पडती मौक्तिकहार तोडितां ! ७६
असता जरि तेथ मानव जणुं पाषाणचि मूर्तिमंत तो
उलता तडकोनि तत्क्षणीं जननीचा जंव शोक पाहतो ! ७७
मनुजा जरि एकही कुणी जगतीं प्रेमनिधान तें नसे
प्रिय वाचकहो ! गमे तया हतदैवा गृहही श्मशानसें ! ७८
जननीमन कोवळें अर्धी मग सौभाग्य तियेस अंतरे !
सुत एकुलता व लाडका पडला बंधनिं काय तैं उरे ? ७९

रणिं संकट पातता तुला जनकाच्या चरणांस आठवीं
स्मरणें प्रगटेल धैर्य हें वच माझें हृदयांत सांठवीं." ५६

श्रवुनी वच वीरवृत्ति ती तनयाच्या हृदयीं उचंबळे
मग जाऊनि सिद्ध होय तो निघतांना जननीकडे वळे. ५७

"करणें नच काळजी तुवां झणिं थोरात करीन बद्ध मी."
वच बोलुनि हें सुपुत्र तो जननीच्या चरणांस तैं नमी. ५८

सुत जाय निरोप घेउनी तंव चिंताकुल माय होउनी
स्मरुनी दिनयामिनी तया बसली तत्पथिं दृष्टि लावुनी! ५९

"किति पाहसि अंत ईश्वरा! न च ये रे! करुणा कशी तुला!
न मनीं नच कल्पनेंतही धरिलें म्या कधिं पाप हेतुला. ६०

घडलें तरि पाप जन्मि या अथवा मागिल जन्मि ना कळे
म्हणुनी न उसंत पावतां शिरिं दुःखावरि दुःख कोसळे! ६१

मम बाळ खुशाल होय नां? नच गेलें गृह सोडुनी कधीं!
भुजशौर्य अरीस दाऊनी जय पावेलाचि कां रणामधीं? ६२

नुकतेंच तयास लागलें जगतीं जन्मुनि वर्ष साहवें
इतुक्यांत रणांत पातलें म्हणुनी तद्विरहा न साहवे. ६३

रिपु होय बलाढ्य पोर हें तरि, देवा! करिं तूंच रक्षण!
नच चैन पडे तयाविणें गमतो एक युगासम क्षण! ६४

लढतां लढतां थकेल कां मग हा! कोण तयास सावरी?
जरि केवळ कल्पनाच ही तरि होते मम वृत्ति बावरी! ६५

अथवा रिपुसैन्य पाहुनी पळसी शत्रुस पाठ दावुनी
परतोनि न ये परी घरीं निजनामास कलंक लावुनी! ६६

मम बाळ गुणी किती तरी, नच हो! त्या जगतीं असे तुला!
तिळतीळ तुटेच जीव हा कधिं रे पाहिन मी मुला! तुला? ६७

उदरीं नवमास वाहिलें म्हणुनी चित्त तयाकडे वळे
जननी-हृदयास जेंवि हें नच हो! तेंवि निपुत्रिका कळे! ६८
नशिबीं तरि काय नाकळे लवतो दक्षिण नेत्र कां बरें?
अवलक्षण यास मानिती ह्मणुनी मन्मन होय घाबरें! ६९
जगतीं दुसरा न आसरा तनया यास्तव मीहि वांचतें
सुखरूप तयास ठेविजे, जबदंबे! तुज हेंच याचितें! ७०
जिकडे तिकडे रडारडी श्रवणीं कां अजि येतसे बरें?
कळवी नच कां मला कुणी! घडलें कां विपरीत हाय रे!" ७१
इकडे तिकडे फिरे तदा जणुं होतें तिज लागलें पिसें!
न च चित्त तिचें कुठें रमे मन भानावरती नसें दिसे! ७२
दचके मधुनी पुन्हा उठे उठुनी ती फिरुनी पुन्हा बसे
तरि चाहुल लागतां उठे बघतां शोधुनि खिन्न होतसे! ७३
तंव जासुद पातला पुढें मुजऱ्यातें करुनी निवेदित
" सअकाअ दिवानजी संगऽपडलै सम्दबि सम्द बंदित. " ७४
पडले श्रवणीं न शब्द हे पडली वीज शिरीं कडाडुनी
सुतनू-तनु कंप पावली शिरतां ती हृदयास भेदुनी! ७५
नयनाश्रु पहा टपा टपा गळती ती हृदयास भेदिता
जणुं मौक्तिक ते पटा पटा पडती मौक्तिकहार तोडितां! ७६
असता जरि तेथ मानव जणुं पाषाणचि मूर्तिमंत तो
उलता तडकोनि तत्क्षणीं जननीचा जंव शोक पाहतो! ७७
मनुजा जरि एकही कुणी जगतीं प्रेमनिधान तें नसे
प्रिय वाचकहो! गमे तया हतदैवा गृहही श्मशानसें! ७८
जननीमन कोवळें अधीं मग सौभाग्य तियेस अंतरे!
सुत एकुलता व लाडका पडला बंधनिं काय तैं उरे? ७९

उरला नच बंध एकही तिजला वर्णु शके न मन्मती
परते मम भारती जडा मुरडोनी तंव शब्द खुंटती ! ८०
कळवी तिज शाहु भूपती " नच चिंता करिं देतसें हमी
जरि जन्म दिला तुवां असे सुत माझा तरि सोडवीन मी. " ८१
मग साधनसज्ज सैनिकां करुनी धाडुनि देइ पेशँवे
"अरि जिंकुनि ये " वदे तया, " सचिवा बद्ध मला न पाहवे." ८२
अरि बद्ध करोनि पेशवा सचिवातें जननीस भेटवी
सुपुरंदरदुर्ग देवुनी जननीही ऋणमुक्त हो भुवीं. ८३
पतिभक्तिपरायणा तरी बहुकर्तृत्ववती असे सती
अति सालस पापभीरुही जगतीं या नच फार लाभती ! ८४
कृतकार्य नयप्रिया तशा सुविचारीहि तियेस मानितों
तरि उक्तसमर्थनार्थ जें कळलें वृत्त तसें निवेदितों. ८५
रण दोन विपक्षियांत जें वतनाच्या विषयांत माजलें
जरि शोध करी सती तरी न तिला निर्णयतत्त्व लाभलें. ८६
तंव येउनि कारभारि ते करिती तैं बहु कारवाइतें
म्हणुनी जन एकपक्षिचे झाणिं झाले वतनास लाभते. ८७
परि वादनिकाल होउनी नच षण्मासहि काळ लोटला
फलभारविनम्र ते स्थळीं सहजीं दाडिमवृक्ष वाळला ! ८८
तंव जाउनि तेथ लोचनीं वठलेला तरु पाहिला तिनें
करि रोदन साश्रु बोलतां " घडतें कां मम याच रीतिनें? ८९
वठला तरि वृक्ष कां असा ? घडला न्याय न कां निवेदितो ?
अथवा अनपत्यतेसह सुतभालीं कुलघात दावितो ? " ९०

७. श्री. बाळाजी विश्वनाथ ( पहिले पेशवे ).

मग येउनि ती वदे सुता "जरि अन्याय घडे अजाणतां
तरि तो करणें दुरी तुवां," करि तैसें सुत माय सांगतां. ९१
अथ दैवत रामचंद्र तें सचिवांचे गृहिं कैवि पातलें
घडलें अजि वृत्त पाहिजे जरि संक्षिप्तचि तें निवेदिलें. ९२
पुरिं बेलसरीं महोत्सवें कुळकर्णी करि रामजन्म तो
परि होय विपन्न चिंतना करि रामोत्सव कैवि चालतो. ९३
जंव चिंतनमग्न तो असे तंव दृष्टान्त तयास जाहला
"जरि उत्सव इष्ट हो तुला सचिवा नेउनि देइ मूर्तिला." ९४
इकडे सचिवांसही तयासम दृष्टान्त तदाच होतसे
"करिं घेवुनि राममूर्तिला कुळकर्णी करितो जसें तसें." ९५
शिरिं घेउनि राममूर्तिला कुळकर्णी झणिं तेथ पातला
म्हणुनी तरि "रामबागचा" तंव "ओढा" नव नांव पावला! ९६
सचिव प्रतिवर्षि उत्सवा करिती ते दिन तीन साजरा
तंव पासुनि कैवि चालतो सकलां ज्ञात जनां असे पुरा. ९७
करिती जरि उत्सवास त सुत न येंण तेंवि माय ती
अनुकूल न दैव होतसे नववंशांकुर पाहिना सती! ९८
मग जाय करोनि कार्य ती पतिमागें इहलोक सोडुनी
सचिवास असह्य होय तें बहुधा कष्टत राहिला मनीं! ९९

---

८. पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेलें एक खेडें.

९. या हकीकतीची सत्यता पटवून देण्यास भोरच्या शिवेवर राहणारे व रामनाम धारण करणारे "रामबाग" व "रामबागचा ओढा" हे दोन साक्षीदार अद्याप हयात आहेत.

१० श्री. नारो शंकराजी ( दुसरे पंतसचिव ).

नच जों बहु काल लोटला सुतही जायचि सोडुनी मही
सरलें नच वर्ष चोविस सरला तों इतिहास सर्वही ! ॥ १००

झाली जैशी निजपतिपदां सेवुनी धन्य भार्या
नाथामागें करुनिहि जिनें दाविलें राजकार्या,
दावी तेवीं प्रियसुत रणीं धाडुनी श्रेष्ठ धैर्या,
केव्हां ऐशा दिसतिल पुन्हां भारतीयांत आर्या ! ॥ १०१॥

( श्रीरामचंद्रार्पणमस्तु । )

---

# वात्स्यायन-कालीन आदर्शभूत गृहिणी

लेखक: प्रल्हाद धोंडो कानिटकर, बी. ए., एल्‌एल्. बी.

[ जन्मः १८८२ सालीं धोम येथें. १९०९सालीं एल्‌एल्.बी. १९१३ पासून १९३० पर्यंत भोरास मुन्सफ व तेथील कायदेमंडळाचे चिटणीस. सध्यां ते धोम येथें आपल्या घरीं असतात. त्यांचे अनेक विषयांवरील लेख विविधज्ञानविस्तार, चित्रमयजगत, मुमुक्षु, महाराष्ट्र साहित्यपत्रिका यांतून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांची महाराष्ट्र साहित्य-परिषदेच्या नियामक मंडळांत सातारा जिल्ह्यातर्फे नेमणूक झाली असून डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीच्या परीक्षकमंडळांतहि ते आहेत. त्यांचें ‘ रुक्मिणी-हरण–निरीक्षण ’ हें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. सध्यां ते आपला काल वाङ्मय-व्यासंगांत घालवीत असतात. ]

या निबंधाच्या शीर्षकावरून या लेखांत वात्स्यायनकालीन एखाद्या गृहिणीचें वृत्त दिलें असेल अशी सकृद्दर्शनीं कल्पना होणें स्वाभाविक आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नसून, वात्स्यायनकालीं गृहिणीधर्माची काय कल्पना होती ही गोष्ट वात्स्यायनाच्या “ कामसूत्र ” नामक ग्रंथांतील “भार्याधिकारिक” नांवाच्या “ अधिकरणांत ” दिलेल्या नियमांचें भाषांतर करून विशद करण्यांत येत आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ साधण्याचा

प्रत्येकानें प्रयत्न करावा असें सर्व शास्त्रें कंठरवानें सांगतात. या प्रत्येक बाबतींत अधिकारी पूर्वाचार्यांनीं ग्रंथ ग्रथित केले आहेत. मन्वादि स्मृति, वेद, उपनिषदें वगैरे ग्रंथांतून धर्मशास्त्र व मोक्ष या दोन पुरुषार्थांचा भरपूर ऊहापोह केलेला आहे. अर्थशास्त्रावर बृहस्पति व कौटिल्य यांचे प्रमाणभूत ग्रंथ आहेत. कामशास्त्रावर मात्र एकट्या वात्स्यायनाशिवाय दुसऱ्या कोणीं केलेले ग्रंथ आज उपलब्ध नाहींत. वात्स्यायनाच्या पूर्वीं कामशास्त्रावर अनक ग्रंथ झाले होते; त्यांतून निवडक विषय घेऊन वात्स्यायनानें " कामसूत्रें " ग्रथित केलीं. प्रथमतः वात्स्यायनासंबंधीं माहिती देऊन, नंतर कामसूत्रांसंबंधीं माहिती आम्ही देणार आहों.

## ( १ ) वात्स्यायन

वात्स्यायन उत्तर हिंदुस्थानचा रहिवासी असावा असें कामसूत्रांत आलेल्या देशविषयक, व्यक्तिविषयक व निरनिराळ्या क्रीडाविषयक उल्लेखांवरून दिसतें. वात्स्यायनाचें दुसरें नांव मल्लनाग असें होतें. ( **मल्लनागोऽश्रमातंगे वात्स्यायनमुनावपि** । विश्वकोश ). कामसूत्राचा टीकाकार यशोधर म्हणतो:— **वात्स्यायन इति स्वगोत्रनिमित्ता समाख्या । मल्लनाग इति च संस्कारिकी** । यावरून वात्स्यायन हें गोत्रनाम असून, उपनयनसंस्काराच्या वेळीं मल्लनाग हें नांव दिलें असलें पाहिजे असें दिसतें. वात्स्यायनानें जे पूर्वींच्या राजांचे उल्लेख केले आहेत त्यांत कुंतल देशाचा राजा शातकर्णी व त्याची राणी मलयवती या दोघांचे उल्लेख आहेत. त्यावरून वात्स्यायन इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत झाला असावा असें बहुतेक विद्वानांचें मत आहे. कामसूत्रांत कौटिल्याच्या अर्थशास्त्रांतील कांहीं सूत्रें व मजकूर शब्दशः घेतला आहे. ( रामशास्त्री यांच्या अर्थशास्त्राचा उपोद्घात पहा. ) कौटिल्याचा काळ इ. सनापूर्वीं ३०० हा ठरलेला आहे. गाथासप्तशतीचा कर्ता शातकर्णी हा आंध्रभृत्य राजा इ. सनाच्या पहिल्या शतकांत होऊन गेला. वात्स्यायन त्याच्यानंतर झाला यांत संदेह नाहीं. वात्स्यायनाचा उल्लेख वासवदत्ताकथाकार सुबंधुकवीनें केला आहे. भवभूतीनें मालतीमाधव नाटकाच्या सातव्या अंकांत वात्स्यायनाचीं कांहीं सूत्रें शब्दशः घेतलीं असून

एवं किल कामसुत्त आरा आमणन्ति, असें म्हणून कामसूत्रकाराचा ( वात्स्यायनाचा ) स्पष्ट निर्देश केला आहे. आद्य श्रीशंकराचार्य यांनींही कामसूत्रावर एक निबंध लिहिला असें शांकरदिग्विजयांतील खालील श्लोकावरून दिसतें:—

वात्स्यायनप्रोदितसूत्रजातं तदीयभाष्यं च विलोक्य सम्यक् ।
स्वयं व्यधत्ताभिनवार्थगर्भं निबन्धमेकं नृपवेषधारी ॥

कामसूत्राशिवाय वात्स्यायनानें 'न्यायसूत्रभाष्य' नांवाचा न्यायशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला आहे. येणेंप्रमाणें साधारण वात्स्यायनासंबंधीं माहिती उपलब्ध आहे.

## ( २ ) कामसूत्रम्

कामसूत्राचे ३६ अध्याय, ६४ प्रकरणें, ७ अधिकरणें व १२५० श्लोक आहेत. अधिकरणांचे वर्ण्यविषय खालीं देतों:–

(१) साधारण नाम. (२) सांप्रयोगिकम्. (३) कन्यासंप्रयुक्तकम्. (४) भार्याधिकारिकं. (५) पारदारिकम्. (६) वैशिकम्. (७) औपनिषदिकम्.

कामसूत्रांपैकीं पहिलें सूत्र–**धर्मार्थकामेभ्यो नमः।** ( धर्म अर्थ व काम यांना वंदन असो ) असें आहे. यांत वास्तविक कोणत्याहि विशिष्ट देवतेला नमन नाहीं. तथापि ती शंका कोणी घेतील म्हणून दुसरें **सूत्रशास्त्रे प्रकृतत्वात्।** असें दिलें आहे. धर्म, अर्थ व काम या तीन मूर्तिमान् देवता आहेत असें शास्त्र सांगतें, म्हणून प्रारंभीं विशिष्ट देवतेला नमन न करितां धर्म, अर्थ व काम यांना नमन केलें आहे. पुढें धर्मशास्त्र, अर्थशास्त्र व कामशास्त्र यांची उत्पत्ति सांगितली आहे. धर्मशास्त्र स्वायंभुव मनुप्रणीत असून, बृहस्पतीनें अर्थशास्त्र ग्रथित केल्याचें सांगितलें आहे.

## ( ३ ) कामशास्त्राची उत्पत्ति

महादेवाचा अनुचर नंदी यानें, शिवपार्वती दिव्य सहस्र वर्षें सुरतसुखाचा उपभोग घेत असतांना, गृहद्वारावर राहून एक हजार अध्यायांचें कामसूत्र सांगितलें. उद्दालकमुनींचा पुत्र श्वेतकेतु यानें नंदीच्या कामसूत्रांचा

संक्षेप ५०० अध्यायांत केला. श्वेतकेतूच्या काळीं परदाराभिगमन निषिद्ध नव्हतें; इतकेंच नव्हे तर गम्यागम्य स्त्रीसंबंधीं विधिनिषेधहि नव्हते. स्त्री म्हणजे सर्वसाधारण ( common property ) वस्तु होती. स्त्रीची कल्पना पुढें दिल्याप्रमाणें होती:--

पक्वान्नमिव राजेन्द्र सर्वसाधारणाः स्त्रियः
तस्मात्तासु न कुप्येत न रज्येत रमेत च ॥

( स्त्रिया या पक्वान्नाप्रमाणें होत. पक्वान्न खाण्याला ज्याप्रमाणें कोणाचाहि अधिकार असतो तद्वतच स्त्रियांची गोष्ट. म्हणून त्यांच्या ठिकाणीं कोप किंवा आसक्ति न करतां प्राप्त झाल्यास उपभोग घ्यावा. ) ही समाजाची स्थिति पाहून या बाबतींत नियम पाहिजेत असें श्वेतकेतूला वाटल्यावरून त्यानें नियम घालून दिले. सुरापानापासून गुरुपुत्र कच यानें निवृत्ति केली व परदारागमनापासून श्वेतकेतूनें निवृत्ति केली.

मद्यपानान्निवृत्तिश्च ब्राह्मणानां गुरोः सुतात् ।
परस्त्रीभ्यश्च लोकानामृषेरौद्दालकादपि ॥
ततः पितुरनुज्ञानाद्गम्यागम्यव्यवस्थया ।
श्वेतकेतुस्तपोनिष्ठः सुखं शास्त्रं निषद्धवान् ॥

श्वेतकेतूनंतर बाभ्रव्य पांचाल यानें श्वेतकेतूच्या कामसूत्रांचा दीडशें अध्यायांत संक्षेप केला. त्यांतील वैशिक ( वेश्यांसंबंधीं ) सहावें अधिकरण पाटलिपुत्रांतील वेश्यांच्या सांगण्यावरून दत्तक नांवाच्या आचार्यानें पृथक् केलें. त्याप्रमाणें प्रत्येक अधिकरण पृथक् केलें गेलें तें खालीलप्रमाणें:—

| कर्ता | विषय |
| --- | --- |
| ( १ ) चारायण | साधारणाधिकरण. |
| ( २ ) सुवर्णनाभ | सांप्रयोगिक अधि० |
| ( ३ ) घोटकमुख | कन्यासंप्रयुक्तक अधि० |
| ( ४ ) गोनर्दीय | भार्याधिकारिक अधि० |
| ( ५ ) गोणिकापुत्र | पारदारिक अधि० |
| ( ६ ) कुचुमार | औपनिषदिक अधि० |

याप्रमाणें कामशास्त्र विच्छिन्न होऊन नष्ट होण्याच्या मार्गाला लागलें. दत्तकासुद्धां वर दिलेल्या सहा कर्त्यांचीं सूत्रें एकाच विषयापुरतीं होतीं व बाभ्रवीयाचें शास्त्र फार मोठें असल्यामुळें अभ्यास करण्यास कठीण होतें. या दोन आपत्ति लक्षांत घेऊन सर्व विषयांचें संक्षिप्त असें कामसूत्र वात्स्यायनानें तयार केलें. त्याचे विषय वर दिलेच आहेत.

## ( ४ ) शास्त्राची फलश्रुति

**त्रिवर्गप्राप्तिफलं शास्त्रम्** । धर्म, अर्थ, काम, या तीन पुरुषार्थांची उपलब्धि हेंच शास्त्राचें फल होय. पुरुषाचें आयुष्य शंभर वर्षांचें असतें ( शतायुर्वै पुरुषः ). त्या कालाचे ( शंभर वर्षांचे ) योग्य विभाग पाडून परस्पराला विघातक न होतील अशा रीतीनें धर्म, अर्थ व काम यांचें सेवन करावें. वात्स्यायनानें बाल्य, यौवन, स्थाविर असे आयुष्याचे तीन भाग केले आहेत. बाल्यांत विद्याग्रहण, यौवनांत कामसेवन व स्थाविरांत धर्म व मोक्ष-साधन करावें असें वात्स्यायन म्हणतो. या नियमाप्रमाणें मनुष्य वागला तर त्याला चारी पुरुषार्थ प्राप्त होतील:—

**एवमर्थं च कामं च धर्मं चोपाचरन्नरः ।**
**इहामुत्र च निःशल्यमत्यन्तं सुखमश्नुते ॥**

कामशास्त्राचें तत्त्व ज्याला नीट समजलें तो जितेन्द्रिय होईल: —

**रक्षन् धर्मार्थकामानां स्थितिं स्वां लोकवर्तिनीम् ।**
**अस्य शास्त्रस्य तत्त्वज्ञो भवत्येव जितेन्द्रियः ॥**

## ( ५ ) कामसूत्रांवरील आक्षेप

हा ग्रंथ अश्लील आहे असा मुख्य आक्षेप आहे. परंतु हा आक्षेप अस्थानीं आहे असें विचारांतीं दिसून येईल. कोणतेहि शास्त्रीय ग्रंथ लिहावयाचे म्हणजे तदंतर्गत सर्व विषयांचें सांगोपांग विवेचन आवश्यक असतें; व तें तसें नसेल तर शास्त्रीय ग्रंथ ही संज्ञा अन्वर्थक होणार नाहीं. समाजानें अधर्म्य विषयसुखापासून परावृत्त व्हावें याकरितां कामशास्त्रांत सर्व बाबतींचा समावेश आवश्यक आहे. वेश्या, परदारा-

भिगमन, अयोग्य कालीं वैवाहिक स्त्रीशीं संबंध इत्यादि गोष्टींपासून कशी हानि होते हें स्पष्ट दाखविण्याकरितां कामशास्त्राची उत्पत्ति झाली आहे. वैद्यकशास्त्र शिकतांना शरीराच्या प्रत्येक अवयवाचें यथार्थज्ञान, गर्भधारण व पोषण व जननेंद्रियांसंबंधीं रोग इत्यादि गोष्टी ज्याप्रमाणें ग्रंथांत अवश्य असल्याच पाहिजेत, तद्वतच कामशास्त्रांतील विषय आवश्यक असल्यानें शास्त्रकारानें दिले आहेत. कामशास्त्र ही मनोरंजक कादंबरी नव्हे. यामुळें य शास्त्रांतील विषय अश्लील या सदराखालीं येऊं शकत नाहींत. अलंकार शास्त्रांतहि अश्लीलता हा दोष सांगितला आहे. तथापि कोणतेंहि काव्य अगर नाटक पहा, त्यांत हा दोष थोड्याफार प्रमाणांत सांपडेलच. संस्कृतांतील पंच महाकाव्यें पाहिलीं तर त्यांतहि प्रत्येक काव्याचा एकेक सर्ग उत्तान शृंगारपर आढळतो. ( रघुवंश–१९, कुमारसंभव–८, शिशुपालवध–१०, किरातार्जुनीय–९, नैषधीयचरित–८ ). अशास्त्रीय ग्रंथांत कांहीं ठराविक मर्यादेपलीकडे शृंगारवर्णन अश्लील ठरेल; परंतु शास्त्रीय ग्रंथांत तो दोष होऊं शकत नाहीं. समाजाची स्थिरता व वाढ शास्त्रसंमत स्त्रीपुरुषसंबंधावर अवलंबून आहे. कोणता संबंध शास्त्रसंमत आहे व कोणता नाहीं याच गोष्टींचा कामसूत्रांत प्रामुख्यानें ऊहापोह केलेला आहे. म्हणून कामशास्त्रावरील आक्षेप फोल ठरतो.

## ( ६ ) या निबंधाचा वर्ण्यविषय

व्यक्तिमात्राचा स्त्रीशीं व पुरुषाशीं निरनिराळ्या प्रकारचा नात्यांचा संबंध उत्पन्न झालेला असतो. परंतु या सर्व नात्यांचें बीज वैवाहिक संबंधांत आहे. वैवाहिक संबंध सुखकर होण्यास सुपत्नीच मुख्य कारण असते. गृहाचा स्वर्ग किंवा नर्क बनविणें स्त्रीवर अवलंबून आहे ( Woman makes a man or mars a man ). ज्याला सुगृहिणी लाभेल त्यालाच संसारांत सर्व सुख प्राप्त होतें. सुगृहिणीला पतीकडून देवतेप्रमाणें मान मिळतो व असें झालें म्हणजे तेथें देवतांचाहि वास होतो. ( यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः । ) देवतांच्या सान्निध्यांत व्यक्तिमात्राला नितान्त आनंदाचा लाभ होतो हें ओघप्राप्तच आहे.

एवंगुणविशिष्ट पवित्र वैवाहिक संबंध हा या निबंधाचा वर्ण्यविषय आहे. या संबंधास विशेष महत्त्व देऊन वात्सायनानें सर्व बाजूंनीं विचार केला आहे.

पाणिग्रहणानंतर पत्नीनें पतीला देववत् मानून शक्य तितका प्रपंचाचा भार आपल्या अंगावर घ्यावा व संसार टापटिपीनें करावा असें वात्स्यायनाचें मत आहे. आदा पाहून खर्च करणें, अवास्तव खर्च न करणें, क्षुल्लक वस्तूचा सुद्धां उपयोग करणें ( उदाहरणार्थ–कोंडा, कोळसे, फाटके कपडे ), संसारांत लागणाऱ्या वस्तु शक्य तितक्या घरीं तयार करणें, जरूरीच्या वस्तूंचा योग्य कालीं संग्रह करून ठेवणें व प्रसंग पाहून क्रयविक्रय करून द्रव्यार्जन करणें, हीं टापटिपीच्या संसाराचीं मूलभूत तत्त्वें आहेत. पुरुष जरी पैसा मिळविणारा असला तरी "व्यये चैनां नियोजयेत ।" या मनुवचना-प्रमाणें पैशाचा विनियोग पत्नीच्या हातून व्हावा. पत्नी नुसती गृहकृत्यांत दक्ष असून उपयोगी नाहीं. पतीची मर्जी नेहमीं सुप्रसन्न असावी व आपल्या-वर त्यानें सदैव प्रेम करावें असें पत्नीचें ध्येय पाहिजे. "धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि।" ही प्रतिज्ञा पतीकडून सदैव पाळली जाईल असें आदर्शभूत वर्तन पत्नीनें ठेवलें पाहिजे. गृहिणी ही "गृहिणी सचिवः सखी-मिथः प्रियाशिष्या ललिते कलाविधौ ।" या कालिदासोक्तीप्रमाणें सर्वथैव असली पाहिजे.

सासूसासरे, दीरनणंदा, पतीचे मित्र व नोकरचाकर वगैरे भिन्न दर्जाचीं माणसें हरघडीं सहवासांत येतात; त्यांच्या बरोबर ज्याच्या त्याच्या योग्यते-प्रमाणें पत्नीची वर्तणूक असली पाहिजे. पति घरीं असतांना वागण्याची पद्धत व कामानिमित्त बाहेरगांवीं गेला असतांना वागण्याची पद्धत यांतहि फरक आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून वात्स्यायनानें "भार्याधिका-रिक" नांवाचें एक "अधिकरण" रचिलें आहे. त्यांत पत्नीच्या वागणुकीचे नियम, तत्कालीन व पूर्वपरंपरेस अनुरूप सामाजिक रूढ चालीप्रमाणें ग्रथित केले आहेत. सांप्रतच्या "समान हक्कां"च्या युगांत ते कदाचित् स्त्रीच्या वैयक्तिक स्वातंत्र्यास विघातक भासतील; परंतु ते नियम कोणीं आज पाळावे असा सांगण्याचा हेतु नसल्यामुळें या आक्षेपाचा विचार करण्याचें कारण रहात नाहीं.

वात्स्यायनाच्या सूत्रांचें टीकानुरोधानें शब्दशः भाषांतर केलें आहे. किंबहुना या बाबतींत–

यथा मूलं तथैव तत् । न मनागप्यतिक्रमः ॥

असें म्हटल्यास चालेल. वरील विवेचनावरून वर्ण्य विषयाची स्थूल कल्पना करतां येईल. आतां प्रस्तुत विषयाकडे वळूं.

## सूत्रांतर्गत विषयानुक्रमणिका

पत्नीचें पतीशीं वर्तन कसें असावें—१, १०–१७, १९–२१, २४, २५.
कुटुंबचिंता––२, २६–२८, ३२–३४.
घर कसें असावें—३, ४.
बागेची व्यवस्था––६, ७, ८.
स्वयंपाक घर—१८.
वर्ज्य गोष्टी—९, २२, २३, २९.
इतर कुटुंबीय माणसांशीं वागणूक—५, ३५,
स्वतःची ( पत्नीची ) वागणूक—३०, ३१.
पति प्रवासस्थ असतांना वागण्याचे नियम—३६–४१.

## भार्याधिकारिकं नाम चतुर्थमधिकरणम् ।

### अध्याय १

विवाहोत्तर पत्नीनें पतिगृहीं कशा रीतीनें आचरण करावें तें या प्रकरणांत सांगितलें आहे. म्हणूनच यास " भार्याधिकारिक " असें म्हटलें आहे. ( भार्या अधिकारिणी यस्मिन्नस्तीति भार्याधिकारिकम् । असा खुलासा टीकाकारानें केला आहे. )

आतां क्रमानें वात्स्यायनाचीं सूत्रें देऊन टीकानुरोधानें त्यांचा अर्थ देतों. मूळ ग्रंथांत सूत्रांना अंकानुक्रम दिला नाहीं; तथापि, सोईकरितां तो खालीं दिला आहे.

भार्यैकचारिणी गूढविश्रम्भा देववत्पतिमानुकूल्येन वर्तेत ॥ १ ॥

**अर्थः**—'भर्ता तु देवता स्त्रीणाम्'। या स्मृतिवाक्याच्या आधारें हें सूत्र ग्रथित केलें आहे. अत्यंत विश्वासुक व पतिव्रता भार्येनें पतीला देववत् मानून त्याच्या मनोदयाप्रमाणें वर्तन करावें.

तन्मतेन कुटुम्बचिन्तामात्मनि संनिवेशयेत् ॥ २ ॥

**अर्थः**—पतीच्या संमतीनें गृहव्यवस्थेची जबाबदारी पत्नीनें आपल्या अंगावर घ्यावी.

वेश्म च शुचि सुसंमृष्टस्थानं विरचितविविधकुसुमं
श्लक्ष्णभूमितलं हृद्यदर्शनं त्रिषवणाचरितबलिकर्म
पूजितदेवायतनं कुर्यात् ॥ ३ ॥

**अर्थः**—( घर कसें असावें तें या सूत्रांत सांगितलें आहे. ) पवित्र, स्वच्छ, सारविलेलें, विविध फुलांनीं ठिकठिकाणीं शोभायमान केलेलें, ज्यांतील भुया मऊ व तुळतुळीत आहेत असें, पाहिल्याबरोबर मनाला आनंद देणारें, ज्यांत त्रिकाल बलिकर्म करण्यांत येतें असें, ज्यांतील देवगृहांतील देवांची नित्य पूजा होते-अशा प्रकारची घराची व्यवस्था ठेवण्यांत यावी.

न ह्यतोऽन्यद्गृहस्थानां चित्तग्राहकमस्तीति गोनर्दीयः ॥ ४ ॥

**अर्थः**—वर वर्णन केलेल्या व्यतिरिक्त दुसरें कोणतेंहि घर गृहस्थांच्या चित्ताला आल्हाद देणारें नसतें, असें गोनर्दीयाचें मत आहे.

गुरुषु भृत्यवर्गेषु नायकभगिनीषु तत्पतिषु च
यथार्हं प्रतिपत्तिः ॥ ५ ॥

**अर्थः**—गुरुजन ( सासुसासरा वगैरे ), नणदा व त्यांचे पति आणि नोकर चाकर यांचा मान ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें ठेवावा.

परिपूतेषु च हरितशाकवप्रानिक्षुस्तम्बाज्जीरकसर्षपा-
जमोदशतपुष्पातमालगुल्मांश्च कारयेत् ॥ ६ ॥

**अर्थः**—( तिसऱ्या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें ) पवित्र अशा त्या घरांत ( मागील; पुढील व भोंवतालच्या मोकळ्या जागेंत ) पुढें सांगितल्याप्रमाणें

व्यवस्था करवून ( चाकरांकडून ) घ्यावी; हरित म्हणजे कोथिंबिर, आलें व शाक म्हणजे पालक्यादि भाजांचे वाफे करवावे, उंसाचे वाफे करवावे, जिरें, मोहऱ्या, अजमोदा ( ओवा ) यांचे वाफे करवावे, तसेंच शतपुष्पा आणि तमाल या वृक्षांचे ताटवे करवावे.

टीकाकार " शाकं पालङ्क्यादि च " असा शाक शब्दाचा खुलासा करतो. दिल्लीस " पालक " नांवाची एक पालेभाजी मिळते. जिच्याची लागवडहि काश्मीराकडे होते. यांवरून वात्स्यायन काश्मिराकडे रहाणारा असावा. २८ सूत्रांत 'पालंकी'चा उल्लेख आहे.

**कुब्जकामलकमल्लिकाजातीकुरण्टकनवमालिकातगरनंद्यावर्त-**
**जपागुल्मानन्यांश्च बहुपुष्पान् बालकोशीरकपातालिकांश्च**
**वृक्षवाटिकायां च स्थण्डिलानि मनोज्ञानि कारयेत् ॥ ७ ॥**

**अर्थः**--तसेंच निरनिराळ्या फुलझाडांचे व लतांचे ताटवे, वाळा, उशीर यांचे वाफे, व वृक्षवाटिकांत मनोहर आकृतींचीं स्थंडिलें करवावीं. यांत उल्लेखिलेले वृक्ष ( फुलझाडें ) पुढीलप्रमाणें आहेत...( १ ) कुब्जक, ( २ ) आमलक, ( ३ ) मल्लिका, ( ४ ) जाती ( जाई ), ( ५ ) कोरांटी, ( ६ ) नवमालिका, ( ७ ) तगर, ( ८ ) नंद्यावर्त, ( ९ ) जपा.

**मध्ये कूपं वापीं दीर्घिकां वा खानयेत् ॥ ८ ॥**

बागेमध्यें जागा असेल त्या मानानें कुवा, वापी किंवा दीर्घिका खणवून घ्यावी. ( वापी म्हणजे पायऱ्या असलेली समभुज चौरस विहीर. दीर्घिका म्हणजे लांबट चौकोनी पायऱ्यांची विहीर. )

**भिक्षुकीश्रमणाकुलटाकुहकेक्षणिकामूलकारिभिर्न संसृज्येत॥९॥**

**अर्थः**--भिकारीण, बौद्धधर्मीय संन्यासिनी, स्वैरिणी, लबाड स्त्री, दैवज्ञा, चेटकी इतक्या प्रकारच्या स्त्रियांशीं संबंध ठेवूं नये. ( ईक्षणिका= Fortune-teller )

**भोजने च रुचितमिदमस्मै द्वेष्यमिदं पथ्यमिदमपथ्यमिदमिति च विन्द्यात् ॥ १० ॥**

अर्थः--भोजनांत अमुक पदार्थ पतीला आवडतो, अमुक आवडत नाहीं, अमुक पथ्यकर किंवा अपथ्यकर आहे याचें ज्ञान स्त्रियेला असावें.

स्वरं वहिरुपश्रुत्य भवनमागच्छतः किं कृत्यमिति ब्रुवती
सज्जा भवनमध्ये तिष्ठेत ॥ ११ ॥

अर्थः—पति घराकडे येत असतांना बाहेरच त्याचा शब्द ऐकून काय काम करावयाचें आहे, असें म्हणत कामाकरतां तयार होऊन अंगणांत वाट पहात उभें रहावें.

परिचारिकामपनुद्य स्वयं पादौ प्रक्षालयेत् ॥ १२ ॥

अर्थः--पति बाहेरून आल्यावर दासी पाय धुण्याकरितां पुढें झाली असली तरी तिला बाजूस सारून स्वतः पतीचें पादप्रक्षालन करावें.

नायकस्य च न विमुक्तभूषणं विजने संदर्शने तिष्ठेत् ॥ १३ ॥

अर्थः--अंगावरील अलंकार काढलेल्या स्थितींत पत्नीनें एकांतांत पतीसमोर कधींहि जाऊं नये.

अतिव्ययमसद्व्ययं वा कुर्वाणं रहसि बोधयेत् ॥ १४ ॥

अर्थः--नवरा उधळेपणानें किंवा वाईट कामांत खर्च करीत असेल तर पत्नीनें त्याची कानउघाडणी एकांतांत करावी. ( उघड निषेध केल्यास अपमान होऊन पति लज्जित होईल. )

आवाहे विवाहे यज्ञे गमनं सखीभिः सह गोष्ठीं
देवताभिगमनमित्यनुज्ञाता कुर्यात् ॥ १५ ॥

अर्थः--वरगृहीं, कन्यागृहीं, यज्ञाच्या ठिकाणीं, मैत्रिणींबरोबर वनभोजनास किंवा देवदर्शनाकरितां स्त्रियांनीं पतीच्या आज्ञेनें गमन करावें. ( आवाहे वरगृहे। विवाहे कन्यागृहे। असे अर्थ टीकाकार देतो. परंतु दोन्ही शब्दांत फरक आहे असें दिसत नाहीं. आवाह शब्द कोशांत सांपडत नाहीं. विवाह=कन्यागृह अर्थ हा कोशांत सांपडत नाहीं. )

सर्वक्रीडासु च तदानुलोम्येन प्रवृत्तिः ॥ १६ ॥

अर्थः—सर्व प्रकारच्या लोकांत रूढ असलेल्या क्रीडांमध्यें भर्त्याच्या संमतीनें पत्नीनें भाग घ्यावा.

पश्चात् संवेशनं पूर्वमुत्थानमवबोधनं च सुप्तस्य ॥ १७ ॥

अर्थः—भर्ता निद्रिस्त झाल्यावर पत्नीनें शयन करावें; तो उठण्याच्या पूर्वी उठावें व दिवसा पतीचा निद्राभंग करू नये.

महानसं च सुगुप्तं स्याद्दर्शनीयं च ॥ १८ ॥

अर्थः—स्वयंपाकघर एका बाजूला व प्रकाशयुक्त असावें.

नायकापचारेषु किंचित्कलुषता नात्यर्थं निर्वदेत् ॥ १९ ॥

अर्थः—पतीच्या हातून अपराध घडल्यास किंचित् राग धरावा; पुन्हां असें करू नये असें त्यास सांगावें. परंतु फारसा वादविवाद त्या बाबतींत करू नये. ( या सूत्रांत ‘ अपचार ’ याचा अर्थ ‘ परस्त्रीविषयक आसक्ति ’ असा घ्यावयाचा आहे ).

साधिक्षेपवचनं त्वेनं मित्रजनमध्यस्थमेकाकिनं वाप्युपालभेत ।
नच मूलकारिका स्यात् ॥ २० ॥

अर्थः—भर्ता मित्रांबरोबर बसला असतांना किंवा एकटा असतांना त्यास उद्देशून निंदागर्भभाषण करावें. ( परस्त्रीविषयक नाद सुटावा म्हणून. ) परंतु चेटुक, ताईत, दोरे असले वशीकरणाचे प्रकार करूं नयेत.

नह्यतोऽन्यप्रत्ययकारणमस्तीति गोनर्दीयः ॥ २१ ॥

अर्थः—भर्त्याचा पत्नीच्या ठिकाणीं अविश्वास उत्पन्न होण्यास याशिवाय ( चेटुक वगैरे प्रकार ) दुसरें कारण नसतें असें गोनर्दीय याचें मत आहे.

दुर्व्याहृतं दुर्निरीक्षितमन्यतो मंत्रणं द्वारदेशावस्थानं निरीक्षणं
वा निष्कुटेषु मंत्रणं विविक्तेषु चिरमवस्थानमिति वर्जयेत् ॥ २२ ॥

अर्थः—पुढें दिलेल्या गोष्टी पत्नीनें वर्ज कराव्या; (१) अपशब्द बोलणें, (२) रागानें पहाणें, (३) दुसरीकडे पाहून नवऱ्याबरोबर बोलणें, (४) दरवाजांत उभें राहून बाहेर पाहणें, (५) घराच्या मागें आडबाजूला उभें राहून एखाद्या स्त्रीशीं भाषण करणें, (६) घरांतील ओसाड जागेंत बराच वेळ

राहणें, ( नवऱ्याशीं बोलतांना नवऱ्याकडे तोंड करून बोलावें ) ( वरील १।२।३), या गोष्टी वैराग्यजनक आहेत; (४) यांतील दोन्ही गोष्टी अयत्न-साम्यसूचक आहेत; (५।६ ) या दोन्ही गोष्टी नवऱ्याच्या मनांत अप्रेम उत्पन्न करणाऱ्या आहेत. सबब या सर्व वर्ज्य कराव्या.)

स्वेददन्तपङ्कदुर्गंधाश्च बुध्येतेति विरागकारणम् ।। २३ ।।

अर्थः—घामटपणा भर्त्याच्या मनांत वैराग्य उत्पन्न करणारा असल्यामुळें घाम स्वच्छ पुसावा, दांत स्वच्छ घांसावे व कोणत्याहि प्रकारें शरीर मलीन न राहील अशी दक्षता बाळगावी.

बहुभूषणं विविधकुसुमानुलेपनं विविधअंगरागससुज्ज्मलं वास इत्याभिगामिको वेषः । प्रतनुश्लक्ष्णाल्पयदुकूलता परिमितमाभरणं सुगन्धिता नात्युल्बणमनुलेपनम् । तथा शुक्लान्यन्यानि पुष्पाणीति वैहारिको वेषः ।। २४ ।।

[ शरीर-प्रसाधनाचे दोन प्रकार वरील सूत्रांत वर्णन केले आहेत. वस्त्र, अलंकार, पुष्पें व अंगराग हीं शरीरप्रसाधनाचीं चार साधनें आहेत. पतिसन्मुख जातांना व यात्रा, क्रीडाविहार करतांना वस्त्रालंकार एकाच प्रकारचे नसावेत. पतिसंन्मुख जातांना स्त्रीचा वेष मनोहारि असावा; इतर प्रसंगीं सभ्यतेस अनुरूप असा विनीत वेष असावा. ]

अर्थ—पतिसन्मुख जातांना मौल्यवान वस्त्रें, पुष्कळ अलंकार, चित्रविचित्र सुवासिक फुलें व सुगंधि उटणीं स्त्रीनें धारण करावीं. (वस्त्र तांबड्या रंगाचें असावें; कारण, ‘ रक्तवाससा प्रसाधिता मनोहरा ’ असें टीकाकार म्हणतो.) यात्रा, क्रीडा वगैरे प्रसंगीं मध्यम प्रतीचे, बेताचे कपडे, बेतशीर अलंकार ( कानांत व गळ्यांत ), तुरळक उटणीं व पांढरीं फुलें स्त्रीनें धारण करावीं. ( वैहारिक–विहारासंबंधीं )

नायकस्य व्रतमुपवासं च करणेनानुवर्तेत
वारितायां च नाहमत्र निर्बन्धनीयेति तद्वचसो निवर्तनम् ।।२५।।

अर्थः--पति जे व्रतानियम करीत असेल त्याचें अनुकरण भार्येनें करावें. जर तिला पतीनें प्रतिबंध केला तर " या बाबतींत मी आपलें म्हणणें ऐकणार नाहीं, मला उगीच प्रतिबंध करूं नये " असें तिनें त्यास सांगावें.

मृद्विदलकाष्ठचर्मलोहभाण्डानां च काले समर्घग्रहणम् ।। २६ ।।

अर्थः--मातीचीं भांडीं, सुपें, टोपलीं ( विदल ), पाट, खाट वगैरे लांकडाचे पदार्थ, चामड्याचीं भांडीं ( बुधले, लहान शिशा ) व लोखंड, तांबें वगैरे धातूंचीं भांडीं यांचा संग्रह योग्य काळांत करावा, म्हणजे त्या त्या वस्तु सवंग ( समर्घ ) मिळतात.

तथा लवणस्नेहयोश्च गन्धद्रव्यकटुकभाण्डौषधानां च
दुर्लभानां भवनेषु प्रच्छन्नं निधानम् ।। २७ ।।

अर्थः—तसेंच मीठ, तेल, तूप, गन्धद्रव्यें (कचोरा) कटुक, मसाल्याचें सामान ( भाण्ड ), किरकोळ औषधें ( जीं विशिष्ट वेळींच मिळतात ) यांचा संग्रह करून घरांत अशा ठिकाणीं ठेवावीं कीं, तीं नीट रहातील व त्यांचा नाश होणार नाहीं.

मूलकालुकपालङ्की दमनकाम्रातकैर्वारुकत्रपुसवार्ताककूष्माण्डालाबु-सूरणशुकनासास्वयंगुप्तातिलपर्णिकाग्निमंथलशुनपलाण्डुप्रभृतीनां सर्वौषधीनां च बीजग्रहणं काले वापश्च ।।२८।।

अर्थः—पुढें दिलेल्या फळझाडांचें व इतर औषधींचें बी संग्रहित करून योग्य काळीं त्यांची लागवड करावी; मूलक=मुळे, अलुक, पालंकी=एक प्रकारची पालेभाजी, दमनक=दवणा, आम्रातक=अंबाडी, ऐर्वारुक=काकडी, तवस, वार्ताक (=वांगें ), कूष्मांड=कोहाळा, अलाबु=दुध्या भोपळा, सुरण, शुकनासा, स्वयंगुप्ता, तिल्पार्णिका, अग्निमंथ, लसूण, तांबडा कांदा वगैरे.

स्वस्य च सारस्य परेभ्यो नाख्यानं भर्तृमंत्रितस्य ।।२९।।

अर्थः—आपल्या पतीजवळ असलेल्या द्रव्याची दुसऱ्यास माहिती देऊं नये. ( धनायुषी गुप्ततमे कार्ये। असें वचन आहे. ) भर्त्याकडून कळलेली गोष्ट दुसऱ्यास सांगूं नये.

समानाश्च स्त्रियः कौशलेनोऽज्वलतया पाकेन मानेन तथोपचारैरतिशयीत ॥३०॥

अर्थः—कौशल्य, नीटनेटकेपणा, पाकप्रावीण्य, स्वाभिमान, पतिसेवा इत्यादि बाबतींत बरोबरीच्या स्त्रियांपेक्षां आपलें आधिक्य दाखवावें.

सांवत्सरिकमायं संख्याय तदनुरूपं व्ययं कुर्यात् ॥३१॥

अर्थः—वार्षिक उत्पन्न किती येईल त्याची गणती करून त्या मानानें खर्च करीत जावा.

भोजनावशिष्टाद्गोरसात्घृतकरणम् तथा तैलगुडयोः। कार्पासस्य च सूतकर्तनम् सूत्रस्य वानम्। शिक्यरज्जुपाशवल्कलसंग्रहणम्। कुट्टन-कंडनावेक्षणम्। आचाममण्डतुषकणकुट्यंगाराणामुपयोजनम्। भृत्यवेतनभरणज्ञानम्। कृषिपशुपालनचिन्तावाहनविधानयोगाः। मेषकुक्कुटलावकशुकसारिकापरभृतमयूरवानरमृगाणामवेक्षणम् दैवसिकायव्ययपिण्डीकरणमिति च विद्यात् ॥ ३२ ॥

[ गृहिणीला प्रपंचांतील कोणत्या गोष्टींचें ज्ञान आवश्यक आहे तें या सूत्रांत विस्तारानें सांगितलें आहे.

अर्थः—खालील गोष्टींचें ज्ञान गृहिणीस असावें. ( १ ) सर्व मनुष्यांचीं भोजनें होऊन जो अवशिष्ट गोरस राहील, त्यापासून लोणी काढून तूप करणें, ( २ ) मोहरीचें तेल काढणें, ( ३ ) उस गाळून गूळ तयार करणें, ( ४ ) कापसाचें सूत कातणें व त्यापासून वस्त्रें तयार करणें, ( ५ ) शिंकीं, दोऱ्या, दावीं, वल्कलें यांचा संग्रह करणें, ( ६ ) धान्याला घाव घालणें व तांदूळ कांडणें, ( ७ ) कांजी, मंढ, कोंडा, कण्या, कूट व कोळसे यांचा उपयोग करणें, ( ८ ) चाकरांच्या वेतनांसंबंधीं माहिती, ( ९ ) शेतकी, पशुपालन व वाहनें ( मेणा, पालखी वगैरे ) यांचें ज्ञान, ( १० ) मेंढा, कोंबडा, लावा, पोपट, सारिका, कोकिळ, मोर, वानर, हरिण इत्यादिकांची परीक्षा, ( ११ ) दररोजचा जमाखर्च लिहिण्याची माहिती.

तज्जघन्यानां च जीर्णवाससां संचयस्तैर्विविधरागैः शुद्धैर्वा कृतकर्मणा परिचारकाणामनुग्रहो मानार्थेषुच दानमन्यत्र वोपयोगः ॥३३॥

अर्थः--भर्त्याचे जुने कपडे सांठवून ठेवावेत; ते स्वच्छ धुवून किंवा त्यांस रंग देऊन नोकरचाकरांनीं एखादें चांगलें काम केल्यास त्यांस ते बक्षीस द्यावेत; किंवा भिकारी लोकांना दान द्यावेत किंवा त्यांचा उपयोग वाती करण्याकडे करावा ( अन्यत्र वेति दीपवर्त्यादिषु ).

सुराकुम्भीनामासवकुम्भीनां च स्थापनं तदुपयोगः ।
क्रयविक्रयावायव्ययावेक्षणम् ॥ ३४ ॥

अर्थः—सुरा व आसवें यांचे कुंभ व्यवस्थेनें ठेवावे; प्रसंगविशेषीं त्यांचा घरांत उपयोग करावा; स्वस्ताई व महागाई असेल त्या मानानें त्यांचा क्रयविक्रय करावा. या व्यवहारांत नफातोटा काय होतो तेंहि पहात जावें.

नायकमित्राणां च स्रगनुलेपनताम्बूलदानैः पूजनं न्यायतः । श्वश्रूश्वशुरपरिचर्या तत्पारतंत्र्यमनुत्तरवादिता परिमिताप्रचण्डालापकरणमनुच्चैर्हासः । तत्प्रियाप्रियेषु स्वप्रियाप्रियेष्विव वृत्तिः । भोगेष्वनुत्सेकः । परिजने दाक्षिण्यम् । नायकस्या निवेद्य न कस्मैचिद्दानम् स्वकर्मसु भृत्यजननियमनमुत्सवेषु चास्य पूजनमित्येकचारिणीवृत्तम् ॥३५॥

अर्थः--उचित प्रसंगीं गंध, फुलांच्या माळा, तांबूल देऊन भर्त्याच्या मित्रांचा त्यांचे गुण, जात, वय, यांकडे लक्ष देऊन आदरसत्कार करावा. सासूसासऱ्यांची सेवा करावी, त्यांच्या तंत्रानें वागावें; ते बोलल्यास उलट उत्तर देऊं नये, बोलणें थोडकें व हळूं असावें, मोठ्यानें हंसूं नये. भर्त्याला ज्या गोष्टी आवडतात व ज्या आवडत नाहींत त्याच गोष्टींबद्दल आपली आवडनावड असावी, सुखोपभोग मिळत असले तरी अंगीं नम्रता असावी, नोकरचाकरांविषयीं आदरभाव ठेवावा. नवऱ्याला न सांगतां कोणास कांहींहि देऊं नये, ज्या नोकराचें जें काम आहे तेंच त्यांच्याकडून करवून घ्यावें. सणवाराला नोकरांना खायलाप्यायला देऊन त्यांचा सन्मान करावा. याप्रमाणें एकचारिणीची पद्धत असावी.

भर्ता सन्निध असतांना पत्नीनें कसें वागावें ते नियम वर सांगितले आहेत. भर्ता प्रवासास गेला असतांना पत्नीनें कसें वागावें तें खालीं सांगतों.

प्रवासे मंगलमात्राभरणा देततोपवासपरा वार्तायां
स्थिता गृहानवेक्षेत ॥३६॥

अर्थः—भर्ता घर सोडून बाहेरगांवीं गेल्यावर पत्नीनें मंगलसूत्राव्यतिरिक्त अलंकार धारण करूं नयेत, देवाची भक्ती करण्यांत वेळ घालवावा; भर्त्याची वार्ता काय येते तिकडे लक्ष ठेवावें व प्रपंचाची काळजी ध्यावी.

शय्या च गुरुजनमूले । तदभिमता कार्यनिष्पत्तिः ।
नायकाभिमतानां चार्थानामर्जने प्रतिसंस्कारे च यत्नः ॥३७॥

अर्थः—सासूच्या शेजारीं निजत जावें. सासूसासरा सांगेल त्याप्रमाणें काम करावें. भर्त्याला ज्या गोष्टी अभिमत असतील त्या मिळविण्याचा प्रयत्न करावा.

नित्यनैमित्तिकेषु कर्मसूचितो व्ययः । तदारब्धानां च
कर्मणां समापने मतिः ॥३८॥

अर्थः--नित्यनैमित्तिक कर्मांत कर्मांच्या महत्त्वाप्रमाणें खर्च करावा. भर्त्यानें ज्या कामांचा आरंभ केला असेल तीं कामें पुरीं करून घेण्याकडे लक्ष ठेवावें.

ज्ञातिकुलस्यानभिगमनमन्यत्र व्यसनोत्सवाभ्याम् । तत्रापि
नायकपरिजनाधिष्ठिताया नातिकालमवस्थानमपरिवर्तित-
प्रवासवेषता च ॥३९॥

अर्थः--अडचणीच्या वेळीं किंवा एखाद्या समारंभाच्या वेळीं मात्र पत्नीनें माहेरीं जावें; इतर वेळीं जाऊं नये. माहेरींसुद्धां प्रवासवेषच असावा व पतीच्या परिजनाबरोबर जावें व फार काळ राहूं नये.

गुरुजनानुज्ञातानां करणं उपवासानाम् । परिचारकैः
शुचिभिराज्ञाधिष्ठितैरनुमतेन क्रयविक्रयकर्मणा
सारस्यापूरणं तनूकरणं च शक्त्या व्ययानाम् ॥४०॥

**अर्थः**--सासूसासरे सांगतील तेच उपासतापास करावे. त्यांच्याच अनुमतानें विश्वासुक व आज्ञाधारक सेवकांकडून मालाची खरेदीविक्री करवून भांडवल वाढवावें. प्रसंगविशेषीं जास्त खर्च करणें जरूर असल्यास भांडवलापैकींहि खर्च करावा.

आगते च प्रकृतिस्थाया एव प्रथमतो दर्शनं ।
दैवतपूजनमुपहाराणा चाहरणमिति प्रवासचर्या ।।४१।।

**अर्थः**--पति प्रवासाहून परत आल्यावर प्रथमतः प्रोषित भर्तृकेच्या वेषांतच पतीचें दर्शन घ्यावें व नंतर देवतांची पूजा करून तन्निमित्त दान वगैरे द्यावें ( नवस केले असतील ते फेडावेत ). याप्रमाणें भर्ता प्रवासास गेला असतांना पत्नीनें वर्तणूक ठेवावी.

सद्‌वृत्तमनुवर्तेत नायकस्य हितैषिणी ।
कुलयोषा + + + + + + वाप्येकचारिणी ।।
धर्ममर्थं तथा कामं लभन्ते स्थानमेव च ।
निःसपत्नं च भर्तारं नार्यः सद्‌वृत्तमाश्रितः ।। ४२ ।।

**अर्थः**--आपल्या भर्त्याचें कल्याण व्हावें या इच्छेनें एकचारिणी कुलबधूनें सद्‌वर्तन ठेवल्यानें स्त्रियांना धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारी पुरुषार्थांचा लाभ होऊन निःसपत्न ( एकच बायको करून तिच्यावर पूर्ण प्रेम करणारा ) पति प्राप्त होतो.

**टीपः**--पहिल्या सूत्रांत ‘ एकचारिणी ’ असा शब्द आहे. कोशकार “एकचारिणी – पतिव्रता” असा अर्थ देतात. परंतु ‘ एकचारिणी – जिला सवत नाहीं म्हणजे जी नवऱ्याची एकटीच विवाहित स्त्री आहे ’ असा अर्थ सूत्रकाराला अभिप्रेत आहे. कारण दुसऱ्याच अध्यायांत ‘ सैव ( एकचारिणी ) सपत्नीभिर्युज्यते तदा कथं वर्तितव्यम् ’ असें प्रारंभीं टीकाकार म्हणतो. शिवाय पहिल्या सूत्रांच्या प्रारंभीं टीकाकार म्हणतोः—

‘ भार्या च द्विविधा एकचारिणी सपत्निका च ।
तत्र प्राधान्येन एकचारिणी वृत्तमुच्यते ’ ।।

---

# इतिहाससंशोधक राजवाडे

लेखकः लक्ष्मणदास माधवदास देवी, बी. ए.

[ हे भोरचे रहिवासी होत. त्यांचा जन्म १९०७मध्यें झाला. प्राथमिक व दुय्यम शिक्षण भोरास झालें. उच्च शिक्षण फर्ग्युसन व डेक्कन कॉलेजमधून झालें. ते १९२८ सालीं बी. ए. झाले. फर्ग्युसन कॉलेजांत असतांना 'गडकरी' या विषयावर निबंध लिहिल्याबद्दल त्यांना पटवर्धन पारितोषिक मिळालें आहे. ते सध्यां एल्‌एल्. बी.चा अभ्यास करीत आहेत. ]

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचें नांव उच्चारतांच भारतेतिहाससंशोधनक्षेत्रांतील त्यांची ती प्रचंड कामगिरी दृष्टीसमोर उभी राहते. त्यांची ती भव्य व उग्र शरीरयष्टी, करारी परंतु बाणेदार स्वभाव आणि सर्वांत इतिहाससंशोधनकार्यासाठीं तनमनधनें वाहून घेऊन त्याकरितां स्वीकारलेली अखंड संन्यस्तवृत्ती यांची आठवण होतांच समर्थसांप्रदायांतील हा कोणी महापुरुष पुनरपि जन्मास आला असावा असें वाटतें. कारण कोणतेंहि राष्ट्रकार्य पार पाडण्याकरितां आवश्यक असलेलें समर्थांचें विशिष्ट तत्त्वज्ञान त्यांचे अंगीं पूर्णपणें बाणलें होतें. लहानपणापासून ते शेवटपर्यंत श्रीसमर्थांनीं वर्णन केलेल्या ' निस्पृहाची व विरक्ताची शिकवण ' याचे ते मूर्तिमंत अवतार होते. 'कांता दृष्टी राखों नये। गोडी मनास चाखऊं नये। धारिष्ट चळतां दाखऊं नये। मुख आपुलें ।। येकें स्थळीं राहूं नये। कानकोंडें साहों नये। द्रव्यदारा पाहों नये। आकळेपणें ।। अपमानितां सिणों नये। निखंदितां कष्टों नये। धिःकारितां झुरों नये। कांहीं केल्या ।। नित्यनेम सांडूं नये। अभ्यास बुडों देऊं नये। परतंत्र होऊं नये। कांहीं केल्या '।। दीर्घोद्योग, अश्रांत परिश्रम, खोल अभ्यास, चिकाटी, स्वदेश व स्वभाषेवरील निरतिशय प्रेम, जगास तृणवत् लेखून अंगीकृत कार्याकरितां स्वीकारलेली त्यागवृत्ती व तिजबद्दल असलेला जाज्वल्य अभिमान इत्यादि अनेक गुणांमुळें राजवाडे यांनीं सुरू केलेलें इतिहाससंशोधनाचें घोर तप अखंडपणें पार पाडण्यास ते समर्थ झाले.

केवळ भारतेतिहाससंशोधन हेंच राजवाड्यांचें प्रचंड कार्यक्षेत्र होतें. जुन्या इतिहासाचीं दप्तरें शोधून काढून भारतीय इतिहासावर नवीन प्रकाश

पाडण्याकरितां त्यांनीं आपलें सर्व आयुष्य व प्रचंड बुद्धिमत्ता खर्च केली. ऐतिहासिक कागदपत्रें शोधून काढण्याकरितां त्यांनीं दूरदूरचा प्रवास केला, दऱ्याखोऱ्यांतून हिंडले, अनेक डोंगर पालथे घातले, नानाप्रकारचे कष्ट सोसले, व पोटापाण्याची सुद्धां क्षिती बाळगली नाहीं. भोर संस्थानांतील शिवपूर्वकालीन मराठ्यांचीं घराणीं जीं आज पुढें आलेलीं दिसत आहेत, त्यांचें श्रेय सर्वस्वीं राजवाड्यांनाच दिलें पाहिजे. खेड्यांपाड्यांत जाऊन जुन्या कागदपत्रांचा गळाठा धुंडाळण्याकरितां त्यांना सामान्य अज्ञ जनांचें आर्जव करावें लागलें, त्यांच्या घराचे उंबरठे झिजवणें भाग पडलें व कित्येक वेळां त्यांस आपला मानी स्वभाव सुद्धां एका बाजूस ठेवावा लागला. ऐतिहासिक स्थळांचें निरीक्षण करण्याकरितां त्यांनीं अनेक वेळ पायीं प्रवास केला, स्वतः शिजविलेली भाजी-भाकरी खाऊन दिवस काढले. परंतु स्वतःस अत्यंत प्रिय असलेल्या कार्या-पासून ते कधींहि पराङ्मुख झाले नाहींत. त्यांच्या पाठीमागें कोणत्याहि प्रकारचा कौटुंबिक पाश नसल्यामुळें रात्रंदिवस त्यांस इतिहाससंशोधनाचा निदिध्यास लागला होता. द्रव्य आणि दारा यांचा त्यांनीं शेवटपर्यंत त्याग केला होता. त्यांचा स्वभाव कांहींसा हेकेखोर व एककल्ली असल्यामुळें अनेक विद्वान् व विख्यात पंडितांचें व कित्येक संस्थांचें व त्यांचें कधींहि जमणें शक्यच नव्हतें. इतकेंच काय परंतु त्यांच्याच प्रेरणेनें व परिश्रमानें स्थापन झालेल्या भारतइतिहाससंशोधनमंडळासारख्या संस्थांचाहि त्यांना अखेर संबंध सोडावा लागला. यामुळें त्यांच्या कार्याच्या उपेक्षेला व लोकांच्या अप्रियतेला ते स्वतःच कांहींसे कारण झाले, असें म्हटल्यास चुकींचें होणार नाहीं. कांहींहि असलें तरी त्यांस अंगीकृत कार्याबद्दल इतका अभिमान व आत्म-विश्वास होता कीं, सामान्य जगाच्या मदतीची त्यांनीं काडीइतकी सुद्धां पर्वा केली नाहीं. त्यांस आधुनिक सुधारणांचा व सभामंडळें यांच्या ठरावांतील दिखाऊपणाबद्दल अत्यंत तिरस्कार वाटे. त्यांच्या कडक शिस्तीमुळें लोक त्यांच्यापाशीं जाण्यास धजावत नसत. आपण आंखून दिलेल्या मार्गावरून जाण्यास जे कचरत, त्यांच्यावर ते रागानें धुमसत आणि म्हणूनच त्यांस प्रो. विजापूरकर विनोदानें ‘ दुर्वास ऋषी ’ म्हणत. परंतु दुर्वास ऋषीप्रमाणें त्यांची इतिहासविषयक तपश्चर्याहि अत्यंत घोर व दीर्घकालीन होती.

त्यांच्या ग्रंथसंपत्तीकडे सहज नजर फेंकली असतां त्यांच्या व्यापक प्रयत्नाची व अचाट बुद्धिमत्तेची साक्ष सामान्य वाचकांसहि पटण्यासारखी आहे. ऐतिहासिक कागदपत्रें गोळा करून त्यांनीं मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे बावीस खंड प्रसिद्ध केले. यांखेरीज इतर स्वतंत्र विषयांवरहि त्यांनीं पांच सहा मोठमोठे ग्रंथ लिहिले आहेत. ऐतिहासिक साधनांचे खंड प्रसिद्ध करण्याचे आधीं कै. विजापूरकरप्रभृति विद्वान् मंडळींच्या साहाय्यानें ते एक स्वतंत्र मासिक पुस्तक चालवीत असत. तद्वारें त्यांनीं कांहीं पाश्चिमात्य ग्रंथकारांच्या ग्रंथांचीं भाषांतरें करण्याचा व्यवसाय सुरू केला होता. कांहीं आकस्मिक कारणांमुळें त्यांचा हा व्यवसाय बंद पडला व इतिहाससंशोधनाचें महत्तप अतःपर सुरू झालें. शके १८२० सालीं त्यांच्या ऐतिहासिक साधनांचा पहिला खंड बाहेर पडला. त्यांच्या निधनापर्यंत म्हणजे पुरीं अडीच तपें राजवाड्यांचा हा दीर्घोद्योग अखंडपणें व अनन्यभावनेनें चालू होता. त्यांनीं या कार्यास ज्या काळीं हात घातला, त्या काळीं मराठ्यांच्या इतिहासाची स्थिति अत्यंत शोचनीय व अपमानास्पद होती. परकीय पंडितांच्या साहाय्याखेरीज मराठ्यांचा इतिहास मुळींच उपलब्ध नव्हता असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाहीं. ही स्थिति बदलून, मराठ्यांच्या इतिहासाची विश्वसनीय माहिती जुन्या अस्सल कागदपत्रांवरून गोळा करण्याकरितां राजवाडे सिद्ध झाले. याखेरीज राजवाडे यांनीं इतर स्वतंत्र विषयांवर जे ग्रंथ व अनेक निबंध लिहिले आहेत, त्यांवरून त्यांच्या अष्टपैलू बुद्धिमत्तेची व दीर्घ व्यासंगाची सहज कल्पना येते. ज्ञानेश्वरीची जुन्यांत जुनी प्रत शोधून काढून तत्कालीन भाषेचें लिहिलेलें व्याकरण यावरून त्यांच्या विवेचक कल्पनाशक्तीची व गाढ विद्वत्तेची प्रचीति येण्यासारखी आहे. त्यांनीं आपलीं शेवटचीं पांचसहा वर्षे ‘ मराठी भाषेचा धातुकोश ’ नांवाचा प्रचंड ग्रंथ लिहिण्यांत घालविलीं. शब्दांच्या इतिहासाचें खोल अध्ययन करून त्यांनीं ‘ महाराष्ट्राचा वसाहतकाल ’ म्हणून एक अत्यंत मार्मिक व विवेचक लेखावलि लिहिली आहे. समाजशास्त्र व राजकारण यांवर देखील त्यांनीं अनेक सुप्रसिद्ध लेख लिहिले आहेत. ‘ इतिहास आणि ऐतिहासिक ’ या मासिकांत इतिहाससंशोधनाबद्दल त्यांनीं आपल्या अंतःकरणाची तीव्र

तळमळ व्यक्त केली आहे. यांखेरीज भारत इ. सं. मंडळाच्या सभांतून वाचलेलीं अनेक टिपणें व लेख व ऐतिहासिक कालांतील महानुभावीय गुप्त संकेत फोडून कित्येक गोष्टींची महाराष्ट्रास ओळख करून देण्यांत राजवाडे यांनीं जी कल्पकता व बुद्धीची कुशाग्रता प्रगट केली ती खरोखरीच आश्चर्यजनकच आहे. त्यांची प्रस्तावना लिहिण्याची एक विशिष्ट पद्धति असे. त्यांनीं लिहिलेल्या प्रत्येक ओळींत त्यांची ती साधी परंतु करारी आणि उग्र मूर्ति प्रतिबिंबित झाली आहे. भाषेच्या सजावटीस किंवा 'तालबद्ध संगीत कल्पनेला' ते कधींहि शिवले नाहींत. त्यांची सत्यनिष्ठुरता व विचारांतील करारीपणा हीं साधारण लोकांस मानवण्यासारखीं नाहींत.

शारदोपासक संमेलनाच्या व्यासपीठावरून राजवाडे यांनीं केलेलें एकच भाषण वाचून ते कोणत्या तऱ्हेचे पुरुष होते याची कल्पना करतां येईल. 'शेंडी तुटो कीं पारंबी तुटो' परंतु मायभाषेखेरीज अन्यभाषाद्वारें त्यांनीं कधींहि एक ओळ देखील लिहिली नाहीं. आपले ग्रंथ इंग्रजीद्वारें लिहिले असतां आपली जगभर कीर्ति होईल, मराठ्यांच्या इतिहासाचें नांव सर्व जगभर ऐकूं येईल, इत्यादि विचारांस बळी पडून परकीय लेखणीचा त्यांनीं कधींहि अवलंब केला नाहीं. शारदोपासक संमेलनाच्या पीठावरून महाराष्ट्र भाषाभिज्ञांस त्यांनीं एकच सवाल टाकला:—'आपली मराठी भाषा मरणाच्या पंथास तर लागली नाहीं ? आणि मरणाच्या पंथास जर लागली असेल तर त्या मढ्याला सजवीत बसण्यांत कोणता शहाणपणा आहे ?' मराठी भाषेला मृत्युपंथास लावणारे जे अनेक जबरदस्त महारोग आहेत, त्यांचा समूळ निःपात करण्याकरितां त्यांनीं जे उपाय सांगितले आहेत ते सामान्य जनास अव्यवहार्य व एककल्ली वाटण्याचा संभव आहे. परंतु मराठी भाषेचें रोपटें परकीय भाषेच्या दडपणामुळें कसें खुरटत चाललें आहे, याचा खरोखरच दूरवर विचार केला असतां राजवाडे यांचें निवेदन कठोर असलें तरी किती सत्य आहे, याची प्रत्येकास खात्री पटेल. त्यांचें मराठी भाषेबद्दल अनन्यसाधारण प्रेम आढळून येतें. एकादी माता ज्याप्रमाणें आपल्या अपत्याच्या प्रकृतिस्वास्थ्याकरितां किंचित् मनोनैष्ठुर्य दाखवून त्याच्या घशांत कडू औषध ओतीत असते, त्याप्रमाणें राजवाडे यांनीं

भाषेच्या वृद्धीसाठीं कठोर परंतु निश्चित मार्ग दाखवून दिले आहेत. परंतु त्यांची ही सत्यनिष्ठुरता तलवारीच्या धारेप्रमाणें तीव्र असल्यामुळें सामान्य जनांस ती पटण्यासारखी नसल्यास त्यांत नवल नाहीं. व्यवहार्यतेच्या पोकळ कल्पनांनीं त्यांनीं आपलीं मतें कधींहि बदललीं नाहींत. या गोष्टीबद्दल येथें इतकी चर्चा करण्याचें कारण, राजवाडे यांचें अंतःकरण मराठी भाषेच्या सध्यांच्या शोचनीय परिस्थितीमुळें किती तळमळत होतें याचें दिग्दर्शन करावयाचें हें होय.

याप्रमाणें महाराष्ट्रभाषेबद्दल जाज्वल्य अभिमान असलेला हा कट्टा वीर, भारत इतिहास संशोधनांत आपल्या आयुष्याचीं तीस पस्तीस वर्षे घालविणारा हा महापुरुष काळाच्या उदरांत गडप झालेला पाहून अंतःकरणांत दुःखाचा उमाळा आल्याखेरीज रहात नाहीं. राजवाडे यांच्यासारख्या महापुरुषांनीं इतिहाससंशोधनासारख्या राष्ट्रीय कार्याकरितां अनन्यभावानें आपलें सर्व आयुष्य खर्च केलें, हें महाराष्ट्रास चिरंतन अभिमानास्पद आहे. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें त्यांनीं लोकांपुढें मांडून भारतेतिहासावरच काय परंतु जगाच्या इतिहासावर त्यांनीं थोर उपकार करून ठेविले आहेत. त्यांनीं आपलें सर्व वाङ्मय केवळ मराठींतूनच लिहून ठेविलें असल्यामुळें त्यांच्या प्रतिभासंपन्न बुद्धीची ओळख जगास आजच होणें शक्य नसलें, तरी हा त्यांचा दोष नसून परिस्थितीचा दोष आहे. उलट ते आपल्या प्रतिज्ञे-पासून आमरण कधींहि भंग पावले नाहींत, याबद्दल त्यांचें करावें तितकें कौतुक थोडेंच आहे. या त्यांच्या करारी बाण्यापासून महाराष्ट्रास मोठा धडा शिकावयाचा आहे. परिस्थितीच्या पायबंदामुळें मराठींतील अभियुक्त ग्रंथ-कारांसहि सध्यां विशेष कोणी पुसत नसल्यास त्यांत नवल नाहीं. इंग्रजी हीच सध्यां राजभाषा असल्यानें तिच्या घातुक दडपणामुळें आपल्या भाषेची व तींतील वाङ्मयाची गति कुंठित झाली असली तरी राजवाड्यांसारख्या थोर पुरुषांच्या निग्रही व बाणेदार वर्तनापासून स्फूर्ति मिळवून मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठीं शक्य तितके प्रयत्न केले पाहिजेत आणि हे प्रयत्न राजवाड्यां-सारखे इतके लोकोत्तर असले पाहिजेत कीं, जगांतील वाङ्मयभक्तांनीं त्यांचा एक वेळ राष्ट्रीय सन्मान केला पाहिजे. राजवाडे यांच्या कामगिरीचें

महत्त्व अद्याप मराठी भाषा जाणणाऱ्या पंडितांस देखील पूर्णपणें पटलें आहे कीं नाहीं याची शंका येते. कारण मराठ्यांच्या इतिहासाचें परिशीलन व्हिन्सेंट स्मिथ, लेनपूल किंवा ग्रँट डफ साहेबांच्या ग्रंथांबाहेर न करणारे पुरुष महाराष्ट्रांत अद्याप थोडे नाहींत. परकीय भाषेंतील साधारण ग्रंथकारांनीं लिहिलेल्या इतिहासाच्या द्वारें आम्हीं आपल्या भावी पिढीस ज्ञानपान करवितों ही खरोखर गर्हणीय गोष्ट आहे. राजवाडे यांच्यासारख्या अभियुक्त ग्रंथकारांच्या कृतीचें आम्ही योग्य चीज करीत नाहीं, हें आमच्या बौद्धिक अधःपाताचें चिन्ह नव्हे काय ?

खरे, भावे, पारसनीस वगैरे थोर इतिहाससंशोधक दिवंगत झाल्यानंतर त्यांच्या पाठोपाठ राजवाडेहि गेले. या सर्व इतिहासकारांच्या अकालीं निधनामुळें महाराष्ट्रेतिहासाची जी भयंकर हानि झालेली आहे ती पाहून कोणाचें अंत:करण दुःखावेगानें भरून येणार नाहीं ? राजवाड्यांच्या निधनामुळें महाराष्ट्रेतिहासज्ञांच्या सभेंतील रिकामें पडलेलें हें आचार्यपद कोण केव्हां सुशोभित करील हें एकट्या काळासच माहित !

---

## शुकास

### कवि : केशव काशीनाथ आंबेकर, नसरापूर.

[यांचा जन्म श. १७९८ मध्यें वांई येथें झाला. त्यांचें इंग्रजी शिक्षण साताऱ्यास होऊन पुढें त्यांनीं भोर संस्थानच्या पोलीस खात्यांत नोकरी धरली. सध्यां ते नसरापूर येथें फौजदार आहेत.]

गोड गिरा या अवेळीं
का गा शुका बोलसी ? ॥ धृ ॥
रसिक परी दुष्टाहातीं
खचित बद्ध होसी;

अविचारें नाश करोनी
कां बळेंचि घेशी ?
उचित मौन वरणें आतां
साच तव हितासी;
गान हेंचि जीवन तूंतें,
नावरे मनासी;
येइं तरी रिझवाया बा,
गानिं केशवासी !

---

# शिक्षणांतील दोन मुख्य दोष

लेखक : त्रिंबक अप्पाजी कुळकर्णी, बी.ए., नाशिक.

[ हे भोर संस्थानांतील सुधागड पालीचे रहिवासी होत. बी. ए. झाल्यानंतर त्यांनीं शिक्षणविषयक कामास सुरुवात केली. मुंबई येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापकांपैकीं ते एक प्रमुख चालक होत. सध्यां ते नाशिक येथील 'हंसराज प्रागजी ठाकरसी ' या कॉलेजचे प्रिन्सिपॉल आहेत.]

जगांतील सर्व देशांत शिक्षणाची प्रगति झपाट्यानें चालू आहे व ती प्रगति कशी कायम ठेवितां येईल या गोष्टीकडे सर्व लोकांचें लक्ष आहे. आपल्या देशांत शिक्षणाचा प्रसार सर्व जातींत सारख्या प्रमाणांत नसल्यामुळें राजकारणांत मोठ्या भानगडी उपस्थित झाल्या आहेत. शिक्षणप्रसाराच्या कार्याकडे कांहीं लोक निराळ्या दृष्टीनें पहात आहेत व त्यांची दृष्टि शिक्षणाच्या दोषांकडे लागलेली आहे. ते दोष कसे काढून टाकतां येतील याचा विचार करणें जरूर आहे. त्या दोषांपैकीं मुख्य असे जे दोन दोष आहेत त्यांचा थोडासा विचार मी या ठिकाणीं करीत आहें.

पहिला दोष कष्ट करण्याचा कंटाळा. ज्या ठिकाणीं शिक्षणाचा फैलाव जोरानें झाला आहे, त्या ठिकाणीं लोक आळशी, पोशाखी व कामचुकार

असे आढळतील. अंगमेहनतीचें कोणतेंच काम करण्याची त्यांची तयारी नसते व एका ठिकाणीं बसून कमी कष्टाचीं कामें करणें त्या लोकांस आवडतें. शेतीचा व उद्योगधंद्यांचा अशा लोकांस कंटाळा येतो व त्याचा परिणाम असा होतो कीं, फक्त कारकुनी पेशाचें काम करण्यास पुष्कळ लोक तयार असतात व त्यांत त्यांस मोठेपणा व अभिमान वाटतो. काबाडकष्ट करण्यास मात्र फारच थोडे लोक कबूल असतात. कष्ट करणें हें कमीपणाचें आहे. असें मानलें गेलें असल्याकारणानें जो मनुष्य आपले हात काबाडकष्ट करण्यास मुळींच वापरीत नाहीं, फार काय पण जो कष्टाचीं सर्व कामें दुसऱ्यावर टाकतो, तो मनुष्य समाजांत फार श्रेष्ठ व अत्यंत सुखी अशी भ्रामक समजूत दृढ होते. ज्या लोकांचें शेतीचें उत्पन्न सालिना हजारों रुपयांचें आहे व ते आपल्या घरीं चांगले पगारदार नोकर ठेवूं शकतात, अशा सधन शेतकऱ्यांचीं मुलें थोडेंसें शिक्षण मिळाल्याबरोबर आपल्या शेतीची हेळसांड करितात व दरमहा पांचपंचवीस रुपयांच्या कारकुनीच्या नोकरीसाठीं धडपड करीत राहतात. कारण तशा नोकरीनें समाजांत दर्जा वाढतो अशी त्यांची समजूत असते. तसेंच उत्तम कारागीर असलेल्या लोकांचीं मुलें थोडें लिहितांवाचतां येऊं लागल्याबरोबर आपला कौशल्याचा धंदा सोडून कारकुनीच्या मागें लागतात व आपल्या घरांतील उत्तम धंदा गमावून बसतात. या सर्वांचा दोष समाजावर आहे; कारण समाज कारकुनास जास्त मान देतो व हातानें काम करणारास हलका मानतो.

शिक्षणाचा दुसरा दोष म्हटला म्हणजे केवळ परीक्षांना व पैशाला दिलें जाणारें महत्त्व व त्यांमुळें शीलाकडे व सच्चारित्र्याकडे होणारें दुर्लक्ष. परीक्षा, डिग्री, पदवी व पैसा या सर्वांना महत्त्व आहे. पण यांचे बरोबरच मनुष्याचे अंगीं शील उत्तम असलें पाहिजे. शील उत्तम बनविणें ही संवयीनें होणारी गोष्ट आहे. उत्तम संवयी संपादन करणें हें फार कष्टाचें आहे व शिक्षकांनीं व समाजानें सुद्धां परीक्षांपेक्षां शीलाला जास्त महत्त्व दिलें पाहिजे. सरकारी नोकरींत पैसे खाऊन श्रीमंत होऊन थाटानें राहणाऱ्या सुशिक्षित मनुष्यास समाजांत चांगला दर्जा मिळतो, कारण त्याचे जवळ पैसा भरपूर असतो. तो पैसा कशा तऱ्हेनें संपादन केलेला असतो, ही गोष्ट जरी समाजाला माहित

असली, तरी समाज त्या मनुष्याच्या दुर्वर्तनाकडे दुर्लक्ष करून पैशामुळें त्यास मान देतो व म्हणून वाईट मार्गानें पैसा मिळवून श्रीमंत होण्याकडे पुष्कळांचा कल असतो. तसेंच गरीब पण सुशील असणाऱ्या लोकांस जर समाजांत मान मिळेल तरच शीलसंवर्धनाकडे मुलांचें जास्त लक्ष जाईल.

या दोन्ही गोष्टींत सुधारणा होण्यासाठीं व शिक्षणांतून हे दोष नाहींसे करण्यासाठीं समाजांतील उच्च दर्जाच्या माणसांनीं समाजाला चांगलें वळण लाविलें पाहिजे. मोठ्या माणसांनीं आपल्या कृतीनें कष्ट करणें हें कमीपणाचें नाहीं व कष्ट करण्याचा मनुष्याला अभिमान वाटला पाहिजे या गोष्टी दाखवून दिल्या पाहिजेत. तसेंच शीलाचें महत्त्व मोठ्या माणसांनीं आपल्या सदाचरणानें सिद्ध करून दिलें पाहिजे, म्हणजे हे दोष पुष्कळ प्रमाणांत कमी होतील.

---

# कलेची कला

लेखक: स. वि. पुरोहित, पुणें.

आकाश निरभ्रच होतें, पण मनोनभावर औदासिन्याचे मेघ आल्यामुळें तिला तें मेघाच्छादित दिसत होतें. कान्तिमान चंद्रकला आज कलेच्या दृष्टीला निस्तेज दिसत होती. मन उदास असलें म्हणजे भोंवतालची सृष्टीहि उदासच भासूं लागते. कलेची मनःस्थिति आज अशा प्रकारचीच होती. पुनः तिची विचारमालिका सुरू झाली. “ बुधवार बुधवार आठ नि आज गुरुवार नऊ. आणखी पांचसहा दिवस प्रकृतीची विशेष काळजी घेतली पाहिजे, असं डॉक्टरांनीं बजावून सांगितलं आहे. श्रीकांत आज इथं असता तर त्याचा नसता का उपयोग झाला ? पण त्याचा स्काउट कँप याच वेळीं निघाला. विद्याधर ! पण त्यांचा आपला तसा काय संबंध ! तथापि ते आज असते तर शेजारधर्माप्रमाणें त्यांनीं नसतों कां आपणांस मदत केली ! ”

कर्रर्र असा दाराचा आवाज झाला. कलेची विचारशृंखला एकदम तुटली. तिनें मागें वळून पाहिलें तों दारांत विद्याधर उभा होता. अपेक्षित व्यक्ति अनपेक्षितपणें समोर उभी राहिल्यावर मनाचा जो गोंधळ होतो, तसाच कलेचा

विद्याधरच्या आकस्मिक येण्यानें झाला. तथापि मनःस्थितींत झालेला गोंधळ विद्याधरच्या निदर्शनास न येईल अशा शांत आवाजानें तिनें, "विद्याधर, या ना आंत," असें म्हणून जवळच असलेली आरामखुर्ची त्यास बसण्यासाठीं पुढें सारली. कलेनें पुढें केलेल्या आरामखुर्चीवर विद्याधर जाऊन बसला. पण त्याच्यानें तिच्या उदास झालेल्या निस्तेज मुखाकडे पाहवलें नाहीं. कलेचा चेहरा निस्तेज होण्याचें कारण, ती आजारी तर नसेल ना अशी शंका त्याचे मनांत येऊन त्यानें अधीरतेनें विचारलें,

"तुम्हांला बरं कां वाटत नाहीं ? आजारी तर नाहीं ना ?"

"छेः, मुळींच नाहीं. मला कांहींसुद्धां होत नाहीं."

"तुमचं मन कष्टी होणार नसेल तर मी विचारूं कां, कसल्या काळजीमुळें तुमचा चेहरा इतका उदास दिसतो ? तुमची काळजी दूर करणं मला शक्य असेल तर शक्य ती मदत मी आनंदानं करीन."

सहानुभूतीच्या प्रेमळ शब्दांनीं आपलें काम केलें. कलेचें हृदय गहिंवरलें, डोळे पाण्यांनीं डबडबले, ती सद्गदित आवाजांत म्हणाली,

"विद्याधर, आई फार आजारी आहे हो ! आजचा नव्वा दिवस. पण तापास कसा तो उतारच नाहीं. दोषिक ताप आहे असं डॉक्टरांचं म्हणणं आहे."

"कोणत्या डॉक्टरांचं औषध सुरू केलं आहे ?"

"डॉक्टर देवभक्तांचं; तुमचा व त्यांचा परिचय आहे असं त्यांच्या बोलण्यांत आलं होतं."

"ते व मी एकाच गांवचे रहाणारे आहोंत. पण श्रीकांत कुठं दिसत नाहीं ? औषधासाठीं डॉक्टरांकडे तर गेला नाहीं ?" चौकस दृष्टीनें इकडेतिकडे पहात विद्याधरानें प्रश्न केला.

"छेः, तो इथं नाहीं. यंदां लोणावळ्यास त्याचा स्काउटचा कँप असल्यानं तो तिकडेच गेला आहे."

विद्याधरास आतां एकंदर सर्व परिस्थिति आकलन करतां आली. प्रेमसर्वस्व अशी आई तापानें–दोषिक तापानें–आजारी पडल्यामुळें कलेची चित्तवृत्ति बावरून जाणें कसें स्वाभाविक आहे व विशेषतः श्रीकान्त येथें

नसल्यानें तिची झालेली असहाय्य स्थिति कशी अनुकंपनीय आहे वगैरे गोष्टी त्याच्या लक्षांत आल्या. थोडासा विचार करून तो उठला तो तडक आजारी असलेल्या कलेच्या आईच्या खोलींत गेला. पण तिला झोंप लागलेली असावी असें त्यास आढळून आलें. बाहेर जाण्याच्या उद्देशानें तो कलेजवळ येऊन उत्तेजित स्वरांत म्हणाला, " नाउमेद होऊन आपला धीर खचूं देऊं नका. ईश्वरी कृपेनें आपले प्रयत्नास खात्रीनें यश येईल. मी आतां देवभक्ताकडे जातों. " असें म्हणून विद्याधर जाण्यास निघाला. नजरेआड होईपर्यंत कला त्याचेकडे अनिमिष दृष्टीनें पहात होती. कृतज्ञतेचे दोन अश्रुबिन्दू तिचे डोळ्यांत उभे राहिले; तिची दृष्टि सहज आकाशाकडे गेली. कांहीं वेळापूर्वी क्षीण दिसणारी कान्तिमान् चंद्रकला कलेच्या दृष्टीला आतां निस्तेजच दिसली असेल का ?

* * * *

लोणावळ्याहून श्रीकान्त येऊन आतां बरेच दिवस झाले होते. आपल्या गैरहजेरींत आईची तब्येत दोषिक तापानें अत्यवस्थ झाल्याची व त्या प्रसंगीं आपण असहाय्य झालों असतां आईची सुश्रूषा करण्याचे कामीं विद्याधरानें कशी मदत केली वगैरे हकीगत कलेकडून श्रीकान्तास घरीं आल्यावर समजली. ईश्वरी कृपा तर खरीच. परंतु आईची प्रकृति जी हळूहळू सुधारते आहे, तिचें बरेंचसें श्रेय विद्याधरच्या प्रयत्नास आहे अशी कलेप्रमाणें श्रीकान्ताची देखील समजूत झाली होती. विद्याधराबद्दल त्यास आतां आदरयुक्त प्रेम वाटूं लागलें. जवळच भिंतीवर टांगलेल्या कॅलेंडरावर त्याचें लक्ष जाऊन त्याच्या डोक्यांत एक विचार आला. " ताई ! ए कलाताई ! " पण कला या वेळीं शेजारच्या खोलींत दार बंद करून बसली असल्यामुळें तिला श्रीकान्ताची हांक ऐकूं आली नाहीं. तिच्या खोलीजवळ जाऊन त्यानें दारावर टिक् टिक् असा आवाज केला.

" कोण आहे ? "

" मी, श्रीकान्त आहें. जरा दार उघडतेस का ? "

" होय. " असें म्हणून कलेनें कलरडिशमध्यें बुडविलेला ब्रश परत जागचे जागीं ठेवून तिनें दार उघडलें.

" कोठपर्यंत झालें आहे चित्र, मला दाखवतेस का ? " कला काढीत असलेल्या चित्राकडे पाहून श्रीकान्तानें प्रश्न केला.

" छेः, अपुरें चित्र मी कधींच कोणास दाखवीत नाहीं. "

कलेच्या उत्तरानें तो हिरमुष्टी झाला. पण बहिणीचा करारी स्वभाव श्रीकान्तास परीचित असल्यानें त्यानेंहि मग विशेष आग्रह धरला नाहीं.

" ताई, एक विचारूं का ? "

" काय ? "

" उद्यां रविवार आहे; तेव्हां तुझी सम्मत्ति असेल तर विद्याधरांना उद्यां आपल्याकडे जेवणाचं निमंत्रण करूं का ? "

"अरे पण, उद्यां सकाळीं आपल्याकडे येण्यास त्यांना सवड होणार नाहीं, असं कालच ते म्हणत होते. म्हणून उद्यां संध्याकाळचं त्यांना निमंत्रण करून ये. अन् श्री, मी देतें एवढें पत्र त्यांना नेऊन दे. " असें म्हणून कलेनें नोट-पेपरवर कांहीं मजकूर लिहून तो पाकिटांत घालून तें श्रीकान्ताजवळ दिलें.

ताईची सम्मत्ति मिळाली. उल्हासित मनानें तसाच तो विद्याधरांना निमंत्रण करण्यास निघाला. कलेची मनस्थिति अशीच झाली असेल का ?

सायंकाळचे पांच वाजण्याची ती वेळ होती. विद्याधर आपल्या खोलींत हातांत पुस्तक घेऊन आरामखुर्चीवर बसला होता. पण आज त्याचें वाचना-कडे लक्ष लागत नव्हतें. घटकेंत पुस्तक उघडावें, क्षणभरानें तें मिटवावें, पुन्हां तें उघडून वाचल्यासारखें करावें तों कोणतातरी विचार मनांत येऊन पुन्हां तें मिटवावें असा क्रम कितीतरी वेळ चालू होता. शेवटीं तो कंटाळला हातांतील पुस्तक मिटून त्यानें शेल्फवर ठेविलें व खोलींतच त्याच्या इकडेतिकडे येरझारा सुरू झाल्या. पुस्तक वाचनाच्या मिषानें आतांपर्यंत दबलेल्या विचारांना आतां वाचा फुटली–तो आपल्याशीं विचार करूं लागला. मनुष्य प्रत्येक गोष्ट काय जाणूनबुजूनच करतो ? पुष्कळ गोष्टी नकळत त्याचे हातून होतात. यमुनाबाई दोषिक ज्वरानें आजारी काय पडतात, त्यांची शुश्रूषा करण्याच्या कामीं मी कलेला मदत काय करतों आणि अशा परि-चयानें सहवास वाढून त्याचें रूपान्तर प्रेमांत काय होतें ? कलेचें शरीर-सौंदर्य माझ्या दृष्टीला आकर्षक वाटलें म्हणून तर माझें प्रेम तिच्यावर जडलें

नसेल ना ? कां तिच्या ठिकाणीं वसत असलेल्या गुणांवर लुब्ध होऊन मी प्रेमासक्त झालों असेन ? किंवा,—कोणीं सांगावें तसें नसेल म्हणून, माझ्या वरील तिच्या निस्सीम प्रेमामुळें माझ्या ठिकाणीं प्रेमाचा विकास झाला नसेल ? जीवितांत आशा आणि प्रेम नसेल तर तें जीवन निरसच नाहीं का ? प्रेमजलसिंचनाशिवाय जीवित-काव्य-लता कशी वाढीला लागावी ? कलेवर माझें निस्सीम प्रेम आहे, परंतु तिचें माझ्यावर......खरोखर प्रेमासारखा रोग नाहीं व प्रेमभंगासारखें मरण नाहीं म्हणतात तें खोटें नाहीं. अशा प्रकारें विचाराच्या परिभ्रमणानें त्याचें डोकें सुंद झालें. बाहेरील मोकळया हवेंत फिरण्यास गेल्याशिवाय डोकें शांत होणार नाहीं, म्हणून त्यानें अंगांत कोट घालून डोक्यावर टोपी ठेवणार तोंच दारावर थाप मारल्याचा आवाज झाला. विद्याधरानें दाराजवळ जाऊन दार उघडलें तों श्रीकान्त बाहेर उभा असलेला दिसला.

" काय हो ! आज कुणीकडे ? " विद्याधरानें स्मित करून प्रश्न केला.

" आलों होतों उद्यांचं तुम्हांस निमंत्रण करण्यासाठीं. उद्यां सकाळीं तुम्हांस सवड नाहीं, असं ताई म्हणत होती. म्हणून संध्याकाळचं जेवणाचं निमंत्रण देण्यासाठीं आलों आहें. मग काय ? आपणांस सवड होईल असंच मी समजूं ना ? "

" " उद्यां किती वाजतां ? "

" आपली गैरसोय होणार नसेल तर सायंकाळीं सात वाजतां. "

" ठीक आहे. मी आनंदानं येईन. "

" अच्छा ! " असें म्हणून श्रीकान्त जाण्यास उठला. जातांना कलेनें दिलेलें पत्र विद्याधरला देण्यास तो विसरला नाहीं. श्रीकान्त गेल्यावर विद्याधरनें कलेचें पाकिट फोडलें, तों पत्राचीं दोन्ही टोकें फाटलेलीं त्यास दिसून आलीं. त्यांकडे कानाडोळा करून त्यानें पत्र वाचण्यास सुरुवात केली. पत्रांतील मजकूर सारांशरूपानें होता तो असा:—

" उद्यां सायंकाळीं आपणांस आमचेकडे जेवणास येण्यास सवड होईल या आशेनें आपणांस हें पत्र लिहित आहें. आपण येथें आल्यावर, बॉंबे आर्ट

सोसायटीतर्फे भरणाऱ्या प्रदर्शनमध्यें ठेविण्यासाठीं मी नवीन काढीत असलेलें पेन्टिंग उद्यां पुरें होईल तें आपणांस दाखविण्याचा माझा मनोदय आहे. मनोदय माझा असला तरी तो तडीस नेणें आपल्याच स्वाधीन आहे. कळावें ही विनंति.

—कला ”

विद्याधरानें तें पत्र कितीतरी वेळां वाचून पाहिलें असेल! असें काय पत्रांत गूढ होतें, कीं तें त्यास इतका वेळ वाचूनहि आकलन करतां आलें नाहीं?

*   *   *   *

फिरत्या भोंवऱ्याप्रमाणें कलेचे मनोविचार खोलींत ( स्टुडिओ ) सभोंवार टांगलेल्या अनेक चित्रांवरून फिरत होते. मध्येंच तिनें खोलीच्या दाराकडे बघावें, तों पुन्हां तिनें आपली दृष्टि आज पुरें केलेल्या चित्राकडे रोखावी. आतुरतेनें ती कोणाची तरी वाट पहात असावी असें तिच्या अधिऱ्या वृत्तीवरून वाटत होतें. पण शेवटीं कंटाळून ती खुर्चीवरून उठणार तोंच तिनें दार उघडल्याचा आवाज ऐकला म्हणून ती लागलींच खालीं बसली व जवळच्याच चित्राकडे पहाण्यांत गढून गेलों आहोंसें तिनें दाखविलें. विद्याधर दार उघडून आंत आला. आधींच आतुर झालेल्या तिच्या मनाला हा विलंब कसा सहन व्हावा! स्वाभाविकपणें नकळतच तिची दृष्टि त्याच्याकडे जाऊन एकदम तिनें त्यास विचारलें, “ काय उशीर हा! ”

“ पण चित्र पहाण्यांत गुंग झालेल्या माणसाला उशीर कसा झाला हें कसं समजतं?” व्यंजोक्तीनें त्यानें विचारलें. बिचारीला आपली बतावणी फसली म्हणून वाईट वाटलें. मध्यंतरीं कोणीच कोणाशीं बोललें नाहीं. शेवटीं विद्याधरनें शांततेचा भंग करून विचारलें,

“ तुम्ही आज पुरें केलेलें चित्र तें हेंच का? ”

होकारार्थी कलेनें आपली मान हलविली.

“ तुम्हीच म्हणतां म्हणून, नाहींतर हें चित्र तुमचीच कृति असेलं अशी कल्पनासुद्धां मला शिवली नसती. ”

“ खरंच आहे, कल्पनेनं तर्क करून चित्रकार ओळखणं हें वाटतं तितकं सोपं नाहीं ! ” विद्याधराच्या विचारण्यांतील खोंच ओळखून कलेनें उत्तर दिलें.

“ चित्राला विषय कोणाच्या प्रेरणेनं मिळाला? कां ही तुमची स्वतःचीच कल्पना ? ” उपरोधिकपणें विद्याधरानें प्रश्न केला.

“ चार महिन्यांपूर्वीं एका मासिकाचीं पानं चाळीत असतां ‘ रती ’ या नांवानं संबोधिलेली कविता माझ्या वाचनांत आली. त्या कवितेवरूनच मला हे चित्र काढण्याची कल्पना सुचली. माझं हें चित्र आपणांस पसंत नाहींसं दिसतं. ”

“ स्पष्ट बोलतों त्याचा राग मानूं नका. मला तुमचं चित्र आवडलं नाहीं हें खरं. ”

“ आपल्या स्पष्ट बोलण्याचा मला मुळींच राग नाहीं. परंतु आपणांस तें नापसंत पडण्याचं कारण आपण मनमोकळेपणानं सांगूं शकाल का? ”

“बारीक व तलम असं अस्मानी रंगाचं पातळ परिधान करून पहाणारास तें निमित्तमात्र वस्त्राच्छादनच वाटावं, जिच्या उरोभागावरील पदर अस्ताव्यस्त झाला आहे, हातांत पुष्पमाला घेऊन जिचे डोळे प्रियकराचे वाटेकडे लागले आहेत, अशा एका नवयुवतीचं चित्र रेखाटून भारतीयकलादृष्ट्या आपण उच्च परंपरेस व पर्यायानं समाजास घातुक वळण लावीत आहांत असं तुम्हांस नाहीं वाटत ? ”

“ परंपरेच्या दृष्ट्या विचार केल्यास दारू पीत असलेले देवाधिदेव, गोपगोपींच्या प्रणयचेष्टा, आपल्या प्रियकरणींच्या गळ्यांत हात टाकून बसलेले मोंगल सम्राट हीं किंवा अशाच प्रकारचीं चित्रं काय परंपरेस उच्च पदास नेणारीं समजावयाचीं ? बदलत्या काळाप्रमाणं लोकांच्या आचारविचारांत व अभिरुचींतहि बदल होत असतो, ही साधी गोष्ट नजरेआड करून कसं भागेल ! ”

“परंतु प्रस्तुत चित्रकार एक स्त्री आहे ही गोष्टहि विसरतां येण्याजोगी नाहीं.”

"चित्रकार, मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो, 'Art for Art's Sake' हेंच त्याचं ध्येय असतं. आणि चित्र पहाणारानं सुद्धां याच दृष्टीनं त्याच्या चित्रनिर्मितीकडे पहाणं जरूर आहे."

"परंतु चित्रकारानं सुद्धां आपलीं चित्रं संस्कृतीला घातुक होणार नाहींत याच ध्येयबुद्धीनं काढणं सुसंस्कृतीच्या दृष्ट्या श्रेयस्कर नाहीं का?"

"अहो, पण कलेचं ध्येयच मनोरंजन आहे. कलावान् माणसास त्याच्या कलेपासून जितका आनंद होतो तितका कोणत्याहि व कसल्याहि मोबदल्यानं होत नाहीं. कलानिर्मितीपासून होणारा आनंद हाच त्याचा मोबदला व तेंच त्याचं ध्येय."

"नैतिकदृष्ट्या तुमचं चित्र नीतिग्राह्य नाहीं याचं तुम्ही कसं समर्थन करणार?"

"वास्तविक कला या दृष्टीनं प्रस्तुत चित्राचा विचार केला पाहिजे. कला ही स्वैर आहे व अशा कलेला नैतिक बंधनांनीं जखडून टाकणं म्हणजे खऱ्या कलेबद्दल उदासीनता दाखविण्यासारखं आहे. चित्राचे बाह्यांगापेक्षां अंतरंगच ओळखावयाचं असतं. तें जो ओळखतो त्यालाच खरा आनंद होतो, व नीतिअनीतींच्या कल्पनांचा तिथंच विलय होतो." विद्याधर गप्प बसला. तो कांहींच बोलला नाहीं. थोड्याशा वेळानंतर "मला वाटत झाल्या या वादविवादावरून आपलं थोडंसं तरी समाधान झालं असेल नाहीं?" कलेनें उल्हसित मनानें विचारलें.

"समाधान म्हणाल तर तें प्रथम चित्रदर्शनानंच झालं होतं. परंतु आतांच्या या तुझ्या–तुमच्या संभाषणानं मात्र पूर्ण समाधान झालं आहे." 'तुझ्या'बद्दल 'तुमच्या' ही केलेली दुरुस्तीची चूक कलेला आवडली कीं नाहीं कोण जाणे! तिनें विचारिलें,

"विद्याधर?"

"काय?"

कला घुटमळली. तिला प्रश्न करवेना.

विद्याधर अडखळला, त्याला पुढें विचारवेना.

" प्रणयी जीवांच्या ससंवेद्य भावना अशाच प्रकारच्या का असतात ? "

विद्याधर स्वतःशींच पुटपुटला. त्यानें कलेकडे पाहिलें, तों ती आपल्याकडेच पहात आहे असें त्यास दिसून आलें. क्षणमात्र दोघांचें नेत्रमीलन झालें. कलेनें आपली नजर फिरविली, तों आकाशांत नुकतांच उगवलेला पौर्णिमेचा चंद्र तिच्या दृष्टीस पडला. कां कुणास ठाऊक, पण गतगोष्टीची तिला आठवण झाली. ती स्वतःशींच उद्गारली,

" विकासानंच ना प्रथम मंद दिसणाऱ्या चंद्रकलेचा असा पूर्ण चंद्र होतो ! मग माझ्या प्रेमकलेचा असाच नाहीं का पूर्ण चंद्र उगवणार ? "

---

## रोहिडगडास पाहून

कवि : महादेव गोपाळ दीक्षित थिटे, भोर.

[ जन्म शके १८०८ क्षेत्र महाबळेश्वरामध्यें; शिक्षण भोर हायस्कूलमध्यें; धंदा श्रौतदीक्षिताचा. वसती भोर, पंतसचिवांचे पिढीजाद आश्रित.]

( चालः—' प्रेमल ललना प्रेमातुल० )

रोहिलगड[1] दिसतांचि लोचनीं
निर्भर दाटे मोद मन्मनीं;
टाकि विचारीं नित गुंगवुनी,
प्रेरक होइ अम्हां तो कवनीं ! १

मंदरगिरिसा मावळप्रांतीं
गिरिवर शोभे अवनीवरती;
अर्पाया बहुसाल निज रति[2]
सोत्सुक ठाके आम्हांपुढती २

---

१. हा किल्ला भोरच्या नैऋत्येस आहे. याला विचित्रगड असेंं दुसरेंहि नांव आहे. २. प्रेम.

विचित्रगड हा शांत विलोकुनि
भासे येउनि पुराण मुनि कुणि,
स्फूर्ति मावळीयांच्या जीवनिं
देई पूर्व-पराक्रम कथनीं— ३

'रोहिडमल्ल,[३]' पाताल[४]-नभरि' या—
वांचुनि कांहिं न ठाईं तुझिया,
त्याच मदंतरिं हो फुलवाया
स्वाभिमान-कारण गडराया ! ४

गाइ तुझी इतिहास न कीर्ति
जाउनि हें उपजे मनिं खंती;
रिझवाया तरि तुज मी संप्रति
गातों ही रोहिडगड-गीती ! ५

---

# सिंधी स्त्रियांची राहणी

लेखिकाः सौ. सरलाबाई जोशी, शिकारपूर ( सिंध ).

[ जन्म पुणें येथें सन १९०७ सालीं झाला. शिक्षणः—फीमेल हायस्कूल मधून मॅट्रिक व स. प. कॉलेजमधून सन १९२८ सालीं इंटर आर्टसूची परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास. ह्या प्रो. एम्. आर्. परांजपे यांच्या कन्या असून त्यांचा विवाह भोर संस्थानचे शालाधिकारी यांचे ज्येष्ठ चिरंजीव रा. श्री. वा जोशी, बी. ई., यांचे बरोबर झाला आहे. त्या शिकारपूर ( सिंध ) येथें असतात. ]

हल्लींच्या सुधारणेच्या काळांत हिंदुस्थानविषयक ज्या कांहीं सुधारणा होऊं पहात आहेत, त्यांमध्यें मुंबई इलाख्यापासून सिंध प्रांताची विभागणी हा

३. रोहिडमल ऊर्फ रोहिडमल्ल हें त्या किल्ल्याचें मुख्य दैवत आहे.
४. या नांवाचें एक तळें आहे.

एक चर्चेचा प्रमुख विषय होऊन बसला आहे. तरी आजपर्यंत आपल्या इलाख्याशीं संघटित असलेल्या व पुढें कदाचित् विभक्त होणाऱ्या या सिंध प्रांताविषयीं स्वानुभवानें मिळालेली थोडीशी माहिती महाराष्ट्र बंधुभागिनींना सादर करावी एवढाच हा लेख लिहिण्याचा उद्देश आहे व माझ्या सारख्याच माझ्या आणखीहि कांहीं महाराष्ट्रभगिनींना सिंध प्रांतांत येऊन राहण्याची पाळी आली तर त्यांनाहि या माहितीचा थोडा फार उपयोग होईल अशी मला आशा आहे.

सिंध प्रांताचे साधारण दोन भाग पडतात, एक खालचा सिंध ( Lower Sind ) व दुसरा वरचा सिंध (Upper Sind ) वरच्यापेक्षां खालच्या भागामध्यें हिंदु लोकांची वसति जास्त आहे व शिक्षणाचा प्रसार देखील सिंधच्या याच भागांत जास्त झालेला आढळून येतो.

सिंध प्रांताला विशेष महत्त्व जर कशामुळें प्राप्त झालें असेल तर तें सिंधु नदीमुळें होय. एवढेंच काय परंतु सिंधु नदीवांचून सिंध प्रांत म्हणजे केवळ वालुकामय प्रदेशच होय ! वर्षाकांठीं कधींतरी चारदोन पावसाच्या सरी दृष्टीस पडणाऱ्या ह्या सिंध प्रांताचें सिंधू नदी हें जणू जीवनच आहे! आणि म्हणूनच येथील हिंदुमुसलमान सर्व लोक तिला 'माता' असें म्हणतात. सर्व सिंध प्रांतांत सिंधूचे कालवे पसरलेले आहेत व सिंधमध्यें जें काय पीकपाणी होतें तें सर्व या कालव्यांच्या जोरावरच होतें.

आजपर्यंतच्या अनुभवावरून असें आढळून आलें आहे कीं, कांहीं एका सातआठ मैलांचे टापूमध्यें सिंधु नदीचा प्रवाह बदलत असतो व याच एका कारणामुळें बऱ्याच मोठमोठ्या एंजिनिअर लोकांचें सक्करचें धरण बांधण्याविषयीं प्रतिकूल मत होतें. परंतु आजपर्यंतचे इतिहासावरून पाहतां असें आढळून आलें आहे कीं, सिंधूनें जरी आजवर बऱ्याच निरनिराळ्या भागांतून आपलें पात्र बदललें आहे, तरी ज्या ठिकाणीं आज धरण बांधलें आहे, ती जागा मात्र तिनें कधींच सोडिली नाहीं व ह्याच आधारावर हें सक्करच्या अवाढव्य धरणाचें काम हातीं घेऊन सरकारनें तें शेवटास तर नेलें! सरकारच्या अपेक्षेप्रमाणें हें काम जर यशस्वी झालें तर आजच्या या

वालुकामय सिंध प्रांताचें लवकरच नंदनवन झालेलें आपल्या दृष्टीस पडेल. त्यांतून परमेश्वरी इच्छा काय असेल ती खरी !

सिंधु नदी आपला प्रवाह नेहमीं बदलीत असते याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे लारखान्यापासून सरासरी वीस मैलांवर सांपडलेलें ' मोहींदाजारो ' हें शहर होय. असें म्हणतात कीं, फार पूर्वी हें शहर सिंधूचे कांठीं वसलेलें असलें पाहिजे व कालांतरानें सिंधूनें आपला प्रवाह बदलल्यामुळें तें तिच्या पोटांत गडप झालें असावें. तें शहर नुकतेंच उकरून काढलें असून त्या भागाच्या अवलोकनावरून पूर्वीच्या नगररचनेच्या बाबतींतहि लोक किती पुढें गेले होते, त्याचीहि त्यावरून बरीच कल्पना येते.

वायव्य सरहद्दीवरील मुसलमान लोकांचा अंमल सिंध प्रांतावर बरेच दिवस असल्यानें येथील लोकांच्या राहणीवर, रीतीरिवाजांवर, पोशाखांवर वगैरे अनेक बाबतींत मुसलमानी पद्धतीचें वर्चस्व दिसून येतें, एवढेंच काय परंतु येथील हिंदूंचे व आपले धर्मविषयक आचारविचार यांत देखील आपणांस बराच फरक आढळून येईल. आपल्याप्रमाणें हे लोक मूर्तिपूजक आहेत. येथेंहि कांहीं ठिकाणीं शंकराचीं, रामाचीं वगैरे देवालयें आहेत. आपल्याप्रमाणेंच ' भगवद्गीता ' हा त्यांचा धर्मग्रंथ आहे. परंतु त्याबरोबरच हे लोक शीखांचा पवित्र धर्मग्रंथ जो ' ग्रंथसाहेब ' त्याचीहि पूजा करतात. ' गुरु-नानक-दिन ' येथें मोठ्या उत्साहानें दरसाल साजरा केला जातो व अशा तऱ्हेनें शीख-धर्मावरील त्यांची भक्ति पाहिली म्हणजे त्यांना शीख म्हणावें कीं हिंदु म्हणावें अशीहि शंका उद्भवते.

येथील लोकांच्या राहणीवर नव्हे तर त्या लोकांच्या भाषेवर—म्हणजे सिंधी भाषेवर देखील—मुसलमान अंमलाचा परिणाम झालेला दिसून येतो. सिंधी भाषा ही मराठी, हिंदी, बंगाली व गुजराथी वगैरे भाषांप्रमाणें संस्कृतची उप-भाषा आहे. परंतु हा देश बरेच दिवस मुसलमानी अंमलाखालीं राहिल्यामुळें त्यांत फारसी शब्दांचा बराच भरणा आढळतो. हिंदी भाषेचा प्रचारहि येथें बराच आहे. अगदीं अडाणी, अशिक्षित लोक सोडल्यास बहुतेकांना हिंदी बोलतां येतें. त्यामुळें आपल्यासारखीं परकीं माणसें येथें आल्यास त्यांना त्या

लोकांत मिसळणें विशेष जड जात नाहीं. कारण हिंदी भाषा थोड्याच दिवसांच्या सहवासानें समजूं लागते. सिंधी भाषा समजण्यास जरा वेळ लागतो.

सिंधमध्यें हैदराबाद, कराची, शिकारपूर, सक्कर वगैरे मोठमोठ्या शहरांत शिक्षणाचा बराच प्रसार झालेला आढळून येतो. अव्वल इंग्रजीचे सुरुवातीस सर्वस्वीं शिक्षणास वाहून घेतलेल्या विद्वान् महाराष्ट्रीय मंडळींचें कार्यक्षेत्र किती विस्तृत होतें याची कल्पना आपणांस सिंधमधील शिक्षणाच्या इतिहासावरून होईल व त्याबरोबरच सिंधचा व महाराष्ट्राचा वाटतो त्यापेक्षां बराच निकटचा संबंध आहे असें वाटूं लागेल. सिंधमध्यें आजपर्यंत झालेल्या शिक्षणप्रसाराच्या श्रेयाचा बराचसा वांटा महाराष्ट्रीयांच्या पदरांत आहे हें ऐकून कोणाहि महाराष्ट्रीयाला अभिमानच वाटेल! हैदराबादमध्यें प्रथम उघडलेल्या शाळेचे हेडमास्तर डॉ. सर भांडारकर होते! कराची येथील प्रसिद्ध ‘ जगन्नाथ नारायण हायस्कूल ’ला तें नांव, येथें येऊन या प्रांतांत शिक्षणाचा प्रसार करण्यास सतत झटणाऱ्या ‘ जगन्नाथ नारायण ’ नांवाच्या एका महाराष्ट्रीय विद्वान् गृहस्थांची आठवण म्हणूनच प्राप्त झालें आहे. त्याचप्रमाणें त्या गृहस्थाचें स्मारक म्हणून शिकारपूरलाहि त्यांच्या नांवाचें एक सार्वजनिक वाचनालय आहे. त्यांच्याप्रमाणेंच दुसऱ्याहि अनेक महाराष्ट्रीयांनीं येथें येऊन शिक्षणाचा प्रसार करण्यास मदत केली आहे.

कराची हें शहर जरी लोकवस्तीच्या दृष्टीनें मोठें असलें तरी ज्याप्रमाणें महाराष्ट्रांत पुणें हें शिक्षणाचें केंद्र समजलें जातें त्याप्रमाणें हैदराबाद हें येथील शिक्षणाचें केंद्र आहे. कराचीची साधारणपणें मुंबईबरोबर तुलना करतां येईल. मुंबईप्रमाणेंच येथेंहि सिंधी, गुजराथी, पारशी, महाराष्ट्रीय वगैरे अठरापगड किंबहुना भिन्न प्रांतीय लोकांची वस्ती, त्यामुळें कराचीमध्यें राहिल्यास आपण सिंधमध्यें आहोंत असें साधारणत: आपल्यासारख्यांना वाटतहि नाहीं. सक्कर हेंहि एक सिंधमधील प्रसिद्ध शहर आहे व अलीकडे तर येथील धरणामुळें त्याला बरेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. परंतु व्यापार व लोकवस्ती या दृष्टींनीं शिकारपूर हें सक्करपेक्षां मोठें आहे असें आढळून येईल. सर्व सिंध प्रांतांत शिकारपूर येथील व्यापारी वर्ग फार श्रीमान् आहे. शिकारपुरी व्यापाऱ्यांबद्दल

अशी एक गोष्ट सांगतात कीं, जगांतील मोठमोठ्या बंदरांपैकीं कोणत्याहि बंदरावर त्या व्यापाऱ्यांची पेढी नाहीं असें सहसा होत नाहीं.

हैदराबादेंतील हिंदूंचे साधारणतः दोन भाग आहेत. कांहीं लोक आपणांस 'आमील' म्हणवतात तर कांहींना 'भाईबंद' म्हणतात. सिंधचे फार पूर्वीचे राज्यकर्ते, ज्यांना 'मीर' असें म्हणत असत, त्यांच्या दिवाणांना 'आमील' ही संज्ञा होती. व आजचा 'आमील' वर्ग हा त्यांचाच वंशज होय. व्यापारी वर्गाच्या लोकांस 'भाईबंद म्हणतात. 'आमील' लोकांमध्यें भाईबंदापेक्षां स्त्रीशिक्षणाचा प्रसार जास्त झालेला आढळून येतो. आणखी एक लक्षांत येण्याजोगी गोष्ट म्हणजे सिंधमध्यें जेवढे हिंदु आहेत त्यांचे जातिविषयक असे विशेष पोटभाग नाहींत; परंतु विशेषतः राहण्याचे ठिकाणावरून मात्र भेद असलेले आढळतात. उदाहरणार्थ, हैदराबाद व शिकारपूर येथील लोकांस अनुक्रमें 'हैदराबादी' व 'शिकारपुरी' असें म्हणण्याचा प्रघात आहे. व ह्यांच्यांत सोयरिकसंबंधही क्वचितच आढळून येतो.

सिंधी लोकांत एकत्र कुटुंबपद्धति फारशी दिसून येत नाहीं. त्याचप्रमाणें सिंधी लोकांत पाहुण्यांचा सुळसुळाटही बराच कमी आहे. आपल्याकडे साधारण ओळखीवर देखील पाहुणे म्हणून जाण्याची पद्धत फार व अलीकडे कांहीं कांहीं मासिकांतून पाहुण्यांचा त्रास कसा चुकवावा ह्या विषयावर ज्या गोष्टी येतात त्या सर्वच जरी खऱ्या नसल्या तरी सत्यसृष्टींतही आपल्याकडे अशा गोष्टी घडून येणें अगदींच अशक्य नाहीं. सिंधी लोक येवढ्या बाबतींत मोठे सुखी आहेत. त्यांच्याकडे सहसा कोणी पाहुणा येत नाहीं. अगदींच कोणी नात्यांतला असला तर येतो. परंतु तिऱ्हाईत पाहुणा कधीं येणारहि नाहीं व आलाच तर त्याला अगदीं घरांत शिरकावहि मिळणार नाहीं. त्यांच्या घरांत पाहुण्यासाठीं म्हणून एक खोली बाहेरच्या बाजूस बांधलेली असते. तिला 'ओताक' म्हणतात, व त्यांत पाहुण्याची सर्व सोय स्वतंत्र तऱ्हेनें केलेली असते. घरामध्यें 'पापड-पाणी' पाहुण्याला दिलें कीं झालें आदरातिथ्य! आपल्याकडे कोणी आले कीं निदान चहा तरी आपण करतोंच, त्याप्रमाणें ह्या लोकांत पापड व पाणी देतात. पापड ह्या लोकांना फार आवडतो. आपल्यासारखा हे लोक पापड फक्त जेवतांनाच

खातात असें नव्हे, तर सकाळ, संध्याकाळ वाटेल त्या वेळेस खातात. लहर आली कीं पापड भाजतात व खातात! बाजारांतही भाजलेले पापड मिळतात. एवढेंच काय, परंतु कोणीं जर नुसतें पाणी पिण्यास मागितलें तर आधीं पापड भाजून देतील व मग पाणी!

येथील स्त्रियांमध्यें पडद्याची पद्धतहि कांहीं ठिकाणीं दिसून येते. त्यांच्यामधील पडद्याची पद्धत हेंदेखील सिंधप्रांतावर मुसलमानी अंमल बरेच दिवस असल्याचेंच एक चिन्ह आहे. हल्लीं कांहीं कांहीं सुधारलेल्या स्त्रियांनीं पडदा अजिबात टाकून दिला आहे. सिंधी स्त्रियांचा पोशाख म्हणजे मुख्यतः एक पायजमा, वर एक अंगरखा, व सर्वांचे वर एक साधारण तीन वार लांब इतकें डोक्यावरून घेण्याचें सफेत कापड. ह्या कापडास 'पोती' असें म्हणतात. ह्या पोतीचा कोणताच भाग कोठेंच खोंचलेला नसतो. फक्त ती डोक्यावरून घेऊन एक पदर पुढें व एक मागें असे मोकळेच सोडलेले असतात. कांहीं बायका गुजराथी स्त्रियांसारखा घागरा नेसून वर मात्र ओढणी न घेतां एक पांढरा कपडा डोक्यावरून शालजोडीसारखा पांघरतात. सिंधी स्त्रियांत डोक्यावरून पदर घेण्याचें महत्त्व फार आहे. डोक्यावरून पदर नसलेली बाई पाहिली म्हणजे ही कोणी हलक्या प्रतीची बाई आहे असेंच हे लोक समजतात. हा पोषाख आतां घरांतच पहावयास सांपडतो. बाहेर जातांना हल्लीं बहुतेक सर्व स्त्रिया पारशी पद्धतीचा पोशाख करतात. कराची, हैद्राबाद वगैरे सारख्या सुधारलेल्या शहरीं तर सर्व स्त्रिया पारशी स्त्रियांसारखा पोशाख करतातच, परंतु खेडेगांवांतूनहि बऱ्याच बायका अलिकडे तसाच पोशाख करूं लागल्या आहेत. येथील पुरुषहि बायकांप्रमाणेंच पायजमे घालून वरून शर्ट घालतात. व्यापारी लोक म्हणजे बनिये, हे मात्र धोतरें नेसतात व त्यांची धोतरें नेसण्याची पद्धत व आपली पद्धत ह्यांमध्यें विलक्षण साम्य दिसून येतें.

सिंधी लोकांना कपड्यांचा शोक विशेष दिसतो. आपल्या लोकांपेक्षां त्यांना कपडा अतोनात लागतो. साधारण ५०-६० रुपये मिळविणारा कारकून असला तरी त्याचे सहज सातआठ सूट केलेले सांपडतील. त्यांना मिळणाऱ्या पैशांपैकीं अर्धाअधिक पैसा कपड्यांखालींच खर्च होतो, असें

म्हणण्यास हरकत नाहीं. पुरुषांप्रमाणें सिंधी स्त्रियांनाहि बरेच कपडे लागतात. सिंधी लोकांना कपड्यांचा शोक तर खराच, परंतु त्यांना कपडे जास्त लागण्याचें दुसरें एक कारण म्हणजे कपडे कधींहि घरीं न धुणें हें होय. त्यांच्या बायका घरीं कधींहि कपडे धूत नाहींत. नेहमीं धोब्याकडे देतात. आंघोळ केल्यावर रोज धुतलेले कपडे घालण्याचा इकडे रिवाजच नाहीं. एकदां परिटाकडून आलेले कपडे घातले कीं, ते मळेपर्यंत वापरतात व मग ते धुण्यासाठीं धोब्याकडे देऊन दुसरे कपडे काढतात. अशा तऱ्हेनें हे लोक दोनचार दिवसांनीं एकदां कपडे बदलतात. परंतु एक लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांचे रात्रीं घालण्याचे व दिवसा घालण्याचे कपडे वेगवेगळे असतात. अर्थात् यांपैकीं घरीं मात्र कोणतेच कपडे धुतले जात नाहींत ! घरीं स्वतः किंवा मोलानें कां होइना, परंतु रोज कपडे धुण्याची त्यांना बिलकुल कल्पनाच नाहीं. आम्हीं रोज लुगडीं घरीं धुतों व रोज स्नान केल्यावर धुतलेलें लुगडें नेसतों हें त्यांना फारच चमत्कारिक वाटतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ते लोक रात्रीं दुसरे कपडे घालतात वगैरे सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या व त्यांचे कपडे वरून कितीहि स्वच्छ दिसले तरी एकंदरीनें हा प्रकार आपल्याला थोडासा गलिच्छच वाटेल यांत शंका नाहीं.

येथील बायकांना जसें कपडे धुण्याचें काम कमी तसेंच दक्षिणी बायकांपेक्षां त्यांना स्वयंपाकाचेंहि काम कमी असतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. साधारण स्थितींतील लोकांकडे बहुतेक स्वयंपाकी असतो. परंतु, जरी स्वयंपाकी नसला तरी देखील सिंधी बाईला दक्षिणी स्त्रीप्रमाणें बहुतेक सकाळीं उठल्यापासून बारावर दोन वाजेपर्यंत स्वयंपाकघरांत राबावें लागत नाहीं. त्यांचा स्वयंपाकहि विशेष घासाघिशीचा नसतो. एक रोजची खिचडी, रोटी, भाजी, डाळ ( आमटी ) एवढेच पदार्थ साधारणतः त्यांच्या घरांत शिजतात; व इतर सर्व पदार्थ बाजारांतून आणून खाण्याची पद्धत आहे. केवळ पेढे, बर्फी असलेच जिन्नस नाहीं तर भजी, लाडू, जिलेबी असले जिन्नसहि हे लोक बाजारांतून आणून खातात. आपल्याकडे वरील जिन्नस गरीब व अडाणी असलेच लोक बाजारांतून घेऊन खातात. परंतु इकडे गरीब, श्रीमंत, सुशिक्षित, अशिक्षित वगैरे सर्वच लोकांनीं वाटेल तो जिन्नस बाजारांतून घेऊन खाण्याची

पद्धत आहे. आपल्याकडे आपली कोणी मित्रमंडळी आपणांस भेटावयास आली तर आपल्या बायकांचा बहुतेक वेळ त्यांना कांहींतरी फराळाचें करण्यांत जाईल व गप्पागोष्टींस फारच थोडा वेळ मिळेल. परंतु सिंधी बायका चट्कन् चार पैशांचे पकोडे ( भजीं ), शेव आणतील कीं मोकळ्या होतील! मुलांना बाजारचें आणून खाण्याची संवय लागूं नये म्हणून आपण शाळेंत जातांना व इतर वेळीं देखील त्यांच्या हातांत बाजवीपेक्षां जास्त पैसा राहूं नये म्हणून काळजी घेतों. परंतु येथें मोठीं माणसेंच बाजारचें खातात मग लहान मुलांचें काय? म्हणजे जी संवय आपण अतिशय वाईट असें समजतों व ती मुलांना लागूं नये म्हणून विशेष जपत असतों ती संवय येथें सरसकट प्रत्येक मुलालाच असते असें म्हणण्यास हरकत नाहीं.

परंतु वरील हकीकत वाचून कोणी असा अर्थ करील कीं, सिंधी बाईला विशेष काम नसल्यानें तिचा बहुतेक काळ निरुद्योगीपणांतच जात असेल; पण तसें मात्र नव्हे. सिंधी बायकांना कलाकौशल्याची आवड फार आहे. आपल्या बायकांपेक्षां त्या बायकांत हा एक गुण विशेष दिसून येतो. महाराष्ट्रीय स्त्रियांत कलाकौशल्याची आवड नसते असें नव्हे; परंतु सिंधी बायकांपेक्षां ती कमी असेंच केव्हांहि म्हणावें लागेल. साधारणतः सिंधी स्त्री रिकामटेकडेपणानें गप्पा मारीत बसलेली दिसणार नाहीं. बहुतेक ती कांहींतरी विणण्यांत नाहींतर शिवण्यांत गुंतलेली दिसेल. एकाद्या सिंधी घरांत जाऊन पाहिलें तर तेथील त्यांचीं टेबलें व टी-पॉय, टेबलक्लॉथशिवाय उघडीं अशीं कधींहि दिसणार नाहींत. रेशमाचीं, किंवा सुताचीं फुलें वगैरे निरनिराळ्या आकृती भरून अतिशय सुबक तऱ्हेनें हीं टेबलक्लॉथ बनविलेलीं असतात किंवा इतकें नक्षीकाम प्रत्येकावर नाहींच झालें तर निदान कापडाच्या कडेला दोरे बांधून व त्यांना गांठी मारून त्या एक प्रकारची झालर करीत असतात. ही झालर करण्याचें काम अतिशय सोपें व कमी खर्चाचें असून दिसण्यांत मात्र फारच सुरेख दिसतें. या बायकांना ही झालर करण्याचा इतका शोक आहे कीं मोठमोठ्या पांघरावयाच्या चादरी, उशांचे अभ्रे, लहान मुलांचीं दुपटीं यांनासुद्धां या असली झालर करतात.

सिंधी स्त्रिया बहुतेक सर्व कपडे घरीं शिवतात. कित्येक बायका पुरुषांचे

कोट, पॅन्टस् वगैरेसुद्धां घरींच शिवतात. साधारणतः प्रत्येक सिंधी स्त्रीच्या घरीं शिवण्याचें यंत्र असतेंच. त्या कपडे शिवतात तेंहि मोठे सुबक व सुरेख शिवतात यांत शंका नाहीं. लहान लहान मुलांच्या व मुलींच्या कपड्यांवरून देखील त्या रेशमाचें काम करतात. कांहीं उद्योग नसला कीं सिंधी स्त्री खाटेवर मशीन घेईल आणि कपडे शिवीत बसेल! आपल्याप्रमाणें सिंधी लोक जमिनीवर कधींहि न बसतां नेहमीं खाटेवर बसतात ही एक लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. प्रत्येक घरांत एकेकाची एकेक खाट असून शिवाय दोनचार खाटा जास्त असतात. सर्व घरभर खाटाच असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु त्यांच्या खाटा फार सुरेख विणलेल्या असतात. काथ्याच्याच जातीच्या परंतु अतिशय मऊ अशा दोरानें अगदीं दाट व त्यांतहि कांहीं नमुनेदार आकृती येतील अशा तऱ्हेनें त्या विणलेल्या असतात; आपल्या इकडल्या खाटांप्रमाणें वेळेस मूलसुद्धां खालीं जाईल एवढालीं भगदाडें ठेवून त्या विणलेल्या नसतात; व मऊ असल्यानें नुसत्या खाटेवर बसण्यासहि हरकत वाटत नाहीं. जमिनीवर बसणें म्हणजे सिंधी लोकांना अतिशय गलिच्छ वाटतें व आम्हांला एकादे वेळेस जमिनीवर बसलेलें पाहिलें म्हणजे ते तसें बोलूनहि दाखवितात; परंतु मजा ही कीं खाटेवर बसून खाटेखालींच थुंकणें मात्र त्यांस गलिच्छ वाटत नाहीं! अगदींच सुधारलेले किंवा ज्यांचीं मनें सुसंस्कृत झालेलीं आहेत असे कांहीं थोडे लोक सोडून दिल्यास साधारणतः सिंधी माणसाला पटकन् बसल्याजागीं थुंकण्यास कांहींच वाटत नाहीं. व सहवासानें जरी इतकें वाटलें नाहीं तरी प्रथमदर्शनीं त्यांचीं घरें जरा गलिच्छच वाटतात. सिंधी लोक जेवतात सुद्धां खाटेवरच! व घरांत पुरेशा खाटा नसल्यास ते ज्या खाटेवर जेवतात तीच खाट जरा झटकून त्यावर खुशाल आंथरूण घालून निजतात. अलीकडे कांहीं महाराष्ट्रीय मंडळींनीं देखील कोणी पाहुणे वगैरे जेवावयास आल्यास टेबलावर बसून जेवणाची पद्धत पाडली आहे.

सिंधी लोकांच्या, विशेषतः हैदराबाद, कराची येथील लोकांच्या घरें बांधण्याच्या पद्धतीवरूनही त्यांची कलाकौशल्याची आवड दिसून येते. हैदराबाद येथील साधारण सुखवस्तु गृहस्थांचीं घरें पाहिल्यास तीं अतिशय सुबक

व सुंदर रीतीनें बांधलेलीं आढळून येतील. प्रत्येक घरांत निदान एकदोन तरी आरशाचीं कपाटें व दोनतीन साधीं कपाटें असतीलच.· घराचें काम असेल तकलुबीचें, परंतु त्यांतल्यात्यांत प्रत्येक दारांवर, खिडक्यांवर नक्षीदार कमानी, दारांना बिलोरी रंगीबेरंगी कांचा, व दारांच्या फळ्यांवर देखील नक्षीकाम केलेलें आढळेल. इकडे दगड अतिशय दुर्मिळ असल्याकारणानें व विटा उत्तम तयार होतात म्हणून सर्व घरें व त्यांतील फरशी वगैरेसाठीं इकडे विटाच वापरतात. त्यामुळें उन्हाळ्यांत त्यांवर पुष्कळ पाणी शिंपडलें तरी चिखल न होतां अत्यंत थंडावा येतो. ज्याप्रमाणें येथील घरांना विटाच्या जमिनी असतात त्याप्रमाणेंच प्रत्येक घराला प्रशस्त गच्च्या किंवा मोकळे व्हरांडे असतात; व ऐन उन्हाळ्यांत सर्व लोक या गच्च्यांवरच निजतात. इकडे एकदां उन्हाळा सुरू झाला म्हणजे इतर लोक तर काय परंतु वेळ पडल्यास पहिल्या दिवसाच्या बाळंतिणीसुद्धां उघड्यावर येऊन निजतात. इतका भयंकर इकडला उन्हाळा असतो. जें उन्हाळ्याचें मान तेंच थंडीचें ! पावसाळ्याचें मात्र नांव नाहीं.

येथील उन्हाळा व हिंवाळा यांचें प्रमाण एकदां वाढूं लागलें म्हणजे इतकें वाढतें कीं, त्या लोकांना त्या त्या ऋतूला अनुसरून आपल्या नेहमींच्या राहणींतही थोडाफार फरक करावा लागतो. एकदां भर उन्हाळा सुरू झाला म्हणजे हे लोक दिवसांतून दोनदां आंघोळी करूं लागतात. थंडींत येथील एकून एक लोक चहा पितात तर उन्हाळ्यांत इकडे चहा पिणारा एकजणहि आढळणार नाहीं. एवढेंच काय पण थंडींत जीं चहाचीं लहान लहान दुकानें उघडलेलीं असतात, तीं सर्व उन्हाळा येतांक्षणींच जाऊन व त्यांतील कपबशा वगैरे सामान अडगळींत पडून त्यांची जागा सोडा, लेमनच्या बाटल्या व ग्लास यांनीं तात्काळ भरून निघते. अशा रीतीनें चहाच्या दुकानाचें एकदम ‘ सोडा, लेमन, बरफ’च्या दुकानांत रूपांतर झालेलें पाहून मनाला आश्चर्य वाटतें.

सिंधी लोकांच्या व आमच्या राहणीवागणींत मुळांतच मोठा फरक आहे हें खरें. परंतु वर उल्लेखिलेल्या बारीकसारीक गोष्टींत सुद्धां जर कालमानाप्रमाणें बदल करावा लागतो, तर येथील रहिवासी बनलेल्या महाराष्ट्री-

यांच्याहि राहणींत देशस्थितीनुरूप फरक पडला तर त्यांत नवल काय ? मी जेव्हां प्रथम येथें आलें, तेव्हां त्या लोकांचे पोषाख, रीतिरिवाज वगैरे गोष्टी पाहून मला त्यांविषयीं फार चमत्कार वाटला. कित्येक वेळां तर त्यांच्यापेक्षां आपलीच रहाणी सरस असेंहि माझ्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं. परंतु थोड्या दिवसांच्या सहवासानें, कांहीं गोष्टी वगळल्यास दुसऱ्या कित्येक बाबतींत त्यांच्या व आपल्या रहाणींत दिसत असलेले फरक हे केवळ देशकालपरिस्थित्यनुरूप पडलेले असावेत असें प्रत्ययास येऊं लागलें आणि म्हणूनच 'देश तसा वेष!' असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. असो. याप्रमाणें नुसत्या बारीकसारीक गोष्टी घेतल्या तरीसुद्धां त्या इतक्या विपुल सांपडतील कीं त्या योगानें सिंधी व महाराष्ट्रीय यांच्या रहाणींत कसा भेद आहे हें सहज समजून येईल. त्या सर्व गोष्टी सांगणें येथें शक्य नाहीं. म्हणून त्यांपैकीं कांहीं ढळक गोष्टींचाच काय तो मी प्रस्तुत लेखांत निर्देश केला आहे. पण तेवढ्यावरूनहि सिंधी लोकांच्या राहणीची साधारण बरीचशी कल्पना महाराष्ट्रांतील माझ्या भगिनींना येईल असें वाटतें.

---

# हरीभाऊंची बालसृष्टि

लेखकः **वाग्भट नारायण देशपांडे**, बी. ए., एल्‌एल्. बी., सातारा.

[ यांचा जन्म सन १८९२ सालीं सातारा हायस्कूलमधून १९०८ सालीं मॅट्रिक; १९१३ सालीं डेक्कन कॉलेजमधून बी. ए.; १९१७ मध्यें एल्‌एल्. बी. कॉलेजमध्यें असतांना मराठींत निबंध लिहिल्याबद्दल कॅन्डी पारितोषिक; डेक्कन कॉलेज त्रैमासिकाच्या मराठी भागाचे कांहीं दिवस संपादक. 'विविधज्ञानविस्तार', 'मनोरंजन' वगैरे मासिकांतून परीक्षणात्मक निबंध व गोष्टी त्यांनीं लिहिल्या. भोर कायदे-कौन्सिलचे सभासद आहेत. सध्यां ते साताऱ्यास वकिली करीत असून 'ऐक्या'चे संपादक आहेत.]

कै. हरिभाऊ आपट्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांचा आतांपावेतों अनेक दृष्टींनीं विचार व अभ्यास झालेला आहे. परंतु बाल-मानस-शास्त्राच्या दृष्टीनें या कादंबऱ्यांचें महत्त्व किती आहे याकडे महाराष्ट्रांतील वाचकांचें अद्यापि लक्ष गेलेलें दिसत नाहीं. हरिभाऊंची कोणतीहि सामाजिक कादंबरी असली

तरी तिच्यांत लहान मुलांचा संबंध प्रामुख्यानें कोठें ना कोठें तरी असलेला आढळून येतोच. 'मी', 'पण लक्षांत कोण घेतो?', 'यशवंतराव खरे' या तीन कादंबऱ्यांत तर, नायकनायिकांच्या भूमिका लहान मुलांकडे दिल्या असून त्या मुलांची वाढ कशी झाली आणि त्यांची मनोवृत्ति परिस्थित्यनुरूप कसकशी बदलत गेली याचें सुंदर चित्र रेखाटलें आहे. पण यांशिवाय इतर सामाजिक कादंबऱ्यांतसुद्धां मुलांचा अनेकदां संबंध आला असून त्या त्या ठिकाणीं भोंवतालची परिस्थिति मुलांच्या भावी चांगल्या वाईटपणाला कशी जबाबदार असते हें मोठ्या बोधप्रद रीतीनें दाखविलें आहे. या सर्व कादंबऱ्यांतून निर्माण झालेली हरिभाऊंची बालसृष्टि पाहतां लहान मुलांच्या मनोवृत्तींच्या निष्पापपणाचें हरिभाऊंना किती मार्मिक ज्ञान होतें व त्याचप्रमाणें लहान मुलांच्या संगोपनाबद्दलहि त्यांनीं किती काळजीपूर्वक विचार केला होता हें पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं. हरिभाऊंना लहान मुलांच्याबद्दल वाटणारें नितान्त प्रेम हेंहि त्यांच्या या अत्यंत गोड आणि निष्पाप अशा बाल-सृष्टीचें कारण असूं शकेल. लहान मुलांच्यांत अत्यंत मोकळेपणानें मिसळणें, त्या क्षणापुरता स्वतःचा मोठेपणा आणि वयांतील अंतर विसरून जाऊन त्यांच्या खेळांत अगदीं समरस होऊन जाणें इत्यादि हरिभाऊंच्या चरित्रांतील विशेष त्यांच्या निकटवर्ति मित्रांस ठाऊक आहेतच. बालमनाच्या विकासाचें इतकें सूक्ष्म ज्ञान होण्यास त्यांना मुलांबद्दल वाटणारें आत्यंतिक प्रेम हेंच बहुधा कारण असलें पाहिजे. तें कसेंहि असलें तरी आज त्यांनीं आपल्या वाचकांपुढें जी बाल-सृष्टि उभी केली आहे तिकडे वाचकांनीं लक्ष दिलें तरी तिच्या द्वारें बाल-मानसशास्त्रासंबंधीं अनेक सिद्धांत व प्रमेयें त्यांजपुढें सोदाहरण मांडलेलीं आढळून येतील. किंबहुना असेंहि म्हणावयास हरकत नाहीं कीं, ज्याप्रमाणें प्रयोगशाळेंत अमुक द्रव्यांचा संयोग झाला असतां अमुक परिणाम होतो असें प्रत्यक्ष उदाहरणानें दाखवितां येतें, त्याचप्रमाणें हरिभाऊंनीं आपल्या कादंबऱ्यांतून अमुक परिस्थितीचा परिणाम मुलांवर कसा होतो हें वाचकांस आपल्या कादंबऱ्यांतून प्रत्यक्ष दाखविलें आहे. यामुळें हरिभाऊंच्या कादंबऱ्या म्हणजे बालमानसशास्त्राची एक प्रयोगशाळाच होय असेंहि म्हणावयास मुळींच हरकत नाहीं.

घरची परिस्थिति चांगली असेल, आईबाप सज्जन व पापभीरू असतील तर मुलेंहि हटकून चांगलीं निघावयाचींच; आणि त्याचप्रमाणें घरची परिस्थिति प्रतिकूल असली तर मुलेंहि वाईट निघावयाचीं असा एक सर्वसामान्य समज असतो. अगदीं सामान्यरीत्या पाहिलें तर हें तत्त्व अगदींच चुकीचें नाहीं. पण लहान मुलांच्या मनाची आणि विचारांची वाढ होत असते त्या वेळीं फक्त घरच्या परिस्थितीचा किंवा त्यांच्या आईबापांच्या वर्तनाचा त्यांजवर परिणाम होतो असें मानणें चुकीचें आहे. या सर्व गोष्टी चांगल्या असूनहि इतर अनेक बाह्य कारणांमुळेंसुद्धां मुलें अनीतीला किंवा वाईट मार्गाला लागण्याचा संभव असतो. शिवाय गृहपरिस्थिति किंवा आईबाप नुसते चांगले असूनहि भागत नाहीं. त्यांचा मुलांशीं प्रत्यक्ष संबंध येऊन मुलांच्या वाढत्या चारित्र्यावर आईबापांच्या गुणांचा परिणाम व्हावा लागतो. मुलें लहानपणीं किती संस्कारक्षम असतात, आणि त्यांच्यापुढें येणाऱ्या किंवा घडणाऱ्या गोष्टींचें चित्र फोटोच्या कांचेप्रमाणें आपल्या मनावर तीं कसें चटदिशीं आणि कायमचें उठवून घेतात हें हरिभाऊंनीं आपल्या कादंबऱ्यांतून वेळोवेळीं दाखविलें आहे.

हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांतील सर्व व्यक्ति मध्यम स्थितींतल्या आहेत. मध्यम स्थितींतील सुशिक्षित लोकांपुढें येणाऱ्या प्रश्नांचा विचार करून त्या लोकांना मार्ग दाखविण्यासाठींच या कादंबऱ्यांचा अवतार असल्यामुळें हें स्वाभाविकच आहे आणि यामुळें जहागिरदार, संस्थानिक इत्यादि लोकांचीं चित्रें हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून आपल्या दृष्टीस पडत नाहींत. अर्थात् त्यांची बालसृष्टीहि मध्यम वर्गांतील आहे, तरी पण त्यांतहि अनेक प्रकारची विविधता आढळून येते. मध्यम स्थितींतलीं म्हटलीं तरी, संपन्न आणि गरीब अशा दोन्ही परिस्थितींतलीं मुलें त्यांच्या कादंबऱ्यांत दृष्टीस पडतात. तसेंच बाप वाईट असून आई चांगली, आईबाप दोघेहि वाईट, आईबाप दोघेहि चांगले अशी भिन्न भिन्न प्रकारची परिस्थिति हरिभाऊंनीं वर्णन केलेली आहे; आणि या परिस्थितींतील मुलें कशीं निपजलीं, त्यांजवर खुद्द आईबापांचा आणि त्यांव्यतिरिक्त इतर गोष्टींचा संस्कार कसकसा झाला, व त्यामध्यें त्या त्या मुलांचें शील अंतीं कसें बनलें याविषयीं

हरिभाऊंनीं दाखविलेलीं उदाहरणें बाल-मानस-शास्त्राच्या दृष्टीनें खरोखरीच फार महत्त्वाचीं आहेत. बाप अधिकारी असल्यास आणि वेळोवेळीं आपल्या अधिकाराचें प्रदर्शन करून लोकांस त्रास देण्याची त्याची वृत्ति असल्यास त्याचा परिणाम मुलांवर कसा होतो हें '**यशवंतराव खरे**' या कादंबरींतील रा. ब. आडमुठ्यांच्या मुलांवरून दिसतें. रा. ब. आडमुठ्यांची बेपर्वाई, उद्दामपणा, मोठेपणाची घमेंड या सर्व गोष्टी त्यांच्या मुलांनीं बरोबर उचलल्या आहेत. या ठिकाणीं या मुलांचें शील तयार होण्यांत, रावबहादुरांच्या घरांतील सगळा कारभार पाहणारी त्यांची बहिण सखूताई हिचाहि बराच परिणाम झालेला आहे. कारण तीहि आपल्या भावाच्या मोठेपणाची प्रत्येकास हरघडी जाणीव करून देत असे. बाप वाईट असला तरी आई जर चांगली असेल आणि तिच्या सद्वर्तनाचा मुलांच्या मनावर संस्कार होईल तर मुलें सहसा वाईट निघत नाहींत असें हरिभाऊंनीं तीनचार ठिकाणीं दाखविलें आहे. उदाहरणार्थ '**पण लक्षांत कोण घेतो?**' या कादंबरींत दादा आणि यमू यांच्या सच्छीलास सर्वस्वीं त्यांची आईच कारणीभूत आहे. '**जग हें असें आहे**' या कादंबरींतहि सीताराम वगैरे मुलें चांगलीं निघण्यास त्यांची आई राधाबाई हीच कारण झाली. '**मायेचा बाजार**' या कादंबरींत मथूताईच्या भावांचें शील त्यांना आईप्रमाणें वाढविणाऱ्या त्यांच्या थोरल्या वहिणीमुळेंच बनलें. याप्रमाणें मुलांचें शील बनण्यांत त्यांच्या बापापेक्षां आईचाच कार्यभाग अधिक आहे, हें हरिभाऊंना दाखवावयाचें असावें असें वाटतें. आणि म्हणूनच रा. ब. आडमुठ्यांची बायको स्वभावानें सुशील आणि गरीब असतांहि तिच्यांत कर्तृत्व आणि धमक नसल्यामुळें तिजकडून मुलांना सद्वर्तनी करावयाच्या बाबतींत कांहीं एक होऊं शकलें नाहीं. उलट ज्या वेळीं रावबहादूर आपल्या थोरल्या मुलास त्याच्या दुर्वर्तनाबद्दल घरांतून घालवून देतात, आणि तो घरीं आल्यास त्याला जेवावयाला न घालण्याबद्दल घरांतील सर्व मंडळींस ताकीद देतात, तेव्हां मुलगा चोरून घरीं आल्यावर त्याला त्याच्या आईनें खोट्या मायेस बळी पडून चोरून जेवावयास घातल्याचा प्रसंग हरिभाऊंनीं दाखविला आहे. आई सुस्वभावी असली तरी खोट्या मायेस बळी पडल्यानें आणि योग्य वेळीं दाखवावयाचा

तो कडकपणा न दाखविल्यामुळें मुलें बिघडण्यास तिची अप्रत्यक्ष मदत कशी होतें हें यावरून दिसतें. आई चांगली असतांहि केवळ तिच्यांतील कर्तृत्व-शून्यतेमुळें मुलांवर तिचें कांहींएक वजन न पडतां मुलें निव्वळ वाईट बापाच्या किंवा भोंवतालच्या परिस्थितीच्या आहारीं कशीं जातात याचें दुसरें असेंच परिणामकारक उदाहरण म्हणजे '**पण लक्षांत कोण घेतो ?**' या कादंबरींतील शंकर मामंजींचीं बनुवन्सें व धोंडू भाऊजी हीं दोन मुलें. ह्या ठिकाणीं मुलांची आई अत्यंत गरीब आणि सात्त्विक अशी आहे. पण या गरिबीमुळेंच ती घरांत निर्माल्यवत् होऊन राहिली असून तिचा त्यामुळें आपल्या मुलांवर कांहीं एक ताबा राहिला नाहीं. पोटच्या मुलानें आपल्यास "वेडे" म्हणून हांक मारली तरी त्याला रागें भरण्याचासुद्धां तिला अधिकार नाहीं; उलट त्याला रागें भरल्याबद्दल बापानें मुलाकडून तिला दहा वेळां "वेडे" म्हणून हांक मारून तिला शिक्षा करविली! अशा प्रकारच्या गृहशिक्षणांत मुलांच्या मनावर कोणत्या प्रकारचे संस्कार होतील आणि हीं मुलें पुढें कशीं निपजतील हें सांगावयासच नको.

बाप सद्वर्तनी पण वाजवीपेक्षां जास्त कडक असला तरी त्याचा मुलांवर कसा अनिष्ट परिणाम होतो याचींहि हरिभाऊंनीं दिलेलीं दोन उदाहरणें पाहण्यासारखीं आहेत. त्यांपैकीं एक '**भयंकर दिव्य**' या कादंबरींत दादासाहेब आणि त्यांचा मुलगा पद्माकर हें होय. या ठिकाणीं पद्माकर आपल्या वाडिलांच्या शिस्तीखालीं सुशील आणि सद्वर्तनी निघाला हें खरें, पण वडिलांच्या कडकपणामुळें त्याच्या मनांत त्यांजविषयीं आदरापेक्षां भीतीचाच भाग अधिक असून तोहि एकदां नष्ट झाल्यावर, विवाहाच्या बाबतींत वडिलांची आज्ञा किंवा इच्छा मोडण्यास त्याला क्षणाचाहि उशीर लागत नाहीं. वडिलांच्या इच्छेविरुद्ध कमलेशीं लग्न करून आपला आणि घराचा संबंध तोडतांना त्याला वाईट वाटतें, पण तें वडि-लांचा आणि आपला संबंध सुटणार म्हणून नव्हे, तर आपल्या गरीब आई-करितां. पद्माकराचें पुढील आयुष्य दुःखकारक झालें व त्याला त्याचा हेकेखोर स्वभाव मुख्यत्वेंकरून कारण झाला; पण हा स्वभाव बनला त्याला तरी त्याच्या वडिलांचा फाजील कडकपणा आणि मुलावर वाजवीपेक्षां जास्त

अधिकार चालविण्याची प्रवृत्ति हींच जबाबदार नाहींत काय ? याच्या उलट म्हणजे बाप समंजस असून त्यांचें आणि मुलाचें पितापुत्रांपेक्षां मित्रत्वाचेंच जास्त नातें असल्याचें उदाहण ' **मायेचा बाजार** ' या कादंबरींतील दादासाहेब आणि त्यांचा मुलगा वसंतराव यांचें होय. या दोन पितापुत्रांच्या जोड्यांतील साम्य आणि विरोध मानसशास्त्राच्या दृष्टीनें खरोखरीच तुलना करण्यासारखा आहे. बापाच्या कडकपणामुळें पद्माकर प्रत्यक्ष दुर्मार्गास लागला नाहीं; पण मुलें केवळ याच कारणामुळें दुर्मार्गाला लागल्याचें उदाहरण ' **मायेचा बाजार** ' याच कादंबरींत हरिभाऊंनीं दाखविलें आहे. पद्मेचे वडील आबासाहेब हे पद्माकराच्या वडिलांइतकेच कडक. आपली शिस्त मुलांनीं पाळण्याबद्दल त्यांचा फार मोठा कटाक्ष. पण मुलांना वाढवावयाचें किंवा शिक्षण द्यावयाचें तें केवळ धाकानें नसून त्यांत प्रेमाचा आणि सहानुभूतीचा बराच मोठा भाग असावा लागतो ही गोष्ट आबासाहेबांना ठाऊक नसल्यामुळें, आपल्या मुलांचें त्यांना दुर्मार्गापासून संरक्षण करितां आलें नाहीं; उलट मुलांच्या हातून चूक होतांच त्यांना घराबाहेर हांकून देऊन, मुलांच्या सर्वस्वीं नाशालाच ते कारणीभूत झाले.

बाप खाष्ट आणि कठोर असतांहि केवळ आईच्या प्रेमळपणामुळें योग्य तऱ्हेनें गृहशिक्षण मिळून मुलें सद्‌वर्तनी निपजल्याचें उदाहरण, ' **पण लक्षांत कोण घेतो ?** ' या कादंबरींत दादा आणि यमू यांचें दाखविलें असल्याचा उल्लेख वर केलाच आहे. या ठिकाणीं या मुलांच्या मानसिक आणि नैतिक संगोपनांत बापाचा कोणत्याहि प्रकारें संबंध आलेला नाहीं. उलट जो थोडाबहुत आला आहे तो त्याच्या उदासीनतेचा आणि कठोरपणाचा आहे. शिवाय बाप आणि आजाआजी यांचेहि परस्पर संबंध मुलांच्या मनावर विशेष चांगले परिणाम होतील असे नाहींत. ' मी 'मधील भावानंदाप्रमाणें सत्संगतीचा लाभहि या मुलांना झालेला नाहीं. अशा रीतीनें हीं मुलें सुशील आणि ध्येयवादी निपजण्यास केवळ त्यांच्या शहाण्या आईचें शिक्षणच कसें कारण झालें हें हरिभाऊंनीं या कादंबरींत फारच कौशल्यानें दाखविलें आहे. प्रत्येक मनुष्याच्या मानसिक स्थितींत अगर उत्क्रांतींत असे कांहीं प्रसंग येतात कीं, त्या वेळेस घडणाऱ्या गोष्टींचा किंवा

केलेल्या उपदेशाचा त्यांच्या मनावर कायमचा ठसा राहतो किंवा प्रसंगीं आजिवात वेगळें वळणहि लागतें. असे प्रसंग–ज्यांना इंग्रजींत Psychological moment असें म्हणतात–ज्याप्रमाणें थोर मनुष्याच्या त्याचप्रमाणें लहान मुलांच्या आयुष्यांतहि येतात. किंबहुना थोर मनुष्यांपेक्षां लहान मुलांच्या बाबतींत या प्रसंगाचें महत्त्व विशेष असतें. कारण या प्रसंगीं मुलांच्या मनावर जो ठसा उमटेल किंवा त्यांना जें वळण लागेल तेंच पुढें आयुष्यभर कायम राहतें. म्हणून ज्यांच्यावर बालसंगोपनाची जबाबदारी आहे त्यांनीं लहान मुलांच्या बाबतींत अशा रीतीनें येणाऱ्या प्रसंगांकडे लक्ष देऊन, मुलांच्या पुढें कांहीं आदर्श ठेवावयाचा असल्यास, किंवा त्यांच्या मनावर सदुपदेशाचा चिरकाल ठसा उमटवावयाचा असल्यास या प्रसंगांची संधी साधणें अवश्य आहे. या प्रसंगांचा उपयोग हरिभाऊंनीं आपल्या कादंबऱ्यांतून वेळोवेळीं करून दाखविला आहे. उदाहरणार्थ, ‘ पण लक्षांत कोण घेतो ? ’ या कादंबरींत दादा आणि यमू या दोघांहि मुलांच्या बाबतींत असे तीन चार प्रसंग मुद्दाम आणले आहेत. मृत्युशय्येवर पडल्यावर, दादाला त्याची आई आपल्या लहान भावंडांची जबाबदारी घेण्यास सांगते; आणि त्या क्षणापासून दादा अकालवृद्ध होतो, व आपल्या भावंडांचें हितानहित जास्त काळजीपूर्वक पाहूं लागतो. त्याचप्रमाणें यमूच्या बाबतींतसुद्धां तिची आई आजारी असतांना, मुलीनें फणीकरंड्याची पेटी उघडी टाकली या एका क्षुल्लक प्रसंगावरून ती यमूस कळकळीचा उपदेश करते, आणि आयुष्यांत टापटिपीची व सर्वांची मर्जी सांभाळून वागण्याची आवश्यकता तिचे मनावर बिंबविते. हाहि आणखी असाच एक प्रसंग म्हणतां येईल.

हे प्रसंग बाहेरून अत्यंत क्षुल्लक दिसले तरी, त्यांना मुलांच्या आयुष्यांत आणि मानसिक विकासांत केवढें मोठें महत्त्व असतें व अशा अनेक प्रसंगांच्या समुच्चयांनींच मुलांचें शील पुढें कायमचें कसें बनतें हें हरिभाऊंनीं आल्या ‘ मी ’ आणि ‘ यशवंतराव खरे ’ या दोन कादंबऱ्यांतून फारच सुरस रीतीनें दाखविलें आहे. मला तर असें वाटतें कीं, बाल-मानस-शास्त्राच्या दृष्टीनें या दोन कादंबऱ्या फारच महत्त्वाच्या गणल्या जातील. या दोन्ही कादंबऱ्यांत त्यांतील नायकांचें चारित्र अगदीं बालपणापासून रेखाटलें

असून अगदीं लहाणपणींच त्यांजवर आलेल्या बऱ्यावाईट प्रसंगांमुळें त्यांचे स्वभाव आणि ध्येयें कसकशीं बनत गेलीं यांचा समग्र इतिहास दिला आहे. भावानंद आणि यशवंतराव या दोघांत, घरची अत्यंत गरिबी, दुसऱ्याच्या मदतीनें योगक्षेम, स्वतंत्र आणि उत्कृष्ट बुद्धिमत्ता, उपदेश करणारा आणि आयुष्यास वळण लावणारा गुरु, अशा तीनचार बाबतींत विचारांत घेण्यासारखें साम्य आहे. यशवंतरावाप्रमाणें भाऊलाहि एक बहिण आहे. यशवंतरावाची आई विधवा आहे, तर भाऊचा बाप परागंदा झालेला आहे. दोघांच्या परिस्थितींत इतकें साम्य असूनसुद्धां त्यांच्या स्वभावांत, ध्येयांत आणि आयुष्यांत जो विलक्षण फरक पडलेला आहे, तो निवळ त्यांजवर वेळोवेळीं आलेल्या प्रसंगांमुळेंच होय. यशवंतरावाची आई अत्यंत प्रेमळ, गरीब व मुलांच्या सुखाकरितां अहर्निश झटणारी, उलट भाऊची आई अत्यंत कठोर आणि मानी. तिच्यापासून भाऊस कसलेंच सुख लागलें नाहीं. असें असतांहि स्त्रीजातीबद्दल दोघांच्या मनांत उत्पन्न होणाऱ्या भावना मातृसुखाच्या अनुभवाविरुद्ध असाव्यात हें केवढें आश्चर्य ? यशवंतराव स्त्रियांना अगदीं तुच्छ मानणारा, तर भाऊ स्त्रियांचा पक्का कैवारी ! याचें कारण एवढेंच कीं, यशवंतरावाची आई अत्यंत प्रेमळ असली तरी त्याच्या बालपणीं आलेल्या संस्कारक्षम प्रसंगीं कठोर आणि स्वार्थी अशा इतर स्त्रियांकडून त्याला अपमान भोगावे लागले व त्यानंतर जी प्रेमळ सहानुभूति त्याच्या बाल मनाला हवी होती ती त्याच्या आईकडून तिच्या अज्ञानामुळें मिळूं शकली नाहीं. या ठिकाणीं '**पण लक्षांत कोण घेतो ?**' मधील यमूची आई आणि या कादंबरींतील यशवंतरावाची आई या दोघींतील महत्त्वाचा फरक दिसून येतो. रा. ब. आडमुठ्यांच्या घरीं रावबहादुरांच्या मुलांनीं यशवंतरावाची शेंडी कापून त्याचा केलेला अपमान, आडमुठ्यांच्या सखूताईनीं स्वतःच्या मुलांच्या आपराधांवर पांघरूण घालून ऐन जेवण्याचे वेळीं यशवंतरावाला घराबाहेर हाकून देणें, त्या संतापांत यशवंतरावाचें पर्वतीवर निघून जाणें, तेथें त्याची व श्रीधरपंतांची गांठ पडून त्यांनीं त्याला स्वतःच्या घरीं जेवावयास आणणें; व तेथें उपाशीं पोटीं आणि कळंजून गेलेल्या मनःस्थितींत सत्यभामाबाईचें त्यांच्याशीं झालेलें वर्तन, हे सर्व प्रसंग हरिभाऊंनीं अत्यंत बहारदार रीतीनें वर्णिले असून,

त्यांवरून बालमनाचें त्यांचें अवलोकन किती सूक्ष्म व मार्मिक होतें हें दिसून येतें. या प्रसंगानंतर यशवंतराव जो घरीं आला तो अत्यंत दुःखी पण संतप्त मनास्थितींत, आणि आपल्या नशिबाला, आयुष्याला आणि गरिबीला दोष देतच आला. त्याच्यासारख्या दहाबारा वर्षांच्या कोवळ्या आणि निष्पाप पण स्वाभिमानी मुलावर एका दिवसांत मानहानीचे इतके प्रसंग यावेत हें पाहून वाचकांच्या सुद्धां डोळ्यांत पाणी येतें. घरीं आल्यावर अर्थातच आपण आपल्या आईच्या गळीं पडून रडूं, आपले झालेले हाल तिला सांगूं आणि ती आपलें सान्त्वन करील अशी त्याची अपेक्षा असते. व ती तशी अशा प्रसंगांत असलेल्या लहान मुलाची कां असणार नाहीं ? पण घरीं येतांच त्याला जो अनुभव येतो तो मात्र त्याचा अगदीं अपेक्षेविरुद्ध! मुलगा सारा दिवस बाहेर राहिल्यामुळें आणि त्याचे झालेले हाल ठाऊक नसल्यामुळें इकडे आईहि संतापलेलीच. आईच्या पूर्व आयुष्यांत तिजवर आलेले प्रसंग, तिच्या नवऱ्यानें तिला दिलेलें दुःख, पहिली श्रीमंती जाऊन हल्लीं भोगावें लागत असलेलें अठराविश्वे दारिद्र्य, आणि यांतून आपला सर्वांचा उद्धार करणारीं आतां आपलीं हीं मुलेंच अशी तिची श्रद्धा, या गोष्टी पाहिल्या म्हणजे आईच्या संतापाबद्दलहि तिला तितकासा दोष देतां येणार नाहीं. पण आडमुठ्यांच्या घरीं आपल्या मुलाला अत्यंत वाईट रीतीनें वागविलें जातें, जाणूनबुजून त्याचा पदोपदीं अपमान करण्यांत येत असतो, व मुलगा केवळ आपल्याच शब्दासाठीं त्या घरीं वारानें जेवत आहे ही परिस्थिति ठाऊक असतां त्या वेळीं यशवंतरावाचें म्हणणें ऐकून घेतल्याशिवाय त्याजवर रागावण्यांत त्याच्या आईची मोठीच चूक झाली यांत संशय नाहीं. आई आपल्याला रागानें बोलत आहे, इतक्यांत आपला लहानगा भाऊ येतांच तिचा राग विरघळून जातो व ती त्याला प्रेमानें घेते, या अगदीं साध्या गोष्टीचाहि यशवंतरावाच्या मनावर त्या मनःस्थितींत फार मोठा परिणाम झाला. आपण इतक्या हालअपेष्टा सोशीत असून आणि कुटुंबास गरिबींतून वर काढण्यासाठीं मनापासून विद्याभ्यास करीत असतांहि आईचें प्रेम आणि सहानुभूति आपल्याकडे नाहीं, त्याचा सर्व वांटा आपल्या लहानग्या भावंडाकडे गेला आहे, अशी असूया यशवंत-

रावाच्या मनांत त्या क्षणीं उत्पन्न होते; आणि त्याबरोबर त्याचें आपल्या आई-बरचें आणि भावंडांवरचें सर्व प्रेम नष्ट होतें. आपण जगांत अगदीं एकटे, आपल्याला कोणाकडूनहि सहानुभूति आणि प्रेम मिळणें शक्य नाहीं, प्रत्येक-जण आपल्यांत नसते दोष काढून आपल्या मार्गात अडथळाच आणणार अशी त्याची भावना होऊन आपला मार्ग आपण एकट्यानेंच, आयुष्यांतील सर्व अडचणी निश्चयी मानानें बाजूस सारून काढला पाहिजे अशी त्याची वृत्ति होण्यास हाच प्रसंग मुख्य कारण झाला. स्त्रियांकडून, त्या मूर्ख व स्वतःपुरतें पहाणाऱ्या असल्यामुळें, सहानुभूतीची व प्रेमाची अपेक्षा कधींहि करूं नये हेंहि आपल्या मनाशीं त्यानें याच वेळीं ठरविलें; व त्यामुळें आपल्या स्वतःच्या आईचे सद्‌गुण आणि प्रेमळपणा व त्याचप्रमाणें माईसाहेब आणि साळूबाई यांचेंहि त्याजवरील निष्काम वात्सल्य त्याला दिसेनासें झालें! स्त्री जातींमधील सखूताई आणि सत्यभामाबाई यांजसारख्या कठोर स्त्रियाच त्याच्या मनापुढें विशेष प्रामुख्यानें उभ्या राहून, त्याचें मन सर्व स्त्री-जाती-विषयीं कठोर, निष्प्रेम आणि सहानुभूतिशून्य बनलें.

श्रीधरपंतांच्या सहवासाचा यशवंतरावाच्या मनावर आणि चारित्र्यावर कसकसा परिणाम झाला, त्याचीं सामाजिक आणि राजकीय मतें त्यांच्या उदाहरणानें कशीं तयार होत गेलीं, मोठमोठ्या पुढाऱ्यांविरुद्ध श्रीधरपंत आणि त्यांचे अनुयायी वेळोवेळीं टवाळीचे उद्‌गार काढीत त्यांचाहि यश-वंतरावाच्या बालमनावर काय परिणाम झाला, याचीं चित्रें हरिभाऊंनीं पुढें काढलीं आहेत, तीं सुद्धां अत्यंत बोधप्रद आहेत. श्रीधरपंतांच्या उपदेशामुळें आणि उदाहरणामुळें त्याला विद्याभ्यासाची गोडी लागली. आणि श्रीधर-पंतांप्रमाणें आपणहि उत्तम विद्वान होण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या मनांत उत्पन्न झाली हें खरें. परंतु त्याबरोबरच सामाजिक बाबतींत आकुंचित, पण राजकीय बाबतींत जहाल अशीं त्याचीं मतें होण्यास त्याच्या बालपणा-पासूनचें आयुष्य आणि संस्कारक्षम अशा वयांत त्याला आलेले अनुभव यांचा किती परिणाम झाला हेंहि विसरून चालणार नाहीं.

याच्या उलट '**मी**'मधील नायक भाऊ याचा आतां आपण विचार करूं. भाऊ आणि यशवंतराव यांच्या परिस्थितींतील थोडेंबहुत साम्य वर

दाखविलेंच आहे. पण संस्कारक्षम अशा प्रसंगीं भाऊच्या बालदृष्टीपुढें सुंदरी आणि शिवरामपंत यांजसारखे लोक आल्यामुळें त्याच्या आयुष्याला अगदींच वेगळें वळण लागलें. स्वतःच्या घरांतील निष्प्रेम वातावरण आणि असंतुष्टता व शिवरामपंतांच्या घरांतील प्रेमळ वातावरण व संतुष्टता या दोहोंतील तुलना अगदीं बालपणींच त्याच्या डोळ्यांपुढें ढळढळीतपणें उभी राहिली. सुंदरीच्या घरीं जाणेंयेणें, त्याला केवळ सुंदरीकरितांच नव्हे, तर तिच्या घरांतील प्रेमळ आणि उदात्त वातावरणाचा अनुभव घेण्याकरितां ठेवावेंसें त्याला वाटूं लागलें. सुंदरी आपल्यापेक्षां लहान असूनसुद्धां जास्त चांगलें वाचते व हा आपल्यास कमीपणा आहे, या एकाच गोष्टीवरून तो झटून अभ्यास करण्याचा निश्चय करतो. हट्टी, उनाड आणि खोटें बोलणाऱ्या मुलांचा सहवास मी माझ्या मुलीस लागूं देणार नाहीं असें शिवरामपंत म्हणतांच केवळ सुंदरीच्या सहवासाच्या आशेनें भाऊ एकदम चांगला वागूं लागतो. शिवरामपंतांस आपण आवडावें व सुंदरीशीं खेळण्यास हा मुलगा अपात्र आहे असें त्यांचें मत होऊं नये, या एकाच हेतूनें भाऊमध्यें त्याच्या अगदीं लहान वयांतच केवढें तरी परिवर्तन झालेलें आहे. सुंदरीच्या शीलाचें आणि गुणांचें त्याच्या मनावर इतकें मोठें वजन बालपणींच पडलेलें आहे कीं, एकदां एका क्षुल्लक कारणावरून त्यानें आपल्या थोरल्या बहिणीस मारहाण केली असतां " सुंदरी तुला चांगला म्हणते तो तूं असाच का ? " असें तिनें विचारतांच, भाऊला आपल्या कृत्याची लाज वाटून तो आपल्या बहिणीची क्षमा मागावयास तयार होतो. इतकेंच नव्हे तर, भाऊ आणि ताई यांजमध्यें त्या क्षणींच अत्यंत जिवलग मित्रत्वाचें नातें उत्पन्न होऊन तें आमरणान्त कायम राहतें. स्वतःची आई अत्यंत खाष्ट असली तरी सुंदरी आणि सुंदरीची आई या दोन स्त्रिया पाहून त्याचें मन स्त्रीजातीविषयीं प्रेमळ आणि आदरपूर्ण होतें व त्याचें कारण एवढेंच कीं, ज्या ज्या वेळीं त्याच्या आईकडून त्याला त्रास होई, त्या त्या वेळीं जरूर ती सहानुभूति त्याला सुंदरीकडून आणि तिच्या आईकडून मिळे. याप्रमाणें स्त्रीजाती-विषयीं मन एकदां सहानुभूतिपूर्ण झाल्यावर आपल्या आईच्या दोषांकडे त्याचें दुर्लक्ष होऊन तिचा स्वाभिमान, कर्तृत्व इ. गुणांकडेच त्याचें जास्त

लक्ष वेधलें व त्यामुळें आपल्या आईसारख्या कर्तृत्ववान् स्त्रीची निव्वळ तिच्या नवऱ्याच्या नादानपणामुळें अशी स्थिति व्हावी ही गोष्ट त्याच्या लक्षांत येऊन, स्त्रीजातीची असहाय्यता त्याला प्रत्यक्ष प्रत्ययानेंच पटली. याहून सुद्धां भाऊवर पुढें जे बरेवाईट प्रसंग आले व त्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या प्रसंगीं शिवरामपंतांनीं त्याला जो उपदेश केला त्यामुळें त्याच्या चारित्र्याचा विकास कसा झाला आणि त्याच्या विचाराची आणि ध्येयाची परिणति शेवटीं ज्या अंतिम टोंकाला गेली, तेथपर्यंत ती कशी गेली याचें चित्र हरिभाऊंनीं रेखाटलें आहे तेंहि अत्यंत परिणामकारक आणि वाचकांच्या मनाला कायमचा चटका लावणारें आहे.

आतांपर्यंत दिलेल्या उदाहरणांवरून हरिभाऊंची बालसृष्टि किती चित्तवेधक आणि बोधप्रद आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. यांत लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं, या विस्तीर्ण बालसृष्टींत स्वभावतःच किंवा उपजत वाईट अशा एकाहि मुलाचें उदाहरण नाहीं. यावरून हरिभाऊंच्या मतें, प्रत्येक मूल जन्मतःच चांगलें, सत्यप्रिय आणि निष्पाप असेंच असतें असें दिसतें. जीं मुलें वाईट निघालीं आहेत तीं सर्व आईबापांच्या किंवा इतर वडील माणसांच्या शिकवणीनें अथवा आकुंचित आणि स्वार्थी वातावरणांत राहिल्यानें बिघडलीं आहेत असें हरिभाऊंनीं दाखविलें आहे. '**जग हें असें आहे**'मधील चिंतोपंत व रंगोपंतांचीं मुलें; '**यशवंतराव खरे**'मधील आडमुठ्यांचीं मुलें व कृष्णराव, '**मी**'मधील विनायक, '**मायेच्या बाजारां**'-तील पद्मेचे भाऊ, '**पण लक्षांत कोण घेतो?**'मधील बनुवन्सें आणि धोंडू भाऊजी या सर्वांची दुर्वृत्तता त्यांच्या त्यांच्या परिस्थितीचा परिणाम आहे. हे परिणाम अर्थात्च आयुष्यभर टिकतील, किंवा सत्संगतीमुळें ते नष्टहि होतील. चिंतोपंत आणि धोंडू भाऊजी हे दोघेजण अनुभवानें पुढें निवळल्याचेंहि आढळून येतें. '**मधली स्थिति**' या कादंबरींतील विनायकराव हाहि पुढें अनुभवानें निवळला आहे. तरी पण मुलें जन्मतः निष्पाप असून तीं सुवृत्त किंवा दुर्वृत्त होणें आणि त्याचप्रमाणें तीं समाजास भूषणभूत होणें किंवा न होणें हें सर्वस्वीं त्यांच्या आईबापांवर, किंवा त्यांना आपण ज्या परिस्थितींत ठेवूं त्या परिस्थितीवर अवलंबून असतें हें मात्र

हरिभाऊंनीं आपल्या भिन्नभिन्न सामाजिक कादंबऱ्यांतून फार परिणामकारक रीतीनें वाचकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला आहे यांत शंका नाहीं. प्रत्येक मूल, फोटोच्या कांचेप्रमाणें, जन्मतः सुष्टदुष्ट कसल्याहि संस्कारांपासून अलिप्त असतें कीं काय, पूर्वकर्माप्रमाणें चांगल्यावाईट भावनांचा सांठा तें आपल्याबरोबर घेऊन येतें किंवा नाहीं, आणि भावी आयुष्यक्रमांत त्याच्या हातून होणाऱ्या चांगल्यावाईट कृत्यांबद्दल त्याची परिस्थिति आणि त्याला लहानपणीं मिळणारें गृहशिक्षण हींच सर्वस्वीं जबाबदार असतात किंवा काय या प्रश्नांचा विचार येथें करण्याचें अर्थात्च प्रयोजन नाहीं. कारण या प्रश्नांची सत्यता गृहीत धरली तरी त्यामुळें मुलांच्या भोंवतालची परिस्थिति आणि त्यांना बालपणांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मिळणारें शिक्षण यांचें महत्त्व कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं. मुलांचीं मनें अत्यंत संस्कारक्षम असून त्यांजपुढें घडणाऱ्या गोष्टींचें तीं चट्दिशीं ग्रहण करितात आणि या गोष्टींचा त्यांच्या जीवनक्रमावर व मनोविकासावर परिणामहि होतो. या गोष्टी प्रत्यक्ष सिद्ध आहेत; आणि म्हणूनच बाल-मानस-शास्त्राच्या अभ्यासाला बालशिक्षणांत व बालसंगोपनांत हल्लीं इतकें महत्त्व येऊन बसलें आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचें महत्त्व केवळ उत्कृष्ट समाजचित्रें व समाजसुधारणा या दृष्टीनेंच नसून बाल-मानस-शास्त्राचीं महत्त्वाचीं प्रमेयेंहि त्यांतून सुंदर रीतीनें सप्रमाण सिद्ध केलीं आहेत. या दृष्टीनेंसुद्धां हरिभाऊंचें कार्य अत्यंत महत्त्वाचें असून त्यांच्या कादंबऱ्या वाचतांना वाचकांनीं त्यांचा या दृष्टीनें विचार करावा, आणि बालसंगोपनाच्या कामांत वडील माणसांकडून होणाऱ्या चुका, हरिभाऊंनीं दाखविलेल्या आहेत त्या स्वतःच्या हातून तरी होऊं देऊं नयेत.

---

# प्रचलित कायद्याचा नीतीवर परिणाम

लेखकः **वासुदेव सदाशिव पाटणकर**, भोर.

[ जन्म शके १८०३. शिक्षण-भोर हायस्कूलमधून मॅट्रिक, पुढें हायकोर्ट प्लीडरची परीक्षा दिली; सध्यां भोरास वकीली करतात. हल्लीं ते संस्थानचे पब्लिक प्रॉसिक्यूटर असून, भोर शहर म्युनिसिपॅलिटीचे उपाध्यक्ष व भोर कायदेकौन्सिलचे सभासद आहेत.]

इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत झाल्यापासून आमचे कांहीं व्यावहारिक फायदे झाले आहेत, ही गोष्ट नाकबूल करितां येणार नाहीं. ही गोष्ट जरी खरी असली तरी फायद्यांपेक्षां नैतिक व धार्मिक तोटेच अधिक झाले आहेत, हें सूक्ष्म विचारांतीं आपणांस दिसून येईल. या तोट्यांपैकीं आमच्या धार्मिक व सामाजिक संस्कृतीचा नाश होत चालला आहे, हा आमचा सर्वांत मोठा तोटा झाला आहे. हल्लीं आमची सांपत्तिक स्थिति शोचनीय झाली आहे. तथापि उद्यां स्वराज्य मिळाल्यावर परदेशांत जाणारा द्रव्याचा ओघ थांबल्यावर आमची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास वेळ लागणार नाहीं. हिंदुस्थानची भूमी दरसाल क्रोडो खंडी धान्य पिकविणारी आहे; यामुळें स्वराज्यांत आमची सांपत्तिक उन्नति होण्यास व आम्हांस पोटभर अन्नवस्त्र मिळण्यास पंचाईत पडणार नाहीं; परंतु परकीयांच्या सहवासानें आमची संस्कृति नष्ट झाल्यामुळें आमचा होणारा तोटा मात्र भरून येणार नाहीं. इंग्रजांचा राजकीय अम्मल येथें सुरू झाल्यापासून आमच्या धार्मिक व नैतिक अधः-पतनास सुरुवात झाली व आमची संस्कृति नष्ट करण्याच्या बाबतींत पद्धतशीर प्रयत्न चालू झाले. इंग्रजी अम्मल आमच्या देशांत रीतसर सुरू झाल्यानंतर हल्लींचे प्रचलित कायदे सुरू झाले. हे प्रचलित कायदे येथें सुरू होण्यापूर्वी धार्मिक व नैतिक बंधनांचा लोकांच्या मनावर पगडा होता. कोणत्याहि रीतीनें परद्रव्याचा अपहार करणें, परस्त्रीशीं व्याभिचार करणें, दुसऱ्याचें घेतलेलें कर्ज बुडविणें, दुसऱ्याचे शरिरास अगर मनास क्लेश होतील अशी कोणतीहि कृति बुद्धिपूर्वक करणें, अभक्ष्यभक्षण करणें व मद्यपान करणें, हीं सर्व धार्मिक व नैतिक पातकें समजलीं जात होतीं. धार्मिक व नैतिक श्रद्धा जोंपर्यंत तीव्रतेनें सामान्य लोकांत होती तोंपर्यंत अशी स्थिति होती. दुसऱ्याचें घेतलेलें कर्ज जर आपण बुडविलें तर आपण नरकांत जाऊं अशी श्रद्धायुक्त भावना सामान्य लोकांच्या अंतःकरणांत वसत होती. पन्नाससाठ वर्षांचे कर्जरोखे जर आपण पाहिले तर ते दहापांच ओळींत लिहिलेले असावयाचे व त्यांवर गांवचे भैरोबाची व मारुतीची अशा साक्षी घातलेल्या असावयाच्या, अशी स्थिति होती. पण त्या वेळीं कर्ज कधींहि बुडविलें जात नव्हतें व कर्जवसुली-करितां दरबारांत फिर्यादीहि फारच क्वचित् होत होत्या. व्यभिचार हें धार्मिक

व सामाजिक महापातक मानलें जात होतें. यामुळें या बाबतींत स्त्रीपुरुषांची नीतिमत्ता फार चांगली होती. समाजाच्या वरच्या वर्गांत अभक्ष्यभक्षण व मद्यपान मुळींच नव्हतें व तें खालच्या वर्गांत असलें तरी फारच अल्प प्रमाणांत होतें. समाजाच्या वरच्या वर्गांत जर क्वचित् एखादा अभक्ष्यभक्षण करणारा अगर मद्यपान करणारा असला तर त्याजवर सामाजिक बहिष्कार टाकला जात असे. याप्रमाणें त्याला खड्यासारखा उचलून समाजाच्या बाहेर फेकून दिल्यामुळें बाकीचे समाजावर या गोष्टीचा चांगलाच परिणाम होऊन तो शुद्ध रहात असे. हल्लीं खोट्या व भ्रामक व्यक्तिस्वातंत्र्याच्या पाश्चात्य कल्पनांनीं या गोष्टींचा समाजांत फैलाव बराच झाल्यामुळें वरच्या वर्गांत ही एक फॅशनच बनून गेली आहे. परकीय संस्कृतीच्या लोकांशीं जेव्हां सामाजिक संसर्ग सुरू होतो तेव्हां प्रथम परकीय लोकांच्या वाईट तेवढ्या गोष्टी नेमक्या उचलल्या जातात. पूर्वी सर्वच लोक शुद्धाचरणी होते व हल्लीं सर्वच लोकांचें नैतिक व धार्मिक अधःपतन झालें आहे, असें म्हणण्याचा आमचा उद्देश नाहीं. परंतु शेंकडावळ जर पाहिली तर हल्लींपेक्षां पूर्वी पापभीरु लोक जास्त होते ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. हल्लीं तेंच प्रमाण कमी झालें आहे याचें कारण स्वराज्याचे अभावीं पाश्चिमात्य कल्पना व चालीरितींचा लोकांच्या मनांवर पगडा बसत चालला असल्यामुळें राजकारणाशिवाय इतर धार्मिक, नैतिक व सामाजिक बाबतींत कोणीच शास्ता नसल्यामुळें वाटेल त्यानें वाटेल तसें वागावें व वाटेल तें करावें अशी स्थिति झाली आहे. यालाच 'व्यक्तिस्वातंत्र्य' असें गोंडस नांव देण्यांत आलें आहे. हल्लींच्या राजवटींत सर्व बंधनांचा लोप झाला असून फक्त प्रचलित कायद्यांचें कृत्रिम बंधन उत्पन्न केलें गेलें आहे. समाज सुस्थितींत रहावा, त्याची नैतिक अधोगति होऊं नये, कोणत्याहि बाबतींत कोणी कोणाचें कसलेंहि नुकसान करूं नये, यांकरितां बंधनांची जरूरी असते. समाजाची सर्वांगीण सुस्थिति ही प्रचलित इंग्रजी कायद्यांसारख्या नुसत्या कृत्रिम कायद्यांच्या बंधनांनीं राहू शकणार नाहीं. इंग्रजांनीं पाश्चिमात्य कायद्यांच्या धर्तीवर इकडे कायदे तयार करून लागू केले. दरसाल नवीन नवीन कायदे व नियम तयार होत असतात. रयतेला न्याय देण्याकरितां सर्व फौजदारी व दिवाणी कोर्टें स्थापन केलीं आहेत.

जज्ज व मॅजिस्ट्रेट हीं सामान्य माणसेंच असल्यामुळें त्यांच्या हातून खरा न्याय ज्याला म्हणतात तो फार थोड्या वेळेला होतो. हे न्यायाधीश न्याय देणार तो साक्षीदारांच्या सांगण्यावर. साक्षीदार हे शेंकडा पंचाण्णव बाबतींत खोटें बोलणारे असतात. आपण खरें बोलावें असें धार्मिक अगर नैतिक बंधन त्यांना राहिलेलें नाहीं. एखादा साक्षीदार खोटें बोलण्यास धजत नसला तर त्यास खोटें बोलण्यास उत्तेजन दिलें जातें. साक्षीदारास खरें बोलण्याची प्रथम न्यायाधीश शपथ देतो. न्यायाधीशांनीं दिलेली खरें बोलण्याची शपथ घेतलीच पाहिजे, नाहीं घेतली तर गुन्हा होतो असा कायदा असल्यामुळें साक्षीदार 'परमेश्वराचें स्मरण करून खरें बोलेन, खोटें बोलणार नाहीं,' अशी शपथ घेतो व पहिल्या प्रश्नाचे उत्तरापासून बेधडक खोटें सांगूं लागतो. परमेश्वराला साक्षी ठेवून हा साक्षीदार कां खोटें बोलतो ? धार्मिक व नैतिक बंधनांचा दाब त्याचे मनावर नसल्यामुळें त्याची सत्याची चाड नाहींशी झालेली असते. असल्या साक्षीदारांच्या साक्षींवर विश्वास ठेवून न्यायाधीश न्याय देतात, तो न्याय नसून पुष्कळ वेळेला अन्यायच ठरतो. दावा लावण्यास कायद्यानें मुदत ठेवलेली असते. त्या मुदतीनंतर एक दिवसहि गेला असला तरी न्यायाधीश दावा बुडवितो. कारण न्यायाधीश हा मुदतीचे कायद्यानें बांधला गेलेला असतो. प्रॉमिसरी नोटेची तीन वर्षांची मुदत संपून एक दिवस झाला असला तरी धनकाचे येणें खरें असून त्याजला एक पैहि वसूल करून मिळत नाहीं. मुदतीबाहेर कागद गेला तर ऋणको हा नैतिक अगर धार्मिक दृष्टि बाजूला ठेवून खुशाल कायदेशीर रीतीनें कर्ज बुडविण्याचा अन्याय करूं शकतो.

गुन्हे गुप्त रीतीनें करण्याची करामत साधत असेल तर हल्लींचे कायद्यांप्रमाणें कोणी कसलाहि गुन्हा करावा अशी स्थिति आहे. परंतु नीतीला अगर धर्माला गुप्त किंवा प्रगट कोणताच गुन्हा संमत नाहीं. वीसवीस वर्षांनीं हातावरील कर्ज व्याजासुद्धां आणून देणारा शुद्ध धार्मिक व नैतिक आचरण असलेला, हल्लींचे कायदे प्रचारांत येण्यापूर्वीचा गरीब ऋणको कोणीकडे, व हल्लींचे कायद्यांप्रमाणें तीन वर्षांनंतर मुदतीची हरकत सांगून खरें कर्ज बुडविणारा हल्लींचा ऋणको कोणीकडे ? हल्लींचे कायद्यास जपणारे

परंतु गुप्त रीतीनें नैतिक गुन्हे करणारे अशा लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

गुन्हे उघडकीला आले असले व कोर्टांत ते गुन्हे शाबीत होण्याइतका पुरावा मिळाला असतां ते गुन्हे करणारास शासन करण्यास हल्लींचे कायदे समर्थ आहेत. परंतु प्रछन्न गुन्ह्यांबद्दल सुद्धां नीतीचा कटाक्ष असतो. गुन्हे करण्याकडे अगर दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहा करण्याकडे समाजांतील लोकांचा कल होतां होईल तों कमी व्हावा असा कायद्यांचा हेतु सांगण्यांत येतो. परंतु प्रचलित कायदे सुरू झाल्यापासून हा हेतु आज साठ सत्तर वर्षांत सिद्धीस कितपत गेला आहे हें पाहिलें तर त्याचें उत्तर 'नास्ती' पक्षींच द्यावें लागेल. आज साठसत्तर वर्षांत कोर्टांत दाव्यांची अगर फौजदारी खटल्यांची संख्या कमी झालेली नसून वाढतच आहे, असें दिसून येतें. लोकांची गुन्हे करण्याची प्रवृत्तीहि कमी झालेली नाहीं. यावरून लोकांची नीतिमत्ता वाढून दुसऱ्यास बुडविण्याची व गुन्हे करण्याची प्रवृत्ति कमी होण्याचे कामीं हल्लींचे कायद्यांचा उपयोग होत नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें.

मुन्सिफ अगर मॅजिस्ट्रेट यांस कांहींतरी निकाल हा करावाच लागतो. वादी प्रतिवादी अगर फिर्यादी आरोपी, यांपैकीं खरा कोण अगर खरा न्याय कोणता हें आपणांस पुराव्यांवरून कळून येत नाहीं. सबब आपण निकालच करीत नाहीं, असें न्यायाधीशानें म्हणून चालत नाहीं. कांहींतरी निकाल करणें त्यास भाग असतें. म्हणून न्यायाधीश हा नेहमीं निकाल करतो. न्यायच करतो असें नाहीं. म्हणून या निकालांत कधीं न्याय होतो तर कधीं अन्यायहि होतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून खालील कोर्टास, निकाल कां होणेचे राहिले, खटले फार शिल्लक आहेत, लवकर निकाल करून टाका, अशी भाषा हुकमांत वापरली जाते. जो न्यायाधीश झटपट निकाल करून टाकतो, खटल्यांची शिल्लक फारशी राहूं देत नाहीं, तो न्यायाधीश उत्तम व हुशार समजला जातो व त्यास बढती मिळते. परंतु झटपट निकाल करण्यांत त्याचे हातून किती अन्याय झाले आहेत हें कोणी फारसें पहात नाहीं.

प्रचलित कायदे व कोर्टें अस्तित्वांत आल्यानंतर वकिलांची संस्था निर्माण झाली. अडाणी पक्षकारांची बाजू कोर्टापुढें मांडण्याकरितां वकील लागतात

व म्हणून वकील हे न्यायाधीशाला मदत करणारे असें समजलें जातें. आपले अशिलाची सत्य असेल ती बाजू कोर्टापुढें मांडणें हें खरें वकिलांचें कर्तव्य, परंतु हें कर्तव्य प्रामाणिकपणानें किती वकील पाळत असतील ते असोत. न्यायाधीशाच्या डोळ्यांत धूळ फेंकून त्याची दिशाभूल जो बेमालूम रीतीनें करूं शकतो तो चांगला वकील समजला जातो. खरोखर ज्या आरोपीनें चोरी केली आहे, त्यास कायद्याचे तडाक्यांतून जो सोडवूं शकतो तो शहाणा वकील समजला जातो. प्रत्यक्ष खून केला आहे, हें माहित असून अडाणी साक्षीदारांना चकवून व न्यायाधीशाची व ज्यूरीची वावदूकपणानें दिशाभूल करून जो वकील खुनी इसमास दोषमुक्त म्हणून सोडवून घेऊं शकतो तो नामांकित वकील म्हणून मानला जातो व समाजांत त्यांची चहा होते. वकिलाची व्यावहारिक हुशारी यांत दिसून येत असेल किंवा कुत्र्याचे पाय मांजरास व मांजराचे पाय कुत्र्यास लावण्यांत तो मोठा वाकबगार असेल, किंवा परिस्थितीचा फायदा घेण्याची हातोटी त्यास साधली असेल; परंतु नीतीच्या दृष्टीनें खरा गुन्हेगार सुटणें किंवा निरपराध्यास शिक्षा होणें या दोन्ही गोष्टी सारख्याच गर्हणीय आहेत. समाजावर या गोष्टींचा नैतिकदृष्ट्या फार वाईट परिणाम झालेला आहे. युनिव्हर्सिटीच्या यंत्रांतून दरसाल हजारों वकिलांची पैदास होत आहे, प्रत्येक कोर्टांत अलिकडे वकिलांची गर्दी झाली आहे, त्यामुळें वकील वर्गांत दिवसेंदिवस बेकारी वाढत्या प्रमाणावर आहे. वकील फार झाल्यामुळें अलीकडे पैसा मिळेनासा झालेला आहे. हल्लींचें ज्या तऱ्हेचें शिक्षण शाळांतून व कॉलेजांतून दिलें जात आहे, त्या शिक्षणानें सत्त्वगुणांचा विकास न होतां रजोगुणांची वाढ होत असल्यामुळें ज्ञानाची घमेंड व सुखलालसा हीं उत्पन्न होतात. ही सुखलालसा पैसा पुष्कळ मिळाल्यावांचून तृप्त होत नाहीं. हिंदुस्थानच्या गव्हर्नर-जनरलच्या महिन्याच्या प्राप्तीपेक्षां दुप्पट प्राप्ती महिन्याला मिळविणारे कै. बाबू चित्तरंजन दास अगर पंडित मोतिलाल नेहरू यांसारखे वकील होऊन गेले व हल्लींहि आहेत. पूर्वी वकील थोडे होते, तेव्हां सामान्य वकिलासहि प्राप्ति पुष्कळ असे; त्यामुळें वकिलास पुष्कळ पैसा मिळालाच पाहिजे अशी वकिलांची समजूत होऊन बसली आहे. वकिलांची संख्या अलीकडे फार वाढल्यामुळें पैसा

मिळणें दुरापास्त झालें आहे, हें वर सांगितलेंच आहे. अर्थात् 'बुभुक्षितः किं न करोति पापम्' या न्यायानें वकीलवर्गाकडून नीति-अनीतीचा विचार केला जात नाहीं. खरा सल्ला न देतां कामें वाढतील असें करणें, खऱ्या हकीकतीच्या कैफियती किंवा खरा बचाव न करणें, निव्वळ खरा पुरावा कोर्टापुढें न मांडणें, वगैरे गोष्टी वकीलवर्गाकडून कमी-अधिक प्रमाणांत होऊं लागल्या. अशा रीतीनें वकील वर्गाचा व त्याबरोबर जनतेचाहि नैतिक अधःपात होत चालला आहे. आमच्या या लिहिण्यानें वकील वर्गास राग येईल हें आम्ही जाणून आहोंत. परंतु नीतीच्या दृष्टीनें आम्ही विचार करीत असल्यामुळें सत्य दडविणें रास्त होणार नाहीं. सर्वच वकील असे आहेत असें आमचें म्हणणें नाहीं. सत्याची चाड बाळगणारेहि पुष्कळ वकील असतात, नाहीं असें नाहीं. परंतु कायद्यानें परिस्थितीच अशी निर्माण झाली आहे कीं, वकिलांचाहि निरुपाय होतो. कारणें कांहींहि असोत किंवा दोष कोणाचाहि असो, सामान्यतः समाजांत शुद्ध नीतीचा ऱ्हास होत चालला आहे, ही गोष्ट डोकें शांत ठेवून विचार करणारांना पटल्याशिवाय राहणार नाहीं अशी आमची खात्री आहे.

हल्लींच्या कायद्यांमुळें व कोर्टामुळें समाजांत भांडखोरपणा मात्र वाढला आहे. कोर्टांत दिवाणी अगर फौजदारी काम एखाद्यावर चालू करण्यांत न्याय मिळविण्याचे हेतूपेक्षां सूड घेण्याचीच बुद्धि जास्त दिसून येते. खेड्यापाड्यांतील लोकांचे कोर्टांत चालणारे वाद अगर खटले पाहिले तर अगदीं क्षुल्लक कारणाकरितां तीनतीन कोर्टें वाद भांडून हजारों रुपये खर्च करून, धुळीला मिळणारे लोक दृष्टीस पडतात. हल्लींचे कोर्टांकडून मिळणारा न्याय स्वस्त असा कधींच पडत नाहीं. ज्याचे जवळ पैसा नसेल त्यास कितीहि अन्याय झाला असला तरी न्याय मिळूं शकत नाहीं. एखाद्या श्रीमंतानें गरिबास बुडविण्याचें मनांत आणल्यास लोकांचे अनुकूलतेमुळें कोर्टाकडून त्यास तो बुडवूं शकतो. एखाद्यास खालचे कोर्टांतून न्याय मिळाला नसल्यास हायकोर्टाकडून अगर प्रिव्ही-कौन्सिलकडून न्याय मिळविणें अतिशय खर्चाचें व त्रासाचें काम असतें, यामुळें गरिबांस अन्याय निमुटपणें सहन करून स्वस्थ बसावें लागतें. गरिबांस न्याय मिळविण्याचे बाबतींत हल्लींचे कायदे व कोर्टें

हीं उपयोगीं पडूं शकत नाहींत. एखाद्यानें एखाद्याच्या श्रीमुखांत दिली व त्याबद्दल त्यानें फौजदारी फिर्याद मॅजिस्ट्रेटकडे केली तर कोर्टखर्च व वकिलाचा खर्च मिळून त्यास अखेर निकालापर्यंत कमींत कमी पंचवीसतीस रुपये पर्यंत खर्च येतो व पुरावा नीट वठला तर क्षुल्लक गुन्हा म्हणून आरोपीस मॅजिस्ट्रेट पांच रुपये दंड करितो. शिवाय, फिर्यादीचा सर्व खर्च फौजदारी कामांत उलट बाजूकडून भरूनहि मिळत नाहीं. म्हणजे मार देणारास पांच रुपये दंड व मार खाणारास खर्चाचे रूपानें पंचवीस रुपये दंड अशी स्थिति होते. आपले देशांत गरिबांचीच संख्या जास्त असल्यानें वर लिहिल्याप्रमाणें गरिबांस म्हणजे देशांतील बहुजनसमाजास न्याय स्वस्त व सुलभ रीतीनें मिळण्याचें साधन नसल्यामुळें त्यांना अनीतीच्या मार्गाचें अवलंबन करून आपलें साध्य साधणें भाग पडतें.

हायकोर्टाचे निकालांनीं व विधवाविवाहासारख्या कांहीं कायद्यांनीं हिंदुधर्मशास्त्राचे नियमांत पुष्कळच ढवळाढवळ केली आहे. त्याचा सामाजिक नीतिमत्तेवर कांहीं बाबतींत अप्रत्यक्षपणें अनिष्ट परिणाम झालेला आहे, व होत आहे.

शेतकऱ्यांस परस्पर ऋणमुक्त करणेचे कायदे मुंबई इलाख्यांत व इतरत्र करण्यांत आलेले आहेत. हे कायदे खरोखर शेतकऱ्यांच्या कळवळ्यानें केलेले आहेत कां त्यांत कांहीं दुसरा हेतु आहे त्याचा विचार करणेचें हें स्थल नव्हे. परंतु शेतकऱ्यांचें खरें कल्याण मात्र या कायद्यांनीं झालेलें नसून शेतकरी, ऋणको व सावकार या दोघांचीहि नीतिमत्ता रसातळास गेली आहे. या कायद्यानें शेतकऱ्यांस व सावकारांस दोघांसहि लबाडी करण्यास मदतच केली आहे. शेतकरी ऋणको हा कर्ज काढण्याचे वेळीं वाटेल ते करार लिहून देतो. परंतु सावकारानें कर्जवसुलीकरितां कोर्टांत फिर्याद केल्यास या कायद्याच्या आश्रयानें खुशाल कराराबाहेर वाटेल त्या तक्रारी करितो व तसा कायदाच असल्यामुळें त्याच्या तक्रारी कोर्टाकडून मान्य केल्या जातात. पुढें ऋणको असें करितात म्हणून, सावकारहि प्रथमपासून लबाडी करणेस प्रवृत्त होतात. दुप्पट रकमेचे कागद लिहून घेणें, वसुलाच्या पावत्या न देणें वगैरे गोष्टी करण्यास कायदा सावकारास भाग पाडतो. तात्पर्य इतकेंच कीं, कुळें

व सावकार ह्या दोघांसहि कायद्यानें लबाडी शिकविली आहे. शेतकरी हा मूळचा गरीब, सालस व प्रामाणिक असून त्या कायद्यानें त्याचेंहि नैतिक अधःपतन होणेस मदतच केली आहे. छांदोग्योपनिषदांत अश्वपति राजा म्हणतो.:—

न मे स्तेनो जनपदे न कदर्यो न मद्यपः।
नानाहिताग्निर्नाविद्वान्न स्वैरी स्वैरिणी कुतः॥

'माझे राज्यांत कोणीहि चोर नाहीं, अनुदार नाहीं, मद्य पिणारा नाहीं, अग्नि-पूजा करीत नाहीं असा कोणीहि नाहीं, कोणी अविद्वान् नाहीं, कोणीहि पुरुष स्वैर नाहीं, मग स्वैरिणी स्त्री कोठून असणार?'

खरोखर असें छातीला हात लावून सांगणारा एक तरी राजा हल्लींच्या युगांत सांपडेल काय? ज्या राज्यांतील सर्व लोकांची नीतिमत्ता इतकी प्रखर आहे तें राज्य व त्यांतील लोक धन्य होत, ह्यांत शका नाहीं. ही स्थिति कोणीकडे व समाजाची हल्लींची स्थिति कोणीकडे?

हल्लीं कायद्यांच्या तावडींत न सांपडतां कितीतरी प्रतिष्ठित चोर व खुनी समाजांत वावरत आहेत. पानस्वातंत्र्याचे नांवाखालीं राजरोस मद्यपान सुरू आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचे नांवाखालीं स्त्रीपुरुषांचें स्वैर वर्तन चालू आहे.

वर केलेल्या एकंदर विवेचनावरून भिन्न संस्कृतीच्या परधर्मीयांनीं येथें सुरू केलेल्या प्रचलित कायद्यांच्या कृत्रिमपणामुळें आमच्या समाजांतील धार्मिक व नैतिक बंधनें शिथिल झालीं असून आमची नैतिक अधोगति झाली आहे व होत आहे, हें सूक्ष्म विचारांतीं कोणासहि पटल्यावांचून राहणार नाहीं.

ही स्थिति सुधारून सर्व समाजाची नैतिक उन्नति होण्यास निश्चित असे उपाय सांगणें फार कठीण आहे. मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्तीच वाईट गोष्टीं-कडे असते. धार्मिक व नैतिक बंधनांनीं त्या प्रवृत्तीस आळा घातलेला असतो. हीं धार्मिक व नैतिक बंधनें शिथिल झालीं म्हणजे मूळची समाजाची नैसर्गिक प्रवृत्ति उसळी मारून वर उठते. क्षणिक अशा आधिभौतिक सुखाकडे मनुष्याचे मनाचा नेहमीं कल असतो. ही आधिभौतिक सुखलालसा कमी

झाली तरच मनुष्याची नैतिक उन्नति होईल. अलिकडे जगांत आधिभौतिक सुखाची फारच वाढ झालेली आहे. त्या सुखाप्रीत्यर्थ गरजा वाढल्यामुळें मनुष्याची राहणी फारच खर्चाची व मिजाशीची झाली आहे, व त्यामुळें मनुष्य संकटांत पडत आहे. सुखलालसा व गरजा वाढल्या म्हणजे त्या पुरविण्यास साधन मिळालें नाहीं म्हणजे मनुष्याची प्रवृत्ति वाईट मार्गाकडे होते. म्हणून आपले देशांतील लोकांनीं आपली राहणी पूर्वीप्रमाणें अतिशय साधी ठेवण्यास शिकलें पाहिजे व महात्मा गांधींच्या तत्त्वाप्रमाणें मनोनिग्रह वरून व धर्मतत्त्वांवर श्रद्धा ठेवून त्यांनीं आपली ऐहिक सुखोपभोगाची लालसा शक्य तितकी कमी केली पाहिजे. याप्रमाणें प्रत्येक व्यक्ति वागूं लागेल तर समष्टीची म्हणजे बहुजनसमाजाची नैतिक उन्नति होण्यास व शाश्वत सुखाची समृद्धि होण्यास वेळ लागणार नाहीं.

---

## नाटकांतील संगीत

लेखक : शंकर बापूजी आंबेकर एम्. ए., हिंगणें.

[ जन्म सन १९०२ सालीं झाला. सन १९२१ सालीं पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रीक; पुढील अभ्यासक्रम फर्ग्युसन कॉलेजांत होऊन १९३० मध्यें एम्. ए. झाले. बी. ए. झाल्यापासून व्यवसाय शिक्षकाचा; हुजुरपागा, भावे स्कूल वगैरे ठिकाणीं यांनीं शिक्षकांचें काम केलें. सांप्रत हे हिंगणें येथील महिला आश्रमांत अध्यापक आहेत. त्रुटित टीकालेख हे मधूनमधून लिहितात. ]

हल्लींच्या रंगभूमीवरील संगीत हें अलिकडेच अस्तित्वांत आलें आहे, अशी कित्येकांची निराधार समजूत असल्याचें आढळून येतें. भारतीय नाट्यशास्त्राचा इतिहास विचारांत घेतल्यास संगीताची पीठिका फार पुरातन काळापासून प्रचलित झालेली आहे हें कोणालाहि सहज सिद्ध करून दाखवितां येईल. हल्लीं रंगभूमीवरील गायकाला ज्याप्रमाणें स्वर व ताल यांची साथ देणाऱ्या कारागिरांची गरज असते, त्याप्रमाणें फार पुरातन काळीं, म्हणजे आद्य नाट्याचार्य भरतमुनि यांनीं आपला नाट्यशास्त्र नामक ग्रंथ लिहिला त्या वेळीं, साथीची पद्धत रंगभूमीवरील गायक नटांना विशेष अगत्याची

वाटत असावी असें दिसून येतें. आधुनिक गायक नटांना पेटी, सारंगी व तबला एवढ्याच हत्यारांची अवश्यकता असते. पण पूर्वीं मृदंग, चौघडा, वीणा, अलगुज वगैरे उपकरणें गायकाच्या साथीला सिद्ध ठेवलेलीं असत. एवढ्यावरून नाटकामध्यें संगीताचा भाग अंशमात्रेंकरून तरी असावा अशी त्या वेळची रूढ प्रवृत्ति असल्याचें दिसून येतें.

सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं महाराष्ट्रांत संगीत नाटकांना जेव्हां विशेष अभिनव स्वरूपाची चालना मिळाली त्या वेळीं संगीत नाटकांच्या प्रचारकांच्या दृष्टीपुढें भरतकालीन रंगभूमीची परिस्थिति होती असें अर्थात्च खात्रीलायक रीतीनें म्हणतां येणार नाहीं. पण भरतानें आंखून दिलेल्या नियमांचें योग्य रीतीनें परिपालन करणारीं संस्कृत कवींचीं गद्यपद्यात्मक नाटकें उपरिनिर्दिष्ट महाराष्ट्रीय नाटककारांनीं कित्त्यादाखल म्हणून स्वतःपुढें टेवलेलीं असावींत असें मात्र म्हणतां येण्यासारखें आहे. प्रारंभीं याच संस्कृत नाटकांपैकीं कांहींचीं मराठींत भाषांतरें होऊन मूळांतील संस्कृत पद्यभाग मराठींत लावणी वगैरे चालींच्या संगीतांत रूपांतर पावला. शाकुंतल, मृच्छकटिक, विक्रमोर्वशीय वगैरे नाटकांतून किर्लोस्कर व देवल यांनीं मराठींत रूढ असलेल्या पदांच्या चालींवर संस्कृत श्लोकांच्या जागीं पदें घालून त्या नाटकांना मराठी संगीत नाटकांचें स्वरूप दिलें. किर्लोस्कर व देवल यांनीं आपल्या स्वतंत्र नाटकांतूनहि पदें घातलेलीं आहेत. नाटक हें समाजाला दर्पणवत् आहे, त्यांत समाजाचें यथायोग्य प्रतिबिंब पडलें असल्याचें आढळून येतें, त्यांत संसारांतील प्रसंगांचें आणि संभाषणाचें लालित्ययुक्त अनुकरण केलेलें असतें वगैरे नाटकांसंबंधींचे गुणविशेष लक्षांत घेतां नाटकांमध्यें संगीताची योजना असणें अस्वाभाविकच आहे असें नव्हे तर ती अप्रयोजकपणाचीहि आहे. पण संस्कृत नाटकांतील श्लोक, समकालीन प्रेक्षकांची प्रवृत्ति, कथा, तमाशे, ललितें यांमध्यें असणारें संगीत आणि तें ऐकण्याकरितां उत्सुक असणारा समाज वगैरे गोष्टी ध्यानांत घेऊनच किर्लोस्करप्रभृतींनीं आपल्या नाटकांतून संगीताची योजना केली असावी, असें म्हणतां येण्यासारखें आहे. तत्कालीन प्रेक्षकांचीं मनें तमाशे, ललितें, वगैरे हलक्या प्रतीच्या करमणुकींपासून परावृत्त करण्याकरितां संगीत नाटकें प्रायः प्रचारांत आणलीं गेलीं, तेव्हां

तमाशे, लळितें वगैरेमधील संगीतापेक्षां श्रेष्ठ प्रतीचें संगीत नाटकांमध्यें प्रविष्ट करण्यांत आलें. सौभद्र, शारदा, संशयकल्लोळ वगैरे नाटकांचें सूक्ष्म दृष्टीनें परिशीलन केल्यास असें आढळून येतें कीं, नाटकांतील कथानकांची कलाप्रवणता, आणि त्या त्या रसांचा आविष्कार व परिपोष यांना यत्किंचित्‌हि धक्का न लावतां संगीत भागाची मोठ्या कौशल्यानें मांडणी केलेली आहे. किंबहुना कथानक आणि रस यांचा अधिक उठाव होण्याकरितांच संगतीचा उपयोग करण्यांत आलेला आहे.

सर्वसामान्य लोकांना स्थूल मानानें रसग्रहण करतां येईल, अशी आकर्षक कला म्हटली म्हणजे संगितकलाच होय. त्या कलेचें शास्त्रीय ज्ञान नसतांना-सुद्धां संगीतापासून आनंद मिळवणारे कितीतरी लोक असतात. संगीताबद्दल नावड बाळगणारे लोक फारच थोडे. अशा स्थितींत किर्लोस्कर कंपनीच्या गायननिपुण नटांनीं त्या वेळीं प्रेक्षकसमाजाला पार मोहून टाकलें असल्यास आश्चर्य नाहीं. शिवाय नाटक कंपन्यांमुळेंच लोकांमध्यें गायनश्रवणाची अभिरुचि उत्पन्न झाली असें नव्हे तर अत्यंत पुरातन असे जे वेद त्यांतील ऋचासुद्धां संगीतप्राय आहेत. मुसलमान बादशहांच्या रियासती संगीताच्या निनादांनीं दुमदुमून राहिल्या होत्या. रजपूत वीरांच्या पदरचे भाट आपल्या प्रतिभासंपन्न गायनानें सृष्टीदेवीचें नित्यशः प्रबोधन करीत असत. पेशवाईच्या ऐन अंमलांत कोणताहि महोत्सवाचा प्रसंग कलावन्तिणींच्या गाण्याशिवाय पूर्णपणें साजरा झाला असें म्हणणें म्हणजे अरसिकपणा व्यक्त करण्यासारखेंच असे. पेशवाई जाऊन इंग्रजी अंमल सुरू झाला आणि किर्लोस्करांचीं संगीत नाटकें अस्तित्वांत आलीं; त्या वेळीं जुन्या अंमदानींतल्या ऐषआरामाची परंपरा चालूच होती. जहागिरदार इनामदार लोक हे या जुन्या परंपरेचे पुरस्कर्ते होते, तर सामान्य लोक तमाशे, लळितें असल्या प्रकारच्या करमणुकींच्या साधनांनीं कालक्रमणा करीत होते. अशा समयीं नाट्यकलेला संगीताची जोड लाभली. तेव्हां नाटकांतील संगीत त्या वेळीं किती लोकप्रिय झालें असेल, याची सहज कल्पना करतां येण्यासारखी आहे.

पुढें पुढें संगीत नाटक मनोरंजनाचें एक प्रमुख साधन गणलें जाऊं लागलें; आणि संगीत नाटकांचा स्वतंत्र संप्रदायच सुरू झाला. किर्लोस्कर व देवल यांच्या-

नंतर जे संगीत नाटककार झाले त्यांनीं नाटकांमध्यें फक्त संगीताची योजना करण्यांतच आपल्या पूर्वसूरींचें अनुकरण केलें, पण कथानकाची सजावट रम्यतर अथवा निरनिराळ्या रसांचा उठावदार रीतीनें परिपोष करण्याकडे या नाटककारांनीं संगीताचा उपयोग केला असें मात्र निर्विवाद रीतीनें कोणालाहि म्हणतां येणार नाहीं. पांडित्याचें प्रदर्शन करावें किंवा सरसनीरस कल्पना काव्यांतून प्रतीत करण्याकरितां संगीताची कास धरावी या वृत्तीनें या नवीन नाटककारांचीं मनें भारलीं गेल्याचें दिसून येतें. कांहीं लोकप्रिय पदांचीं उदाहरणें घेऊन वरील मुद्दा सहज सिद्ध करतां येण्यासारखा आहे. सौभद्र नाटलांतील दुसऱ्या अंकांतील सुभद्रेचीं 'वद जाऊं कुणाला,' 'किति सांगुं तुला,' 'अरसिक किति हा शेला' वगैरे पदें किंवा तिसऱ्या अंकांतील कृष्णाचीं शृंगारपर पदें ऐकल्यास अगर वाचल्यास मनाचा असा स्पष्ट अभिप्राय होतो कीं, त्या सर्व पदांच्या योगानें नाटकांतील कथानकाची सजावट अधिक खुलून दिसते आणि त्या त्या वेळचे शृंगार आणि करुण हे रस फार परिणामकारक रीतीनें आविष्कृत होऊन त्यांचा परिपोष विशेष जोरदार रीतीनें घडून येतो. सौभद्र, शारदा वगैरे नाटकांतील पदांची भाषा साधी, सोपी अतएव दृश्य काव्याला सर्वस्वीं अनुरूप अशीच होती. शिवाय त्या पदांत आगंतुक कल्पनांचा भरणा विशेष नसून संविधानकांतील महत्त्वाच्या भागाचें त्यांतून कथन झालें असल्याचें आढळून येतें. त्यामुळें तीं पदें नाटकांतील गद्यभागाशीं एकजीव होऊन गेलीं आहेत. उपमाच देऊन सांगावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, जुन्या संगीत नाटकांची घडण एकाद्या सोन्याच्या मोहनमाळेसारखी बांधेसूद आहे. कोणत्याही सांखळीचा एकादासुद्धां दुवा निखळल्यानें माळेच्या शोभेला जसा उणेपणा यावा, तसा एकाद्याहि पदाच्या गाळागाळीनें सबंध नाटकाच्या संविधानकाचा रसभंग होत होता! जुन्या नाटकांचाच केवळ पक्षपात न करतां नवीन नाटकांनाहि उपमेचें देणें बहाल करून बोलावयाचें झाल्यास असेंच म्हणावें लागेल कीं, हल्लींचीं संगीत नाटकें झेंडूच्या फुलांच्या माळेसारखीं आहेत. वेळप्रसंगीं चार दोन फुलें काढून माळेची लांबी कमी केली तरी माळेच्या मूळच्या घडणींत यत्किंचितहि बिघाड होत नाहीं. त्याचप्रमाणें नाटकांतील वाटेल तो भाग,

विशेषतः कोणत्याहि पात्राचें कोणतेंहि पद गाळलें तरी नाटकाच्या कथानकाला धक्का लागावयाचा नाहीं आणि रसाचा आविष्कारच इतका बेतासबात असतो कीं, पदांची काटाकाट केल्यानें त्यांत बिघाड होण्याची भीति रहात नाहीं. सर्वांत खेदाची गोष्ट ही कीं, कलेवराला ज्याप्रमाणें भरजरी साजशृंगार चढवावा त्याप्रमाणें या नवीन नाटककारांच्या पदांच्या चाली मात्र अस्सल हिंदुस्थानी असतात आणि त्या गाऊन दाखविणारे नट शास्त्रोक्त संगीताचें अध्ययन केलेले खास गवई असतात ! पण साजशृंगारानें कलेवराला चेतना येणें ज्याप्रमाणें शक्य नसतें, त्याचप्रमाणें या बाह्यात्कारी भव्य देखाव्यांच्या साहाय्यानें नाटकांतील गद्यभाग अगर संगीतभाग विशेष रीतीनें खुलून दिसणें अर्थातच शक्य होत नाहीं. श्री. कृ. कोल्हटकर किंवा कृ. प्र. खाडिलकर यांच्या नाटकांतील संगीत पारशी व हिंदुस्थानी चालींमुळें आणि नटांच्या गायनामुळें कितीहि आकर्षक वाटत असलें तरी त्यांच्या प्रायः सर्वच नाटकांतील संगीत अतिशय दुर्बोध, नाटकांसारख्या दृश्य काव्याला सर्वस्वीं अनुचित असें आहे. कोल्हटकर आणि खाडिलकर यांच्या संगीत नाटकांचे प्रयोग किर्लोस्कर आणि गंधर्व या नाटक मंडळ्यांनीं करून दाखविल्यामुळें नाटककारांच्या कलेपेक्षां नटांच्या अभिनयाकडे व विशेषतः गायनाकडे प्रेक्षकांचें लक्ष अधिकाधिक वेधलें गेलें आणि नाटकांतील प्रतिपाद्य विषय कितीहि विस्कळित असला, संगीतांतील काव्य ( ? )-कल्पना कितीहि दुर्बोध आणि रसविघातक असल्या तरी तिकडे प्रेक्षक लक्ष देतनासे झाले. भाऊराव कोल्हटकर, नारायणराव जोगळेकर, कृष्णराव गोरे, बालगंधर्व, केशवराव भोंसले इत्यादि गायकनटांचें मनसोक्त गायन ऐकणें म्हणजे नाटक पहाणें होय, अशी बहुसंख्याक प्रेक्षकांची उत्तरोत्तर कल्पना होत गेली आणि प्रेक्षकांच्या या प्रवृत्तीचा नाटककारांच्या नाट्यलेखनावर अलीकडे अलीकडे तर विशेष परिणाम झालेला दिसून येतो. स्वयंवर, द्रौपदी हीं संगीत नाटकें खाडिलकरांनीं केवळ बालगंधर्वांच्याकरितां लिहिलीं आणि त्या नाटकांचे प्रयोग पहाणें म्हणजे बालगंधर्वांचे गायनाचे जलसे ऐकणें होय, असें मोठ्या खेदानें म्हणणें भाग आहे. खाडिलकरांसारख्या मुरलेल्या नाटककाराचें इतर नवीन व होतकरू नाटककारांनीं अनुकरण न केलें तरच

आश्चर्य होय! बालगंधर्वांचे इतर नाटककार किंवा इतर कंपन्यांचे संगीत नाटककार या सर्वांच्या नाटकांतून संगीताला इतकें प्राधान्य दिलेलें असतें कीं, कित्येक प्रसंगीं प्रेक्षक नाटकाच्या संविधानकाकडे, कथानकाकडे आणि नटांच्या अभिनयाकडे सर्वस्वीं दुर्लक्ष करूं शकतात. नाटक या शब्दाच्या उच्चाराबरोबर अभिनयाची जी कल्पना मनांत येते, त्या कल्पनेला प्रेक्षकांच्या मनांत बिलकुल थारा नसतो. वस्तु, रस आणि अभिनय या नाटकांतील मुख्य गोष्टींना उठाव यावा म्हणून संगीतासारख्या रम्य साधनाची प्रथम योजना करण्यांत आली. पण आज तीच शिरजोर होऊन तिनें मुख्य गोष्टीस दुय्यमपणा आणला आहे. पंचपक्वान्नांच्या जेवणाला विशेष रुची यावी म्हणून एकादें तोंडीं लावणें पानांत घ्यावें आणि दुर्दैवानें त्या तोंडीं लावण्याचीच छाप सर्व पक्वानांच्या वर पडून जावी—इतकी कीं, "जेवायला काय केलें होतें?" म्हणून एकाद्यानें प्रश्न केल्यास पक्वान्नांचें नांव घ्यावयाच्या ऐवजीं जेवणारानें त्या तोंडीं लावण्याचेंच नांव घ्यावें!—तशांतलाच हा प्रकार झाला! नाटकांतील अंगोपांगांवर संगीताचें इतकें वर्चस्व बसलें आहे कीं, गद्य नाटक मंडळ्यांचीं नाटकें प्रेक्षकांना आळणी वाटावयाला लागलीं. गद्य नटांनीं कितीहि जीव तोडून अभिनय केला तरी प्रेक्षकांना त्याचें कांहींहि महत्त्व वाटत नाहीं. प्रेक्षकांच्या या वृत्तीमुळें प्रत्यक्ष बस्तुस्थिति अशी झाली आहे कीं, संगीत नाटक मंडळ्यांच्या नंदकुमारसारख्या टाकाऊ नाटकांना हजार रुपये उत्पन्न होतें तर गद्य नाटक मंडळ्यांच्या कीचकवधासारख्या प्रयोगांना अवघे शंभर रुपयेसुद्धां मिळण्याची मारामार पडते.

नाटकांत संगीत असण्याची पद्धत परंपरागत असली तरी तें कशा प्रकारचें असावें आणि किती प्रमाणांत असावें याबद्दल भरताच्या नाट्यशास्त्रांत स्पष्ट उल्लेख आहे.

"गीते वाद्ये च नृत्ये च विकृतेऽति प्रसंगतः।<br>
खेदो भवेत्प्रयोक्तॄणां प्रेक्षकाणां तथैव च ॥ १ ॥<br>
खिन्नानां रसभावेषु स्पष्टता नोपजायते।<br>
ततः शेषप्रयोगस्तु न रागजनको भवेत् ॥ २ ॥"

या श्लोकद्वयांवरून नाटकांत संगीत असलें तरी तें बेतानेंच असावें, असा

भरताचा अभिप्राय असल्याचें दिसून येतें. भरताचा हा नियम आधुनिक नाट्यशास्त्राला संमत होण्याचा संभव नाहीं या सबबीवर तो जरी दृष्टीआड केला, तरी नाट्यकलेच्या इतर अंगांची गळचेपी करण्याइतकें नाटकांत संगीताचें प्राबल्य नसावें असें कोणाही रसिक माणसाला म्हणावेंसें वाटेल यांत बिलकुल संशय नाहीं. नाटकांत संगीत असण्याची पद्धत आपल्यामध्यें इतकी रूढ झालेली आहे कीं, ती समूळ नाहींशी करणें आज जवळजवळ अशक्यच होऊन बसलें आहे. तरी पण अभिनयाला प्राधान्य देण्याकरितां संगीताला गौणत्व आणणें भाग आहे. अशा परिस्थितींत आज विशेष प्रामुख्यानें ज्या संगीत नाटकांचे प्रयोग होत आहेत, ते हळूहळू कमी करीत करीत नवीन धर्तीच्या नाटकांचे प्रयोगच अधिकाधिक करण्यांत यावेत, अशी सूचना केल्यास ती अनाठायीं होईल असें वाटत नाहीं. संशयकल्लोळ नाटकामध्यें ज्याप्रमाणें जलशाचा स्वतंत्र कार्यक्रम ठेवलेला आहे त्याप्रमाणें स्वतंत्र गायनाचे कार्यक्रम असलेलीं नाटकें लिहिलीं गेलीं पाहिजेत. गद्य नाटकाचा प्रयोग चालला असतांनाच मधून मधून प्रेक्षकांना पालट (relief) मिळावा म्हणून संगीताचा थोडक्यांत कार्यक्रम असावा. ही योजना निरंतरची असावी, असें अर्थातच प्रस्तुत लेखकाचें मत नाहीं. प्रेक्षकांची संगीताची चटक कमी होऊन त्यांच्यामध्यें स्वतंत्र गद्य नाटक पहाण्याची अभिरुचि उत्पन्न व्हावी एतदर्थ ही एक योजना आहे. संगीताचे स्वतंत्र जलसे अलीकडे पुष्कळ होऊं लागले आहेत. ते लोकांची संगीतप्रियता सहज पुरी पाडूं शकतील. नाटक व संगीत यांची कलाहानिकारक अशी सांगड आज जी पडलेली दिसते ती नाहींशी होईल. अशा प्रकारच्या एखाद्या योजनेनें संगीताच्या कचाट्यांतून जर नाट्यकलेला सोडविण्यांत आलें तर अभिनयादि प्रकारांना प्रयोगसमयीं विशेष महत्त्व प्राप्त होऊन अभिनयनिपुण गद्य नटांची हल्लीं होत असलेली गळचेपी नाहींशी होईल व त्यांना त्यांच्या कलानैपुण्या-बद्दल मान आणि प्रतिष्ठा यथार्थ रीतीनें लाभेल.

---

# प्रेममीमांसा व कौटुंबिक सुख

लेखकः वे. शा. नारायणशास्त्री नरहरशास्त्री भावे, भोर.

[ जन्म भोर येथें सन १८८१ सालीं झाला. भोर हायस्कूल मधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण. त्यांनीं आपले मातुलगृहीं प्रसिद्ध राजवैद्य विनायकशास्त्री गोखले यांजपाशीं आयुर्वेदाचा आभ्यास झाल्यावर पुढें पाश्चात्य वैद्यकीय पद्धतीचा तुलनात्मक अभ्यास केला. हल्लीं हे भोर येथें राजवैद्य असून त्यांनीं श्रीमंत सरकार बाबासाहेब पंतसचीव यांजबराबरे विलायतेचा प्रवास केला. त्यांची 'ऐक्य' पत्रामधून 'विलायतचीं बातमीपत्रें' ही लेखमाला प्रसिद्ध झाली आहे. ]

विधात्यानें विश्व निर्माण केल्यावर त्याचें सातत्य कायम रहावें याकरितां त्यानें सृष्टपदार्थांमध्यें परस्पर आकर्षणशक्ति ठेविली आहे. हें आकर्षण जर अस्तित्वांत नसतें तर विधात्यास विश्वचक्र चालवण्याची मोठीच अडचण भासली असती. या आकर्षणशक्तीमुळें सृष्टजातांत नव्याजुन्याची बटघट सारखी चालू रहाते. हें सर्वव्यापी आकर्षणतत्त्व जेव्हां जीवसृष्टींत दिसून येतें तेव्हां त्याची परिणति संततींत दृग्गोचर होते. संततींत परिणत होणारें आकर्षण जीवसृष्टीच्या भिन्नजातीय वर्गांत सारखें चालू असतें. आतां या भिन्न जाती म्हणजे समाजचक्राचीं दोन शकलें—स्त्रीजाती व पुरुषजाती होय.

स्त्री व पुरुष या दोन भिन्न जातीय व्यक्तींमध्यें परस्परांना आकर्षण करण्याची शक्ति जितकी उत्कट असेल तितकाच मोठा आघात, त्या दोन शक्ती एके ठिकाणीं जेव्हां मिळतात, तेव्हां होतो. या भिन्न जातीय दोन व्यक्तींचा आघात एकमेकांवर एकसमयावच्छेदेंकरून जेव्हां घडून येतो, तेव्हां त्या आघातानें एक दिव्य ज्योति निर्माण होते; आणि त्या ज्योतीच्या किरणरज्जूंनीं स्त्री व पुरुष या दोन जाती कायमच्या एकत्र बद्ध होऊन जातात, याच ज्योतीला प्रेम अशी संज्ञा दिली जाते.

प्रत्येक जीवाचे ठायीं प्रेम ही भावना उपजत निर्माण होत असते. भिन्न जातीयांचा शरीरसंबंध होऊन फक्त संतति निर्माण व्हावी व जीवसृष्टीचें सातत्य रहावें एवढाच प्रेमाचा हेतु नसतो; त्याचें याहूनहि एक विशिष्ट कार्य भासूं शकतें. प्रेमाचें प्रभुत्व मनावर असतें तेव्हां तें मनाच्या ठिकाणीं एक

वेळ दृढतर झाल्यावर त्यामुळें प्राणिमात्रांचे अंतःकरणांत ऐहिक व पारमार्थिक सुखाच्या भावना उत्पन्न होतात आणि त्यामुळें मन अत्यंत उत्साही बनतें. सुखभावनांची उत्कटता इहलोकींच्या क्षेत्रांत नांदत असेल तर इहलोकीं जीवांना प्रपंचसुख अनुभवितां येतें. परलोकाविषयींच्या सुखभावना जेव्हां अत्युत्कट निर्मळ व सर्वव्यापी अशा पारमार्थिक क्षेत्रांत नांदत असतात, त्या वेळीं त्या जीवांस परमेश्वराची प्राप्ति करून देतात. इतकेंच नव्हे तर परमार्थप्रेमी अशा जीवांना सर्व सृष्टिजातांत जगन्निवासाचें सच्चिदानंद-स्वरूप दिसूं लागतें व त्याच स्वरूपांत त्यांची एकतानता होऊन अखेर त्यांना अमृताची प्राप्ति होते.

प्रेमभावनेचें मूलतः एक विशिष्ट रूप असतें, परंतु सृष्टींतील वस्तु किंवा व्यक्ति यांच्या विविधतेनें तदाश्रित असलेल्या प्रेमभावनेचें भिन्न भिन्न स्वरूप दिसूं लागतें. भिन्न भिन्न वस्तु किंवा व्यक्ति यांच्या आधारानेंच प्रेमाचें भिन्न स्वरूप दिसतें. असें जरी आहे तथापि वस्तूंतून व व्यक्तींपासून ती प्रेमभावना जशी रंगून निघेल त्याप्रमाणें तिचें विविधत्व दृक्प्रत्ययास येतें.

मातापितरांविषयीं अपत्यांचें प्रेम, अपत्यांवरील मातापितरांचें प्रेम, बंधुप्रेम, भगिनीप्रेम, बंधुभगिनीप्रेम, मित्रत्व, दाक्षिण्य व धर्म यांविषयींचें प्रेम हीं प्रेमभावनेचीं अनेक स्वरूपें प्रत्ययास येतात. तथापि या अनेक स्वरूपांत प्रेमाचें एकच निर्मळ रूप असतें.

आकर्षणशक्तीचा विकास प्रेमांत होऊन त्या प्रेमज्योतीनें संततिकार्यार्थ स्त्री व पुरुष या दोन भिन्न जातींना बद्ध केलें जातें असेंच कांहीं नसून मनावर प्रेमाचें जें प्रभुत्व असूं शकतें त्यामुळें सजातीय व्यक्तींना देखील बद्ध केलें जातें. हें प्रेमाचें आकर्षणकार्य इतकें वाढत जातें कीं, केवळ सर्व मानवी जाती एकाच प्रेमरज्जूनें निगडित होतात असें नसून याशिवाय पशुपक्षी, वनस्पति, वगैरे भिन्न सृष्टीविषयीं मानवी अंतःकरणांत आत्मीयता उत्पन्न होते. असा प्रेमाच्या वाढीचा क्रम चालू राहिल्यानें पुढें परमेश्वर आणि आत्मतत्त्व यांतील भेदभाव नाहींसा होतो.

अंशाअंशांनीं प्रेमाचें जें आकर्षण सृष्टींत अनुभवास येतें तें सृष्टीच्या नियमांना सोडून रहात नाहीं. कारण, एखादी वस्तु अगर व्यक्ति जितकी

जवळ अगर दूर असेल तितकें त्यांच्यामधील आकर्षण कमी अगर अधिक असल्याचें आढळून येतें! अर्थात् प्रत्येक ठिकाणीं आकर्षणाचा भाग कमीअधिक प्रमाणांत प्रत्ययास येत असतो!! आणि म्हणूनच प्रथम दोन व्यक्ति अगर वस्तू यांमध्यें जोराचें आकर्षण चालू होतें व पुढें त्या आकर्षणाचा प्रभाव आपलें कुटुंब, आपला देश व आपलें राष्ट्र यांमध्यें तें तारतम्य भावानें व्यापक होत जातें. तसेंच, स्वराष्ट्राविषयीं मनुष्यमात्राला जितकें अधिक प्रेम वाटतें तितकें तें इतर राष्ट्रांविषयीं वाटत नाहीं; याचें कारण इतर राष्ट्रें दूर असल्यामुळें त्यांत आकर्षणशक्तीचा प्रभाव कमी असतो, हें होय.

व्यक्तिमात्राचे ठिकाणीं ज्याप्रमाणें आकर्षक प्रेम असतें त्याप्रमाणें तिरस्काराचीहि भावना उद्भूत होत असते. यामुळेंच मनुष्यमात्राचे ठायीं आवडनावड अशा परस्परभिन्न भावना उत्पन्न होतात. आवडनावड या भावना उत्पन्न होण्यास बाह्यतः जरी कांहीं कारण दिसून येत नाहीं, तथापि अदृष्ट असें कांहीं कारण त्याच्यामागें असतेंच; असें गृहीत धरल्याखेरीज आवड व नावड या भावनांच्या उत्पत्तीचा कार्यकारणभाव निर्णीत होत नाहीं. नाहींपेक्षां पूर्वी न पाहिलेली अशी एखादी वस्तु अगर व्यक्ति दिसल्याबरोबर तिच्याविषयीं चटकन् आवड किंवा तिरस्कार उत्पन्न होतो याचें कारण काय?

दोन वस्तूंमधील परस्पर आकर्षण गुणसाम्यानेंच सुरू होतें; तें गुणसाम्य शील, आवड व व्यसन यांत दिसावें लागतें. साम्यगुणांनीं परस्पर वस्तूंचें आकर्षण होतें हा नियम तर खराच; परंतु, गुणवैषम्यानेंहि प्रेमाकर्षण झाल्याचें दिसून येतें. अशा तऱ्हेच्या आकर्षणाचीं उदाहरणें प्रतिदिवशीं दृष्टीस पडतात. बलहीन, बलवानांचा आश्रय करूं पाहतो, भेकड, पराक्रमी पुरुषाची वाहवा करितो, व अविचारी, सुज्ञ माणसांच्या सल्लामसलतींची अपेक्षा करितो. हीं सर्व याच गुणवैषम्यांच्या प्रेमाकर्षणाचीं प्रत्यंतरें होत. समगुण वस्तूंमधील आकर्षण या सकृत्दर्शनीं दिसणाऱ्या परस्परविरोधी सिद्धान्तांची एकवाक्यता करणें फारसें अवघड नाहीं. कारण साम्यगुणाकर्षण व विषमगुण वस्तूंमधील विषमगुणाकर्षण यांत आकर्षणशक्तीचा तारतम्यभाव असल्याचें दिसून येतें. त्याशिवाय आकर्षण ही क्रिया घडून येणेंच शक्य नाहीं. वस्तूंची

किंवा व्यक्तींची साम्यगुणाकर्षणानें जोड झाल्यावर जसा आनंद उत्पन्न होतो, तसें विषमगुणाकर्षणानें वस्तूंचें अगर व्यक्तींचें संधान झाल्यावर आश्चर्य वाटूं लागतें. वधूवरांच्या गांठींत शील, स्वभाव, गुण, आवड व व्यसन यांची जी विषमता दिसून येते ती पाहिल्यावर आपण ब्रह्मदेवाला दोष देतों. उलट पक्षीं समानगुणधर्मियांची त्यानें एकत्र जोड केल्याबद्दल आपण त्याची प्रशंसा करितों. ब्रह्मदेवाला दोष देणें अगर प्रशंसा करणें या गोष्टी आपणांस आकर्षणशक्तीचा नियम माहीत नसतो, म्हणूनच चुकीनें आपल्याकडून घडून येतात. तत्त्वतः विषमगुणधर्मियांची जोड हाच नियम असतो, व समानगुणधर्मियांची जोड हा अपवाद ठरतो. कवींनीं आपल्या काव्यांत समानगुणधर्मियांबद्दल ठिकठिकाणीं प्रशंसा केल्याचें आढळतें. त्याचें कारण असें कीं, समानगुणसंबंध फार क्वचित् घडून येतात. म्हणूनच त्यांच्याविषयीं आपणांस अत्यंत आदर व प्रेम वाटूं लागतें, व जगांत समानगुण वस्तूंचेंच आकर्षण होतें असा भ्रम मनुष्याचे अंतःकरणांत उत्पन्न होतो.

मानवी कोटींत विरुद्ध जातीविषयीं जी प्रेमभावना असते तिचा उदय व्यक्तींच्या बाल्यावस्थेंतच होतो. तिचें स्वरूप फार कोमल, प्रत्ययपूर्ण, व सात्त्विक असें असतें. पिता व दुहिता, माता व पुत्र, बंधु व भगिनी, हीं विरुद्धजातिविषयक प्रेमाचीं उदाहरणें आहेत. वरील उदाहरणांत प्रेमभाव फार अलौकिक असतो. रोजच्या व्यवहारांत देखील मातापितरांचा ओढा विजातीय अपत्यांकडे जितका असतो, तितका सजातीय अपत्यांबद्दल असत नाहीं. तसेंच बंधुभगिनींमध्यें जें जिव्हाळ्याचें प्रेम रहातें तें बंधुबंधूंमध्यें रहात नाहीं. प्रथम बाल्यावस्थेंत असा क्रम सुरू होऊन पुढें मुलगा अगर मुलगी मोठी झाल्यावर ज्या विजातीय वडील माणसांची गांठ पडते, तीं माणसें त्यांच्या नात्यांतील नसूनहि त्यांचेबद्दल त्या मुलामुलींना आपल्या मातापितरांप्रमाणें व बंधुभगिनींप्रमाणें प्रेम वाटूं लागतें. आतां सगोत्रांतील मुलामुलींमध्यें बंधुभगिनीभाव सात्त्विक असूं शकतो, परंतु परगोत्रांतील विरुद्धजातीय समानवयस्क व्यक्तींमध्यें वैषयिक भाव जास्त संभवनीय असतो! अर्थात्, तो सात्त्विक असूं शकत नाहीं. या परगोत्रांतील व्यक्तीविषयीं असणाऱ्या प्रेमभावाला इष्ट फळ येण्यास यदृच्छा समागमाची अपेक्षा

असते. आपल्या गोत्राचा, रक्तमांसाचा, व सहवासाचा संबंध मुलामुलींना विवाहाचे कामीं फारसा चित्ताकर्षक व सोयीचा न वाटल्यामुळें दूरस्थ परगोत्रीय व विजायतीय माणसांशीं संबंध करणें फार श्रेयस्कार वाटतें; तेव्हां दूरच्या व निरनिराळ्या विरुद्धजातीय माणसांशीं संबंध ठेवणें हाच एक नियम समाजांत रूढ होऊन बसला आहे. मुलामुलींना दूरच्या संबंधाविषयीं जितकें अधिक प्रेम असतें तितकें नित्य परिचयाच्या व ओळखीच्या माणसाविषयीं असूं शकत नाहीं. कारण नित्य परिचयानें परस्परांचे दोष दिसून प्रेमाकर्षण कमी होत जातें. मला असें वाटतें कीं, निसर्गतः प्रत्येक माणसाला त्याच्या मनाच्या सात्त्विक व अविकारवश अशा स्थितीला शिक्षणानें व सुसंस्कारानें प्रगल्भता व तेजस्विता या गुणांची जोड मिळाल्यावर स्त्रीत्वाविषयीं मनुष्यास फार आदर वाटूं लागतो व विशेषतः त्याच्या स्त्रीविषयक ध्येयाला जुळणारे गुण ज्या स्त्रियांमध्यें दिसून येतील त्या स्त्रियांबद्दल त्याचे अंतःकरणांत आत्यंतिक प्रेमभाव उत्पन्न होतो. अशा तऱ्हेनें प्रत्येक स्त्रीलाहि पुरुषत्वाविषयीं आदर उत्पन्न होतो. हा आदर स्त्रीला वाटूं लागण्यापूर्वी तिचा चित्तवेध पुरुषाच्या शौर्य, औदार्य व सौजन्य वगैरे गुणांनीं व्हावा लागतो.

एवंगुणविशिष्ट पुरुषाच्या परिचयाच्या कक्षेंत जर एखादी स्त्री आली तर तो त्या स्त्रीचा सत्कार स्त्रीजातीला अनुरूप असाच करितो. व त्या स्त्रीला आपल्या जिवाच्या मित्राप्रमाणें लेखतो, इतकेंच नव्हे तर तिच्या बयाच्या गुणांच्या प्रगल्भतेप्रमाणें तो तिला दुहिता, भगिनी, किंवा माता या भावनेनें संबोधितो. कित्येक वेळां एखादे पुरुषाचा एखादे स्त्रीशीं प्रथम परिचय होतांच त्याचें तिच्यावर इतकें अत्यंत निरपेक्ष प्रेम बसूं शकतें कीं, तें जात्या निर्व्याज असूनही सकृद्दर्शनीं दोषैकदृग् व वैषयिक प्रवृत्तीच्या माणसाला त्या निरपेक्ष प्रेमाचे मुळाशीं वैयक्तिक इच्छेचा धागा असावा अशी शंका व कुकल्पना येते. परंतु तत्त्वतः तें प्रेम असल्यानें त्यास उत्तरोत्तर अत्यंत उज्ज्वल स्वरूप येऊन त्यांत दोषैकदृष्टीच्या माणसांना विषयप्रवृत्तीचा यत्किंचितहि लेश दिसूं शकत नाहीं. अशा तऱ्हेच्या सात्त्विक व निर्व्याज प्रेमाचा उदय परस्पर स्त्रीपुरुषांमध्यें उत्पन्न होण्यास समान गुण व कांहीं विशिष्ट कारणें यांची अपेक्षा असते. समान गुणांनीं परस्परांमध्यें आकर्षण चालू

होऊन स्नेहभाव उत्पन्न होतो व त्या स्नेहभावाचें पर्यवसान निर्व्याज प्रेमांत होतें.

पुरुषाचें स्त्रीवरील प्रेम व स्त्रीचें पुरुषावरील प्रेम विषयवासनांच्या ज्वालांपासून जितकें अधिक दूर अगर मुक्त असेल तितकें तें निरपेक्ष व निर्व्याज आहे असें म्हणतां येईल. एकदां प्रेमाचें स्वरूप पूर्ण व निरपेक्ष असें बनलें म्हणजे मग धीरोदात्त गुणांचा मनाभोंवतीं एक अभेद्य तट उभारला जाऊन विषयभोगांविषयीं तृषित जाहलेल्या वासनांचा त्यांत प्रवेश होण्यास लेशमात्र सुद्धां जागा उरत नाहीं. मनुष्यमात्राचे अंतःकरणांत अशा तऱ्हेचें निरपेक्ष व निर्व्याज प्रेम उत्पन्न होऊन त्याचा पूर्ण विकास जाहल्यावर अधोगतीस नेणाऱ्या विषयवासनांच्या जाळ्यांत मनुष्यप्राणी केव्हांहि सांपडण्याचा संभव रहात नाहीं.

स्त्रीपुरुषांमधील आकर्षण व अनुराग यांचें पर्यवसान विवाहांतच होतें आणि प्रेमाचें अंतिम ध्येय म्हणजे विवाहच, अशी चुकीची कल्पना पुष्कळांची होते. प्रेमाच्या मुळाशीं जर विवाहाची कल्पना असेल आणि त्या कल्पनेनें कोणा एकाचें अंतःकरण जर दूषित होईल तर तीं दोघेंहि अंगचें बल व सुख यांना पारखीं होऊन त्यांना पवित्र स्नेहाचा किंवा प्रेमाचा निरंतरचा आस्वाद घेतां येणार नाहीं. उलट त्या प्रेमाची परिसमाप्ति सदोष व दुःखमय विवाहांतच होईल.

स्त्री व पुरुष या दोघांच्या अंतःकरणांत परस्परांविषयीं कोमल भाव उत्पन्न होऊन जेव्हां त्यांचीं अंतःकरणें एकमेकांकडे ओढलीं जातात तेव्हां त्यांचे अंतःकरणांत प्रेमाकरतां प्रेम असा उज्ज्वल विचार उत्पन्न होतो व त्यांना बंधुभगिनींप्रमाणें पवित्र नातें कायम ठेवून मित्रत्वानें राहतां येतें. अशा स्थितींत त्यांना लग्नाची कल्पना देखील शिवत नाहीं. वरीलप्रमाणें स्त्रीपुरुषांमधील परस्परांविषयीं प्रेमभावना कायम होऊन त्यांच्या मनोवृत्ती उज्ज्वल होतात आणि त्यामुळें त्यांचें पवित्र वर्तन समाजांत चालू रहातें. असें असतांहि या गोष्टी आजूबाजूंच्या लोकांना चांगल्याशा समजत नाहींत.

स्त्रीपुरुषांमध्यें प्रेमभाव उत्पन्न होऊन बंधुभगिनी या पवित्र नात्यानें ते एक वेळ वागू लागल्यावर बंधुभगिनींचें पवित्र नातें कायम राखण्यास जर

त्यांच्या अंगीं नीतिधैर्य नसेल तर, त्या दोघांनाही लोकेषणा व समाजाचा कुत्सित ग्रह यांना बळी पडून इच्छा नसतांनाहि विवाह करणें प्राप्त होतें. अशा प्रसंगीं विवाह जर केला नाहीं, तर आपण एकमेकांच्या सहवासांतील सुखास आंचवूं असें वाटूं लागून ते मोठ्या कष्टानें विवाह करितात. विवाह करण्यांत त्यांचेकडून अशी घोडचूक होते कीं, तिची दुरुस्ती सर्व आयुष्यांत पुढें कधींहि होण्याचा संभव नसतो.

'प्रेमाकरितां प्रेम' व 'विवाहाकरितां प्रेम' हे दोन्ही प्रेमभाव परस्पर भिन्न आहेत. या दोन्ही भावांत स्त्रीपुरुष प्रेमानें जरी एकत्र निगडीत होतात, तत्रापि प्रत्येकाचें कार्य अगदीं स्वतंत्र असेंच असतें. प्रेमाकरितां प्रेम या संबंधांत पवित्र मित्रकार्य असतें व विवाहाकरितां प्रेम या संबंधांत मित्रत्वाबरोबर संसारसुख व संतति हें ध्येय असतें. वर निर्दिष्ट केलेल्या दोन्ही प्रेमसंबंधांच्या स्वरूपांची जाणीव जनतेला आली म्हणजे अदूर दृष्टीनें प्रेमसंबंधांत पडून तिचेकडून विवाह करण्यांत चूक होणार नाहीं व प्रेमाकरितां प्रेम या गोष्टीबद्दल त्यांचें मन दुषितहि होणार नाहीं.

विवाहाकरितां प्रेम व प्रेमाकरितां प्रेम हे संबंध व त्यांचें खरें स्वरूप जनतेला पटल्यावर अनैतिक, पाशवी वृत्तीचा प्रेमसंबंध, ज्यांत आरोग्य, आयुष्य व शील यांचा नाश होऊन अनीतीचा प्रादुर्भाव होतो, तो कोणासहि मान्य होणार नाहीं. उलट त्याची निंदाच होईल व पाशवी प्रेमसंबंधांत पडण्याचें कोणीहि धाडस करणार नाहीं.

विवाहाकरितां घडून आलेल्या प्रेमसंबंधाचें अंतिम ध्येय संसार करून वंश चालविणें हें जसें आहे तसें प्रेमाकरितां प्रेम या संबंधांत स्त्रीपुरुषांचें अंतिम ध्येय काय असतें? 'प्रेमाकरितां प्रेम' या संबंधांत गुंतलेल्या एखाद्या पुरुषाला अगर स्त्रीला स्वतंत्र तऱ्हेनें एखाद्या दुसऱ्या स्त्रीशीं अगर दुसऱ्या पुरुषाशीं विवाह करून, विवाहपूर्व घडून आलेल्या 'प्रेमाकरितां प्रेम' या संबंधांतील शुद्ध प्रेमपूर्ण असें बंधुभगिनींचें नातें कायम राखतां येतें अगर तें नाहींसें होतें असे दोन प्रश्न उद्भवतात.

'प्रेमाकरितां प्रेम' या संबंधांत स्त्री व पुरुष यांमध्यें परस्पर बंधुभगिनींचें नातें राहतें. शिवाय त्यांत मित्रत्वाची भावना असते. तेव्हां तो संबंध

टिकण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. बंधूच्या अगर भगिनीचा विवाह होऊन ते आपआपल्या घरीं सुखानें संसार करीत असले तरी देखील त्यांच्यामधील बंधुभगिनींचें नातें जसें तुटत नाहीं व परस्परांवरील प्रेम कमी होत नाहीं, तसेंच 'प्रेमाकरितां प्रेम' या संबंधांत त्यांचा बंधुभगिनीभाव एका रक्त-मांसाच्या नात्यानें घडून आलेला नसला तरीहि त्यांच्यामधील बंधुभगिनी या नात्याचें प्रेम कमी होत नाहीं. विवाहित स्त्री अगर विवाहित पुरुष यांना त्यांच्या विवाहपूर्व घडून आलेल्या प्रेमसंबंधाबद्दल विवाहोत्तरकालीं मत्सर अगर अविश्वास वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. कारण, एखाद्या स्त्रीचा अगर पुरुषाचा एखाद्या पुरुषाशीं अगर स्त्रीशीं जो विवाहपूर्व प्रेमभाव उत्पन्न झालेला असतो, त्याचें स्वरूप बंधुभगिनी या नात्याचें असतें. हें पवित्र नातें सुजनता, सत्य, पावित्र्य व शील यांच्या पायावर उभारलें गेलेलें असतें. तेव्हां विवाहपूर्व झालेल्या प्रेमसंबंधामुळें कोणत्याहि पुरुषाचा अगर स्त्रीचा विवाहोत्तरकालीं कोणत्याहि प्रकारच्या ऐहिक किंवा परमार्थिक सुखाचा अगर अधिकाराचा उच्छेद होत नाहीं. अशा तऱ्हेनें जगांतील स्त्री व पुरुष आपापलीं नातीं ओळखून पवित्र प्रेमभावानें वागतील तर अशा प्रेमसंबंधास जगाची अनुमति मिळून प्रेम हें सोज्ज्वल भावनेवर उभारलेलें विश्वव्यापी तत्त्व होईल यांत शंका नाहीं.

---

# विदुला-प्रबोध

**लेखक : गोविंद विष्णु चिपळूणकर, पुणें.**

[ जांभुळपाडा, तालुके सुधागड, येथील रहिवासी. जन्म सन १८९८ सालीं झाला. ट्रेनिंग कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाची परीक्षा पास झाल्यानंतर मॅट्रिक झाले. सध्यां नाथीबाई ठाकरसी कन्याशाळेंत शिक्षक. शिशुशिक्षण-मालेंतून त्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं तीं:-वीरा विदुला, गरुडाची गोष्ट, मुलांचा शिवाजी, वीर अभिमन्यु, बालवीर कुशलव, द्रौपदीची गोष्ट, सहा पांडवांची गोष्ट.]

## प्रवेश पहिला

( राणी विदुला व तिची दासी बोलत आहेत. )

**विदुला**—आज माझा उजवा डोळा कां बरं लवतो आहे? सिंधु राजाचं सैन्य आमच्या सौवीर देशावर चाल करून आलं, त्याला तोंड देण्याकरितां माझा संजय सरहद्दीवर केव्हांच रवाना झाला आहे. तिकडील तर कांहीं अनिष्ट बातमी नसेल ना येणार?

**दासी**—बाईसाहेबांनीं काळजी करण्याचं कांहीं कारण नाहीं. संजय-महाराज वयानं जरी लहान असले, तरी पराक्रमानं थोर आहेत. दोन वर्षांपूर्वीं सरहद्दीवरील रानटी लोकांचं बंड त्यांनींच नाहीं कां मोडलं?

**विदुला**—तें सर्व खरं, पण किती झालं तरी माझा संजय अजून लहान आहे. गेल्या मधुमासांत तर त्याला नुक्तं सोळावं वर्ष लागलं. सिंधु राजा हा मोठा पराक्रमी असून त्याची तयारीहि जय्यत आहे. म्हणून मला जरा काळजी वाटते.

**दासी**—आपलं मातृहृदय म्हणून काळजी वाटणं साहजिकच आहे. पण ईश्वराच्या कृपेनं संजयमहाराजांना या युद्धांत जय मिळेल, असं म्हणण्यास हरकत नाहीं.

**विदुला**—जा बरं. कांहीं लढाईचं वर्तमान आलं असेल तर मला लवकर येऊन कळव.

[ पडद्यांत—तास वाजवून खालील दवंडी देण्यांत येते—(' नागरिक हो, ऐका, घात झाला, नाश झाला, सर्वस्वीं नाश झाला. संजयमहाराजांचा युद्धांत पराभव झाला. ते लवकरच नगरांत येऊन दाखल होतील. नागरिक हो, महाराजांचा असा हुकूम आहे कीं, ज्यांना किल्ल्याचा आश्रय पाहिजे असेल त्यांनीं किल्ल्यांत लवकर जाऊन रहावें हो! ). तास वाजतो. ]

**विदुला**—अखेरीला जें नको तेंच प्राप्त झालं. पण संजय समरभूमीला पराङ्मुख होऊन परत कसा आला? क्षत्रियाचा पुत्र आणि रणांगणांतून पलायन! धिक्कार, धिक्कार, धिक्कार असो. कुलाची कीर्ति, पूर्वजांचा पराक्रम व राज्याचा दरारा हा सर्व घालविणार, मातीमोल करणार. 'युद्धामध्यें अपलायन' असा क्षत्रियाचा धर्म असून, हा शत्रूला पाठ दाखवून एकाद्या

भ्याडाप्रमाणं नगराचा आश्रय करूं पहातो काय! हं! पण मी त्याला नगरांत येऊं देईन तेव्हां ना! हल्लीं संजयाचे सर्व अधिकार मजकडेच आहेत.

पद

( चाल–जलदा झणीं शांत )

समरा झणिं सोडि कसा आतां । समरा झणिं ।
क्षत्रियधर्मा विसरुनि येई । नगरिं त्यजुनि हा लज्जा ।
कर्तव्याचा पथ दाखवुं या । त्यास बोधुनी आतां ॥ १ ॥

कोण आहे ग तिकडे ? ( दासी येते. ) कोतवालाला माझा हुकूम म्हणून कळव कीं, ' नगराचे दरवाजे एकदम बंद करा. संजयराजे किंवा दुसरे कोणी पळपुटे रणांगण सोडून पळून येत असतील तर त्यांना नगरांत घेऊं नका.'

**दासी**—राणीसरकार, निष्ठुर होऊं नका. संजयराजांनीं जयाकरितां आपल्या प्रयत्नांची शिकस्त नसेल का केली ?

**विदुला**—तें कांहीं नाहीं. समरविन्मुखांना यापेक्षांहि कडक शिक्षा पाहिजे. बस्स, माझ्या हुकुमाची अंमलबजावणी झालीच पाहिजे.

**दासी**—आज्ञा प्रमाण.

[ पडदा पडतो.]

## प्रवेश दुसरा

[ **स्थळः**—नगराचा दरवाजा, पहारेकरी उभा आहे.]

( संजयाचा सेवक रुद्रराम प्रवेश करितो.)

**रुद्रदाम**—काय, नगराचा दरवाजा बंद ? शत्रूकडील मनुष्याचा शहरांत शिरकाव होऊं नये, म्हणून तर दरवाजा बंद केला नसेल ना ? ( पुढें होऊन ) पहारेकरी, संजयमहाराजांची स्वारी युद्धांतून परत आली आहे; तरी दरवाजा लवकर उघड.

**पहारेकरी**–( स्वगत ) पहा काय चमत्कारिक स्थिति झाली आहे! प्रत्यक्ष महाराजांना नाहीं म्हणण्याचा प्रसंग आला आहे. बरें आंत येऊं द्यावें तर मातुःश्री सरकारांचा हुकूम मोडला जातो. इकडे आड तिकडे विहिर, असें झालें आहे. ( उघड ) दरवाजा उघडण्याचा आम्हांला हुकूम नाहीं.

रुद्र०–अरे, तुम्ही शुद्धीवर आहां, का सोमरसावर ताव मारून धुंद झालां आहां? प्रत्यक्ष महाराज आले असून, तुम्ही दरवाजा उघडण्यास दिरंगाई करितां, तेव्हां कमाल आहे तुमची!

पहारेकरी–दरवाजा उघडण्याचा आम्हांला हुकूम नाहीं.

रुद्र०–शत्रूकडील कोणी मनुष्य फसवून दरवाजा उघडण्यास सांगत आहे, असें तुम्हांला वाटतें कीं काय? तुम्ही सरकारची इतराजी करून घेत आहां!

पहारेकरी—संजयमहाराज किंवा दुसरे कोणी रणांगण सोडून पळून येत असतील तर त्यांना दरवाजा उघडून आंत घेऊं नये, असा विदुलाराणी-साहेबांचा आम्हांला सक्त हुकूम आहे.

रुद्र०—ठीक आहे. हे पहा संजयमहाराजच इकडे येत आहेत.

( संजय प्रवेश करितो. )

संजय––काय? मी स्वप्नांत तर नाहीं? शहराचे दरवाजे मला राजालाहि बंद? हा प्रकार आहे तरी काय? माझ्याव्यतिरिक्त येथें कोणाचा हुकूम चालत आहे?

पहारेकरी––सरकार, क्षमा करा. आश्चर्य नाहीं. ‘ कोणालाहि आंत सोडूं नये. ’ असा आईसाहेबांचा हुकूम आहे!

संजय––मलाहि दरवाजा उघडून आंत घेऊं नये, असा तुला हुकूम आहे?

पहारेकरी––होय सरकार. आपल्या गैरहजेरींत आईसाहेबांची आज्ञा अखेरची असें समजून, त्याप्रमाणें वागण्याचा आपण आम्हांला सक्त हुकूम दिला नव्हता का? माझ्या हातून शिस्त पाळण्यांत जर कांहीं चूक होत असेल, तर आपण द्याल ती शिक्षा भोगण्याला मी तयार आहें.

संजय––जा तर, आईसाहेबांना कळव कीं, ‘ मला आपली भेट घ्याव-याची आहे. ’

विदुला––( प्रवेश करून ) असल्या कारट्याला जन्म दिल्याबद्दल खरोखर मला खेद होत आहे. तुझें तोंड पहाण्याची मला इच्छा नाहीं. पण निर्वाणीचा सवाल म्हणून मी तुला हें सांगत आहें कीं, आपल्या प्रयत्नांची शिकस्त कर आणि आपल्या कुलाची व राष्ट्राची कीर्ति अशी मातीमोल करूं नकोस.

**संजय**—आईसाहेब, आपला क्रोध आवरून माझें म्हणणें जरा ऐकाल काय ? **समरभूमि म्हणजे आम्हां वीरांचं क्रीडांगण आहे.** जयाचा फांसा, जर दैवाची जोड नसेल तर, आमच्या विरुद्ध बाजूला पडणें साहजिक आहे. मी लढण्याची शिस्त केली नाहीं, असं कां आपल्याला वाटतं ?

**विदुला**—दैवापेक्षां मी प्रयत्नाला—उद्योगाला जास्त किंमत देतें. आजपर्यंत मी स्वतःला 'वीरमाता' समजत होतें. पण तो माझा अभिमान वृथा ठरावा ना ? तुझ्या या काळ्याकुट्ट कृतीनं माझ्या सर्व आकांक्षांची राख झाली. तूं युद्धपराङ्मुख होऊन आल्यामुळं पूर्वजांच्या बेचाळीस पिढ्या रौरव नरकांत पिटाळल्यास. हा कुलकलंक कारटा मीं वाढविला, म्हणून जग मला दोष देईल.

**संजय**—माते, लेंकरावर इतका गहबज करण्याचं काय बरं कारण ? **वारा येईल तशी पाठ देणं जरूर आहे.** शत्रु पाठलाग करीत असून त्याचा मला धरण्याचा पक्का निश्चय आहे. तेव्हां सेनापतींच्या विनंतीप्रमाणं लढाईचा भार त्यांच्यावर सोपवून मी परत आलों आहें. मला प्राणाची पर्वा आहे असं नाहीं, पण आतांची वेळ प्रयत्नाला प्रतिकूल आहे.

**विदुला**—माझा बाळ संजयच हें बोलत आहे काय ? वृथा वृथा क्षात्रिय कुलांत जन्मलास ! जर तुझ्या अंगांत अस्सल क्षात्रियाचं रक्त असेल तर पुन्हा रणांगणावर जा आणि शत्रूशीं दोन हात कर. मी किल्ला लढविण्याचा निश्चय केला आहे. रणभीरूंना नगरांत प्रवेश मिळणार नाहीं. जा, जा. अपयशानं माखलेलं हें काळं तोंड मला दाखवूं नकोस. [ जाते.

**संजय**—कालाचा महिमा मोठा अगाध आहे. विचार करण्याला क्षणाचाहि अवधि नाहीं. ( नगारा वाजतो ). शत्रु घोडदौडीनं नजरेच्या टापूंत दाखल झाले. या वेळीं माझं सैन्य नामोहरम झाल्यामुळं व मला नगरांत प्रवेश मिळत नसल्यामुळं आतां वनाचा रस्ता धरणेंच भाग आहे. किल्ला लढवीत असतां, जर कांहीं भलाबुरा प्रसंग मातेवर आलाच तर त्यांतून पार पडण्यास रुद्रदामाला इथंच ठेवावा. आल्या प्रसंगाला तोंड दिलं पाहिजे खरं.

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश तिसरा

( स्थळ—जंगल. संजय प्रवेश करितो. )

**संजय**—धिकार! धिकार असो माझ्या जिण्याला! वृथा क्षत्रियकुलांत जन्म घेऊन वाडवडिलांच्या नांवाला कमीपणा आणला. जी माझी बुद्धि प्रजेचं कल्याण करण्याकडे खर्च व्हावयाची, ती आतां या वनांत वठून चालली आहे! ज्या माझ्या शस्त्रांनीं शत्रूंचीं शिरं कापावयाचीं, त्यांना आतां कुशाग्रें कापावीं लागत आहेत! कालाचा महिमा मोठा विचित्र आहे. रंकाचे राव व्हायला वेळ नाहीं आणि लक्षाधिपतीचा भिक्षापति व्हायलाहि वेळ नाहीं. आतां माझे दिवस असेच या अरण्यांत जाणार काय? राज्य परत मिळविण्याचा प्रयत्न करावा. पण हा प्रयत्न कसा करणार? माझ्या जवळ ना फौज, ना शस्त्रें, ना द्रव्य, मग लढाई कशाच्या बळावर जिंकणार? चालू स्थितींतच आतां संतोष मानणं भाग आहे. हा धीनोधरचा डोंगर दुर्गम आहे. या ठिकाणीं सिंधु राजाचा शिरकाव होणार नाहीं. शिवाय या वनांत आम्ही स्वतंत्रच आहोंत. पण राजधानीकडील वर्तमान कांहींच कळत नाहीं. रुद्रदामाला मी तिथं ठेवून, तिकडील वर्तमान कळविण्यास सांगितलं होतं. पण त्याचाहि पत्ता नाहीं. ( रुद्रराम येतो. )

**रुद्रदाम**—संजयमहाराजांचा जयजयकार असो. (वंदन करतो.)

**संजय**—अरे, आतां मी राजा कसला आणि महाराजा कसला! मी ओसाड गांवचा राजा मात्र खासा शोभेन खरा! पण राजधानीकडील काय वर्तमान आहे? विदुलामाता खुशाल आहे ना?

**रुद्रदाम**—ती अशी हकीकत झाली. आपण निघून गेल्यावर लवकरच सिंधु राजानें राजधानीवर निकराचा हल्ला केला. शत्रूनें किल्ल्याचा तट उडविला. मातोश्रीसरकारांनीं लढण्याची शिकस्त केली, पण इलाज चालेना. मी त्यांना राजधानी सोडून बाहेर चलण्याचा सल्ला दिला. पण त्यांचा निश्चयच कीं, लढाईतून निघून जावयाचें नाहीं. शेवटीं मीं सांगितलें कीं, 'आपल्याशिवाय संजयराजांना योग्य मार्ग कोण दाखवील? शिवाय आपणांला प्रयत्न करून राज्य परत मिळवितां येईल.' तेव्हां 'सौवीर देश स्वतंत्र

करण्याच्या कामांतच आपण आपला देह खर्ची घालूं.' असें ठरवून त्या राजधानींतून बाहेर पडल्या. त्या येथून थोड्या अंतरावरच आहेत.

**संजय**—पण आतां सौवीर देश परत घेण्याचें कसें जमणार बुवा ?

**रुद्रदाम**—कसें जमणार, तें मातोश्रीसरकारच सांगतील. त्यांनीं मला आपणांला शोधण्याकरितांच पाठविलं आहे. चला आतां आपण त्यांच्याच भेटीला जाऊं.

**संजय**—चल.

( जातात. )

---

## प्रवेश चवथा

( विदुला व तिची दासी )

**विदुला**—अशा संकटकालींहि तूं माझ्याबरोबर आहेस, यामुळं मला दुःखांतहि सुख वाटत आहे.

**दासी**—बाईसाहेब, यांत मीं विशेष असं काय केलं ? मीं आपलं फक्त कर्तव्यच केलं आहे. आपण मात्र मला आपणांबरोबर येऊं दिलं, त्यामुळं आपल्यासारख्या थोर विभूतीचा मला सहवास घडला. याबद्दल मी आपणांला धन्य मानतें.

**विदुला**—सर्व माणसं जर असंच आपापलं कर्तव्य ओळखून वागतील, तर काय बहार होईल. बरं, आतां सौवीर देश परत मिळविण्याच्या बाबतींत आपणांस काय काय करितां येईल ?

**दासी**—अगोदर आपणाला संजयराजांचा शोध लावला पाहिजे. त्यानंतर त्यांना हरएक प्रयत्न करून युद्धाला प्रवृत्त केलं पाहिजे. परमेश्वराच्या कृपेनं, वाडवडिलांच्या पुण्याईनं व आपल्या सर्वांच्या प्रयत्नानं आपण स्वराज्यसंपादनाच्या कामांत खास विजय मिळवूं.

**विदुला**—शाबास, तुझे व माझे विचार अगदीं तंतोतंत पटतात. रुद्रदामला संजयाच्या शोधाला पाठविलं; पण त्याचा अद्याप पत्ताच नाहीं. जा तूं, शोध घेऊन ये.

( संजय व रुद्रदाम प्रवेश करितात. )

संजय—आपल्या अवकृपेस पात्र झालेला आपला हा पुत्र आपणांस अभिवंदन करीत आहे. ( वंदन करितो. )

विदुला—बाळा, खुशाल आहेस ना ?

संजय—या वनांत माझे दिवस मोठ्या आनंदांत जात आहेत. मी स्वस्थ आहें. मला ना काम ना धाम !

विदुला—बाळा संजया, असा स्वस्थ काय बसलास ? या परतंत्र स्थितींत संतोष मानूं नकोस. साम, दाम, दंड, भेद या उपायांनीं शत्रु आटोक्यांत आणतां येतो. तेव्हां प्रयत्न करून आपलं राज्य परत मिळव. ज्यानं कांहीं सत्कृत्य केलं नाहीं, तो केवळ खानेसुमारींत आंकडा वाढविण्याच्याच उपयोगी !

संजय—माते, हा पर्वत दुर्गम आहे. इकडे शत्रु येणार नाहीं. मी संतोषी आहें, हें पाहून तूंहि संतुष्ट रहा.

विदुला—तूं इतका पराक्रमगलित कां म्हणून झालास ? सौवीर देशांतील आपले प्रजाजन सिंधु राजाच्या अंमलाखालीं संतुष्ट नाहींत. त्यानं लोकांना लष्करी सामर्थ्याच्या जोरावर ताब्यांत ठेविलं आहे. तूं जर प्रयत्न करशील, तर लोक तुला खात्रीनं मदत करतील.

संजय—माते, तूं मला लढाईवर दवडूं नकोस.

विदुला—तूं लढाईला इतका कां भितोस ? पूर्वीं तूं पराक्रम केले नाहींस का ? आपली हल्लीं काय स्थिति झाली आहे ती पहा. **‘ नांव महीपति अन् तिळभर जागा नाहीं हातीं. ’** अशी आपली अवस्था झाली आहे. तूं जर असाच स्वस्थ बसलास तर सौवीरच्या स्वारीचं काम मलाच हातीं घेतलं पाहिजे.

संजय—माते, सावत्र मुलाप्रमाणं मला दूर लोटूं नकोस.

विदुला—तुला मुलगा म्हणण्याचीहि मला लाज वाटते. **‘ कुसंतानापेक्षां निःसंतान बरं. ’** **मी ममतेच्या मायाजालांत गुंतणारी माता नव्हे.** तुझं नांव संजय म्हणजे पूर्ण जय मिळविणारा असं आहे. त्या नांवाप्रमाणं कांहीं कृति कर; नाहींतर **‘ नांव मोठं लक्षण खोटं. ’**

( भुजंगप्रयात )

रणीं झुंजतां प्राणपर्वा कशाला ।
रणीं येश येतां मिळे राज्य हाता ।
रणीं मृत्यु नेतां मिळे राज्य स्वर्गा ।
गती नाहिं युद्धाविणें क्षत्रियाला ॥ १ ॥

कसाहि विचार केलास तरी क्षत्रियाला युद्धाशिवाय मार्ग नाहीं. या पारतंत्र्याच्या नरकांत खितपत पडण्यांत तरी अर्थ काय ?

संजय—माते, तुझं म्हणणं खरं आहे. मला तें सर्व पटलं आहे. पण मजजवळ द्रव्य नाहीं, सैन्य नाहीं, शस्त्रें नाहींत. मग शत्रूवर स्वारी कशी करायची आणि जय तरी कसा मिळवायचा ?

विदुला—तूं आळस सोडून दृढ प्रयत्न करूं लाग; म्हणजे अशक्य असं काय आहे ?

पद ( चाल-भूषणसंसार० )

विगता स्वातंत्र्या मिळवा । लागा लवकरिं यत्न कराया ।
उदासीन का बैसशि ऐसा । कार्यचि झालें यत्नाविण का ? ।
टाकीचे घण सोसल्याविना । दगड न थेई देवकळेला ॥ १ ॥

आपल्याजवळ पुरून ठेवलेला पैसा पुष्कळ आहे. तो माझ्याशिवाय कोणालाहि माहित नाहीं. तो मी तुला आणून देईन. त्या पैशानं तुला सैन्य तयार करितां येईल व शस्त्रंहि विकत घेतां येतील. हेर पाठवून सिंधु राजाच्या किल्ल्यांची व सैन्याची माहिती मिळव. तूं उद्योग करूं लाग, म्हणजे यश आपलंच आहे.

संजय—माते, माझं कर्तव्य मला समजलं. आतां मी मोहिमेच्या तयारीला लागतों. विजय मिळाल्यासच आपली भेट होईल. नाहींतर हीच शेवटची भेट समजा. ( वंदन करितो. )

विदुला—माझा बाळ विजयी होवो !

[ पडदा पडतो. ]

---

# राजाभाऊची " त्राटिका "

लेखकः केशव रामचंद्र दिवेकर, बी.ए., एलएल्.बी., सॉलिसिटर, मुंबई.

[ यांचा जन्म सुधागड तालुक्यांत पडघवली येथें इ. स. १८८६ सालीं झाला. १९०५ मध्यें प्रवेशपरीक्षा उत्तम तऱ्हेनें पास होऊन एलिफिन्स्टन कॉलेज-मध्यें त्यांना शिष्यवृत्ति मिळाली. १९०९ सालीं बी. ए. झाल्यावर दोन वर्षांनीं एल्एल्. बी. झाले. पुढें कायद्याचा अभ्यास तसाच चालू ठेवून त्या वेळीं अत्यंत बिकट व खर्चाची अशी सॉलिसिटरची परीक्षा १९१७ सालीं दिली. पण या श्रमाचा परिणाम शरीरावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. प्रथम त्यांनीं रा. भागवत यांना घेऊन धंदा सुरू केला व पुढें स्वतःच्याच नांवानें कंपनी स्थापिली. लवकरच त्यांचे कनिष्ठ बंधु रा. वासुदेवराव हेहि त्या धंद्यांत शिरले व सध्यां प्रसिद्ध असलेली ' **दिवेकर व पोपटलाल** ' नांवाची तिघांच्या भागीदारीची कंपनी काढली आहे.

यांचा दत्तोपंत बाळेकुंद्रीकर या सत्पुरुषानें लिहिलेल्या वाङ्मयाचा अतिशय निकट परिचय असून त्यांनीं श्री. दत्तप्रेमलहरी पदसंग्रहाच्या या तृतियावृत्तीला उपोद्घात लिहिला आहे. प्रस्तुत लेखावर पडलेली पंतांच्या वाङ्मयाची छटा वाचकांस दिसून येईल. ]

राजाभाऊ मोठा रसिक, मार्मिक व खोल विचाराचा मनुष्य. त्यामुळें त्याच्या स्नेह्यांना त्याच्यासंबंधीं फार प्रेम व आदर वाटत असून त्याचें बोलणें ते लक्ष लावून ऐकत. अशा स्नेह्यांपैकींच वीरेश्वर व दिनेश्वर हे होते. एकदां रविवारीं संध्याकाळीं सहा वाजतां राजाभाऊ, वीरेश्वर व दिनेश्वर हे मलबार-हिलवर फिरावयास गेले व एका झाडाखालीं गप्पा मारीत बसले, तेव्हां राजाभाऊ म्हणालाः—

मित्रहो, काल शाहूनगरवासी नाटकमंडळीचें त्राटिका नाटक पहावयास गलों होतों. एकंदर सर्व प्रयोग फार प्रेक्षणीय झाला. नाटक संपल्यावर रात्रीं दोन वाजतां घरीं आलों. नुकतेंच पाहिलेलें नाटक सारखें डोक्यांत घोळत होतें; इतक्यांत झोंप लागली. नंतर स्वप्नांत जो विलक्षण प्रकार पाहिला, तो तुम्हांस सांगितल्यानें माझ्याप्रमाणें तुम्हांलाहि आनंद होईल असें वाटल्या-वरून मी तो तुम्हांला सांगतों. तर लक्ष देऊन ऐका. तो प्रकार असाः—

शनिवारचा दिवस. माझें ऑफिसांतील रोजचें काम आटोपून मी लवकर

घरीं येण्याकरितां निघालों; तों वाटेंत, जागजागीं पुढीलप्रमाणें जाहिराती लागलेल्या दिसल्या.

'श्रीदत्तप्रासादिक देहग्रामवासी लीलाविग्रही नाटकमंडळी

" त्राटिका " " त्राटिका " " त्राटिका "

चिद्विलास नाटकगृहांत. आज रात्रौ ९॥ वा.

टीपः–मुद्दाम राखून ठेविलेल्या तूर्यपीठावरील जागांकरितां नांवें नोंदवा.'

याप्रमाणें लागलेल्या जाहिराती वाचून, त्राटिका नाटक पाहण्याची मला फार उत्कंठा लागली व नऊ वाजतांच मी चिद्विलास नाटकगृहाशीं गेलों; तों दाराशीच आत्मारामपंतांची ( व्यवस्थापकांची ) गांठ पडली. त्यांचा व माझा बराच परिचय असल्यामुळें मी त्यांचेबरोबर रंगपटांत गेलों. तों सर्व नट आपआपल्या भूमिकांप्रमाणें सजून तयार असून आरती करण्याच्या बेतांत होते. त्यांची 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही आरती सुरू झाली. तेव्हां 'कोणत्या नटानें कोणती भूमिका घेतली आहे?' असें आत्मारामपंतांना विचारतां त्यांनीं मुख्य मुख्य भूमिका पुढील नटनटींनीं घेतल्या असल्याचें सांगितलें.

**जीव ( मुमुक्षु )**—जिवाजीपंत ( त्राटिकेचे वडील )
**प्रबोध**—प्रबोधपंत ( त्राटिकेला मागणी घालणारे )
**विवेक**—विवेकशास्त्री ( शांतीला मागणी घालणारे गृहस्थ )
**सद्भाव**—विवेकाचा स्नेही
**दंभ**—दंभाजीराव ( शांतीला मागणी घालणारे दुसरे गृहस्थ )
**मन्मथ**—मन्मथराव ( शांतीला मागणी घालणारे तिसरे गृहस्थ )
**विराग**—विराग्या ( प्रबोधपंताचा नोकर )
**सद्भक्ति**—प्रबोधाची जननी
**कल्पना ( मन )**—त्राटिका
**शांति**—शांति ( त्राटिकेची बहिण )
**प्रीति**—प्रीताई ( त्राटिकेची मावशी )
**लालसा**—लालसा ( दंभाजीरावांची बायको )
**सुमति व सुशीला**—त्राटिकेच्या दासी

इतक्यांत आरती संपली व पांच मिनिटांची घंटा वाजली. तेव्हां

व्यवस्थापकांनीं एका इसमास बरोबर देऊन मुद्दाम राखून ठेवलेल्या खुर्चीवर मला बसविलें. बसण्यापूर्वीं मीं पाहतों तों खुर्चीच्या पाठीवर चिकटविलेल्या चिठीवर पुढील अक्षरें दिसलीं. 'तूर्यपीठ.' त्या तूर्यपीठावर बसून मी रंगपटाकडे पहातों तों रंगभूमीवरील ' ड्रॉप 'च्या ( अंकाच्या ) पडद्यावर वरच्या बाजूला ' इन्द्रजाल ' व खालच्या बाजूला ' भ्रांति ' हे शब्द मोठ्या अक्षरांनीं लिहिलेले दिसले. मी तो भ्रांतीचा पडदा निरखून पहाण्यांत दंग झालों होतों; इतक्यांत सूत्रचालकांनीं वाजविलेल्या शिटीचा ध्वनि ( प्रणवध्वनि ) माझे कानीं पडला. लगेच तो भ्रांतीचा पडदा दूर झाला व नाटकाला सुरुवात झाली.

## अंक १ ला

जिवाजीपंत आपल्या वाड्यांतील ' हृन्मंदीर ' दिवाणखान्यांत आपल्या दोघी मुलींसह बोलत होते. वडील मुलीचें त्राटिका व धाकटीचें नांव शांति. दोघीहि उपवर झालेल्या, तेव्हां त्यांचीं लग्नें केव्हां होतील याबद्दल जिवाजीपंतांना मोठी चिंता लागून राहिली होती. शांतीला मागण्या पुष्कळ. ती फार देखणी, शांत व मनमिळाऊ असल्यामुळें तिला वरण्याकरितां अधिकारी अनधिकारी, योग्य अयोग्य अशा सर्व तऱ्हेच्या लोकांच्या मागण्या येत होत्या. साहजिकच आहे. कारण शांति कोणाला नको आहे ? सद्भावानें मागणी घातली, शमानें घातली, दमानें घातली, दंभानें घातली, मन्मथानें घातली व इतर सर्व षड्रिपूंनींहि मागण्या घातल्या. तेव्हां तिच्यासंबंधीं बापाला फारशी काळजी वाटत नव्हती. परंतु थोरली जी त्राटिका तिला कोणाकडूनहि मागणी येईना. कल्पनाच ती. तिला मागणी घालणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधूं जाणेंच होय ! तेव्हां तिचा अंगिकार करण्यास कोण तयार होणार ? पण थोरलीचें लग्न झाल्याशिवाय धाकटीचें लग्न त्यांना करतां येईना. कारण चंचल मनाचा बंदोबस्त झाल्याशिवाय आत्मशांतीचा लाभ व्हावा कसा ? त्यामुळें जिवाजीपंतांना सारखा हृद्रोग लागून राहिला होता. ते आपल्या वडील मुलीला उपदेश करण्याच्या हेतूनें म्हणाले, "बाळे, त्राटिके, तुझे हे चाळे किती दिवस चालणार ? तुझ्या द्वाडपणामुळें कोणालाहि सुख नाहीं. तुझं आतां वय कांहीं लहान नाहीं. तुला पुष्कळ उपदेशाच्या गोष्टी

सांगून पाहिल्या, धाकदपटशा दाखविला, स्वैरपणानं कांहीं दिवस वागूं दिलें, सर्व तऱ्हेचे उपाय करून मीं थकलों. पण तुझ्या स्वभावांत आणि वागण्यांत किंचित्‌हि बदल न होतां, तुझे खोडकर चाळे दिवसेंदिवस वाढतच आहेत. त्यामुळं तुला मागणी करण्यास एकहि वरपिता अजूनपर्यंत आला नाहीं. सर्व लोक तुला भितात. तुझ्याशीं लग्नाची नुसती गोष्ट काढली कीं, वाघिणी-सारखी तूं अंगावर येत्येस. घरांतहि तुझा किती उपद्रव ! परवां ते सुदाम-शास्त्री भागवत वाचीत बसले असतां तूं त्यांच्या कुचेष्टा करण्यास आरंभ केलास. नाहीं नाहीं त्या गोष्टी त्यांच्या मनचक्षूंपुढं उभ्या करून त्यांचं भागवतावर किंचित्‌हि लक्ष लागूं दिलं नाहींस. आबाभटजींची तीच तक्रार. त्यांनीं श्रीशंकरावर आवर्तन करण्यास सुरुवात केली मात्र, तों तूं त्यांच्यापुढें जाऊन कांहीं कर्जरोखे व खातेवह्या हीं त्यांच्या-पुढें टाकिलींस व त्यांच्या स्पृश्यापृश्य कुळांच्या व ऋणकोंच्या भुतांना त्यांच्यापुढें आणून उभीं केलींस. त्यांना इतकें सतावून सोडलेंस कीं, त्यांनीं सर्व आवर्तन फोनोग्राफच्या यंत्राप्रमाणें म्हटलें. शेजारचा वसंतहि हीच तक्रार करीत होता. त्यानें पुस्तक हातांत घेण्याचा अवकाश कीं, तूं लागलीसच त्याच्या पाठीस. नाटक-सिनेमांतील देखावे, कादंबऱ्यांतील प्रणय-प्रसंग वगैरे त्याच्यापुढें दाखवून त्याचें वाचण्याकडे लक्ष लागूं देत नाहींस. त्याची एकहि परीक्षा धड पास नाहीं. परवां ती कुसुम माझ्याकडे रडत आली व म्हणाली, ‘ मी कशिदा काढीत बसलें. इतक्यांत तुमच्या त्राटिकेनें माझ्या हातांतील सर्व सामान उडवून दिलें व माझा हात धरून म्हणाली, ‘ आपल्याला हें असलें कांहीं नको बरें. चल आपण चौपाटीवर फिरावयास जाऊं.’ ’ कोणी देवाची प्रार्थना करण्यास डोळे मिटले कीं, तूं त्याच्या पाठीस लागलीसच. तुझी बहीण शांति किती गरीब. पण तिलाहि तूं स्वस्थ बसूं देत नाहींस. तिला मागणी घालण्याकरितां येणाऱ्या लोकांना तूं अगदीं भंडावून सोडलें आहेस. त्या दंभाजीरावांच्या डोक्यांत केरसुणी मारून त्यांना वेडावीत म्हणालीस, ‘ मेल्या ढोंग्या, शांतीकडे नुसतें बघ-ण्याचा सुद्धां तुला अधिकार नाहीं. तेव्हां तिला मागणी घालण्याला तुला लाज नाहीं वाटत ? खबरदार असला आचरटपणा पुन्हा करशील तर. तुझी

फट्फजिती करून चांगला खरपूस मार देईन. ’ मन्मथरावांची तीच गत. मी स्वतः ते दिवशीं श्रीशंकराचें ध्यान करण्यास डोळे मिटले मात्र; तों मलाहि त्रास देण्यास कमी केलें नाहींस. मी आतां अगदीं वैतागून गेलों आहें. माझें वय झालें. आतां तरी मला थोडी विश्रांति मिळूं दे. एके दिवशीं मीं तुझ्या द्वाडपणामुळें इतका वैतागलों कीं, देवघरांत जाऊन भगवान् चंद्रमौलीची अनन्यभावानें प्रार्थना केली कीं, ‘ हे दयाघना, माझ्या त्राटिकेला लवकरच योग्य वराकडून मागणी येऊन तिचें लग्न होऊं दे. म्हणजे मी राहिलेलें आयुष्य तुझ्या सेवेंत घालवीन. ’ लगेंच रात्रीं श्रीशंकरानें दृष्टांत देऊन मला आशीर्वाद दिला कीं, ‘ तुझे मनोरथ लौकरच पूर्ण होतील. ’ तेव्हांपासून मला जरा आशा वाटूं लागली व धीर आला आहे. पहावें काय होतें तें.” असें म्हणून जिवाजीपंत दुःखाचा सुस्कारा टाकून सचिंत बसले.

याप्रमाणें वडिलांचें भाषण चाललें असतां, त्राटिकेच्या आंगाचा तिळपापड झाला. ती रागानें लाल झाली व हातपाय आपटून तडफडाट करूं लागली व शांति किंचित् हंसलीसें पाहून तिलाहि मारहाण करूं लागली. बरोबरच आहे. आपणांस ताब्यांत ठेवण्याचा कोणी प्रयत्न करूं लागल्यास स्वच्छंदी मन त्याच्या पाठीस लागणारच. त्यानें कित्येक साधकांना योगभ्रष्ट करून सोडल्याचेहि दाखले आहेत.

असो. वडिलांच्या भाषणानें त्राटिकेचा क्रोध अनावर होऊन ती झपाट्यानें पाय आपटीत तेथून निघाली व जातांना वडिलांकडे वळून म्हणाली, ‘ बाबा, मी तुम्हांला निक्षून सांगतें कीं मी कालत्रयींहि कोणाशीं लग्न लावून त्याची ताबेदारीण, त्याची बटिक होऊन राहाणार नाहीं, समजलांत ! माझ्या लग्नाच्या बाबतींत आपण उगाच त्रास करून घेऊं नये. मला वाटेल तशी मी वागेन. आपल्या या शांतुलीचें वाटल्यास लग्न करून टाका. पण मी आपणांस बजावून ठेवतें कीं, माझ्या वाटेस कोणी गेल्यास मी तुम्हांला कोणालाहि सुख लागूं देणार नाहीं, हें पक्कें समजा. ’ असें म्हणून ती पाय आपटीत झपाट्यानें निघून गेली. तें पाहून शांति रडूं लागली. तेव्हां तिला जवळ घेऊन तिच्या पाठीवरून हात फिरवीत जिवाजीपंत सद्गदित कंठानें

म्हणाले, “ बाळ, अशी रडूं नको. मला स्वतःला तिच्यापासून किती त्रास होत आहे हें तूं पहातच आहेस. परंतु तुझ्याकडे पाहून मी आयुष्याचे दिवस कसे तरी कंठीत आहें. कित्येक वेळां मला जीव अगदीं नकोसा होतो. परंतु भगवान् चंद्रमौलीचा आशीर्वाद कधीं तरी सफळ होईल, ही मला आशा असल्यामुळें त्या आशेच्या भाग्यावर मी दिवस कंठीत आहें. बाळ, तूं चतुर आहेस, सद्गुणी आहेस, सुशील आहेत, सुरूप आहेस. तेव्हां भक्तवत्सल प्रभु तुझी सर्व काळजी लवकरच दूर करील. धीर सोडूं नकोस.” याप्रमाणें बोलत असतां जिवाजीपंतांना स्वतःला धीर वाटू लागून त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसूं लागली. साहजिकच आहे. कल्पनासुसरीच्या मगरमिठींतून सुटण्याकरितां धडपड करीत असलेल्या कोणत्या मुमुक्षूला—अवस्थांतरीं कां होईना—भगवंताच्या आशीर्वादानें धीर येणार नाहीं? जिवाजीपंत किंचित् हास्य करून पुनः शांतीला म्हणाले, “ बाळे, आतां तूं एकटीच आहेस म्हणून विचारतों कीं, तुला मागणी घालण्याकरितां आलेल्यांपैकीं कोणता वर तुला पसंत आहे तें अगदीं मन मोकळें करून सांग.” तेव्हां शांतीनें किंचित् लज्जित होऊन मान खालीं घातली व पुढील शब्द, अस्पष्ट असे, जिवाजीपंतांना ऐकूं आले. “ बाबा, मी तुमच्या बाहेर कां आहें ! तुम्ही कराल तें मला कबूल. त्यांतच माझें हित.”

इकडे त्राटिका वडिलांच्या दिवाणखान्यांतून निघाली ती तरतर आपल्या महालांत गेली व तेथें असलेल्या एका कोचावर धाडकन् तिनें आपलें अंग टाकलें. ती अगदीं बेफाम होऊन आपल्याशींच बडबडत होती. “ कोण मेला मला मागणी घालायला येतो आहे त्याला येऊं द्या. मारून त्याची चामडी लोंबवितें. हे पुरुष कसे सारे मस्त झाले आहेत; आणि साऱ्या बायका यांच्यापुढं कशा शेळपट बनतात याचं मला मोठं नवल वाटतं. या पुरुषांची आमच्यावरताबेदारी कां ? यांनींच आमच्या ताब्यांत काय म्हणून राहूं नये? आजपर्यंत स्वैरपणानं राहणारी ही त्राटिका कोणाची बायको होऊन त्याच्या ताटाखालचं मांजर होऊन कधींच राहणार नाहीं, हा माझा पक्का निश्चय आहे. आणि याच्या आड प्रत्यक्ष बाबा जरी आले तरी त्यांचं मी ऐकणार नाहीं. आतां कधीं कधीं त्यांच्याबद्दल जरा वाईट वाटून माझा निश्चय डळमळूं

लागतो. पण तें कांहीं उपयोगीं नाहीं. कांहीं झालं तरी आपला निश्चय कायम ठेवलाच पाहिजे. " इतक्यांत शांतीला मागणी घालण्यासाठीं कांहीं मंडळी आल्याचें तिला समजलें व ती तिकडे गेली. आणि अंकाचा पडदा पडला.

राजाभाऊचें वरीलप्रमाणें भाषण चाललें असतां वीरेश्वर अगदीं चित्रासारखा बसून तें लक्षपूर्वक ऐकत होता व तें संपतांच,

" चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथिबलवद्दढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ।।

हा गीतेंतील श्लोक गुणगुणूं लागला.

## अंक २ रा

शांतीला मागणी घालणाऱ्या नवरदेवांपैकीं श्रीयुत विवेक यांना अशी बातमी लागली कीं, जिवाजीपंत आपल्या घरांत पुराण सांगण्याकरितां एखाद्या विद्वान् शास्त्र्याची नेमणूक करणार आहेत. तेव्हां त्यांनीं आपला मित्र सद्‌बोध याचा सल्ला घेऊन व पोक्त विचार करून असें ठरविलें कीं, आपण उघड उघड मागणी घालण्यापूर्वीं प्रथम शांतीचें मन वळवावें व तिला वश करून घ्यावी. म्हणजे आपलें काम तेव्हांच फत्ते होईल व याकरितां आपण शास्त्री बनून जिवाजीपंतांच्या घरांत शिरकाव करून घेतला तर शांतीचें मन वळविण्यास उशीर लागणार नाहीं. अशा रीतीनें आपण आंतून मारा करूं व आपला स्नेही सद्‌बोध हा आपली ही युक्ति सफळ होण्याच्या कामीं बाहेरून जरूर ती मदत करील. आंतून व बाहेरून असा जोराचा मारा सुरू झाला म्हणजे अभेद्य वाटणारा शांतिदुर्ग हस्तगत झालाच पाहिजे, असा भरंवसा वाटून श्रीयुत विवेक हे शास्त्रीबोवा बनले व त्यांनीं जिवाजीपंतांकडे वशिला लावून त्यांच्या घरांतील बायकामंडळींना पुराण सांगण्याकरितां आपली नेमणूक करवून घेतली.

दंभाजीरावांना समजलें कीं, शांतीला गायनवादन शिकविण्याकरितां जिवाजीपंत एखाद्या नामांकित गवयाच्या शोधांत आहेत. तेव्हां शांतीला हस्तगत करण्याला ही संधि चांगली आहे असें वाटून ते गवई बनले व त्यांनीं जिवाजीपंतांकडून आपली नेमणूकहि करवून घेतली. पण लवकरच

त्यांचें कारस्थान त्राटिकाबाईच्या लक्षांत आलें व त्यांनीं त्यांचें सोंग उघडकीला आणून, फजिती करून त्यांना खरपूस मार देऊन, त्यांची बोळवण केली. त्यामुळें त्यांचा सर्व व्यूह ढांसळून पडला.

मन्मथरावांचा मार्ग निराळा. त्यांनीं केवळ भपक्यानें शांतीला दिपवून टाकून वश करण्याचा घाट घातला व आपलें वैभव आणि आपली प्रौढी तिच्या कानांवर घालण्याची योजना केली. पण त्यांची कांहीं डाळ शिजली नाहीं. असल्या कृत्रिम व बेगडी उपायांनीं शांतीचा लाभ होणें नाहीं हें सांगणें नकोच.

सद्भाव, शम, दम, मन्मथराव वगैरे शांतीला मागणी घालणारे इतर नवरदेव अहमहमिकेनें आपापल्या स्तुतीचे पाठ वाचीत, व मनांत मांडे खात बसले होते. पण त्राटिकेचें लग्न झाल्याखेरीज धाकटीचें होणें नाहीं, हा जिवाजीपंतांचा निश्चय सर्वांना माहीत असल्यामुळें ही अडचण कशी दूर करावी, या फिकीरींत ते होते. इतकेंच नव्हे तर या त्राटिकेला माळ घालण्यास कोणी पुरुष तयार होईलसें त्यांना वाटत नसल्यामुळें ते निराशेनें आपापल्या गांवीं परत जाण्याच्या गोष्टी बोलूं लागले. इतक्यांत ज्याचें अंग अगदीं करपून गेल्याप्रमाणें दिसत असून डोळे तीक्ष्ण पण खोल गेले होते, ज्याचा चेहरा उग्र व भयप्रद दिसत होता, ज्याच्या अंगावर धड वस्त्रहि नव्हतें असा एक विक्षिप्त मनुष्य तेथें आला व त्यानें उद्धटपणानें त्या बसलेल्या मंडळीला "जिवाजीपंताच्या घराचा रस्ता ह्योच काय ?" म्हणून विचारलें. त्याला पाहून सर्वजण हंसूं लागले व कांहींना तर भीतीहि वाटली. परंतु सद्भावानें त्याला त्याचें नांव विचारतां त्यानें "इराग्या" म्हणून उत्तर दिलें व जिवाजीपंतांच्या घरचा पत्ता विचारण्याचें कारण विचारतां "माझे इजमान तार्टिका बाईसनीं मांगनी घालनार हायती. त्येस्नी ओवा हवी ना ओवा ! म्हणून इचारलें." असें त्यानें सांगितलें. तें ऐकून त्राटिकेला मागणी घालणारा याचा यजमान कोणीतरी शतमूर्ख व याच्याचसारखा आचरट मनुष्य असला पाहिजे, असें त्यांच्यापैकीं बहुतेकांना वाटूं लागलें. परंतु सद्भावाला मात्र इराग्याची निश्चयी व बेडर मुद्रा पाहून 'याचा धनी म्हणजे कांहींतरी जड प्रकरण असलं पाहिजे.' असें वाटून त्यानें "जा, तुझ्या धन्याला घेऊन ये.

म्हणजे त्याला आम्ही जिवाजीपंतांचं घर दाखवूं. ” असें सांगून इराग्याला परत पाठविलें. त्राटिकेला मागणी घालणारा एक तरी हरीचा लाल पुढें आल्याचें ऐकून त्या भाबड्याबद्दल कांहींजणांना कींव वाटूं लागली. पण आपल्या मार्गांतील ही मोठी धोंड दूर झालीसें वाटून त्यांच्यापैकीं प्रत्येकजण ‘ आतां शांति खास आपली झाली. ’ अशा भावनेनें पुढें आपण काय काय करणार यासंबंधीं वल्गना करूं लागला. थोडक्याच वेळांत त्यांचा बालिशपणा विकोपास जाऊन मत्सरबुद्धीनें ते एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून हातघाईवर आले. शम, दम आणि सद्भाव हे त्यांच्या माकडचेष्टा मुकाट्यानें पहात होते. त्यांनीं त्यांना जें कांहीं करणें असेल तें शांतपणानें करण्यास सांगितलें. परंतु त्यांच्या बोलण्याकडे किंचित्‌हि लक्ष न देतां ते उलट त्यांचीच चेष्टा करूं लागले व त्यांच्या आपापसांतील स्पर्धेला अधिकच चेव येऊन ते अगदीं बेहोषपणें बरळूं लागले. इतक्यांत तो पूर्वींचाच आचरट ‘ इराग्या ’ तेथें आला व त्याच्या मागून एकाद्या गांवढळासारखा ज्याचा पोषाख होता, ज्याच्या डोक्यावर डोंगरासारखा अस्ताव्यस्त रचलेला मळका फेटा होता, अंगांत फाटके तुटके कपडे होते, पायांत फाटक्या वाहाणा होत्या, असे एक गृहस्थ येतांना त्यांना दिसले. त्यांची शरीरयष्टि उंच व बांधेसूद असून सडपातळ होती. त्यांचा चेहरा शांत व गंभीर असून त्यांच्या अर्धोन्मीलित नेत्रांतून दिव्य तेज चमकत होतें. त्यांना पाहिल्याबरोबर आपला तर्क खरा ठरला अशी सद्भावाची खात्री झाली; व हा पुरुषसिंह खात्रीनें त्या द्वाड त्राटिकेशीं लग्न लावून तिला वठणीवर आणील हा त्याला विश्वास वाटूं लागला. विवेकाचा मार्ग आतां खास मोकळा झाला असेंहि त्याला वाटूं लागलें. परंतु ज्यांची मति भ्रष्ट झाली होती, ज्यांच्या दृष्टीवर मोहाचीं दाट पटलें आलीं होतीं अशा कांहीं दुष्ट दुर्मतींनीं—जडबुद्धिच ते—त्या गृहस्थाच्या त्या पोषाखाची टर उडविण्यास सुरुवात केली. परंतु त्याच्या मर्मभेदक व काळासहि कंपायमान करणाऱ्या तीक्ष्ण नजरेशीं नजर भिडविण्याचें त्यांच्यापैकीं कोणालाहि धाष्टर्य होईना. सहस्ररश्मीपुढें खद्योताचा अगर दिवाभीताचा टिकाव कसा लागावा ! घुंगुरट्याला खगेंद्राची बरोबरी कशी करवेल ! त्यांच्या त्या बालिशपणाकडे तुच्छतापूर्ण व तिरस्कारयुक्त नजरेनें

एकदां पाहून ते गृहस्थ सद्भावाजवळ गेले. तेव्हां सद्भावानें त्यांना सर्व हकीगत सांगून जिवाजीपंतांच्या घराची खूण सांगितली; प्रबोधपंत व विराग्या यांच्याखेरीज सर्वजण पुढील बेत करीत, मनचे मांडे खात निघून गेले.

ते गेल्याचें पाहून प्रबोधपंत विराग्याला म्हणाले, " विराग्या, कायरे, हीं माकडें त्या शांतिरत्नाकरितां कशीं बेहोष झालीं आहेत, तें पाहिलंस ना? यांची खोड मोडण्याला एक त्राटिकाच योग्य आहे. व तिनं यांना पुरा हात दाखविला असेलच. असल्या कुटाळ, टवाळखोर, नाठाळ, विषयलंपटांना शांति बरणार काय ? तें शक्यच नाहीं. तिला अनुरूप असा वर म्हणजे विवेकच होय व वेळ आली म्हणजे त्याच्याशींच तिचा विवाह होईल अशी मला खात्री वाटते. बरें, आपण ज्या कामाकरितां आलों आहोंत तें केलंच पाहिजे. तर तूं आतां जा. उद्यां आपणांस जिवाजीपंतांच्या घरीं जायचं आहे. सर्व तयारी ठेव. " तें ऐकून " जी सरकार, " म्हणून विराग्या मुजरा करून गेला.

प्रबोधपंत ( स्वगत )—अखिल देवांचे देव, मायेचे शास्ते, चराचराचें अधिष्ठान, विश्वनाटक सूत्रधार श्रीदत्तमहाराज, ब्रह्मगिरीवर निरंजन वनांत स्वानंदमग्न असतां, जिवाजीपंतांची व त्यांच्यासारख्या अनन्यगतिकांची हांक त्यांना ऐकूं आली व त्यांना त्यांची करुणा येऊन कल्पनारूपी त्राटिकेच्या जाचांतून त्यांना सोडविण्याच्या हेतूनं त्यांनीं मला दृष्टांत देऊन आज्ञा केली कीं, ' बेटा, तूं जिवाजीपंतांच्या देहगांवीं जा. तिथं कल्पनारूपी त्राटिकेनं फार पुंडावा माजविला आहे. कित्येक साधकांना बुद्धिभ्रष्ट करून तिनं अधोगतीला नेलं आहे. ती कोणाचंहि कोणतंहि काम सुरळीतपणं होऊं देत नाहीं. ती जात्याच चंचल. आदिमायाच ती. जगांतील सर्व बखेडे तिच्यामुळं होतात. त्यामुळं तिच्याशीं विवाह करण्यास कोणीच पुढं येत नाहीं. सर्वांना शांति पाहिजे, पण ती मिळावी कशी ? तर तूं जा. त्या त्राटिकेशीं विवाह कर व तिला सद्बोध करून हरतऱ्हेनें तिला आपल्या पूर्णपणं कह्यांत ठेव व ती भगवत्-चरणीं लीन होऊन सदैव स्वानंदीं रंगून जाईल अशा तऱ्हेनं तिला शिक्षण दे. म्हणजे तिच्या बापाची व इतर त्रस्त जीवांची पीडा निवारण होऊन तुलाहि प्रपंचपरमार्थीं तिचें फार मोठें साह्य होईल. वृत्ति एकदां निजरंगीं

रंगली म्हणजे तिच्यासारखी आनंदी व प्रेमळ सहचारिणी त्रिभुवनांत कुठं आढळणार नाहीं. तिच्या संगतींत तुझा प्रपंच व परमार्थ सुरळीतपणं चालून जनबोधाचें काम सुकर होईल. सत्यशोधनाचा प्रयत्न करणाऱ्या असंख्य लोकांची या त्राटिकेनं दिशाभूल करून दिल्यामुळं ते देहदंडण करून नाहीं नाहीं त्या साधनांच्या फंदांत पडतात व कर्तव्यपराङ्मुख होऊन दुःखी होतात. भक्तिमूलक ज्ञानप्रधान निष्कामकर्मयोग पुसट झाला आहे. तर बेटा, तुला माझी अशी आज्ञा आहे कीं तूं जा व या कल्पनारूपी त्राटिकेशीं विवाह करून तिची “ आनंदी ” करून तिच्या सहवासांत गृहस्थाश्रमींच राहून अज्ञजनबोधाचं कार्य कर. तुझं कार्य यशस्वी होईल हा माझा आशीर्वाद आहे. ’ याप्रमाणें श्रीदत्तमहाराजांची आज्ञा झाल्यावर परमपूज्य सद्भाक्ति-माउलीला वंदन करून इथं आलों. मी गिरिकंदरांत अगर खेड्यापाड्यांत राहणारा, या कृत्रिम व्यवहाराच्या जगांत येण्याचा मला कंटाळा. पण कधीं काळीं श्रीदत्तमहाराजांच्या आज्ञेवरून जनसंमर्दांतहि मिसळावें लागतें. तेव्हां आतां त्राटिकेला मागणी घालावी. प्रकरण जड तर खरंच. तरी पण माझ्या प्रेमळ भक्तिमातेची देखरेख, माझ्या बोध-खड्गाचा अक्षय्य व तीक्ष्ण मारा, विरागाचा कडकडीत पाहरा, व सुशीला व सुमति या दासींचा गोड सहवास, असा थाट जमून आल्यानंतर वृत्ति पालटलीच पाहिजे; त्राटिकेची आनंदी झालीच पाहिजे. विराग माझा विश्वासु नोकर. त्याच्या साहाय्यानें या कल्पनारूपी त्राटिकेचा सर्व लसलसाट मोडून तिला सर्कशींतील वनराजाप्रमाणं आपल्या कह्यांत ठेवणं कठीण नाहीं. विरागाच्या पाहऱ्यांत अभ्यासाचे कष्ट सोसल्याशिवाय निजानंद ठेवा हस्तगत होणार नाहीं व निष्काम कर्मयोग साधणार नाहीं. आतां उद्दिष्ट कार्याला लागावं.

इतक्यांत

“ असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।<br>
अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ।। ”

हा गीतेंतील श्लोक वीरेश्वर गुणगुणूं लागला.

## अंक ३ रा

आपल्या वाड्यांतील 'हृन्मंदीर' दिवाणखान्यांत एका उच्चासनावर जिवाजीपंत सचिंत बसले होते. त्यांच्या उजव्या बाजूस त्यांच्या मुली त्राटिका व शांति बसल्या होत्या व पलीकडे लालसा बसली होती. त्यांच्या डाव्या बाजूला प्रथम विवेकशास्त्री बसले होते. त्यांचे पलीकडे सद्भाव, शम, दम, दंभाजीराव, मन्मथराव वगैरे शांतीला मागणी घालणारी मंडळी विराजमान झाली होती. आपल्या थोरल्या मुलीला मागणी घालण्याकरितां कोणी एक गृहस्थ आज येणार आहेत ही गोष्ट जिवाजीपंतांच्या कानावर होती. पण तिच्यावर त्यांचा विश्वास बसेना; व कदाचित् एकादा मागणी घालण्यास तयार असला तरी त्राटिकेला प्रत्यक्ष पाहिल्यावर तो कितपत तिला मागणी घालील याबद्दल त्यांना जबर शंका वाटत होती. तरी पण श्रीशंकरानें दिलेला आशीर्वाद कधींहि खोटा ठरणार नाहीं असा त्यांना भरंवसा वाटत असल्यामुळें त्यांना थोडी आशा वाटत होती. त्यांच्या अंतःकरणांत या वेळीं द्वंद्वांनीं हलकल्लोळ उडवून दिला होता. आशा, निराशा, श्रद्धा, अश्रद्धा, अशा परस्परविरुद्ध मनोधर्मांच्या कातरींत सांपडल्यामुळें ते अगदीं हतबल झाले होते. अशा केविलवाण्या स्थितींत ते अनन्यभावानें श्रीशंकराला शरण जाऊन मनांतल्या मनांत त्याचा धांवा करूं लागले कीं, "हे दीनदयाळ प्रभो, या द्वंद्वांच्या कैचींत सांपडल्यामुळें मी अगदीं जर्जर झालों आहें. तूं वचनाभिमानी आहेस. तेव्हां स्वप्नांत दिलेला दृष्टांत खरा करणें तुझें ब्रीद आहे. तुझ्या कृपेशिवाय या त्राटिकेच्या काचांतून माझी सुटका होणें शक्य नाहीं. आतां माझी तुला इतकीच प्रार्थना आहे कीं, माझ्या त्राटिकेला (वृत्तीला) योग्य वर (सत्संग) मिळूं दे. याखेरीज माझें कांहींच मागणें नाहीं. तूं समर्थ आहेस, सर्वज्ञ आहेस." हा सर्व प्रकार जिवाजीपंतांच्या अंतरीं चालला होता. बाहेर काय चाललें आहे याचें त्यांना किंचित्हि भान नव्हतें. आपण निर्भान होऊन पडूं कीं काय याचेंहि त्यांना भय वाटूं लागलें. व ते पुन्हा श्रीशंकराची 'अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम। तस्मात् कारुण्यभावेन रक्ष रक्ष परमेश्वर॥' अशी प्रार्थना करूं लागले. इतक्यांत त्यांना 'मा भीः,' 'मा भीः' असा ध्वनि ऐकल्याचा भास झाला व

' विराग्या, बघतोस काय, दार ठोठाव अबीके अबी, खूप जोरसे. ' हे शब्द बाहेरच्या दिंडीकडून त्यांच्या कानावर आदळले व त्यासरसे ते खडबडून जागे झाले. हे शब्द म्हणजे आपल्या निराशेनें करपून जात असलेल्या अंतः-करणांत चैतन्य उत्पन्न करणारा विद्युत्प्रवाहच होय असें त्यांना वाटलें, व त्यांना धीर वाटूं लागला. हलकपाट खोलण्याची वैराग्याला दिलेली आज्ञा ऐकून कोणत्या मुमुक्षूला धीर येऊन आनंद होणार नाहीं ? इतक्यांत कोणीं दिंडीचें दार उघडलें व प्रबोधपंत व त्यांच्यामागून विराग्या हृन्मंदिरांत येऊन दाखल झाले. प्रबोधपंतांच्या अंगचें अलौकिक तेज, त्यांची दिव्य कांति, त्यांची काळालाहि कंपायमान करणारी अर्धोन्मीलित दृष्टि, निश्चयी व गंभीर मुद्रा यांचा तेथें बसलेल्या मंडळींवर इतका विलक्षण परिणाम झाला कीं, प्रबोधपंतांनीं हृन्मंदिरांत प्रवेश करितांच त्यांना सर्वांनीं कळसूत्री बाहुल्यां-प्रमाणें उभें राहून खडी ताजीम दिली. त्यांना पाहून जिवाजीपंतांना वाटूं लागलें कीं, उदयाचलींचा चिद्रवि तो हाच, ताटकांतक प्रभु रामचंद्र तो हाच, आपलें वचन पुरें करण्याकरितां भगवान् शंकरानें पाठविलेला पुण्यपुरुष तो हाच. त्यांची चिंता पार मावळली, व त्यांना विलक्षण समाधान वाटून भगवान् चंद्रमौळीची सेवा फलद्रूप होणार हा विश्वास दृढ झाला, अंतः-करणांत आनंदाचें भरतें आलें, अंगावर रोमांच उभे राहिले नेत्रांत प्रेमाश्रु उद्भूत झाले. पण इतक्यांत आपण कोठें आहोंत याचें त्यांना भान होऊन त्यांनीं तो प्रेमोद्रेक आवरला व प्रबोधपंतांना कुशल विचारून मुद्दाम राखून ठेविलेल्या आसनावर बसण्यास सांगितलें.

वरीलप्रमाणें जिवाजीपंतांची स्थिति झाली खरी, पण प्रबोधपंत हृन्मदिरांत येतांच बाकीच्या मंडळींच्या मनांवर ज्याच्या त्याच्या अंतःस्थितीप्रमाणें परिणाम झाल्याचें दिसून आलें. विवेकशास्त्री व शांति यांना आपला सखा, आपला पाठिराखा, आपला हितचिंतक आला असें वाटून हर्ष झाला. प्रबोधपंत तेथें आल्यानें आपल्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं असें दाख-विण्याच्या इराद्यानें त्राटिकेनें एकदां आपली कुर्रेबाज दृष्टि त्यांच्याकडे वळविली. पण प्रबोधपंतांच्या अद्भुत सामर्थ्यानें ती दिपून गेली व किंचित् खजिल होऊन ती जी तोंड फिरवून बसली ती तिनें एकवारहि पुन्हां आपली

दृष्टि त्यांचेकडे वळविली नाहीं. सर्पापुढें विंचवानें नांगी टाकावी त्याचप्रमाणें तिची स्थिति झाली. केवळ स्थूल देहाकडे पाहणाऱ्या येथें बसलेल्या जड-बुद्धींना तर त्यांच्याकडे नुसतें पहाण्याचाहि धीर होईना. इतके ते त्यांच्या दिव्य तेजानें दिपून जाऊन खालीं माना घालून बसले होते. तरी पण मग-रूरच ते. त्यामुळें प्रबोधपंतांच्या विक्षिप्त पोषाखाची कुचेष्टा करीत ते आपा-पसांत कुजबुजत होते. दंभाजीरावाच्या अंगाला तर भीतीनें दर्दरून घाम सुटला. जिवाजीपंतांनीं प्रबोधपंतांना येण्याचें प्रयोजन विचारतांच त्यांनीं आपलें नांवगांव सांगून आढेवेढे न घेतांच स्पष्ट सांगितलें कीं, "मी आपल्या वडील मुलीला मागणी घालण्याकरितां आलों आहें. तेव्हां आपला रुकार मिळावा अशी विनंति आहे. माझ्या वडिलांचा व आपला फार स्नेह होता. त्यामुळें माझ्या घराण्याची माहिती आपणांस आहेच."

आपल्या द्वाड मुलीला असल्या धीरोदात्त व अधिकारी पुरुषाकडून मागणी आलेली पाहून जिवाजीपंतांचा आनंद हृदयांत मावेना. तरीपण त्यांनीं तो आवेग दाबून ठेवण्याचा प्रयत्न करीत भगवान् चंद्रमौलीला मनानें शतशः प्रणिपात केले व "धन्य, धन्य, धन्य." असें ते आपल्याशींच उद्गारले. त्यांच्या नेत्रांतूनहि दोनतीन प्रेमाश्रूंचे बिंदु खालीं पडले. परंतु त्यांनीं आपले नेत्र तात्काळ पुसल्यामुळें ही गोष्ट कोणाच्या लक्षांत आली नाहीं. नंतर त्यांनीं सावध होऊन त्राटिकेकडे पाहिलें तों त्यांना कांहीं निराळाच प्रकार दिसला.

प्रबोधपंतांचे वरील शब्द त्राटिकेच्या हृदयावर वज्राघाताप्रमाणें जाऊन आदळले; व ती पहिल्या झटक्यासरशीं उठून निघून जाण्याच्या बेतांत होती. पण इतक्यांत ती गोष्ट जिवाजीपंतांच्या लक्षांत येऊन त्यांनीं तिला नजरेनेंच खालीं बसण्यास खुणावल्यामुळें ती नाईलाजानें खालीं बसली. जी त्राटिका मोठमोठ्या "मी मी" म्हणणाऱ्यांना न भितां त्यांची फटफजिती करणारी तीच प्रबोधपंतांची मागणी तेथल्या तेथेंच न झिडकारतां मूग गिळून मान खालीं घालून बसली हा तिला मागणी घालणाऱ्या मांत्रिकाचा प्रभाव असावा हें जिवाजीपंतांनीं तेव्हांच ताडलें, व तिला भीतभीत विचारलें, "बाळे, ऐकलेंस ना ? हे प्रबोधपंत तुला मागणी घालण्याकरितां आले आहेत. तेव्हां

तुझें काय म्हणणें आहे तें मला स्पष्टपणें सांग. तूं आतां प्रौढ आहेस, शहाणी आहेस. तेव्हां हल्लींच्या रिवाजाप्रमाणें तुझ्या संमतीनेंच निकाल झालेला बरा."

जिवाजीपंतांचा हा प्रश्न ऐकून त्राटिकेच्या अंगाला घाम सुटला. वास्तविक तिच्या आजपर्यंतच्या अनुभवाप्रमाणें हा प्रश्न ऐकतांच तिनें मागणी घालणाराचे व प्रत्यक्ष वडिलांचेहि वाभाडे काढून कल्पान्त करावयास पाहिजे होता. पण आज ती निमूटपणें खालीं मान घालून बसलेली पाहून, हें काय गौडबंगाल! हा काय चमत्कार! असें सर्वांना वाटलें; व सर्वजण प्रबोधपंतांकडे पाहूं लागले.

त्राटिकेच्या अंतःकरणांत काहूर माजून राहिलें. 'होय' कीं 'नाहीं,' हॅम्लेटप्रमाणें 'जगावें' कीं 'मरावें' असें तिला होऊन गेलें. 'होय' म्हणावें तर आजपर्यंत निष्कंटकपणानें उपभोगिलेली स्वतंत्रता जाणार व सर्वांशीं तोऱ्यानें वागणारी त्राटिका दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारें मेषपात्र होऊन, त्याच्या ताटाखालचें मांजर होऊन बसणार! ही नुसती कल्पनासुद्धां तिला असह्य वाटूं लागली; व 'होय' म्हणण्यापेक्षां मेलेलें बरें असेंहि तिला वाटलें. 'नाहीं' म्हणावें तर आज तो शब्द उच्चारण्याला लागणारें धैर्य तिला होईना. समोरच्या रांगेंत बसलेल्या मांत्रिकानें आपल्या सर्व शक्तींचें हरण केल्यानें आपला शक्तिपात झाल्यासारखें तिला वाटूं लागलें. तिला त्याच्या संबंधीं एक प्रकारचा अति सूक्ष्म ओढा वाटूं लागला, व आज असें कां होत आहे याचें तिचें तिलाच आश्चर्य वाटूं लागलें; व सुविचाराची पहाट फुटल्याप्रमाणें होऊन 'आपण नाहीं म्हटल्यास बाबांना काय वाटेल?' हा विचार तिच्या मनांत डोकावूं लागला. अशा प्रकारें तिच्या अंतःकरणांत 'होय' कीं 'नाहीं' चें तुमुल युद्ध होऊन अखेर 'होय' पक्षाची सरशी झाली; व तिनें पोक्तपणानें असें ठरविलें कीं 'नुसतें लग्न लागलें म्हणून काय झालें? आपल्या स्वतंत्रतेला फारसा बाध नाहीं आला म्हणजे झालें. आजच बाबांना सर्वांसमक्ष कां दुखवा? आपण 'होय' म्हटल्यानें बाबाहि मोकळे होतील व शांतीच्या लग्नाच्या आड येणारी माझी धोंड तरी वाटेंतून दूर होईल.' असा पोक्त विचार करून, तिनें आपल्या सर्व शक्ती एकवटून अगदीं हलक्या आवाजानें "मला कबूल आहे." हे शब्द उच्चारले.

इतक्यांत तिला घेरी आल्याप्रमाणें होऊन कसेंसेंच वाटूं लागलें व ती जाग्यावरच काष्ठवत् बसली.

त्राटिकेचा हा निकाल ऐकून शांतीला मागणी घालणाऱ्या उतावळ्या नवरदेवांनीं हर्षातिरेकानें, शिष्टाचार विसरून मोठ्यानें टाळ्या वाजवून आपला आनंद व्यक्त केला. प्रबोधपंतांना माहीतच होतें कीं त्राटिका ही कांहीं हाडाची द्वाड नव्हे. ( मन म्हणजे चित्स्वरूपाचेंच चंचलावतरण होय. ) तिचा द्वाडपणा हा वरचा खळखळाट आहे. तेव्हां आपल्या अद्‌भुत सामर्थ्यानें तिच्या उद्दाम वृत्ति हरण केल्यावर तिचें काय चालणार ? त्यामुळें ते मेरुवत् अचल असून त्यांची मुद्रा प्रसन्न दिसत होती. जिवाजीपंतांना त्राटिकेच्या तोंडचा ‘ हो ’कार ऐकून आपण आनंदसागरांत पोहत आहोंतसें वाटूं लागलें. त्यांची दृष्टि प्रेमाश्रूंनीं भरून आली. तेथल्या मंडळींनीं वाजविलेल्या टाळ्या म्हणजे भगवान् शंकरानें आपलें केलेलें अभिनंदनच होय असें त्यांना वाटून त्यांनीं अनन्यभावानें त्याचें स्मरण करून मोठ्या प्रेमानें प्रबोधपंतांची मागणी मान्य केल्याचें जाहीर केलें व ते स्वतःशींच पुटपुटले, “ आज मीं धन्य झालों, कृतकृत्य झालों. माझ्या अनंत सुकृतोदयानें आज माझ्या त्राटिकेला ( वृत्तीला ) सत्संग मिळाला. देवाधिदेवा, हा देह आतां तुझ्या चरणसेवेस अर्पण केला आहे.”

प्रबोधपंतांची मागणी जिवाजीपंतांनीं मान्य केली. आतां प्रश्न राहिला शांतीला आलेल्या मागण्यांचा. परंतु हा प्रश्न जरा नाजुक असल्यामुळें त्याचा तडकाफडकीं निकाल लावणें बरें नाहीं व तसें केल्यानें तेथें जमलेल्या नवरदेवांची आतांच निराशा होणें इष्ट नाहीं असें वाटल्यवारून जिवाजीपंतांनीं “या प्रश्नाचा निकाल दोन दिवसांनीं सांगूं,” असें सांगितलें व त्या दिवशींचा कार्यक्रम समाप्त झाला.

विवेकशास्त्री म्हणजे चातुर्याची मूर्ति, केवळ युक्तिस्वरूपच. तेव्हां आपलें काम सिध्या मार्गानें होणारें नाहीं असें ताडून त्यांनीं शांतीच्या प्रेमळ मावशी प्रीताई यांच्याशीं संधान बांधून शांतीचें मन वळविलें व मावशींचा व आपला जिवलग मित्र सद्‌भाव याच्या साह्यानें शांतीशीं विवाह उरकून घेण्याची तयारी केली. असल्या बिकट परिस्थितींत कामक्रोधादिकांबरोबर

उघड सामना देण्यापेक्षां युक्तीनेंच आपला हेतु साधणें इष्ट वाटल्यावरून त्यांनीं प्रथम जिवाजीपंतांच्या सम्मतीचीहि वाट पाहिली नाहीं. कारण आपल्या या कृत्याबद्दल जिवाजीपंतांकडून आपल्यास धन्यवादच मिळतील अशी त्यांना खात्री वाटत होती. उघडच आहे कीं शांतीला विवेकापेक्षां अधिक अनुरूप वर कोण मिळणार? मावशींनीं योग्य संधि साधून जिवाजीपंतांच्या कानावर ही गोष्ट घातली; तेव्हां ते रागावले. पण शांतीशीं विवाह लावणारे गृहस्थ श्रीयुत विवेक हे शास्त्रीबोवा नसून ते फार थोर, अब्रूदार, सन्मान्य, सुशील व सुसंपन्न गृहस्थ आहेत असें समजल्यावर त्यांनीं त्यांच्या शांतीशीं होणाऱ्या विवाहाला मान्यता दिली व शांतीकरितां ' आ ' पसरून टपून बसलेल्या आशाळभूतांना नकार दिला.

नंतर लवकरच त्राटिकेच्या व शांतीच्या विवाहांचा मुहूर्त ठरून त्राटिकेचा प्रबोधपंतांशीं व शांतीचा विवेकाशीं विवाह झाला. प्रबोधपंतांना डामडौल, थाटमाट व भपका वगैरेबद्दल तिटकारा वाटत असल्यामुळें त्यांच्या आग्रहावरून हे विवाहसमारंभ साधेपणानें व शक्य तितक्या कमी खर्चांत उरकण्यांत आले व प्रबोधपंत जिवाजीपंतांचा निरोप घेऊन आपल्या अर्धांगीसह आपल्या व्यवहारग्रामीं आले. शांति हस्तगत होत नाहीं, अशी खात्री झाल्यावर दंभाजीरावांनीं त्वरा करून लालसाबाईशीं विवाह केला.

येथें तिसरा अंक समाप्त झाल्यामुळें राजाभाऊ विसांवा घेण्याकरितां जरा थांबला. इतक्यांत दिनेश्वर तुकाराममहाराजांचा पुढील अभंग गुणगुणूं लागला.

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचें कारण ॥
मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छी तें ॥ १ ॥
मनें प्रतिमा स्थापिली । मनें मना पूजा केली ।
मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ॥ २ ॥
मन गुरु आणि शिष्य । करी आपुलेंचि दास्य ।
प्रसन्न आपआपणांस । गति अथवा अधोगति ॥ ३ ॥
साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात ।
नाहीं नाहीं आन दैवत । तुका म्हणे दुसरें ॥ ४ ॥

## अंक ४ था

प्रबोधपंतांनीं आपल्या पत्नीचें नांव 'आनंदी' ठेविलें होतें. जणूं हें नांव तिच्या भावी मनःस्थितीचें द्योतकच होतें. कारण प्रबोधाच्या सहवासांत व त्याच्या तालमींत वृत्ति ही आनंदी बनलीच पाहिजे. नाहींतर तो प्रबोध कसला !

बोध झाला तरी स्वभावतः वृत्तीच्या ठिकाणीं असलेला उद्दामपणा व स्वच्छंदीपणा एकदम शमणें शक्य नसतें. व्यवहारग्रामीं आल्यावर प्रबोधपंतांनीं त्राटिकेला सामोपचाराच्या चार गोष्टी सांगून पाहिल्या. पण त्यांच्या बोलण्याचा तिच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहींसें दिसलें व तिनें त्यांना रोखठोक जबाब दिला कीं, "मी आजपर्यंत स्वतंत्रपणें वागण्यास शिकलेली असल्यामुळें मला दुसऱ्याची ताबेदारी करणें आवडत नाहीं. म्हणून मी तुम्हांला स्पष्ट सांगतें कीं, तुम्हांला योग्य दिसेल त्या मार्गानें तुम्हीं जावें. मला योग्य दिसेल तशा तऱ्हेनें मी वागणार. तुमच्याशीं लग्न लाविलें म्हणून मीं नेहमीं तुमच्या ताटाखालचें मांजर होऊन रहावें अशी कां तुमची इच्छा आहे ? मला वाटेल तशी मी वागेन. तुम्ही माझ्याआड येऊन आपला अपमान करून घेऊं नये हें बरें." इतकें बोलून ती झपाट्यानें निघून जाणार इतक्यांत तिला प्रबोधपंतांनीं आडवून धरिलें. शांत व गंभीर वाणीनें ते जरा ठासून म्हणाले, "आनंदी, मी प्रेमानें तुला सामोपचाराच्या गोष्टी सांगून पाहिल्या. पण तुझ्या मनावर त्यांचा कांहींच परिणाम झाला नाहींसें दिसतें; उलट आतांच्या तुझ्या बोलण्यावरून तूं सामोपचारानें बेतावर येशीलसें दिसत नाहीं. तेव्हां या तुझ्या द्वाडपणाच्या रोगावर मला माझ्या जालीम मात्रेचीच योजना केली पाहिजे. माझें तुला असें सांगणें आहे, नव्हे, माझी तुला अशी आज्ञा आहे कीं, आजपासून तूं विद्यार्जनाला सुरुवात केली पाहिजे; व वेळोवेळीं मी जे जे नियम घालून देईन त्यांप्रमाणें अगदीं बिनचूक वागलें पाहिजे. तुझ्या सेवेला माझा विश्वासु नोकर विराग्या, सुमति व सुशीला या दोन दासी यांची नेमणूक केली आहे. तुला काय हवें नको तें विराग्याला सांगत जा. तो सर्व व्यवस्था नीट ठेवील. सुमति व सुशीला या तुला फुरसतीच्या वेळीं करमणूक करून तुझ्या तैनातींत राहतील.

याप्रमाणें मी आंखून दिलेल्या मार्गानें बिनचूक वाग म्हणजे तुझें हित होईल. नाहींतर माझ्याशीं गांठ आहे हें पक्कें लक्षांत ठेव. प्रथम तुला तसें करणें जरा जड जाईल, परंतु नेटानें अभ्यास करीत राहिल्यानें यश हें आलेंच पाहिजे." प्रबोधपंतांच्या या मात्रेचा इष्ट तोच परिणाम झालेला दिसला. कारण त्यांचे ते शब्द ऐकून त्राटिका पदरानें डोळे पुशीत ताबडतोब निघून गेली. याप्रमाणें प्रबोधपंतांनीं स्वैरपणें भटकणाऱ्या मनाला अभ्यास आणि वैराग्य यांच्या मुशींत तर घातलें. आतां त्याला बोधाग्नीच्या ज्वाळांची आंच लावून ते त्राटिकेची आनंदी कशी करतात तें दिसेलच.

नंतर प्रबोधपंतांनीं विराग्याला बोलावून आनंदीच्या सेवेला त्याची नेमणूक केल्याचें त्याला सांगितलें; व ते म्हणाले, " विराग्या, तूं माझा फार दिवसांचा विश्वासु नोकर. तेव्हां मी तुला एक फार नाजुक जोखमीची कामगिरी सांगणार आहें. तूं हुषार आहेस, चाणाक्ष आहेस. तेव्हां ती कोणती हें तूं ताडलेंच असशील." इतकें बोलून त्यांनीं खोंचदार नजरेनें एकदां विराग्याकडे पाहिलें, तों त्याच्या किंचित् हंसऱ्या चेहऱ्यावरून आपलें मनोगत त्यानें ताडलें असल्याची त्यांची खात्री झाली, व ते पुढें म्हणाले, " विराग्या, अरे, तुझी मालकीण घरांत आली आहे. तेव्हां तूं आतां नेहमीं तिच्याच तैनातींत असलें पाहिजेस. तिला थोडीशी भूतबाधा झाली आहे. तेव्हां तिचें खाणें पिणें, झोपणें, हिंडणें फिरणें वगैरे सर्व बाबतींत जे नियम एका मांत्रिकानें घालून दिले आहेत त्याप्रमाणें जर ती अगदीं बिनचूक वागली तरच तिच्या अंगांतील संमंध जाईल. नाहीं तर तो अधिकच पीडा करील. तेव्हां तिच्या प्रत्येक गोष्टीवर, प्रत्येक हालचालीवर तूं असा कडक पाहरा ठेविला पाहिजेस कीं तिच्याकडून केव्हांहि कोणत्याहि बाबतींत कसलेंहि कुपथ्य अगर त्या नियमांचें एक रेसभरही उल्लंघन होतां कामां नये. ते नियम मी तुला लवकरच समजावून देईन. या कामीं तुला जरा निष्ठुर बनावें लागेल. बाकी तें तुला सांगावयाला नकोच. पण एकादे वेळीं ती आपली यजमानीण असें मनांत येऊन तुला तिची कींव करावीशी वाटेल. म्हणून मी बजावून सांगतों कीं, मीं सांगितलेल्या कामांत तुझ्याकडून थोडी जरी कसूर झाली तरी तुझ्या अंगाचीं चामडीं लोळवीन, हें

पक्कें लक्षांत ठेव. दररोज तुझ्या कामगिरीची मला खबर देत जा; व वेळो-वेळीं मी सांगेन त्याप्रमाणें तुझें पुढील धोरण ठेव. हे सर्व उपचार मी तिच्याच कल्याणाकरितां करीत आहे हें बिसरूं नकोस." इतकें सांगून प्रबोध-पंतांनीं विराग्याला जाण्यास सांगितलें व तो निघून गेला.

नंतर प्रबोधपंतांनीं सुमति व सुशीला या आपल्या दासींना बोलावून ते म्हणाले, "सुमति, सुशीले, तुम्ही आज पुष्कळ दिवस माझ्या घरीं नोकरीला आहांत. तुम्हांला मी चांगल्या ओळखतों. तुमच्यावर माझा विश्वास आहे, तेव्हां तुमच्या मालकीणबाईच्या खास तैनातीला तुमची नेमणूक केली आहे. त्यांची प्रकृति असावी तशी नाहीं. त्यांना डोकें फिरण्याचा व दुखण्याचा विकार आहे. औषधपाण्याची सर्व व्यवस्था केली आहे. तुम्ही नेहमीं त्यांच्या जवळ राहून त्यांची सोय गैरसोय पहात जा; व गोड बोलून त्यांना करम-णूक करीत जा. त्या कधीं रागावल्या तर त्यांचा राग लवकर जाईल अशा तऱ्हेनें त्यांच्याशीं वागा. विराग्या जें जें सांगेल तें तें अगदीं बिनचूक करीत जा; व मधून मधून त्यांचें प्रकृतिमान मला कळवीत जा." याप्रमाणें प्रबोधपंतांनीं विराग्या, सुमति व सुशीला यांची आनंदीच्या तैनातीला नेमणूक केली.

प्रबोधपंत म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानस्वरूपच. तेव्हां त्यांनीं प्रथम आपल्या पत्नीला स्वतःच शिक्षण देण्यास सुरुवात केली, व ती नेहमीं उद्योगांत गर्क राहील इतक्या बेतानें ते तिला पाठ देत असत. "मन रिकामें व हलकें असलें म्हणजे त्याच्यांत नाहीं नाहीं त्या कल्पना शिरतात व तें भटकूं लागतें. परंतु कर्तव्यकर्माचें व उद्योगाचें वजन त्याच्या डोक्यावर असलें म्हणजे त्याला जडपणा येऊन तें स्थिर राहतें," असें ते म्हणत. आहार, विहार, व्यायाम, झोंप वगैरे बाबतींत तिच्यावर विराग्याचा सक्त पाहरा असून तो तिला ठरलेल्या परिमितीच्या बाहेर एक रेसभरहि जाऊं देत नसे. प्रबोधपंतांची माता सद्भक्ति ही मधून मधून तिला भगवद्भक्तीच्या प्रेमळ कथा व उपदेशाच्या गोष्टी सांगत असे. त्याबद्दल प्रथम तिला तिटकारा वाटे व कधींकधीं ती आपल्या सासूबाईंना दुरुत्तरांनीं ताडणहि करीत असे. पण सद्भक्ति माऊली

तें सर्व पोटांत घालून तिला प्रेमानें वागवी. सुमति व सुशीला या तिला सुविचाराच्या गोष्टी सांगून करमणूक करीत व तिच्या सेवेला नेहमीं तत्पर असत.

प्रथम प्रथम त्राटिकेला हा नवीन कार्यक्रम तुरुंगवासाप्रमाणें असह्य वाटे. कधींकधीं विजनीं स्वैरसंचार करणाऱ्या राघूला पिंजऱ्यांत कोंडला असतां जशा वेदना होत तशा वेदना तिला होत व तिची वृत्ति बेफाम होऊन आपण येथून निघून जावें असेंहि तिला वाटे व तिनें एकदोन वेळां तसा प्रयत्न केलाहि. पण विराग्याच्या चाणाक्षपणामुळें त्यांत तिला यश आलें नाहीं. एकादे वेळीं ती इतकी वैतागून जाई कीं, एकदम जीव द्यावा असेंहि तिच्या मनांत येई; परंतु सुमति व सुशीला यांच्या प्रेमळपणामुळें व गोड भाषणामुळें तिची ती ऊर्मि जागच्याजागीं जिरून जाई. पण अभ्यासाच्या योगानें व संवयीनें तोच कार्यक्रम हळुहळु तिच्या अंगवळणीं पडत चालला व तिच्या अंगचा उद्दामपणा कमी कमी होत गेला. तिच्या ठिकाणीं उज्ज्वल कर्तव्यनिष्ठा जागृत होऊं लागली. बारकाईनें आत्मनिरीक्षण करण्याची संवय लागून तिला आपले स्वतःचे गुणदोष अधिकाधिक दिसूं लागले व नैसर्गिक उच्छृंखल मनोवृत्तींना दाबांत ठेवण्याचा ती प्रयत्न करूं लागली. दिवसेंदिवस तिला हिंडणें फिरणें वगैरे बाबतींत अधिकाधिक सवलत मिळत गेली.

प्रबोधपंतांनीं आपल्या पत्नीला पहिल्यापहिल्यानें जरी कडकपणानें वागविलें तरी त्यांचें अंत:करण फार प्रेमळ असून तिच्या अंगच्या नैसर्गिक गुणांची त्यांना पुरी जाणीव होती. त्यांचा बोध प्रेमशर्करावगुंठित असून त्याचा आनंदीच्या मनावर चांगला परिणाम होत गेला, व हळुहळू तिला त्यांच्याबद्दल प्रेम वाटूं लागलें. त्यांनीं तिला कांहीं दिवस एका शाळेंतहि घातलें होतें. वर्षअखेर तिची प्रवेशपरीक्षा उतरली व तिचें नांवहि चांगलें वर आलें.

तितक्या अवधींत आनंदीची ग्राहकशक्ति काय दर्जाची आहे, तिचा नैसर्गिक कल कोणत्या विषयांकडे व कलेकडे आहे वगैरे गोष्टी त्यांना कळून आल्या व तिची बुद्धिमत्ता अलौकिक असून तिच्या अंगीं विलक्षण तडफ आहे असेंहि त्यांना आढळून आलें. तसेंच विराग्याच्या कडक पहाऱ्यांत ही वाघीण कसे काय दिवस काढते हेंहि त्यांना पाहण्यास मिळालें व आपल्या

आयुष्याचें ध्येय काय, आपल्या पत्नीनें कसें वागलें पाहिजे वगैरे संबंधींचे आपले विचारहि तिच्या कानावर घालतां आले. एकंदरींत या वर्षांत प्रबोधपंतांच्या प्रयत्नाला बरेंचसें यश आलें व त्यांना पुढील मार्ग आक्रमण करण्यास उमेद वाटूं लागली. त्यांना पक्कें माहित होतें कीं, आपल्या पत्नीच्या अंगचा उच्छृंखळपणा हा केवळ वरवरचा फेंस आहे. तेवढा एकदां नाहींसा झाला कीं, आंत आनंदसागर भरलेला आहे. " त्या आनंदाचा मी माकल व्हावें, माझी ' त्राटिका ' ( वृत्ति ) आनंदी बनावी हीच माझी इच्छा. " असें ते म्हणत व बुऱ्या व भाबड्या लोकांनीं जरी तिला नांवें ठेविलीं तरी तिला योग्य शिक्षण मिळाल्यावर ती आपल्या अंगच्या विविध गुणांनीं अखिल स्त्रीजातीला ललामभूत होईल असा त्यांना भरंवसा वाटे.

नंतर प्रबोधपंतांनीं एका स्त्रियांच्या सुप्रसिद्ध महाविद्यालयांत आपल्या पत्नीचें नांव घातलें व विराग्या, सुमति आणि सुशिला यांनाच तिच्या तैनातीला नेमिलें. हल्लींची शिक्षणपद्धति सदोष असून खऱ्या आत्मोन्नतीचें शिक्षण हें विश्वविद्यालयाच्या बाहेर ज्यानेंत्यानेंच प्रयत्न करून संपादन केलें पाहिजे असें त्यांना वाटत असे. या कामीं त्यांना गृहशिक्षणाचें फार महत्त्व वाटत असल्यामुळें ते आपल्या पत्नीला घरीं देखील शिक्षण देत असत. " हें विश्व हाच खरा नैसर्गिक ग्रंथ असून तो वाचण्यास शिकल्याशिवाय खरें शिक्षण मिळणें नाहीं." असें ते म्हणत. खरें शिक्षण म्हणजे भाराभर माहिती आपल्या मेंदूत कोंबणें नव्हे, थोर पुरुषांचे जे सिद्धांत व विचार आपण वाचतों व ऐकितों ते स्वानुभव-कसोटीला लावून पाहिल्याशिवाय आपल्या अनुभवांत भर पडणार नाहीं; म्हणून तसा प्रयत्न करून त्यांत यश मिळविणें व आपली उन्नति करून घेणें हें खरें शिक्षण असें त्यांचें मत होतें. या धोरणानें विश्वविद्यालयांत न मिळणाऱ्या निरनिराळ्या व उपयुक्त विषयांचें व कलांचें आनंदीला ज्ञान करून देण्यास त्यांनीं सुरुवात केली. तसेंच आपल्या पूर्व संस्कृतीचें महत्त्व, आर्यांचें तत्त्वज्ञान, भरतभूमीचा खरा खरा इतिहास वगैरे विषयांचें महत्त्व तिला पटविलें. तिच्या ठिकाणीं अध्यात्म विषयाचीहि गोडी उत्पन्न केली; आणि ललित विषयांचें तिला ज्ञान व्हावें म्हणून चांगल्या नाणावलेल्या तज्ज्ञांची शिक्षक म्हणून त्यांनीं नेमणूक केली. तसेंच त्यांनीं तिला

सुट्टीच्या दिवसांत गाजावाजा न करितां दुःखपीडितांना कायावाचामनानें व बंधुत्वाच्या नात्यानें शक्य ती मदत करणें वगैरे गोष्टींचे धडे प्रत्यक्ष कृतीनें शिकविले व तिला खेडेगांवांत घेऊन जाऊन तेथील लोकांची स्थिति किती खालावलेली आहे हें प्रत्यक्ष दाखवून दिलें. अशा तऱ्हेचीं लक्षावधि खेडीं-पाडीं आपल्या देशांत असून कोट्यवधि लोक खायला अन्न नाहीं व पांघरण्यास वस्त्र नाहीं अशा कंगाल स्थितींत आयुष्य कंठीत असल्यामुळें आपला देश किती विपन्नावस्थेंत आहे व ही स्थिति सुधारण्यास काय काय उपाय योजिले पाहिजेत हें त्यांनीं तिच्या मनावर चांगल्या तऱ्हेनें बिंबविलें, व जनतारूपी जनार्दनाची आराधना करणें हेंच महत्तप होय हें तिला पटवून दिलें. सद्भक्ति माऊलीच्या देखरेखीखालीं आनंदीला गृहकृत्यांचीहि चांगली माहिती झाली व सुगृहिणीपदाला जरूर असणाऱ्या सर्व गोष्टी तिला अवगत झाल्या.

याप्रमाणें महाविद्यालयांतील चार वर्षांचा कार्यक्रम पुरा होऊन आनंदी अखेरच्या परीक्षेंत पहिली आली व तिची सर्वत्र वाहवा झाली. त्यामुळें प्रबोधपंतांना व त्यांच्या सद्भक्तिमातेला अत्यानंद झाला. अजून आपलें पूर्ण समाधान झालें नाहीं असें आनंदीला वाटे व तें होईपर्यंत आपला अभ्यासक्रम सोडावयाचा नाहीं हा तिचा निर्धार होता. कारण ती असें म्हणे कीं विद्यार्थिदशेंत मनुष्याचें मन संग्राहक असतें. म्हणजे नवीन नवीन विचारांचा व नवीन गोष्टींच्या ठशांचा तें संग्रह करून ठेवीत असतें व इतर गोष्टींचें त्याच्यावर दडपण नसल्यामुळें त्याला आपली उन्नति करून घेण्यास अवसर चांगला मिळतो. त्यामुळें विद्यार्जनाचा पुढील कोणता मार्ग स्वीकारावा याबद्दल ती विचार करूं लागली.

या बाबतींत प्रबोधपंतांचे विचारहि आनंदीच्या विचारांशीं जुळते होते. त्यांना असें वाटत असे कीं, आपण देखरेखीखालीं आनंदीला येथपर्यंत शिक्षण दिलें खरें. तरी पण ती जर कांहीं दिवस आपल्यापासून दूर राहील तर तिला आजपर्यंत मिळालेल्या ज्ञानाचें शांतपणें मनन करण्यास सांपडून स्वतंत्रपणें विचार करण्याची संवय लागेल. श्रवण केलेल्या बोधाचें मनन होऊन निदिध्यास लागल्याशिवाय तो गळीं उतरत नाहीं, अनुभवखातीं

जमा होत नाहीं व साक्षात्कार होत नाहीं; आणि तसें झाल्याशिवाय अंगीं स्वावलंबन येत नाहीं. आनंदीला पुढील शिक्षणाकरितां अमेरिकेस पाठविल्यानें आपला हा हेतु सहजच साधेल असेंहि त्यांना वाटूं लागलें. परमुलखांत जाऊन, परक्या संस्कृतींत आनंदी पुढील अभ्यास करूं लागली म्हणजे तिला आजपर्यंत मिळालेलें ज्ञान कसाला लागून स्वावलंबनाचे धडे सहजच मिळतील, अंगावर जबाबदारी येऊन पडल्याशिवाय ती पार पाडण्याची धमक अंगीं येणार नाहीं, असें त्यांचें मत होतें. तरी पण आपली आनंदी, आपल्या भावी आशेचा हा गड्डा, आपल्या आंतड्याचा हा नाजुक भाग, आपला हा कलिजा, आपला हा प्राण, आपलें हें आनंदधाम अमेरिके-सारख्या देशांत गेल्यानें ती एकाद्या मोहाच्या अनिवार्य भोंवऱ्यांत सांपडून अगर एकाद्या इंद्रजालांत गुरफटून आपला सर्वच व्यूह ढांसळून पडेल कीं काय अशी शंकाहि एकाद्या वेळीं त्यांच्या मनांत डोकावे. परंतु आज-पर्यंत आपल्या सहवासांत तिला मिळालेल्या बोधाचें प्रेमजीवनाशीं संमिश्रण होऊन तिच्या उन्नतीचा पाया इतका मजबूत झालेला आहे कीं, त्याच्यावर पाश्चात्य संस्कृतीचा वाईट परिणाम होऊन तो डळमळणें शक्य नाहीं, तर उलट तो अधिक मजबूत होईल, ही त्यांना खात्री वाटत असल्यामुळें त्यांचा निश्चय कायम राहिला.

तसेंच प्रबोधपंतांचें असें मत होतें कीं, परकें तें सर्व तुच्छ मानण्याच्या कूपमंडूकवृत्तीनें आपल्या समाजाचें फार नुकसान झालें आहे. तेव्हां सुधारणेचा कळस जेथें झाला आहे, असें समजण्यांत येतें अशा अमेरिकेसारख्या ठिकाणीं आपल्या पत्नीचें कांहीं वर्षें अध्ययन झाल्यास तिला पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतींचा व समाजरचनांचा तुलनात्मक बुद्धीनें अभ्यास करितां येईल व त्यायोगें तिची दृष्टि व्यापक होईल. तेव्हां त्या उभयतांनीं पूर्ण विचार करून, सद्भक्ति माउलीची संमति मिळवून, आपल्या इष्टमित्रांचा सल्ला घेऊन व जरूर ती चवकशी करून आनंदीस अमेरिकेस पाठविण्याचा बेत कायम केला व सर्वसिद्धता झाली. तिच्या बरोबर जाण्याकरितां विराग्या, सुमति व सुशीला या त्रयींचीच योजना झाली व प्रबोधपंतांनीं अमेरिकेंतील आपल्या कांहीं स्नेह्यांना पत्रें पाठवून तेथील व्यवस्था करविली.

शुभ मुहूर्तावर सद्भक्तिमाउलीचा शुभाशीर्वाद घेऊन आनंदी मोठ्या उत्साहानें अमेरिकेला जाण्याकरितां निघाली. बोटीच्या धक्क्यापर्यंत प्रबोधपंत व इतर कांहीं मंडळी तिच्याबरोबर होतीच. बोट सुटण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली, तसतशी वियोगाची कल्पना मनांत येऊन आनंदी व प्रबोधपंत या उभयतांचीं अन्तःकरणें भरून आलीं. उभयतांच्या इतक्या दिवसांच्या जिव्हाळ्याच्या सहवासानें त्यांना परस्परांबद्दल अत्यंत गाढ प्रेम वाटूं लागलें होतें. त्यामुळें हा ताटातुटीचा प्रसंग उभयतांनाहि असह्य वाटत होता. तरी दोघांनींहि जगन्नियंत्याच्या वात्सल्यावर व स्वकर्तव्यावर नजर देऊन तो आवेग आंवरून धरिला व तीन वर्षांची भेट, जणुं उभयतांच्या दृष्टीच्या एकाच गाढ मीलनानें घेऊन जड पावलें टाकीत प्रबोधपंत परत फिरले व बोट चालू झाली. तरी प्रबोधपंत धक्क्यावरच उभे होते व तीं दोघें एकमेकांना दिसेनाशीं होईपर्यंत त्या उभयतांनीं परस्परांच्या दर्शनसुखाचा लाभ घेतला.

प्रबोधपंत घरीं आल्यावर त्यांना कांहीं वेळ चुकल्याचुकल्यासारखें झालें. तरी जसजसे ते आपल्या रोजच्या व्यवसायांत गर्क झाले तसतसें त्यांचें वियोगदुःख कमी कमी होत गेलें. पण आनंदीची स्थिति मात्र निराळ्या प्रकारची झाली. प्रबोधपंत धक्क्यावर उभे असलेले तिला दिसत होते तोंपर्यंत तिची दृष्टि त्या मनमोहन सगुण मूर्तीवर अगदीं खिळून राहिली होती व वियोगाचाहि तिला जवळजवळ विसर पडला होता. परंतु ते दृष्टिआड होऊन बोट जसजशी पुढें चालूं लागली, तसतशी तिची स्थिति विलक्षण होऊं लागली. आपल्या हृत्पटलावर कोरून ठेविलेल्या प्रबोधपंतांचें ध्यान करण्यांत गुंगून जाऊन आपण कोठें आहोंत याचेंहि तिला भान राहिलें नाहीं. अशा स्थितींत ती असतां आपण स्वतः व प्रबोधपंत एकजीव झालोंसें वाटून तिला जें प्रेमाचें भरतें आलें त्याबरोबर ती देहभानहि विसरत चालली व आपला अन्तर्बाह्य प्रेमसागरच भरलेला असून आपण त्यांतील मत्स्य आहोंत असें तिला वाटूं लागलें. तिच्या नेत्रांवाटें प्रेमाश्रूंच्या धारा सारख्या चालू होत्या, अंगावर रोमांच उभे राहिले होते व सर्व अंग पिळवटल्यासारखें होऊन आंतून एकसारखे प्रेमाचे जोराचे हुंदके येत होते. इतक्यांत तिचें भानहि उडाल्यासारखें झालें. थोड्या वेळानें ती जरा भानावर आली व रुमालानें अश्रूंनीं

डबडबलेले डोळे वैगेर पुसून ती विचार करूं लागली, तेव्हां हा काय प्रकार आहे याचें तिलाच आश्चर्य वाटूं लागलें. हा प्रकार वियोगदु:खानें झाला असें तिला म्हणवेना. कारण या थोडक्या वेळांत तिला अनुपम सुखाचा लाभ झाला. तसेंच जी विदुषी उच्च ध्येयानें प्रेरित होऊन, पूर्ण विचारांतीं इतक्या लांबवरच्या प्रवासाला निघाली ती एखाद्या सामान्य पोरीप्रमाणें वियोगदु:खानें इतकी विव्हल होईल हें शक्यच नव्हतें. हे दु:खाश्रु नसून प्रेमाश्रु आहेत असें तिला वाटूं लागलें व दु:खाच्या योगानें येणारी नाउमेद व वाटणारा शीण यांसारखा अनिष्ट परिणामहि या प्रकारानें आपल्या मनावर झालासें तिला वाटेना. उलट तिची उमेद व प्रसन्नताहि वाढली व तिला अधिक धीर आला. पण हें काय आहे हें तिला समजेना. असें कां झालें याची तिला अटकळ होईना. आपल्या अन्तरींच्या शुद्ध प्रेमाचेंच हें उधान असेल काय? निर्विषय सुखाचेंच हें अवतरण काय? ब्रह्मानंदलहरी ती हीच काय? हें गुरु( प्रबोध )प्रसादाचेंच लक्षण काय? हें ईशकृपेचेंच चिन्ह काय? वगैरे विचार तिच्या मनांत येऊं लागले व हा अननुभूत असा कांहींतरी निराळाच प्रकार आहे अशी तिनें आपल्या मनाशीं खूणगांठ बांधिली व नंतर तिला अधिकच धीर वाटूं लागला. पुढें पुढें मधून मधून प्रबोधपंतांची आठवण होऊन तिची अशा तऱ्हेची स्थिति होई. त्यांची आठवण म्हणजेच मनोत्साह, त्यांचें स्मरण म्हणजेच उल्हास अशी तिची स्थिति होत गेली. दिवसेंदिवस प्रबोधपंत म्हणजेच शुद्ध प्रेम, ते म्हणजे प्रेमाचीच घडलेली मूर्ति असून ते आपल्याबरोबरच आले आहेत ही गोष्ट तिला अधिकाधिक बाणत चालली.

आनंदी अमेरिकेस जाऊन तिनें आपला अभ्यासक्रम सुरू केला. ज्ञानाद्रीचा हा अखेरचा टप्पा मात्र तिला फार त्रासाचा झाला. परका मुलूख, तेथील संस्कृति अगदीं भिन्न, तेथील लोकांची राहणी व त्यांचे विचार हीं अगदीं निराळीं. त्यामुळें प्रथम कांहीं दिवस तिला फार जड गेले. पण कांहीं झालें तरी आपलें ध्येय गांठण्याचा तिनें दृढ निश्चय केला असल्यामुळें तिनें आपला धीर कधीं खचूं दिला नाहीं. प्रबोधपंतांच्या प्रेमळ बोधाची जागृति, विद्येची खरी खरी अभिरुचि, अभ्यासानें अंगीं मुरलेली उद्योगशीलता,

विराग्याच्या कडक शिस्तीमुळें झालेली कष्ट सोसण्याची संवय, सुमति व सुशीला यांचा गोड सहवास यांमुळें पाश्चात्यांच्या दिखाऊ व मोहक चोचल्यांनीं दिपून न जातां व अडचणींना न जुमानतां तिनें आपला अभ्यासक्रम नेटानें पुढें चालविला. प्रबोधपंतांच्या रूपाचें ध्यान व त्यांच्या नांवाचा जप हाच तिचा फुरसतीच्या वेळचा कार्यक्रम होऊन बसल्यामुळें तिचा वेळ आनंदांत जात असे व त्यायोगें तिला नवजीवनाचा लाभ होऊन पुढें पाऊल टाकण्यास उमेद येई. प्रबोधाचें ध्यान करितांकरितां ती प्रत्यक्ष बोधरूपच बनत चालली व सतत त्यांच्या नांवाचा गुंजारव करण्याची संवय अंगीं जडल्यामुळें तिची वृत्ति निजरंगीं रंगूं लागली. ती इतकी कीं, कधीं कधीं झोंपेंतसुद्धां "प्रबोध" "प्रबोध" म्हणून ती बडबडत असल्याचें सुमति व सुशीला यांना ऐकूं येत असे.

तेथें गेल्यापासून दर आठवड्याला ती प्रबोधपंतांना नेमानें पत्र पाठवीत असे. तिच्या पत्रांत प्रेक्षणीय स्थळांचीं रसभरित वर्णनें, तेथील लोकांच्या कांहीं रीतीरिवाजांची माहिती, स्वतःचें व बरोबरीच्या मंडळींचें प्रकृतिमान, तेथील हवापाणी वगैरे मामुली मजकूर असेच. तरीपण प्रबोधपंतांना पत्र लिहिणें म्हणजे आपल्या प्रेमाला उजळा देणेंच होय असें तिला वाटे. कारण त्यांना पत्र लिहिण्याची नुसती कल्पना मनांत उद्भवल्यापासून हृदयीं सांठवून ठेविलेल्या प्रबोधपंतांच्या प्रेममूर्तीचें तिला ध्यान लागून राही. प्रबोधपंत म्हणजे केवळ प्रेमाची मूर्ति, शुद्ध प्रेमस्वरूपच अशी तिची भावना असल्यामुळें तिच्या अंतरींच्या त्या प्रेममूर्तीशीं तिनें केलेलें हितगुज, प्रेमकलह, हास्यविनोद या सर्वांचें प्रतिबिंब तिच्या लेखणीच्या द्वारें तिच्या पत्रांत उतरत असे. तिचें पत्र म्हणजे आपल्या आनंदीच्या हृदयाचा फोटोग्राफच होय, असें प्रबोधपंतांना वाटे व तें वाचीत असतां आपली आनंदी आपल्या जवळच—नव्हे आपल्यांतच—आहे असा भास होऊन त्यांना तिच्या प्रत्यक्ष सहवाससुखाचाच अनुभव घेण्यास मिळे. प्रबोधपंतहि मधूनमधून तिला बोधपर व प्रेमाचीं पत्रें पाठवीत व तिला तीं संजीवनीमात्रेप्रमाणेंच वाटत.

अशा तऱ्हेनें त्यांच्या परस्परांच्या अन्तःकरणांना पत्रद्वारें प्रेमजीवन मिळत गल्यामुळें वियोगाग्नीची दाहकता त्यांना फारशी जाणवली नाहीं. इतकेंच

नव्हे तर एकाच प्रेमस्वरूपाचीं हीं दोन अंगें, एकाच आंतड्याचे हे दोन भाग एकत्र असतां जो प्रेमाचा ओघ संथपणें वाहत असे त्याला, हीं दोन अंगें, हे दोन भाग, दूर फेंकलें गेल्यामुळें, जें वारंवार भरतें येई, त्यायोगें त्यांना अननुभूत अशा प्रेमसोहाळ्याचा अनुभव घेण्यास मिळाला; व अगोदरच गाढ असलेल्या त्यांच्या परस्परांवरील प्रेमाची घोंटणी होऊन तें अविरल व गाढतम झालें व प्रत्येक पत्राबरोबरच त्याच्यावर एकेक पुट बसत चाललें. तसेंच आनंदीच्या अंतःकरणांतील उच्च भावनांना तिच्या शिक्षणानें किंचित्‌हि धक्का न लागतां त्या अधिक उद्दीपित व तीव्र झाल्या. प्रबोधपंत व आनंदी यांच्यामधील तो पत्रव्यवहार म्हणजे दिव्य प्रेमरत्नांचा खजिना व बोधरत्नांचें भांडारच होय. तो खजिना व तें भांडार ज्या भाग्यवंतांना लुटण्यास मिळेल ते धन्य होतील.

एकंदरींत परस्परांपासून झालेला हा वियोग त्या उभयतांना उपकारच वाटूं लागला. कारण त्यायोगें परस्परांमधील प्रेमाला वाट मिळून त्यांनीं लिहिलेल्या पत्रांच्या द्वारें प्रेमरसाचा जोराचा प्रवाह सुरू झाला व त्याच्या लाटांच्या आंदोलनाचे हेलकावे खात त्यांना स्वर्गीय सुखाचा अनुभव घेण्यास मिळून त्यांचेमधील प्रेम वृद्धिंगत होत गेलें.

आनंदीनें या तीन वर्षांच्या अवधींत तेथील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचें बारकाईनें निरीक्षण करून महत्त्वाच्या प्रचलित प्रश्नांचाहि अभ्यास केला व पाश्चात्यांच्या संस्कृतीपेक्षां आपली संस्कृति किती उज्ज्वल आहे याची तिला साक्ष पटली. तसेंच हिंदी संस्कृति, हिंदु धर्म, वेदान्तशास्त्र व आर्य स्त्रियांचें कर्तव्य वगैरे विषयांवर चांगल्या विद्वान मंडळींपुढें तिचीं बरींच व्याख्यानें झालीं व तिलाहि बऱ्याच विद्वान व गुणी लोकांच्या संगतीचा लाभ झाला.

अशा तऱ्हेनें तीन वर्षें अमेरिकेंत काढल्यावर आनंदीनें पीएच्.डी.ची बहुमानाची डिग्री मिळविली व तिची तिकडे मोठी वाहवा झाली. तावडतोब ही बातमी तिनें प्रबोधपंतांना तारेनें कळविली. ती तार वाचून त्यांना जो आनंद झाला तो गगनांत मावेना. आपण कृतकृत्य झालोंसें वाटून त्यांनीं लवकर निघून येण्याबद्दल आनंदीला तार केली. त्याप्रमाणें

तिनें तावडतोब निघण्याचा बेत ठरवून निघाली. आपण कोणत्या बोटीनें, कोणत्या दिवशीं मुंबईस पोहोंचूं याबद्दलची तिनें प्रबोधपंतांना आगाऊ सूचना दिली.

आपल्या प्रिय पत्नीच्या आगबोटीची वाट पाहात प्रबोधपंत बंदरावर उभे होते. ते आनंदीच्या भेटीला अगदीं आतुर झाले होते. इतक्यांत बोट धक्क्याला लागली. थोड्याच वेळांत विराग्या, सुमति व सुशीला यांच्यासह आनंदी बोटींतून उतरतांना त्यांना दिसली. त्यासरसें ते तसेच पुढें धांवत गेले व तिची आणि त्यांची दृष्टादृष्ट झाली. त्या वेळीं आनंदीच्या अंतः-करणाची जी स्थिति झाली तिचें शब्दांनीं यथार्थ वर्णन करणें अशक्य आहे. त्यांच्याबद्दलचें तिचें निरतिशय प्रेम व तिला वाटत असलेलें त्यांच्या अनंत उपकारांचें ओझें हीं असह्य होऊन तिला गहिंवरून आलें व अभ्यासाच्या दगदगीनें ती अगोदरच कृश झालेली असल्यामुळें तिला आलेला गहिंवर अनावर होऊन प्रेमोद्रेकानें आपलें हृदय फुटून जातें कीं काय असें तिला झालें व ती आतुरतेनें कशीबशी गर्दींतून मार्ग काढीत चालली. प्रबोधपंतहि लगबगीनें पुढें जात होते. थोड्याच वेळांत त्या उभयतांची भेट होऊन त्यांना जो अत्यानंद झाला, त्याचें शब्दांनीं वर्णन होणें नाहीं. तो समरसानंद केवळ अनुभवगम्य असल्यामुळें त्याचा नामनिर्देश करण्यापलीकडे शब्द कांहीं करूं शकत नाहींत. याप्रमाणें आपलें ध्येय गांठून कृतकृत्य झालेली आनंदी ( अन्वय मार्गानें ) परत येत असतां पहिल्या प्रेमभोंवऱ्यांत सांपडली.

आनंदीचा प्रबोधपंतांशीं—( श्रद्धासरितेचा बोधसागराशीं ) समरस झालेला पाहून एवढा अरसिक विराग्या पण त्यालाहि गहिंवर आला व त्याच्या उग्र दिसणाऱ्या डोळ्यांत प्रेमाश्रु उभे राहिले. सुमति व सुशीला यांनाहि अत्या-नंद झाला.

नंतर लवकरच प्रबोधपंत आपल्या प्रिय पत्नीसह आपल्या घरीं आले. आनंदी स्वगृहीं येतांच तिनें आपल्या सासूबाईच्या—सद्भक्ति मातेच्या—पायांवर मस्तक ठेवून अश्रुपूर्ण नयनांनीं गत अपराधांबद्दल त्यांना क्षमेची याचना केली. पण त्या माउलीला कसली मागली आठवण होणार ? ज्ञानमाताच ती. आपल्या सुनेचें मुखकमल पहातांच तिचें हृदय भरून आलें व तिनें

आनंदीला घट्ट पोटाशीं धरून तिच्या पाठीवरून व हनुवटीवरून कुरवाळीत तिला अखंड सौभाग्य व उदंड ' औक्ष ' चिंतून अनंत आशीर्वाद दिले. प्रबोधाची जननी सद्भक्ति व पत्नी आनंदी या उभयतांची ही प्रेमभेट म्हणजे कृष्णा-पंचगंगा-संगमच होय. अमेरिकेंतून परत आल्यापासूनचा ( अन्वय मार्गावरचा ) आनंदीचा हा दुसरा प्रेमभोंवरा होय.

आपली लेक अमेरिकेंतून परत आल्याचें समजतांच जिवाजीपंतांनीं प्रबोधपंतांना आपल्या पत्नीसह येऊन भेटण्याची आग्रहाची विनंति केली व त्या विनंतीला मान देऊन—किंवा त्यांच्या विनंतीला मान देऊन कशाला, तर जिवाजीपंतांच्या भेटीची तीव्र उत्कंठा लागून—प्रबोधपंत आपल्या आनंदीसह त्यांच्या गांवीं जाण्यास निघाले.

वरील हकीगत सांगत असतां राजाभाऊचा कंठ दाटून आला होता. तो आपले प्रेमाश्रु पुसून पाहतो तों वीरेश्वराची स्थिति विलक्षण झालेली दिसली. त्याचें अंतःकरण जात्याच कोमल असल्यामुळें राजाभाऊच्या तोंडून हीं प्रेमभोंवऱ्यांचीं रसभरित वर्णनें ऐकून तो ओक्साबोक्शीं रडत होता व दिनेश्वर " आनंदलें मन। प्रेमें पाझरती लोचन " असें आपल्याशींच हलके हलके पुटपुटत होता. वीरेश्वराचा तो आवेग कमी झाल्यावर राजाभाऊ पुन्हा बोलूं लागला.

## अंक पांचवा

आजचा दिवस आनंदाचा. जिकडेतिकडे आनंदाचें साम्राज्य पसरलें होतें. आज त्राटिका सुसंस्कृत होऊन आपल्या प्रिय पतीसह बऱ्याच वर्षांनीं आपल्या गलितगात्र झालेल्या वृद्ध पित्याला म्हणजे जिवाजीपंतांना भेटण्याकरितां येणार. लग्न झाल्याबरोबर तिला प्रबोधपंत घेऊन गेले त्यानंतर तिची व वडिलांची ही पहिलीच भेट. त्यांतून जिच्या द्वाडपणाचा बोभाटा सगळीकडे झालेला व जिला मागणी घालण्यालाहि कोणी धजत नव्हता, तीच त्राटिका यक्षिणीची कांडी फिरल्याबरोबर प्रबोधपंतांच्या अद्भुत सामर्थ्यानें व दिव्य बोधानें विदुषी होऊन आपल्या प्रिय पतीसह पितृदर्शनाला आज येत आहे. काय हा अपूर्व योग! ही बातमी ऐकून कोणाला सकौतुक आनंद होणार नाहीं ?

प्रबोधपंत व त्राटिका यांच्या स्वागताकरितां जिवाजीपंतांनीं आरंभिलेल्या उत्सवसमारंभांत गांवांतील आबालवृद्ध स्त्रीपुरुष सामील झाले होते. अगोदरच जिवाजीपंतांचा नांवलौकिक फार मोठा. त्यांच्याबद्दल सर्वांना आदर. त्यांतून आजचा हा अपूर्व आनंदपर्वणीचा योग आलेला. तेव्हां असली सुसंधी कोण दवडणार ? कुसुमाकराच्या नवजीवन देणगींतून कोणी वगळलें जातें काय ? एकादें रोपटें कितीहि रोडावलेलें असलें, एकादी वेल कितीहि कांटेरी व गलितपत्र झालेली असली तरी तो आपल्या अमृतसंजीवनीनें त्यांना तजेला आणून त्यांच्या अंगावर पत्रफलपुष्पांचे सुंदर अलंकार घालून त्यांना आपल्या वसंतोत्सवांत सामील करून घेतो, त्याचप्रमाणें आजच्या या महोत्सवप्रसंगीं सर्वांनाच आनंद होऊन, श्रीमंतगरीब, लहानथोर व सुमतिदुर्मति सर्वच त्यांत सामील झाले. कामक्रोधांसारखे दुष्ट दुर्जनहि आपापले देहस्वभाव थोडा वेळ विसरून जाऊन या सुखसोहळ्यांत मिसळले. आनंदसागराला भरतें येऊन त्यानें सर्व अंत:करण व्यापून टाकल्यावर बिचाऱ्या क्षुद्र मनोविकारांचा पाड काय ? तेहि त्या सागराच्या प्रचंड लाटांत गारद झालेच पाहिजेत.

भगवान् हिरण्यगर्भाच्या आगमनाची खबर देण्याकरितां उष:कालची गोड प्रभा जसजशी फाकूं लागली तसतशी भावी आनंदाची सूचक जी प्रसन्नता ती सर्वांच्या मुखकमलांवर अधिकाधिक चमकूं लागली. आजचा भगवत्प्रसादाचा सुदिन. तेव्हां प्रसन्नतेला काय वाण ? प्रसाद म्हणजेच प्रसन्नता नव्हे काय ? आज होणाऱ्या स्वागतसमारंभाच्या तयारीची जिकडे तिकडे एकच गर्दी उडून गेली होती. सृष्टिमाताहि आपला हिरवा शालु परिधान करून फलपुष्पादि उत्तमोत्तम अलंकार घालून आपल्या जिवलग अपत्यांच्या स्वागतसमारंभांत प्रेमभरानें सामील झाली होती. त्या गांवांतील सर्व घरांवर ध्वजा, तोरणें वगैरे उभारलीं होतीं. जिवाजीपंतांनीं स्वागतसमारंभाकरितां एक भव्य व सुंदर मंडप उभारून तो थाटानें शृंगारला होता.

जिवाजीपंत फार अशक्त झाले असल्यामुळें त्यांची धाकटी मुलगी सौ. शांताबाई व धाकटे जांवई श्रीयुत विवेक हीं उभयतां प्रबोधपंतांचें व सौ. आनंदीबाईंचें स्वागत करण्याकरितां मोठ्या लवाजम्यानिशीं गांवच्या वेशी-पाशीं सामोरीं गेलीं होतीं. आनंदीताईची व शांतामाईची दृष्टादृष्ट होतांच

आनंदीला घट्ट पोटाशीं धरून तिच्या पाठीवरून व हनुवटीवरून कुरवाळीत तिला अखंड सौभाग्य व उदंड 'औक्ष' चिंतून अनंत आशीर्वाद दिले. प्रबोधाची जननी सद्भक्ति व पत्नी आनंदी या उभयतांची ही प्रेमभेट म्हणजे कृष्णा-पंचगंगा-संगमच होय. अमेरिकेंतून परत आल्यापासूनचा (अन्वय मार्गा-वरचा) आनंदीचा हा दुसरा प्रेमभोंवरा होय.

आपली लेक अमेरिकेंतून परत आल्याचें समजतांच जिवाजीपंतांनीं प्रबोध-पंतांना आपल्या पत्नीसह येऊन भेटण्याची आग्रहाची विनंति केली व त्या विनंतिला मान देऊन—किंवा त्यांच्या विनंतीला मान देऊन कशाला, तर जिवाजीपंतांच्या भेटीची तीव्र उत्कंठा लागून—प्रबोधपंत आपल्या आनंदीसह त्यांच्या गांवीं जाण्यास निघाले.

वरील हकीगत सांगत असतां राजाभाऊचा कंठ दाटून आला होता. तो आपले प्रेमाश्रु पुसून पाहतो तों वीरेश्वराची स्थिति विलक्षण झालेली दिसली. त्याचें अंतःकरण जात्याच कोमल असल्यामुळें राजाभाऊच्या तोंडून हीं प्रेम-भोंवऱ्यांचीं रसभरित वर्णनें ऐकून तो ओक्साबोक्शीं रडत होता व दिनेश्वर "आनंदलें मन। प्रेमें पाझरती लोचन" असें आपल्याशींच हलके हलके पुटपुटत होता. वीरेश्वराचा तो आवेग कमी झाल्यावर राजाभाऊ पुन्हा बोलूं लागला.

## अंक पांचवा

आजचा दिवस आनंदाचा. जिकडेतिकडे आनंदाचें साम्राज्य पसरलें होतें. आज त्राटिका सुसंस्कृत होऊन आपल्या प्रिय पतीसह बऱ्याच वर्षांनीं आपल्या गलितगात्र झालेल्या वृद्ध पित्याला म्हणजे जिवाजीपंतांना भेटण्या-करितां येणार. लग्न झाल्याबरोबर तिला प्रबोधपंत घेऊन गेले त्यानंतर तिची व वडिलांची ही पहिलीच भेट. त्यांतून जिच्या द्वाडपणाचा बोभाटा सगळीकडे झालेला व जिला मागणी घालण्यालाहि कोणी धजत नव्हता, तीच त्राटिका यक्षिणीची कांडी फिरल्याबरोबर प्रबोधपंतांच्या अद्भुत सामर्थ्यानें व दिव्य बोधानें विदुषी होऊन आपल्या प्रिय पतीसह पितृदर्शनाला आज येत आहे. काय हा अपूर्व योग! ही बातमी ऐकून कोणाला सकौतुक आनंद होणार नाहीं?

प्रबोधपंत व त्राटिका यांच्या स्वागताकरितां जिवाजीपंतांनीं आरंभिलेल्या उत्सवसमारंभांत गांवांतील आबालवृद्ध स्त्रीपुरुष सामील झाले होते. अगोदरच जिवाजीपंतांचा नांवलौकिक फार मोठा. त्यांच्याबद्दल सर्वांना आदर. त्यांतून आजचा हा अपूर्व आनंदपर्वणीचा योग आलेला. तेव्हां असली सुसंधी कोण दवडणार ? कुसुमाकराच्या नवजीवन देणगींतून कोणी वगळलें जातें काय ? एकादें रोपटें कितीहि रोडावलेलें असलें, एकादी वेल कितीहि कांटेरी व गलितपत्र झालेली असली तरी तो आपल्या अमृतसंजीवनीनें त्यांना तजेला आणून त्यांच्या अंगावर पत्रफलपुष्पांचे सुंदर अलंकार घालून त्यांना आपल्या वसंतोत्सवांत सामील करून घेतो, त्याचप्रमाणें आजच्या या महोत्सवप्रसंगीं सर्वांनाच आनंद होऊन, श्रीमंतगरीब, लहानथोर व सुमतिदुर्मति सर्वच त्यांत सामील झाले. कामक्रोधांसारखे दुष्ट दुर्जनहि आपापले देहस्वभाव थोडा वेळ विसरून जाऊन या सुखसोहळ्यांत मिसळले. आनंदसागराला भरतें येऊन त्यानें सर्व अंत:करण व्यापून टाकल्यावर बिचाऱ्या क्षुद्र मनोविकारांचा पाड काय ? तेहि त्या सागराच्या प्रचंड लाटांत गारद झालेच पाहिजेत.

भगवान् हिरण्यगर्भाच्या आगमनाची खबर देण्याकरितां उषःकालची गोड प्रभा जसजशी फाकूं लागली तसतशी भावी आनंदाची सूचक जी प्रसन्नता ती सर्वांच्या मुखकमलांवर अधिकाधिक चमकूं लागली. आजचा भगवत्प्रसादाचा सुदिन. तेव्हां प्रसन्नतेला काय वाण ? प्रसाद म्हणजेच प्रसन्नता नव्हे काय ? आज होणाऱ्या स्वागतसमारंभाच्या तयारीची जिकडे तिकडे एकच गर्दी उडून गेली होती. सृष्टिमाताहि आपला हिरवा शालु परिधान करून फलपुष्पादि उत्तमोत्तम अलंकार घालून आपल्या जिवलग अपत्यांच्या स्वागतसमारंभांत प्रेमभरानें सामील झाली होती. त्या गांवांतील सर्व घरांवर ध्वजा, तोरणें वगैरे उभारलीं होतीं. जिवाजीपंतांनीं स्वागतसमारंभाकरितां एक भव्य व सुंदर मंडप उभारून तो थाटानें शृंगारला होता.

जिवाजीपंत फार अशक्त झाले असल्यामुळें त्यांची धाकटी मुलगी सौ. शांताबाई व धाकटे जांवई श्रीयुत विवेक हीं उभयतां प्रबोधपंतांचें व सौ. आनंदीबाईचें स्वागत करण्याकरितां मोठ्या लवाजम्यानिशीं गांवच्या वेशी-पाशीं सामोरीं गेलीं होतीं. आनंदीताईची व शांतामाईची दृष्टादृष्ट होतांच

गंगायमुनांचे हे प्रचंड प्रवाह दूरदूर कसे राहणार! तें शक्यच नव्हतें. अगोदरच स्त्रीहृदय कोमल व भावनाप्रधान, त्यांतच आईवांचून पोरक्या असलेल्या बहिणीबहिणींची फार वर्षांनीं भेट झालेली. त्यामुळें त्या एकमेकींना कडकडून भेटल्या व दोघींचीं अन्तःकरणें प्रेमानें भरून आलीं. तेव्हां शब्द कसा बाहेर पडावा! बोलावें कोणी! तेव्हां या अपूर्व संगमानें आलेला प्रेमपूर नेत्रांच्या द्वारें थोडासा ओसरल्यावर त्या एकमेकींना कुशल विचारूं लागल्या. इकडे प्रबोधपंत व विवेक हे उभयतां जिवलग मित्रांप्रमाणें एकमेकांना भेटले. पण ते दोघेहि विचारी व प्रसंग पाहून वागणारे, तेव्हां त्यांची भेट प्रेमाची पण शिष्टाचाराला धरून झाली. थोड्या वेळानें आनंदी या तिसऱ्या प्रेमभोंवऱ्यांतून कशीबशी बाहेर पडली व वाद्यांच्या गजरांत मिरवणूक चालू झाली.

या मिरवणुकीबरोबर श्रीयुत मत्सरहि आले होते. सर्वांसमक्ष झालेल्या प्रेमभेटी—आणि त्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांत पाहून—ते जरा नाक मुरडूं लागले. पण त्या सर्वच वातावरणांत शुद्ध प्रेमाचें साम्राज्य पसरलेलें असल्यामुळें त्यांच्या मनांतील किंतु जागच्या जागीं जिरून तेहि आनंदीचें कौतुक करूं लागले. नंतर ती मिरवणूक वाजत-गाजत गांवभर हिंडून स्वागत-समारंभाच्या मंडपाशीं आली.

जिवाजीपंत जरी आपल्या उच्चासनावर पडून होते तरी त्या मिरवणुकींतील वाद्यांचा गजर जसजसा त्यांच्या कानावर येऊं लागला तसतशा त्यांना आनंदाच्या उकळ्या येऊं लागल्या; व आपल्या जागेवरून मंडपाच्या दाराशीं एकदम उडून जावेंसें त्यांना वाटूं लागलें. इतके ते आपल्या लेकीच्या व जांवयाच्या भेटीला आतुर झाले होते. मिरवणूक मंडपाजवळ येऊन प्रबोधपंत व आनंदी मंडपाच्या प्रवेशद्वाराशीं येतांच, शांताबाईनीं अगोदर योजना केल्याप्रमाणें, त्यांच्यावर पुष्पवृष्टि करण्यांत आली व शांताबाईनीं स्वतः चटकन् पुढें होऊन प्रेमभरित अन्तःकरणानें व अश्रुपूर्ण नयनांनीं त्या उभयतांना कुंकुमतिलक ( प्रेमचिन्ह ) लावून सुमनहार घातले व पंचारतीनें ओंवाळिलें. इतक्यांत प्रबोधपंतांनीं शांतामाईच्या हातांतील सुवर्ण तबकांत चिद्रत्नहाराची ओंवाळणी घातली. त्याबरोबर सर्व मंडळींनीं जो टाळयांचा प्रचंड गजर केला त्यायोगें जिवाजीपंतांच्या अंगांत प्रेमवारें भरून ते नीट बसले राहिले. तोंच

' त्राटिके'ची नजर त्यांच्याकडे गेली; व इकडे तिकडे न बघतां ती तडक वडिलांकडे धांवतच गेली; आणि तिनें आपलें मस्तक त्यांच्या पायांवर टेविलें तेव्हां तिला प्रेमाचें जें भरतें आलें त्यायोगें तेथून चटकन् उठणें तिला अशक्य झालें, व तिनें आपल्या प्रेमाश्रूंनीं वडिलांच्या चरणकमलांवर सिंचन केलें. अशा तऱ्हेनें आनंदी या चवथ्या व अत्यंत जोराच्या प्रेमभोंवऱ्यांत सांपडली. जिवाजीपंतहि या प्रेमभोंवऱ्यांत सांपडून अपत्यप्रेमानें व वात्सल्यभरानें त्यांचें अन्तःकरण इतकें भारावलें कीं ' बाळे, ऊठ ' म्हणून ते खालीं वांकून तिला उठविणार इतक्यांत ते स्वतःच कोलमडून पडतात कीं काय असें वाटूं लागलें. पण प्रबोधपंत जवळच असल्यामुळें त्यांनीं त्यांना सांवरुन धरिलें. जिवाजीपंतांनीं त्राटिकेचा हात धरुन तिला आपल्याच कोंचावर आपल्या डाव्या हाताला बसविलें व प्रबोधपंतांना प्रेमानें आलिंगन देऊन त्यांना आपल्या उजव्या हाताला बसविलें व समारंभास सुरुवात झाली.

प्रथम सौ. शांताबाईनीं खड्या सुरांत आपल्या मधुर आवाजानें " सुबोध उदेला। महानंद झाला ।। " ( द. प्रे. लहरी, पद १५१५ ) दत्तमहाराजांचें हें पद भैरवी रागांत म्हटलें. त्यांचें तें सुस्वर गायन चाललें असतां सर्व मंडळी चित्रासारखी तटस्थ बसली होती. अगोदरच ती सकाळची शांत वेळ, त्यांत शांतीचे मधुर आलाप, यामुळें अगोदरच प्रसन्न असलेल्या सर्वांच्या चित्तवृत्ति इतक्या उचंबळल्या कीं, कांहीं जणांच्या नेत्रांतून आनंदाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. विराग्यासुद्धां आपला नेहमींचा कठोरपणा विसरुन बेहोष बनला व तो नाचूंउडूं लागला. शांताबाईचें पद सुरू झाल्यापासून तो एकसारखा आपल्या वस्त्रानें आपले प्रेमाश्रु पुशीत होता. तें पद संपतें तों जिकडेतिकडे एकच आनंदाचें साम्राज्य पसरलेलें दिसत होतें. प्रत्यक्ष स्वर्गच भूलोकीं आला आहे कीं काय असेंहि कित्येकांना वाटूं लागलें ! इतक्यांत जिवाजीपंत बोलूं लागले. अगोदरच ते अशक्त झालेले. त्यांतून नुकतेंच त्यांनीं जोराच्या प्रेमभोंवऱ्यांतून आपलें डोकें वर काढलें होतें. त्यामुळें प्रथम त्यांच्या तोंडून शब्दच बाहेर पडेना. तरी पण थोडें प्रसंगावधान राखून ते हलक्या आवाजानें बोलूं लागले.

ते म्हणाले, " प्रबोधपंत, बाळे, आज मी धन्य झालों. खरोखर आज

मला भगवान् शंकराचा प्रसाद लाभला. मी आनंदसागरांत पोहत आहेंसें मला वाटत आहे. बाळे, तुझी ताटातूट झाल्यापासून मी इतके दिवस मुठींत जीव घेऊन कसेबसे लोटले. राजा दशरथाप्रमाणें वियोगाग्नीनें होरपळत माझा शेवट होतो कीं काय अशी नेहमीं भीति वाटे. पण दशरथापेक्षां मी कितीतरी भाग्यवान्! ईशकृपेनें आज रामनवमीच्या शुभ दिवशीं मला तुम्हां उभयतांच्या भेटीचा हा परमानंदाचा सुखसोहळा पाहण्याचें भाग्य लाभलें. प्रबोधपंत, तुमचे माझ्यावर इतके अगणित उपकार झाले आहेत कीं, त्यांची माझ्याकडून कधींहि फेड होणें शक्य नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांच्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञताहि मला बोलून दाखवितां येत नाहीं. निराशेनें करपून जात असलेल्या माझ्या जीवाला तुम्हीं प्रेमजीवन दिलेंत. माझ्या ‘ त्राटिके ’ची ‘ आनंदी ’ केलीत. माझ्या अनेक जन्मींचें संचित सुकृत आज फळास आलें. त्याशिवाय, प्रबोधपंत, तुमचे पाय माझ्या या हृन्मंदिराला कसे लागले असते? ईशकृपेशिवाय असला अलभ्य लाभ होणें नाहीं. प्रबोधपंत, तुम्ही म्हणजे प्रत्यक्ष ताटकांतक प्रभु रामचंद्रच आहांत, व माझी बाळी प्रत्यक्ष सीतादेवीच आहे असें मला वाटत आहे. तुमचा हा जोडा पाहून माझी म्हाताऱ्याची दृष्ट लागेल, या भीतीनें माझा हा म्हातारा जीव तुमच्यावरून ओंवाळून टाकावासें वाटतें. भगवान् चंद्रमौली सदैव तुमचें कल्याण करो. आतां माझ्याच्यानें जास्त बोलवत नाहीं. माझी कृतकृत्यता समूळ जिरून गेली. आनंदाशाहि निमाली. पुनः तुम्हां सर्वांना शुभाशीर्वाद देऊन तुमचें अभीष्ट चिंतून मीं स्वस्थ बसतों. आतां पुढचा कार्यक्रम चालू द्या.”

नंतर प्रबोधपंत बोलण्यास उभे राहिले. तेव्हां त्यांची गंभीर व सुप्रसन्न मुद्रा, त्यांची अर्धोन्मीलित, स्थिर व करुणाभरित दृष्टि, त्यांचा भव्य व वैभवशाली भालप्रदेश, त्यांचें अलौकिक तेज या सर्वांचा भोंवतालच्या मंडळींवर विलक्षण परिणाम झाला व जिबाजीपंतांनीं त्यांना दिलेली प्रभु रामचंद्राची उपमा किती यथार्थ आहे याची सर्वांना साक्ष पटली. ज्या गारुड्यानें ‘त्राटिकेला’ आजची ही ‘ आनंदी ’ बनविली, ज्या मांत्रिकानें तिच्यांत इतकी विलक्षण क्रांति घडवून आणिली, त्याचें सामर्थ्य किती अद्भुत असलें

पाहिजे असें वाटून सर्वजण आश्चर्यचकित मुद्रेनें त्यांचेकडे कुतूहल दृष्टीनें पाहूं लागले. त्यांचें भाषण ऐकण्याची सर्वांना फार उत्सुकता वाटत होती.

प्रबोधपंत म्हणाले, “बाबासाहेब, आजपर्यंत आपल्या लेकीला मी आपल्याकडे पाठविली नाहीं याबद्दल मलाहि फार वाईट वाटे. परंतु अंगीकृत कार्य पुरें सिद्धीस गेल्याखेरीज इतर गोष्टींकडे ढुंकूनहि बघावयाचें नाहीं हा माझा पक्का निश्चय असल्यामुळें मला निष्ठुर बनावें लागलें, याबद्दल क्षमा असावी. परंतु इतक्या वर्षांनीं आम्हां उभयतांना आपल्या दर्शनसुखाचा लाभ झाला हें मी आमचें महद्भाग्य समजतों. आपण माझ्यावरच्या निरतिशय प्रेमामुळें मला प्रभु रामचंद्राची व आपल्या लेकीला जानकीदेवींची उपमा दिलीत. पण तसें म्हटल्यानें आपण स्वत: राजा जनक होत नाहीं काय? आणि खरोखरच आपला अधिकार विदेही जनकासारखाच आहे. आपल्यावर भगवंताची पूर्ण कृपा आहे. त्यामुळेंच आजचा आपल्या भेटीचा हा अपूर्व योग जमून आला. आजच्यासारखा प्रेमानंद सोहळा देवादिकांनाहि दुर्लभ. आपण आज आनंदाची लूट चालविली आहे.” इतकें बोलून ते म्हणाले, “बंधुभगिनींनो, आज आमच्या स्वागताच्या रूपानें बाबासाहेबांनीं हें जें आनंदामृताचें भोजन घातलें, त्यामध्यें आपण सामील होऊन आमच्यावरचें आपलें जें प्रेम आपण व्यक्त केलेंत त्यायोगें आमचा आनंद द्विगुणित झाला आहे. मी आम्हां उभयतांच्या वतीनें आपले सर्वांचे मनापासून आभार मानितों. माझ्या प्रिय पत्नीच्या शिक्षणासंबंधीं मीं कांहीं बोलावें अशी आपली इच्छा असल्याचें नुकतेंच माझ्या कानावर आलें. पण हल्लींच्या रिवाजाप्रमाणें मीं तिला उच्च शिक्षण दिलें इतकेंच. यांत मी अधिक असें कांहींच केलें नाहीं. कर्ताकरविता परमेश्वर आहे. त्या विश्वनाटकसूत्रधारप्रभूचा हा सारा खेळ आहे. यांत आपलें असें कांहीं नाहीं अगर कर्तेपणा नाहीं. हा त्याचा सहज विलास आहे. त्यामुळें मीं विशेष असें कांहींहि केलें नाहीं. त्यांतून माझी आनंदी–आपली त्राटिका–येथेंच असल्यामुळें तिच्यासंबंधीं बोलून मी आपला अधिक वेळ घेत नाहीं. आतां उशीर होत आहे. तेव्हां आपणां सर्वांचे पुन: एकदां अन्त:करणपूर्वक आभार मानून मी आपली रजा घेतों.” इतकें बोलून ते खालीं बसले. तों सर्वांनीं टाळ्यांचा गजर करून त्यांचा गौरव केला.

नंतर श्रीयुत विवेकांनीं सौ. आनंदीबाईच्या शिक्षणाचा सातआठ वर्षांचा इतिहास गोड शब्दांत सर्वांना थोडक्यांत सांगितला. श्रीयुत दंभाजी-रावांनीं आनंदीवहिनींना प्रसंगाला अनुसरून चार शब्द बोलण्याची विनंति केली. सौ. लालसाबाईनीं त्या विनंतीला पुष्टि दिली. त्याबरोबर सौ. आनंदीबाई मोठ्या उत्सुकतेनें बोलण्यास उभ्या राहिल्या. पण त्यांच्या मुखा-वाटें शब्दच बाहेर पडेना. कंठ दाटून आला, ओठ स्फुरण पावूं लागले व सर्व अंग थरथर कांपूं लागलें. इतक्यांत तो सर्व आवेग दाबून अगदीं हलक्या स्वरानें त्या बोलूं लागल्या. "बंधुभगिनींनो, आज आनंदातिशयानें माझा कंठ दाटून आला आहे; माझ्यानें बोलवत नाहीं. तरी माझ्या तोंडून चार शब्द ऐकण्याच्या तुमच्या इच्छेला मान देणें मला भाग झालें आहे."

याप्रमाणें सौ. आनंदीबाईची प्रस्तावना चालली असतां सर्व मंडळी जणूं सर्वांगाचे कान करून ऐकत होती. त्यांची हकीगत ऐकल्यापासून त्यांना पाहण्याबद्दल सर्वांना साश्चर्य, सादर, सकौतुक कुतूहल उत्पन्न झालें होतें. त्यांच्या अंगची दिव्य कांति, त्यांची सुप्रसन्न मुद्रा, त्यांच्या नेत्रांत चमक-णारें विद्येचें अनुपम तेज व आनंदभरानें खुलून दिसणारी त्यांची मधुराकृति प्रत्यक्ष पाहिल्यावर त्यांच्या रूपानें एकजीव झालेल्या लक्ष्मीसरस्वतींच्या दर्शनसुखाचा दुर्लभ लाभ आपणांस झालासें सर्वांना वाटूं लागलें व त्यांचें भाषण ऐकण्याची सर्वांची इच्छा अधिकच तीव्र झाली. इतक्यांत त्यांचा "बंधुभगिनींनो" हा जिव्हाळ्याचा शब्द ऐकल्याबरोबर त्या सर्वांना विद्यु-ल्लतेचा धक्का बसल्याप्रमाणें झालें व ते गारुड्यानें भारलेल्या सापाप्रमाणें भारले जाऊन त्यांचा प्रत्येक शब्द झेलण्यास उतावीळ झाले होते.

आनंदीच्या मावशी प्रीताई या मंडपाच्या एका कोंपऱ्यांत उभ्या राहून हा समारंभ पहात होत्या. आनंदीला व प्रबोधपंतांना मंडपाच्या दाराशीं पाहिल्यापासून त्यांच्या नेत्रांतून वाहणाऱ्या प्रेमाश्रूंच्या धारांना फारसा खंड पडला नव्हता. व त्यांना आपल्या बहिणीची म्हणजे त्राटिकेच्या आईचीं वारंवार आठवण होऊन त्यांचा कंठा भरून येत होता. त्यांतच आनंदीला भाषण करण्याकरितां उभी राहिलेली पाहून तर त्यांना आलेला गहिंवर अनावर होऊन, त्या पदरानें आपलें तोंड झांकून एकसारख्या स्फुंदूनस्फुंदून

रडत होत्या व एकीकडे प्रबोधपंतांना व आनंदीला उदंड " औक्ष " देण्याबद्दल देवाचा धांवा करीत होत्या.

आनंदीबाईना आलेला तो प्रेमाचा उमाळा जरा कमी झाल्यावर त्या पुढें बोलूं लागल्या.

"पूर्वी द्वाड, अह्लड, खट्याळ, भांडखोर व मारकुटी असणारी ही त्राटिका तुमच्या अकृत्रिम प्रेमाला पात्र होऊन आजचा गोड समारंभ पाहण्याचा सुयोग जमून आला, ही परमेश्वराची कृपा व हें परमपूज्य बाबांच्या आशीर्वादाचें फळ होय ही गोष्ट खरीच. तरी पण बाबांनीं माझा विवाह करून मला जी अत्यंत दुर्लभ अशा सत्समागमाची जोड करून दिली, तिचाच हा परिणाम होय. माझें अनंतजन्मींचें सुकृत आज सुफलित झालें, म्हणूनच मला हा सत्संगतीचा दुर्मिळ लाभ झाला. माझी पूर्वीची स्थिति आपणांपैकीं बहुतेकांनीं पाहिलेलीच आहे. परंतु ज्या महाभागांनीं आपल्या अद्‌भुत सामर्थ्यानें, प्रेमबोधानें व चिकाटीनें माझ्यांत हा विलक्षण फरक घडवून आणिला ते आज प्रत्यक्षच येथें हजर आहेत. माझ्या यशाचें सर्व श्रेय त्यांनाच आहे. मी त्या ज्ञानभास्कराची, त्या चिद्रवीची प्रभा असून तेच माझ्याकरवीं हें बोलवीत आहेत असें मी समजतें. मी अज्ञ, अजाण, मूढ असतां ज्यांनीं माझ्या दुरुत्तरांचीहि पर्वा न करितां केवळ माझ्या कल्याणाकडे नजर देऊन मला योग्य शिक्षण दिलें त्यांची थोरवी मी किती वानूं शकणार ? मला मिळालेलें यश म्हणजे त्यांच्या बोधवृक्षाला आलेलें मधुर फळच होय. त्यांच्या संगतींत मला बहुमोल ज्ञानलाभ कसा झाला व माझ्या स्वभावांत आणि विचारांत ही विलक्षण क्रांति कशी घडून आली यासंबंधीं सविस्तर वर्णन करण्याचा आजचा प्रसंग नाहीं. त्यासंबंधीं मी पुनः केव्हां तरी बोलेन.

आज मी इतकेंच सांगतें कीं, आपली उन्नति करून घेणें हें प्रत्येक मनुष्याच्या हातीं आहे. माझ्या पुण्याईनें मला अगदीं योग्य वेळीं जी सुसंगति लाभली ती लाभण्याचें भाग्य सर्वांच्याच नशिबीं असतें असें नाहीं हें खरें. तरी पण मी आपणांस माझ्या अनुभवावरून इतकें सांगूं शकतें कीं, ईश्वरावर अचल निष्ठा ठेवून श्रीमद्‌भगवद्गीतेसारख्या अद्वितीय ज्ञानभांडारांतील बोधाचें, अनुभवी महात्म्यांच्या बोलांचें, थोर विभूतींच्या चारित्र्याचें

मनन करीत अभ्यास व वैराग्य यांची कांस धरून शक्य तितका सुसंगतीचा लाभ घेत निष्कामकर्माचरण करीत राहिल्यानें अथवा थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे भक्तिमूलक ज्ञानप्रधान निष्कामकर्मयोगाचा अवलंब केल्यानें आपली उन्नति झालीच पाहिजे व अभ्युदय व निःश्रेयस् यांची प्राप्ति झालीच पाहिजे. हें ध्येय गांठणें सोपें नाहीं. तरी पण परमेश्वरावर सर्व भार टाकून त्याचें अखंड स्मरण ठेवून दीर्घ प्रयत्न करीत राहिल्यानें तें हस्तगत झालेंच पाहिजे. मनुष्यप्रयत्नाला परमेश्वराचें अधिष्ठान असल्याशिवाय हा योग साधणार नाहीं. नुसता जीवप्रयत्न थोटा आहे. मनुष्य कितीहि मोठा झाला तरी तो एकदेशी व भगवान् सर्वदेशी, त्यामुळें तो सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, भक्तवत्सल प्रभु अनुकूल झाला म्हणजे सर्व गोष्टी सुकर होतात, वाटाडे भेटतात, मार्गदर्शक भेटतात, आपल्यालाच स्फूर्तिरूपानें निरनिराळे मार्ग सुचतात व बुद्धीला योग्य वळण लागून ती अधिकाधिक स्थिर व कर्तव्यपरायण होत जाते, चित्ताला शांतिसुखाचा लाभ होतो. तेव्हां त्याला आपलासा करून, त्याचा स्नेह संपादून त्याच्याशीं सलगी करून निष्काम बुद्धीनें ओघप्राप्त कर्तव्यकर्म करीत राहिल्यास यश हें आलेंच पाहिजे. ही गोष्ट चुटकीसरसी साध्य होणारी नाहीं. त्याकरितां दीर्घ प्रयत्नाची जरूर आहे. ज्या वेळीं आपलें मन कोंवळें व भावनाप्रधान असतें व त्याच्यांत तर्कवितर्कांचें व शंकाकुशंकांचें बीजारोपण झालेलें नसतें, अशा बाळपणांतच या प्रयत्नाला सुरुवात झाली पाहिजे. कोणत्याहि विद्येचा अभ्यास सुरू करण्यास आपल्या आयुष्यांतील तोच भाग अनुकूल असतो. त्या वेळीं आपल्या मनांत विचारांचे अगर भावनांचे जे अंकुर उद्भवतात त्यांचीच पुढें वाढ होत जाऊन त्यांचे वृक्ष बनतात व ते चांगले अगर वाईट असतील त्याप्रमाणें त्यांना गोड अगर कडू फळें येतात. तेव्हां या बाबतींत मुलामुलींच्या पालकांनीं दक्षता बाळगिली पाहिजे. तसेंच प्रत्येक जाणत्या मनुष्यानें आपली दृष्टि अन्तर्मुख करून आपणच बागवान बनून अन्तःकरणांतील कुविचार, असद्भावना व कुकल्पना यांचें रान तोडून, मनोभूमि साफ करून, तिच्यांत सुविचार, सद्भावना व सुकल्पना यांचें बीजारोपण करून, योग्य नियमांचें कुंपण घालून व खतपाणी घालून, त्यांची वाढ करून वृक्ष बनविल्यास त्यास गोड फळें आलींच पाहिजेत. आपली उन्नति आपणच करून

घेतली पाहिजे. आपली ऐहिक उन्नति करण्याच्या व परमार्थलाभ करून घेण्याच्या प्रयत्नांना एकदमच सुरुवात केल्यास ते एकमेकांना पोषकच होतात. सर्व प्रयत्नांचें ध्येय म्हणजे सुखप्राप्ति. तेव्हां जें सुख मिळविण्याकरितां धडपड करावयाची तें जितकें अधिक स्वाधीन व टिकाऊ असेल तितकें तें अधिक श्रेयस्कर होय व स्वाधीन, अढळ व अक्षय्य असें जें आत्मसुख हें सर्वांत श्रेष्ठ होय. तसेंच प्रत्येक व्यक्तीनें केवळ आपल्या अगर आपल्या कुटुंबाच्याच सुखाकडे अगर हिताकडे न बघतां सर्व भूतांच्या हिताकरितां त्यांचें कल्याण व्हावें म्हणून प्रयत्न केले पाहिजेत.

पाश्चात्य संस्कृतीशीं माझा जो परिचय झाला त्यावरून माझी अशी ठाम समजूत झाली आहे कीं, शारीरिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय वगैरे बाबतींत आपली फार अवनति झाली आहे. या बाबतींत पाश्चात्य समाज आपल्या फार पुढें गेले आहेत. राष्ट्राराष्ट्रांत चालू असलेल्या चढाओढींत आपल्या राष्ट्रानें टिकाव धरून आपलें विशिष्टत्व कायम राखिलें पाहिजे. तेव्हां पाश्चात्यांच्या संस्कृतीनें दिपून न जातां, स्वाभिमानशून्य न बनतां, आपल्या उज्ज्वल पुरातन संस्कृतीचें मर्म जाणून आपल्या पूर्वजांनीं आपल्याकरितां जें ज्ञानभांडार निर्माण करून काळजीनें जतन करून ठेविलें आहे त्याचा आपण पूर्ण फायदा घेतला पाहिजे, तरच आपली खरी उन्नति होईल. त्याचप्रमाणें आपल्या संस्कृतीखेरीज इतर संस्कृतींना तुच्छ न लेखतां, कूपमंडूकवृत्ति सोडून, त्यांच्यांतील चांगला भाग तेवढा स्वीकारून इतर राष्ट्रांशीं टक्कर मारण्यास आपलें राष्ट्र तयार होईल अशा तऱ्हेनें आपल्या नव्या पिढीस शिक्षण देण्यास आपण तयार असलें पाहिजे.

आजच्या या आनंदाच्या प्रसंगीं तुम्हीं माझ्या बाळपणाच्या परिचयाची मंडळी मला भेटलांत; त्यामुळें माझें हृदय भरून आलें आहे. मीं पूर्वी कोणाला ताडण केलें असेल, टाकून बोललें असेन, अगर रागें भरलें असेन तर त्या सर्वांबद्दल मला क्षमा करा व माझे अपराध पोटांत घाला. " आनंदीबाईच्यानें पुढें बोलवेना; व ग्रामस्थ मंडळींपैकींहि पुष्कळांना गहिंवरून आलें. जरा थांबून त्या बोलूं लागल्या, "माझ्यानें आतां जास्त बोलवत नाहीं. फक्त मी तुम्हांला एवढेंच सांगून ठेवितें कीं, ही तुमची प्रीतींतली बहिण असें मानून

या वहिणीशीं प्रेमानें वागा. तुम्हां कोणाला कसलीहि अडचण आली, कांहीं गरज लागली तर माझ्याकडे या. आतां उशीर फार झाला आहे. तेव्हां मी तुमचे सर्वांचे आभार मानून पुनः एकदां गतगोष्टींबद्दल क्षमेची याचना करितें."

इतकें बोलून सौ. आनंदीबाई खालीं बसल्या. तों सर्वांनीं टाळ्यांचा प्रचंड गजर करून त्यांच अभिनंदन केलें. त्या गजराच्या निनादानें आत्मरंगीं पूर्ण रंगून गेलेले जिवाजीपंत भानावर आले व म्हणाले, "आज प्रेमाची लूट झाली. भगवान् चंद्रमौलीनें आपलें वचन सत्य केलें. आकाश ढळेल, भूमि खचेल, पण त्यांचें वचन कधींहि खोटें पडणार नाहीं. आतां त्यांचे धन्यवाद गात हा गोड समारंभ आवरता घेऊं. हा आनंद कितीहि लुटली तरी त्याचा वीट येणार नाहीं."

लगेच सौ. शांताबाईनीं

जयजयकार सदा । भक्तांसीं । जयजयकार सदा ॥
सुखदुःखाची ऊर्मि नाहीं । वाणी न आनंदा ॥

(द. प्रे. ल. पद १८६८)

हें दत्तमहाराजांचें पद म्हणण्यास सुरवात केली. त्याबरोबर सर्व मंडळी अगदीं तल्लीन होऊन गेली. इकडे पेढे, हारतुरे, अत्तरगुलाब वगैरे वाटण्याची एकच गर्दी उडाली. शांताबाईचें पद संपल्यावर जिवाजीपंतांनीं एकदां सर्वांकडे प्रेमभरित नेत्रांनीं पाहून मौनानेंच सर्वांना आशीर्वाद दिला. इतक्यांत अंकाचा पडदा पडला.

* * * *

राजाभाऊंच्या स्वप्नाची हकीगत संपते तों अंधार पडला होता. तो आपल्या मित्रांना उठण्यास सांगणार, इतक्यांत त्याला वीरेश्वराची विलक्षण स्थिति झालेली दिसली. राजाभाऊनें सांगितलेल्या स्वप्नाचा वीरेश्वरावर इतका परिणाम झाला कीं, राजाभाऊलाच प्रबोधपंत समजून तो त्याचे पाय धरणार इतक्यांत राजाभाऊनें त्याला उचलून धरिलें व तो त्याला म्हणाला, "अरे, वीरेश्वर, हें काय? वेडा कुठला." पण त्या दोघांनाहि गहिंवर येऊन ते एक-

मेकांना कडकडून भेटले व राजाभाऊ म्हणाला, "अरे, मला जें स्वप्न पडलें तें मीं तुम्हांला सांगितलें. यांत मीं रे काय केलें? मी फक्त निरोपाचा धनी. तेव्हां माझ्या कसला पायां पडतोस? कोणीं पाहिलें तर काय ह्मणेल? आतां सुदैवानें काळोख पडला आहे म्हणून ठीक. नाहींतर हें काय खूळ आहे, म्हणून येणारे जाणारे हंसले असते कीं! चला, आतां उशीर फार झाला आहे, लवकर घरीं गेलेंच पाहिजे."

नंतर ते तिघे आपआपल्या घरीं गेले. वीरेश्वराच्या मनावर राजाभाऊच्या स्वप्नाचा ठसा इतका कायम बसला कीं, त्याला अजूनहि त्याची वारंवार आठवण होऊन आनंदाच्या उकळ्या येत असतात.

---

# आतां पुढें काय?

लेखक : ग. ह. का.

प्रेम ही जगांतील मोठी जादूमय शक्ति आहे यांत कांहीं संशय नाहीं. मग तें प्रेम, मायलेकरांतील, पितापुत्रांतील, स्त्रीपुरुषांतील, मित्रांमित्रांतील किंवा अन्य कोणत्याहि प्रकारचें असो; त्यासाठीं मनुष्य जगांत वाटेल तें साहस व लागेल तो स्वार्थत्याग करण्यास तयार होतो. अशाच प्रकारच्या प्रेमळ हट्टास बळी पडण्याचा प्रसंग नुकताच माझेवर आला. नानाप्रकारें समजूत घालूनसुद्धां, 'नाहीं, हो' करतां करतां अखेर मला, लवकरच प्रसिद्ध होणाऱ्या 'साहित्य-तोरण' या पुस्तकांत कांहींतरी लिहून देण्याचें कबूल करावें लागलें. वास्तविक आतांपर्यंत परीक्षेचे पेपर्स किंवा पत्रें यांशिवाय माझेकडून लेखन असें कांहींच झालेलें नाहीं. लेखनाची संवय नसल्याकारणानें म्हणा, अगर पाहिजे तर विचारांचा अभाव म्हणून समजा, पण कोणताहि विषय घेतला तरी त्यांत मन लागेना; आणि एकदां कां लिहिण्यांत मन लागेनासें झालें कीं, लेखणी-वर कितीहि बलात्कार केला, तरी कांहीं केल्या कांहींच लिहून होत नाहीं. आणि अशा वेळीं कां संपादकाचा ससेमिरा पाठीस लागला कीं, मग काय तारांबळ विचारतां? सरस्वतीची कृपा होण्याऐवजीं (भाकण्यापेक्षां) पूर्णपणें अवकृपा झालेली असती तर बरें, असें वाटं लागतें. अशा प्रकारच्या

विलक्षण पेचांत मी सांपडलों असतां, सहज माझें लक्ष समोरील सुरेशाच्या फोटोकडे गेलें व त्यानें आपल्या आयुष्यांत घडलेल्या प्रसंगांच्या पाठविलेल्या पत्रांची मला आठवण झाली. इतरांस तीं कपोलकल्पित वाटतील खरीं; परंतु तें त्याच्या आयुष्याचें खरें शब्दचित्रच आहे. त्या पत्रांचाच उपयोग एक लघुकथा लिहिण्याकडे करावयाचा ठरवून मीं तीं पत्रें बाहेर काढलीं व एक गोष्ट थोडासा फेरफार करून व खरीं नांवें बदलून संपादक महाशयांच्या तोंडावर टाकण्यास तयार केली. तेव्हां मनास जरा हायसें वाटलें. शेवटीं मला माझ्या प्रेमळ मित्राचा अशा वेळीं असा उपयोग झाला म्हणून फारच आनंद झाला. गोष्टीचें सर्व श्रेय त्यालाच आहे. माझें काम कंपॉझिटरहून जास्त नाहीं.

"मग आतां पुढचा विचार काय ठरवलाय्?" जिन्याच्या पायऱ्या उतरतां उतरतां दादासाहेबांनीं शरद्चंद्रास विचारलें.

"पाहूं या, अजून नक्की असं कांहीं ठरविलं नाहीं, तूर्त तरी आणखी कांहीं दिवस अशीच विश्रांति घेईनसं म्हणतों." असें उडवाउडवीचें कांहीं-तरी उत्तर देऊन, अनपेक्षित रीतीनें विचारलेल्या त्या प्रश्नामुळें उडालेला मनाचा गोंधळ लपविण्याचा प्रयत्न करीत, शरद्चंद्रानें दादासाहेबांना दारा-पर्यंत पोहोंचवून निरोप दिला व तो स्वतःचे खोलींत आला.

मनुष्याचें मन कधीं इतकें हळुवार व अधु बनतें कीं, एकादें क्षुल्लक कारणसुद्धां त्यास भाराभर विचार करण्यास पुरेसें होतें. असाच प्रकार आज त्याचे मनाचा झाला. दादासाहेबांनीं सहज विचारलेल्या वरील प्रश्नामध्यें कितीतरी गूढार्थ भरलेला असल्याचें त्यास दिसूं लागलें. जों जों तो त्या प्रश्नावर विचार करूं लागला तों तों त्यास त्याचें निर्णयात्मक व समाधान-कारक उत्तर सुचेना. उलट त्याचे मनाचा गोंधळ अधिकाधिक वाढूं लागला. आर्त विचारानें डोकें तापून गेल्यामुळें त्याचें मनःस्वास्थ्य नष्ट झालें व त्यामुळें त्याला कांहींएक सुचेनासें झालें. शेवटीं तो तापदायक विचार डोक्यांतून काढून टाकण्यासाठीं त्यानें टेबलाच्या ड्रॉवरमधून फ्ल्यूट काढला व नेहमींचें आवडतें सारंग रागांतील पद तो वाजवूं लागला. पण आज तें वाजविण्यांत मन रमेना. भैरवीचे सूर काढतांना त्यास फ्ल्यूट बदसूर झालासें वाटूं लागलें व त्यामुळें निघणारे सूर एकप्रकारें भेसूरपणाचेंच वातावरण निर्माण करीत असल्याचें त्यास वाटलें.

तेव्हां तें पद तसेंच अर्धवट सोडून, अखेरं 'हें मन रामरंगीं रंगलें,' हें भक्तियुक्त व भावनाप्रधान पद वाजवून धीर, गंभीर व शांत वातावरण निर्माण होईलसें त्यास वाटलें व त्यामुळें मनक्षोभ थोडातरी कमी होईल म्हणून तेंच तो वाजवूं लागला. परंतु त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. कोणत्याहि उपायानें मनाची खळबळ शांत होईनासें पाहून तो फार वैतागून गेला. हातांतील फ्ल्यूट तसाच टेबलावर फेंकून देऊन, तो पलीकडील पश्चिमभागाचे खिडकीपाशीं असलेल्या कॉटवर स्वस्थ पडून राहिला; तरी त्याची विचारमालिका मात्र थांबली नाहीं. प्रत्येक तरुणासमोर आयुष्याची सुरुवात करण्यापूर्वी 'पुढें काय?' हा प्रश्न दत्त म्हणून उभा रहात असेल! मग तो सुशिक्षित असो वा अशिक्षित असो, आयुष्यांतील यशापयश व सुखदुःख यावरच अवलंबून नाहीं का? कितीतरी तरुणांचीं आयुष्यें वरील प्रश्न सोडवितांना, व्यवहारी जगाचा अनुभव नसल्यानें व योग्य मार्गदर्शक न मिळाल्यानें दुःखी झालीं असतील! आपली परिस्थिति याहून भिन्न कोठें आहे? मग आपलें आयुष्य सुखी कां दुःखी होणार? अशाच प्रकारच्या विचारमालिकेंत तो गर्क होऊन गेला होता. रात्र किती संपली याकडे त्याचें लक्षच नव्हतें. पण काळाचा ओघ आपल्या नेहमींच्या गतीनें चालूच होता. पहाटेच्या सुमारास खिडकींतून चोरपावलांनीं वावरणाऱ्या शीत वायुलहरींमुळें आधींच विचारातिरेकानें त्रस्त व क्षीण झालेला त्याचा मेंदू थोडा शांत झाला व त्याचा डोळा लागला; परंतु त्यापासून त्याचे मनास विश्रांती न मिळतां, उलट जडदेहाचा भार कमी झाला म्हणूनच कीं काय त्याचा मनःसंचार पूर्वींपेक्षां अधिक जोरानें चालू झाला. मॅट्रिक पास झाल्यापासून तों आतांपर्यंतचा आयुष्याचा सर्व भाग, त्यांतील बारीक सारीक सर्व गोष्टी सिनेमांतील चित्रपटाप्रमाणें त्याचे मनश्चक्षूंसमोर एकामागून एक येऊं लागल्या. जणूं काय आज तो आपल्या कॉलेज लाईफमधील, त्या स्वतंत्र स्वैर पण जबाबदार वातावरणांतील आयुष्यांत घडलेल्या सर्व महत्त्वाच्या छोट्यामोठ्या गोष्टींची उजळणीच करीत होता. तें सर्व स्वप्न सांगत न बसतां त्यांतील महत्त्वाचा भाग सारांशरूपानें खालीं दिला आहे.

तो पांचसहा वर्षांचा एवढा मोठा काळ, प्रेमळ पण निस्वार्थी मित्रांच्या

सुखकारक गोड सहवासांत, त्यांजबरोबर हंसण्याखेळण्यांत, गप्पागोष्टी व निर-निराळ्या विषयांवर वादविवाद करण्यांत कसा झटदिशीं आनंदांत संपून गेला, त्या आनंदाचा अनुभव तो पुन्हां एकवार घेत होता. विद्यादानाचें पवित्र कार्य अंगिकारलेल्या त्या स्वार्थत्यागी प्रोफेसरांच्या निराभिमानी व प्रेमळ मूर्ती त्याचे डोळ्यांसमोर एकामागून एक उभ्या राहिल्या. कै. आगरकर व टिळक यांचें समाजकारण व राजकारण या विषयांवर त्यांजबरोबर केलेले वादविवाद, सद्य:स्थितींत दोहोंपैकीं समाजास अधिक जरूरी कोणत्या सुधा-रणेची, त्या वेळीं आपले मित्रांत व स्वत:त झालेला मतभेद, प्रो. × नें अध्यक्ष या नात्यानें, दोन्ही बाजूंचीं भाषणें संपूर्ण ऐकल्यावर, दोन्ही सुधा-रणांचें महत्त्व यावर सांगोपांग चर्चा करून Golden mean चा केलेला उपदेश, समाजांत दोन्ही सुधारणांच्या त्वरित भासणाऱ्या आवश्यकतेचें महत्त्व पटवून देतांना कुशलतेनें पण मार्मिकपणानें केलेला समारोप, त्या वेळचीं सर्व भाषणें वगैरे, थोडक्यांत तो सर्व प्रसंग जशाचा तसा त्याचे डोळ्यांसमोर उभा राहिला. वसतिगृहांत राहिल्यानें निकटसहवासानें पहावयास मिळणारीं बरींवाईट मनुष्यस्वभावाचीं विचित्र चित्रें व त्यामुळें अप्रत्यक्षपणें पुढील आयुष्यांत होणारी मदत; तसेंच कॉलेजमधील बेजबाबदार व बेफिकीर तरुणतरुणींचीं बाष्कळ प्रेमकथानकें, त्यांमुळें त्यांचे मनावर व अंगीकारलेल्या विद्यार्जनावर व अप्रत्यक्षपणें त्यांचे पुढील आयुष्यावर झालेले अनिष्ट परिणाम, सुखाच्या व मोठेपणाच्या भलत्याच कल्पनेस बळी पडून स्वत:स बऱ्यावाईट, अनवश्यक व अपायकारक व्यसनांचे व चैनीचे दास करून घेणारांचीं वगैरे अनेक प्रका-रांचीं दृश्यें फारच थोड्या अवधींत त्याचे समोरून येऊन गेलीं! त्यांतल्या त्यांत ' डिबेटिंग युनिअन्'तर्फे, College life मधील केलेल्या स्वत:च्या शेव-टच्या भाषणाचा प्रसंग जशाचा तसा त्याचे समोर उभा राहिला. तो दिवस कै. लोकमान्य टिळक यांचे पुण्यतिथीचा असल्यानें सेक्रेटरीनें मुद्दामच औचित्यानें 'सुशिक्षित तरुणाचें कर्तव्य' हा विषय घेण्यास आग्रह केला होता. तो प्रसंग कांहीं केल्या त्याचे दृष्टिआड होईना. तो भव्य Lecture Hall, चित्रविचित्र रंगांचे पोशाक केलेल्या विद्यार्थिविद्यार्थिनींनीं गच्च भरून गेला होता. त्यांचे पेहेरावांवरून राष्ट्रभर उसळलेल्या असहकारितेच्या चळवळीची



डॉ. कमलाबाई देशपांडे.



कु. कृष्णाकुमारी डबीर.



श्री. वासुदेव विनायक जोशी.



श्री. बाळकृष्ण पांडुरंग ठकार.



श्री. शंकर बापुराव आंबेकर.



श्री. विष्णु बापुराव आंबेकर.



श्री. दिनकर विनायक देव.



श्री. नरेंद्र काशिनाथ बाबडेकर.

यांना दादहि नसावीसें दिसत होतें. त्या स्वदेशप्रेमशून्य दृश्यामुळें मनावर आलेलें औदासीन्याचें पटल व त्या तशाच मनःस्थितींत वरील विषयावर आपण भाषण करीत आहों. ' मायभूमीचे उद्धारासाठीं प्रत्येक सुशिक्षित स्त्रीपुरुषानें स्वतःस झीज सोसून व स्वतःचा स्वार्थ सोडून, खेडोंपाडीं जाऊन आपल्या देशबांधवांना आपल्या ज्ञानाचा फायदा देऊन, त्यांना साक्षर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे; तरच आपण आपणांस सुशिक्षित म्हणून घेण्यास पात्र आहों. अशानेंच आपण संपादन केलेल्या ज्ञानाचें चीज होणार आहे. अशिक्षित व असमंजस लोकांप्रमाणेंच जर आपण पैसा हेंच आयुष्याचें एकमेव ध्येय ठेविलें, तर सुशिक्षित व अशिक्षित यांमध्यें फरक काय ? स्वदेशप्रेमानें ज्यांच्या भावना उचंबळत नाहींत, मरेमरेतों काबाडकष्ट करूनसुद्धां स्वतःची अब्रू व देह यांस थंडीवाऱ्यांपासून सुरक्षित ठेवण्यास अंगभर वस्त्र व पोटभर अन्नहि मिळत नाहीं, अशा ज्ञानहीन देशबांधवांची केविलवाणी स्थिति पाहूनसुद्धां ज्याच्या हृदयांस पीळ पडत नाहीं, तशा त्या असहाय स्थितींतून त्यांना वर काढण्यासाठीं, किंबहुना अंशतः तरी सुखी करण्यासाठीं जे प्रयत्न करीत नाहींत व त्यासाठीं करावा लागणाऱ्या कोणत्याही स्वार्थत्यागास तयार नाहींत, अशांना सुशिक्षित म्हणतां येईल का ? स्वतःचे स्वार्थास तिलाञ्जली देऊन ज्यांनीं आपणांस ज्ञानदान केलें, त्यांच्या दृष्टीनें तरी आपलें करणें योग्य ठरेल काय ? अशाच आशयाचें बरेंच जोरदार व आवेशयुक्त भाषण आपण करीत आहों. भाषण संपल्यावर श्रोत्यांनीं दिलेल्या प्रचंड टाळ्यांमुळें आपणांस आनंद न होतां, उलट त्यामुळें आपल्या मनाची उद्विग्नता कशी अधिकच वाढली; वगैरे वगैरे सर्व त्यास दिसलें.

सायंकाळीं अविनाश व कमलाकर यांजबरोबर आपण फिरावयास गेलों असतांना, अविनाशानें केलेली आपल्या भाषणाची प्रशंसा, तर उलट " Platform Oratory " छान साधते बुवा, बाकी व्यवहारी जगांत याचा फारसा उपयोग होईलसें नाहीं वाटत, असे कमलाकरानें कुचेष्टेनें पण अर्थपूर्ण काढलेले उद्गारहि, आपण ऐकत आहोंसें वाटलें. रात्रौ गप्पागोष्टी संपवून आपण बिछान्यावर निद्रादेवीची प्रार्थना करीत पडलों असतां, आपणांस नकळत, आपलें मन अविनाश व कमलाकर या दोन्ही परस्पर-

विरोधी स्वभावांच्या चित्रांचें पृथक्करण करण्यांत गढून गेलें असतांनाच, आपणांस झोंप लागली व आपण एक सुखस्वप्न पाहण्यांत गुंग होऊन गेलों. स्वप्न खालीलप्रमाणें होतें:—

एक शुभ्र वस्त्र परिधान केलेली स्त्री आपणांसमोर उभी असून, आपण तिच्याशीं दुपारीं केलेल्या भाषणासंबंधीं बोलत आहों. आपलीं मतें फारच idealistic आहेत, तीं व्यवहारांत उतरविणें फार कठीण आहे, असें ती म्हणत आहे. आपण तिच्याशीं बराच वावदूकपणा केला; पण अखेर त्यांत आपणांस हारच खावी लागणार असें कळून चुकलें. एवढ्याशा अल्पवयांत, एखाद्या मोठ्या अनुभवी माणसासारख्या बोलणाऱ्या त्या प्रेमळ मूर्तीशीं बोलण्याचा प्रसंग अधिक लांबवावा म्हणून आपण चकित व हतबुद्ध होऊन-सुद्धां आपला हेका मुद्दामच सोडीत नाहीं अशा त्या सुखस्वप्नाचे आनंदांत शरच्चंद्र गर्क झाला असतां, त्याचे खोलीचें दार कोणीं जोरजोरानें ठोठावून त्यास हांका मारीत होतें. त्या गोंगाटामुळें तो सुखस्वप्नांतून जागा झाला व त्यानें दाराची कडी काढली, तों अरुण दारांत बराच वेळ तिष्ठत उभा असल्याचें त्यास दिसलें.

"कां अरुण, आज फार लवकर आगमन ?" सुखस्वप्नाचा भंग केल्यामुळें अरुणाचें आगमन, एका दृष्टीनें तापदायक तर दुसऱ्या दृष्टीनें कालपासून उद्भवलेल्या क्षोभजनक विचारानें व रात्रौ पडलेल्या स्वप्नानें भारावलेलें मन हलकें करण्यास योग्य स्थान मिळणार या जाणिवेनें त्याचें आगमन समाधान-कारक वाटलें. अशा प्रकारच्या मनाच्या संमिश्र मन:स्थितींत त्यानें अरुणास हंसत हंसत वरील प्रश्न केला. "हो, आपण म्हणतां तेंच अगदीं बरोबर. आपल्या सारख्या सवाई कुंभकर्णास सूर्य कितीहि वर आला तरी तो लवकरच उगवलासा वाटणार. आधींच सूर्यवंशी आणि त्यांतून हल्लीं तर काय विश्रांति चालू आहे. मग काय विचारतां ! म्हणतात ना, आधींच मर्कट..." असें हंसत हंसत उत्तर देत त्यानें आपलें हातावरील घड्याळ त्याचे पुढें धरलें.

"किती ८-३० ! बापरे, फारच उशीर झाला नाहीं ? Excuse me अं, आलोंच एक दोन मिनिटांत." असें म्हणत शरच्चंद्र खालीं गेला व येतांना दोन कप चहा घेऊन वर आला ! चहा घेतां घेतां अरुणानें विचारलें,

“इतका उशीरसा झाला उठायला ? काल रात्रीं कांहीं...” “हें बघ, मला बरंचसं तुला सांगायचंय्, आधीं चहा संपव पाहूं, मग आपण बाहेर जाऊं.” अरुणास वाक्य पुरें करूं न देतां शरच्चंद्रानें वरील उत्तर दिलें. चहा संपवून त्यानें कपडे केले व बाहेर जाण्यास तयार झाला. अरुणाचें चहापान संपतांच दोघेहि बाहेर जाण्यास निघाले. दारांतच एका गड्यानें त्यास एक पाकीट दिलें. पाकिटावर खालील पत्ता होता.

To,

Dr. Sharachandra Nagpurkar, M. D.

Ajagaon.

*From:—*

Miss Rajani Ajagaonkar

Secy. To म. वि. शाखा, अजगांव.

शरच्चंद्रानें पत्र फोडून पाहिलें तों आंत म. वि. शाखेला वार्षिक उत्सवाची निमंत्रणपत्रिका होती. ती वाचल्यानंतर ते दोघे बाहेर गेले.

दादासाहेब म्हणजे प्रत्यक्ष लक्ष्मीपुत्र व त्यांतून त्यांचें दातृत्वहि वाखाणण्यासारखें; त्यामुळें तालुक्यांतील आसपासच्या लहानमोठ्या संस्था म्हणजे त्यांच्या उदारपणाचीं उदाहरणेंच होतीं. त्या गांवात महिला विद्यापीठाची शाखा उघडण्याबद्दल दादासाहेबांनीं जी मदत केली तिच्या मुळाशीं केवळ औदार्यच होतें असें नव्हे. आपल्या एकुलत्या एका मुलीस संसारसुखाच्या अभावीं सार्वजनिक कार्यांत मन रमवितां यावें हा स्वार्थी हेतुहि होता. व तो थोड्याच दिवसांत अपेक्षेबाहेर रजनीनें तडीस नेऊन दाखविला. या संस्थेवर तिचें अत्यंत प्रेम होतें व तिच्या उत्कर्षाकरतां ती रात्रंदिन झटे. अलिकडे शरच्चंद्राची ओळख झाल्यापासून तिच्या मनांतून ह्या शाखेस एक ‘नर्सिंग होम’ नांवाची उपशाखा निर्माण करावी असें वाटूं लागलें होतें. पण तीसुद्धां पैशाची अडचण कशी दूर करावी हा प्रश्न सोडवावयास पाहिजे होता. ह्या संस्थेस दादासाहेबांनीं एवढी रक्कम दिली होती कीं पुन्हां आतां पैशाबद्दल गोष्ट काढणें तिला कठीण वाटे.

शरच्चंद्राच्या ओळखीचें आतां घरोब्यांत रूपांतर होऊन तो अलीकडे

दादासाहेबांच्या घरीं नेहमीं येत असे. रजनी किंवा दादासाहेब यांना शरच्चंद्र केवळ डॉक्टर म्हणून हवा होता असें नाहीं तर त्यांस त्याच्याबद्दल एक प्रकारचें प्रेम वाटे. त्याची वागण्याची पद्धत, वादविवादकौशल्य व सर्वांत श्रेष्ठ असा सरळ स्वभाव यांमुळें दिवसेंदिवस स्नेहभाव वृद्धिंगत होत होता. रजनीस जरी वादविवादाची विशेष आवड नसे तरी शरच्चंद्राचें बोलणें ऐकणें तिला फार आवडे. म्हणून ती नेहमीं वेगवेगळ्या विषयांवर प्रश्न उपस्थित करी. एकदां सहज बोलतांना रजनी म्हणाली,

" ध्येयवादी लोक नेहमीं वर पाहतात व खालीं चालतात व म्हणून स्वतःच ठेंचा खातात. विचार व कर्म यांचा त्यांना मेळ घालतां येत नाहीं."

" मेळ घालावयास प्रसंग आल्यास मग ध्येयवादी कर्मयोगी बनतो. "

गप्पा संपवून शरच्चंद्र घरीं जाण्यास निघाला. पण रजनीची मूर्ति त्याच्या डोळ्यांसमोरून हलेना. स्वप्नांत दिसलेली स्त्री व रजनी ह्या दोहोंत त्यास विलक्षण साम्य दिसूं लागलें. ध्येयाचा व्यवहाराशीं मेळ घालून देणारी हीच जादूगार असावी असें त्यास वाटूं लागलें. तिचें वाक्य कानांत सारखें निनादित होत होतें. तिनें सांगितलेल्या वचनाची ती स्वतःच उपमा होय असें त्यास वाटूं लागलें व स्वतःच संधी मिळेपर्यंत विचार करण्याशिवाय आपल्या हातीं कांहीं नाहीं असें त्यास वाटे.

* * * *

आज दादासाहेबांना बरें वाटत होतें. अर्धांगवायूचें दुखणें व त्यांतून म्हातारपणीं. शरच्चंद्राच्या निर्व्याज प्रेमामुळें व मदतीमुळें आज आपणांस बरें वाटत आहे हें दादासाहेब जाणून होते. डॉक्टर घरचा झाला तरी त्यास कांहींतरी बक्षिस म्हणून द्यावयास पाहिजे असें त्यांस वाटूं लागलें. रजनी-जवळ त्यांनीं यासंबंधीं एकदां प्रश्न काढला. पण ती कांहींच बोलली नाहीं. कांहीं वेळानें तीच म्हणाली,

" बाबा, त्यांना बक्षिस देण्याची तुमच्याप्रमाणें माझीहि इच्छा आहे. पण ती इच्छा अमलांत आणण्याची माझी योजना मात्र वेगळी आहे. "

" ती काय ? " खोल आवाजानें दादासाहेबांनीं विचारलें.

" माझ्या मनांतून महिलाविद्यापीठास एक नवीन 'नार्सिंग होम'ची उपशाखा निर्माण करावयाची असून तीवर शरच्चंद्रांना मुख्य डॉक्टर करावयाचें आहे. पण त्यास एक मोठी अडचण आहे... "

" अडचण ! कशाची अडचण ? "

" दहा हजार रुपये आपण त्याकरतां द्यावयास पाहिजेत. म्हणजे त्यांना हवी असलेली जनतासेवेची संधि आपण दिल्यासारखी होईल व ..... "

दादासाहेबांच्या डोळ्यांस रजनीच्या बोलण्याचा अर्थ कळण्यास बिलकूल वेळ लागला नाहीं. कारण त्यांचाच हेतु तिनें बोलून दाखविला होता. तोंडानें 'हो' म्हणण्याऐवजीं त्यांच्या वात्सल्यप्रेमानें आलेल्या उमाळ्यानेंच होकार दिला.

---

# कृत्तिवासी रामायण

### लेखकः विष्णु केशव सामक, बी. ए.

[ यांचा जन्म सन १८८५ मध्यें झाला. त्यांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण भोर येथें होऊन ते १९०३ सालीं भोर हायस्कूलमधून प्रवेशपरीक्षा व फर्ग्युसन कॉलेजमधून १९०९ सालीं बी. ए.ची परीक्षा पास झाले. गेलीं १६ वर्षें ते भोर हायस्कूलचे मुख्याध्यापक आहेत. त्यांचें घराणें मूळचें वांई येथील असून आज सुमारें दीडशें वर्षें ते श्रीमंतांचे आश्रित आहेत. कुटुंबशिक्षणमालेंत व लोकशिक्षण, मनोरंजन, वगैरेंतून विद्यापति, चैतन्य, चंडीदास, बेहुला वगैरे चरित्रांवर व वर्णनात्मक असे यांचे लेख आलेले आहेत. ]

आधुनिक शास्त्रीय शोधांचे योगानें दळणवळणाचीं साधनें इतकीं सुलभ आणि त्वरित गतीचीं झालीं आहेत कीं, दूरदूरच्या देशांमधील अगर खंडांमधील अंतर नाहींसें होत चाललें आहे. पूर्वी महानद्या, उत्तुंग पर्वत, वालुकामय प्रदेश आणि महासागर इत्यादि भौगोलिक अडचणी प्रांताप्रांतांतील अगर देशादेशांतील सीमा ठरविण्यास अत्यंत उपयोगीं पडत असत. परंतु आतां हा मनु पालटला असून या भौगोलिक अडचणींचें महत्त्व आधुनिक यानांचे योगानें फारच कमी झाल्यामुळें प्रांत अगर देश यांच्या सीमा कित्येक नवीन

वसाहतींच्या देशांत अक्षांश आणि रेखांश यांस अनुसरून ठरविण्यांत येत आहेत. आपले देशावर इंग्लिश सरकारचें एकछत्री राज्य होण्यापूर्वी पंजाब, राजस्थान, बंगाल, महाराष्ट्र वगैरे प्रदेशांतील लोक एकमेकांस परकीय समजत होते; एवढेंच नव्हे तर या लोकांच्या स्वाऱ्या परस्परांचे प्रदेशांवर होत. परंतु हा भेदभाव आतां पूर्ण नाहींसा झाला असून राजकीय व्यवस्थेसाठीं तरी भाषावार प्रांतरचना होणें इष्ट आहे. तथापि परस्परांचे विचारविनिमयासाठीं सार्वत्रिक उपयोगांत येणारी एखादी देशी भाषा असावी, अशी तीव्र भावना जनतेचे अंतःकरणांत उत्पन्न झाली आहे. या भावनेस अनुसरून हिंदी भाषेस प्राधान्य द्यावें आणि ती आसेतु-हिमाचल अभ्यासिली जावी, असा प्रयत्न करण्यांत येत आहे. त्याबरोबर इतरहि भाषांचे हक्क अशा सार्वत्रिक भाषेसाठीं पुढें मांडण्यांत येत आहेत. तथापि अशी एखादी भाषा मान्य करण्याचे बाबतींत कित्येक व्यावहारिक अडचणी असून कार्यकर्त्या माणसांचें तितकें साहाय्य नसल्यामुळें हा मनोरथ मंद गतीनें चालू आहे.

अखिल हिंदी राष्ट्रासाठीं एखादी सार्वत्रिक भाषा मान्य होऊन तिचा प्रसार, मातृभाषेवरील प्रेम कायम राखूनहि, जारीनें केव्हां होईल तो होवो; परंतु जनतेचे आचारविचार ज्यांत प्रतिबिंबित झाले आहेत, अशा निरनिराळ्या प्रांतांतील सुंदर ग्रंथांची माहिती परस्परांस प्रांतिक भाषांतून होणें इष्ट आहे. शिवाय ज्या ग्रंथांची किंमत निव्वळ वाङ्मयविषयक आहे त्यांच्या माहितीनें प्रांतिक भाषांतील तत्सदृश ग्रंथांचा तौलनिक अभ्यास करणेंहि मनोरंजक असल्यानें येथें बंगाली भाषेंतील प्रसिद्ध कृत्तिवास-प्रणीत रामायणासंबंधानें चार शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

वाङ्मय-क्षेत्रांत महर्षि व्यास आणि वाल्मीकि यांच्यासारखें महद्भाग्य फार थोड्या ग्रंथकारांचें असेल. जी वाणी शेंकडों वर्षें कोट्यवधि लोकांच्या ओंठावर विलास करीत राहिली, दुःखी व हताश झालेल्या जीवांचें जिनें सांत्वन केलें, संसारांतील सुखी लोकांचा आनंद जिनें द्विगुणित केला, मुत्सद्यांस जिनें मसलत दिली, रोमहर्षणप्रसंग निर्माण करून वीरांचे बाहू जिनें स्फुरण पावण्यास लाविले, नानाविध संदेहांचे प्रसंगीं मार्गदर्शक होणारीं सुभाषितरत्नें मुक्तहस्तानें जिनें संसारी जनांस देऊन टाकलीं, आणि पारलौकिक

साधन करणाऱ्या मुमुक्षूंस जिनें भक्तिप्रवण करून तत्त्वज्ञान शिकविलें, अशी दिव्य वाणी ज्यांस लाभली त्यांचें दैव केवढें थोर! रामायण आणि महाभारत यांचे कथानकांचे सूत्रांत इतके हृदयंगम प्रसंग गोविले आहेत कीं, त्यांतील प्रत्येक प्रसंगावर कवि, नाटककार वगैरे प्रबंधकारांना आपली प्रतिभा प्रगट करण्यास पूर्ण अवसर मिळाला आहे. ज्याप्रमाणें गंगादि नद्या गिरिराज हिमालयाच्या हिमनद्यांपासून निर्माण होऊन आर्यावर्ताच्या विस्तीर्ण प्रदेशांतील क्षेत्रें फलें, पुष्पें आणि धान्यें यांनीं सुसमृद्ध करीत आणि त्यांना रमणीयता प्राप्त करून देत अखंड, अव्याहत वाहात राहिल्या आहेत, त्याप्रमाणें वाङ्मयक्षेत्रांत इतर ग्रंथकारांकरवीं रमणीयता निर्माण करूनहि या राष्ट्रीय ग्रंथांनीं आपली महती अनेक शतकें कायम राखिली आहे. होमर, डँटे, मिल्टन इत्यादि कवींनीं अनुक्रमें इलिअड, डिव्हाइन कॉमेडी आणि पॅरेडाइज लॉस्टसारखीं महाकाव्यें रचलीं असलीं तरी अखिल जनतेचे जिव्हेवर विलास करण्याचें भाग्य त्यांचे काव्यांस प्राप्त झालेलें नाहीं. उलट हिंदुस्थानांतील देशी भाषांतून व्यास आणि वाल्मीकि यांच्या काव्याच्या आधारें ज्यांनीं काव्यरचना केली त्यांचाहि गौरव त्या आद्य कवींप्रमाणें झालेला आहे. फक्त रामायणापुरतेंच बोलावयाचें असल्यास वाचकांच्या संख्येचे मानानें देशी भाषांत आद्यस्थान, हिंदींतील तुलसीदासी रामायणास दिलें पाहिजे. बंगालींतील कृत्तिवासप्रणीत रामायणाचा क्रम दुसरा लागेल.

बंगाली भाषेंत जे अत्यंत लोकप्रिय ग्रंथ आहेत, त्यांत कृत्तिवासाचे रामायणाची गणना आहे. हें रामायण आणि काशीदासाचें भारत यांचें पठण तिकडे धार्मिक ग्रंथ म्हणून होत असतें. कृत्तिवासाशिवाय बंगालींत अनेक कवींनीं रामायणें लिहिलीं आहेत. त्यांत शंकर कविचंद्र, रघुनंदन गोस्वामी, हे दोन कवि विशेष नांव घेण्यासारखे आहेत. कविचंद्राचे रामायणांतील कित्येक भाग सौंदर्यामुळें कृत्तिवासाचे रामायणांत बेमालूम शिरले आहेत असें म्हणतात. या कवींशिवाय जगत्‌राम, अद्‌भुताचार्य, रामगोविंददास वगैरे कवींनीं रामचंद्राचें यश गाऊन आपली वाणी पवित्रित करून घेतली आहे. पण कृत्तिवासी रामायणानें आपली छाप पांचशेंवर वर्षे बंगाली वाचकांवर कायम राखली आहे.

कृत्तिवासाचें चरित्र थोडक्यांत असें आहे. हा कवि बंगालमधील चोवीस परगण्यांतील फुलिया नांवाचे गांवीं सन १३४६ मध्यें फेब्रुवारी महिन्यांत एका कुलीन ब्राह्मणाचे कुळांत जन्मास आला. याच्या बापाचें नांव बनमाली ओझा ( उपाध्याय ). याचे पूर्वज इ. स. ७३२ मध्यें कनोजहून बंगालमध्यें आले. कृत्तिवासाचे घराण्याची विद्वत्तेबद्दल प्रसिद्धी होती. स्वतः या कवीनेंहि पद्मानदीचे तीरावरील एका ठिकाणीं पूर्वबंगालमध्यें अध्ययन करून संस्कृत भाषेमध्यें प्राविण्य संपादन केलें. नंतर राजदरबारीं मान्यता मिळावी एवढ्यासाठीं तो गौडेश्वराचे सभेस गेला. त्याची ती विद्वत्ता पाहून राजानें त्याचा सत्कार केला आणि त्यास देशी भाषेंत रामायण रचण्यास सांगितलें. राजाच्या आज्ञेनुसार कृत्तिवासानें आपला ग्रंथ पुरा केला आणि बंगाली वाङ्मयांत आपलें नांव चिरस्थायी करून टाकलें. यापेक्षां जास्त माहिती या कवीसंबंधानें नाहीं. कृत्तिवासानें आपलें आत्मवृत्त रामायणांतच देऊन ठेविलें आहे, त्यावरून सदरील माहिती उपलब्ध होते.

कृत्तिवासानें गौडेश्वराचे सभेंत जेव्हां आपलें पांडित्य प्रकट केलें, तेव्हां सर्व सभासद म्हणाले, “ फुलियाचे पंडित, तुम्ही खरोखर धन्य आहांत! सर्व ऋषींत ज्याप्रमाणें वाल्मीकी श्रेष्ठ त्याप्रमाणें विद्वानांमध्यें तुम्ही गुणवान् आहांत. ” मात्र हा गौडेश्वर कोण याचा उलगडा नाहीं! कृत्तिवासाचे जन्मकालाचा विचार केल्यास असें स्पष्ट दिसून येतें कीं, दिल्लीचे तख्तावर अद्यापि हुमायूनचे वंशाची स्थापना झालेली नव्हती. महाराष्ट्रांत विजयानगरचें राज्य फक्त दहा वर्षांपूर्वी अस्तित्वांत येऊन वाढीस लागलें होतें व कलबुर्ग्याचे बहामनी राज्याची प्रतिष्ठापना नुकतीच झाली होती. मराठी संतकवि ज्ञानराज ज्ञानदेवींचा अमृतघट महाराष्ट्रास सादर करून आत्मस्वरूपीं विलीन झाल्यास शतकार्ध होऊन गेलें होतें व संतकवींपैकीं दुसरा एखादा कवि अद्यापि क्षितिजावर चमकावयाचा होता. कृत्तिवासाचे कालांत बंगालमध्यें अफगाण सुलतानांचा अम्मल असून लक्ष्मणावती ऊर्फ लखनौती अथवा गौड येथें त्यांची राजधानी होती. म्हणून गौडेश्वर असा ज्याचा त्यानें आपले काव्यांत उल्लेख केला आहे तो कोणी हिंदु राजा होता अगर मुसलमानी बादशहा होता ही गोष्ट संदिग्ध आहे. या वेळीं खुद्द इंग्लंडमध्यें दुसरे एडवर्डचे कार-

कीर्दीत सातआठ वर्षांपूर्वी महाकवि चॉसर ( १३३८–१४०० ) जन्मास आला होता. चॉसर यास इंग्लिश काव्याचा जनक म्हणतात. त्यानें आपल्या काव्यांत सुंदर गोष्टी गुंफिल्या आहेत. वर्ण्यवस्तूशीं तादात्म्य, सौंदर्याची अभिरुचि आणि अभिव्यक्ति, श्रुतिसुख पद्यरचना इत्यादि गुणांमुळें इंग्लिश वाङ्मयांत त्यास प्रमुख स्थान आहे. परंतु भाषेच्या प्राचीनत्वामुळें खुद्द इंग्लिश वाचकांसहि तो दुर्बोध झाला आहे. इकडे हिंदुस्थानांतील तत्पूर्वींच्या अगर तत्कालीन कवींचें केवढें सुदैव! चॉसरप्रमाणें ज्ञानेश्वरीची भाषा जुनी आहे आणि तिचा विषय तर वेदांतासारखा रूक्ष आहे. परंतु चटकदार भाषा, उपमादृष्टांतादिकांची चित्ताकर्षक सृष्टि, विषय सुगम करण्याचें कौशल्य आणि भक्तिरसाचा ओलावा, यांमुळें धार्मिक भावनेनें ज्ञानेश्वरीचें पठण आज सहाशें वर्षें चालू आहे. त्याचप्रमाणें कृत्तिवासाचें रामायण सर्व जातींचे बंगाली लोकांस भगवद्गीतेप्रमाणें पूज्य वाटत असून त्यांना तो नैतिक ग्रंथ वाटतो व व्यापारी, उदमीदेखील त्याचें पठण फुरसतीचे वेळीं आपले दुकानांत करीत असतात. मराठींतील श्रीधरस्वामींचे ग्रंथ ज्याप्रमाणें चातुर्मासांत शेतकऱ्यांपासून तो धनवानांपर्यंत आबालवृद्ध प्रेमानें वाचतात, त्याप्रमाणें कृत्तिवासाचे ग्रंथाची स्थिति आहे.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भाषांत ज्याप्रमाणें वाल्मीकीचे आधारानें प्राकृत कवींनीं रामायणें रचलीं आहेत त्याप्रमाणें कृत्तिवासानेंहि आपलें रामायण लिहिलें आहे. आपाततः असें वाटतें कीं, नवीन काव्यसृष्टि निर्माण करणाऱ्या कवीपेक्षां दुसऱ्याच्या कवित्वाचा आश्रय करून काव्य लिहिणें किंचित् सुगम आहे. ही गोष्ट कांहीं अंशानें खरी आहे. एक तर अशा काव्यांत कथानकाची जुळवाजुळव करण्याचा खटाटोप करावा लागत नाहीं. स्वभावचित्रें अगोदरच रेखाटलेलीं असतात. आधारभूत कवीनें रसोत्पादनासाठीं जे प्रसंग निर्माण केले असतील, त्यांचा पूर्ण लाभ घेतां येतो व भावना उद्दीप्त करण्याची तजवीज अगोदर झालेली असते. अशा तऱ्हेनें काव्यसृष्टीचीं सर्व साधनें हाताशीं राहिल्यानें काव्यद्रष्टीचेंहि पुष्कळसें कार्य अगोदर उरकलेलें असतें. पण एवढ्यानें काव्यनिष्पत्ति करतां येईल असें नाहीं. युद्धसामग्री स्वाधीन असल्यानेंच ज्याप्रमाणें शौर्य आणि युद्धकला ह्या अंगीं येणार

नाहींत, पाकनिष्पत्तीचीं साधनें जवळ असलीं तरी सुगृहीणीशिवाय ज्याप्रमाणें सुरस पक्वान्नें सिद्ध होणार नाहींत, पूर्वार्जित धनसंपत्ति असतांनाहि चातुर्याशिवाय ज्याप्रमाणें तिचा विनियोग कसा करावा तें समजणार नाहीं, त्याप्रमाणें काव्यनिर्मितीचे प्रसंग उपलब्ध असूनहि कवित्वशक्तीशिवाय ते सर्व व्यर्थ होत. वाल्मीकीची प्रतिभा दांडगी आहे. चित्तवेधक वर्णनें, उद्बोधक स्वभावचित्रें आणि चरित्रें, प्रसादादि गुण आणि स्वाधीन रसोत्पादन यांमुळें त्याची कृति नितांतहृदयंगम झालेली आहे. तींत पुनरुक्ति, असंबद्धता, प्रमाणातीत विस्तार वगैरे दिसून येणारे दोष त्या महाकवीचे नसून, अनेक शतकांत त्याच्या काव्यानें मोहित होऊन त्यांत आक्षेप करण्याचा लोभ ज्यांना अनिवार झाला त्यांचे आहेत. तेव्हां अशा काव्याच्या आधारानें काव्यसृष्टि निर्माण करणें सोपें काम नव्हे. पदलालित्य, शब्दालंकार, सूचक वर्णनें इत्यादिकांचे साहाय्यानें त्या त्या प्रसंगांचीं बहारदार चित्रें वाचकांचे हृत्पटलावर उमटवून रसोत्पादन करणें अत्यंत कठीण आहे. डेनहॅमनें म्हटलें आहे कीं, "काव्य हें मद्यार्काप्रमाणें सूक्ष्मतर आहे. या पात्रांतून त्या पात्रांत ओततांना मद्यार्क ज्याप्रमाणें उडून जातो, त्याप्रमाणें भाषांतरित करतांना काव्यसौंदर्य नाहींसें होतें. शिवाय ज्याअर्थी काव्य हें शब्दमय संगीत आहे, आणि संगीत हें ध्वनिमय काव्य आहे, त्याअर्थी भाषांतरित काव्यांत दोहोंचें मधुरमीलन न झाल्यास तें काव्य कसलें !"

प्राचीन कवींचीं काव्यें देशी भाषांत आणतांना देशीय कवींनीं कित्येक ठिकाणीं स्वातंत्र्य अवलंबिलें आहे. त्याचें उदाहरण म्हणुन रामायणांतील एक प्रसंग घेऊं. या प्रसंगावर रामायणाची उभारणी आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं असें वाटतें. श्रीरामचंद्रास यौवराज्याभिषेक होण्याचे प्रसंगीं कैकेयीनें भरताचा हक्क दशरथापुढें मांडला नसता तर रामायण 'संपुष्टांत' आलें असतें. कैकेयी ज्याप्रमाणें सौंदर्याची खाण होती, तशीच स्वभावानें अतिशय गोड होती. रामावर तिचें अतिशय प्रेम होतें. यौवराज्यासाठीं अयोध्येंत चाललेल्या गडबडीची बातमी मंथरेनें जेव्हां कैकेयीस दिली तेव्हां तिला अतिशय आनंद झाला. हा प्रसंग वाल्मीकीनें पुढील श्लोकांत वर्णिला आहे—

मंथराया वचःश्रुत्वा शयनात् सा शुभानना ।
उत्तस्थौ हर्षसंपूर्णा चंद्रलेखेव शारदी ।

वाल्मीकीची वाणी म्हणजे एक जादू आहे. या एका श्लोकांत तिनें कैकेयीचें निरुपम सौंदर्य, तिचें रामावरील प्रेम, त्यामुळें अभिषेकासंबंधाची बातमी ऐकतांच कैकेयीस झालेला आनंद हीं सर्व एकदम व्यक्त केलीं आहेत ! सर्वांना गूढ पडतें तें असें कीं

रामे वा भरते वाहं विशेषं नोपलक्षये।

अशी म्हणणारी कैकेयी, मग तिच्यांत एवढा फरक कशानें झाला ? सुस्वभावी माणसें प्रसंगविशेषीं स्वभावाविरुद्ध वर्तन करितात, त्यांतलाच हा प्रकार होता. कार्यकारणभाव दाखविण्यासाठीं वाल्मीकीनें मंथरा निर्माण करून तिच्या माथीं हें पाप मारिलें आहे. पण एवढ्यानें तुलसीदासजींचें समाधान न होऊन त्यांनीं आपल्या हिंदी रामायणांत देवांनीं प्रत्यक्ष सरस्वतीस मंथरेचे ठिकाणीं प्रेरणा करण्यास पाठविलें असें वर्णन केलें आहे. श्रीधरस्वामींनीं आपले रामविजयांत देवांकडून हें कार्य ' विकल्पाकडे देण्यांत आलें होतें,' असें सांगितलें. विकल्पावर त्यांनीं दहा वीस ओंव्या लिहिल्या आहेत, त्यांपैकीं दोनतीन विकल्पाचें स्वरूप ध्यानांत येण्यासाठीं देतों.

विकल्प नव्हे तो श्वान । धावे भक्तांवरी वसवसून
आनंदरसपात्र उलंडून । क्षणमात्रें टाकित ॥ १ ॥
जो कां निर्दय आचारहीन । नावडे हरिकथा पुराणश्रवण ।
सदा जल्पत परदोषगुण । विकल्प येऊनि तेथें राहे ॥ २ ॥
वेदविरुद्ध जे वर्तत । नसतें वाढविती कुमत ।
कोठें विश्वास न धरी चित्त । विकल्प नित्य तेथें राहे ॥ ४ ॥

या प्रसंगांत कृत्तिवासानें नवीन पात्रांची भर न टाकतां वाल्मीकींप्रमाणें वर्णन केलें आहे. कैकयी आणि मंथरा यांचा संवाद रामायणांत महत्त्वाचा असल्यामुळें त्यांतील कांहीं भाग नमूना म्हणून भाषांतरासह खालीं दिला आहे.

मंथरा कैकयीस म्हणते

कैकेयी तोमार दुःख आमार अंतरे।
बलि हित बिपरीत बुझाओ आमारे ॥
सपत्नीतनय राजा तुमि आनन्दिता ।
कौशल्या तोमार चेये बुद्धिते पण्डिता ॥
निजपुत्रे राजा करे स्वामीर सोहागे।
थाकिबा दासीर न्याय कौशल्यार आगे ॥
थाकिल कौशल्या राणी सीतार संपदे ।
दाँडाइते नारिबि सीतार परिच्छदे ॥
कौशल्या जिनिले तुमि सोहागेर दापे।
निज पुत्रे राजा करे सेइ मनस्तापे ॥
भरत थाकिल गिया मातामहघरे।
राजार कि दोष दिब ना देखि ताहारे ॥
सतीनेर आनन्देते आनन्द सतिनी ।
हेन अपरूप कभु ना देखि ना शुनि ॥
लालिया पालिया बड करिनु भरते ।
माता पुत्रे पडिला से कौशल्यार हाते ॥
श्रीराम लक्ष्मण दुइ एकइ शरीर।
उभय करिब राज्य भरत बाहिर ॥
तबे त भरत तोर हइल बंचित ।
हित कथा बलिलाम बुझिस् अहित ॥

म्हणण्याचा भावार्थ असा–"कैकेयी, तुझें दुःख मीं मनांत वागवितें. मी तुला तुझें हित काय तें सांगत आहें. यांत कांहीं उलट असल्यास मला समजावून सांग. तुझ्या सवतीचा मुलगा राजा होतो आणि त्याचा तुला आनंद वाटतो. खरोखरी कौसल्या तुझ्यापेक्षां जास्त बुद्धिवान होय. ती आपल्या नवऱ्याच्या कृपेनें आपल्या पुत्रास राजा करीत आहे. पुढें तुला कौसल्येसमोर दासीसारखें उभें राहावें लागेल. सीतेच्या वैभवामुळें कौसल्या राणीच राहणार. पण तूं मात्र सीतेप्रमाणें राणी राहणार नाहींस. तूं आपल्या सौंदर्य-

दर्पानें कौसल्येस जिंकलेंस. यावरून तिला वाईट वाटून तिनें आपल्या पुत्रास राजा करण्याचें योजिलें आहे. भरत मातुलगृहीं जाऊन राहिला आहे. आतां तो महाराजांपुढें नसल्यामुळें त्यांना काय दोष द्यावा ? मात्र सवतीच्या आनंदानें आनंदित झालेली सवत कधीं पाहिली नाहीं अगर ऐकिली नाहीं. भरताचें लालनपालन करून मीं त्याला मोठा केला, पण आतां तो कौसल्येचे हातीं गेला. श्रीराम आणि लक्ष्मण एकदेहमात्र आहेत. ते दोघे राज्य् करतील आणि भरत मात्र बाहेर राहणार. म्हणून तर भरताची फसगत झाली. तुला तुझ्या हिताची गोष्ट सांगितली. पण तुला ती वाटते अकल्याणाची ! ”

मंथरेच्या अशा बोलण्याचा राणी कैकेयीवर इष्ट तो परिणाम झाला आणि ती मंथरेस म्हणाली:—

( कैकयी बलेन ) कुंजी तुमि हितैषिणी ।
राम मम मंदकारी किछुइ ना जानि ॥
भरत प्रवासे राम राजा हवे आजि।
केमने अन्यथा करि युक्ति बल कुंजी ॥
नृपतिर प्राण राम गुणेर सागर ।
केमने पाठाव तारे बनेर भितर ॥
घरेते राखिब बरं राज्य नाहि दिब ।
कोन दोषे श्रीरामेरे बने पाठाइब ॥

“ कुबडे, तूं माझें कल्याण चिंतणारी आहेस. पण रामचंद्र माझें अकल्याण करणारा कसा आहे, त्याचा कांहीं उलगडा होत नाहीं. भरत दूर गेला आहे आणि राम आज राजा होणार. तेव्हां हा सर्व बेत हाणून पाडण्याची युक्ति सांग. राम महाराजांचा प्राण आहे, तो गुणांचा सागर आहे, त्याला बनवासास कशी पाठवूं ? त्याला घरींच ठेवीन. राज्य तेवढें देणार नाहीं. नाहीं तर त्याला उगीच काय बोल लावून अरण्यांत पाठवूं ? ” वगैरे.

वर कृत्तिवासी रामायणांतील उतारा जरा विस्तारानें देण्याचें कारण वाचकांना त्याच्या काव्याची थोडी तरी कल्पना यावी, हें होय. तुलसी-दासांच्या अगर श्रीधरस्वामींच्या रामायणाप्रमाणें या बंगाली कवीनें

यौवराज्याभिषेकप्रसंगीं मूळ कथेंत जरी बदल केला नसला, तरी वाल्मीकीचे कथेस सोडून कृत्तिवासानें अनेक स्थळीं वर्णनें केलीं आहेत. कित्येक ठिकाणीं रामायणांत नसलेला विषय पुराणांतरांतून घेऊन त्यानें आपले ग्रंथांत समाविष्ट केला आहे. अहीरावण आणि महीरावण यांचा वध, मरणसमयीं रावणानें रामचंद्रास केलेला राजकारणासंबंधीं उपदेश, रावणाच्या आकृतीवर सीतेचें शयन इत्यादि अनेक गोष्टी कृत्तिवासी रामायणांत नवीन आलेल्या आहेत. कृत्तिवासी रामायणांत जे विषय वाल्मीकी रामायणा-शिवाय येऊन गेले आहेत, त्यांची जबाबदारी फक्त याच कवीवर आहे असें नाहीं. सोपें वृत्त आणि कृत्तिवासाची लोकप्रियता यांमुळें प्रेरित होऊन बंगाल्यांतील महान साधु चैतन्यदेव ( १४८६–१५३४ ) यांनीं प्रवर्तित अगर प्रोत्साहित केलेल्या वैष्णवपंथीय लोकांनीं तसेंच शाक्तांनींहि त्याच्या ग्रंथांत बदल केले आहेत. राक्षस मुद्राधारण करणारे रामभक्त होते अशींहि वर्णनें केलीं आहेत! आणि कित्येक नवीन प्रसंगहि त्यांत समाविष्ट केले आहेत. एवढेंच काय, परंतु कालाच्या ओघाप्रमाणें भाषाहि बदलत जाते आणि त्यास अनुसरून या काव्यांतील कित्येक शब्दप्रयोगसुद्धां बदल-ण्यांत आले आहेत. मुद्रणकलेमुळें लेखनास जें स्थैर्य आलें आहे तें येण्यापूर्वीं अशा गोष्टी अपरिहार्य होत्या. म्हणून इतर प्राचीन ग्रंथकारांच्या कृतींची जी अवस्था झाली तीस असा लोकप्रिय ग्रंथ अपवाद राहणें शक्य नव्हतें. पण यामुळें संशोधकांना एक नवीन कार्यक्षेत्र निर्माण झालें आहे हा फायदा काय लहान आहे?

कृत्तिवासाच्या काव्याची थोडीतरी कल्पना यावी, एवढ्यासाठीं आणखी एक उतारा द्यावयाचा आहे. हा प्रसंग अतिशय गंभीर आहे. तो म्हणजे सीतेच्या पातालप्रवेशाची हकीकत. रामायण आणि महाभारत हे दोन्ही राष्ट्रीय ग्रंथ शोकपर्यवसायी आहेत. सद्गुणांचें फळ इहलोकीं मिळतेंच असें नाहीं. किंबहुना गुणवान् माणसें आयुष्यांत अत्यंत दुःख भोगितात ही स्थिति आश्चर्यकारक आहे, विस्मयावह आहे, खेद उत्पन्न करणारी आहे, ती भयानक आहे व तिला धैर्यानें तोंड देणें यांतच चारित्र्याची कसोटी आहे, आणि मनुष्याची मर्दुमकी आहे. सद्गुणाचें फळ नियमितपणें

मिळत नाहीं, म्हणून तर अशा स्थितीची भरपाई करण्यासाठीं कविसृष्टि निर्माण झाली. जग आहे तसें वर्णन करणारा जसा कवींचा एक पंथ आहे त्याप्रमाणें तें असावें कसें तें दाखवून काव्यसृष्टींत तरी सद्गुणांचा उत्कर्ष रेखाटणारा दुसरा एक पंथ आहे. दैवी शक्तीचें साहाय्य असतांना देखील जगांतील दुःखें दूर लोटतां येत नाहींत, हें कटु सत्य व्यासवाल्मीकींनीं पहिल्या पंथाप्रमाणें चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. सद्गुणी, पापभीरु, प्रजावत्सल, पत्नीनिष्ठ आणि उदारचरित श्रीरामचंद्राचें आणि जानकी-सारख्या महासाध्वीचें आयुष्य दुःखांत जावें ही गोष्ट अस्वाभाविक नाहीं. तथापि सत्याची कास सोडण्यांत भ्याडपणा आहे—गर्हणीय मनोदौर्बल्य आहे, असेंच रामचरित्र शिकवितें. म्हणून सीतेच्या पातालप्रवेशाची हकीकत राम-चरित्रांत न देणें म्हणजे सत्याचा अपलाप करण्यासारखें आहे. हा प्रवेश टाळण्यानें ग्रंथाचे उपदेशांत न्यूनता येते. तथापि उत्कट भक्तीमुळें तुलसी-दासजी आणि रामविजयकार यांनीं हा प्रसंग गाळून टाकला आहे. या प्रसंगापर्यंत कथेचा ओघ आला असतां रामविजयांत कवि म्हणतो,

श्रीरामविजयग्रंथ पावन । उत्तरकांड सुरस गहन ।
पुढें निजधामा गेला रघुनंदन । हें अनुसंधान वर्णावें ॥ १ ॥
तों मध्यानीं प्रकटोनी रघुनाथ । म्हणे येथोनी ग्रंथ करी समाप्त ।
अवतार संपला हें चरित्र । रामविजयीं न सांगावें ॥ २ ॥

आदिकवि वाल्मीकीनें या प्रसंगास अनुरूप शब्दचित्रांनीं उदात्ततेचें वातावरण निर्माण करून—

सर्वान् समागतान् दृष्ट्वा सीता काषायवासिनी ।
अब्रवीत् प्रांजलिर्वाक्यमधोदृष्टिरवाङ्मुखी ॥ १ ॥
यथाहं राघवादन्यं मनसापि न चिंतये ।
तथा मे माधवी देवी विवरं दातुमर्हति ॥ २ ॥

वगैरे प्रसिद्ध श्लोक लिहिले आहेत. कुशल चित्रकार ज्याप्रमाणें दोन-चार रेघा मारून सुंदर चित्र हातांत देतो, त्याप्रमाणें पहिल्या श्लोकांत चारच विशेषणें सीतेचें वर्णन करण्यासाठीं योजिलीं आहेत. पण त्यांमुळें तिची शुचिता, शालीनता, कारुण्यावस्था यांचें हृदयंगम चित्र वाल्मीकीनें

किती सुंदर काढलें आहे! हरतरपर्श झाला कीं, सोनें करतां येतें म्हणतात तें यालाच!

कृत्तिवासी रामायणांतील याच प्रसंगासंबंधीं उतारा पुढें दिला आहे. तो कदाचित् थोडा मोठा वाटत असला तरी सहृदय वाचकांना आवडल्याशिवाय राहणार नाहीं.

### सीतादेवीर पाताले प्रवेश

जोड हाते जानकी बलेन धीरे धीरे ॥
कि कार्य आमार रघुनाथ ए जीवने ।
प्रवेश करिब अग्नि तोमार बचने ॥
परीक्षा दिलाम पूर्ब्बे देव विद्यमाने ।
देवेरा बलिल जहा शुनिले आपने ॥
देशेते आनिला तुमि दिया जे आश्वास ।
अकस्मात् मोर केन दिला बनवास ॥
महादेवी हइया मुनिर घेर बसि ।
फल मूले खाइ आमि नित्य उपवासी ॥
पतिकुले पितृकुले नाहि पाइ स्थान ।
अग्निते परीक्षा दिया कर अपमान ॥
ब्रह्मा बलिलेन जत शुनिले आपनि ।
मृतपिता तोमा कत बुझाले काहिनी ॥
साक्षाते शुनिले तुमि पितार बचन ।
तेबे से आमारे लैया देशे आगमन ॥
कुलबधु जत नारी सेइ थाके घरे ।
सभाते परीक्षा दिते आसि बारे बारे ॥
सर्बगुण धर तुमि बिचारे पंडित ।
बुझिया परीक्षा निते हय त उचित ॥
अदेखा हइब प्रभू घुचाब जञ्जाल ।
संसार साध नाहि जाइब पाताल ॥



श्री. लक्ष्मणदास माधवदास देवी.



श्री. राजाराम प्रल्हाद कानिटकर.



श्री. रघुनाथ शतानंद पारखी.



श्री. दिनकर दत्तात्रय क्षीरसागर.



पुराणरत्न शेषाद्रि गोविंद कानडे.



प्रो. रामचंद्र बळवंत आठवले.



श्री. पांडुरंग हरि देशपांडे.



श्री. रामचंद्र गोविंद कानडे.

आजि हैते घुचुक तोर लाज दुःख ।
आर जेन नाहि देख जानकीर मुख ॥
निरबधि अपबाद दितेछ आमोर ।
सभाय परीक्षा दिते आनि बारे बारे ॥

मथितार्थः— हात जोडून सीता सावकाश बोलूं लागली. ती म्हणाली, " रघुनाथ, मला हा जीव काय करावयाचा आहे? तुमच्या बोलण्यावरून अग्निप्रवेश करून पूर्वी देवांसमक्ष मी सत्त्वपरीक्षा करून दाखविली. महाराज, देव जें स्वतः बोलले तें आपण ऐकिलें. नंतर मला आश्वासन देऊन अयोध्येस आणिलेंत. मग अकस्मात् मला वनांत कां पाठविलेंत ? महाराणी होऊन ऋषींचे घरीं राहण्याचा प्रसंग मला आला आहे. फलमूल खाऊन मला उपवास घडत आहेत. पितृगृहीं किंवा पतिगृहीं मला आधार मिळत नाहीं. अग्नींत परीक्षा होऊनहि आपण अपमान करीत आहांत. ब्रह्मदेवानें जें कांहीं सांगितलें तें आपण ऐकिलेंत. त्याचप्रमाणें तुमच्या मृत पित्यानेंहि तुम्हांस कित्येक गोष्टी सांगितल्या, त्याहि श्रवण केल्यात, व मग मला अयोध्येस घेऊन आलांत. जितक्या म्हणून कुलस्त्रिया आहेत, तितक्या घरीं राहतात. मी मात्र परीक्षा देण्यासाठीं बारंवार सभेंत येत असतें. आपण गुणसंपन्न आहां. विचारानें पंडित आहां. तरीं विचार करून परीक्षा घेणें योग्य होतें. मी आतां अदृश्य होतें. त्या योगानें तरी आपला त्रास चुकेल. याउपर संसाराची आशा मला राहिलेली नाहीं. आतां मी पातालांत जातें. माझ्यामुळें तरी आपल्यास झालेल्या दुःखाचा आणि लाजेचा आतां शेवट होवो. यामुळें आजपासून जानकीचें मुख पाहाण्याचा प्रसंग आपणांवर येणार नाहीं. मला आपण निस्सीम अपवाद देत आलांत आणि सत्त्वपरीक्षेसाठीं बारंवार सभेंत आणिलेंत."

जानकीचें चरित्र पाषाणास द्रव आणील इतकें तें कारुण्यपूर्ण आहे. तें निर्व्याज, निस्सीम, अखंड प्रेमाचा आदर्श आहे. कृत्तिवासास वाल्मीकीप्रमाणें करुणरस उत्पन्न करतां आला आहे. या प्रसंगीं सीता पुढें म्हणते,

जन्मे जन्मे प्रभु मोर तुमि हओ पति ।
आर कोन जन्मे मोर करोना दुर्गति ॥

"महाराज, जन्मोजन्मीं आपण माझे पति व्हावें आणि पुढील जन्मांत माझी दुरवस्था पुन्हां करूं नये."

यानंतर भूमातेला सीतेनें हांक मारली आणि ती हांक सप्त पातालांत असलेल्या पृथ्वीनें ऐकली. जानकीस नेण्यासाठीं ती पुढें आली. सप्त पातालांतून एक विवर उत्पन्न झालें. त्यांतून एकदम एक सुवर्णसिंहासन वर आलें आणि त्यायोगानें हा मर्त्य लोक दाही दिशांनीं प्रकाशित झाला.

अकस्मात् उठिल सुवर्णसिंहासन ।
दशदिक आलो केर ए मर्त्यभुवन ॥

नाना तऱ्हेचे अलंकारांनीं मंडित झालेली, सुंदर वस्त्रें परिधान करणारी पृथ्वी देवी उपस्थित झाली आणि तिनें 'बाळे' म्हणून जानकीस मोठ्यानें हांक मारली, तिला पोटाशीं धरून सिंहासनावर घेतलें आणि रामास उद्देशून म्हणाली कीं, "लोकांच्या बोलण्यावरून ज्या अर्थी सीतेची परीक्षा पहात आहेस त्या अर्थी लोकांस घेऊन सुखानें रहा." पृथ्वीचें भाषण सर्व जनतेनें ऐकलें. सीतेनें आपल्या दोन्ही मुलांची अपेक्षा केली नाहीं. फक्त रामचंद्राकडे टक लावून तिनें पातालांत प्रवेश केला. ती पातालांत जात असतांना रामानें सीतेचे केस धरले, तों मूठभर केस मात्र राजाचे हातांत राहिले. इकडे सीतादेवी पातालांत गेली ती क्षणभर देखील तेथें थांबली नाहीं. आतांपर्यंत जानकीचे रूपानें राहणारी लक्ष्मी स्वतःचा देह धारण करून स्वर्गास गेली आणि त्यामुळें सर्व देव हर्षित झाले.

सीतार चरित्रकथा शुने जेइ लोके ।
पुञ्ज पुञ्ज पुण्य हय पाप नाहि थाके ॥

शेवटीं, सीताचरित्राचें श्रवण झाल्यानें अतिशय पुण्यसंचय होईल अशी फलश्रुति सांगितली आहे.

कृत्तिवासानें वाल्मीकीप्रमाणें संपूर्ण रामचरित्र सप्तकाण्डांत गायिलें आहे. त्यांत प्राधान्यानें 'पयार' छंदाचा उपयोग केला असून मधूनमधून 'त्रिपदी' छंदांतहि रचना केली आहे. 'पयार' छंदाचे प्रत्येक चरणांत चौदा वर्ण असतात व आठव्या अक्षरावर यति असतो. ( चतुर्दश वर्णे हय सकल पयार, अष्टम अक्षरें यति प्रशस्त तहार ).

कृत्तिवासाची भाषा सरळ, सुबोध आणि चित्ताकर्षक आहे. त्याचे वाणींत प्रसाद आणि ओज हे दोन्ही गुण आहेत. प्रशांत स्थळीं वाहणाऱ्या प्रसन्न, निर्मळ जलप्रवाहाप्रमाणें कृत्तिवासाच्या रामायणीय कथेचा ओघ चाललेला पाहून वाचकाचें मन तल्लीन झाल्यावांचून रहात नाहीं. रसांचा उठाव—विशेषतः करुणरसाचा उठाव—करण्याची शैली त्यास चांगली साधली आहे. या सर्व गुणांत भक्तिरसाचा प्रवाह समाविष्ट झाल्यामुळें वाचकांचें मन हरण करून कौटुंबिक गुण वृद्धिंगत करण्याचें कार्य त्याचा ग्रंथ आज पांच शतकांचेवर करीत आला आहे.

इतर कवींशीं कृत्तिवासाची तुलना करावयाची असल्यास देशी भाषांतील दोन नांवें प्रमुखपणें आपले पुढें उभीं राहतात. त्यांचा उल्लेखहि वर करण्यांत आलेला आहे. आदिकवि महर्षी वाल्मीकि औपम्यातीत असल्यानें व त्याच्या उल्लेख कविश्रेष्ठ कालिदासानेंहि रघुवंशांत

अथवा कृतवाग्द्वारे वंशेऽस्मिन् पूर्वसूरिभिः ।
मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येवास्ति मे गतिः ।।

असा गौरवपूर्ण केला असल्यामुळें त्याचें नांव सोडून हिंदी कवी तुलसीदास आणि मराठी कवि श्रीधर हेच शिल्लक राहतात. तुलसीदासांनीं रामचरितमानस हिंदींत रचून, कृत्तिवासांनीं बंगालींत साग्र रामयश गाऊन आणि श्रीधरस्वामींनीं ‘ रामविजय ’ वर्णन करून आपआपले प्रांतिक जनांस उपकृत करून ठेविलें आहे. तिघांचीहि वाणी प्रसादयुक्त. तिघांची रामभक्ति उत्कट. तिघांनाहि रसनिष्पादनाची हतोटी साधलेली आहे. स्वतः तुलसीदास साधु असल्यामुळें आणि श्रीधरस्वामीसुद्धां विशेषतः पारमार्थिक दृष्टीचे असल्यामुळें त्यांनीं निदान रामायणांत तरी रामावताराच्या समाप्तीचे प्रसंग टाळले आहेत. तुलसीदासांनीं आपली भाषा अलंकारांनीं मंडित केली असून गृहस्थाश्रमी जनांस विनोद करून ते हंसू आणल्याशिवाय राहत नाहींत. श्रीधरांनीं रूपकें व उत्प्रेक्षा वगैरे अलंकार मनमुराद घडविले आहेत. कृत्तिवासांनीं अलंकारांचा खटाटोप फारसा केलेला नाहीं. पण त्यांची कविता निसर्गमनोहर आहे. शिवाय स्वभावचित्रें रेखाटण्यांत कदाचित् कृत्तिवासाकडे कांटा झुलता राहील. निव्वळ काव्यनिर्मितीचाच जर विचार केला तर श्रीधरांचीं काव्यें

बरींच आहेत. तुलसीदासांनीं तर प्रचंड ग्रंथरचना केली आहे. कृत्तिवासाचे जास्त ग्रंथ उपलब्ध नाहींत. तिघांनीं आपले ग्रंथ प्राकृतजनांसाठीं आणि सोप्या छंदांत लिहिले आहेत. पण तुलसीदासी रामायणांत अनेक प्रांतिक भाषा असल्यामुळें व कालाच्या दृष्टीनें तें रामायण रामविजयापेक्षां प्राचीन असल्यामुळें सामान्य वाचकांस मदतीची अपेक्षा असते. कृत्तिवासी रामायण सर्वांत ज्येष्ठ असूनहि अनेक महाशयांचा त्यावर हस्तक्षेप झाल्यामुळें त्याची दुर्बोधता बरीच कमी झाली आहे. हे त्या त्या रामायणांचे विशेष आहेत.

मनोरंजन हा काव्यनिर्मितीचा इतर ललितकलांप्रमाणें एक हेतु असावा हें साहजिकच आहे. परंतु राष्ट्रीय महाकाव्याचा प्रधान हेतु उच्चतर असावयास पाहिजे. लाखों लोकांकडून नित्य पठण केलीं जाणारीं काव्यें जर ध्येयरहित असतील आणि मनोरंजनापलीकडे जर त्यांची मजल जात नसेल, तर त्यांचें राष्ट्रीयत्व नष्ट व्हावयास पाहिजे. रामायण आणि महाभारत किंवा त्यांचे देशी भाषांतील अवतार हे नीतिग्रंथ आहेत, देशांतील जनतेचें शील बाल्यावस्थेंत आणि तारुण्यांत बनविण्याचीं ते साधनें आहेत. म्हणून अशा राष्ट्रीय कवींना राष्ट्रीय वीरांच्या शेजारीं आसन देण्यांत येत असतें. एक ग्रंथकार* तर असें म्हणतो कीं, 'महाकवि प्रथमतः जी कल्पना प्रकट करतो तीच वीर प्रत्यक्ष कृतींत आणतात आणि याच कारणास्तव कवि आणि वीर यांचा एकच वर्ग होय.'

रामायणाची शिकवण कौटुंबिक गुणांच्या विकासासाठीं आहे. रामायणांत जीं अनेक स्वभावचित्रें रेखाटलीं आहेत त्यांचे ठिकाणीं स्वार्थत्यागाची उदात्त कल्पना कवीनें उत्तम प्रकारें प्रतिबिंबित केली आहे. सगळ्या कुटुंबांच्या हितासाठीं स्वतःचे सुखावर तिलांजलि देण्यास कुटुंबांतील निरनिराळ्या व्यक्तींनीं तयार असलें पाहिजे. कौटुंबिक हितासाठीं स्वार्थत्यागाचें प्रथमतः बीजारोपण झालें, तरच त्या गुणाची वाढ राष्ट्रीय कल्याणासाठीं होणार असल्यानें या गुणाची जोपासना प्रारंभापासून व्हावयास पाहिजे. जी व्यक्ति नित्यसंबंधींच्या आणि जिव्हाळ्याच्या व्यक्तींसाठीं स्वतःचें सुख रतिमात्र

* Poets and heroes are of the same race; the latter do what the former conceive.—Lamartine.

कमी पडूं देणार नाहीं ती अनभ्यस्त, अपरिचित अशा राष्ट्रबांधवांसाठीं काय करणार तें स्पष्टच आहे! सांप्रत कुटुंबांतील घटक स्वार्थी भावनेनें अलग होण्याच्या मार्गास नित्य लागत असून ' यूयं यूयं, वयं वयम् ' असा बाणा वाढूं लागला आहे. म्हणूनच रामायणाची शिकवण चित्तांत जितकी जास्त ठसेल तितकें राष्ट्रीय कल्याण साधणारें आहे.

ही शिकवण पित्याच्या वचनासाठीं राज्यत्याग करणाऱ्या रामचंद्रांत, भ्रातृप्रेमानें बद्ध झालेल्या आणि स्वसुखाविषयीं निरभिलाष असणाऱ्या लक्ष्मणांत आणि भरतांत व पतिनिष्ठ जानकींत स्पष्ट व्यक्त झालेली आहे. रामायणांत स्वार्थत्यागी व्यक्ति अनेक आहेत. त्यांचा विस्तारानें येथें उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं. फक्त गौण पात्रांत जिची गणना केली जाईल, अशा ऊर्मिळेचाच विचार केला तरी वाल्मीकींनीं मांडलेली ही त्यागाची कल्पना सुंदर प्रकारें प्रतीत होते. पतिवियोगाचीं चौदा वर्षे स्वकर्तव्यांत घालवून शालीनतेनें राहणाऱ्या आणि वैभवाचे दिवसांतहि जिचा गुणगौरव झालेला नाहीं असें ऊर्मिळेचें चित्र काढलें आहे. डॉ. रवींद्रनाथ ठाकूर यांनीं एका ठिकाणीं ज्यांच्या संबंधानें कवींनीं अन्याय केला आहे अशीं संस्कृत वाङ्मयांतील कांहीं पात्रें दिलीं आहेत. त्यांत कालिदासाच्या शाकुंतलांतील अनुसूया आणि प्रियंवदा, बाणभट्टाचे कादंबरींतील पत्रलेखा व रामायणांतील ऊर्मिला यांचा अंतर्भाव केला आहे. ' दुःखसंवेदनायैव रामे चैतन्यमर्पितम्, ' हा सिद्धांत फक्त श्रीरामापुरताच नसून ऊर्मिळेसारख्या गौण पात्रांनाहि तो लागू आहे. इंग्लिश कवि टेनिसननें आपल्या ' Idylls of the King ' नामक काव्यांत मठांतील एका कुमारिकेच्या तोंडांत जे शब्द घातले आहेत, ते ऊर्मिळेस तंतोतंत लागू पडतील. सदरहू काव्य टेनिसननें आख्यायिकेंत प्रसिद्ध असलेल्या महापराक्रमी, धीरोदात्त अशा आर्थर नांवाच्या इंग्लंडमधील प्राचीन राजासंबंधानें लिहिलें असून, त्यांत त्याची पत्नी पातिव्रत्यापासून भ्रष्ट झाल्यामुळें त्याच्या सर्व सरदारांमध्यें—नाइटस् ऑफ दि राउंड टेबलमध्यें—दुर्गुण कसे शिरले, त्यामुळें राजाच्या सर्व सत्कृत्याची आणि त्याच्या राज्याची धुळधाण कशी झाली, आणि पश्चात्तापानें त्रस्त झालेल्या सौंदर्यसंपन्न पण दुर्गुणी राणीनें एका जोगिणीचे मठांत अज्ञातवास कसा पत्करला व एका मुलीबरोबर

बोलत असतांना आर्थरची गोष्ट निघाली व त्यांत आपण प्रत्यक्ष राणीशीं बोलत आहों, हें त्या मुग्ध बालिकेस माहित नसल्यामुळें, या सर्व नाशाचें कारण पतित झालेली राणीच कशी आहे व सद्‌गुणी आणि प्रेमळ अशा आर्थर राजाच्या दुःखास सीमा कशी राहिलेली नाहीं, इत्यादिसंबंधीं त्या कन्यकेचें भाषण त्यांत आलेलें आहे. हें काव्य सुंदर आणि रसभरित आहे. पुष्कळ प्रसंगीं असें दिसून येतें कीं, मोठे आणि छोटे यांचीं दुःखें समान स्वरूपांचीं असतात. पण जोगिणींचे मठांतील मुलगी म्हणते—

For me, I thank the saints, I am not great.
For if there ever come a grief to me
I cry my cry in silence, and have done.
None knows it, and my tears have brought me good.

गरिबांना अगर अज्ञात सामान्य जनांना एकांतांत अश्रुपातानें आपल्या दुःखास वाट करून देतां येते. मोठ्या लोकांचें तसें नाहीं. त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांचीं दुःखें वेशीवर टांगलीं जातात आणि त्या योगानें त्यांचें दुःख द्विगुणित होतें.

... ... ... Yet this grief
Is added to the griefs of the great must bear,
That howsoever much they may desire
Silence, they cannot weep behind a cloud.

अशा थोर लोकांप्रमाणें राजा रामचंद्राची स्थिति नव्हती असें कोण म्हणेल? पण ऊर्मिळेप्रमाणें स्वार्थत्यागपूर्वक स्वकर्तव्य करीत राहणारे आणि सन्मानाचा अभिलाष न धरणारे लोक देखील एक प्रकारें ईश्वरोपासनाच करीत असतात. महाकवि मिल्टन म्हणतो त्याप्रमाणें,

They also serve who only stand and wait.

शेवटीं रामायण आणि महाभारत हे ग्रंथ संस्कृतमधून अगर देशी भाषांतील रूपांतराच्या द्वारें वाचतांना रसिकतेला रजा देऊन, आर्यसंस्कृतीचा अभिमान विसरून, आत्मीयता सोडून आणि कालाचा अपव्यय करून त्यांत भलत्याच गोष्टींची अपेक्षा धरून ते वाचण्यांत येऊं नयेत, एवढें सांगावयाचें आहे. सांप्रत पश्चिमेकडून जे निरानिराळ्या मतांचे वारे येत आहेत, त्याप्रमाणें विचार या प्राचीनतर ग्रंथांत संग्रहित केले नाहींत, म्हणून नाक मुरडण्यांत अर्थ नाहीं. सांप्रतच्या कांहीं सुधारलेल्या देशांतल्याप्रमाणें स्त्री-

पुरुषांमधील वैवाहिक संबंध शिथिलतेचे असावेत किंवा स्वार्थ साधण्यासाठीं कुटुंबांतील घटकांना संकटांत लोटण्यास दिक्कत बाळगूं नये इत्यादि आधुनिक सिद्धांत त्यांत सांगितले नसतील. परंतु दोन्ही ग्रंथांत ग्राह्यांशहि पुष्कळ आहे, ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं. या दोन्ही राष्ट्रीय ग्रंथांची उभारणी ऐतिहासिक सत्यावर आहे. त्यांतील वर्ण्यविषय उदात्त व गंभीर आहेत, त्यांची भाषा ओजस्वी आणि विषयानुरूप आहे. गृहकलहाचे परिणाम व्यक्तींसच काय, पण अखिल राष्ट्रांस हानिकारक कसे होतात व दैविक शक्तीचें साहाय्यहि संकटें टाळण्यास कसें निरर्थक ठरतें इत्यादि गोष्टी चटकदार रीतीनें या काव्यांतून वर्णिल्या आहेत. भारतानें अद्वैतामृतवर्षिणी गीतेस जन्म दिला आहे, तर रामायणानें भागीरथीच्या आणि त्या वेळीं अज्ञात अशा दक्षिण हिंदुस्थानच्या भौगोलिक शोधांची हकीकत वर्णन करून सुधारलेल्या लोकांनीं अर्धवट सुधारलेल्या वा-नरांचे कंपू निर्माण करून परराष्ट्रावर जय मिळविण्याचा इतिहास वर्णन केला आहे. राष्ट्रीय गुणांचा परिपोष होण्यासाठीं महाभारतांतील वातावरण रजोगुणी स्त्रीपुरुषांच्या दणदणाटांनीं दुमदुमून राहिलें आहे, तर गृहव्यवस्थेस अवश्य असणाऱ्या सात्त्विक गुणांच्या परिपोषासाठीं चंद्रिकेप्रमाणें शीतल वातावरण रामायणांत निर्माण केलें आहे. एकंदर कर्ममार्गप्रवर्तक भगवान् श्रीकृष्णापासून तों भीष्मकर्णादिकांपर्यंत, तसेंच कृपद्रोणादि ब्राह्मण सैनिकांपर्यंत, इतकेंच नव्हे तर विदुला, कुंती, द्रौपदी, देवयानी, सावित्री, शकुंतला इत्यादि स्त्रियांपर्यंत सर्वांच्या ठिकाणीं राष्ट्रीय धर्मास पोषक जो रजोगुण—तेजस्वी क्षात्रगुण—तो दिसत असून आपण प्रखर सूर्यप्रकाशांत संचार करीत आहोंत कीं काय, असा वाचकांस भास होतो. रामायणावर औदासिन्याची छाया पसरल्याची जाणीव होते, महाभारतांत स्वभावचरित्रें विपुल असून सुंदर उपाख्यानांचा संग्रह केलेला आहे. सत्यवान-सावित्री, कच-देवयानी, नल-दमयन्ती, दुष्यंत-शकुंतला यांचीं उपाख्यानें क्रमानें चित्ताकर्षक, रसपूर्ण आणि बोधप्रद असल्यामुळें भारतीयकथेला मोहक स्वरूप प्राप्त झालें आहे, तर रामायणांत गंगावतरण, अहिल्येचें वृत्त, धेनुहरण, नृग-सौदास-श्वेत-दंड इत्यादि राजांच्या आख्यायिका देऊन आणि भारतांतील स्वभावचित्रांच्या

मानानें अल्पसंख्याक पण जास्त रेखीव अशीं चित्रें काढून कवीनें काव्यास मनोरमता आणिली आहे. सारांश, दोन्ही ग्रंथ अथवा त्यांचीं रूपांतरें उद्बोधक असल्यामुळें अभ्यसनीय आहेत.

अखेर मुद्याची गोष्ट ही कीं, कृत्तिवासी रामायणावर निबंध लिहिण्यांत त्या रामायणासंबंधीं माहिती देणें हा मुद्दा गौण आहे. प्रधान हेतु हा कीं, तामील, तेलगु इत्यादि द्राविडी भाषेचें ज्ञान करून घेणें अवघड असलें तरी संस्कृत भाषेपासून उत्पन्न झालेल्या हिंदी, गुजराथी आणि बंगाली भाषांचा परिचय अल्प श्रमानें करून घेतां येण्यासारखा आहे. भाषा समजणें ही गोष्ट वेगळी आणि तींत स्वतंत्र रचना करणें ही गोष्ट वेगळी. थोडी प्रत्ययांची आणि वाक्यरचनेची माहिती करून घेतली म्हणजे संस्कृतोद्भव भाषेच्या जिवंत, प्रचलित वाङ्मयाशीं परिचय करून घेणें सुलभ काम आहे. जन्मभाषा, संस्कृत आणि इंग्लिश इतक्या भाषांचा अभ्यास विद्यालयांत करावा लागतो. त्या वेळीं कदाचित् ही गोष्ट इतर विषयांच्या ओझ्यानें वांकलेल्या व मातृ-भाषेच्या माध्यमाच्या अभावामुळें अडचणलेल्या विद्यार्थ्यांस अवघड वाटेल. परंतु विद्यार्थिदशेनंतर यथावकाश हौसेनें यांतील एक अगर सर्व भाषांशीं परिचय करून घेतल्यास कालाचा सदुपयोग होऊन, प्रचलित विचारांचें ज्ञान करून घेण्यानें प्रांताप्रांतांतील भेदभावाचीं आवरणें पूर्ण नाहींशीं होतील.

श्रीसितारामचंद्रार्पणमस्तु ।

---

# मम सुमन मृत्युच्या द्वारीं

कवयित्री : कु. कृष्णाकुमारी डबीर, पुणें.

[ भोरचे रहिवासी रा. केशव बलवंत डबीर, बी. ए., यांची या कन्या होत. त्यांचा जन्म शके १८३६ मध्यें भोरास झाला. त्यांचें शिक्षण पुण्यास होऊन त्या चालू सालीं सेवासदनमधून मॅट्रिकला बसल्या आहेत.]

( चालः—राजहंस माझा निजला० )

सुमनाच्या जवळीं गेलें । मज दृश्य निराळें दिसलें ॥
ती सुंदर लतिका माझी । ढाळिते अश्रु कां आजी ॥

कुरवाळुनि प्रेमें पुसलें । तिजला परि शब्द न फुटले ॥
वायूच्या शीतल लहरी ॥
करिती ही दुनिया हंसरी ॥
परि द्वेष साधुनी भारी ॥
मज म्हणति 'दुःख घे पदरीं । मम सुमन मृत्युच्या द्वारीं' ॥१॥

पुसुनिया पाहिलें त्यांना । ना बोलति एकहि वचना ॥
मज जाती अवहेलुनिया । त्यां नसे दया वा माया ॥
कुजबूज येइ जी कानीं ॥
सुमनाचिच वाटे ध्यानीं ॥
अंधारिं येत तैं नयनीं ॥
लतिकेच्या आर्त रवानें । मम हृदय भरे शोकानें ॥ २ ॥

क्षणिं गमे येति यमदूत । हरुनिया प्राणधन नेत ॥
मज वदति सोडि गे हात । का करिसि बालिके खंत ॥
भेसूर लता कुंजांत ॥
मी रडलें सखि-समवेत ॥
परि कींव न कोणा येत ॥
चित्तासि गमे हुरहूर । काळीज कांपतें चरर ॥३ ॥

नयनांत न मावे नीर । अश्रूंचा वाहे पूर ॥
कुंजांतुनि येतां जातां । मनिं ध्यास ऐक तो आतां ॥
दैवाची करणी काय ॥
मम सुमन जगांतुनि जाय ॥
चहुंकडे हाय ! सखि, हाय ! ॥
निष्प्रेम, ओस जग होई । मम सुमन मृत्युच्या गेहीं ॥ ४ ॥

---

मानानें अल्पसंख्याक पण जास्त रेखीव अशीं चित्रें काढून कवीनें काव्यास मनोरमता आणिली आहे. सारांश, दोन्ही ग्रंथ अथवा त्यांचीं रूपांतरें उद्बोधक असल्यामुळें अभ्यसनीय आहेत.

अखेर मुद्याची गोष्ट ही कीं, कृत्तिवासी रामायणावर निबंध लिहिण्यांत त्या रामायणासंबंधीं माहिती देणें हा मुद्दा गौण आहे. प्रधान हेतु हा कीं, तामील, तेलगु इत्यादि द्राविडी भाषेचें ज्ञान करून घेणें अवघड असलें तरी संस्कृत भाषेपासून उत्पन्न झालेल्या हिंदी, गुजराथी आणि बंगाली भाषांचा परिचय अल्प श्रमानें करून घेतां येण्यासारखा आहे. भाषा समजणें ही गोष्ट वेगळी आणि तींत स्वतंत्र रचना करणें ही गोष्ट वेगळी. थोडी प्रत्ययांची आणि वाक्यरचनेची माहिती करून घेतली म्हणजे संस्कृतोद्भव भाषेच्या जिवंत, प्रचलित वाङ्मयाशीं परिचय करून घेणें सुलभ काम आहे. जन्मभाषा, संस्कृत आणि इंग्लिश इतक्या भाषांचा अभ्यास विद्यालयांत करावा लागतो. त्या वेळीं कदाचित् ही गोष्ट इतर विषयांच्या ओझ्यानें वांकलेल्या व मातृभाषेच्या माध्यमाच्या अभावामुळें अडचणलेल्या विद्यार्थ्यांस अवघड वाटेल. परंतु विद्यार्थिदशेनंतर यथावकाश हौसेनें यांतील एक अगर सर्व भाषांशीं परिचय करून घेतल्यास कालाचा सदुपयोग होऊन, प्रचलित विचारांचें ज्ञान करून घेण्यानें प्रांताप्रांतांतील भेदभावाचीं आवरणें पूर्ण नाहींशीं होतील.

श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ।

---

## मम सुमन मृत्युच्या द्वारीं

कवयित्री : कु. कृष्णाकुमारी डबीर, पुणें.

[ भोरचे रहिवासी रा. केशव बलवंत डबीर, बी. ए., यांची या कन्या होत. त्यांचा जन्म शके १८३६ मध्यें भोरास झाला. त्यांचें शिक्षण पुण्यास होऊन त्या चालू सालीं सेवासदनमधून मॅट्रिकला बसल्या आहेत.]

( चालः—राजहंस माझा निजला० )

सुमनाच्या जवळीं गेलें । मज दृश्य निराळें दिसलें ।।
ती सुंदर लतिका माझी । ढाळिते अश्रु कां आजी ।।

कुरवाळुनि प्रेमें पुसलें । तिजला परि शब्द न फुटले ॥
वायूच्या शीतल लहरी ॥
करिती ही दुनिया हंसरी ॥
परि द्वेष साधुनी भारी ॥
मज म्हणति 'दुःख घे पदरीं । मम सुमन मृत्युच्या द्वारीं' ॥१॥

पुसुनिया पाहिलें त्यांना । ना बोलति एकहि वचना ॥
मज जाती अवहेलुनिया । त्यां नसे दया वा माया ॥
कुजबूज येइ जी कानीं ॥
सुमनाचिच वाटे ध्यानीं ॥
अंधारिं येत तैं नयनीं ॥
लतिकेच्या आर्त रवानें । मम हृदय भरे शोकानें ॥ २ ॥

क्षणिं गमे येति यमदूत । हरुनिया प्राणधन नेत ॥
मज वदति सोडि गे हात । का करिसि बालिके खंत ॥
भेसूर लता कुंजांत ॥
मी रडलें सखि-समवेत ॥
परि कींव न कोणा येत ॥
चित्तासि गमे हुरहूर । काळीज कांपतें चरर ॥३ ॥
नयनांत न मावे नीर । अश्रूंचा वाहे पूर ॥
कुंजांतुनि येतां जातां । मनिं ध्यास ऐक तो आतां ॥
दैवाची करणी काय ॥
मम सुमन जगांतुनि जाय ॥
चहुंकडे हाय ! सखि, हाय ! ॥
निष्प्रेम, ओस जग होई । मम सुमन मृत्युच्या गेहीं ॥ ४ ॥

# वर्तुळाचें सर्वस्व

लेखक न. का. बावडेकर.

[ यांचा जन्म सासवड येथें १९०७ सालीं झाला; ते भोर हायस्कूलांतून मॅट्रिक १९२६ सालीं झाले. डेक्कन कॉलेजमध्यें सध्यां शिकत आहेत. कॉलेज मासिक, यशवंत वगैरे मासिकांतून यांचे विनोदी लेख व नाट्यछटा प्रसिद्ध होतात. ]

' A circle is a plane figure bounded by a line traced out by a point which moves so that its distance from a certain fixed point is always the same. '

—Geometrical definition

' जीवात्मा म्हणजे एक अनंत वर्तुळ आहे. शरीर हें त्या वर्तुळाचा मध्यबिंदु. पण त्या वर्तुळाचा परीघ कोठेंच नाहीं ( म्हणजे सर्वव्यापी आहे ) आणि मरण म्हणजे हा मध्यबिंदु एका शरिरांतून दुसऱ्या शरिरांत बदल होय. '

—स्वामी विवेकानंद

कोणत्याहि देशाच्या प्राचीन अगर अर्वाचीन इतिहासाकडे नजर टाकल्यास आपणांस असें आढळून येईल कीं आजतागाईत अशी एकहि मानवाकृति उत्पन्न झाली नाहीं कीं, जिनें बाहुबलानें, युक्तिप्रयुक्तीनें अगर प्रेमभावानें अखिल पृथ्वी आपलीशी करून टाकली आहे.* परंतु सकृद्दर्शनीं

---

* या विधानास अपवाद म्हणून कोणी शिकंदर बादशहाचें उदाहरण घेण्याचा संभव आहे. परंतु त्या वेळीं जगाविषयीं कल्पना किती कोती होती व ऑस्ट्रेलिया, अमेरिकेसारखीं ´डें कशीं अज्ञात होतीं हें लक्षांत आणल्यास 'बादशहास जिंकण्यासाठीं नवीन प्रदेश न उरल्यामुळें त्याच्या डोळयांस पाणी आलें ' ही दंतकथा जमेस धरतां येणार नाहीं. अर्थात् त्यास अपवादहि म्हणतां येणार नाहीं.

ही अशक्य दिसणारी गोष्ट एका निर्जीव आणि साध्यासुध्या दिसणाऱ्या आकृतीनें कशी सिद्ध करून दाखवली आहे, इतकेंच नव्हे तर या जगांत क्षणोक्षणीं चालणारे व्यापारविषयक व्यवहार व यांत्रिक, औद्योगिक, भौतिक, संगीत वगैरे सर्व गोष्टी आपल्या कक्षेंत आणून त्यावर आपला अबाधित हक्क कसा प्रस्थापित केला आहे, हें खालील गोष्टी वाचल्यावर समजून होणार आहे. असो.

आतां राष्ट्राची पहिली पायरी जी ' व्यक्ती ' ती आपण प्रथम लक्षांत घेऊं या. शिवशाहींतील नरवीर मालुसरे, नेताजी पालकर, वीरप्रभु बाजी देशपांडे वगैरे वंद्य व्यक्ती आपल्या अंतःकरणांतून केव्हांहि नष्ट होणार नाहींत. त्यांचीं त्या वेळचीं शूर व धाडसाचीं कृत्यें इतिहासांत अजरामर होऊन राहिलीं आहेत. त्यानंतर पेशवाईंत प्रसिद्धी पावलेल्या बापू गोखले, नाना फडणवीस प्रभृतींच्या आठवणी आपल्या हृदयांत चिरकाल टिकतील यांत संशय नाहीं. या परिचित पुरातन व्यक्ती पुढें येण्यास त्यांचें शूरत्व व ' डोकेबाजपणा ' या गोष्टीच कारणीभूत झाल्या आहेत हें निःसंशय खरें आहे. पण माझ्या मतें शिवशाहींतील वीरांच्या पाठीराखा असणाऱ्या ' वर्तुलाकार ' ढाली व पेशवाईंतील पुरुषांच्या ' डोक्यांवर ' वरचढ करणारीं ' वर्तुलाकृति ' पागोटींच त्यांना नांवारूपास चढण्यास जास्त कारणीभूत झालीं असावींत. आतां ' व्यक्ती तितक्या प्रकृति ' या न्यायानें अलीकडील तरुणांचें प्रकृतिमान तितकेंसें चांगलें न राहिल्यामुळें त्यांस भल्या मोठ्या व्यासांचीं ( महर्षी व्यास मात्र नव्हेत ) चक्राकार पागोटीं सहन न होऊन त्यांची जागा हलक्या फुलफुलीत पुणेरी पगड्यांनीं भरून काढली आहे. अर्थातच त्यानें स्वतःचें वजन कमी झाल्यामुळें दुसऱ्यावर पडावी तशी छाप पडत नाहीं आणि अशा तऱ्हेनें कर्तबगारीचा वाव कमी झाल्यामुळें नांवलौकिक मिळविणेंहि दिवसेंदिवस दुरापास्त होत आहे. जो सर्वांत प्रवीण त्याचा लौकिक झपाट्यास वाढतो, पण तें प्राविण्य संपादन करण्यास मनुष्यास " All-round " बनावें लागतें. मिळून काय 'येन केन प्रकारेण ' वर्तुलाकृतीशीं संबंध आल्याशिवाय उदयकाल येत नाहीं हेंच खरें.

मनुष्यानें बुद्धिकौशल्यानें वनपशूंचा 'अनभिषिक्त राजा ' जो सिंह त्यालाहि

आपल्यापुढें मान वांकवावयास लावलें आहे. पण ही कसोटी दाखवतांना मात्र उभयतांना 'वाटोळ्या' मैदानांतच ( Ring ) यावें लागतें हें सर्कशींतील प्रेक्षकांनीं पाहिलेंच असेल.

'आवळा देऊन कोहळा काढणाऱ्या' व्यक्तींना या जगांत स्वतःचें पोट 'गरगरीत' करण्यास बिलकूल व्यत्यय येत नाहीं. आणि अशा प्रकारें पोट गबर झाल्यावर त्यांच्या कृतीमुळें त्यांचें नांव अनायासेंच इतरांच्या लक्षांत राहतें, ही गोष्ट सर्वांनाच परिचित असेल. असो.

दूरदृष्टी ( Long-sighted ) असणाऱ्या किंवा वयोवृद्ध असणाऱ्या व्यक्तींनीं ( आरशीची ) वाटोळी कांच डोळ्यांआड करून क्षणभरहि चालत नाहीं, हें कोणच्याहि डोळस मनुष्यास दिसून येण्याजोगें आहे.

रणजितसिंह, दिलीपसिंह अगर टिल्डन यांना 'क्रीडापटु' म्हणून जगभर नांव मिळवण्यास 'वर्तुळाकृति' कंदुकच कारणीभूत झाला असें म्हटल्यास त्यांत वावगें होईल काय? तद्वतच प्रसिद्ध पहिलवान गामा अगर गुंगा यांना शक्तिसामर्थ्य वाढवण्यास तालमींतील दगडी गोट्या व 'वर्तुळाकार' कडीं उपयोगीं पडलीं नसतील असें हमखास कोणासहि सांगतां येणार नाहीं.

गोलघुमटाचें अस्तित्वच नसतें तर आदिलशाहीची आठवण आपणांस होती ना. एकूण आशय इतकाच कीं, प्रत्येक पिढींतील पुरुषास प्रसिद्धी पावण्यास आमच्या आकृतीची आराधना करावी लागते अगर आधार तरी घ्यावा लागतो, हें आतांपर्यंतच्या वरील विवेचनावरून समजलेंच असेल.

आतां आपण व्यक्तीच्या पुढील पायरी जें कुटुंब तिकडे वळूं. कुटुंबास संसार-शकटाचें दुसरें चाक असें संबोधण्यांत येतें. शिवाय कोणत्याहि कुटुंबास स्वतःचे प्राणापेक्षांहि जर कोणती गोष्ट प्रिय असेल तर तिचे सौभाग्यालंकार ही होय. यांत मुख्यतः मंगलसूत्र, कुंकुमतिलक व कंकणें या त्रयीचा समावेश होतो. आणि या त्रयींत सूत्राचे मणी, बांगड्या व कुंकवाचा टिळा यांचा आकार 'वाटोळा' असल्याचें डोळे मिटूनहि सांगतां येण्यासारखें आहे. आतां क्वचित् ठिकाणीं हा तिलक 'अर्धचंद्राकृति' दृष्टीस पडतो, पण ही गोष्ट अपवादात्मक असल्यामुळें त्यास 'अर्धचंद्र' देणेंच सयुक्तिक ठरेल.

स्वतःचे घरांतील मंगलकार्यांच्या मिरवणुकींत जर चुकून 'अबदागीर

कुटुंबाचे डोक्यावर नसेल तर तळपायाची आग कशी मस्तकास जाते हें अनुभवान्तीं समजण्यासारखें आहे.

एकदां एका स्नेह्याच्या लग्नप्रसंगीं रुखवतांत लाडू, पुऱ्या, जिलेबी, पुरणपोळ्या, पापड, पापड्या, वगैरे जिनसांचीं 'वाटोळीं' शितरें कमी दिसल्यामुळें करवल्यांची कुरकुर इतकी वाढली कीं, त्यापुढें लग्नमुहूर्त टळून जातो आहे याचें त्यांस घटकाभर तरी विस्मरण झाल्याचें प्रस्तुत लेखकास माहित आहे.

कुटुंबानंतर पुढें समाज लक्षांत घ्यावयास हवा, म्हणून एखादा गायनसमाज उदाहरणादाखल घेण्यास कांहीं हरकत नाहीं. तालावांचून संगीत नीरस ठरेल. अर्थात् या तालास तोलून धरणाऱ्या गोष्टी म्हणजे तबला व डग्गा या होत. या दोघांचीं 'वर्तुळाकार' तोंडें मोकाट सुटल्यास तीं बेताल होतील या भीतीनें, वाद्यांनीं व दोऱ्यांनीं आधींच तीं भक्कम आवळलेलीं असतात. पण इतकें असूनहि आणखी त्यांचीं तोंडें पुन्हां 'वाटोळया' काळ्या शाईनें भरवलीं जातात. ज्याप्रमाणें नाटकांत अगर सिनेमांत सिनेमा असला म्हणजे मनाला जास्त करमणूक होते, तद्वतच या योजनेनें स्वरमाधुर्य वाढण्यास 'अधिकस्याधिकं फलम्' या न्यायानें उपयोग होतो.

समाजाच्या पुढची पायरी म्हणजे राष्ट्र. त्याचें हिताहित त्यावरील राज्यकर्ते आपापल्या परीनें बघतच असतात. परंतु एखाद्या बलवान् सत्तेखालीं नांदणाऱ्या एखाद्या कमकुवत राष्ट्रांतील प्रजेच्या संतोषासाठीं एखादी 'वर्तुळाकार' परिषदच बोलवावी लागते ही गोष्ट हिंदवासियांना तरी खास अपरिचित नाहीं. आणि अशीं अनेक राष्ट्रें जिनें आपल्या पृष्ठभागावर संभाळलीं आहेत त्या पृथ्वीचा आकार कसला आहे हें भूगोलविषयक साधारण ज्ञान असलेलें कोणतेंहि मूल सांगू शकेल. आणि ही पृथ्वी स्वतःभोवतीं फिरत फिरत 'वर्तुळाकृति' कक्षेंत पुनश्च सूर्यनारायणाभोंवतीं प्रदक्षिणा घालीत असते.

'आपणांसारिखें करिती तात्काळ' या न्यायानुसार कीं काय कुणास ठाऊक झाडून सारे ग्रह आपला आग्रह सोडून 'वर्तुळाकृति' बनले आहेत. इतकेंच नव्हे तर सर्वांत 'खाष्ट' म्हणून ज्याची ख्याति आहे व ज्यांनीं आपल्या लीलेनें विक्रमहरिश्चंद्रांसारख्यांना राजत्याग करून हालअपेष्टेंत दिवस काढावयास लावले अशा त्या महाबलाढ्य शनीमहाराजांना ही आकृति

इतकी मनापासून आवडली कीं, तिला त्यांनीं आपल्या वक्ष:स्थळाशीं प्रेमानें कवटाळून धरलें आहे.

कोणाचें कांहीं झालें तरी जगाचें रहाटगाडगें केव्हांहि चालणारच असें म्हणतात. परंतु वर्तुळाकृतीच्या अभावीं या म्हणण्यासहि बाध येईल हें थोडा विचार करतांच समजण्याजोगें आहे.

अखेरीस या जगांत उद्दिष्ट कार्यासाठीं वेळोवेळीं 'अवतार' घेऊन धावणारे देव आमच्या आकृतींत स्थिर होऊन ते मानवांच्या हातांत खुल्या दिलानें वावरू लागल्याचें उदाहरण दशावतारी गंजिफा खेळतांना 'अखेरी'-साठीं झटणाऱ्या खेळाडूंकडे पाहतांच पटेल. असो.

आतां या आकृतीनें सर्व व्यापार कसा हस्तगत केला आहे तें आपण बघूं. व्यापारांत आवश्यक असणाऱ्या गोष्टी म्हणजे देवघेवीसाठीं लागणारीं चलनी नाणीं व दळणवळणाचीं साधनें या होत. पैकीं पैपासून पौंडापर्यंत एकजात सर्व नाणीं ( निकलच्या नाण्यांकडे लक्ष न दिल्यास ) 'वाटोळीं' असल्याचें एखादा अंधळाहि सांगूं शकेल. इतकेंच नव्हे तर जेथें पैशांचा सारखा पाऊस पडत असतो व ज्यास 'संभावित जुगार' अशी संज्ञा आहे, त्या रेसकोर्समधील घोडदौडीचें मैदान वर्तुळाकार असल्याचें शर्यत-प्रेमी जनांस तरी खास अवगत असेल.

कधीं कधीं पैशाची तुलना ( Time is money ) वेळेशीं करण्यांत येते. अशा रीतीनें पैशाची बरोबरी करूं पाहणाऱ्या या कालदर्शक यंत्राचा आकारहि बहुतांशीं 'वाटोळा'च असतो, हें एखाद्या घड्याळजीच्या दुकानांत जातांच प्रत्येकाच्या प्रत्ययास येईल.

नंतर दळणवळणाचे बाबतींत वाहनें व पोस्टखातें यांचा मुख्यत: समावेश होतो. पैकीं गाडी या सदराखालीं येणाऱ्या बैलगाड्या, पायगाड्या, मोटारगाड्या व आगगाड्या यांचीं चाकें जर 'वर्तुळाकार' नसतीं तर तासीं ५० मैल धांवणाऱ्या 'डेक्कन क्वीन'ला तितक्याच वेळांत ५० फुटांचें तरी अंतर तोडतां आलें असतें कीं नाहीं हा प्रश्नच आहे. या वाटोळ्या चक्रांच्या अभावीं सर्व यांत्रिक कला बंद पडली असती व सुखसागरांत पोहत असलेल्या आजच्या मनुष्यमात्रास यावज्जन्म दु:खाच्या गर्तेंत पडावें लागलें असतें. असो.

पोस्टखात्याकडून ( चुकीनें म्हणा अगर कसेंहि म्हणा ) छापल्या गेलेल्या कार्डावर अगर चौकोनी तिकिटांवर ‘ वर्तुळाकार ’ छाप ( Stamp ) पडल्याखेरीज तें पत्र अगर पार्सल पुढें रवानाच होऊं शकत नाहीं. इतकेंच नव्हे तर आपलें वर्चस्व सिद्ध करण्यासाठीं पुन्हां एकदां वाटोळा शिक्का पडल्यानंतरच मालकाच्या हातीं पडण्याची लायकी त्यास प्राप्त होत असते. बिनतिकिटांनीं प्रवास करणाऱ्या पत्रांवर ( Not-paid ) अर्धवर्तुळाकृति शिक्का मारण्यांत येतो; आणि अशा रीतीनें सदरहू पत्रें पाठवणारांचा अर्धवटपणा मात्र आपोआप निदर्शनास येतो. असो.

तात्पर्य काय कीं अशा रीतीनें या आकृतीची महति सप्रमाण आपल्या मनावर बिंबली असतांना ‘ तुझें वाटोळें होईल ’ असा तळतळाट जर कोणाकडून रागाचे भरांत आपल्या माथीं मारला गेला तर त्याबद्दल वाईट वाटण्याऐवजीं तो एक ‘ शुभशकुन ’ च समजला जाण्यास आतां हरकत दिसत नाहीं.

इति वर्तुळाकृतेर्वर्चस्वपुराणं समाप्तम् ।

---

# आधुनिक कवितेचें नवीन वळण

**लेखक: राजाराम प्रल्हाद कानिटकर,** एम्. ए., संपादक, चित्रमयजगत्.

[ यांचा जन्म शके १८२८ मध्यें झाला. प्राथमिक व दुय्यम शिक्षण भोर हायस्कूलांत झालें. शके १८४५ मध्यें मॅट्रिक होऊन पुण्याच्या डेक्कन कॉलेजांतून १८४९मध्यें ते बी. ए., व शके १८५१ मध्यें एम्. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. डेक्कन कॉलेजांत असतां ‘ मराठी भाषेंतील चरित्रें ’ या त्यांच्या निबंधाला ‘ कँडी-पारितोषक ’ मिळालें. सध्यां ते पुणें येथील ‘ चित्रमय-जगत् ’ या मासिकाचे संपादक आहेत. प्रो. वा. म. जोशी, पं. मोतीलाल नेहरु व कवींद्र रवींद्रनाथ यांचीं चरित्रें त्यांनीं लिहिलीं आहेत. ]

“ काव्यें नकलीं नीरस वाचून जिवाला । वाटे न जिव्हाळा ॥

—माधव ज्यूलियन.

आधुनिक कवितेला नवीन वळण लागत चाललें आहे, ही गोष्ट इतकी निरपवाद व मतभेदातीत आहे कीं, तिजविषयीं चर्चा करूं गेल्यास ती पुनरुक्तच ठरण्याचा संभव आहे. पण तिला हें जें नवीन वळण लागत चाललें आहे, त्याच्या यथार्थ स्वरूपाची कल्पना फारच थोड्यांना आली असेल! कारण हें परिवर्तन इतकें बहुविध स्वरूपाचें आहे आणि तें इतकें अनपेक्षित रीतीनें होत आहे कीं, त्यांचें स्थिरीकरण होईपर्यंत निःस्तब्धपणें तटस्थ रहणाऱ्या वाचकांखेरीज मधुकरवृत्ति रसिकांना त्यांच्या स्थित्यंतराची ओळख होणें दुरापास्त आहे. आधुनिक किंवा आजकालच्या कवितेंत आठवणाऱ्या विशेषांचें सूक्ष्म आणि तन्मयतेनें निरीक्षण केल्यास वरील प्रश्नाचा तात्काल परिहार होणार असल्यामुळें तिकडे दृष्टिक्षेप करणें अधिक समुचित ठरेल.

आधुनिकांपैकीं पण जुन्या पिढींत मोडणारे किंवा नव्यांतले जुने म्हणून समजले जाणारे कवि म्हटले म्हणजे लेंभे, लोंढे, चंद्रशेखर, अनंततनय, साधुदास इत्यादि होत. या कवींचे विशेष म्हटले म्हणजे संस्कृतानुसारी भाषा-पद्धति, संस्कृतानुसारी कविसंकेतांचा स्वीकार व त्यांचें साग्रह प्रतिपादन, ठसकेदार आणि प्रौढ रचना, सयमक पद्धतीचा अभिनिवेश, विषय अभिनव पण जुन्या पद्धतीनें मांडण्याची विशिष्ट प्रवृत्ति वगैरे होत. आधुनिकांच्या पिढींत केशवसुत, बालकवि, गोविंदाग्रज, दत्त, टिळक, गोविंद शाहीर, तांबे, रेंदाळकर, माधव ज्यूलियन, यशवंत, गिरीश वगैरे कवि समाविष्ट होतात. या कवींत पुढील विशेष साकल्यानें आणि प्रामुख्यानें प्रतीत होतात. विषयांचें नाविन्य, उत्कटता, प्रतिपादनशैलीची अभिनवोज्ज्वलता, अभिनिवेशपूर्ण कवित्वाचा आविष्कार, 'स्वतंत्र ब्रीदाची उद्घोषणा', राष्ट्रीय जागृतीची उत्कट आकांक्षा, स्वयंपूर्ण आणि आत्मवैशिष्ट्यदर्शक भाषाशैली इत्यादि. तसेंच प्रचलित काव्यांत आढळणाऱ्या विशेषांत कल्पनावैभव, उत्प्रेक्षाप्राचुर्य व कल्पनानुसारी सुश्लिष्ट रचनेचा अभाव या गोष्टी लक्षणीय म्हणून सांगतां येतील. नुसत्या कल्पनेच्या दीप्तीनेंच आधुनिक कवि इतके भारले जातात कीं, कल्पनाविलासाला अनुरूप अशी शब्दयोजना करण्याचा त्यांना पोंचच रहात नाहीं. समर्पक शब्दयोजनेसाठीं जे परिश्रम घेणें अवश्य आहे, ते घेतले जात नसल्यामुळें आजकालची कविता अगदीं पोंचट, लिबलिबीत

व क्षीणशक्ति भासूं लागते. नुसत्या कल्पनांच्या मनोऱ्यांवर सत्काव्याची उभारणी होणें कठिण आहे. तरल कल्पनांच्या झुलत्या आंदोलनांवर किंवा स्वैर मानसलहरींवर जर सत्काव्य अवलंबून असतें, तर काव्याची निराळीच व्याख्या करण्याचा प्रसंग ओढवला असता. अलीकडील काव्याचें ' कल्पना-निष्ठ काव्य ' असें थोडक्यांत लक्षण करतां येईल.

यमक, वृत्त, चित्रकाव्य, बंध-प्रबंध इत्यादि बंधनांतून विमुक्त होऊन हल्लींची कविता खरोखरच बंधनाचे पलीकडे चालली आहे. खरा कवि हा बंधनाचे पलीकडे जाऊन अज्ञातावर झेंप घेणारा, स्वैरविहारी चंडोल आहे, अशी आधुनिक कवींची विचारसरणी असल्यामुळें त्यांची कविता स्वैरिणी बनल्यास नवल काय? हल्लींच्या कवितेवर अर्थालंकारादि जडावाचीं आभूषणें नाहींत किंवा वृत्तयमकादिकांचीं लेणींहि नाहींत. ती एक साधी-भोळी पण चप्खल वनबाला आहे. यमकादि विभूषणविलासांवर काव्याची प्रतिष्ठा अवलंबून नाहीं. तथापि काव्योत्कर्ष आणि काव्योत्कटता साधण्यास त्यांची आवश्यकता आहे हें सांगावयास नकोच. तसें नसतें तर सुप्रसिद्ध आधुनिक कवि माधव ज्यूलियन यांनीं आपल्या ' सुधारक ' काव्यांत मोठ्या ओढाताणीनें आणि खटाटोपीनें—कित्येकदां काव्यार्थहानि पत्करूनहि—यमकाचा अवलंब केला नसता, आणि रेंदाळकरांप्रमाणें भावनाविहीन संस्कृत-प्रचुरपंक्ति एकापुढें एक रचल्या असत्या. अंतरींच्या भावनेचा जिव्हाळा प्रतिबिंबित व्हावयाला यमकालंकारादिकांनीं काव्यशृंखलाबद्ध व्हावयास पाहिजे असें नाहीं. तरी पण रेंदाळकरांत भावनोत्कटता किंवा कोमल हृद्-भावांचा आविष्कार फारसा प्रत्ययाला येत नाहीं. त्यांची कविता भावानु-प्रवाही न होतां रचनानुप्रवाही झाली आहे. त्यांनीं संस्कृतप्रचुर शब्दजाड्याकडे आपलें सर्वस्व वेंचल्यामुळें त्यांच्या काव्यांतील जिव्हाळा आणि अंतर्वेधशक्ति नष्ट झाली आहे असें म्हणावें लागतें.

बालकवि आणि दत्त हे खरेखुरे कवि; ' काव्य ' या संज्ञेस पात्र होणारी त्यांची कविता आहे. रसात्मक काव्यनिर्मितीबद्दलची त्यांची प्रसिद्धी चिरंतन टिकणारी आहे. दत्त कवि जो प्रसिद्ध आहे तो केवळ रसात्मक काव्याबद्दल. बालकवीच्या काव्यांत कल्पनासौष्ठव परिपूर्ण असून समर्पकध्वनियुक्त व

वादानुकूल शब्दयोजना करण्यांत त्याचें विशेष कौशल्य दिसून येतें. देशाभिमानाच्या तेजोदीप्तीनें सर्वत्र महशूर झालेला गोविंद शाहीर कल्पनालालित्याचा मोठा पुरस्कर्ता आहे. कल्पनावैभव, भाषासौष्ठव आणि सहजौघी रचना हे या कवीचे मुख्य गुण आहेत. आधुनिक कवितेला कल्पनानिष्ठ बनविण्याचें बरेंचसें श्रेय गोविंद कवीलाच दिलें पाहिजे. गोविंदाग्रज आणि बालकवि हे कल्पना-संप्रदायांतील प्रमुख कवि होत. केशवसुतांपूर्वी कवितेच्या बाह्यांगाचें जें अनुकरण सुरू होतें तो मनु केशवसुतांनीं बदलला. या नव्या युगाच्या शाहीरानें आपली तुतारी फुंकली व कवितेला नवीन वळण दिलें. त्यांनीं कवितेच्या आत्म्याला–अंतरंगाला अभिनव दिशा दाखविली. कल्पनावैभव किंवा कल्पनाप्राचुर्य या गोष्टी मागाहून आल्या. गोविंद कवीनें त्यांत आपलें वैशिष्ट्य व्यक्त केलें. गोविंद कवीची ' सुंदर मी होणार ' ही कविता अत्यंत प्रतिभायुक्त असून तिच्यांत कवीच्या अंतकालच्या कारुण्योत्कट उदात्ततेचें प्रतिबिंब पडलें आहे. त्यामुळें ही कविता हृदयाला चटका लावून सोडते. गोविंद कवीच्या ' मुरली ' या काव्यांत जरी रसवंती ओथंबलेली आहे, तरी एकामागें एक उसळणाऱ्या तरल काव्यलहरींचा विलास ' सुंदर मी होणार ' या कवितेंतच पहावा. ह्या कवितेच्या तोडीची कविता मराठी वाङ्मयांत अद्याप व्हावयाची आहे.

आधुनिकांतील जुनी पिढी जशी ' रचनानिष्ठ ' काव्याबद्दल प्रसिद्ध आहे त्याप्रमाणें ' कल्पनानिष्ठ ' काव्याबद्दल नवी पिढी महशूर आहे, हें वर दिग्दर्शित केलेंच आहे. पण खरें काव्य कल्पनासाम्राज्यांत विहार करणाऱ्या कवींजवळ सांपडूं शकतें काय हा प्रश्नच आहे. खरें काव्य नुसत्या कल्पनांच्या भराऱ्यांत किंवा भाषावैभवांत नाहीं. दिव्य किंवा अलौकिक काव्य नेहमीं अंतर्हित असतें. तें निर्माण होण्यापूर्वी किंवा दृश्य स्वरूपांत येण्यापूर्वी मानसिक शक्तीचें, हृदयभावनांच्या खळबळाटाचें व अत्युत्कट स्फूर्तीचें एवढें भयंकर रणकंदन चाललेलें असतें कीं, त्यांतून शब्दरूपानें काव्य निर्माणच होऊं शकत नाहीं. स्फूर्तीचें हें उधाण ओसरल्यावरच शब्दरत्नांचे कण हातीं लागतात. तोंपर्यंतचें काव्य केवळ शब्दातीत असतें. ही अगदीं पराकोटीची असामान्य कवित्वशक्ति झाली. ही काव्यनिर्मिति निःशब्द, निराकार व

निर्गुण स्वरूपाची होय यांत शंका नाहीं. सामान्य लोकव्यवहारांत रसोत्कर्ष साधणें किंवा अपरिमित आनंदाचा आस्वाद घेणें हेंच कवीचें खरें कार्य आहे अशी जी समजूत आहे ती अगदीं यथार्थ आहे. 'सर्वेषां काव्यानां विषयः आनंदः' या थोडा फेरफार केलेल्या औपनिषदिक सिद्धांताप्रमाणें काव्य वाचून सहृदय रसिकाला आनंद होत असतो. असो.

आजकालच्या कवितेंत कसलेंहि नाविन्य नसल्यामुळें अनुकरणप्रियतेचा दोष अगदीं ढळढळीतपणें आढळून येतो. इंग्रजी, चिनी, जपानी, जर्मन, इत्यादि भाषांतील काव्यप्रकारांचें अनुकरण मराठी भाषेला केव्हांहि हितावहच आहे. कारण त्या भाषांतील रसास्वादाचा अनुभव त्याशिवाय कसा घेतां येणार? पण हें अनुकरण किंवा हा अनुवाद मराठी भाषेच्या वैशिष्ट्याला अनुरूप किंवा सुसंगत नसल्यामुळें ही निव्वळ मर्कटचेष्टा चालली आहे कीं काय असा भास होतो. आजच्या सरसकट मराठी काव्याला '**माकड-छाप**' असा शिक्का मारण्याचा मोह बळावतो. एकानें 'आम्ही कोण?' लिहिलें कीं दुसऱ्यानें लगेंच 'आम्ही कोण?' याच विषयावर काव्य भरकटावें व 'कवि' म्हणून प्रौढी मिरवावी असें आजकाल दिसूं लागलें आहे. एकानें 'सारंगी' तर दुसऱ्यानें 'वीणा', एकानें 'निर्झर' कीं दुसऱ्यानें 'निर्झरिणी,' एकानें 'न्याहारी' कीं दुसऱ्यानें 'भलंरी' इत्यादि अनेक प्रकारांनीं मराठी कवितार्णव फुगत चालला आहे. 'भावतरंग' निघालें कीं, 'भावमंथन' अस्तित्वांत आलेंच, व 'गीतद्विदलां'च्या पाठोपाठ 'गीतत्रिदलां'चा अवतार झालाच म्हणून समजावें. अशा एक कीं अनेक गोष्टी त्यासंबंधानें सांगतां येतील. कवींच्या जवळ विषयाचें नाविन्य, कल्पनेचें नाविन्य, रचनेचें नाविन्य किंवा, अगदीं साधी गोष्ट, नांवाचेंहि नाविन्य राहिलें नसल्यामुळें असले 'माकड-छाप' व परोपजीवी कवि निपजत आहेत व असल्या 'माकड-छाप' कविता निर्माण होत आहेत. मराठी भाषेला ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी आहे हें सांगणें नकोच. ज्यांना मुळींच काव्य लिहितां येत नाहीं, किंवा ज्यांना काव्य म्हणजे काय याची पुरती तोंड-ओळखहि नाहीं त्यांनीं असलें निकृष्ट काव्य लिहिण्याचा अट्टाहास कां करावा व मराठी भाषेच्या काव्यसंपत्तींत भर घालण्यासाठीं अहमह-

भिकेनें पुढें तरी कां सरसावावें हें सांगतां येणें कठिण आहे. आजकालची कविता इतकी रूक्ष व निःसत्त्व झाली आहे कीं, कोणतीहि कविता मोठ्या आवडीनें व गोडीनें वाचावी असें वाटतच नाहीं. नवीन कांहींच व कोठेंच नाहीं असा एकसारखा अनुभव येत गेल्यास कोणता रसिक मोठ्या अगत्यानें या कवितांकडे वळेल ?

अनुकरणाबरोबरच विडंबन निर्माण होत असतें. या न्यायानें मराठींत विडंबन कवितेनें आपलें अवतारकार्य करण्यास सुरवात केली आहे. स्वतंत्र प्रतिभेचा जातिवंत कवि व परोपजीवी टीकाखोर कवि यांमध्यें जमीन-अस्मानांचें अंतर असतें. स्वतंत्र प्रतिभेचाच जातिवंत कवि उत्कृष्ट विडंबन करूं शकतो. म्हणजे 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' नव्हे. सज्जनाला नांगी मारणाऱ्या वृश्चिकराजाची मनोवृत्ति टीकाखोर कवीच्या अंगीं नसेल तरच तें खरें विडंबन होईल; विडंबन जर शुद्ध अंतःकरणाचें व निर्मळ मनाचें असलें तरच तें खरें विडंबन. व्यक्तीला झोंबणारी पण निर्भीडपणानें केलेली टीका अंतःकरणास पीडा देणार नाहीं असें नाहीं. पण ती शत्रुत्व संपादण्यास कारणीभूत होणार नाहीं. सामान्य जनतेला असल्या कविता कां आवडतात याची मीमांसा केली तर त्यांत त्यांचीं कातडीं बचावलीं गेलीं आहेत असें आढळून येईल. मराठींत ' झेंडूचीं फुलें ' नांवाचा एक विडंबन काव्यांचा संग्रह आहे. ह्या संग्रहाच्या कर्त्यानें कांहीं आधुनिक कवींची कमी अधिक प्रमाणांत हजेरी घेतली असून माकडानें माणसास जशा वांकोल्या दाखवाव्या त्याप्रमाणें त्या कवितांची मर्कटचेष्टा केली आहे. बहुतेक विडंबनांत सहृदयतेच्या अभावीं व्यक्तिद्वेषाचा उग्र दर्प भरून राहिल्यामुळें सहृदय सज्जनांस तो त्याज्यच वाटल्यास नवल नाहीं. हा विडंबनाचा प्रकार मराठींत नवीन आहे, त्यामुळें असले दोष प्रारंभीं आढळल्यास त्यांकडे फारसें लक्ष देण्याचें कारण नाहीं.

आजकालच्या आधुनिक कवींची मनोवृत्ति कशी आहे व त्यांचा आत्मविश्वास केवढा दांडगा आहे याबद्दलचा येथें एक उतारा देणें अत्यंत आवश्यक वाटतें.

एक कवि म्हणतो--

" आम्हांला सुचतील शब्द तसले काव्यांत घालूं आम्ही.
त्याला अर्थ नसेल कांहीं तर तो येईल आम्हांमुळें.

शब्दसृष्टि रचावयास धरली आम्ही करीं लेखण
देवालाहि अशक्य आड आमुच्या येणें......"

ज्या आधुनिक कवींची अशी विचारसरणी आहे, त्यांच्यापुढें सहृदय टीकाकाराची लेखणी बोथट झाल्यास नवल काय?

---

# सौंदर्य-मीमांसा

लेखक: **नारायण विनायक देव**, बी. ए., भोर.

[ यांचा जन्म १९०६ मध्यें भोर येथें झाला. त्यांचें शिक्षण भोर हायस्कूल-मध्यें होऊन तेथूनच ते १९२४ सालीं प्रवेशपरीक्षा पास झाले. फर्ग्यूसनमधून १९३० मध्यें बी. ए. झाले. त्यांनीं 'शिवाजीचा उदयकाल' या विषयावर एक इंग्रजींत निबंध लिहिला आहे. ]

"A thing of beauty is a joy forever."—Keats.

सौंदर्यदर्शन नेहमींच आनंददायक असतें असें आपण म्हणतों. परंतु जगांत सौंदर्याशिवाय अशा अनेक वस्तू आहेत कीं, त्यांच्यापासूनहि आपणांस आनंद होतो. तेव्हां सौंदर्यजन्य आनंद ओळखण्यास ज्या सुंदर वस्तूंपासून आनंद झाला असेल त्या इतरांपासून वेगळ्या काढून त्यांच्या आड लपलेलें सौंदर्य-तत्त्व हें कशा प्रकारचें आहे, त्याचें अस्तित्व कोठें असतें, तें कसें भासतें वगैरे प्रश्नांचा विचार करावा लागेल. या बाबतींत 'भिन्नरुचिर्हि लोकः' या न्यायाप्रमाणें देशादेशांत, व्यक्तिव्यक्तींत इतकें मतवैचित्र्य दृष्टीस पडतें कीं, सौंदर्याची व्याख्या करणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधल्यासारखें होणार आहे. उपलब्ध ज्ञानांत तत्त्वज्ञांचें एकमत नसल्यामुळें व मानसशास्त्राच्या झपाट्याचे वाढीमुळें ह्या क्षेत्रांत ज्ञानाची विशेष भर पडत असल्यामुळें सौंदर्य-तत्त्वज्ञानांत निश्चितता येणें कठीण होत चाललें आहे. त्यांतून सध्यां सर्व जगाचा कल अध्यात्मिकाकडे वळला असल्यामुळें या शास्त्रानेंहि आपलें सुकाणूं त्याच दृष्टीनें वळविलें आहे. त्यामुळें आतांपर्यंत विद्वान म्हणून

मणलेले तत्त्वज्ञ या विचारसरणीपुढें कुचकामाचे ठरण्याचा संभव आहे. हें सर्व लक्षांत घेऊन आपण मुख्य विषयाकडे वळूं.

मनुष्यास प्रथम सौंदर्याची जाणीव कशी झाली हें प्रथमतः पाहिलें पाहिजे. सौंदर्यजन्य आनंदास सौंदर्य हें जरी कारण असलें तरी सौंदर्याची जाणीव करून देण्यास आनंद हाच कारणीभूत झाला असला पाहिजे. मनुष्य जन्मास आल्यानंतर त्यानें आपल्या सहोदर सृष्टीकडे जेव्हां जेव्हां पाहिलें असेल त्या त्या वेळीं त्यास आनंद झाला असेल. पण असे आनंदाचे प्रसंग वारंवार आल्यानें, आनंद आपणांस कां व कशापासून होतो हे प्रश्न जेव्हां त्याच्या डोक्यांत आले तेव्हां त्यास असें आढळून आलें असेल कीं, निसर्गाचे बहुविध देखावे डोळ्यानें पाहिल्यामुळें मनास आनंद होतो, व म्हणून आनंदाचें कारण निसर्गातील देखावे असें त्यानें ठरविलें. निसर्गात त्यास कांहींतरी जादू आहे असें वाटूं लागलें व त्यास तो सौंदर्य म्हणूं लागला. पण त्यास सृष्टींत दुसऱ्याहि प्रकारचे देखावे दृष्टीस पडूं लागले व त्यास त्यापासून आनंद न होतां दुःख होऊं लागलें. पुन्हा हे आनंदजन्य देखावे क्षणोक्षणीं पालटत असल्यामुळें व पुष्कळ वेळां ते दुःखाशीं निगडित असल्यामुळें अस्सल सौंदर्य कशांत असतें हें जाणण्याची उत्कट जिज्ञासा त्याच्या मनांत उत्पन्न झाली. आनंद हवा असल्यामुळें तो कसा मिळेल व दुःख नको असल्यामुळें तें कसें टाळतां येईल असा सतत प्रयत्न करण्याचा मनुष्यस्वभाव असल्यामुळें या जिज्ञासेस प्रयत्नाची जोड मिळाली व येथून सौंदर्यतत्त्वज्ञानास सुरुवात झाली.

सौंदर्यदर्शनार्थ सहल करण्यास बाहेर जावयाचें ठरलें. पण हें ठरल्यावर कोणत्या दिशेनें गेलें असतां आपणांस सौंदर्य-स्थलें दिसतील असा प्रश्न प्रथमच आपणांपुढें उभा राहतो. परप्रांतीं प्रवास करतांना वाटाड्याची फार आवश्यकता असते. कारण आपल्या डोळ्यांस दिसणाऱ्या स्थलांचें महत्त्व व न दिसणाऱ्यांचें दर्शन व महत्त्व पटवून देण्यास ते फार उपयोगीं पडतात. याच दृष्टीनें सौंदर्यक्षेत्रांत प्रवास करतांना त्यांतील मार्मिक मीमांसकांचें कांहीं वेळेला साहाय्य घेणें अपरिहार्य होणार आहे. हें साहाय्य पुष्कळ वेळेला उपकारक होईल यांत शंका नाहीं. पण त्यांच्यांत एकमत नसल्यामुळें तें अनेक

अडचणींसहि कारणीभूत होईल. सौंदर्यघटनेसंबंधीं विचार करितांना तर यांपैकीं एकाचें मत दुसऱ्यास मान्य नाहीं अशी स्थिति आहे. पौर्वात्य व पाश्चिमात्य यांच्यांत सौंदर्यासंबंधींची विचारसरणी अगदींच भिन्न आहे. आपणांस अन्तःसौंदर्याशिवाय सौंदर्य दिसत नाहीं तर पश्चिमात्यांना बाह्य सौंदर्याशिवाय जगांत सौंदर्य असेल अशी कल्पनासुद्धां येत नाहीं. हें भिन्नत्व असण्यास अनेक कारणें आहेत. त्यांत भिन्न देश, भिन्न संस्कृति व भिन्न सामाजिक कल्पना हीं प्रमुख होत. पौर्वात्य व पाश्चिमात्य यांचें ध्येय चित्स्वरूपीं जरी एक असलें तरी लौकिकदृष्टया भिन्न होय. आपलें ध्येय पारमार्थिक तर त्यांचें ऐहिक. आपला मार्ग आध्यात्मिक तर त्यांचा आधिभौतिक; आपलें ब्रीदवाक्य 'उद्धरेदात्मनात्मानम्' तर त्यांचें 'बहुतांचें बहुत हित;' आपल्या उन्नतीचा सर्व भर जर श्रद्धेवर, तर त्यांचा बुद्धीवर. पण या सर्वांत श्रेष्ठ कारण म्हणजे धर्माबद्दलच्या विरुद्ध कल्पना. ते धार्मिक याचा अर्थ बौद्धिक (Intellectual patrimony) असा करतात व आपण आध्यात्मिक (Spiritual life) असा करतों. ते बौद्धिक व आध्यात्मिक यांत फरक मानीत नाहींत. खरोखर अध्यात्म हें बौद्धिक क्षेत्रापलीकडे आहे हें गूढ त्यांना उकललेलें दिसत नाहीं. मानसशास्त्रज्ञ एवढें मात्र सांगू शकतात कीं, मनुष्याच्या मनाची तीन क्षेत्रांत विभागणी करतां येते; प्रबुद्ध (conscious), उद्बुद्ध (subconscious), अनुद्बुद्ध (unconscious). हा तिसरा प्रकार बुद्धीस केवळ अगम्य होय एवढेंच ते सांगू शकतात. धर्माबद्दल त्यांची वरील कल्पना असल्यामुळें ते कला व धर्म यांचा परस्परांशीं कोणताहि संबंध मानीत नाहींत. आपण कलेचें व धर्माचें ध्येय एकच मानतों व तें म्हणजे आत्मोन्नति होय. एवढ्यावरून आपल्यांत व पाश्चिमात्यांत मतभेद कां आहे ह्याचें कारण लक्षांत आलेंच असेल. आतां त्यांच्या तरी सौंदर्याच्या कल्पना काय आहेत तें आपण पाहूं या.

१. प्रथमतः सौंदर्यघटना कशी असते व तिचा मनावर कसा परिणाम होतो हें पहावयाचें आहे. कांहींच्या मतें सौंदर्य हें मनांत निर्माण होतें व तेथेंच रहातें. बाह्यसृष्टींतील एखादी वस्तु सुंदर असें जेव्हां आपण म्हणतों त्या वेळीं त्या वस्तूच्या उपयुक्ततेची कल्पना मनांत असते व त्यामुळें ती सुंदर दिसते.

कोळसा सॉक्रेटिसाच्या मताप्रमाणें सुंदर आहे. कारण तो उपयुक्ततेच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे. सौंदर्याचा तो नैतिक दृष्टीनें विचार करणारा असल्यामुळें मनुष्याच्या शरीरावरून त्याचें सौंदर्य न ठरवितां त्याच्या सद्वर्तनावरून तो ठरवी. सुख (Comfort), उपयुक्तता (Utility) व सौंदर्य (Beauty) हे तिन्ही शब्द समान अर्थाचे त्यास वाटत. सॉक्रेटिसाच्या ह्या सौंदर्याबद्दलच्या मतास तत्त्वज्ञानांत जागा मिळेल किंवा नाहीं ही शंकाच आहे. कारण सौंदर्यनिर्मिति व सौंदर्याकलन हे दोन्हीहि व्यापार सुसंस्कृत मनाचे होत. त्याचे उलट उपयुक्ततावादित्व हें असंस्कृत व आकुंचित मनाचें लक्षण समजलें जातें. सॉक्रेटिसाच्या वेळेचा समाज अगदीं सुधारणेच्या प्राथमिक दशेंत असल्यामुळें सौंदर्याच्या असल्या हलक्या कल्पनेबद्दल त्यास दोष लावणेंहि बरोबर नाहीं. पण त्याचा काळ जरी पालटला असला तरी त्याच्याच विचारसरणीचे लोक अजून आहेत. सौंदर्याची जाणीव पशुपक्ष्यांसहि असते, असें एका मोठ्या संशोधकाचें मत आहे. घरटीं नटाविणें किंवा आरशांत पाहणें या गोष्टी त्या जाणीवेचें द्योतक होत असें त्याचें मत आहे. कारण पशुपक्षी घरटीं बांधूं लागले किंवा मनुष्य वस्त्रप्रावरण वापरूं लागला यावरून त्यांना सौंदर्याची जाणीव होती असें म्हणण्यापेक्षां त्यांना त्यांची उपयुक्तता कळूं लागली असें म्हणणें बुद्धीस जास्त पटण्याजोगें आहे. पुढें जाऊन तो म्हणतो कीं, ही जाणीव कामवासनेंत जन्म घेते. याच दृष्टीनें पुरुषास स्त्री सुंदर दिसते. सौंदर्याची ही उपपत्ति सृष्टिसौंदर्यास लावतांना तो म्हणतो कीं, फूल सुंदर कां दिसतें तर त्याच्या पाकळ्यांचा आकार, मऊपणा, रंग यांचें स्त्रियांत दिसणाऱ्या सौंदर्याशीं सादृश्य असतें म्हणून. हें झालें पुरुषांच्या दृष्टीनें. कारण सौंदर्य आकलन करण्याचें सामर्थ्य पुरुषासच आहे. स्त्रीस स्वभावतः उदात्तता आवडते, व म्हणून तिलाच सौंदर्यापेक्षां उदात्तता जगांत दिसते. उदात्तता ही जर त्यांच्या म्हणण्याप्रमाणें इंद्रियास अगम्य किंवा अगोचर (Super-physical) अशी एक मनाची शुद्ध भावना मानली तर अन्तःसौंदर्य हेंच सौंदर्य असें म्हणणाऱ्यांच्या मताप्रमाणें हें सौंदर्य आकलन करण्याची शक्ति पुरुषांपेक्षां स्त्रियांतच जास्त आहे असें म्हणावें लागेल. या दृष्टीनें अखिल सृष्टींत मनुष्यजात व मनुष्यजातींत स्त्रीजात परमेश्वरस्वरूपाजवळ जाण्यास अधिक लायक

आहे असें म्हणावें लागेल; पण अनुभवाचा कस लावून पाहिल्यास हा सिद्धांत बरोबर आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण पुरुषच तेवढे कामलोलुप असतात म्हणून त्यांना स्त्रींत सौंदर्य दिसावें व स्त्रिया तशा नसल्यामुळें त्यांना सौंदर्याऐवजीं उदात्तता पुरुषांत दिसावी हें म्हणणें शारीरशास्त्रज्ञांस कितपत रुचेल याची शंका वाटते. सौंदर्य-तत्त्व हें एकाच स्वरूपाचें व चिरस्थायी असल्यामुळें तें पुरुषासच दिसावें व स्त्रीस दिसूं नये असें म्हणतां येणें शक्य नाहीं. इंद्रियभिन्नत्वामुळें उत्पन्न होणारें थोडेंसें मनोघटनेंतील भिन्नत्व वगळ-ल्यास आत्म्याच्या दृष्टीनें स्त्री व पुरुष यांत बिलकूल भेद मानण्याचें कारण नाहीं. सौंदर्य हें केवळ इंद्रियजन्य नसल्यामुळें त्याबद्दल असणाऱ्या कल्पने-संबंधीं स्त्रीपुरुषांचें द्विधा मत असण्याचेंहि कारण नाहीं. पण सौंदर्याची इंद्रिय-विकारांशीं सांगड घातल्यामुळें वरील तत्त्ववेत्त्यांच्या म्हणण्यास उपयुक्तता-वादाचा कांहींसा वास येऊं लागला आहे. सॉक्रेटिसाचेंसुद्धां म्हणणें हेंच आहे कीं, जगांत सौंदर्य असें वेगळें कांहीं नाहीं. जी वस्तु आपणांस उपयुक्त वाटते तिच्यावर आपण सौंदर्याचा आरोप करतों व मग तिला आपण सुंदर म्हणूं लागतों. हें उपयुक्ततेचें तत्त्व प्लेटोस मान्य नाहीं. तो सौंदर्य व उपयु-क्तता हीं वेगळीं समजतो. उपयुक्त वस्तु सुंदर असेल व ती उपयुक्ततेमुळें जास्त सुंदर दिसेल, पण सुंदर वस्तु उपयुक्त असावयास पाहिजे हें म्हणणें त्यास मान्य नाहीं. सौंदर्य आत्मनिष्ठ (Subjective) असतें हें सॉक्रेटिसाचें मत त्यास मान्य आहे. याची मीमांसा करतांना तो असें प्रतिपादन करतो कीं, आपणांस भासणारें सौंदर्य आत्म्यावर झालेल्या आनुवांशिक संस्कारांमुळें व निरपेक्ष सौंदर्यतत्त्वाच्या (Absolute beauty) मनावर होणाऱ्या प्रत्याघाता-(Reaction)मुळें आपणांस ओळखतां येतें. या सौंदर्यतत्त्वानें सर्व जग व्यापृत केलें असून तें अविनाशी, शाश्वत व संपूर्ण असें आहे. तें ज्या वेळीं जडसृष्टीच्या आश्रयानें आपल्या निदर्शनास येतें त्या वेळीं त्याची जाणीव उत्पन्न होण्यास प्रमाणबद्धता व सुसंबद्धता हे गुण कारणीभूत होतात. तात्पर्य, सॉक्रेटिस व प्लेटो हे, सौंदर्य आत्मनिष्ठ (Subjective) आहे असें प्रतिपादि-तात. पण प्लेटो थोडें पुढें जाऊन असें सांगतो कीं, सौंदर्य आत्मनिष्ठ असून परतत्त्व (Transcendental) आहे.

२. प्लेटोनंतर सतराव्या शतकापर्यंत सौंदर्याचा विशेष विचार झाला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. आतांपर्यंत सौंदर्याचें विवेचन मनुष्याच्या हिताहितास धरून झालें असल्यामुळें खऱ्या सौंदर्यमीमांसेस अजून आरंभच झाला नव्हता असें पुष्कळांचें म्हणणें आहे. या कालांत आधिभौतिक शास्त्राच्या वाढीबरोबर चौकसबुद्धि वाढत जाऊन सॉक्रेटीस, प्लेटो व अरिस्टॉटल यांनीं सांठविलेल्या सौंदर्यसाहित्याची सूक्ष्म दृष्टीनें छाननी होऊं लागली. इंग्रजी ग्रंथकारांनीं सौंदर्याचें योग्य वर्गीकरण करून सौंदर्य व हित (Good) यांची कायमची फारकत केली. सौंदर्य जसें पाहणाराच्या मनांत कल्पनास्वरूपांत असतें तसें तें बाह्यसृष्टींतहि जडस्वरूपांत असतें असें त्यांनीं ठासून सांगितलें. इंग्रजी विद्वानांपैकीं पुष्कळांना प्लेटोचें निरपेक्ष सौंदर्यतत्त्व (Absolute beauty) मान्य असून त्याचें उदाहरण गुरुत्वाकर्षण हें होय असें ते सांगतात. या सौंदर्यतत्त्वाचें अनुकरण करून जें सौंदर्य मनुष्य निर्माण करतो तें सापेक्ष सौंदर्य (Relative beauty). कलासौंदर्य हें त्याचें उदाहरण होय. या सौंदर्याचे मुख्य घटक वर्ण, आकृति, भावव्यक्ति व सहजता हे होत असें समजलें जातें. निरपेक्ष सौंदर्य मनोगत सौंदर्यास जवळचें असल्यामुळें मनास तें अन्तर्वृत्ती (Internal sense)च्या साहाय्यानें आकलन करतां येण्यासारखें आहे. असें असल्यामुळें अन्तर्बाह्य निरीक्षणानें मनुष्याचें अन्तःसौंदर्य जेव्हां जागृत होऊन त्यास भरती येऊं लागली, तेव्हां त्याच्या लाटा कलेच्या द्वारा बाह्य सृष्टीच्या किनाऱ्यावर आदळूं लागल्या. या मूर्त स्वरूपांत दिसणाऱ्या सौंदर्यांतहि मनुष्यास तेव्हां कांहीं नियमबद्धता आहे असें आढळून आलें; या नियमबद्धतेंतहि सौंदर्य आहे असें त्यास वाटूं लागलें. पण या दोन प्रकारांच्या सौंदर्यांत महत्त्वाचा फरक आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. मनोगत किंवा आत्मनिष्ठ सौंदर्य हें नेहमीं पारलौकिक म्हणून शुद्ध व उच्च दर्जाचें असतें व वस्तुनिष्ठ सौंदर्य हें ऐहिक म्हणून अशुद्ध व नीच दर्जाचें असतें. अन्तःस्फूर्तीनें आपलें अन्तःसौंदर्य जगापुढें व्यक्त केलें, त्याची कृति जगास पटली व त्यानें निर्माण केलेल्या कलाकृतीवरून कलाशास्त्र रचून त्या शास्त्रानुसार सौंदर्यनिर्मिति होऊं लागली. पण स्वयंस्फूर्तीनें कला निर्माण होणें व कलाशास्त्राचें पठण करून कला निर्माण करणें यांत जसें जमीनअस्मानाचें अंतर आपणांस

दिसतें तेंच अंतर सौंदर्याच्या कल्पना व प्रकृति यांच्यांत आहे. या दृष्टीनें विचार केला असतां या वर्गाच्या पंडितांनीं प्लेटोच्या म्हणण्यांत विशेष भर टाकली असें वाटत नाहीं.

३. सौंदर्यधारणेसंबंधीं विचार करणारा आणखी एक तिसरा वर्ग आहे. तो म्हणजे जर्मन तत्त्ववेत्त्यांचा. यांचें तत्त्वज्ञान वरील दोन्ही वर्गांपेक्षां भिन्न असल्यामुळें त्यांच्या सौंदर्याबद्दलच्या कल्पनाहि भिन्न असल्यास नवल नाहीं. त्यांच्या व आपल्या तत्त्वज्ञानांत विशेष फरक नसल्यामुळें त्यांचें म्हणणें समजून घेण्यास आपणांस विशेष कठीण जाणार नाहीं. ब्रह्म (cosmic being) हें सर्वव्यापी असून अखिल चराचरांत भरून उरलें आहे. मनुष्याचा आत्मा हा या ब्रह्माचा किंवा परमात्म्याचा एक अंश असून ही जाणीव जेव्हां त्यास उत्पन्न होते तेव्हां तो त्यांत मिळून जातो. प्लॉटिनसनें याच दृष्टीनें सौंदर्याचा विचार केला आहे. परमात्मा (cosmic being) हेंच निरपेक्ष सौंदर्य होय. तें सृष्टिपदार्थांत भरलेलें असल्यामुळें आपणांस निसर्गसुंदर दिसतें. पण हें सौंदर्य आकलन होण्यास त्याची जाणीव (consciousness) अवश्य असते. ही जाणीव किंवा ज्ञान प्राप्त करून घेण्यास मनुष्यापुढें दोन क्षेत्रें असतात. एक अंतःसृष्टि व दुसरी बाह्यसृष्टि. अन्तःसृष्टीचें ज्ञान जेव्हां तो संपादन करतो तेव्हां त्याच्या समोर हिता(welfare)चा प्रश्न उभा असतो. व म्हणूनच अन्तःसौंदर्याचा विचार करतांना हिताचा प्रश्न त्यास टाळतां येत नाहीं. बाह्यसृष्टींत तो जेव्हां ज्ञान संपादन करतो, तेव्हां त्यास सत्यसंशोधन करावें लागतें व याच दृष्टीनें तो सौंदर्यमीमांसा करूं लागतो. बाह्यसृष्टींत दिसून येणारें हें सत्य म्हणजे सौंदर्य होय असें तो म्हणूं लागतो. या विवेचनावरून एक गोष्ट मात्र लक्षांत घेण्यासारखी आहे कीं, अंतर व बाह्य निरीक्षणांत कार्य करणारी बुद्धि एकाच प्रकारची नाहीं. पहिल्या क्षेत्रांत उपयोगांत येणारी बुद्धि व्यावहारिक (practical) असून दुसऱ्यांतील शुद्ध किंवा निरिच्छ (pure) असते. पण या दोहोंशिवाय आणखी एक प्रकारची शक्ति मनुष्याजवळ असते व तिच्या साहाय्यानें मात्र तो सत्यासत्य किंवा हिताहित विचारांत न घेतां तो केवळ आनंदाचें संशोधन करितो व हीच सौंदर्याचा मार्गदर्शक म्हणून त्यास उपयोगीं पडते. सत्, चित् व आनंद हें परमेश्वराचें

केलेलें वर्णन कॅन्टच्या वरील विचारसरणीस किती तंतोतंत जमतें हें पाहण्यासारखें आहे. अध्यात्माच्या दृष्टीनें केलेला हा सौंदर्यविचार आपणांपैकीं पुष्कळांना पटण्यासारखा आहे, असें वाटतें.

सौंदर्याचें स्वरूप कसें आहे हें पाहिल्यावर तें अनुभवास कसें येतें हें विचार करण्यासारखें आहे. सौंदर्याचा मनावरील परिणाम जो आनंद तो निर्माण करण्यास अवश्य असलेलें सौंदर्यज्ञान तें कोण पोहोंचवितो ? सुंदर पुष्प पाहिल्याबरोबर आपणांस आनंद होतो. गायनाची एखादी सुरेल लकेर ऐकतांच आपण आनंदानें डोलूं लागतों. सुवासिक अत्तराचा वास आल्याबरोबर मन प्रसन्न होतें. मखमली गादीच्या खुर्चीवर बसतांच साध्या आरामखुर्चीवर बसण्यापेक्षां जास्त आराम वाटूं लागतो. या सर्व उदाहरणांवरून एक सोपा सिद्धांत निघतो कीं, आनंदजन्य वस्तूशीं जेव्हां इंद्रियाचा संबंध येतो, त्या वेळींच त्या वस्तूपासून उत्पन्न होणारी आनंदाची संवेदना मनास पोहोंचविण्याचें काम इंद्रियास करावें लागतें. मन हें सुप्तसौंदर्यसंपत्तीची एक तिजोरी आहे. तिला चार इंद्रियद्वारें आहे. तीं द्वारें उघडण्यास बाह्य सृष्टींतील सचेतन सौंदर्य या किल्लीचा नेहमीं उपयोग होतो. तीं द्वारें म्हणजे नेत्र, कर्ण, घ्राणेंद्रिय व त्वचा हीं होत, असें इंद्रियवाद्यांचें म्हणणें आहे. पैकीं नेत्र हें मनाचें महाद्वार असें समजलें जातें; कारण बाह्यसृष्टींत सौंदर्यास मनोराज्यांत प्रवेश करण्यास दृष्टीचा राजरस्ताच जास्त उपयोगीं पडतो. इंद्रियांचे उपयोगाच्या दृष्टीनें कमीअधिक महत्त्व अजमावण्यापेक्षां तीं संवाहकाच्या कामास किती कार्यक्षम आहेत हें पाहिलें असतां इंद्रियमतवाद्यांचें सकृद्दर्शनीं बरोबर वाटणारें म्हणणें किती फोल आहे हें कळून येईल. याकरितां तत्त्वज्ञानाची मदत घेणें जरूर आहे. तत्त्वज्ञांचे मताप्रमाणें सृष्टीचे दोन भाग पडतात. एक स्थूल (form) सृष्टि व दुसरी सूक्ष्म (substance) सृष्टि व यास अनुलक्षून मनुष्याचेंहि वर्गीकरण करावयाचें झाल्यास मनुष्याचें शरीर स्थूलदेह, मन सूक्ष्मदेह व थोडें याच्याहि पुढें जावयाचें म्हणजे आत्मा हा कारणदेह होय असें म्हणतां येईल. सर्वसाधारण सृष्टि व मनुष्य या दोहोंच्या वर्गीकरणांत थोडेंसें अन्तर आहे, पण तें फार महत्त्वाचें आहे. मनुष्याच्या दृष्टीनें विचार करतांना त्यांच्या सूक्ष्म देहाचे पुन्हां दोन विभाग पाडलेले दिसतात.

एक मन व दुसरा आत्मा. मन हें आत्म्याचें चंचल स्वरूप होय. बाह्य सृष्टीचे शरीरावर व शरीराचे मनावर याप्रमाणें नेहमीं अप्रतिहतपणें आघात होत असल्यामुळें बाहेरील सुखदु:खांच्या लाटांचें आंदोलन मनासहि झोंके घ्यावयास लावतें. त्याच्या उलटहि असें दिसतें कीं, मनुष्याच्या अन्तरभावनांचा परिणाम त्याचे शरिरावर होऊन त्याचा थोडाफार परिणाम समोंवारच्या वातावरणावर होतो. मनाच्या वृत्ती नेहमीं बदलल्या असल्यामुळें त्यांचा बाह्यसृष्टीवर होणारा परिणामहि बदलता असतो. या वृत्ती दोन प्रकारच्या असतात, असें परिणामावरून आपणांस कळतें. त्या म्हणजे जगाच्या दृष्टीनें हिताहिताच्या होत. ज्या वृत्तीनें जगाचें थोडेंफार हित साधणार आहे त्या वृत्तीस स्थिरत्व आणण्याचें व जीपासून जगाचें अहित होणार आहे ती नाहींशी करण्याचें काम बुद्धीवर सोंपाविलेलें असतें व म्हणूनच हिताच्या स्थायी वृत्तीला आपण सद्‌गुण म्हणतों व अहिताच्या स्थायी वृत्तीला आपण दुर्गुण म्हणतों. हा सर्व मनाचा व्यापार सांगण्याचें कारण असें कीं, शरीरास स्वत:चें कार्य कांहींच नसून त्यास बरेंवाईट, सौंदर्यासौंदर्य ओळखण्याची बिलकुल पात्रता नाहीं. असें जरी असलें तरी शरीराच्या अतएव इंद्रियाच्या कांहीं वासना किंवा आकांक्षा असतातच, व त्या तृप्त झाल्या कीं, त्याचा अनुकूल (agreeable) परिणाम मनावर होतो. त्या नेहमीं वैषयिक (sensuous) असून त्यांतहि बऱ्या वाईट असे प्रकार असतात व या दोहींतहि रेघ ओढण्याचें काम बुद्धीचेंच असतें. डोळ्यांनीं अर्ध नग्न 'व्हीनस'चा पुतळा पाहिला म्हणजे मनावर होणाऱ्या परिणामाचें विश्लेषण केलें तर हा मुद्दा जास्त स्पष्ट होण्यास बरीच मदत होईलसें वाटतें. वर म्हटलेंच आहे कीं मनांतील भावना समजण्यास शरीर हें माध्यम अवश्य असतें. पुष्कळ वेळां, उदाहरणार्थ, चित्रकलेंत व शिल्पकलेंत, भावना-अभिव्यक्तिकरणार्थ शरीराचें माध्यम अवश्य लागतें. हा पुतळा निर्माण करून कलावन्तानें आपली विशिष्ट भावना जगापुढें मूर्त स्वरूपांत ठेविली. ती भावना शक्य तितक्या उत्कटतेनें व पूर्णपणें पाहणाराच्या मनांत उत्पन्न व्हावी, म्हणून त्यानें त्यास अनुरूप अशी त्या पुतळ्याच्या अवयवाची ठेवण कोरण्यांत आपली सर्व कलाकुशलता खर्ची घातली. रसिकांस ही भावना उपभोगण्यास शेवटपासून म्हणजे शरीराच्या

सर्व अवयवांच्या निरीक्षणापासून सुरुवात करावयाची असते. व त्यापासून नेत्रांस मिळणाऱ्या वास्तविक ज्ञानाचे कण रसिकांच्या मनांत सामुदायिक रीतीनें कलावन्ताची भावना उत्पन्न करूं शकतात. रसिक जेव्हां आपल्या शारीरिक दृष्टीनें त्या पुतळ्याकडे पाहतो तेव्हां त्याची नजर प्रथमतः अपूर्वदृष्ट अशा अवयवांकडे अडखळावी यांत नवल नाहीं. अशा वेळीं दृष्टीपासून होत असलेला आनंद (?) न होऊं देण्याबद्दल चाललेली बुद्धीची खटपट यांमधील लढा सूक्ष्म निरीक्षकांच्या प्रत्ययास आल्यावांचून राहणार नाहीं. हा लढा चालू असतां कलेपासून होणारा निर्भेळ आनंद कसा चाखतां येणार ? कारण कलेचा जो आनंद तोच सौंदर्याचा आनंद. सौंदर्य हें कलेचें ध्येय. येथें असा एक आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, आनंद इंद्रियजन्य असल्यामुळें तो बुद्धीस पटला पाहिजे असा आग्रह धरण्याचें कारण काय ? सौंदर्यानंद हा भावनेनें उपभोगावयाचा असून बुद्धीनें त्याचें पृथक्करण करावयाचें नाहीं. हें म्हणणें वरवर बरोबर वाटेल. कारण सौंदर्य भावनेनें अनुभवावयाचें असतें हें कांहीं अंशानें खरें आहे. पण भावना ही वृत्तीची उत्कटावस्था असल्यामुळें ती शरीरवासनेची पुष्कळ वेळेस परिणति असते. व ही जी इंद्रियाकांक्षापूर्ति ती खऱ्या सौंदर्यानंदापासून वेगळी असते. दोन्ही जरी इंद्रियद्वारा मनांत प्रवेश करीत असले तरी त्यांच्या कारणाचा तलास बुद्धीस लावावा लागतो. कांहीं लोक इंद्रिय, भावना व बुद्धि यांच्याबद्दल विचार न करतां कल्पना हीच सौंदर्याकलनास कारणीभूत होते असें म्हणतात. हिचें काम काय असतें हें पाहिल्यास आपणांस वरील म्हणण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं असें वाटेल. बुद्धीस चालना देणें व उद्भूत भावनेस उत्कटता आणणें हें कल्पनेचें कार्य असतें. सौंदर्यानंद वाढविणें कल्पनेचें काम आहे खरें, पण या आनंदाच्या मुळाशीं सौंदर्यच कारणीभूत आहे हें तिला ओळखतां येणें शक्य नाहीं. याचें कारण एक तर तिला एवढा अधिकार पोहोंचत नाहीं, व दुसरें ती परावलंबी असते. कल्पनेस स्वतःची बुद्धि कांहींच नाहीं तशी तीस आवडहि नाहीं. रुचीच्या आवडीवर तिचा सर्व कारभार चाललेला असतो. बाह्यसृष्टींतील विवक्षित पदार्थांची निवड करणें, त्यांचा अर्थ आपल्या आवडीप्रमाणें लावण्यास बुद्धीस

गळ घालणें, त्यापासून नवी सृष्टि निर्माण करण्यास कल्पनेस मदत करणें व स्वतःच्या सौंदर्यकल्पनेप्रमाणें वेगवेगळे रंग तींत भरणें या सर्व गोष्टी रुचि करते. वरील विवेचनावरून सूक्ष्म दृष्टीस असें दिसून येईल कीं, बुद्धीच्या खालोखाल रुचीसच स्वयंनिर्णयाचा अधिकार प्राप्त होतो व ही गोष्ट खरी आहे. सामान्यतः मनुष्य रुचीच्या तंत्रानें वागत असतो. पण त्यास समाजाशीं वागतांना स्वतःच्या आवडीनावडी बाजूस सारून समाजाच्या हिताहितांचा प्रश्न विचारांत घेऊन वागावयाचें असतें. सौंदर्याचा निर्णय एक व्यक्तीनें ठरवावयाचा नसून त्याचा विचार सापेक्षतेनें करावयाचा असतो. याकरितां बुद्धीस समाजाची आवड काय आहे हें शोधून काढावें लागतें व त्याबरोबर समाजाच्या हिताहितांचा प्रश्न निगडित असल्यामुळें त्याच्या मेळानें विचार करावा लागतो. या सर्व गोष्टींचा विचार केल्यावर सौंदर्यतत्त्वापासून होणाऱ्या आनंदाचें परीक्षण करून हा आनंद एका व्यक्तीसच काय पण सर्व समाजासहि उपभोगतां येणें शक्य आहे किंवा नाहीं हें अजमावण्याचें सामर्थ्य विवेचक बुद्धींत आहे हें आपण पाहिलें व हें प्लेटोसहि मान्य होतें. पण हें तत्त्व आपण मान्य करण्यापूर्वी, मान्य केल्यानंतर कितीतरी अडचणींचे प्रश्न आपणांपुढें उभे राहतात, याची कल्पना आणून दिल्यास अविचारानें एकतर्फी निकाल दिल्याबद्दल पश्चात्ताप वाटणार नाहीं.

सौंदर्य-ध्येयाचा विचार करतांना प्रथमतः कलेचा सौंदर्याशीं असलेला संबंध विचारांत घ्यावयास पाहिजे. कारण सौंदर्य-मीमांसा करतांना सौंदर्याचा अर्थ व्यापक रीतीनें घ्यावयाचा आहे. सृष्टिसौंदर्य व मानवसौंदर्य—वास्तविक हें शास्त्रशुद्ध वर्गीकरण नसतां केवळ सोयीसाठीं केलें आहे,—हे जरी निसर्गनिर्मित सौंदर्यप्रकार असले तरी मनुष्यानें आपल्या संशोधक बुद्धीच्या साहाय्यानें आणखी एक प्रकार निर्माण केला आहे. तो म्हणजे कलासौंदर्य हा होय. प्रथम दोन प्रकार अस्तित्वांत असतां मनुष्यास तिसरा प्रकार शोधून काढण्याची काय आवश्यकता भासली हा मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. कला ही निसर्गसौंदर्याचें अपत्य असून कलासौंदर्याशीं असलेलें नातें स्पष्ट करून सांगावयाचें झाल्यास निसर्गसौंदर्य श्रेष्ठ कां मनोगत सौंदर्य श्रेष्ठ, कलावंतानें निसर्गाचें अनुकरण करावयाचें कां आपल्या कल्पनासामर्थ्यानें त्यांत

असलेल्या उणीवा भरून काढून व अवश्य ती भर घालून त्यांत सुधारणा करावयाची वगैरे वादांत न शिरतां कलोत्पत्तीस कारण काय झालें तें पाहूं या. निसर्गप्रेमी मनुष्यास त्यांतील आनंद प्रथम उपभोगण्यास मिळाला हें खरें; पण तो एकट्यानेंच चाखण्यांत त्यास समाधान होईना. आपणांपाशीं नाहीं तें मिळविण्यांत व तें मिळाल्यानंतर पुन्हा त्याचा विक्रय करून त्याच्या मोबदला समाधानरूपानें मिळविणें हा मनुष्यस्वभाव असल्यामुळें निसर्गापासून मिळविलेला आनंद कलेच्या द्वारा इतरेजनांस चाखतांना पाहून कलावंतास त्या आनंदाची पूर्णावस्था उपभोगण्यास सांपडूं लागली. रसिकांच्या दृष्टीनें कला परोपकारक आहे असें जरी त्यांना वाटलें तरी कलावन्ताच्या दृष्टीनें ती सर्वस्वीं स्वार्थमूलक आहे. या दोघांच्या परस्परविरोधी दृष्टीमुळें बिचाऱ्या कलेची अगदीं केविलवाणी स्थिति झाली आहे. एक कवि व्यवहारांतील सुपुत्र व सुकन्या यांचीं लक्षणें सांगतो कीं, “ जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच, जें दे पतीस सुख फार कलत्र तेंच. ” हें सांगतांना कवि, पुत्र व बाप आणि कन्या व पती यांची केलेली विभागणी गृहीत धरून चालला हें ठीक आहे. पण ही ऐहिक जगांतील वांटणीची पद्धति कलेच्या अलौकिक जगांत नसते हें, तो स्वतः कलावंत असूनहि, त्याच्या कसें लक्षांत आलें नसेल? सुपुत्र व सुकन्या या दोहोंचींहि कामें एकट्या कलेस करावीं लागत असल्यामुळें तिला खरोखर स्वर्गीय स्वरूप प्राप्त झालें आहे. ‘ स्वजनकास आनंद ’ व ‘ पतीस सुख ’ देणारी तीच कला होय. व्यावहारिक दृष्टांत सोडून बोलावयाचें म्हणजे रसिकांस कलेपासून होणारी प्राप्ति विशेषतः हिताहितांच्या दृष्टीनें महत्त्वाची असून तिजपासून होणारा आनंद हा दुय्यम दर्जाचा असतो. उदाहरणार्थ, आपण रोज अशनपान करतों. तें करतांना आपणांस आनंद वाटतो; म्हणून त्याचा मुख्य हेतु आनंद आहे असें समजणें शुद्ध वेडेपणा होय, असें टॉलस्टॉयचें मत होय. अशनपान शरीरधारणेकारितां करावयाचें असतें. त्यापासून आनंद होणें ही आनुषंगिक गोष्ट होय. ही इतकी साधी व सरळ वस्तुस्थिति असतांनासुद्धां मनुष्यानें तीस किती विकृत स्वरूप दिलें आहे हें पाहण्यासारखें आहे. आपल्या रुचीचें चोज पुरविण्यासाठीं तो अन्न शिजवूं लागला. त्यांत जास्त रुचकर, स्वादिष्ट

पदार्थ घालून ते खातांना आनंद व्हावा अशी सोय करून ठेवली. वास्तविक असलें अन्न शरीरधारणेस किती विघातक असतें हें आपणांस माहित असतें. पण संवयीमुळें त्याचें मूळचें कार्य आपण विसरून गेलों. त्याचप्रमाणें कलेचें झालें आहे. पण अशी दिशाभूल अजून तरी होऊं नये म्हणून, बर्नार्ड शॉनेंसुद्धां एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, केवळ कलेच्या आनंदाकरितां मी एक शब्दसुद्धां लिहिण्याचे कष्ट घेतले नसते. यावरून कलेचें ध्येय समाजाच्या दृष्टीनें विचार करतां मनोरंजनापेक्षां सुख( welfare )च मानावें लागेल व म्हणून कला ही समाजोद्धार करण्यास किंवा तो पूर्णत्वास नेण्यास एक उत्कृष्ट साधन आहे असें समजण्यांत चूक होणार नाहीं. सौंदर्य कलेवर अवलंबून असल्यामुळें कलेचें ध्येय बदलतांच सौंदर्याचेंहि बदलणार व त्यास मनोरंजनापलीकडे बरीच दूरवर दृष्टि फेंकावी लागणार यांत शंका नाहीं.

येथवर आल्यावर सौंदर्यद्वारें समाजोद्धार करून घेण्याचे कामीं आणखीहि कांहीं गोष्टींबद्दल विचार करावा लागणार आहे. समाजोद्धार करणें याचा अर्थ, अंतिम ध्येयाच्या दृष्टीनें करावयाचा झाला तर, समाजास दृश्य जगापलीकडे असणाऱ्या आदि तत्त्वाची ओळख करून देऊन तिकडे जाण्याचा मार्ग दाखविणें, असा करतां येईल. जीवात्म्याचा विश्वात्म्याशीं असलेला संबंध दर्शविणें म्हणजे सत्यकथन होय. हा संबंध जडसृष्टीच्या आश्रयानें व्यक्तीस उद्बोधित होतो. हा संबंध दर्शविण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यांपैकीं कलावन्त स्वयंस्फूर्तीनें मनांत जागृत झालेल्या सौंदर्यमार्गाचा अवलंब करतो. जडवस्तूंच्या अवलंबनानें चिरस्वरूपी दृश्यमान होणारीं तत्त्वें नियमबद्ध आहेत, अशी त्याची कल्पना असते. म्हणून त्यांचें सौंदर्ययुक्त आविष्करण करतांना तो नियमबद्धतेचा आश्रय करतो. हीं तत्त्वें कशा प्रकारचीं आहेत हें ओळखून त्यांस अनुरूप व समाजाच्या हिताहितावर नजर ठेवून नियम बांधणें व त्याप्रमाणें वागण्यास आज्ञा करणें ह्या गोष्टी धर्मसंस्थापकासहि कराव्या लागतात. यावरून कला व धर्म यांच्यांत खरोखर अन्तर नाहीं हें दिसून येईल. इतकेंच नव्हे तर हीं एकमेकांस साहाय्यकच आहेत. कलेचा प्रवाह व्यक्तीकडून समाजाकडे वाहतो व धर्माचा समाजाकडून व्यक्तीकडे वाहतो एवढाच फरक. दोहोंतहि व्यक्ति व समाज हीं एकमेकांस परोपकारक आहेत.

म्हणून कलेचा सुद्धां विचार समाजाच्या हिताहिताच्या व नीतिअनीतींच्या दृष्टीनें करणें प्राप्त आहे. 'सत्यं वद' ही आपल्या धर्माची आज्ञा समाजाच्या हितासाठीं व सोयीसाठीं प्रत्येक व्यक्तीस पाळावयाची असते. कित्येक वेळेला खोटें बोलूनच व्यक्तीचा फायदा होणार असतो, पण तो वरील आज्ञेस विरोधी असल्यामुळें त्याचा त्याग करावा लागतो. हा नियम जसा एका व्यक्तीस तसा कलावन्तासहि लागू आहे. सामान्य मनुष्याप्रमाणें कलावन्तासहि अनीतीच्या कर्मांत लोळण घेण्याची अनिवार इच्छा होते हें खरें, पण ती दाबून जगन्नेत्या कलावन्तानें आपल्या माणुसकीची आठवण ठेविली पाहिजे. नियम घालून दिलेल्या द्रष्ट्यापेक्षां प्रत्येकानें आपण शहाणे आहोंत असें मानणें व आज हजारों वर्षे अबाधित रीतीनें चालत आलेल्या निर्बंधांचें उल्लंघन करणें हें हास्यास्पद नव्हे काय? खऱ्या सौंदर्योपासकांनीं भलत्याच मार्गाचा पुरस्कार न करतां सौंदर्याचा नीतीशीं संबंध काय हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सौंदर्य हें नेहमीं पारदर्शक असतें; तें पहाणारास पलीकडील—म्हणजे लौकिक जगापलीकडील—सूक्ष्म स्वरूपांत रहाणाऱ्या परमेश्वराची कल्पना देतें. ही कल्पना नीतिअनीतींच्या पलीकडील आहे यांत शंका नाहीं. पण नीतीच्या पैलतीरास जाण्यास नीतीच्याच मार्गानें जावयास पाहिजे. मनांतील सौंदर्य नीतिअनीतींच्या पलीकडे असणाऱ्या आदिशक्तीकडे वाट दाखविण्यास समर्थ आहे. पण त्यास व्यावहारिक जगांतून जोंपर्यंत प्रवास करावयाचा आहे, तोंपर्यंत येथील नीतीच्या नियमांस अनुसरूनच तो केला पाहिजे. अन्तःसौंदर्य समजण्यास बाह्यसौंदर्य हें माध्यम आहे. धर्मानें दाखवून दिलेल्या ध्येयावर अढळ दृष्टि ठेवून, सौंदर्याच्या सामुदायिक सदभिरुचीबरहुकूम वळविलेलें वर्तन म्हणजेच नीति होय. ही जोंपर्यंत मनःसृष्टींत असते तोंपर्यंत तीस आपण सौंदर्य म्हणतों व ती ज्या वेळीं आचरणांत म्हणजे बाह्यसृष्टींत येते त्या वेळीं तीस आपण नीति असें म्हणतों. यावरून सौंदर्य व नीति खरोखर भिन्न नसून एकाच तत्त्वाचीं सूक्ष्म व स्थूल स्वरूपें होत. तथापि व्यापकतेच्या दृष्टीनें सौंदर्य व नीति हीं सारखींच आहेत असें मानतां येत नाहीं. ऐहिक जगांत दिसणारीं दोन रूपें ज्या जगाची मर्यादा ओलांडतांच नीति सौंदर्यांत मिसळून जाऊन एक होतात, तेथून निरपेक्ष

( transcendental) सौंदर्याचें राज्य सुरू होतें; तेथेंच व्यक्तीच्या अभ्युदयाची अंधःकारमय वाट संपून निश्रेयसाचा उज्ज्वल मार्ग सुरू होतो. या क्षेत्रांत मार्गदर्शक होण्यास बुद्धि व मन अगदीं कुचकामाचीं ठरत असल्यामुळें अन्त:संवेदना( Intuition )पासून क्षणोंक्षणीं मिळणाऱ्या प्रकाशांतून श्रद्धा मार्ग दाखवीत असते. तेथील आनंद, अव्यंग व चिरकाल टिकणारा असतो. मनुष्यानें मनोरंजनाकरितां काढलेल्या अनेक क्लृप्त्यांपैकीं कला ही एक असल्यामुळें तिजपासून होणारा आनंद ब्रह्मानंदापेक्षां निःसंशय कमी दर्जाचा असावा हें उघड आहे. कला ऐहिक जगापासून क्षणभर वर नेईल; पण परमात्म्याशीं तादात्म्य पावविण्याचें सामर्थ्य तिच्यांत खात्रीनें नाहीं. कारण, तादात्म्य पावण्यास स्वतःची विस्मृति पडावयास पाहिजे. पण कलेचा आनंद उपभोगण्यास स्वतःची जाणीव अवश्य लागते. म्हणून कलेचें कार्य मनास गोचर असें सौंदर्य निर्माण करून जगांतील अनेक दुःखांमुळें संत्रस्त झालेल्या जीवास क्षणभर सौंदर्यानंदाचा उपभोग देऊन पुढील आयुष्य-क्रमास उत्तेजन देणें हें होय. स्वतः अनुभवलेल्या भावना शक्य तितक्या मूळच्या उत्कट स्वरूपांत दुसऱ्यांत उत्पन्न करणें हें जसें स्वतःस तसें समाजा-सहि उत्कर्षाच्या दृष्टीनें आवश्यक असल्यामुळें कलावन्तास व समाजास कलावन्ताची जरूरी आहे. कलावन्ताचा उत्कर्ष कलेपासून मिळणाऱ्या अतींद्रिय आनंदावर अवलंबून असल्यामुळें सर्वांचें ध्येय जें परम हित किंवा निश्रेयस तें गांठण्यास नीतीसारखे बाह्य निर्बंध आड येत नाहींत. पण समा-जास केवळ इंद्रियजन्य आनंदावर विसंबून राहावें लागत असल्यामुळें त्यास आपल्या ध्येयाची वाट अनीतींच्या खड्ड्यास वळसा घालून काढावी लागते. येथवर झालेल्या विवेचनावरून सौंदर्य व नीति हीं दोन रूपें बाह्यतः जरी भिन्न दिसलीं तथापि, तीं तत्त्वतः एकच आहेत ही गोष्ट लक्षांत घेतां कलेंत अनीति संभवतच नाहीं हें वेगळें सांगणेंच नको. कारण हें एकदां स्पष्ट झालें म्हणजे मद्यपानापासून आनंद होतो म्हणून मद्यांत सौंदर्य आहे किंवा गुत्तेवाला मद्य देतो म्हणून तो कलावन्त आहे असें म्हणणाऱ्या वितंड-वाद्यांशीं हुज्जत घालण्याचा अतिप्रसंग आमच्यावर बहुतेक येणार नाहीं असें वाटतें.

येथवर जो सौंदर्य-विचार झाला तो संक्षेपानें वाचकांपुढें मांडावयाचा असल्यामुळें त्याचें व्हावयास पाहिजे तितकें संपूर्ण विवेचन करण्यास अवकाश मिळाला नाहीं. सर्व मीमांसकांचें व्यक्तिशः म्हणणें पुढें मांडणें कंटाळवाणें व येथें अशक्य असल्यामुळें त्यांचें तत्त्वानुरूप वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक वर्गाचें सौंदर्याबद्दलचें काय मत आहे, एकाच्या कल्पनाविकासास त्याच्या मागच्या मीमांसकांचें विचारभांडार कसें उपयोगीं पडलें, उपनिषदांत सांगितलेल्या पंचावस्थेंतून मनुष्याची प्रगति कशी होत आहे व आतां त्यास आनंदकोशाचें ध्येय दिसूं लागल्यापासून बाकींच्या अवस्था कमी दर्जाच्या अतएव त्याज्य कशा वाटूं लागल्या वगैरे गोष्टींचें दिग्दर्शन करण्यांत आलेंच आहे. पण असें करतांना पुष्कळ प्रश्नांचा नुसता नामनिर्देश करावा लागला. उदाहरणार्थ, सौंदर्याचें वर्गीकरण केल्यानंतर निसर्गसौंदर्य श्रेष्ठ कीं कलासौंदर्य श्रेष्ठ हा वादग्रस्त प्रश्न अजिबात गाळावा लागला. ह्यानंतर सौंदर्याकलन करण्यास कोणत्या साधनांचा उपयोग होतो, ह्याचें विवेचन करतांना या सुद्धां बाबतींत किती मतवैचित्र्य आहे हें आपण पाहिलें. सौंदर्यसंवेदना मनास नेऊन पोंचविण्याचें काम केवळ इंद्रियांचेंच आहे व त्यांतल्यात्यांत डोळे व कान हे जास्त कार्यक्षम आहेत, असें कांहींचें मत आहे. परंतु जडवस्तूपलीकडे सौंदर्यच नाहीं असें त्यांना वाटत असल्यामुळें त्यांचें मत एकांगी असल्याचें आपण पाहिलें. पण हे इंद्रियवादी काव्यानंदाची मीमांसा कशी करतात हें पाहिलें म्हणजे त्यांची काव्याबद्दल किती हीन कल्पना आहे हें दिसून येतें. खरा काव्यानंद बाह्यरंगाच्या आकर्षकतेवर अवलंबून आहे असें ते मानतात. काव्यकला व ललितकला यांतील फरक लक्षांत घेण्यासारखा आहे. पहिलींत मिळणारा आनंद अतींद्रिय असून तो हेतुरहित असतो. दुसरींतील आनंद इंद्रियजन्य व आकांक्षापूरक असतो. हा फरक असल्यामुळें सौंदर्याकलनाचें साधन केवळ इंद्रिय नाहीं असें मानावें लागलें. पुढें कल्पना, रुचि व बुद्धि या साधनांची चौकशी करतांना कांहीं मर्यादेपर्यंत बुद्धीसच निर्णय देण्याचा अधिकार प्राप्त होतो. पण या अधिकाराची मर्यादा क्षेत्राइतकीच समजण्याची असल्यामुळें अध्यात्माच्या पुढील क्षेत्रांत कोणतें साधन उपयोगीं

पडेल हा प्रश्न उपस्थित झाला. हें क्षेत्र बुद्धि व मन यांच्या पलीकडील असल्यामुळें तें साधनहि अतिशय उच्च व अगम्य असावें यांत नवल नाहीं. त्या साधनांस आपण स्वयंप्रेरणा किंवा अन्तःसंवेदना ( Intuition ) असें म्हटलें आहे. अशा रीतीनें आपण स्थूल, सूक्ष्म व कारण दैहिक सौंदर्यांचा विचार केला व पुढें सौंदर्य, कला व नीति यांचा परस्परांशीं काय संबंध आहे हें पाहिलें. या सर्व गोष्टींवरुन निरनिराळ्या क्षेत्रांत विचार करणाऱ्यांच्या सौंदर्याच्या कल्पना काय असतात, ते त्या दृष्टीनें साधनांचा कसा विचार करतात व त्यामुळें सौंदर्यविषयक व तदनुषंगिक विषयांमध्यें मतवैचित्र्य कां निर्माण होतें हें आपणांस पहातां आलें.

---

# जॉर्ज बर्नार्ड शॉ

लेखक: मा. का. देशपांडे, बी. ए. (ऑनर्स), फर्ग्युसन कॉलेज, पुणें.

[ यांचा जन्म १०-१२-१९१० रोजीं भोर संस्थानांतील दापोडें गांवीं झाला. दुय्यम व उच्च शिक्षण पुणें येथील नू. म. विद्यालय व फर्ग्युसन कॉलेज यांमध्यें झालें. सध्यां ते फर्ग्युसन कॉलेजांत इंग्रजी विषयाचे 'लेक्चरर' आहेत. इंग्रजी भाषेवरील प्राविण्याबद्दल यांची विशेष ख्याति आहे; इन्टर आर्टस् या परीक्षेमध्यें इंग्रजी विषयांत त्यांचा पहिला नंबर आल्याबद्दल कॉलेजतर्फे यांना "दाणी-प्राइज" देण्यांत आलें होतें. यांनीं फर्ग्युसन कॉलेज मॅगेझिनमध्यें अनेक विषयांवर इंग्रजी व मराठी लेख लिहिले आहेत ].

इंग्लंडच्या आधुनिक विख्यात ग्रन्थकारांत बर्नार्ड शॉ यांचा अत्यन्त प्रामुख्यानें उल्लेख करण्यांत येतो. प्रतिभासम्पन्न नाटककार व निर्भीड टीकाकार म्हणून गेलीं चाळीस वर्षें ते सुप्रसिद्ध आहेत. आज त्यांचें वय ७६ वर्षांचें आहे; तथापि वार्धक्यामुळें त्यांच्या लेखणींतील ओज कमी झालें नसून, त्यांच्या खम्बीर मतांप्रमाणें त्यांच्या लिखाणांत अजूनहि तारुण्याची धडाडी दिसून येते. सुशिक्षित समाजांत त्यांनीं आपला विलक्षण दरारा बसविला असून त्यांनीं हातांत लेखणी धरली कीं, मी मी म्हणविणारे वाग्वीरहि

गडबडून जातात. त्यांनीं आतांपर्यंत अठ्ठावीस नाटकें लिहिलीं असून पांच कादंबऱ्याहि लिहिल्या आहेत. यांशिवाय त्यांचे शेंकडों विषयांवर लिहिलेले लहान मोठे निबन्ध आहेत, ते निराळेच. यावरून त्यांच्या विशाल वाङ्मय-प्रपंचाची कल्पना येईल. परंतु त्यांच्या स्वतःच्या लिखाणापेक्षां त्यांच्याविषयीं इतरांकडून लिहिलें गेलेलें वाङ्मय पाहून अचंबाच वाटतो. आतांपर्यंत जवळ जवळ दोनशेंऐशीं लेखकांनीं त्यांच्याविषयीं निरनिराळ्या मासिकांतून लेख लिहिले आहेत. व यांशिवाय त्यांचीं तत्त्वें व नाटकें यांवर लिहिलेल्या ग्रन्थांची यादी ऐशींच्यावर सहज जाईल. यावरून बर्नार्ड शॉ यांनीं लेखणीच्या जोरावर साहित्यक्षेत्रांत केवढी प्रचण्ड खळबळ उडवून दिली आहे याची कल्पना येईल. जिवन्त असतांना इतक्या लेखकांकडून बरेंवाईट म्हणवून घेण्याचें भाग्य शॉच्याइतकें इतर कोणत्याहि वाङ्मयभक्ताला लाभलेलें दिसत नाहीं. शेक्सपियरच्या मृत्यूनंतर असंख्य ग्रन्थ त्याजवर लिहिले गेले; परंतु तो जिवंत असतांना बर्नार्ड शॉच्या एकशतांश तरी त्याच्या नांवाचा बोलबाला होता कीं नाहीं याबद्दल शंका वाटते.

शॉनीं जेव्हां प्रथम वाङ्मयक्षेत्रांत पाऊल टाकिलें त्या वेळीं त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें. त्यांच्या विक्षिप्त मतांबद्दल त्यांची चेष्टा व निर्भर्त्सना झाली. ' मूर्तिभञ्जक ' या नांवानें ते ओळखले जाऊं लागले व क्रांतिकारक विचारांनीं सळसळणारीं त्यांचीं नाटकें रंगभूमीवर आणाव-यास कोणताहि निर्भीड मॅनेजर पुढें येईना. जगांतील अलौकिक माणसांचा असाच प्रथम छळ होतो असें इतिहास आपणांस सांगतो; व त्याप्रमाणें शॉच्यावर अनेक वेळां उपासमारीची पाळी आली होती. परंतु गुणवान् माणसें फार दिवस अंधारांत रहात नाहींत, या अनुभवाप्रमाणें या तरुण तेजस्वी लेखकाकडे विल्यम आर्चर (William Archer) यांचें लक्ष गेलें, व शॉच्या कर्तबगारीची त्यांना खात्री पटून, त्यांनीं शॉना Pall Mall Gazette च्या संपादकीय मंडळांत जागा दिली. तेव्हांपासून बर्नार्ड शॉ यांच्या उत्कर्षास सुरुवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं व आज जगभर जी त्यांची कीर्तिनौबत झडत आहे, तिचें बरेंचसें श्रेय आर्चर यांनीं थोर मनानें केलेल्या या गौरवाकडे आहे असें निःसंशय म्हणतां येईल.

बर्नार्ड शॉ हे जातीनें ऐरीश आहेत. आयर्लंड ही त्यांची जन्मभूमी. तथापि, आयर्लंडचा किनारा सोडून ते आज कित्येक वर्षे इंग्लंडमध्यें येऊन स्थाईक झाले आहेत. आयर्लंडमध्यें त्यांच्या तत्त्वांबद्दल व विचारांबद्दल अत्यंत गैरसमज पसरला आहे. तेथें त्यांच्या तत्त्वांची अत्यंत कुत्सित बुद्धीनें हेटाळणी करण्यांत येते. एक वायफट, बेअक्कल, अहंमन्य, मूर्ख लेखक, एवढीच तेथें शॉ यांच्याबद्दल कल्पना आहे. त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करून त्यांचीं तत्त्वें समजून घेण्याचा त्यांच्या जन्मभूमींत जे. एस्. कोलिस यांच्याशिवाय इतर कोणीं त्रास घेतलेला नाहीं. १९२३ मध्यें "फ्लॉगिंग बिल" पास करून आयर्लंडनें आपल्या स्वातंत्र्य-स्पृहेचें प्रदर्शन केलें त्या वेळीं 'आयरिश टाइम्स'ला एक पत्र पाठवून बर्नार्ड शॉ यांनीं या पशुवृत्तीचा अत्यंत तीव्र शब्दांत निषेध केला. त्या वेळीं त्यांच्या नांवानें जिकडेतिकडे तिरस्काराची व उपहासाची लाट उसळली. बर्नार्ड शॉ यांचें नांव उच्चारतांच "अहो शॉच ते! ते कशाच्या विरुद्ध नाहीं म्हणून सांगतां? त्यांना फटके मारणें, देवी टोंचणें इत्यादि गोष्टी नापसंत आहेत. असल्या मूर्खाच्या बरळण्याकडे कोणीं लक्ष द्यावें?" अशा तऱ्हेचे विचार चार मंडळी एकत्र जमली कीं चालू होत. आयरिश लोकांना बर्नार्ड शॉ यांची किंमत कां वाटत नाहीं, यांची मीमांसा कोलिस यांनीं आपल्या "बर्नार्ड शॉ" या ग्रंथांत मार्मिकपणें केली आहे.

बर्नार्ड शॉ यांचेबद्दल गैरसमज व तिरस्कार पसरण्याचें मुख्य कारण म्हणजे ते आयर्लंडच्या गुणदोषांची निर्भीडपणें टीका करतात हें होय. त्यांना आडपडदा ठाऊक नाहीं. "John Bull's Other Island" या नाटकांत त्यांनीं आयरिश लोकांच्या दोषांची खूप कुचेष्टा केली आहे. पण आपल्यावर जर कोणीं टीका केली तर आयरिश लोकांना मनस्वी संताप येतो. त्यांच्या दोषांची चेष्टा केली कीं, त्यांना फार चीड येते. दुसऱ्यानें केलेली टीका शांतपणें ऐकून घेण्याइतकें मानसिक धैर्य आयरिश लोकांत नाहीं, असें कोलिस यांचें म्हणणें आहे. त्यांची राजकीय दृष्टि फार आकुंचित स्वरूपाची असते. इंग्लिश लोकांप्रमाणें त्यांच्या प्रवृत्ति व्यापक व उदार स्वरूपाच्या नाहींत. इंग्लिश लोकांचा देशाभिमान जरी जाज्वल्य असतो, तरी

आयरिश लोकांप्रमाणें ते देशाभिमानानें अंध बनून न जातां, इतर आन्तर-राष्ट्रीय विचारांत लक्ष घालतात. आपल्या देशाबाहेर निरानिराळे प्रांत जिंकून इंग्लंडचा लौकिक वाढवावा अशा प्रबल महत्त्वाकांक्षेनें त्यांचीं मनें प्रेरित असतात. आयरिश लोकांचें वर्तन याच्या अगदीं उलट असतें. त्यांच्या वाङ्मयांतसुद्धां इतरांनीं केलेली ढवळाढवळ त्यांना खपत नाहीं. याच्या उलट बर्नार्ड शॉ हे आयरिश असतांनाहि त्यांना 'नोबेल प्राईज' देण्यांत आलें होतें. परंतु आपल्या मालकी हक्कांवर जर कोणी हक्क सांगूं लागला तर आयरिश लोक त्यावर तुटून पडतील. बर्नार्ड शॉ यांची वृत्ति अत्यंत उदार व विशाल. आपल्या आचारविचारांना मर्यादा घातलेल्या त्यांना बिलकूल खपावयाच्या नाहींत. आयर्लंडच्या स्वार्थी वृत्तीवर टीका करतांना ती अगदीं मर्मभेदक असावयाची. अशा तऱ्हेच्या भिन्न आकांक्षेच्या मनुष्याचा आयरिश लोक गौरव करतील हें कधींतरी शक्य आहे काय?

बर्नार्ड शॉ यांच्या विरुद्ध आयरिशांची इतकी बेपर्वाई असण्याचें कारण म्हणजे वाङ्मयक्षेत्रांत त्यांनीं सम्पादिलेला अलौकिक विजय व लौकिक होय, असें कोलिस यांचें म्हणणें आहे. विजयी वीराचा गौरव करून त्याला सन्मान देण्यांत इंग्रजांचा लौकिक आहे. एकादा तरुण तेजस्वी लेखक इंग्रज मनुष्याच्या पाहण्यांत आला तर तो त्याला प्रोत्साहन देऊन कार्यक्षम करतो, पण एकाद्या आयरिशमननें जर असा एकादा यशोन्मुख लेखक पाहिला तर त्याला निरुत्साही करण्याकडे त्याची प्रवृत्ति दिसून येते. कोणाला जर या विधानाची सत्यता पटत नसेल तर त्यानें इंग्लंड व आयर्लंड यांमध्यें अस्तित्वांत असलेल्या "आयरिश सोसायट्यां"चे व्यवसाय पहावे असें जे. सी. कोलिस आव्हान देतात.

शॉंची विचार प्रगट करण्याची शैली अत्यंत विक्षिप्त! त्यामुळें त्यांच्याविषयीं गैरसमजाचें इतकें प्रचण्ड काहूर उठलें कीं, लोकांची समजूत घालतांना ते अगदीं जेरीस आले. त्यांच्या शुद्ध हेतूबद्दल जिकडेतिकडे असंशयाचा वणवा पेटला व आज चाळीस वर्षांच्या जलसिंचनानंतरहि त्याची धग अजून गेलेली नाहीं. त्यांच्या विचित्र शैलीचा नमुना खालीलप्रमाणें देतां येईल. शेक्सपियरविषयीं लिहितांना ते म्हणतात, "मी जेव्हां शेक्सपियरशीं

माझी तुलना करूं लागतों, त्या वेळीं मी त्याच्यापेक्षां कितीतरी पटीनें श्रेष्ठ आहें असें मला वाटतें. इतकेंच नव्हे तर कधीं कधीं माझें मन इतकें अस्वस्थ होऊन जातें कीं, त्याचें तीनशें वर्षांपूर्वीचें प्रेत उकरून काढून त्याला चार धोंडे मारल्याखेरीज मला मानसिक स्वास्थ्य मिळावयाचें नाहीं असें वाटतें." शेक्सपियरसारख्या विश्ववंद्य कवीश्वराबद्दल आत्मप्रौढीचें हें कुत्सित विधान वाचून सामान्य उथळ वाचकांच्या मनाची काय स्थिति होऊन जात असेल हें सांगावयास नकोच. शान्त व समतोल विचारशक्ति जर नसेल तर शॉच्या तत्त्वाचें मर्मग्रहण कधींच व्हावयाचें नाहीं. यामुळें उच्छृंखल वृत्तीच्या अनेक फ्रेंच, जर्मन व इंग्रज लेखकांनीं शॉविषयीं आपला भलताच गैरसमज करून घेऊन मोठीं गमतीदार पुस्तकें लिहिलीं आहेत. तें टीकात्मक वाङ्मय वाचतांना शॉ आपल्या अभिनव कलाविलासानें कुशल जादुगाराप्रमाणें नजरबंदी करून उथळ वाचकांना कसें सहज व हातोहात फसवूं शकतात हें पाहून त्यांच्या चातुर्याबद्दल मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें.

तथापि जरी शॉच्या विरुद्ध वर सांगितल्याप्रमाणें गैरसमजाची व संशयाची वावटळ पसरली तरी त्यांनीं धीर सोडला नाहीं. अडीअडचणी व विरोध यांना न जुमानतां त्यांनीं आपलें ग्रंथलेखन तसेंच पुढें चालू ठेवलें. समोरून अंगावर उसळणाऱ्या लाटांना न जुमानतां तसेंच बेडरपणें पाणी तोडीत जाणाऱ्या अट्टल पोहणाराच्या धडाडीनें त्यांनीं या अडचणींतून मार्ग काढला व आपल्या स्वतंत्र व निर्भीड विचारसरणीनें जगास चकित केलें. जसजसा काल जाऊं लागला, तसतसें गोंधळून गेलेल्या समाजानें शान्त चित्तानें या विक्षिप्त नाटककाराबद्दल विचार करावयास सुरुवात केली. हळू हळू शॉच्या विक्षिप्त कल्पनांचें व त्याहिपेक्षां अत्यन्त विक्षिप्त अशा भाषाशैलीचें महत्त्व व रहस्य लोकांस पटूं लागलें. गढूळ झालेलीं मतें जसजशीं निवळूं लागलीं, तसतसा त्यांच्या शुद्ध हेतूंबद्दलचा विश्वासहि दृढ होत गेला व कालांतरानें त्यांच्या बद्दलची कल्पना साफ बदलून जाऊन, आज ब्रिटनच्या नामांकित नाटककारांत ते सम्राट्पदीं आहेत असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

समाजांतील दोषस्थळांचें रंगभूमीवर प्रदर्शन मांडून युरोपियन समाजाला

चाबकाचे फटकारे मारण्यांत आनंद मानणारा शॉच्या इतका बेगुमान, उर्मट, अहंमन्य लेखक आजपर्यंत तरी झालेला ऐकिवांत नाहीं. Country Wife व The Way of the World यांसारखीं सामाजिक नाटकें लिहून विचरले व कॉंग्रीव्ह यांनीं शॉच्यापूर्वी १७व्या शतकांतील नीतिभ्रष्ट समाजाचा तमाशा जगापुढें मांडिला हें कबूल आहे; परंतु त्यांच्या लेखणीला उर्मटपणा ठाऊक नाहीं. त्याचप्रमाणें Swift व Samuel Butler सारखे लेखक शॉच्यापूर्वी समाजावर ताशेरे झाडून गेले. परंतु आत्मप्रौढी व बेगुमान उर्मटपणा या बाबतींत ते बर्नार्ड शॉ यांची बरोबरी करूं शकत नाहींत. शॉचीं नाटकें वाचतांना आपणांस बरचेवर विजेचे धक्के बसल्याचा भास होतो. त्यांच्या कल्पना इतक्या नाविन्यपूर्ण व भेदक असतात कीं, समंजस वाचक एकादा विनोदी प्रवेश वाचीत असतांना त्यांतील विनोद विसरून जातो व विनोदाच्या विरल अभ्रांतून डोकावणाऱ्या उत्तमोत्तम कल्पनांबद्दल गंभीरपणें विचार करावयास लागतो.

स्त्रीचें या जगांतील महत्त्वाचें कार्य कोणतें? असा जर प्रश्न कोणीं शॉना केला तर ते चटकन् उत्तर देतात " माता होणें "—मातृपदावर आरूढ होणें हेंच स्त्रीजीविताचें साफल्य असें त्यांचें मत आहे. या मताचा पुनरुच्चार त्यांनीं आपल्या अनेक नाटकांतून उघडपणें केला आहे. नाटककाराचीं नाटकें वाचून त्यांवरून नाटककाराचे विचार ओळखावयाचे हें काम अत्यन्त चातुर्याचें व तितकेंच बिकट व जबाबदारीचें असतें. परन्तु बर्नार्ड शॉ यांच्या बाबतींत ही अडचण फारशी जाणवत नाहीं. शेक्सपियरप्रमाणें नाटक लिहितांना त्यांना आपलें व्यक्तित्व लपवितां येत नाहीं. त्याचप्रमाणें, प्रत्येक नाटकाच्या प्रस्तावनेंत ते आपलीं मतें इतकीं निःशंकपणें विशद करितात कीं, संशयाला जागाच उरत नाहीं. तेव्हां मातृत्वांत गौरव मानणें हेंच स्त्रीचें कर्तव्य होय, असें शॉचें मत आहे, असें निर्धास्तपणें म्हणतां येईल.

स्त्रीला जो पुरुषाबद्दल आपलेपणा वाटतो त्याचें कारण, ती त्याजकडे प्रजोत्पत्तीच्या दृष्ट्या पाहते म्हणून, त्यांत पवित्र प्रेमाचा कांहीं एक संबंध नाहीं, हे नवीन शब्द शॉनीं आपल्या नाटकांत प्रतिपादन केले आहेत. Man and Superman या नाटकाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं या तत्त्वाची

विस्तृत चर्चा केली आहे. शॉ म्हणतात—"या जगांत पुरुष-जातीला वश करण्यासाठीं स्त्रियांनीं अनेक मोहांचीं जाळीं पसरून ठेविलीं आहेत. आणि तें योग्यच आहे. स्त्रीचें प्रमुख कर्तव्य म्हणजे माता होणें. व या पवित्र कर्तव्याची बजावणी ती पुरुषजातीच्या मदतीशिवाय करूं शकणार नाहीं. यासाठीं पुरुषजातीला वश करण्यासाठीं स्त्रियांची अत्यन्त धडपड चाललेली असते. परंतु अशा तऱ्हेनें पुरुषजातीला वश करितांना ती एका धूर्त मार्गाचा अवलम्ब करिते. कोळी ( Spider ) जसा आपल्या जाळ्यांत माशी पकडण्यासाठीं संथपणें लपून बसतो व माशी जाळ्यांत सांपडतांच तिच्यावर झपकन् उडी घालून तिला तंतूंत अडकवून टाकितो, त्याप्रमाणें स्त्री जरी वरून संभावितपणाचा आव आणून स्वस्थ बसतांना दिसते, तरी हा सर्व संभावितपणा पुरुषजातीला वश करण्यासाठीं पांघरलेला असतो." शॉचें हें तत्त्व The Theory of the Spider Female या नांवानें प्रसिद्ध आहे.

स्त्री व पुरुष यांच्या परस्पर आकर्षणाकडे शॉ हे शास्त्रीय चष्म्यांतून पहात असल्यामुळें त्यांच्या विवाहविषयक कल्पना इतर लेखकांपेक्षां निराळ्या असणार हें सांगावयास नकोच. राष्ट्रांतील लोकसंख्या वाढविण्याचें विवाह हें एक साधन आहे, एवढीच त्यांची विवाहाबद्दल कल्पना आहे. "विवाह हें परस्परांच्या आत्म्याचें लग्न होय !" अशा तऱ्हेचें स्वर्गीय सुभाषित बोलणाऱ्या भवभूतीबरोबर आपण अन्तरिक्षांत विहार करीत असतां, शॉ आपणांस साखळदण्डानें खालीं खेंचून सत्यसृष्टीच्या खडकावर आपटून जागे करितात. बलिष्ठ, तेजःपुंज, बुद्धिमान अशा तऱ्हेचीं समाजाला आलंकृत करणारीं नररत्नें निर्माण करणें हेंच विवाहाचें अत्यन्त महत्त्वाचें कार्य आहे, असें ते जोराजोरानें प्रतिपादन करितात. अशा तऱ्हेनें उत्तम प्रजा निर्माण करणें हें विवाहाचें आद्य ध्येय असल्यामुळें, लग्न करितांना पतिपत्नींच्या शरीरसंपत्तीवर करडी नजर असावी अशी त्यांची सूचना आहे. नालायक, रोगग्रस्त, क्षयी व अनेक भयंकर व्याधींनीं जर्जर झालेल्या लोकांना लग्न करण्याचा सक्त मज्जाव असावा, कारण त्यांपासून समाजाच्या स्थैर्यास धोका पोहोंचण्याचा संभव आहे, ही सावधगिरीची सूचना त्यांनीं दिली आहे. आज इंग्लंडमध्यें प्रचलित असलेल्या विवाहपद्धतीचा त्यांना मनापासून तिटकारा

आहे. विवाह हें प्रजोत्पत्तीचें साधन असतांना, हल्लीं लोकसंख्येचा झपाट्यानें ऱ्हास होत असलेला पाहून त्यांना विषाद वाटतो. आधुनिक तरुण, विवाह म्हणजे कायदेशीर व्यभिचाराची मुभा एवढाच अर्थ घेऊन वैवाहिक जबाबदारीकडे कानाडोळा करून, अत्यन्त अश्लाध्य गोष्टी करण्यांत आनंद मानतो व खुजट, निस्सत्त्व व रोगांचीं केवळ माहेरघरेंच अशा निरुपयोगी अर्भकांना जन्म देतो हें पाहून त्यांना सुचेनासें होतें. असा हा अविचार आत्मघातकी व समाजाला भयंकर संकटांत लोटणारा आहे, असें गेलीं पंचवीस वर्षे ते कळकळीनें बजावत आले आहेत. शॉच्या या विवाह-कल्पनांचें वैदिक ऋषींच्या विवाहविषयक कल्पनांशीं आश्चर्यकारक साम्य दिसून येतें. शॉप्रमाणें विवाहाचा हेतु प्रजोत्पादन हा आहे असेंच भारतीय आर्यांचें म्हणणें होतें. प्रेमसुख हा लग्नाचा हेतु आहे, अशा तऱ्हेचा उल्लेख कोठें आढळत नाहीं. ‘ धर्मपत्नी ’ ह्या संज्ञेचें मर्म तरी हेंच ! विवाहकार्यांतील वैदिक मंत्र जर आपण चाळून पाहिला तर त्या विवाहमंत्रांत ‘ आपण उत्तम प्रजा निर्माण करूं ’ अशा तऱ्हेची शपथ वधूवरांनीं घ्यावयाची असते, असें दिसून येईल. शॉच्या विवाहकल्पनांना प्राचीन भारतीय आर्यांचा हा जोरदार पाठिंबा पाहून थोडीशी गंमत वाटल्यावांचून रहात नाहीं.

एकदां एका सार्वजनिक व्याख्यानांत बर्नार्ड शॉ म्हणाले, “ आपल्या वयाचीं तीस किंवा चाळीस वर्षे उलटून गेल्यानंतर आपण शिक्षणास प्रारंभ करावा; तत्पूर्वी शिक्षणास सुरुवात करूं नये. ” वरील उद्गार वाचून वाचकांचें मन आश्चर्यानें थक्क होईल. परंतु या एका वाक्यांत शॉच्या शिक्षणविषयक मतांचें सार सांठविलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीकडून शॉना व्याख्यान देण्यासाठीं अनेक आमंत्रणें आलीं, परंतु एकाहि आमंत्रणाचा त्यांनीं स्वीकार केला नाहीं. उलट किंचित् उर्मटपणेंच नकार दर्शविला. आधुनिक सुशिक्षित लोकांनीं जगाची प्रगति आडवून धरली आहे असें तें स्पष्टपणें समजतात. “ शिक्षणाबद्दल तुम्ही माझीं मतें विचारतां ! ठीक आहे. तुम्हांला जर माझ्या मतांप्रमाणें शिक्षणविषयक सुधारणा करावयाची असेल तर प्रथम ऑक्सफर्ड, केम्ब्रिज, हॅरो, ईटन, विंचेस्टर येथील

विश्वविद्यालयें जाळून फस्त करा, एवढेंच माझें सांगणें आहे." शॉचें लेक्चर ऐकणारी एक स्त्री किंचित् रागानें म्हणाली, "तुम्हीं शाळा, कॉलेजें उध्वस्त केल्यानंतर त्यांचे ठिकाणीं काय ठेवणार?" शॉनीं तावडतोब उत्तर दिलें, "कांहींसुद्धां नाहीं. शाळा म्हणजे तुरुंग आहेत; मी कांहीं दिवस या तुरुंगाचा अनुभव घेतलाच आहे. म्हणून मी आपणांस सांगतों कीं, शाळा, कॉलेजें उध्वस्त करून टाका. त्यांनीं विश्वप्रगतीला मोठा पायबंद घातला आहे."

कुटुम्बपद्धति ठीक नसल्यामुळें शाळा अस्तित्वांत आल्या, असें त्यांचें म्हणणें आहे; व यांत बरेंच तथ्य आहे. मुलांना शिक्षण देण्याची कल्पना त्यांना बिलकूल नापसन्त आहे. निसर्गानुरूप एकाद्या पुष्पाप्रमाणें मुलाच्या मनाचें विकसन झालें पाहिजे; आपल्या नीतीच्या व शिक्षणाच्या भ्रमिष्ट कल्पनांनीं त्यांचीं बालमनें बिघडवूं नका, त्यांना शक्य तितकें मानसिक स्वातंत्र्य द्या, असें बर्नार्ड शॉ वरचेवर बजावून सांगतात. मुलांचे पालक जेव्हां जेव्हां मुलांना शिक्षण द्यावयास लागतात, तेव्हां आपण सर्वगुण-संपन्न आहोंत अशा भावनेनें ते त्यांच्यापुढें उभे राहतात, व "आतां तुला शिक्षण घेऊन माझ्यासारखें शहाणें झालें पाहिजे," असें त्यांना भासवितात! अशा तऱ्हेनें पालकांनीं आपलें व्यक्तित्व सदोदित त्यांच्या दृष्टीपुढें ठेविल्यामुळें साहजिकच मुलांच्या मनाची नैसर्गिक वाढ खुंटते. आपल्या मातापितरांचीं चरित्रें डोळ्यांपुढें ठेवून ते शिक्षणास प्रारम्भ करितात व अशा तऱ्हेनें हीं बालमनें बौद्धिक दास्यांत अडकावून ठेविल्यामुळें मनुष्यप्राण्याची नैसर्गिक प्रगति खुंटून गेली आहे, असें बर्नार्ड शॉचें मत आहे.

स्थलसंकोचास्तव शॉच्या इतर विषयांवरील मतांचें नुसतें दिग्दर्शनसुद्धां करणें अशक्य आहे. तथापि वरील विवेचनावरून त्यांच्या निर्भीड व स्वतंत्र विचारसरणीची कल्पना येणार आहे. जिवंत झऱ्याप्रमाणें त्यांच्या तेजस्वी प्रतिभेंतून नवीन नवीन विचारांचे तुषार उसळत असतात. त्यांची उत्फुल्ल प्रतिमा म्हणजे चित्रविचित्र विचारकमलांचें एक रम्य सरोवरच आहे. त्यांचीं नाटकें म्हणजे सुंदर सुंदर कल्पनांच्या रत्नखाणीच होत. अनेक अभिनव, तेजस्वी विचारांचा आहेर अर्पण करून त्यांनीं आंग्ल वाङ्मयाला कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. आज अनेक शतकें आपण रूढीचे दास बनून,

जवळजवळ आचारविचारांचें स्वातंत्र्य गमावून बसलों आहोंत. मनुष्य-जातीचा उत्तरोत्तर होत चाललेला हा मानसिक ऱ्हास पाहून शॉंचें अंतःकरण कळवळलें व मार्गापासून च्युत झालेल्या समाजाला खडबडून जागें करण्यासाठीं त्यांनीं लेखणी हातांत धरिली. त्यांच्या हेतूंची शुद्धता लक्षांत घेतां, त्यांचे कांहीं विषयांवरील अतिशयोक्तीचे उद्गार क्षम्य आहेत. बर्नार्ड शॉ यांची गणना आज साधुकोटींत व्हावयास लागली असून त्यांचा कीर्ति-परिमल सर्व जगभर दरवळून राहिला आहे. अशा तऱ्हेच्या अत्यंत निर्भीड, तत्त्वनिष्ठ व थोर ग्रंथकाराच्या वाङ्मयाचा परिचय उदयोन्मुख हिंदवी तरुणाला असणें अत्यावश्यक आहे. अशा तऱ्हेची जिज्ञासा जर या लेखापासून कोणास झाली तर मी स्वतःस कृतार्थ समजेन.

---

# आयुर्वेदाचें वैशिष्ट्य

लेखक: आयुर्वेदाचार्य पांडुरंग हरि देशपांडे, पुणें.

[ जन्म शिरवळ येथें १९०२ मध्यें. शिक्षण—मॅट्रिक्युलेशन, व भिषग्, आयुर्वेदविशारद आणि आयुर्वेदाचार्य या नि. भा. आयुर्वेद विद्यापीठाच्या परीक्षा उत्तीर्ण. आयुर्वेद आणि इतर विषयांवर स्फुट लेख आयुर्वेद, आयुर्वेदचिकित्सक, जर्नल् ऑफ् आयुर्वेद, तेलगू समाचार इ० मासिकें यांतून लिहिले. हल्लीं मुख्य धंदा वैद्यक, देशी दवाखाना, शुक्रवार पेठ, पुणें.]

वैद्यशास्त्र म्हटलें कीं, रोग बरे करणें हें त्याचें उद्दिष्ट असणार हें कोणालाहि समजतें. परंतु रोग बरे करण्यास रोगनिश्चिति—**निदान**—प्रथम व्हावयास पाहिजे; आणि रोगनिश्चिति होण्यास रोगी भागाची स्पष्ट कल्पना यावयास पाहिजे. आणि ती म्हणजे तेथील बिघाड काय स्वरूपाचा आहे हें कळणें होय. पण हें कळण्यासाठीं निरोगी स्थितींत तो भाग कसा असतो—त्याचें **शारीरज्ञान**—हें समजावयास पाहिजेच. परंतु इतकें समजलें तरी दृष्टीच्या टप्प्यांतील स्थूल गोष्टींचेंच हें ज्ञान झालें. स्थूल शारीरिक रचनाविशेष ज्या इंद्रियांचे व्यापारांना साहाय्यक होतात, त्यांचे व्यापार व ते व्यापार काय

तत्त्वानें चालतात हें कळणें अवश्य आहे. तेव्हां एका रोगनिदानासाठीं शरीर इंद्रियांच्या व्यापारांचें तत्त्व कळणें हेंच ज्ञान प्राधान्येंकरून चिकित्सकांला अवश्य आहे.

दुसरी गोष्ट चिकित्सेची. रोगनिदान बरोबर झालें तरी रोगावर हुकुमी काम करणारें औषध योजतां आलें पाहिजे. त्यासाठीं औषधांचे गुणधर्म मांहीत हवेत आणि हे गुणधर्महि काय धोरणानें ठरविले आहेत हें कळलें नाहीं तर, अंधारांत चांचपडल्याप्रमाणें, ग्रंथाचा आधार म्हणूनच सांगितलेले गुण मानावयाचे असला प्रकार होईल. म्हणून पदार्थांच्या गुणधर्मांच्या धोरणाचें यथार्थ्यानें आकलन व्हावयास पाहिजे. तेव्हां वैद्यशास्त्राला, रोगनिदान आणि रोगचिकित्सा सांगतांना निरोगी शरीराच्या वाढीचें आणि चिकित्सेंत योजल्या जाणाऱ्या औषधिद्रव्यांचे गुणधर्म ठरविण्याचें तत्त्व चांगलें कळलेलें असावयास पाहिजे. या दोन गोष्टी ज्यांत नसतील त्याला, बाकीचा फापटपसारा कितीहि असला तरी तें वैद्यशास्त्र म्हणतांच येणार नाहीं. पण आयुर्वेदानें या दोन गोष्टी सांगितल्या आहेत. मात्र त्यांची पद्धति अगदीं निराळी आणि विशिष्ट आहे. ती पुरती समजून न घेणाऱ्यांना शास्त्रीयत्वाचीं हीं मुख्यांगें असूनहि ‘आयुर्वेद शास्त्रीय का अशास्त्रीय’ असा संशय पडतो. या पद्धतींतील वैशिष्ट्य पाहणें हेंच प्रस्तुत होय.

जीवंत शरीराचें जीवनमान टिकविण्यासाठीं त्याचें पोषण निराबाध व्हावयास पाहिजे हें समजणें कठीण नाहीं. परंतु पोषणासाठीं आणखी कांहीं क्रियांची जरूरी लागते. त्या क्रिया म्हणजे पोषक घटकांचें संग्रहण, संगृहीतांचें पचन, आणि पाचितांचें सात्म्यीकरण व निःसत्त्व घटकांचें उत्सर्जन या होत; आणि या क्रिया ज्या मानानें सरळ आणि निर्विघ्नपणें पार पडतील त्या मानानें शरीराचे पोषणाचें आणि जिवंतपणाच्या लक्षणांचें कार्य पार पडणार. मानवी शरीरच काय, अखिल सजीव सृष्टीच्या पोषणाची हीच पद्धती आहे असें थोड्याशा अवलोकनानें कोणाच्याहि ध्यानीं येईल.

पोषक घटकांचा संग्रह म्हणजे मनुष्यानें ते घटक निवळ भक्षण करणें एवढाच संकुचित अर्थ नाहीं. हें काम प्रत्येकजण करीत असूनहि सर्वांच्याच शरीरांकडून पोषक घटक पाहिजे तसे संगृहित केले जात नाहींत. संगृह्यमाण

घटक शरीरधातूशीं सजातीय पाहिजेत. शरीरधातूंत वासना उत्पन्न होते का नाहीं हा मानसशास्त्रज्ञांचा प्रश्न असला तरी एवढें मात्र खरें कीं ज्या पदार्थांचा कमीपणा त्याची इच्छा आणि ज्यांचें आधिक्य त्यांचा तिटकारा हा मानवी देहाला रोगी स्थितींत नेहमीं अनुभव येतो.

कुर्वते हि रुचिं दोषा विपरीतसमानयोः ।
वृद्धाःक्षीणाश्च भूयिष्ठं लक्षयन्त्यबुधास्तु न ।। (वाग्भट, सू. स्था. अ. ११).

ज्यांची जरूरी त्याच घटकांचा पदार्थ सेवन केला गेल्यास त्यांचें शरीराकडून संग्रहण केलें जातें हें निःसंशय.

तथापि आहार्य पदार्थ निव्वळ सजातीय एवढ्यानें बोध होणार नाहीं. सजातीयत्वाचीं गमकें काय आहेत हें कळणें जरूर आहे. हे सजातीय पदार्थ-घटक ज्याचे साहाय्यानें संगृहीत केले जातात तो मध्यवर्ती पदार्थच कसा आहे हें पाहिल्यानेंच हें सर्व समजेल. हा पदार्थ स्निग्ध म्हणजे ओषट आहे आणि तो या गुणाचे साहाय्यानें आहार्य घटक जोडून घेण्याचें काम करतो. जोडून घेतलेले घटक शरीरांत टिकविण्यासाठीं त्यांत थंडपणा लागतो. हा पदार्थ गतीनें मंद आणि वजनाला जड आहे. कारण संग्रहाचें–आकर्षणाचें त्याचें कार्य स्निग्धशीतयुक्त स्थितींत होतें. इतक्या गुणांचा पदार्थ स्थिर म्हणजे आपलें आसन कायम ठेवून राहणारा असणार. याच सर्व गुणांचा समुच्चय श्लेष्मा–कफ या नांवाच्या पदार्थांत असून त्याचेच साहाय्यानें आहार्य घटकांचा शरीरधातूंत संग्रह होतो. कफाचें ग्रंथोक्त वर्णन असेंच आहे.

स्निग्धः शीतो गुरुर्मंदः श्लक्ष्णो मृत्स्नः स्थिरः कफः । (वा. सू. अ. १)

पोषक घटकांचा संग्रह झाला तरी त्यांचें पचन होऊन शरीरधातूंत शोषण व्हावयास पाहिजे तरच त्यांनीं शरीराचें पोषण होणार. म्हणून हें काम करणाऱ्या पदार्थांचीहि तितकीच जरूरी आहे. पचनांतच पृथक्करणाचा अंतर्भाव होतो. पचनसंस्कारानें तावूनसुलाखून जेवढा पोषक अंश असेल तेवढाच धातूंत शोषित होऊन बाकीचा निरुपयोगी होतो. शरीरांत हें पचनाचें कार्य पित्त नांवाचा पदार्थ करतो. पित्ताच्या गुणांत तें

(पित्तं) सस्नेहतीक्ष्णोष्णं लघु विस्रं सरं द्रवम् । (वा. सू. अ. १)

(म्हणजे) किंचित् स्निग्ध, तीक्ष्ण, उष्ण, हलकें, आंबुस, सारक आणि पातळ

असल्याचें वर्णन आहे. स्नेहमय घटक पचविणाऱ्या पदार्थांत थोडीशी स्निग्धता असावी लागतेच; आणि पचनाचें प्रत्यक्ष कार्य उष्णता आणि तीक्ष्णता याच गुणांनीं होणार. पचनकार्य द्रवसाहाय्यानें चांगलें होतें हें व्यवहारांतहि आपण पाहतों, आणि द्रव पदार्थ स्वतः सरणारे असून अपल्याबरोबर दुसऱ्यांनाहि सरकवितात. पित्तहि द्रव आणि सारक म्हटलें आहे तें यासाठींच. परंतु पचनाचें कार्य प्रमाणबद्ध होतें कां नाहीं हें तेथल्या तेथेंच अजमविण्यासाठीं पित्तांत अंबूसपणा ठेवला आहे. तें अधिक वाढल्यास अंबूसपणा वाढतो, व प्रमाणानें कमी झाल्यास चिकटा अधिक वाढतो, मिळून दोन्हींनींहि वैषम्यच येतें आणि आमसंचय होऊन रोगोत्पत्ति होते. द्रवविशिष्ट पदार्थ हा घन पदार्थांचे अपेक्षेनें हलकाच असणार.

पोषक घटक पचून पोष्य धातूंत मिळण्यालायक झाले तरी त्यांचें त्या त्या धातूंत प्रत्यक्ष नेणें—संवहन—आणि धातूंनीं आपल्या अंतर्गत पचनशक्तीनें हे घटक पुरते पचवूनहि त्यांतून कामाला आलेले—मल म्हणून टाकून दिलेले घटक—उत्सृष्ट करण्याचें कामहि वर वर्णन केलेल्या ग्रहणपचन या कामाइतकेंच महत्त्वाचें आहे. पोषक परमाणु धातूंत पूर्णपणें मिळून गेले तरच शरीराचें पोषण बिनतक्रार होतें, तसाच निरुपयोगी झालेला मलभागहि केरासारखा काढून दूर फेंकून दिला गेला पाहिजे, नाहींतर मलभाग संचित होऊन स्वतःच कुजूं लागतील आणि पोषक धातूंनाहि कुजवितील व त्यामुळें शरीर बिघडूं लागेल. हें संवहनाचें—बियोजनाचें—कार्य शरीरांत वायु नांवाचा शक्तिमान पदार्थ करतो. वायु पदार्थ कसा हा वादाचा प्रश्न येथें विस्तारभयास्तव चर्चेला घेतां येत नाहीं. तरी, कोणतीहि शक्ति पदार्थाश्रित झाल्याखेरीज कार्यकारी होऊं शकत नाहीं, या नियमान्वयें महान् कार्यकारी आणि सामर्थ्यवान् वायु पदार्थाश्रित होत्सातांच शरीरक्रिया चालवतो असें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं. वायु हा सर्वच हालचालींचा, श्वासोच्छ्वासादि प्राणधारक क्रियांचा प्रवर्तक असून तीव्र संवेदक असे जे मल, मूत्र, वात, ढेकर, उचकी, शिंक, अश्रु, इ. वेग त्यांचेंहि प्रवर्तन वायूच करतो. म्हणून 'वायुस्तंत्रयंत्रधरः।' (चरक सू. स्था.) असें त्याला म्हटलें आहे. पण हीं वायूचीं मुख्य कार्यें नव्हेत. पोषक घटकांचें नीट पचन झाल्यावर रस, रक्त, मांस, मेद,

अस्थि, मज्जा आणि शुक्र या सप्त धातूंत त्यांचे त्यांचे घटक नेमके नेऊन सोडणें हेंच वायूचें प्रधान कार्य होय. वस्तुतः स्थानी पचनशक्तीनें अगर धात्वग्नीनें पोषक घटक धातूंत मिळण्यालायक होतात व क्रमानें रसाचें रक्त, रक्ताचें मांस, मांसाचा मेद इ. साती धातु बनतात. जसें--

रसाद्रक्तं ततो मांसं मांसान्मेदस्ततोऽस्थि च ।
अस्थ्नो मज्जा ततः शुक्रं शुक्राद्गर्भः प्रजायते ॥

( वा. शा. स्था. अ. २ )

पण हें धातुसंवहन होण्यासाठीं सारखी हालचाल होऊन एक प्रकारचा संरंभ व्हावा लागतो, आणि हें कार्य वायु आपल्या 'चल' अगर 'चंचल' या गुणानें करतो. रूक्षता, हलकेपणा, खरखरीतपणा आणि सूक्ष्मता हीं त्याचीं तत्कार्यद्योतक स्वरूपें आहेत. दोन परमाणूंना एकत्र करणारें द्रव्य स्निग्ध असावें लागतें, तद्वतच दोन परमाणूंना वियोजित करणारें द्रव्य रूक्ष असावें लागतें आणि हीं दोन्ही कार्यें दाखविणारे 'स्निग्ध' आणि 'रूक्ष' हे दोन गुण कफ आणि वायु यांचे गुणांत आरंभींच सांगितले आहेत. वियोजक परमाणु अधिक सामर्थ्यवान् असतात, कारण वियोजन झाल्याबरोबर त्याच गतींत मलभागांचें उत्सर्जनहि व्हावें लागतें. वायूहि तसाच शक्तिमान् असल्याचें सांगितलें आहे.

पित्तं पंगुः कफः पंगुः पंगवो मलधातवः ।
वायुना यत्र नीयन्ते तत्र वर्षन्ति मेघवत् ॥

( माधव निदान आतंकदर्पण टीका )

थोडक्यांत त्रिदोषांचें वर्णन करावयाचें तर कफाचें कार्य श्लेषण अगर संयोजन ( Unification or Assimilation ), पित्ताचें पचन आणि शोषण ( Digestion and Absorption ) आणि वायूचें वियोजन आणि उत्सर्जन ( Separation and Excretion ) हें होय. दोषांकडूनच सप्त धातूंचें पोषण व धारण होतें आणि मलभागांचें उत्सर्जन होऊन शरीराचें जीवमान टिकतें. या क्रिया जितक्या प्रमाणांत निर्दोष होतील तितक्याच प्रमाणांत शरीराचें निरोगीपण टिकेल आणि या क्रियांत व्यत्यय येऊन त्रिदोषांत वैषम्य आलें

कीं रोग उत्पन्न झालाच. या क्रियांत व्यत्यय येणें म्हणजे त्रिदोषांच्या संयोजन, पचन व वियोजन या क्रियांत कमीअधिकपणा येणें होय. पण वायु हाच शक्तिमान् असल्यानें त्याचीच क्रिया अधिक चांगली व्हावयास पाहिजे आणि ती चांगली असेल तरच बाकीच्या दोन्ही क्रियांना मदत होईल व पुरुष शतायु होईल.

अव्याहतगतिर्यस्य स्थानस्थः प्रकृतिस्थितः ।
वायुः स्यात्सोऽधिकं जीवेद्वीतरोगः समाःशतम् ॥
(मा. नि. वातरोग निदान)

उलटपक्षीं कफ व पित्त यांच्या वाढीमुळें वायूचा संचारमार्ग रुद्ध होऊन त्याचे कार्यांत अडथळा येतो. वायूचा संचार थांबला कीं, त्याचें वियोजनोत्सर्जनाचें कार्यंहि थांबलें. मग धातुसंवहन बंद होऊन मलभागांचा संचय होतो व रोगाला आमंत्रण दिलें जातें.

कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम् ।
यत्र संगः स्ववैगुण्याद्व्याधिस्तत्रोपजायते ॥ १ ॥ (चरक)
क्षिप्यमाणः स्ववैगुण्याद्रसः सज्जति यत्र सः ।
तस्मिन्विकारं कुरुते खे वर्षमिव तोयदः ॥ (वाग्भट)

दोषांनींच धातूंचें पोषण होतें व त्यांचेकडूनच मलभागांचें उत्सर्जन होतें. म्हणून तेच सप्तधातूंचें संवर्धन करतात, व त्यांना शरीराचें धारण करण्यास तयार करतात. स्वतः परपुष्ट आहेत, तरी ते शरीराला आधार देतात; म्हणून त्यांना धारक या अर्थानें 'धातु' म्हटलें. या अपेक्षेनें त्रिदोष हे धातूंचे उत्पादक म्हणून फार तर कारक असें त्यांना म्हणतां येईल, पण त्यांनाच 'धातु' असें कधींहि म्हणतां यावयाचें नाहीं. 'धरणाद्धातवः' या व्युत्पत्तीनें सप्तधातूच खरे धातु ठरतात; दोष उत्पादक आणि पोषक होत. दोषांनाच धातु म्हणणारे, पोषण आणि धारण या क्रियांचा घोंटाळा करतात. 'दोष' ही संज्ञा निरोगी स्थितीपेक्षां रोगी स्थितींतच अधिक लागू पडते हें खरें आणि यालाच अनुलक्षून 'दूषयन्तीति दोषाः'

असें म्हटलें आहे. पण म्हणून दोष निरोगी स्थितींतहि धातु या संज्ञेला कधींच पात्र होणार नाहींत. असो.

हें त्रिदोषवर्णन आयुर्वेदाच्या वैशिष्टयाचें प्रधान अंग असून यावरच सर्व निदान आणि चिकित्सा अधिष्ठित झाली आहे; आणि म्हणून त्रिदोषांचा जितका अभ्यास करावा तितकी निदानचिकित्सा अधिक चांगली करतां येते.

चिकित्सा यशस्वी होण्यास वापरण्यांत येणाऱ्या औषधीद्रव्यांचे गुणधर्म चांगले माहीत हवेत. नाहींतर ती चिकित्सा अंधळी होईल. शरीराचे व्यापारांचीं मूलतत्त्वें कळणें जितकें आवश्यक तितकेंच बिघडलेल्या शरीरावर वापरण्याच्या औषधांचे गुणधर्म कळणेंहि आवश्यक आहे. आयुर्वेदानें त्रिदोष-पद्धतीनें शरीराचे व्यापारांचें सूक्ष्म अवलोकन केलें आणि तार्किक तरी अत्यंत तात्त्विक व मूलग्राही म्हणून कोणीहि त्यांची प्रशंसा करील. पण पदार्थांचे गुणधर्म त्याला कसे समजले? जुन्या काळीं पृथक्करणाची पद्धति नव्हती. मग काय ' यस्य कस्य तरोर्मूलं ' या विनोदी म्हणीप्रमाणें कोणतें तरी औषध कसेंतरी त्यानें वापरलें म्हणावें? पण तसें असतें तर त्याच म्हणींत म्हटल्याप्रमाणें चिकित्सेच्या फलाची स्थिति ' यद्वा तद्वा 'च झाली असती, आणि हमखास गुणकारी चिकित्सा म्हणून तर आयुर्वेदाची प्रसिद्धि फार आहे! कोणी म्हणतात, ऋषींनीं दिव्य दृष्टीनें पदार्थांचे गुणधर्म ओळखले! पण मग दिव्य दृष्टीला इतकें गुणवर्णन करूनहि त्यांचें तत्त्व सांगतां आलें नसतें काय? पुष्कळांची अशी समज आहे कीं, रुग्णालयीन पद्धती-प्रमाणें प्रत्येक पदार्थ रोग्यावर वापरून त्याचे बरेवाईट गुण अजमावले व मग ते नोंदून ठेवले गेले. पण अगणित पदार्थांचें, अनेक तऱ्हांचें गुणवर्णन, तसेंच काढा, चूर्ण, आसव, अरिष्ट, गुटिका, घृत, तेल इत्यादि प्रकारांत, विषारी आणि निर्विष पदार्थांचें गुणवर्णन करण्यास रुग्णालयांतून सहस्रशः अमोलिक जीवांचे बळी पडले असतील असें मानावें लागेल! पण याविषयीं अस्पष्टसुद्धां अनुमान करण्यास जागा नाहीं, तोंपर्यंत हल्लीं कितीहि परिचयाची झालेली असली तरी जुन्या आयुर्वेदीयांनीं औषधींचे गुणधर्म अजमावण्यास तीच (clinical) पद्धति अमलांत आणली होती असें मानतां येत नाहीं. पण मग ते ठरविले तरी कसे? असा साहाजिकच प्रश्न उभा राहतो.

आयुर्वेदीय पदार्थांचे गुणधर्म सांगतांना त्यांचें रस, विपाक, वीर्य आणि **प्रभाव** असें चतुर्धा वर्गीकरण केलें असून त्याच अनुरोधानें गुण सांगितले आहेत. रस म्हणजे पदार्थाची जिभेला समजणारी रुची. ही गोड, आंबट, खारट, तिखट, कडु आणि तुरट अशी सहा प्रकारची असून यांनाच षड्रस असें म्हणतात. पदार्थांच्या चवी ठरविणें अत्यंत सोपें आहे असें कोणीहि म्हणेल. पण गोड पदार्थांच्या यादींत साखर व मध यांबरोबर तूप, सोनें, गेरू; आंबट पदार्थांत ताक, चिंच व महाळुंग यांबरोबर रुपें; खारट पदार्थांत शिसें; कडू पदार्थांत कासें; तिखट पदार्थांत पित्त, मूत्र आणि बिब्बा, हे घातले, त्यांचे हे रस कसे ठरविले ? तर गोड म्हणजे केवळ साखरेसारखा जिभेला सुखविणारा अगर तिखट म्हणजे तिखटासारखा जिभेला झोंबणारा पदार्थ नव्हे, तर ज्यांचें पचन झाल्यावर आंतड्यांत आणि रक्तांत शमन करण्याचें अगर क्षोभ उत्पन्न करण्याचें कार्य होतें तेच अनुक्रमें गोड आणि तिखट पदार्थ म्हणून गणले गेले. पदार्थांचें पचन होतांना आंतड्यांत दोन परिणाम विशेषें व तिसरा क्वचित् अनुभवास येतो व ते म्हणजे **क्षोभक** आणि **शामक** व तिसरा **मध्यवर्ती**, आणि यांनाच अनुक्रमें तिखट, गोड आणि अम्लविपाक असें म्हणतात. आंबट पदार्थ आंतड्यांना झोंबणारे नसले तरी त्यांचें कार्य क्षोभक होतें म्हणून ते मध्यवर्ती होत. तथापि रक्तांत दोनच प्रकार अनुभविण्यास मिळणार म्हणून उष्ण आणि शीत असे दोनच वीर्यांचे प्रकार केले. रक्तावर जो परिणाम होणार तोच रक्ताचें रूपान्तर पुढें सतधातूंत झाल्यामुळें त्यावरहि होणार.

तथापि एवढ्यानें पदार्थ पुरता कळत नाहीं. त्याची चव कळली, पचनानंतर त्यानें काय परिणाम केला अगर रक्तांतहि त्यानें काय फरक उत्पन्न केला हें कळलें, तरी तो अमुकच रोग घालवितो अगर निर्माण करतो हें कसें कळणार ! आणि हें कळल्याविना बाकी कितीहि गुण सांगितले तरी ते निरुपयोगीच. यासाठीं **प्रभाव** हा चवथा गुणभाग सांगितला आणि हाच अत्यंत महत्त्वाचा. यांतच पदार्थांचे सर्व गुण केंद्रीभूत झाले असून आयुर्वेदीयांनीं औषधांचे गुणधर्म कसे ठरविले याचें कोडें याचाच विचार केल्यानें उलगडणार आहे.

चरकानें आपल्या संहितेच्या आरंभीं पदार्थांच्या वृद्धीचें तत्त्व सांगतांना

**सर्वदा सर्वभावानां सामान्यं वृद्धिकारणम् ।**

( Like begets like ) ( च. सू. अ. १ )

म्हणजे ज्या पदार्थाची वाढ करावयाची त्याच्याशीं त्याचा सजातीय पदार्थ संयुक्त झाला तर वाढ होते असें सांगितलें आहे, आणि हेंच तत्त्व शरीरालाहि लागू पडणार. प्रत्यक्षच पदार्थानें पदार्थाची वाढ तर होतेच, जसें,

**न हि मांससमं किंचिदन्यद्देहबृहत्वकृत् ।**
**मांसादमांसं मांसेन संभृतत्वाद्विशेषतः ॥**

( वा. सू. अ. १४. )

त्याचप्रमाणें या तत्त्वानुसार सजातीय पदार्थ म्हणजे तुपानें शुक्रधातूची वाढ, कुक्कुटांडांनीं गर्भाची वाढ हीं तितकींच सजातीय उदाहरणें होत. अतिसारांत आंत्रभागहि निघून जातात तेव्हां द्यावयास सांगितलेला बकऱ्याचा आंत्र-रस याच तत्त्वाचा निदर्शक आहे. समान समानाची वृद्धि करतो तशी समान पदार्थ समान पदार्थांतील क्रियाहि वाढवितात अगर कमी करतात आणि याच दृष्टीनें पुष्कळ औषधी पदार्थ उपयोगांत आणले आहेत. ( १ ) ग्रंथिविनाशनासाठीं गांठीपिंपळमूळ, गुग्गुळ, आंबेहळद; ( २ ) छातींतील कफावर कोरफडीचा रस; ( २ ) आमवातांतील संधिगत आमावर गुग्गुळ; ( ४ ) प्रमेह आणि मधुमेह यांवर शिलाजत्; ( ५ ) गंडमाळेवर अमरकंद; ( ६ ) देवीवर उंबराच्या पानावरचे फोड; ( ७ ) प्रदरादिकांतील रक्तस्रावावर लाजाळू; ( ८ ) गुळवेलीचें रसायनकार्य; ( ९ ) गलगंडावर गोरखमुंडी; ( १० ) माक्याचा अम्लपित्तनाशक उपयोग; ( ११ ) मृगशृंगांचा अस्थिवर्धक म्हणून उपयोग; ( १२ ) हाडसांधीचा अस्थिभंगावर उपयोग; वगैरे कित्येक उदाहरणांनीं पदार्थांच्या प्रभावी गुणाला सजातीयत्व कारण आहे हें दाखवितां येईल. मग हें सजातीयत्व पदार्थापदार्थांचें असो कीं पदार्थांच्या एका अंगाशीं मूळ विकृत अंगाचें असो, रोगी भागांतील निरोगी क्रियांशीं औषधीपदार्थांच्या उत्पत्तीस्थितींतील क्रिया समान असोत अगर शरीरभागाचें आकारमान औषधीच्या आकारमानाशीं समान

असो. 'सामान्यमेकत्वकरम्।' हा अगदीं निराबाध सिद्धान्त असून अखिल सृष्टिजात याच तत्त्वाप्रमाणें वृद्धिंगत होते. याचेच उलट 'विशेषस्तु पृथक्त्वकृत्' म्हणजे असामान्य–निराळेपणा–क्षय निर्माण करतो हाहि तितकाच निरपवाद सिद्धान्त आहे. शरीरांतील जे पदार्थ प्रमाणाबाहेर वाढले असतील त्यांचें कर्शन करण्यासाठीं–लंघनासाठीं–जे पदार्थ द्यावयाचे त्यांत 'विशेषस्तु पृथक्त्वकृत्' अगर मागील–

सर्वदा सर्वभावानां सामान्यं वृद्धिकारणम्। या सूत्राचें पुढचें अर्धचरण
ह्रासहेतुर्विशेषस्तु......॥ (च. सू. अ. १)

त्यांत हें लंघनाचें तत्त्व आहे. बृंहण आणि लंघन अगर वृद्धि आणि क्षय हींच चिकित्सेचीं मुख्य दोन तत्त्वें आहेत. मग ती वाढ अगर क्षीणता शरीराच्या सप्तधातूंत असो, तीन दोषांत असो अगर तीन मलांत असो. पण एकाची वाढ कीं दुसऱ्याचा क्षय हा त्रिदोषांत प्रकार असल्यामुळें (कारण एकमेक परस्परविरुद्ध गुणांचे आहेत) कोणाचीहि वाढ अगर क्षय होवो त्यांत वैषम्यच यावयाचें आणि त्रिदोषांच्या विषम स्थितींतच सप्तधातु बिघडून रोग व्हावयाचे म्हणून

रोगस्तु दोषवैषम्यं दोषसाम्यमरोगता। (वा. सू. अ. १)

असा सिद्धान्त प्रस्थापित केला गेला. हें वैषम्य घालविणें हें चिकित्सेचें ध्येय असल्यामुळें औषधी पदार्थ याच वैषम्याच्या नाशकत्वावर वापरले गेले.

प्रभावाचा अधिक खोल विचार अनेक उदाहरणें घेऊन केल्यास पृथक्करणाचे पद्धतीचे अभावींहि आयुर्वेदीयांनीं केवळ सूक्ष्म अवलोकनानें सृष्टीचे नियम हेरून त्यांवरच पदार्थांचे गुणधर्म अनुमानले व मगच त्यांनीं औषधें रोग्यांवर वापरलीं हें ध्यानीं येईल. रोगीपरत्वें प्रमाण, कल्प इत्यादिमध्यें फरक पडला तो अर्थात् अनुभवानेंच ठरवावा लागला, पण आरंभींचें प्रेरकत्व अनुभवाकडे मुळींच नव्हतें. पृथक्करणानें पदार्थांतील मूळ द्रव्यें काय आहेत हीं समजलीं तरी जोंपर्यंत समपदार्थान्वित द्रव्यांचे गुणधर्म निरनिराळे अनुभवास येतात

तोंपर्यंत पृथक्करणाची पद्धति अपुरीच राहणार. निसर्गाच्या नियमांचें सूक्ष्म अवलोकन करून त्यांच्या प्रेरणेनें पदार्थांचे गुणधर्म काय, अगर शरीर-व्यापारांचीं तत्त्वें काय, ठरविणें हेंच अधिक शास्त्रशुद्ध असून आयुर्वेदानें तेंच केलें हेंच आयुर्वेदाचें वैशिष्ट्य होय.

---

# चित्रकला

लेखक : कृष्णाजी रघुनाथ केतकर, ए. एम्., मुंबई.

[ यांचा जन्म १८९३ सालीं सुधागड तालुक्यांत झाला. थोड्या इंग्लिश शिक्षणानंतर त्यांनीं मुंबईच्या आर्ट स्कूलमध्यें चौदा वर्षें अध्ययन करून या कालांत अनेक शिष्यवृत्त्या व बक्षिसें मिळविलीं. शेवटचें मेयो मेडलहि यांनाच मिळालें. सन १९१७ सालीं या शिक्षणक्रमांतील शेवटची '**आर्ट मास्टर**'ची परीक्षा ते उत्तीर्ण झाले. " दि केतकर्स आर्ट इन्स्टिट्यूट " या संस्थेचे ते संस्थापक आहेत. स्वदेशांत व परदेशांत भरणाऱ्या प्रदर्शनांमधून यांना पारितोषिकें मिळालीं आहेत. संगीताचाहि यानीं अभ्यास केला आहे.]

या जगतांत जे चल-अचल, व्यक्त-अव्यक्त पदार्थ किंबहुना मूर्त-अमूर्त



कल्पना यांचें ज्यांत यथार्थ स्वरूप दाखविलें जातें त्याला **चित्र** असें म्हणतात.

कोणत्याहि वस्तूच्या सर्व बाजूंचा अनुभव आणून देणें, हा कलेचा हेतु होय. नुसत्या डोळ्यांनींच चित्राचा अनुभव येतो असें नसून स्पर्शालाहि त्याचा अनुभव येऊन त्यावरून तें कशाचें चित्र आहे हें सांगतां आलें पाहिजे. असें चित्र कोरून, कातरून, खोदून किंवा रंगवून तयार करण्याचें जें शास्त्र त्यास **चित्रकला** असें म्हणतात.

अतिशय प्राचीन काळीं, म्हणजे ज्या वेळीं आर्य लोक अगदीं रानटी स्थितींत राहत होते, ज्या वेळीं संस्कृत, देवनागरी, द्राविडी वगैरे भाषा

अस्तित्वांत नव्हत्या अशा वेळींसुद्धां चित्रकला प्रचारांत होती. इतकेंच नव्हे तर भाषेचें काम चित्रकलेच्या साहाय्यानें होत होतें, असें एकंदर मागील इतिहासावरून धोरण बांधल्यास तें अस्थानीं होणार नाहीं. हल्लीं प्रचारांत असलेल्या भाषा व प्राचीन भाषा यांमधील अक्षरांची कल्पना चित्रांपासूनच निघालेली आहे. उदाहरणार्थ ॐ हें चित्र निर्गुण, निराकार असें जें ब्रह्म (ईश्वर), त्याचें निदर्शक होय. त्या चित्रापासून जसें अ हें अक्षर झालेलें आहे, तसें कमलाच्या चित्रापासून क हें अक्षर झालेलें दिसतें. याचप्रमाणें प्रत्येक अक्षर एकेका विवक्षित चित्रापासून झालेलें असावें. अशा रीतीनें ( लिपी ) अक्षरें होऊन त्यांच्यापासून झालेल्या भाषांच्या मातृपदाचा मान चित्रकलेकडेच द्यावा लागतो.

"Art is the mother of all industries." अशी इंग्रजींत एक म्हण आहे. यावरून उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें विचार केल्यासहि मातृपदाचा मान या कलेला मिळतो. पुराणांत चौदा विद्या व चौसष्ठ कला यांचा उल्लेख आहे. याचें कारण असें दिसतें कीं, त्या काळीं कलाकौशल्याकडेच लोकांची प्रवृत्ति जास्त होती. अजिंठा, कार्ला, बदामी, बाग, वेरूळ, वगैरे लेणीं हीं त्या वेळीं शिल्पकला व चित्रकला किती उच्च स्थानाला पोहोंचल्या होत्या याची सत्यता पटविण्यास समर्थ आहेत. दुसरें उदाहरण म्हणजे, उषा व चित्रलेखा यांचें. ही कथा सर्व आबालवृद्धांस माहित आहे. आपली सखी उषादेवी हिनें स्वप्नांत पाहिलेली मूर्ति कोणाची हें समजण्याकरितां सर्व देवांचीं हुबेहुब चित्रें क्रमवार काढित असतां अनिरुद्धाची मूर्ती जेव्हां चित्रलेखेनें काढली त्या वेळीं उषादेवीनें हीच ती रम्य मूर्ति असें तिला सांगितलें. अशा रीतीनें अनिरुद्धावरच उषेचें मन बसलें आहे असें कळतांच उषादेवीच्या पित्याची काळजी दूर झाली.

यावरून पाहतां स्त्रियांनासुद्धां त्या वेळीं चित्रकलेचें उत्तम ज्ञान होतें. आजच्या सुधारलेल्या राष्ट्रांतील सुशिक्षित लोकांच्या दृष्टीनें पूर्वीच्या अशिक्षित लोकांनासुद्धां ज्या कलेचें अत्यंत महत्त्व वाटत होतें, किंबहुना ज्या कलेशिवाय त्यांचें चालत नव्हतें ती ही चित्रकला खरोखरी अत्यंत महत्त्वाची आहे आणि म्हणूनच त्या काळच्या सर्व स्त्री-पुरुषांना या कलेचा अभ्यास केला. अशा रीतीनें जी कला एके काळीं इतक्या उच्चतेला पोहोंचली

होती तिचा ऱ्हास कसा आणि केव्हां झाला असावा, असा साहजिकच प्रश्न उभा राहतो. वास्तविक रीतीनें ती कला आज कितीतरी पटींनीं अधिक पुढें जावयास पाहिजे होती; परंतु आज उलट ती कितीतरी पटींनीं खालीं आलेली दिसत आहे. आज आम्हांस फक्त "वडिलांची कीर्ति सांगून पढतमूर्खपणा" पदरीं घ्यावा लागत आहे, याचें कारण काय?

मध्यंतरीं अज्ञानयुगाच्या काळांत अनेक प्रकारच्या अडचणींमुळें कला-कौशल्य व शास्त्रें यांची अवनति झाली. अवनति होण्यास कारण असें असावें कीं, ज्या वेळीं ही कला पूर्णत्वास पोहोंचली होती, त्या वेळीं त्या कलेसंबंधीं उपलब्ध असलेली माहिती व्यवस्थित रीतीनें ग्रथित केली असती तर त्या माहितीचा उपयोग वंशपरंपरेनें पुढें झाला असता. परंतु आपणांस आजही अशीं उदाहरणें पहावयास मिळतील कीं, एखादा गवई घ्या अगर एखादा उत्तम वैद्य घ्या, त्याला अवगत असलेली विद्या त्याच्याबरोबरच लय पावते. कारण आपणांस अवगत असलेली विद्या दुसऱ्यास दिल्यास आपलें महत्त्व कमी होईल अशा मनाच्या कोतेपणामुळें ती विद्या दुसऱ्यास देण्याची इच्छा होत नाहीं. मग स्वतः ग्रथित करून प्रसिद्ध करण्याची गोष्ट तर बाजूसच राहो. 'बुद्धिः कर्मानुसारिणी' या न्यायानें ज्या वेळीं राष्ट्राची भरभराट होते त्या वेळीं कलेचीहि भरभराट होते. परंतु धनिक लोक धनाच्या मदानें धुंद झाल्यावर त्यांना पुढचामागचा विचार करण्याचें भान रहात नाहीं. केवळ आम्ही श्रीमंत आहोंत, अर्थात् आम्हांला काय कमी आहे, या झोकांत ते राहतात. परंतु त्यांच्याच वंशांतील पुढील पिढीस आपल्या पूर्वीच्या श्रीमंतीचें वर्णन करण्याची वेळ आलेलीं शेकडों नव्हे हजारों उदाहरणें आपण प्रत्यहीं पहात आहों. तद्वतच प्राचीन कारागीर लोक कलेच्या श्रीमंतीनें धुंद झालेले होते. त्यांनीं पुढच्या पिढ्यांकरितां कांहीं मार्ग आंखून ठेवलेले नव्हते. त्यामुळें आज आम्हांस प्रत्येक कलेच्या बाबतींत परक्याकडे पाहण्याची वेळ आलेली आहे. कारागिरानें कलेकडे दुर्लक्ष केलें, म्हणजे धंद्यास मंदी येऊं लागते. धंदे मंदावले, म्हणजे बेकारी फैलावते. त्यामुळें राजाश्रय कमी होतो. अशा रीतीनें सर्वांस उतरती कळा लागते आणि देश अवनतीला जातो. त्याच्या उलट पाश्चात्यांनीं एखादा शोध लावला कीं, त्या शोधाविषयीं प्रथमपासून उत्पन्न होत असलेल्या

आपत्ति व त्यांतून निघण्याचे मार्ग हे ग्रथित केले असल्यामुळें त्या आपत्तींतून चांगल्या रीतीनें त्यांना सुटून जातां येतें. याचप्रमाणें तेथें ते ग्रंथ सर्वत्रांस पाहण्यास मिळणें ही गोष्ट सुलभ असल्यामुळें पाहिल्यावर ताण होईल अशी एकादी कल्पना अगर एकादा शोध लागण्याचा पूर्ण संभव असतो. अशा रीतीनें पाश्चात्यांमधील वरील गुण अत्यंत महत्त्वाचा असून अनुकरणीय आहे.

पुराणांत चौदा विद्या आणि चौसष्ठ कला असल्याचें आपण नेहमीं ऐकतों. परंतु त्या सर्वांत चित्रकला अथवा शिल्पकला ही श्रेष्ठ समजली पाहिजे. संगीत अथवा काव्य यापासून आबालवृद्ध, पशुपक्षी, यांनासुद्धां आनंद होतो. पण तो आनंद कायमचा नसून क्षणिक असतो. चित्रकलेची गोष्ट अगदीं निराळी आहे. चित्रकार अथवा शिल्पकार आपल्या कलेनें आपले विचार व आपल्या मनोभावना यांची प्रत्यक्ष रीतीनें कल्पना आणून देतो. आपल्या स्वतःबरोबर चित्र पहाणाऱ्यांपैकीं प्रत्येकास तो आनंदित करून टाकतो. केव्हांहि चित्र पाहिल्याबरोबर प्रेक्षकास त्या कालाची पूर्ण कल्पना येते. हजारों वर्षांपूर्वींच्या रीतीभाती, त्या कालांतील वाहनें, हत्यारें, वस्त्रें, अलंकार इत्यादि कल्पना केवळ चित्रकलेवरून आपणांस आजहि प्रत्यक्ष पहावयास मिळत आहेत. निरनिराळ्या पदार्थसंग्रहांत जाऊन पाहिल्यास जुन्या काळांतील माहितीचीं दृश्यें पहावयास मिळतील.

सर्वांसच चित्रकार होणें शक्य नाहीं. कारण प्रत्येकास एकाच चित्रकलेची आवड असणें शक्य नसतें. तरीपण प्रत्येकास त्या कलेची माहिती थोड्याबहुत प्रमाणानें असणें अत्यंत अगत्याचें आहे; व याच कल्पनेनें हल्लींच्या शिक्षण-क्रमांत चित्रकलेचा समावेश केलेला आहे. हल्लींच्या सुधारलेल्या उपकरणांच्या साहाय्यानें शिक्षण दिल्यास या कलेची आवड प्रत्येकास थोड्याबहुत प्रमाणानें उत्पन्न होईलच होईल. कलाकौशल्याच्या आवडीपासून सौंदर्य आणि शुद्ध आनंद यांचा लाभ होईल. ज्याच्या ठिकाणीं चित्रकलेविषयीं आवड आहे त्याला सृष्टिसौंदर्याबद्दल प्रेम वाटेल. सृष्टिसौंदर्याबद्दल प्रेम वाढल्यावर जिनें ही सृष्टि निर्माण केली त्या सर्वसाक्षी, सर्वव्यापी, सर्वकलानिधि अशा आदि-शक्तीबद्दल दृढ प्रेम उत्पन्न होऊन भक्तिभाव व अत्युच्च कल्पनांचा विकास होण्याचें ती एक उत्कृष्ट साधन आहे अशी खात्री होईल.

या कलेच्या अध्ययनानें शिक्षणदृष्ट्या महत्त्वाचे असे चार फायदे आहेत.

१. ज्या वस्तूचें चित्र काढावयाचें असेल त्या वस्तूचें निरीक्षण अगदीं बारकाईनें व झटकन् करावें लागतें. त्यामुळें निरीक्षणशक्तीला भरपूर वाव मिळून तिची वाढ होते.

२. स्मरणानें चित्र काढतांना ज्या वस्तूचें चित्र काढावयाचें असेल त्या वस्तूची लांबीरुंदी, तिचें प्रमाण, आकारमान, रंग, घाट वगैरे गोष्टींकडे चौकस दृष्टीनें निरीक्षण केल्याशिवाय त्या स्मरणांत रहात नाहींत. ग्रहणशक्ति, धारणाशक्ति व स्मरणशक्ति या तिन्ही शक्तींच्या क्रिया उत्तम रीतीनें झाल्याशिवाय स्मरणानें चित्र काढतां येणार नाहीं. म्हणून या कलेनें या तीन्ही शक्तींचा विकास होईल.

३. वर्णनाबरहुकूम चित्र काढणें म्हणजे कल्पनेनें चित्र काढणें. कल्पनाशक्तीनें चित्र काढतांना कल्पनाशक्तीबरोबर विचारशक्तीचाहि उपयोग करावा लागतो. कल्पनाशक्तीला विचारशक्तीच्या अनुरोधानें काम करावें लागतें. त्यामुळें विचारशक्तीची योग्य व हितकारक वाढ होते व कल्पनाशक्तीहि वाढते.

४. चित्रकलेनें सदभिरुची वाढून प्रत्येक तऱ्हेच्या उद्योगधंद्याला तिची बहुमोल मदत होते. त्याचप्रमाणें टापटीप, नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा वगैरे गुणांची वाढ होऊन चित्रकाराचा समाजांतील दर्जा वाढतो. उद्योगधंदे या दृष्टीनें विचार केल्यास या कलेला आज सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांनीं जो मातृपदाचा मान दिला आहे तो अगदीं योग्य आहे असेंच म्हणावें लागतें. या कलेचा उपयोग जसजसा अधिक केला जाईल तसतशी देशांतील उद्योगधंद्यांची अधिकाधिक भरभराट होत जाईल.

भक्तिमार्गाच्या दृष्टीनें विचार करणारास याहि कलेचा उपयोग योगसाधनाकडे करतां येईल. निर्गुण, निराकार अशा शक्तीचें आपल्या प्रेमळ भावनेप्रमाणें सगुण, साकार असें रूप काढून त्याच्या दर्शनसुखांत मग्न होतां येतें व त्यामुळें त्यास मनाची एकतानता करावयाची संवय लागते. या संवयीपासून पुढेंपुढें ज्याला समाधिसुख म्हणतात तें चित्रकारास मिळून त्या योगानें चित्-स्वरूपाची ओळख होते. अशा रीतीनें भक्तिमार्गानें जाणाऱ्या चित्रकारांनासुद्धां या कलेचा उपयोग परमसुखाचा होतो व मनाला खरी शांति मिळते.

अशा रीतीनें सर्व बाजूंनीं विचार केल्यास आपणांस आढळून येईल कीं, चित्रकला खरोखर जीवनाला अत्यंत आवश्यक म्हणजे आंधळ्याला काठीप्रमाणें उपयोगीं आहे. बालपणांत या कलेपासून कल्पना, ग्रहण, धारणा, विचार, सदभिरुचि, सौंदर्य वगैरे गुणांचा विकास होतो. तारुण्यांत या कलेचा उपयोग उद्योगधंद्यांकडे होऊन उद्योगांची भरभराट होते. उद्योगधंद्यांच्या भरभराटीबरोबर राष्ट्राची भरभराट होते. वृद्धपणीं या कलेचा उपयोग भक्तिमार्गाकडे करतां येतो व त्या योगानें ईश्वरदर्शनसुखाचा लाभ मिळून खरा आनंद व खरी शांति हीं मिळतात. अशा रीतीनें ही कला जन्मापासून सर्व कालीं व सर्व बाजूंनीं मनुष्यमात्राच्या उन्नतीला कारणीभूत होते आणि याच करितां ही कला अत्यंत महत्त्वाची होय.

---

# नीतिबोध

लेखिका : सौ. राधाबाई भिडे, अमळनेर.

[ यांचा जन्म १८९५ मध्यें पुणें येथें झाला. या कै. ग. स. खरे इंजिनिअर यांच्या कन्या असून अमळनेरचे वकील रा. गोविंद महादेव भिडे यांच्या पत्नी होत. त्यांचे कांहीं लेख मनोरंजनमध्यें प्रसिद्ध झाले आहेत. ]

## १. उद्योग

ज्याअर्थी गेलेले दिवस फिरून कधींहि परत येण्याची आशा नाहीं व पुढें येणारे तरी आपल्या वांट्यास येतीलच अशी कोणत्याहि प्रकारें खात्री देतां येत नाहीं, त्याअर्थी गेलेल्या वेळेबद्दल वृथा शोक करीत न बसतां अथवा पुढें येणाऱ्या वेळेवर फारसें अवलंबून न रहातां, आपल्या हातीं येणाऱ्या प्रत्येक क्षणाचा होईल तितक्या उत्तम रीतीन व्यय करण्याबद्दल खबरदारी घेणें, हेंच मनुष्याचें आद्य कर्तव्य होय. ( १ )

सध्यां चालला आहे हा क्षण आपला आहे. त्याच्यानंतर येणारा भवितव्यतेच्या आधीन असल्यामुळें अर्थात्च तो अनुकूल किंवा प्रतिकूल निघेल हें सांगतां येणें शक्य नाहीं. ( २

कोणतीहि गोष्ट करण्याचा आपला निर्धार झाला म्हणजे ती लागलीच करावयास लागावें. जें काम सकाळीं होण्यासारखें असेल तें करण्याचें संध्याकाळावर टाकूं नये. (३)

आळस हा गरज व दुःख यांचा जनक होय. परंतु शुद्ध अंतःकरणानें केलेल्या श्रमापासून होणारें सुख अनुपम आहे. (४)

त्याचप्रमाणें ऋद्धि आणि सिद्धि या उद्योगाच्या सहचारिणी होत व उद्योगतत्परता ही गरजेचा नाश करणारी आहे. (५)

जो आळसाला थारा देत नाहीं व त्याला शत्रूप्रमाणें समजतो, तोच खरा धन्य होय! त्याला संपत्ति, सत्ता व मान हीं सुलभ होतात. सर्व लोक त्याचा स्तुतिवाद गातात व राजदरबारांतहि त्याची मानमान्यता होते. तो सकाळीं लवकर उठतो व रात्रीं वेळेवर निजतो. तो सुचिंतनानें आपल्या मनास व कामाच्या योगानें आपल्या शरीरास व्यायाम देतो आणि तेणेंकरून दोघांचेंहि आरोग्य रक्षण करितो. (६)

उलटपक्षीं, आळशी मनुष्यास आपलें स्वतःचेंच ओझें वाटूं लागतें. त्याला कांहीं उद्योग नसल्यामुळें वेळ केव्हां जाईल असें होतें. त्याच्या शरीराला काम पाहिजे असतें, पण त्याचें मन तें करण्यास तयार नसतें. त्यामुळें त्याला काय करावें हें सुचत नाहींसें होतें व त्याचा वेळ केवळ इकडेतिकडे भटकण्यांत अथवा झोंपेंत व्यर्थ जातो. (७)

## २. विवेक

आपण कोण, ईश्वरानें आपणांस कशाकरितां उत्पन्न केलें आहे, येथील आपलें कर्तव्य काय, याचा आपल्या मनाशीं नेहमीं विचार करीत जावा. (१)

तसेंच, आपलें सामर्थ्य, आपल्या गरजा व आपली परिस्थिति यांचाहि स्वतःशीं नेहमीं चांगला विचार करीत जावा, म्हणजे जगांतील आपलीं वास्तविक कर्तव्यें कोणतीं याचा आपल्या मनावर चांगला प्रकाश पडतो व आपलीं तीं कर्तव्यें करण्यास कोणत्या मार्गाचा अवलंब करणें श्रेयस्कर होईल हें त्या योगानें आपल्यास कळूं लागतें. (२)

विचार करण्याची तिसरी व अत्यंत महत्त्वाची वेळ म्हटली म्हणजे आपल्या मनांतील हेतूस शब्दाचें अथवा कृतीचें स्वरूप देण्याच्या पूर्वीची होय. ही

वेळ फार नाजूक असते. आपल्या विचारास शब्दांचें व विशेषतः कृतीचें स्वरूप देतांना तर त्याची योग्यायोग्यता काय आहे, व त्यास तसें स्वरूप दिल्यास त्यापासून काय काय इष्ट व अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे, वगैरे गोष्टींचा अगदीं दूरवर व अत्यंत सूक्ष्म विचार केला पाहिजे. म्हणजे अपयश अथवा मानहानी सहन करण्याची पाळी येत नाहीं, अथवा पश्चात्ताप आणि दुःख यांसहि थारा मिळत नाहीं. (३)

उलटपक्षीं, अविचारी मनुष्याची जीभ त्याच्या ताब्यांत नसते. तो विचार न करितां वाटेल तें बोलतो व शेवटीं एखाद्या वेळीं आपल्याच मूर्खपणाच्या शब्दजालांत सांपडला जाऊन आपणच आपल्या पायावर धोंड पाडून घेतो. (४)

ज्याप्रमाणें एखादा मनुष्य कुंपणावरून घाईनें उडी मारावयास जातो व पूर्वीं न पाहिलेल्या कुंपणाच्या पलीकडे असलेल्या खड्ड्यांत पडतो, त्याचप्रमाणें एखाद्या गोष्टीपासून होणाऱ्या परिणामाकडे लक्ष न पोहोंचवितां तिला आरंभ करणाराची स्थिति होते. (५)

याकरितां विवेकाची कांस बळकट धरली म्हणजे तो आपणांस शहाणे करून व सत्याचा निर्भय मार्ग दाखवून शेवटीं निरंतर सुख व समाधान यांची प्राप्ती करून देईल. (६)

## ३. विनय

हें नेहमीं ध्यानांत ठेवावें कीं, कितीहि झालें तरी आपण यःकश्चित् मानव! सर्वस्वीं पूर्णतेस पोहोंचणें आपल्याला कधींहि शक्य नाहीं. करितां आपल्यास आपल्या सत्तेचा, शहाणपणाचा व कर्तृत्वशक्तीचा गर्व मनांत बाळगण्यास कोणत्याहि प्रकारें अधिकार नाहीं. (१)

आपलें अज्ञान आपणांस कळूं लागणें ही शहाणपणाची पहिली पायरी होय! आणि लोकांनीं आपणांस शहाणें म्हणावें अशी जर इच्छा असेल तर अगोदर स्वतःला शहाणा समजण्याचें वेड काढून टाकावें! ही गोष्ट प्रतिक्रियेप्रमाणें आहे. स्वतःला अज्ञानी समजून निरभिमान वृत्तीनें राहणारास लोक खरा शहाणा समजून त्याची मानमान्यता खचित वाढवितील. (२)

# सुवेझ कालवा कंपनीचा कारभार

लेखक : रावसाहेब अनंत रामचंद्र जोशी, बी. ए., एल्एल्. बी.

[ यांचा जन्म १८८४ जूनमध्यें पेण, जि. कुलाबा, येथें झाला. त्यांची प्रवेश-परीक्षा तेथील हायस्कूलमधून होऊन पुढील अभ्यासक्रम पुणें येथील फर्ग्यूसन कॉलेजांत झाला. १९०५ सालीं त्यांची एलएल. बी.ची परीक्षा उतरली. भोर संस्थानांत मुन्सफीच्या जागेवर त्यांची प्रथम नेमणूक होऊन पुढें ते न्यायमंत्री पदापर्यंत चढत गेले. भाटघर धरणासंबंधींच्या त्यांच्या कामगिरीदाखल त्यांनीं जून १९२९ मध्यें सरकारांतून रावसाहेब हा किताब मिळाला. भोरच्या अधिपतींसमवेत त्यांनीं १९३० सालीं विलायतचा प्रवास केला. नुकतेच ते सेवानिवृत्त होऊन संस्थानचे पेन्शनर झाले आहेत. ]

आशिया व युरोप हीं खंडें एकमेकांस शेंकडों मैलांपर्यंत लागलेलीं असून आशियाचे मानानें युरोपखंड बरेंच लहान आहे. यामुळें हीं दोन्ही खंडें वेगळीं नसून युरोप हा आशिया खंडाचाच एक वायव्य दिशेच्या अनुरोधानें पुढें गेलेला भाग आहे, असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. हे लोक या संयुक्त-खंडास युरेशिया या नांवानें संबोधतात. हें युरेशिया खंड सुमारें ७० वर्षां-पूर्वींपर्यंत आफ्रिका खंडाशीं सुवेझच्या संयोगी भूमीमुळें सलग्न झालेलें होतें. परंतु धाडशी व कल्पक फ्रेंच एंजिनिअर फर्डिनण्ड डी लेसेप् या विख्यात महापुरुषानें सुवेझची संयोगभूमी खणून काढून तेथें प्रचंड कालवा तयार केला आणि त्यायोगानें ईश्वरनिर्मित असलेल्या भूभागांचा संयोग एकादें जोडफळ सुरीनें दुभंगून टाकावें त्याप्रमाणें कृत्रिम योजनेनें विलग केला. लेसेप्च्या करणीनें भूमध्यसमुद्रांतून तांबड्या समुद्रांत येण्यासाठीं सुलभ असा जलमार्ग खुला झाला. आणि दर्यावर्दी लोकांस युरोपांतील पश्चिमे-कडील देशांतून पूर्वेकडच्या हिंदुस्थान वगैरे देशांकडे यावयाचें झालें तर केप ऑफ गुड होपला वळसा घालून जें फार दूरचे मार्गानें यावें लागे तो त्रास वाचला, हें जरी आतां सर्वांस माहित झालेलें आहे, तथापि लेसेप्च्या या साहसाचा इतिहासहि फार मनोरंजक व बोधप्रद असल्यामुळें तो येथें थोडक्यांत देण्याचें योजिलें आहे.

भूमध्यसमुद्र व तांबडा समुद्र यांस जोडणारा हा कालवा बांधण्याची कल्पना फार पुरातन काळची आहे. सुवेझपासून नाइल नदीपर्यंत एक कालवा इजिप्तच्या ख्रिस्तपूर्व काळांतील राजांनीं बांधीत आणला होता, व तो इराणच्या दरायस नामक राजानें पुराहि केला होता. परंतु पुढें ख्रिस्ती सनाच्या नवव्या शतकांत खलीप अलमनसूर याचे हुकुमानें हा कालवा बुजवण्यांत आला. प्रस्तुतच्या कालव्याचें पश्चिम तीरावरील पोर्ट ट्यूफिक आणि कडू सरोवरें यांच्या दरम्यानच्या भागांत कोठेंहि सुमारें अर्धा तास आंत चालत गेलें असतां सदर कालव्याचे अवशेष अद्यापहि दृष्टीस पडतात. त्याप्रमाणें हा प्राचीन कालवा जरी नष्ट झाला तरी हिरोडोटस् याच्या लेखांत त्याचा उल्लेख आहे. केप ऑफ गुड होपचा सलग जलमार्ग सांपडल्यापासून व्हेनिस वगैरे शहरांच्या पूर्वेकडील व्यापारास बराच धक्का बसला; व त्यामुळें तेव्हांपासून हा नजिकचा मार्ग पुनः सुरू करण्याबद्दलचा विचार, व्यापारविषयक नुकसान झालेल्या लोकांच्या अगर त्यांच्याविषयीं सहानुभूति वाटत असलेल्या लोकांच्या डोक्यांत नेहमीं घोळत असे. तसेंच पूर्वेकडील सुवर्णभूमीसंबंधींच्या ऐश्वर्याच्या हकीकती ज्या राजकीय महत्त्वाकांक्षी लोकांना अवगत होत्या, त्यांचेहि डोक्यांत इजिप्त देश जिंकून घेऊन व तेथील कालव्याचा पुनरुद्धार करून अगर तत्सम एखादी नवीन योजना करून पूर्वेकडील देशांशीं दळणवळणाचा मार्ग सुलभ करावा आणि आपल्या राजकीय सत्तेचा शक्य असेल तेथें प्रसार करावा अशा कल्पना येऊन जात. विशेषतः फ्रान्स देशच्या चवदाव्या लुईसारख्या महात्त्वाकांक्षी राजाच्या वेळेपासून फ्रेंच मुत्सद्यांचे मनांत हे बेत तज्ज्ञ लोक भरून देत असत. या कारणानेंच नेपोलियननें ती कल्पना उचलून अठरावे शतकाचे अखेरीस इजिप्त देशावर स्वारी केली आणि या कालव्याच्या योजनेबद्दल आपला अभिप्राय देण्यासाठीं एक कमिशनहि लेसेप् यांचे अध्यक्षतेखालीं नेमलें. तांबडा समुद्र व भूमध्यसमुद्र यांचे सपाटींमध्यें अंतर आहे, अशी त्या कमिशनची समजूत झाली होती. तथापि, सदर कमिशननें कालव्याचे योजनेबद्दल एकंदरीनें अनुकूल अभिप्राय व्यक्त केला. परंतु पुढें इजिप्तमधील फ्रेंच सत्तेस उतरती कळा लागल्यानें या योजनेचें काम तितकेंच राहिलें.

यानंतर सुमारें ३० वर्षांनीं कलकत्ता येथील वाघॉर्न नांवाच्या एका तरुण ब्रिटिश अधिकाऱ्यानें हा प्रश्न थोड्या निराळ्या दृष्टीनें हातीं घेतला. अलेक्झांड्रा ते केरो आणि केरो ते सुवेझ एवढ्या पुरतें खुषकीच्या मार्गाचें अवलंबन करून युरोपचें टपाल किंवा तिकडील उतारू भूमध्यसमुद्रांतून तांबड्या समुद्रांत आणून नंतर एडन, मुंबईकडे रवाना करण्याची योजना केप ऑफ गुड होप या लांबच्या मार्गापेक्षां थोडके दिवसांत व थोडके खर्चांत होण्यासारखी आहे, हें त्यानें प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविलें; परंतु त्याची योजना कोणींच हातीं धरली नाहीं व तो दारिद्र्यांतच मरण पावला. पुढें आणखी दहा वर्षांनीं पी. अॅण्ड ओ. कंपनीनें हा वाघॉर्न-रस्ता लोकप्रिय केला व ब्रिटिश सरकारनें अलेक्झांड्रा-पासून केरोमार्गें सुवेझपर्यंत रेल्वे बांधण्याची सवलतही इजिप्तचे खेदिवा-कडून मिळविली. याप्रमाणें या रस्त्यानें उतारूंची व टपालाची सोय चांगली झाली, तरी मालाची मोठ्या प्रमाणावर नेआण करण्याच्या कामीं या रस्त्याचा फारसा उपयोग होत नव्हता; पण त्यामुळें कालव्याची योजना करण्याचें काम मागें पडलें नाहीं. ही कल्पना मूळ फ्रेंचांची असल्यामुळें व तीवर त्यांनीं बरे परिश्रम केलेले असल्यामुळें त्यांनीं या प्रश्नाचा पिच्छा केव्हांच सोडला नाहीं. अखेर फर्डिनंड डी लेसेप नांवाच्या फ्रेंच परराष्ट्रीय वकिलास या कामीं यश मिळालें. 'शेंडी तुटो कीं पारंबी तुटो' अशा चिकाटीनें त्यानें या योजने संबंधीं खटपट केली आणि शेवटीं त्यास या कामीं अप्रतीम यश लाभलें. सदर योजनेचा सर्व बाजूंनीं विचार करून सुवेझ कालव्याकरितां सन १८५४ सालीं फर्डिनंड यास महमद सय्यद पाशा याचेकडून प्रथम सवलती मिळाल्या. सन १८५८ सालीं त्यानें या कार्याकरितां कंपनी काढली व सन १८५९ चे एप्रिलच्या २५ तारखेस पाया खणण्यास सुरुवातहि केली. नंतर सन १८६९ च्या नवंबर महिन्याचे १७ वे तारखेस दरम्यानच्या छाती दडपून टाकण्यासारख्या अनेक अडचणींचें निराकरण होऊन कालव्याचा प्रवेशसमारंभ झाला. कंपनी २५ वर्षें यशस्वी रीतीनें चाललेली पाहिल्यावर सन १८९५ सालीं फर्डिनंड हा मरण पावला. अशा प्रकारची प्रचंड कल्पना काढण्यापासून तों ती तडीस जाऊन पाव शतकापर्यंत अव्याहतपणें चाललेली पहाण्याचें अपूर्व श फारच थोड्या लोकांच्या वांट्यास येतें. पोर्टसय्यद येथें फर्डिनंडचा भव्य

पुतळा त्याच्या बुद्धिसामर्थ्याचें स्मारक म्हणून कालव्याचे काठीं उभारलेला आहे, तो पाहिला असतां वरील सर्व इतिहास एकदम मनश्चक्षूंपुढें उभा रहातो व परमेश्वरी लीलेचें कौतुक वाटतें. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याचे सुमारास इंग्रजांचें हिंदुस्थानांत मोठें साम्राज्य स्थापन झालें असल्यामुळें असा कालवा झाल्यास त्याचा फार फायदा होण्यासारखा होता. या कारणानें इंग्रजांची मदत मिळेल अशी फर्डिनंड यास साहजिकच मोठी आशा होती. परंतु जिकडून आशा करावी तिकडून निराशा होते आणि जेथें बिलकूल आशा नसावी तेथून अकल्पित पाठिंबा मिळतो असा जो चमत्कार जगांतील व्यवहारांत कित्येक वेळां दृष्टीस पडतो तसाच अनुभव फर्डिनंड यास आला.

ब्रिटिश सरकारनें फर्डिनंडचे योजनेस शक्य तितका विरोध केला; व तसा विरोध आपण करूं असें फर्डिनंड यास त्यांचेकडून स्पष्ट बजावण्यांत आलें. त्या वेळीं लॉर्ड पामर्स्टन हे मुख्य प्रधान होते. सुवेझ कालव्याची कल्पना ही एक असंभाव्य गोष्ट असून यदाकदाचित् ती संभवनीय झाली तरी तीपासून नफा तर बिलकूल होणार नाहीं असें त्यांचें ठाम मत बनलें होतें. त्यामुळें साउथ सी बबल कंपनीप्रमाणेंच ही योजना मृगजलाप्रमाणें लोकांची दिशाभूल करणारी, किंबहुना ती एक भयंकर खड्डयासारखी असून तिच्यामुळें साधेभोळे लोक शेअर घेऊन फसतील असें त्यांनीं स्पष्ट बोलूनहि दाखविण्यास कमी केलें नाहीं. सुवेझचा कालवा तयार झाल्यावर पूर्वेकडील ब्रिटिश साम्राज्यास धोका पोहोंचेल अशीहि त्या वेळीं इंग्रज मुत्सद्यांची समज झाली. तथापि, या विरोधामुळें फर्डिनंड बिलकूल डगमगला नाहीं. त्यानें पांचशें फ्रँक्सचा एक भाग याप्रमाणें चार लक्ष भागांची एक कंपनी उभारली. परंतु लॉर्ड पामर्स्टन यांचे इषाऱ्यामुळें इंग्लंड अगर युनायटेड स्टेटस् या देशामधून फर्डिनंडचे सुवेझ कॅनॉल कंपनीच्या एकहि भागास मागणी आली नाहीं. सुमारें निम्याहून थोडे अधिक इतके भाग फ्रान्समध्यें खपले. परंतु सय्यद पाशा यानें बाकीचे सर्व भाग खरेदी करण्यास पुढें येऊन फर्डिनंडचें काम चालू करून दिलें.

यानंतरही फर्डिनंडचे मार्गांत कायदेशीर भांडणांच्या, मजुरांच्या पुरवठ्याच्या वगैरे बाबतींत अनेक अडचणी आल्या; परंतु त्या सर्व छातीठोकपणानें निवारण करून सुमारें दहा वर्षांत कालव्याचें काम त्यानें पुरें केलें आणि फ्रान्सची

महाराणी यूजन हिच्या हस्तें कालव्याचा उद्घाटनसमारंभ सन १८६९ चे नवंबर महिन्यांत होऊन निरनिराळ्या राष्ट्रांचीं ६८ जहाजें नवीन कालव्यांतून तांबड्या समुद्रांत गेलीं.

इतकें प्रत्यक्ष पाहिल्यावर इंग्रज लोकांचा विरोध कमी पडला; कालव्याच्या उद्घाटनसमारंभाचे वेळीं त्यांनींहि यशःचिंतनपर संदेश पाठविला. इतकेंच नव्हे, तर त्यांचीं शेंकडोंशें गलबतें कालव्यांतून जाऊं येऊं लागलीं. सन १८७० चे जूनमध्यें फर्डिनंडला बोलावून त्यांनीं त्यास 'फ्रीडम् ऑफ दि सिटी ऑफ लंडन' हा बहुमान मोठ्या सन्मानपूर्वक अर्पण केला. याप्रमाणें फ्रेंचांच्या पिढ्यानूपिढ्यांचें व फर्डिनंडच्या तरुणपणचें स्वप्न सत्य सृष्टींत आलें. तथापि विशेष लक्षांत ठेवण्यासारखी ही गोष्ट कीं, ब्रिटिश सरकारनें आपलें टपाल या रस्त्यानें पाठविण्याची तजवीज कालवा होऊन गेल्यावरहि वीस वर्षांपर्यंत करण्याचें मनांत आणलें नाहीं. त्यावरून माणसाचा जात्या जो गुणस्वभाव असेल त्यासच तो चिकटून राहतो त्याचें हें आणखी एक प्रत्यंतर सांपडतें.

यानंतरचीं पांच वर्षें अडचणींतच गेलीं. सांपत्तिक दृष्ट्या प्रथम प्रथम हा कालवा किफ़ायतशीर होईना. त्याच्या दुरुस्तीस हमेश खर्च करावा लागे. व्यापारावर कालव्यांतील वाहतुकीचें प्रमाण काय असावें वगैरे कटकटी मिटविण्यांत बराच काळ गेला. परंतु अखेर कंपनी चांगलीच फायदेशीर होऊं लागली व त्याचें प्रमुख कारण वाफेच्या इंजिनांतील सुधारणा हें झालें.

इतक्यांत खेदिवाची सांपत्तिक स्थिति खालावली आणि त्यानें आपले शेअर विक्रीस काढले. ही बातमी अचानक रीतीनें त्या वेळचे इंग्लंडचे मुख्य प्रधान डिझरायली यांस १५ नोव्हेंबर १८७५ रोजीं समजली. लागलीच लंडन व केरो यांमधील तारायंत्र हलूं लागलें. लवकरच केरो येथील ब्रिटिश वकिलानें हा सौदा इंग्रजी राष्ट्रातर्फे जुळवून आणला; आणि २६ नोव्हेंबर रोजीं प्रत्यक्ष शेअर केरोचे ब्रिटिश वकिलातींत येऊन पडले. एवढा मोठा व्यवहार जुळवून आणण्याचे बाबतींत पार्लमेंटची संमति घेण्यासहि अवसर सांपडला नाहीं. खेदिवाचे १,७६,६०२ शेअर चाळीस लक्ष पौंडांस विकत घेण्यांत आले. तथापि ही गोष्ट बाहेर समजतांच परकीय राष्ट्रांकडून

जिकडूनतिकडून डिझरायलीवर अभिनंदनपर तारांचा वर्षाव झाला. व त्याचा हा मुत्सद्देगिरीचा डाव सर्व इंग्रज राष्ट्रासहि संमत झाला. लॉर्ड पामर्स्टननें केलेली चूक पंधरा वर्षांनंतर अशा प्रकारें दुरुस्त झाली. या शेअरांपासून ब्रिटिश खजिन्यास व्याज व शेअर्सवरील नफा मिळून भली मोठी रक्कम दरसाल मिळते आणि कंपनीच्या डायरेक्टरांचे बोर्डांत इंग्रजांचे दहा प्रतिनिधी घेतले जातात. हल्लीं या भागांची किंमत सुमारें अडीचशें लक्ष पौंड होत आहे.

सन १८८२ सालीं या सुवेझ कालव्यामधून पन्नास लक्ष टन मालाचीं गलबतें गेलीं. परंतु सन १९२५ सालीं हाच व्यापार एकशेंसाठ लक्ष टनांपर्यंत वाढला. यांतील जवळजवळ शेंकडा साठ टक्के व्यापार ब्रिटिश जहाजांचा आहे.

सदरची सुवेझ कंपनी ईजिप्तचे कायद्याप्रमाणें ईजिप्शियन कंपनी म्हणून नोंदलेली आहे. हिची मुख्य कचेरी पॅरिस येथें रुद अस्टॉर या विभागामध्यें आहे. या कंपनीचा अध्यक्ष फ्रेंचमन असावा लागतो. तसेंच डायरेक्टर बोर्डांतील वीस डायरेक्टर आणि कंपनीचें सेक्रेटरीयट व इतर ऑफिसें यांतील नोकर व अधिकारी बहुतेक सर्व फ्रेंच लोकच असतात. हॉलंडचा एक प्रतिनिधी या बोर्डावर असतो. महायुद्धापूर्वीं जर्मनीतर्फेंहि एक डायरेक्टर घेण्यांत येत असे. कंपनीच्या डायरेक्टरमंडळाची सभा दर महिन्याच्या पहिल्या सोमवारीं भरते व तिचे कार्यकारीमंडळाची सभा दर आठवड्यास भरते. कंपनीचा अध्यक्ष हाच या मंडळाचाहि अध्यक्ष असतो. याशिवाय, जमाखर्च, बँकिंग, अशीं कंपनीचीं अनेक पोटमंडळें व शाखा आहेत. एंजिनियरिंगविषयक प्रश्न तज्ज्ञांकडे सोपाविले जातात व त्यांची सभा दरसाल पॅरिसमध्यें एक वेळ भरते. कंपनीचें प्रत्यक्ष काम ईजिप्तमध्येंच होतें. केरो येथें सुपीरियर एजंट म्हणून कंपनीचा मुख्य कार्यकारी कामगार असतो. त्याचे हातांत दोन खातीं असतात. एक व्यापाराचें (Traffic Department) व दुसरें कामाचें (Works Department). या दोन्ही खात्यांचीं मुख्य ऑफिसें पोर्ट सय्यद व सुवेझ यांचे दरम्यान मधोमध असलेल्या इस्मैलिया या शहरीं आहेत व पोट-ऑफिसें पोर्ट सय्यद व पोर्ट टयुफिक येथें आहेत. व्यापारविषयक शाखेंत फ्रेंच आरमारांतील लोकच कामदार म्हणून नेमले जातात.

त्यांचे हातांत कालव्यांतून येणारे जाणारे जहाजांची सर्व व्यवस्था असते. कामाचे खात्यांत पॅरिस येथील पॉलिटेक्निक संस्थेंतील पदवीधर नेमले जातात. नवीन कामें, दुरुस्त्या, गाळ काढणें वगैरे कामें या खात्यामार्फत होत असतात.

कालव्याच्या कडेनें सर्व ठिकाणीं तारायंत्र व टेलिफोनची व्यवस्था असून प्रत्येक पांचसहा मैलांचे अंतरावर तार व टेलिफोन ऑफिसें आहेत; व तीं रात्रंदिवस उघडीं असतात. यामुळें प्रत्येक जहाजाच्या हालचाली किंवा कालव्याचे तीरांना यत्किंचितहि अपघात झाला तरी त्याबद्दलची बातमी अगदीं थोड्या सेकंदांच्या आंत कालव्याच्या अधिकाऱ्यांना कळूं शकते.

कंत्राटानें दिलेल्या मोठ्या कामावरील माणसांखेरीज कंपनीचे नोकरींत सुमारें तीन हजारांवर लोक आहेत; व त्यांच्यावर अवलंबून असणारीं माणसें या संख्येच्या चौपट भरतील. या नोकरवर्गांत कांहीं इसम निरनिराळ्या देशांतील आहेत. १९१४ सालीं एकंदर नोकरखर्च चाळीस लक्ष फ्रँक होता तो १९२४ पासून सुमारें दोन कोटी फ्रँकांवर गेला आहे. या उपरोक्त रकमेंत नोकरांस द्यावयाचें बोनस, रजेच्या दिवसांचे पगार व नफ्याचा हिस्सा यांचाहि अंतर्भाव होतो. यावरून नोकरांचे सुस्थितीसाठीं कंपनीनें एखाद्या सुधारलेल्या राष्ट्रीय सरकाराप्रमाणें कशी सुसंघटित व्यवस्था केलेली आहे, हें लक्षांत येईल. १८७५ सालीं कंपनीचा एकंदर खर्च सुमारें २ कोटी फ्रँक होता तो १९२५ सालापासून ९ कोटी फ्रँकवर गेला आहे. त्याचप्रमाणें कंपनीचे नोराचें उत्पन्न वरील दोन सालांत अनुक्रमें ३ कोटी व २० कोटी फ्रँक असें झालें. हा नोर जहाजाचे दर टनीं सवासात फ्रँक व उतारूंगणिक दहा फ्रँक यांप्रमाणें वसूल करितात.

कालव्याचे कामाविषयीं बोलावयाचें झालें तर तें कधींच संपणारें नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. कालव्यांतील गाळ काढण्याचें काम सतत चालू ठेवावें लागतें. नाहींतर कालवा केव्हांच भरून जाईल. कालव्यांतून प्रवास करणाऱ्या जहाजांची सोय अधिक व्हावी व अनेक जहाजांना एकदम व लवकर प्रवास कालव्यांतून करतां यावा, म्हणून कालव्याची रुंदी व खोली हीं वाढविण्याचें काम असेंच अव्याहत चालू आहे. कालव्याचे दोन्ही कांठां-

वरहि सारखा भराव टाकून ते रुंद व उंच करण्याचा क्रम नित्य चालूच आहे. कंपनीनें आपले नोकरांसाठीं चांगलीं घरें बांधलीं आहेत व आणखी बांधावयाचा क्रम बंद पडलेला नाहीं. पोर्ट सय्यदचे समोरच कालव्याचे पूर्व बाजूस पोर्ट सय्यदच्या बरोबरीचें एक नवें शहर लवकरच वसेल असा अंदाज आहे. कंपनीच्या अशा प्रकारच्या धोरणामुळेंच इस्मैलिया व टयूकिफ हीं शहरें वसलेलीं असून भरभराटींत आहेत. तात्पर्य, कंपनीचें धोरण अशा प्रकारें आंखलेलें आहे कीं, त्यापासून कालव्याचा उपयोग करणाऱ्या जहाजांच्या कंपन्यांना किंवा कंपनीच्या नोकरांना कंपनीबद्दल आदर रहावा व पूर्ण विश्वास वाटावा. हल्लींच्या मजुरांच्या किंवा नोकर लोकांच्या संपाच्या काळांत या कंपनीचे नोकरवर्गात केव्हांहि संप झाले नाहींत किंवा तशी कोठें प्रवृत्तीहि दिसून येत नाहीं. यावरून कंपनीचें धोरण नोकरांस कसें सुखावह आहे, याविषयीं निराळे दाखले देण्याचें कारण रहात नाहीं.

मजुरांच्या कामाचे तासहि माफक आहेत. तसेंच नोकरांना कंपनीचे नफ्यांतून कांहीं अंश दिला जातो. त्याचप्रमाणें इस्पितळें, दवाखाने, शाळा, करमणुकीच्या सोयी वगैरेकडेहि नोकरांच्या सुखासाठीं कंपनी भरपूर लक्ष देत असते.

आंतरराष्ट्रीय करार होऊन सन १८८८ सालीं हा कालवा शांततेच्या काळाप्रमाणें लढाईच्या काळांतहि सर्व राष्ट्रांस खुला असावा असें ठरलें आहे. या कालव्याची एकंदर लांबी दर्यावर्दी ८७॥ मैलांची आहे. परंतु, प्रत्यक्ष खणती ६६ मैलच करावी लागली. कारण बाकीचा भाग मूळचीं सरोवरें सामील करून बनलेला आहे. या कालव्यास एकंदर खर्च सुमारें तीन कोटि पौंड लागलेला आहे. कालव्याची रुंदी ११८ फुटांची व खोली ३३ फुटांची आहे यामुळें दोन जहाजें एकाच वेळीं एकमेकांजवळून जाऊं शकत नाहींत. याकरितां मधूनमधून जास्त रुंदीचीं स्टेशनें ठेविलीं असून एकंदर जहाजांची ये-जा सिंगल लाइनचे रेलवेप्रमाणें नियमित व नियंत्रित केली जाते. पण त्यांतल्या त्यांत टपालबोटींना आधीं जाऊं दिलें जातें. कालव्यांतून जातांना जहाजांचा वेगहि ताशीं ५॥ मैलांप्रमाणें मर्यादित केला आहे. कारण तसें केलें नाहीं तर जास्त वेगामुळें कालव्यांतील पाणी फार जोरानें उसळून कांठांस धोका पोंचण्याचा संभव उत्पन्न होणारा आहे. पूर्वी या कालव्यांतून

रात्रीं जहाजें जाऊं देत नसत. परंतु आतां सर्चलाइटची व्यवस्था झाल्यामुळें जहाजांस रात्रीं प्रवास करावयाची मोकळीक मिळालेली आहे. यामुळें पूर्वी कालवा ओलांडून जाण्यास गलबतास तीस पस्तीस तास लागत, ते आतां टपाल बोटीला १४।१५ तास पुरतात. आतां कालव्याची रुंदी सरसकट १४८ फुटांपर्यंत वाढविण्याचा विचार चालू आहे व मधील वळणांत ती १८० फुटांपर्यंत ठेवण्यांत येणार आहे.

सुवेझ कालव्याचें काम पूर्णपणें सिद्धीस गेल्याकारणानें यासारखींच दुसरीं कामें हातीं घेण्यास धाडशी व कल्पक लोकांस स्फूर्ति झाली; व या कालव्याचे अडीचपट खर्चाचें व त्याहिपेक्षां कितीतरी अवघड असलेलें पनामा कालव्याचें काम हें त्या स्फूर्तीचें एक लोकोत्तर उदाहरण होय.

या एकंदर हकीगतीवरून सुवेझ कालवा कंपनीचा पसारा कसा जगड्व्याळ आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईल. पाश्चिमात्य देशांतील सरकारांचे व्याप प्रचंड तर आहेतच; परंतु तदनुषंगिक असे रेल्वे, बँका, नौकानयन कंपन्या, कारखाने वगैरे केवढे अचाट उद्योग चालतात व त्यांचा कारभार शेंकडों वर्षें कसा सुरळीत चाललेला आहे यासंबंधींची बरीचशी कल्पना या लेखावरून वाचकांना येईल अशी आशा आहे.

---

# विसाव्या शतकांतील नमुनेदार ग्रंथालय

लेखकः श्री. रघुनाथ शतानंद पारखी, पुणें.

[ जन्म १९०१ सालीं झाला. शिक्षण भोर हायस्कूल, द्रविड हायस्कूल, वांई, व पुण्याचे नाइट हायस्कूलमधून होऊन ते १९२४ सालीं मॅट्रिक झाले. १९२९ सालीं लाहोरच्या ग्रंथालय शास्त्रसंस्थेचा त्यांना डिप्लोमा मिळाला. पुढें दोन वर्षांनीं कोलंबिया युनिव्हर्सिटीच्य ग्रंथालयशास्त्राच्या दोन मुख्य विषयांच्या त्यांनीं परीक्षा दिल्या. सध्यां ते फर्ग्युसन कॉलेजमध्यें उपग्रंथाध्यक्ष आहेत. ]

**विसावें शतकः**—" विसावें शतक " हे शब्द उच्चारतांच आपणांपुढें एक अत्यंत भव्य-दृष्टीला दिपविणारें-कल्पनेला गुंग करणारें-विचारांना कुंठित करणारें-असें जग उभें रहातें. विसाव्या शतकांतील माणसें व त्यांचे

आचार, विचार व व्यवहार यांमध्यें कल्पनातीत व्यापकता दिसून येते. सध्यां आम्ही दूरदूरच्या देशांतून एकमेकांशीं अगदीं घरांत बसल्याप्रमाणें बोलतों व आपले विचार तावडतोब लिहून दाखवितों. हवेंतून, समुद्रांतून व जमिनीवरून मोठ्या वेगानें जगाच्या निरनिराळ्या भागांतून हिंडूंफिरूं शकतों, वाटेल त्या देशांतील माणसांशीं रोटी-व्यवहार व बेटी-व्यवहार करूं शकतों—जगांतील वाटेल त्या ठिकाणचे कोणतेहि व कसलेहि शोध, जिन्नस, वस्तु, विचार व व्यवहार आम्हांस एका दृष्टिक्षेपांत पहावयास व अनुभवावयास मिळतात; अगम्य, अशक्य अथवा अतर्क्य असें चालू शतकांत कांहीं एक नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं.

**ग्रंथालयांचें शतकः**—ज्ञानसंचयाचे मार्गीत विसावें शतक म्हणजेच ग्रंथालयांचें शतक असें म्हणण्यास हरकत नाहीं. ग्रंथालय हें चालू शतकाचें जीवित आहे. ग्रंथालयासारखें अत्यंत महत्त्वाचें कार्य सध्यांच्या प्रागतिक जगांत कोणत्याहि ठिकाणीं पहावयास मिळणार नाहीं. शास्त्रवेत्ते, वाङ्मयसेवक, संशोधक, कलाभिज्ञ, धंदेवाले व व्यापारी, इतकेंच काय पण अगदीं अक्षरशत्रु व दारिद्रनारायण असा मनुष्य जरी घेतला तरी त्याला ग्रंथालयांत शिरल्याबरोबर आपण एका अत्यंत पवित्र, शांत व रमणीय ठिकाणीं प्रवेश केला आहे, असें वाटून तो आपलें अज्ञान, दुःख व बाह्य जगाविषयींचे विचार विसरून जातो व त्याला एक प्रकारचा स्वर्गीय आनंद व उल्हास वाटूं लागतात.

**ज्ञान-संपादन व त्याची वृद्धिः**—सध्यां निरनिराळ्या शास्त्रांत इतके शोध लागले आहेत व दिवसेंदिवस लागत आहेत कीं, मनुष्याला सहज रीतीनें त्यांचा परामर्ष घेतां येणें अशक्य आहे. ज्ञानसंपादनाकडे मनुष्याचें लक्ष इतकें वेधून गेलें आहे कीं, तो देहभान विसरून जातो व त्याजकडून त्याच्या नकळत 'रामन् परिणाम'सारखे अत्यंत महत्त्वाचे शोध लावले जातात व सर्व लोक त्याला परमेश्वराप्रमाणें मानतात. सध्यां माणसांमाणसांत किंवा गावांगावांत ज्ञानबुद्धीची चढाओढ लागलेली नसून ती देशांदेशांत व राष्ट्रांराष्ट्रांत चालू आहे. म्हणून आम्हांस युरोपांतील प्रख्यात वाङ्मयसेवकांच्या, तत्त्ववेत्त्यांच्या व शास्त्रज्ञांच्या तोडीचे डॉ. रवींद्रनाथ टागोर, डॉ. राधाकृष्णन् व सर

चंद्रशेखर वेंकट रामन् सारख्या विख्यात विभूतींचा विचार करावा लागतो. सध्यां ज्ञानसंपादन व ज्ञानवृद्धि यांचा ओघ इतक्या वेगानें चालू आहे कीं, सर्वसाधारण मनुष्यास कोणत्याहि विषयांत प्रवीणता मिळविणें फार कठिण झालें आहे.

**सध्यांचे ऋषिः**—पूर्वींचे ऋषि अरण्यांत जाऊन तपश्चर्येच्या योगबलानें स्वर्गीय शक्तींना आपले दास करीत होते, तर आतांचे ऋषि मोठमोठ्या प्रयोगशाळेंत तपश्चर्या करीत असतात. पूर्वींच्या लोकांचा आचार, विचार व व्यवहार यांच्या आकुंचिततेमुळें पूर्वींच्या ऋषींच्या शोधांना जसें महत्त्व यावयास पाहिजे होतें तसें महत्त्व त्यांना मिळालें नाहीं. आतां आपले सर्वच व्यवहार व्यापक झाल्यामुळें व दळणवळण अत्यंत जोरांत असल्यामुळें सध्यांच्या ऋषींच्या शोधांना अत्यंत महत्त्व येऊन त्यांवरून नवीन नवीन शोध लागत आहेत.

**सध्यांचें वाङ्मयः**—सध्यां वाङ्मयामध्येंसुद्धां पूर्वीप्रमाणें साधेपणा व आकुंचितपणा राहिला नाहीं. लोकांची दृष्टी जसजशी व्यापक होत आहे, तसतसे लोकांना आपले विचार व्यापक करावे लागतात. त्याशिवाय त्यांचें लिखाण परिणामकारक होत नाहीं. सध्यां हिंदुस्थानांतील कोणत्याहि वाङ्मयाच्या प्रकारांत ( कविता, नाटक, कादंबरी, निबंध वगैरे ) नुसते हिंदुस्थानांतलेच आचारविचार दिल्यानें वाचक खूष होणार नाहींत; तर त्यांना आपल्या आचारविचारांची परकीय आचारविचारांशीं सांगड घातलेली जास्त आवडेल.

**नमुनेदार ग्रंथालयः**—विसाव्या शतकांतील नमुनेदार ग्रंथालय कोणतें अथवा कोणत्या ग्रंथालयास नमुनेदार ही संज्ञा द्यावी याचा आपण विचार करूं लागलों म्हणजे आपणांस ग्रंथालयाच्या जागेचा, संग्रहाचा, तेथील कामाच्या पद्धतीचा व तेथील कामगारांचा मुख्यत्वें विचार करावा लागतो.

**ग्रंथालयाची जागाः**—ग्रंथालयाची जागा स्वच्छतेच्या दृष्टीनें, उजेडाच्या दृष्टीनें व शांततेच्या दृष्टीनें समाधानकारक असावी लागते. ज्या ठिकाणीं लोकांची रहदारी फार चालू आहे, जेथें नेहमीं गडबड चालू असते, अशा ठिकाणीं जर ग्रंथालय असेल तर तेथील रहदारीपासून शक्य तितकें

दूर असावें. वाचनालय व ग्रंथसंग्रहालय हीं दोन्ही एकाच मजल्यांत असल्यास फार सोयीचें होतें. त्यामुळें पुस्तकांची ने-आण करणें सोपें होतें. ग्रंथालयाची इमारत दोन मजली असल्यास वाचनालय दुसऱ्या मजल्यावर असावें. यामुळें ग्रंथसंग्रहालयांतील गडबडीचा परिणाम वाचनालयांत होत नाहीं. वाचनालयाला नैसर्गिक उजेड भरपूर मिळतो व हवा जास्त खुली रहाते.

वाचनालयः—कोणत्याहि ग्रंथालयांत वाचनालयाची सोय असणें अत्यंत आवश्यक आहे. ग्रंथालयांतील पुस्तक ग्रंथालयांत वाचण्याची सोय केल्यानें दोन फायदे होतात. एकतर यामुळें ग्रंथालयांतील कोणतेंहि पुस्तक कोणाहि वाचकाला अगदीं मागतांक्षणींच देतां येतें; व दुसरें, पुस्तक हरवण्याचा संभव फार थोडा असतो. वाचनालयांत नवीन आलेलीं मासिकें व वर्तमानपत्रें टेबलावर नीट विषयवार लावून ठेवावींत व वाचकांना वेळोंवेळीं वाचावयास लागणारीं पुस्तकें देण्याची व्यवस्था करावी.

ग्रंथाध्यक्षः—पुस्तकांच्या देवघेवीच्या कामांत चांगल्या कसलेल्या ग्रंथाध्यक्षाची योजना करणें फार आवश्यक आहे. कारण वाचकांकडून पुस्तकांच्या ज्या मागण्या येतात त्यांपैकीं बऱ्याचशा मागण्या अशा असतात कीं, त्यांना कोणतीं पुस्तकें हवीं आहेत हें साध्या मनुष्याला कळणार नाहीं. "आम्हांला केळकरांचा 'ज्ञानाचीं सदावर्तें' हा लेख ज्या पुस्तकांत आहे तें पुस्तक हवें; तर्कशास्त्रावर मराठी लेखकांचीं कांहीं पुस्तकें व कांहीं मासिकांतील लेख दाखवा, वसाहतीचें साम्राज्य या विषयावर कांहीं सामग्री मिळेल काय?" असे नानातऱ्हेचे वाचकांचे जेव्हां एकामागून एक प्रश्न येतात, तेव्हां सर्वसाधारण ग्रंथाध्यक्षास त्यांच्या मागण्या पुरविणें फार जड जातें. त्याला बहुश्रुत व ग्रंथालयाचे कामांत तरबेज झालेलाच ग्रंथाध्यक्ष पाहिजे. ग्रंथालयाची किंमत ग्रंथाध्यक्षावरून करितां येते. ग्रंथाध्यक्षास वाचकांनीं मागितलेलीं पुस्तकें तात्काळ देतां आलीं पाहिजे व त्या विषयांवर आणखी कोठें कोठें माहिती आहे हें त्यास सांगतां आलें पाहिजे. वरील हेतु सफल होण्यास ग्रंथाध्यक्षाला निरनिराळ्या भाषांचें थोडें थोडें ज्ञान असलें पाहिजे. तसेंच त्यास निरनिराळीं शास्त्रें व वाङ्मय यांची ऐतिहासिक माहितीहि असणें जरूर आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तो 'चालता बोलता ज्ञानकोश'

असला पाहिजे. असा ग्रंथाध्यक्ष असेल तरच कोणतेंहि ग्रंथालय नीट चालू शकेल. ग्रंथाध्यक्षाचे अंगीं मार्दव, निर्भीडपणा, कंटकपणा वगैरे गुणांचें वास्तव्य असावें लागतें. वाचकांचे हेतु समजावून घेऊन त्यांना वेळोंवेळीं खुल्या अंतःकरणानें मदत करणें हें ग्रंथाध्यक्षाचें मुख्य कर्तव्य आहे. जो ग्रंथाध्यक्ष ‘ आपण वाचकांकरितां आहोंत व आपण त्यांना सदैव शक्य तितकी मदत केली पाहिजे ’ असें समजतो व त्याप्रमाणें प्रयत्न करितो त्यालाच खरा ग्रंथाध्यक्ष म्हणावें.

**ग्रंथांची निवडः**—ग्रंथालयांतील पहिलें महत्त्वाचें काम म्हणजे ग्रंथांची उत्तम निवड करणें हें होय. ग्रंथांची निवड करतांना वाचकांची आवड व पात्रता यांकडे विशेष लक्ष द्यावें लागतें. बहुश्रुत वाचक असल्यास कठिण व गहन विषयांचें प्रतिपादन केलेलीं पुस्तकें घ्यावीं लागतात व सर्वसाधारण वाचक असले तर सोपीं व मनोरंजक पुस्तकें घ्यावीं लागतात. पुस्तकांमध्यें सुद्धां पुष्कळ प्रकार असतात. कांहीं पुस्तकें केवळ लहान मुलांकरितां असतात, कांहीं शाळेंतील मुलांकरितां असतात, कांहीं कॉलेजमधील विद्यार्थ्यांकरितां असतात, कांहीं शिक्षकांकरितां असतात, कांहीं सर्वसाधारण वाचकांकरितां असतात, व कांहीं निरनिराळ्या धंद्यांच्या लोकांकरितां असतात. त्यांतून नेमकीं आपल्या ग्रंथालयांत उपयोगीं पडतील अशींच पुस्तकें ग्रंथाध्यक्षास निवडावीं लागतात. हें काम सुद्धां फार कठिण असतें. या कामाकडे दुर्लक्ष केलें असतां ग्रंथालयांत कित्येक वेळीं नको असलेलीं पुस्तकें धूळ खात पडतात व लोकांना हवीं असलेलीं पुस्तकें मिळत नाहीं.

**ग्रंथांचें वर्गीकरणः**—आपल्या बहुतेक ग्रंथालयांतून ग्रंथांच्या वर्गीकरणाचा नीट विचार केला जात नाहीं ही फार शोचनीय स्थिति आहे. ग्रंथांचें वर्गीकरण हा ग्रंथालयशास्त्रांतील अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. पाश्चिमात्य देशांतून या विषयावर स्वतंत्र ग्रंथ तयार आहेत. सध्यां पाश्चिमात्य देशांत ज्या महत्त्वाच्या वर्गीकरणपद्धति चालू आहेत, त्यांमध्यें अमेरिकेंतील ग्रंथालयांच्या चळवळीचा उत्पादक व प्रसारक जगविख्यात मेलव्हिल ड्यूई यांच्या “दशांश-वर्गीकरण” पद्धतीचा बराच प्रसार झाला आहे. या पद्धतींत ज्ञानाचे मुख्य नऊ वर्ग केले आहेत. ते येणेंप्रमाणें—(१) सर्वसाधारण ग्रंथ,

(२) धर्म, (३) समाजशास्त्र, (४) भाषाशास्त्र, (५) विज्ञानशास्त्र, (६) उपयुक्त कला, (७) ललितकला, (८) वाङ्मय, व (९) इतिहास.

वरील वर्गांचे पुष्कळ विभाग व उपविभाग करून शेवटीं अगदीं विशद अनुक्रमणिका जोडलेली आहे. या पद्धतीनें आपणांस पुस्तकांचें वर्गीकरण फार उत्तम रीतीनें करतां येतें. या पद्धतीचा उपयोग आपल्या देशांतील वाङ्मयाचें वर्गीकरण करण्याचे कामीं व्हावा, या हेतूनें तिचें मराठींत रूपांतर लेखकानें केलें आहे. तें लवकरच प्रसिद्ध करावें असा त्याचा विचार आहे.

**ग्रंथांच्या याद्याः**–पुस्तकांच्या याद्या करण्याचें कामसुद्धां वाटतें तसें सोपें नाहीं. ग्रंथकाराचें बरोबर नांव कोणतें आहे व तें यादींत कसें लिहावें, पुस्तकाच्या नांवाचा कोणता व किती मजकूर घ्यावा, पुस्तकाचीं पानें, त्याचा आकार, तें एकाद्या मालेंत प्रसिद्ध झालें असेल तर त्या मालेचें नांव, त्या पुस्तकाचें महत्त्व वाचकांस थोडक्यांत समजावें म्हणून दोनतीन ओळींत त्याची सूत्रमय माहिती, पुस्तक सचित्र असेल तर त्या प्रकारची नोंद करणें वगैरे पुष्कळ निरनिराळ्या मुद्यांचा विचार करून याद्या तयार कराव्या लागतात. याद्यांचे सुद्धां (१) वर्गवार यादी, (२) ग्रंथकारनामयादी, (३) ग्रंथनामयादी, (४) विषयवार यादी व (५) कोशयादी असे निरनिराळे प्रकार आहेत. निबंध-वाङ्मयाची आणि वर्तमानपत्रें व मासिकें यांतील वाङ्मयाची माहितीसुद्धां वरील याद्यांतून निरनिराळ्या ठिकाणीं द्यावी लागते. निरनिराळ्या ग्रंथालयांतील याद्या एकाच पद्धतीनें केल्या जाव्यात म्हणून अमेरिका व इंग्लंड येथील ग्रंथालयसमित्यांनीं एक "Catalogue Rules" या नांवाचें १७४ नियमांचें पुस्तक तयार केलें आहे. याद्या करतांना त्याचा फार उपयोग होतो.

**ग्रंथालयाचीं मुख्य पांच अंगें:**—निवडक पुस्तकें, रम्य व सोयीची जागा, गुणी व प्रेमी ग्रंथाध्यक्ष, तर्कसम्मत ग्रंथांची रचना, वाचकांच्या गरजेप्रमाणें तयार केलेल्या ग्रंथांच्या याद्या व मुबलक पैशाचें पाठबळ, हीं पांच अंगें असलीं कीं, ग्रंथालय नमुनेदार होण्यास मुळींच अवधि लागत नाहीं. वरील पांच अंगांपैकीं एकहि अंग कमी असलें तरी ग्रंथालयाची सुधारणा होणें फार कठिण पडतें. या अंगांच्या संघशक्तीनें ग्रंथालयास येणारें महत्त्व विसाव्या

शतकांत काय आहे याची कल्पना वाचकांस सहज येणार आहे व अशा ग्रंथालयाची आवश्यकता सध्यां किती आहे हें सुज्ञ वाचकांस सांगावयास नको.

**पाश्चिमात्य देशांतील ग्रंथालयें:**—वर वर्णन केल्याप्रमाणें नमुनेदार ग्रंथालयें पाश्चिमात्य देशांत बऱ्याच प्रमाणानें पहावयास मिळतात. तेथें कित्येक ग्रंथालयांतून अगदीं निवडक दहादहा, पंधरापंधरा लाख पुस्तकांचा संचय असतो. तेथें आपणांस आपल्या विषयावर काय वाङ्मय आहे याबद्दल मुळीं सुद्धां विचार करावा लागत नाहीं. आपण ग्रंथाध्यक्षास आपला उद्देश सांगितल्याबरोबर यंत्राप्रमाणें ग्रंथालयांतील त्या त्या विषयांवरील कसलेले ग्रंथाध्यक्ष आपल्या विषयावरचीं अगदीं अलिकडचीं उत्कृष्ट पुस्तकें, मासिकें वगैरे सर्व वाङ्मय घेऊन आपणांकडे येतात व आपल्याशीं त्या विषयांवर चर्चा करूं लागतात. अशा तऱ्हेची व्यवस्था पाहिल्याबरोबर आपण अगदीं चकित होऊन जातों व शेवटीं पुस्तकांची निवड करण्याचें काम ग्रंथाध्यक्षांवरच सोंपविणें किती श्रेयस्कर आहे याची आपणांस खात्री पटते.

**जगांतील मुख्य ग्रंथालयें:**—जगामध्यें सर्वांत मोठीं व सर्व तऱ्हेनें अत्युत्कृष्ट अशीं तीन ग्रंथालयें आहेत. त्यांपैकीं फ्रान्सची "नॅशनल लायब्ररी" ही एक आहे. या ग्रंथालयांत अदमासें बावन लाख छापील ग्रंथ व एक लाख बावीस हजार हस्तलिखित ग्रंथ आहेत. दुसरें लंडन येथील "ब्रिटिश म्युझियम." या ग्रंथालयांत अदमासें बत्तीस लाख छापील ग्रंथ व छप्पन हजार हस्तलिखित ग्रंथ आहेत. अमेरिकेंतील "कॉंग्रेस लायब्ररीं"त अदमासें तीस लाख छापील ग्रंथ व बरेच हस्तलिखित ग्रंथ आहेत. या ग्रंथालयांतून जगांतील कोणतेंहि निवडक पुस्तक कोणाहि वाचकास वाचावयास मिळतें. मुबलक जागा, उत्तम व्यवस्था, भरपूर सामग्री आणि शांत व उल्लसित वातावरण अशा तऱ्हेची सोय वरील व आणखी कित्येक पाश्चिमात्य देशांतील ग्रंथालयांतून आपणांस पहावयास सांपडते.

**अँड्र्यू कार्नेजी व ग्रंथालयें:**—तिकडे ग्रंथालयांवर मोठमोठ्या धनिक लोकांनीं कोट्यवधि पैसा खर्च केला आहे. ग्रंथालयाचे प्रगतीप्रीत्यर्थ सर्वांत जास्त पैसा दानशूर अँड्र्यू कार्नेजी यानें खर्च केला आहे. त्यानें आपले आयुष्यांत एकंदर सात कोटी पौंड म्हणजे अदमासें अठ्याण्णव कोटी रुपये ग्रंथालयां-

करितां खर्च केले आहेत. कार्नेजीविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, त्याला एकाद्या भिकाऱ्यानें कांहीं खावयास मागितलें तर तो त्यास एक उत्तम पुस्तक वाचावयास देत असे. यावरून असा बोध घ्यावयाचा कीं, त्याला ग्रंथालयाच्या सुधारणेचें व लोकांच्या ज्ञानवृद्धीचें अत्यंत वेड लागलें होतें. सध्यां अमेरिका व इंग्लंड या देशांमध्यें कार्नेजीनें दिलेल्या देणग्यांच्या व्याजावर कित्येक ग्रंथालयें चाललेलीं आहेत.

**ग्रंथालयशास्त्र:**—सध्यां पाश्चिमात्य देशांत इतकीं विविध तऱ्हांचीं ग्रंथालयें आहेत व त्यांमधील ग्रंथांची संख्या देखील इतक्या झपाट्यानें वाढत आहे कीं, अशीं ग्रंथालयें चालवावीं कशीं, त्यांमधील ग्रंथांची रचना कशी करावी, वाचकांना उपयोगीं पडतील अशा त्यांच्या याद्या कराव्या कशा, वाचकांना सर्वतोपरी ग्रंथालयांचा जास्तींत जास्त फायदा देण्याकरितां काय योजना करावी, ग्रंथालयाचें स्थान कोठें व कसें असावें, ग्रंथालयाला खर्च कोणत्या प्रमाणानें करावा व तेथील कामगारांचें शिक्षण कशा तऱ्हेनें झालेलें असावें व त्यांनीं काम कोण या पद्धतींनीं करावें वगैरे तद्विषयक नाना तऱ्हेचे प्रश्न उपस्थित होऊं लागल्याकारणानें अलीकडे ग्रंथालयाचें एक स्वतंत्र शास्त्रच झालें आहे व या शास्त्राचें शिक्षण देणाऱ्या अनेक उत्कृष्ट संस्था तिकडे चालू आहेत. एक वर्षापासून चारपांच वर्षें ग्रंथालयशास्त्राचें शिक्षण देणाऱ्या शाळा व कॉलेजें हीं पाश्चिमात्य देशांतून उघडलीं आहेत. ज्यानें ग्रंथालयशास्त्राचें शिक्षण पुरें केलें नाहीं, त्याला ग्रंथालयांत महत्त्वाचें काम द्यावयाचें नाहीं असा येथें नियम आहे. त्यामुळें ग्रंथालयशास्त्राचें शिक्षण घेतलेल्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व ग्रंथालयाचे कामांतहि दिवसेंदिवस स्पृहणीय सुधारणा होत आहेत. अलीकडे ग्रंथालयशास्त्रावर बरेच ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत; व उत्तम मासिकांच्या द्वारें ग्रंथालयशास्त्राच्या नवीन पद्धतीचा प्रसार मोठ्या झपाट्यानें चालू आहे.

**हिंदुस्थानांतील ग्रंथालयांची सद्य:स्थिति**—हिंदुस्थानकडे वळलें तर सर्वांत उत्तम व अगदीं तंतोतंत पाश्चिमात्य देशांतील ग्रंथालयांप्रमाणें चालविलेलीं अशीं फारच थोडीं ग्रंथालयें दिसतात. त्यांपैकीं कलकत्त्याची "इंपीरियल लायब्ररी" व बडोद्याची "सेंट्रल लायब्ररी" हीं दोन ग्रंथालयें सर्व प्रकारें

प्रमुख आहेत. या दोन्ही ग्रंथालयांचे ग्रंथाध्यक्ष चांगले नामांकित व ग्रंथालयशास्त्रांत निपुण असे आहेत. या ग्रंथालयांचे खालोखाल बंगाल व मुंबई येथील " रॉयल एशियाटिक सोसायटी "च्या ग्रंथालयांची गणना करतां येईल. हिंदी विश्वविद्यालयांतील ग्रंथाध्यक्षांमध्यें मद्रासच्या विश्वविद्यालयाच्या ग्रंथाध्यक्षांला पहिलें स्थान दिलें पाहिजे. मद्रास विश्वविद्यालयाच्या ग्रंथालयाची प्रगति जोरानें सुरू आहे. तेथील विख्यात ग्रंथाध्यक्ष मि. एम्. आर. रंगनाथन् हे ग्रंथालयशास्त्रांत प्रवीण असून त्यांनीं नुकतेंच " Five Laws of Library Science " या नांवाचें ग्रंथालयशास्त्रावरील अत्यंत महत्त्वाचें पुस्तक प्रसिद्ध करून सर्व हिंदुस्थानांतील ग्रंथाध्यक्षांना अत्यंत ऋणी करून ठेविलें आहे. हिंदुस्थानांतील ग्रंथालयांच्या सुधारणेचा पाया प्रथम बडोद्याचे प्रगतिप्रिय अधिपति श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं घातला. बडोदा संस्थानांत ग्रंथालयांचा प्रसार फारच उत्तम रीतीनें चालला आहे. या बाबतींत बडोद्याचें उदाहरण हिंदुस्थानांतील इतर शहरांनीं घेण्याजोगें आहे.

**नमुनेदार ग्रंथालयांची आवश्यकता:**—आपल्या देशांत नमुनेदार ग्रंथालयांची आवश्यकता लोकांना आतां भासूं लागली आहे. परंतु तशीं ग्रंथालयें उघडण्याचे प्रयत्न जसे व्हावयास पाहिजेत, तसे अद्यापि झालेले दिसत नाहींत. ग्रंथालयाचे चळवळीला संघशक्तीची फार आवश्यकता आहे. हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व निकडीचा असल्यामुळें ग्रंथालयांची चळवळ हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांत जितकी नेटानें होईल तितकी आपली शैक्षणिक सुधारणा होण्यास जास्त मदत होईल.

**उपसंहार:**—सध्यां शैक्षणिक विविधता फार वाढल्यामुळें नुसत्या शाळेंतील क्रमिक शिक्षणानें जगांत वावरण्यास मनुष्य समर्थ होऊं शकत नाहीं. जगांतील आपले व्यवहार उत्तम रीतीनें चालावयास आणि आपलें आयुष्य सुखांत व सुजाणतेंत जावयास आपणांस वेळोंवेळीं ग्रंथालयांतील मोठमोठ्या विभूतींच्या उपदेशाचा आस्वाद घेणें अत्यावश्यक आहे. या कार्यापासून जे परावृत्त रहातात, त्यांना सध्यांचे जगांत जवळजवळ अस्तित्व नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. घरीं स्वस्थ बसून अथवा खेडेगांवीं गप्पांचे आखाडे भरवून ज्ञानसंपन्नता मिळविणें शक्य नाहीं. त्याला विद्यादेवीच्या मंदिरांत जाऊन

तपश्चर्या करावी लागते; आणि ज्या घरांत, गांवांत अथवा देशांत अशा तऱ्हेची संवय नागरिकांना असते, तेवढेच नागरिक जगाच्या अतर्क्य प्रगती-बरोबर टिकाव धरू शकतात. आपले शिक्षणाविषयींचे विचार अगदीं व्यापक झाले पाहिजेत. डॉ. रवीन्द्रनाथ टागोर, डॉ. राधाकृष्णन्, सर सी. व्ही. रामन् यांच्यासारखे अलौकिक महात्मे निर्माण होण्यास जरी दैवी अनुग्रहाची जरूरी असली, तथापि त्यांनीं निर्माण केलेल्या ज्ञाननिर्झरिणीचें अमृतमय पेय ज्ञानपिपासूंना सुलभतेनें साध्य करून देणारें जगांतील उत्कृष्ट साधन म्हणजे ग्रंथालय हेंच होय. ज्ञानासाठीं हपापलेल्या लाखों लोकांची आकंठ तृप्ति होऊन त्यांच्या हातून त्यांच्या आयुष्यांत जी कांहीं उच्च कामगिरी घडून येईल त्याचें श्रेय पर्यायानें ग्रंथालयांनाच मिळणारें आहे. ग्रंथालयांमधून सर्व काळांतील व सर्व देशांतील विभूतींच्या ज्ञानाचा सांठा व्यवस्थित रीतीनें ठेवलेला असतो व तेथील कामगारवर्ग ज्ञानदेवीच्या भक्तांना त्यांच्या आवडीच्या भक्तीचें साधन साध्य करून देण्यास सदैव तत्पर असतो. पूर्वीच्या काळीं लोकांचे व्यवहार फारच अल्प प्रमाणांत चालू असल्यामुळें त्यांना थोड्या प्रयासानें आपली प्रगति करून दाखवितां येत असे. परंतु सध्यांच्या काळीं एकंदर व्यवहार फारच व्यापक झाले आहेत, ते इतके कीं, त्यांची व्यापकता पटविण्यास जसे मोठमोठे ग्रंथ निर्माण झाले पाहिजेत व विविध ज्ञानोत्तेजक व्याख्यानमाला सुरू झाल्या पाहिजेत, तशीं जर सुसमृद्ध व सुव्यवस्थित अशीं भव्य ग्रंथालयें खुलीं होतील तरच जागतिक व्यवहाराच्या व्यापकतेची यथार्थ कल्पना लोकांना होणार आहे.

---

## ग्रामोद्धार

लेखक: सरदार राघवेन्द्रराव सदाशिवराव पुरंदरे, बी. ए., पुणें.

[ हे पुण्याच्या प्रसिद्ध सरदार पुरंदरे घराण्यांतील असून त्यांचा जन्म १८९७मध्यें झाला. त्यांचें उच्च शिक्षण पुणें येथील डेक्कन कॉलेजांत होऊन तेथून ते बी.ए. झाले. ]

अलीकडे आपणांस वर्तमानपत्रांतून ग्रामसुधारणेबद्दल ओरड ऐकूं येत आहे. सद्यःपरिस्थितींत जर हिंदुस्थानांत सरकारचें व लोकांच्या पुढाऱ्यांचें

एकमत होत असेल, तर तें ह्याच एका बावतींत. म्हणून आपल्या खेड्यांतील राहणाऱ्या बांधवांची स्थिति सुधारणें हें प्रत्येक सुशिक्षित माणसानें आपलें कर्तव्य समजलें पाहिजे.

हिंदुस्थानांतील खेड्यांची संख्या अदमासें ७,६०,००० आहे. इंग्रजी अम्मल सुरू होण्यापूर्वी हीं खेडेगांवें चांगलीं सुसंपन्न असून भरभराटींत होतीं. त्यांचा ऱ्हास होण्याचीं कारणें अनेक आहेत. मुख्य कारण म्हटलें म्हणजे यांत्रिक युगामुळें सर्व जगाचीच बदललेली परिस्थिति. याचा परिणाम असा झाला कीं, मोठमोठे कारखाने उघडले गेले व खेडेगांवांतील वस्ती कमी होऊन मोठमोठीं शहरें निर्माण झालीं व व्यापाराचीं केंद्रस्थानें बनलीं. या वेळेपर्यंत शेती हेंच उपजीविकेचें मुख्य साधन समजलें जात असे, व याच्या जोडीला सूत काढून कापड विणण्याचा दुय्यम धंदा असे. कापडाच्या गिरण्यांमुळें हा धंदा अजिबात बसला. शेतकरी आपणांस लागणारें कापड सुद्धां शहरांतील गिरणीचेंच घेऊं लागला; व पावसाळ्यांत शेतीचें काम नसल्यामुळें फावलेली वेळ, नुसत्या रिकामटेकडेपणामुळें भांडणें करण्यांत व कोर्ट-दरबारांत पैसे खर्च करण्यांत घालवूं लागला. याचा परिणाम असा झाला कीं, त्याचें शेतकीवरील लक्ष उडालें. जमिनीची मशागत नीट न झाल्यामुळें शेतीचें उत्पन्न कमी झालें. कोर्टाच्या खर्चाखालीं शेतकरी कर्जबाजारी बनला. कापड विणण्याचा त्याचा दुय्यम धंदा बुडाला. स्वतःस लागणाऱ्या कापडाकरितां सुद्धां तो शहरांत पैसा खर्च करूं लागला व आपलें उत्पन्न कमी होत असतांनासुद्धां शहरांतील चैनीची चट लागल्यामुळें, स्वतःच्या जमिनी सावकाराच्या ताब्यांत देऊन, शहरांतील गिरण्यांत मजूर बनला. अशा रीतीनें खेड्यांतील लोक बायकामुलांसुद्धां शहरांत येऊं लागले व खेडेगांवें उध्वस्त होऊन जमिनीची मशागत कमी झाल्यामुळें यांचें उत्पन्नहि दिवसेंदिवस कमी झालें.

इंग्रजांच्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांनीं खेडेगांवांतील राज्यव्यवस्थेंत कधींच हात घातला नाहीं. ते आपली ठराविक चौथाई किंवा सरदेशमुखीची खंडणी घेऊन तेथील सर्व व्यवस्था ग्रामपंचायतीवरच सोपवीत असत. परंतु इंग्रजी अमदानींत ग्रामपंचायतींना कांहींच अधिकार नसल्यामुळें त्या नामशेष झाल्या व त्यांच्या बारीकसारीक सर्व कामाचा बोजा मध्यवर्ती सरकारास पार पाडतां

येईना; यामुळें खेडेगांवची घडी विस्कळीत झाली. अलीकडे ही चूक सरकारच्या लक्षांत येऊन पुन्हां सरकार ग्रामपंचायती स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहे. आपणहि (प्रत्येक हिंदी मनुष्यानें) खटपट केल्यास त्या प्रयत्नास यश येण्यास फारसा वेळ लागणार नाहीं.

गतवर्षी पुणें येथें डेक्कन ॲग्रिकल्चर असोसिएशनच्या विद्यमानें पंडित मदनमोहन मालवीय यांचे अध्यक्षतेखालीं ग्रामोद्धार-परिषद ता. २० जून १९३१ रोजीं भरविण्यांत आली होती. ही परिषद भरविण्याचा मुख्य उद्देश म्हणजे सध्यांची खेडेगांवची अत्यंत हलाखीची स्थिति सुधारण्यासाठीं या खेड्यांच्या अवनतीचीं कारणें शोधून काढून त्यांवर उपाय योजणें हा होय. वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानांत ७,६०,००० खेडेगांवें आहेत व सरासरी शेंकडा ९० लोक खेडेगांवांतच रहातात, याचा विचार आपण केला म्हणजे ही बाब किती महत्त्वाची व व्यापक स्वरूपाची आहे, हें पंडितजींनीं आपल्या अध्यक्षीय भाषणाच्या आरंभींच पुढें सांगून आपल्या सर्वांच्या अवनतीच्या कारणांचा व त्यावर कोणते उपाय केले पाहिजेत याचा त्यांनीं बराच ऊहापोह केला. पंडितजींच्या मतें (१) सध्यांची सदोष शिक्षणपद्धति बदलून टाकून, ज्यांत धर्मांचा सुद्धां अंतर्भाव आहे असा शिक्षणक्रम आखून सर्व देश साक्षर केला पाहिजे, (२) आपल्या पुढें स्वावलंबनाचें ध्येय ठेवलें पाहिजे, (३) ग्रामपंचायती स्थापून आपले तंटे व भांडणें हीं आपसांतच मिटविलीं पाहिजेत, (४) आपसांतील जातिभेद बाजूस ठेवून एकी केलीच पाहिजे, (५) आपल्या देशाचें उपजीविकेचें मुख्य साधन शेती असल्यामुळें व पुष्कळ कच्चा माल येथें होत असल्यामुळें प्रत्येकानें शेती ही केलीच पाहिजे व आपलें आपणच सूत काढून कापड विणलें पाहिजे, म्हणजे बेकारीचा प्रश्न आपोआपच सुटेल, (६) प्रत्येकानें साधी रहाणी व उच्च विचाराचें ध्येय आपणांपुढें ठेवलें पाहिजे, (७) खेडेगांवांनीं संघ करून ग्रामपंचायतीनें स्वतःचें संरक्षण स्वतःच केलें पाहिजे, म्हणजे सरकारास पोलिस व फौजेचा खर्च कमी करतां येईल व जनतेसहि कराचा बोजा कमी करून घेतां येईल, (८) खेडेगांवांतील लोकांनीं केलेला माल शहरवासीयांनीं घेतल्यास त्यांना मदत होईल व आपलीहि गरज आपल्या देशांत होणाऱ्या वस्तूंनीं भागवितां येईल, (९) या

ग्राम-सुधारणेच्या कार्याकरितां पैशाच्या पेक्षां सुद्धां कळकळीच्या व स्वार्थ-त्यागी माणसांची जरूरी आहे. त्यांनीं हें कार्य करीत असतां स्वतःबद्दलच्या मोठेपणाच्या खोट्या कल्पना बाजूस ठेवून खेड्यांतील लोकांशीं मिळूनमिसळून वागलें पाहिजे.

या परिषदेच्या वेळीं वेगवेगळ्या ठिकाणीं खेड्यांत काम करणाऱ्या मंडळींनीं आपापले अनुभव सांगून त्यांच्या मतांप्रमाणें वेगवेगळे उपायहि सुचविले. परिषद भरविणारांचा मुख्य उद्देश म्हणजे या विचार-विनिमयापासून सर्वमान्य असे ग्रामोन्नतीचे मार्ग आंखून शहरांतील लोकांस आपल्या खेड्यांत राहणाऱ्या बांधवांना कोणकोणत्या प्रकारें मदत करितां येईल, याची दिशा दाखविणें हा होय. हल्लीं वेगवेगळ्या ठिकाणीं निघालेल्या अशा प्रकारच्या संस्था या डेक्कन ॲग्रिकल्चर असोसिएशनच्या कार्यकर्त्यांच्या खटपटीचें द्योतकच आहेत.

याशिवाय आमचे मतें मुख्य जरूरी म्हणजे शेतकरीवर्गाचा कर्ज-बाजारीपणा कमी केला पाहिजे. गेल्या वर्षी बँकिंग कमिटीनें जो रिपोर्ट प्रसिद्ध केला, त्यांतील आंकडे पाहिले म्हणजे शेतकऱ्यांची किती हलाखीची स्थिति झाली आहे, हें लक्षांत येईल. मुंबई इलाख्यांतील जमिनीची एकंदर किंमत अदमासें १०३ कोटी असून शेतकऱ्यांना कर्ज ८० कोटी रुपये आहे. नुसत्या शेतकीवर निर्वाह करणाऱ्याला त्यांच्या जमिनीच्या किंमतीपेक्षां जास्त कर्ज असेल. जे लोक दुसरे धंदे करून शेतकी करतात किंवा जे मोठे जमिनदार असतात त्यांच्याच तेवढ्या जमिनी कर्जा-शिवाय आहेत. त्या परिस्थितीचा विचार केला म्हणजे प्रत्येकाची खात्री होईल कीं, नुसत्या को-ऑपरेटिव्ह सोसायट्या किंवा तगाई यांनीं काम भागणार नाहीं. सरकारनें शेतकऱ्यांच्या कर्जविमोचनाकरितां एखादा कायदा केल्याखेरीज गत्यंतरच नाहीं. डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स् रिलीफ ॲक्टनें शेतकऱ्यांस फायदा तर कांहींच झाला नाहीं व उलट त्यांची पत कमी होऊन त्यांना हंगामाच्या वेळीं लागणारें कर्ज मिळण्यांत सुद्धां अनेक अडचणी उपस्थित झाल्या. याकरितां हल्लींच्या कायद्यांत सुधारणा तरी केली पाहिजे किंवा सरकारनें अगदीं थोड्या व्याजानें रकमा तरी दिल्या पाहिजेत. तशाच जुन्या धार्मिक कल्पना व

लग्नकार्यांत विनाकारण होणारा खर्च करण्याची संवय घालविण्यास सार्वत्रिक शिक्षण दिलें पाहिजे. वाचनालयासारख्या संस्था स्थापून सद्यःपरिस्थितीची जाणीव, वर्तमानपत्रें अगर व्याख्यानें यांच्या साहाय्यानें खेड्यांतील प्रत्येक व्यक्तीस करून दिली पाहिजे. तसेंच मॅजिक-लॅन्टर्न अगर सिनेमा या रूपानें स्वच्छतेचीं व आरोग्यशास्त्राचीं तत्त्वें खेडेगांवांतील लोकांच्या मनावर बिंबविलीं पाहिजेत. त्यांच्यांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न करून ती चांगल्या मार्गाकडे लाविली पाहिजे. खेड्यांतील लोकांस हंगामाच्या वेळीं सर्वांत जास्त जरूरी पैशाची लागते ती भागविण्यासाठीं पतपेढ्या स्थापून कमी व्याजानें पैसे मिळण्याची सोय केली पाहिजे व शेतकऱ्यांस बींबियाण्यासाठीं वेळेस पैसे देऊन अगर बाजारभाव नसल्यास मालावर आगाऊ पैसे देऊन भाव आला म्हणजे तो माल विकण्याची सोय केली पाहिजे. दलालांच्या मध्यस्थीस ( Middleman's profit ) आळा घालून पिकविणारे (Producer) आणि विकत घेणारे ( Consumer ) यांची गांठ घालून दिली पाहिजे, म्हणजे घेणारास माल स्वस्त पडून शेतकऱ्यांचा फायदा होईल.

दिल्ली येथें ता. १३ मार्च, १९३२, रोजीं अखिल-भारतीय ग्रामसुधारणा परिषद झाली. तींत त्यांनीं खेड्यांची सार्वत्रिक सुधारणा व त्यांची सर्वांगीण उन्नति करण्याकरितां जमीनमहसुलाबाबत धोरणांत ताबडतोब सुधारणा, तगाईच्या पद्धतीचें बँकेच्या स्थापनेंत रूपांतर, खेड्यापाड्यांच्या विकासासाठीं एका मंडळाची स्थापना, खेड्यांत स्वयंसेवक-पोलिसांची संघटना, रयतेच्या हक्कांची सनद, दलालांना आपले खिसे गरम करतां येऊं नयेत या हेतूनें वस्तूंच्या किंमतींवर नियमन, स्वयंशासित ग्रामांचा कारभार, इत्यादि ठराव पास केले.

वेगवेगळ्या ठिकाणचे ग्रामसुधारणा करणारे लोक कोणत्या मार्गांनीं कार्य करीत आहेत व तसेंच खेड्यांतील लोकांच्या कोणकोणत्या गरजा आहेत हें दाखविण्याचा या लेखांत प्रयत्न केला आहे. प्रत्येक ठिकाणीं हे सर्वच उपाय लागू पडतील असें नाहीं. तरी परिस्थित्यनुरूप कोणकोणते फरक करण्याची जरूरी लागेल हें प्रत्यक्ष त्या ठिकाणीं काम करणारास जास्त कळूं शकेल. ग्रामसुधारणेचें काम अंगावर घेऊं इच्छिणारांनीं कोणत्या

मार्गानें सुरुवात करावी, त्याची दिशा दाखविण्याचा येथें प्रयत्न केला आहे. तरी या प्रकारचें कार्य अंगावर घेणाऱ्यास या लेखापासून थोडातरी फायदा झाल्यास लेखक आपणास धन्य समजेल, व आपल्या खेड्यांतील खितपत पडलेल्या आपल्या बांधवांस हस्तें-परहस्तें मदत केल्याचें त्यास श्रेय मिळेल.

---

## काव्यप्रवेश

### लेखक : काव्यभूषण मार्तंड नारायण आचार्य, नाडसूर.

[ हे नाडसूर, तालुका सुधागड, येथील रहिवासी होत. त्यांना कवितेबद्दल मुंबई येथें भरलेल्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाकडून पदक मिळालें आहे. त्यांचीं काव्यें दादरच्या कवि-मित्र-मंडळानें प्रसिद्ध केलेल्या काव्यसंग्रहांतून प्रसिद्ध झालीं आहेत. संगीत कीर्तिसिंह, संगीत लघुशाकुंतल, संगीत सतिप्रभाव, श्रीगुरुगीतावलि, तत्पदानुरागम्, वगैरे पुस्तकें त्यांनीं लिहिलेली आहेत. ]

" ननु वक्तृविशेषनिःस्पृहा, गुणगृह्या वचने विपश्चितः "

—भारवि

स्थूल मानानें काव्य म्हणजे काय, तें कसें असतें व अंगीं असलेल्या कवित्वशक्तीचा विकास होण्यासाठीं कशाची जरूर असते, यांचा येथें थोडक्यांत सोदाहरण विचार करणार आहें. विषय मतभेदाला पात्र असल्यामुळें, जेथें कांहीं भाग आपल्या रुचीविरुद्ध जाईल तेथें आपण शांतचित्त राहून तें सहन कराल अशी मी आशा करतों. तसेंच हा प्रयत्न काव्यांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या होतकरू तरुणांकरितां आहे हें प्रारंभींच सांगून ठेवण्याची परवानगी घेतों व विशेष शब्दविस्तार अगर शब्दच्छल न घडेल अशी काळजी घेऊन विषयाकडे वळतों.

प्रथम कवि व काव्य यांचे व्युत्पत्तिदृष्ट्या काय अर्थ संभवतात व यांना परंपरेचा आधार लावून त्यांपैकीं कोणता अर्थ निश्चित होतो तें पाहूं. ' कवि ' या शब्दाचा ' क्रांतदर्शी ' असा अर्थ सायनाचार्य देतात. ' क्रांत ' म्हणजे ' पलीकडचें ' व ' दर्शी ' म्हणजे ' दाखविणारा '. येथें थोडें ध्यानांत

आणलें पाहिजे कीं, 'दर्शी' या पदाचा 'पाहणारा' असा अर्थ करण्यापेक्षां 'दाखविणारा' असाच अर्थ करणें इष्ट होणार आहे. नुसतें स्वतःपुरतें पहाणाऱ्यापेक्षां स्वतः पाहून इतरांस तें समजेल अशा रीतीनें दाखविणारा केव्हांहि श्रेष्ठ असणार. आणि कवींत हेंच वैशिष्टय असतें. जर इतरांनीं काव्यदृष्टि शिकली पाहिजे तर उलटपक्षीं कवींनींहि लोकव्यवहारदृष्टि ठेविली पाहिजे. म्हणजे आपणांस समजलेलें तत्त्व लोकांस समजेल अशा रीतीनें त्याचें वर्णन करण्याची पात्रता कवीच्या अंगीं असली पाहिजे. या संबंधांत—

'श्लिष्टाः क्रिया कस्यचिदात्मसंस्था संक्रांतिरन्यस्य विशेषयुक्ता ।
यस्योभयं साधु स शिक्षकाणां धुरि प्रतिष्ठापयितव्य एव ॥'

या कालिदासीय सदुक्तीची मीं आपणांस आठवण दिली असतां प्रस्तुताचें चांगलें स्पष्टीकरण होईल. असो.

आतां 'पलीकडचें' हा शब्द अन्यसापेक्ष आहे. म्हणजे एखादी गोष्ट दुसरीच्या पलीकडची असूं शकेल, परंतु तिसरीच्या मात्र अलीकडची असूं शकेल. तेव्हां अशा रीतीनें आनंत्य उत्पन्न होऊन अनवस्थाप्रसंग घडूं नये, म्हणून आपल्या अध्यात्मप्रवण पूर्वजांनीं 'क्रांत' याचा 'जडाच्या पलीकडचें' असा अर्थ करून 'क्रांतदर्शी' या शब्दाचा अध्यात्मपर श्रेष्ठ अर्थ निश्चित केला. 'कविं कवीनामुपमश्रवस्तम्', 'कविं पुराणमनुशासितारं' वगैरे ठिकाणीं हाच अर्थ व्यक्त होतो.

परंतु सामान्य व्यवहारांत कवीची व्याख्या करतांना हा अर्थ व्यर्थ होणार. आपणांस जडांतील कवीविषयीं बोलावयाचें आहे. जडाच्या पलीकडे व्यवहार करणाऱ्याकडे कवी म्हणून पहावयाचें नाहीं. तेव्हां कवि व काव्य या शब्दांचे अर्थ रूढीला कल्पनेचें साहाय्य देऊन व अनुभवाची कसोटी लावूनच आपण ठरविले पाहिजेत.

'कवयति पंडितराजः' म्हणजे जगन्नाथ पंडित काव्य करितात. पंडितांनीं रसगंगाधरांत काव्याचीं सर्व उदाहरणें पद्यांत दिलीं आहेत; गद्यांत एकहि उदाहरण दिलेलें नाहीं. भट्ट मम्मटहि काव्याचीं उदाहरणें पद्यांतच देतात. किंबहुना काव्यावर लिहिणाऱ्या प्रत्येक ग्रंथकारानें आजवर काव्याचें उदा-

हरण पद्यांतच दिलेलें आढळेल. हें सर्व ध्यानांत घेतलें असतां एक निश्चित अनुमान निघतें; आणि तें हें कीं, काव्याचा पद्याशीं अत्यंत निकट किंबहुना अभेद्य संबंध असला पाहिजे. म्हणजे सदभिरुचीच्या दृष्टीनें काव्य हें पद्यांतच असलें पाहिजे. काव्यमय रचनेला गद्य ही भूमिका नव्हे. पद्य—त्यांत इतर गुण नसल्यास—कदाचित् काव्य ठरणार नाहीं. परंतु पद्याशिवाय काव्य मात्र केव्हांहि असूं शकणार नाहीं. पूर्वींच्या काव्यग्रंथलेखकांचा असा अभिप्राय नसता, तर काव्याचीं गद्यात्मक उदाहरणें देणें त्यांनाहि अशक्य नव्हतें. परंतु तसें कांहीं घडलेलें नाहीं. "गा तूं गा नादी भ्रमरा । मी 'गणमात्रा जुळणारा'" हे एका अर्वाचीन कविवर्यांचे सहजोद्गार काव्य आणि पद्य यांचा अभेद्य संबंधच दर्शवितात.

यालाच आपण आतां आपल्या कल्पनेचें साहाय्य देऊन काय ठरतें तें पाहूं. काव्यांत चमत्कृति असली पाहिजे, वैचित्र्य असलें पाहिजे, नेहमींपेक्षां कांहींतरी निराळें त्यांत भासलें पाहिजे. आतां हें वैचित्र्य दोन प्रकारचें संभवणार, अर्थवैचित्र्य व शब्दवैचित्र्य.

एखादी अर्थवैचित्र्यपूर्ण कल्पना, आपण ज्या गद्यांत नित्यव्यवहार चालवितों, त्याच्या साहाय्यानें व्यक्त केली असतां, ती जितकी आनंदप्रद होईल त्याहिपेक्षां तीच कल्पना रचनाचातुर्योपेत पद्याच्या साहाय्यानें भूषित केली असतां अधिक आनंदप्रद होईल हें कोणासहि नाकबूल करतां येण्यासारखें नाहीं. गद्यांत अर्थ व्यक्त होईल, परंतु त्याचा उठाव पद्याप्रमाणें परिणामकारक होणार नाहीं व त्याचप्रमाणें गद्यमय रचनेंत रचनाचातुर्यहि फारसें कसास लागणार नाहीं व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या कुतूहलाचाहि अभावच असणार. आणि यासाठीं मला वाटतें काव्याचीं म्हणून जीं उदाहरणें पूर्वग्रंथकारांनीं दिलीं तीं सर्व पद्यमयच निवडलीं. या संबंधांत थोडा अधिक विचार केला असतां दुसरेंहि कारण आपल्या ध्यानांत येईल आणि तें हें कीं, काव्यांत रसाचा परिपोष आवश्यक आहे व तो अत्युत्कट वीररसाचे दृश्य प्रसंग अपवाद सोडून इतर सर्व प्रसंगीं अनुकूल रागदारीच्याच साहाय्यानें परिणामकारक होतो व रागदारीची सोय पद्यांतच लाविली आहे. अर्थात् रसाची उत्कटता दाखविण्यास पद्याचीच आवश्यकता असते व अनुभवानें

हेंहि ठरेल कीं, पद्यविशिष्ट रचना करणें हें एक कौशल्य आहे. त्यांतच कवीच्या भाषेवरील प्रभुत्वाची कसोटी आहे. 'चातुर्य मोठें रचनेंत आहे' हा चरण काव्यसेवकांना परिचित आहेच. असो. वरील विवेचनावरून हें ध्यानांत येईल कीं, अलीकडील गद्यकाव्यपंथ निर्मूल ठरतो. गद्याला अर्थ असतो व त्यांत रसोत्पत्तीहि होते; परंतु पद्याशीं त्याची तुलना करतां रचनावैचित्र्यामुळें उत्पन्न होणाऱ्या विशिष्ट चमत्कृतीला व अनुकूल रागदारीच्या आलापांनीं अधिक परिणामकारक होणाऱ्या रसपरिपोषाला गद्यकाव्य केव्हांहि पारखेंच राहणार! आणि याच दोन गुणांत काव्याचें अर्धेंअधिक वैभव सांठलें असल्यामुळें, गद्याचा त्यांत समावेश करणें उचित नाहीं असें माझ्या अल्पमतीला व अनुभवाला पटतें व कोणीहि पक्षाभिनिविष्ट न होतां विचार करील तर त्याचीहि तशीच खात्री होईल अशी मला आशा आहे.

उदाहरणार्थ, आतां एकच अर्थाचें गद्य व पद्य घेऊन यांच्या साहाय्यानें वरील गोष्ट व्यक्त करून निर्णय रसिकांचे मर्जीवर ठेवून हें विवेचन पुरें करतों.

हें गद्य पहा—

'रत्नाकराच्या भेटीसाठीं अंतःकरणांत उडालेली खळबळ आपल्या शेंकडों तरंगांच्या द्वारें व्यक्त करून "धो धो" वाहणारी नर्मदा नदी, जणुं कांहीं धापा टाकीत आहे असें वाटलें."

तोच अर्थ पद्यद्वारा पुढीलप्रमाणें देतां येईल.

**समुत्सुका कीं, विजनाथदर्शनीं तरंगरूपें हृदयार्ति दावुनी ।**
**रेवा महाशब्दवती जणूं ही करीत दीर्घश्वसनास पाही ॥**

कवीची कृति जें काव्य तें पद्यात्मक असणेंच इष्ट आहे, हें येथवर पाहिल्यावर आतां त्यांत आणखी कोणते विशेष असले पाहिजेत त्याचा विचार करूं. त्यापूर्वीं गद्यकाव्यपंथ कोणत्या कारणानें अथवा कारणांनीं प्रचारांत येऊं पहात असावा याचा थोडक्यांत विचार करणें वाउगें होणार नाहीं.

आपणांस माहितच असेलच कीं, काव्याचें परीक्षण करण्यास कवीचीच जरूरी असते असें नाहीं. कांहींजण कवि नसूनहि उत्तम काव्यपरीक्षक असतात, याचें कारण ते रसाचे भोक्ते व काव्यांतील गुणदोषांचे ज्ञाते

असतात. कवि हा रसादिकांचा निर्माता असतो व भोक्ता हा त्याचे गुणदोष जाणणारा असतो, हें कवि व काव्यपरीक्षक यांचें नातें आहे. या काव्य-परीक्षक-भोक्त्याचे मनांत कधीं काळीं जर स्वतःच कवि होण्याचें आलें तर मला वाटतें पद्यमय रचनाचातुरीच्या अभावीं त्याला आपली हौस गद्य कवींचा पंथ निर्माण करूनच फेडून घ्यावी लागणार. परंतु, वस्तुतः पद्यमय रचना-चातुरीच कविपद प्राप्त करून देणारी आहे. अन्यथा—

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समः ।
यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥

या केवळ क्रोधयुक्त वाणीनें उच्चारलेल्या शापप्रद रचनेनेंच भगवान् वाल्मीकींना आद्य कवि अशी संज्ञा कधींहि प्राप्त झाली नसती. गद्य अगर पद्य यांच्या साधनांशिवाय नेत्रमुद्रा इत्यादिकांच्या साधनांनीं केलेले परिणामकारक अर्थपूर्ण हावभाव, हेहि काव्य कां असूं शकणार नाहींत? असल्या प्रश्नांसहि कवींच्या अतिव्याप्त खुल्या दरबारांत अलिकडे वाव मिळणें कठीण जात असल्यामुळें, हा गद्यपंथ निर्माण करणाऱ्यांना स्व-समर्थन करणें अशक्यप्राय होत नाहीं व कोणतीहि अथवा कशीहि शास्त्रीय मीमांसा त्यांचें समाधान करूं शकणार नाहीं. तथापि, अनुभवी रसिक हें ' शम्यभावे अश्मंतकपूजन ' आहे एवढें तरी खासच समजणार!

वरील विवेचनानें गद्य कवींनीं मजवर राग मानूं नये, अशी माझी त्यांना विनंति आहे. कारण हा ऊहापोह मी द्वेषान्वेषणबुद्धीनें करीत नसून माझ्या अनुभवास जें पटलें तेंच लोकांपुढें मांडून सत्यान्वेषणासाठीं करीत आहें. माझें मत सदभिरुचीच्या विरुद्ध आहे असें दर्शविणारी कपिलाषष्ठी आल्यास मी तिचाहि पर्वणी म्हणून आनंदानें स्वीकार करण्यास हरकत घेणार नाहीं. असो.

येथवर केलेल्या विवेचनावरून ज्या माझ्या ज्ञाताज्ञात होतकरू कवि-सहचरांसाठीं मीं प्रस्तुत उपक्रम केला आहे, त्यांनीं प्रथम आपल्या पद्यरचना-शक्तीची वाढ कितपत झाली आहे, हें मुख्यत्वें ठरविणें जरूर आहे, असें सिद्ध होतें. यांतहि मात्रावृत्तापेक्षां अक्षरवृत्तेंच अधिक श्रेयस्कर. कारण

मात्रावृत्तांत रचनेला बरीच मोकळीक असते. परंतु अक्षरवृत्तांत सरस काव्य करणें तारेवरील कसरतीसारखें असतें. अलीकडे अक्षरवृत्तांचा बहुतांशीं लोप होत चालला आहे. त्यांच्या अनेक कारणांपैकीं दुर्गमत्व हें एक प्रमुख कारण होय. असो. विशिष्ट साच्यांत अन्वर्थक शब्द योजणें कठिण असल्यामुळें एकच अर्थ व्यक्त करणारे अनेक शब्द योजणें कवीला अपरिहार्य असतें हेंहि विसरतां कामा नये. म्हणजे कवीचें वाचनच दांडगें असून चालणार नाहीं, तर त्याची उपस्थितीहि जागृत असली पाहिजे. अशा प्रकारें लीलेनें शब्दरचना घडूं लागली म्हणजे पुढें पाऊल टाकणें सोपें असतें.

वर सांगितलेला पद्यमय रचना करण्याचा गुण साध्य झाल्यावर त्यांत आणखी कशाची भर घातली पाहिजे तें पाहूं.

"कवयः किं न पश्यन्ति"—म्हणजे कवि काय पाहूं शकत नाहींत ? हा उत्तरगर्भ प्रश्न आहे. अर्थात् आपल्या बुद्धिमत्तेच्या व सूक्ष्म दृष्टीच्या जोरावर सामान्य जनांस अगोचर असलेले वस्तुजातांतील गूढ अर्थ कवि पाहूं शकतो. म्हणजे ज्याला कवि होणें असेल त्यानें सृष्टीच्या सूक्ष्म निरीक्षणाचा अभ्यास चालू ठेवलाच पाहिजे व जडजंगम वस्तुजातांतहि बोधपर भावार्थ अनुभवून तो जगास आपल्या नादमधुर वाणीनें निवेदिला पाहिजे. आतां मानवी विकार नऊ रसांत विभागिले असल्यामुळें तो भावार्थ व तें नादमाधुर्य रसानुभूतीप्रमाणें निरनिराळ्या पद्धतींनीं दाखविलें गेलें पाहिजे; व असें करितांना तो तो रस त्या त्या नादमाधुर्याच्या साहाय्यानें कितपत परिणामकारक होतो, तें मुख्यतः पाहिलें पाहिजे. कारण रस हा काव्याचा आत्मा आहे. पद्यापासून उत्तम रसोत्पत्ति होत असल्यास त्यांतील इतर गुण पाहण्याची आवश्यकता नसते.

पण यांतही 'वृक्षबीज-न्याया'सारखीच गुंतागुंत आहे हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. अनुकूल राग ( वृत्त ) व अनुकूल सालंकार शब्दरचना असल्याशिवाय काव्यांत परिणामकारक रसोत्पत्ति होत नाहीं. तथापि असेहि कांहीं हृदयस्पर्शी प्रसंग असतात कीं, ते सहज वर्णिले असतांहि परिणामकारक होतात. अशा वेळीं काव्यांतील इतर अंगें ढिलीं असल्यास चालण्यासारखें असतें. तथापि कवीचें खरें कार्य म्हणजे लोकांना ज्यांत कांहीं विशेष दिसत

नसेल अथवा दिसत असूनहि ठसत नसेल, त्यांतच तसें कांहीं आहे हें पटविण्याचें अगर ठसविण्याचें असल्यामुळें काव्यांतील रसपरिपोषाला जरूर असलेल्या उपांगांकडे त्यास बहुशः लक्ष ठेवावें लागतें. तिकडे दुर्लक्ष झाल्यास काव्य नीरस होतें, म्हणजे रसशून्य दिसतें. याची कल्पना येण्यासाठीं पुढील पद्याचें यथामति गुणदोषविवेचन करतों.

**गंगेच्या परिस जरीहि जान्हवीचें आकारें द्विगुणित पात्र होय तीचें**
**तत्रापि प्रथिततरा तिहींहि लोकीं त्या दोघींतुनि पाहिलीच राहते कीं ॥**

—चिंतामणि पेठकरकृत गंगावर्णन.

वरील कवितेंत कवीला गंगेचें महत्त्व वर्णन करावयाचें आहे व तसें करून इतरांची तद्विषयक भावना उद्दीपित करावयाची आहे, हें स्पष्टच दिसतें. कोणत्याहि व्यक्तीचें अगर वस्तूचें महत्त्व वर्णन करतांना ज्या विशिष्ट गुणामुळें ती व्यक्ति अगर वस्तु प्रसिद्धीस आली असेल, त्याचा निर्देश केला असतां ईप्सित रसनिष्पत्ति घडते. अथवा ती व्यक्ति अगर वस्तु स्वयमेव-नामनिदर्शनानेंच परिणाम करणारी असेल तर ‘ हें का सांगितलें पाहिजे ? ’ किंवा ‘ हें सारें जग जाणतेंच ’ अथवा ‘ तुम्हांला हें माहीत आहेच ’ अशा रीतीची योजना करून वाचकांची भावना उद्दीपित केली पाहिजे. गंगा भरतखंडांत प्रसिद्ध आहे ती तिच्या पावनत्वामुळें! त्याचाहि प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष निर्देश होणें जरूर होतें. तीच कविता आपण थोडा फरक करून म्हणूं.

**गंगेच्या परिस जरीहि जान्हवीचें आकारें द्विगुणित पात्र होय साचें**
**तत्रापि स्वजलपुनीतसागरा कीं या दोघींतुनि पाहिलीच वंद्य लोकीं ॥**

प्रस्तुत फेरफारांत ‘ स्वजलपुनीतसागरा ’ या विशेषणानें सगरकुलाच्या उद्धारप्रसंगाची आठवण देऊन गंगेचें माहात्म्य स्पष्ट केलें व त्यामुळें वाचकांची भावना सहज उद्दीपित केली; व ‘ वंद्य ’ या विशेषणानें पावनत्वाविषयींची प्रसिद्धि ध्वनित केली. असो. आतां मुळांतील ‘ तीचें ’ हें निरर्थक पद काढून त्या ठिकाणीं ‘ साचें ’ हें अर्थाला दार्ढ्य देणारें पद योजिलें आहे; व कवीची तादात्म्यशक्ति दर्शविण्यासाठीं ‘ त्या ’ या प्रकृष्टांतरदर्शक

सर्वनामाचे ठिकाणीं ' या ' हें सान्निध्यवाची दर्शक सर्वनाम योजिलें आहे. मला वाटतें आतां मूळ कविता रसोत्पादनाच्या दृष्टीनें निर्दोष अशी झाली आहे.

यावरून हें समजावयाचें कीं, ज्या काव्यांत रसाचा अभाव असतो तें गद्यमय पद्य समजलें पाहिजे. तथापि येथें हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, स्वतंत्र रसोत्पत्ति करण्यास अवसर असूनहि जेथें कवीला तें साधलें नाहीं तेथेंच हा दोष काढतां येईल. अन्यथा मुख्य विषयाचे वर्णनांत जेथें उपांग म्हणून वृत्तमात्रवर्णन संदर्भानुरोधें जरूर असतें तेथें दुसरें काव्य काय संभवणार ? तशा ठिकाणीं गद्यमय दिसणारें पद्यहि निर्दोषच असणार. उदा० ' अथ प्रजानामधिपः प्रभाते ' ही रघुवंशांतील द्वितीय सर्गाच्या प्रारंभींची कविता ! कथानुसंधानाला आहे तशीच अवश्य आहे. या कवितेंत विशिष्ट भावना उद्दीपित करण्याचें प्रयोजन नाहीं व तें स्थलहि नव्हे. म्हणून असल्या सर्व कविता वरील दोषाला पात्र नसतात.

तेव्हां अशा रीतीनें रचिलेल्या आपल्या पद्यमय काव्यांत रसाची उत्पत्ति झाली आहे किंवा नाहीं हें कवीनें पाहिलें पाहिजे. त्याचप्रमाणें उत्पन्न झालेल्या रसाची हानि होणार नाहीं, अशीहि काळजी घेतली पाहिजे. रसहानीचें उदाहरण मी आपल्यापुढें ठेवितों.

कन्यारूपी परक्याचें धन ठेव म्हणुनि जें होतें
अर्पुनि अजि तें ज्याचें त्याला धन्य जाहलों वाटे;
मुलिंनो, जाउं अतां । गेली लाडकि मम दुहिता ॥

—आण्णासाहेब किर्लोस्कर.

वरील साकी 'अर्थोहि कन्या परकीय एव—' या कालिदासीय पद्याचें भाषांतर आहे. शकुंतलेची सासरीं रवानगी करतांना सामान्यजनांप्रमाणें शोकमग्न झालेल्या आपल्या चित्ताला आवरून गांभीर्य धारण करून भगवान् कण्वांनीं हे उद्गार काढले आहेत. म्हणजे ते करुणरसांतून शांतरसांत येत आहेत. कालिदासानें तें चित्र रीतसर रंगविलें आहे. परंतु वरील रूपांतरांत कालिदासाची कल्पना पहिल्या दोन ओळींतच पुरी झाली व पुढें साकी

वृत्त पुरें करण्यासाठीं म्हणून पुस्ती देतांना कवीनें तादात्म्य न ठेविल्यामुळें योग्य रचना घडली नाहीं. ' गेली लाडकि मम दुहिता ' हे उद्गार पुन्हां अपत्यप्रेमाचा पगडा बसवून शांतरसाची हानि करण्यास कारणीभूत झाले. हेंच पद्य आपण सुधारून म्हणं—

**कन्यारूपी परधन होतें रक्षितव्य जें म्हणुनी**
**अर्पुनी आजी ज्याचें त्याला झालों मी मुक्तऋणी**
**चिंता लव नुरली। आतां शांति मना आली.**

प्रस्तुत चरणांनीं शांतरसाची हानि न होतां उलट परिपोषच झाला. तेव्हां काव्य हें पद्यांत असलें पाहिजे व त्यांत रसोत्पत्ति झाली पाहिजे व उत्पन्नरसाची हानीहि होतां कामा नये एवढें स्पष्ट झालें.

यापुढें काव्याला आणखी कोणत्या गुणांची आवश्यकता असते तें पाहूं. काव्यांत वृत्ताची निवड रसानुकूल असावी आणि वर्णरचना निर्दोष म्हणंजे मुख्यत्वें व्याकरणशुद्ध, यतिभंग-दोषरहित व अक्लिष्ट आणि रसानुकूल असावी. तसें नसल्यास वाचकांचा विरस होऊन रसाचा परिपोष होण्यास अडचण पडते.

सदोष वृत्तांचीं खालील उदाहरणें पहा—

**१. पांडुनृपति जनक जया। माता कुंति यदुतनया**
**धर्म भीम बांधव जया। नामें विजय जो।।** ( सं. सौभद्र )

**२. ते कुटिल कपटी काकजातींचे** ( सं. शारदा )

**४. धिःकार मन साहिना !** ( सं. मानापमान )

वरील वृत्तें प्रसंगानुकूल नाहींत. प्रथम पद्यांतील वृत्त तर पात्रानुकूल नाहीं. हीं सर्व पद्यें आजमितीस रंगभूमीवर गाइलीं जात असल्यामुळें होतकरू कविमित्रांनीं अवश्य ऐकून रसपरिपोषाला अडथळा होतो कीं काय तें ठरवावें. असला दोष टाळण्यासाठीं ज्या वृत्तांत काव्य करावयाचें तें वृत्त कवीनें संपूर्ण पचनीं पाडलें पाहिजे. वृत्त पचनीं पडल नसल्यास तेथें प्रस्तुत दोष क्लिष्टतादोषहि बहुमानपूर्वक घेऊन होत असतो. कारण उघड आहे

कीं, अशा वेळीं कवि हा जें पद्य गृहित धरून आपलें काव्य रचीत असतो त्या पद्यांतील ऱ्हस्वाशीं ऱ्हस्व, दीर्घाशीं दीर्घ व अक्षरें अर्थाला धरून जुळविणें त्याला क्लेशदायकच होत असतें व तेंच पुढें सहृदय श्रोत्यांनाहि तापदायक होणें अपरिहार्य असतें. विशेषतः संगीत नाटकांतच वृत्तदोष आढळतो. याचें कारण नाटक मंडळींतील ज्या नटाला जें वृत्त ( चाल ) चांगलें म्हणतां येत असेल त्याच वृत्तांत पद्य रचावें अशी कवीला सक्तीची शिफारस असते. अशा प्रसंगीं कवींना दोष देण्यापेक्षां परिस्थितीचीच कींव करणें बरें.

आतां यतिभंगाचीं उदाहरणें घेऊं:—

१. त्या दोघींतुनि पहिलीच राहते कीं ॥

वरील ओळ प्रहर्षिणी वृत्तांतील आहे. पहिल्या तीन अक्षरांनंतर तिचा यति असतो. प्रस्तुत ठिकाणीं एका बाजूला ‘ तुनि ’ या प्रत्ययानें विरहित असें ‘ दोघी ’ हें रूप निराळेंच निघतें तें दोषार्ह आहे.

२. दिधले असतेच बळी सर्व गांढिवा ॥

या पद्यांत ‘ दिधले अस ’ येथें यति येतो. तो फारच कटु आहे, हें व्याख्यान देऊन सांगण्याची जरूरी नाहीं.

आतां वर्णरचनेबद्दल कांहीं ठोकळ नियम सांगून त्यांचीं उदाहरणें देऊं. बरेचसे प्रौढ ( संस्कृतप्रचुर ) शब्द काव्यांत योजून त्यांतच एखादा अगदीं प्राकृत अगर परक्या भाषेंतील शब्द योजणें अनुचित असतें. हा दोष भाषा-दारिद्र्यामुळें अथवा रचनाचातुर्याच्या अभावामुळें अगर धंदेवाईकपणांतील बेफिकिरीनें संभवतो. उदाहरणार्थः—

१. शस्त्र जसें तें अबला-कराला। रूप जसें तें जोगिणीला
सत्ता सुखरत अधमाला । धनजडजना मदत पतना ॥

२. बाजूला खडक असोनि उंच भारी। वाहे त्यामधुनि तिचें
विशुद्ध वारी ॥

वरील पद्यांतील ‘ मदत ’ हा शब्द पहावा म्हणजे सावांच्या मेळ्यांत एकटाच चोर घुसल्यासारखा दिसतो! वेळींच थोडी काळजी घेतली तर त्याची हकालपट्टी सहज करतां आली असती. ‘ शिकवि ’ ‘ बळवि ’ अशा-

सारखी कांहीं रचना अशक्य नव्हती. आतां दुसऱ्याच पद्यांतील 'खडक' हा शब्द पहावा. मला वाटतें या खडकावर टीका न केलेलीच बरी!

आतां अर्थाच्या व व्याकरणाच्या दृष्टीनें शब्दांची अनुचित योजना होते. उदाहरणार्थः—'कोण्या शक्तिवशें कबंध लढलें सांगा शिरावेगळें?' (विपिनविहारी) यांत 'वश' शब्दांतील अर्थदोष व व्याकरणदोष सोडल्यास काव्य उत्तम असें म्हणतां येईल. परंतु 'वश' पदाचा शक्ति या शब्दाशीं जोडलेला संबंध अनर्थावह आहे. वीर शक्तीला वश होऊन पराक्रम करीत नसतो, तिच्या जोरावर करितो. शक्तीची छाप वीरावर नसून उलट वीराची छाप तिच्यावर असते. मनुष्य ज्या कारणानें स्वस्थिति सोडून विपरीत (निराळ्या) अवस्थेंत खुषीनें अगर नाखुषीनें प्रवेश करितो त्या वेळीं त्या कारणास तो वश होऊन तें करतो, हें म्हणणें उचित आहे. उदाः—भीतिवश भक्तिवश, परंतु शक्तिवश हें अनर्थावह आहे. याच शब्दांत दुसरें व्याकरणदृष्टीचेंहि व्यंग आहे. 'वश' हें येथें विशेषण आहे. त्याला तृतीयेचा प्रत्यय लावला आहे! 'कोण्या शक्तिबळें कबंध लढलें सांगा शिराबेगळें?' अशी रचना केली असतां दोष राहणार नाहीं. आतां वर्ण्य विषयाशीं संपूर्ण तादात्म्य न झाल्यामुळें असलाच्च दोष संभवतो. उदाहरणार्थः—'प्रफुल्ल होऊनि सुपुष्प ठेलें। तोषूनि ऐका तरि काय बोले। माझ्याच साठीं फुललों न मी हें। ऐका समस्तांप्रति सांगताहें॥' येथें फुललों हा प्रयोग फुललें असा पाहिजे.

(४) आतां रसानुकूल मृदुकठोर वर्णांकडे लक्ष न पुरविलें असतां काय होतें तें पाहूं. उदाहरणः—

अखर्वरूपें चल कंबुकंठि। कंठा तुझ्या या भिडवीच कंठीं।
तुझ्याविणें प्राण टिकेल कैसा। उत्फुल्ल रात्रीविण चंद्र कैसा।?' (स्वकृत)

वरील पद्यांत एक प्रियकर आपल्या प्रणयिनीची प्रेमयाचना करीत आहे. अशा वेळीं प्रणयरसाला अनुकूल असलेले मृदु वर्ण येतील तितकें बरें. परंतु या ठिकाणीं उलट झालें आलें. म्हणजे कठोर वर्णांचेंच आधिक्य झालें आहे. त्यामुळें पद्य कर्णकटु लागतें. हेंच जरा फेरफार करून म्हणूं.

‘ अमोघरूपे सखये सुशोभने !
गळ्यांत या घालि गळा शुभानने !
जगेल हा जीव तुझ्याविणें कसा
निशावियोगीं विधु हीनसा जसा ! ” ( स्वकृत )

या पद्यांत मृदु वर्णांचें आधिक्य असल्यामुळें वर्णानुकूल्याच्या दृष्टीनें दोष राहिला नाहीं.

( ५ ) आतां निरर्थक अथवा अनवश्यक शब्द पद्यांत आला असतां, विशेषत: प्रारंभीं अथवा वृत्ताच्या उठावाचे ठिकाणीं कशी हानि होते तें पहा:--

मला मदन भासे । मोही मना

या पद्यांत ‘मला’ हें अनवश्यक पद प्रारंभींच आलें आहे. त्यामुळें रसोत्पत्तीला ‘ मूले कुठार: ’प्रमाणें झालें आहे. नायिका मोहित होऊन नायकाचें वर्णन करीत आहे. अशा वेळीं लडिवाळपणा व्यक्त करणाऱ्या शब्दापासून अगर विकारानुकूल उद्गारवाचकांपासून पद्यास प्रारंभ केला असतां तात्कालिक रसोत्पादन होतें. निदान अनवश्यक शब्द तरी प्रारंभीं योजूं नये. याच पद्याची आपण अशी सुरुवात करूं.

अहा ! मदन भासे । मोही मना
किंवा सखा मदन भासे । मोही मना

येथें रसोत्पत्तीला अडथळा राहिला नसून सहृदयालाहि नाक मुरडण्यास कारण उरलें नाहीं.

( ६ ) आतां एखाद्या रसाचें उत्कट वर्णन करतांना होणाऱ्या शब्द-रचनेंत कोणत्याहि सनातन भावनेस धक्का बसणार नाहीं, अशी योग्य काळजी कवीनें घेतली पाहिजे. कारण कवीचा अधिकार रूढ तत्त्वें उठावदार रीतीनें व्यक्त करण्याचा असतो, त्यांत फरक करून नवीन तत्त्वें प्रतिपादन करण्याचा नसतो, असें जग समजत असतें आणि तें योग्यच आहे. म्हणून ज्या शब्द-रचनेंत तसल्या तत्त्वास बाध येऊं पहात असेल ती शब्दरचना काव्यदृष्टीनें कितीहि सरस असली तरी त्याज्यच ठरणार ! उदाहरणार्थ:--

( १ ) ‘ कांते, फार तुला मजसाठीं ’ या पद्यांतील ‘ जरि वरिला असता दुर्योधन। पाहिली तरी असती नेत्रांनीं ’ हे चरण किती भलतेंच तत्त्व प्रतिपादन करणारे आहेत पहा! अर्जुनासारखा वीर भावी पत्नीविषयीं शोक करीत असतां हे उद्गार काढतो! आणि तोहि कोणता अर्जुन? तर ‘ दिधले असतेच बळी सर्व गांडिवा! ’ असे वीरसहज उद्गार प्रारंभींच काढणारा! आर्यावर्तांत असले नादान उद्गार काढणारा किंवा पत्नीविषयक शुद्ध प्रेमाची व्याख्या असल्या अधम तत्त्वशून्यत्वाला पोंचविणारा कोणीहि पुरुष वीर-मालिकेंत संमानिला जाणार नाहीं. असें असतांहि कवीनें त्याचा शोकविकार उत्कट दिसावा म्हणून वर्णनाचे भरांत भान न राहून यथास्थित वर्णिलें आहे. उलटपक्षीं ‘ आमर्षण: शोणितकांक्षया किं, पदास्पृशंतं दशति द्विजिन्ह: ’ हे श्रीरामचंद्राचे तेजस्वी उद्गार आठवा!

( २ ) करिन यदुमनीं सदना। रुचिर सदन पतिमन सतींना
अशुभमणीमय भुवन अबलांना। जरि हा नाथ रमेना

प्रस्तुत पद्यांत आलंकारिक कोटिक्रम करण्याचे भरांत सतीचें ध्येय दाखविलें आहे. पतीच्या हृदयांत जागा मिळण्याची इच्छा स्त्रीनें केल्यास तें योग्यच आहे. परंतु एवढ्याच ध्येयानें ती सती होईल कीं काय हा प्रश्न आहे. उलटपक्षीं पतीच्या हृदयावर स्वामित्व गाजवितां न आल्यामुळें एखादी पतिव्रता सतीत्वाला पारखी होईल कीं काय? पतीचा वास आपल्या मनांत व्हावा, हें पतिव्रतेचें मुख्य ध्येय असतें. तें साधीत असतां सहजच वरील पद्यांतील परिस्थिति प्राप्त झाल्यास तिला अप्रिय होईल असें नाहीं; तथापि तसें घडून आलेंच पाहिजे असें तिला वाटणार नाहीं; व ती ‘ पति मुठींत ठेविन पुरता ’ असली प्राकृत इच्छा कधींहि व्यक्त करणार नाहीं. हा दोष टाळण्यासाठीं ‘ सती ’ या वैशिष्ट्यवाचक शब्दाचे ऐवजीं याच पद्यांत पुढें जसा ‘अबलांना’ हा सामान्य शब्द योजिला आहे, तसाच एखादा योजिला असता म्हणजे बरोबर झालें असतें. सारांश, पद्यरचना करतांना न कळत कां होईना आपल्या हातून एखाद्या सत्तत्त्वाचा घात अगर अध:पात होणार नाहीं, अशी कवीनें खबरदारी घेतली पाहिजे. नुसत्या कल्पनामय काव्यांतहि

अशी काळजी न घेतल्यास दोष घडतो. मग ज्या सत्तत्त्वांचा अवलंब करून जगांतील मोठमोठे समाज स्थिति धरून राहिले आहेत, त्यांत संशय उत्पन्न करणारें काव्य सदोष गणलें गेल्यास नवल काय ? असो.

येथवर केलेल्या विवेचनावरून स्थूल मानानें कवि व काव्य यांची कोणासहि कल्पना येईल असें वाटतें. अर्थात् हें केवळ दिग्दर्शन आहे. अधिकारयुक्त कवी होण्यासाठीं—

सप्रमाणं तु तद्विद्धि विदुषां ग्रंथसेवया ।
उपदेक्ष्यंति ते काव्यं निश्चितं पारदर्शिनः ॥

असेंच कोणासहि सांगणें योग्य होणारें आहे.

आतां कवि असणाऱ्यांनीं अथवा कवि होऊं पहाणारांनीं लक्षांत ठेवाव्या म्हणून एक दोन सूचना करण्याची परवानगी घेतों. अलीकडे काव्य व तत्त्वज्ञान यांचीं नांवें सविकल्प समाधि व निर्विकल्प समाधि यांच्याप्रमाणें आहेत असें प्रतिपादलें जातें. तें माझ्या मतें बरोबर नसून एक प्रकारचें कवित्वच आहे. वस्तुतः सविकल्प समाधि व निर्विकल्प समाधि या त्याच तत्त्वज्ञानांतील दोन अवस्था असून एक सगुण रूपांत रममाण करणारी आहे व दुसरी निर्गुणसाक्षात्कारांत सायुज्यता देणारी आहे. त्या अवस्थांचा कवि व काव्य यांशीं कसलाहि संबंध नाहीं. कवि हा भेद कल्पून निरनिराळ्या नऊ रसांत बुड्या मारणारा आहे; तर त्या अवस्था भेदभावांचा नाश करून एकत्व सिद्ध करणाऱ्या आहेत. आतां कोणी म्हणतील उपनिषदांत काव्य आहे मग उपनिषदें म्हणजे तत्त्वज्ञान नव्हे काय ? बरोबर. उपनिषदें म्हणजे तत्त्वज्ञान. परंतु त्यांत काव्य आहे म्हणून नव्हे. तर तत्त्वज्ञानी पुरुषांनीं काव्याचा आश्रय करून तत्त्वप्रतिपादन केलें म्हणून ! काव्याचा आश्रय करण्याचें कारण ज्यांच्या कल्याणासाठीं उपनिषदें रचिलीं ते नव रसांत सुखदुःख अनुभविणारे अज्ञानी जन ! त्यांची समजूत प्रथम त्यांच्याच मार्गानें घालून, क्रमानें भेदबुद्धीचा निरास करून, सर्व रसांच्या पलीकडे असणारी जी अवस्था—सोईसाठींच जिला ब्रह्मानंद असें म्हटलें आहे—तिचा आस्वाद केव्हांतरी त्यांना घेतां यावा म्हणून.

मुलांचे मनांत आंकड्यांचें ज्ञान ठसण्यासाठीं रंगीत गोट्यांचा जितपत उपयोग होतो, तितपतच काव्याचा उपयोग तत्त्वज्ञान पटविण्यासाठीं तत्त्व-ज्ञानी करीत असतो. म्हणजे कवीची योग्यता कमी आहे असें समजूं नये. व्यवहारांत कवीची योग्यता खरोखर मोठी आहे. परंतु तेथें ती तशी आहे म्हणून भलतीच भ्रांतिमूलक महत्त्वाकांक्षा धरणें योग्य नाहीं. कवि हा विचार व उच्चार या दोहोंचा स्वामी असतो, तर तत्त्वज्ञानी हा विचार, उच्चार व आचार या त्रयीचा अधीश्वर असतो.

त्यालाच मी संतकवि म्हणूं इच्छितों. म्हणजे संतकवि हे तत्त्वज्ञानी. या तत्त्वज्ञांनीं प्राकृत जनसमूहासाठीं आपल्या प्रासादिक रसाळ वाणीनें काव्य-रूपी साधन घेऊन तत्त्व प्रतिपादिलें. अर्थात् काव्य म्हणजे तत्त्व नव्हे. तसेंच कवि म्हटला कीं, तो तत्त्वज्ञानी असेंहि नव्हे. इतकेंच नव्हे तर कवित्वाचा अंत म्हणजे तत्त्वज्ञानाचा प्रारंभच अशी वस्तुस्थिति आहे. हा विस्तार माझ्या कविमित्रांसाठीं मी हेतुपुरःसर करीत आहें. साहित्यपरिषदेसारखे खटाटोप लौकिक कवींचे आहेत व कवीची सर्वसाधारण व्याख्याहि लौकिकाला धरूनच असली पाहिजे हें लक्षांत ठेवून आपला अधिकार ओळखूनच कार्य केलें पाहिजे, तरच तें लोकप्रिय होईल. अन्यथा लोकांत आपल्या काव्य-शक्तीची चांगलीच चहा होत आहे, असें पाहून आपण तत्त्वज्ञानी झालों अशा दंभांत कोणीहि मग्न होऊन भलत्याच मोहाला बळी पडूं नये, म्हणून या अनुकूल संधीचा फायदा घेऊन मीं हें सांगण्यांत आपलें कर्तव्य बजा-विलें आहे. असो.

दुसरी सूचना म्हणजे मराठी कवींनीं संस्कृत भाषेशीं अल्प तरी परिचय ठेविला पाहिजे ही होय. कारण मराठी भाषा अद्यापि पूर्णावस्थेला पोंचली नसल्यामुळें व संस्कृत वाङ्मयाशीं तिचा अत्यंत निकट संबंध असल्यामुळें त्या भाषेंत काव्य करणाऱ्या कवींना संस्कृताचें पायाशुद्ध अत्यल्प ज्ञान अपरि-हार्य आहे असें मला वाटतें; व या गोष्टींत दोन फायदे साधतात. एक पद-लालित्यादि शब्दरचना या गुणासंबंधीं व दुसरा काव्यदृष्टिविषयक. काव्यदृष्टि म्हणजे काव्याकडे पहाण्याची पद्धति. अलीकडे मराठी कविता मुख्यत्वें आंग्ल-विद्याविभूषितांचे हातीं गेल्यासारखी असल्यामुळें व बहुतांशीं पदवीधरांचें

संस्कृतविषयाचें अध्ययन बेताचें असून कालमानानुसार इंग्रजी भाषेवरच प्रभुत्व असल्यामुळें आर्यांच्या काव्यदृष्टीवर आंग्ल पद्धतीचा चष्मा ठेविल्याशिवाय चालेनासें होऊं पहात आहे. यासाठीं माझी विनंति आहे कीं, माझ्या कविमित्रांनीं संस्कृत मुळींच येत नसल्यास थोडेंतरी शिकावें. थोडें येत असल्यास जरा श्रम घेऊन अधिक वाढवावें. पूर्वीच्या आपल्या संस्कृत ग्रंथांचें बुद्धिसामर्थ्यानें आकलन करावें व वर्डस्वर्थच्याहि एखाद्या काव्यविषयक कोटिक्रमाला पंडित जगन्नाथरायांसारख्यांची थोप देऊन आपल्या प्राचीन काव्यसंपत्तीचें तेज जगाच्या निदर्शनास आणावें. याचा अर्थ असा नव्हे कीं, मी आंग्ल पद्धतीचा द्वेषी आहें. परंतु आपलें सोडून सर्वस्वीं परक्यांच्या पद्धतीवर अवलंबून राहणें, हें अज्ञानाचें व स्वाभिमानशून्यतेचें लक्षण आहे. याला मी एक मोघम दाखला देतों. एका आंग्ल पदवीधर महाराष्ट्र-काव्यसेवकाशीं संभाषण चालू असतां, ते म्हणाले, "अहो! उत्तम काव्य उन्मनावस्थेंतच घडूं शकतें." मी म्हणालों, "कां हो! उन्मनावस्था म्हणजे काय?" ते म्हणाले, "उच्च अवस्था!" मला वाटतें एखाद्या इंग्रजी निबंधांतल्या विशिष्ट शब्दाला उन्मनावस्था हा त्यांनीं आपल्या बुद्धीनें प्रतिशब्द शोधून काढलेला असावा. असो. मी त्यांना म्हणालों, "हा तुमचा अर्थ चुकीचा आहे." तरीहि ते ठासूनच म्हणाले, "आम्ही याच अर्थानें त्याचा उपयोग करतों." येथें वादच मिटला. या गोष्टींत गमतीबरोबर बोधहि आहे हें आपल्या ध्यानांत येईलच.

सारांश, माझ्या कविमित्रांनीं प्रथम आपलें पचनीं पाडून नंतरच दुसऱ्याचें जिरविण्याचा प्रयत्न करावा, अशी विनंति करून आतां उपसंहाराकडे वळतों.

प्रस्तुत लेखांत काव्याचें सर्वसाधारण स्वरूप सांगितलें आहे. वरील विवेचनावरून सामान्यतः काव्य म्हणजे सरस व निर्दोष अशी पद्यरचना व तें रचण्याची ज्याला निसर्गदत्त शक्ति आहे तो कवि, हें स्पष्ट झालें.

या लहानशा निबंधांत विस्तारभयास्तव ध्वनि व मध्यम काव्य यांचें विवरण करणें अशक्य असल्यामुळें व क्रमवार पाहतां काव्यप्रवेशांतील ती दुसरी पायरी असल्यामुळें व आज काव्याचें स्थूल स्वरूप निश्चित करण्याचेंच मीं योजिलें असल्यामुळें तसें केलें नाहीं. आतां विषयप्रतिपादनार्थ ज्या महाशयांचे

काव्यांतील दोष मी समजुतीप्रमाणें दाखविले त्यांची अथवा त्यांच्या पक्षपाती सज्जनांची मजवर अवकृपा होऊं नये अशी विनंति आहे.

शेवटीं काव्यावर निरनिराळे लहानमोठे स्वतंत्र निबंध लिहीत व वाचीत बसण्यापेक्षां साहित्यभक्तांनीं प्रस्तुत परिषदेंत* एकमत करून पूर्वीच्या एखाद्या प्रमाणभूत संस्कृत काव्यग्रंथाचें मराठींत भाषांतर करण्याचें ठरवून व तसें करून होतकरू कवि-तरुणांना उपकृत करावें व स्वभाषेला समृद्ध केल्याचें श्रेय घ्यावें अशी त्यांना आग्रहाची विनंति करून व माझीं मतें शांतपणें ऐकून घेतल्याबद्दल सभेचे आभार मानून—

इत्येषा शारदादेवी पादपंकजयोः शुभा ।
अर्पिता वाङ्मयीपूजा प्रीयतामनया गुरुः ।।

या स्तवनानें कर्म गुरुचरणीं अर्पण करून आपली रजा घेतों.

---

# आपली विवाहसंस्था

लेखकः बा. पां. पागे, भोर.

" शुभ लग्नऽसावधान ! ! " चे ध्वनी आनंददायी तर खरेच; परंतु ते जितके आनंददायी भासतात त्यापेक्षां कितीतरी पटीनें ते अर्थगांभीर्यपूर्ण आहेत ! त्या अर्थगांभीर्याची ओळख कोणत्याहि वयातील इसमास नव्यानें करून देणें नकोच. कारण, मानवी आयुष्यांतील तीनचतुर्थांशाहून अधिक भाग व्यक्तिमात्र ऐहिक सुखसाधनांच्या साहाय्यानें घालवितांना त्याच्या आयुष्याच्या ध्येयपूर्तीसाठीं मनुष्याच्या जीवनांत जी एक अलौकिक क्रान्ति घडून येत असते, ती याच मंगल ध्वनींत एकवटलेली असते ! अर्थात् विवाहित आयुष्याची सुरुवात ज्या ध्वनीमुळें होत असते ते ' शुभ लग्नऽसावधान'चे ध्वनी आनंददायी व मानवी आयुष्यांतील महत्त्वाच्या स्थित्यंतराचे दिग्दर्शक म्हणूनच ओळखिले जात असतात आणि ते तसे गेलेहि पाहिजेत. परंतु, या

---

* ' कवि-मित्रमंडळ ', दादर, या संस्थेच्या वतीनें मुंबईच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनांत वाचलेला निबंध.

मांगल्यपूर्ण संक्रमणास्थितीचें मंगल स्वरूप ज्या एका विशिष्ट गोष्टीवर अवलंबून असतें त्या गोष्टीकडे आजच्या समाजाचें असावें तितकें–नव्हे मुळींच–लक्ष नसल्यामुळें वरील आनंददायी ध्वनी अंतीं अतिशय दुःखदायी ठरतात ! आणि शेवटीं त्या मंगल मंत्राक्षरांनीं बद्ध होणारीं वधूवरें म्हणूं लागतात कीं, " देवा, कशाला आमच्या नशिबीं ही घोर विवाहघडी लिहून ठेविलीस ? "

वरील कारणामुळेंच पांढरपेशा समाजांतील चालू विवाहपद्धतीप्रमाणें झालेलीं बरींच लग्नें घेतलीं तर त्यांत वधूवर सारख्या प्रमाणांत सुखानें नांदत असलेले केव्हांच दिसत नाहींत. हीं वधूवरें केवळ विवाहबंधनाच्या ग्रंथीनें ग्रथित केलीं गेलीं असल्यानें त्यांचीं अंतःकरणें एकमेकांशीं संलग्न होतातच असें मात्र नाहीं. यामुळें कित्येक कुटुंबें समाधानास कायमचीं अंतरलेलीं असून पति आणि पत्नी यांच्यांत निरंतरची असंतुष्टता वास करिते. आतां ही असंतुष्टता नेहमींच तिऱ्हाईत इसमाच्या दृष्टोत्पत्तीस येईल असें मात्र नाहीं. ती कांहीं ठिकणीं नवराबायकोंच्या परस्पर वागणुकीवरून तर कांहीं ठिकाणीं त्यांच्या घरांत नांदणाऱ्या औदासिन्यावरून वगैरे साधनांनीं शोधून काढावी लागते. परंतु, ज्या ज्या ठिकाणीं ही असंतुष्टता अतिशय वाईट थराला जाऊन पोहोंचलेली असते, तेथें ती बहुतेक आपोआपच बाहेर पडत असते. कारण अशा ठिकाणीं पति व पत्नी हीं आपल्या मनांतील असमाधानाचा भाव आपल्या जिव्हाळ्याच्या माणसाजवळ व्यक्त करीत असतात; किंवा याहीपेक्षां ज्यास्त कडेलोट म्हणजे तीं पापाचरणाचा किंवा आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात.

अशा तऱ्हेच्या दुःखी जोडप्यांच्या असमाधानाची कारणमीमांसा जर कोणी करूं लागला तर त्याला एकच गोष्ट कळून चुकेल कीं, या बिचाऱ्यांचें लग्न ज्या घडीवर ठरलें आणि लागलें तीच विवाहघटी त्यांना खोटी लागली. कारण, त्या वेळीं त्यांच्या अंतःकरणांत वसत असलेल्या अत्यंत नाजुक भावनांचा त्या विवाहानें चक्काचूर करून टाकला. आतां हा चक्काचूर प्रत्येक जोडप्याचे बाबतींत अगदीं सुरुवातीसच वधूवरांस कळून येतो असें नाहीं. वधू आणि वर हीं दोघेंहि विवाहपूर्वकालीं आपल्या विवाहोत्तर कालांतील व्यवहाराचीं चित्रें आपल्या मनोभूमीवर काढीत असतात. विवाह-

बंधनांनीं बद्ध होणारीं वधूवरें एकमेकांना पूर्वपरिचित असून एकमेकांचीं वैवाहिक सुखाचीं चित्रें आणि आशा जर सारख्याच असतील तर त्यांना विवाहित आयुष्यांत वर लिहिल्याप्रमाणें दुःखाचे प्रसंग केव्हांहि येत नाहींत. तसेंच पूर्व परिचय नसतांनाहि लग्न होणारीं वधूवरें जर एकाच मनोरचनेचीं असतील आणि त्यांच्या भावी सुखाच्या कल्पना व आशा जर सारख्याच असतील तर तींहि सुखासमाधानानें नांदूं शकतील. परंतु, अशा प्रकारचीं युगुलें आजच्या समाजांत फारच थोडीं सांपडतील. विवाहपूर्व कालीं रंगवलेलीं सुखाचीं चित्रें शतशः छिन्नविछिन्न झालेलीं आहेत अशा निराश मनांचींच वधूवरें आजच्या समाजांत विवाहहोमांत होरपळून निघालेलीं दिसतात. या चित्रांची मोडतोड, ज्या ठिकाणीं प्रेमभंगाची आंच वधूवरांच्या अंतःकरणास पुरेपूर लागली आहे, त्या ठिकाणीं वधूवरांच्या दृष्टोत्पत्तीस जास्तच भयंकर स्वरूपांत येत असते; तीहि बहुतेक अगदीं सुरुवातीसच कळून चुकते. अशा ठिकाणीं हीं विवाहित वधूवरें ज्या वेळीं आपल्या गत सुखाशांचीं चित्रें आपल्या कल्पनासृष्टींत निर्माण करीत असतात, आणि त्या चित्रांची प्रत्यक्ष सृष्टींतील सत्य प्रत्यक्षांशीं त्यांची तुलना करूं लागतात त्या वेळीं एकमेकांचे सखे एकमेकांसमोर दुःखाश्रु गाळूं लागतात. अशा वेळीं ' अंतरांत तोहि रडे । लिहिलें नशिबांत रडें ! । ' या कव्युक्तीची तात्काल आठवण होते ! तसेंच कांहीं वधूवरांचीं अंतःकरणें सुरवातीस प्रणयजालांत गुंतलेलीं नसतात, परंतु वैवाहिक सुखाच्या कल्पना मात्र त्यांच्या मनश्चक्षूंपुढें विवाहपूर्वकालींच वसत असतात, आणि विवाहित आयुष्यांत भिन्न रुचि अगर इतर कोणत्याहि कारणांवरून अंतीं तीं चित्रें पार भंग पावून जातात. अर्थात् अशा प्रकारच्या वधूवरांना एकमेकांच्या स्वभावांतील खांचाखोंचा जोंपर्यंत पूर्णपणें माहित झालेल्या नसतात, तोंपर्यंत त्यांचा विवाहित आयुष्यांतील कडवट सत्य त्यांना मुळींच दिसत नाहीं. परंतु, त्यांच्या आयुष्याचे दिवस जसजसे पुढें जाऊं लागतात, तसतसे त्यांना एकमेकांच्या सहवासापासून व्हावें तसें सुख होईनासें होतें आणि शेवटीं 'इब्सेन'च्या ' Doll's House ' नाटकांतील नायकनायिकेप्रमाणें विवाहबंधनांची शृंखला त्यांना असह्य होते. अशा प्रसंगीं जर काडीमोडीसारखी

सवलत समजानें ठेविली असेल तर वधूवरें तिचें साहाय्य घेण्यास कधींच कमी करणार नाहींत. परंतु, दुर्दैवानें हिंदुधर्मशास्त्राच्या सांप्रतच्या स्वरूपांत 'Once a marriage, always a marriage' अशी स्थिति असल्यामुळें अशा प्रकारच्या जोडप्यांचें विवाहित जीवन त्यांना अगदीं शापवत् वाटूं लागतें. या दुःसह स्थितीची जाणीव वधूवरांना अर्थात् विवाहोत्तर कालांत कांहीं कालांतरानें येत असते. यामुळें अशा तऱ्हेचे विवाह सुरुवातीस सुखकारक असेच भासत असतात. परंतु, अशी स्थिति केवळ वधूवरांच्या स्वभावाचें संपूर्ण ज्ञान वधूवरांस आलेलें नसतें यामुळेंच निर्माण होते. ह्या प्रकारचे विवाह इतर कोणत्याहि प्रकारच्या विवाहापेक्षां जास्तच दुःखदायी वाटतात. कारण, अशा ठिकाणीं प्रथम प्रथम सुखाची थोडीशी आशा निर्माण होत असते, आणि शेवटीं त्या आशेचे अगदीं तुकडे तुकडे होऊन जातात. विवाहपूर्व कालांतच प्रणयभंग होऊन विवाहास उभें राहणें भाग पडलेल्या जोडप्यास आपला मार्ग केवळ निराशेंतूनच काढावा लागत असतो. त्यांना पुढील दुःखाची बरोबर जाणीव आलेली असते. यामुळें अंतीं तीं वधूवरें शेवटच्या प्रकारच्या विवाहानें गांगरून जात नाहींत. तथापि त्यांच्या दुःखाचा भार मात्र यामुळें कांहीं हलका होऊं शकेल असें मानण्यास जागा नाहीं. फक्त अशा वेळीं तीं येणाऱ्या परिस्थितीस तोंड देण्यास तयार असतात.

---

## मार्गप्रतीक्षा

कविः—अनंत हरि जोशी, पुणें.

[ जन्म सन १९१२, राहणार वांजळवाडी, तालुके प्रचंडगड. सध्यां फर्ग्युसन कॉलेजमध्यें इंटर आर्टस्च्या वर्गांत आहेत. ]

( वृत्त—दिण्डी )

प्रतीचीला भेटण्या अंशुमाली
सिद्ध झाला, विहगही साथ घाली
नभीं सोन्याचे सडे शिम्पलेले!
कसे अद्यापि कुणीही न आले?

पहाटेसी कामास लागलेले
उदय होतां जन घरा परत आले
निशादेवींचें दान त्यांस युक्त
प्रियामीलन ही सन्धि होय प्राप्त !
कुण्या वीराची अङ्गना वरून
कशी निरखीते तिचा दुजा प्राण
'अतां येणें इकडुनी खास होई !'
अश्वदौडी देखण्या उत्सुका ही !
कुण्या मजुराची तशी घरधनीन
कशी दुरुनी पाहते न्याहळून
'धनी ममहि येतील दुजा प्राण
गोष्टि जीवांतील बोलतील दोन !'
प्रिया विरहें ही दुःखिता चकोरी
ऐकवेना त्या आर्तस्वरा भारी !
भेटण्यासी हरिणाक्षि चालली ही;
नाथ अपुला देखुनी धन्य होई !
हंस-हंसी बघ दम्पती मिळून
चालली ही सङ्गतीं गात गान !
'वाट पाहूं किति ?' वदे अशी बाळा,
'सांज झाली परि अजुनि कां न आला ?'
कुणी तेथें मागुनी वीर येई
करें अपुल्या झांकिले नेत्र दोही !
प्रतीक्षेचें फल लाधलें तियेला
अरुणलाली रङ्गली दोहि गालां !

# भारतीय धर्मशास्त्राचें वैशिष्ट्य

लेखकः वासुदेवशास्त्री कोनकर, वांई.

सुमारें ७।८ वर्षांपूर्वी आमचे एक स्नेही अहमदाबादेस गेले होते. त्यांचा व तेथील एका गृहस्थाचा मनोरंजक संवाद झाला. त्या गृहस्थांना बोलतां बोलतां सनातन धर्माचें लक्षण काय असा प्रश्न विचारला. आमचे स्नेही दार्शनिक वाङ्मयांत निष्णात पंडित असलेमुळें त्यांना माहित असलेलीं सर्व लक्षणें त्यांनीं सांगितलीं. पण त्या गृहस्थांचें समाधान झालें नाहीं. तेव्हां आमच्या मित्रांनीं ‘ आपण लक्षणें सांगा ’ अशी विनंति केली. ‘ स्पर्शास्पर्श-विचार, भक्ष्याभक्ष्य-विचार व विवाह्याविवाह्य-विचार या तीन तत्त्वांवर अधिष्ठित तो सनातन धर्म. ’ या लक्षणानें माझे मित्र आश्चर्यचकित झाले. कारण सनातन धर्म कांहीं याच तीन तत्त्वांवर अधिष्ठित नाहीं. त्या धर्मानें ज्या गोष्टींचा विचार केला आहे, त्यांत या तीन येतात, इतकेंच म्हणतां येतें. पण पुष्कळशा लोकांची समजूत वरीलप्रमाणेंच आहे. सोनगीर येथील विद्वत्परिषद् व अकोलें येथील बृहन्महाराष्ट्र ब्राह्मणपरिषदेचें अधिवेशन यांनीं वरील विचारसरणीला जोराचा धक्का दिला व काशीस्थ पंडितांचे वाद महाराष्ट्रीय पंडितांशीं सुरू झाले. याचकरितां काशीस अखिल भारतीय ब्राह्मण संमेलन भरविलें गेलें. धर्मशास्त्र हें समाजशास्त्र आहे, त्यांतील तत्त्वें फार व्यापक आहेत, परिस्थितीप्रमाणें नवीन आचार, राजकारण इत्यादिकांचा परिपाक त्यांत आहे, ही विचारसरणी महाराष्ट्रीय पंडितांनीं समाजापुढें ठेवली आहे. त्याचाच विचार प्रस्तुत लेखांत थोडक्यांत करावयाचा आहे.

जगांत आजपर्यंत अनेक संस्कृती उत्पन्न झाल्या व कालौघाबरोबर त्या नष्टहि झालेल्या आहेत. कांहींचा पत्ता अस्पष्टपणें लागला आहे, कांहींचा त्या-पेक्षां थोडा अधिक आहे. उर्वरित अवशेषांवरून त्या त्या संस्कृतीचें ज्ञान आपणांस होत आहे. पण मौज अशी आहे कीं, गत संस्कृतीचे जन्म व मृत्यु दोन्ही पाहिलेली कोणती संस्कृति आजतागायत विद्यमान असेल तर ती भारतीय संस्कृतीच होय. रोम, ग्रीक, खाल्डिअन, बाबिलोनिअन, असि-रिअन इत्यादि अनेकगत संस्कृतींचा अभ्यास त्यांच्या उर्वरित आवशेषांवरून

आज संशोधक करीत आहेत. ज्या संस्कृतींतील गोष्टी अधिक निसर्गानुसारी असतील ती संस्कृति व तो समाज जगांत अधिक काल जिवंत राहतो. मानवाची अखंड परंपरा टिकविणें हा हेतु भारतीय संस्कृतीइतका दुसऱ्या कोत्याहि संस्कृतींत सिद्ध झालेला दिसत नाहीं. भारतवर्षांत वरील हेतु पूर्ण करण्याचा प्रयत्न धर्मशास्त्रांत दिसतो.

जगांतील इतर धर्मशास्त्रांत व भारतीय धर्मशास्त्रांत अनेक बाबतींत महदंतर आहे. 'रस्त्यानें जाणाऱ्यायेणाऱ्यांपैकीं कोणीं कोणाला वाट द्यावी' या व्यवहारांतील साध्या गोष्टीपासून तों तहत मोक्षापर्यंतच्या सर्व गोष्टींचा समावेश धर्मांत होतो, असें भारतीय धर्मशास्त्र कंठरवानें सांगत आहे. मनु, याज्ञवल्क्य इ. स्मृति व आपस्तंब, गौतम इ. धर्मसूत्रें उघडून पाहिल्यास त्यांत वर्ण, आश्रम, संस्कार, आचार, राजनीति, व्यवहार, आपद्धर्म, अशौच, प्रायश्चित्त इ. इ. अनेक समाजोज्जीवक व समाजपोषक गोष्टींचा ऊहापोह केलेला आढळून येईल. भारतीय धर्मशास्त्रांत परिवर्तनें झालेलीं आहेत. नवीन अनुभव, नवीन सुखदुःखें, नवीन राजकारण इत्यादि गोष्टींचीं परिवर्तनें होणें हा अपरिहार्य परिणाम आहे. तसेंच धर्मकारण, समाजकारण व राजकारण हीं तीन निरनिराळीं, एकमेकांपासून अत्यंत भिन्न आहेत. ह्या विचारसरणीला या धर्मशास्त्रांत कोठेंच आधार सांपडणार नाहीं. "यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः' धर्म हा ऐहिक व पारलौकिक उत्कर्ष साधून देणारा आहे, असें वैशेषिकांचें म्हणणें आहे. हीच गोष्ट 'धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मो धारयते प्रजाः। यः स्याद्धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः॥' या महाभारतांतील श्लोकांत असंदिग्ध भाषेंत सांगितली आहे. व्यक्तीच्या, कुटुंबाच्या व समाजाच्या प्रत्येक क्रियेवर निर्बंध घालून त्याला विशिष्ट वळण दिलेलें आहे, हा याचा अर्थ आहे. धर्मशास्त्र हें आयुर्नियमन करणारें शास्त्र आहे. व्यक्ति, कुटुंब व समाज यांच्या आयुष्याचें तें नियमन करतें. ही व्यापक व्याख्या भारतीय धर्मशास्त्राइतकी इतर धर्मशास्त्रांना लागू होईल कीं नाहीं याची शंका वाटते.

ऐतिहासिकांच्या मतें भारतीय संस्कृति ही कमींत कमी दहा हजार वर्षें जिवंत आहे. एक वर्ग असेंहि म्हणणारा आहे कीं, वैदिक काळापूर्वींसुद्धां भारतांत उत्तम दर्जाची संस्कृति नांदत होती. लोक सुधारलेले होते. तिला

ते ' सूत संस्कृति ' म्हणतात. नंतर वैदिक आर्यांनीं येऊन आपल्या संस्कृतीची छाप वरील संस्कृतीवर पाडून तिला आत्मसात् केलें. कसेंहि असो ! एवढी गोष्ट निश्चित आहे कीं, आज ही संस्कृती दहा हजार वर्षे जिवंत आहे. याचें पुष्कळसें श्रेय भारतीय धर्मशास्त्राला आहे, हेंहि तितकेंच खरें आहे. कारण धर्मशास्त्राचा आरंभसुद्धां वेदापासूनच आहे. " वेदोऽखिलो धर्ममूलम्' हें भगवान् मनूचें म्हणणें सार्थ आहे.

एकच एक वक्ता व एकच एक धर्मग्रंथ असेल तर किती सुटसुटीतपणा असतो ? नेमकें बोट ठेवून तो सांगतो कीं, हा आदेश देणारा व हा ग्रंथ. नाहींतर भारतीय धर्मशास्त्रांत पहा ! ' नैको ऋषिर्यस्य वचः प्रमाणम् । ' मनु, याज्ञवल्क्य, हारीत, नारद इ. हजारों ऋषी धर्म सांगणारे आहेत. कोणाचें खरें व कोणाचें खोटें समजावें ? महमंद पैगंबर वक्ता व कुराण धर्मग्रंथ, यशू खिस्त प्रवक्ता व बायबल धर्मग्रंथ अशा प्रकारची साधी, सुटसुटीत पद्धत भारतीय धर्मांत नसल्यामुळें हा धर्म म्हणजे एक कडबोळें आहे आणि त्यामुळें हिंदु समाजाचें अत्यंत अहित झालेलें आहे; अशी विचारसरणी गेल्या कांहीं वर्षांत ठिकठिकाणीं ऐकूं येते, पण ती चुकीची आहे. ' साधनानामनेकता ' व ' उपास्यानामानियमः ' हा या धर्मांत दोष नसून गुणच आहे. सर्वसंग्राहकता हा मोठा फायदा आहे बरें ! सर्वच स्मृतिकार एकदम एके ठिकाणीं झालेले आहेत, असेंहि आम्ही म्हणत नाहीं. विभिन्न देशकालपरिस्थितींत स्मृति रचल्या गेल्या आहेत; आणि हा नवीन आचार, नवीन सुखदुःखें, नवीन राजकारण इत्यादिकांचा परिणाम आहे. तत्त्वें कायम ठेवून देशकालपरिस्थित्यनुसार परिवर्तनें करणें इतका लवचिकपणा अन्यत्र कोठेंच आढळणार नाहीं. हा मोठा सद्गुण आहे. याच गुणावर आजपर्यंत भारतवर्ष जगलें आहे. मानवी स्वभाव भारतीय धर्मशास्त्रकारांइतका दुसऱ्या धर्मशास्त्रकरांनीं लक्षांत घेतला नाहीं. तात्पर्य, जे दोष म्हणून दाखविले जातात ते दोष नसून गुण आहेत व जे गुण वाटतात ते मोठे दोष आहेत. कारण मानवी स्वभाव ते लक्षांत घेत नाहींत.

मनुष्यस्वभाव हा नेहमीं आजच्या पुढें धांवत असतो. भविष्य काळांत काय ? हा प्रश्न तो सोडविण्याची खटपट करतो. जो व्यक्तीचा तोच समा-

जाचा स्वभाव आहे. यामुळें एकाच दैवी व्यक्तीच्या आदेशानें नेहमींच समाजाचें आयुर्नियमन शक्य होत नाहीं. ' न हि सर्वः सर्वं जानाति ' हा तर भारतीयांचा बाणा आहे. भारतीय धर्मशास्त्रांत वरील दोष नाहीं. वेद, सूत्रें, स्मृति, पुराणें इत्यादि वाङ्मय हें सर्व धर्मशास्त्रांत मोडतें. सूत्रें, स्मृति, पुराणें यांना मूलभूत वेद होत. पण आज उपलब्ध वैदिक वाङ्मयांत न आढळणारे शेंकडों विधिनिषेध धर्मसूत्रें व स्मृति यांतून विस्तरशः आले आहेत. सूत्रकार व स्मृतिकार हे विधिनिषेध सांगत असतांना वेदप्रतिपादित तेंच सांगत आहों असें सांगतात. मग ते उपलब्ध वेदभागांत न आढळल्यास लुप्त अथवा गुप्त वेदभागांत आहेत; अशी त्यांची कोटी आहे. पण हें खरें कीं, स्मृतिकारांनीं सांगितलेल्या पुष्कळशा गोष्टी लिंग, अर्थवाद, विधि इत्यादि स्वरूपांत आढळतात. वेदमूलकत्व सांगत असतांना स्मृतिकार दोन गोष्टी साधत असतात. वेदच आपले मूल ग्रंथ आहेत, ही गोष्ट वारंवार समाजाचे डोळ्यापुढें ठेवून त्यांवरील समाजाची श्रद्धा कमी न होऊं देण्याचा प्रयत्न करतात व परिस्थितीप्रमाणें पालटलेल्या आचारांचें निरूपण करून त्यांना वेदमान्यतेचा शिक्का देतात. आपस्तंब व हिरण्यकेशीय सूत्रांचे आरंभींच "अथातः सामयाचारिकान् धर्मान् व्याख्यास्यामः । धर्मज्ञसमयः प्रमाणम् । वेदाश्च ॥ " इत्यादि सूत्रांवरून ही गोष्ट सिद्ध होते. समय म्हणजे संकेत म्हणजे थोर लोकांनीं पाडलेल्या रूढी. त्या रूढींचें वर्णन आम्हीं करतों. या रूढींना प्रमाण धर्मज्ञांचे संकेत व वेद हीं होत.

भारतीय धर्मशास्त्र हें समाजशास्त्र पण आहे. समाजाच्या निरनिराळ्या अवस्था यांत स्वच्छ प्रतिबिंबित झालेल्या आढळतात. हें धर्मशास्त्र केवळ विधिनिषेध व कोठें कोठें हेतु सांगणारें आहे. पण तपशील देऊन त्यावरून विधिसिद्धांत सांगणारें नाहीं. आज युरोपमध्यें मोठमोठे समाजशास्त्रज्ञ हजार हजार कुटुंबें डोळ्यांपुढें ठेवून त्यांचा निरनिराळ्या तऱ्हांनीं अभ्यास करून तपशीलपूर्वक एखादा सिद्धांत मांडतात, तसा प्रयत्न प्राचीन काळीं भारतांत झाला होता किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं, पण आज उपलब्ध असलेल्या विधिनिषेधांतूनच अनेक बाबतींत दिसणाऱ्या पायऱ्या मात्र स्वच्छ दाखवितां येतात. उदाहरणाकरितां विवाहसंस्था घेऊं. विवाहसंस्थेंत नियोगपद्धति प्राचीन कालीं अस्तित्वांत होती. नियोग म्हणजे अन्य पुरुषापासून, पति अगर पति

नसल्यास वडील माणसांचे अनुज्ञेनें पुत्रसंतति निर्माण करविणें. हा संयोग फक्त एक अगर दोन पुत्र होईपर्यंतच असे. नियोगांत खालीलप्रमाणें पायऱ्या दृष्टीस पडतात. (१) आपल्यापेक्षां उच्च वर्णीयापासून संतति निर्माण करविणें, (२) सवर्णीयापासून संतति निर्माण करविणें, (३) सगोत्रियापासून संतति निर्माण करविणें, (४) दिरापासून संतति निर्माण करविणें, (५) नियोगबंदी. दुसरें उदाहरण अनुलोमप्रतिलोम विवाहांचें घेऊं. (१) प्रतिलोम विवाहाला मान्यता, उदाहरण ययातीदेवयानी, (२) प्रतिलोम विवाहाला बंदी, (३) खालच्या वर्णाच्या सर्व स्त्रियांशीं विवाहाला परवानगी, (४) शूद्रानुलोम त्रैवर्णिकांना वर्ज्य, (५) अनुलोम बंदी. अशीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील. वरील उदाहरणांत ज्या अनेक पायऱ्या दृष्टीस पडतात त्या तशा कां झाल्या याचा तपशील नाहीं. पण प्रत्येक पायरींत शेंकडों वर्षांचें अंतर गेलेलें असलें पाहिजे असें अनुमान होतें. कारण समाजावरील प्रयोग एकदोन पिढ्यांत सिद्ध होऊन त्यांची इष्टानिष्टता सांगणें कठिण आहे. चारशेंपांचशें वर्षे एकादा प्रयोग सतत होऊन मगच त्याची इष्टानिष्टता कसाला लागते.

भारतीय धर्मशास्त्रानें प्रत्येक व्यक्तीचें समाजांतील स्थान व त्याची उपजीविकेची वृत्ति या गोष्टींचा विचार काळजीपूर्वक केलेला दृष्टीस पडतो. अनुलोम-प्रातिलोम संतति, तज्जन्य संकर, इत्यादि सर्वांचा समावेश समाजांत करून त्यांचे संघ ऊर्फ जाती निर्माण केल्या गेल्या. प्रत्येक जातीला विशिष्ट धंदा लावून दिला. त्रैवर्णिकांव्यतिरिक्त बाकी सर्वांना धनोत्पादक व कलाकौशल्याचे धंदे दिले गेले. कोणीहि निरुद्योगी नसावें, आपलें व कुटुंबाचें पोट त्यानें भरावें, तदनुषंगानें समाजांत स्वास्थ्य, शांतता लाभावी, हा त्यांत स्पष्ट हेतू दिसतो. पिढिजात धंदा मिळाल्यानें त्यांत पूर्ण कौशल्य आलें व स्वाभाविकपणें धंदे करण्यास माणसें तरबेज होऊं लागलीं. आर्थिक विषम वांटणीनें आज जगांत ज्या हाणामाऱ्या व क्रांत्या चालू आहेत त्यांमुळें तें सुधारलेलें आहे कां ? असें चटकन् मनांत येतें. आजच्या जगाचें दुःख म्हणजे आर्थिक विषम वांटणी, भांडवलशाही हेंच प्रायः दिसतें. भौतिक शास्त्रांच्या वाढीचा हा परिणाम आहे. भौतिक शास्त्रांची वाढ नव्हती अशा वेळीं मनुष्य एकमेकांला दूर असेल, पण तो आजच्या सारखा दुःखी होता किंवा काय ? हा प्रश्न विचारार्ह आहे.

भारतीय धर्मशास्त्रज्ञांनीं प्रत्येक व्यक्तीला वृत्तीचें, उपजीविकेचें साधन देण्याची जबाबदारी ब्राह्मणांवर टाकलेली दृष्टीस पडते. " स च वृत्तिं दर्शयति इतरेषाम् " या आपस्तंब धर्मसूत्रांवरून ही गोष्ट स्पष्ट आहे. समाजाला उपजीविकेचें साधन देणाऱ्या या ब्राह्मणांनीं शेंकडों धंदे व कला निर्माण केल्या. त्यांवर ग्रंथ लिहिले असावेत असें अनुमान आहे. आज जिवंत असलेले वेद श्रौतकर्मोपयोगी म्हणजे भिक्षुकीचे जिवंत आहेत. पण असे वेद निरनिराळ्या कलांवर असले पाहिजेत. " आयुर्वेदो गांधर्वश्चेति ते त्रयः। अर्थशास्त्रं चतुर्थं तु..." इत्यादि जीं नांवें उपवेद म्हणून आलेलीं आहेत ते तरी जिवंत कोठें आहेत ? पण कांहीं कलांवरील ग्रंथ आज कांहीं विद्वानांच्या संशोधनानें उपलब्ध होत आहेत. भिक्षुकीचे वेद जिवंत राहिले आहेत याचें कारण त्याबद्दल बराच अट्टाहास केला गेला व इतर कलाविषयक वाङ्मय कालाच्या विशाल उदरांत गडप झालें, याचें कारण प्रत्येक जातीला एकेक धंदा परंपरागत मिळाल्यामुळें त्या वाङ्मयाची अनवश्यकता हें असावें असें वाटतें. परंपरेनें कलांचा व विद्येचा परिपोष फार चांगला होतो.

भारतीय धर्मशास्त्रानें कायदे करणें व त्यांची अंमलबजावणी करणें हीं कामें एकाच व्यक्तीच्या हातांत ठेवलीं नव्हतीं. शासनसंस्थेचा मालक राजा याला फक्त अंमलबजावणीचा अधिकार असे. कायदे करण्याची परंपरा ब्राह्मणांची असे. मनु, याज्ञवल्क्य इत्यादि स्मृति उघडून पहा ! त्यांत त्र्यवरापर्षत्, सप्तावरापर्षत् यांचीं वर्णनें आढळतील. या परिषदेनें दिलेले निकाल अमंलबजावणीकरितां राजाकडे येत असत. चतुर्विंशतिमतम्, षट्त्रिंशन्मतम्, इत्यादि उल्लेख वरील विधानालाच पोषकच आहेत. मुख्य न्यायाधिश उत्तम विद्वान्, निःस्पृह ब्राह्मण असावा असा धर्मशास्त्राचा कटाक्ष दिसतो. अशा प्रकारें कायदे करणें व त्यांची अंमलबजावणी करणें हीं वाटलीं गेल्यामुळें एकाच व्यक्तीचे हातांत या दोनहि सत्ता असतांना जे अनर्थ व्हावयाचे त्याला पायबंद बसला. कर कोणत्या पदार्थावर घ्यावा, किती घ्यावा, राजानें आपली दिनचर्या कशी ठेवावी इत्यादि सर्व गोष्टी धर्मशास्त्रानें ठरवून दिलेल्या आहेत. या कायद्यांची अंमलबजावणी न करणाऱ्या राजाला शासनसंस्थेवर टिकणें अशक्य असे. वेनाचें उदाहरण या दृष्टीनें मननीय आहे.

भारतीय धर्मशास्त्र अशा अनेक दृष्टींनीं अभ्यसनीय आहे. मीमांसाशास्त्रांतील नियमान्वयें सर्व वचनांचा समन्वय करून एकवाक्यता करावयाची, व विरोधी वचनांची वाट निरनिराळ्या रीतींनीं लावावयाची, अशा पद्धतीनें या धर्मशास्त्राचा अभ्यास आजपर्यंत पुष्कळ विद्वानांनीं केलेला आहे. मेधातिथी, विज्ञानेश्वर, विश्वरूप इत्यादि टीकाकार व नीळकंठ, मित्रमिश्र, लक्ष्मीधर इत्यादि निबंधकार हे याची साक्ष देतील. किंबहुना धर्मशास्त्राची विशिष्ट रचना या निबंधकारांनींच केलेली आहे. शिवाय पुष्कळ अनुपलब्ध स्मृती या निबंध-ग्रंथांतूनच सांपडतात. अनेक ऋषींचीं वचनें त्यांतून दिलेलीं असतात. अशा दृष्टीनें निबंधग्रंथांचा अभ्यास आवश्यक आहे; आणि आजतागायत सर्व पंडित धर्मशास्त्राचा अभ्यास या मीमांसापद्धतीनेंच करीत आले आहेत. त्यांच्या मतें वेदमूलकच सर्व स्मृती आहेत. वेदविरोधी स्मृती नाहीं. विभिन्न देशकाल, परिस्थिती स्वबध्यनुस्वारानें निरनिराळे उपदेशक झालेले नसून ते सर्व अनादि अशा वेदांत आहेत. म्हणून कोणत्याहि धर्मसुधारकास पूर्वमीमांसापद्धतीनें निर्णित अशा विचाराच्या विरुद्ध परिवर्तन करण्याचा अधिकार नाहीं.

दुसरे अभ्यासी चिकित्सक होत. त्यांच्या मतें धर्मांत नेहमीं परिवर्तनें होतात. तीं वेद, सूत्रें, स्मृती व पुराणें यांवरून कळतात. भिन्नस्मृतिकारांचे विधिनिषेध हे नवीन अनुभव, नवीन राजकारण, नवीन सुखदुःख इत्यादि सामग्रीचा परिणाम होत. वर्णाश्रम, संस्कार इत्यादि परिस्थितींतून निर्माण झाले, त्याप्रमाणेंच बदलले आहेत. त्यांना इतिहास आहे.

अशा या दोघांहि अभ्यासकांना प्रमाणग्रंथ सारखेच आहेत. पण विषयवारीनें व कालानुक्रमानें सर्व वचनें डोळ्यांपुढें आल्याशिवाय पूर्ण अभ्यास होऊं शकत नाहीं.

अत्यंत संक्षिप्त भाषेंतच मला विषय मांडावा लागला आहे. पण त्यावरून या विषयाकडे आपलें लक्ष लागलें तरी याचे श्रम भरून निघाले असें लेखकाला वाटेल.

---

# विद्यार्थिनी आणि गृहिणी

लेखिका : सौ. स्नेहलताबाई जोशी, बी. ए., एडन.

[ जन्म १९०६ सालीं झाला. यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण भोरास झाल्यावर १९२२ सालीं त्या पुढील शिक्षणाकरितां न्यू पूना कॉलेजमध्यें गेल्या व त्यांतूनच त्या १९२६ सालीं बी. ए. झाल्या. भोर हायस्कूलमधून मॅट्रिक झालेल्या व पुढें पदवीधर झालेल्या ह्याच पहिल्या विदुषी होत. सध्यां त्या एडनला असतात. ]

' विद्यार्थिनी ' आणि ' गृहिणी ' या दोन परस्परविरोधी संज्ञा आहेत, असें सुशिक्षितांपैकीं कांहींना व अशिक्षितांपैकीं बहुतेकांना वाटतें. आजची प्रौढ विद्यार्थिनी पुढें आदर्शभूत गृहिणी होऊंच शकणार नाहीं, असा समज बहुतेक ठिकाणीं दृढ झालेला दिसून येतो. सुशिक्षित अशा सुगृहिणी प्रत्यक्ष दाखविल्या तर त्या ' नियमास अपवाद ' असेंच लोक मानतात आणि आपलाच समज योग्य आहे, असा निश्चयात्मक आविर्भाव दाखवून दुसऱ्याची खात्री करूं पाहतात. 'या काय शिकलेल्या मुली!' असे उद्गार वाचकांनीं कितीतरी वेळां ऐकले असतील! शिकलेल्या मुलींच्या माथीं कांहींहि दोष मारले तरी ते बहुतेकांना नेहमींच खरे वाटतात. त्यांत असंभाव्य असें कांहीं असेल असें सामान्य माणसास वाटतच नाहीं. मग ज्यांच्या गृहिणीसंबंधीं पुरातन नव्हेत पण गांवढळ कल्पना आहेत, त्यांना 'विद्यार्थिनी' ही ' सुगृहिणी ' होऊंच शकणार नाहीं हें पटविण्याचा प्रयत्न न करतांहि पटलें तर त्यांत नवल काय?

पण वास्तविक ' विद्यार्थिनी ' किंवा सुशिक्षित स्त्रिया आणि गृहिणी यांच्यांत परस्परविरोधी असें काय आहे? आजचा विद्यार्थी हाच उद्यांचा नागरिक असें आपण नेहमीं म्हणतों. मग आजची विद्यार्थिनी हीच पुढें सुगृहिणी होणार असें कां मानूं नये? विद्यार्थिनी आणि गृहिणी या परस्परविरोधी जाती नसून एकींतूनच दुसरीचा, विकास होणार आहे. कळी आणि फूल यांचा जो संबंध तोच विद्यार्थिनी आणि गृहिणी यांचा आहे. संसाराचा गाडा शिरावर घेण्यापूर्वी मुलाला शिक्षण हवें तसें तें मुलीला कां नको?

दोघांचीं कर्तव्यक्षेत्रें निराळीं असतील. पण प्रत्येकाला आपआपल्या कार्यक्षेत्रांत तरबेज होण्यासाठीं शिक्षण देणें जरूर नाहीं काय? मग शिक्षण घेणारा विद्यार्थी तो तेवढा चांगला असें समाजानें मानावें, तो उत्तम नागरिक होणार अशी अपेक्षा समाजानें बाळगावी आणि त्याच्याकडे मोठ्या आशेनें पहावें आणि शिकणाऱ्या विद्यार्थिनीकडे किंवा शिकून बाहेर पडलेल्या स्त्रीकडे मात्र लोकांनीं सामान्यतः साशंक वृत्तीनें पहावें! 'ह्या कसल्या संसार करणार?' म्हणून तुच्छतागर्भ निराशोद्गार काढावेत, त्यांच्या शिक्षणाबद्दल आदर वाटला तरी त्याचा परिणाम समाजानें त्यांना दुरून नमस्कार करण्यांतच किंवा त्यांचें दुरून कौतुक करण्यांतच व्हावा असें कां व्हावें? सुशिक्षित स्त्रियांबद्दल समाजानें दुरून आदर दाखवावा, पण त्यांना समाजाच्या अंतरंगांत मिसळतां येऊं नये, सुशिक्षित पुरुषांची समाजाला जशी आत्यंतिक जरूर भासते तशी सुशिक्षित स्त्रियांची भासूं नये असें कां व्हावें?

माझ्या मतें असें होण्याचीं कारणें मुख्यतः तीन आहेत. एकतर आपला बहुजनसमाज अद्यापि जुन्या वळणाचा नसला तरी त्याला जुन्या मताबद्दल फाजील अभिनिवेश आहे. स्त्रियांनीं शिकणेंसवरणें, समाजांत मान्यतेनें आणि श्रेष्ठपणानें वागणेंवावरणें त्याला सहन होत नाहीं. 'पायांतली वहाण पायांत पाहिजे,' ही स्त्रियांसंबंधींची घमेंडानंदनी वृत्ति अजून बऱ्याच ठिकाणीं कायम आहे. पण एकतर हे लोक 'परंपरेचे दास' आहेत आणि त्यांतले बहुतेक अज्ञानीहि आहेत. शिक्षणाबरोबर त्यांचीं मतें सुसंस्कृत होतील त्या वेळीं त्यांचे दुर्ग्रह नाहींसे होतील अशी आशा करण्यास जागा आहे.

दुसरें कारण असें कीं, अगदींच अशिक्षित नसले तरी अर्धशिक्षित लोक हे सुशिक्षित स्त्रियांचे अकारण शत्रु झाले आहेत. कॉलेजांत परीक्षांच्या बाऱ्या करणारीं 'उनाड' गणलेलीं मुलें व अर्धवट शिक्षणांतून बाहेर पडलेलीं मुलें, यांची विद्यार्थिनींच्या संबंधीं वागण्याची आणि बोलण्याची वृत्ति पाहिली म्हणजे हे लोक सुशिक्षित स्त्रियांचे प्रच्छन्न शत्रूच आहेत असें म्हणावें लागेल. अशा विद्यार्थ्यांशीं मात्र विद्यार्थिनी मोकळेपणानें मिसळूं शकत नाहींत; पण अशा विद्यार्थ्यांची मात्र विद्यार्थिनींनीं आपल्याशीं मोकळेपणानें वागावें अशी अत्यंत उत्कट इच्छा असते. आणि विद्यार्थिनींचें लक्ष वेधण्यासाठीं

ते मर्कटासारख्या अनेक चेष्टा करीत असतात, तरीहि विद्यार्थिनी लक्ष देत नाहींत. हें पाहिलें म्हणजे निराश होऊन विद्यार्थिनींचे ते अधिकच शत्रू बनतात! हींच माणसें समाजांत मिसळतात आणि 'अनुभवाचे बोल' म्हणून विद्यार्थिनींबद्दल वाटेल ते बडकत असतात! अज्ञ समाजाला हे 'शिकलेले सवरलेले' लोक सांगतील तें खरें वाटतें! ते बिचारे अज्ञच असतात. त्यांचा सुशिक्षित स्त्रियांशीं परिचय क्वचितच होतो. अशा अज्ञ लोकांचा त्यांच्या अज्ञानामुळें कोणालाच फारसा राग येत नाहीं! सुशिक्षित स्त्रियांची अशा लोकांनीं आतांपर्यंत जितकी नालस्ती केली असेल, तितकी दुसऱ्या कोणींच केली नसेल! त्याचा थोडातरी परिणाम लोकांच्या मनावर होत असलाच पाहिजे.

. सुशिक्षित स्त्रियांबद्दल समाजाचें मत कलुषित करणारीं हीं दोन्हीहि कारणें तावडतोब दूर होण्यासारखीं नाहींत आणि त्यांच्याकडे विशेष लक्षहि देण्याचें कारण नाहीं. ज्ञानाच्या प्रसाराबरोबर कांहीं कालानें तीं आपोआप दूर होतील. तिसरें कारण मात्र बरेंच महत्त्वाचें आहे. स्त्रियांना मिळणारें शिक्षण हें समाजाच्या एकंदर हितास आवश्यक आणि उपयुक्त असेंच मिळतें असें समाजास वाटत नाहीं. शिक्षणानें मन सुसंस्कृत होतें, विचाराची कक्षा वाढते, बुद्धि तीव्र होते, म्हणून सुशिक्षित स्त्रियांबद्दल समाजास सामान्यतः आदर वाटत असेल. कोणत्याहि कार्यक्षेत्रांत सुशिक्षित मनुष्य अशिक्षित मनुष्यापेक्षां अधिक कार्य करून दाखवील. त्या मानानें अशिक्षित स्त्रीपेक्षां सुशिक्षित स्त्री आपला संसार अधिक सुखाचा आणि टापटिपीचा करूं शकेल. तिची विचारशक्ति वाढली असल्यामुळें कुटुंबांत तिला अधिकार व समाजांत आदरयुक्त मान्यता मिळेल. म्हणून स्त्रियांना अजिबात शिक्षण न मिळण्यापेक्षां आहे तें शिक्षण जरी मिळालें तरी हवेंच आहे. परंतु ही सामान्य दृष्टि सोडली तर स्त्रीच्या कर्तव्यास अनुलक्षून उपयुक्त असें विशिष्ट शिक्षण विद्यार्थिनींना मिळत नाहीं, असेंच म्हणावें लागेल. स्त्रियांचें शिक्षण ही निकडीची गोष्ट आहे असें समाजास वाटत नाहीं. स्त्रियांना शिकविणें ही एक शोकाची गोष्ट आहे असें लोक मानतात. मुलगी शाळेंत पाठविलीच पाहिजे, नाहींतर फॅशन बिघडते! तसेंच अशिक्षित मुलींची लग्नाच्या बाजारांत

किंमत अगदीं कमी लागते. म्हणून हजारों मुली शाळेंत जात आहेत. असें आहे तरीसुद्धां सुशिक्षित स्त्रियांविरुद्ध उद्‌गार निघतच असतात! पण त्या उद्‌गारांचा खरा अर्थ एवढाच असावा कीं, लोकांना स्त्रीशिक्षणाची हल्लींची पद्धति मात्र सर्वस्वीं नापसंत असावी. मुलांच्या शिक्षणाचा मुलांना द्रव्योत्पादनासाठीं थोडाबहुत उपयोग होतो. म्हणून समाज सुशिक्षित पुरुषांविरुद्ध फारशी जोराची ओरड करीत नाहीं. स्त्रियांच्या शिक्षणाचा त्यांना स्त्रीविशिष्ट कर्तव्यांत फारसा उपयोग होत नाहीं, म्हणून समाजाची स्त्रीशिक्षणाविरुद्ध तक्रार आहे. लोक अजिबात स्त्रीशिक्षणाविरुद्ध आहेत असें मानणें साफ चुकीचें आहे.

साधारणतः इंग्रजी पांच इयत्तांपर्यंत मुलामुलींच्या शिक्षणांत विशेष फरक करण्याची जरूरी नाहीं. परंतु त्यापुढें पुरुषांसाठीं आंखलेल्या शिक्षणक्रमांतूनच स्त्रियांना जावयास लावणें हा त्यांच्यावर जुल्म आहेच, पण समाजाच्या दृष्टीनेंहि विघातक आहे. " The Doctrine of Sex-Equality in Education is biologically unscientific, psychologically untenable and sociologically impracticable." असें कै. गो. म. चिपळूणकरांचें म्हणणें होतें. स्त्रिया आणि पुरुष या दोघांचीं निरनिराळीं कार्यक्षेत्रें आहेत हें विसरून चालणार नाहीं. द्रव्योत्पादन करणें हें पुरुषांचें मुख्य कर्तव्य आहे, तर अंतर्गत कुटुंबव्यवस्था पहाणें हें सामान्यतः स्त्रीचें मुख्य कर्तव्य आहे. हल्लींची शिक्षणपद्धति पुरुषांसाठीं तयार केलेली आहे. म्हणजे तींत मुख्यतः द्रव्योत्पादनास जरूर अशाच गोष्टींचा समावेश आहे. तीच शिक्षणपद्धति स्त्रियांवर लादणें म्हणजे पर्यायानें असें म्हणणें आहे कीं, स्त्रियांचीं आणि पुरुषांचीं कर्तव्यें एकच आहेत, दोघांनाहि आयुष्यांत एकाच प्रकारचें काम करावयाचें आहे, द्रव्योत्पादन करणें व अंतर्गत कुटुंबव्यवस्था पहाणें या प्रत्येकांत दोघांनीं सारखाच भाग उचलला पाहिजे. पण वस्तुस्थिति मात्र अगदीं उलट असते. स्त्रिया शिक्षणक्रमांतून पूर्ण यशस्वी होऊन बाहेर पडल्या तरी त्यांच्या मागचीं घरांतलीं कामें सुटत नाहींत. नोकरी करणाऱ्या स्त्रियांनाहि नोकरी करून शिवाय घरांतलें काम पहावेंच लागतें. त्यांतल्यात्यांत मुलें असणाऱ्या स्त्रियांची दुर्दशा विचारूंच नये! नोकरी करावी, घरांतलें थोडेंबहुत

तरी इतर काम पहावें आणि शिवाय मुलांच्या खस्ता खाव्या या सर्व गोष्टी यांना कराव्या लागतात. पुरुष मात्र बाहेरचें काम केलें कीं सुटतात! अशा स्त्रियांची स्थिति कामकरी मुंग्यांसारखी आत्यंतिक काबाडकष्टाची होते. इतर गोष्टी सोडल्या तरी निव्वळ स्त्रियांच्या सुखाच्या दृष्टीनें पहातां स्त्रियांनीं द्रव्योत्पादन करणें आणि संसार करणें या दोन्ही गोष्टी एकदम केल्यास त्या त्यांच्या दुःखालाच कारण होतील. स्त्रियांनीं अविवाहित राहून द्रव्योत्पादन करावें कीं कसें हा एक स्वतंत्र मुद्दा आहे व त्याबद्दल येथें चर्चा करणें अप्रस्तुत आहे. परंतु थोडक्यांत सांगतां येईल कीं, तो मार्गहि धोक्याचा आणि समाजाच्या व व्यक्तीच्या अशा दोन्ही दृष्टींनीं अहिताचा असाच आहे. संकटाच्या वेळीं नोकरी करणें किंवा ज्यांना घरांतील सर्व कामें करूनहि भरपूर वेळ मिळेल त्यांनीं दिवसांतून तास दोन तास शिकविण्याचें वगैरे काम करणें क्षम्य मानलें जाईल. पण ही मर्यादा सोडून पुढें गेल्यास अखेर पश्चात्तापाचीच पाळी येईल.

वरील विवेचनावरून वाचकांच्या हें लक्षांत येईल कीं, समाजाचा स्त्री-शिक्षणाविरुद्ध खरा आक्षेप हा आहे कीं, आजचें शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थिनी ह्या सुगृहिणी होतील अशी समाजास खात्री वाटत नाहीं. तशा प्रकारचें शिक्षण विद्यार्थिनींना दिलें जात नाहीं. हा आक्षेप दूर करण्यासाठीं स्त्रियांच्या शिक्षणांत सुधारणा होणें अत्यंत जरूर आहे. इंग्रजी पांचव्या इयत्तेपासून पुढें स्त्रियांना आवश्यक असे निरनिराळे विषय विद्यार्थिनींना शिकविले पाहिजेत. फिजिक्स, ट्रिग्नॉमेट्री, बीजगणित यांसारखे नीरस व रूक्ष विषय विद्यार्थिनींना कां शिकवावेत? त्यांच्या ऐवजीं संगीत, चित्रकला, शिवणकला, कशिद्याचीं कामें, अन्नांच्या जाती, त्यांचे शरीरावर परिणाम व निरनिराळ्या अन्नांतील सत्त्वें यांबद्दल माहिती व स्वयंपाक वगैरेबद्दल शिक्षण दिल्यास मुलींना कितीतरी उपयोग होईल. मुलांचें संगोपन, गर्भिणींची व बाळंतिणींची शुश्रूषा, औषधांची जुजबी माहिती, मुलांचे रोग व त्यांवर उपाय हे विषय कॉलेजांतील मुलींना शिकविले जातील तर त्यांच्या पुढील आयुष्यांतला निम्मा त्रास, खर्च आणि काळजी दूर होईल. सौंदर्याच्या दृष्टीनें घरांतली मांडणी कशी ठेवावी हेंहि विद्यार्थिनींना

शिकवावयास पाहिजे. भूगोल, इंग्रजीचीं फाजील पुस्तकें वगैरेंचा अभ्यास काढून टाकावा लागला तरी चालेल. गृहव्यवस्था सुखाची आणि सौंदर्ययुक्त करणें हें स्त्रीचें मुख्य कर्तव्य ज्या तऱ्हेनें पार पाडतां येईल, तें शिक्षण विद्यार्थिनींना देणें अवश्य नाहीं काय? पुणें येथें भरलेल्या अखिल भारतीय महिला परिषदेंत खालील ठराव मंजूर करण्यांत आला होता:—

'In all education of girls in India teaching in the ideals of motherhood and in the making of the home beautiful and attractive, should be kept uppermost.' या ठरावाची अंमलबजावणी सर्व ठिकाणीं होईल तर कितीतरी विद्यार्थिनींचे आयुष्यक्रम अधिक सुखाचे होतील!

विद्यार्थिनींच्या शिक्षणक्रमाला हा प्रयोग नवीन आहे असें नाहीं. प्रो. वाडिया यांनीं आपल्या Ethics of Feminism या पुस्तकांत खालील उदाहरणें दिलीं आहेत. '...There are admirable special classes in house-work connected with all schools. Well-furnished household ecomony schools have been established in Prussia, Bavaria, Baden, Wurtenberg, where girls and women receive instruction in cooking, preserving, washing, poultry, bee and small animal breeding, milking, handwork, cloth-cutting, gymnastics and singing. botony and chemistry, hygiene and household book-keeping.' जपानमधील एका महिला विद्यापीठांतहि असाच प्रयोग चालू आहे. तेथल्या विद्यार्थिनींबद्दल Prof. Jinzo Naruse हे म्हणतात, 'Cooking, washing, setting tables, decorating in rooms, the economical management and everything that concerns the house is under control of the residents.'

अशा प्रकारच्या शिक्षणक्रमांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थिनी या सुगृहिणी होणार नाहींत असा नुसता संशय बाळगण्याची कोणाची छाती होईल काय? मात्र चालू शिक्षणक्रम सुधारावा असें म्हणतांना दुसऱ्या एका टोंकास जाण्याची भीति आहे. ती म्हणजे स्त्रियांचें शिक्षण निव्वळ घरांतल्या गोष्टींपुरतेंच होऊन बसेल ही होय. कै. चिपळूणकरांनीं आपल्या 'Scientific Basis of

Woman's Education' या पुस्तकांत कांहींसें असेंच एकांतिक मत प्रतिपादिलें आहे. गृहिणीची परीक्षा ठेवावी आणि त्या परीक्षेकरितां मुलींना तयार करावें हें त्याचें म्हणणें हल्लींच्या शिक्षणाच्या अगदीं उलट टोंकाचें आहे असें वाटतें. 'An examination like Diploma in House-wifery, should be instituted and girls should be prepared for such an examination' (page 89) स्त्रीशिक्षणाचा सुवर्णमध्य हल्लींचें निव्वळ पुरुषी शिक्षण व 'गृहिणीची परीक्षा' या दोन टोंकांच्या मध्यें सांपडेल. विद्यार्थिनींना अनावश्यक असे विषय काढून टाकून वर निर्देश केलेल्या विषयांचे गट तयार करून ते त्या ठिकाणीं नेमले पाहिजेत. विद्यार्थिनी ही पुरुषासारखीच केवळ नोकरी करणारी अशी निर्माण व्हावयास नको, तशीच ती वाङ्मयास पारखी असलेली अशी स्वयंपाकघरांतील नुसती नोकरहि नको आहे. तिला वाङ्मयांत विहार करतां येईल, तिला जगाचें सामान्य ज्ञान मिळेल याचीहि तिच्या शिक्षणक्रमांत काळजी घेतली पाहिजे. "गृहिणी सचिवः सखी मिथः" हें पद तिला घालवावयाचें नाहीं. याची काळजी घेऊनच स्त्रियांचा शिक्षणक्रम आंखला तर विद्यार्थिनींबद्दल असलेलें समाजाचें हल्लींचें अनास्थेचें मत बदलेल; आणि आजची विद्यार्थिनी हीच उद्यांची सुगृहिणी होणार असा त्याला दृढ विश्वास वाटूं लागेल.

---

# अपभ्रंश भाषा आणि ज्ञानेश्वरीपूर्वकालीन अपभ्रंश वाङ्मय*

लेखकः डॉ. परशुराम लक्ष्मण वैद्य, एम्. ए., डी. लिट्., पुणें.

[ यांचा जन्म पुणें येथें ता. ३० जून १८९१ रोजीं झाला. प्राथमिक व दुय्यम शिक्षण पाली तालुक्यांत सिद्धेश्वर व जांभुळपाडा येथें झालें. संस्कृत व वैद्यक शिक्षण सांगली व्याकरणपाठशाळा व नाशिक येथें झालें. न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रिक.

* हॉलंडमधील लायडन शहरीं भरलेल्या अठराव्या आन्तरराष्ट्रीय पौरस्त्य परिषदेपुढें वाचलेल्या निबंधांतील कांहीं भाग ( थोडा फेरफार करून).

उच्च शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमध्यें झालें. मुंबई विश्वविद्यालयाची बी. ए. व कलकत्ता विद्यापीठाची एम्. ए. पदवी मिळवून पुढील अभ्यासासाठीं ते युरोपांत गेले. पॅरिस, घेंट ( बेल्जम ), बॉन (जर्मनी ) इत्यादि विद्यापीठांत संस्कृत, प्राकृत, पाली भाषांचें अध्ययन केलें. पॅरिस युनिव्हर्सिटीची डी. लिट्. ही पदवी संपादन केल्यावर राजाराम कॉलेज, विलिंग्डन कॉलेज व फर्ग्युसन कॉलेज यांतून त्यांनीं अध्यापनाचें काम केलें आहे. यशोधरचरित ( अपभ्रंश ), हेमचंद्र प्राकृत, व्याकरण, आर्यदेव, चतुःशतक ( तिबेटी ), न्यायावतार ( संस्कृत ), उपासकदशा ( जैन–प्राकृत ), मोरोपंतांचे संस्कृत ग्रंथ वगैरे २० पुस्तकें त्यांनीं संपादन केलीं आहेत. त्यांचा पाली भाषेचा व जैन वाङ्मयाचा व्यासंग विशेष आहे. 'बौद्धधर्माचा अभ्युदय व प्रसार' हा त्यांचा संशोधनात्मक ग्रंथ मराठींत प्रसिद्ध झाला आहे. सध्यां ते बौद्धधर्मावर एक मोठा व विवेचक ग्रंथ लिहीत आहेत.]

अलीकडे आपल्या विश्वविद्यालयांतून मराठी, गुजराथी, बंगाली व हिंदी वगैरे देशी भाषांच्या अध्ययनाकडे आणि त्याचप्रमाणें त्यांच्या विकासाकडे विद्वानांचें लक्ष वेधूं लागलें आहे व त्या दिशेनें त्यांचे प्रयत्नहि चालू आहेत. यांपैकीं कांहींचें मत असें आहे कीं, संस्कृतादि अभिजात भाषांच्या अध्ययनाची अगदीं हानि झाली तरी ती पतकरूनहि देशी भाषांच्या अभ्यासाला उत्तेजन द्यावें व त्याच देशी भाषांचा शिक्षणाचें माध्यम म्हणून सार्वत्रिक उपयोग करावा. पण या वादग्रस्त विषयावरील खोल विचारांत मी सध्यां शिरत नाहीं. राजकीय दृष्टि सोडून दिली तरी देशी भाषांना विश्वविद्यालयांत सन्मान्य स्थान असावें याबद्दल सर्वांचें एकमतच होईल. मतभेद असेल तर तो हें सन्मान्य स्थान कोणचें याबद्दल होय. माझ्या मतें हें सन्मान्य स्थान म्हणजे देशी भाषांना अभ्यासक्रमांत मुख्य–पहिलें स्थान द्यावें; तें जर साधत नसेल तर निदान इंग्रजी भाषेच्या खालोखाल देशी भाषांचा आवश्यक विषयांत अनुक्रम लावावा, आणि यापुढें संस्कृतादि अभिजात भाषांना, आवश्यक विषयांमध्येंच स्थान मिळावें.

....

देशी भाषांचा जर उच्च शिक्षणामध्यें व विशेष अध्ययनामध्यें शिरकाव करून घ्यावयाचा असेल, तर त्यांची संस्कृतादि अभिजात भाषांशीं फारकत

होऊन चालणार नाहीं. विशेष अध्ययन विश्वविद्यालयांत करावयाचें म्हटलें तर त्यांमध्यें भाषेची व वाङ्मयाची उत्पत्ति आणि विकास या भागांस बरेंच महत्त्वाचें स्थान दिलें पाहिजे. युरोपियन विश्वविद्यालयांमध्येंहि चालू भाषांच्या खालोखाल लॅटिनसारख्या भाषांना स्थान दिलेलें असतें तें याच कारणामुळें होय. तिकडील जनताहि अशा भाषांना ऐच्छिक या सदरांत घालावयास तयार नाहीं. फ्रान्समध्यें सन १९२३ सालीं शिक्षणमंत्र्यानें त्यांना ऐच्छिक या सदरांत घालण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत त्याला माघार घ्यावी लागली.

विश्वविद्यालयांमध्यें देशी भाषांचा अभ्यास करावयाचा म्हणजे फक्त आजकालच्या वाङ्मयाचा अभ्यास करून भागावयाचें नाहीं. त्या त्या भाषांचा, त्याचप्रमाणें त्यांच्या उत्पत्तीचा व विकासाचाहि ऐतिहासिक दृष्ट्या अभ्यास व्हावयास पाहिजे. बीजापासून झाडाच्या फळापर्यंत विकास होतांना तें बीज ज्या ज्या अवस्थांतून जातें, तशाच अवस्था भाषेच्या विकासाच्या इतिहासांत सांपडतात. आपल्या भाषेच्या पूर्वावस्थेचें यथार्थ ज्ञान नसेल तर तिच्या विकासालाहि आपणांस योग्य वळण लावतां येणार नाहीं, व या अज्ञानामुळें आपण नवीन म्हणून प्रचारांत आणलेले संकेत जुनेच आहेत असें सिद्ध झाल्यास आपल्या मनुष्यजातीच्या बुद्धीचा अपव्यय केल्याचा आरोप मात्र आपणांवर येईल. प्रस्तुत लेखांत या देशी भाषांपैकीं प्रमुख अशा मराठी भाषेचा अपभ्रंश भाषेशीं व त्या भाषेंतील वाङ्मयाशीं जो संबंध आहे त्याचेंच त्रोटक विवेचन मी करणार आहें.

साधारणतः लोकांची अशी समजूत आहे कीं, संस्कृत भाषा एक असून तिच्यांत बोलीवजा भेद नाहींत. थोड्याशा विचाराअंतीं असें आढळून येईल कीं, ही समजूत बरोबर नाहीं. जर संस्कृत भाषेंत असे भेद नसतील तर वेदांची भाषा आजकालच्या साधारण संस्कृत येणाऱ्याला कां कळूं नये? खरें पाहिलें असतां संस्कृत भाषेंतहि अनंत फरक झाले आहेत. व्याकरणकार पाणिनि वारंवार 'छन्दसि' व 'भाषायाम्' म्हणजे वैदिक संस्कृतांत व लौकिक संस्कृतांत असे शब्द वापरतो. ऋग्वेद, ब्राह्मणें, सूत्रग्रंथ, रामायणभारतादि इतिहासग्रंथ, पुराणें, काव्यें, जैनांनीं लिहिलेले संस्कृत ग्रंथ, महानुभावादिकांनीं लिहिलेले संस्कृत ग्रंथ व महाराष्ट्र कविवर्य मोरोपंत यांनीं रचिलेलीं

संस्कृत काव्यें या सर्वांची भाषा नांवानें एक असली तरी स्वरूपानें, व्याकरणानें, वाक्प्रचारांनीं, शब्दसंपत्तीनें निरनिराळी आहे असेंच म्हणावें लागेल. शिवाय संस्कृताच्या जोडीस प्राकृत, पाली याहि भाषा चालूच होत्या व या जाणणाऱ्यांची संख्या संस्कृत जाणणाऱ्या लोकसंख्येपेक्षां फार होती असेंहि प्राचीन ग्रंथांतून आढळतें. पाली व प्राकृत या भाषा संस्कृतापासून उद्भवल्या असें मानणाऱ्या विद्वानांचा एक वर्ग, तर पाली व प्राकृत या स्वतंत्र भाषा होत्या असें मानणाऱ्या विद्वानांचा दुसरा वर्ग. कांहींच्या मतानें तर पाली व प्राकृत वगैरे भाषा त्या त्या काळच्या देशी भाषा होत्या.

पण इतका दूरवर विचार सध्यां न करतां आपण मराठी वगैरे आजकालच्या देशी भाषांच्या उत्पत्तीकडे वळूं. या भाषांच्या इतिहासांत अपभ्रंश भाषेला महत्त्वाचें स्थान द्यावें लागेल. वैयाकरणांच्या मतें अपभ्रंश भाषेचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत तसल्या अपभ्रंश भाषेचा काळ साधारणपणें इसवी सनाच्या पांचव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत मानलेला आहे. माझ्या स्वतःच्या अवलोकनांत पंधराव्या शतकांत लिहिलेले अपभ्रंश ग्रंथ आलेले आहेत, ते अपवादादाखल धरिले तरीहि वर दिलेला काळच साधारणपणें बरोबर दिसतो. हा काळ म्हणजे देशी भाषांच्या उदयापूर्वीचा काळ होय. या काळांत परिनिष्ठित संस्कृत भाषेमध्येंहि ग्रंथरचना होत होतीच. कालिदास, बाण, भवभूति व शंकराचार्य वगैरे प्रख्यात ग्रंथकार याच काळांत होऊन गेले. तथापि, वाक्पतिराज वगैरे प्रख्यात प्राकृत ग्रंथकारहि याच काळांत होऊन गेले, व जैनांचें आगमहि याच काळाच्या आरंभीं अर्धमागधी वगैरे प्राकृत भाषांमध्यें लिपिबद्ध झालें. तेव्हां सध्यांच्या देशी भाषांच्या उत्पत्तीला कोणकोणच्या भाषांचें कितपत साह्य झालें हा मुद्दा विचारणीय ठरतो.

प्राकृत व्याकरणकारांपैकीं सर्वांत जुना जो वररुचि त्यानें महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी व पैशाची अशा चार प्रकारच्या प्राकृत भाषांचें व्याकरण लिहिलें आहे. हेमचंद्रानें पैशाची भाषेचा पोटभेद म्हणून चूलिकापैशाची व अपभ्रंश या दोन भाषांची भर घातली. मार्कंडेयानें आपल्या प्राकृतसर्वस्व नांवाच्या व्याकरणांत प्राकृत भाषांचें वर्गीकरण, भाषा, विभाषा, अपभ्रंश आणि पैशाची असें केलें असून या प्रत्येकीचे पुष्कळ अवांतर पोटभेद वर्णिले

आहेत. विशेषत: अपभ्रंश भाषेचे मुख्य असे तीन पोटभेद मानिले असून पुढें तर प्रत्येक देशाची निरनिराळी अपभ्रंश भाषा आहे असें म्हटलें आहे.

युरोपियन भाषाभिज्ञांमध्येंहि प्राकृत, अपभ्रंश व देशी भाषा यांच्या परस्परसंबंधाविषयीं भिन्न भिन्न मतें प्रचलित आहेत. ग्रियर्सनचें मत असें आहे कीं, प्रत्येक प्राकृत भाषेपासून एक एक अपभ्रंश भाषा निघाली व त्या अपभ्रंश भाषेपासून पुढें देशी भाषा झाली. उदाहरणार्थ, महाराष्ट्री प्राकृतापासून महाराष्ट्री अपभ्रंश, व या महाराष्ट्री अपभ्रंशापासून पुढें मराठी; याचप्रमाणें शौरसेनी प्राकृतापासून शौरसेनी अपभ्रंश, व तीपासून गुजराथी व हिंदी वगैरे. ज्यूल ब्लोख( Jules Bloch )च्या मतें प्राकृत व देशी यांच्या मधली भाषा मानण्याची जरूरी नाहीं, व तशी भाषा असल्याबद्दल पुरेसा पुरावाहि नाहीं.

काव्यदर्शकार दंडी याच्या मतें अपभ्रंश ही आभीरादि रानटी जातींची भाषा आहे. विद्यापति आपल्या अपभ्रंश भाषेंतील कीर्तिलता नांवाच्या ग्रंथाच्या आरंभीं ' अवहट्टा '( अपभ्रष्टा ) भाषेंत ग्रंथ रचिल्याचें सांगतो व त्याच भाषेस पुढें ' देसिल वयना ' ( देशी वचन ) देशी भाषा असें म्हणतो. मार्कंडेयाच्या मतें देशभेदाप्रमाणें अपभ्रंशाचे पुष्कळ भेद होतात हें वर सांगितलेंच आहे.

याप्रमाणें व्याकरणकारांच्या मतांप्रमाणें व भाषाशास्त्रज्ञांच्या मतांप्रमाणें जरी अपभ्रंशाचे प्रांतिक भेद शक्य आहेत, तरी प्रत्यक्ष सृष्टींत म्हणजे हस्तलिखित ग्रंथांत तरी असे प्रांतिक भेद शक्य असल्याचा पुरावा मिळत नाहीं. हेमचंद्राच्या मतें शौरसेनी प्राकृताप्रमाणें क्वचित् अपभ्रंशांतहि त बद्दल द येतो, पण याबद्दलहि हस्तलिखित प्रतींमध्यें एकवाक्यता नाहीं. एवढेंच नव्हे तर ज्या प्रतींत ज्या ठिकाणीं त बद्दल द येतो, त्याच प्रतींत त्याच शब्दांमध्यें इतरत्र तसा तो आढळत नाहीं. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या वेळीं लिहिलेलीं अपभ्रंश ग्रंथांचीं ४०।५० हस्तलिखितें तरी माझ्या नजरेखालून गेलीं आहेत, त्यांवरून मला असें म्हणतां येतें कीं, अपभ्रंशाच्या व्याकरणकारांनीं केलेल्या भेदांना निदान या हस्तलिखितांत तरी पुरावा नाहीं, व माझें असें मत होत चाललें आहे कीं, वाङ्मयाला तरी

एकच अपभ्रंश भाषा माहीत आहे; आणि हीच एक अपभ्रंश भाषा आधुनिक देशी भाषांचें मूळ असावी. पण या एकमूलभूत अपभ्रंशाची परिणति होत असतांना प्रांतिक बोलीचें वजन तीवर पडून त्या त्या देशभाषेंत कांहीं रूपभेद नवीन आले असतील, तर कांहीं प्रचारांतून अजिबाद नाहींसे झाले असतील. शब्दसंपत्तीच्या बाबतींतहि असाच फरक झाला असावा व त्या त्या प्रांतांतील भाषांतून तींत बरीच भर पडली असावी; किंवा संस्कृतांतून पुनरुज्जीवन-क्रियेनें ( Process of rejuvenation )हि ती अधिक समृद्ध झाली असावी. थोडक्यांत आणि स्पष्ट सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्री अपभ्रंश, शौरसेनी अपभ्रंश वगैरे अपभ्रंशांचे भेद फक्त व्याकरणकारांच्या कल्पनेंतच असावेत. पण वाङ्मय म्हणून अपभ्रंश भाषेचें स्वरूप एकच असून याच एक अपभ्रंशापासून उत्क्रांतिक्रमानें मराठी वगैरे आधुनिक देशी भाषांची उत्पत्ति झाली असावी.

वरील मतास पुष्टि मिळण्यासाठीं मराठीसारखी आधुनिक देशी भाषा ज्या भागांत प्रचारांत आहे, त्याच भागांत लिहिलेले अपभ्रंशभाषेंतील ग्रंथ उपलब्ध झाले पाहिजेत. त्यांच्या प्रती त्याच प्रांतांत झालेल्या असाव्यात, निदान त्यांचा संग्रह तरी त्याच प्रांतांत झालेला असावा. अशा ग्रंथांच्या आधुनिक चिकित्सापद्धतीनें तयार केलेल्या आवृत्तींचा या कामीं फार उपयोग होईल. ग्रंथकारानें स्वहस्तें लिहिलेलें अपभ्रंशहस्तलिखित मिळणें हें जवळजवळ अशक्यच आहे, आणि एखादा ग्रंथ लोकप्रिय झाल्यावर परप्रांतांतील विद्वान व लिपिकार यांनीं त्याच्या प्रती तयार करून नेणें हेंहि साहजिक आहे. निजामच्या राज्यांत मलखेड गांवीं तयार झालेल्या ग्रंथाची प्रत सुरतेंतील शांतिनाथाच्या मंदिरांत जाऊन तेथून पुन्हा वऱ्हाडांतील कारंजा या गांवच्या ग्रंथसंग्रहालयांत आज विद्यमान असल्याचें एक उदाहरण माझ्या नजरेस आलें आहे. पण ग्रंथकार कोणत्या प्रांतांतील आहे, हें जर ठरवितां आलें, आणि त्या प्रांतांत त्याच्या ग्रंथाच्या प्रती उपलब्ध झाल्या, तर योग्य संपादक अशा सामग्रीच्या जोरावर प्रमाणभूत ग्रंथावृत्ति तयार करूं शकेल. या ठिकाणीं मराठी भाषेच्या अभिमान्यांना आनंददायक अशी गोष्ट मला जाहीर करावयाची आहे. ती ही कीं, जुन्या महाराष्ट्रांत, वऱ्हाडांतील कारंजा

या गांवीं जैनांच्या मठांत बरेच अपभ्रंश भाषेंत लिहिलेले ग्रंथ नुकतेच उपलब्ध झाले आहेत. त्यांपैकीं तीन ग्रंथ जुन्या महाराष्ट्रांतील मलखेड ( संस्कृत-मान्य-खेट ) या दहाव्या शतकांतील राष्ट्रकूटांच्या राजधानींत तिसऱ्या कृष्ण-राजाच्या कारकीर्दींत लिहिले गेले असून त्या ग्रंथांच्या प्रती हिंदुस्थानभर पसरल्या आहेत. या ग्रंथाचा कर्ता पुष्पदंत कवि हा असून त्यास कृष्ण-राजाचा प्रमुख मंत्री भरत व त्याचा मुलगा नन्न (नाना किंवा संस्कृत-नंद) यांचा आश्रय होता. या भरताच्या घरीं त्यानें एकंदर तीन ग्रंथ लिहिले. त्यांपैकीं यशोधरचरित ( अपभ्रंश—जसहरचरिउ ) हा ग्रंथ मी स्वतः संपादित केला असून तो गेल्या वर्षीच कारंजा जैन ग्रंथमालेचें पहिलें पुष्प म्हणून प्रसिद्ध झाला आहे. उमरावतीचे संस्कृत प्रोफेसर हिरालाल जैन यांनीं संपा-दिलेला नागकुमारचरित ( अपभ्रंश—णायकुमारचरिउ ) याचें मुद्रण सध्यां चालू असून तो लवकरच प्रसिद्ध होईल. पुष्पदंतकवीचा तिसरा ग्रंथ महा-पुराण किंवा त्रिषष्टिमहापुरुषगुणालंकार ( अपभ्रंश—तिसट्ठिमहापुरिसगुणालं-कार ) हा असून त्याचें संपादन मीच करीत आहें.

मराठी वगैरे देशी भाषांच्या इतिहासावर या ग्रंथांनीं बराच प्रकाश पडणार असून शिवाय या भाषांची उत्पत्ति व वृद्धि या प्रश्नांसंबंधींहि विचा-रांना चालना मिळेल, इतक्या महत्त्वाचे हे ग्रंथ आहेत. आपल्या सध्यांच्या माहितीप्रमाणें मराठी भाषेंतील आद्य ग्रंथ म्हणजे महानुभावपंथीय चक्र-धराचीं सिद्धांतसूत्रें हा होय. हा ग्रंथ सन १२६४त लिहिला गेला. त्याच-प्रमाणें गुजराथी भाषेंतील पहिला ग्रंथ म्हणजे शालिभद्राचा बाहुबलिरास हा होय. तो सन ११८४ सालीं रचिला गेला. हिंदी व बंगाली भाषांतील आद्य ग्रंथहि याच सुमारचे, कदाचित् थोडे अगोदरचे आहेत. कोणच्याहि भाषेंत ग्रंथरचना होण्याच्या अगोदर ती भाषा बोली म्हणून निदान दोन-तीन शतकें तरी प्रचारांत असली पाहिजे. अशा बोलीला ग्रंथरचनेनें स्थिरता येते. मराठी भाषाहि सन १२६४ पूर्वीं कांहीं शतकें तरी बोली म्हणून प्रचारांत असलीच पाहिजे. पण कांहीं थोड्या शिलालेखांखेरीज या भाषेच्या अस्तित्वाचा पुरावा सन १२६४ पूर्वीं म्हणजे सिद्धांतसूत्रांच्या रचनेपूर्वीं फारसा उपलब्ध नाहीं, हें कबूल करणें भाग आहे.

या ठिकाणीं आणखी एक गोष्ट सांगणें जरूर आहे. ती ही कीं, मराठी भाषेंत जेव्हां ग्रंथरचनेला सुरुवात झाली, तेव्हां भाषा आजच्या भाषेप्रमाणें परिणत स्वरूपाला आलेली नव्हती व पूर्वाध्ययन, पूर्वसंस्कार वगैरेंचा पगडाहि ग्रंथकाराच्या मनावर होता. यामुळें अगदीं प्रारंभीं जी रचना झाली ती शुद्ध नसून मिश्र स्वरूपाची होती. उदाहरणार्थ, महानुभवांचे पहिले आचार्य नागदेव यांची बहीण उमांबा इनें पैठण मुक्कामीं सन १२६४ च्या सुमारास रचिलेल्या पहिल्या चौपाईत अपभ्रंश, मराठी, गुजराथी व हिंदी यांचें मिश्रण सांपडतें.

नगरद्वारहो भिच्छा करोहो बापुरे मोरी अवस्था लो।
जिहां जावो तिहां आयसरिसा कोऊं न करी मोरी चिंता लो ॥ १ ॥
हाट चौहाटां पड रहूं मांगूं पंचघर भिच्छा।
बापुड लोक मोरी आवस्था कोऊं न करी मोरी चिंता लो ॥ २ ॥

—देशपांडेकृत महानुभावीय मराठी वाङ्मय, पृष्ठ १२ पहा.

वरील ओळींवरून आणखी एक विचार मनांत येतो तो असा कीं, प्राकृतापासून अपभ्रंशाच्या द्वारें देशी भाषांची उत्क्रांति होत असतां, अपभ्रंश व देशी भाषा यांच्यामध्यें एखादी मिश्र भाषा असावी कीं काय? आणि याच मिश्र भाषेपासून दक्षिणेंत मराठी, पश्चिमेकडे गुजराथी, उत्तरेकडे हिंदी व पूर्वेकडे बंगाली, बिहारी, मैथिली वगैरे देशभाषा उत्पन्न झाल्या नसतील काय! जर अशी मिश्र सार्वदेशिक भाषा खरोखरीच अस्तित्वांत असेल, तर ती वाङ्मयिक अपभ्रंशांशीं बऱ्याच अंशीं सदृश पण उत्तरकालीन असावी व कृष्णेच्या उत्तरेकडील प्रदेशांतील सर्व सुशिक्षितांना समजत असावी. दहाव्या आणि अकराव्या शतकांतील अपभ्रंश ग्रंथांचा नीट अभ्यास झाल्यास त्याचप्रमाणें देशी भाषांमधील प्राचीन ग्रंथांचें संशोधन झाल्यास या प्रश्नावर महत्त्वाचा प्रकाश पडेल अशी मला खात्री वाटते.

अशा तऱ्हेच्या मिश्र भाषेचें अस्तित्व केवळ माझ्या कल्पनेंतून निघालें नाहीं. मराठी प्रदेशांत रचिलेल्या उमांबेच्या चौपाईपेक्षांहि या कल्पनेस जास्त पुरावा सांपडतो. मुंबईचे विद्वान् ॲडव्होकेट मोहनलाल दलिचंद देसाई यांनीं

आपल्या ' जैन गुर्जर कविओ ' या पुस्तकांत अपभ्रंश–गुजराथी–हिंदी अशा मिश्र भाषेचा उल्लेख केला आहे, त्याचप्रमाणें महामहोपाध्याय हरप्रसादशास्त्री यांनीं संपादिलेल्या विद्यापति ठक्कुरविरचित ' कीर्तिलता ', ' दोहा-ओगान' यांमध्यें, व डॉक्टर साहिदुल्ला यांनीं प्रकाशित केलेल्या 'दोहाकोष,' ' चर्या ' वगैरे ग्रंथांतून अपभ्रंश–हिंदी- बंगाली अशी भाषाविकासाची प्रणाली स्पष्टपणें दाखविली आहे.

वरील सर्व माहितीवरून एकच गोष्ट ठळकपणें नजरेस येते ती ही कीं, देशी भाषांच्या विशेष अध्ययनामध्यें अपभ्रंशाच्या अध्ययनाला महत्त्वाचें स्थान मिळालें पाहिजे; आणि देशी भाषांतील ग्रंथरचनेचा, विशेषत: मराठीचा आरंभकाल अकराव्या शतकांत मानिला तर त्यापूर्वी रचिलेल्या–विशेषत: महाराष्ट्रांत रचिलेल्या–अपभ्रंश ग्रंथांना विशेष महत्त्व दिलें पाहिजे. या ग्रंथांच्या अभ्यासावरून एक गोष्ट लक्षांत येते ती ही कीं, नवव्या, दहाव्या व अकराव्या शतकांत अपभ्रंश भाषा ही कृष्णेच्या उत्तरेस निदान सुशिक्षित लोकांची तरी सार्वदेशिक भाषा होती. या सुमारास संस्कृतांतहि मधूनमधून ग्रंथरचना होतच होती, पण तीमध्येंहि अपभ्रंशाचा प्रभाव ठळकपणें दिसून येतो. सोमदेवानें राष्ट्रकूटांच्या अमदानींत सन ९५९ सालीं ' यशस्तिलक' नांवाचा संस्कृत गद्यपद्यात्मक चंपू लिहिला. याच सालीं याच अमदानींत पुष्पदंतानें आपल्या ' महापुराण ' नांवाच्या ग्रंथास सुरुवात केली. दोघेहि कवि बृहन्महाराष्ट्राचे रहिवासी, दोघांच्या गांवांमधील अंतर फार तर १००–१५० मैलांचें असेल; आणि दोघांच्या ग्रंथांची भाषा जरी निराळी असली तरी सोमदेवाच्या संस्कृतावर त्या काळच्या प्रचलित बोलीचा परिणाम स्पष्ट दिसतो. सोमदेवानें पुष्कळ देशी शब्द, देशी वाक्प्रचार, देशी म्हणी, गाण्यास योग्य अशीं मात्रावृत्तें वापरलीं आहेत तशीं पूर्वीच्या संस्कृत ग्रंथांत तितक्या प्रमाणांत उपलब्ध नाहींत. यांवरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, सोमदेवानें मृत संस्कृत भाषेंत ग्रंथरचना केली तरी प्रचलित भाषेंतील वाङ्मयाचा तीवर फार परिणाम झाला.

अपभ्रंश भाषेच्या लोकप्रियतेचा आणि सार्वदेशिकत्वाचा आणखी एक पुरावा मिळण्यासारखा आहे. अपभ्रंश ग्रंथांत येणारीं पज्झटिका, चामर वगैरे



श्री. नारायण महादेव भिडे.



श्री. गोविंद महादेव भिडे.



श्री. नारायण वासुदेव महाजनी.



श्री. सदाशिव महादेव भिडे.



श्री. वासुदेव विष्णु कोनकर.



श्री. गोविंद कृष्ण मोडक.



श्री. महादेव गोपाळ थि



श्री. शंकर रंगनाथ दबडगे.

वृत्तें व प्रत्येक कडवकाच्या ( कडव्याच्या ) शेवटीं येणाऱ्या घत्ता या नांवाच्या दोन ओळी यांनीं सबंध कडवें एक गाण्यास योग्य असें पदच बनतें. कडव्याची भाषा त्या काळीं साधारण लोकांस समजण्यासारखी असल्यामुळें कीर्तनकार वगैरे अशा पद्यांचा निरूपणप्रसंगीं उपयोग करीत असावेत; आणि आजकालचे हरिदास कीर्तनांत ज्याप्रमाणें कटाव वगैरे गात असतांना जरूर तेथेंच फक्त अर्थ सांगतात, पण कटावाचें गायन बंद ठेवीत नाहींत, त्याचप्रमाणें या अपभ्रंश ग्रंथांतील कडवकांचा अर्थ गातां गातां सहज कळण्यासारखा असतो. पुष्पदंत कवीच्या ग्रंथांत तर इतकीं निरनिराळीं वृत्तें आलीं आहेत कीं, आधुनिक छन्दोरचनाकारांना व कवींना त्यांपासून स्फूर्तीचा एक नवीन झराच सांपडल्यासारखें वाटेल. यमक, अनुप्रास वगैरे शब्दचित्रांतहि इतकी विविधता आहे कीं, वामनमोरोपंतांनीं मराठी भाषेवर चढविलेले शब्दालंकार उष्टे व अपुरे वाटतील.

रूपसिद्धीचा विचार केला तर अपभ्रंश, महानुभावी वाङ्मय व ज्ञानेश्वर यांची मराठी यांमध्यें रूपांची परंपरा पूर्णपणें जमवितां येते. अम्हारा, महारा वगैरे अपभ्रंशामध्यें येणारीं रूपें जरी हिंदीमध्यें हमारा या स्वरूपांत दिसतात, तरी मराठींत मात्र दिसत नाहींत, असा जो एक अपवाद घेतला जातो, त्यासहि उत्तर देतां येण्यासारखें आहे. प्रत्येक देशी भाषेंत प्रांतिक म्हणून गणले जाणारे कांहीं प्रकार असतातच. मराठीनें माझा, आमचा असे अल्पाक्षरी व अल्पप्रयत्नी शब्द बनविल्यामुळें तिला त्या शब्दरूपांची जरूरी वाटली नसेल.

ज्ञानेश्वरीपूर्वकालीन अपभ्रंश वाङ्मयामध्यें पुष्पदंत कवीच्या ग्रंथांचें महत्त्व मराठीच्या दृष्टीनें विशेष आहे. याची ग्रंथरचना विविध असून विपुल आहे. याच्या तीनहि ग्रंथांचा एकंदर विस्तार रॉयल साच्याचीं सुमारें १५०० पृष्ठें भरतील इतका आहे. त्यानें महापुराण, यशोधरचरित आणि नागकुमारचरित असे तीन ग्रंथ लिहिले. पहिल्या ग्रंथाचे आदिपुराण व उत्तरपुराण असे दोन भाग असून त्या दोहोंमिळून १०२ संधि (अध्याय किंवा वर्ग) असून ग्रंथसंख्या वीस हजार आहे. दुसरा व तिसरा ग्रंथ त्या मानानें अगदीं लहान असून त्यांतील संधींची संख्या अनुक्रमें ४ व ९ अशी असून ग्रंथसंख्या प्रत्येकीं दोन हजार आहे. हे सर्व ग्रंथ पद्यमय असून त्यांत अपभ्रंश भाषेंतील निरनिराळीं

मात्रावृत्तें योजिलीं आहेत. यांपैकीं पहिला ग्रंथ राष्ट्रकूट घराण्यांतील तिसऱ्या कृष्णराजाच्या कारकीर्दींत व त्याचा मुख्य मंत्रि भरत याच्या विनंतीवरून व याच्याच घरीं लिहिला आहे. या ग्रंथाच्या रचनेची सुरुवात सन ९५९ या वर्षी होऊन तो सहा वर्षांनीं म्हणजे सन ९६५ या सालीं समाप्त झाला. यशोधर आणि नागकुमार हे दोन ग्रंथ भरताच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा नन्न याच्या विनंतीवरून लिहिले आहेत.

या पुष्पदंत कवीविषयीं माहिती त्याच्या ग्रंथांतील उल्लेखावरून मिळते ती अशी:--पुष्पदंत हा काश्यप गोत्री ब्राह्मण, त्याच्या आईचें नांव मुग्धादेवी किंवा मुद्धाई व बापाचें नांव केशवभट्ट. पुष्पदंत जरी जन्मानें वैदिकधर्मी ब्राह्मण होता, तरी पुढें त्यानें गिदंबर जैन धर्माची दीक्षा घेतली. त्याच्या ग्रंथांचे विषयहि जैनधर्मीयच आहेत. प्रथम तो वीरराज नांवाच्या दक्षिणेंतील एका राजाचा आश्रित होता; पण त्याचा दरबारीं अपमान झाल्यामुळें तेथून हा निघाला व मान्यखेट (हल्लींच्या निजामच्या राज्यांतील मलखेड) शहरीं आला. प्रवासाच्या श्रमानें दमून शहराबाहेरील एका राईंत तो बसला असतां तेथें भरतमंत्र्याच्या ओळखीचे सद्‌गृहस्थ आले व त्यांच्या सांगण्यावरून तो भरताचे घरीं आला व शेवटपर्यंत त्याच्या व त्याच्या मुलाच्या आश्रयानें राहिला. पुष्पदंताची शरीरयष्टि कृश होती. वर्णानें तो काळासांवळा व साधारण कुरूपच होता; पण तोंडावर मात्र सदा हास्य दिसत असे. त्याला मूलबाळ वगैरे कांहीं नव्हतें. घरदारहि त्यानें केलें नाहींसें दिसतें. महापुराणाच्या आरंभीं पुष्पदंतानें आपल्या पूर्वीच्या व परिचित ग्रंथकारांची यादी दिली आहे तीवरून कवीचें वाचन दांडगें असलें पाहिजे असें सिद्ध होतें. याची कवित्वशक्ति उच्च प्रतीची होती. विशेषतः याच्या ग्रंथांपैकीं कांहीं भाग, उदाहरणार्थ हरिवंश, (महापुराणांतील ८१-९२ हे संधि) विशेष सुंदर आहेत.

यशोधर-चरिताच्या प्रस्तावनेंत मीं याच्या ग्रंथाविषयीं लिहिलेंच आहे क, मराठी भाषेच्या अभ्यासकाला ज्ञानेश्वरीपूर्व अपभ्रंशाचें ज्ञान असणें फार जरूर आहे. त्यांतून पुष्पदंत हा महाराष्ट्रांतील कवि. त्यानें जेथें ग्रंथरचना केली तेथून २००-३०० मैलांच्या परिघाच्या आंतच पुढील तीन शतकांत महत्त्वाची मराठी ग्रंथरचना झाली. महानुभावांचीं सिद्धांतसूत्रें, ऋद्धपुर-

वर्णन, शिशुपालवध, वच्छहरण वगैरे ग्रंथांनंतर ज्ञानेश्वरी तयार झाली ती याच प्रदेशांत. तेव्हां या सर्व ग्रंथांचें यथार्थ ज्ञान व्हावयास याच प्रदेशांतील पूर्वीच्या ग्रंथसंपत्तीचें ज्ञान असणें हें आवश्यक आहे.

ज्ञानेश्वरपूर्वकालीन अपभ्रंश कवींपैकीं दुसरा महत्त्वाचा कवि धवल हा होय. यानें केलेला हरिवंशपुराण हा एकच ग्रंथ व त्याचीहि फक्त एकच प्रत आतांपर्यंत उजेडांत आली आहे. या हरिवंश-पुराणाचे १२२ संधि असून ग्रंथसंख्या १८००० आहे. ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय नेमिनाथ तीर्थंकराचें चरित्र हा आहे. या कथेमध्यें व कृष्णाच्या कथेमध्यें पुष्कळच साम्य असल्यामुळें त्यांचा तुलनात्मक अभ्यास करणें मौजेचें होईल. धवल कवि हा दहाव्या शतकाच्या अखेरीस, सन ९८८ नंतर, पण अकराव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेला. याचें वास्तव्य कोणच्या प्रदेशांत होतें हें ठरविण्यास कांहीं साधन उपलब्ध नाहीं.

श्रीचंद्र नांवाच्या कवीनें कथाकोष नांवाचा एक ग्रंथ अपभ्रंश भाषेंत लिहिला आहे. या ग्रंथाचे एकंदर ५३ संधि असून त्यांपैकीं प्रत्येकांत एक एक गोष्ट दिली आहे. या कवीनें आपली ग्रंथरचना पाहिला मूलराज ( सुमारें सन ९४१-९९६ ) याच्या कारकीर्दींत काठेवाडांतील अणहिल्लपूर ( सध्यांचें पाटण ) येथें केली आहे. ग्रंथाचा विषयच असा आहे कीं, त्यांत त्या वेळच्या प्रचलित बोलींचें प्रतिबिम्ब पडलें आहे. जुन्या गुजराथी भाषेच्या अभ्यासकांना हा ग्रंथ फार महत्त्वाचा आहे. या ग्रंथाचीहि आतांपर्यंत एकच प्रत उपलब्ध झाली असून ती कारंजा येथें आहे.

अपभ्रंश भाषेंतील आणखी एक महत्त्वाचा कवि कनकामर हा होय. यानें करकण्डूचरित नांवाचा एक ग्रंथ लिहिला असून, त्याचे दहा संधि आहेत. यांत करकण्डू नांवाच्या एका जैन राजाचें चरित्र वर्णिलें आहे. या कवीनें आपल्या ग्रंथांत स्वयंभुदेव आणि पुष्पदंत यांचे उल्लेख केले असल्यामुळें त्याचा काळ दहाव्या शतकानंतरचा ठरतो. प्रो. जैन यांच्या मतानें हा कवि अकराव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेला. करकण्डूचरिताचें सध्यां एकच हस्तलिखित उपलब्ध आहे व तें कारंजा येथें आहे. यानें आपला ग्रंथ कोठें लिहिला हें माहित नाहीं.

पण वर उल्लेखिलेल्या अपभ्रंश कवींपेक्षांहि जुन्या स्वयंभुदेव नांवाच्या कवीचे हरिवंशपुराण आणि पउमचरिय ( जैन रामायण ) हे ग्रंथ नुकतेच उजेडांत आले आहेत. त्यांची ग्रंथसंख्या अनुक्रमें १८००० व १२००० आहे. या कवीनें आपल्या ग्रंथांत भामह, दण्डि, बाण, हरिषेण, चतुर्मुख आणि रविषेण या पूर्वग्रंथकारांचा उल्लेख केला आहे; आणि पुष्पदंतानें स्वयंभुदेवाचा उल्लेख केला आहे. त्यांवरून हा कवि आठव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत केव्हां तरी झाला असावा असें सिद्ध होतें.

वर उल्लेखिलेल्या ग्रंथांशिवाय आणखीहि कांहीं लहानमोठे, प्रसिद्ध-अप्रसिद्ध ग्रंथ उपलब्ध आहेत. पण मराठी भाषेच्या इतिहासाला बृहन्महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या पुष्पदंताच्या ग्रंथांचें महत्त्व विशेष आहे हें सांगणें नकोच. मराठी भाषेच्या अभिमान्यांनीं व तिच्या उन्नतीची इच्छा करणाऱ्यांनीं या कवीच्या कृतींकडे दुर्लक्ष करूं नये अशी विनंति करून मी हा छोटेखानी लेख संपवितों.

---

# साहित्य आणि संगीत

लेखक : **प्रो. रामचंद्र बळवंत आठवले**, एम्. ए., अहमदाबाद.

[ यांचा जन्म सन १८९४ सालीं झाला. मॅट्रिकपर्यंत शिक्षण भोरास व पुढें फर्ग्युसन कॉलेजमधून पहिल्या वर्गांत बी. ए. होऊन '**भाऊ दाजी प्राइज**' मिळालें. एक वर्ष फीमेल हायस्कूलमध्यें शिक्षकाचें काम केल्यावर गुजराथ कॉलेजमध्यें संस्कृतचे प्रोफेसर झाले. पुढें कांहीं दिवस गुजराथ महाविद्यालयांत (राष्ट्रीय) प्रोफेसर होते. सध्यां ट्युटोरिअल हायस्कूल या खाजगी शाळेंत मास्तर आहेत. १९२८ सालीं **भांडारकर पारितोषिक** मिळवून एम्. ए. झाले. गुजराथींत त्यांनीं अनेक लेख लिहिले आहेत. ]

जगांतील यच्चयावत् प्राणिमात्रांची आयुष्यांतील प्रत्येक क्षणीं आनंदाकरतां धडपड चाललेली असते, याचें कारण काय ? जगांतील प्रसिद्ध तत्त्वज्ञांनीं या गूढ प्रवृत्तीची कारणमीमांसा करण्याचे अनेक प्रयत्न केले आहेत;

पण आपल्या उपनिषत्कार ऋषींनीं याची जी कारणमीमांसा केली आहे तीपेक्षां ज्यास्त सयुक्तिक व समाधानकारक अशी मीमांसा आजपर्यंत दुसरी झाली नाहीं. ऋषींच्या मतें हें सर्व जगत् आनंदस्वरूप ब्रह्मापासून उत्पन्न झालें असून ब्रह्मस्वरूप अतएव आनंदस्वरूप आहे. मायेच्या अगम्य शक्तीमुळें ' आपण आनंदस्वरूप आहोंत, ' ही प्राणिमात्रांची जाणीव बरीच पुसट व कित्येक ठिकाणीं जवळजवळ नाहींशी झालेली आढळते. तथापि आनंदाविषयीं अथवा स्वस्वरूपाविषयीं त्याची गोडी कधींहि अजिबात नष्ट होत नाहीं. " **आनंदाद्धि इमानि भूतानि जायन्ते आनन्देन जीवन्ति–**" व " **आनंदं अभिसंविशन्ति** " ह्या उपानिषदांचे वचनांत ' प्राणिमात्रांची आनंदाविषयीं धडपड कां ? ' याचें समर्पक उत्तर दिलें आहे.

जगांतील प्राणिमात्रांचें ध्येय आपलें आनंदस्वरूप प्राप्त करून घेणें हें आहे असें जरी वर सांगितलें, तरी खऱ्या आनंदाचें स्वरूप अज्ञानामुळें बहुतेक प्राणी विसरून गेले आहेत व त्यामुळें खोट्याच आनंदाला सत्य आनंद मानून ते त्याला कवटाळतात व शेवटीं दुःख पावतात, असें नित्याच्या या क्लेशबहुल संसारांत आपण पहातों.

या प्राण्यांतील अत्यंत अज्ञानी प्राण्यांचा जो एक वर्ग असतो, तो शरीरसंरक्षण करणें व देहधर्म पाळणें ह्यालाच सुखसर्वस्व मानतो व त्याचकरतां त्याची धडपड चाललेली असते. वृक्षपाषाणादिकांत अलीकडील शास्त्रीय शोधानें जरी मनोविकार, सुखदुःखांची वेदना वगैरे धर्म आहेत असें सिद्ध झालें आहे, तरी स्पष्ट तऱ्हेनें ते धर्म दिसत नसल्यानें तूर्त त्यांचा विचार बाजूला ठेवूं या; परंतु पशुपक्ष्यादिकांत मात्र ही शरीरसंरक्षणालाच आनंदस्वरूप मानण्याची प्रवृत्ति दिसून येते ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. उपनिषत्कारांनीं आनंदस्वरूपाकडे पोंचणाऱ्या प्राण्यांचे पांच वर्ग कल्पिले आहेत. त्यांपैकीं शेवटच्या वर्गाला त्यांनीं ' अन्नकोश ' असें नांव दिलें आहे. ह्या अन्नकोशबिशिष्ट-वर्गांत वरील पशुपक्षी येतात. पण येथें हेंहि सांगणें योग्य आहे कीं, कित्येक मनुष्येंहि ह्या वर्गांत पशुपक्ष्यादिकांच्या खांद्याला खांदा लावून बसलेलीं दिसतात. जगांत ' **आहार, निद्रा, भय व मैथुन** ' यांखेरीज यांना दुसरें कांहींच दिसत नाहीं. पण अशीं हीं थेट पशूंप्रमाणें असलेलीं

माणसें सोडून दिलीं तर बाकीचीं मनुष्यें त्यांच्यापेक्षां वरील वर्गांतील असतात. म्हणजे केवळ देहधर्मांतच आनंद न मानतां शरिराला जेणें करून सौख्य होईल, मनाला व तद्द्वारा शरिराला जेणेंकरून आनंद वाटेल अशी प्रवृत्ति करण्यांत हे लोक गढून गेलेले असतात. "शरीराच्छादनाला पुरेल इतकेंच कापड नव्हे तर, ज्याच्या योगानें शरीराला गुदगुल्या होतील व नेत्रांना आल्हाद होईल असें मऊमऊ व चित्रविचित्र रंगांचें कापड मला पाहिजे, पुष्पमाला, चंदनलेप, भव्य इमारती इत्यादि सुखविलासांचीं साधनें मला पाहिजेत," असें म्हणून तत्संपादनार्थ ह्या वर्गांतील लोकांचा सारखा प्रयत्न चालू असतो. या लोकांच्या वर्गाला 'प्राणकोश' असें विशिष्ट नांव उपनिषत्कारांनीं दिलें आहे. पूर्वींच्या 'अन्नकोशां'तील प्राण्यांत व यांच्यांत हें एक मोठें अंतर आहे कीं, अन्नकोशांतील मंडळींना ज्ञान अथवा विचार हा पदार्थ फारसा माहित नसतो. त्यांचें जास्तींत ज्यास्त ज्ञान म्हणजे 'ओघप्राप्त' ज्ञान ( Instinct ) हेंच. पहिल्या वर्गांतील प्राण्यांचें सौख्य तामस असतें तर दुसऱ्या वर्गांतील लोकांचें सौख्य राजस असतें.

यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः ।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥–गीता, १८. ३९.

असें गीतेंत जें तामस सुखाचें लक्षण दिलें आहे तें पहिल्या म्हणजे अन्नकोशांतील प्राण्यांना उद्देशून लिहिलें आहे व

विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥–गीता, १८. ३८.

असें जें राजस सुखाचें लक्षण केलें आहे तें वरील दुसऱ्या वर्गांतील लोकांच्या सुखाला लागू पडतें. भौतिक पदार्थांतच सुखसर्वस्व सांठवलें आहे, अशी कल्पना करून घेऊन हे दुसऱ्या वर्गांतील लोक संपत्ति व विषयभोगांतच सदैव गढून गेलेले असतात. ह्या वर्गांतील लोकांत ज्ञानाची खूपच प्रगति झालेली असते. ह्यांची सौंदर्यसेवनाची रसिकताहि बहुत वाढलेली असते, पण त्यांची मर्यादा अथवा पर्यवसान, भौतिक अथवा इंद्रियगोचर अथवा इंद्रियसेव्य विषयांतच होतें. भौतिक पदार्थांचें स्वरूपच सुखदुःख-

मिश्रित असल्यानें त्यांचें कितीहि रसिकतेनें सेवन केलें तरी त्यांपासून निर्भेळ आनंदाची प्राप्ति व्हावयाची नाहीं, हें अगदीं उघड आहे. ह्या दुसऱ्या वर्गांतील लोकांतच प्रथमतः कलांचें स्वरूप व उत्पात्ति दृष्टीस पडतात. आजकाल सुधारणेच्या शिखराला पोंचलेल्या राष्ट्रांतील उच्च संस्कृतीचे म्हणविणारे पुष्कळसे लोक ह्या 'प्राणकोशां'तील आनंदाच्या पलीकडे गेलेले नाहींत. अर्थ आणि काम ह्या दोन पुरुषार्थांच्या पलीकडे या वर्गांतील लोकांची मजल गेलेली नसते. मानव हा शब्द 'मन्' (विचार करणें) ह्या धातूपासून झालेला आहे. तो धात्वर्थ या वर्गांतील मंडळी सार्थ करून दाखवितात. तथापि, दुर्दैवानें शरीरसुख व विलासांची अभिवृद्धि करण्याकडे ह्या मानवांची विचारशक्ति खर्च होते. मनाच्या विचारशक्तीचें रम्य फल 'कला' तिलाहि राजसुखाची दासी बनवून तिला भ्रष्ट करण्याचें पाप या वर्गांतील लोक करतात.

पण याच्यापेक्षां वरील वर्गांतील लोकांचें शरीरसौख्य अथवा विलास यांकडे लक्ष कमी असून भौतिकपदार्थनिरपेक्ष सौख्य मिळविण्याकडे यांची जास्त प्रवृत्ति असते. सृष्टींतील दृश्य पदार्थांना अज्ञानानें रम्य अथवा अरम्य मानून त्यांच्या प्राप्तीकरतां अथवा त्यांच्या त्यागाकरतां प्रवृत्ति करून दुःख पावणारे हे लोक नसतात. या लोकांची सृष्टि ब्रह्मदेवाच्या सृष्टीपेक्षां कांहीं निराळीच असते. दृश्य सृष्टींतील सुखदुःखमय पदार्थांवर या सृष्टींतील सौख्य अवलंबून नसल्यानें ही सृष्टी 'ल्हादैकमयी' म्हणजे आनंदमय असते. अमुक एक पदार्थ मिळाला तरच दृश्य सृष्टींत आनंद होतो, तसाच प्रकार येथेंहि असल्यानें ही अदृश्य अथवा कल्पनिक अथवा मानस सृष्टी 'अनन्यपरतंत्रा' असते. ह्या सृष्टींत विहार करणाऱ्या लोकांना उपनिषदांत 'मनःकोशां-'तील लोक म्हटलें आहे. या लोकांचा दर्जा दुसऱ्या वर्गांतील लोकांपेक्षां फारच वरचा आहे. हे लोक जेथें जास्त तेथेंच सुधारणेचा उत्कर्ष आहे असें समजावें. याचे उलट या वर्गांतील लोक जेथें फारच थोडे आढळतात तेथें भौतिक सुधारणा कितीहि झाली असली तरी तो देश रानटी म्हणायला मुळींच हरकत नाहीं. कलांचें शुद्ध स्वरूप व त्यांपासून होणारा सात्त्विक आनंद या मनःकोशाच्या सृष्टींतच पहायला मिळतें. साहित्य, संगीत व

चित्र इत्यादि कलांची निस्सीम उपासना करणारे श्रेष्ठ रसिक याच वर्गांत दृष्टीस पडतात.

वरील किंचित् लांबलचक परंतु आवश्यक विवरणावरून आपले लक्षांत आलेंच असेल कीं, कलांचा उदय मनुष्याच्या ज्ञानावर अवलंबून असतो. कला उत्पन्न झाल्या म्हणजे समजावें कीं, मनुष्यप्राणी हा ' अन्नकोशां 'तून वर येऊन प्राणकोशापर्यंत अथवा मनःकोशापर्यंत आला. मनुष्य कलारसिक झाला कीं, मोक्षमार्गांतील एक टप्पा त्यानें आक्रमिला असें म्हणायला हरकत नाहीं. कलाविहीन मनुष्य पशूपेक्षां कोणत्याहि तऱ्हेनें निराळा मानतां येत नाहीं.

**' साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः !**
**तृणं न खादन्नपि जीवमानस्तद्भागधेयं परमं पशूनाम् ॥ १ ॥**

या श्लोकांत कवीनें मोठ्या मार्मिकतेनें कलाविहीन अरसिकाला जो खोंचदार टोमणा मारला आहे त्याचें स्वारस्य वरील विवेचनावरून आपल्याला कळेल असें वाटतें. कामसूत्रकार वात्स्यायनानें कामशास्त्रांत चौसष्ट कलांचा उल्लेख केला आहे. पण त्यांत उच्च कला कोणत्या व हीन कला कोणत्या याचा त्यानें विचार केला नाहीं; त्यामुळें ' कले 'च्या तात्त्विक स्वरूपाविषयीं लोकांत बरीच गैरसमजूत झालेली दिसते. आमच्या मतें कलेंतहि उच्चनीच भाव जरूर आहे व तो उच्चनीचभाव वरील ' प्राणकोश ' व ' मनःकोश ' यांच्या लक्षणांवरून ठरवितां येईल. जर कलांत उच्चनीच भाव मानला नाहीं तर नित्य व्यवहारांतहि हास्यास्पद घोंटाळे उत्पन्न होतील. शरीराला व मनाला आनंद देणारी कृति निर्माण करण्याचें कौशल्य याला ' कला ' म्हणूं लागले तर रसभावयुक्त काव्य करणाऱ्या महाकवीला व लज्जतदार व षड्रससंपन्न स्वयंपाक करणाऱ्या बल्लवाचार्याला एकाच पंक्तीला बसवावें लागेल; अथवा आपल्या गानमाधुर्यानें श्रोत्यांच्या चित्तवृत्ती दंग करून सोडणाऱ्या गायकांचा व मोहक सुवासाचें अत्तर तयार करणाऱ्या गंध्याचा दर्जा समान मानावा लागेल. परंतु शिष्टव्यवहारांतहि गायक व कवि यांचा दर्जा गंधी व आचाऱ्यांपेक्षां श्रेष्ठ मानतात. यावरूनहि वात्स्यायनानें सांगितलेल्या

चौसष्ट कलांचें 'उच्च' व 'नीच' असें वर्गीकरण पाडणें भाग आहे हें उघड होतें. तेव्हां प्राणकोशाला साहाय्यभूत कला हीन दर्जाच्या व मनः-कोशांतर्गत कला उच्च हेंच आमच्या मतें कलांचें निरपवाद वर्गीकरण होय. याचेंच स्पष्टीकरण करायचें म्हणजे ज्या कला शरीराचें सौख्य वाढवितात अथवा भोगोन्मुख इंद्रियवृत्ति करतात, अथवा ज्यांचे सेवनापासून उत्पन्न होणारें सौख्य अल्प काल टिकतें, अथवा ज्या कलांचें अस्तित्व बाह्यसृष्टींतील पदार्थांवर अवलंबून असतें, त्या कला हीन दर्जाच्या, व याच्या अगदीं उलट प्रकारच्या कला उच्च दर्जाच्या असें समजावें. उदाहरणार्थ, पाककला. या कलेपासून निर्माण केलेलें पक्वान्न हें शरीराला अथवा रसनेंद्रियांना सौख्य देतें; पक्वान्नसेवनापासून जीभ सुंदर पदार्थ खाण्याविषयीं चटावते; पक्वान्न-सेवनापासून उत्पन्न होणारें सुख फारच थोडा वेळ टिकतें, इतकेंच नव्हे तर अतिरिक्त पक्वान्नसेवनानें शरीराला पीडाहि होते हें अनुभवसिद्ध आहे; याशिवाय पक्वान्न बनविण्याची कला बाह्यसृष्टींतील मालमसाल्यावर अवलंबून आहे. ह्या सर्व दृष्टींनीं पाहतां ह्या कलेपासून उत्पन्न होणारें सौख्य,

'विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् । परिणामे विषमिव' अशा प्रकारचें असल्यानें ही कला हीन आहे.

याचे उलट काव्यकला ऊर्फ साहित्यकला आणि संगीतकला यांचें उदाहरण घेऊं. या दोन्हीहि कला प्रत्यक्ष इंद्रियांना जितकें सौख्य देतात त्यापेक्षां मनाला जास्त देतात. ह्या कलेच्या सात्त्विक रसिकतेनें केलेल्या सेवनापासून भोगपराङ्मुख वृत्ति होते; यांच्या आनंदांत दंग होऊन रसिक लोक शरीरधर्महि विसरतात हें अनुभवास येतें; या कलांच्या सेवनापासून उत्पन्न होणारा आनंद शुद्ध व चिरकाल टिकणारा असतो. काव्यसेवनाचा अतिरेक झाला तरी त्यापासून रसिक आजारी पडला आहे, संगीत अतिरिक्त श्रवण केल्यानें रसिकला अपचन झालें आहे असें ऐकिवांत नाहीं. शेवटीं या कला बाह्यपदार्थांवर मुळींच अवलंबून नाहींत. म्हणजे समजा, काव्यांत एखाद्या सुंदर उपवनाचें वर्णन करायचें असलें तरी उपवन दोनशें मैल दूर असलें तरी त्यांचें कांहीं अडत नाहीं. कवि स्वतः भिकार झोंपड्यांत बसूनहि टोलेजंग राजवाड्यांचें वर्णन करूं शकेल. खडकावर बसूनहि गायनाचार्य आपल्या अलौकिक

गानसामर्थ्यानें नानाविध रसांचें छत पसरून टाकतो. तेव्हां या दोन कला निःसंशय श्रेष्ठ दर्जाच्या होत व म्हणूनच त्यांसंबंधीं प्रस्तुत निबंधांत थोडी चर्चा करण्याचें योजिलें आहे.

या श्रेष्ठ दर्जाच्या कलांचे निस्सीम उपासकाला मनःकोशाच्या वर्गांत घालतां येतें. या वर्गांतील लोकांचीं मनें इतकीं कोमल व सात्त्विक बनलेलीं असतात कीं, 'अन्नकोशां'तील सौख्याविषयीं हे संपूर्णतः नाहीं तरी फारच उदासीन असतात. 'प्राणकोशां'तील शरीरमनःसंयोगानें होणाऱ्या उच्च आधिभौतिक सुखाविषयींहि हे बेफिकीर असतात. '**पिपासितैः काव्यरसो न पीयते**' असा या लोकांना जरी आधिभौतिक सुखवाद्यांनीं टोमणा मारला, तरी हे आपल्या मानसिक आनंदांत गुंग होऊन—

'**पिबामः शास्त्रौघान् उत विविधकाव्यामृतरसान्**'

असें स्वतःशींच वेड्यासारखें पुटपुटतात, अथवा रससेवनानें उन्मत्त होऊन

**कान् पृच्छामः सुराः स्वर्गे निवसमो वयं भुवि ।**
**किं वा काव्यरसः स्वादुः किंवा स्वादीयसी सुधा ।**

असें विचारीत सुटतात. (या योगभ्रष्ट रसिकांनीं) (मोक्षमार्गांतील) निम्मी मजल गांठली आहे असें म्हणायला हरकत नाहीं. या रसिकांना दारिद्र्याची जरी गांजणूक झाली, आधिभौतिक विलासांना जरी हे पारखे झाले तरी यांच्या काव्यसंगीतसेवनाच्या सात्त्विक आनंदांत मुळींच अंतर पडत नाहीं.

**यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।**
**तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तं आत्मबुद्धिप्रसादजम् ॥** गीता, १८-३७

यांत सांगितलेल्या सात्त्विक सुखाचा अल्पांशानें तरी आस्वाद घेण्याचें महाभाग्य या रसिकवरांचेंच असतें.

वस्तुसापेक्ष सुखाला कायमची लाथ मारल्यानें या कलारसिकांनीं राजस व अनियमित सुखावर मात केलेली आहे. तथापि यांचें मनःसुख सापेक्ष असल्यानें मनोनिरपेक्ष उच्च आनंद भोगणाऱ्या 'विज्ञानकोशां'तील ज्ञान्यापेक्षां रसिक कमी दर्जाचे हें उघड आहे. पण 'विज्ञानकोश' व त्याच्याहि पुढच्या आनंदस्वरूप झालेल्या 'आनंदकोशां'त विहार करणाऱ्या सिद्ध व

मुक्त महापुरुषांची जगांत सर्वकालीं अत्यंत अल्पसंख्या असल्यानें त्यांचा विचार न करतां तूर्त सामान्य जगांतील लोकांच्या दृष्टीनें आम्ही कलारसिकांना श्रेष्ठ स्थान देतों, व म्हणून प्रस्तुत निबंधांत कला व कलारसिक यांचें विशेष विस्तारानें माहात्म्य वर्णन केलें आहे.

या ठिकाणीं कोणी अशी शंका घेतील कीं, " कलोपासक लोकांचें तुम्ही महत्त्व वर्णितां तें कबूल; पण नानाविध शास्त्रांचें अध्ययन करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या सात्त्विक सुखाचें महत्त्व तुम्ही कबूल करितां कां नाहीं ? करीत असाल तर त्याचा येथें निर्देश सुद्धां करीत नाहीं हें काय? " यावर उत्तर असें कीं, मनाच्या दोन शक्ति आहेत. एक विचार करण्याची व दुसरी कल्पना करण्याची. यांपैकीं विचार करण्याच्या शक्तीचें जेथें प्राधान्य असतें, त्याला शास्त्र म्हणतात. ज्या ठिकाणीं कल्पनेचें प्राधान्य असतें तेथें कलेचा प्रादुर्भाव होतो. दोहोंचाहि उद्देश आनंदप्राप्ति अथवा मोक्षप्राप्ति हाच. पण शास्त्र बुद्धीच्या मार्गानें जातें तर कला भावनेच्या बळावर आनंदप्राप्ति करूं इच्छिते. विश्वांतील नानात्वांत ऐक्यबुद्धीनें पाहणें हें शास्त्राचें ध्येय, तर भावनेनें ऐक्य पाहणें हें कलांचें. सर्व जग आनंदस्वरूप पाहून त्यांत आपला लय करणें हें दोघांचेंहि काम. पण भावनाप्रधान कलांचा विचार करण्याचें प्रस्तुत निबंधांत योजिलें असल्यानें आम्ही शास्त्रांचा परामर्ष घेतला नाहीं

असो. आमच्या निबंधाच्या विषयाची भूमिका तयार करायला इतका वेळ लागला. वरील विवरणाची संक्षेपानें पुनरुक्ति केल्यास पुढील विषयप्रतिपादन समजण्यास सोपें जाईल. वरील विवरणांत प्रत्येक प्राणी आनंदस्वरूप विसरतो. तथापि, आनंदप्राप्तीकरतां त्याची खटपट चालू असते. बाह्य पदार्थांच्या उपभोगानें मनुष्याला विकृत आनंद मिळतो. कलेच्या योगानें त्याला बऱ्याच वरच्या दर्जाचा वस्तुनिरपेक्ष सात्त्विक आनंद मिळतो. सर्वच कला सारख्या दर्जाच्या नसतात. त्यांच्यांतील राजस सुख देणाऱ्या कला हीन मानाव्या व सात्त्विक सुख देणाऱ्या उच्च दर्जाच्या समजाव्या. साहित्य व संगीत ह्या कला फारच श्रेष्ठ कला आहेत. शास्त्रें हीं बुद्धिप्रधान व कला या भावनाप्रधान असल्यानें दोहोंहि ध्येयांत ऐक्य जरी असलें तरी येथें शास्त्राचा विचार केला नाहीं, इतकाच सारांश आहे.

आतां साहित्य व संगीत या दोनच कलांचा या ठिकाणीं विचार करण्याचेंहि कारण असें आहे कीं, बाकींच्या कोणत्याहि दोन कलांत या दोन कलांतील सादृश्याइतकें निकट सादृश्य नाहीं. साहित्य व संगीत या दोन्हीहि कला एकाच मातेच्या वडील धाकट्या बहिणी इतक्या सदृश आहेत. दोन्हीहि कला ध्वनीपासून उत्पन्न झाल्या आहेत. अर्थात् दोन्हीहि श्रोत्रेंद्रियांचे विषय आहेत. यांशिवाय या दोन्ही कला परस्परांना इतक्या उपकारक आहेत कीं, या त्यांच्या परस्परोपकारत्वामुळें या दोन्ही कला एकच आहेत अथवा निदान एकीवांचून दुसरीचें अस्तित्वच संभवूं शकणार नाहीं, असा यांच्या विषयीं गैरसमज झालेला दिसतो. तेव्हां खरोखरी यांचें सत्य स्वरूप काय आहे, याची चर्चा करणें मनोरंजक व तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

साहित्य व संगीत या दोन्हीहि कला मानव हृदयांत भावनेची उत्कटता झाल्यामुळेंच अस्तित्वांत येतात, हें वर आपण पाहिलेंच आहे. ध्वनिप्रधान अथवा शब्दप्रधान इतर शास्त्रें अथवा कला यांच्यापेक्षां या कलाद्वयांत विशेष हाच आहे कीं, केवळ शब्दाच्या सामान्य स्वरूपापेक्षां "श्रवणमधुर नादविशेष" दोन्हींत प्राधान्येंकरून आढळतो. किंबहुना श्रवणमधुर नादविशेष हा ह्या दोन्ही कलांचा प्राण आहे. 'कु' गाणें या धातूपासून काव्य हा शब्द उत्पन्न झाला आहे, व 'गै' गाणें या धातूपासून गायन हा शब्द झाला आहे. उभयतांतहि श्रवणमधुर नादविशेष हा समान आहे. ज्या वेळीं मनुष्यहृदयांत कोणताहि विकार प्रबलतम होतो व ज्या वेळीं तो त्या विकारांना वाणीनें व्यक्त करूं इच्छितो, त्या वेळीं व्यावहारिक अथवा नेहमींच्या नादापेक्षां एका विशिष्ट तऱ्हेचा नाद त्यांच्या तोंडांतून निघतो ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. या नादानंतर त्याच्याच पायावर अर्थपूर्ण—भावनेला व्यक्त करण्यास समर्थ अशी—शब्दरचना करणें हा काव्याचा प्रांत; व त्याच मधुर नादाला कमीअधिक चढवून म्हणजे मन्द्र, मध्य व तार ह्या तिन्ही सप्तकांत फिरवून एक विशिष्ट नाद अथवा स्वररचना—अन्तःकरणांतील उसळणारे मनोविकार व्यक्त करण्यास समर्थ अशी-निर्माण करणें हा संगीताचा प्रांत.

ह्या दोन्ही कलांत श्रेष्ठ कला कोणती हें ठरविणें थोडेंसें कठिण, परंतु शक्य आहे. कित्येक लोक "या दोन्ही कलांत उच्चहीन भाव ठरविणें

सर्वथैव अशक्य आहे, कारण ह्यांचा उच्चहीन भाव रुचिवैचित्र्यामुळें सर्वसंमत ठरवितां येणार नाहीं. बासुंदी, श्रीखंड यांतील श्रेष्ठ पक्वान्न कोणतें हें ठरविणें जसें अशक्य तसेंच या कलेच्या बाबतींतहि" असें म्हणून ही चर्चा अजिबात टाळू पहातात. परंतु आमच्या मतें या कलाद्वयांतील उच्चहीन भाव केवळ रुचिवैचित्र्यावरच अवलंबून आहे असें नाहीं. ध्वनिशास्त्रांतील मार्मिक तज्ज्ञांचें असें म्हणणें आहे व नित्य व्यवहारांतील गोष्टींच्या सूक्ष्म अवलोकनावरून हीच गोष्ट सिद्ध होते कीं, ज्या वेळीं भावना हृदयांत प्रबल व अनावर होऊन मुखावाटें व्यक्त होतात त्या वेळीं नादविशेषयुक्त शब्दरचना बाहेर पडते ही तर गोष्ट खरीच; पण भावनेचा बेहद्द प्रकर्ष झाला तर शब्दरचनाहि बंद पडून नुसती श्रवणरम्य नादविशेष रचनाच शिल्लक उरते; याच्याहि पुढें भावनाप्रकर्षाची तयारी गेली तर हा नाद-विशेषहि बंद पडतो व भावनेच्या असह्य धक्क्यानें मनुष्य मूर्छित होतो. आपण व्यवहारांतील एक उदाहरण घेऊं. पुत्रनिधनाच्या असह्य दु:खानें व्यथित झालेली माता ज्या वेळीं आपलें दु:खसंतप्त हृदय व्यक्त शोकानें हलकें करूं पाहते, त्या वेळीं पाषाणालाहि पाझर फोडील असा एक कानाला कांहीं निराळाच लागणारा व हृदयाला भेद करणारा आवाज काढून 'अरे माझ्या तान्हुल्या, तूं कोठें गेलास रे?' इत्यादि शब्द उच्चारते व शेवटीं शोकाचे कढ येऊं लागल्यावर तर तिचे ते शब्द देखील बंद पडतात व ती केवळ अश्रुगद्गद स्वरानें रडत बसते. या दृष्टान्तावरून काव्यापेक्षां संगीतांत भावनेचा जास्त प्रकर्ष आहे हें सिद्ध होतें—किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, जेथें काव्यानें अशक्त होऊन हात टेकले तेथून संगीतास आरंभ होतो. या ठिकाणीं काव्य व संगीत यांतील भेद स्पष्ट दाखविण्याकरतां आम्ही संगीत शब्दरहित पण नादविशेषरचनायुक्त असेंच घेतलें आहे. पण यावरून काव्य असतें तेथें संगीत नसतें अथवा संगीताच्या प्रांतांत काव्य मुळींच पाऊल ठेवूं शकत नाहीं असें म्हणण्याचा आमचा मुळींच आशय नाहीं. आमचें म्हणणें एवढेंच कीं, काव्यापेक्षां संगीतांत भावना व्यक्त करण्याचें सामर्थ्य अधिक आहे. अतएव काव्यापेक्षां संगीत श्रेष्ठ मानलें पाहिजे. शिवाय ज्याच्या वांचून दुसऱ्याचें अडेल तोच श्रेष्ठ ही व्यावहारिक कसोटी लावूनच जर पहावयाचें म्हटलें तर संगीतच श्रेष्ठ ठरेल. कारण कर्णमधुर

नादरचना अजिबात न आणतां काव्यरचना करावयाचें मनांत आणलें तर मुळींच साधावयाचें नाहीं अथवा साधलेंच तरी तें काव्य इतकें उठावदार तरी खास लागणार नाहीं. याचे उलट संगीतानें एक वेळ 'माझ्यांत एकहि शब्द येऊं देणार नाहीं.' अशी प्रतिज्ञा जरी केली तरी ती चालण्यासारखी आहे. कारण निःशब्द संगीत ऐकल्यानें अथवा गायल्यानें, भावना व्यक्त केल्यानें होणाऱ्या आनंदांत मुळींच कमतरता येणार नाहीं.

सखि स विजितो वीणावाद्यैः कथाप्यपरस्त्रिया ।
पणितमभवत्ताभ्यां तत्र क्षपाललितं ध्रुवम् ॥
कथमितरथा सेफालीषु स्खलत्कुसुमास्वपि ।
प्रसरति नभोमध्येऽपीन्दौ प्रियेण विलम्ब्यते ॥

'सखि! कुणीतरी दुसऱ्या स्त्रीनें वीणा वाजवून त्यांना मोहून टाकिलें असावें व रजनीलीला करण्याचा दोघांचाहि बेत नक्की ठरला असावा; नाहीं तर, पारिजातकाचीं फुलें टपटप गळायला लागलीं असतां व आकाशाच्या मध्यावर चंद्र आला असतांहि, प्रियांनीं यायला उशीर कां बरें केला असता?'

वरील नितान्तमधुर रसकाव्यांत सुंदर ध्वनि योजून अर्थाच्या दृष्टीनें कवीनें तर बहार केलीच आहे; पण वाचकांची चित्तवृत्ति तल्लीन होण्यांत, विप्रलम्भशृंगाराला अनुकूल अशी कोमल शब्दरचना 'सेफालीषु स्खलत्कुसुमास्वपि' इत्यादि, विप्रलंभाला अतिशय परिपुष्ट करणारें हृदयहारि हरिणीवृत्त इत्यादि नादविशेषयुक्त रचनेची बरीच मदत झाली आहे. ती काढून टाकून कर्कश गद्यांत जर या श्लोकार्थाला आणिलें तर सध्यांइतकी गोडी तरी खास येणार नाहीं. काव्याला संगीताच्या तोंडाकडे पाहिल्याशिवाय कसें चालत नाहीं याचें वरील काव्य समर्पक उदाहरण आहे. पण 'गद्यकाव्यांत तर संगीताची कांहीं मदत घ्यायची जरूर नाहीं ना?' असा प्रश्न आपण विचारला तर त्यावर उत्तर हेंच कीं, 'होय, गद्यकाव्यांतहि श्रवणमधुर नादविशिष्टता असल्याशिवाय बहार येत नाहीं.' याचें उत्कृष्ट उदाहरण, बाणभट्ट कवीच्या 'कादंबरी' या गद्यकाव्यांतील पुढील उतारा पहा:—

'साहं पितृभवने बालतया कलमधुरप्रलापिनी वीणेव गंधर्वाणामंकादंकं संचरन्ती अविदितशोकायासमनोहरं शैशवं अतिनीतवती।'

वरील गद्यकाव्यांत अर्थाचा मोहकपणा तर खराच, पण ललित व नादवती शब्दरचनेनें त्या अर्थांत कांहीं अपूर्व गोडी आणिली आहे.

पूर्वीच्या कीर्तनकारांनीं कथेंत भारतचंपू, रामायणचंपू इत्यादि गद्यकाव्यें तोंडांनीं म्हटलीं असतां त्यांतील झोंपाळ्याप्रमाणें हेलकावे खाणारी विशिष्ट नादरचना ऐकून आनंदानें हृदयाहि कसें डोलूं लागत असे याचा अनुभव आपल्याला असेलच. असो.

सांगण्याचा मतलब हा कीं, एक वेळ संगीताचें काव्यावांचून चालेल, पण काव्याचें संगीतावांचून चालणें कठीण आहे. यावरूनहि संगीत श्रेष्ठ हेंच सिद्ध होतें.

याशिवाय काव्यापेक्षां संगीताचें महत्त्व जास्त कां, याला एक फारच मोठें पण सूक्ष्म-दृष्टि रसिकांनाच मात्र पटणारें असें कारण आहे. तें हें कीं, काव्य हें मर्यादित प्रांतांत मर्यादित रसाचीच व्यक्ति करतें तर संगीत हें निर्मर्याद रसोत्पत्ति करण्यास समर्थ आहे. करुणरसाचें एक उदाहरण घेऊं.

"न किल भवतां देव्याः स्थानं गृहेऽभिमतं ततः।
तृणमिव ततः शून्ये त्यक्ता न चाप्यनुशोचिता॥
चिरपरिचितास्ते ते भावा परिद्रवयन्ति माम्।
इदमशरणैरद्यास्याभिः प्रसीदत रुद्यते॥"

लोकापवादाला भिऊन बारा वर्षे सीतादेवीचा त्याग केल्यावर श्रीराम पंचवटींत पुनरपि आल्यावर तेथील पूर्वीच्या गोष्टींचें स्मरण करून देणारीं अनेक स्थळें व पदार्थ पाहून त्यांच्या हृदयांत सीतेच्या विरहदुःखाची पीडा असह्य होऊं लागली असतां ते सीतेवर नाहक आरोप घेणाऱ्या दुर्जनांना उद्देशून म्हणतातः—

'आपल्याला सीतादेवीनें घरांत राहणें बरें वाटलें नाहीं, म्हणून तिला मीं गवताच्या काडीप्रमाणें (तुच्छ गणून) टाकून दिलें व (तुमच्या भयानें) त्याबद्दल शोकहि केला नाहीं; पण आज माझ्या फार परिचयाचे असलेले हे

( पंचवटींतील ) पदार्थ माझ्या हृदयाचें पाणी करून सोडीत आहेत. तेव्हां मी असहाय झाल्यानें आज रडतों आहें, मला क्षमा करा. '

करुणरसाची या सर्वांगसुंदर श्लोकांत जितकी परमावधि झाली आहे, तितकी क्वचितूच झाली असेल. पण थांबा, हा श्लोक तोडी रागांत फारशा ताना, आलाप न घेतां म्हणा, म्हणजे आहे या करुणरसांतच कांहींशी जास्त भर पडलेली आपल्याला दिसेल व आपण स्वभावतःच कोमलहृदय रसिक असल्यानें आपलें हृदय फुटण्याच्या बेतांत येईल. यानंतर वरील श्लोक गायचे थांबवा व केवळ शब्दरहित तोडी राग, करुणरसाच्या कोमलतेचा भंग न होईल अशा रीतीनें, अगदीं जपून ताना, आलाप घेऊन थोडा वेळ आळवा व काय चमत्कार होतो तो पहा ! सीतेकरतां शोकविव्हल झालेली रामाची मूर्ति आतां आपल्या मनश्चक्षूंपासून हलके हलके दूर जात जात शेवटीं अदृश्य होईल. आपल्या भूतकालीन प्रियजनविरहाचें करुण पण आनंददायक स्मरण आपल्या मनांतून विरून जाईल व थोड्याच वेळानें विश्वांतील करुणरसाचे अनंत झरे आपल्या हृदयसागराला येऊन मिळतील. रामाच्या व आपल्या स्वतःच्या करुणरसावरून आपलें कोमल मन विश्वाच्या अनंत करुणरसाशीं तादात्म्य पावेल आणि अमूर्त पण हृदयगम्य करुणातिशयाच्या आनंदपूर्ण दुःखानें आपली वृत्ति बेभान होऊन जाईल. रससमाधि उतरल्यावर गायन ऐकणारा रसिकहि उद्गार काढील कीं, 'अहाहा ! संगीत ही काय अद्भुत चीज आहे ! जगांतील घाणेरड्या वस्तूंच्या उद्वेगकारक बाजारांत ईश्वरानें आपल्या उदात्ततेची साक्ष म्हणून हें संगीत जगांत ठेविलें असावें. संगीताचे दिव्य मधुर ध्वनी कानांवर पडतांच सर्वांग रोमांचानें थरारून जातें आणि जगाशीं मला जखडून टाकणारीं बंधनें तटातट तुटून जाऊन माझ्या कल्पनेनें रंगविलेल्या दिव्य वातावरणांत माझें आनंदानें बेहोष झालेलें मन स्वैर विहार करूं लागतें. इकडे संगीताच्या कर्णमधुर ध्वनींचे झोत माझ्या कानावर आदळत असतात, तर दुसरीकडे वरील काल्पनिक विश्वसाम्राज्यांत नायकाची भूमिका घेऊन मी माझे उदात्त व्यवहार करीत असतों. ' असो. तर काव्यापेक्षां संगीतांत विशेष हा कीं, काव्य अर्थानें मर्यादित अशा रसाचा अनुभव करून देतें तर संगीत वृत्तीला विश्वविशाल बनवून विश्वरसाशीं तादात्म्य



श्री. प्रल्हाद धोंडो कानिटकर.



श्री. वासुदेव सदाशिव पाटणकर.



श्री. वासुदेव नारायण जोशी.



श्री. गोविंद रामचंद्र लिमये.



श्री. लक्ष्मण केशव भावे.



श्री. नरहर गोपाळ आंबेकर.



श्री. श्रीपाद केशव भिडे.



श्री. केशव काशीनाथ आंबेकर.

पावर्वितें. 'ते ये शतं मानुषाः आनंदाः स एको मनुष्यगंधर्वाणामानंदाः' अशी जी उपनिषदानें संगीताच्या आनंदाची महति गायली आहे, त्याचें स्वारस्य वरील विवेचनावरून आपल्याला कळेल. गायनाला पांचवा वेद मानण्यापर्यंत कित्येकांची मजल गेली आहे, त्याचेंहि कारण आतां आपल्या लक्षांत आलेंच असेल.

वरील विवेचनावरून संगीत श्रेष्ठ असें जरी सिद्ध झालें, तरी त्यावरून काव्य व संगीत यांच्या उचित संगमानें जी एक अपूर्व मजा येते तिच्याकडे आपण दुर्लक्ष केलें तरी चालेल असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. उलट आमचें तर असें म्हणणें आहे कीं, निःशब्द संगीताची गोडी मिळवून देणारे गायक व ती गोडी घेणारे श्रेष्ठ रसिक फार दुर्मिळ असल्यानें, निःशब्द संगीताला वाद्यांचें क्षेत्र आपण देऊन टाकूं व व्यवहारांत काव्य व संगीत यांची रम्य जोडीच ठेवूं. विश्वांत Harmony अथवा 'संवाद' उत्पन्न करणें हें जर संगीताचें ध्येय आहे तर त्यानें काव्याशीं गर्वानें वाकून वागून अर्थात् 'विवाद' करून चालायचें नाहीं.

संगीत व काव्य यांचें उचित मीलन होणें जितकें इष्ट आहे, तितकेंच त्यांचें अयोग्य मीलन होणें अनिष्ट आहे. सबब या ठिकाणीं उचित मीलनासंबंधीं थोडीबहुत चर्चा करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

काव्यामध्यें अर्थाचें प्राधान्य असल्यानें, किंबहुना ध्वन्यर्थ हा सत्काव्याचा आत्मा असल्यानें जेणेंकरून काव्य ऐकतांना अर्थप्रतीतीला विलंब होईल अशा संगीताचा काव्यांत प्रवेश होऊं न देण्याची खबरदारी घ्यावी. काव्याच्या प्रांतांत संगीत केवळ मदतरूपच असल्यानें आपल्या सान्निध्यानें काव्याला रमणीयता येईल इतपतच त्यानें काव्याला मदत करावी. नाहींतर 'नाकापेक्षां मोती जड' अशापैकीं स्थिति होऊन रसिकांचा ( अर्थहानि झाल्यानें ) विरस होण्याचा संभव फार. एखाद्या सन्मान्य शिष्टाला लग्नसमारंभांत विशेष शोभा यावी म्हणून निमंत्रण केलें असतां, त्यानें नवऱ्या-मुलाला दूर सारून स्वतःच भोंवल्यावर बसण्यांत जो अनर्थकारक औचित्यभंग आहे, तोच सत्काव्याच्या अर्थमाधुर्यानें रसिकांना रिझविण्याचा प्रसंग चालला असतां संगीतानें तानालापांच्या फाजील माऱ्यानें अर्थाला गुदमरून

टाकण्यांतहि आहे! ! पण प्रचलित संगीताच्या विचित्र पद्धतींत असे औचित्याचे खून वारंवार झाल्याचे पहाण्यांत येतात. मोठ्या आशेनें, रसाची बहार व्हावी म्हणून—

" उत्कम्पिनी भयपरिस्खलितांशुकान्ता
ते लोचने प्रतिदिशं विधुरे क्षिपन्ती
क्रूरेण दारुणतया सहसैव दग्धा ।
धूमान्धितेन दहनेन न वीक्षिताऽसि ॥" —रत्नावली.

यासारखा करुणरसानें ओथंबलेला व ध्वन्यर्थाच्या सौंदर्यानें मोहून टाकणारा श्लोक एखाद्या गवयाला गावयाला सांगावा तर तो पहिल्या प्रथम 'उत्कम्पिनी ईऽऽऽऽऽऽऽ' अशी तान मारायला सुरुवात करतो व 'भय'पासून पुढें रसिकांना भयानें गांगरून सोडणाऱ्या तानांचा वर्षाव करूं लागतो! इतकेंच नव्हे तर जेव्हां पुढें तो बोलताना घ्यावयाला सुरुवात करतो व 'ते लोऽऽऽऽ चने चने नच' असे जेव्हां शब्दांचे तुकडे पाडतो, तेव्हां रसिकांनाहि धूमान्धित दहनानें ज्याप्रमाणें नायिकेला दग्ध केलें त्याप्रमाणें हाहि रसाला तानान्धित होऊन दग्ध करूं पहात आहे असें वाटतें! बराच वेळपर्यंत जणुं परिस्खलित अंशुकांतांतच त्याच्या तानेचा पाय गुरफटल्यामुळेंच कीं काय, तो दुसऱ्या ओळींतील 'लोचना'कडे व रसिकांच्या निराशेनें खिन्न झालेल्या लोचनांकडे ढुंकूनहि पहात नाहीं! रसोत्सवाच्या मांडवशोभेला बोलाविलेले संगीतराज स्वतःच वरराज होऊं इच्छितात! तेव्हां यासारख्या प्रसंगीं संगीतानें बहुत जपून आपलें काम केलें पाहिजे. कीर्तनप्रसंगीं असें औचित्यभंग तर हंमेश होत असल्यानें कीर्तनकारांनाहि या बाबतींत 'सावध' रहाण्याविषयीं या ठिकाणीं आम्ही सप्रेम सूचना करतों.

दुसरी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे रागांची उचितता. जो रस काव्यांत असेल त्याला अनुरूपच रागाची योजना झाली पाहिजे. नाहींतर अजिबात न गाण्यापेक्षां जास्त रसभंग व्हावयाचा. उदाहरणार्थ:—

'अपरिक्षतकोमलस्य यावत् । कुसुमस्येव रसस्य षट्पदेन ॥
अधरस्य पिपासता मया ते । सदयं सुंदरि गृह्यते रसोऽस्याः॥' —शाकुं. ३

असा अगदीं गळ्यांत पडणाऱ्या शृंगाररसानें भरलेला श्लोक असावा व तो गवयाला गावयाला सांगितला असतां त्यानें वीररसव्यंजक शंकऱ्यांत आणि त्यांतल्या त्यांत झपतालांत हा श्लोक म्हणावा, म्हणजे हा प्राणी आतां आपल्याला मारायला धांवतो असें वाटून रसिक तेथून पळूनच जावयाचा! तेव्हां समुचित रागाची योजना करण्याचे बाबतींतहि रसिकानें दक्ष असलें पाहिजे. योग्य ती काळजी घेतल्यास काव्य व संगीत यांचें मधुरमीलन रसिक श्रोत्यांस फारच चित्ताकर्षक वाटेल यांत शंका नाहीं. तेव्हां या दृष्टीनें संगीताच्या ज्ञानाचें महत्त्व फारच आहे. असो. संक्षेपांत विषयचर्चा करण्याची प्रतिज्ञा करून बसलों होतों तरी हा विषयच मधुर असल्यानें आमची रसिक लेखणी प्रमाणाबाहेर पाघळली व तिनें आपला बराच वेळ घेतला याबद्दल मी आपली क्षमा मागतों.

संगीताची एके काळीं अशी अवनत स्थिति होती कीं, तिचें महत्त्व लोकांस पटविण्याकरतां मोठमोठ्या प्रतिष्ठित व्यक्तींना तिच्याकडे एखादा सदय कटाक्ष फेंकण्याबद्दल विनंति करावी लागत होती. सुदैवानें आज ती स्थिति पूर्ण पालटली आहे व स्वतःचें महत्त्व वाढविण्याकरतां 'आम्ही संगीतज्ञ आहोंत,' निदान 'आम्ही संगीतरसिक आहोंत,' असें प्रतिष्ठित व्यक्तींनींहि म्हणण्याची वेळ आली आहे. आपण स्वतःच्या अज्ञान अरसिकतेनें ज्या संगीताच्या रत्नाला पायदळीं तुडवीत होतों त्याची पुनरपि रसिकतेच्या सज्ञानतेनें माथ्यावर घेऊन योग्य संभावना करीत आहों हें योग्यच आहे. हें आपलें रसिकत्व देशाच्या उन्नतीचें स्पष्ट चिन्ह आहे, असें खास समजा. कारण जेथें साहित्य व संगीत यांची संभावना केली जाते तोच देश उन्नतीच्या मार्गाला लागला आहे असें समजावें. हाच आशय प्रसिद्ध महाराष्ट्रकविवर्य केशवसुत यांच्या शब्दांत सांगून आपली रजा घेतोंः—

आलेल्या दुरवस्थितींतूनि तुम्ही उत्तीर्ण व्हाया जरी।
उद्योगीं रत व्हावया धरितसां औत्सुक्य चित्तीं, तरी ॥
गाण्यानें कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल।
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल॥

आशा, प्रेम तसेंच वीर्य कवनीं तो आपुल्या गाइल ।
गेलें वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल ॥
द्या उत्तेजन हो कवीस न करा गाणें तयाचें मुकें ।
गाण्यानें श्रम वाटतात हलके हेंही नसे थोडकें ॥
आतां जात असे दुरी शिथिलता अस्मत्समाजांतुनी ।
याची खूणच गान जें निघतसे तें साच जागा मनीं ॥
तारा ताणलियावरी पिळुनिया खुंट्यांस वाद्याचिया ।
त्याच्यांतून अहा ! ध्वनी उमटती जे गोड ऐकावया !

---

## खरें सौंदर्य !

श्री. सौ. ताईसाहेब पुरंधरे, बी. ए., पुणें.

[ श्री. सरदार बाळासाहेब पुरंधरे यांच्या ह्या पत्नी होत; जन्म सन १९०६ साली झाला. प्राथमिक व दुय्यम शिक्षण उमरावती येथें. नागपूर युनिव्हर्सिटीच्या ह्या पदवीधर आहेत. बी. ए. झाल्यावर फेलोशिप घेऊन त्यांनीं एम्. ए.चा अभ्यास केला. कॉलेजमध्यें अनेक शिष्यवृत्त्या मिळविल्या. वक्तृत्वाबद्दल यांची तेथें ख्याति असून कॉलेजमध्यें असतांना नागपूर युनिव्हर्सिटी युनिअनच्या सभासद होत्या. ]

कॉलेजमधील आनंदी दिवस ते! विशेषतः आपल्या हिंदु मुलींचा रम्य व सुखी भाग असेल तर तोच!! हिंदु मुलगी कितीहि श्रीमंत असो, आई-बापांची एकुलती एक लाडकी असो, पतीच्या प्रेमाची अधिष्ठात्री देवता असो, भरभराटीस चढलेला मुलामुलींच्या हृदयाचा आनंद अशी माता असो, तिच्या आयुष्यांतील रम्य क्रीडांगण, जीवितांतील सुखदुःखाच्या भावना सतत नाचविणारें कारंजें म्हणजे विश्वविद्यालयांतील स्वच्छंदी व काळजीविरहित काल होय! आतां स्वच्छंदी या शब्दाचा अर्थ कोणीं 'स्वैर' असा घेऊं नये; तर मनांतील उपजत भावना ज्या कांहीं असतात त्यांना पोसणें, वाढविणें व त्यांचा पुढील आयुष्यांत उपयोग करणें असा

अर्थ स्वच्छंदीपणानें वागणें याचा करावा. उपजत भावनांचें उत्तम शिक्षण म्हणजे अमृतसिंचन आहे. विश्वविद्यालय ही सुपीक जमीन आहे व मनाचें योग्य वळण ( Mental discipline ) ही त्याची खरी वाढ आहे. अशा या रम्य कालाची महती वर्णन करावी तितकी थोडीच! कोल्हटकरांनीं 'रम्य तें बालपण देईं देवा फिरून' म्हणून आपल्या अमर लेखणीनें बालपण अजरामर केलें; पण या कालाची त्यांनीं कांहींच महती वर्णन केलेली नाहीं, हें फार आश्चर्यकारक वाटतें. बालपण म्हणजे अज्ञान, मूर्खत्व, त्यांतच खरा आनंद आहे हें अगदीं असंभवीय आहे. कारण आनंद व बालपणाचा रम्यपणा तरी कळण्याची अक्कल बालकांना असते काय! त्यांना रम्यपणा आपणा मोठ्या माणसांना वाटतो म्हणून आपण बालपण रम्य म्हणतों. ज्ञानाचें आकंठ पान करण्याची व त्याची खरी गोडी व खरी माधुरी चाखण्याची शक्ति असणें हेंच खरें आयुष्यांतील रम्यत्व. अज्ञानांत सौख्य नसतें व ज्ञानांत आणि सुखदुःखें भोगण्यांतच खरा मोक्ष आहे. म्हणून 'रम्य तो ज्ञानसुखनिधी, दाखवि देवा, फिरूनी' असें म्हणावेंसें फार वाटतें.

अशा कालांत आनंदानें बागडणाऱ्या चारपांच तरुणी संध्याकाळच्या वेळीं सहल करावयास निघाल्या होत्या. सूर्यास्त नुकतांच झाला होता व जिकडेतिकडे धुळीचें साम्राज्य पसरलेलें दिसत होतें. ही मोटारीची धूळ चुकविण्याकरितां त्या मुली एका लहानशा वळणानें शेजारच्या शेतांत शिरल्या. पिकें चांगलीं वाढलेलीं होतीं. तुरीच्या शेंगा व ज्वारीचीं कणसें यांनीं सर्व जमीन फुलून गेलेली दिसत होती. सर्व भाग धुळीपासून अलिप्त होता, शांततेमुळें पक्षांचे किलबिलाट स्पष्ट ऐकूं येत होते व या सर्व सौंदर्यांत भर टाकण्याकरितांच कीं काय चंद्राची चटोर कोर मंद स्मित करीत पश्चिम क्षितिजावर उदय पावली.

सर्वजणी आपल्याच नादांत चालल्या होत्या. पण त्यांपैकीं एकीनें असा कांहीं विषय काढला कीं, वादाला खूपच जोर चढला.

'काय ग, सखूच्या सौंदर्याचें चीज झालें हो! त्या आय्. सी. एस्. सोनटक्क्यांनीं एकदां तिला पाहिल्यावर तिच्याशीं लग्न ठरविलें!' मनोरमा गोगटे उद्गारली.

'ती सखू म्हणजे पुण्याच्या परांजप्यांची मुलगी! इंग्लिश दुसरींत होती; तिला म्हणे बापू सोनटक्क्यांनीं टिळक तलावावर पोहतांना पाहिली व लगेच म्हणे त्यांचें तिच्यावर प्रेम बसलें.' भीमा तुळपुळे इनें टीका केली.

हा संवाद ऐकत त्या घोळक्यापैकीं एक तरुणी मात्र मुकाट्यानें चालली होती. तिच्या चेहऱ्यावर परस्परविरोधी विचारांचें भयंकर काहूर माजलेलें दिसत होतें. कोणताहि वादविवादाचा प्रश्न निघाला कीं, मृणालिनी भावे आपल्या अतुल बुद्धिप्रभावानें सर्वांना अगदीं गप्प बसवी. नैसर्गिक बुद्धि-चातुर्य, मार्मिक टीका व योग्य ठिकाणीं विनोदप्रचुरता या सर्व गुणांनीं कॉलेजांतील डिबेटिंग सोसायटीची लाडकी व्यक्ति या नात्यानें मृणाल प्रसिद्ध होती. केव्हांहि ती बोलावयास उठली कीं, टाळ्यांच्या कडकडाटानें तिचें स्वागत विद्यार्थीवृंदाकडून केलें जात असे. एखाद्या वेळीं तिच्या बुद्धि-सामर्थ्याचे मनोऱ्यांवर मनोरे चढत गेले म्हणजे कोणीं तिला ज्युलियस् सीझर नाटकांतील मार्क अँटनीचीहि उपमा देत असत. असो.

तिचें हें अनैसर्गिक मौन पाहून बाकीच्या मुली मनांत चरकल्या व हा विषय कुठून काढला असें त्यांना होऊन गेलें. बोलण्याच्या नादांत बरीच संध्याकाळ झाली व आजूबाजूंना दिवे चमकूं लागले, हें त्यांच्या ध्यानांत फारच उशीरां आलें. क्लबच्या जेवणास उशीर होईल म्हणून त्या झपूझप् परत निघाल्या.

बापू सोनटक्के हा ×× गांवच्या कॉलेजांतील अतिशय हुशार विद्यार्थी म्हणून गणला जात असे. प्रत्येक परीक्षेंत पहिला नंबर मिळविण्यांत अगर नांवापुढें डिग्र्यांची माळ जोडण्यांतच त्याची हुशारी दिसून येत नव्हती तर विश्वविद्यालयाच्या अनुषंगिक सर्व संस्थांमध्यें देखील बापू भाग घेत असे. मॅगझिनमध्यें घ्या, डिबेटिंग सोसायटी घ्या, क्रिकेट ग्राऊंड घ्या, त्यांत बापू सोनटक्के चमकला नाहीं, असें कधींच झालें नाहीं. विशेषतः वादविवादोत्तेजक सभेंत तर सर्व सभेचें चित्त आपल्याकडे आकर्षून घेण्यांत सोनटक्के याचा हातखंडा असे. जेव्हां जेव्हां सामाजिक प्रश्नांसंबंधीं वादविवाद होई, हिंदु विधवांचे हक्क, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह वगैरे विषय निघाले म्हणजे मृणाल-बापूंचीं परस्पर विरोधी भाषणें ऐकण्याजोगीं असत! कोणत्याहि विषयाचें समर्थन

करावयास बापू उठला कीं, तें म्हणणें खोडून काढण्यास मृणालिनी पुढें सरसावलीच समजावें! दोघांचेंहि दोन्ही बाजूंचें बुद्धिप्रचुर समर्थन ऐकण्यास सर्व सभागृह अगदीं उत्सुक असे. या सर्वांचा शेवट असा होई कीं, मृणालिनीच्या मुद्यापुढें बापूला शेवटीं हारच खावी लागत असे. जरी सभागृहांत बापू हार खात असे तरी, परीक्षेच्या बाबतींत मात्र त्यानें आपला पहिला नंबर कधींहि सोडला नाहीं. असो.

बापू-मृणालिनींची लहानपणापासूनच मैत्री होती. दोघांचेहि वडील बुद्धिमान होते. तरी लक्ष्मीची कृपा त्यांच्यावर बेताचीच होती. मृणालचे वडील त्यांच्या गांवांतील शाळेचे हेडमास्तर असून मृणाल ही त्यांची एकुलती एक मातृहीन कन्या होती. विसूभाऊ भावे (मृणालिनीचे वडील) यांचा जिवाचा कालिजा म्हणजे त्यांची कन्या, असें म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांनीं आपलें सर्वस्व तिलाच अर्पण करून तिच्या उत्तरोत्तर होत असलेल्या प्रगतींतच त्यांनीं सुख मानलें होतें. पैशाची जरी इतकी टंचाई होती तरी, त्यांनीं मृणालिनीला विश्वविद्यालयांतील उच्च शिक्षण दिलें होतें. मुलगी पण बापाच्या श्रमाचें चीज करणारीच होती; दिसण्यांत म्हणाल तर मृणालिनी कांहीं सुंदर नव्हती. वर्णानें काळीसांवळी, डोळे मोठे, तेजदार, रेखीव व चणचणीत होते. एकदम पहाणारास ती फारच चांगली दिसे. तिची पोषाक करण्याची ढबच अशी होती कीं, पुष्कळांना ती मोहक वाटे व तिचे कांहीं अभिमानी तर तिला सुंदरहि म्हणत. एक साधें बारीक किनारीचें लुगडें, अंगांत पातळ ब्लाऊज, हातांत कांचेच्या दोन दोन बांगड्या यांपलीकडे मृणालचा हौशीपणा कधींच गेला नाहीं. पण लुगडें व ब्लाऊज अशा रंगांचें व तऱ्हेचें ती घेत असे कीं, तशी निवड करण्याची हातोटी फारच थोड्यांना साधलेली असते. तिचें सर्व सौंदर्य तिच्या स्वभावांत ओतप्रोत भरलेलें होतें. तिच्या डोळ्यांतील चमक तिच्या अतुल बुद्धिसामर्थ्याची साक्ष देत होती. तोंडावरील सदैव वसत असणारें स्मित तिच्या आनंदी स्वभावाचें द्योतक होतें. तिनें धारण केलेली गंभीर वृत्ति तिच्या स्वभावाचें नैतिक तेज व कठोरपणा हीं दर्शवीत असे. वाहत्या ओढ्याच्या खळखळाटासारखें तिचें खदखद हंसणें, बालिशपणा अजून लोपला नाहीं,

हें दाखवीत होतें. तिच्या डोळ्यांत क्षणांत विद्युल्लतेप्रमाणें चमकून जाणारी चमक, तिच्या विनोदी व मिस्किल स्वभावाची बाजू पहाणारापुढें आणी. यांवरून मृणालिनी जगाच्या दृष्टीनें, समाजाच्या नेहमींच्या सौंदर्याच्या 'गोरि-गोमटी सुबक ठेंगणी,' या Standard प्रमाणें एक साधारण मुलगी होती. लग्नाच्या बाजारभावांत तिची किंमत फारच कमी होती. कारण कुरूपपणा भरून काढणाऱ्या श्रीमंत बापाच्या इस्टेटीची मदत तिच्या रूपाला नव्हती. म्हणजे मृणालिनी फार तर एखाद्या कारकुनी 'स्थळा'च्या योग्यतेची होती, असें म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं.

विश्वनाथ ऊर्फ बापू सोनटक्के याचे वडील पण एक साधारणपैकीं वकील होते. घरांतलें कुटुंब मोठें असल्यामुळें दर महिन्याची तोंडमिळवणी करतां करतां बिचाऱ्या अण्णांच्या ( बापूच्या वडिलांच्या ) नाकीं नऊ येत असत. अण्णांच्या अतिशय विनोदी स्वभावामुळें त्या गरीब कुटुंबांत जें एक आनंदाचें राज्य व सौख्य होतें तें एखाद्या पिढीजात श्रीमंत जहागिरदाराच्या येथेंहि दृष्टीस पडणें कठिण होतें. मृणालिनीची या कुटुंबांत ओळख तिची मैत्रिण गोदू हिच्यामुळें झाली. दोघीजणींचा लहानपणापासून अतिशय स्नेह होता व मृणालच्या गोड स्वभावामुळें ती अण्णांची फारच लाडकी बनली. लहानपणीं परकर नेसून मृणाल खेळावयास आली म्हणजे अण्णांनीं तिला आपल्या मांडीवर बसवून घ्यावी व नानापरींनीं तिचें कोडकौतुक करावें. या सर्व गोष्टींमुळें एकहि दिवस असा गेला नाहीं कीं, ज्या दिवशीं मृणाल सोनटक्क्यांच्या घरीं गेली नाहीं ! बापू मात्र लहानपणापासून फार हूड म्हणून कोणाचा फारसा आवडता नव्हता. स्वभावानें अतिशय अभिमानी, खेळकर, उनाड व भांडखोर म्हणून सर्व मुलांत त्याची प्रसिद्धि होती. एखाद्या क्षुल्लक कारणावरून देखील तो आपलें डोकें फिरवून घेत असे. ज्यानें त्याचा थोडा अपमान केला असेल त्याला तो चांगलाच पिटून काढीत असे; सर्वांना त्याचा बराच त्रास होत असे. असो.

बापू सर्वांचा नावडता होता तरी, मृणालिनीला मात्र तो फार आवडत असे. तिला अभ्यासांतील कांहींहि Difficulty आली तरी ती आपल्या 'बापू'लाच विचारीत असे. बापूच्या बालिश हृदयांतहि पण बहिणीबरोबर

नेहमीं खेळावयास येणाऱ्या, गोड, हंसऱ्या डोळ्यांच्या, परकर नेसणाऱ्या मुलीविषयीं एक प्रकारचा 'आपले'पणा वाटत होता.

* * * * *

काळ भराभर चालला होता. वयाच्या मानानें अण्णा अगोदरच दिवंगत झाले होते. गोदूचें लग्न होऊन ती सासरीं नांदत होती. मृणाल व बापू दोघेंहि एकाच वर्षी मॅट्रिक पास होऊन कॉलेजांतील उच्च शिक्षण संपादण्याकरितां + + पूरला आलीं होतीं. दोघेंहि आपल्या बुद्धिसामर्थ्यानें कशीं चमकत होतीं हें मागें सांगितलेंच आहे.

दोघांची मैत्री वाढत चालली. बापू दोनतीन दिवसांआड तरी मृणालिनीला येऊन भेटत असे. दोघांच्याहि मनांतल्या भावना अगदीं बालिश होत्या. मृणालला तिची मैत्रिण मनोरमा व बापू यांत कांहींच फरक वाटत नसे. जितक्या मोकळ्या मनानें ती मनोरमेशीं हंसतखेळत असे, तितक्या मोकळेपणानें बापूशीं गप्पा मारीत असे. कोणतीहि गोष्ट तिला हवी असली कीं, बापूला तिनें आपलें सांगावें व बापूनें ती तिला आणून द्यावी.

पण एके दिवशीं मात्र असा कांहीं प्रकार घडून आला कीं, मृणालच्या भावनांना बापूविषयीं निराळेंच नाजूक वळण लागलें. गांवामध्यें नुकतेंच एक प्रदर्शन उघडलें होतें. तेथें हौशी लोकांची विलक्षण गर्दी होत असे. तेथें जाऊन कांहींतरी वस्तु खरेदी कराव्या असें मृणालला व तिच्या मैत्रिणींना फार वाटूं लागलें. पण इतक्या गर्दींत मुलींना तेथें कोण विचारतो? म्हणून त्यांनीं बापूला बरोबर न्यावयाचें ठरवून एके दिवशीं त्या निघाल्या. संध्याकाळचीच वेळ होती. तो दिवस सुट्टीचा असल्यामुळें बहुतेक सर्वजणी पांढरीं पातळेंच नेसल्या होत्या. त्यांतहि तो न्हाण्याचा दिवस असल्यामुळें सर्वजणींनीं पाठीवर वेण्या सोडल्या होत्या. काय असेल तें असो, मृणालला पांढरें पातळ नेहमींच खुलून दिसत असे. प्रत्येकाला शोभणारा विशिष्ट रंग असतो, कोणाला हिरवा शोभतो तर कोणाला डाळिंबी खुलून दिसतो, तर कोणाला किरमिजीच छान दिसतो. त्याप्रमाणें मृणालचा रंग पांढरा होता.

प्रदर्शनाच्या प्रवेशद्वारावर तिकिटें खरेदी करून सर्व मंडळी आंत गेली. आंत गेल्यावर उजव्या बाजूसच लहानलहान मुली कोटांत वाढण्याकरितां

फुलांचीं बटनहोलस् घेऊन बसल्या होत्या. आपल्याकरितां बापूनें इतके श्रम घेतले त्याबद्दल तो आपल्याकडून दुसरेंतिसरें कांहींच घेणार नाहीं, तरी पण बटनहोल तो कांहीं नाकारणार नाहीं असें सर्व मुलींना वाटून त्यांनीं एक सुंदरसें बटनहोल खरेदी केलें व मृणालकरवीं त्याच्या कोटाला अडकविलें! मृणालिनीला पण त्यांत विशेष असें कांहींच वाटलें नाहीं. सरळपणानें तिनें तें त्यांच्या कोटाला खोंविलें. पण--

टारगट मुलांची एक टोळी त्याच वेळेला तेथून आली व त्यांनीं 'Three cheers for Bapu-Mrunalini' म्हणून एकच टाळयांचा गजर केला. मृणालिनी क्षणभरच गोंधळली. बापूच्या भालप्रदेशावर घर्मबिंदु चमकूं लागले. पण दुसऱ्या क्षणींच एकमेकांची दृष्टादृष्ट होऊन दोघेंहि भानावर आलीं. दोघांच्याहि हृदयांत एका अननुभूत भावनेचा संचार झाला! सर्व मुली मृणालला चिडवूं लागल्या. तिनें व बापूनें पण खंबीर मनानें सर्वांना उत्तरें देऊन गप्प केलें, नंतर सर्वजण हंसतखेळत प्रदर्शन बघण्यास गेलीं.

* * * *

प्रिय वाचक, त्या दिवसापासून मृणालिनी पार बदलून गेली. ती मनामध्यें अनन्यभावानें बापूची पूजा करीत असे. एक दिवस बापू दृष्टीस पडला नाहीं तर तिला चैन पडत नसे. प्रेमाचा उगम तिच्या हृदयांस फारच उशीरा झाला व जेव्हां झाला तेव्हां त्याचा प्रवाह इतक्या जोरानें वाहूं लागला कीं, मृणालिनीला जीवित असह्य वाटूं लागलें. अग्नि लवकर पेट घेतां घेत नाहीं व एकदां पेटला कीं, कुणीकडे भडकत जातो याचा पत्ता लागत नाहीं. मृणालिनीच्या हृदयांत बापूची मूर्ति कोरली गेली होती व बापूचें पण आपल्यावर प्रेम आहे असें त्या भोळ्या जीवाला वाटत होतें. पण जग फारच विचित्र आहे! मनुष्यांच्या पवित्र भावनांना तेथें वाव मिळतच नाहीं. पापी जगांत त्या भावना जगण्यास देखील योग्य नाहींत, म्हणूनच अशा भावनांची जोपासना करण्याकरितांच परमेश्वरानें स्वर्ग निर्माण केला आहे काय?

पतिव्रतेचें पावित्र्य, मनुष्याचें प्रामाणिकत्व, बालकांचा निरपराधीपणा व सरळपणा, प्रामाणिक सेवकाची स्वामिनिष्ठा या सर्व गोष्टींना या पापी

जगांत थारा नाहीं! प्रदर्शनांत घडलेली गोष्ट बापू केव्हांच विसरून गेला. पण मृणालिनीच्या हृदयांत मात्र त्या गोष्टीनें दुसराच प्रकाश पाडला होता. बापू फर्स्टक्लास बी. ए. पास होऊन शिष्यवृत्ति मिळवून विलायतेंत I.C.S. होण्यास गेला व कालानुसार दीड वर्षांतच परत आला. बापूमध्यें दिवसें-दिवस फारच विलक्षण फेरबदल होत चालला होता. सध्यां तो श्रीमंती व विलासी लोकांच्या कंपूंत बावरूं लागला. उपवर मुलींच्या श्रीमंत बापांकडे त्याला जेवणास, मोटारमधून सहल करण्यास, नाटक सिनेमा पाहण्यास वारं-वार आमंत्रणें येऊं लागलीं. कर्मधर्मसंयोगानें ज्या गांवांत बापू-मृणालिनीनें आपले आनंदी दिवस घालविले होते, त्याच गांवांत दोघेंहि निरनिराळ्या स्थितींत रहात होतीं. बापू मोठा हुद्देदार ऑफिसर होता तर मृणाल तेथील लॉ कॉलेजांत अभ्यास करीत होती. बापू तिला लहानपणची मैत्रिण या-पलीकडे मुळींच ओळख देत नव्हता. मृणालिनीनें पण आपल्या कोमल भावना जाळून टाकल्या होत्या व गंभीर वृत्तीनें ती वाबरत होती. जगाला होतां होईल तों आपली मनोवृत्ति ती दाखवीत नव्हती. नुकतेंच तिला कळलें होतें कीं, बापूचा विवाह पुण्याच्या गोखल्यांच्या सुंदर मुलीशीं झाला म्हणून!

दिवसांमागून दिवस चालले. मृणालिनी एम्. ए., एल्एल्. बी. होऊन तेथीलच मुलींच्या शाळेची मुख्य अध्यापिका झाली होती. सर्व विद्यार्थिनींचें प्रेम हेंच तिच्या जीविताचें ध्येय होऊन बसलें होत. आतां ती पूर्वीची मृणा-लिनी राहिली नव्हती. बापूच्या बेपर्वाईनें ती जवळ जवळ स्वतःला मेल्या-सारखीच समजत असे. तिचा पूर्वीचा आनंदीपणा, अल्लडपणा, डोळ्यांतील चमक व अंगांतील विद्युल्लता हीं जळून खाक झालीं होतीं. बापूनें जवळ जवळ तिचा नैतिक खूनच केला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आतां मृणालिनीनें पुनर्जन्म घेतला होता. ज्या सामाजिक सौंदर्या-करितां बापूनें तिचा त्याग केला होता, ज्या साहजिक सौंदर्या-करितां बापूनें तिचा त्याग केला होता, त्या सौंदर्याहून अधिक उज्ज्वल अशा सौंदर्यानें ती तळपूं लागली. शाळेंतील विद्यार्थिनींचा कलिजा, शिक्षकवर्गाची आवडती वरिष्ठ, सरकारी वातावरणांत उत्तम नांव असलेली मृणालिनी भावे × × × गांवांत आबालवृद्धांस आदर्शनीय होती.

गांवांत भयंकर देवीची सांथ आली होती. सर्वांनीं शक्य तितकी काळजी घेण्याचें ठरविलें होतें. पण विधिघटना कांहीं विचित्रच होती! या भयंकर रोगानें सोनटक्कयांच्या फॅशनेबल बंगल्यांत प्रवेश केला. बिचारी बापूची बायको देवीच्या सांथीनें फारच हैराण होती. त्यांतच तिचा खरें म्हटलें तर अंत व्हावयाचा; पण आयुष्याची दोरी बळकट म्हणूनच ती वांचली! खरें पाहिलें असतां मेली असती तरच बिचारी जास्त सुखी झाली असती. कारण त्यानें पुढील हालअपेष्टा तरी चुकल्या असत्या.

मिसेस् भावे हिचा सुंदर चेहरा पार बदलून गेला. त्यांत तिचा एक डोळा कायमचाच जायबंदी झाला होता. तिचें सौंदर्य पालटतांच बापूचें तिच्यावरील प्रेमहि पालटलें. समाजांत तिच्याबरोबर फिरण्याची त्याला लाज वाटूं लागली. सर्व गोष्टींचा विचार करून त्यानें मोठ्या 'दयार्द्र' अंतःकरणानें तिला शंभर रुपयांची नेमणूक करून देऊन माहेरीं कायमची रवानगी केली व वर्षांतून एकदां भेटण्याची परवानगी दिली.

बापू सोनटक्के परत लग्न करण्याच्या विचारांत आहेत, अशी गांवांत दाट वदंता होती. असो.

*　　　*　　　*　　　*

सकाळीं नऊ साडेनऊचा सुमार होता. मृणालिनी आपल्या टुमदार बंगल्याच्या ऑफिसरूममध्यें बसून सरकारी कामकाज पहात बसली होती. आजपासून मॅट्रिकची परीक्षा सुरू व्हावयाची असल्यामुळें तिला लवकर जेऊन शाळेंत जावयाचें होतें व परीक्षेच्या मुलींशीं दोन शब्द बोलावयाचे होते, म्हणून ती जरा गडबडींतच होती. घंटेचें बटन दाबून भैयाला आंत बोलावून ऑफिसची पेटी शाळेंत नेऊन पोहोंचविण्यास ती सांगणार तोंच एक मोटार धडधड् करीत तेथें येऊन ठेपली! व आंतून अतिशय फॅशनेबल सूट केलेला एक तरुण खालीं उतरला!

क्षणभरच मृणालिनीच्या हृदयांत प्रदर्शनाच्या दिवशीं भासलेली भावना चमकून गेली. पण ती क्षणभरच! तिनें आपलें मन आंवरलें व गंभीर वृत्तीनें बापू सोनटक्के यांच्याशीं हस्तांदोलन केलें व त्यास बसावयास खुर्ची दिली.

तोंडांतील सिगार तशीच ठेवून बापू उद्गारला,

"Well, Mrunal, let us forget the past. I was a little bit brute but now I can make reparations. Will you marry me now?"

(मी आतांपर्यंत पशूसारखें वर्तन केलें; पण तें अजून सुधारणें शक्य आहे. तूं माझ्याशीं लग्न करतेस का?)

मृणालिनी नखशिखांत संतापानें कांपूं लागली. त्या नरपशूला त्या वेळीं काय उत्तर द्यावें हें तिला सुचेना. शांतपणानें तिनें उत्तर दिलें, "बापू, पूर्वीची मृणाल केव्हांच गेली, आज तूं कुणाशीं बोलत आहेस? माझ्यापेक्षां शतपटीनें सुंदर मुली तुला मिळतील, माझ्या मेलेल्या शवाशीं लग्न करून तुला काय मिळणार आहे?" असें म्हणून तिनें चपराशाला हांक मारण्यास कॉल्-बेल् वाजविली!

---

### वतन विरुद्ध वेतन

## शंकराजी नारायण यांची समयज्ञता

### लेखक : रा. बापूजी मार्तंड आंबेकर, पुणें.

[यांचा जन्म १८७५ सालीं झाला. रहाण्याचें मुख्य गांव वांई असून त्यांचा भोरच्या राजघराण्याशीं मातुलसंबंध आहे. बडोदा कॉलेजांत इन्टरपर्यंत शिक्षण झालें. त्यानंतर १८९७ पासून १९०६ पर्यंत त्यांनीं धुळें, फलटण, वांई वगैरे गांवींच्या शिक्षण-संस्थांत शिक्षक म्हणून काम केलें. या कालांत वांई येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'मकरंद' मासिकांत व 'कादंबरी-कल्पद्रुम' या मासिकांत त्यांचीं पांचसहा पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. १९०७ च्या पूर्वी 'सयाजीविजय,' 'मोदवृत्त' इत्यादि वर्तमानपत्रांशीं त्यांचा संपादक म्हणून संबंध होता. त्या वर्षी ते 'ज्ञानप्रकाश' वर्तमानपत्राच्या संपादक-मंडळांत दाखल झाले व तेव्हांपासून ते आजतागायत सहसंपादक म्हणून तेथें काम करीत आहेत. वांईच्या भारतवर्षीय–नररत्न–मालेंत त्यांनीं आगरकर, गोखले इत्यादि चरित्रें लिहिलीं आहेत. 'हरिभाऊ आपटे यांचें चरित्र' व 'हरिभाऊंच्या आठवणी' हीं त्यांचीं दोन पुस्तकें प्रसिद्ध असून पंचतंत्र व हितोपदेश या पुस्तकांचीं मराठी भाषांतरें केलीं आहेत. रत्नाकर,

मनोरंजन व विविधज्ञानविस्तार इत्यादि मासिकांतून त्यांचे विविध विषयांवरील लेख वेळोवेळीं प्रसिद्ध होत असतात. परीक्षणात्मक लेखांबद्दल त्यांची विशेष प्रसिद्धी आहे.]

शिवाजीच्या पूर्वी मराठे सरदार विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडें वगैरे राज्यांत राजाकडून वंशपरंपरा वतनें मिळवून त्यामोबदला लष्करी नोकरी करीत. ज्यानें जो मुलुख जिंकावा तो त्यास जहागीर म्हणून देण्यांत यावा अशी त्या काळांत वहिवाट सुरू झाली होती. या वहिवाटीमुळें वतनदार व रयत यांचा हरएक बाबतींत प्रत्यक्ष संबंध येऊं लागल्यानें वतनदार लोक हे प्रतिराजेच बनूं लागले. त्यांतील एखादा पुरुष विशेष प्रभावशील व कर्तृत्ववान् निपजल्यास तो प्रसंगीं राजाच्या डोक्यावरहि मिरें वाटल्यावांचून रहात नसे. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे बहामनी राज्याचें होय. या एका राज्यांतून स्वतंत्र अशा निरनिराळया पांच राज्यांचा उद्भव झाला हें या वतनदारी पद्धतीचें किंवा ज्या सरदारानें जो प्रदेश जिंकावा त्यास या प्रदेशासंबंधांत सर्वाधिकार देण्याचेंच फळ होय. खुद्द बहामनी राज्य दिल्लींतील खिलजी सत्तेपासून स्वतंत्र झालें तें याचमुळें होय. जहागीरदारांनीं शिरजोर बनून अखेर मुख्य सत्तेसहि जुमानूं नये अशीं शेंकडों उदाहरणें शिवाजीच्या डोळ्यांपुढें होतीं. जो ज्यास्त वतन देईल त्या धन्याची नोकरी करावयाची हाच लष्करी पेशाच्या लोकांचा त्या वेळीं शिरस्ता ठरून गेला होता. वतनदारीच्या या मोहामुळें स्वकीय, परकीय हाहि भेदाभेद जाणण्याइतकी विवेकशक्ति त्यांच्या ठिकाणीं अवशिष्ट राहिली नव्हती. स्वराज्याच्या उद्योगास हा वतनाचा मोह पदोपदीं नडेल हें ओळखून त्याचें निर्मूलन करण्याचा शिवाजीनें संकल्प ठरविला.

स्वराज्याच्या शाश्वतीस आवश्यक अशी वतनाच्या जागीं वेतनी पद्धत सुरू केल्याबद्दल शिवाजीची सर्वतोमुखीं प्रशंसा होणें स्वाभाविकच आहे. यानंतर अवघ्या तीसच वर्षांत ही पद्धत बंद होऊन पूर्वीची वतनांची राशत सुरू झाली याबद्दल उद्वेग प्रदर्शित होणें तितकेंच स्वाभाविक आहे. इतिहासकारांनीं या दोन्ही भावनांचें आविष्करण यथास्थल केलेंहि आहे. पण या वतनी पद्धतीचें विसर्जन व तिचें पुनरागमन या दोन्ही वेळची परिस्थिति पाहिली असतां कोणकोणतीं अनुमानें निघतात हें पहाणें जसें मनोरंजक आहे, तसेंच तें ऐतिहासिक सत्यतेच्या दृष्टीनेंहि महत्त्वाचें आहे. शिवाजीमहाराजांनीं

बतनदारीची वहिवाट बंद करण्याचा उपक्रम राजकीय धोरण म्हणून स्वीकारला हें निःसंशय मान्य केलें तरी स्वराज्याच्या उद्योगास त्यांनीं प्रारंभ केला त्या वेळीं बतनी पद्धति पुढें चालू ठेवण्यासारखी त्यांची स्थितीहि नव्हती हीहि गोष्ट दृष्टीआड करतां येत नाहीं. स्वराज्याच्या प्राणप्रतिष्ठेचा काळ सन १६६० हा धरला तर त्या वेळीं शिवाजीच्या ताब्यांतील मुलुख अगदीं मर्यादित होता. अशा स्थितींत वतनदाराची पद्धत पुढें चालू ठेवूं म्हटलें तरी शिवाजीस तें शक्य नव्हतें. शिवाजीनें स्वीकारलेल्या वतनबंदीच्या धोरणासंबंधांत तत्त्वाप्रमाणें सोयीचाहि प्रश्न होता असें यावरून मानण्यास हरकत नाहीं.

वतनाच्या ऐवजीं नक्त वेतन घेऊन लष्करी कामगिरी करण्यांत त्या वेळीं घरंदाज पुरुष तयार कसे झाले हाहि प्रश्न या ठिकाणीं विचार करण्यासारखा आहे. मोंगलांकडून किंवा विजापूरकरांकडून काबीज केलेल्या मुलखापैकीं मुलुख सरदारांस किंवा सैनिकांस, त्यांच्या कामगिरीच्या मोबदल्याप्रीत्यर्थ, देणें हें शिवाजीस शक्य होतें; आणि हा उपक्रम रुजणें संभवनीय असतें तर तो कदाचित् प्रचारांतहि आला असता. पण त्या धामधुमीच्या काळांत अशा प्रकारें मिळणाऱ्या वतनांची लोकांना शाश्वती न वाटणें हेंहि स्वाभाविकच होतें. वतनवाडी ही लोकांना अहंविशेष वाटण्याचें मुख्य कारण तींत असणारी शाश्वती हें होय. निरनिराळ्या राजवटींचें नश्वरत्व त्या काळांत पदोपदीं प्रत्ययास येऊं लागल्यामुळें वतनांतील शाश्वतीहि नष्टप्राय होऊन गेली. वतनाचा नाद सोडून लोक वेतनावर संतुष्ट रहाण्यास तयार झाले ते या कारणामुळेंच होय. अशा रीतीनें वेतन देण्याघेण्याचा उपक्रम उभयपक्षींहि सोईस्कर ठरण्यासारखी तत्कालीन परिस्थिति होती. ज्यांच्या हातून विशेष कामगिरी होई, त्यांना त्यांच्या कामगिरीच्या तोलाचेंच वेतन देण्याची शिवाजी खबरदारी घेत असे; किंबहुना वतनापेक्षांहि या वेतनाची रक्कम अधिक व्हावी असेंहि त्याचें सामान्यतः धोरण असे. बऱ्याच काळाच्या वहिवाटीनें ज्यांच्या वतनास स्थिरता आली होती, त्यांचीं वतनें मात्र कायम ठेवण्यांत आलीं. मात्र अशा वतनांची व्यवस्था व कारभार हीं शिवाजीनें नेमलेल्या अधिकाऱ्यांकडून व्हावींत व वतनाप्रीत्यर्थ वतनदारास सालीना नक्त रक्कम मिळावी अशी योजना अस्तित्वांत आली. वतनी मुलुखाच।

बंदोबस्त व वसुली यांची दगदग वांचून आयती नक्त रकम लोकांच्या पदरांत पडूं लागली, त्यामुळें आपल्या वतनाची व्यवस्था शिवाजीनें नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या हातीं देणें जुन्या वतनदारांना मुळींच अवघड वाटलें नाहीं. शिवाय ज्या मुलुखांत त्यांचें हें वतन असे तो मुलुख दुसऱ्याच्या मालकीचा झाला तरी, वतनाप्रीत्यर्थ ठरलेली नक्त वर्षासनें लोकांना अविच्छिन्न रीतीनें मिळत. अफजलखानाच्या मृत्यूनंतर पुणें, इंदापूर, चाकण, सुपें व बारामती हा मुलुख शिवाजीच्या ताब्यांत आला. पुढें शाहिस्तेखानानें हा मुलुख घेतला तो शिवाजीचा म्हणून घेतला. यादरम्यान ज्यांना इनामाबद्दल नक्त रकमा ठरविल्या होत्या, त्यांच्या त्या रकमा, हा प्रदेश हातचा गेल्यानंतरहि त्यांनीं कायम ठेवल्या. यासंबंधानें खंड ८ लेखांक ११ यांत पुढीलप्रमाणें उल्लेख आहे:—

"पुणें, इंदापूर व चाकण, सुपे, बारामती ऐसें इनाम हिंदु-मुसलमान यांसीं इनामें आहेत. त्यांस पेराजी आपणास मुकासा असतां अफजलखाना-आधीं जेणेंप्रमाणें तसलमती ज्यास जे पावत असेल त्यास तेणेंप्रमाणें देणें, ऐसा तह ( ठराव ) केला असे."

लोकांचें वतनावर परंपरागत व पिढीजाद प्रेम असतांहि ते त्याच्या मोबदला नक्त वर्षासनें घेण्यास कां तयार झाले याचा यावरून उत्कृष्ट उलगडा होतो. शिवाजीच्या मालकीचा मुलुख मर्यादित असल्यामुळें वतनाऐवजीं वेतन देणें त्यास जसें सोईस्कर होतें, तसेंच वेतनावर संतुष्ट रहाणें हें शाश्वतीच्या दृष्टीनें लोकांनाहि श्रेयस्कर होतें. एरव्हीं वतनें बंद करण्याची बाब कांहीं सामान्य नव्हती. त्याप्रीत्यर्थ जनतेंत प्रसंगीं हलकल्लोळ उडून आपसांत यादवी माजण्यासहि चुकली नसती. परंपरेवर घाला घालणारी ही क्रांतिकारक योजना शांतपणानें कशी अमलांत आली हें, तत्कालीन परिस्थितीचें आतांपर्यंत जें वर्णन दिलें त्यावरून लक्षांत येण्यासारखें आहे.

मुलुख घेतला कीं वतनें अमानत म्हणजे तात्पुरतीं जप्त करण्याचा पायंडा आदिलशाही, निजामशाही वगैरेंत होता. हीं वतनें जप्त झाल्यानंतर वतनदारांकडून आपलीं वतनें चालू रहाण्याबद्दल बादशहाकडे विनंति करण्यांत येत असे व तीं त्यांना योग्य चौकशी होऊन परत देण्यांत येत असत. शिवाजीनेंहि हीच पद्धत स्वीकारली. कारण आरंभीं जुन्या वतनदारांना होतां होईतों संतुष्ट

राखणें हेंच धोरण बाळगणें त्यास अवश्य होतें. पण पुढें त्याच्या स्वराज्याच्या उपक्रमास उत्कर्षाचें स्वरूप येऊं लागलें तसतसें वतनी पद्धत बंद करण्याचें धोरण त्याजकडून अधिक अधिक प्रमाणांत स्वीकारण्यांत येऊं लागलें. उलटपक्षीं शिवाजीच्या राज्यास स्थिरस्थावरता येत चालली. तसतशी लोकांच्या मनांतील वतनाबद्दलची प्रेमबुद्धीहि जागृत होऊं लागली; धामधुमीच्या काळांत केवळ आपद्धर्म म्हणून पत्करलेली वेतनी पद्धत त्यांना आळवावरच्या पाण्या-प्रमाणें क्षणभंगुर वाटूं लागून वतनाची इच्छा त्यांच्या ठिकाणीं उत्कटतेनें उसळी घेऊं लागली. शिवाजीमहाराजांना औरंगजेबाइतकें आयुष्य लाभलें असतें तर वतनदारीची पद्धत त्यांची त्यांनाच कदाचित् पुनः सुरू करावी लागली असती. त्यांनीं सुरू केलेली वेतनदारीची पद्धत लोकमतास पटून प्रचारांत आली असती तर केवळ तीस वर्षांच्या अवधींतच राम म्हणण्याची तिच्यावर पाळी आली नसती. एका पक्षीं सोईस्कर म्हणून व दुसऱ्या पक्षीं आपद्धर्म म्हणून स्वीकारण्यांत आलेली ही पद्धत यापेक्षां अधिक काळ टिकली असती तरच आश्चर्य होतें.

राज्याच्या उत्कर्षाबरोबर या नवीन पद्धतीचाहि जोर वाढत गेला असता तर स्वराज्याच्या खंबीरीस निःसंशय कायमपणा आला असता. पण स्वरा-ज्याची इमारत रंगारूपास येऊं लागली तोंच धामधुमीखालीं दडपून गेलेली वतनदारीची इच्छा पुनः डोकें वर काढूं लागली. राजारामाच्या कारकीर्दींत रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण या दोन कर्तृत्वशील पुरुषांच्या पुरस्कारानें वतनदारीच्या पद्धतीचें पुनरुज्जीवन झालें असलें, तरी या पुनरु-ज्जीवनास अनुकूल अशी भूमिका स्वराज्यास साधारण स्थिरता आल्याबरोबर म्हणजे शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दींतच निर्माण झाली होती. याबद्दल कोणासहि वस्तुतः दोष देण्याचें कारण नाहीं. आजच्या देशाभिमानाच्या कल्पना त्या काळास चिकटवून तत्कालीन व्यक्तींस देशाभिमानशून्यतेचा दोष लावूं पहाणें सर्वस्वीं असमंजसपणाचें ठरेल.

शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक झाला त्या वेळेस संभाजीसहि यौव-राज्याभिषेक करण्यांत आला. शिवाजीनें वतनदारीच्या पद्धतीवर कटाक्ष ठेवला; पण स्वतःची गादी मात्र वंशपरंपरा करण्याची योजना केली ही

वस्तुस्थिति या वेळीं जनतेच्या निदर्शनास येऊन तिलाहि आपल्या कर्तृत्वाचा मोबदला वंशपरंपरा कायम रहावा अशी इच्छा होणें अस्वाभाविक नव्हतें; आणि शिवाजीमहाराजांपेक्षां कमी प्रभावशीलतेचा दुसरा कोणी राजा असता तर त्यास त्याबद्दल तिनें जाब विचारण्यासहि कमी केलें नसतें. अशा बिकट परिस्थितींतून शिवाजीचा पूर्णपणें बचाव झाला असें मात्र म्हणतां येत नाहीं. संभाजीस यौवराज्याभिषेक झालेला पाहून आपलेहि हक्क वंशपरंपरा करण्याची आवश्यकता अष्टप्रधानांनीं शिवाजीच्या निदर्शनास आणली. या संबंधानें शिवचरित्र-साहित्य खं. १, पृ. १०८ वर निर्देश आहे तो लक्षांत ठेवण्यासारखा आहेः—

**" अष्टप्रधान अष्टस्तंभीं उभे राहिले...ते समई ' अवघे बोलले, आमच्या पदास शाश्वताभय असावें. ' गागाभट्ट म्हणाले, ' यांचें समाधान आमचे समक्ष करावें. ' महाराज बोलले, ' कसें करावें? ' तेव्हां भटजींनीं बेल व दवणा आणून राजांचे हातीं देऊन बोलविलें कीं हीं पदें तुम्हांस दिलीं. यास तुमचा वंश असे तोंवर जो खलेल करील त्याचा वंशक्षय होईल. "**

याप्रमाणें वतनदारीच्या हक्काची मागणी अष्टप्रधानांनींच केली व ते हक्क वंशपरंपरा शपथपूर्वक देणें शिवाजीस भाग पडलें. सुदैवानें हें प्रकरण येवढ्यावरच मिटलें म्हणून बरें झालें. नाहींतर ही वतनदारीच्या हक्काच्या मागणीची सांथ सर्वत्र पसरली असती तर शिवाजीस तिचें सर्वतोपरि समाधान करण्याशिवाय गत्यंतरच उरलें नसतें. शिवाजीमहाराजांनीं आपली गादी वंशपरंपरा केली, याबद्दलहि त्यांना कमीपणा देण्याचें अर्थातच कारण नाहीं. त्यांच्या या कृत्याचा निर्णय द्यावयाचा तो त्या वेळच्या रूढ कल्पनांच्या अनुरोधानेंच दिला पाहिजे. स्वतःच्या प्रभावशालित्वानें व असामान्य कर्तृत्वानें राज्यपद मिळविणाऱ्या पुरुषाचें राज्य त्याच्या घराण्यांत वंशपरंपरा चालू रहावयाचें अशीच त्या काळीं पद्धत होती व ती तत्कालीन लोकमतासहि मान्य होती. मुख्य ध्यानांत ठेवण्याचा मुद्दा इतकाच कीं, शिवाजीनें वतनदारीच्या ऐवजीं वेतनदारी निर्माण केली तींत तत्त्वाचा

कांहीं भाग असला तरी तिच्याशीं तत्कालीन विशिष्ट परिस्थितीचाहि प्रामुख्यानें संबंध पोहोंचतो. ही परिस्थिति निवळतांच लोकांची वतनप्रियता पुनः जोर करूं लागली. शिवाजीमहाराजांची हयात बरीच वाढली असती तर या वृत्तीचा योग्य परामर्ष घेणें त्यांनाहि अपरिहार्य झालें असतें.

संभाजीची कारकीर्द संपल्यानंतर राजाराम, संभाजीची बायको येसूबाई, व मुलगा शाहू अशीं माणसें, रायगडला मोंगलांच्या तर्फे वेढा पडला त्यांत होतीं. राजाराम या वेढ्यांतून निसटला व तेथून लांब जाण्यांतच सुरक्षितता आहे असा विचार करून तो आश्रयाकरितां जिंजीस गेला. जातांना रामचंद्रपंत व शंकराजी नारायण ( हल्लींच्या सचिवांचे मूळ पुरुष ) यांच्याकडे राजारामानें राज्याची सर्व व्यवस्था सोंपविली. या दोन थोर पुरुषांनीं विसकटलेल्या स्वराज्याची घडी पूर्ववत्, किंबहुना पूर्वींहूनहि नीटनेटकी कशी बसविली हें सुप्रसिद्धच आहे. “ शिवाजीपेक्षां राजारामाची फौज भारी झाली. मग गंगथडीस शिरून चौथाई व सरदेशमुखीचें वतन स्वबळें घेऊं लागले. द्वेषक आणि जे कोणी मानीनात तें मातूं लागले. त्या वेळेस वसुलाचा बंदोबस्त शिवाजीप्रमाणें ठेविला. जेथें वसूल करण्यास हरकत पडे तेथील करारनामा घेत. ” ( पंतप्रतिनिधींची बखर ). राजारामाच्या कारकीर्दीची कीर्ति अशी उज्ज्वल झाली त्याचें मुख्य श्रेय जर कोणास देणें जरूर असेल तर तें या दोन इतिहासप्रसिद्ध व्यक्तींसच होय. राज्यकारभाराचा शकट हांकण्याची राजारामाकडून कुलमुखत्यारी मिळाल्यानंतर, औरंगजेबाविरुद्ध आपलें संरक्षण करण्याची काय तजवीज करावी, हा मुख्य प्रश्न या दोघांपुढें उपस्थित झाला. शिवाजीसारखी तेजस्वी व प्रभावशील व्यक्ति राज्यावर होती. त्या वेळीं लोकांचीं वतनें संपादन करण्याचा हव्यास दडपून रहाणें शक्य होतें. त्या वेळीं वतनाबद्दलच्या पुनरुज्जीवित झालेल्या लोकांच्या आकांक्षेचें आतांहि निरोधन करणें राज्याच्या हानीसच कारण होईल ही वस्तुस्थिति यांनीं ओळखली. लोकांचें चित्त राज्याकडे वेधण्यास वतनांचीच लालूच उपयोगीं पडण्यासारखी आहे, ही मनाशीं खूणगांठ बांधून तोच उपक्रम सुरू करण्याचा त्यांनीं निश्चय ठरविला.

कोणत्या परिस्थितींत कोणता उपाय योजावा हें ठरवितांना लोकमता-

चाहि विचार करावा लागतो. योजना कितीहि चांगली असली तरी जोंपर्यंत ती लोकमतास झेंपण्यासारखी नाहीं तोंपर्यंत तिचें योग्य चीज होणें केव्हांहि शक्य नसतें. योजनेचा केवळ अंगभूत चांगुलपणा तिच्यांत ठामपणा किंवा फलद्रूपता आणण्यास पुरा पडत नाहीं. या संबंधांत लोकमताच्या मनःपूर्वक अनुकूलतेची आवश्यकता असते. ही अनुकूलता वेतनी पद्धतीस नसून वतनी पद्धतीसच आहे हें ओळखून या दोन पुरुषांनीं तिचाच अवलंब केला. धामधुमीच्या काळांत लोकांना वतनाची शाश्वती वाटत नाहीं ही स्थिति ओळखून वेतनी पद्धतीचा पुरस्कार करण्याचा शिवाजीमहाराजांनीं चाणाक्षपणा दाखविला, त्याप्रमाणेंच मूलतः कोणती पद्धति चांगली किंवा अधिक श्रेयस्कर आहे याची चिकित्सा करीत न बसतां या दोन राजकारणकुशल पुरुषांनीं लोकांची प्रवृत्ति व राज्यावर ओढवलेला बिकट प्रसंग या दोहोंचा विचार करून वतनी पद्धतीचाच अंगिकार करण्याचें ठरविलें. या बाबतींत लोकांकडूनहि त्यांना तशा मागण्या होऊं लागल्या. खंड १७ लेखांक २१ (इ.स. १६९०) यांत खंडेराव पानसंबल हा गुंजनखोऱ्याच्या हवालदारांना व कारकुनांना लिहितोः—

"राजश्री कैलासवासी स्वामीचे वेळेस आपलीं वतनें अमानत करून हक्काची मोईन (नक्त नेमणूक) करून देत होते. सांप्रत गनीमाचे धामधूम करतां व मुकामेकरतां रयत गेली मेली! जुजबी राहिली; त्यास खावयासी व रहावयासी नाहीं; ये जातीचा रयतेचा विचार जाला आहे. रयतींचा बहुत बजा दिलासा करून कीर्दी माहमुरा (लागवड) करून साहेबाचेया किलियासी व कामास मदती करावी लागते; तरी साहेबी आम्हा वतनदारावरी कृपाळु होऊन आमचीं वतनें व इनामती व इसाफती हकलाजिमा इनामती सेते आमचे हवाली केले पाहिजे म्हणौन अर्ज केला. तो साहेबी हकीकत मनास आणून वतनदाराचीं वतनें दुमाली केलिया विराहित पोटातिडिक लागत नाहीं ऐसे कळो आले. यावरून देशमुख व देशकुळकर्णी व मुतालिक खासनीस हेजीब मोकदम चौगुले बाजे वतनदार यांचीं वतनें इनामती व इसाफती व हकलाजिमा न सेत सेरिया व हक लाजिमा यांची यांचे दुमाला केली असेत."

त्या काळचीं वतनाबद्दल मागणी केलेलीं अशीं कितीतरी पत्रें सांपडतील. ज्यांच्या जिवावर स्वराज्याच्या इमारतीचा भक्कमपणा साधावयाचा त्या लोकांचें

समाधान राखणें या प्रसंगीं अत्यंत जरूर होतें. गोष्ट होऊन गेल्यावर ती अमुक रीतीनें घडली असती तर अधिक चांगलें झालें असतें असें कोणासहि म्हणतां येण्यासारखें असतें. पण प्रत्यक्ष प्रसंग ज्यांच्यावर येऊन गुजरतो, त्यांना समयोचित व कार्यक्षम असा उपाय कोणता एवढी एकच दृष्टि राखावी लागते; आणि म्हणूनच रामचंद्रपंत आमात्य आणि शंकराजी नारायण या उभयतांनीं "वतनदाराचीं वतनें दुमाली केलियाविरहित पोटतिडिक लागत नाहीं." या लोकांच्या मागणींतील स्वारस्य ओळखून आपलें धोरण आंखलें याबद्दल त्यांची तारीफच करणें जरूर आहे. प्राप्त परिस्थितींत सर्वोत्कृष्ट असें जें काय त्यांना करतां आलें तें त्यांनीं केलें किंवा नाहीं एवढ्याच दृष्टीनें त्यांच्या कारभाराचें पर्यालोचन करणें युक्त होणार आहे. देशाभिमानाची ज्या काळीं कल्पनाच नव्हती त्या काळास या कल्पनेची कसोटी लावून तत्कालीन थोर पुरुषांवर ताशेरा झाडीत बसणें सर्वथा अनैतिहासिक व म्हणूनच अनिष्ट होय. शिवाजीच्या अमदानींत वतनदारीबद्दलची लालसा कांहीं काळ दडपून राहिली इतकेंच. त्या पद्धतीची अनिष्टता पटण्यासारखी लोकांची मनोभूमिका नसल्यामुळें थोडें स्थिरस्थावर झाल्याबरोबर आपल्याला वतनदारीची प्राप्ति व्हावी याबद्दल लोकांच्या मनांत धडपड सुरू झाली. शिवाजी-महाराजांनीं संभाजीस यौवराज्याभिषेक करून आपली गादी वंशपरंपरा चालविण्याची केलेली सिद्धता पाहून अष्टप्रधानांच्या मनाची जी चलबिचल उडाली तींत एकंदर जनतेच्या मनाचें प्रतिबिंबच दिसून आलें असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाजीनें बंद केलेली वतनी पद्धत पुनः प्रत्यक्ष सुरू करण्याचें कार्य रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण यांच्या हस्तें झालें असलें तरी त्याची भूमिका शिवाजीच्या कारकीर्दींतच तयार झाली होती हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. कोणत्याहि उपक्रमास लोकमताची अनुकूलता असल्याशिवाय त्यास स्थायिकता व स्थिरता प्राप्त होणें अशक्य कसें असतें हेंच "वतन विरुद्ध वेतन" या प्रकरणाच्या इतिहासावरून लक्षांत येतें.

---

# कृष्णा-कोयनांचा संगम

कवि : कै. माधवानुज.

[ माधवानुज ऊर्फ काशिनाथ हरि मोडक यांचा जन्म पडघवली, ता. सुधागड, येथें शके १७९३ (सन १८७२) फाल्गुन शु. ७ रोजीं झाला. ते कल्याण येथील सरकारी दवाखान्यांत डॉक्टर होते व सन १९१५ सालीं मरण पावले. त्यांच्या स्फुट कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाला आहे. बंगालींतून बंकीमचंद्रांच्या 'कृष्णकांतेर उइल' व 'कपालकुंडला' या दोन कादंबऱ्यांचीं त्यांनीं मराठींत भाषन्तरें केलीं आहे. त्याचप्रमाणें मायकेल मधुसूदन दत्त यांच्या 'मेघनादवध' या महाकाव्याचें व रवींद्रनाथ टागोर यांच्या गीतांजलींतील कांहीं पद्यांचें भाषांतर त्यांनीं केलें आहे. ]

( चाल–गडे हो, सत्याहि गुरुची खूण० )

सखे गे ! सुरेख संगम किती, कृष्णा मिळाली कोयनेप्रति !
किती विशाल तट हे अहा !
प्रिय सखे, उभी तूं रहा !
क्षण येथिल शोभा पहा !
सखे गे० ॥ १ ॥

बहु चकाकते यावरी,
ही सुरेख सिकता, परी
जाय गळुनि धरितां करीं
सखे गे० ॥ २ ॥

जगीं असे सुखाचे क्षण,
नर झटे धराया, पण
जाति तयास ते फसवुन !
सखे गे० ॥ ३ ॥

झष जलीं उड्या मारिती,
भय न या सुखी हे किती!
भवजलीं रमूं या रितीं
सखे गे० ॥ ४ ॥

बघ दोघिंचि मैत्री किती!
एकमेकिस आलिंगिती.
दोन असून एकचि होती!
सखे गे० ॥ ५ ॥

जर अशींच अपुलीं मनें,
एक होतिल गे प्रीतिनें!
मग सुखास कुठुनी उणें?
सखे गे० ॥ ६ ॥

स्थळ पवित्र हें गे, जगीं
जन बघेल जो लोचनीं
अघ हरेल त्याचें झणीं
सखे गे० ॥ ७ ॥

---

# विष्णुशास्त्री चिपळूणकरांची लेखनशैली

लेखक: गहिनीनाथ माधव पानसे, बी. ए., एल्एल्. बी., भोर.

[यांचा जन्म १८९४ सालीं सोनवरी येथें झाला. त्यांचें सर्व शिक्षण भोरास झालें व तेथूनच ते प्रवेशपरीक्षा पास झाले. फर्ग्युसनमधून बी. ए. होऊन १९१४ मध्यें ते एल्एल्. बी. झाले. सध्यां ते भोरास वकील आहेत.]

गद्य ग्रंथकार या दृष्टीनें विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं महाराष्ट्र वाङ्मयांत एक नवयुगच प्रस्थापित केलें यांत मुळींच शंका नाहीं. लोकजागृति हें जरी

'निबंधमाले'चें उद्दिष्ट कार्य होतें, तरी त्यांत अभिजात ग्रंथकाराच्या लेखनशैलीचे उत्तमोत्तम गुण प्रगट झाले असल्यामुळें केवळ वाङ्मयाच्या दृष्टीनेंहि निबंधमालेस जें अत्युच्च स्थान देण्यांत येतें तें युक्तच आहे. देशभक्ति, स्वसंस्कृतीबद्दल जाज्वल्य अभिमान, करारी बाणा इत्यादि, त्यांच्या अंगीं असलेले सर्व प्रमुख गुण त्यांच्या लेखनांत अत्युकृष्ट रीतीनें उतरले आहेत. त्यांची लेखनशैली इतकी तेजस्वी व नवीन प्रकारची आहे कीं, तत्पूर्वी निबंधमालेसारखें नांव घेण्याजोगें उत्कृष्ट गद्य मराठींत क्वचितच आढळूं शकतें. राष्ट्रीय जागृति घडवून आणणें हा जरी शास्त्रीबुवांचा प्रधान उद्दिष्ट हेतु होता, तरी ही जागृति त्यांनीं वाङ्मयद्वारें घडवून आणली असल्यामुळें साहजिकच त्यांचे लेख व निबंध मराठी भाषेंत अजरामर झाले आहेत. केवळ भाषाशैली या दृष्टीनें सुद्धां निबंधमालेस मराठी वाङमयांत अग्रपूजेचा मान देण्यांत येतो.

तत्कालीन मराठी भाषेचें दुर्दैन्य पाहून शास्त्रीबुवांचें अंतरंग कळवळत होतें. 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' या निबंधमालेंतील अगदीं पहिल्याच निबंधांत शास्त्रीबुवांचे मराठी भाषेबद्दलचे अत्यंत बाणेदार व जोमदार वृत्तीचे उद्गार प्रगटले आहेत. त्यांच्या काळीं मराठी भाषा अगदींच बाल्यावस्थेंत होती. तरुण पिढीचें लक्ष तिच्या अभिवृद्धीकडे असावें तितकें नव्हतें, तरी शास्त्रीबुवांस मराठी वाङ्मयाच्या भावी संपन्नतेबद्दल पूर्ण आशा होती. मराठी भाषेच्या उज्ज्वल भावितव्यतेबद्दल ते कधींहि निराश झाले नाहींत. समकालीन पिढीच्या स्वभाषेच्या अनास्थेमुळें ते तीवर कडक टीका करीत. परंतु नवीन पिढीकडून स्वभाषेच्या अभिवृध्यर्थ नेटानें प्रयत्न करण्यांत यावेत याबद्दल ते आस्था व कळकळ दाखवीत असत. निबंधमालेचा उद्देश काय असावा, या विषयावर लिहीत असतां मराठी भाषेची उन्नति हें एक प्रमुख ध्येय त्यांच्या डोळ्यांपुढें होतें. "घरीं दारीं, उठल्या बसल्या इग्रेजी तर हल्लीं सुद्धा बरीच झाली आहे. ऑफिसांतून जाणारे लोक, इंग्रजीचा खराखोटा बाणा बाळगणारे लोक, अशांच्या जिव्हाग्रीं तर इंग्रजीनें अक्षयीं वास केलेला असतोच; पण कित्येक बहादूर असे आहेत कीं, घेडगुजरी मराठी तोंडांत बसण्याचें कारण

जें इंग्रजीचें ज्ञान त्याचाहि पण त्यांस गंध नसतो. असो. तेव्हां मराठी बुडण्याचीं हीं सर्व भयंकर चिन्हें नव्हेत काय? देशाभिमान, स्वदेशीय व्यापार इत्यादि प्रकरणीं सध्यां चोहोंकडे एवढी गडबड चालली असतां, बिचाऱ्या मराठी भाषेची कोठेंच दाद लागूं नये हा केवढा चमत्कार आहे! तिजकडे अगदीं दुर्लक्ष करून तिची परभाषेच्या पायीं अनिवार विटंबना करण्यासहि कारण होणें हें आमच्या देशाभिमानी विद्वानांस केवढें भूषण होणार आहे! असो. तेव्हां या आणीबाणीच्या वेळीं मराठीस जें साहाय्य होईल तें तीस अनेक प्रकारांनीं उपयोगीं पडणारें आहे. एकतर तिचें पुनरुजीवन झाल्यासारखें होईल, तसेंच विटंबना निवारण होईल; आणि शिवाय ग्रंथसमृद्धि होऊन ती उत्कर्षाच्या मार्गास लागेल." या उताऱ्यावरून परकीय भाषेमुळें मराठी भाषेची होत असलेली कुंचबणा कशी सुधारेल आणि तिचा अभ्युदय कोणत्या रीतीनें होईल, यांबद्दल शास्त्रीबुवांस असलेली कळकळ दिसून येते. या निबंधांतील व इतर कित्येक ठिकाणीं मराठी भाषेबद्दल त्यांनीं काढलेले उद्गार त्यांनीं स्वतः अमलांत आणलेले असून मराठी भाषेची त्यांनीं अमोल सेवा केली आहे. परकीय भाषेचाहि ते द्वेष करीत नसत. मराठीच्या अभिवृध्य्र्थ त्यांनीं परकीय भाषेचा योग्य तो आधार घेण्याचें ठरविलें होतें. "इंग्लिश भाषेचा आम्ही द्वेष करीत नाहीं; हें तर काय, पण आपल्या मराठीच्या उत्कर्षास ती मोठेंच साधन होईल. सर्व जगाचें ज्ञानभाण्डार तींत सांठविलेलें असल्यामुळें तिचें साहाय्य मराठीसारख्या परिपक्व होऊं पाहणाऱ्या भाषेस जितकें होईल तितकें थोडें आहे." इंग्रजी भाषेबद्दल त्यांचे हे विचार समतोल बुद्धीचे व दूर दृष्टीचेहि आहेत. असो. संस्कृतप्रमाणें इंग्रजी वाङ्मयाचाहि त्यांचा व्यासंग फार दांडगा होता. मेकॉले हा त्यांचा आवडता ग्रंथकार होता. त्याच्याविषयीं त्यांची एक प्रकारची विरोधी भक्ति होती. त्याचें त्यांनीं इतकें अनुकरण केलें आहे कीं, मेकॉलेच्या गद्यांतील गुणदोष विष्णुशास्त्र्यांच्या लेखनांत अगदीं तंतोतंत रीतीनें उतरले आहेत, असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. पल्लेदार वाक्यरचना, संस्कृतप्रचुर शब्द, सभ्य व जोरदार भाषाशैली व प्रसंगविशेषीं समतोलपणा सुटून एकादें विधान बेधडकपणें करण्याची त्यांची पद्धति या

बाबतींत त्यांनीं या आंग्ल ग्रंथकाराचा कित्ता उचलिला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं; कारण आधुनिक मराठी वाङ्मयांतील निरनिराळे प्रकार मराठींत परकीय भाषेंतून बरेचसे रूढ करण्यांत आले आहेत व विष्णुशास्त्री यांनीं निरनिराळ्या विषयांवर लेख व निबंध लिहिण्याचा प्रकार परभाषेपासूनच परंतु अत्यंत स्वतंत्रपणें सुरू केला. इंग्रजीप्रमाणें संस्कृत भाषेचें साहाय्य मराठींत अत्यावश्यक असेंच होतें; आणि शास्त्रीबुवांनीं तें योग्य प्रमाणांत घेतलें आहेत. त्यांच्या गंभीर, भारदस्त, आवेशयुक्त व विद्वत्ताप्रचुर भाषाशैलीमुळें मराठीस अगदीं नवीन प्रकारचें वळण लावलें व तीस अपूर्व ओजस्विता आणून दिली. विचारप्रतिपादन करण्यांची त्यांची हातोटी अशी आहे कीं, वाचक एकदां त्यांच्या जाळ्यांत सांपडला कीं, त्यांतून जो सहसा सुटून जाणें अशक्य. कोणावर त्यांच्या टीकास्त्राचा एकदां भडिमार सुरू झाला कीं, कित्येक वेळेस ते सत्यासत्यतेपासूनहि अलिप्त राहतात. त्यांच्या जोरदार व आवेशयुक्त भाषेचा परिणाम वाचकांच्या मनावर असा होतो कीं, वाचकहि शास्त्रीबुवांच्या विचारसरणीबरोबर वाहून जातो. प्रतिपक्षांतील एखाद्या विशिष्ट व्यक्तीस उद्देशून लिहितांना त्यांच्या लेखनांत कित्येक स्थळीं व्याजोक्ति आणि उपहासाचा अतिरेकहि झालेला आढळतो. शास्त्रीबुवांची टीका स्पष्ट व सडेतोड असते. त्यांचें टीकाचक्र एकदां सुटलें कीं, प्रतिपक्षास ' दे माय धरणी ठाव ' होऊन जाई. शास्त्रीबुवांच्या या टीकात्मक लेखांचें महत्त्व तत्कालीन असलें तरी त्यांतील मार्मिकतेमुळें व मोहक लेखनाविर्भावामुळें महाराष्ट्रास ते अद्यापिहि वाचावेसे वाटतात.

स्वतंत्र व वाङ्मयविषयक जवळ जवळ सर्वच लेख इतके लोकप्रिय होण्याचें कारण त्यांची बहुश्रुत विद्वत्ता व विशिष्ट लेखनशैली ह्या होत. इंग्रजी व संस्कृत वाङ्मयांमधून त्यांनीं उत्तमोत्तम विचार ग्रहण करून, त्यांमधून नानाप्रकारचे दृष्टान्त व निर्देश शोधून काढून, ते आपल्या प्रौढ व उच्च भाषेंत सजविल्यामुळें त्यांचे मोठमोठे लेख व निबंध वाचतांना बिलकुल कंटाळा येत नाहीं. त्यांच्या लेखांत त्यांचें बुद्धिसर्वस्व तुडुंब भरून राहिलें आहे. जगाच्या इतिहासांतील नानाप्रकारचे प्रसंग, गोष्टी, माहिती त्यांच्या लेखांत जागोजाग वर्णिल्या असल्यामुळें, ते लेख आकर्षक व वाचनीय झाले आहेत. प्रत्येक लेखा-

मधून त्यांच्या विशिष्ट भाषाशैलीचे व विचारप्रतिपादनपद्धतीचे सुंदर नमुने काढून दाखवितां येतील. इंग्रजी भाषा, भाषादूषण, लेखनशुद्धी, भाषांतर, भाषणपद्धति व मराठी भाषेची सांप्रतची स्थिति हे त्यांचे केवळ मराठी भाषाविषयक निबंध होत. विद्वत्व आणि कवित्व, इतिहास, वाचन, वक्तृत्व, ग्रंथावर टीका, डॉ. जान्सनचें चरित्र व मोरोपंतांची कविता इत्यादि निबंध ' वाङ्मय ' या सदराखालीं पडतील. आमच्या देशाची स्थिति, संपत्तीचा उपभोग वगैरे निबंध राजकीय, सामाजिक विषयांवर अगदीं स्वतंत्र रीतीनें लिहिलेले असे निबंध आहेत. निबंध फारसे गहनविचारप्रतिपादक आहेत अशांतला भाग नाहीं. तत्कालिन प्रचलित असलेल्या विविध मतांवर व विषयांवर प्रायः त्यांचा रोख असल्यामुळें, निबंधांचा ओघ बहुधा टीका करण्याकडे किंवा विरुद्ध मतें खोडून काढण्याकडे वळल्याखेरीज रहात नाहीं. मात्र त्यांतील बहुश्रुतपणा, विविध माहिती व जोरकस भाषेंत एखादा विषय आकर्षक करण्याची पद्धति वाचकांस सदासर्वकाळ मोह पाडते. त्यांच्या विशिष्ट लेखनशैलीचा नमुना म्हणून खालीं एक लहानसा उतारा उद्धृत करतों.

" मोरोपंताला वाग्देवीच्या न्यायासनापुढें पिंजऱ्यांत जर चौकशीकरतां उभा केला व नवीन विद्वान मंडळांतले पंच त्याचा इनसाफ करण्यास नेमले, तर बहुधा इसापनीतींतील पंचाइतींत मेंढ्यास जो मान मिळाला किंवा शंभर वर्षांपूर्वी इंग्रजी ज्यूरीनें नंदकुमाराच्या तर्फेनें जो आपला अभिप्राय दिला त्यासारखीच आमच्या बिचाऱ्या महाराष्ट्र कवीचीहि अवस्था व्हावयाची. "

या एकाच वाक्यावरून शास्त्रीबुवांची बहुश्रुतता व टीका करण्याची विशिष्ट पद्धति दिसून येते. सहज जातां जातां त्यांनीं इंग्रजी ज्यूरीवर फटकारा ओढला आहे. भाषेचा प्रौढपणा व अलंकारित्व हीं यांत चांगल्याच रीतीनें व्यक्त झालीं आहेत. असो. अखंड वाचन, बुद्धीचा अष्टपैलूपणा व त्यामुळें प्राप्त होणारें भाषेवरील प्रभुत्व इत्यादि ज्या गोष्टी सुंदर ग्रंथ लिहिण्यास आवश्यक असतात त्या शास्त्रीबुवांच्या ठिकाणीं परिपूर्णपणें वसत होत्या. त्यांची विचार करण्याची पद्धति प्रख्यात ग्रंथकार डॉ. जॉन्सन् किंवा एडमंड बर्क याच्याप्रमाणें राष्ट्रांत नवजागृति घडवून आणणारी होती. मालेंतील प्रत्येक निबंध घेऊन या दृष्टीनें विचार करणें प्रस्तुत स्थलीं विस्तार-

भयास्तव अशक्य होय. मराठी भाषा सुधारण्याकरितां त्यांनीं जे अविश्रांत परिश्रम घेतले त्यांबद्दल आपण त्यांचे केव्हांहि उतराई झालेंच पाहिजे. निबंधमाला लिहून अनेक वर्षें लोटून गेलीं व त्यानंतर मराठी भाषेची सर्वांगीण वाढ व तींतील वाङ्मयविस्तार बराच मोठा झाला असला, तरी मराठी भाषेंतील वाङ्मयाचा अभ्यास करितांना निबंधमालेची विस्मृति कदापिहि होणें शक्य नाहीं.

शास्त्रीबुवांनीं मराठी भाषेची केलेली सेवा अगदीं अपूर्व व बिनमोल होय. परंतु मराठी वाङ्मयास जगांतील साहित्यक्षेत्रांत उच्च दर्जा महाराष्ट्रांत विष्णुशास्त्री यांच्यासारखे अनेक ‘ मराठी भाषेचे शिवाजी ’ उत्पन्न होतील तेव्हांच प्राप्त होणारा आहे. विष्णुशास्त्र्यांसारखे वाङ्मयवीर शेंपन्नास वर्षांतून एकदोनच निर्माण होतात. मराठीचें नष्टचर्य अद्याप संपलेलें नाहीं. मराठी वाङ्मयास अद्याप फार मोठा दर्जा प्राप्त करून घ्यावयाचा आहे. शास्त्रीबुवांचा जन्म म्हणजे ‘ बुडत्याचा पाय खोलांत ’ जाऊं नये म्हणून आशेचा आधार देणारा एक तेजस्वी तारा होय. शास्त्रीबुवांचें प्रत्यक्ष कर्तृत्व, त्यांची भावी महत्त्वाकांक्षा व अकालीं निधन या गोष्टी आठवतांच अंतःकरण करपून जातें! परंतु सर्वच गोष्टी मनुष्याधीन नसतात. विष्णुशास्त्री अकालीं मरण पावले तरी इतक्या अल्पवयांत आपल्या विशिष्ट लेखनपद्धतीनें मराठी वाङ्मयांत नवीन युग निर्माण करण्याइतकी श्रेष्ठ कामगिरी जी त्यांनीं बजाविली तिचें महत्त्व महाराष्ट्र वाङ्मयांत अखंडच राहील.

---

## लक्ष्मीपूजन !

लेखक: विष्णु बापूजी आंबेकर, बी. ए., पुणें.

[ यांचा जन्म वाई मुक्कामीं १६ नोव्हेंबर १९०८ रोजीं झाला. १९२५ सालीं मॅट्रिकची परीक्षा न्यू इंग्लिश स्कूलमधून पास झाल्यावर हे फर्ग्युसन कॉलेजांत दाखल झाले. १९३० सालीं इंग्रजी व मराठी हे विषय घेऊन यांनीं बी. ए. ची परीक्षा दिली. सांप्रत त्यांची महाराष्ट्रांतील प्रमुख लघुकथा लेखकांत गणना होत असते. यांनीं ‘कुटाळकंपू’ या नांवाचें एक विनोदप्रचुर नाटक लिहिलें असून ‘भावचित्रें’ या

नांवाचा लघुकथांचा संग्रह काढलेला आहे. ' नाट्यसृष्टीचें सिंहावलोकन, ' ' कै. आगरकरांच्या लेखनांतील विशेष ' वगैरे त्यांचे लेख रत्नाकर मासिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. रत्नाकर मासिकाशीं त्यांचा संबंध कांहीं दिवस संपादक या नात्यानें होता. लेखनव्यवसायांतच हल्लीं ते कालक्रमणा करीत असतात. ]

" लक्ष्मी ? " दिवाणखान्यांतून हांक ऐकूं आली.

सासऱ्याच्या त्या धीरगंभीर आवाजाची लक्ष्मीला मुळींच संवय नव्हती असें नाहीं ! पण त्या अबोल वृत्तीच्या माणसाच्या तोंडून क्वचित् प्रसंगींच शब्द बाहेर पडत असत. त्यामुळें त्या मुखांतून आपल्या नांवाचा उच्चार झालेला ऐकून लक्ष्मीसुद्धां किंचित् चपापली. हातांतील केरसुणी तशीच टाकून लक्ष्मी लगबगानें दिवाणखान्याच्या दाराशीं गेली आणि नम्रपणानें तिनें विचारलें, " काय ? "

श्रीनिवासरावांनीं अतिशय शांतपणानें—गंभीरपणानें पुन्हां विचारिलें, " लक्ष्मी, काय करीत होतीस ? "

डोळ्यांवर असलेल्या चष्म्याच्या कडांतून तिच्याकडे दृष्टि टाकीत स्मित मुखानें त्यांनीं तिला हा प्रश्न केला. जरूरीपुरतें आपल्याशीं भाषण करणाऱ्या आपल्या सासऱ्यानें आज हा प्रश्न काय म्हणून विचारावा याचा उलगडा तिला होईना. काय करीत होतीस ? कुठें गेली होतीस ? असले प्रश्न तिनें यापूर्वी सासऱ्याच्या तोंडून कधींच ऐकलेले नव्हते. आपण जें काम करीत होतों तें करीत असतांना आपल्या हातून कांहीं चूक तर झाली नाहीं ना ? असें लक्ष्मीला वाटूं लागलें. तशी कांहीं चूक झाली असल्याशिवाय उगीच कशाला हांक मारली असती ? असेंच तिला वाटलें. ती बुचकळ्यांत पडली आणि तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

प्रेमळ स्मित करीत श्रीनिवासरावांनीं पुन्हा तोच प्रश्न विचारला. भयभीत अंतःकरणानें खालीं पहात लक्ष्मीनें म्हटलें, "घरांतले केर काढीत होतें."

तोंडावरील स्मित कमी करीत श्रीनिवासरावांनीं विचारलें, "लक्ष्मी, तूं केर काढीत होतीस, मग गोजा काय करीत होती ? "

सरळपणें बोलण्याचा लक्ष्मीला अद्यापहि धीर होत नव्हता. सासऱ्याला आज आपल्याला काय सांगावयाचें आहे, याचा तिला अजूनसुद्धां उमज

पडलेला नव्हता. पण कांहीं तरी उत्तर द्यावयास हवें म्हणून तिनें म्हटलें, " गोजाच नेहमीं केर काढीत असते, पण आज लक्ष्मीपूजन आहे म्हणून मी जरा लवकर केर काढीत होतें. "

आरामखुर्चीवरच जरा पुढें होऊन सांवरून बसतां बसतां श्रीनिवासरावांनीं तिला म्हटलें, " लक्ष्मी, बैस, त्या खुर्चीवर बैस. अग, केरवारे, दळण-कांडण असल्या गोष्टी नेहमीं आहेतच, पण आज या येथें बैस. या मासिकांतील या स्त्रियांवरील लेखामुळें मला तुझी आठवण झाली. बैस, बैस ! "

आजचा प्रकार लक्ष्मीला अगदीं अपूर्व वाटला. आपल्याला हांक मारून आपल्याशीं बोलण्याची आज सासऱ्याला कां इच्छा झाली याचा तिला उलगडा होईना. सासऱ्याला आपली चहा आहे ही गोष्ट लक्ष्मीला माहित होती. पण प्रत्यक्ष समोरासमोर येण्याचे प्रसंग फारच थोडे होते. सासरा जेवीत असतांना त्याला वाढण्याकरतां लक्ष्मी केव्हां केव्हां त्याच्यासमोर जात असे तेवढेच काय ते समोरासमोर येण्याचे प्रसंग. त्यामुळें सासऱ्यानें लक्ष्मीला खुर्चीवर बसण्यास सांगितलें तरी तसें करण्याचा तिला धीर होईना. मात्र इतका वेळ तिच्या मनाला नुसती भीति वाटत होती पण आतां तिला लाजहि वाटूं लागली.

श्रीनिवासरावांनीं आग्रही स्वरानें तिला म्हटलें,

" बस, बस. मी कांहीं कुणी परका आहें का ? "

लक्ष्मीनें खुर्ची बाजूला ओढून घेतली आणि लाजत लाजत ती त्या खुर्चीवर बसली. श्रीनिवासरावांनीं त्या मासिकाचा अंक पुन्हा उघडला. लक्ष्मीच्यापुढें तो अंक करून त्यांनीं म्हटलें,

" लक्ष्मी, मी पेन्सिलीनें खूण केली आहे तें वाक्य तुला दिसलें का ? काय आहे तें वाक्य ? "

लक्ष्मीची आज जणूं काय परीक्षाच व्हावयाची होती. लक्ष्मीनें अंक हातांत घेतला आणि खूण केलेल्या वाक्यावरून ती आपली दृष्टि फिरवीत बसली.

श्रीनिवासरावांनीं म्हटलें, " लक्ष्मी, वाच. मोठ्यानें वाच ! "

लक्ष्मीला चांगलें वाचावयास येत होतें. पण सासऱ्याला वाचून दाखविण्या-

इतका धीटपणा तिच्या आंगीं नव्हता. कसेंबसें अवसान आंगीं आणून तिनें अंक डोळ्यांपुढें उचलून धरला आणि तें वाक्य वाचलें—

"—दुःखराशींनीं गांजून गेलेल्या सज्जन प्राण्याला मृत्यूनंतर स्तुतीचें सौख्य लाभल्याशिवाय राहात नाहीं."

तिनें तें वाक्य भीतभीत वाचलें खरें; पण तिच्या वाचनांतला सफाईदारपणा त्या वेळींहि दिसून आल्याशिवाय राहिला नाहीं. श्रीनिवासरावांनीं तिला विचारलें, "लक्ष्मी, समजला कां तुला त्याचा अर्थ ?"

बिचकत बिचकत लक्ष्मीनें उत्तर दिलें 'होय.' एकदां 'हो' म्हणून उत्तर दिलें म्हणजे आपली सुटका तरी होईल या हेतूनें लक्ष्मीनें 'हो' म्हटलें.

पण श्रीनिवासरावांनीं अतिशय प्रेमळपणानें प्रश्न केला, "सांग बघूं काय त्याचा अर्थ तो."

आतां मात्र लक्ष्मीला खरी पंचाईत पडली. आपण हो तर म्हणून गेलों आणि आतां या वाक्याचा अर्थ स्पष्ट करून कसा सांगावयाचा ? हा तिच्यापुढें प्रश्न पडला. त्या वाक्याचा अर्थ समजला नव्हता असें नाहीं. तिचा तिला अर्थ समजला; पण सासऱ्याला स्पष्ट करून सांगण्याइतकें तिला धैर्य नव्हतें.

श्रीनिवासरावांनीं बराच आग्रह केला, म्हणून लक्ष्मीला अर्थ सांगणें भाग पडलें. आपण काय बोलतों आहोंत इकडे तिचें लक्ष नव्हतें. पण आपलें बोलणें ऐकत असतांना समोर असलेल्या श्रीनिवासरावांच्या चर्येवर कसकसे फेरफार होत आहेत इकडे तिचें सगळें चित्त लागून राहिलें होतें. आपण जर सांगावयास चुकत असलों तर आपला सासरा आपली मागाहून फार फजीति करील अशी तिला राहून राहून भीति वाटत होती.

लक्ष्मीनें तिला समजला तसा अर्थ थोडक्यांत सांगितला; आणि शेवटीं तिनें स्वतःला त्यावरूनच पटलेलें एक तत्त्वहि सांगून टाकलें. "आणि म्हणून दुःखाची पर्वा न करतां माणसानें आपलें कर्तव्यकर्म करावें, जे लोक त्याला आज नांवें ठेवीत आहेत, तेच उद्यां त्याच्या मरणानंतर त्याची स्तुति करतील. त्याला कसकसा त्रास झाला याचा ते लोक मागाहून विचार करतील आणि इतका त्रास सोसूनहि त्या माणसानें आपलें काम बिनकसूर बजाविलें, म्हणून

ते त्याची स्तुति करतील. कुणी निंदो किंवा कुणी वंदो, आपण आपलें काम मुकाट्यानें बजाविल्याशिवाय राहूं नये."

या भाषणांतील विचार अर्थात्च विशेष अभिनव होते अशांतला भाग नाहीं. पण लक्ष्मीच्या तोंडून हे विचार बाहेर पडले, अगदीं अपेक्षा नसतांना बाहेर पडले, म्हणूनच श्रीनिवासरावांना त्याचें विशेष महत्त्व वाटलें.

एकदम बसल्या जागेवरून ते उठले. त्यांना उठतांना पाहून लक्ष्मीहि उठून उभी राहिली. श्रीनिवासराव मंदमंद पावलें टाकीत तिच्याजवळ आले आणि अत्यंत शांतपणानें त्यांनीं तिच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें,

"लक्ष्मी, तुझें म्हणणें अगदीं बरोबर आहे; आणि वेळ आली म्हणून तुला सांगतों कीं, तुझें आचरणहि तूं म्हणतेस त्याप्रमाणेंच आहे. तुझ्यासारखी सून मला मिळाली म्हणून मला नेहमीं समाधान वाटतें."

बोलतां बोलतां श्रीनिवासरावांचा गळा गहिंवरून आला. त्यांचा हस्तस्पर्श होतांक्षणीं लक्ष्मीला मात्र तिच्या वडिलांनीं मागें एकदां असाच तिच्या पाठीवरून हात फिरविला होता त्या वेळच्या प्रसंगाची आठवण झाली. लक्ष्मी उपवर झाली असतांना एकदां तिला उपदेश करीत असतांना तिच्या वडिलांनीं अशाच प्रेमळपणानें तिच्या पाठीवरून हात फिरविला होता. आजहि लक्ष्मीला वाटलें कीं, सगळेच सासरे सारखे नसतात. बापापेक्षांहि अधिक प्रेम करणारे सासरे क्वचित् प्रसंगीं दृष्टीस पडल्यावांचून राहात नाहींत. सासऱ्याचा तो प्रेमळपणा पाहून तिच्याहि डोळ्यांना पाणी आलें.

तो दिवस लक्ष्मीपूजनाचा होता. इतरांच्या दृष्टीनें एक सणाचा दिवस म्हणूनच त्या दिवसाला महत्त्व होतें. पण लक्ष्मीच्या दृष्टीनें त्या दिवसाला एक विशिष्ट प्रकारचें महत्त्व होतें. त्या दिवशीं तिला आपल्या पितृतुल्य सासऱ्याची खरोखरी परीक्षा झाली होती. बापाच्या प्रेमळ सहवासाला आपण अंतरलों असलों तरी आज परमेश्वरानें आपल्याला आपल्या वडिलांच्या ठिकाणीं ज्यांची योजना करावीशी वाटेल अशा सासऱ्याची जोड करून दिली वगैरे प्रकारचे विचार लक्ष्मीच्या मनांत राहून राहून येत होते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं आपल्या सासऱ्याचा आणि आपला प्रत्यक्ष परिचय झाला ही गोष्ट तिच्या मनांत आतां वज्रलेप होऊन जाणें अगदीं योग्य होतें.

जेव्हां जेव्हां पुढें तिला लक्ष्मीपूजनाच्या सणाची आठवण होण्याचा प्रसंग येईल तेव्हां तेव्हां तिला या सुखप्रद आणि चिरस्मरणीय प्रसंगाचीहि मधुर स्मृति झाल्याशिवाय राहावयाची नाहीं. आज घडलेल्या त्या प्रसंगानें तिच्या मनापुढें एक वेगळ्याच प्रकारची सृष्टि निर्माण झालेली होती.

तिचा पति गंगाधर याच्या स्वभावाची तिला पुरेशी ओळख पटलेली नव्हती. पण बापाच्या वळणावरच जर मुलगा गेलेला असेल तर आपला वैवाहिक आयुष्यक्रम खास आदर्शवत् झाल्याशिवाय राहणार नाहीं, अशी तिच्या मनाची खात्री पटली. वास्तविक असा तो प्रसंग काय होता कीं, त्यामुळें तिच्या सासऱ्याची तिला परीक्षा पटावी? पण इतरांना क्षुल्लक किंबहुना अगदीं उपेक्षणीय वाटणारे प्रसंगहि कांहीं कांहीं माणसांच्या दृष्टीनें 'न भूतो न भविष्यति' इतक्या महत्त्वाचे असतात—निदान त्यांना ते तसे वाटतात एवढी गोष्ट मात्र खरी. लक्ष्मीला आज आपल्या सासऱ्याबद्दल कांहीं विशेष प्रकारचा आदर वाटूं लागला; आणि साहजिकपणानें सासऱ्याच्या आजच्या वर्तनावरून ती आपल्या मनाशीं गंगाधराच्या स्वभावाचा एक विशिष्ट दिशेनें कयास बांधण्याचा प्रयत्न करीत होती. तिच्या विचारांत आजच्या दिवसानें फरक पडण्याचा योग होता.

श्रीनिवासरावांनीं लक्ष्मीच्या जवळ येऊन जेव्हां तिच्या पाठीवरून हात फिरविला, त्या वेळीं तीं दोघेंहि दाराच्या बाजूला पाठमोरीं होतीं. देवाला जाऊन आलेली तिची सासू त्याच वेळीं दाराच्या बाजूला येऊन उभी राहिलेली होती. तिला आपल्या नवऱ्याबद्दल तसला कांहीं संशय येण्यासारखा तिचा नेहमींचा स्वभाव नव्हता. दोघांनीं खेळीमेळीनें आज इतके दिवस संसार केलेला होता. तिला आपल्या नवऱ्याच्या स्वभावाविषयीं आणि चालचलणुकीमुळें शंका येण्यासारखें त्याच्या वर्तनांत तिला आजपर्यंत कांहींहि दिसून आलें नव्हतें.

पण आज मात्र तिच्या मनांत काय आलें कोणास ठाऊक? तिला वाटलें न जाणो मनुष्यच आहे. एकाद्या वेळेला मन फिरण्याचा संभव आहे. देवादिकांनासुद्धां कधीं कधीं मोहाला बळी पडावें लागतें, तिथें माणसाची काय कथा?

आणि योगायोग तरी किती विचित्र होता? आजच्या पुराणांतहि तिला असल्याच गोष्टी ऐकावयास मिळाल्या होत्या. ब्रह्मनिष्ठ वसिष्ठालासुद्धां प्रत्यक्ष सुनेकडे वांकड्या नजरेनें पाहण्याचा मोह झाला; ती कथा आजच्या पुराणांत होती. दिवाणखान्याच्या दाराशीं येऊन आंतील प्रकार पाहिल्याबरोबर एरव्हीं कधींहि यावयाचा नाहीं असला संशय तिच्या मनांत येऊन गेला. पण नवऱ्याचा तिला एक प्रकारें वचक असल्याकारणानें त्याच वेळीं काय पण इतर कोणत्याहि वेळेला आपल्या मनांतला हा संशय तिला शब्दांनीं व्यक्त करून दाखवितां येणें शक्य नव्हतें. किंबहुना तिनें हा आपला संशय शब्दांनीं कोणाजवळ व्यक्त केला असता तर तिलाच लोकांनीं वेड्यांत काढलें असतें. आसपासच्या लोकांना श्रीनिवासरावांच्या वर्तनाबद्दल अतिशय आदर वाटत असे. लक्ष्मीसंबंधाच्याहि अशा संशयाला लोकांनीं चटकन् पसंती दिली नसती. अर्थात् हें संशयाचें शल्य तिला मनांतल्या मनांत बोंचत राहिलें. ती गोष्ट मनांतल्या मनांत दडपून ठेवून कोठेंहि न बोलून दाखविणेंच तिच्या हिताचें होतें. पण त्या दिवसापासून तिला श्रीनिवासरावांच्याबद्दल थोडासा राग आला आणि त्या क्षणापासून लक्ष्मीच्यासंबंधानें तिचें मन मत्सरग्रस्त होऊन गेलें. लक्ष्मीच्या बऱ्यावाईट अशा कोणत्याहि करण्यासवरण्याबद्दल विपर्यस्त विधानें करून येनकेन प्रकारेण तिची नालस्ती करण्यांतच तिच्या सासूला सुख वाटूं लागलें. बिचारी लक्ष्मी मात्र त्या दिवशीं फारच प्रसन्न होती. तिला सासूच्या मनांतील द्वेषाची कल्पनासुद्धां नव्हती.

[२]

" लक्ष्मी, इतका वेळ कुठें गेली होतीस ? "

" मी तिकडे मास्तरांच्याकडे गेलें होतें. "

" इतका वेळ मास्तरांच्या घरांत काय करीत होतीस ? "

" कांहीं नाहीं. कांहींतरी बोलत बसलों होतों झालें. "

" पहा बाई, तूं आपली रोज उठून त्याच्या घरांत जातेस. त्याला बायको ना पोर ! बाकी मला काय करायचें आहे तुला बोलून ? लोक तेंच घेऊन बसतात आणि म्हणतात कीं, अमक्यातमक्याची बायको अमक्यातमक्याच्या

घरांत जाऊन तासन् तास बसते. बघ बाई, तुझी तूंच. माझें काय राहिलें आहे ? ते होते तोंपर्यंत मला बोलायचा अधिकार होता, आतां माझें कोण ऐकून घेतो ? ”

पार्वतीबाईचा बोलण्याचा पट्टा सुरू झाला. लक्ष्मीचा स्वभाव वाद घालीत बसण्याचा नव्हता. त्यांतून सासूच्या असल्या बोलण्याची तिला अलीकडे पुष्कळच संवय झाली होती. ‘ मला बोलून काय करावयाचें आहे ? ’ असा आरंभ करून हजार गाडे वटवट करण्याची सासूची खोड तिला आतां पूर्णपणें माहिती झाली होती. उत्तरास प्रत्युत्तर करीत बसण्यानें कांहींच निष्पन्न न होतां उगीच गोष्टी विकोपाला मात्र जावयाच्या, या भीतीनें लक्ष्मी होतां होईल तों शब्दाला शब्द देण्याचें टाळीत असे. त्यांतून सासूबाईची हल्लींची परिस्थिति जरा नाजूक होती. भांडणें विकोपाला जाऊन तीं लोकांच्या चर्चेचा विषय झाल्यास त्यांत सासूबाईला दोष न देतां लोक लक्ष्मीलाच नांवें ठेवायला तयार झाले असते. श्रीनिवासरावांना या जगांतून गेल्याला आज बरेच महिने झाले होते. सासू दुःखांत आहे, असेंच वरवर पहाणाराला वाटत असे. त्यामुळें एखाद्या वेळीं भांडणाचा जर कांहीं भलताच परिणाम झाला तर त्यांत लक्ष्मीकडेच जास्त दोष आला असता ! लक्ष्मीच्या वर्तनाबद्दल सासूबाईंना खरोखरच संशय होता अशांतलाहि भाग नाहीं. पण श्रीनिवासराव असल्यावेळेपासूनच तिच्या मनांत जें एक शल्य बोंचत राहिलें होतें तें त्यांच्या मरणानंतरहि मधूनमधून खुपल्याशिवाय रहात नसे.

आपल्याला जें सुख मिळत नाहीं तें दुसऱ्याला मिळत असलेलें पाहून सर्वसामान्य माणसाला हेवा वाटल्याशिवाय रहात नाहीं. आपल्या वैवाहिक आयुष्यक्रमाची घडी विसकटली, असें पार्वतीबाईंना राहूनराहून वाटत होतें; आणि त्याच वेळीं तिच्यासमोर रोज गंगाधर आणि लक्ष्मी यांचा खेळी-मेळीचा संसार सुरू होता. तें त्यांचें एकमेकांबद्दलचें प्रेम पाहून वास्तविक पार्वतीबाईंनीं कौतुक करावयाचें. पण त्यांना आपल्या मुलांबद्दल कितीहि प्रेम वाटत असलें तरी तिला लक्ष्मीबद्दल एक प्रकारचा द्वेष वाटत असल्यामुळें गंगाधर व लक्ष्मी यांचें एकमेकांचें नीट बनूं नये अशी इच्छा तिनें मनांत

घरणें अगदीं साहजिक होतें. गंगाधर बाहेरून आल्यानंतर लक्ष्मी आसपास नाहीं असें पाहून त्याची आई त्याला तिच्याबद्दलच्या कागाळ्या नित्यशः सांगत असे. पण गंगाधर बराचसा समंजस होता. पुष्कळ वेळां तो या गोष्टीं-कडे कानाडोळा करीत असे. त्यांतून त्यानें मनाशीं निश्चय केला होता कीं, लक्ष्मीनें या गोष्टींबद्दल आपण होऊन बोलणें काढल्याशिवाय आपण या गोष्टींचा विचारच करावयाचा नाहीं.

आज लक्ष्मीपूजनाचाच दिवस होता. दुपारचें चहापाणी होऊन गेलें होतें. गंगाधर कुठेंसा कामाला बाहेर गेला होता. गंगाधराचा आणि मास्त-रांचा कमालीचा स्नेह होता. दोघांचें अगदीं सख्ख्या भावासारखें प्रेम! त्यामुळें गंगाधर नसतांसुद्धां मास्तरांशीं मनमोकळेपणानें गप्पा मारीत बसण्याचा लक्ष्मीला संकोच वाटत नसे. आज मास्तरांना सुट्टीच होती. लक्ष्मीलाहि कांहीं वेळ मोकळा असल्याकारणानें ती आज मास्तरांच्या खोलींत गेली. त्या वेळीं मास्तर एक इंग्रजी पुस्तक वाचीत होते. खोलींत शिरतांशिरतांच लक्ष्मीनें सहास्य मुद्रेनें मास्तरांना विचारलें,

" काय भाऊजी? कसलें वाचन चाललें आहे? "

मास्तरांनीं पुस्तक मिटीत म्हटलें,

" कसलें नाहीं. लग्नासंबंधाचें पुस्तक आहे, वहिनी. "

"लग्न करावयाचें नाहीं न् लग्नाबद्दलचें पुस्तक कशाला वाचतां, भाऊजी?"

लक्ष्मीनें किंचित् चेष्टेच्या स्वरांत प्रश्न केला. त्यावर मास्तरांनीं म्हटलें, " पण वहिनी, लग्न कां करूं नये याबद्दलचे माझे विचार आणि या लेख-काचे विचार कितीतरी ठिकाणीं जुळत आहेत! "

" या लेखकांचें लग्नाबद्दल काय म्हणणें आहे, भाऊजी? "

लक्ष्मीनें खालच्या सतरंजीवर बसतां बसतां विचारिलें. "त्याच्या सर्व म्हण-ण्याचा सारांश इतकाच कीं, लग्न करण्यानें कांहीं कांहीं गोष्टींचें सुख मिळतें ही गोष्ट खरी आहे. पण त्याबरोबरच कितीतरी त्रास मागें लागतो. साध्या क्षुल्लक गोष्टींनीं सुद्धां कित्येकदां मनाची स्वस्थता बिघडून जाते. दोन चार माणसें एकत्र असलीं म्हणजे भांडणतंडण झाल्याशिवाय थोडेंच रहाणार आहे? आणि लग्न करण्यानें पुष्कळ ठिकाणीं धुसफूस, भांडणतंडण, असलेच

प्रकार पहावयास मिळतात. वहिनी, हा लेखक असेंच म्हणतो आणि मला हें त्याचें म्हणणें पटतें. मी पहा कसा सुखी आहें तो. माझ्या मनाची शांतता क्वचित्च भंग पावते."

"पण भाऊजी, तुम्ही असें लग्न न करतां राहिलांत तर तुम्हांला काय थोडी निंदा सोसावी लागेल कां? नाहीं तिथें तुमचे संबंध जोडून लोक तुम्हांला नांवें ठेविल्याशिवाय रहावयाचे नाहींत."

"पण लोकांना मी कुठें भीक घालणार आहें? माझ्या मनाची शांतता त्यामुळें थोडीच बिघडणार आहे?"

अशाच तऱ्हेच्या त्या दिवशीं बराच वेळ गप्पागोष्टी झाल्या. मास्तरांनाहि बाहेर जावयाचें होतें, म्हणून तीं दोघेंहि त्यांच्या खोलीच्या बाहेर एकदमच पडलीं.

लक्ष्मी आपल्या घरीं आली तेव्हां तिच्या सासूनें तिला मागें सांगितल्या-प्रमाणें हर तऱ्हांनीं बोलून घेतलें. त्या दिवशींच्या त्या योगायोगाचें लक्ष्मीला फारच आश्चर्य वाटलें. अविवाहित राहण्यानें लोक मास्तरांची कशा प्रकारानें निंदा करतील याचें तिनें मास्तरांच्या खोलींत नुकतेंच दिग्दर्शन केलेलें होतें. घरीं आल्यावर सासूबाईच्या बोलण्यांतली एका विशिष्ट प्रका-रच्या संशयाची छटा तिच्या भेदक बुद्धीला समजल्याशिवाय राहिली नाहीं; आणि त्यामुळें तिचें मन बरेंचसें अस्वस्थ होऊन गेलें होतें. अशा प्रकाराच्या संशयाला सासूबाईनींच 'सूत उवाच' करून द्यावें याचें तर तिला फारच वाईट वाटलें. सासूबाईच्या सहजासहजीं बोलण्यांत ही गोष्ट जर दुसऱ्या कुणाच्या कानावर गेली तर परिणाम भलताच होईल, अशी तिला राहून राहून भीति वाटूं लागली.

त्या दिवशीं सायंकाळीं सासूबाईनीं संधि साधून आपली शंका आपल्या मुलाच्या कानावर घालण्याचें काम चोख रीतीनें बजाविलें.

पहांट होण्याची वेळ होती. लक्ष्मीला त्या दिवशीं शांत अशी झोंप लागली नाहीं पण राहून राहून तिचा अर्धवट डोळा लागत होता. गंगाधर जागा झाला त्या वेळीं लक्ष्मी झोंपेंतच बोलत होती, 'मास्तर, तुमचें म्हणणें मला मनापासून पटलें. खरेंच, मास्तर माझेंहि लग्न झालें नसतें तर—'

असें अर्धवट बोलून लक्ष्मी थांबली. गंगाधरानें मात्र आपलें पांघरूण दूर भिरकावून दिलें आणि तो अंथरुणावर तटकन् उठून बसला. त्याचे डोळे ताठ झाले होते. आपल्या डोक्यावर कुणीतरी जोरानें आघात करीत आहे, असा त्याला वारंवार भास होत होता. इतक्यांत लक्ष्मी पुन्हां बोलूं लागली.

'मास्तर, खरेंच तुम्ही फार शहाणे आहांत! आम्ही मात्र अभागी खरे.'

हे शब्द गंगाधराला ऐकवेनात. झोंपेंत सुद्धां आपल्या बायकोला मास्तरांचें वेड लागलेलें आहे असें त्याला वाटलें. त्याला संताप आला आणि तो जागचा उठला. लक्ष्मीच्या हाताला धरून त्यानें तिला जोरानें अंथरुणावर उठवून बसविलें आणि रागारागानें तिला म्हटलें, "जवळ मास्तर नाहीं, मी आहें."

लक्ष्मी जागी झाली. पण आपण झोंपेंत कांहीं बोलत होतों हें तिला मुळींच समजलें नाहीं. गंगाधर रागानें असें बोलतो आहे हें तर तिच्या अगदींच ध्यानांत आलें नाहीं. तिनें सहजच उत्तर दिलें, "मी कुठें म्हणतें मास्तर जवळ आहेत म्हणून?"

"आतां इतक्यांतल्या इतक्यांत छप्पनदां तर म्हणालीस कीं मास्तर, मास्तर म्हणून!"

लक्ष्मीला याचा कांहींच उलगडा होईना. तिनें पुन्हां म्हटलें, "आपल्यालाच कांहींतरी स्वप्न पडलें असेल."

"नव्हे, नव्हे. मी चांगला डोळे उघडून तुझें बोलणें ऐकत होतों. तूं मास्तराला हांका मारून मोठमोठ्यानें बोलत होतीस."

तरीसुद्धां लक्ष्मीला तें म्हणणें खरें वाटेना. आपला नवराच कांहींतरी वेड्यासारखें बोलत आहे असें तिला वाटलें; आणि ती मोठ्यानें हंसली आणि हंसतहंसतच गंगाधराला म्हणाली, "स्वप्न, स्वप्नच बरें; दुसरें कांहीं नाहीं."

गंगाधराच्या रागाचा पारा अधिकाधिक वर चढत होता. त्याच्या सर्वांगाला जसा कांहीं वणवाच लागला होता. त्यानें जोरांत ओरडून म्हटलें, "काय बेशरमपणा हा माझ्याशीं असली लुच्चेगिरी करतेस? लाज नाहीं वाटत तुला?"

आतां मात्र लक्ष्मी कावरीबावरी झाली. आपल्या झोंपेंतल्या बोलण्याचा हा परिणाम आहे हें तिला अजूनहि समजलें नव्हतें. पण आपल्यासंबंधानें

आपल्या नवऱ्याला कांहींतरी विचित्र संशय आलेला आहे याची मात्र तिला जाणीव झाली. किंचित् धीर करून गंभीरपणानें तिनें विचारलें,

" काय? मी काय केलें? कसली लुच्चेगिरी? "

गंगाधराचाहि राग किंचित् कमी झाला होता. त्यानें म्हटलें, " झोंपेंतसुद्धां तूं मास्तराच्या नांवाचा जप घेऊन बसतेस? काय त्यानें तुला इतकी भुरळ घातली आहे कोण जाणे? "

लक्ष्मीनेंहि पुन्हा शांतपणानें प्रश्न केला, " हा काय प्रश्न? मास्तर माझे भाऊजी नव्हेत का? "

" पण तुला हें माहीत आहे ना कीं, शास्त्रानेंसुद्धां भाऊजीशीं लग्न रण्याची सवलत ठेवलेली आहे ती! "

लक्ष्मीला कळून चुकलें कीं, आपल्या नवऱ्याला आपल्याबद्दल जबर संशय आलेला आहे. आपण झोंपेंत काय बोललों कोणास ठाऊक? पण कांहींतरी भयंकर गोष्टी आपल्या तोंडून बाहेर पडलेल्या असतील अशी तिची तिलाच शंका आली. तिनें पुन्हा गंगाधराला म्हटलें, " आपली कांहींतरी चूक होत आहे. "

" हो. माझीच चूक होत आहे, नाहीं तर काय? तुझ्या आणि मास्तरांमधें मी येतों आहें ही माझी चूक नव्हे तर काय?"

किंचित् रागानेंच तिनें उत्तर दिलें, " हो. तेंच खरें आहे! "

ती संतापानें ताबडतोब उठून गेली. त्या दिवसापासून तिच्या सुखाच्या समुद्राला ओहोटी लागून तो पूर्णपणें आटून जाण्याच्या मार्गाला लागला.

[ ३ ]

अखेर व्हावयाचें तेंच झालें. गंगाधराच्या मनांत त्याच्या आईनेंच भरवून दिलेला संशय कांहीं केल्या कमी होईना. मास्तरांच्याकडचें त्याचें जाणेंयेणेंहि आतां अगदीं कमीकमी होत चाललें होतें. लक्ष्मीनें तर मास्तरांच्याकडे जाणें अजीबात बंदच केलें होतें. रोजरोज संशयाची चढती कमान होऊन लक्ष्मीच्या त्रासाचीहि अगदीं पराकाष्ठा होत होती.

शेवटीं बिचारीच्या मानसिक यातनांचा तिच्या शरीरावर फार परिणाम

झाला. तिला रोज ताप येऊं लागला आणि तिनें अंथरूण धरलें. गंगाधरानें तिची कोणत्याहि प्रकारची हेळसांड केली नाहीं. तो आपल्याकडून शक्य ते प्रयत्न करीत होता. पण दोघांच्याहि मनांत एकमेकांविषयीं असणाऱ्या प्रेमादराबरोबर तितक्याच प्रमाणांत संकोचहि वास करीत होता. आपण मनमोकळेपणानें बोलावें असें लक्ष्मीलाहि वाटत नव्हतें. लक्ष्मी मनमोकळे-पणानें बोलत नव्हती; मग एकटा गंगाधर तरी काय बोलणार?

होतां होतां लक्ष्मीच्या आधिव्याधि अतिशय वाढून तिची आतां सर्वांनाच काळजी वाटूं लागली. गंगाधराला तर सर्वांपेक्षां जास्त काळजी वाटत होती. मध्यंतरीं उत्पन्न झालेल्या या ओंगळ गोष्टीव्यतिरिक्त दोघांच्या प्रेमामध्यें कशानेंहि खंड पडलेला नव्हता.

सकाळची वेळ होती. लक्ष्मीचा अंतकाळ अगदीं समीप आला होता. त्या दिवशीं मास्तरसुद्धां तेथें आले. मास्तर गंगाधराशीं कांहीं एक न बोलतां थेट लक्ष्मीच्याजवळ जाऊन बसले. ती गोष्ट लक्ष्मीच्या ध्यानांत आली आणि तशा स्थितींतसुद्धां तिनें सर्व प्राण एकवटून तोंडांतून शब्द काढले, "भाऊजी, तुम्ही जरा दूर बसा, माझा दाह होतो आहे."

बिचाऱ्या मास्तरांना तें खरें वाटलें आणि किंचित् दूर सरत त्यांनीं विचारिलें, "वहिनी, मग वारा घालूं का?"

जें विचारूं नये तें मास्तरांनीं विचारिलें. लक्ष्मीतरी काय उत्तर देणार? तिनें मानेनेंच 'नको' अशी खूण केली. तिचे डोळे भरून आले होते आणि श्वास वेगानें चालला होता.

थोड्याच वेळांत लक्ष्मीचें प्राणोत्क्रमण झालें आणि व्हावयाची ती सर्व व्यवस्थाहि झाली. प्रत्येकाला आपापल्या परीनें दुःख झाल्याशिवाय राहिलें नाहीं. तिचा अंत्य विधि होत असतांना मास्तरसुद्धां कितीदां तरी ढसढसून रडले.

* * * *

बरेच दिवस होऊन गेलेले होते, गंगाधराच्या खोलींत आतांसा एक मोठा थोरला फोटो टांगलेला असून, फोटोंतील लक्ष्मीच्या दोन्ही पायांवर नेहमीं गंधफूल वाहिलेलें असतें!

तोहि लक्ष्मीपूजनाचाच दिवस होता. आसपासच्या घरांतील बायका

लक्ष्मीपूजनाच्या गडबडींत होत्या. त्यांतील एकदोघी लक्ष्मीच्या सासूकडे आल्या आणि इकडेतिकडे पहात म्हणाल्या,

" कां आजीबाई, आज लक्ष्मीपूजनाची सामसूम कशी? "

त्यावर सासूबाईंनीं उत्तर दिलें,

" आतांशा किनई आमच्याकडे रोजच लक्ष्मीपूजन असतें! "

दुसरी बाई कांहींशी फटकळ होती तिनें तेथेंच उत्तर दिलें, " हो, हो. बैल गेला नि झोंपा केला!! आतां नेहमीं लक्ष्मीपूजनच करीत बसा! "

---

# सुधागड–वर्णन

शिवशाहीर वासुदेव पुरुषोत्तम डोंगरे, वैद्य, पुणें.

[ शके १८१७ मार्गशीर्ष वद्य ४ स पडघवलीं येथें जन्म. गु. माधवरावजी मोडक यांचा बालपणापासून बराच सहवास घडला. वे. मू. मोरेश्वर हरि मोडक यांचे जवळ वेदाध्ययन. पुण्याचे सुप्रसिद्ध वैद्य पु. ग. नानल आयुर्वेदाचार्य यांचे जवळ खाजगी रीतीनें संस्कृत व आयुर्वेद यांचा अभ्यास. त्यांना काव्य करण्याची आवड असून त्यांनीं ऐतिहासिक विषयांवर बरीच कविता लिहिली आहे. त्यांचें ' छत्रपतींच्या छायेंत ' या नांवाचें ऐतिहासिक पदांचें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. सध्यां ते पुणें येथें वैद्यकीचा धंदा करीत असतात. ]

**विषयः**––भौगोलिक वर्णन, क. १–११, ऐतिहासिक वर्णन, क. १२–२१; व सद्यःस्थितीचें वर्णन, क. २२–३१.

**श्री सचिवांच्या छत्राखालीं सुखांत नांदे सुधागड।**
**भाऊ त्याचा बाऊ रिपुचा तसाच अवघड सरसगड ॥ १ ॥**
**चहुबाजूचे सह्याद्रीचे विशाल निधडे उंच कडे।**
**सुधागडाच्या प्रांताभवतीं जणूं उभीं हीं भिंताडें ॥ २ ॥**

श्री भोराई आई पाही प्रेमें राही प्राचीला।
देवि वर्धनी आशीर्वादा दक्ष सदोदित दाक्षिणला ॥ ३ ॥

उद्धरशिखरीं प्रभु रामेश्वर पश्चिम दिक्पालनवाला।
पिंपळमाचीवर गोंदावी शंकर तारी उत्तरला ॥ ४ ॥

बल्लाळेश्वर राज विराजे सिद्धि-विनायक पल्लीला।
किति वर्णाव्या स्यां मुग्धानें महन्मंगला तल्लीला ॥ ५ ॥

आर्ता ज्याचा पुरा आसरा असा न दुसरा देव दिसे।
श्री वीरेश्वर भूताधीश्वर अखंड तो असल्यास वसे ॥ ६ ॥

साधि तपाला गोमाशीला भृगु नामक तो महामुनी।
भोराईची करी स्थापना अशी सांगती कथा जुनी ॥ ७ ॥

पयस्त्राविणी अंबा तैशी अम्बा नाम्नी तरंगिणी।
करी विहारा हार्द-हृदार्द्रा सुधागडाच्या गृहांगणीं ॥ ८ ॥

ठाणाळ्याचें कोरिव लेणें असतां रूपा काय उणें।
सुखोदकानें होई न्हाणें दिलें उन्हेरें देवानें ॥ ९ ॥

घोटवड्याची गुहिरी गहिरी शोभा दाविल पाण्याची।
वक्र दृष्टिनें छाति कुणाची उंबरखिंडिस बघण्याची ॥ १० ॥

आंबवण्याचा वाघजईचा घाटमार्गही हे रगड।
स्थलश्रेष्ठ हा आम्रफलांच्या गोड घडासम सुधागड ॥ ११ ॥

शास्त्याचा सरदार कार्तलबखान शिवाजिस धुंडीत।
घाटावरुनी घसरत आला पडला उंबरखिंडींत ॥ १२ ॥

अफाट जंगल वाट दिसेना दाट भयंकर तें रान।
त्यांतचि उठलीं भुतें मराठी झाला पुरता हैराण ॥ १३ ॥

सुटलीं वस्त्रें तुटलीं शस्त्रें किती कथूं हो त्या मौजा ।
दीन होउनी शरण शिवाला आल्या खानाच्या फौजा ॥ १४ ॥

शंकराजीचा पिता प्रतापी नारो मुकुंद घन समरीं ।
सरसगडाच्या माचीवरती पराक्रमाची शर्थ करी ॥ १५ ॥

या महनीया बघुनि सहाय्या गुणी जनांचा कैवारी ।
करि शिवनृप त्या सुधागडासह, ससगडचा अधिकारी ॥ १६ ॥

वाम-करीं शिर शिवार्थ रिपुच्या वधा सव्य-करिं समशेर ।
घेति तयांचे वंशज अमुचे भूपति किति हें यश थोर ॥ १७ ॥

सुधागडाला पांच, त्यापरी सरसगडाला दु-हजार ।
होन दुरुस्तिस देइ शिवाजी असा गडांचा बडिवार ॥ १८ ॥

बंडखोर सुत अवरंग्याचा नांव महंमद अकबर ज्या ।
करुनि कुर्निसा वदे शंभुला थारा मजला दे राजा ॥ १९ ॥

ऐकुनि अर्जी बोले फर्जी रहा धोंडसें गांवाला ।
हवा पुरावा तरी विचारा खुलवा पाच्छापूराला ॥ २० ॥

फिरल्या सेना शिव प्रभूच्या ज्या घाटांच्या वाटांनीं ।
गाउं पवाडे प्रेमें त्यांचे शिव-शाहीरी थाटांनीं ॥ २१ ॥

प्रभुज्ञातिच्या सौभाग्याचें देशमुखांचें आतोणें ।
आत्मोन्नतिच्या आकांक्षेनें करि सिद्धेश्वर सफल जिणें ॥ २२ ॥

कोर्ट-कचेरी जशि राजाची तशी प्रजेची सु० ता० सभा ।
शिवोत्सवासह जनसेवेला समाजसेवा संघ उभा ॥ २३ ॥

आंग्ल-मराठी वैदिक शाळा करिती बालां सद्बुद्ध ।
ज्ञानवर्धना मनोविकसना सदा वाचनालय सिद्ध ॥ २४ ॥

बलदायक बलभीमासन्निध बलसंवर्धक मंडळ तें।
खाडा जोडी खांब दावुनी नवजीवन देहा देतें ॥ २५ ॥

सुविचारांची माला विमला देइ मनाला आरामा !
वदता विस्तर होइल ऐसा पल्लिग्रामाचा महिमा ॥ २६ ॥

राजपथातें त्यजुनि विलोका आडबाजुचें नाडसुर।
युवसंघाचें चित्रकलेचें कवि-कवितेचें माहेर ॥ २७ ॥

ग्राम-स्थाना ज्या नच तुलना जांभुळपाडा रम्य असा।
स्थल जल शोभा पाहुनि सहसा निसर्ग झाला मुग्ध जसा ॥२८॥

सुंदरशाला शिकवी बाला तेंवि वाचनालय सान।
ज्ञान जनांना देइ जगाचें लोक उद्यमीं गुणवान ॥ २९ ॥

तपःसिद्धिचें, सरस्वतीचें, चित्रकलेचें आभरण।
शिवोत्सवाचें स्थान जयतु ते पडघवली हें अभिधान ॥ ३० ॥

बृहन्महाराष्ट्रासाजेसा असे आमुचा हा देश।
धनी तयाचा वर्ष शतद्वय भोरपुरीचा वसुधेश ॥ ३१ ॥

---

# अध्यात्म व ललितकला

लेखक: 'पुराणरत्न' शेषाद्रि गोविंद कानडे, एम्. ए., एस्. टी. सी.

[ यांचा जन्म १८९७ मध्यें वाई येथें झाला. प्राथमिक व माध्यामिक शिक्षण भोर हायस्कूलमध्यें. १९१४ मध्यें मॅट्रिक, १९१९ सालीं बी. ए. व १९२२ मध्यें एम्. ए. मध्यंतरीं कांहीं वर्षें पुणें येथील ज्ञानकोश मंडळांत काम केल्यानंतर दोन वर्षें अमळनेरच्या तत्त्वज्ञानमंदिरांत फेलो म्हणून राहिले. या अवधींत ' तत्त्वज्ञानमंदिर ' त्रैमासिकाचे ते संपादक होते. यानंतर ते पंढरपूरमधील हायस्कूलचे हेडमास्तर होते. व नंतर ते पुण्याच्या विद्याप्रसारक सभेच्या भारत हायस्कूलमध्यें आले.

सध्यां सभेच्या लोणावळा शाखेच्या हायस्कूलचे हेडमास्तर आहेत. संस्कृत साहित्य व संगीत कलेचा त्यांचा व्यासंग असून पुणें व बडोदें येथील पुराण व कीर्तन या विषयांच्या त्यांनीं संस्कृत परीक्षा दिल्या आहेत. मानसशास्त्र व तत्त्वज्ञान हा त्यांचा व्यासंग असून ते सध्यां भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास नांवाचा स्वतंत्र व सांगोपांग ग्रंथ लिहीत आहेत. ]

"The problems of the age are not merely social, economic and political; not merely psychological and scientific. These involve the adjustment of experiencc, knowledge and thought and a recognition of man's place in the world of life and thought."

—S. A. Cook.

सांप्रतचें युग भौतिक शास्त्रांचें व तदाधिष्ठित व्यापारधंद्याचें आहे. मनुष्यप्राणी हा यंत्रसामग्रीचे जोरावर विश्वामित्राप्रमाणें प्रतिसृष्टि निर्माणकर्ता बनूं पहात आहे. भौतिक शास्त्रामध्यें लागत असलेले निरनिराळे शोध मानवी सुखामध्यें कितीतरी भर टाकीत आहेत! अशा या धकाधकीच्या मामल्यामध्यें, या बहुरूपी जीवनकलहामध्यें, तें जुनेंपुराणें 'अध्यात्म' व ती नटवी 'कला' यासारख्यांचा पाड काय लागणार? विश्वाच्या आरंभापासून या अध्यात्म-पिशाच्चानें मनुष्यप्राण्यास सळों कां पळों करून सोडलें इतकें हें जरठ झालें आहे. कलेनेंसुद्धां आपल्या विविध साधनसामग्रीनें मानवी मनास कसकसें ढंगी बनाविलें याची साक्ष मानववंश-शास्त्रच देईल. वेदकालीन ऋषींना उषादेवीच्या रम्य व आल्हाददायक चेहऱ्यामध्यें दिव्य सौंदर्य प्रतीत होऊन त्यांच्या मुखांतून जीं दिव्य काव्यस्तोत्रें अवतीर्ण झालीं, त्याला कारण ही नटमोगरी कलाच होय. हिच्या निशेनेंच धुंद झालेल्या बौद्धभिक्षूंनीं सह्याद्रीच्या कृष्णवर्णी फत्तराच्या हृदयांमधून शिल्पसौंदर्याचीं आगरें निर्माण केलीं. फार काय श्रीशंकराचें ताण्डवनृत्य, श्रीकृष्णाचा मुरलीरव, भरतमुनीचें नाट्यकौशल्य, तानसेनाचें संगीतपाटव, मयासुराचें शिल्प, बाणासुरकन्या उषा हिचें चित्रनिर्माणकौशल्य, व्यासवाल्मीकि-कालिदासादिकांचा प्रतिभाविलास हें सर्व या महामायेचेंच इंद्रजाल होय.

अध्यात्म व कला या दोहींचें साहचर्यसुद्धां विजोड दांपत्यांच्या प्रहसना-

प्रमाणें हास्यास्पद ठरणार नाहीं ! ‘ अध्यात्मविद्या विद्यानाम् ’ ‘ अध्यात्म हें शास्त्रांचें शास्त्र. ’ अर्थात् शास्त्रीय घटपटांची खटपट या ठिकाणीं परमावधीस पोहोंचलेली असणार! सरडा ज्याप्रमाणें एका क्षणार्धामध्यें निरनिराळे रंग पालटतो त्याप्रमाणें अध्यात्मशास्त्र निरनिराळ्या शतकांमध्यें निरनिराळे पेहेराव घेऊन प्रगट होतें व आपली प्रणालिका पुढें चालवितें. कलेच्या स्वरूपाकडे पहावें तर तिचा भर भावना व तदाधिष्ठित कार्यप्रवृत्ति यांवर आहे. अशा रीतीनें अध्यात्मशास्त्राचा निकट संबंध तर्कप्रधान विचारांशीं (Congrution) तर कलेचा संबंध भावनाप्रधान सौंदर्यप्रतीतीशीं (Congrution); भारतीयांच्या कल्पनेप्रमाणें अध्यात्मसूर्य हा या अफाट विश्वाच्या पसाऱ्यावर तळपत असतो; तर कला ही विद्युल्लतेच्या चमकेप्रमाणें अगर सांख्याच्या प्रकृतीप्रमाणें, विश्वाच्या रंगभूमीवर क्षणोक्षणीं मानवी मनाला गुंगविणारा विलास प्रगट करून पुनः पुन्हा स्वतःमध्यें विलीन होते.

अशा रीतीनें अध्यात्म व कला यांमध्यें कितीहि विसंगति दिसत असली तरी या दोन्हींमध्यें तितकींच निकट बंधनें आहेत, ही गोष्ट मात्र दृष्टीआड होऊं देतां कामा नये. हीं बंधनें कशा स्वरूपाचीं आहेत व या बंधनांपासून मानव्याची प्रगति होणार कां परागति होणार हेंच आपणांस शास्त्रीय कसोटी लावून पारखावयाचें आहे. अर्थात् ही कसोटी लावतांना आपणांला अनेक प्राचीन-अर्वाचीन, पौर्वात्य-पाश्चात्य शास्त्रविकासांचा उपयोग होणार आहे. विशेषतः ‘ मानसशास्त्र ’ या नांवानें संबोधल्या जाणाऱ्या विचारपद्धतीचा व संशोधनाचा या ठिकाणीं कसाकसा उपयोग करून घेतां येईल यासंबंधीं फक्त दिशा या लेखामध्यें दर्शित करावयाची आहे.

विश्वामध्यें मनुष्यासुद्धां सर्व प्राणिसृष्टीची धडपड आत्यंतिक सुखाकरितां आहे व या आत्यंतिक सुखाची पुष्कळशी मदार या जगांत व्यक्तिरूपानें आपलें जीवन वर्धिष्णु करण्यावर अवलंबून आहे. परंतु मानवी मनाला ज्या वेळीं व्यक्तिस्वरूपानें आपलें अस्तित्व शक्य तों जास्त कालपर्यंत टिकवणें अशक्य वाटूं लागलें त्या वेळींच व्यष्टिरूपानें अनंत कालपर्यंत जगण्याची कल्पना अशक्य कोटींतील ठरून मानवी मनाची धडपड समष्टिरूपानें तरी शक्य तों जास्त कालपर्यंत आपलें अस्तित्व टिकवण्याच्या दृष्टीनें सुरू झाली व या

धडपडीचा परिणाम म्हणजेच शास्त्रें, कला, धर्म, तत्त्वज्ञान वगैरेंनीं युक्त अशा निरनिराळ्या भारतीय, रोमन, ग्रीक, बाबिलोनी संस्कृतींचा झालेला विकास होय.

वरील विवेचनावरून हीहि गोष्ट स्पष्ट होईल कीं, मानवी मन हें ज्याप्रमाणें बुद्धि (Knowing), भावना (Feeling) व कर्तृत्व (Willing) या तिहींचें बनलें असल्याचें मानस शास्त्रावरून समजतें, त्याप्रमाणें मानवी संस्कृतीमध्यें, बुद्धिप्रधान शास्त्रें, भावनाधिष्ठित कला व कर्तृत्वाधिष्ठित इतर घटना यांचा अंतर्भाव होतो. याकरितांच संस्कृतिसंवर्धन हें जगांतील मानवी घडामोडींचें ध्येय समजलें जाऊं लागलें आहे. हें ध्येय साध्य करण्याऐवजीं राजकीय स्वातंत्र्यसंपादन, समाजसुधारणा, यांत्रिक प्रगति, औद्योगिक उन्नति, आर्थिक विकास, तात्त्विक विचारप्रणालिका इत्यादि गोष्टीच आतांपर्यंत जगामध्यें ध्येयरूपानें पाश्चात्य जगामध्यें वावरत होत्या; नाहीं म्हणावयास भारतीयांची धर्मविषयक कल्पना मात्र अर्वाचीन कालांतील संस्कृतीच्या सर्वसंग्राहक कल्पनेशीं समानार्थक आहे; ही गोष्ट प्राचीन ग्रंथांवरून स्पष्ट आहे. प्राचीन भारतीय आर्यांनीं ठरविलेलीं धर्माचीं अनेक लक्षणें पाहिलीं असतां धर्माचें मुख्य कार्य समाजधारणा म्हणजे समाजाचें ऐहिक व पारत्रिक कल्याण समजलें जातें. या दृष्टीनें पाहिलें असतां भारतीय धर्म हा इतर ख्रिस्ती, महंमदी, बौद्ध वगैरे धर्मसंप्रदायांप्रमाणें संकुचित स्वरूपाचा, केवळ दिवाणखान्याला सुशोभित करणारा अलंकार नसून त्यामध्यें तत्त्वविचार, राजकारण, कलाविकास, शास्त्रीय प्रगति वगैरेंचाहि अंतर्भाव करण्यांत येतो. या दृष्टीनें पाहतां इतर धर्मांचें स्वरूप अत्यंत संकुचित आहे. सुप्रसिद्ध मोंगल बादशहा औरंगझेबाच्या संबंधींची संगीतकलेचें दफन करण्याबद्दलची आख्यायिका खरी असो, अगर खोटी असो; परंतु एवढें मात्र निश्चित कीं, यावरून त्या धर्माची संकुचित कल्पना व्यक्त होते. मशिदीपुढील वाद्यवादन अगर महंमद पैगंबराचें चित्रलेखन यांसारख्या धर्मवेडाच्या गोष्टी तर संकुचित भावनेच्या स्पष्ट निदर्शक आहेत. या विवेचनावरून प्राचीन भारतीयांची धर्मसंबंधीं भावना किती सर्वसंग्राहक आहे व अर्वाचीन 'संस्कृति' या शब्दाशीं किती समानार्थक आहे हें दिसून येईल.

जगांतील कोणत्याहि संस्कृतीमध्यें शास्त्रें, कला, धर्म व तत्त्वज्ञान यांचें

अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध कां असतात याचाहि उलगडा वरील विवेचनावरून होणार आहे. समाजमानसशास्त्राप्रमाणें प्रत्येक विशिष्ट मानवसमाजाचें एक सर्वसाधारण मन (Social mind) गृहीत धरावें लागतें. या विराट पुरुषाच्या मानसिक घडामोडींत बुद्धिप्रकर्ष हा निरनिराळ्या शास्त्रीय सिद्धांतरूपानें प्रादुर्भूत होतो. त्याचप्रमाणें या समष्टिस्वरूप मनामध्यें ज्या ज्या सौंदर्यभावना निर्माण होत असतात त्याच सहजसुलभ अशा नाद, वर्ण, शब्द, रेखा वगैरे बाह्य साधनसामग्रीचा उपयोग करून त्या त्या समाजाचे अगर संस्कृतीचे कलाविलास बनतात. धर्म अगर तत्त्वज्ञान हींसुद्धां या समष्टिरूप मनाचीच खटपट असून विश्वाच्या सर्वसंहारक शक्तीवर केलेली एक प्रकारची मातच होय.

मानवी मनामध्यें बुद्धि (Cognition) व भावना (Conation) यांचा जो संबंध आहे, तोच संबंध संस्कृतिविकासामध्यें शास्त्र व कला यांमध्यें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. किंबहुना अर्धनारीनटेश्वराप्रमाणें संस्कृतिविकास हा या दोहींचा मिळून बनलेला आहे. जगांतील प्रत्येक कला कोणत्या तरी शास्त्रीय सिद्धांताचा आधार घेऊन कार्य करीत आहे, तर जगांतील प्रत्येक शास्त्राचा उपयोग मानवी जीवन सौंदर्यपूर्ण अर्थात् कलायुक्त करण्याकडे होत असतो. मनुष्यप्राण्याच्या प्रत्येक घडामोडीचीं शास्त्र (Theory) व कला ( Practice ) अशीं दोन अंगें आहेत. ज्याप्रमाणें एका चाकाच्या योगानें रथाला चांगली शक्ति मिळत नाहीं किंवा ज्याप्रमाणें उद्योगाशिवाय दैव फलवान् होत नाहीं त्याचप्रमाणें केवळ शास्त्राधिष्ठित अगर केवळ कलोपजीवी असें मानवी जीवन फार वेळ टिकाव धरूं शकत नाहीं.

या ठिकाणीं केवळ शास्त्राधिष्ठित अगर केवळ कलोपजीवी याचा अर्थ शब्दशः न घेतां " प्राधान्येन व्यपदेशात् " या न्यायानें घ्यावयाचा आहे. खरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, मानवी मनामध्यें काय अगर मानवी संस्कृतीमध्यें काय, ज्या घटकांचा उत्कर्ष झाला असेल त्या घटकांखेरीज इतर घटकांचा अभावच असतो असें नाहीं. अमुक मनुष्य बुद्धिवान् आहे, अमुक मनुष्य भावनावश आहे, याचा अर्थ त्याच्या ठिकाणीं मानवी मनाचे इतर घटक त्याच्या ठिकाणीं नाहींत असा

नव्हे. कारण बुद्धि, भावना व कर्तृत्व यांच्या शिवाय कोणतेंच मन अस्तित्वांत येऊं शकत नाहीं. संस्कृतीची अशीच गोष्ट आहे. रोमन् संस्कृति युद्धशास्त्रप्रधान, तर ग्रीक संस्कृति कलाप्रधान व याच्या उलट भारतीय संस्कृति तत्त्वविचारप्रधान; या म्हणण्याचा अर्थ इतकाच असतो कीं, त्या संस्कृतींच्या इतर सर्व मानवी घडामोडींवर एक प्रकारचा कायम छाप उमटलेला असतो. सध्यांच्या युरोपीय राष्ट्रांच्या बाबतींत सुद्धां इटालियन राष्ट्र कलोपजीवी, जर्मनी भौतिकशास्त्रोपजीवी, फ्रान्स भावनावश म्हणून फॅशनचा प्रवर्तक इत्यादि म्हणण्यामध्यें सुद्धां वरील वस्तुस्थिति गृहीत धरली पाहिजे. या दृष्टीनें विचार केला तर प्रत्येक मानवी संस्कृतीमध्यें शास्त्र, कला, धर्म व तत्त्वज्ञान यांचें प्रयोजन व अस्तित्व महत्त्वाचें आहे. विश्वामध्यें कोणतीहि संस्कृति अत्यंत पूर्णावस्थेस केव्हांच पोहोंचली नाहीं. कै. पुरातत्त्वभूषण विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं म्हटल्याप्रमाणें "सर्व मनुष्यसमाज कोणच्याहि एका काळीं रानटी स्थितींत होता असा इतिहासाला मुळीं काळच आढळून आलेला नाहीं. ... ... एखादा सुसंस्कृत मनुष्यसमाज पृथ्वीच्या पाठीवर कोठेंतरी सदोदित आहे व दुसरा कोणता तरी समाज त्या समाजाचा धागा धरून संस्कृतावस्थेंत येत आहे, अशी स्थिति अति प्राचीन कालापासून दृष्टीस पडते." जी गोष्ट समाजाची, राष्ट्राची अगर संस्कृतीची, तीच गोष्ट त्यांनीं संवर्धित केलेल्या शास्त्र व कला, धर्म व तत्त्वज्ञान वगैरे विषयांची होय. एकंदर विवेचनावरून अध्यात्म व कला यांचे परस्परसंबंध अत्यंत निकटचे आहेत हें उघड होईल.

अध्यात्मशास्त्राचा संबंध तर्कविचारांशीं आहे, त्याचप्रमाणें कलेचा संबंध सौंदर्यभावनांशीं आहे. यामुळें अध्यात्माचा मार्ग साहरा वाळवंटाप्रमाणें रखरखित, रूक्ष व तापदायक असा झाला असावा यांत नवल नाहीं. याच्या उलट कलेचा मार्ग कर्णमधुर कोकिलालापांनीं निनादित झालेल्या, चित्रविचित्र रंगांच्या पुष्पगुच्छांनीं व फलभारांनीं नटलेल्या उद्यानमार्गासारखा आहे. अध्यात्मशास्त्र हें कांहीं थोड्या सुसंस्कृत हृदयांवरच मोहिनी घालूं शकतें तर कलाविलास हा विश्वांतील केवळ मानवसृष्टीवरच नव्हे तर यच्चयावत् प्राणिसृष्टीवरही थोड्याबहुत प्रमाणांत प्रभाव गाजवूं शकतो. असें असलें

तरी तर्क व भावना यांना थोड्याबहुत प्रमाणांत परस्परांचें साहाय्य घेतल्याशिवाय कार्य करतां येत नाहीं. वर सांगितलेंच आहे कीं, शाश्वत सुखाचा आनंद प्राप्त करून घेणें हेंच अध्यात्मशास्त्राचें व कलेचें शेवटचें साध्य आहे, यांत कांहीं शंका नाहीं. परंतु बादरायणांनीं 'तर्काप्रतिष्ठानात्' या वेदांतसूत्रामध्यें म्हटल्याप्रमाणें किंवा उपनिषदांनीं 'नेषा तर्केण मतिरापनेया' या वचनांत बोध केल्याप्रमाणें केवळ तर्कविचार हा अध्यात्माचे बाबतींत वाळूचा पूल ठरणार यांत शंका नाहीं. भूतकालीं जरी प्रत्येक दिवशीं प्रभातकाळीं सूर्य नियमितपणें उगवलेला असला तरी उद्यां तो नियमानें सकाळीं उगवेलच हा सिद्धांत अनुभवाच्या पायावर अगर एक प्रकारच्या अंतःश्रद्धेवर अधिष्ठित केल्याशिवाय केवळ तर्कपद्धतीनें सिद्ध ठरत नाहीं. म्हणूनच 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः' या उपनिषदाच्या आज्ञेमध्यें श्रवण, मनन, निदिध्यासापूर्वी दर्शन म्हणजे साक्षात् अनुभव आवश्यक सांगितला आहे.

अध्यात्मशास्त्रामध्यें अशा कांहीं प्रणालिका आहेत कीं, त्यांमध्यें तत्त्वविचाराबरोबरच तत्समबल अशी भावना तिलाच एका विशिष्ट प्रकारें वळण लावलें असतां अतर्क्य, अतिभौतिक सुखाचा, सृष्टीच्या पलीकडे असलेल्या अनिर्वर्णनीय आनंदाचा अनुभव मानवी मनास घेतां येतो. श्रीसमर्थ, ज्ञानेश्वर, तुकाराम वगैरे भगवद्भक्तांनीं अनुभवलेला अशा प्रकारचा आनंद आपल्या अनेक वचनांमध्यें ग्रथित करून ठेवला आहे. सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ विल्यम जेम्स् यानें आपल्या सर्वमान्य अशा 'धार्मिक अनुभूतीचे प्रकार' (Varieties of Religious Experiences) या ग्रंथामध्यें अशा तऱ्हेच्या अतिभौतिक अनुभवांचें उत्तम संशोधन केलें आहे. अशा तऱ्हेचे गूढ अनुभव भारतवर्षामध्यें नव्हे तर पाश्चात्य राष्ट्रांमध्यें होऊन गेलेल्या अनेक नामांकित साधुपुरुषांस झाल्याचें स्पष्ट दिसतें. जगामध्यें लोकोत्तर प्रतिभेचे कवि, ग्रंथकार, धर्मप्रवर्तक, भौतिकशास्त्रज्ञ यांना अशा प्रकारच्या आनंदानुभूतीची प्रतीति अनेक प्रसंगीं झाल्याचे दाखले सांपडतात.

अध्यात्माचें अधिष्ठान तर्कशास्त्र, तसें कलेचें अधिष्ठान सौंदर्यशास्त्र. चित्र, शिल्प, संगीत, नृत्य, काव्य व नाट्य इत्यादि ललितकलांमधील सौंदर्या-

नुभूति मानवी मनांस कोणत्या नियमांनीं प्रतीत होते या सर्व नियमांचा विचार सौंदर्यशास्त्र करितें. तर्कशास्त्राप्रमाणेंच अगर नीतिशास्त्राप्रमाणेंच सौंदर्यशास्त्र हें ध्येयदर्शी (Normative) शास्त्र आहे. सौंदर्यशास्त्र हें जरी अगदीं अलीकडेच विकास पावलेलें असलें तरी या शास्त्रांतील आजचे बरे-चसे सिद्ध झालेले सिद्धांत भारतीय आर्यांनीं निरनिराळ्या ललितकलांवरील गीर्वाण वाङ्मयांत, विशेषतः अलंकारशास्त्रावरील ग्रंथांमध्यें अत्यंत सूक्ष्म तऱ्हेनें तर्करीत्या विवेचित केलेले दृष्टोत्पत्तीस येतात. हे सिद्धांत कितपत खरे आहेत, यासंबंधीं संशोधनाची जबाबदारी प्रायोगिक मानसशास्त्र (Experimental Psychology) या शाखेशीं परिचय करून घेतल्यावरच पार पाडणें शक्य होणार आहे.

या ठिकाणीं हें लक्षांत ठेवणें अत्यंत जरूरीचें आहे कीं, ललितकलांपैकीं काव्यकला हिची साधनसामग्री ‘ शब्द व अर्थ ’ हिजबद्दल प्राचीनांना ऊहापोह करणें जितकें साहित्यशास्त्रामध्यें सुलभ झालें, तितकें इतर कला म्हणजे चित्र, शिल्प, संगीत वगैरेंच्या बाबतींत सुकर झालें नाहीं, यालाहि कांहीं विशिष्ट कारणें आहेत.

कलेच्या साधनांमध्यें जितका ‘ विषयीभाव ’(Subjective aspect) कमी असेल त्या मानानें त्या साधनांच्या सौंदर्योत्पादक शक्तीची चर्चा करणें सोयीचें जातें. या दृष्टानें काव्य, नाट्य या कलांमध्यें विषयीभाव (Subjective aspect) व विषयभाव (Objective aspect) हे समसमान असल्यामुळें भारतीय प्राचीन अलंकारिकांना सौंदर्यभावना, त्यांचें वर्गीकरण, त्यांचीं कारणें वगैरेंची बव्हंशीं अर्वाचीन प्रायोगिक संशोधनास जुळणारी उपपत्ति म्हणजे नवरसविवेचन याबद्दल ऊहापोह करतां आला. इतर कलांच्या बाबतींत मात्र ही सौंदर्यासमीक्षा तितकीशी स्पष्ट नाहीं किंवा असली तरी ही प्रणालिका जिवंत राहिलेली दिसत नाहीं.

भारतीय गीर्वाणसाहित्यामध्यें संगीतावर भरतमुनी, शारंगदेव, व्यंकटमखि, अहोबल पंडित, रामचंद्र, सोमेश्वर, पुंडरीक, नारायण वगैरे पंडितप्रवरांच्या ग्रंथांमध्यें भारतीय संगीतांतील प्रमुख अशी रागकल्पना, तिचा विस्तार वगैरे बाबतींत पुष्कळच विवेचन आलें आहे. भिन्न भिन्न रागांतील स्वररचना

कशी असावी लागते, रागांचा व रसांचा संबंध काय, रागांचीं ध्यानें कशा प्रकारचीं असतात वगैरे बाबींचा या ग्रंथांमध्यें विस्तृत ऊहापोह आला आहे. परंतु ठिकठिकाणीं या विवेचनास एकांगीपणा आलेला असून सर्व बाबी प्रायोगिक संशोधनाच्या साहाय्यानें स्पष्ट करण्यांत आल्या पाहिजेत. रागरचनेचे मूलभूत सिद्धांत काय, निरनिराळ्या रागांचे ठिकाणीं आरोपित केलेली रसाविर्भावशक्ति कितपत कसोटीस उतरते वगैरे मुद्यांचें विवेचन प्रयोगांनींच सिद्ध झालें पाहिजे.

पौर्वात्य व पाश्चात्य संगीताचें वैशिष्ट्य काय, तंतुवाद्यें, विततवाद्यें, घनवाद्यें, सुषिरवाद्यें या चार प्रकारांचा विकास कसकसा झाला, प्रत्येक वाद्याचा संगीताच्या रसोत्पादनशक्तीस काय उपयोग होतो, सप्त स्वर व सूर्यकिरणांतील सप्त रंग यांचे परस्परसंबंध कशा प्रकारचे असावेत, कीर्तीचा रंग शुभ्र, प्रेमाचा रंग गुलाबी, शौर्याचा रंग जांभळा, वैराग्याचा रंग केसरी, हास्याचा रंग शुभ्र, दुष्कृत्याचा रंग काळा वगैरे जे लौकिक संकेत ( Popular conventions) आज अनेक शतकें प्रचलित आहेत त्यांचें रहस्य काय, तालाचा व लयाचा काय संबंध, शिक्षणशास्त्रदृष्ट्या संगीताचें काय महत्त्व आहे वगैरे मुद्द्यांची साग्र चर्चा मायर्स्, जेम्स् वगैरे प्रायोगिक सौंदर्यशास्त्रज्ञांनीं दाखविलेल्या संशोधनपद्धतीनें झाली पाहिजे.

चित्रशिल्पांच्या बाबतींत भारतीय विचारपरंपरा अत्यंत त्रुटित आहे. कालाच्या संहारक शक्तीस न जुमानतां आपल्या प्रौढ गांभीर्यानें सर्व जगाच्या आदरास पात्र झालेलीं अजंठा, वेरूळ वगैरे ठिकाणचीं कोरीव लेणीं, वर्णचित्रें आणि शिल्पकाम जरी आजतागायत पहावयास मिळत आहेत तरी हीं कामें करतांना प्राचीन कलाभिज्ञांनीं उपयोगांत आणलेली विचारपद्धति कांहीं शिल्पावरील ‘ मयमत ’ यासारख्या जुन्या ग्रंथामध्यें दृष्टोत्पत्तीस येते. विष्णुधर्मोत्तरपुराण या ग्रंथामध्यें चित्र, शिल्प संगीत यांबद्दलची कार्यपद्धति व बरेचसे सिद्धांत ग्रथित केलेले ओहत व या सिद्धांतांस अर्वाचीन संशोधनाची कसोटी लावून चित्रांमधून रसाविर्भावपद्धति कसकशी दृग्गोचर होते, हें पाहाण्यास व भारतवर्षामध्यें प्राचीन कालापासून ज्या ज्या भिन्न चित्रशिल्पांच्या बौद्ध, जैन, रजपूत व मोंगल वगैरे प्राचीन व बंगाली, महा-

राष्ट्रीय व द्राविडी वगैरे परंपरा निर्माण झाल्या आहेत त्यांचें वैशिष्ट्य काय यात्राहि साकल्यानें विचार करण्यास प्रायोगिक सौंदर्यशास्त्राची व उपकरणांची अत्यंत जरूरी आहे.

यांपैकीं बहुतेक संशोधनकार्यांची दिशा म्हणजे भिन्न भिन्न नादसमूह अथवा राग अगर चित्रक्रिया अगर शिल्पाचीं कामें निरनिराळ्या दर्जांच्या अगर संस्कृतींच्या मनुष्यांपुढें ठेवून ते ते रसाविर्भाव कितपत होतात व कां होतात, याची अनुगमपद्धतीनें ( Inductive method ) कार्यकारणपरंपरा शोधून काढणें हें बरेंच कौशल्याचें संशोधन आहे. मायर्स् वगैरे संशोधकांनीं मानवी शरीरावर निरनिराळ्या नादांच्या अगर रंगांच्या समूहांपासून उत्पन्न होणाऱ्या भावनांचें माप घेणारीं यांत्रिक उपकरणें शोधून काढलीं आहेत. ह्या किंवा अशा प्रकारच्या उपकरणांचा उपयोग निरनिराळ्या सौंदर्यभावनांचें पृथक्करण करून त्यावरून प्राचीन ग्रंथांमध्यें दिलेले सिद्धांत व हे नवीन प्रयोगांनीं ठरविलेले सिद्धांत, यांमध्यें कितपत साम्य अगर वैषम्य दृष्टोत्पत्तीस येतें वगैरे गोष्टी सूक्ष्मपणें पाहिल्या पाहिजेत.

भिन्नभिन्न कलांचें विशिष्ट शिक्षण देणाऱ्या अशा अनेक संस्था, समाज, मंडळें हीं पुणें, मुंबई, कलकत्ता, मद्रास वगैरे ठिकाणीं कार्य करीतच आहेत. परंतु चित्र, शिल्प, संगीत काव्य, नाट्य वगैरे कलांचा प्रायोगिक मानसशास्त्रदृष्ट्या अभ्यास करून प्राचीन ग्रंथांमधील संशोधनाची व अर्वाचीन प्रयोगांची सांगड घालून एकंदर संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक अशा ज्या ललितकला यांचा पुनरुद्धार करणें अत्यंत जरुरीचें झालें आहे.

अशा तऱ्हेची " **भारतीय ललितकला–मानसशास्त्र संशोधन मंदिर** Academy of Indian Fine Arts & Psychology " या नांवाची संस्था निर्माण करून तिच्या द्वारां वरील प्रकारचें संशोधनकार्य करण्याची प्रस्तुत लेखकाची योजना पूर्ण झाली असून, लोणावळें मुक्कामीं अल्प प्रमाणावर संशोधनकार्यास सुरुवात करावयाची आहे व पुढील कार्याची मदार परमेश्वरी कृपा व भारतीय जनतेचें साहाय्य यांजवरच अवलंबून आहे. धर्म, पंथ, जात, प्रांत, स्त्री, पुरुष, लहान, थोर वगैरे भेद ललितकलेच्या प्रांतांत उपेक्षणीय आहेत. प्राचीन कालामध्येंहि हिंदु, मुसलमान, शीख वगैरे भिन्नभिन्न जातीं-

मध्यें अनेक कलावंत निर्माण झाले व त्यांनीं परस्परांमध्यें देवाणघेवाण करून अनेक कलासंप्रदाय व कलाप्रकार निर्माण केले, ही गोष्ट आपणांस विसरतां कामा नये. खेदाची गोष्ट ही कीं, या कलासंप्रदायास आधारभूत असलेले सौंदर्यशास्त्रीय सिद्धान्त मात्र आज तागायत अज्ञात आहेत. ही तुटलेली परंपरा व ज्ञानप्रणाली पुन्हा सांधून ललितकलांमध्यें नवचैतन्य निर्माण करून, राष्ट्रीय प्रगतीस हातभार लावून, भारतीय संस्कृतीचें चिरंतनत्व वाढविणें हें कोणा भारतीयाचें कर्तव्य नाहीं ?

अशा तऱ्हेनें अध्यात्मशास्त्र व ललितकला यांचे संबंध किती जिव्हाळ्याचे आहेत, यासंबंधींचा उलगडा झालाच आहे. फार काय पण अध्यात्माच्या रूक्ष व तर्ककर्कश प्रांतांतहि ललितकलेच्या रम्य लावण्यानें आकर्षकत्व निर्माण केलें आहे. मूर्तिपूजा ही कोणाहि धर्मांस अगर संप्रदायास त्याज्य वाटो, फार कशाला ज्या बौद्ध धर्मानें प्रथम प्रथम मूर्तिपूजेचा तिरस्कार केला त्याच्याच अनुयायांनीं भारतवर्षामध्यें शिल्पाचे व चित्रकलेचे अत्यंत उत्कृष्ट नमुने अशीं आपलीं कलास्मारकें जागजागीं निर्माण करून ठेवलीं आहेत. मूर्तिभंजक अशा मुसलमानी राज्यकर्त्यांकडूनच ताजमहाल निर्माण केला गेला. भक्तिप्रधान अशा तत्त्वपरंपरेमध्यें संगीतास किती महत्त्व आहे, हें मध्ययुगांतील अनेक भागवतधर्मीय साधुपुरुषांनीं सोदाहरण सिद्ध करून दाखविलें आहे. " **वीणावादनतत्त्वज्ञः श्रुतिशास्त्रविशारदः। तालज्ञश्चाप्रयासेन मोक्षमार्गं प्रयच्छति॥**" या दण्डकाप्रमाणें भारतीयांचें प्रत्येक शास्त्र व कला यांचा संबंध अध्यात्माशीं निगडित केलेला आहे. नीरसांतलें नीरस असें व्याकरणशास्त्र तें असें म्हणतें कीं, "**एकः शब्दः सम्यग्ज्ञातः सम्यक् प्रयुक्तः स्वर्गे लोके च कामधुग्भवति**" एकच शब्द चांगल्या तऱ्हेनें कळलेला व चांगल्या रीतीनें प्रयोग केला गेलेला स्वर्गामध्यें व इहलोकामध्यें मनोरथपूरक होतो. योगामध्यें ज्या तऱ्हेनें समाधि नांवाची अवस्था प्राप्त होते, तशाच तऱ्हेची अवस्था संगीतानें प्राप्त होते, ही गोष्ट मानसशास्त्राच्या सिद्धांतानुरूप शक्य आहे. वरील ललितकलांचें ध्येय म्हणजे सौंदर्यभावनांच्या द्वारें "**रसो वै सः। रसं ह्येवायं लब्ध्वाऽऽनंदीभवति**" या वचनानुसार रसब्रह्माचा साक्षात्कार करून घेणें होय. या रसब्रह्माचें स्वरूप व ज्ञानानें

मिळणाऱ्या मोक्षाचें अगर कैवल्याचें स्वरूप यांत फरक मानलेला नाहीं. कारण सत्, चित् व आनंद म्हणजे अस्तित्व, चैतन्य व आनंद हे ब्रह्माचेच घटक होत. संगीतामधील नादब्रह्मसुद्धां या ब्रह्माचेंच स्वरूप होय. एका गायनशास्त्रज्ञानें म्हटल्याप्रमाणें—

नादसागर है अपार। किनहू न पायो पार।
सरसती आजहूं डरत। करत तूंब के आधार॥

हा नादसमुद्र अफाट आहे व कोणीहि याच्या पैलतीरावर जाऊं शकत नाहीं. इतकेंच काय पण प्रत्यक्ष सरस्वती अद्याप ह्या नादसमुद्रास भीत असून तिनें आपण बुडूं नये म्हणून भोपळ्याचा आधार घेतला आहे, म्हणजे हातांमध्यें वीणा धारण केला आहे. ही नादब्रह्माची कल्पना सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञानांतील 'गोलीय संगीत' ( Music of Spheres ) या कल्पनेशीं किती जुळती आहे व मानवी मन कितीहि भिन्न परिस्थितीमध्यें असलें तरी सारख्या कल्पना कशा निर्माण करतें ही गोष्ट संशोधित करणें मनोरंजक आहे. ग्रीक लोकांच्या शिक्षणक्रमामध्यें संगीतादि ललितकलांना फारच महत्त्व होतें. कारण मानवी मनाच्या सुप्त भावनांना योग्य व इष्ट वळण लावण्याचें कार्य बव्हंशीं ललितकला-शिक्षणावरच आहे. केवळ बुद्ध्युपजीवि शिक्षणक्रमानें राष्ट्र कसें एकांगी बनतें याचें आपलें भारतवर्ष हें एक उत्तम उदाहरण आहे. या नादब्रह्माचें अगर रसब्रह्माचें सुख लुटणें हेंच मानवी जीवनाचें सार होय.

एका गायकानें केलेल्या खालील नादब्रह्मवर्णनानें लेखसमाप्ति करून हा लेख आम्ही येथें संपवितों. हें नादब्रह्म सप्तस्वरांचें बनलें असून त्यालाच 'आद्य अनहतनाद' अशीहि संज्ञा दिलेली आहे ती पुढीलप्रमाणें—

आद अनहत नाद उपजो जगतमें।
ताको करूं ध्यान पाक मनघटमें॥ ध्रु०॥
षड्ज रिषभ, गंधार, सप्तसुर आहत।
मिलाय निर्गुण ब्रह्म। व्यापक जगतमें॥ १॥

---

# आजचें आरोग्य

लेखक: पुरुषोत्तम पांडुरंग भडकमकर, एम्. एस्सी. ( केंब्रिज ), भोर.

[ हे सन १९०६ सालीं रसायनशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां न्यू यॉर्कला गेले. तेथें सन १९०६ ते १९११ पर्यंत कोलंबिया विद्यालयांत 'फुड अॅन्ड इन्डास्ट्रियल केमिस्ट्री' या विषयाचें सांगोपांग व प्रत्यक्ष अध्ययन केलें. सन १९१५ सालीं अमेरिकेंतून ते इंग्लंडमध्यें राहण्यास गेले. त्या अवधींत ते केंब्रिज युनिव्हर्सिटीचे एम्. एस्सी. झाले. कांहीं दिवस रंग व औषधें यांचा व्यापार केल्यावर मॅन्चेस्टरला 'पीस् गुडस्चा' धंदा सुरू केला. पुढें १९३१ सालीं ते हिंदुस्थानांत परत आले. तेव्हांपासून ते भोर संस्थानांत प्रायव्हेट सेक्रेटरीचें काम पहात असतात. ]

विसाव्या शतकांतील मानवी जीवित म्हणजे एक अजब चीज आहे. मानवी संस्कृतीच्या इतिहासाचीं पानें आजच्या शतकांतील मानवी सुधारणांनीं जितकीं व्यापून टाकलीं आहेत तितकीं तीं पूर्वीं केव्हांहि व्यापिलीं गेलीं नव्हतीं. ज्या ज्या लोकांना आधुनिक यंत्रसामग्री आणि जमिनींच्या वाढत्या किंमती यांपासून फायदा मिळवितां येणें शक्य होतें, त्यांनीं त्यांनीं आजच्या शतकांत अगणित पैसा कमाविला असून ते आज कुबेर होऊन बसले आहेत. अर्थात् त्या द्रव्यसाह्यामुळें त्या त्या लोकांना आधुनिक सुखसोयींच्या साधनांच्या साह्यानें या मर्त्य लोकावर नंदनवन प्रत्यक्ष आणून ठेवतां आलें आहे. तसेंच जगांतील बहुतेक सर्व संपत्ति मोठमोठ्या राष्ट्रांतून फारच मोठ्या प्रमाणांत सांचली गेली आहे. तात्पर्य काय कीं, आजच्या काळांत मानवी समाजाची कितीतरी प्रगति झालेली आहे. परंतु जर कोणी या प्रगतीच्या सर्व अंगांचें बारकाईनें निरीक्षण करूं लागेल तर त्याला कळून चुकेल कीं, ज्या प्रगतीबद्दल आज सुधारकी जगांत फुशारक्या मारल्या जात आहेत, ती प्रगति अनेक दृष्टींनीं केवळ एकांगीण असून दारिद्र्य आणि अनेक प्रकारचे भयंकर रोग यांचा थैमान मानवी समाजावर अद्यापहि चालूच आहे. सारांश, विसावें शतक म्हणजे सृष्टिक्रमाच्या दोन विरुद्ध टोकांचें समीकरणच होय. अर्थात् ही विषमता समाजाच्या प्रगतीस केव्हांहि

विघातकच होणारी असून ती नाहींशी करण्याचे मार्ग अवलंबिल्याशिवाय आजची वरकरणी भासणारी सुधारकी प्रगति केव्हांहि चिरस्थाई होणार नाहीं. प्रस्तुत लेखांत वरील दोन गोष्टींपैकीं ' रोगराई ' व ती दूर करण्याचीं तात्कालिक साधनें यांचाच थोडाबहुत विचार करावयाचा आहे.

आरोग्यशास्त्राच्या अभ्यासकांना एक गोष्ट मान्य करावी लागेल कीं, अमेरिका किंवा युरोपखंडांतील प्रमुख देश यांतील ' रोगराईचें ' मूळचें कारण त्यांच्या रोजच्या अन्नांत आहे. आतां आजच्या काळांत अन्नाचें प्रमाण जरी वाढतें असलें तरी देखील त्याची प्रत मात्र रोज कमी कमीच होत जात असते. कारण, आधुनिक यांत्रिक क्रियेमुळें त्या अन्नांतील कांहीं महत्त्वाचीं द्रव्यें नाहींशीं होतात, इतकेंच नव्हे तर कित्येक वेळां त्या अन्नांत दुसरीं भिन्नजातीय द्रव्यें किंवा विखारी पदार्थहि मिसळले जात असतात.

याचप्रमाणें आरोग्यसंवर्धक व शरीरपोषक अशा तऱ्हेचीं खनिज द्रव्यें धान्य दळून त्याचें पांढरें स्वच्छ पीठ करण्याचे कृतींत अगर दुपेटा साखर वगैरे सारख्या पदार्थांतून आजच्या दिखाऊपणाच्या मोहानें बहुतांशीं नाहींशीं होत असतात. यामुळें अर्थातच चमचमीत गणल्या जाणाऱ्या भोजनांत आपणांस अगदीं निस्सत्त्व असेंच अन्न मिळतें. खाण्याच्या पदार्थांतील अंगभूत क्षार वस्तुतः मानवी शरीररचनेच्या पायाचे मुख्य चिरे असून आजच्या पाकसिद्धीच्या अनिष्ट रीतीमुळें हीं क्षार द्रव्यें त्या त्या पदार्थांतून पार काढून टाकिलीं असतात. आतां या क्षारांच्या बदला दुसरे कृत्रिम क्षार उपयोगांत आणणें केवळ आत्मघातकीपणाचेंच होतें. कारण, पहिल्या प्रकारच्या नैसर्गिक क्षारांची आपल्या अन्नांतील उणीव आस्ते आस्ते आपल्या शरीरास कमकुवत बनवीत असून कांहीं कालांतरानें त्याच उणीवेमुळें अनेक तऱ्हेच्या भयंकर रोगांस मानवी शरीरांत जागा मिळूं लागते व शेवटीं हें आपलें शरीर कायमचें कुचकामी बनत असतें.

वर नमूद केलेल्या गोष्टींवरून कोणासहि कळून चुकेल कीं, आज दिसून येणाऱ्या बहुतेक रोगांची उपपत्ती आपल्या रोजच्या अन्नांतील निस्सत्त्वपणाशीं खात्रीनें जोडून देतां येईल. यावरून आपणांस उघडउघड असें म्हणतां येईल कीं, प्रचलित रोगांच्यापैकीं किमानपक्ष शेंकडा नव्वद रोगांचें

उत्पत्तिस्थान आपलें अप्रमाणशीर व सदोष अन्नच आहे; असें असून आज शरीरसंवर्धनाच्या आणि रोगांवरील उपचारांच्या बाबतींत वैद्यकशास्त्रदृष्ट्या आपल्या अन्नाबाबत जितकें विचारपूर्वक संशोधन व्हावयास पाहिजे तितकें तें अद्यापहि होत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट नव्हे काय ?

आतां वर लिहिल्याप्रमाणें सदोष अन्नाचा होणारा अनिष्ट परिणाम आपणांस एकदम व तात्कालच दिसून येतो असें नाहीं. बहुतेक ठिकाणीं त्या अन्नामुळें मनुष्याच्या हातून आरोग्यरक्षणाच्या बाबतींत स्वभावतःच अगदीं लहानसहान चुका घडूं लागतात. या चुका आरंभीं इतक्या क्षुल्लक भासतात कीं, कोणीहि मनुष्य त्यांकडे ताबडतोब लक्ष न पुरवितां बहुतेक प्रसंगीं तो तिकडे दुर्लक्षच करीत असतो; परंतु, त्या कारणामुळें त्याला शेवटीं त्याच चुकांचा विनाशी परिणाम भोगावा लागतो. उदाहरणार्थ, मूत्राशयाचे विकार( Kidney troubles ). अशा प्रकारचे विकार इतके हळुहळू उत्पन्न होत असतात कीं, कित्येक वर्षेंपर्यंत या विकारांची वाढ, मनुष्यास कोणत्याहि प्रकारचा त्रास न होतां, होत असते. त्या वाढीकडे त्याचें मुळींच लक्ष नसतें. परंतु, शेवटीं तोच विकार इतका विकोपास जातो कीं, त्यांतून मनुष्य साफ बरा होणें अगदीं दुरापास्त होऊन बसतें; आणि या वेळपर्यंत जी गोष्ट मनुष्याच्या ध्यानींमनींहि नसते तिकडे त्याचें लक्ष स्वाभाविकपणेंच वेधतें. पण अशा वेळीं त्याचा उपयोग काय होणार? अशा प्रकारें मनुष्याच्या आरोग्याची खराबी करणारीं कारणें एखादे प्रसंगीं मनुष्याकडून घडणाऱ्या असामान्य गोष्टीपेक्षां विशेषतः तीं कमीजास्त प्रमाणानें मनुष्याच्या प्रकृतीवर सतत परंतु, त्याच्या नकळत घडणाऱ्या क्रमागत गोष्टींत सामावलेलीं असतात. अर्थात् आजकाल आपल्याला जिकडे तिकडे खराब अन्नाचेच परिणाम भोगावे लागत आहेत. हे परिणाम विशेषतः सर्व वयांच्या लहान मुलांत ठळकपणानें दिसून येणारे आहेत. ही गोष्ट, लहान मुलांचीं काटक्यासारखीं दिसणारीं हाडें, खराब झालेले दांत, नादुरुस्त कोठा, अवरोध वगैरे सारखे कोठ्याचे विकार आणि त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या दुसऱ्या इतर शारीरिक व्याधी व त्यांमुळें भोगावे लागणारे दुष्परिणाम यांवरून केव्हांहि सिद्ध होणारी आहे.

मनुष्याचें शारीरिक व मानसिक स्वास्थ बहुतांशीं मनुष्याच्या रक्तांत असणाऱ्या क्षारांच्या कमीजास्त प्रमाणावर अवलंबून असतें. त्याचप्रमाणें मनुष्याच्या बहुतेक व्याधींचें निदान आमदोषावर अवलंबून असतें. तसेंच आपणांपैकीं फारच थोड्या लोकांस माहित असतें कीं, शरीरांतील मलमूत्रादि गोष्टींचें योग्य उत्सर्जन होऊं देणें हीच गोष्ट अन्नांच्या बाबतींत प्राधान्येंकरून विचारांत घ्यावयास पाहिजे. आतां नैसर्गिक गुण काढून टाकलेलें अन्न ज्याप्रमाणें कुचकामी ठरून मनुष्यास उपोषण घडवितें, त्याचप्रमाणें शरीरांतील त्याज्य गोष्टींचें उत्सर्जन न झाल्यास त्यामुळें शरीरांत अनेक विखारी वायु व द्रव्यें निर्माण होत असतात. यांवरून एक गोष्ट सिद्ध होते कीं, मनुष्याचा मृत्यु अन्नाच्या अभावामुळें होणाऱ्या उपासमारीपेक्षां मलमूत्रादिकांचें योग्य विसर्जन न झाल्यामुळेंच अधिक लवकर ओढवतो.

आतां अकालीं घडणाऱ्या बहुतेक मृत्यूंचे बाबतींत असें आढळून येईल कीं, आमदोष वाढविणाऱ्या अन्नाचें अप्रमाणशीर भक्षण केल्यामुळें उत्पन्न झालेल्या विषारी द्रव्यांचें आणि मलमूत्रादींचें विसर्जन योग्य प्रकारें न झाल्यामुळेंच हे मृत्यु घडून येतात. तेव्हां, ताजीं फळें आणि भाजीपाला यांच्या रूपानें मनुष्यानें जर भरपूर क्षारद्रव्यांचा पुरवठा आपल्या शरीरांत रोजच्यारोज केला तर योग्य प्रकारें शरीरसंवर्धन होऊन, शरीरांतील उत्सर्जन व अंतःशोषणादि क्रिया योग्य प्रकारें घडूं लागतील; व त्यामुळें अगदीं उतार वयांत देखील मनुष्य उत्साहपूर्ण राहूं शकेल. यामुळें आजच्या काळांत पन्नाशीच्या आंतच कुचकामी बनणारें शरीर त्यापेक्षां कितीतरी कालपर्यंत भर तारुण्यांतील उत्साह आणि जोम राखूं शकेल. परंतु त्याकरतां त्यानें नैसर्गिक राहणीवर ज्यास्त भर दिला पाहिजे. त्याचप्रमाणें निसर्गनिर्मित अन्नांचें अगदीं अल्प प्रमाणांत केलेलें सेवन ही गोष्टहि या बाबतींत अगदीं जरूरीची आहे. अर्थात् ज्यांना आपलें तारुण्य कायम राखण्याची इच्छा असेल त्यांनीं आरोग्य आणि व्याधि यांना पोषक अशा प्रकारच्या गोष्टी लागतात, याची अभ्यासपूर्वक पाहणी केली पाहिजे. कारण, योग्य प्रकारच्या आहारविहारादिमुळें मनुष्य आपलें आरोग्य योग्य प्रकारें सांभाळून शंभर वर्षांचें शतायुष्यहि खात्रीनें उपभोगूं शकेल; आणि असें झालें म्हणजे चाळीशी किंवा पन्नाशी म्हणजे

मनुष्याची ऐन उमेद ठरूं शकेल व त्यामुळें आज निरुपयोगी वाटणारा आयुष्याचा काल अगदीं सुखावह व कर्तबगारीपूर्ण असाच वाटूं लागेल.

वरील विधानांच्या बळकटीसाठीं इटालियन सद्‌गृहस्थ लुई कार्नेशे यांचें साधेंच परंतु, बहुमोल वाक्य पुरेसें आहे. ते म्हणतात ‘ ज्याला पुष्कळ खाण्याची इच्छा असेल त्यानें थोडें खाल्लें पाहिजे.’ त्यांच्या या वाक्याचा मतितार्थ असा कीं, अल्पाहार मनुष्याचें आयुष्य वाढवतो, आणि दीर्घकाळ जगल्यामुळें मनुष्याला पुष्कळच अन्न खातां येतें. हे गृहस्थ वास्तविक आपल्या वयाच्या चाळिसाव्या वर्षींच प्रकृती नादुरुस्त होऊन कोणत्याहि व्यवहारास कुचकामी बनले होते. परंतु नियमित आहार व आचरण यांमुळें ते एकशेंचार वर्षेंपर्यंत जगूं शकले; व अशा तऱ्हेनें त्यांनीं आपलें विधान आपल्या प्रत्यक्ष कृतीनेंच सत्य करून दाखविलें. यावरून त्यांचें उदाहरण स्पृहणीय नाहीं असें कोण म्हणेल!

सारांश, ज्या ज्या महात्म्यांनीं आपलें आयुष्य आपल्या देशाच्या आरोग्य-रक्षणास वाहिलेलें आहे त्या त्या थोर विभूतींच्या विचारकक्षेंत प्रामुख्यानें शिरणारा यापेक्षां अधिक महत्त्वाचा दुसरा विषय असणें संभवत नाहीं. माझ्या मतें या बाबतींत समाजधुरीणांवर पुढील तीन कर्तव्यें अवलंबून आहेत आणि तीं पूर्णपणें पार पाडणें अपरिहार्य आहे. तीं येणेंप्रमाणें:-प्रथमतः सर्व-साधारण जनतेस त्यांनीं कोणतें अन्न सेवन करावें व तें कां करावें हें नीट समजावून देणें. दुसरें, निसर्गदत्त अन्नांचा पुरवठा वाढवून तीं योग्य प्रकारें विभागलीं कशीं जातील या दृष्टीनें शास्त्रीय संशोधनाचा उपयोग करून घेणें आणि शेवटीं तिसरें आणि सर्वांत महत्त्वाचें कर्तव्य म्हटलें म्हणजे सतत व मोठ्या जोमानें शास्त्रीय संशोधनाचें क्षेत्र वाढवीत जाऊन ज्ञानाच्या पूर्णत्वास पोहोंचण्याचा प्रयत्न करणें. हींच मनुष्याचीं कर्तव्यें असून उपर्युक्त अन्नाची वाढ हीच केव्हांहि त्या अन्नाच्या अभावीं उत्पन्न होणाऱ्या व्याधींच्या निवा-रणार्थ प्रस्थापित झालेल्या संस्थांपेक्षां ज्यास्त महत्त्वाची गोष्ट आहे हें लक्षांत ठेवावें.

---

# सरदार वीररत्न बाजी प्रभु देशपांडे व त्यांचे वंशज

लेखकः कै. सच्चिदानंद रघुनाथ चित्रे, भोर.

[ यांचा जन्म तारीख २० जून १८८० रोजीं भोर मुक्कामीं झाला. मुरुड-जंजिरा हायस्कुलांतून प्रवेशपरीक्षा पास झाल्यानंतर भोर हायस्कुलांत त्यांची शिक्षक म्हणून नेमणूक झाली. त्यांचा ऐतिहासिक संशोधनाचा व्यासंग चालू होता व त्यासंबंधीं त्यांचे लेख 'महाराष्ट्र-साहित्य' व 'ज्ञानप्रकाश' यांत प्रसिद्ध आहेत. सार्वजनिक कामांत ते अत्यंत उत्साहानें पुढाकार घेत असत. मृत्यूचे अगोदर चारपांच वर्षे त्यांना अंधत्व प्राप्त झालें होतें. ते ता. ३० ऑगष्ट १९२७ रोजीं ४७ व्या वर्षीं दिवंगत झाले. ]

सरदार बाजी प्रभु देशपांडे व त्यांचे वंशज यांविषयींची महत्त्वाची ऐतिहासिक माहिती आजपर्यंत फारशी कोठें उपलब्ध नाहीं. त्यांच्या वंशजांकडून आम्हांस जे कागदपत्र उपलब्ध झाले त्यांवरून बरीच माहिती मिळाली, ती एकत्र करून खालील लेखांत संकलित रूपानें देण्याचें आम्हीं योजलें आहे. यांतील बराचसा मजकूर नवीनच आहे हें सांगणें नकोच.

वीररत्न बाजी प्रभूचा जो वंशवेल उपलब्ध झाला आहे, त्यावरून पहातां बाजीचा पणजा 'वैज्य' प्रभू होय. या पुरुषापासूनच पुढील माहिती मिळते.

वैज्य प्रभूस पुत्र एक 'पिलाजी' व पिलाजीस पुत्र दोन बाळाजी व कृष्णाजी. बाळाजी व कृष्णाजी विभक्त झाले व बाळाजीचे वंशज हल्लीं मौजे दापकेघर, देवघर, म्हसर या ठिकाणीं असून देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण करीत आहेत. वरील तीन गांवें हिरडस-मावळांत आहेत. आतां कृष्णाजीस चार पुत्र होते. पहिले बालोजी, दुसरे अनाजी, तिसरे फुलाजी व चवथे आपले नरवीर बाजी कृष्ण.

पिलाजींचें म्हणजे बाजी प्रभूच्या आजाचें राहणें सिंद येथें होतें. हें कसब्याचें गांव असून भोर शहरापासून तीन मैलांवर आहे. पूर्वीच्या घराची सिंद येथील जागा प्रस्तुतच्या लेखकानें पाहिली आहे. घराचें जोतें चिरेबंदी असावें असें दिसतें. हल्लीं तेथील दगड लोकांनीं काढलेले असून, खूण मात्र

राहिली आहे. यांचें उपनांव प्रधान व गोत्र भार्गव असून ही सर्व मंडळी देशपांडे या नांवानें अद्यापि प्रसिद्ध आहेत. पिलाजीचे वेळीं हें कुटुंब एकत्र असून सिंदासत्र राहत असावें. यांचेकडे त्याच वेळीं हिरडस-मावळचें गांव-कुळकर्ण व देशकुळकर्ण असलें पाहिजे. यांच्या जुन्या दप्तरांत जे लेख उपलब्ध झाले आहेत त्यांपैकीं कांहीं शके १२१६ चे आहेत व त्यांतील भाषा फारशी दिसते. कांहीं नकला आहेत. त्यांत विजापूरशाहीचे व निजामशाहीचे लेख आहेत. शिवेचे तंटे आहेत. जेधे, खोपडे व बांदल देशमुखांचीं नांवें आहेत—जेधे तर्फ रोहिडखोरें, खोपडे तर्फ उत्रोली, बांदल तर्फ हिरडस-मावळ. कांहीं देशमुखांचीं नांवें अढळराऊ, ढोर, पासलकर, पुण्याचे सितोळे, शिरवळचे निगडे अशीं आहेत. शके १२१६ सालांत चांदजी नाईक बांदल देशमूख तर्फ हिरडस-मावळ यांचा उल्लेख असून सिंद व गोवडी या गांवांचा उल्लेख आहे. यावरून पहातां सुमारें सव्वासहाशें वर्षांपूर्वींपासून म्हणजे श्रीज्ञानेश्वराचे कालांत बाजी प्रभूचे वंशज इकडे आले असावेत. शके १५६० सालीं जो महजर झाला आहे, तो स्वतः बालाजी पिलाजीनें लिहिला आहे व त्यांत बालप्रभू देशपांडे ता० हिरडस-मावळ असें लिहिलें आहे. पिलाजी यांस कृष्णाजी बांदलानें ठार मारलें. राजवाडे यांस उत्तरादाखल शके १२१६ व शके १५६० चे दोन जुने लेख पुरेसे होतील. इ. स. १६१८ ते १६२९ पर्यंतचे मुसलमानी अमदानींतील कागद बरेच आहेत. ( खंड १५, पान ३९२, लेखांक ३६३, राजवाडे यांचा पहा.) त्यांत बाजी प्रभू पूर्वींपासून मुत्सद्दी होता किंवा नाहीं हें स्पष्ट कळून येण्यासारखें आहे. त्यांत कृष्णाजी बांदलानें बाजी प्रभूस घोडा बसावयास दिला. काम फत्ते झालें. बाजी प्रभूची पाठ थोपटून त्यास पोटाशीं धरलें व म्हणाले ‘बाजी प्रभू तुम्ही शर्थ केली ’ असा उल्लेख आहे.

कृष्णाजी नाईक बांदल हा फार पुंड होता. बाजी प्रभूचे आजे पिलाजी व बंधू अनाजी यांस कृष्णाजीनें ठार मारिलें. बाजी प्रभूचे वडील कृष्णाजी पिलाजी यांस मारून जखमी केलें. खुद्द बाजीस त्रेचाळीस जखमा केल्या. परंतु त्यांतून ते वाचले. यावरून पहातां बाजी प्रभू इतक्या जखमा झाल्या असतांहि लढणारे होते हें सिद्ध होतें. शिवाजी महाराज पुण्यास असतां तेथें

एक काजी अबदूल हकीमानें महजर केला. त्यांत बाजी प्रभू व फुलाजी प्रभू देश कुळकर्णी ता० हिरडस-मावळ असा उल्लेख आहे. बाजी प्रभूचे वाडवडील निजामशाहींत व मलिकंबराचे कारकीर्दीत इनामदार होते. गांवगन्ना इनामती होत्या. टिपणीसीचा अधिकार होता. सारांश, श्रीछत्रपतीच्या महाराष्ट्रांत स्वराज्यस्थापनेच्या पूर्वापार चां. का. प्रभू मावळ प्रांतांत वतनदार होते, हें अगदीं पुराव्यावरून सिद्ध होतें. त्यावरून चां. का. प्रभूंच्या शके १५५० च्या पूर्वीच्या इतिहासाच्या अंधकार जो राजवाडे यांस भासत आहे, तो जाऊन प्रकाश दिसूं लागेल, अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे. हा सर्व पुरावा दस्तऐवजीं अस्सल आहे.

वीर बाजी प्रभू हा रोहिडा किल्ल्यावर शिवछत्रपतीविरुद्ध बांदलच्या बतीनें लढण्यास प्रवृत्त झाला असें जें प्रसिद्ध झालें आहे तें आम्हांस खरें वाटत नाहीं. जो पुरावा आम्हांस मिळाला आहे त्यांत श्रीशिवाजीनें प्रथम बारा मावळें काबीज केलीं. कोंडाणा, राजगड व तोरणा हस्तगत केले, त्याच वेळीं मावळप्रांताचे देशमुखदेशपांडे शिवप्रभूस मिळाले. कारण शिवाजीनें जेव्हां बारा मावळें काबीज केलीं तेव्हां दलपतराव नांवाचा सरदेशमुख मावळ प्रांतांत होता. त्यानें विजापूरचे बादशहाजवळ जाऊन मावळप्रांत शिवाजीनें काबीज केला व किल्ले घेतले अशी तक्रार केली. यावरून विजापूरच्या बादशहास फार राग आला व दलपतरावास नामजाद हक देऊन शिवाजीवर स्वारी करण्यास हुकूम केला. त्या दलपतरावानें मावळप्रांतांत येऊन शिवाजीवर छापा घातला. पण त्या वेळीं मावळचे देशमुख बांदल पालसकर व प्रभू ज्ञातीचे देशपांडे महाराजांजवळ होते. त्यांनीं तो हल्ला उलटविला व दलपतराव पळून गेला. शिवाजीमहाराजांनीं त्यावर पाळत ठेवून त्यास पकडलें व ठार मारण्याची आज्ञा केली. पण त्याची साध्वी स्त्री महाराजांस शरण गेली. महाराज शिवप्रभू फार दयाळू अंतःकरणाचे असल्यानें त्यांनीं ठार मारण्याचा हुकूम रद्द करून त्याचे पाय तोडले. ही हकीगत जेव्हां शहाजीराजे विजापुरीं गेले आणि शिवाजीराजे व मातुश्री जिजाबाईसाहेब हीं पुण्यास राहिलीं त्यानंतर झाली. शिवाजीमहाराजांनीं प्रथम मावळ भागचे देशमूखदेशपांडे आपले जवळ करून चाकरीस ठेविले. त्यांत बांदल हिरडस-मावळचे

अधिकारी व बाजीप्रभूचे वाडवडील देशपांडे असावेत. बांदल जरी पुंड होता तरी तो शिवप्रभूला प्रथम अनुकूल झाला. शिवाजीनें रायगड काबीज करण्यापूर्वी त्यावर कोळी राज्य करीत होता व त्याचेजवळ तीन लाख कोळी जमाव असे, असा साधार जुना कागद सांपडला आहे. या कोळी राजाचा एक जमादार होता. त्यास मावळप्रांतांतील कांहीं खोऱ्यांचा मोकासा अंमल होता. त्याची वहिवाट दलपतराव पहात असे. तेव्हां पासलकरानें त्याचा पराभव केला. हकीमाचे सभेंत जे देशपांडे आहेत, ते सारे चां. का. प्रभू असून निजामशाही, अदिलशाही, कुतुबशाही वगैरे राज्यांपासूनचे वतनदार आहेत.

बाजीप्रभूच्या पुत्राचें पत्र वाचलें असतां असें कळून येतें कीं, कृष्णाजी बांदल देशमूख हा दादोजी कोंडदेवांशीं गैरकावा झाला व पुंडावे करूं लागला. बाजीप्रभूचे वतनास त्रास देऊं लागला. त्यास दादोजी कोंडदेवानें अखेरीस पकडून कैद केलें. शिवाजीनें प्रथम सर्व वतनदारांचीं वतनें अनामत केलीं. तेव्हां बाजीप्रभूनें वतनें चालविण्याविषयीं विनंति श्रीशिवरायांसमक्ष केली. महाराजांनीं सांगितलें कीं, सध्यां आपलें कार्य चालू आहे तें सिद्धीस गेल्यावर तुमचें वतन तुम्हांस देऊं, असें अभय दिलें व स्वामी त्यास बरोबर घेऊन गेले. स्वामींबरोबर अनेक जिवावरचीं कार्यें बाजीप्रभूनें केलीं. अखेरीस पन्हाळयाहून विशाळगडास स्वामीबरोबर येत असतां मध्यंतरीं गजापूर डोंगराच्या खिंडींत बाजीप्रभूनें यवनांबरोबर युद्ध केलें व अत्यत पराक्रम करून स्वामीकार्यासाठीं आपल्या प्राणाची आहुती देऊन शिवराय विशाळगडास पोहोंचल्याच्या तोफांचा ध्वनी ऐकूं येतांच बाजीनें आपला प्राण धारातीर्थीं मोठ्या आनंदानें सोडला. इतिहास-संशोधक- मंडळानें गजापूर क्षेत्राचा शोध करावा. आम्हांस बाजीप्रभूच्या मुलाचे लेखांवरून जी माहिती मिळाली ती लिहिली आहे. याप्रमाणें हा वीरप्रभू स्वामीकार्यार्थ धारातीर्थीं पतन झाल्याकारणानें शिवप्रभूंस वाईट वाटणें साहजिक आहे. त्यांनीं त्याच्या पुत्रांचें सान्त्वन केलें, पालख्या दिल्या, इत्यादि हकीगत आमचे वाचनांत आली आहे. पण ती कितपत विश्वसनीय आहे याबद्दल आम्हांस शंका येते. खरी असल्यास आम्हांस आनंद व अभिमान आहे; पण तो काल इतक्या शांततेचा नव्हता. मोंगलांनीं फारच उपद्रव केला होता. शिवछत्रपतीजवळ पालख्या असतील,

परंतु सरदार बाजी देशपांडे यांच्या तरुण व शूर पुत्रांना पालखींत बसवून मिरविणारा तो शिवप्रभू नव्हता. त्या वेळीं क्षात्रतेजाची जरूरी होती. तेव्हां या पालखीबद्दल मन साशंक होतें. बाजीप्रभूच्या पुत्रांस सरदार केलें हें मात्र खरें. असो.

बाजीप्रभू कोणत्या तारखेस व महिन्यांत पतन पावला याबद्दल आम्हांस अद्याप विश्वसनीय पुरावा मिळाला नाहीं. सन १६६० हें साल बरोबर आहे व तो पावसाळ्याचा आरंभकाळ असावा. बाजीप्रभूच्या पुत्राचे लेखांवरून असें दिसतें कीं, यवनांविरुद्ध चाललेलें कारस्थान बाजीप्रभूला शिवाजीकडून पूर्ण कळलें होतें; आणि जी मसलत चालू होती तींत बाजीप्रभू हे सल्ला-गार होते. सारांश, बाजीवर शिवप्रभूचा पूर्ण विश्वास होता व तो त्यानें खरा केला.

बाजीप्रभूचे वडील बंधू फुलाजी व सर्वांत वडील वाल्होजी हे बाजीप्रभूचे मागेंपुढें परलोकवासी झाले असावेत असा समज होणें स्वाभाविक आहे. पण वांटणीपत्रकावरून असें दिसून येतें कीं, फुलाजी हा स्वारीमध्यें पडला असावा. वाल्हो कृष्ण आधींच स्वर्गवासी झाला होता. वाल्हो कृष्णाचे वंशज जनार्दन खंडेराव प्रधान देशपांडे हे हल्लीं हिरडस-मावळांत कांहीं गांवचे देशकुळकर्णी व गांवकुळकर्णी आहेत, व त्यांस इनाम शेतें वगैरे आहेत. राजारामाचे कारकीर्दींत हें घर परागंदा झालें. हल्लीं त्यांचा स्वतःचा वाडा पुणें येथें आहे.

फुलाजी कृष्ण यांस तीन पुत्र होते. पहिला विठ्ठल, दुसरा भिकाजी व तिसरा कृष्ण. या तिन्ही बंधूंच्या घराण्यांचे वंशज हल्लीं हिरडस-मावळांतील भोर, सिंद, ब्राह्मणघर, नांदगांव, आळेंदें व पावें या गांवीं वतनदार आहेत. रा. गोविंदराव लक्ष्मण तोफखानेवाले, बडोदें, हे याच शाखेपैकीं होत. या घराण्यांतील विठ्ठल फुलाजी हे इ. स. १७०५ सालीं कल्याण प्रांताहून परत येत असतां वारले. कृष्णाजी फुलाजी हे धनाजी जाधवराव सेनापती यांजकडे सरदारीवर होते.

वीररत्न बाजीप्रभूस स्त्रिया दोन, वडील सोनाई व दुसरी गौतमाई. सोनाई इजला पुत्र तीन, महादाजी बाजी, मोराजी बाजी व रामाजी बाजी.

द्वितीय स्त्रीस पुत्र पांच, येसाजी बाजी, बाबजी बाजी, हरजी बाजी, विसाजी बाजी व अंताजी बाजी. हरजी बाजी, विसाजी बाजी व येसाजी बाजी यांची हयात राजाराम महाराजांचे कारकीर्दीपर्यंत होती. पुढें यांचा वंश नाहीं. बाजीचे सर्व पुत्र स्वारीशिकारीवर होते. विठ्ठल फुलाजी, मोराजी बाजी व रामाजी बाजी यांनीं बाजीप्रभू पडल्यावर चुलत बंधूबरोबर इ. स. १६६० पासून इ. स. १६७५ पर्यंत एकत्र राहून देशकुळकर्णी वगैरे वतनदारी केली. पुढें १६७५ पासून इ. स. १७०५ पर्यंत त्यांनीं पाळीपाळीनें तिची वांटणी केली. बाकीचे बंधू सरदारीवर असत. विठ्ठल फुलाजी व मोराजी बाजी यांचीं पत्रें पाहिलीं असतां त्यांतील मजकुरावरूनहि असें दिसून येतें कीं, बाकीचे बंधू महाराजांबरोबर सरदारीच्या कामावर असत. 'स्वामीबरोबर आपण कुशल येऊन पोहोंचला, संतोष झाला.' अशा आशयाचीं तीं पत्रें आहेत. हे सर्व चुलत बंधू उत्तम प्रकारचे लेखक होते. सुमारें इ. स. १७०६ सालीं म्हणजे शके १६२८ व १६२९ व्यय व सर्वजित् या संवत्सरांमध्यें या चुलतबंधूंची वांटणी झाली. ती वाटणी अखेरीस रांगणा ऊर्फ प्रसिद्धगडीं कायम झाली. हें बांटणीपत्र फारच मोठें आहे, व फार महत्त्वाचें आहे. हें मोराजी बाजी, रामाजी बाजी व कृष्णाजी फुलाजी यांमध्यें झालें. विठ्ठल फुलाजी, भिकाजी फुलाजी, बाबजी बाजी व हरजी बाजी हे त्या वेळीं हयात नव्हते, तर विठ्ठल फुलाजीचे पुत्र नरहरी व निळकंठ हे होते. अशी ही बाजीप्रभू व त्यांचे वंशज या विषयींची हकीगत होय.

( वरील लेख माझे चुलते कै. सच्चिदानंद रघुनाथ ऊर्फ बाळासाहेब चित्रे यांच्या दप्तरांतून उद्धृत केला आहे. त्यांत त्यांनीं ठिकठिकाणीं पुराव्यादाखल कांहीं ऐतिहासिक कागदांच्या नकला जोडल्या आहेत. परंतु स्थलसंकोचास्तव त्या येथें देतां आल्या नाहींत.–र. ब. चित्रे ).

# देवत्वविकास हेंच मानवी जीविताचें साध्य
## अथवा
# नीत्शेचे कांहीं विधायक विचार

लेखक: गणेश धोंडदेव देशपांडे, बी. ए. ( टि. )

[ यांचा जन्म नारायणपूर, जि. पुणें, येथें १९०३ सालीं झाला. त्यांचें शिक्षण भोर हायस्कूल व टिळक महाविद्यालय यांमध्यें झालें. ]

The only possible way of upholding the concept of God would be: To make him not the motive force but the condition of maximum power, an epoch, a point in the further development of the Will To Power by means of which subsequent evolution-just as much as former evolution up to Him-could be explained.

He who determines values and leads the will of millenniums and does this by leading the highest natures—he is the highest man.

Not mankind but superman is the goal.

*Will To Power*, Vol. II.

लेख लिहिण्याचा बेत फार उशिरा कायम झाल्यामुळें साधनें जुळवून पूर्वतयारी करण्यास अवसर मिळाला नाहीं. प्रारंभीं, विनंतिपत्रकांतील कडक अटी आपणांस कशा पाळतां येणार व निबंधलेखनाचा हा पहिलाच प्रयत्न भारदस्त ग्रंथांत शोभेल तरी कसा ! असे अनेक अडचणींचे प्रश्न उपस्थित होऊन 'झांकली मूठ सव्वा लाखाची' या न्यायानें स्वस्थ रहावें असें ठरविलें. परंतु संपादकांच्या इच्छेविरुद्ध वागून मूठ झांकून ठेवण्यांत आपलाच कमकुवतपणा व्यक्त होतो. आपले दोष उघड दाखविण्यास लागणारें धैर्यहि आंगीं नसावें, यासारखी लाजिरवाणी गोष्ट नाहीं. ह्या व दुसऱ्या कांहीं विचारांचा जय होऊन कांहींतरी पांढऱ्यावर काळें करून द्यावें हा निश्चय स्थिर झाला. तथापि हें काम जबाबदारी ओळखून विचारपूर्वक व्हावयास हवें होतें ही गोष्ट मान्य केली पाहिजे.

आणखी एका वैय्यक्तिक गोष्टीचा उल्लेख करून नंतर मुख्य विषयाकडे वळूं. कोणत्याहि विषयावर माझीं मतें अद्याप तयार झालेलीं नाहींत. अंतः-करण कोणीकडे ओढ घेतें ? असा प्रश्न कांहीं लोक वादविवाद करितांना मला विचारतात. पण एकाद्या तत्त्वाचा, साधकबाधक प्रमाणें उदासीन वृत्तीनें पारखून, पूर्वग्रहास जागा न देतां, विचार करावा हेंच खऱ्या तत्त्व-जिज्ञासूचें लक्षण आहे. सत्य कितीहि भेसूर, तीव्र, मनास न रुचणारें, अंतः-करणास झोंबणारें असलें तरी त्याचा अनादर करितां कामा नये. ज्या ग्रंथकाराच्या विचारांशीं वाचकांचा परिचय करून देण्याचें मीं योजिलें आहे त्याचे ग्रंथ वाचतांना कित्येक वेळां माझें मनहि इतकें चिडून जात असे कीं, अडाणी स्त्रियांच्या शिव्या बऱ्या, पण ही नीत्शेची टीका वाचणें नको. एकंदर बहुजनसमाजाविषयीं त्यानें इतकी अनुदार वृत्ति दाखविली आहे कीं, यशवंतगिरीशांसारख्या आधुनिक कविवर्यांच्या हृदयांतून काव्यांचे महानद उगम पावतील अशी योग्य भीति वाटते. मी कवि नाहीं हें मी आपलें भाग्यच समजतों. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सबंध लेखांत स्पष्टी-करण फक्त माझें असून, विचार जर्मन तत्त्वज्ञ नीत्शे याचे आहेत. त्याचें बरेचसें कार्य विध्वंसक स्वरूपाचें आहे. त्याच्या राष्ट्रांत प्रचलित असलेलें शिक्षण, राज्यव्यवस्था, नैतिक मूल्यें, ख्रिस्ती धर्म, समाजव्यवस्था वगैरे सर्व गोष्टी निरुपयोगी, सडक्या, कुजलेल्या, टाकाऊ आहेत, त्या उत्कर्षसाधक नसून प्रगतिप्रतिबंधक आहेत, अवनतीच्या खोल व भयाण गर्तेकडे नेणाऱ्या आहेत; म्हणून त्यांचा आमूलाग्र नाश झाला पाहिजे व सर्व यूरोपची पुनः-र्घटना होईल तरच मनुष्याच्या ठिकाणीं असलेल्या शक्तींचा विकास होणें शक्य आहे असें त्याचें मत होतें. तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, राजकारण, मानस-शास्त्र, भौतिक-शास्त्रें वगैरे सर्व शास्त्रांवर त्यानें निर्दयपणानें टीका केली आहे. त्याचे आंगीं आत्मविश्वासहि फार दांडगा होता. मी अत्यंत उच्चशैल-शिखरावर विराजमान झालों असून तेथील हवा अतिशय थंड आहे, पण ती सोसण्यास जो तयार होईल त्यास अमर्याद उत्साह पुरविण्याची शक्ति त्या हवेंत आहे. ज्यांच्या अंगांत इतका दम असेल त्यांनींच माझ्या नादीं लागावें. इतरांकरितां माझें लेखन नाहीं. दुर्बल, नालायक, भीरु व संकुचित

लोकांची मला जरूरी नाहीं व माझा त्यांना उपयोगहि नाहीं. अशा प्रकारचे अनेक उद्गार त्याच्या ग्रंथांमध्यें इतस्ततः पसरलेले आहेत.

शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञानी लोकांनीं अगदीं स्थिर म्हणून ठरविलेले सिद्धांत, नानाप्रकारच्या शंका उपस्थित करून व त्यांच्यामधील दोष उघड करून, त्यांचा फोलपणा दाखविणें हें तर नीत्शेच्या कार्याचें प्रधान अंग होतें. परमेश्वर या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या कोणातरी व्यक्तानें घालून दिलेल्या नियमांप्रमाणें निसर्गातील व्यवहार घडत असतात, ही कल्पना साफ खोटी असून विश्वांतील उलाढाली होण्यास जर कोणती शक्ति कारण असेल तर ती बलाकांक्षा, प्रभविष्णुता ( Will to Power ) ही एकच असून बाकी सर्व थोतांड किंवा कल्पनाजाल आहे हा नीत्शेचा मुख्य सिद्धांत. जगांत नियमबद्धता नाहीं किंवा शास्त्रज्ञ समजतात तसा कोठेंहि कार्यकारणभावहि नाहीं. ज्या समाजांत नांदावयाचें त्याचें रक्षण व अभिवृद्धि घडवून आणण्यास निसर्गाचा उपयोग व्हावयाचा असेल तर निसर्गामध्यें नियमबद्धता असावयास पाहिजे. असे कांहीं नियम सांपडले तर त्यांचा विचार करून मनुष्यसमाजास निसर्गाचा फायदा करून घेतां येईल. अशा प्रकारें मानवी हिताच्या दृष्टीनें जे नियम शास्त्रज्ञांनीं शोधून काढले त्यांचें सूक्ष्म परीक्षण करून नीत्शेनें असें सिद्ध केलें कीं, विचाराच्या कसोटीस ते सिद्धांत उतरू शकत नाहींत. जग एकसारखें बदलत असून शास्त्र म्हणजे केवळ घसरड्या जमिनीवर ' येन केन प्रकारेण ' पाय ठेवण्यास आधार मिळविण्याचा प्रयत्न आहे. जगाची गति अबाधित आहे. ती कधीं थांबणार नाहीं, इतकेंच नव्हे तर ' धाता यथा पूर्वमकल्पयत् ' या वचनांत म्हटल्याप्रमाणें पूर्वीच्या घटनांची पुनरुक्ति होईल ही गोष्टहि शक्य नाहीं. शास्त्रांविषयीं नीत्शे म्हणतो, " The object is not to know but to schematise, to impose as much regularity and form upon chaos as our practical needs require." विश्वनियामक परमेश्वर कोणी नसला तरी विश्वांतच अशी एक शक्ति आहे कीं, जिच्यामुळें विश्वांत एकसारखा बदल होत रहाणार व नवीन स्वरूपें उत्पन्न होणार. या शक्तीच्या क्रियेस मर्यादा नाहीं. एक विशिष्ट अवस्था प्राप्त झाली म्हणजे प्रगति थांबेल हें म्हणणें सयुक्तिक नाहीं. नीत्शेचा हा विचार

त्याच्याच शब्दांत मांडून दुसऱ्या मुद्यांकडे वळूं. त्याचे शब्द असेः—

Although the universe is no longer a god, it must still be capable of the divine will of creating and transforming,.... .... It must forbid to relapse itself into any one of its previous forms, it must not only have the intention but also the means of avoiding any sort of repetition........it must control every single one of its movements with the view of avoiding goals, *final state* and repetition.

नीत्शेच्या दृष्टीला हें विश्व प्रचंड सामर्थ्याच्या स्वरूपांत दिसतें. समुद्राचें पाणी ज्याप्रमाणें कधींच कमीअधिक होत नाहीं, त्याप्रमाणेंच हा सामर्थ्य-संचय कधीं क्षीण होत नाहीं किंवा वाढतहि नाहीं, फरक फक्त रूपांत होतो. बरेंवाईट, पापपुण्य ह्या गोष्टी त्यांत नाहींत. विश्व हें आत्मविकासक्षम ( Self-creative ) आहे. अर्थात् विकासाबरोबर नाशहि आलाच. पण नाश म्हणजे रूपाचा नाश, निःशेष नाश नव्हे. असो. पुढील तत्त्वज्ञानांत ही विश्वाची कल्पना अनुस्यूत असल्यामुळें इतकें वर्णन देणें अपरिहार्य होतें. पूर्वीच्या तत्त्वज्ञांचे विचार हाणून पाडण्यांत त्याचें सूक्ष्म बुद्धिवैभव प्रत्ययास येतें. त्याचा वाचकांना आस्वाद देण्यास स्थलावकाश नाहीं व प्रस्तुत विषयास त्याची आवश्यकताहि नाहीं.

शिरोभागीं दिलेल्या अवतरणांत देव मानावयाचाच झाल्यास त्यास तो कोणत्या स्वरूपांत मानावा याविषयींची नीत्शेनें अशी कल्पना दिली आहे. दुसऱ्या उताऱ्यांत विश्वविकासांत मानवाचें कार्य काय हेंहि सांगून टाकलें. निसर्गामध्यें जी सामर्थ्यविकासाची क्रिया चालू आहे तीच मनुष्यानें पुढें चालविली पाहिजे. अनंत सामर्थ्यसंपन्नतेची अवस्था म्हणजे देव अशी कल्पना करून त्या दिशेनें कष्ट सोसून मार्ग आक्रमण करण्याचा नेटाचा प्रयत्न करणें हेंच मानवाचें साध्य; इतर सर्व ध्येयें क्षुद्र होत. हें मानवी जीविताचें उत्कृष्ट कर्तव्य ठरवून तें सिद्ध होण्यास उपयुक्त अशीच समाज-रचना असणें जरूर आहे, इतकेंच नव्हे तर समाजांतर्गत व्यक्तीच्याहि स्वैर वर्तनास आळा घातला पाहिजे. मागें सांगितल्याप्रमाणें नीत्शेनें हातोडा घेऊन जुनाट व रोगट कल्पनांच्या मूर्ति फोडण्याचें जरी मुख्यतः कार्य केलें

असलें तरी दिव्य पुरुषोत्तम निर्माण होण्यास समाजरचना कोणत्या धोरणावर केली पाहिजे व समाजांतील ज्या एका प्रकृष्ट वर्गामधून अशा अमोल रत्नांचा उद्भव व्हावयाचा त्यांतील व्यक्तींवर किती कडक व निष्ठुर निर्बंध लादणें जरूर आहे याची संक्षिप्त पण स्पष्ट कल्पना मांडली आहे. पैकीं समाजरचनेचा विचार करण्यापूर्वीं व्यक्तीच्या उन्नतीविषयीं नीत्शे काय म्हणतो तें प्रथम पाहूं.

विश्वरचनेमध्यें जे धर्म नीत्शेला दिसले तेच मानवांमध्येंहि असावयास पाहिजेत. विश्वांत युद्धप्रवृत्ति, जयिष्णुता, स्वामित्व प्रस्थापित करण्याची भयंकर लालसा आहे. ज्या समाजाला युद्धाचा वीट येतो व ज्यांतील जयिष्णुता लयास गेली असेल तो समाज लोकशाहीच्या व दुकानदारांच्या अधिराज्यास योग्य होतो. सुखाची, शांततेची व चैनीची इच्छा उत्पन्न झाली कीं, तोच त्या समाजाचा अधःपात असें म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थात् जयिष्णुता व प्रभविष्णुता वाढीस लागण्यास व्यक्तीच्या जीवनक्रमांत मृदु भावना, नाजुकपणा, दौर्बल्य, निराशा इत्यादि कर्तृत्वनाशक दोषांस उत्तेजन मिळेल अशा गोष्टींचा समावेश होऊं देतां कामा नये हें उघड आहे. ज्या प्रकारच्या व्यक्तींचा मला ध्यास लागला आहे, त्यांच्याविषयीं दया न करणें म्हणजेच त्यांना मोठें साहाय्य करण्यासारखें आहे. आजार, अपमान, भयंकर संकटें, लोकनिंदा, तिरस्कार, अपयशाचे प्रसंग, सारांश, भीषण आपत्तींचे जेवढे प्रकार कल्पितां येतील तेवढ्या सर्व दिव्यांतून माझ्या शिष्यांना पार पडण्याची जरूरी नेहमींच भासावी हेंच योग्य. कारण अशा परिस्थितीमध्येंच त्यांच्या ठिकाणीं असलेली तत्त्वनिष्ठा ( Capacity of sticking to his guns ) कसास लागते व त्यांच्या अंगचें तेज वाढतें. हिऱ्याची किंमत ऐरणीवर ठरत असते. सोनें अग्नीमधून निघालें म्हणजे त्याच्या अस्सलपणाबद्दल शंका रहात नाहीं.

असा मनुष्य कोणत्याहि विकारास वश होण्याइतका कमकुवत नसावा. गोल्डस्मिथनें वर्णन केलेला पाद्री नीत्शेच्या दृष्टीनें जगण्यास नालायक ठरतो. त्या ख्रिस्ती साधूचें अंतःकरण कसें मेणाहून मऊ होतें व दीनदुबळ्यांच्या दुःखांनीं तें किती कळवळत असे हें दाखविण्याकरितां व वाचकांची सहानुभूति

जागृत करण्याकारितां, गोल्डस्मिथनें त्याच्याविषयीं " His pity gave ere charity began ! " असें म्हटलें. पण नीत्शेला यांतच अवनतीचें बीज दिसतें. त्याच्या मतें विकारांच्या ताब्यांत जाऊन केलेलें सत्कृत्यहि निंद्य ठरतें. थोरपणाचें लक्षण त्याच्या दृष्टीनें खालीं दिल्याप्रमाणें आहे. दया ही बाह्यतः दिसते तितकी निरुपद्रवी वृत्ति नाहीं. स्वैर सोडल्यास ती कोणत्याहि भयंकर विकाराइतकीच हानि करणारी आहे. **'देशे काले च पात्र च तद्दानं सात्त्विकं विदुः ॥'** हा उपदेश करितांना भगवंताचाहि हाच आशय आहे. या वचनांतील पात्र कोण ? हें यथावकाश पुढें स्पष्ट होईल. तसेंच शृंगार-रसोत्पादक, मोहक व आकर्षक प्रेरणांनीं ज्याचें हृदय विव्हल होतें, काममूढ बनतें त्यालाहि या उच्च वर्णांत स्थान नाहीं. कामविकारावर ताबा चालवितां येत नाहीं म्हणून, संततिनियमनाचे कृत्रिम व किळसवाणे उपाय उपयोगांत आणूं इच्छिणारा तरुण वर्ग नीत्शेच्या दृष्टीनें ज्या मानववंशांत वाढत्या प्रमाणावर असेल तो वंश क्षयाच्या पंथास लागला असें निश्चित समजावें. उतारे देण्याचा मोह जरी आवरणें आवश्यक असलें तरी कित्येक वेळां ग्रंथकारास स्वत:सच बोलूं देणें अधिक सयुक्तिक वाटतें. नित्शे म्हणतो:—

'Unfortunately, however, one of the regular symptoms of exhausted stock is the **inability to exercise any self-restraint** in the presence of stimuli, and the tendency to respond to the smallest sexual attraction.'

**' Continence and discipline are only steps to higher things. Above them stands golden nature. '** कडक शिस्त, इंद्रियांचा जय किंवा आत्मसंयम, संकटांस तोंड देण्याचें सामर्थ्य, जाज्वल्य कर्तव्यनिष्ठा इत्यादि सामान्य जनांना प्रखर वाटणारे श्रेष्ठ गुण ज्या प्रकारच्या आचरणानें धर्म बनून जातील असें वर्तन ठेवणें व ज्या वातावरणांत ते अंगीं बाणतील अशा वातावरणांत राहणें आवश्यक आहे. वाटेंत पडलेल्या गजऱ्या-वर काव्यें रचण्यानें, भावनोद्दीपक व रोमांचकारी चित्रपटांच्या दर्शनानें, ' ओलेती 'सारख्या चित्रांतील कलेच्या आस्वादसेवनानें किंवा रेनॉल्डसच्या कादंबऱ्यांच्या नित्य अध्ययनानें या असाधारण विभूतिमत्वाच्या उच्चासनावर

जागृत करण्याकरितां, गोल्डस्मिथनें त्याच्याविषयीं " His pity gave ere charity began ! " असें म्हटलें. पण नीत्शेला यांतच अवनतीचें बीज दिसतें. त्याच्या मतें विकारांच्या ताब्यांत जाऊन केलेलें सत्कृत्यहि निंद्य ठरतें. थोरपणाचें लक्षण त्याच्या दृष्टीनें खालीं दिल्याप्रमाणें आहे. दया ही बाह्यतः दिसते तितकी निरुपद्रवी वृत्ति नाहीं. स्वैर सोडल्यास ती कोणत्याहि भयंकर विकाराइतकीच हानि करणारी आहे. '**देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं विदुः ॥**' हा उपदेश करितांना भगवंताचाहि हाच आशय आहे. या वचनांतील पात्र कोण ? हें यथावकाश पुढें स्पष्ट होईल. तसेंच शृंगार-रसोत्पादक, मोहक व आकर्षक प्रेरणांनीं ज्याचें हृदय विव्हल होतें, काममूढ बनतें त्यालाहि या उच्च वर्णांत स्थान नाहीं. कामविकारावर ताबा चालवितां येत नाहीं म्हणून, संततिनियमनाचे कृत्रिम व किळसवाणे उपाय उपयोगांत आणूं इच्छिणारा तरुण वर्ग नीत्शेच्या दृष्टीनें ज्या मानववंशांत वाढत्या प्रमाणावर असेल तो वंश क्षयाच्या पंथास लागला असें निश्चित समजावें. उतारे देण्याचा मोह जरी आवरणें आवश्यक असलें तरी कित्येक वेळां ग्रंथकारास स्वतःसच बोलूं देणें अधिक सयुक्तिक वाटतें. नित्शे म्हणतोः–

'Unfortunately, however, one of the regular symptoms of exhausted stock is the **inability to exercise any self-restraint** in the presence of stimuli, and the tendency to respond to the smallest sexual attraction.'

'**Continence and discipline are only steps to higher things. Above them stands golden nature.**' कडक शिस्त, इंद्रियांचा जय किंवा आत्मसंयम, संकटांस तोंड देण्याचें सामर्थ्य, जाज्वल्य कर्तव्यानिष्ठा इत्यादि सामान्य जनांना प्रखर वाटणारे श्रेष्ठ गुण ज्या प्रकारच्या आचरणानें धर्म बनून जातील असें वर्तन ठेवणें व ज्या वातावरणांत ते अंगीं बाणतील अशा वातावरणांत राहणें आवश्यक आहे. वाटेंत पडलेल्या गजऱ्यावर काव्यें रचण्यानें, भावनोद्दीपक व रोमांचकारी चित्रपटांच्या दर्शनानें, 'ओलेती 'सारख्या चित्रांतील कलेच्या आस्वादसेवनानें किंवा रेनॉल्डसच्या कादंबऱ्यांच्या नित्य अध्ययनानें या असाधारण विभूतिमत्वाच्या उच्चासनावर

आरोहण करण्याची पात्रता येणार नाहीं. ही लायकी आंगीं येण्यास नित्याच्या वागणुकींत जे फरक करावयास पाहिजेत असें नीत्शेला वाटतें त्यांतील कांहीं प्रकार थोडक्यांत देतों.

( १ ) यतिधर्मः—( asceticism ) या उपायांचा ज्या कार्याकडे उपयोग केला जातो त्याऐवजीं दुसऱ्या कामीं हें साधन वापरलें जाईल तर तें अत्यंत कार्यक्षम आहे असें आढळून येईल. देहात्मबुद्धि नाहींशी करणें, जगाविषयीं तिरस्कार व काल्पनिक निर्भेळ सुख हस्तगत करून घेण्याकरितां सर्वकर्मत्याग, अहंकार व उद्दाम मनोविकार यांचें उच्चाटण, उद्विग्न मनास समाधान लाभावें या हेतूंनीं या मार्गाचा अवलंब केला जात असे. जीविताचा कंटाळा व स्वर्गांतल्या सुखाविषयींचा अद्‌भुत कल्पना या सर्व प्रयत्नांच्या मुळाशीं असत. या कल्पना टाकून बलवर्धन, आत्मसामर्थ्यविकास इत्यादि उत्साहजनक हेतु दृष्टीपुढें ठेवून तींच व्रतें, तेच कडक नियम पाळणें व तपश्चर्या करणें हें उच्च जीवनास पोषक झाल्यावांचून रहाणार नाहीं. करारीपणा, निस्पृहता व बाणेदारपणा वाढविण्यास या निर्बंधांची फार आवश्यकता आहे. यानें मुर्दाडपणा कमी होऊन मर्दपणा आंगीं येईल. इतर सर्व परीक्षांपेक्षां सत्त्वपरीक्षाच मनुष्याची योग्यता ठरविण्यास पुरेशी आहे. अंगीकृत कार्य निश्चयानें तडीस नेणें व वचन पाळणें यांतच श्रेष्ठतेचें बीज असतें. नीत्शेचे पुढील उद्गार तरुणांनीं लक्षांत ठेवावेः—" How does one become stronger ? By deciding slowly and by holding firmly to the decision, once it is made. "

( २ ) एकांतवासः—सर्व बाह्य जगाच्या संसर्गापासून अत्यंत अलिप्त राहून आत्मपरीक्षण करणें व दुर्बलतेचा अंश जो आपल्या ठिकाणीं राहिला असेल त्याला अर्धचंद्र देणें व आयुष्यांतील खडतर तपश्चर्येसाठीं मनाची तयारी करणें इत्यादि गोष्टी एकांतांत फारच उत्तम साधतात. एकांतसुद्धां मानावाच लागतो. श्रीसमर्थांचीं दासबोधांतील वचनें तुलना करण्यासारखीं आहेत.

( ३ ) मृत्यूविषयीं निर्भयताः—ही वृत्ति सर्वच तत्त्वज्ञान्यांमध्यें व सर्व क्षेत्रांत अद्‌भुत कर्तृत्व गाजविलेल्या व्यक्तींमध्यें बहुतेक असतेच. मनुष्याची नजर फिरल्याशिवाय, केवळ सत्त्वांच्या रूपांत जगावें असें वाटण्याइतका

परमावधीचा नैतिक उत्कर्ष झालेला असल्यावांचून हें आयुष्यांतील फार मोठें यश लाभणें फार दुर्घट आहे. या बाबतींत नीत्शे लिहितो:--The foolish physiological fact must be converted into a moral necessity. One should live in such a way that one may have *the will to die at the right time.*

विचाराच्या क्षेत्रांत श्रद्धाळूपणा हा एक जबरदस्त शत्रु आहे. मानवी जीवनाचें व विश्वाचें स्वतंत्रपणें परीक्षण करून अपूर्व व स्वतंत्र विचार प्रसविण्याची आकांक्षा जिवंत अंत:करणांत उसळत राहिली पाहिजे. संशयावांचून ज्ञान वाढणें शक्यच नाहीं, म्हणून उच्चवर्णीय लोक सर्वतंत्रस्वतंत्र असले पाहिजेत. संशयातीत सिद्धांत म्हणून मान्यता पावलेल्या विचारांविरुद्ध बंड पुकारणारा ठरवून समाज आपणांवर रुष्ट होईल कीं काय अशी कल्पनाहि मनांत येतां कामा नये. संशयी वृत्ति अभिजात वर्गांत सहज असावयास पाहिजे. विश्वासू किंवा श्रद्धाळु मनुष्य निकृष्ट जातीचा नमुना असतो. विकासेच्छु वर्गानें तसल्या मनोवृत्तीचा स्पर्शहि होणार नाहीं अशी काळजी घ्यावी. बुद्धीची कुशाग्रता नसेल तर कोणीहि व्यक्ति समर्थ पदवी मिळवूं शकणार नाहीं, कारण उच्चवर्गांतील प्रत्येक व्यक्ती मागें सांगितल्याप्रमाणें सर्वतंत्रस्वतंत्र असते. या हक्काचा योग्य उपयोग करण्यास निर्बुद्ध मनुष्य सर्वथा अपात्र असतो. आज्ञापालन करणें एवढेंच निकृष्टांचें काम. अभिजात वर्गांत अशा लोकांना प्रवेश देण्यानें उच्चतम जीवनास मोठाच अडथळा होण्याचा संभव आहे.

तथापि नुसती बुद्धिमत्ताहि पुरेशी नाहीं. उच्च कुलांत जन्म व रक्तबीजशुद्धि यांची जोड मिळाल्यावांचून बुद्धीसुद्धां वैभवसंपन्न होऊं शकत नाहीं. सुवंशांत जन्म व प्रभुनीति ( master morality ) यांचाहि नित्य संबंध आहे. सतत अभ्यास, चिकाटी, दीर्घोद्योग, कडक निर्बंध, आत्मसंयमन व विलक्षण आपत्तींशीं टक्कर देऊन उच्च गुण, अनेकविध कला व पराकाष्ठेचें नैपुण्य संपादन करावें लागतें हें जरी खरें तरी कित्येकांना हा अमोल ठेवा जन्माबरोबरच प्राप्त झालेला असतो. पूर्वजांच्या अनेक पिढ्यांनीं संपादन केलेलें, मोठ्या कसोशीनें जतन केलेलें सामर्थ्य मोठ्या धैर्यानें व निश्चयानें

उच्च वैवाहिक नीतिनियमांचें परिपालन केल्यानेंच जसेंच्या तसें रक्षण करणें शक्य असतें. अशा रीतीनें परंपराप्राप्त भांडवल ज्याला आयतेंच मिळालें असेल त्याला स्वतःच्या तपोबलानें पुष्कळ दूरचा पल्ला गांठतां येतो. अर्थात् असा तो बलसंपन्न नरवीर आपल्या सामर्थ्यास साजेसें अद्‌भुत कार्य मोठ्या लीलेनें पार पाडतो आणि सामान्य लोक आश्चर्यानें मूढ होऊन पहात रहातात. हें दुर्लभ ऐश्वर्य कोठून येतें? याचें सरळ उत्तर एकच. पूर्वजांनीं दिलेल्या किंमतीचा तो मोबदला असतो. त्यांची सर्व तपश्चर्या एका व्यक्तीमध्यें फलित होते, एकत्रित होते.

निसर्गांत विषमता आहे, तशीच मनुष्यांमध्येंहि मानसिक, बौद्धिक, नैतिक विशेष गुणधर्मांच्या निसर्गानें केलेल्या विषम वांटणीमुळें आनुवंशिक असते. निकृष्ट वंशांत जन्मलेल्या व्यक्तीमध्यें उच्च गुणांची वाढ होण्याची शक्यताच नसते. उच्च गुण व उच्च बुद्धिसत्ता कुलीन घराण्यांत जन्मलेल्यांनाच परंपरेनें प्राप्त झालेली असते. हें कटु सत्य—अर्थात् नीत्शे व त्याच्यासारखे ज्यांचे विचार आहेत त्यांच्या दृष्टीनें सत्य—नीत्शेनें निःसंदिग्ध शब्दांत मांडलें. "The only nobility is that of birth and blood. Intellect alone does not ennoble, on the contrary something is always needed to ennoble intellect. What then is needed? Blood.

We hold that no *morality is possible without good birth.*"

समतावादी आणि जन्मजात वैषम्य प्रतिपादन करणारे दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे शिक्षणाभिमानी आणि समाजशास्त्रज्ञ यांच्यामध्यें हा वाद आजहि चालू आहेच. तथापि शिक्षणाच्या क्षेत्रांत काम करणारे लोक समाजशास्त्रज्ञांच्या बाजूला येऊन मिळतात असें दृश्य अमेरिकेंत आज दिसूं लागलें आहे. बौद्धिक आणि मानसिक परीक्षेचे (Intelligence and Mental tests) जे विविध प्रकार आज उपयोगांत आहेत त्यांवरूनच बौद्धिक व मानसिक गुणधर्म कांहीं विशिष्ट वंशांमध्येंच उच्च दर्जाचे असतात असें सिद्ध झालेलें आहे. काउंट गोबिनो तर दुसऱ्या टोंकास जाऊन असें प्रतिपादन करितो कीं, 'जगामध्यें जेथें जेथें शास्त्र, कला, श्रेष्ठ संस्कृति यांत मानवी बुद्धिमत्तेचें अद्‌भुत कर्तृत्व दिसून येतें तेथें एका विशिष्ट मानवकुलाच्या परा-

क्रमानेंच सर्व स्थित्यंतरें घडून आलीं यांत शंका नाहीं. जगांतील सर्व सुसंस्कृत समाजांमध्यें याच वंशाच्या अनेक शाखांचें वर्चस्व आहे ! ! कांहीं वंशांमध्यें, शिक्षणानें फारच अल्प प्रमाणांत बौद्धिक व नैतिक गुण वाढवितां येतात; ते जन्मतःच उच्च शिक्षणास नालायक असतात ही गोष्ट सत्य असली तरी दयाळु अंतःकरणास ती बरी वाटत नाहीं. यामुळेंच कित्येक लोक अधिक विचार न करितां या तत्त्वाचें शांतपणें परीक्षण करण्याइतके निःपक्षपाती राहूंच शकत नाहींत. जी गोष्ट वेड न लागलेल्या कोणाहि मनुष्यास सहज समजावी इतकी स्पष्ट आहे तिच्यासंबंधीं विचार तो काय करावयाचा ? असें निर्णायक मत ते ठोकून देतात. पण अशा डोळे झांकण्यानें जर गुंतागुंतीचे प्रश्न सुटूं लागले तर जगांत कठिण असें कांहींच उरणार नाहीं. वुइल्यम मॅक्डुगल यांनीं आपल्या "*National Welfare and National Decay*" या ग्रंथांत स्पष्ट म्हटलें आहे, "Science calls upon us to weigh evidence impartially and to recognize that if nature has made men of unequal value, *the cruelty is hers, not ours* and that we do no wrong in ascertaining and recording the facts." रक्तशुद्धि, आनुवंशिकता, प्रकृष्ट-निकृष्टभाव, विवाहसंस्था, वर्णव्यवस्था (नीत्शेच्या शब्दांत order of rank) हे विषय अत्यंत जिव्हाळ्याचे, गुंतागुंतीचे, व्यापक व शास्त्रीय आहेत. एकादा शेरा मारून त्यांचा निकाल लागावयाचा नाहीं. नीत्शेनें नैसर्गिक वैषम्य व वर्गव्यवस्था या गोष्टींवर फार जोर दिला आहे. अर्वाचीन शास्त्रज्ञहि त्याच सुरांत बोलूं लागले आहेत. नीत्शेच्या दृष्टीनें प्रकृष्ट विकासांतच निकृष्टांच्या अस्तित्वाची सार्थकता आहे. प्रकृष्टांचा प्रभुवर्ग आणि निकृष्ट म्हणजे दास, अशीच भाषा तो वापरतो. येथेंहि त्याचेच शब्द देणें जरूर वाटतें, ते असे, "*The Ruling Types* :- The shepherd as apposed to the lord ( the former is only a means to the mainteinance of the her; the latter, *the purpose for which the herd exists.*")श्रेष्ठांचा वर्ग हें अंतिम साध्य आहे कीं ज्याकरितां बहुजनसमाज जगावा, समाजाकरितां तो नाहीं. धनगराचें कर्तव्य बजावण्याची जबाबदारी त्याच्यावर नाहीं. त्यानें सर्व समाजावर स्वामित्व प्रस्थापित

करावें हेंच योग्य. या बाबतींत आणखी एका गृहस्थांचा अभिप्राय नमूद करून पुढें जाऊं. शेलर नांवाच्या गृहस्थानें आपल्या सर्व आयुष्यभर नीग्रो समाजाचा अभ्यास केला. हे गृहस्थ म्हणजे अमेरिकेंतील 'माटे'च-दलितोद्धारार्थ झटणारे या दृष्टीनें-म्हणण्यास हरकत नाहीं. मॅक्डुगलसाहेबांच्या ग्रंथांतूनच मी तो उतारा येथें देत आहें. मि. शेलर म्हणतात, " All the facts we have, point to the same *unhappy* conclusion, that the Negro considered as a species is, by nature, *incapable of creating or maintaining society of an order above barbarism* and so far as we can discern this feature of his nature, depending as it does, on the lack of certain qualities of mind, is irremediable." तात्पर्य, समाजांतील निकृष्ट वर्ग संधि न दिल्यामुळें मागसलेला असतो ही गोष्ट खरी नाहीं. नालायकी त्यांच्याबरोबरच जन्मास येते व ती नाहींशी करणें शक्य नाहीं.

नीत्शेची प्रकृति बरी नसल्यामुळें त्या वेदना विसरून जाण्याकरितां व झोंप लागावी म्हणून तो अफू खात असे. अफूच्या निशेंत बाहेर पडलेले विचार काय किंमतीचे असणार? असा एक आक्षेप मला ऐकूं येतो, म्हणून ज्याची अफूबाजीविषयीं प्रसिद्धी नाहीं व चांगला शास्त्रज्ञ समजला जातो, त्याचे विचारहि नीत्शेच्या विचाराशीं जुळतात हें दाखविण्याकरितां वुइल्यम मॅक्डुगलच्या ग्रंथांचा उपयोग मी करीत आहें. असें करण्यांत दुसराहि एक हेतु आहे. पश्चिमेकडील राष्ट्रांमध्यें ' समता, बंधुता, स्वतंत्रता ' यांसारखे कर्णमधुर शब्द दुमदुमतात, समाजसत्तावादी, विश्वकुटुंबवादी व इतर आपापल्या तत्त्वांची घोषणा करितात; त्यामुळें आमचें लक्ष तिकडे वेधतें व पश्चिमेकडून आलेली अपूर्व देणगी समजून आम्ही त्यांचा स्वीकार करतों. समाजशास्त्रज्ञांचे विचार ते जाहिराती देऊन प्रचार करीत नसल्यामुळें आमच्या तरुणवर्गापर्यंत पोहोंचत नाहींत. नीत्शेनें जीं तत्त्वें आपल्या ग्रंथांतून निर्भीडपणें प्रतिपादन केलीं तीं शास्त्रज्ञांनीं चालविलेल्या प्रयोगांनीं सिद्ध होत आहेत, अशी कांहींतरी हालचाल जगांत चालू आहे, एवढें वाचकांना कळविण्याकरितां हा खटाटोप केला. पूर्वपक्ष व उत्तरपक्ष मांडून कांहीं मत प्रस्थापित करणें हा

या लेखाचा हेतु नाहीं. माझ्या स्वभावाला अनुसरून नाइलाजास्तव हें थोडेंसें विषयांतर करावें लागलें.

असो. रक्तशुद्धीसंबंधीं मॅक्डुगलचें मत नीत्शेसारखेंच आहे. उच्च वर्गांतील श्रेष्ठ गुणांचें रक्षण होण्याकरितां भिन्न रक्तांचें मिश्रण होऊं देणें योग्य होणार नाहीं. कारण त्यामुळें प्रजा निकृष्ट दर्जाची निपजते. त्यांनीं आपलें मत पुढील शब्दांनीं व्यक्त केलें आहे. " Isolation of any race is necessary for the maintenance of its special qualities; for cross-breeding with other races tends to produce reversion to the lower ancestral type.' त्याचप्रमाणें एका वंशानें सतत अंतर्विवाह केल्यास (close inbreeding) त्या वंशांतील कर्तृत्व कमी होतें हें म्हणणेंहि नवीन पुढें आलेल्या पुराव्यावरून निराधार ठरलें आहे. एवंच, वर्गभेद संस्कृतिरक्षणाच्या दृष्टीनें आवश्यक आहे. निसर्गाविरुद्ध बंड केल्यास त्यांत अपयश येईल हें सांगावयास नकोच. उच्चनीच भाव कृत्रिम नाहीं व त्याच्या नाशाच्या प्रयत्नानें सर्वनाश ओढवणार आहे म्हणून केवळ भावनेला बळी पडणें दुबळेपणा आहे. रक्षणीय काय, भावना किंवा संस्कृति ? हा विचाराचा प्रश्न आहे. ' अंशनाशे समुत्पन्ने सर्वं त्यजति ' अशा मनुष्यास काय नांव द्यावयाचें तें वाचकांनीं ठरवावें.

शेवटीं, एकच लहानसा मुद्दा राहिला आहे तो थोडक्यांत मांडून वाचकांच्या क्षमाशीलतेची परीक्षा संपणार आहे. निकृष्ट वर्गाचा प्रकृष्टांच्या विकासकार्याचें एक साधन म्हणून उपयोग करावयाचा असला तरी त्यांस नेहमीं असंतुष्ट ठेवावें असें नीत्शेचें म्हणणें नाहीं. सामान्यतः मध्यम वर्ग उद्योगधंदे व धनोत्पादक कामें करण्यांत गुंग असतो. त्याला मोठ्या आकांक्षा नसतात व आकांक्षा पार पाडण्याइतकी लायकीहि नसते. त्यांचें समाधान बिघडूं देऊं नये. त्यांच्यामध्यें सहकारितेची भावना खोल रुजवावी. प्रकृष्ट वर्गाविषयीं त्यांच्या मनांत भीति उत्पन्न होणें इष्ट नाहीं, दुर्बळ वर्गाच्या योग्यतेनुरूप त्यांना सांगण्यासारखीं पुष्कळ कार्यें असतात तीं त्यांच्याकडून करून घ्यावीं व त्यांना आपल्या जीविताचा वीट येणार नाहीं, अशा मनःस्थितींत

ठेवावें. परंतु मर्यादा उल्लंघन करून भलतीच सत्ता हातीं घेण्याचें कोणीं धाडस करील तर त्याला मात्र क्षमा करितां कामा नये. नीत्शे स्पष्ट म्हणतो कीं, अशा लोकांना डोकें वर काढूं देऊं नये. " War must be made upon accidents, even upon the accidents of the great man. " प्रभु रामचंद्रास ऐकूं आलेली आकाशवाणी नीत्शेच्या या मताशीं हुबेहुब जुळतें ती अशी:—

> शंबूको नाम वृषलः पृथिव्यां तप्यते तपः ।
> शीर्षच्छेद्यः स ते राम तं हत्त्वा जीवय द्विजम् ॥

शंबूकाच्या वधानें ब्राह्मणपुत्र वाचला म्हणजे काय झालें? शंबूकानें केलेल्या मर्यादातिक्रमानें उच्चांच्या प्रगतीस विरोध झाला असता तो वाचला. निकृष्ट वर्गास उच्चवर्णीयांचीं कर्में करण्याची बुद्धि झाली म्हणजे नालायकीमुळें तो हेतु सिद्ध होणार नाहींच. उलट व्यवस्था बिघडून प्रकृष्टांचे पाय ओढल्यासारखें होणार. हें थांबविणें म्हणजेच द्विज वांचविणें, अशी वरील श्लोकांतील कल्पनेची उपपत्ति सांगतां येईल. असो! नीत्शेच्या विचारांपैकीं कांहीं वाचकांपुढें मांडले आहेत. पूर्वी सांगितल्याप्रमाणें यांत माझें असें कांहींच नाहीं. प्रकटीकरणांतील व स्पष्टीकरणांतील दोष फक्त माझे आहेत. ते दूर करण्यास कोणी साहाय्यकर्ता भेटेल तर तें मी आनंदानें स्वीकारीन. अशा व्यक्तीविषयीं माझ्या अंतःकरणांत कृतज्ञता व आदराच्या भावना सदैव जागृत रहातील असा मला स्वतःविषयीं विश्वास वाटतो.

---

## हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचा दुवा
### अर्थात्
# संत कबीरदास

लेखकः नरहर रघुनाथ फाटक, बी. ए., मुंबई.

[ हे भोरचे रहिवाशी असून त्यांचें शिक्षण भोर येथें झालें. १९१५सालीं बी. ए. झाल्यानंतर त्यांनीं कांहीं दिवस लेखनव्यवसायांत घालविलीं. याच काळांत त्यांची

'कमलिनी' प्रभृति कादंबऱ्या त्यांनीं लिहिल्या आहेत. त्यानंतर मुंबई येथें ते 'इंदु-प्रकाशांत संपादक म्हणून होते. याच काळांत त्यांनीं 'न्यायमूर्ति रानडे यांचें विस्तृत चरित्र' प्रसिद्ध केलें आहे. सध्यां ते 'नवा-काळ' पत्रांत सहसंपादक म्हणून काम करीत आहेत. त्यांचें लेखन परिश्रमपूर्वक व विचारप्रधान असें असतें. श्रीसमर्थ रामदासांच्या कार्यासंबधीं त्यांनीं लिहिलेले संशोधनपूर्ण व चिकित्सक लेख प्रसिद्ध आहेत. 'विविध-ज्ञान-विस्तार', 'मनोरंजन', 'विविधवृत्त', 'वसुंधरा' वगैरे नियतकालिकांतून त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. ]

मुसलमानांनीं आठव्या शतकाच्या प्रारंभीं हिंदुस्थानावर चढाई केली असली तरी त्यांचें दळणवळण या देशाबरोबर आधींपासून होतें. चढाई-पूर्वींच्या काळांत हिंदु राजांकडून त्यांना हक्क मिळाले होते. चढाईनंतर हिंदु-स्थान देश हळुहळू त्यांच्या राज्यकर्तृत्वाखालीं गेला व मुसलमानी धर्मप्रसा-राला तरवारीचें साह्य होऊं लागलें; परंतु महम्मद कासमानें पंजाब-सिंध-प्रांत आक्रमण केला, तेव्हां मुसलमान राज्यकर्त्यांना कळून चुकलें कीं, निव्वळ तरवारीच्या जोरावर हिंदुसमाजाला धर्मान्तर करावयास लावणें दुष्कर आहे. त्यांनीं हिंदूंच्या बाबतात सहानुभूतीनें वागण्याला प्रारंभ केला. हिंदुस्थानांत वस्ती करून मुसलमानांच्या कांहीं पिढ्या लोटल्यावर त्यांना हिंदुबांधवांचा व या देशाचा अभिमान वाटूं लागणें स्वाभाविक होतें. यामुळें या दोन समाजांमधील विरोध काढून टाकण्याच्या उद्देशानें दोन्ही समाजाच्या विचारी लोकांत जी वृत्ति उत्पन्न झाली तिची हकीकत विस्तीर्ण, उद्बोधक आणि मनोरंजक आहे. आपसांतील विरोधाचा परिहार भाषेच्या ऐक्यानें सुरू झाला. हिंदु व मुसलमान या दोघांनीं हिंदुस्थानी भाषा स्वीकारली. मुसलमानी राज्यकर्त्यांनासुद्धां पर्शियन अथवा अरबी भाषेचा आग्रह सोडून देवनागरी लिपि व हिंदुस्थानी भाषा यांचा उपयोग जास्त सोयीचा वाटला. हिंदु रीतिरिवाजांना त्यांनीं आपल्या दरबारांत स्थान दिलें याचा अर्थहि सलो-ख्याची भावना अविच्छिन्न चालू राहिली, असा करावयाचा नाहीं. मधून-मधून एखाद्या मुसलमान समाजाचा स्वधर्माभिमान प्रबळ होत असे. त्या-पायीं हिंदु समाजाला कांहीं सुलतानी उत्पात सोसावे लागत. पण पुन्हा अशा माथेफिरूंच्या मागून सलोख्याची घडी जमण्याला उशीर लागत नसे.

ही परस्पर-सहिष्णुतेची लाट खालच्या बहुजन-समाजांत पोंचविण्याचें काम मुसलमानी राज्याबरोबर उदयास आलेल्या साधुपुरुषांनीं केलें. एकमेकांत खटके उडविणारा जो धर्म त्याची परीक्षा व पुनर्घटना या साधुसंतांनीं चालविली. मुसलमानांच्या धर्मवेडेपणामुळें हिंदु समाजाला भोगावी लागणारी आपत्ति विचारांत घेऊन हिंदु साधुपुरुषांनीं धर्माच्या जुन्या व कालानुसार अयोग्य ठरणाऱ्या कल्पना टाकून देण्याचा उपदेश आरंभिला. मुसलमानांचा एकेश्वरी वाद, आपसांतील भ्रातृभाव, वगैरे गुणांसमोर नाना उपास्यांची मूर्तिपूजा, जातिभेदानुसार मानलेला स्पर्शास्पर्श विचार इत्यादिकांनीं व्यापलेला हिंदु धर्म टिकाव धरणार नाहीं, याची जाणीव होऊन चवदाव्या शतकांत रामानुज संप्रदायाचे रामानंद यांनीं उत्तर हिंदुस्थानांत रामभक्तीचा नवा पंथ उभा केला. रामभक्तांमध्यें जातिभेद मानावयाचा नाहीं, अशीं कांहीं या संप्रदायाचीं तत्त्वें होतीं. हिंदु धर्माच्या पुनर्घटनेची तळमळ विचारी हिंदु पुरुषांना लागून रहाण्याचें दुसरें एक कारण म्हणजे हिंदुस्थानांत पसरलेलीं सूफी पंथाचीं मतें हें ध्यानांत बाळगणें अवश्य आहे. या पंथाचे भक्त वेदान्तासारखींच मतें प्रतिपादन करीत असत. सामान्य मुसलमानी धर्माची रचना हिंदु धर्माहून जितकी निराळी तितकींच या संप्रदायाचीं मतें हिंदु धर्माशीं सदृश असल्यामुळें या पंथाचा आश्रय करणें हिंदूंना सुलभ होतें. सूफीपंथाच्या साधूंपैकीं कित्येकांना मुसलमान राज्यकर्ते शिष्य लाभल्यानें अशा राज्यकर्त्यांची मर्जी संपादन करण्याची इच्छा असणाऱ्या महत्त्वाकांक्षी हिंदूंना सूफी साधूंच्या गोटांत शिरणें आवश्यक वाटल्यास नवल नाहीं. पुनः सूफीच्या शिष्यत्वानें स्वधर्महानीचा दोष माथ्यावर बसण्याला जागा नव्हती. परधर्मीयांचीं तत्त्वें आपलींशीं करून हिंदु धर्मीत रहाणारांचा बुद्धिभेद थांबविण्याकरितां हिंदु साधुपुरुषांना आपल्या धर्माची सुधारणा सूफीपंथाच्या धोरणानें करावी लागली. मुसलमानांच्या अमदानींत वाढलेल्या हिंदु भक्तिमार्गाचा इतिहास सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करणारांना त्यावर पडलेली सूफीपंथाची छाया अंधुक अंधुक दृष्टीस पडते. रामानंदांनीं रामोपासनेचा प्रसार करतांना सूफीपंथाला साफ दृष्टिआड केलेलें नाहीं. प्रस्तुत संप्रदायाची गति कुंठित करणें हें हिंदु भक्तिमार्गाचें मुख्य ध्येय असलें तरी मुसलमानी धर्माचारावर कोरडे ओढून

या विषयींचा कडवेपणा कमी करण्याची कामगिरी सूफीपंथानें केली व तिचा फायदा हिंदु भक्तिमार्गाला मिळाला हें कबूल करणें भाग आहे.

रामानंदांनीं हिंदूंना रामोपासनेच्या बैठकीवर आणून हिंदु धर्माला लागलेली कीड मारण्याचा यत्न केला. त्यांचे शिष्य या लेखाचा विषय असलेले कबीरदास होत. त्यांच्या जन्ममृत्यूंच्या काळाबद्दल वाद आहे. चवदाव्या शतकाच्या शेवटीं म्हणजे इ. स. १३९८-९९ त त्यांचा काशी क्षेत्रीं जन्म झाला असा कबीरपंथी लोकांचा समज आहे. ते सुमारें १२० वर्षें जगले व त्यांचा छळ दिल्लीचा सुलतान शिकंदर लोदीनें केला, अशी आख्यायिका रूढ आहे. रामानंदांनीं आपल्या एका ब्राह्मण भक्ताच्या विधवा मुलीला पुत्रवती होण्याचा आशीर्वाद दिला व तो आशीर्वाद कबीरांच्या जन्मानें सफल झाला हा समज कबीरपंथी वाङ्मयांत सर्वत्र आढळतो. लोकापवाद टाळण्याकरितां त्या विधवा स्त्रीनें आपल्या पुत्राला लहर तलाव नांवाच्या जागीं टाकलें व तेथून तें मूल एका मुसलमान कोष्टी बाईनें घरीं नेऊन त्याचें पालनपोषण केलें. हें मूल सात वर्षांचें असतां एकदां रामानंदांच्या पायाखालीं पहांटेच्या अंधारांत गंगेच्या घाटावर सांपडलें. पायाच्या धक्क्यानें वेदना होऊन मूल ओरडतांच रामानंदांनीं 'बाबा, अशा ओरडण्यानें काय होणार ? रामाचें नांव घे.' ( रामनाम कह, रामनाम कह ) असा उपदेश केला. मुलानें चटकन् हाच गुरुमंत्र समजून त्याचें ग्रहण केलें. कबिरांचे गुरु रामानंद कीं मुसलमान फकीर ? याविषयीं दुमत आढळतें. परंतु कबिरांच्या रामभक्तीमुळें या प्रश्नाचा रामानंदांच्या बाजूनें निकाल लागतो. इतकें मात्र खरें कीं, कबिरांच्या उपदेशांत सूफी विचारांचें प्राबल्य बरेंच आहे व त्यांवरून ते जसा हिंदु सत्पुरुषांच्या तसाच मुसलमान फकीर-अवलियांच्या समागमांत काळ घालवीत होते असें मानण्याला प्रत्यवाय नाहीं. हिंदूंचा राम त्यांनीं आपला उपास्य विषय केला. परंतु, या रामाला ते दशरथाचा पुत्र, देवाचा मानवी अवतार मानीत नाहींत. ही स्थिति त्यांच्या विचारावर सूफीमताचा पगडा ध्वनित करते. कबिरांनीं विवाह केला होता कीं नव्हता, याबद्दलहि मतैक्य नाहीं. अखेरीस ते कालवश झाल्यावर हिंदु-मुसलमानांनीं त्यांच्या अंत्य संस्कारानिमित्त तंटा उपस्थित करून शवाच्या जागीं निघालेलीं फुलें वांटून घेतलीं

व दोन्ही समाजांनीं आपापल्या पद्धतीनें कबिरांचें और्ध्वदेहिक उरकलें, ही कथा प्रसिद्धच आहे.

कबिरांच्या वाङ्मयांतील उपदेश सारासार विवेकाला धरून केलेला व सडेतोड स्वरूपाचा आहे आणि त्या उपदेशाची परंपरा पाहूं लागल्यास त्यांच्या आधीं दोन-अडीचशें वर्षें होऊन गेलेल्या मुसलमान फकिरांपर्यंत जाऊन भिडते. हिंदुमुसलमान हा भेद झुगारून दोन्ही समाजांना सारखाच ग्राह्य वाटणारा उपदेश कबिरांच्या आधीं मुसलमान साधूंनीं सुमारें दोनशें वर्षे अव्याहत चालविला होता. कबिरांमागून थोड्याच अवधींत झालेल्या नानक गुरूंच्या बोधसंग्रहांत अशा मुसलमान साधूंचीं वचनें पुष्कळच पाहण्याला सांपडतात. या साधूंचा त्या त्या काळच्या मुसलमान राज्यकर्त्यांकडून धर्माच्या अभिमानानें छळ झाल्याचीं उदाहरणें आहेत. कबिरांनीं या उपदेशसरणीला उत्कट स्वरूप आणलें. मुसलमानी धर्माच्या तडाख्यांत हिंदूंचे आचार भ्रष्ट बनले होते. हिंदूंच्या सहवासांत मुसलमान देखील औपचारिकरीत्या आपले धर्माचार पाळून दिवस काढीत होते. दोघांच्या धार्मिक अवस्था शोचनीय असतांहि धर्माचा अभिमान हा मनोविकार असा आहे कीं, तो या शोचनीयत्वाकडे माणसाचें लक्ष जाऊं देत नाहीं. उलट भ्रष्ट स्थितींतसुद्धां हा विकार माणसांमध्यें परधर्माविषयीं असहिष्णुता जागृत राखतो. कबिरांनीं दोन्ही समाजांच्या या धार्मिकपणावर सत्याच्या अभिनिवेशानें आग पाखडली आहे. त्यांच्या पुढील पदावरून उपदेशाचें धोरण कळेल.

'दुई जगदीश कहा ते आये कहू कौने भरमाया ।
अल्ला राम करीम केशव हरि हजरत नाम धराया ॥
गहना एक कनकते गहना तामे भाव न दूजा ।
कहन सुननको दुइ कर थापे एक नेवाज एक पूजा ॥
वही महादेव वही मोहम्मद ब्रह्मा आदम कहिए ।
कोई हिंदू कोई तुरुक कहा वै एक जमीपर रहिए ॥
वेद किताब पढे वे कुतबा वे मोलना वे पांडे
बिगत बिगत कै नाम धरायो यक माटीके भांडें ।

कह कबीर वे दोनों भूलें रामहि किनहु न पाया ॥
वे खसिया वे गाय कटावै बादे जन्म गवांया ॥

दोन ईश्वर आले कोठून? हा भ्रम कोणीं उत्पन्न केला? एकाच देवानें अल्ला, राम, करीम, केशव, हरि हीं नांवें धारण केलीं आहेत. ज्याप्रमाणें सोनें व सोन्याचा दागिना यांमध्यें फरक असत नाहीं, त्याचप्रमाणें हा प्रकार आहे. सांगण्याऐकण्यानें हा भेद उत्पन्न झाला व एकाच विधीला निमाज व पूजा अशीं निराळीं नांवें पडलीं. जो महादेव तोच मोहम्मद असून ब्रह्मयालाच दुसरें नांव आदम देण्यांत आलें आहे. एकजण स्वतःला तुर्क म्हणवितो, दुसरा हिंदु म्हणवितो, परंतु दोघांची वस्ती एकाच भूमीवर आहे. एकानें ज्ञानाच्या ग्रंथाला वेद असें नांव दिलें आहे. दुसरा तोच विषय कुतबा या नांवानें ओळखतो. विद्वानाला मौलाना व पंडित अशीं दोन भिन्न नांवें ठेवलेलीं आहेत. भिन्नता आढळली तरी मूळ हे दोन्ही प्राणी एकाच मातीचीं भांडीं होत. कबीर म्हणतातः—शब्दभेदाच्या कटकटींत सांपडून हे दोघेहि बुद्धिभ्रंशाच्या फेऱ्यांत पडले आहेत व दोघांना रामाची प्राप्ति होणें शक्य नाहीं.

कबिरांनीं हिंदु व मुसलमान या दोन्ही समाजांतील पोकळ अथवा दांभिक आचारविचारांची हजेरी ज्यांत घेतली आहे, अशा कविता पुष्कळच केल्या आहेत. व कबीरपंथी संशोधकांचें म्हणणें आहे कीं, अद्यापि कबिरांचा सगळ्या कवितेचा पत्ता लागलेला नाहीं. दोन्ही समाजांची कानउघाडणी करणाऱ्या कबिरांनीं आपला पंथ कोणत्या आचारविचारांच्या आधारानें उभारला हें पाहूं गेल्यास त्यावर हिंदुधर्मतत्त्वांची छाया विपुल दिसते. भागवतपुराणाचा काल आधुनिक विद्वानांच्या मतानें कोणताहि असला तरी एवढें मात्र खरें कीं, बाराव्या शतकापासून पुढें कांहीं शतकें श्रीमद्भागवताचा पगडा हिंदुधर्म-विचारावर जबरदस्त बसलेला आढळतो. भक्तिमार्गाचें पोषण एका भागवतानें या काळांत जितकें केलें तितकें दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथानें केलेलें नाहीं. भागवतामधील तत्त्वज्ञान, भागवतांत सांपडणाऱ्या भक्तांच्या कथा यांच्या कबीरवाङ्मयांतील निर्देशावरून कबिरांच्या अभ्यासांत भागवताचें प्रमाण मोठें होतें असा तर्क करतां येतो. कबिरांनीं अभ्यास केला म्हणजे स्वतः त्यांनीं हे ग्रंथ वाचले असें म्हणतां येत नाहीं. साधुसंतांच्या संगतींत राहून त्यांनीं

भागवतामधील वेदान्ताचें ज्ञान संपादन केलें आणि मानवी व्यवहाराच्या अवलोकनाचा व स्वतःच्या अनुभवाचा त्या ज्ञानाला संस्कार देऊन आत्मरचित स्वयंस्फूर्त कवितेच्या द्वारें त्याचें जगाला दान केलें अशी त्यांच्या अभ्यासाची परंपरा एकंदर माहितीवरून दाखवितां येते. धर्मविचारांचें आविष्करण हिंदु धर्मग्रंथांच्या परिभाषेच्या साह्यानें व्हावें यांत आश्चर्य कांहींच नाहीं. मुसलमानांचें वास्तव्य हिंदुस्थानांत शेंकडों वर्षें होऊन इकडच्या रीतीभातींमध्यें त्यांच्या बुद्धीची पिढ्यानुपिढ्या वाढ सुरू झाल्यामुळें अरबस्तानइराणच्या विचार-परंपरेची व त्यांची साहजिकच ताटातूट घडून आली. अशा स्थितींत इतर मुसलमान ग्रंथकारांनीं ज्याप्रमाणें हिंदुशास्त्रांचा आश्रय घेऊन वाङ्मय निर्माण केलें त्याप्रमाणें मुसलमान साधुसंतांनीं अध्यात्मशास्त्राची हिंदु परिभाषा स्वीकारावी हें स्वाभाविक आहे. कबिरांच्या कवितेंत यामुळें भक्तिमार्गाच्या हिंदु कल्पना, हिंदु समजुती, हिंदु दृष्टान्त यांचा भरणा रेलचेल झालेला आहे. इतकेंच नव्हे तर विश्वाची उत्पत्ति, स्थिति व लय, परब्रह्म आणि माया, पंचमहाभूतें, त्रिगुण, ब्रह्मा विष्णु-महेश, सप्तलोक, निर्वाण, सद्गुरुमहिमा इत्यादि सारे विषय त्यांच्या कवितेंत थेट हिंदु पद्धतीनेंच आलेले आहेत. मायेच्या कर्तृत्वासंबंधीं जशीं कूटें हिंदु साधूंनीं रचिलीं आहेत, तशींच कबिरांच्या कवितेंतहि आहेत. हिंदु व मुसलमान या दोन्ही समाजांला कबीरदास वंद्य झाले व दोन्ही समाजांतील तत्त्वजिज्ञासु सदर वाङ्मयाचा अभ्यास मोठ्या आस्थेनें करतात हें ध्यानांत आणलें तर कबिरांच्या काळांत अध्यात्मविचारापुरती हिंदुमुसलमानांची बैठक एक होती हें कळण्यास उशीर लागणार नाहीं.

कबिरांचें वाङ्मय अफाट असून त्यांतील विषय तसेच बहुविध व इतक्या भिन्न भिन्न प्रकारांनीं मांडलेले आहेत कीं, उताऱ्यांची निवड थोडक्यांत समाधानकारक होणार नाहीं. ज्यांना शक्य असेल त्यांनीं मुंबईच्या श्रीव्यंकटेश्वर प्रेसमार्फत प्रसिद्ध झालेल्या मूळ ग्रंथांपैकीं बीजक शब्दावलि वगैरे ग्रंथ पहावे. हिंदी भाषेच्या अनेक प्रकाशकांनीं कबिरांच्या उताऱ्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं असून संक्षेपांत कबिरांच्या उपदेशाचा परिचय करून घेण्याला काशी-नागरि-प्रचारिणी-सभेच्या मनोरंजक-पुस्तक-मालेंतील कबीर-वचनावलि हें पुष्प उपयोगी आहे. भाषा जुनी व तिच्यांत पुनः अपभ्रष्ट शब्दांचा

मुळमुळाट, शिवाय मुद्रण-पिशाचांचा धुडगूस, यांमुळें अर्थग्रहण झटकन् होत नाहीं हें खरें; परंतु विचार साधारणतः परिचयाचे आणि रचना साधी म्हणून तर्कानें फारशी चूक न होतां अर्थ गळीं उतरतो. कबिरांची कविता प्रायः दोहरा वृत्तांत जास्त असून बरीच निरनिराळ्या पदांच्या चालींवर आहे. यांतील कांहीं लोकप्रिय पदें आबालवृद्धांच्या तोंडून ऐकूं येतात. कोणताहि विचार घेतला तरी त्यावर कित्येक बिनमहत्त्वाच्या गोष्टींनीं मळ चढतो आणि त्याचा मूळ उद्देश झांकून जातो. कबीरसाहेब विचाराचें शुद्ध स्वरूप अगदीं सोप्या व नित्य अनुभवाच्या दृष्टान्तानें दाखवून देतात. पुष्कळदां ही त्यांची साधी सरळ विवेचनपद्धति मर्मभेदक वाटते. 'इस तनधनकी कौन बढाई, देखत नैनोंमें मट्टी मिलाई।' या ओळखीच्या पदाचें विवरण केल्यास त्याच्या उपदेशाची चुणूक समजेल. पुढील अंतऱ्याच्या चरणांतून त्यांनीं मनुष्य मेल्यावर त्याचीं हाडें लांकडाच्या मोळीप्रमाणें जळतात, केस गवताच्या पेंढीप्रमाणें भस्म होतात, वगैरे अवस्था वर्णिलेली आहे. वर्णनांत दुर्बोध भाग नाहीं. कल्पनाशक्तीला ताण देऊन अर्थ उलगडावा लागत नाहीं. परंतु वर्णनाचा साधेपणाच कठोर भासून त्याचा मनावर परिणाम घडतो. सामान्य उपदेशाचा भाग असा कळण्याला सोपा असला तरी कांहीं भागांत योगांतील गूढें आहेत. हीं गूढें विचारांत घेऊन त्यांचा ऊहापोह 'कबीरका रहस्यवाद' ( Mysticism ) नांवाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत एका हिंदी विद्वानानें केला आहे. हिंदुस्थानांत जवळ जवळ ४०-५० लाख हिंदुमुसलमान कबीरपंथी असून त्यांचीं संमेलनें भरतात. एक मासिक पुस्तक कबीरपंथामार्फत प्रसिद्ध होत असतें. कबिरांचा उपदेश आणि कबीर-सांप्रदायिकांचा व्यवहार समजण्याला उपयोगी अशी सदर मासिकांतून बरीच सामग्री बाहेर पडत असते. कबीरपंथी साधु बाबा युगुलानंद यांनीं कबिरांच्या ग्रंथांचें संशोधन, संपादन व विवरण आज अनेक वर्षें चालविलें असून त्यांच्याच प्रयत्नानें श्रीव्यंकटेश्वर प्रेसमार्फत कबिरांचे बरेच मोठाले ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत.

कबिरांनीं हिंदु-मुसलमानांतील धर्मभेदाची तीव्रता घालविण्याचा उद्योग आपल्या उपदेशानें जन्मभर केला. त्यांच्या काळानंतर नानकांनीं तीच परंपरा

अंमलांत आणली. पूर्वेस चैतन्य आणि दक्षिणेस वल्लभाचार्य यांनीं भक्ति-मार्गावर हिंदुमुसलमानांना एकत्र आणण्यांत यश संपादन केलें. हल्लींच्या राजकीय परिस्थितींत जुन्या भेदभावांना प्रखरत्व आलेलें आहे. तथापि हिंदी राष्ट्राचा उद्धार करावयाचा झाल्यास कोणते उपाय स्वीकारणें अवश्य आहे, याचें शिक्षण कबिरांच्या वाङ्मयांत सांपडतें. सर्व जातींच्या, धर्मांच्या व पंथांच्या लोकांना कबिरांचीं वचनें आवडतात. कारण मानवी जीवनाचा प्रवाह मुळांत शुद्ध असून त्याच्या शुद्धत्वाची विवेचना करणारांना कबिरांचें वाङ्मय मार्गदर्शक ठरतें. मूळचा प्रवाह शुद्ध, त्याची गति स्थिति सर्वत्र सारखीच. पण देश, धर्म, जात, पंथ, कुळ वगैरे उपाधि त्याला फांटे फोडतात, फांट्या-फांट्यांत विरोध असल्याचें दर्शवितात. कबिरांनीं अशा उपाधींच्या पडद्यामागील शुद्ध जीवनप्रवाह दिसण्याची शक्ति आपल्या उपदेशानें पुरविली असून तिच्या योगानें देशोद्धाराची स्फूर्ति झाल्याचीं दोन आधुनिक उदाहरणें सांगितल्यास अस्थानीं होणार नाहींत. कै. ज्योतिबा फुले व लोकहितवादी या दोघांना लहानपणीं पुण्यांत राहणाऱ्या एका कबीरपंथी वैराग्याच्या सहवासांत कबीर वाङ्मयाचा अभ्यास घडला व देशाच्या उन्नतीचें कार्य स्वीकारण्याची स्फूर्ति झाली अशी आख्यायिका आहे. कबिरांच्या उपदेशाचें परिशीलन केल्यास खोट्या मनोविकाराच्या निरसनाला मदत झाल्याशिवाय रहाणार नाहीं. हेच मनोविकार आपल्या प्राबल्यानें मनुष्या मनुष्यांत झगडे उत्पन्न करीत असतात. त्या मनोविकारांचें दुष्टत्व ध्यानांत येऊन त्यांच्या त्यागाचा प्रयत्न होऊं लागल्यावर ऐक्याशिवाय दुसरें पर्यवसान घडणें शक्य नाहीं.

---

## भोर संस्थानांतील लेखक व कवि

### लेखक : गोविंद महादेव भिडे, अमळनेर.

[ हे भोरचे रहिवासी होत. त्यांचा जन्म पुण्यास सन १८८८ मध्यें झाला. भोर हायस्कूलमध्यें शिक्षण होऊन १९०५ मध्यें प्रवेश परीक्षा पास झाले. हल्लीं अंमळनेर येथें ते वकिली करतात. त्यांचे विविधज्ञानविस्तार व काव्यरत्नावली यांतून लेख व कविता येतात. ]

मराठीशाहीचे जे थोडेसे अवशिष्ट भाग आहेत, त्यांतच भोर संस्थानची गणना होते. त्याच्या उत्तरेस व वायव्येस कुलाबा जिल्ह्याची हद्द लागली आहे. ईशान्येस सह्याद्रीच्या रांगा असून पूर्वेस पुणें व सातारा या दोन जिल्ह्यांच्या सरहद्दी भिडल्या आहेत. या संस्थानचें क्षेत्रफळ सव्वानऊशें चौरस मैल आहे व लोकसंख्या सुमारें पावणे दोन लाख इतकी भरेल. विचित्रगड, राजगड, प्रचंडगड, पौन मावळ व सुधागड असे त्याचे पांच तालुके ऊर्फ महाल असून त्यांत एकंदर ५०२ लहानमोठीं गांवें आहेत. वरीलपैकीं विचित्रगड तालुका म्हणजे सगळ्या संस्थानचा एकपंचमांश भाग सोडला तर बाकीचा मुलूख डोंगराळ आहे. तथापि ऐतिहासिक दृष्ट्या तो अत्यंत महत्त्वाचा ठरेल. शिवपूर्वकालापासून गाजत असलेल्या सह्याद्रीच्या बारा खोऱ्यांपैकीं रोहिडें, वेळवंड, कानद, मोसें व मुठें अशीं पांच प्रचंड खोरीं या संस्थानच्या हद्दींत आहेत. तसेंच एका काळीं युद्धोपयोगी झालेल्या डोंगरी किल्ल्यांपैकीं रोहिडा, तुंग, तिकोना, सरसगड, भोरप हे किल्ले या संस्थानी मुलुखाला शोभवीत आहेत. राजगड व प्रचंडगड ऊर्फ तोरणा हे किल्ले तर मराठी राज्याच्या उदयकाळीं त्याचे आधारस्तंभ होते, असें यथार्थतेनें म्हणतां येईल.

भोर संस्थानचें हें जें वर्णन दिलें आहे, त्यावरून पाहतां तेथील मुलुख मुख्यत्वेंकरून डोंगराळ आहे व डोंगराळ भागांत राहणारे लोक नेहमीं काटक व श्रमजीवी असतात असा भौगोलिक सिद्धांत आहे. पण त्याबरोबर असेंहि येथें घडून आलें आहे कीं, धान्याच्या पिकाप्रमाणें वाङ्मयाच्या पिकाला हें क्षेत्र निकामी ठरलें. भोर संस्थान लहान असलें तरी बौद्धिक वंध्यपणाचा क्षेत्रज दोष पुण्याखालील बाराहि खोऱ्यांत आढळून येतो, त्यामुळें शिवाजीच्या उदयाबरोबर तेथल्या मराठ्यांनीं जशी आपली क्षात्रवृत्ति जगाच्या निदर्शनास आणून दिली, तशी वाङ्मयाची चमक या मावळी प्रांतांत झळकल्याची कोठेंच खूण दिसत नाहीं. कवि अगर शाहीर उदयास येण्याचें राहोच, पण कोणी लेखक देखील येथें उत्कर्ष पावलेला आढळांत नाहीं. बाजीप्रभु देशपांडे यानें आपली तरवार गाजवून शौर्याच्या दृष्टीनें उज्ज्वल कीर्ति संपादन केली; परंतु लेखणीच्या जोरावर आपलें नांव कमावणाऱ्या बाळाजी

आवजीसारख्या एखाद्या वाकबगार चिटणिसाला अगर शब्दद्वारां वीररसाचें चित्र रंगविणाऱ्या प्रभाकरासारख्या एखाद्या उमद्या शाहीराला या मुलखानें जन्म दिला नाहीं. जेधे खोपडे अगर जेधे बांदल यांचें देशमुखीबद्दल परस्परांविरुद्ध चाललेलें चढाईचें धोरण या प्रांतांत वरचेवर दृष्टीस पडे. पण फडावरील कलगीतुऱ्यांच्या चुरशीच्या सामन्याचे पडसाद मात्र येथें ऐकूं येण्याचा कधींच प्रसंग आला नाहीं. या कारणानें येथल्या प्राचीन लेखकवर्गाचा जर उल्लेख करणें झाला तर त्यांत पत्रें, करीने, महजरनामे यांसारख्या व्यावहारिक लिखाणांच्या लेखकांचाच समावेश होऊं शकेल. इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं प्रसिद्ध केलेल्या खंडांमध्यें या प्रांतांत लेखकांचीं जीं कांहीं पत्रें प्रसिद्ध केलीं आहेत, त्यांत शंकराजी नारायण व नारो शंकर या दोघांचीं पत्रें आहेत. शंकराजी नारायण हा जात्या कारकुनी पेशांत वाढला होता, ही गोष्ट त्याच्या पत्रलेखनावरून सहज दिसून येते. रोहिडखोऱ्याचा अंमलदार जो कृष्णाजी दादाजी प्रभू यास शंकराजी नारायण यांनीं लिहिलेलीं जीं कित्येक पत्रें उपलब्ध आहेत, त्यांवरून पाहतां शंकराजीचे अंगीं खंद्या कारकुनास शोभणारें कलमबहादुरीचें केवढें कसब होतें या गोष्टीचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाहीं. ‘ मावळ प्रांतांत गनिमांनीं चाल केली आहे म्हणोन समजलें. त्यास कोरल खिंड, ढवळा घांट व मांढर देवचा सडा येथील जागा चौक्या घालून गनिमाची खबर ठेवून कमकसूर खाश बातमी करणें + + + राजगडीं कळवितांच तुमची कुमक रोहिड वगैरे जागाहून होईल. तुम्ही सिरवली मर्दमु चांगली केली हे खबर येथें समजली. या वेळीं गनीम नामोहरम सर्वांनी करावा. तुम्ही जमेदार व सरचाकर माहाराजाचे वेळचे. +++ करोन दाखवतील हा भरंवसा आहे.’ (खंड १५, ले. २८०) हें पत्र शके १६०८ (सन १६८६)चें आहे. त्या वेळीं शंकराजी नारायण हे रामचंद्र आबाजी याचे लष्करांत हुद्याच्या जागेवर असून मावळ भागाची त्यांस पूर्ण माहिती होती. वरील पत्र ज्यास उद्देशून लिहिलें आहे, त्यास त्यांनीं त्या प्रसंगीं काय करावयास पाहिजे हें सुरुवातीस एखाद्या परिचिताप्रमाणें स्पष्ट सांगितलें आहे. तथापि इतक्या निक्षून सांगितलेली कामगिरी नोकराकडून उत्तम रीतीनें पार पडावी म्हणून मुद्दाम त्याच्या मागील कर्तबगारीचा उल्लेख

करून बेतशीर पण उत्तेजित शब्दांनीं त्याचा गौरवहि करण्यास लेखक चुकला नाहीं. एकंदर भाषा देखील असंदिग्ध व ठासीव आहे. हें एक नेहमींच्या व्यवहारांतील पत्र असतांहि त्यांत लेखनाची शिताफी दिसावी, ही खरोखर लेखकाच्या उत्कृष्टपणाची खूणगांठ होय. शंकराजीप्रमाणें नारो शंकर याचींहि पत्रें वरील खंडांत आलीं आहेत. तींहि त्याच्या वडिलांसारखींच उतरलीं आहेत. विशेषेंकरून भोरसंस्थानच्या इतिहासांत दरबारांतील टिपणांमधून सन १७३४ चें पत्र दिलें आहे. त्यावरूनहि नारो शंकराचें लेखनचातुर्य लक्षांत येईल. पत्राप्रमाणें करीना ऊर्फ घराण्याची कैफियत लिहून ठेवण्याची पूर्वापार वहिवाट असे. असे करीने इकडील घराण्यांतून लिहिले गेले आहेत. त्यांतला जेधेदेशमुखांचा करीना नमुन्यादाखल घेतां येईल. सरल वृत्तकथन हें त्या करीन्याचें वैशिष्ट्य असून मोठ्यांबरोबर बारीकसारीक गोष्टींचेंहि आक्रमण करीत करीत हकीकतीचा ओघ निर्वेधपणें चाललेला भासतो. भानजी नाईक जेधे यानें देशमुखीबद्दलचा बादशाही परवाना मिळवून शिरवळाहून उत्रवलीस जात असतांना वाटेंतल्या गाडे खिंडींत खोपड्यांनीं दबा धरून त्याला ठार केलें व शेजारच्या विंगच्या डोहांत तो परवाना बुडवून उत्रवलीमधल्या जेध्यांच्या मुलामाणसांना लुटलें. पुढें भानजीचा मुलगा कान्होजी थोर झाल्यावर त्यानें लग्नानिमित्त करनवडें येथें जमलेल्या खोपडे मंडळींवर अचानक छापा घालून सबंध लगीनच्या लगीन ठार केलें. अशी प्रारंभीं कलागतीची सविस्तर हकीकत देऊन पुढें दोन्ही पक्षांत जो समेट झाला त्यासंबंधीं करीनाकार लिहितो, ‘ आपले वडील कान्होजी नाईक यास व खोपवडीयांस जमा केलें. त्यास सिरवलीच्या वडाखाले दिवाण व गोत बोलिलेजे; पातशहांनीं जेधियास देशमुखी दिली हे गोष्टी; परंतु खोपडीयांनीं जेधियाचा मारा केला व जेध्यांनीं खोपडियांचें वऱ्हाड मारिलें. त्यामुळें खून दुतर्फा झाले आहेत. याकरितां देशमुखी दों जागा वाटावी ऐसा निर्वाह करून दोन तर्फांच्या दोही वाटण्या करून चिठिया लेहून श्रीदेव मौजे आंबवडें येथें टाकिल्या; त्यांत वरले तर्फेची चिठी जेध्यांच्या हातास आली, उत्रौलीतर्फेची चिठी खोपडियाचे हातास आली.’ ( खं. १५, ले. ३०२ ). हा लेख वस्तुतः व्यावहारिक स्वरूपाचा असतांहि

लेखकानें किती वळसे घेऊन ती हकीगत सांगितली आहे हें समजून येईल. सध्यांच्या कायदेशीर पुराव्याच्या दृष्टीनें कदाचित् त्यांतला बराचसा मजकूर अनुपयुक्त ठरेल, पण एकंदर हकीकतींतील कार्यकारणभावाचा केव्हांहि व कोणालाहि नीटसा उमज पडावा, या हेतूनें लेखकानें ब-याच आजूबाजूंच्या गोष्टींचाहि उल्लेख करून त्या हकीकतींत सुसंबद्धता राखण्याविषयीं शक्य तेवढी खबरदारी घेतलेली दिसते. याच हकीकतीचा दुसरा एक करीना खंड १६, ले. १, मध्यें छापला आहे. तो वरच्यापेक्षां अधिक तपशीलवार असल्यानें प्रसंगोपात घडलेला विनोद व दैविक प्रभाव यांचाहि त्यांत उल्लेख सांपडतो. कान्होजी नाइकानें रोहिड्याचे हकीमास आईमाई जेरबेटी केली असतां नाइकानें व त्याच्या सहा मुलांनीं त्या कृतीचा इन्कार केला. तेव्हां हकीमानें कान्होजीचा सर्वांत धाकटा मुलगा नाइकजी यास त्याबद्दल विचारिलें; तेव्हां त्यानें उत्तर केलें कीं, 'सत्य असेल तेंच मी सांगेन. खास चाकर पण आपण धनी हाकीम म्हणजे आमचे जमीदाराचे मायबाप! तेव्हां आईस शिवी दिली, तिचा उच्चार माझे मुखीं मी कसा करूं? सर्वस्वें मायबाप धनी आहेत. सर्व अपराध माफ केले पाहिजेत.' या विनोदप्रचुर उत्तराचें हकीमासच काय पण कोणासहि कौतुक वाटल्याखेरीज राहणार नाहीं. हकीमानें तर त्या वराण्याचा शिक्का कान्होजीजवळून घेऊन नाइकजीचे स्वाधीन केला. लेखकानें पुढील मजकुरांत जेधे व बांदल यांच्या मधील दाइत्याबद्दलच्या तंट्याची हकिकत देतांना एका दैविक प्रभावाचा उल्लेख केला आहे. 'कृष्णाजी नाईक बांदल यानें झुंझास निघतांना आपली स्त्री दिपाबाइच्या पायांत बेडी घालून ठेविली होती. नाइकानें जेध्यांबरोबर अनेक झुंझ केले; परंतु कांहीं केल्या त्यांत यश येईना. त्या वेळीं कडतोपंताच्या वडिलानें नाइकास सांगितलें कीं दिपाबाइच्या पायांत बेडी घालून तुम्ही ठेविली तोंपर्यंत तुम्हांस यश येत नाहीं. तुम्ही दिपाबाइची बेडी तोडून टाकून सन्मान करणें. दिपाबाइनीं तुम्हांस व सर्व लोकांस ओंवाळून लोकांस आशीर्वाद दिला म्हणजे तुम्हांस यश येईल.' असें बोलून 'यांत खोटें झालें तर आम्हांस शासन करावें.' अशी खात्री दिली. या सांगण्याप्रमाणें दिपाबाईच्या पायाची बेडी काढून व न्हाणी घालून तिला पाटाव नेसावयास दिला. दिपाबाईनें

पाटाव नेसून व हातीं पंचारति घेऊन नाइकास व त्याच्या सर्व लोकांस ओंवाळिलें व त्यांस आशीर्वाद दिला कीं, 'तुम्ही झुंजास जाणें. तुम्हांस यश येईल. परंतु तुम्ही नदीपार न जाणें. नीरेचे अलीकडे झुंजावें.' दिपाबाइचे सांगीप्रमाणें बांदलांनीं जेध्यांना कासार खिंडींत गांठून त्यांचे तीनशें असामी ठार केले व दहा घराणीं बसविलीं. याच झुंजांतील पुढची एक मौजेची हकिगत खं. १५, ले. ३६३, यांत दिली आहे. जेध्यांचा पराभव करून त्यांना कारीपावेतों पिटीत नेऊन कृष्णाजी नाईक बांदल माघारा येत असतांना वाटेनें त्याच्या डोईचें मुंडासें आमलाच्या मदानें त्याला न कळत झोट धरणींत पडलें. बरोबर चाललेल्या बाजी प्रभु देशपांडे यानें तें उचलून आपल्या तोबऱ्यांत घातलें. मुंडासें गेल्याचें जेव्हां नाइकाचे लक्षांत आलें तेव्हां तो खजिल होऊन बोलला 'बाजी प्रभु, एक दोन लढाया झाल्या, परंतु आज फत्ते झाली. (पण) जेधोजीचें शीर मात्र नेलें.' तेव्हां बाजी प्रभु यांनीं उत्तर दिलें, 'तुम्ही बारा मावळांत यशवंत आहां. तुमचें इतर काम होईल.' असें म्हणून घोड्यावरून उतरून आपले तोबऱ्यांतून मुंडासें काढून दिलें. तें बांधून मग बाजीबाबास पोटाशीं धरुन बोलले जे 'बाजी प्रभु, तुम्ही शर्थ केली.' वरील दोन्ही हकीगती खरोखर व्यावहारिक करिन्यापेक्षां एका अद्‌भुतरम्य कथानकालाच शोभणारी आहे. त्या सांगतांना लेखकानें शब्दविस्तार न करितां केवळ सूचकार्थानेंच त्यांतील मर्म पटविलें आहे. यांत खरोखर यांचें लेखनकौशल्य दिसून येतें. करीन्याप्रमाणें अर्ज हाहि एक गद्यलेखनाचा प्रकार समजण्यास हरकत नाहीं. खालीं दिलेला अर्ज खान अजमनबाब याजकडे गुंजणमावळच्या महिपाजी देशमुखानें केला आहे. 'आपले वडिलांनीं एकतारी धरून खिजमती बहूतच केली; त्यामुळें या राज्यांत आपले वडिलांस तलबखानें कितेक प्रकारें खराबी झाली. आपले दादे हैबतराव तोरणे गडावर बंदखानी कित्येक दिवस कुदलों. अखेर खंडदंड देऊन जीवमात्र सुटलों. कांहीं उबर राहिला नाहीं. हाली साहेबाचे बांदगीस कागदपत्र पाठविला नाहीं. तूर्त आपले शरीरीं आजार आहे म्हणून बांदगीस यावयास अनुकूल पाडिले नाहीं. आपले भाऊ बांदगीस आले आहेती. आमचे तख्त

जागा साहेब आहेती, ते आम्हांस जागा आहेती. आपली सर्फराजी करा-वयासी धणी मायबाप आहेती. बांदगीस रोशन होए हे अर्जदास्त ' (खं. १७, ले. ६ ). या अर्जावर जरी सालाचा निर्देश नाहीं, तथापि एकंदर संदर्भावरून हें शिवपूर्वकालीन लिखाण दिसतें. भाषेंत फारशी शब्दांची व वाक्प्रचारांची रेलचेल आहे. त्याचप्रमाणें परकीय अधिकाऱ्यांशीं वागतांना भाषेच्या दृष्टीनें किती जपून वागावें लागतें, याचेंहि चित्र वरील अर्जांत पाहा-वयास मिळतें. करीना व अर्ज तयार करणाराचें नांव त्यांत नमूद नसल्या-कारणानें तो लेखक कोण हें सांगणें अशक्य असलें तथापि, कुळकर्णी हाच सामान्यत: त्या काळचा लेखकवर्ग होता. तेव्हां त्याच वर्गापैकीं त्या गांवीं राहणारा कोणीतरी लेखक असला पाहिजे. प्रकृत ठिकाणीं व्यक्तीपेक्षां त्या काळचें लेखन कसें होतें याचा नमुना म्हणून तद्विषयक दोन उतारे वर दिले आहेत.

त्यानंतर म्हणजे १९ वे शतकाचे पूर्वार्धांत, सातारच्या दरबारचा एक वकील रंगो बापूजी देशपांडे याचा वतनाविषयींचा अर्ज खं. १५, ले. ३२३, यांत आला आहे. हा लेख सन १८३१ च्या सुमाराचा आहे. अर्ज बराच लांबलचक असतांहि त्यांतील तुटक तुटक वाक्यें बोलभाषेच्या वळ-णाचीं असल्यानें तीं वाचतांना त्यांतला पाल्हाळ कंटाळवाणा होत नाहीं. ' नंतर साहेब यांनीं श्रीमंतास हा मजकूर विचारून, बखर लिहून आणवावी सांगितलें. त्यावरून पुणें मुक्कामींच दादासाहेब चिटणिसांनीं बखर तयार करून दिल्ही. त्यानिमित्त गारपिरावर त्यांनीं मला बंगल्यास पाठविलें. निरोप सांगितला कीं, पेशवे यांजकडून महाराजास किल्ल्यावर फार अडचण होती, ते धणी व बाजीराव हे महाराजांचे चाकर असतां असें होतें. तों त्यांनीं सांगितलें कीं, तुम्हीं हें राजकारण महाराजांस कळवून करतां किंवा कसें ? मग परत मीं चिटणीसास सांगितलें. त्यांनीं सांगून पाठविलें कीं, महारा-जांस किल्ल्यावर फार अडचण, त्यांचें दर्शन होणें फार कठिण आहे, त्यांज-वर साहेबांनीं सांगितलें कीं, 'हरप्रयत्नानें त्यांस कळवून करणें तें करावें.' ' (पान ३२८ ) अर्जासारख्या व्यावहारिक मजकुरामधील भाषेचा शुद्ध घर-गुती थाटमाट पाहिला तर राजकारण व सामाजिक जीवन यांच्या आमच्या

मराठशाहींतील एकवटपणाची चांगलीच जाणीव होते. या गोष्टीचें प्रत्यंतर त्या वेळच्या एका समकालीन परंतु अव्वल इंग्रजी राजवटींत प्ररूढ झालेल्या मराठी भाषेच्या तुलनेवरून दिसून येईल. ‘ धुकें आणि दंव पडूं लागलें म्हणजे ऋतु बदलला पाहून चित्त विरस होतें आणि भयंकर मेघगर्जनेसहित विद्युल्लता चमकूं लागली पाहून सर्व शक्ति जो भगवंत त्याचे सामर्थ्याचें स्मरण होतें; परंतु हे चमत्कार नाहींसे झाले आणि वायु मंदशीतल वाहूं लागला म्हणजे मनुष्य हे विचार सोडून देतात आणि पदार्थविज्ञानी आहेत ते मात्र सृष्टींतील वस्तूंचा विचार करीत बसतात.’ ( मराठी ग. इं. अवतार, पान २३ ) हाहि उतारा १८३१ सालीं प्रसिद्ध झालेल्या ‘ सारसंग्रह ’ या पुस्तकाच्या प्रस्तावनेंतील आहे. वरील दोन्ही लेखांचा जन्म जरी एकाच वेळीं झाला असला तरी पाहिल्यांतील घरगुती भाषा दुसऱ्यांत नाहीं. दुसऱ्यांची भाषा केवळ ग्रांथिक स्वरूपाची आहे.

येथें जुन्या मराठी वाङ्मयाचा काळ संपतो. त्या काळांत पत्रें, करीने, अर्ज ह्यांसारख्या प्रासंगिक, प्रापंचिक व व्यावहारिक लिखाणांचें इतर ठिकाणांप्रमाणें येथेंहि प्राचुर्य दिसतें. हें लिखाण कै. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें खरोखर ‘ जुन्या कदीम रिसायतेंतील अवशेषें ’ होत. मराठेशाहीमध्यें इभ्रतीचें व तालेवारीचें बोलणें कसें चालत होतें, त्याचें यथार्थ ज्ञान त्यावरून होतें. इतिहासकार सरदेसाई यांनीं जुन्या कागदपत्रांसंबंधीं लिहितांना असें म्हटलें आहे कीं, ‘ या ऐतिहासिक कागदांत दिसून येणारी भाषा साधी व मार्मिक आहे. दरएक विषय स्पष्ट व जोमदार शब्दांनीं व्यक्त केलेला दिसतो. तथापि लेखकाचें लक्ष आपल्या कामाकडे होतें, भाषेकडे विशेष नव्हतें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.’ ( म. सा. पत्रिका व. ४ अं. २, पा. ५९ ) जुन्या कागदपत्रांत आढळून येणारे गुण थोड्याफार अंशानें इकडच्याहि जुन्या प्रतीच्या लिखाणांत दिसून आल्यावांचून राहणार नाहींत.

यानंतर ज्यास ग्रंथ हें नांव यथार्थतेनें देतां येईल असा ‘ शिवाजी महाराजांच्या वंशाचा व प्रतिनिधि व अष्टप्रधान यांचा इतिहास ’ साताऱ्याच्या दप्तरांतील माहितीवरून भोर दरबारचे चिटणीस विष्णु गोपाळ भिडे यांनीं १८६५ सालीं लिहिला. हा इतिहास भोरच्या ऐतिहासिक वाङ्मयांत तर

पहिल्यानें प्रसिद्ध झालेला ग्रंथ असें म्हणतां येईलच; परंतु स्वतंत्रपणें लिहिलेल्या मराठी इतिहासग्रंथांतहि या ग्रंथाला कदाचित् आद्य स्थान मिळूं शकेल. ग्रँट डफाच्या इतिहासावरून लिहिलेली 'मराठ्यांची बखर' १८४७ मध्यें म्हणजे वरील अष्टप्रधानांच्या इतिहासापेक्षां अठरा वर्षांनीं अगोदर प्रसिद्ध झाली हें खरें. तथापि तो ग्रंथ भाषांतर आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. केवळ कागदपत्रांवरून लिहिलेला भिडे यांचा इतिहास पाहिला होय. १८६७ पावेतों महाराष्ट्रांत मराठ्यांच्या इतिहासाची फारशी आस्था वाटत नव्हती, ही गोष्ट रा. ब. कीर्तने यांनीं आपल्या बखरीवरील टीकेंत नमूद केली आहे. अशा परिस्थितींत फारशी सामग्रीहि हातांशीं नसतांना आपल्या ग्रंथाची भिडे यांनीं सजावट केली ही खरोखर महत्त्वाची गोष्ट होय. साधनाभावें या इतिहासांत अनेक चुका झाल्या आहेत. परंतु या धर्तीवर शिवाजी व त्याचे अष्टप्रधान यांचा संकलित इतिहास अद्याप लिहिला गेला नाहीं; या दृष्टीनें त्याचें अजूनहि महत्त्व ठरतें व लेखकाच्या प्रयत्नाचें कौतुक करावेंसें वाटतें. या इतिहासासंबंधीं भोरचे इतिहासकर्ते भागवत लिहितात, 'ज्या तीसपसतीस वर्षांपूर्वी रा. भिडे यांनीं आपला इतिहास लिहिला, त्या वेळची लोकाभिरुची व इतिहासाभिरुचि ही स्थिति मनांत आणली म्हणजे भिडे यांची त्या श्रमाबद्दल तारीफ करावीशी वाटते.' (पा. ४८, आवृत्ति १९०३). भिडे यांचें आयुष्य भोरासारख्या मराठी दरबारांत गेल्या कारणानें त्यांच्या ग्रंथाची भाषा पूर्वपरंपरागत अशी बखरीवजा आहे. ग्रंथांत शिवाजीपासून तों आप्पासाहेबापर्यंतच्या प्रत्येक कारकीर्दीतील अष्टप्रधान, महाल, प्रांत वगैरे मुलूख, दरकदार, राजघराण्यांतील स्त्रिया इत्यादींची; त्याचप्रमाणें प्रतिनिधी व अष्टप्रधान यांची व त्यांच्या परिवाराची तपशीलवार माहिती दिली आहे. इतकेंच नाहीं तर शिवाजीच्या वेळचे कारकून, मुत्सद्दी, पायदळ, घोडदळ व आरमार यांजवरील सरदार, तसेंच राज्यांतील हरएक किल्ले, प्रांत व तालुके यांची नांवनिशिवार याद, कारखान्यांचीं नांवें इतकी हकीगत त्यांत आढळून येते. हा ग्रंथ आतां दुर्मिळ झाला असला तरी वरील दृष्टीनें त्याचें महत्त्व प्रकृत ऐतिहासिक चिकित्सेच्या काळांतही कमी झालें आहे असें म्हणवत नाहीं.

याच वेळीं म्हणजे १८७३ चे सुमारास भोरच्या आदम नामक एका

शाहिरानें चिमणाजी रघुनाथ ऊर्फ नानासाहेब सचीव यांच्यावर एक पोवाडा केला. तो सगळा कोठें उपलब्ध नाहीं; त्याचीं एक दोन कडवीं भागवतकृत भोर संस्थानच्या इतिहासांत दिलीं आहेत. तीं—

‘ धनि नानासाहिबांचें ध्यान । हिऱ्याची खाण । धैर्यवान ।
नाहीं गुमान पैशाचा । नित्य हा नेमधर्माचा । जसा अवतार कर्णाचा ।
सुरत मोठा मर्द । फौजेंत दर्द । धाक त्याचा । गर्जला जबाब वाघाचा ’

दुसऱ्या एका अज्ञात कवीच्या सचीव घराण्यांतील पदाधिकारी पुरुषासंबंधीं असलेल्या दोन आर्या वरील इतिहासांतून घेऊन ती यादी आम्ही आजतागाईत केली आहे. ती अशी:—

‘ प्रल्हादासि मुकुंदा, तत्सुत नारायणासि जाणावें, ।
नारायणासि शंकर ( १ ) पूर्ण प्रतापी म्हणोनि वानावें ॥ १ ॥
शंकरसुत नारोबा ( २ ) त्याचे उदरींच जन्मला चिमणा ( ३ ) ।
चिमणाजीस सदाशिव (४) रघुनाथहि (५) बंधू दोन हें जाणा ॥२॥
शंकर रघुसुत ( ६ ) त्याचा नंदन चिमणा (७) तयासि रघुनाथ-।
सुत होय ( ८ ) सूनु त्याचा चिमणाजी (९) कवन-शाहिरीं ख्यात।
चिमणाजी-सुत शंकर (१०) तत्सुत रघुनाथ (११) राजपदधारी,
होय सदाशिव तत्सुत युवराज; असे ‘ सचीव ’ पदशाली ॥ ३ ॥
शंकर चिमणाजी, रघुनाथ, तिघांचे त्रिवार अवतार,
नारायणहि सदाशिव, सचिवपदीं रुद्र हे कुलाधार ।

पोवाडा व आर्या यांसंबंधीं येथें विशेष कांहीं सांगण्यासारखें नाहीं.

भिडे यांच्या इतिहासानंतर चालू शतकाच्या सुरुवातीस मराठी वाङ्मयक्षेत्रांत उदयास आलेले संस्थानी तीन तारे म्हणजे मोडक बंधू व प्रो. हरिभाऊ लिमये हे होत. तिघेहि सुधागड तालुक्यांतील रहिवासी. त्यांपैकीं माधवरावजी मोडक यांचा जन्म १८६४ तला असून त्यांचे धाकटे बंधु काशिनाथपंत ऊर्फ कवि माधवानुज हे सात वर्षांनीं लहान होत. माधवरावांची जशी कवि म्हणून तशी अभिजात लेखक या दृष्टीनेंहि ख्याति आहे. शीलनाथ

अष्टोत्तरी, बैरागी व सुताविरह हीं त्यांचीं तीन काव्यें सरस उतरलीं आहेत. शिवाय त्यांच्या बऱ्याच स्फुट कविताहि आहेत. तथापि कविपेक्षां त्यांचा गद्यलेखक म्हणूनच जास्त लौकिक होण्याचें कारण लँबच्या गोष्टींवरून लिहिलेलें '**नाट्य मकरंद**' व '**सुख आणि शांति**' हे त्यांचे दोन्ही ग्रंथ होत. ते भाषांतरित असले तरी त्यांचें शुद्ध व सरस मराठी वळण पाहिलें म्हणजे त्यांना स्वतंत्र ग्रंथांची योग्यता मिळूं शकते. परंतु यांहीपेक्षां त्यांचे '**खडे तात्त्विक बोल**' हें पुस्तक अतिशय रसाळ व मननशील असें उतरलें आहे. चिपळूणकर मंडळीच्या लेखकवर्गात माधवरावांनाच अग्रपूजेचा मान दिला पाहिजे. मात्र अभिनव काव्यमालेच्या प्रथम भागांत उल्लेखिलेलें '**सती ठाकुराणी**' नांवाचें एक मोठें काव्य अपुऱ्या स्थितींत पडल्याला आतां दीड तपावर काळ लोटला. तें काव्य अद्याप अप्रकाशित आहे व पुढें तसेंच राहिल्यास एका उत्तम ऐतिहासिक काव्यास मराठी भाषा व आमचें संस्थान मुकणार अशी भीति वाटते. कारण अलीकडे त्यांची काव्यरचना फारशी होत नाहीं व प्रसंगोपात झाली तर तिच्यांत विचारप्रवणतेचा बोजडपणा शिरूं लागला आहे. पूर्वींच्या गद्यपद्यात्मक भाषांतील माधुर्य आतां अनुभवास येत नाहीं. तथापि, त्यांच्या हातून आजवर झालेली वाङ्मयिक कामगिरी लक्षांत घेतली तरी देखील '**भोर संस्थान**'चे '**राजकवि**' या उच्च सन्मानास ते सर्वथैव पात्र आहेत याविषयीं दुमत होण्याचें कारण नाहीं. यांचे बंधु माधवानुज यांचा धंदा जरी वैद्यकीचा होता, तरी काव्यव्यासंग एकसारखा आजन्म चाललाच होता. त्यांच्या स्फुट कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाला आहे. त्यांची काव्यरचना साधी, प्रसादपूर्ण व हृदयंगम भासते. जगांतल्या सामान्य गोष्टींना काव्यांत गुंफून त्यांना रमणीयता व सहृदयता आणून देण्याच्या कामीं माधवानुजांचा हातखंडा होता. '**मेघनादवध**' नामक त्यांचें एक पौराणिक विषयावरील महाकाव्य आहे. मूळ बंगाली काव्यावरून त्यांनीं आपल्या काव्याची उभारणी केली असली, तरी मुळांतील वर्णनात्मक पाल्हाळ वगळून मराठी काव्यास कवीनें सुटसुटीतपणा आणला आहे. त्या योगानें तें काव्य मुळाहूनहि अधिक आकर्षक झालें आहे. '**कपालकुंडला**' व '**कृष्णकांताचें मृत्युपत्र**' या दोन वंगीय कादंबऱ्या मराठींत उतरण्याचें श्रेय माधवानुजांस आहे. रवींद्र-

नाथांच्या 'गीतांजली' मधील पहिल्या कांहीं गीतांचें भाषांतर नमुन्यादाखल केलें आहे. त्यांत मुळांतला जिव्हाळा सर्वतोपरी अनुभवास येतो. माधवानुज हे १९१६ मध्यें वारले. मोडक बंधूंचें निवासस्थान पडघवली होय. हरिभाऊ लिमये हे पालीचे राहणारे. ते माधवानुजांच्याच वयाचे होते. त्यांचा अभ्यास पुण्यास न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेजांत झाला. एम्. ए.ची परीक्षा पास झाल्यानंतर ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे यावज्जन्म प्रोफेसर झाले. तेथें त्यांनीं अठरा वर्षें अध्यापनाचें काम केलें. त्या अवधींत त्यांची वाङ्मयसेवाहि चालू होती. 'हिंदी सैन्य व कवायती कंपू' हा त्यांचा प्रदीर्घ लेख निबंधरत्नमालेंत प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखावरूनच हरिभाऊंचें हिंदुस्थानच्या इतिहासाचें ज्ञान किती खोल व सोपपत्तिक होतें याचें अनुमान करितां येतें. '**डेलासचा संघ व मराठ्यांचें साम्राज्य**' हा व केळकरांच्या '**मराठे व इंग्रज**' या ग्रंथावरील परीक्षण हे दोन्ही लेख विस्तारांत आले आहेत. दोन्ही लेखांत हरिभाऊंच्या निर्विकार बुद्धीची व निर्भीड विचारांची चांगलीच ओळख पटते. सन १९१४ सालीं जगभर जेव्हां महायुद्धाचा वणवा पेटला, तेव्हां मनोरंजनांतून त्यासंबंधींच्या आठ लेखांची त्यांनीं एक मालिका गुंफली. त्यांमध्यें त्या यादवीचीं कारणें देतांना हरिभाऊंनीं युद्धमान राष्ट्राराष्ट्रांच्या अंतःस्वरूपाचें आविष्करण केलें आहे. त्याच संधीला साम्राज्यांतील स्वराज्य व तटस्थ राष्ट्रांचे हक्क याहि विषयावर लेख लिहून त्यांनीं तद्विषयक आपलीं मतें स्पष्ट रीतीनें पुढें ठेविलीं. '**दिल्ली कीं आग्रा?**' या लेखाच्या द्वारें शिवाजीच्या सुटकेसंबंधींच्या आजहि वादग्रस्त असलेल्या प्रश्नास हरिभाऊंनीं चालना दिली. मुंबईच्या बिशप साहेबांनीं एका व्याख्यानांत हिंदी लोक स्वराज्याला अपात्र म्हणून विधान केलें होतें. हरिभाऊंनीं त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें सडेतोड भाषण करून व्याख्यात्यांचे सर्व मुद्दे किती सप्रमाण खोडून काढले हें अद्यापिहि पुष्कळांच्या स्मरणांत आहे. हरिभाऊ ता. २८ फेब्रुवारी, १९१९, रोजीं एकाएकीं हृदयक्रिया बंद होऊन वारले. हरिभाऊंच्या लेखांचा संग्रह खरोखर व्हावयास पाहिजे. त्यांचीं विधानें नेहमीं स्वतंत्र बुद्धीनें केलेलीं असतात. मराठेशाहीच्या अंताची मीमांसा करितांना त्यांनीं मराठ्यांचें '**अदृष्ट**'

हें एक बलवत्तर कारण दिलें आहे. मराठ्यांच्या हाडींमासीं खिळलेल्या सरंजामी पद्धतीचे दुष्परिणाम सुधारून त्यांनीं एकतंत्री राज्यपद्धति अस्तित्वांत आणण्यापूर्वींच त्यांची इंग्रजांशीं गांठ पडली. हेंच मराठेशाहीचें अदृष्ट होय. डेलासच्या संघाची मराठ्यांच्या संघांशीं हरिभाऊंनीं केलेली तुलना त्यांच्या समर्पक व ऐतिहासिक सूक्ष्म दृष्टीची साक्ष देते. याच वेळीं संस्कृत भाषेंतील प्राचीन ऐतिहासिक महाग्रंथांचा मराठींत पुरस्कार करणारी धाडसी चिपळूणकर आणि मंडळी पुढें आली. सुरुवातीस तिचें कार्य करण्यास जरी दोघेतिघेजणच होते, तथापि प्लेगसारख्या दैविक आपत्तींतून मंडळीचें कार्य नेटानें चालवून पार पाडणारे उर्वरित प्रकाशक बाळकृष्ण पांडुरंग ठकार हे होत. त्यांनीं आपलें अंगीकृत कार्य वयाच्या पांसष्ठावे वर्षापर्यंत एकसारखें चालविलें, ही खरोखर अभिमानास्पद कामगिरी होय. त्यांचें स्वतंत्र असें लिखाण नाहीं. परंतु ज्या कित्येक पुस्तकांना त्यांनीं प्रकाशकाचे चार शब्द जोडले आहेत, ते औपचारिक असले तरी त्यांत जुन्या परंपरेनें वाढलेल्या पाढिक शास्त्र्यांची विचारसरणी पहाण्यासारखी आहे.

यानंतर चालू शतकाच्या दुसऱ्या दशकांतील लेखकांत बऱ्याच जणांचा उल्लेख करितां येईल. प्रथम सुधागड तालुका घेतला तर नागोठणें–सिद्धेश्वर येथील मूळ रहिवासी डॉ. परशुराम लक्ष्मण वैद्य यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावयास पाहिजे. एम्. ए. व डी. लिट्. या शैक्षणिक उच्च पदव्या संपादिल्यानंतर त्यांनीं वुइलिंग्डन् व फर्ग्युसन कॉलेजांत अध्यापकाचें काम केलें. त्यांचा संस्कृत, पाली व अर्धमागधी या भाषांचा व्यासंग दांडगा असून त्यांनीं **'बौद्ध धर्माचा अभ्युदय आणि प्रसार'** हा ऐतिहासिक ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथावरून बौद्ध धर्माचा एकंदर व्याप किती मोठा होता, याची चांगली कल्पना येते. त्याच तालुक्यांतील दुसरे रहिवासी गोविंद कृष्ण मोडक यांचा पुण्यांत उत्कृष्ट शिक्षक म्हणून नांवलौकिक तर आहेच, पण भाषाशास्त्रामध्यें व शब्दांची व्युत्पत्ति ठरविण्याचे कामीं त्यांनीं बरेच परिश्रम घेतले आहेत. संस्कृतचा अभ्यास, समासमयूख वगैरे भाषाविषयक पुस्तकें त्यांनीं लिहिलीं आहेत. नाडसूरचे भगवंतराव मुळे यांनीं '**अबलोन्नति**' नांवाचें लहानसें पुस्तक रचिलें आहे. त्या पुस्तकास दक्षिणा प्राइज कमेटीकडून बक्षिस मिळालें

असून त्यांतील विवेचन समर्पक आहे. मार्तंड नारायण आचार्य हे जसे कवि तसेच लेखकहि आहेत. ' तत्पदानुराग ' व १९२६ च्या मुंबईच्या साहित्य संमेलनांत रौप्यपदक मिळालेली ' हिंदबांधवांस ऐक्यार्थ कळकळीची विनंती ' हीं त्यांचीं दोन थोडींशीं मोठीं काव्य-प्रकरणें होत. दादरच्या कवि-मित्र-मंडळानें प्रसिद्ध केलेल्या ' पुष्पवाटिका 'दि काव्यग्रंथांतून या कवीच्या स्फुट कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. भावशुद्धि व रचनेचा ठाकठीकपणा हे गुण आचार्यांच्या काव्यांत प्रत्ययास येतात. या दृष्टीनें त्यांचीं ' पंचवटी-वर्णन, ' ' अवस्थात्रय ' वगैरे प्रकरणें वाचनीय आहेत. त्याच तालुक्यांतील खवलीचे इनामदार वासुदेव विनायक जोशी हे निबंधलेखक व कादंबरीकार म्हणून महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. त्यांच्या लिहिण्यांत कलेपेक्षां हेतुप्राधान्य अधिक असतें. ' हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा ' कशी झाली आहे, या संबंधींचा विचार करून त्यांनीं त्या प्रश्नाला बरेंच चालन दिलें आहे. ' जन्माचा बंदिवान ' ही त्यांची नुकतीच प्रसिद्ध झालेली कादंबरी घेतली तरी तिच्यांत देखील स्त्रीवर्गाच्या एका सामाजिक जीवनविषयक प्रश्नाचाच विचार केलेला आढळेल. त्यांनीं रेवती, आत्महत्त्या वगैरे कांहीं लघुकथा लिहिल्या असून त्यांत जरी सहेतुकता भासली तरी त्या चित्ताकर्षक झाल्या आहेत. मधूनमधून ते विनोदी लेखहि लिहितात. जोशी हे बडोद्यास वकील आहेत. तेव्हां वेळींअवेळीं पुण्याच्या कुचाळ्या करीत बसणाऱ्या बटोदरी वृत्तीला ते अगदींच पारखे आहेत, असें म्हणतां येत नाहीं. गोविंद विष्णु चिपळुणकर यांनीं रामायण-भारत-ग्रंथांतून उच्च स्त्रीपुरुषांची निवड करून त्यांवरून लहान मुलामुलींकरितां छोटीं पुस्तकें लिहिलीं आहेत. ' वीरा विदुला, ' ' द्रौपदी, ' ' अभिमन्यु, ' ' बालवीर कुशलव ' या गोष्टी लिहून लेखकानें मुलांमध्यें राष्ट्रीय गुणांचें बीजारोपण अनायासें करण्याचा जो उपक्रम केला आहे, तो स्तुत्य होय. पुस्तकांची भाषाहि मुलांना सहज कळेल व पटेल अशी आहे. पालीचे वकील लक्ष्मण केशव भावे यांच्या लेखनास ज्ञानकोशाच्या द्वारें आरंभ झाला. त्यांचे विद्यासेवकांतून कांहीं लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत ' अपयशी हिरे, ' ' रूसवेल्ट, ' ' गेल्या शतकांतील औद्योगिक फरक ' हे लेख माहितीपूर्ण होत.

सुधागड तालुक्यांतील सध्यां धडाडीनें पुढें येत असलेले कवी वासुदेव पुरुषोत्तम डोंगरे हे होत. हे मूळ पडघवलीचे रहाणारे असून वैद्यकीय धंद्यानिमित्त पुण्यास राहतात. 'छत्रपतींच्या छायेंत' या पुस्तकांत त्यांनीं आपल्या कवितांचा संग्रह केला आहे. कवितांचे विषय हेतुपूर्ण असून त्या कामीं मिळालेल्या विषयानुकूल भाषेच्या साहाय्यानें त्यांची रचना परिणामकारक झाली आहे. पुण्यामध्यें सुप्रसिद्ध असलेल्या सन्मित्र-समाज मेळ्याची पद्य-रचना याच कवींच्या हातची आहे, एवढें सांगितलें म्हणजे प्रकृत कवीच्या कृतींतील अंतर्बाह्य उत्कटतेविषयीं निराळा उल्लेख करावयास नको. सुधागड तालुक्यांतील दुसरे कवि '**विपिनविहारी**' ऊर्फ लक्ष्मण गणेश मुळे हे होत. हे नाडसूरचे रहिवाशी असून दादरच्या कवि-मित्र मंडळाचे सभासद आहेत. त्यांच्या कविता काव्योदय-मालेंत आल्या आहेत. 'मराठ्यांचें ब्रीद,' 'स्वातंत्र्य-संगीत' यांत कवीचें राष्ट्रप्रेम व्यक्त होतें. 'स्वारीवर गेल्यावर' व 'वदणारच नाहीं कशी!' या कवितांत झालेलें शृंगार व करुण या रसांचें संमिश्रण आस्वादयोग्य आहे.

घाटावरील लेखक घेतले तर भोरचे सध्यांचे अधिपति श्रीमंत रघुनाथराव ऊर्फ बाबासाहेब पंतसचीव यांचा उल्लेख केला पाहिजे. त्यांनीं युवराज असतांना उत्तर व दक्षिण हिंदुस्तानांमधील प्रवासासंबंधीं प्रवासवृत्तें लिहिलीं आहेत. त्यांत काश्मीर व म्हैसूर या नाणावलेल्या हिंदी संस्थानांतील स्थळें, व्यवहार, रीतिरिवाज यांचें वर्णन असून दोन्ही ठिकाणच्या शासनसंस्थांचें विवेचनहि बोधप्रद आहे. लेखांची भाषा इष्टार्थसाधक असली तरी स्वानुभाविक प्रवासवृत्तांना प्रि. भाटे यांच्याप्रमाणें जितक्या चटकदार भाषेची व वस्तुभेदी सूक्ष्म दृष्टीची स्वाभाविक लज्जत असावी लागते तितकी ती येथें प्रतीत होत नाहीं. धोमचे रहिवासी परंतु बरींच वर्षें संस्थानी वरिष्ठ नोकरींत असलेले प्रल्हाद धोंडो कानिटकर यांचे संशोधनात्मक लेख विचारप्रवर्तक आहेत. त्यांनीं सामराज कवीच्या '**रुक्मिणी-हरण**' नामक सुप्रसिद्ध व सुरस काव्यासंबंधींचें एक निरीक्षणात्मक पुस्तक लिहिलें असून त्यांत लेखकाची अंतर्वेधी चिकित्सक बुद्धि प्रत्ययास येते. बापूजी मार्तंड आंबेकर हे ज्ञानप्रकाशचे, विशेषतः त्यांतील वाङ्मयशाखेचे संपादक आहेत. पूर्वी

"भारतवर्षीय-नररत्न-माले"मध्यें आगरकर, भिडे, सुरेंद्रनाथ यांचीं लघु चरित्रें त्यांनीं लिहिलीं आहेत. हरिभाऊ आपटे यांचें चरित्र व आठवणी असे त्यांचे अलीकडे लिहिलेले दोन ग्रंथ होत. चरित्रविषयक पुस्तकांत हरिभाऊंचा जीवनवृत्तांत देऊन कादंबऱ्यादि त्यांच्या विविध वाङ्मयिक कृतीचें विवेचन केलें आहे. 'आठवणी' या ग्रंथांत विषयनायकाच्या खासगी आयुष्यक्रमासंबंधीं माहिती दिली असल्याकारणानें हरिभाऊंच्या चरित्रास उदात्तता येऊन तें जितकें यथार्थदर्शी तितकेंच जिव्हाळ्याचें भासूं लागतें. लेखकानें दिलेली माहिती चित्तवेधक आहे. त्यांनीं हितोपदेश व पंचतंत्र या ग्रंथांचीं सुलभ मराठी भाषांतरें केलीं आहेत. वांईचे मूळ रहिवासी पण राजगड तालुक्यांतील जांभळीचे इनामदार शंकर लक्ष्मण वैद्य हे मुंबई विश्वविद्यालयाच्या शेतकीशाखेचे पदवीधर होत. त्यांनीं 'वनस्पतींचीं कुलें' नांवाचें एक वनस्पतिशास्त्रावरील पुस्तक लिहिलें असून त्यांत एकंदर फळाफुलांच्या वीस जाती वर्णिल्या आहेत. पुस्तकांतील विषय शास्त्रीय म्हणून अवघड असला तरी लेखकानें त्याचें प्रतिपादन सोप्या व सरळ भाषेंत केलें असल्यानें पुस्तक वाचतांना कंटाळा येत नाहीं. त्याप्रमाणें त्यांचें सृष्टि-निरीक्षणासंबंधींचें पुस्तक प्रसिद्ध आहे. सातारचे वाग्भट नारायण देशपांडे व मुंबईचे नरहर रघुनाथ फाटक या दोघां नामांकित लेखकांचा उदय आगेंमागें पण याच सुमारास झाला. दोघेहि वर्तमानपत्रांचे राजकीय विषयाचे लेखक होत. लेखनांतील तडफदारपणा व मुद्देसूद दृष्टि या बाबतींत दोघांतहि बरेंच साम्य आढळतें. दोन्ही लेखकांची वाङ्मयसेवा विविध प्रकारांची आहे. तथापि फाटक यांच्या खोचदार लेखनशैलीची व प्रतिस्पर्ध्यांवर हटकून मात करण्याची हातोटी देशपांडे यांच्यांत नाहीं. पण देशपांडे यांच्या वकिली थाटाचें सानुनय पद्धतीचें लेखनकौशल्य फाटक यांना साधणारें नाहीं. आपलें जें काय म्हणणें असेल तें सरळ, स्पष्ट व सविस्तर पुढें ठेवावयाचें असें देशपांडे यांचें लेखनविषयक धोरण अलीकडे ठरून गेल्यासारखें दिसतें. त्यांच्या लेखनाचा प्रारंभ सौ. गिरजाबाई केळकर यांनीं लिहिलेल्या 'गृहिणीभूषण' या पुस्तकावरील टीकालेखापासून झाला, तर फाटकांच्या लेखनास प्रारंभ प्रथम कादंबऱ्यांपासून झाला असला

तरी, केळकरकृत लो. टिळकांच्या चरित्रावरील टीकालेख हीच त्यांच्या खऱ्या लेखनव्यवसायाची सुरुवात होय. फाटकांचा वाङ्मयात्मक स्वतंत्र दृष्टीचा अनुभव पटवून देण्यास विष्णुशास्त्री चिपळूणकर, रामदास व एकनाथ यांच्या वरील लेख कारण झाले. देशपांडे यांनीं हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्यांचे बाबतींत विवेचक दृष्टि ठेवून त्यांचें सर्वांगीण महत्त्व दर्शविण्याची प्रशंसनीय कामागिरी केली आहे. 'सुखस्वप्नें' हें त्यांच्या गोष्टींचें पुस्तक असून त्यांतील कांहीं कथा हृदयंगम आहेत. फाटक यांनीं न्या. रानडे यांचें सविस्तर चरित्र लिहिलें आहे. खुद्द भोरास राहणाऱ्या लेखकांत सच्चिदानंद रघुनाथ चित्रे, नारायणशास्त्री भावे, विष्णु केशव सामक व नारायण महादेव भिडे यांचा उल्लेख होण्यासारखा आहे. चित्रे यांची ओळख भोर संस्थानचे इतिहाससंशोधक म्हणून आहे. त्यांनीं रोहिड-खोऱ्यांतील, विशेषतः बाजी प्रभूच्या घराण्यांतील अनेक महत्त्वाच्या कागद-पत्रांचें संशोधन केलें असून त्यांसंबंधींचे त्यांचे लेख महाराष्ट्र-साहित्यांत प्रसिद्ध झाले आहेत. मृत्यूपूर्वी कांहीं वर्षें त्यांस अंधत्व आलें होतें. भावे यांनीं आपल्या विलायतच्या प्रवासामधील नाना तऱ्हांचे अनुभव लिहिले आहेत. हे लेख वर्तमानपत्रांत क्रमशः येत असल्यानें त्यांत जरी पुनरुक्तीचा दोष असला, तरी लेखकाची वर्णनशैली हृदयंगम असल्यानें त्या दोषांकडे एकदम लक्ष जात नाहीं. विशेषतः शास्त्रीबोवांच्या चौकस व चौचाल बुद्धीमुळें युरोपीय समाजाचें अंतरंग त्यांस खुलें झाल्यासारखें भासतें. 'अभागी कमल' या मोठ्या गोष्टीपासूनच सामक यांची लेखक या नात्यानें ओळख झाली आहे. सदर गोष्ट कुटुंब-शिक्षणमालेंत १९१३त प्रसिद्ध झाली, एवढें सांगितलें म्हणजे त्या पुस्तकाच्या शुद्ध विचारांची कल्पना येणारी आहे. विधवा स्त्रियांनीं स्त्री-शिक्षणाचे द्वारां समाजसेवा करावी हें तत्त्व समाजास पटवून देण्याच्या हेतूनें त्यांनीं वरील गोष्ट लिहिली आहे. मध्यम प्रतीच्या कुटुंबाचें सोज्ज्वल चित्र या दृष्टीनें गोष्ट वाचनीय आहे. सामकांनीं बंगाली भाषेचा व्यासंगहि चालू ठेवला आहे. लोकशिक्षण मासिकांत त्यांनीं वंगकवि चंडीदास, विद्यापति व भग-वान् चैतन्यदेव यांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. मनसा मंगला या काव्यांतील बहुला ही उद्बोधक व चित्तवेधक कथाहि त्यांनीं वंगभाषेंतून मराठींत उतरली

आहे. भिडे यांच्या लेखनास कवितेच्या द्वारें सुरुवात झाली. स्वतंत्रांपेक्षां त्यांच्या भाषांतरित कविता बऱ्याच आहेत. आंग्लकवी गोल्डस्मिथ याच्या एका प्रसिद्ध खंडकाव्यावरून त्यांनीं प्रवासी हें काव्य लिहिलें असून, त्याचा शेवटचा भाग हिंदुस्थानास उद्देशून रचला आहे. स्वतंत्र 'कवितांमध्यें फुलपांखरूं' व 'इंद्रधनुष्य' यांचा दर्जा बराच वर लागेल. अलीकडे त्यांनीं काव्यसमीक्षणाचाच व्यासंग ठेवला आहे. मध्यंतरीं मॅाटफर्ड सुधारणेच्या काळांत नाशिकच्या समाजसेवक या मासिकामधून त्यांचे राजकीय व आर्थिक विषयांवर लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनीं केलेल्या ' काव्यचर्चेमध्यें 'सुनीतविचार' व 'मोगरे कवि' हे त्यांचे लेख आहेत. विस्ताराच्या ज्युबिली ग्रंथांत 'अर्वाचीन कवि व काव्यें ' यांवर लिहिलेल्या विस्तृत लेखावरून त्यांची काव्यविषयक विवेचक दृष्टि अनुभवास येते. शाहिरी वाङ्मय, भावगीत, सुभाषित, शून्यशोधनात्मक काव्य, केशवसुत, अनंततनय इत्यादिक लेखांवरून त्यांच्या अर्वाचीन कवि-काव्यविषयक व्यासंगाची कल्पना करितां येईल. ' भाषा नष्ट होणार काय ? ' व ' स्त्रीराज्याचा नवा अवतार ' हे लेख जितके उद्‌बोधक आहेत, तितकाच त्यांतला सूक्ष्म विनोदहि हृदयंगम भासतो. याबरोबरच कवींचा उल्लेख करावयाचा तर प्रथम चंद्रशेखर कवि ऊर्फ चंद्रशेखर गोविंद आगाशे यांचा नामनिर्देश करणें उचित होईल. हे राजगड तालुक्यांतील मांगदरी गांवचे मूळ रहिवासी. पदवीधर झाल्यानंतर ते पुण्यास वकिली करितात. एका तपापूर्वीं लो. टिळकांचा हिंदी स्वराज्य संघ स्थापन झाला होता; त्या वेळीं त्यांनीं '**श्रीस्वराज्यकथा** ' नामक एक लहानसें ओवीबद्ध काव्य रचलेलें आहे. काव्याची भाषा सोपी व ओघवती असल्यानें काव्य चटकदार झालें आहे. केशवकवि ऊर्फ केशव काशिनाथ आंबेकर व महादेव दीक्षित थिटे या दोघां कवींनीं बऱ्याच कविता लिहिल्या आहेत. त्या प्रासंगिक स्वरूपाच्या असल्या तरी त्यांची लोकप्रियता होण्यास बहुशः कवीची समर्पक विषययोजनाच कारण आहे.

यानंतर क्रमानें अगदीं अलीकडचा लेखकवर्ग पुढें येतो. त्यांतील सगळे जण अद्याप विकासशील नवजवान असल्यानें त्यांच्या विषयींचें आतांच विशिष्ट अनुमान करणें चुकीचें होईल; म्हणून त्यांचा येथें केवळ नांवा-

पुरताच उल्लेख करणें बरें. कानडे बंधूंपैकीं शेषाद्रि गोविंद कानडे हे एम. ए. असून त्यांस पुराणरत्न ही बडोद्याची पदवी मिळाली आहे. अमळनेरच्या तत्त्वज्ञान-मंदिराचे संपादक असतांना त्यांनीं शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाविषयीं लेख लिहिले आहेत. त्यांत त्यांच्या विवेचनकौशल्याची चांगली ओळख पटते. काव्यचर्चेतल्या 'काव्य व संगीत' या लेखांत दोन्ही ललितकलांचा परस्परांशीं किती जिव्हाळ्याचा संबंध आहे, याचें स्पष्टीकरण त्यांनीं केलें आहे. दुसरे बंधु रामचंद्र गोविंद कानडे हे टिळक महाविद्यालयाच्या वाङ्मय-शाखेचे विशारद आहेत. त्यांनीं रवींद्रनाथ ठाकूर व प्रो. विजापूरकर यांचीं चरित्रें लिहिलीं असून शिवाय त्यांत ग्रंथालयासंबंधींच्या एका इंग्रजी पुस्तकाची नुकतीच भर टाकली आहे. चरित्रविषयक ग्रंथांत व्यक्तीच्या जीवनवृत्तांताबरोबर तिच्या वाङ्मयकृतीचाहि योग्य परामर्ष घेतला आहे. रवींद्रबाबूंचें, वंग भाषा वगळली तर, दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत मराठीइतकें विस्तृत व सांगोपांग चरित्र आढळणार नाहीं. रवींद्रनाथांच्या चरित्राच्या मानानें विजापूरकरांचें चरित्र जरा घाईनें लिहिलेलें भासतें. कारण त्यांतील हकीकतीसंबंधींच्या चुका सोडल्या तरी भाषेच्या दृष्टीनेंहि त्याचा क्रम खालींच लागतो. राजाराम प्रल्हाद कानिटकर हे वर उल्लेखिलेल्या धोमच्या कानिटकरांचे चिरंजीव असून त्यांची एम. ए.ची परीक्षा पास झाली आहे. परीक्षेनंतर चित्रमय-जगत्च्या संपादकवर्गांत ते दाखल झाले आहेत. चित्रमयजगत्, मनोरंजन, प्रगति यांतून त्यांचे अनेक विषयांवर लेख आले आहेत. बा. म. जोशी, मोतीलाल नेहरू व रवींद्रनाथ ठाकूर हीं त्यांनीं लिहिलेलीं चरित्रात्मक पुस्तकें होत. वर्ण्यविषयाशीं सहृदयता पावणें हें त्यांच्या लेखनाचें वैशिष्ट्य वरील ग्रंथांतून अनुभवास येतें. '**स्त्रियांचें पावित्र्य,**' 'नारायणमहाराजांचें अलौकिकत्व', 'फलज्योतिष' यांसारख्या सामाजिक अगर 'निःशस्त्र-प्रतिकारयुद्ध' यांसारख्या राजकीय अगर रॅम्से मॅकडोनाल्ड, चर्चिल यांवरील स्वभावचित्रात्मक लेखांतून प्रकृत लेखकानें आपले विचार निर्भीडपणें मांडले आहेत. लक्ष्मणदास देवी हे बी. ए. असून डेक्कन कॉलेज मॅगेझिनमधील त्यांनीं लिहिलेल्या लेखांत मुद्देसूदपणा आढळतो. वि. बा. आंबेकर, चिं. द. आंबेकर व नरेंद्र काशिनाथ बावडेकर हे तिघेजण लघुकथालेखक

म्हणून पुढें आले आहेत. विष्णु बापूजी आंबेकर यांनीं आपल्या गोष्टींचा संग्रह करून त्यास ' भावचित्रें ' हें नांव दिलें आहे. ' आईचा ध्यास, ' ' पितृ-वात्सल्य, ' ' आत्मवंचना ' या कथांतून भावपूर्ण चित्रें उमटलीं असून प्रसंगांच्या प्रगतीबरोबर भावनांचा एकसारखा उत्कर्ष होत असल्याचा प्रत्यय येतो. चिंतामण दत्तात्रय आंबेकर यांनीं मुख्यतः किपलिंग, मोपासा, मेरी कॉरेली या आंग्ल व फ्रेंच कथालेखकांच्या गोष्टींवरून आपल्या कथांची रचना केली आहे. मराठींत उतरतांना गोष्टीच्या आकर्षकपणाला खंड पडूं नये याविषयीं लेखकानें अत्यंत दक्षता घेतली आहे. आंबेकर यांचें कथा-लेखन कांहीं ठिकाणीं स्वतंत्रहि असलेलें दिसतें. बावडेकर यांचे कॉलेज-नियतकालिकाखेरीज इतरत्र जे थोडेसे लेख प्रसिद्ध झाले आहेत, त्यांत ' जिवाचें रान ' ही लघुकथा चटकदार व परिणामकारक भासते. रघुनाथ शतानंद पारखी यांचे ग्रंथालयें व ग्रंथसूची यासंबंधींचे लेख रत्नाकर, यश-वंत, ज्ञानप्रकाश इत्यादिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे हे लेख तद्विषय जिज्ञासूंना मार्गदर्शक झाल्यावांचून रहाणार नाहींत.

गद्यलेखकांनंतर जो कवींचा वर्ग पुढें येतो, त्यांत प्रथम भोरचे युवराजश्री. सदाशिवराव ऊर्फ भाऊसाहेब पंतसचीव यांचा कवि या नात्यानें निर्देश केला पाहिजे. त्यांच्या 'त्रिदळ' या काव्यग्रंथांत सौंदर्यविषयक अनुकरणलालसा व रचनेची स्खलनशील शिथिलता या गोष्टींमुळें कवितांचें प्राथमिक स्वरूप लोपणें कठिण असलें तरी त्यांच्यांत मुळाशीं असलेलें सूक्ष्म काव्यबीज खास प्रत्ययास आल्यावांचून राहत नाहीं. गान, वसंतरमणी, प्रियाविरह, पोपट, वाढदिवस, वनिता आणि कविता इत्यादि त्रिदळांतील भावगीतें वरील गोष्टींचें प्रत्यंतर पटवितील. त्यांतील भावना प्रो. बापूसाहेब चापेकर यांनीं यथार्थतेनें वर्णिल्या-प्रमाणें ' संव्यथापूर्ण ' आहे. ' निर्झरिणी ' हा भाऊसाहेबांचा दुसरा काव्यग्रंथ असून तोहि पहिल्यापेक्षां काव्यगुणांनीं कांकणभर सरसच ठरेल. विलायतेहून परत आल्यावर त्यांनीं आपल्या प्रवासाची हकीगत यशवंत मासिकांतून लिहिण्याचा उपक्रम केला आहे. भोरचे दुसरे कवि दिनकर विनायक देव हे होत. ' कविसखा ' हें त्यांचें काव्याभिधान असून ते पुण्याच्या ' भ्रमरमंडळा 'चे सभासद आहेत. त्यांच्या स्फुट कविता त्याच

मंडळानें प्रकाशित केलेल्या ' कुंदाच्या कळ्या ' या काव्यपुस्तकांत आल्या आहेत. त्यांच्या कवितांत बहुशः विनोदाची छटा असते. ' रांगोळी विकणारणीस ,' ' उंच झालों तर, ' ' सांत्वन ' या कवितांतील विनोद खुसखुशीत व रिझविणारा आहे. तसेंच यशवंत कवीच्या ' मातृपदाविण ' या कवितेचें देवांनीं केलेलें विडंबन हृद्य व मार्मिक आहे.

पुरुषांबरोबर संस्थानी स्त्रियाहि शारदेच्या मंदिरांत जाऊन तेथें थोड्याफार प्रमाणानें त्यांनीं आपल्या वाङ्मयिक कामगिरीचें वाण वाटण्यास कमी केलें नाहीं. डॉ. कमलाबाई देशपांडे, श्री. सौ. सरोजिनीबाई पंतसचीव, कु. तान्हूबाई चिरपुटकर (सध्यां सौ. स्नेहलताबाई जोशी ) व सौ. राधाबाई भिडे यांचा लेखिका म्हणून उल्लेख करतां येईल. डॉ. कमलाबाई यांची प्रारंभीं कवयित्री म्हणूनच ओळख झाली आहे. ' गीत-द्विदल ' या काव्यग्रंथामध्यें प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या भावगीतांपैकीं ' बालकास पाहून, ' ' आईविण कां कोणाचें ? ' ' तल्लीनता ' व ' जीवितक्रोडें ' हीं गीतें जितकीं गोड व प्रसादपूर्ण आहेत तितकींच तीं हृदयंगम व हृदयस्पर्शी भासतात. अलीकडे त्यांच्या हातून काव्यनिष्पत्ति झालेली दिसत नाहीं. उच्च शिक्षण संपादून परदेशांतून त्या नुकत्याच परतल्या आहेत. अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं उमरावती येथील महिलापरिषदेंत केलेलें भाषण मुद्देसूद, मार्मिक व कळकळीचें भासतें. त्यांतहि त्यांचा उपजत काव्यगुण दिसून येतो. भोरच्या युवराज्ञी सौ. सरोजिनीबाईसाहेब यांच्या स्फुट कविता मनोरमा मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. निर्झरिणी या काव्यसंग्रहांत त्यांच्याहि कवितांचा संग्रह आहे. त्यांची काव्यरचना सहज, प्रासादिक व गानानुकूल भासते. यशवंतामध्यें ' आमच्या हिचें वेड ' ही त्यांची गोष्ट आली आहे. सौ. जोशी यांचा तत्त्वज्ञान-मंदिरांत 'काव्य आणि तत्त्वज्ञान' हा लेख आला आहे. काव्य आणि तत्त्वज्ञान यांचे मार्ग जरी भिन्न असले तरी त्यांच्या ध्येयांचा संगम होतो. कारण त्यांचें ध्येय एकच असतें व तें ध्येय म्हणजे सत्याचें संशोधन, हें त्या निबंधाचें सार होय. कांहीं वर्षांपूर्वी मनोरंजनांतून अनेक स्त्रियांनीं लेख लिहून समाजांतील आपल्या अडचणी कोणत्या आहेत हें दाखविण्याचा उपक्रम केला होता. त्याच वेळीं सौ. राधाबाई भिडे यांनींहि ' सामाजिक

सुधारणेंतील आमच्या कांहीं अडचणी ' हा लेख लिहून त्यांत हिंदी स्त्री-वर्गाच्या मार्गांत कोणत्या अडचणी आहेत व त्यायोगानें एकंदर सामाजिक सुधारणेला कसा अडथळा येतो त्याचें दिग्दर्शन केलें आहे. ' आमचे सर्व हक्क आम्हांस मिळाले म्हणजे आमची सुधारणा आम्ही आपण होऊन करूं व त्या योगानें देशोन्नतीसाठीं प्रयत्न करीत असलेल्या पुरुषांना आपोआप मदत होऊन आम्ही व आमचा समाज उन्नतीच्या शिखरावर जाऊन बसण्याची कल्पना निव्वळ कल्पना-राज्यांतच राहणार नाहीं. ' या विधानांतील सत्यता पटवून देण्यास चालू परिस्थितीच पुरेशी आहे असें आम्हांस वाटतें.

येथपर्यंत भोर संस्थानांत जे लेखक व कवि जन्मास आले व ज्यांनीं त्याच्या-विषयीं आत्मीयतेची भावना अखंड जागृत ठेवली त्यांच्या लेखनांसंबंधीं जी माहिती दिली आहे ती, प्रकृत लेखकास जेवढी म्हणून साधनसामग्री उपलब्ध होऊं शकली तेवढी सर्व उपयोगांत आणून, लिहिली आहे; ती संपूर्ण आहे असें नाहीं. इतकेंच नव्हे तर अपुऱ्या साधनांवरून बनविलेलीं मतें कदाचित् चुकतीलहि, याची पूर्ण जाणीव आम्हांस आहेच. प्रकृत लेखक हा आपल्या वर्ण्यविषयक संस्थानापासून दूरवर असल्याकारणानें त्यास तेथील लेखकांची वैयक्तिक माहिती नाहीं. प्रत्यक्ष परिचयाच्या योगानें लेखका-संबंधींचें जें यथार्थ ज्ञान व जितका आपलेपणाचा जिव्हाळा हीं वाटतात, तें ज्ञान व तितका जिव्हाळा नुसत्या लेखनांवरून होणाऱ्या परिचयानें वाटणें शक्य नाहीं. तेव्हां याहि दृष्टीनें प्रकृत लेखास उणेपणा आला आहे, असें आम्हांस वाटतें. तसेंच त्यांच्या कृतींचें विवरण करतांना त्यांतील उतारे द्यावयास पाहिजेत. परंतु, स्थलसंकोचामुळें तीहि गोष्ट करतां येणें शक्य झालें नाहीं. तथापि, अशाहि स्थितींत हातीं असलेल्या सामग्रीवरून आम्हांस एवढें म्हटल्यावांचून राहवत नाहीं कीं, वाङ्मयविषयक जागृतीची जी लाट आज जोरानें सर्व देशभर उसळली आहे, ती सह्याद्रीच्या दोन्ही बाजूंकडील पाय-थ्याशीं असलेला हा लहानसा टापूहि हळुहळू व्यापीत चालली आहे; व असाच तिचा जर उत्तरोत्तर प्रसार होत जाईल तर वाङ्मयिक वांझपणाच्या दोषापासून या डोंगरी मुलुखाचीहि सुटका झाल्यावांचून राहणार नाहीं. या आशास्पद परिस्थितीचीं सुचिन्हें प्रकृतस्थळीं जर दृग्गोचर झालीं तर या

लेखाबरोबर आमच्या परिश्रमाचेंहि सार्थक झालें असें आम्ही समजूं. वाङ्मयाला पवित्र गंगेची उपमा देण्यांत येते. महाराष्ट्र सारस्वतकारांनींहि तसल्याच अलंकाराची मोठ्या कल्पकतेनें योजना केली आहे. त्याच भूमिकेचा आश्रय केल्यानें आम्हांसहि असें दृश्य दिसूं लागतें कीं, ही आमची संस्थानी वाग्गंगा किंवा यथार्थतेनें संबोधावयाचें तर 'नीरांबा' सह्याद्री पर्वताच्या अत्युच्च पठारावर उगम पावून व श्रीरायरेश्वराच्या पादप्रक्षालनानें पुनीत होऊन तिच्या पूर्वपश्चिमवाहिनी अशा दोन शाखा बनल्या. पश्चिमेकडचा प्रवाह मोठ्या उतरणीवरून वेगानें जात असल्याकारणानें त्याच्या अस्तित्वाचा बराच काळपावेतों लोप झाल्यासारखा भासला. परंतु कालावधीनें तो प्रवाह 'अंबा' हें नांव धारण धरून तळकोंकणांत पडगवल्लीच्या मार्गानें वाहतांना प्रथम दिसला. तो प्रदेश सपाटीचा म्हणून तेथें त्या नदीचा कोठें मंजुल मृदुरव काव्य-निनादाचा पडसाद उत्पन्न करीत होता, तर कोठें तिच्या गतींत श्रद्धा-प्रसन्न वाग्विलासाची व शब्दवैभवाची प्रशांत गंभीरता नांदत होती. तेथून पुढें ती जांभुळपाडियास वाळूंतून वाहत असतांना तिच्या काठांवर क्रीडा-कौतुक करीत असलेल्या बालबालिकांची आनंदी वृत्ति तिनें धारण केलेली दिसत होती. लवकरच खेवल्लीच्या बाजूनें एक बहारीचा प्रवाह येऊन तिच्या गतीला नवचैतन्य प्राप्त झालें व त्यामुळें हास्यविनोद करीत करीत ती जणुं काय वाटेंतला आपला शिणोटा घालवीत चालली होती. पाल्लिग्रामास पोहोंचल्यावर तिची गति इतकी अनिरुद्ध आणि स्वैर झाली कीं, त्या ठायीं एखाद्या निर्भीड व अस्खलित वाक्प्रवाहाचा स्पष्ट सहानुभव होऊं लागला. शेजारच्या सिद्धिपुरावरून वाहत येणाऱ्या प्रवाहांत धीरगंभीर अशा भिक्षूंची सहजात चाटुता ऐकूं येत होती. तेथून जरा पुढें गेल्यावर लागलींच नटसूरा-वरून एक भावसंमिश्र असा शीतल-मंद प्रवाह येऊन या वाग्गंगेंत मिसळलेला दिसत होता. दुसरा जो पूर्वगामी प्रवाह त्यास 'नीरा' हें नांव प्राप्त होऊन सुरुवातीस तो डोंगरी मुलुखांतून जात असतांना कधीं अत्यंत क्षीण तर कधीं शुष्क असा दिसला. तेथेंच कानद, वेळवंड, रोहिडे या खोऱ्यांतील पाण्याचे लोट पावें, वेळवंडें, आंबवडें या ठिकाणांहून वाहत येऊन मुख्य प्रवाहाला मिळत होते. त्यांमध्यें मुख्यतः रोहिडखोऱ्यांतील कारीच्या ओहोळाचा जोर विशेष

होता. येथपर्यंत जरी अनेक प्रकारचे व ठिकाणचे ओहोळ एकत्र झाले होते, तरी त्यांना खऱ्या नदीचें स्वरूप येण्यास बराच काळ लोटला. तें स्वरूप पुढें तिला–तिचा प्रवाह भोरांस दिसूं लागल्यानंतर–आलें. हा डोंगराळ मुलुख म्हणजे प्राचीन इतिहासानें भरलेला. तेव्हां या वाङ्नीरेच्या प्रवाहाला प्रथम त्याच जातीचा अनन्यसाधारण दरवळ सुटावा हें स्वाभाविक होय. शाहीरी-रसाचा एक बारीकसा पाट येथें येऊन मिसळला होता. कांहीं कालावसर लोटल्यावर त्यांत नानाविध द्रव्यांचें मिश्रण होऊन तो प्रवाह विविधगंध-रसवाही अतएव जास्त सांस्कृतिक, आल्हादजनक व स्फूर्तिदायक झाला. या घटनेबरोबर जिकडेतिकडे जरा निराळें दृश्य दिसूं लागलें. आतांपर्यंत नदी बहुतेक निर्जन प्रदेशांतून आपला मार्ग काढीत असल्याकारणानें तिच्या तीरावर ओसाडी होती. परंतु या वेळीं मात्र तेथें बऱ्याच जणांची गर्दी दिसूं लागली. तिच्यांत वृद्धांबरोबर तरुणहि होते. त्या सगळ्यांचा हेतु उपासना कीं विनोदन होतें हें जरी निश्चितपणें सांगतां येणें कठिण असलें तरी देखील पुष्कळांच्या कृतींत साधारणपणें पहिल्यापेक्षां दुसऱ्याचेंच प्राधान्य दिसून येत होतें. स्नानार्थ आलेल्या त्या गर्दींत एक स्थविर तपस्वी एका बाजूस बसून समोरील रामायण-भारत-ग्रंथांचा त्याचा अव्याहत पाठानुपाठ चाललेला दिसत होता; तर दुसऱ्या ठिकाणीं सृष्टिसौंदर्याचें कथन व शब्दरहस्याचें मार्मिक विवेचन हीं चाललेलीं ऐकूं येत होतीं. कोणी युरोपीय नारींच्या क्रीडानैपुण्याचें कौतुक करीत होता, तर कोणी पुराण वंग कवींचें स्वारस्य अगर अर्वाचीन मराठी कवींचें महत्त्व पटवीत होता. तेथेंच जरा पलीकडे जेठा मारून एकजणाचें सुडाच्या कागदाच्या बळकट्या पहाण्याचें काम एकनिष्ठपणें सुरू होतें. तथापि पहाण्याच्या क्रियेपेक्षां त्याची ती क्रिया हातानेंच चाललेली स्पष्टतेनें दिसत होती. मागाहून आलेले पण धडाडीनें पाण्यांत उडी घेणारे असे बरेच जवान पुढें दिसले. त्यांच्यापैकीं कोणाचें काव्यपठण तर कोणाचें चरित्रकथन, कोणाचें कथानिरूपण तर कोणाचें विनोदरंजन सुरू होतें. ज्यांना आंत उतरण्याची शक्ति नव्हती, असे कांहींजण नुसत्या पादप्रक्षालनाचेंच सुख उपभोगीत होते. भोर सोडून पुढें सरकल्यानंतर एकटाच एक परंतु बहुरंगी प्रवाह ब्रह्मदेवाच्या पदसेवनानें पवित्र होऊन गुंजारव करीत करीत मंदोदरावरून वहात येतांना

त्याच्या तरंगध्वनींत स्वराज्याची कथाहि ऐकूं येत होती. पुढें जंबुग्रामामधल्या फळाफुलांच्या बागांतून त्याची प्रगति होत असतांना शेजारींच चाललेल्या एका संकीर्तनाचा सूर कानीं पडला. त्या कीर्तनांतील विषय विविध असले तरी संतकाळावरच त्याचा विशेष भर होता. तो प्रवाह नदीस मिळाल्यामुळें तिचें स्वरूप जास्त आकर्षक झालें. अशा विविध भावनात्मक रसांचा आदर केल्यानें ती नदी फोफावतच शिरवळीस पोहोंचली. तेथेंहि नवलकथांच्या नवरसांचें आतृप्त सेवन करीत करीत नीरांबेचा तो पूर्वाभिमुख प्रवाह पुढें सोत्सुख आणि सोल्हास वाहत असलेला दिसत होता. या प्रवाहांत आपणांसहि स्नानाचें पुण्य संपादन करितां यावें व त्याचें फळ आपल्या सजातीय भगिनींच्या अल्पांशानें तरी पदरांत पडावें या सदिच्छेनें प्रेरित होऊन भीत भीत पण चिकाटीनें व भक्तिभावानें कांहीं महिला स्नान उरकीत होत्या; त्यांच्यापैकीं एकीचें चित्त मात्र विश्वांतील जीवनाचें निगूढ व अत्यद्भुत कोडें कसें सुटेल या विचारव्यग्रतेनें मूढ झालेलें दिसलें. हे प्रवाह पुढें जरी एकवटले होते तरी त्यांत ज्या अनेकविध ओहोळांचें संमिश्रण झालें होतें, त्यांतील जीवनरस परस्परभिन्न नसून तेथला साधर्म्यभाव आनंददायक भासत होता. अशा प्रकारें स्वेच्छेनें व स्वच्छंदानें पूर्वपश्चिमगामी असलेल्या पवित्र नीरांबेच्या प्रवाहांचें भोरसंस्थानांतील दृश्य कोणा सहृदयाच्या अपरिमित कौतुकास, आनंदास व अभिमानास पात्र होणार नाहीं बरें !

---

# फुलांची हौस

## कवि : सॉ. वासुदेव रामचंद्र दिवेकर, मुंबई.

[ यांचा जन्म १९०० सालीं पडघवली येथें झाला. हे सॉ. केशवराव दिवेकर यांचे कनिष्ठ बंधू होत. सन १९२८ सालीं सॉलिसिटरची परीक्षा देऊन आपल्या वडील बंधुंना धंद्यांत मदत करण्याकरितां ते ( दिवेकर व पोपटलाल ) या कंपनींत शिरले. ते उत्तम गवई असून पुरुषोत्तमबुवा सोमण यांचेजवळ त्यांनीं त्या शास्त्राचें चांगलें अध्ययन केलें आहे. त्यांना कविता करण्याचा नाद असल्यामुळें त्यांच्यांत काव्य व संगीत यांचें गोड मिश्रण झालेलें अनुभवास येतें. ]

लवकरि उठुनीया गोलि घेवोनि हातीं
परडि बहिण माझी धाकुटि सुप्रभातीं
मधुर बकुलपुष्पां वेंचुनी आणण्यातें
प्रतिदिनिं बहु होई तन्मना मोद जेथें! १

जमुनि बकुलवृक्षाखालतीं सर्व बाला
जमविति बहु पुष्पें, बोलती गोड बोलां,
"करूं बहुविध माला;" चालती बेत नाना,
समय बहु मजेचा तो गमे बालिकांना! २

परडि भरुनि ताई यावयातें निघाली,
घरिंवरि बघुनी ती नाचतो हर्ष गालीं;
सहज मजसि वाटे मागुं थोडीं फुलें कीं,
त्वरित झणिं निघालों तीस मार्गीं विलोकीं. ३

"मजसि कुसुम मालेकारणें थोडकीं दे."
मुळिंच मजकडे ती अल्पहा लक्ष ना दे;
चटकन दुरि झाली सोडुनी मार्ग सारा,
चकिताचि बहु झालों देखुनी फार तोरा! ४

"घरिं फुकट बसोनी मागतोसी अतां का?
मुळिंच तुजसि नाहीं द्यायचीं; मार हांका;
मजसि हविंत सारीं तीं; तुम्हां काय त्याचें?
कितितरि वदुं माझ्या हाल होती पदांचे! ५

ग्रथिन कितितरी मी हार भारी मजेचे,
नवनव गजरे हे तेवि नाना तऱ्हेचे;
गणपतिकरितां ही माळ गुंफीन मोठी,
बघशिल मग त्याच्या मीच घालीन कंठीं; ६

सजविन अपुल्या मी बाहुलीला फुलांनीं,
करिन सकल तीचे दागिनेही तयांनीं;
जमविन अजि साऱ्या मैत्रिणींना घरीं मी,
कितिक हरतऱ्हेचीं स्वस्तिकें लावुं नामीं" ७

बहुतपरि तियेचें आणखी बोलणें तें
परिसुनि बहु आली खिन्नता मानसातें;
प्रगट मजसि ती ती ना करी चिंतनांत,
क्षणचि गढुनि गेलों, युक्ति आली मनांत ! ८

"सर सर सर ताई सर्प आला पहा तो;"
तिज कुठुनि पहाया धीर अंगीं उरे तो ?
परडि गळलि खालीं दूर ताई पळाली,
सहज टिपुनि पुष्पें घ्यावयातें मिळालीं ! ९

"फसविलि तुज ताई सर्प नाहीं, न कांहीं;
त्वरितचि इकडे ये, वेंचुं दोघे फुलें हीं."
हंसत हंसत आली बोलली "फेड याची
खचित करिन, नाहीं मी अशी ही फसाची!" १०

---

# एकराष्ट्रीयत्वाची कल्पना

लेखक : चिंतामण दत्तात्रय आंबेकर, भोर.

[ यांचा जन्म सातारा येथें १९०८ सालीं झाला. प्राथमिक व दुय्यम शिक्षण भोर येथें झालें. १९२५ सालीं भोर हायस्कूलमधून मॅट्रिक. सध्यां फर्ग्युसन कॉलेजमधून बी. ए. ला बसत आहेत. कॉलेजमध्यें गणित विषयांतील प्राविण्याबद्दल शिष्यवृत्ति. 'रत्नाकर,' 'यशवंत' 'स्फूर्ति' वगैरे मासिकांतून त्यांच्या अनेक लघुकथा प्रसिद्ध झाल्या आहेत. ]

हिंदुस्थानांत आज अगणित शक्ति आहे. पण ती परस्पराविरुद्ध असल्यामुळें तींतून कांहींच प्रगटसामर्थ्य निष्पन्न होत नाहीं. याला कारण काय तर प्रत्येक जणाचें आपल्या देशबांधवांच्या दोषांकडेच सारें लक्ष वेधून गेलें आहे. त्यामुळें एकीची तर शक्यताच नाहीं, पण ह्या संशयोद्भूत दोषैक दृष्टीमुळें समाजांतील दौर्जन्य व पिशुनता मात्र वाढीस लागते. खरोखर, 'चोर! चोर!' म्हणून तुम्ही एखाद्या विविक्षित समाजाचा पिच्छाच पुरविला तर तो समाज खात्रीनें चोरीच करूं लागेल हें निर्विवाद आहे.

जोंपर्यंत आपण परस्परांचे दोषच पहात आहोंत तोंपर्यंत आपल्यांत प्रेम व ऐक्य कसें वसणार? टीकेमधून जातिविषयक गोष्टी आणण्याचें विष अजिबाद काढून टाकलें पाहिजे. निरपराधी प्राण्यांना बळी दिल्यापासून स्वर्गाची प्राप्ति मिळणार नाहीं तर प्रेमरूपी अग्निकुंडांत पक्षाभिमान, मत्सर इत्यादिकांचें हवन केल्यानेंच तो प्राप्त होणार आहे.

आजपर्यंत आपण पुष्कळ टीकात्मक निषेध केला असेल अगर भंडावून सोडणारा गिलगाहि केला असेल; पण त्यामुळें स्थिति न सुधारतां दिवसेंदिवस ती जास्त बिघडतच चालली आहे. एकानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वासरूं मारण्यांत काय अर्थ आहे? सरळ मार्गाचें अवलंबन करून अन्तःशुद्धी करण्यांतच यशाचा सोपानमार्ग आहे.

जीविताच्या सर्व दरवाजावर 'ओढा' असें लिहिलेलें असतें; पण आपण तें बरोबर न वाचतां अडिल खोंडाप्रमाणें 'ढकलूं' लागतों. मग तें द्वार कसें उघडेल? स्फूर्तीच्या मंदिरांत प्रवेश करण्यास अन्तःकरण हें एकच द्वार आहे. कोणत्याहि जातीचीं मनें प्रेमानें काबीज करा म्हणजे त्यांच्या विचारपद्धतींत पूर्ण क्रांति ठरलेलीच.

आपण जर आपल्या कर्तव्यावर जोर देत गेलों तर आपले हक्क व अधिकार आपल्याकडे आपोआप चालत येतात असा कधींहि न चुकणारा ईश्वरी नियम आहे. येथें जर विस्तव पेटत आहे तर ऑक्सिजन वायु खास खेंचलाच गेला पाहिजे. इंग्रजींत अशी एक म्हण आहे कीं, "पहिल्यानें लायक व्हा आणि मग इच्छा करा!" "First deserve and then desire."

आपणाला जर खरोखरीच यशस्वी व्हावयाचें असेल तर आपण आपल्या

अन्तःकरणांतील स्वार्थी धनीपणाची वृत्ति टाकून दिली पाहिजे. सर्व प्रकारच्या अहंमन्य कल्पनांना तिलांजलि दिल्याशिवाय प्रगतीचें पाऊल पुढें पडणें शक्य नाहीं. या बाबतींत सर ऐझॅक न्यूटनचें उदाहरण खरोखर मनन करण्यासारखें आहे. सर्व जगाच्या दृष्टीनें तो इतका हुशार, विद्वान्, कुशाग्रबुद्धीचा कशानें झाला ? तूं सर्व जगांत मोठा माणूस आहेस अशी त्याची कोणीं स्तुति केली, तेव्हां तो म्हणाला:—

" छे ! छे ! ! माझी बुद्धि अगर माझें व्यक्तित्व म्हणजे अगाध ज्ञानोदधीच्या किनाऱ्यावरील गारगोट्या वेंचणारें लहानगें पोर! "

अद्याप तो गारगोट्या वेंचणारा किनाऱ्यावरचा अल्लड पोरच होता.

यावरून आपणांस असें दिसून येईल कीं, जी निरभिमानपणाची वृत्ति कशावर आपला हक्क सांगीत नाहीं अगर आपल्या क्षुद्र व्यक्तित्वाचें देव्हारेबजा स्तोमहि माजवीत नाहीं तीच वृत्ति आपल्या कर्तव्याला सामर्थ्य देणारी आधिदेवता बनते.

कांहीं नवी शक्कल शोधून काढावी आणि लोकांत लोकप्रियता व प्रतिष्ठा मिळवावी या दृष्टीनें खऱ्या मार्गापासून पुष्कळ लोक कित्येक वेळां परावृत्त होतात. एकाच पवित्र देशांत राहिल्यानें उत्पन्न होणाऱ्या बंधनांची कसलीच पर्वा न बाळगतां लोकांतील बंधुप्रीतीच्या फुलाला ते फुलवून देत नाहींत. आणि याच जातिविषयक भेदामुळें लोकांतील माणुसकीचा नाश होत जाऊन एकराष्ट्रीयत्वाची कल्पना लुप्तप्राय होते व देश रसातळाला जाऊन मिळतो. या दृष्टीनें प्रत्येक हिंदवासियानें जातिविषयक आकुंचित भावना न ठेवतां व्यापक बुद्धीनें राष्ट्रहिताची दृष्टि ठेवली तर हिंदुस्थानचा भाग्योदय होण्यास कितीसा अवधि लागणार ?

---

# खेड्यांतील प्राथमिक शाळा

लेखकः वासुदेव नारायण जोशी, भोर.

[ ह्यांचा जन्म, जांभळी, तालुके राजगड, तेथें ता. १६ मे १८७४ रोजीं झाला. ते इंदूर इंग्लिश स्कूलमधून प्रवेश परीक्षा होऊन इंदूर होळकर कॉलेजांतून कलकत्ता

युनिव्हर्सिटीची एफ्. ए. ची परीक्षा सन १८९६ सालीं पास झाले. नंतर त्यांनी भोर संस्थानच्या शिक्षणखात्यांत नोकरी धरली. ते भोर हायस्कूलचे १९०९ सालीं हेडमास्तर झाले. १९१६ सालापासून ते संस्थानचे शाळाधिकारी आहेत.]

हल्लीं प्राथमिक शाळांकरितां जो अभ्यासक्रम ठरविला आहे, तोच शहरांतील, मोठ्या गांवांतील व खेड्यांतील प्राथमिक शाळांना सरसकट लागू करण्यांत आलेला आहे. यामुळें खेडेगांवांतून शिक्षणाचा जितका प्रसार व्हावयास पाहिजे तितका होत नाहीं. ज्या शाळांतून मराठी चार इयत्तांपर्यंत शिक्षण दिलें जातें त्यांना प्राथमिक शाळा समजण्यांत येते. शहरांतून अगर मोठ्या गांवांतून प्राथमिक शिक्षण पुरें झाल्यावर मुलें पुढें शिकणारीं असतात. खेडेगांवांतील शाळांतून चवथे इयत्तेपर्यंतहि मुलें शाळेंत टिकत नाहींत. पांढरपेशीं मुलें सोडून दिलीं तर बाकीचीं बहुतकरून तीन इयत्ता झाल्या कीं शाळा सोडण्यास सुरुवात करतात किंवा पालक त्यांना शेतीच्या कामाकरितां शाळा सोडावयास लावितात. म्हणजे खेड्यांतील मुलें फार तर तीनचार वर्षेंच शाळेंत राहतात. तेव्हां त्यांना तीनचार वर्षांत लिहितांवाचतां येऊन सामान्य व्यवहार नीटपणें चालविण्यापुरतें गणिताचें ज्ञान मिळेल अशा प्रकारचा नवा शिक्षणक्रम आंखून दिला पाहिजे. याकरितां शहरांतील प्राथमिक शाळांचा व खेड्यांतील प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रम अगदीं भिन्न असला पाहिजे.

हल्लीं खेड्यांतील शाळांतून शहरांप्रमाणेंच भाषा, गणित व इतिहासभूगोल इत्यादि विषयांचें शिक्षण दिलें जातें. भाषाविषयाकरितां जीं क्रमिक पुस्तकें शहरांतून शिकविलीं जातात, तींच खेडयांतील गांवांतून सुरू असतात. सदर पुस्तकांतून चरित्रविषयक, ऐतिहासिक, भौगोलिक व शास्त्रीय असे धडे दिलेले असतात, ते खेडयांतील मुलांच्या भावनेला व परंपरेला धरून नसल्यामुळें त्यांना त्यांत कसलीच गोडी वाटत नाहीं व घोकंपट्टीवर भर देऊन परीक्षेपुरती त्यांची तयारी होत असल्यानें शिक्षणाचे भरीव संस्कार टिकत नाहींत.

शीलसंवर्धन व उच्च भावनांचा विकास हेंच जर शिक्षणाचें ध्येय आहे, तर ज्या योगानें वरील ध्येय साध्य होईल अशा गोष्टींचा शिक्षणक्रमांत समावेश करणें अत्यंत जरूरीचें आहे.

लहानपणीं विशेषतः खेडेगांवांतील मुलांची प्रवृत्ति धार्मिक गोष्टींकडे जास्त असते. त्यांची ही प्रवृत्ति लक्षांत घेऊन धार्मिक विषयांसंबंधीं अनेक धड्यांची योजना खेड्यांतील शाळांकरितां केली तर त्या नवीन क्रमिक पुस्तकांचा अतिशय उपयोग होईल. खेड्यांतील शेतकरी लोकांना पांडवप्रताप, हरिविजय, रामविजय इत्यादि धार्मिक ग्रंथ ऐकण्याची फार आवड असते, हें बहुतेकांना माहित आहेच. नेहमीं नाहीं तरी चातुर्मास्यांत मोठ्या भक्तिभावानें ते वरील ग्रंथ कोणाकडून तरी वाचून घेतात. तेव्हां क्रमिक पुस्तकांत त्यांतील बरेचसे निवडक उतारे जसेच्या तसेच जर दिले तर त्या योगानें मुलांमध्यें वाचण्याची गोडी वाढून शाळा सोडल्यानंतर ते ग्रंथ समग्र वाचण्याकडे त्यांची प्रवृत्ति होऊन, वाचनाची अभिरुचि कायम राहील व अशा ग्रंथांच्या सतत वाचनानें त्यांचें शीलसंवर्धन होण्यास उपयोग होईल. मात्र हे उतारे जसेच्या तसेच दिले पाहिजेत. कारण त्यांचा भावार्थ गद्यरूपानें दिल्यास मूळ ग्रंथाबद्दल वाटत असलेली आदरबुद्धि नष्ट होण्याचा संभव आहे. हल्लींच्या क्रमिक पुस्तकांतून ज्या कविता निवडल्या आहेत, त्यांचा त्या मुलांना करमणुकीपलीकडे जास्त उपयोग होत असेल असें दिसून येत नाहीं. कित्येक वेळां तर अशा कांहीं कवितांचे दाखले मुलांचे पुढें ठेवलेले आढळतात कीं ( उदाहरणार्थ चेंडूफळीचा खेळ ) त्यांत वर्णिलेल्या गोष्टींचा त्या मुलांच्या जीवितांशीं कधीं जन्मांतहि संबंध येत नाहीं. यासाठीं क्रमिक पुस्तकांकरितां अशा कवितांची निवड केली पाहिजे कीं, ज्या पाठ केल्या असतांना त्यांच्या मनावर कांहींतरी अढळ नैतिक परिणाम होईल व त्या मनाला अखंड आनंद देत राहतील.

भाषाविषयाप्रमाणेंच गणितविषयांतहि सुधारणा होणें जरूर आहे. खेड्यांतील मुलांना त्रैराशिक व सरळव्याज यांपलीकडे गणित विषयाचा व्यवहारांत कधींहि उपयोग होत नसतो. कोष्टकांचे बाबतींत तर विदेशी कोष्टकांची कधींच जरूरी खेड्यांतून भासत नाहीं. तेव्हां ज्या कोष्टकांचा कधींहि उपयोग होण्याचा संभव नाहीं तीं खेड्यांतील मुलांना पाठ करावयास लाविल्यानें त्यांच्या कालाचा व बुद्धीचा अपव्यय मात्र होतो.

त्याचप्रमाणें खेड्यांतील मुलांना शेतकी, आरोग्य व सहकारी तत्त्व

यांविषयींचें ज्ञान मिळेल अशा प्रकारची योजनाहि अभ्यासक्रमांत केली असतां विद्यार्थ्यांचा पुष्कळ फायदा होणार आहे.

खेड्यांतील शाळांच्या परीक्षापद्धतींतहि नवीन दृष्टि ठेविली पाहिजे. मुलांचे पुढें परीक्षा पास होणें हेंच ध्येय असल्यामुळें घोकंपट्टी करून एकदांचें पास व्हावें अशी त्यांची प्रवृत्ति होत चाललेली आहे. त्यामुळें त्यांच्या बौद्धिक गुणाचा खरा विकास होत नाहीं. हल्लींप्रमाणें ठराविक धर्तीचे प्रश्न न विचारतां त्यांच्या बुद्धीची वाढ कितपत झाली याकडे विशेषतः दृष्टि ठेवून मुलांची तपासणी केली पाहिजे. शिक्षकानेंहि केवळ क्रमिक पुस्तकांवरच भिस्त न ठेवतां विद्यार्थ्यांना इतर उपयुक्त माहिती देऊन त्यांच्यामध्यें चौकसपणा व स्वतंत्र बुद्धीचा विकास हीं उत्पन्न केलीं पाहिजेत. सारांश, मुलें जेणेंकरून बहुश्रुत व शीलवंत असे उत्कृष्ट नागरिक होतील असा प्रयत्न केला पाहिजे.

या विषयासंबंधीं आणखीहि पुष्कळ उपयुक्त सूचना करतां येण्यासारख्या आहेत. परंतु त्यांतील ज्या विशेष महत्त्वाच्या वाटल्या त्यांचाच मीं येथें विचार केला आहे.

———

# सजीव मनुष्याचा यमलोकीं पराक्रम

लेखिका : सौ. मालतीबाई भिडे, पुणें.

[ यांचा जन्म १९१६ सालीं पुण्यांतील ओंकारांच्या घराण्यांत झाला. त्या कै. कु. शांताबाई ओंकार यांच्या भगिनी असून भोरचे रहिवासी रा. वि. गो. भिडे वकील यांच्या ज्येष्ठ स्नुषा होत. त्यांचे लेख शाळापत्रकांत येत असतात. ]

यमराज व नारद यांची गांठ पडली. त्या वेळीं यमराज म्हणाले, हे नारदमुने, अनादिकालापासून मी मृत मनुष्याचे फक्त प्राणच यमलोकीं आणीत असतों व चित्रगुप्ताकडून मिळालेल्या माहितीप्रमाणें योग्य तें शासन करीत असतों. परंतु हीं माणसें देह धारण करून मृत्युलोकीं कशीं वावरतात हें त्यास एकवार येथें आणून पहावें, अशी मला फार इच्छा झाली आहे. आणूं का मृत्युलोकाहून एक सजीव प्राणी ?

नारद:— *मला विचारलेंस हें बरें केलेंस. ह्या फंदांत तूं पडूं नकोस. हीं* माणसें फार अघोरकर्मी असतात. त्यांचे उपद्याप पाहिलेस म्हणजे तूं थक्कच होशील. फार काय सांगूं, त्यांतला एक जरी प्राणी, नमुन्यादाखल येथें आणलास तरी तुझ्यासारख्या कर्तव्यतत्पर बहाद्दराची तो केव्हांच बंभेरी उडवून टाकील.

यमः—असें तो काय करणार, तेंच तर मला पहावयाचें आहे. तुम्ही अतिशयोक्तीनें त्याचें चित्र रेखाटतां असें मला वाटतें. तुमचें म्हणणें खरें मानावें तर—

स्वर्गीचे अमर इच्छिताती देवा ।
मृत्युलोकीं व्हावा जन्म आम्हां ।।

स्वर्गलोकांतील अमरांनीं जन्म घेण्याची हांव कां धरिली असती ?

नारद:—मला जें वाटलें तें तुला निवेदन केलें. याउपर तुझी मर्जी. यानंतर नारद आपल्या मार्गास लागले.

यमराजांची उत्सुकता दिवसेंदिवस वाढतच चालली. एके दिवशीं त्यानें आपल्या दूतांस मृत्युलोकाहून एक सजीव मनुष्य घेऊन येण्यास सांगितलें. आज्ञेप्रमाणें ते दूत मृत्युलोकीं आले.

याच वेळीं मुलकीकडचा—मामलेदार कचेरींतील एक कारकून अंगणामध्यें बाजेवर गाढ झोंपीं गेलेला आढळला. हा कारकून फार बिलंदर म्हणून नाणावलेला होता. दूतांनीं त्यास अल्लाद उचलून यमलोकांत आणून ठेवलें व यमाजीभास्करास हें वृत्त जाहीर केलें. यमराजांना आनंद झाला. त्यांनीं दूतांना सांगितलें कीं, तुम्ही त्याला कसलाहि उपसर्ग न देतां तो काय काय करतो एवढें पाहून रोज सकाळीं मला वर्दी देत जा.

रोजचे वेळेवर कारकून जागा झाला. त्याचे नजरेस नित्याच्या परिपाठां-तील वस्तु न पडतां निराळ्याच वस्तु दृष्टीसमोर पडूं लागल्या. त्या पाहून तो गांगरला व घाबरला. पुष्कळ विचार केल्यावर त्याच्या ध्यानांत आलें कीं, यमलोकाचीं जीं वर्णनें आपण वाचलीं तीं येथील स्थितीस बरोबर लागू पडतात. तेव्हां हा यमलोकच असावा. आतां घाबरून जाऊन थोडीच सुटका होणार आहे ? या विचारानें त्याला एक प्रकारचें निर्वाणीचें धैर्य आलें.

तो उठला. चोहोंकडून फिरून आला. कंदमुळें भक्षण केलीं. जसजसा काल जाऊं लागला तसतशी त्याला हुशारी वाटूं लागली.

हा यमलोक आहे याबद्दल त्यानें खात्री करून घेऊन नंतर तो उपद्व्यापी कारकून पुढील उद्योगाला लागला.

यमलोकांत लोकवस्ती किती आहे, कोण कोण अंमलदार कोणकोणते जागेवर आहेत, सैन्य किती आहे, राज्यव्यवस्था कशी आहे, यमराजावर अधिकार कोणाचा चालतो, त्याला हुकूम येतात ते कसे येतात वगैरे वगैरे सर्व खडान् खडा माहिती त्यानें मिळविली. त्यामध्यें त्याला असें दिसून आलें कीं, यमावर हुकमत वैकुंठाधिपती श्रीमहाविष्णु यांची असून वैकुंठाधिपतींचे हुकूम यमराजास येतात. यमराज सिंहासनावर बसतात त्या जागेचे वर एक गवाक्ष आहे. त्या गवाक्षांतून श्रीविष्णूचे हुकूम यमराजाचे हातीं पडतात.

त्या बहाद्दरानें त्या सर्व माहितीचा फायदा करून घेण्याचें ठरविलें.

त्यानें दोन हुकूम लिहून तयार केले व त्यावर आपल्या हातांतील आंगठीच्या मोहरा केल्या. ( सदरहू आंगठीवर 'श्रीविष्णु ' एवढींच अक्षरें होतीं. ) त्यांतील एक हुकूम त्याला स्वतःला व दुसरा या यमराजाला होता.

त्याचे स्वतःचे हुकुमांत त्यानें पुढील मजकूर लिहिला होता.

राजेश्री सत्वस्थराव उपटसुंभे राहणार मृत्युलोक आज वस्ती यमनगरी, यांस कळविण्यांत येतें कीं, तुम्हांस अनधिकारानें तुमची मृत्युलोकांतील वास्तव्याची मुदत संपण्याचे पूर्वी आमचे ताबे अंमलदार यमाजीभास्कर यांनीं यमलोकीं आणलें. या झालेल्या अन्यायाबद्दल आम्ही फार दिलगीर आहोंत. तुम्ही बिगर परवानगीनें मृत्युलोकांतील मामलेदार कचेरींत गैरहजर राहिलांत असा आरोप तुमचेवर मामलेदारांनीं ठेवून तुम्हांस त्यांनीं बडतर्फ करून टाकल्याचें वृत्त नुकतेंच आमच्या कानीं आलें आहे. या सर्व अन्यायाचें परिमार्जन करण्याचे हेतूनें आम्ही असा हुकूम फर्मावितों कीं, हुकूम हातांत पडतांच यमराजास दाखवावा व यमराजापासून ताबडतोब चार्ज तुम्ही घ्यावा. यमराजानें यापुढें तुमचे आज्ञेंत राहून तुमचे हुकुमाप्रमाणें चालावें.

यापुढें आम्ही तुम्हांस कोणाचेच ताबेदार न ठेवतां संपूर्ण स्वातंत्र्य देत

आहों. तरी तुम्ही मन मानेल तसा राज्यकारभार चालवून कालक्षेप करावा. क्षेम असो. लेखनसीमा, श्रीविष्णुमुद्रा.

यमाचे हुकुमांत त्यानें पुढीलप्रमाणें मजकूर लिहिला—

ठाणे अंमलदार यमाजीभास्कर यांस हुकूम देण्यांत येतो कीं, आमच्या मंजुरीशिवाय व नेहमींच्या वहिवाटीस सोडून तुम्ही एक सजीव मनुष्य यमलोकीं आणून ठेवला आहे. या गहन अपराधाबद्दल तुम्हांस राज्यच्युत करण्यांत आलें आहे. तरी देखत हुकूम राज्यसूत्रें नवीन आणलेल्या माणसाच्या स्वाधीन करावींत व तुम्ही यापुढें त्याचे आज्ञेंत रहावें. यांत कसूर अगर विलंब होतां कामा नये. यापेक्षां तुम्हांस अत्यंत कडक शिक्षा होणें जरूर होतें. परंतु तुम्ही गादीचे जुने नोकर आहांत ही गोष्ट ध्यानीं घेऊन ही सौम्य शिक्षा करीत आहें. रा. सत्वस्थराव यांना अलाहिदा हुकूम पाठविला आहे. श्रुत होय, लेखनसीमा. श्रीविष्णुमुद्रा.

वरीलप्रमाणें दोन्ही हुकूम लिहून तयार झाल्यावर आपले नांवाचा हुकूम सत्वस्थरावांनीं आपले जवळ ठेविला व दुसरा हुकूम यमराज दरबारांत सिंहासनावर बसले असतांना त्यांचे हातीं नेहमींच्या मार्गानें पडावा अशी व्यवस्था त्यानें केली.

यमराजाचे हातांत यथाकालीं हुकूम पडला. त्याच वेळीं सत्वस्थराव आपला हुकूम हातांत घेऊन तो यमराजास दाखविण्याकरितां त्यांचे समोर हजर झाले. यमराजांनीं हुकुमाप्रमाणें सत्वस्थरावांस सिंहासनावर बसविलें व राजमंत्र्यांना व इतर सेवकांना वैकुंठाहून आलेला हुकूम जाहीर केला. यानंतर यमराज हात जोडून सत्वस्थरावांना विनंति करूं लागले कीं, 'आपण जी मला आज्ञा कराल त्याप्रमाणें मला वागणें भाग आहे. तरी मी यापुढें कोणतें काम करावें याबद्दल आज्ञा व्हावी.'

त्याची नेमणूक फरसाचे जागेवर करण्यांत येऊन राजसभा झाडण्याचें काम व आसनें बरोबर मांडण्याचें काम यमराजाकडे सोंपविण्यांत आलें.

सत्वस्थराव सिंहासनारूढ होतांच जे प्राणी नरकांत पडले होते किंवा इतर अनेक तऱ्हेच्या शिक्षा भोगीत होते, त्या सर्वांची एकदम मुक्तता केली व राजसभेंतील ज्या ज्या लोकांचा त्यांना तिरस्कार वाटला, त्यांना भराभर

तो उठला. चोहोंकडून फिरून आला. कंदमुळें भक्षण केलीं. जसजसा काल जाऊं लागला तसतशी त्याला हुशारी वाटूं लागली.

हा यमलोक आहे याबद्दल त्यानें खात्री करून घेऊन नंतर तो उपद्यापी कारकून पुढील उद्योगाला लागला.

यमलोकांत लोकवस्ती किती आहे, कोण कोण अंमलदार कोणकोणते जागेवर आहेत, सैन्य किती आहे, राज्यव्यवस्था कशी आहे, यमराजावर अधिकार कोणाचा चालतो, त्याला हुकूम येतात ते कसे येतात वगैरे वगैरे सर्व खडान् खडा माहिती त्यानें मिळविली. त्यामध्यें त्याला असें दिसून आलें कीं, यमावर हुकमत वैकुंठाधिपती श्रीमहाविष्णु यांची असून वैकुंठाधिपतींचे हुकूम यमराजास येतात. यमराज सिंहासनावर बसतात त्या जागेचे वर एक गवाक्ष आहे. त्या गवाक्षांतून श्रीविष्णूचे हुकूम यमराजाचे हातीं पडतात.

त्या बहाद्दरानें त्या सर्व माहितीचा फायदा करून घेण्याचें ठरविलें.

त्यानें दोन हुकूम लिहून तयार केले व त्यावर आपल्या हातांतील आंगठीच्या मोहरा केल्या. ( सदरहू आंगठीवर 'श्रीविष्णु' एवढींच अक्षरें होतीं. ) त्यांतील एक हुकूम त्याला स्वतःला व दुसरा या यमराजाला होता.

त्याचे स्वतःचे हुकुमांत त्यानें पुढील मजकूर लिहिला होता.

राजेश्री सत्वस्थराव उपटसुंभे राहणार मृत्युलोक आज वस्ती यमनगरी, यांस कळविण्यांत येतें कीं, तुम्हांस अनधिकारानें तुमची मृत्युलोकांतील वास्तव्याची मुदत संपण्याचे पूर्वी आमचे तावे अंमलदार यमाजीभास्कर यांनीं यमलोकीं आणलें. या झालेल्या अन्यायाबद्दल आम्ही फार दिलगीर आहोंत. तुम्ही बिगर परवानगीनें मृत्युलोकांतील मामलेदार कचेरींत गैरहजर राहिलांत असा आरोप तुमचेवर मामलेदारांनीं ठेवून तुम्हांस त्यांनीं बडतर्फ करून टाकल्याचें वृत्त नुकतेंच आमच्या कानीं आलें आहे. या सर्व अन्यायाचें परिमार्जन करण्याचे हेतूनें आम्ही असा हुकूम फर्मावितों कीं, हुकूम हातांत पडतांच यमराजास दाखवावा व यमराजापासून तावडतोब चार्ज तुम्ही घ्यावा. यमराजानें यापुढें तुमचे आज्ञेंत राहून तुमचे हुकुमाप्रमाणें चालावें.

यापुढें आम्ही तुम्हांस कोणाचेच तावेदार न ठेवतां संपूर्ण स्वातंत्र्य देत

आहों. तरी तुम्ही मन मानेल तसा राज्यकारभार चालवून कालक्षेप करावा. क्षेम असो. लेखनसीमा, श्रीविष्णुमुद्रा.

यमाचे हुकुमांत त्यानें पुढीलप्रमाणें मजकूर लिहिला—

ठाणे अंमलदार यमाजीभास्कर यांस हुकूम देण्यांत येतो कीं, आमच्या मंजुरीशिवाय व नेहमींच्या वहिवाटीस सोडून तुम्ही एक सजीव मनुष्य यमलोकीं आणून ठेवला आहे. या गहन अपराधाबद्दल तुम्हांस राज्यच्युत करण्यांत आलें आहे. तरी देखत हुकूम राज्यसूत्रें नवीन आणलेल्या माणसाच्या स्वाधीन करावींत व तुम्ही यापुढें त्याचे आज्ञेंत रहावें. यांत कसूर अगर विलंब होतां कामा नये. यापेक्षां तुम्हांस अत्यंत कडक शिक्षा होणें जरूर होतें. परंतु तुम्ही गादीचे जुने नोकर आहांत ही गोष्ट ध्यानीं घेऊन ही सौम्य शिक्षा करीत आहें. रा. सत्वस्थराव यांना अलाहिदा हुकूम पाठविला आहे. श्रुत होय, लेखनसीमा. श्रीविष्णुमुद्रा.

वरीलप्रमाणें दोन्ही हुकूम लिहून तयार झाल्यावर आपले नांवाचा हुकूम सत्वस्थरावांनीं आपले जवळ ठेविला व दुसरा हुकूम यमराज दरबारांत सिंहासनावर बसले असतांना त्यांचे हातीं नेहमींच्या मार्गानें पडावा अशी व्यवस्था त्यानें केली.

यमराजाचे हातांत यथाकालीं हुकूम पडला. त्याच वेळीं सत्वस्थराव आपला हुकूम हातांत घेऊन तो यमराजास दाखविण्याकरितां त्यांचे समोर हजर झाले. यमराजांनीं हुकुमाप्रमाणें सत्वस्थरावांस सिंहासनावर बसविलें व राजमंत्र्यांना व इतर सेवकांना वैकुंठाहून आलेला हुकूम जाहीर केला. यानंतर यमराज हात जोडून सत्वस्थरावांना विनंति करूं लागले कीं, 'आपण जी मला आज्ञा कराल त्याप्रमाणें मला वागणें भाग आहे. तरी मी यापुढें कोणतें काम करावें याबद्दल आज्ञा व्हावी.'

त्याची नेमणूक फरासाचे जागेवर करण्यांत येऊन राजसभा झाडण्याचें काम व आसनें बरोबर मांडण्याचें काम यमराजाकडे सोंपविण्यांत आलें.

सत्वस्थराव सिंहासनारूढ होतांच जे प्राणी नरकांत पडले होते किंवा इतर अनेक तऱ्हेच्या शिक्षा भोगीत होते, त्या सर्वांची एकदम मुक्तता केली व राजसभेंतील ज्या ज्या लोकांचा त्यांना तिरस्कार वाटला, त्यांना भराभर

कडक शिक्षा दिल्या. त्याचप्रमाणें त्यांनीं आपल्या दूतांस फर्माविलें कीं, या माझ्या राज्यांतील निम्यापेक्षां अधिक लोकसंख्या कमी झाल्याशिवाय एकहि मनुष्य मृत्युलोकाकडून येथें आणतां कामा नये. त्या नवीन अंमलबजावणीनें सर्वत्र अनास्था ओढवली. मृत्युलोकीं व यमलोकीं दंगल माजून राहिली.

कांहीं काळानंतर नारदांची स्वारी यमलोकीं आली. यमराज यमदरबारचे दाराजवळ केरसुणी घेऊन झाडीत असलेले त्यांना दिसले. आश्चर्यचकित होऊन नारदांनीं यमराजास 'या स्थित्यंतराचा अर्थ काय ?' असें विचारलें. यमराजानें सर्व हकीकत निवेदन केली व ते पुढें म्हणाले, 'हे मुनिश्रेष्ठा, आपण सांगत होतां तें मीं न ऐकतां मला जें करावेंसें वाटलें तें मीं केलें, त्याचें हें फळ सध्यां मी भोगीत आहें. माझ्या हातून झालेल्या या क्षुल्लक अपराधाबद्दल श्रीविष्णूंनीं मला हें फारच कडक शासन केलें असें मला वाटतें. परंतु सत्ते-पुढें शहाणपण काय उपयोगाचें ?'

यानंतर श्रीविष्णूकडून आलेला हुकूम त्यानें नारदास दाखविला. तो हुकूम घेऊन नारद तसेच थेट वैकुंठास आले व त्यांनीं श्रीविष्णूस सांगितलें कीं, 'नवीन यमाची नेमणूक झाल्यापासून मृत्युलोकीं व यमलोकीं फार घोंटाळा माजून राहिला आहे; त्याकडे आपलें लक्ष गेलें आहे काय ?'

नारदाचें भाषण ऐकून श्रीविष्णूस मोठा चमत्कार वाटला. ते म्हणाले, 'अलीकडे माझ्या हुकुमांची अंमलबजावणी बरोबर होत नसल्याचें माझे नजरेस आलें आहे. त्याबाबत आज मीं सक्त तगादा पाठविला आहे. परंतु यमराजाची नेमणूक नवीन झाल्याबद्दल तुम्ही काय सांगत आहां, त्याचा बोध मला होत नाहीं. जुन्या यमराजाचें काय झालें ? नवीन नेमणूक कोणीं व कां केली ? त्यास आमची मंजुरी कां घेतली गेली नाहीं ? याचें मला मोठें आश्चर्य वाटतें.'

श्रीविष्णूच्या शिक्क्याचा हुकूम नारदांनीं श्रीविष्णूस दाखविला. तो पाह-तांच झालेल्या खोडसाळपणाची हकीगत त्यांचे लक्षांत आली. याचा बंदो-बस्त ताबडतोब झाला पाहिजे, हें जाणून ते नारदासह गरुडावर बसून यमलोकीं आले. यमाकडून सर्व हकीगत त्यांस समजली. मृत्युलोकींच्या एका सजीव माणसाकडून यमलोकीं धांगडधिंगा घालण्यांत येत आहे हेंहि त्यांना कळलें.

दरबारचे दारांशीं येतांच पहारेकऱ्यांनीं त्यांना हटकलें व ते म्हणाले, 'आपण वैकुंठाधिपति आहां हें आम्हीं जाणलें, परंतु नवीन यमराजांचा अंमल फार कडक असल्यामुळें व आपण त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य दिल्यामुळें नवीन यमराजांच्या परवानगीशिवाय आम्ही आपणांस आंत सोडणार नाहीं.'

मोठ्या मिनतवारीनें आपण आल्याची वर्दी पोहोंचवून आंत येण्यास आपणांला परवानगी मिळावी असा निरोप श्रीविष्णूंनीं नवीन यमराजास पाठविला.

निरोप ऐकतांच नवीन यमराज म्हणाले, 'श्रीविष्णु अगर वैकुंठ यांपैकीं आम्ही कांहींएक ओळखीत नाहीं. आम्ही कोणाचे ताबेदार नाहीं. आम्ही अगदीं स्वतंत्र आहों. तूर्त आम्हांस कोणाचीहि भेट घेण्यास सवड नाहीं.'

हा निरोप ऐकून श्रीविष्णूंस अत्यंत क्रोध आला व या वेळीं ते सुदर्शनाचा उपयोग करण्याच्या विचारांत होते. परंतु नारदांनीं त्यांस सुचविलें कीं, 'या क्षेत्रांत असेपर्यंत तो नवीन आलेला यमराज अमरच असणार; असा आपला निर्बंध आहे. याकारितां या वेळीं लघुत्व पत्करून त्यास या क्षेत्रांतून बाहेर काढून काय करावयाचें असेल तें करावें.'

यानंतर श्रीविष्णूंनीं पुढीलप्रमाणें निरोप आंत पाठविला.

'आम्ही श्रीविष्णु तुम्हांस शरण येऊन अत्यंत नम्रतापूर्वक कळवितों कीं, एकवार आपले चरणकमल दृष्टीस पडावेत अशी आमची इच्छा आहे.'

या निरोपानें नवीन यमराज संतुष्ट झाले. श्रीविष्णूस दरबारांत येण्याची परवानगी दिल्यास आपल्या दरबारांतील बऱ्यावाईट गोष्टी त्यांचे नजरेस येतील असें होणें इष्ट न वाटल्यामुळें नवीन यमराजच श्रीविष्णूस भेटण्याकरितां दरबारचे बाहेर आले.

या यमराजाची व श्रीविष्णूची भेट होतांच श्रीविष्णूंनीं त्यास बोलतबोलत फार लांबवर नेलें. नंतर तो अमरक्षेत्राचे बाहेर आला, हें पाहून त्यांनीं त्याची योग्य प्रकारानें निर्भर्त्सना केली व त्यांच्या खोडसाळ वर्तनाबद्दल त्याला अघोर शासन करण्याचा आपला विचार श्रीविष्णूंनीं त्याला कळविला.

सत्वस्थरावांची तारांबळ उडाली. श्रीविष्णूंनीं दूतांस पाचारण करून सत्वस्थरावांच्या मुसक्या बांधल्या व पुढील शिक्षा फर्माविण्याकरितां त्यांस घेऊन जाऊं लागले. तोंच सत्वस्थरावांनीं बोलण्यास आरंभ केला. ते म्हणाले,

'गिरिकंदरीं, तडीतापसीं, आपले चरणकमल दिसावेत म्हणून दिवसरात्र तपश्चर्या करीत बसले आहेत, ते सर्व मूर्ख असावेत असें मला वाटतें. कारण चरणकमलच काय परंतु नारायण दृष्टीस पडला असतांना देखील माझ्या यातना चुकत नाहींत, याचा मला प्रत्यक्ष अनुभव येत आहे. याकरितां मी सर्वत्र असें जाहीर करणार आहें कीं, कसला विष्णु व कसलें वैकुंठ घेऊन बसलां आहांत ? तें सर्व थोतांड आहे.'

लोक आपल्या भक्तीपासून च्युत होतील हें श्रीविष्णूंनीं जाणून व नारदांनींहि मध्यस्थी केल्यावरून त्या तोतया यमास वैकुंठीं नेणें श्रीविष्णूस प्राप्त झालें.

---

# रणजितसिंगाची राष्ट्रीय फौज

लेखक : कै. प्रो. हरि गोविंद लिमये, एम्. ए.

[ यांचा जन्म पाली ता. सुधागड येथें १८७१ सालीं झाला. त्यांचें शिक्षण पुणें न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज यांत झालें. एम्. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे लाइफ मेंबर झाले व अखेरपर्यंत कॉलेजांत अध्यापनाचें काम केलें. ते सर्व्हंट ऑफ इंडिया, ज्ञानप्रकाश यांत प्रचलित विषयावर लिहीत असत. मनोरंजन, विविधज्ञानविस्तार व लीडर वगैरे यांतून त्यांचे ऐतिहासिक विषयावर लेख आले आहेत. हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी व न्यू इंग्लिश स्कूलचे कांहीं दिवस सुपरिंटेंडंट होते. ते १९१९ सालीं पुण्यास वारले.]

शीखांची कवाइती फौज रणजितसिंगानें तयार केली. त्याच्या आणि निजामाच्या व शिंद्यांच्या पदरीं असलेल्या कवाइती फौजेंत कांहीं लक्षांत ठेवण्यासारखे फरक होते. निजामाचें दक्षिणेंतील राज्य व उत्तरेंतील राज्य हीं राष्ट्रीय स्वरूपाचीं नव्हतीं. त्यांच्या फौजाहि त्याच तऱ्हेच्या होत्या. पोट भरण्याकरितां व लूट मिळविण्याकरितां वाटेल त्याची नोकरी करून वाटेल त्याविरुद्ध लढावयाचें अशा वृत्तीच्याच लोकांची त्यांत भरती असे. महादजींनीं तर आपल्या सैन्यांत दक्षिणी लोक मुद्दाम घेतले नाहींत असें म्हणतात. रणजितसिंगाचें लष्कर राष्ट्रीय होतें. हिंदुस्तानच्या सरहद्दीवरील प्रांतांत जे शीख अनेक हाल काढून व छळ सोसून आपल्या स्वातंत्र्याकरितां व

धर्माकरितां प्राण खर्ची घालीत होते, त्यांचाच मुख्यत्वेंकरून भरणा रणजित-सिंगाच्या लष्करांत होता. त्यामुळें पैशापेक्षां यशापयशाकडेच त्यांचें पाहणें जास्त असे. दुसरा फरक असा होता कीं, निजाम व शिंदे यांस कवाइती सैन्याची उपयुक्तता वाटली किंवा आवश्यकता भासली तरी त्यांनीं त्या सैन्याशीं आपलें तादात्म्य करून घेतलें नव्हतें. युरोपियन लोक नोकरीस ठेवून त्यांच्या-करवीं ते हें सर्व काम करून घेत व आपण एक प्रकारें अलग रहात. ही तटस्थ-पणाची वृत्तीच त्यांस अपायकारक झाली. रणजितसिंगानें कवाइती फौजेचें खरें मर्म ओळखिलें असल्यामुळें तो कधींहि परकी युरोपियनांवर सर्वस्वीं विसंबला नाहीं. त्यानें युरोपियन मुळींच नोकरीस ठेवले नाहींत, अशांतला प्रकार नव्हे. प्रत्यक्ष कवाईत शिकविण्याकरितां त्यानें त्यांचा उपयोग करून घेतला. पण तो केवळ साधनें या नात्यानें होता, स्वतंत्र अधिकारी म्हणून नव्हे. बुशी व रेमंड, डी. बाईन व पेरन यांसारिखे स्वतंत्र सेनापती रणजित-सिंगाचे पदरीं नव्हते. ॲलर्ड व व्हेंचुरा, कोर्ट व ॲव्हिटॅबिल, हे सर्व आप-आपल्यापरी योग्य व कर्तृत्ववान् होते खरे, पण ते केवळ सांगितल्या कामाचे नोकर होते व कवाइती शीख फौजेचें अस्तित्व त्यांच्यावर केव्हांहि अवलं-बून नव्हतें. कित्येक पाश्चात्य ग्रंथकार हा फरक अजिबात विसरून शीखांच्या सैन्यांत युरोपियन अंमलदार होते म्हणून व त्यांच्या आणि शिंद्यांच्या वगैरे सैन्यांतील भ्रामक साम्य पाहून, शिखांचेंहि सैन्य युरोपियन अधिकाऱ्यांनींच तयार केलें होतें असें विधान करितात. परंतु त्यांत सत्याचा अंश नाहीं. शीख सैन्यांत हुकुमाचे शब्द फ्रेंच भाषेंतील असत, एवढाच त्यास आधार आहे. या विधानाचा खोटेपणा दाखविण्यास एवढें सांगितलें म्हणजे पुरें कीं, पहिला परकीय जनरल व्हेंचुरा हा १८८२ त पंजाबमध्यें प्रथम आला व त्यापूर्वींच रणजितसिंगाची कवाइती फौज नांवारूपास आल्याचें ब्रिटिश ऑफिसरांनीं लिहिलें आहे.

सन १८०५ मध्यें लॉर्ड लेकच्या सैन्याची व्यवस्था पाहण्याकरितां रणजित-सिंग स्वतः गेला होता. सन १८०९ मध्यें मेटकाफच्या छोट्या तुकडीवर शिखांच्या 'अकाली' पायदळानें एकदम हल्ला केला असतां त्यांनीं तो मोठ्या नेटानें परत फिरविला. त्या वेळीं या तुकडीच्या शौर्याचा व शिस्तीचा

रणजितसिंगाच्या मनावर विशेष परिणाम झाला. नंतर तो कवाइती सैन्याकडे विशेषच लक्ष देऊं लागला. आपल्या पायदळांत तो हिंदुस्थानी गुरखे वगैरे शिखांखेरीज इतर लढवय्ये लोकांचाहि समावेश करीत असे. त्यांना कवा- इती शिकविण्याकरितां ब्रिटिश सैन्यांत तयार झालेल्या लोकांस तो नेमीत असे. परंतु त्याची विशेष इच्छा आपल्या शीख बांधवांनीं ही नवी पद्धति शिकून ती आपलीशी करावी व ज्या सैन्यांत त्यांची संख्या मोठी आहे असें आपलें राष्ट्रीय सैन्य तयार व्हावें. हा उद्देश ठीक होता, मात्र तो सिद्धीस जाणें फार कठीण होतें. शीख जरी जात्या लढवय्ये असत, तरी त्यांस पाय- दळ म्हणून लढणें मुळींच पसंत नसे. त्यांच्या जुन्या पद्धतींत व लष्करी व्यव- स्थेंत 'अकाली' या नांवाच्या रानटी व धमवेड्या पायदळाखेरीज दुसरें पाय- दळ नांव घेण्याजोगें नव्हतें. मराठी शिलेदाराप्रमाणें घोडा हें शिखांस सर्वस्व वाटे. त्याच्यावरच शिखांचा दर्जा अवलंबून असे. पायदळी शिखांस लढाईच्या वेळीं मागें बायकापोरांच्या संरक्षणास रहावें लागे. म्हणून कसेंहि करून वाटेल त्या रीतीनें, एखादें घोडें मिळविण्याखेरीज त्यांस गत्यंतर नसे. असे ज्यांचे विचार व अशी ज्यांची व्यवस्था त्या शिखांस पायदळांत चाकरी करावयास लावणें व तीहि नव्या चमत्कारिक पोषाखांत व अगदीं नव्या शिस्तीनें म्हणजे कांहीं सोपें काम नव्हतें. पण रणजितसिंगाच्या आंगीं असल्या कामास लागणारे गुण होते. नव्या तऱ्हेचें लष्कर तयार करण्याचा त्याचा कृतनिश्चय झालेला होता व त्याकरितां तो वाटेल तें करण्यास तयार होता. त्यानें आपल्या लोकांस मोठ्या पगाराची लालूच दाखवावी, बढतीचीं आश्वासनें द्यावींत व त्यांच्या कवाइतीवर स्वतः देखरेख करावी. एवढ्यानेंहि भागेना तेव्हां नवीन तऱ्हेचा विचित्र वाटणारा पोषाख घालून व खांद्यावर बंदूक टाकून तो जातीनें एखाद्या साध्या शिपायाप्रमाणें सर्वांबरोबर कवाईत करूं लागला, असें मुनशी शहामत अली म्हणतो. या सर्व युक्त्यांचा उपयोग झाला व थोडेच दिवसांत ही नवी पद्धति शिखांच्या अंगवळणीं पडली. मराठ्यांच्या भाल्याप्रमाणें बंदूक हें शिखांचें मोठें आवडतें हत्यार असे. त्या हत्यारास कवाईतीनें व शिस्तीनें नवी शक्ति आली, व रणजितसिंगाच्या मरणाच्या पूर्वींच खालसाच्या फौजेनें ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांच्या मनांत काळजी उत्पन्न केली.

शिखांच्या सैन्यांत युरोपियन अधिकाऱ्यांनीं केलेलें काम गौण होतें. निजामाच्या किंवा शिंद्याच्या सैन्याप्रमाणें युरोपिअन अधिकाऱ्यांची इच्छा ही त्यांची प्रवर्तक शक्ति नव्हती. असें असलें तरी त्यांनीं शीख सैन्यास विशेष बळण लाविलें ही गोष्ट खरी आहे, व म्हणून त्यांचा उल्लेख केल्याशिवाय शिखांच्या फौजेची हकीगत पुरी होत नाहीं. व्हेंचुरा व ॲलर्ड हे दोघेहि नेपोलियनच्या हाताखालीं तयार झालेले होते व त्याच्या मोहिमांत आपल्या शौर्यानें व हुशारीनें कीर्ति मिळवून ते महत्त्वाच्या जाग्यांवर चढले होते. नेपोलियनची रवानगी सेंट हेलेनाला झाल्यानंतर त्यांचा उद्योग गेला. व इजिप्त व इराण येथील प्रयत्न निष्फळ झाल्यावर ते अफगाणिस्थानच्या मार्गानें पंजाबांत आले. बऱ्याच चौकशीनंतर रणजितसिंगानें त्यांस नोकरीस ठेविलें. ' फौजखास ' नांवाच्या शीख सैन्यांतील पहिल्या प्रतीच्या कंपूचा व्हेंचुरा हा सेनापति होता व ॲलर्डनें ' ड्रॅगूनस 'चा एक कंपू तयार केला. दोघांनींहि रणजितसिंगाची नोकरी इमानानें केली. ॲव्हिटॅबल हा नेपल्सचा रहिवासी होता. कांहीं दिवस इराणांत नोकरी करून वरील दोघां अधिकाऱ्यांचे मागून तो पंजाबांत आला. सामान्यतः त्याचा उपयोग राज्यकारभारांत करून घेण्यांत येत असे. परंतु व्हेंचुराप्रमाणें त्यासहि पेशावरच्या आसपासच्या डोंगराळ मुलूख ताब्यांत ठेवण्याचें अवघड काम सांगण्यांत आलें होतें. कोर्ट हा गुरख्यांच्या दोन पलटणींवरील अधिकारी होता. यांखेरीज जे थोडे युरोपियन अधिकारी रणजितसिंगाच्या पदरीं होते त्यांत विशेष नांव घेण्यासारिखा कोणी नव्हता. यांपैकीं कोणासहि मुख्य सेनापति कधीं नेमण्यांत येत नसे व रणजितसिंगाच्या मृत्यूनंतर त्यांच्यापैकीं कांहींच्या जिवावरच प्रसंग आल्यामुळें तेहि नोकरी सोडून चालते झाले.

रणजितसिंगाचा पूर्ण भरंवसा हिंदी सेनापतींवरच असे व त्यांपैकीं कांहीं खुद्द रणजितसिंगापेक्षांहि जास्त शूर व युद्धकलानिपुण होते. दिवाण मुखमचंद नांवाचा खत्री १८०६ पासून १८१४ पर्यंत त्याचा मुख्य सेनापति, व त्याच्या सर्व मोहिमांतील यशाचा वांटेकरी होता. दिवाणचंद नांवाच्या दुसऱ्या हिंदु सेनापतीनें १८१८ मध्यें मुलतान घेतलें व १८१९ मध्यें काश्मिरांत जय मिळविला. प्रख्यात शीख सेनापतींमध्यें सरदार न्याहालसिंग

अत्तारीवाला यानें कित्येक मोहिमांत नांव मिळविलें होतें; परंतु रणजितसिंगाच्या सैन्यांतील युरोपियन हिंदु किंवा शीख सेनापतींमध्यें सरदार हरिसिंग नालवा याच्या तोडीचा एकहि सेनापति नव्हता. शौर्य, उत्साह व हिंमत हे गुण त्याजमध्यें एकवटलेले होते व खालसाच्या फौजेचा तो अत्यंत आवडता पुढारी होता. रणजितसिंगाचेंहि त्याच्यावर फार प्रेम असे, व भरंवसा तर इतका पूर्ण होता कीं, कोणत्याहि अडचणीच्या अगर जोखिमेच्या मोहिमेंत हरिसिंग नाहीं असें होतच नसे. या सर्वांच्या गुणांपेक्षांहि जास्त महत्त्व सरदार लेहनसिंगाच्या गुणास दिलें पाहिजे. त्यास हशद्दोला असें म्हणत असत. त्यास अनेक भाषा येत. गणित, ज्योतिष यांचाहि तो बराच व्यासंग करी. तो पहिल्या प्रतीचा शिल्पी व नवीन शोध करणारा होता. नवीन तऱ्हेच्या फौजांचें सर्वस्व चांगल्या हत्यारांत व उत्कृष्ट तोफखान्यांत असतें. कवाइती फौज कितीहि उत्तम असली तरी दारूगोळा व हत्यारें तयार करणें व तोफा ओतणें हें काम जापर्यंत परक्यांच्या हातांत आहे तोंपर्यंत ती फौज स्वतंत्र आहे असें मानतां येणें शक्य नाहीं; म्हणून शिंद्याच्या कवाइती फौजेचा मुख्याधिकारी डी. बॉईन किंवा पेरेन यांच्या ऐवजीं गोपाळराव किंवा अंबाजी असतां, परंतु आग्र्याच्या किल्ल्यांतील कारखान्यांचा व शस्त्रागारांचा मुख्य अधिकारी सॅंगस्टरच रहाता तर बिकट प्रसंगीं शिंद्यांच्या फौजेचा कदाचित् उपयोग झाला नसता. ही चूक रणजितसिंगानें केव्हांहि केली नाहीं. हिंदी सेनापतींबरोबरच हिंदी शिल्पीहि त्यानें तयार केले व सरदार लेहनसिंगास त्यांमध्यें प्रमुख स्थान दिलें पाहिजे. शिखांचा तोफखाना लेहनसिंगानें सुधारिला व तो ब्रिटिशांच्या तोफखान्याच्या निदान बरोबरीचा तरी करून सोडिला. त्यानें ओतलेल्या कित्येक नमुनेदार तोफा शीख युद्धांमध्यें ब्रिटिशांचे हातीं पडल्या.

अशा लोकांच्या मदतीनें स्वभावतः शूर असलेल्या शीख लोकांची जी फौज रणजितसिंगानें तयार केली, तिचा उपयोग त्यानें इंग्रजांच्या विरुद्ध केला नाहीं व इंग्रजांच्या खेरीज त्याच्या बरोबरीचा दुसरा शत्रु सर्व हिंदुस्थानांत कोणी उरलेला नव्हता. यामुळें त्यास मोठें साम्राज्य स्थापितां आलें नाहीं. पेशावर, मुलतान वगैरे प्रांत काबीज करून त्यानें पंजाबची हद्द



श्री. गणेश धोंडो देशपांडे.



श्री. नारायण विनायक देव.



श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे.



श्री. चिंतामण दत्तात्रेय आंबेकर.



सौ. सरलाबाई जोशी.



श्री. नरहर रघुनाथ फाटक.



कै० प्रो. हरि गोविंद लिमये



कै० सच्चिदानंद रघुनाथ चित्रे.

बरीच वाढविली. ह्यांच्यापलीकडे जाण्याचा प्रयत्न करितांच इंग्रज त्यास आडवे आले व त्यांच्या मध्यस्थीमुळें सतलजच्या अलीकडील मुलूख व सिंध ह्यांजविषयीं त्याच्या मनांत असलेले मोठमोठे बेत त्यास जागच्या जागींच जिरवून टाकावे लागले. शीख सैन्य केव्हांहि ब्रिटिश सैन्यापुढें टिकाव धरूं शकणार नाहीं, असें त्यास वाटत होतें; किंवा तोंपर्यंत त्याची फक्त पूर्ण तयारी झाली नव्हती, असें त्याचें मत होतें, हें निश्चयानें ठरवितां येत नाहीं. एवढें मात्र खरें कीं, जेव्हां जेव्हां मानी व साहसी शीख सरदार इंग्रजांच्या मागण्या कबूल न करण्याविषयीं त्यास आग्रह करीत, तेव्हां तेव्हां तो त्यांस संशययुक्त मुद्रेनें विचारी, ' मराठ्यांचा दोन लाख भाला कोठें आहे ? ' त्याचप्रमाणें एकदां त्यास हिंदुस्थानचा नकाशा दाखविण्यांत आला असतां, ' या तांबड्या रेषा कसल्या आहेत ? ' असा त्यानें प्रश्न केला. 'तो इंग्रजांचा मुलूख आहे. ' असें उत्तर मिळतांच तो दुःखाचा मोठा सुस्कारा टाकून म्हणाला, ' हें लवकरच सर्व तांबडें होणार ! '

—निबंधरत्नमालेंतील ' हिंदी सैन्य व कवायती कंपू ' या लेखांतून.

---

# शारीरिक शिक्षणाची आवश्यकता

लेखकः **नरहर गोपाळ अंबेकर**, बी. ए.

[ हे भोरचे रहिवासी असून श्रीमंतांचे संबंधीं आहेत. त्यांचें शिक्षण भोर हायस्कुलांत झालें. ते १९१२ सालीं बी. ए. झाले. त्यानंतर त्यांनीं कांहीं दिवस शिक्षकाचें काम केलें. पुढें ते भोर संस्थानच्या अधिपतींचे प्रायव्हेट सेक्रेटरि झाले. १९३० सालीं त्यांनीं श्रीमंतांचे समवेत विलायतची सफर केली.]

**सहनाववतु । सहनौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै तेजास्विना—**
**वधीतमस्तु माविद्विषावहै ।**

सध्यांच्या तरुण पिढीमध्यें शारीरिक शिक्षणाची आवश्यकता फारच तीव्रतेनें भासूं लागली असून इतर आवश्यक विषयांप्रमाणें शारीरिक शिक्षणहि अभ्यासक्रमांतील एक अवश्य विषय असावा, अशी विचारसरणी शिक्षण-तज्ज्ञांचीहि होऊं लागली आहे. भावी पिढी सुदृढ होण्याच्या दृष्टीनें चालू

पिढीच्या शारीरिक शिक्षणाकडे यापूर्वीच समाजाचें लक्ष जावयास पाहिजे होतें; परंतु आतां तरी हयगय न होतां सक्तीचें शारीरिक शिक्षण सुरू करण्यांत आलें पाहिजे. सध्यां उच्च शिक्षण-संस्थांतून शरीरसंवर्धक अशा फुटबॉल, टेनिस वगैरे मर्दानी खेळांचा मात्र समावेश होतो. परंतु हे खेळ खेळण्याचीं साधनें फार खर्चाचीं असल्यामुळें त्यांचा सर्रास उपयोग करणें हें हिंदी लोकांच्या सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें मुळींच परवडणार नाहीं. दांडपट्टा, जोड्या, जोर, बैठका, कुस्त्या आणि नमस्कार यांसारखे आपले हिंदी खेळ बिन-खर्चाचे आणि सहजसाध्य असे आहेत. होतां होईल तों या खेळांचाच शारीरिक शिक्षणाच्या क्रमांत समावेश व्हावा.

मुलांच्या मर्दानी खेळांप्रमाणें मुलींच्या शारीरिक शिक्षणाकडेहि अवश्य तें लक्ष देण्यांत आलें पाहिजे. फुगड्या, झिम्मा, पिंगा, कोंबडा वगैरे मुलींचे बाळपणींचे खेळ व्यायामाच्या दृष्टीनें मुलींना योग्य असे आहेत. मुलींच्या व्यायामक्रमांत या खेळांचा अवश्य समावेश व्हावा. पूर्वींचीं शारीरिक श्रमाचीं स्त्रियांचीं गृहकृत्यें आतां नाहींशीं झाल्यामुळें दुसऱ्या कोणत्या तरी व्यायामाची स्त्रियांसहि जरूरी आहे. यामुळें स्त्रियांची सध्यां होणारी शारीरिक अवनति व दौर्बल्य कमी होण्यास या व्यायामासारखें दुसरें कोणतेंच साधन नाहीं.

वर दाखविलेले खेळ चालू करण्यास समाजांतील पुढारलेल्या लोकांनीं आणि संस्थानिकांनीं उत्तेजन दिलें पाहिजे. गेल्या वर्षीं आम्ही विलायतेस असतां बिम्बल्डन येथें टेनिस मॅच पहाण्यास गेलों होतों. त्या वेळीं इंग्लंडचे राजेसाहेब व राणीसाहेब मॅच पहाण्याकरितां हजर राहिल्या होत्या. अशा रीतीनें मर्दानी खेळास साहजिकपणें मोठ्या मनुष्यांकडूनहि तेथें उत्तेजन मिळतें. हिंदुस्थानांतहि प्रत्येक खेड्यांत वार्षिक जत्रा भरतात त्या वेळीं कुस्त्यांचे मोठमोठे फड पडतात. या जत्रांकडे पूर्वींपेक्षांहि जास्त लक्ष देऊन मर्दानी खेळांचें व शरीरबलाचें प्रदर्शन करण्याकरितां लोकांनीं त्या जत्रांचा जास्त जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. त्याचप्रमाणें स्थानिक संस्थांनींहि या देशी खेळांना उत्तेजन दिलें पाहिजे.

सध्यांच्या तरुण मंडळींत नाटकें व सिनेमा पाहण्याचें व्यसन बऱ्याच मोठ्या प्रमाणानें वाढलें आहे. अशा उत्तान शृंगारप्रधान कथानकांनीं विद्यार्थ्यांचीं

कोमल अंतःकरणें दूषित झाल्यावांचून राहत नाहींत. या व्यसनाबरोबरच अनियमितपणें चालू असणाऱ्या चहापानाची भर पडली आहे. विलायतेंत लोणी, पाव, बिस्किटें वगैरे कांहींतरी खाऊन त्यावर चहा घेतात. परंतु आपल्याकडे लहरीप्रमाणें वाटेल तेव्हां कंटाळा आला कीं, चहापान करण्याची व हॉटेलांतील पदार्थ खाण्याची संवय तरुणांत बोकाळली आहे. ही चाल अत्यंत घातुक आहे.

त्याचप्रमाणें व्यायामाभाव हें सध्यांच्या तरुण पिढीच्या अवनतीचेंहि एक मुख्य कारण दिसत आहे. सध्यां सायंकाळीं गप्पांचे क्लब स्थापन झाल्यासारखे दिसतात. पूर्वी सुमारें २० वर्षांपूर्वी पुणें येथें गांवांतून २।३ मैल कॉलेजांत पायीं जाण्याची पद्धति असल्यामुळें जातांयेतां विद्यार्थ्यांना साहाजिकच व्यायाम घडत असे. परंतु सध्यां गांवांतून जाणारे विद्यार्थी सायकलवरूनच कॉलेजांत जाण्याचा प्रघात वाढल्यामुळें त्यांच्या व्यायामांत खंड पडत आहे.

विद्यार्थ्यांच्या जेवणाची सध्यांची वेळ दुपारीं ११–१२ ची असते. परंतु आरोग्यदृष्ट्या ही वेळ अत्यंत गैरसोईची असून केवळ गतानुगतिक न्यायानें पूर्वींच्या वेळेंत फरक करावा असे शिक्षणतज्ज्ञांनाहि अद्यापि वाटत नाहीं. जाणत्या विद्यार्थ्यांप्रमाणें बिगारी इयत्तेंतल्या लहान मुलांनाहि सहा तास शाळेंत डांबून ठेवणें अनवश्यक व मुलांच्या कोंवळ्या वयास सर्वथैव अनिष्ट आहे. ही इतकी साधी सुधारणाहि होऊं नये हें आश्चर्यकारक आहे.

परकीय भाषेंतून शिक्षण दिल्यानें विद्यार्थ्यांच्या प्रकृतीवर, विचारशक्तीवर बाजवीपेक्षां ताण पडणें हेंहि विद्यार्थ्यांच्या शारीरिक अवनतीचें एक कारण आहे. शिक्षण हें साध्य नसून साधन आहे. इतक्या मानानें शिक्षणाकडे लक्ष पोहोंचविण्यांत आलें पाहिजे. परंतु साधनासच साध्य समजल्यामुळें सध्यांचा अनवस्थाप्रसंग प्राप्त झाला आहे.

जसा धंदा असेल त्या मानानें आहार व पोशाख ठेवणें जरूर आहे. पूर्वकालीं वेदाध्ययन व अध्यापन यांस योग्य अशा सात्त्विक कालक्रमणेस अनुरूप असा आहार व वेष असे. परंतु पूर्वींच्या समाजव्यवस्थेंत आमूलाग्र फरक झाल्यानें पूर्वींचा आहार आजहि योग्य आहे असें म्हणतां येत नाहीं. जें पाहिजे असेल तें करण्यास हरकत नाहीं. परंतु शक्याशक्यतेचा विचार

करून काय तें ठरविलें पाहिजे. अर्धवट वागून कोणतीहि गोष्ट पूर्णतेला नेतां येणार नाहीं हें मात्र खरें आहे. सध्यां विशेषतः ब्राह्मणवर्गाची फार पंचाईत झाली आहे. तो वर्ग फार दरिद्री बनला असून त्याला पौष्टिक असा पदार्थ खाण्यास मिळेनासा झाला आहे. तूप, दूध हेच पदार्थ ब्राह्मणांस पौष्टिक. परंतु ते सणावारास मोठ्या कष्टानें खाण्यास मिळतात. तेव्हां अशा स्थितींत बयाच्या पांचवे वर्षापासून शिक्षणाचें भलें मोठें ओझें डोक्यावर घेऊन तें अर्धपोटीं स्थितींत पार पाडावयाचें व नंतर पुढें अतिशय खडतर अशा जीवनकलहांत आपण सांपडावयाचें. अर्थात् तेथें तो १०।५ वर्षांत बहुतेक जेरीस येऊन निरुपयोगी ठरतो. तेव्हां अशा मनुष्यानें राष्ट्राचें रक्षण कसें करावयाचें ? ज्याला आपल्या पोटाला नीट रीतीनें मिळविण्याची शरीरांत धमक नाहीं, तो राष्ट्राचें रक्षण काय करणार ? तेव्हां बदललेल्या परिस्थितींत उत्तम रीतीनें वागून जर ब्राह्मणवर्गानें इतर जातींबरोबर आपली सर्व बाजूंनीं उन्नति करून घेऊन व त्यांच्या खांद्यास खांदा देऊन बरोबरीच्या नात्यानें उभें रहावयाचें असेल तर लहानपणापासून शरीरपोषणाला अवश्य तो आहार त्यास मिळाला पाहिजे. मग तो कोणत्याहि प्रकारचा असो.

असो. शारीरिक शिक्षणाची अवश्यकता, सांप्रत किती आहे तें कसें व कोणत्या उपायानें मिळविलें पाहिजे हें सांगितलें. तसेंच शारीरिक सामर्थ्य संपादण्याकरितां पूर्वी काय तजवीज करीत असत, या कामीं राजाश्रय कसा मिळत असे, इतर देशांत शारीरिक सामर्थ्यास कसें महत्त्व व किती उत्तेजन दिलें जातें, त्याचप्रमाणें शारीरिक सामर्थ्य वाढविण्यास कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत व कोणत्या वर्ज्य झाल्या पाहिजेत यांचाहि ऊहापोह केला आहे. आतां शारीरिक सामर्थ्यास व पर्यायानें क्षात्रवृत्तीस अनादिकालापासून आपल्या देशांत व इतरत्रहि राष्ट्रीयदृष्ट्या कसें महत्त्व देण्यांत येत होतें याचें ऐतिहासिकदृष्ट्या थोडेंसें पर्यालोचन करणें जरूर आहे. सबब तेवढें करून प्रस्तुत लेख आटपता घेतों.

प्राचीन काळच्या रोमन आणि स्पार्टन लोकांत मर्दानी खेळाची अत्यंत आवड होती. त्या वेळच्या इतिहासाचें पर्यालोचन करण्यास स्पार्टन लोकांनीं लष्करी तालीम, कडक शिस्त, शिपाई बाणा व सैनिकांमध्यें आढळून येणारी

कदर ह्या अत्यंत राष्ट्रीय वैशिष्ट्याच्या बाबी दृष्टोत्पत्तीस येतील. स्पार्टन व रोमन तरुणांच्या या अभिमानशौर्यधैर्यादि गुणसमुच्चयानें त्यांचीं राष्ट्रें जगांत नमुनेदार झालीं असें इतिहास जाहीर करीत आहे. स्पार्टनामधील तरुणांच्या प्रमाणें तरुणींनाहि तशाच शिस्तींत रहावें लागे. त्यांच्यांत तरुणतरुणींचीं लग्नें, तीं अनुक्रमें २० व ३० वर्षांचीं झाल्याशिवाय होत नसत. उपवर वधूंनीं आपल्या गुणांस अनुरूप व शूर अशा तरुणांस स्वतःच्या पसंतीनें वरावें, असा दंडकच असे. ही चाल कांहीं अंशीं हिंदी लोकांच्या पुराणांतरींच्या स्वयंवरा-सारखी दिसते.

प्राचीन काळच्या रोमन, स्पार्टन लोकांमध्यें शरीरसामर्थ्यासंबंधींची रूढ असलेली पद्धति पाहूनच युरोपियन राष्ट्रांनीं तो कित्ता आपल्यापुढें ठेविलेला दिसतो. सध्यांहि इंग्लंड, जर्मनी, रशिया वगैरे प्रमुख राष्ट्रांमध्यें आढळून येणाऱ्या शरीरसंवर्धक स्वरूपाच्या चळवळी पाहिल्या तर आमच्या म्हणण्यास पुष्टी मिळते. त्यानंतर मराठी साम्राज्याचें विहंगम दृष्टीनें अव-लोकन केलें तर शरीरसामर्थ्याच्या मर्दानी खेळांबद्दल मराठे किती दक्ष होते तें समजतें. आजच्या घटकेसहि प्रत्येक खेडेगांवांत सणावारीं कुस्त्यांसारखे मर्दानी खेळ खेळण्याचे फड पडतात.

अशा प्रकारें शारीरिक शिक्षणाची आज किती आवश्यकता आहे व या बाबतींत हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांनीं आणि संस्थानिकांनीं या कामीं उत्तेजन देणें किती महत्त्वाचें आहे, याचें प्रस्तुत लेखांत थोडेंसें दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. या प्रश्नाकडे सध्यां सरकारचें लक्ष जाऊं लागलें आहे व हिंदी विश्वविद्यालयांनाहि या बाबतींतील आपलें कर्तव्य काय आहे त्याची जाणीव होऊं लागली आहे ही आनंदाची गोष्ट होय.

---

# आपला धर्म

लेखकः पुरुषोत्तम रघुनाथ आवस्थी, बी. ए., एल्एल्. बी., उज्जयिनी.

आपले सांसारिक व्यवहार करीत असतां जी पराधीनता व प्रसंगोपात्त संकटपरंपरा प्राप्त होते, तिनें भांबावून व गोंधळून जाऊन वारंवार त्या

परिस्थितींतून सुटून सुखमय अवस्थेंत पोहोंचण्याकरितां ईश्वरी सत्तेचा धांवा करण्याची जी प्रवृत्ति मानवमात्रांना होते, ती प्रवृत्ति बाळपणापासून आपल्या वाडवडिलांच्या संसर्गानें जागृत होऊन दिवसेंदिवस बळावत जाते. मध्यंतरीं आपण तारुण्यावस्थेस प्राप्त होत असतांना स्वावलंबन, दीर्घोद्योग व सुशीलता या गुणांचा आश्रय करणें व त्यायोगें व्यक्तिगत, कौटुंबिक व सामाजिक हित साधणें हीच मानववंशाची इतिकर्तव्यता वाटते. त्याव्यतिरिक्त यत्न व भावना व्यर्थ आहेत असें भासूं लागतें. बहुधा बहुतेक तरुणांना या अवस्थेचा अनुभव येत असावा. प्रस्तुत लेखकास तरी तो तसा आलेला आहे. व स्वतःचा अनुभव व्यक्त करण्याच्या भावनेनेंच हा लेख लिहिला आहे.

प्रारंभीं बाळपणीं आपल्या वाडवडिलांच्या बरोबर देव, देवता यांच्या संबंधींच्या कल्पना व त्यांची सेवा व पूजा केल्यानें होणारा लाभ व टळणारीं संकटें यांचा अनुभव प्रस्तुत लेखकाला आला आहे. कधीं सफळ व कधीं विफळ अशी स्थिति पावून तारुण्यावस्थेंत ईश्वर ही भावना केवळ भावनाच आहे असें मला वाटूं लागलें.

अशा परिस्थितींत एक दिवस देशसेवेच्या उच्च कल्पना करीत बसलों असतां एका सज्जनास माझ्याविषयीं कींव आली. व त्यानें एकांतांत नेऊन देशोद्धार करणें तर दूरच, आत्मोद्धार तरी कर, असें बजावलें, व त्या आत्मोद्धाराचें साधन म्हणून सत्संग व संतसेवा करण्याची शिफारस केली.

अधिकारी संतांचे प्रत्यक्ष सान्निध्यानें ईशकृपेस पात्र होतां येतें याची जाणीव होण्याकरितां त्यांनीं निर्दिष्ट केलेल्या तत्कालीन एका संताकडेस गेलों. त्यांचे ठिकाणीं अतींद्रिय ज्ञान उच्च प्रतीचें आहे याचा अनुभव मला तात्काळ आला. या वेळीं लेखकाचें वय २७-२८ वर्षांचें असून तो आधुनिक पद्धतीचा पदवीधर कायदेपंडित होता. प्लेगची धामधूम जिकडेतिकडे चालली होती. उद्यांचा भरंवसा कोणास नव्हता. इकडे धंदा नाहीं, तिकडे जीवित अशाश्वत; त्यांतच आशानिराशामय संसार. संतांचे दर्शनास जातांना वाटेंत करमणुकीस्तव भगवद्गीतेचा पाठ करूं लागलों. चवथ्या अध्यायांत 'तद्विद्धि-प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः या श्लोकावर मीं येऊन पोहोंचलों. मनास वाटलें यांना येथेंच अडवावें व ज्ञान

दाखवा म्हणून प्रश्न करावा. वय तरुण, विद्येचा ताठा, ब्राह्मण्याचा अभिमान वगैरे अहंकारवृत्तींनीं पीडित झाल्यामुळें हीनजातीच्या संतास नमस्कार करतांना मला कांहींसा संकोच वाटला. पण त्या विषयींची त्यांनाच जाणीव होऊन त्यांनीं मला नमस्कार करूं दिला नाहीं. ' अरे, तूं ब्राह्मण; आम्हांला नमस्कार करून पापांत कशाला घालतोस ? देवाला नमस्कार कर. ' असें सांगून मंदिराकडे बोट दाखविलें. मंदिराजवळ गेलों तों आंत देव दिसेना. एक वृद्ध बाई दाराशीं आंतल्या बाजूस बसली होती; तिनें देव दाखविला. तो कोणता ? तर भिंतीवर टांगलेला त्यांचाच फोटो ! ही झाली पहिली पायरी. माझा ब्राह्मण्याचा व ज्ञानाचा अभिमान खाडकन् उतरला. त्यानंतर त्यांचें चरित्र पाहून आपला प्रश्न काढावा या हेतूनें संतांच्या जवळ जाऊन मीं बसूं लागलों. तों ते तेथून निघून गेले व मला तेथेंच थांबण्यास सांगितलें. थोड्या वेळानें मींहि त्यांच्या मागें गेलों. तों ते मागें फिरून परत आले. व विचारलें कीं, ' कोठें जातोस ?' निरुपायानें ' पुढें जातों, ' असें मीं खोटेंच बोललों. पण पुढें जाणें भाग पडल्यानें मी थोडा पुढें जातांच ते मागें आड-मार्गें जाऊन अदृश्य झाले. पुढें पश्चात्ताप झाला. तेव्हां एक वाटाड्या भेटला. त्यानें पुनः संतांची गांठ घालून दिली. दोन प्रहरीं एकांतांत ते बसले. लेखकास त्यांनीं दूर बसण्यास सांगितलें. तेथें बसून मी प्रश्न केला कीं, आप-णांस अतींद्रिय ज्ञान कसें झालें ? त्यांनीं जबाब दिला ' राम–राम–सीताराम राजाराम.' मी दंभानें मनांत म्हटलें 'शब्दानें काय होणार ?' 'अनुभव घेऊन पहा' असें त्यांनीं उत्तर दिलें. व नंतर सत्कार करून व भोजन घालून त्यांनीं मला वाटेस लावलें. त्या वेळीं विंचू चावून दंश व्हावा अशी माझी स्थिति झाली. 'राम' शब्दांत काय शक्ति आहे ? नाहीं म्हणावें तर 'रामदास', ' तुकाराम ' ' कबीर ' आदि अनंत संतांचें त्या बाबतींत एकमत दिसतें. असो. तेव्हांपासून एकामागून एक उच्च कोटीच्या विभूति भेटूं लागल्या. व भक्ति-मार्गावरचा माझा विश्वास दृढावत गेला. काय कारण असेल तें असो. राम-नामावर श्रद्धा बसेना. तों तिसरे संत सहा महिन्यांनीं भेटले. त्यांनीं ' शिव ' नामाचा निर्देश केला. मला वाटलें ' राम ' सोडला तर ' शिव ' लागला. ' राम ' ' शिवा'चा भक्त, ' शिव ' ' रामा'चा भक्त, असा अभेदाभेद पाहून

शिवस्मरणावर मन स्थिर झालें. सोळा वर्षे गेलीं. कित्येक संत भेटले. कित्येक स्थित्यंतरें झालीं. मनास वाटे विश्वरूपाचें दर्शन व्हावें. अणुरेणुव्यापक परमात्मा अनुभवावा. परंतु तो योग येण्यास सोळा वर्षे लागलीं. पंढरीस जाऊन श्रीविठ्ठलचरणीं नामदेव-ज्ञानदेव-आदि लाडक्या भक्तांना दिलेल्या अनुभवाचा व आत्मसुखाचा लाभ मागावा असा मनांत हेतु होता. तों एक भक्त-शिरोमणी भेटले. त्यांनीं एका संतशिरोमणीकडे नेलें. तेथें गेल्यापासून आत्मोत्कर्षास आरंभ झाला. पूर्वीचे सर्व अनुभव पहिलेच दिवशीं प्रकट झाले. पांचवे दिवशीं रात्रीं एकादशीचे मध्यरात्रीं माझा काळ होईल अशी एकाएकीं भावना झाली. व घर्मग्रस्त होऊन 'राम' नामाचा जप करीत राहिलों व त्यांचेच आश्रयानें काळ टळला असें वाटलें. सकाळीं जिकडे जावें तिकडे मला आनंद वाटूं लागला. व तेव्हांपासून संतकृपा हेंच श्रेष्ठ धन असें वाटूं लागलें. पुन: १६ वर्षे झालीं. पुन: एक संत भेटले. त्यांचे सान्निध्यांत 'समाधान' स्थितीची बरीच जाणीव झाली. पुढें काल होणार तोच्च जाणे. एवढी गोष्ट मात्र प्रत्यहीं प्रत्ययास येऊं लागली कीं, संकटसमयीं तो संतरूप धारण करून धैर्य देतो व ईशरूप धारण करून सर्वांचें पालनपोषण करतो.

---

## हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं

लेखिका : डॉ. कमलाबाई देशपांडे, बी. ए., पीएच्. डी., पुणें.

[ यांचा जन्म ता. २२ फेब्रुवारी १८९५ रोजीं झाला. त्या १९१७ सालीं पुण्याच्या फीमेल हायस्कुलामधून प्रवेश परीक्षा पास होऊन १९२० मध्यें महिला विद्यापीठाच्या गृहीतागमा झाल्या. १९२९ सालीं त्या युरोपांत गेल्या व तेथें त्यांनीं प्राग् युनिव्हर्सिटीची पीएच्. डी.ची पदवी संपादन केली. त्या हल्लीं भारत महिला विद्यापीठांत अध्यापक आहेत. देशपांडे हें घराणें भोर संस्थानांतील शिरवळचें होय. त्यांच्या कविता गीतद्विदलांत प्रसिद्ध झाल्या आहेत. ]

कृष्णपक्षांतील अष्टमीची रात्र. तीन प्रहर रात्र उलटून गेलेली. सर्व जग निद्रानंदांत पूर्ण गुंगून केलेलें. अतिशय खेळकर मूल ज्याप्रमाणें दिवसभर दांडगाई रात्रीं करून अगदीं गाढ झोंपीं जातें व कोणत्याहि तऱ्हेनें बाहेरील

गडबडीनें त्याची झोंपमोड होत नाहीं, तद्वतच या उपद्व्यापी जगाची स्थिति झालेली होती. 'नीज आतां' म्हणून आईनें दामटून एकदां काळी दुलई डोक्यावरून घातल्याबरोबर या प्राण्याला इतकी गाढ झोंप लागली कीं, बाहेर विश्वांत काय घडामोड झाली त्याचा त्याला पत्ताहि लागला नाहीं. मध्यरात्रीच्या प्रशान्त वेळीं इकडेतिकडे कोणी नाहीं असें पाहून बाहेर येऊन सरोवरावर खेळणाऱ्या हरणाप्रमाणें चंद्रानें पळतपळत येऊन आपला खेळ आकाशांत सुरू केला. लहानसें राज्य स्थापून तरकारूपी परिवाराची योग्य ठिकाणीं नेमणूक करून रोहिणीसमवेत हा चंद्रमा पहा कसा आपल्या सौंदर्याचें व पराक्रमाचें प्रदर्शन करीत वरून हंसतहंसत खालीं बघतो आहे! पण झोंपेंत गढलेल्या मुलाला जगांत कोणी अलंकार घालून मिरविलें म्हणून त्याला आनंद कसला? तो आपल्या निद्रानंदांतच तल्लीन! हातांत दिवा घेऊन, पाळण्यांत निजलेल्या मुलाच्या तोंडावरील पांघरूण काढून पाहणाऱ्या आईला त्या मुलाचें जसें ईषत् हंसरें मुख दिसतें, त्याप्रमाणेंच चंद्राचा दिवा हातांत घेऊन जगाकडे हळूंच निरखून पाहणाऱ्या सृष्टिसतीला चंद्रप्रकाशांत जगाचें किंचित् हंसरें मुख दिसत होतें तेवढेंच! तेवढाच त्यावर विश्वांतील घडामोडीचा परिणाम!

* * * * *

पण बऱ्याच गोष्टींची जगाला दाद नसली म्हणून काय झालें? पहा तर खरें एकदां आकाशाकडे! त्या चंद्राचा नुसता डौल तर पहा! स्वतःजवळ विशेष सामर्थ्य नाहीं, पण जें काय लोकांकडून मिळेल तेवढेंच घेऊन संतुष्ट मनानें इमानेंइतबारें विश्वाची कामगिरी बजावणाऱ्या या एकनिष्ठ सेवकाची ऐट तर पहा! त्याच्याच मागोमाग डौलानें मिरविणारी ही रोहिणी. घरभर मुलांप्रमाणें आकाशाचें आंगण उणें करणारा हा तारकासमूह; गरिबींतच कां होईना पण तशाहि स्थितींत दुसऱ्यावर उपकार केल्यामुळें कृतज्ञ बनून या चिमुकल्या राज्याचें स्वयंस्फूर्तीनें रक्षण करणारा व आपल्या एकामागें एक अशा कोटांनीं चंद्रराज्याला अभेद्य करणारा हा ग्रहसमुदाय; व सर्व गोष्टींची समृद्धि दर्शविणारी ही आकाशगंगा; असल्या राज्यांत उणीव तरी कसली रहाणार? पहा बरें चोहींकडे कसें समाधान, प्रेम व आनंद यांचें साम्राज्य

पसरलें आहे! बरोबरच आहे, संपत्तीची चकाकी नसली म्हणून गरिबींतील प्रेमाचें मार्दव कांहीं कमी सुखकारक नसतें!

* * * *

अरे! पण हें काय? या आनंदसिंधूला ओहोटी लागली! मघाशीं डौलानें मिरवत असलेला चंद्रमा एकाएकीं फिकट कां वाटूं लागला? भविष्यत्कालीं घडून येणाऱ्या एकाद्या भयंकर प्रसंगाचें आधींच भविष्य कळलें असतां दहशत बसून जसा तोंडावर फिकटपणा येतो तसाच हा दिसत आहे. ही परचक्राची तर भीति नव्हे ना? हें पहा, पूर्वेकडून कसला पांढरा धुरळा उडत आहे तो! हा पहा मधूनमधून एक पिवळा तीर आला. झालें! पूर्वेकडील तारांचा फडशा पडूं लागला. तो तिकडे जाळ कसला? हरहर! शत्रूनें जाळपोळ करावयास सुरुवात केली वाटतें? आणि हें सर्व उघडे डोळे ठेवून पाहण्याचें चंद्राच्या नशिबीं आलें हं! पण चंद्रहि अंतर्धान पावला! आणि रोहिणी? ती तर त्याचे पुढेंच अंतर्धान पावली. शत्रूच्या ताब्यांत सांपडून अपमान करून घेण्यापेक्षां जगांतून नाहींसें होणें खरोखरच चांगलें. चंद्रा! तूं गरीब खरा, पण बाणेदार आहेस. रजपुतांचा मूळ पुरुष तूं! सर्व तारकांचा जोहार करून शत्रूच्या हातीं कोणालाहि लागूं न देतां शत्रूंचा नाश करण्याच्या उद्देशानें अरण्यांत चालत आलास हेंच योग्य!

* * * * *

ही पहा नवी कारकीर्द! हा प्रखर प्रकाश तर पहा! अहो! पण बघवत नाहीं तेथें पहा काय? ही भास्करराजांची स्वारी सोनेरी मंदील घालून मोठ्या दिमाखानें दिग्विजय करीत वर येऊं लागली! सगळीं खळबळून जागीं झालीं. बरोबरच आहे. अशा प्रखरतेपुढें कोणाला झोंप यावयाची आहे! भास्करराज, आपण तेजस्वी आहां, पराक्रमी आहां, पण हा उद्दामपणा कशाला? आपणहि किती केलें तरी विश्वाचे नोकरच आहां ना? बिचाऱ्या गरिबाच्या संसाराची धूळधाण कां केलीत? चंद्र तुमच्यापुढें यःकश्चित् तर खराच; तुमचा आश्रित तो! पण आश्रितांचें वाटोळें करण्याची ही कोठली पद्धत? आपण स्वयंप्रकाश असलां म्हणून दुसऱ्याच्या प्रकाशाचा लोप करावयाचा? तुमचा तो चंद्रच पहा कीं? त्याच्या राज्यांत तोच सर्वांत तेजस्वी होता ना? पण त्यानें

कधीं असा दुष्टावा केला का? आपल्या सर्व आश्रितांचें संरक्षण करून, त्यांचीहि उन्नति करून, त्यांच्या व आपल्या तेजानें कसा सुखानें मिरवीत होता. पण आपण पडला स्वयंप्रकाशपराक्रमी! तुम्हांला ' निर्वीरमुर्वीतलं ' करण्याची आकांक्षा! आधीं तुम्ही मुलें, बाळें, बायको यांना तरी कोठें जिवंत ठेवलें आहे म्हणा! म्हणून तुम्हांला आश्रितांचा सांभाळ करावयाला सांगावयाचें? चंद्राचा परिवार कसा त्याच्या भोंवतीं वागडत होता? आपण मुलें, बाळें, बायको सर्वांची वाट लावून बसलां. बरोबरच आहे. सगळ्यांची वाट लावून जळत्या अरण्याप्रमाणें दिसणाऱ्या या आकाशावर खुशाल सत्ता चालवा. खरेंच सांगा बरें! तुम्ही सर्वश्रेष्ठ म्हणून तुम्हांला काय ऐट वाटत असेल तेवढीच. परंतु ह्या एकलकोंड्या वृत्तीनें तुमच्या अंतःकरणाला समाधान मिळतें का? प्रेमाचा ओलावा येतो का? तो जर हवा असेल तर इतकें स्वयंमन्य होऊन चालावयाचें नाहीं. दुसऱ्याच्या मताची थोडी तरी पर्वा करावी लागेल; त्याखेरीज या नुसत्या पराक्रमानें खरें समाधान नाहीं हो नाहीं होणार! पण जाऊं द्या. परिस्थितीच तशी असल्याखेरीज तुम्हांला या शब्दांचें महत्त्व कळणार नाहीं.

पाहिलेंत, वरवर चढत आलेला रथ कलंडला हो कलंडला! आतां जाणार! पश्चिम समुद्रांत जाऊन पडणार! कारण मध्यें आधारच नाहीं. मुळीं खांबाचाहि आधार न घेतां आकाशांत राज्य स्थापावयाची आपली उमेद, आणि मदतहि कोणाची घ्यावयाची नाहीं. तुम्हांला तुमच्या कुटुंबाचें साह्य नाहीं. कारण आपण पहिल्यानेंच त्याची वाट लावून बसलांत. आतां कोण तुमच्या उपयोगीं पडणार? अंतरिक्षांत साम्राज्य स्थापावयाची आपली महत्त्वाकांक्षा पुरी होत नाहीं तर! आतां कां बरें तुमचें तोंड फिकट झालें? इतका वेळ आम्ही बोललों त्याची प्रतीति येऊन त्यामुळें तर ही उदासीनता आली नाहीं ना? पहा बरें, तुमचा चेहरा कसा लाल झाला आहे तो! पण मघाचें तेज गेलें. तुम्ही रागावलां आहां, पण त्याचा उपयोग स्वतःचा दाह करून घेण्यापलीकडे नाहीं. पहा, तुमचा हा संताप पाहून सगळें जग कसें तुमच्याकडे टक लावून हांसत आहे. हा संताप आहे, कां पश्चात्ताप आहे, कां लज्जा आहे? हा रक्तिमा तरी कसला! कसला कां असेना!

तुमची सद्दी फिरली एवढें खरें. हेंच जर स्वपराक्रमानें अंध न होतां दुसऱ्याची थोडी तरी पर्वा केली असतीत तर एखादा तरी बांधव गत उपकार स्मरून तुमच्या साहाय्याला धांवत आला असता. पण आतां काय उपयोग? लोकांचीं अंतःकरणें दुखविलींत, त्या वेळींच याचा विचार करावयाचा होता. तिकडे पूर्वेकडे काय पहातां? तिकडे एकादादुसरा तारा चमकूं लागला होय! लागावयाचाच!–तुम्ही सर्वांचा संहार केलात; पण त्यांच्यांत एकी होती; प्रेमाचे लागेबांधे होते; ते चंद्राचे हेर होते. ते पहा, हळूहळू लहानमोठे तारांगण पुढें येऊन गडबड करूं लागले आहेत. ही पूर्व तयारी बरें! मध्यरात्रीच्या वेळीं फिरून मागच्यासारखें राज्य स्थापन झाल्याचें तुम्हांला दिसेल! नका, असे पश्चिम-समुद्रांत तोंड दडवूं नका. आतां कां बरें तोंड रडवें केलेंत? पूर्वसमुद्रांतून वर येतांना आपलें हंसरें दिसणारें तोंड अजून आम्हांला आठवतें आहे. बरोबरच आहे. "हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं"।

---

# हिंदी सैन्याची घटना

लेखक : कॅ. रामचंद्र हरी लिमये, औरंगाबाद.

[ यांचा जन्म १९०८ मध्यें झाला. शिक्षण पुणें येथें फर्ग्युसन कॉलेजांत झालें. १९२७ सालीं ते रॉयल मिलिटरी कॉलेज, सॅन्डहर्स्ट, येथें दोन वर्षें राहिले. १९२९, परत आले. एक वर्ष नाशिक येथें राहिल्यावर व हल्लीं ते औरंगाबाद येथें १ बटॅलियन १४ व्या पंजाब पलटणींत असतात. ]

हिंदुस्थानांतील सैन्याचे साधारणतः ५ विभाग केलेले आहेत. (१) खडें हिंदी सैन्य, (२) खडें गोरें सैन्य, (३) Territorial Force, (४) Auxiliary Force, (५) Indian Army Reserve.

या सैन्याचें नियंत्रण-कमांडर-इन्-चीफकडून केलें जातें. हा व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचा जादा सभासद असतो. त्याचे मदतीस आर्मी हेडक्वॉर्टर्स व स्टाफ दिलेला असतो. प्रस्तुत लेखांत हिंदुस्थानांतील एकंदर सैन्यासंबंधीं थोडी माहिती देण्याचें योजिलें आहे.

सैन्याचें नियंत्रण कमांडर-इन् चीफ व आर्मी हेडक्वॉर्टर्स यांकडून केलें जातें. कामाच्या सोयीकरितां आर्मी हेडक्वॉर्टर्सचे खालील विभाग केले आहेत.

(१) जनरल स्टाफ (मुख्य मेजर-जनरल किंवा त्या हुद्यापेक्षां वरच्या दर्जाचा अधिकारी) या खात्याचीं कामें खालीलप्रमाणें असतात.

(अ) लष्करासंबंधींचें धोरण, (ब) लष्करी शिक्षण, (क) लष्कराची लढाईकरितां तयारी, (ड) आधुनिक युद्धसाधनांचा शोध.

(२) अॅडजुटन्ट जनरल (मुख्य लेफ्टनंट जनरल किंवा त्याच्या वरच्या हुद्याचा अधिकारी) त्याचीं कामें:--

(अ) सैन्यभरती, (ब) शिस्त, (क) सेरिमोनियल, कोर्ट मार्शल वगैरे व (ड) लष्करी हालचाली.

(३) क्वार्टर-मास्टर जनरल (मुख्य अधिकारी मेजर किंवा त्याच्या वरच्या दर्जाचा अधिकारी) याचीं कामें:—

(अ) लष्करी हालचालींचा बंदोबस्त, (ब) लष्करास रहाण्याकरितां जागा, (क) शिधा, सामग्री.

(४) मास्टर जनरल ऑफ ऑर्डिनन्सेस (मुख्य मेजर जनरल किंवा त्याच्या वरच्या हुद्याचा अधिकारी याचीं कामें:--

(अ) कपडा, (ब) हत्यारें, (क) दारूगोळा व इतर युद्धसामग्री, (ड) विषारी धुराच्या लढाईची तयारी.

(५) इंजिनियर इन चीफ, (कर्नल किंवा त्याच्या वरच्या दर्जाचा अधिकारी) याचीं कामें:—

(अ) किल्ल्यांची डागडुजी, (ब) बराकी व इतर लष्करी इमारतींची डागडुजी, (क) सैन्याकरितां पाण्याचा बंदोबस्त.

(६) मिलिटरी सेक्रेटरी (मुख्य कर्नल किंवा त्याच्या वरचा अधिकारी) याचीं कामें:—

(अ) ऑफिसरांच्या बदल्या व नेमणुका, (ब) ऑफिसरांचीं पेन्शनें.

या शाखांवरील मुख्य अधिकाऱ्यांच्या नेमणुका बादशहा करितात. प्रत्येक शाखेबद्दल त्या त्या शाखेचा मुख्य जरी जबाबदार असला तरी व्हाइसरॉय हे कमांडर-इन-चीफ यांस सर्व खात्यांबद्दल जबाबदार धरितात. व्हाइसरॉय

यांचे कार्यकारी मंडळाप्रमाणें कमांडर-इन-चीफ् यांचें एक कार्यकारी मंडळ असतें. वर लिहिलेल्या खात्यांचे मुख्य त्याचे सभासद असतात. वेळोवेळीं कमांडर-इन-चीफ आपल्या कार्यकारी मंडळाची बैठक भरवून निरनिराळ्या प्रश्नांचा विचार करितात. त्या कार्यकारी मंडळांत वरील सभासदांशिवाय एक सिव्हिलियन असतो. तो कमांडर-इन-चीफ यांस आर्थिक बाबतींत सल्ला देतो.

लष्करी नियंत्रणाचे सोयीकरितां, लष्करीदृष्ट्या हिंदुस्थानाचे चार भाग केले आहेत.

१. नॉर्दर्न कमांड, २. सदर्न कमांड, ३. ईस्टर्न कमांड, ४. वेस्टर्न कमांड.

नॉर्दर्न कमांड—

हा सगळ्या विभागांमध्यें भौगोलिकदृष्ट्या लहान आहे; पण लष्करी दृष्ट्या याचें महत्त्व फार मोठें आहे. हिंदुस्थानावर खुष्कीच्या मार्गानें आतांपर्यंत ज्या परकीयांच्या स्वाऱ्या झाल्या आहेत, त्या सर्व उत्तरेकडूनच झाल्या आहेत. हिंदुस्थानच्या उत्तरेस हिमालय पर्वत असल्यामुळें हिंदुस्थानच्या बहुतेक सरहद्दीचें संरक्षण निसर्गच करतो. उत्तरेकडे हिंदुस्थानची सरहद्द रशिया, तुर्कस्थान, तिबेट, अफगाणिस्थान व इराण या राष्ट्रांच्या सरहद्दींशीं मिळते. यांपैकीं पहिल्या दोन राष्ट्रांची व हिंदुस्थानची सरहद्द फार उंच व काठिण अशा पर्वतावरून गेलेली आहे; त्यामुळें त्या सरहद्दीवर फारसें सैन्य ठेवण्याची जरूरी भासत नाहीं. अफगाणिस्थान व हिंदुस्थान यांच्या सरहद्दी-मध्यें एक बेवारशी जमिनीचा तुकडा आहे. तेथील लोक अडाणी व अशिक्षित असे पठाण असून त्यांची हिंदुस्थानच्या हद्दींतील रहिवाशांना त्रास देण्याची प्रवृत्ती असते. याशिवाय हिंदुस्थानांत येण्याचें बहुतेक रस्तेहि याच सरहद्दीच्या भागांत असल्यामुळें, हिंदुस्थानांतील फौजेच्या अर्ध्यापेक्षां जास्तच हिस्सा या भागांत ठेवण्यांत येतो. नॉर्दर्न कमांडमध्यें नॉर्थ वेस्ट फ्रॉंटियर प्रॉव्हिन्सेस व पंजाबचा थोडासा भाग हे मुलकी जिल्हे समाविष्ट होतात. या भागांत बहुतेक सर्व लष्करी छावण्या रेल्वेनें जोडलेल्या आहेत. नॉर्दर्न कमांडचें मुख्य ठाणें पेशावर हें आहे.

**सदर्न कमांड—**

याचें क्षेत्रफळ इतर कमांडपेक्षां जितकें मोठें आहे. तितकेंच लष्करी-दृष्ट्या याचें महत्त्व कमी आहे. मुंबई इलाखा, मद्रास इलाखा व मध्यप्रांत हे या कमांडमध्यें येतात. याचे मुख्य ठाणें पुणें.

**ईस्टर्न कमांड—**

याचें मुख्य ठाणें कलकत्ता असून बंगाल व आसाम हे मुलकी विभाग यामध्यें समाविष्ट होतात.

**वेस्टर्न कमांड—**

याचें मुख्य ठाणें क्वेटा हें असून थोडासा सिंध, बलुचिस्थान व वझिरिस्थान यांचा या कमांडमध्यें अंतर्भाव होतो.

**ब्रह्मदेश—**

हा एक स्वतंत्र विभाग असून त्यास बर्मा इंडिपेन्डंट डिस्ट्रिक्ट असें म्हणतात. याचे मुख्य ठाणें रंगून हे होय.

खड्या सैन्याशिवाय ब्रह्मदेशामध्यें मिलिटरी पोलीस नांवानें ओळखले जाणारे सैनिक असतात. यांचें काम म्हणजे पोलिस व शिपाई यांच्या कामाचें मिश्रण असतें.

कोणीहि एकटा मनुष्य वर लिहिलेल्या कमांडसारख्या एका मोठ्या विभागाचें काम स्वत: करूं शकत नाहीं. म्हणून त्याच्या मदतीस स्टाफ दिलेला असतो. त्याचप्रमाणें सोयीसाठीं प्रत्येक कमांडचे लहान लहान तुकडे पाडलेले असतात. यांस डिस्ट्रिक्ट असें म्हणतात.

ज्याप्रमाणें कमांडवर हुकमत चालविणाऱ्या अधिकाऱ्यास जनरल ऑफिसर कमांडिंग-इन्-चीफ असें म्हणतात, त्याप्रमाणें डिस्ट्रिक्टवरच्या मुख्यास जनरल ऑफिसर कमांडिंग डिस्ट्रिक्ट असें म्हणतात. डिस्ट्रिक्टमध्यें पुन्हां पोटविभाग असून त्यांस ब्रिगेड असें नांव आहे. अशा एका इन्फंट्रीब्रिगेडमध्यें चार पायदळ पलटणी असतात व घोडदळांच्या ब्रिगेडमध्यें चार रिसाले असतात.

प्रत्येक पायदळ पलटणींत पांच कंपनी असतात. चार प्लॅटूनस् मिळून एक कंपनी होते व चार सेक्शन मिळून एक प्लॅटून तयार होते; आणि नऊ शिपाई मिळून एक सेक्शन् होतो.

वर दिलेले तुकडे कांहीं विशिष्ट हेतूनेंच केलेले आहेत. मुख्य हेतु म्हणजे कामाची विभागणी हा होय. शिपायापासून तों कमांडर इन्-चीफपर्यंत प्रत्येक माणसावर थोडथोडी जबाबदारी ठेविल्यामुळें कामाचा सर्व बोजा एका माणसावर पडत नाहीं व त्यामुळें काम सुरळीत चालतें. दुसरा फायदा म्हणजे प्रत्येक इसमास जबाबदारी थोडी पण नेमून दिलेली असल्यामुळें कोणासहि कामचुकारपणा करण्यास संधि मिळत नाहीं. पण हें लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, जरी जबाबदारी अशा तऱ्हेनें विभागिली गेली आहे तरी प्रत्येक शाखेचा मुख्य त्या त्या शाखेबद्दल जबाबदार धरला जातो.

आतांपर्यंत हिंदुस्थानचे लष्कराच्या सोयीकरितां केलेले भौगोलिक विभाग व लष्कराचे निरनिराळे घटक हे आपण पाहिले. आतां हिंदुस्थानांत सैन्य काय आहे याकडे वळूं. प्रस्तुत लेखांत फक्त हिंदी सैन्यासंबंधींचाच विचार केला आहे.

सैन्य म्हटलें म्हणजे शिपाई, घोडे, नोकर, विमानें वगैरेंचें चित्र आपले डोळ्यांसमोर उभें राहातें. कोणत्याहि राष्ट्राचें सैन्य खरें राष्ट्रीय व पूर्ण बनण्यास त्यामध्यें वर लिहिलेल्या दळांचा समावेश झालाच पाहिजे.

हिंदुस्थानांत वैमानिक दळ शिवाय करून बाकी सर्व दळें आहेत. वैमानिक दळहि इंडियन एअर फोर्स या नांवाखालीं दोन चार वर्षांत अस्तित्वांत येईल असा अंदाज आहे. आतां आपण प्रत्येक दळाचा स्वतंत्र विचार करूं.

पायदळ:—महायुद्धाचे पूर्वीं पायदळ पलटणींना निरनिराळे नंबर असत. उदाहरणार्थ, १९ पंजाबी पलटण, ४० पठाण पलटण, ११७ मराठा पलटण इत्यादि. सन १९२२ मध्यें लॉर्ड रॉलिन्सन–हिंदुस्थानचे त्या वेळचे कमांडर- इन्–चीफ यांनीं जुनी पद्धति बंद करून नवीन पद्धति सुरू केली. या पद्धतीप्रमाणें दर ६ पलटणी एकत्र करून अशा प्रत्येक गटास नांव व नंबर हें देण्यांत आलें. उदाहरणार्थ १ ली पंजाब रेजिमेंट; ५ वी मराठा रेजिमेंट, १३ वी फ्रॉंटियर फोर्स रेजिमेंट वगैरे. अशा प्रत्येक रेजिमेंटमध्यें ५ खडया बटॅलियन व १ ट्रेनिंग बटॅलियन अशी व्यवस्था करण्यांत आली.

ट्रेनिंग बटॅलियनचें काम रंगरूटांना शिक्षण देऊन त्यांना लढाऊ शिपाई

बनविणें हें असतें. या शिवाय रिझर्व्ह म्हणजे शिलकी फौजेचें शिक्षणहि ट्रेनिंग बटॅलियनमध्येंच होतें. प्रत्येक पलटणीची ट्रेनिंग बटॅलियन साधारणतः ज्या भागांतून त्या पलटणीमध्यें रंगरूटांची भरती होते त्या भागांत असते. खड्या पलटणी नांवाप्रमाणें सदैव युद्धाकरितां तयार असतात व त्यांना तेंच शिक्षण खऱ्या पलटणींत मिळत असतें.

**घोडदळ:**—महायुद्धापूर्वी घोडदळें नांवावरून ओळखलीं जात असत. उदाहरणार्थ, प्रोबिन्स हॉर्स, हॉडसनस हॉर्स, वगैरे. १९२२ मध्यें ही पद्धत बंद करून प्रत्येक घोडदळास नंबर देण्यांत आला. जसें, २ री लान्सर रेजिमेंट, १६ वी कॅव्हलरी रेजिमेंट, १८ वी कॅव्हलरी वगैरे. एकंदर हिंदी घोडदळें २१ आहेत. यांशिवाय गव्हर्नर-जनरलचे शरीरसंरक्षक व प्रत्येक गव्हरनरचे शरीरसंरक्षक यांचीं घोडदळें निराळींच आहेत.

**तोफखाना:**—हिंदी तोफखाना सध्यां फक्त डोंगराळ मुलुखांतील लढायांस उपयोगी पडण्यासारखाच आहे. या तोफा खेचरांवर लादलेल्या असल्यामुळें त्या डोंगराळ मुलुखांत जाऊं शकतात. पण लौकरच लांब पल्ल्याच्या तोफाहि हिंदी सैन्यांत समाविष्ट होतील असा अंदाज आहे.

**गुरखे:**—गुरख्यांचा एकंदर १० रेजिमेंटस् असून प्रत्येक रेजिमेंटच्या २ बटॅलियनस् असतात. त्यांच्याकरितां निराळी ट्रेनिंग बटॅलियन नसते.

प्रत्येक रेजिमेंटचा एक डेपो असतो व त्या डेपोमध्यें दोन्ही बटॅलियनस् करितां रंगरूट तयार करितात.

**सॅपर्स आणि मायनर्स:**—हे लढाऊ शिपाई असून यांना विहिर खोदणें, पाण्याचे नळ तयार करणें, नद्यांवर पूल बांधणें वगैरे कामांचें जास्त शिक्षण दिलें जातें. शांततेच्या कामांत यांचा विशेषसा उपयोग नसतो. शांततेच्या काळांत त्यांना इतर खड्या फौजेप्रमाणेंच लढाईचें शिक्षण दिलें जातें; पण लढाईच्या वेळीं त्यांचा फार उपयोग होतो. पाण्याचा बंदोबस्त, पूल बांधणें, पूल उडवणें व खंदकांमध्यें कामें करणें यांकडे यांचा उपयोग होतो. यांशिवाय विषारी धुरापासून व गोळ्यांपासून बचावाच्या जागा हेच तयार करतात. आधुनिक लढाईमध्यें विषारी धूर व गोळे यांचा किती मोठ्या प्रमाणावर

उपयोग होतो यांची कल्पना केली म्हणजे सॅपर्स व मायनर्स यांच्या उपयुक्ततेची कल्पना येते.

सैन्याचें नेहमींचें तत्त्व स्वावलंबनाचें असतें. सैन्याची नेहमींची तयारी अशी असतें कीं, त्यांना कोणत्याहि लढाईत सिव्हिलियनसच्या मदतीशिवाय भाग येतां घ्यावा म्हणून खड्या सैन्याशिवाय, डॉक्टर, जनावरांचे डॉक्टर, शिंपी, चांभार, भंगी वगैरे लोकांचाहि सैन्यांत समावेश करण्यांत येतो. हे लोक युद्धाचे वेळीं आयते मिळणें शक्य नसल्यामुळें त्यांना शांततेच्या वेळींच भरती करून घ्यावे लागतें. भंगी, चांभार व शिंपी हे प्रत्येक पलटणीमध्यें व रिसाल्यांत भरती केलेले असतात. डॉक्टरांचें एक निराळेंच दळ असतें. यांस इंडियन् मेडिकल सर्व्हिस् असें म्हणतात.

१९ व्या शतकांतील लढायांत जखमी किंवा आजारी लोकांच्या शुश्रुषेसंबंधीं कांहींच व्यवस्था नसे. यामुळें गोळी लागून मरणाऱ्या लोकांपेक्षां जास्तच लोक आजारस बळी पडत. जसजशी युद्धशास्त्रामध्यें प्रगति होऊं लागली तसतसें जखमी व आजारी लोकांच्या शुश्रुषेकडे जास्त लक्ष जाऊं लागलें. याचेंच दृश्यस्वरूप म्हणजे सध्यांची इंडियन मेडिकल सर्व्हिस यामध्यें डॉक्टर, कंपाउंडर व रोग्यांच्या शुश्रुषेकरितां ठेवलेले लोक यांचा समावेश होतो. कोणच्याहि सैन्याचें प्रकृतिमान व सैन्य राहाते त्या जागेची साफसफाई यांबद्दल हे डॉक्टर जबाबदार असतात. पाणी खराब किंवा कोणत्याहि कारणामुळें दूषित असल्यास त्यामध्यें औषध वगैरे टाकून ते निरोगी करणें हेंहि यांचेंच काम असतें.

**इंडियन् आर्मी सर्व्हिस कोअर्** :—या कोअरचें काम शांततेच्या व युद्धाच्या काळांत एकच असतें. तें म्हणजे सैन्यास शिधा पुरविणें. पोट भरलेलें असल्याशिवाय मनुष्य काम करूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें रिकाम्या पोटावर आम्ही शिपाई लोक लढूं शकत नाहीं. तेव्हां या आमच्या अन्नदात्यांची आम्हांस लढाईत किती जरूरी असते यांची वाचकांनींच कल्पना करावी. शिधापुरवठ्याशिवाय वाहतुकीचा बंदोबस्त सुद्धां हेंच दळ करतें.

**इंडियन् आर्मी ऑर्डिनन्स कोअर** :—या दलाचें काम बंदुका, पिस्तुलें व इतर युद्धोपयोगीं हत्यारें तयार करणें व त्यांची दुरुस्ती करणें हें आहे. यां-

शिवाय दारूगोळा व इतर युद्धोपयोगी सामग्री सुद्धां हेच लोक तयार करतात. लढाईमध्यें शिपायांस जशी अन्नाची जरूरी आहे तितकीच किंबहुना जास्तच जरूरी त्यांस गोळ्यांची असते. ज्याप्रमाणें रिकाम्या पोटानें शिपाई लढूं शकत नाहींत, त्याप्रमाणेंच रिकाम्या गोळ्यांच्या पिशव्या असलेला शिपाई लढाईच्या कामाला सर्वस्वी निरुपयोगी असतो हें कोणीहि कबूल करीलच. तेव्हां जशी इंडियन आर्मी सर्व्हिस कोअरची आम्हांस लढाईमध्यें जरूरी आहे तशीच इंडियन् आर्मी आर्डिनन्स कोअरचीहि जरुरी आहे. याच कोअरकडून कपड्यांचाहि बंदोबस्त केला जातो.

---

# सौ. वत्सलावहिनी यांचा अल्प परिचय

लेखकः **नारायण वासुदेव महाजनी, भोर**

[ हे भोरचे रहिवाशी असून त्यांचा जन्म शके १८०८ भाद्रपद वद्य १२ रोजीं मुक्काम शिवापूर जिल्हा पुणें येथें झाला. त्यांचें भोर हायस्कूलमध्यें शिक्षण झाल्यानंतर मुंबईच्या 'संदेश' पत्राचे कांहीं काळ व्यवस्थापक होते. सध्यां ते भोर संस्थानचे नोकरींत आहेत ].

सन १९१६ सालची हकीकत. त्याच वेळीं कै. अच्युतराव कोल्हटकर यांचे नेतृत्वाखालीं 'श्रुतिबोध' ( वेदांचें भाषांतर ) हें मासिक प्रसिद्ध होत होतें. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या विद्वानांचे धार्मिक निबंध एकत्रित करून सर्व-धर्म-परिषद अथवा "तिळगूळ" हें पुस्तक संक्रातीच्या दिवशीं प्रसिद्ध करावें अशी आमच्यांत एक कल्पना निघाली. तेव्हां महाराष्ट्रांतील विद्वान लेखकांस निबंध पाठविण्याविषयीं विनंति करण्यांत आली. मुंबईसच आमचे ऑफिस असल्यामुळें मुंबईतील लेखकांस समक्ष भेटूनच निबंध लिहिण्याबद्दल विनंति करण्याची कामगिरी मजकडे आली. प्रस्तुत लेखक श्रुतिबोध संस्थेस मिळण्यापूर्वीं इंदुप्रकाशमध्यें असतांना बऱ्याच लेखकांचा व त्याचा परिचय झालेला होता. यामुळें लेखकांस समक्ष भेटून निबंध लिहिण्याविषयीं विनंति करण्यांत मलाहि उत्साह वाटला. रोज दोनतीन लेखकांस भेटून त्यांनीं कोणकोणत्या विषयांवर निबंध लिहावेत याबद्दल

बाटाघाट करतां करतां एके दिवशीं रावसाहेब ×××× यांची मला आठवण झाली व लागलीच दुसरे दिवशीं त्यांचेकडे जाण्याचा बेत मीं ठरविला. रावसाहेबांची व माझी इंदुप्रकाश ऑफिसपासून चांगलीच ओळख झालेली होती. परंतु ते एक बडे ऑफिसर असून कोल्हटकर यांचे नेतृत्वाखालीं प्रसिद्ध होणाऱ्या तिळगुळासाठीं निबंध लिहून देतील किंवा नाहीं अशी मला शंका होती; तत्रापि एवढ्या मोठ्या विद्वान गृहस्थाकडे गेलों नाहीं असें कोणांस वाटूं नये म्हणून मी मुद्दामच त्यांना विनंति करावी या हेतूनें त्यांच्याकडे गेलों. मी गिरगांव बॅकरोडवरील त्यांचे बिऱ्हाडीं जातांच "कोणीकडे वाट चुकला ?" वगैरे हंसत हंसत बोलून त्यांनीं माझें स्वागत केलें. प्रथम इकडच्यातिकडच्या गप्पागोष्टी झाल्यावर वेदांचें भाषांतर कोण करतों ? संदेशमधील अच्युतराव यांचे लेख इतके कां लोकप्रिय होतात ? वगैरेबद्दल गप्पा झाल्यावर मी कां आलों याची त्यांना थोडक्यांत कल्पना दिली. ते ती नाकारणार हें मला आगाऊच माहित असल्यामुळें त्यांनीं वेळेची सबब सांगतांच मी ज्यास्त जिकीर न करतां राजकारण, समाजसुधारणा, वगैरे अन्य विषयांवर गप्पा सुरू केल्या. आमच्या गप्पा चालू असतां सौ. वत्सलावहिनी-रावसाहेब यांच्या पत्नी-जवळच होत्या. त्याहि मधूनमधून त्यांत वेचक प्रश्न विचारून भाग घेत. त्यांचे प्रश्न ऐकून राजकारण, समाजसुधारणा या विषयांवर त्यांचा बराच व्यासंग असावा असें मला वाटलें, व म्हणून रावसाहेबांनीं लेख लिहिण्याची टाळाटाळ करतांच सौ. वत्सलावहिनींना लेख लिहिण्याबद्दल मीं विनंति केली. माझ्या विनंतीचा अव्हेर करण्याइतका तुसडेपणा त्यांचे अंगीं नसल्यामुळें म्हणा अगर लेख लिहिण्याची त्यास जात्याच हौस होती म्हणून म्हणा, त्यांनीं लेख लिहून देण्याचें तात्काळ कबूल केलें; परंतु रावसाहेबांस ही गोष्ट फारशी न मानवल्यामुळें आमचे तिळगुळांत त्यांचा तिळगुळ मिसळण्याची सुसंधि त्या वेळीं तरी मिळाली नाहीं हें खास.

सौ. वत्सलावहिनींच्या प्रथम परिचयाचे वेळीं लेख लिहिण्यास नकार मिळाला तरी, त्यांचे लेख वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्यास राजकारण व समाजसुधारणा याविषयीं मननशील विचार वाचकांस वाचावयास मिळतील अशी माझ्या

मनाची खात्री होऊन चुकल्यामुळें त्यांचे लेख वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्यासाठीं मिळावेत म्हणून मी पुन्हा त्यांचेकडे गेलों व प्रथम लेख लिहून देण्याबद्दल त्यांची कबुली मिळवूनच नंतर त्या गोष्टीची विनंति करण्याकरितां रावसाहेब यांचेकडे जाऊन मोठ्या चतुराईनें त्यांचें मन वळविण्यांत मला यश आलें. सौ. वहिनींनीं देखील संमति देतांना "वत्सलावहिनी" या सहीनें लेख देण्याचें व केव्हांहि त्यांचें नांव प्रसिद्ध न करण्याचे अटीवर "संदेश" साठीं लेख लिहून देण्याचें त्यांनीं कबूल केलें. व त्याप्रमाणें तारीख ३ फेब्रुवारी १९१५ रोजीं त्यांचा पहिला लेख प्रसिद्ध झाला.

सौ. वत्सलावहिनींचे नांवाखालीं संदेशमध्यें पहिलाच लेख प्रसिद्ध झाला, त्या वेळीं मुंबई व महाराष्ट्रांतील राजकारणी मंडळींमध्यें मोठी खळबळ उडून गेली. त्या लेखाची भाषा इतकी चटकदार व विचारसरणी इतकी सुदेसूद होती कीं, ही लेखिका कोण या जिज्ञासाबुद्धीनें कित्येकजणांचे संदेश आफिसांत हेलपाटे सुरू झाले. कित्येकांनीं पत्रें पाठवून चौकशी सुद्धां केली. परंतु आमचेकडून केव्हांहि नांव फुटणें शक्य नव्हतें; यामुळें जिज्ञासू मंडळींच्या खटपटीस यश येण्याचें चिन्ह दिसेना. लोक तरी काय कमी! आमचेकडून त्यांची निराशा झाल्यावर त्यांच्या सुपीक मेंदूंत तर्कवितर्क सुरू झाले. कोणी म्हणे लेखिका स्त्रीच नव्हे, कोणीतरी पुरुषवेषधारी लेखिका असली पाहिजे. कोणाची तर इतक्यावर मजल गेली कीं, अच्युतराव हेच सौ. वत्सलावहिनी होत व तेच त्या नांवाखालीं लेख लिहित असावेत, असे एक ना दोन कितीतरी तर्क निघूं लागले. सौ. वत्सलावहिनींचें खरें नांव कोठून तरी व कसें तरी बाहेर यावें अशी त्यांच्याकडून एकसारखी खटपट चालू होती. संदेश ऑफिसांतील मंडळींशीं ज्यांचा परिचय होता त्यांपैकीं कित्येकांनीं तर हे लेख आपण स्वत: लिहित असल्याचें जाहीर करून उत्तम लेखक म्हणून म्हणवून घेण्याची हौस भागवून घेण्यास कमी केलें नाहीं, तर कित्येक संदेश ऑफिसांतील मंडळींशीं सौ. वत्सलावहिनींची ओळख पटण्याकरितां संधान बांधूं लागले. उलट संदेशच्या संपादकवर्गांतील मंडळी तरी काय विनोदी! त्या लेखांचे कर्तृत्त्व आपलेकडेच आहे, इतकेंच नाहीं तर त्याची हस्तलिखितें आपल्या हातचींच आहेत, असें जेव्हां प्रत्येकाकडून वेगवेगळ्या वेळीं

त्यांना कळलें, तेव्हां तर या खटपट्या मंडळींच्या फजितीस पारावारच उरला नाहीं. पण त्याचा असा परिणाम झाला कीं, तेव्हांपासून या बाबतींत आमच्या ऑफिसास तरी या लोकांचा उपसर्ग होईनासा झाला.

अस्तु, येथपर्यंत सौ. वत्सलावहिनींचा व माझा परिचय कसा झाला याची हकीकत थोडक्यांत दिली आहे. सौ. वत्सलावहिनींचें चरित्र त्यांचे लेख-संग्रहाबरोबरच प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार होता. परंतु चरित्र छापण्या-विरुद्ध त्यांचें मत असल्यामुळें त्यांचें चरित्र प्रसिद्ध होऊं शकलें नाहीं. नुकतेंच जळगांवच्या " प्रागतिक " वर्तमानपत्रांत सौ. कमलाबाईचें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यांत त्यांनीं सौ. वत्सलावहिनींचा नामनिर्देश करून आपलें व त्यांचें माहेर एकाच गांवचें असें उल्लेखिलें आहे. अच्युतरावांचे निधनानंतर आपल्या " संदेश भाउजीस तिलांजली " देऊन त्यांनींहि आपल्या लेखणीस कायमची विश्रांति दिली असल्याचें नुकतेंच जाहीर केलें आहे. तेव्हां या वेळीं आमच्या सौ. वत्सलावहिनींची थोडीशी का होईना पण ओळख करून दिली असतांना अप्रासंगिक होणार नाहीं असें आम्हांस वाटल्यावरून आम्हीं त्यांना प्रथम दिलेल्या वचनाचा भंग न करितां त्यांचा थोडक्यांत परिचय करून देण्याचें प्रकृत स्थळीं योजिलें आहे. शिवाय असें करण्यांत कदाचित् वचनभंग होतोहि आहे हें धरून चालले, तथापि त्यांच्या लेखांचें पुस्तकांत त्यांचें छायाचित्र घालण्याविषयींची जर आम्हांला त्यांची मूक संमति मिळवितां आली तर या अल्पचरित्राबद्दल त्यांचा रोष झाल्यास तो आम्हांस दूर करणें, त्यांचा मनमोकळेपणा व सौजन्य या गुणांमुळें अशक्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

सौ. वत्सलावहिनींचा जन्म ५३ वर्षांपूर्वीं सातारा प्रान्तांतील एका संस्थानांत ++++ या घराण्यांत झाला. त्यांचे वडील रा. दत्तोपंत हे या संस्थानांत लौकिकवान नोकर होते. तथापि त्यांची सांपत्तिक स्थिति बेताचीच, त्यामुळें चौघा मुलांच्या शिक्षणासाठीं लागणारा खर्च करण्याची त्यांस मोठी पंचाईत पडत असे. मग सौ. वत्सलावहिनी व त्यांचे धाकटे बहिणीस शिक्षण संपादन करण्यास किती अडचण असावी हें वाचकांनींच ठरविणें बरें. पन्नास वर्षांपूर्वींचा काल व संस्थानांतील राहाणी या गोष्टींकडे दृष्टी

फेकली व स्त्रीशिक्षणाबद्दल समाजाचें औदासिन्य किती प्रखर होतें हें पाहिले तर सौ. वत्सलावहिनींना लहाणपणीं शिक्षणाचा लाभ मिळाला नाहीं, यांत कोणासहि आश्चर्य वाटण्याचें कारण दिसत नाहीं. मात्र शाळेंतील शिक्षण मिळालें नव्हतें तरी गृहकृत्यांत त्या तरबेज होत्या. त्यांचे वयाच्या १२ वर्षी—हहि वय त्या वेळीं मोठेंच समजलें जाई-सातारा येथील रावसाहेब गोविंदराव ++++ यांचे बरोबर त्यांचा विवाह झाला. विवाहाचे वेळीं रावसाहेबांचें वय अदमासें २० वर्षांचें असून पुणें येथील डेक्कन कॉलेजांत ते शिकत होते. रावसाहेबांच्या वडिलांची स्थितीहि बेताचीच होती, परंतु त्यांच्या ठिकाणीं शिक्षणाची अभिरुचि पण तिच्यापेक्षा नोकरीचा अभिलाष तीव्र असल्यामुळें हरप्रयत्न करून स्वावलंबनानें त्यांनीं उच्च शिक्षणापर्यंत मजल गांठली व विश्वविद्यालयाच्या पदवीबरोबर विद्वत्तादर्शक प्रशंसापत्रें व पारितोषिकें संपादिलीं. कॉलेजांत शिकत असल्यापासूनच रावसाहेब यांचा ओढा न्या. रानडे यांजकडे विशेष होता. पुढें पुढें एखाद्या प्रसंगीं तर आपण ना. गोखले यांच्या सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटींत दाखल होऊं असेंहि ते म्हणून दाखवीत. परंतु शिक्षणक्रम आटोपल्यावर सरकारी नोकरींत शिरण्याबद्दल वडिलधाऱ्या मंडळींचा आग्रह पडल्यामुळें त्यांनीं सरकारी नोकरींत प्रवेश करून घेतला. वाचनाचा नाद दांडगा असल्यामुळें नोकरी संभाळून बराचसा काळ वाचनांत घालवावा असा त्यांचा क्रम असे. तैलबुद्धि व वाचनाचा हव्यास यांमुळें राजकारण, समाजसुधारणा, स्त्रीशिक्षण वगैरे विषयांवर रावसाहेबांच्या मतांना सुशिक्षितांत मान होता. मुंबईतील ‘टाइम्स’ सारख्या प्रसिद्ध इंग्रजी दैनिकांत रावसाहेबांचे बरेच भारदस्त पण चुरचुरीत लेख टोपण नांवानें प्रसिद्ध झालेलें आहेत. राजकारणांत ना. गोखले, सर फिरोजशहा मेथा वगैरे मवाळाग्रणी व लो. टिळकांचे मधील वादविवादाचे वेळीं ना. गोखले यांचे मार्ग अगदीं व्यावहारिक आहेत व तेच अखेर हिंदुस्थानच्या उन्नतीस कारणीभूत होतील असें मोठ्या अभिमानानें ते सांगत असत. सुरत येथील कॉंग्रेसच्या वादळानंतर रावसाहेबांचे एका मासिकांत दोन लेख प्रसिद्ध झाले. त्यांत जहालांकडून राष्ट्राचें किती नुकसान होत आहे याचें वर्णन त्यांनीं आपलेकडून शिकस्तीनें केलें होतें. सदर लेख लिहूं नयेत असें प्रथम त्यांच्या

मनांत होतें. पण त्याविषयींची त्यांच्या सहकारी मित्रांची भीड मोडवेना, म्हणून त्यांना शेवटीं ते लिहिण्याची कबुली द्यावी लागली. ते लेख महाराष्ट्राच्या त्या वेळीं पचनीं पडणें शक्यच नव्हते. म्हणून त्यावर व परंपरेनें त्यांचेवर, कारण त्या लेखांचे जनक कोण ही गोष्ट त्यावेळीं कर्णोपकर्णीं सर्वत्र श्रुत झाली होतीच, महाराष्ट्रांत चोहोंकडून प्रखर टीकांचा भडिमार झाल्यामुळें टिळकांनीं नवीन पिढी बिघडविली असें म्हणून रावसाहेबांना इतःपर स्वस्थ बसणें भाग पडलें.

नोकरींत शिरल्यामुळें रावसाहेब यांस राजकारणांत उघड भाग घेतां येत नसे. परंतु वरील हकीकतीनंतर त्यांनीं ती दिशा बदलून आपल्या विचारांना स्त्रीशिक्षण, समाजसुधारणा एवढेंच क्षेत्र मोकळें ठेविलें व त्याचाच फायदा त्यांच्या पत्नी विदुषी सौ. वत्सलावहिनी यांना मिळाला.

नोकरीनिमित्त रावसाहेब मुंबईस येऊन राहिले, त्या वेळीं सौ. वत्सलावहिनीहि त्यांचेबरोबर मुंबईस आल्या. ऑफिसचें काम उरकून घरीं आल्यानंतर हुशहुश करीत स्वस्थ बसण्यांत इतर बऱ्या अधिकाऱ्याप्रमाणें रावसाहेबांचा काळ जात नसे. चहा घेतल्यानंतर तास दोन तास आपल्या पत्नीला संभाषण-पद्धतीनें अनेक विषयांसंबंधींची माहिती करून देण्याचा त्यांनीं नित्यक्रम सुरू ठेवला होता. सौ. वत्सलावहिनी या उत्तम बुद्धिमान् असल्यामुळें अल्प काळांतच त्यांची शिक्षणांत चांगली प्रगति झाली. याशिवाय रावसाहेबांच्या घरीं रोज त्यांची मित्रमंडळी जमून कोणत्या तरी राजकारणावर वादविवाद होई. त्यांत सौ. वत्सलावहिनीहि पुढें पुढें मोकळेपणानें भाग घेऊं लागल्या होत्या. काय कारण असेल तें असो, पण राजकरणांत त्या टिळकपंथी होत्या. लोकमान्य टिळकांचा स्वार्थत्याग त्या वेळच्या हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांपेक्षां निःसंशय उज्ज्वल आहे अशी त्यांची ठाम समजूत होती. त्यामुळें त्यांच्या घरीं चालणाऱ्या राजकारणविषयक वादविवादांत लो. टिळकांना कौरव वगैरे विशेषणें देऊन जेव्हां संबोधण्यांत येई, तेव्हां कोणाचीहि भीडमुर्वत न धरतां त्या विदुषी रावसाहेब व त्यांचे स्नेही यांजवर तुटून पडत. लो. टिळकांचा जळजळीत स्वार्थत्याग, निस्सीम देशभक्ति व उच्च शील हे गुण त्यांना पटवून देऊन सौ. वत्सलावहिनी या रावसाहेब व

त्यांची मित्रमंडळी यांस वादविवादांत कित्येक वेळां नामोहरम करीत असत. रावसाहेब उदारमतवादी व स्त्रीदाक्षिण्याचे भोक्ते असल्यामुळें या वादविवादांत जरी त्यांच्या पत्नीचो सरशी होत होती, तरी त्याबद्दल बिलकूल विषाद न मानतां ते उलट सौ. वहिनींचे मनांतून कौतुक करीत असत. लो. टिळकांच्या अंगच्या गुणांचें वर्णन सौ. वत्सलावहिनींच्या तोंडून नित्य ऐकून रावसाहेब यांचें थोडेंबहुत मतपरिवर्तन झालें यांत शंका नाहीं. पण मित्रमंडळींत आपल्या मतांत झालेला हा बदल कबूल करण्याचें धाडस त्यांनीं केलेलें आतांपर्यंत तरी आमच्या ऐकिवात नाहीं. त्या वेळीं आपल्या देशांत मवाळ, जहाल किंबहुना नेमस्त व राष्ट्रीय असे जे राजकीय तट निर्माण झाले होते, तेच मुळीं सौ. वत्सलावहिनींना नापसंत होते. त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या पक्षभेदाबद्दल उल्लेखितांना दोन्ही पक्षांच्या गुणदोषांची त्यांना जाणीव असलेली दिसून येई. मवाळपक्षांतील लोक स्वार्थत्यागी आहेत, तथापि देशकल्याणाची तळमळ व आपल्या बांधवांच्या हालअपेष्टा दूर करण्याची धमक या गुणांचा अभाव त्यांचे ठायीं होता म्हणून त्या पक्षाकडून आपल्या नित्याच्या सुखसोहाळ्यांतच दंग राहून राजकारण लढविण्यांत येई व त्यामुळें त्यांच्या सद्हेतूचा पगडा राजकारणावर बसणें शक्य झालें नाहीं. याप्रमाणें त्यांचें जसें मवाळपक्षाविषयीं मत होतें तसें उलट जहालपक्षाविषयींहि बोलतांना त्या म्हणत असत कीं, ‘ जहालपक्षांत स्वार्थत्याग आहे, देशहिताची तळमळ आहे व आपल्या बांधवांच्या हितास्तव स्वतः हालअपेष्टा सोसण्याची भरपूर धमक पण आहे. या सर्व गोष्टी खऱ्या आहेत, तथापि त्यांच्यामध्यें एकदरीनें तडजोडीचें धोरणच कमी असल्यानें दुसऱ्या पक्षाशीं नेमस्तपणानें मिटतें घेऊन वागणें ही गोष्ट त्यांना शक्यच नव्हती. त्यामुळें त्यांचेकडून देशहित जितकें व्हावयास पाहिजे तितकें खास झालें नाहीं. अशा रीतीनें सौ. वत्सलावहिनींचें दोन्ही पक्षांबद्दल मत झालें होतें. तथापि एकंदरीनें देशांत माजलेल्या पक्षभेदाबद्दल त्यांना नेहमीं तिटकाराच वाटे, ही गोष्ट खरी. देशाच्या उन्नतीकरितां अन्तःकरणापासून झटणाऱ्या लोकांत व्यक्तिवैचित्र्यामुळें थोडासा मतभेद असूं शकेल, परंतु राजकीय क्षेत्रांत कौरवपांडवांसारखे रणांतील शत्रुतुल्य असे तीव्र पक्षभेद

असणें शक्यच नाहीं. हे पक्षभेद केवळ पोटभरू व स्वार्थी लोकांच्या चिथावणीमुळें देशांत माजले आहेत, असे त्या नेहमीं सांगत असत. ते भेद मोडण्यासाठीं स्वार्थत्यागी आणि संसारी हे दोन शब्द जर उपयोगांत आणले तर पुष्कळ बडेबडे लोक जे विनाकारण राजकारणांत लुडबुड करीत आहेत, त्यांची आपोआप गळती होईल. हा त्यांनीं सुचविलेला उपाय खरोखरच मननीय आहे. सौ. वत्सलावहिनींना मोकळेपणानें राजकारणांत भाग घेण्याची सुसंधि मिळाली असती तर सौ. सरोजिनीबाई नायडू यांच्या तोडीस त्यांची कामगिरी निदान महाराष्ट्रास तरी खास पटली असती, पण तसा योग आला नाहीं हें देशाचें दुर्दैव होय.

राजकारणांत त्यांना उघड भाग घेतां आला नाहीं, पण स्त्रीशिक्षण व समाजसुधारणा या बाबतींत त्यांनीं बरेंच पुढारीपण पत्करलें होतें. श्री. अण्णासाहेब कर्व्यांनीं जेव्हां पुण्यास स्त्रियांचें कॉलेज काढलें व निराळी युनिव्हर्सिटी स्थापिली त्या वेळीं त्या संस्थेसाठीं फंड गोळा करण्याचें काम सौ. वत्सलावहिनींनीं स्वतः हातीं घेऊन त्या बाबतींत त्यांनीं फार परिश्रम केले व फंडहि मोठा मिळवून दिला पण त्यांनीं आपलें नांव प्रसिद्ध होऊं न देण्याची मात्र खबरदारी घेतली होती. श्री. अण्णासाहेब कर्व्यांबद्दल त्यांना मोठा अभिमान; कर्व्यांसारखीं कर्तृत्ववान् माणसें देशांत निपजलीं तर देशाची उन्नति होण्यास कितीसा वेळ लागणार असें त्या नेहमीं म्हणत असत. सौ. वत्सलावहिनी व श्री. रमाबाईसाहेब रानडे यांच्या चरित्रक्रमांत बरेंचसें साम्य आढळून येणार आहे. दोघींचीहि पूर्वचरित्रें एकाच वळणाचीं. विद्वान् पतीच्या सहवासानें दोघीहि बहुश्रुत विदुषी झाल्या. पण श्री. रमाबाईसाहेबांच्या मतावर न्यायमूर्तींच्या मताचा जसा परिणाम झालेला दिसतो, तसा सौ. वत्सलावहिनींचे बाबतींत उलट प्रकार घडत गेला. रावसाहेबांना आपल्या कुटुंबाचीं मतें हळहळूं पटूं लागलीं. यांतच, खरोखर सौ. वत्सलावहिनींच्या कृतीचा गौरव झाला असें आम्ही समजतों. मात्र श्री. रमाबाईसाहेबांच्या कार्यकर्तृत्वाला जितका वाव मिळाला, तितका तो सौ. वत्सलावहिनींना केवळ मतप्रदर्शनावांचून मिळाला नाहीं. देशाची खरी उन्नति व्हावयास पुरुषांबरोबरच स्त्रियांनाहि शिक्षण देणें जरूर आहे. नाहींतर गाडीचें एक चाक मोडल्यावर तिची

गती कुंठित होऊन प्रवाशाचा प्रवास अपुरा होतो, तसें देशोन्नतीचें कार्य स्त्रीशिक्षणाचे अभावीं केव्हांहि अपुरेंच राहणार. शाळेंत जाऊन शिक्षण घेण्यास प्रापंचिक अडचण असेल त्यांना घरच्या घरींच शिक्षण देण्याची सोय समाजांतील सुशिक्षित स्त्रियांनींच केली पाहिजे. सौ. वत्सलावहिनींनी आपलीं संसारिक कामें संभाळून चाळीं हिंडून स्त्रियांमध्यें शिक्षणप्रचाराचें कार्यहि नेटानें केलें आहे. त्यांच्या या श्रमाचें फल जितकें मिळावयास पाहिजे होतें, तितकें तें मिळालें नाहीं; तरी पण त्या वेळीं गिरगांवांत बऱ्याच ठिकाणीं जें स्त्रीशिक्षणाचें कार्य चालू झालें होतें त्याचें श्रेय सौ. वहिनींनाच दिलें पाहिजे.

ज्यांनीं सौ. वत्सलावहिनींचे लेख वाचले असतील, त्यांना त्यांच्या समाजसुधारकाविषयींच्या कल्पना काय होत्या तें माहित असेलच. रावसाहेब प्रार्थनासमाजिष्ट होते. प्रार्थनासमाजांत रावसाहेब यांची प्रार्थना नेहमीं होत असे. सौ. वत्सलावहिनींनींहि प्रार्थनासमाजाची दीक्षा घेतली होती, व त्या प्रार्थनामंदिरांत न चुकतां रावसाहेबांच्या बरोबर जात. समाजसुधारणेबद्दलचीं त्यांचीं मतें फार उच्च दर्जाचीं होतीं. अल्पवयांत दुर्दैवानें एकाद्या स्त्रीस वैधव्य प्राप्त झालें तर तिनें पुनर्विवाह अवश्य करावा असें त्या नेहमीं म्हणत; परंतु आपल्याला सर्व बाजूंनीं अनुरूप असलेल्या इसमाशीं तो करावा व तसें केलें तरच तो करण्यापासून खरा फायदा आहे असें त्यांचें ठाम मत होतें. लोकप्रियतेसाठीं अगर स्वतःच्या वासना पूर्ण करण्यासाठीं कित्येक लोक आपल्यापेक्षां कुलशीलानें कमी दर्जाच्या विधवेबरोबर पुनर्विवाह लावून स्वतःच्या नीतिधैर्याचें प्रदर्शन जगास दाखविण्याची हौस पुरवून घेतात. अशा लोकांच्या नीतिधैर्यास त्या नीतिधैर्य समजत नसत. लोकप्रियता सवंग होईल, पण नीतिधैर्याचा भाव कांहीं उतरावयाचा नाहीं. नीतिधैर्य ही चीज बाजारांत स्वस्त मिळत असेल असें कोणास वाटत असल्यास ती त्याची चूक आहे. ही चीज जर इतकी स्वस्त असती तर इंग्रजी राज्य सुरू झाल्यापासून आतांपर्यंत लाखों लोकांनीं ती सहज मिळविली असती, असें समाजसुधारणेमधील सवंग नीतिधैर्याबद्दल बोलतांना त्या नेहमीं सांगत असत. लोकांना नीतिधैर्याची व्याख्या समजली नाहीं. समाजसुधारणा म्हणजे कडबोळ्यांत शंकरपाळे मिसळणें नव्हे. समाजसुधारणा म्हणजे सबगोलंकार नव्हे; वाटेल

त्यानें वाटेल तसें वागणें नव्हे. त्यालाहि कांहीं बंधनें आहेत व असलीं पाहिजेत. नुसते पुनर्विवाह लावणें अगर स्त्रीशिक्षणाचा डांगोरा पिटण्यासाठीं बायकांचीं प्रदर्शनें भरविणें ही समाजाच्या सुधारणेचीं लक्षणें नसून, ज्या तत्त्वांवर आपल्या समाजाची रचना झाली आहे त्यापेक्षां उदात्त व गहन तत्त्वांवर ती उभारणी झाली पाहिजे हीच समाजसुधारणेची त्यांची व्याख्या आहे.

हल्लीं रावसाहेब सेवानिवृत्त होऊन ते आपला काळ धार्मिक बाबतींत घालवीत असतात. सौ. वत्सलावहिनींनी देखील संसारनिवृत्त होऊन आपल्या पतीचें अनुकरण करण्याचें ठरविलें आहे व याच उद्देशानें ते उभयता उत्तर हिंदुस्थानांत देशपर्यटन करीत आहेत. व हिंदुस्थानांतील चारी धामांच्याहि यात्रा करण्याचा त्यांचा मानस आहे.

सौ. वत्सलावहिनींचा अल्प परिचय करून देण्याजोगी जी कांहीं थोडी हकीगत आम्हांस आज येथें देतां आली ती आम्ही मोठ्या आनंदानें सादर केली आहे. यापेक्षां जास्त हाकिकत देऊन त्यांची पूर्ण ओळख पटवून देण्याचें धाडस आमच्यांत नाहीं, ही गोष्ट आम्ही कबूल करतों. त्यांचें संपूर्ण चरित्र छापून प्रसिद्ध करण्याचा आमचा हेतु आहे. पण त्यांची समक्ष भेट घेऊन परवानगी मिळविल्याशिवाय ती गोष्ट करणें म्हणजे त्यांना प्रथम दिलेल्या वचनाचा भंग करणें होय. त्या कारणामुळें महाराष्ट्रांतील वाचकवर्गास आणखी कांहीं दिवस तरी सौ. वत्सलावहिनींची ओळख पटवून घेण्यासाठीं तिष्ठत बसावें लागणार आहे. आमच्या असेंहि ऐकिवांत आहे कीं, त्यांनीं आत्मचरित्रपर अशीं कांहीं टिपणें केवळ आपल्या करमणुकीखातर लिहिलेलीं आहेत. तीं जर जगापुढें येतील तर त्यांचें रहस्यपूर्ण चरित्र जाणण्याची अनायासें सोय होईल, यांत शंका नाहीं.

---

# बालवीर

लेखकः डॉ. मोरेश्वर नारायण नातू , पुणें.

[ हे बालवीर चळवळीचे पुणें डिस्ट्रिक्ट स्काउट कमिशनर म्हणून प्रसिद्ध असून यांच्या बी. एस्सी. व एम्. बी. बी. एस्. या परीक्षा झाल्या आहेत. सांप्रत हे पुणें मुक्कामीं डॉक्टरीचा धंदा करीत असून भोर संस्थानचे इनामदार आहेत.]

बालवीर चळवळीचा फैलाव गेल्या ८।१० वर्षांत सर्वत्र झालेला आहे. तथापि बालवीर म्हणजे कोण याची यथार्थ कल्पना व ' बालवीर ' चळवळीच्या उद्देशांची माहिती फार थोड्यांना आहेसें दिसून येतें. 'बालवीरां'चा पोशाख, कवाईत, शिस्त इत्यादि पाहून कांहींना ही लष्करी शिक्षणाची एखादी संस्था आहे असें वाटतें. अडीअडचणींच्या प्रसंगीं लोकांस मदत करणें, आग वगैरे लागली असतां ती विझाविणें इत्यादि गोष्टी बालवीर करतात; म्हणून नागरिकांच्या उपयोगाकरितां काढलेलें हें एक स्वयंसेवक मंडळ असावें असें कांहींना वाटतें. ही संस्था विशेषतः शाळांमधूनच असल्यामुळें हा शाळेच्या शिक्षणापैकींच कांहीं भाग आहे; अगर इन्स्पेक्टरला दाखविण्याजोग्या बऱ्याचशा प्रदर्शनांपैकीं हीहि एक चीज आहे असा कांहींचा समज झालेला आहे. परंतु यां सर्वांपेक्षां बालवीर चळवळीचें स्वरूप अगदीं भिन्न आहे व तिचें ध्येय अधिक व्यापक स्वरूपाचें आहे. कांहींची तर अशी कल्पना दिसते कीं, ज्याप्रमाणें शरीराला कपड्यादागिन्यांनीं शोभा येते त्याप्रमाणेंच उत्सवप्रसंगीं अगर समारंभाच्या स्थलाला शोभा आणण्याकरतां ' बालवीर ' हें एक उत्तम साधन होय !

बालवीर हा शब्द इंग्रजींतील स्काउट या शब्दाचा वाचक आहे. या शब्दाची इंग्रजींमधील व्युत्पत्ति अर्थ, ' सैन्याच्या अघाडीवर राहून शत्रुपक्षाची टेहेळणी करणारा हेर ' असा होतो. हाच शब्द परमार्थ दृष्टीनें योजिला व त्याकडे अधिक व्यापक व तात्त्विक अशा दृष्टीनें पाहूं लागलों तर बालवीराच्या ध्येयाची व कर्तव्याची बरोबर कल्पना येईल. आपल्या बरोबरीचे आपल्या पक्षाकडील सर्व शिपाई निद्रिस्त असतां त्यांच्या सुखासाठीं स्वास्थ्यासाठीं, अघाडीवर राहून स्वतःचा जीव धोक्यांत घालून अनिमिष

त्यानें वाटेल तसें वागणें नव्हे. त्यालाहि कांहीं बंधनें आहेत व असलीं पाहिजेत. नुसते पुनर्विवाह लावणें अगर स्त्रीशिक्षणाचा डांगोरा पिटण्यासाठीं बायकांचीं प्रदर्शनें भरविणें ही समाजाच्या सुधारणेचीं लक्षणें नसून, ज्या तत्त्वांवर आपल्या समाजाची रचना झाली आहे त्यापेक्षां उदात्त व गहन तत्त्वांवर ती उभारणी झाली पाहिजे हीच समाजसुधारणेची त्यांची व्याख्या आहे.

हल्लीं रावसाहेब सेवानिवृत्त होऊन ते आपला काळ धार्मिक बाबतींत घालवीत असतात. सौ. वत्सलावहिनींनी देखील संसारनिवृत्त होऊन आपल्या पतीचें अनुकरण करण्याचें ठरविलें आहे व याच उद्देशानें ते उभयता उत्तर हिंदुस्थानांत देशपर्यटन करीत आहेत. व हिंदुस्थानांतील चारी धामांच्याहि यात्रा करण्याचा त्यांचा मानस आहे.

सौ. वत्सलावहिनींचा अल्प परिचय करून देण्याजोगी जी कांहीं थोडी हकीगत आम्हांस आज येथें देतां आली ती आम्ही मोठ्या आनंदानें सादर केली आहे. यापेक्षां जास्त हकिकत देऊन त्यांची पूर्ण ओळख पटवून देण्याचें धाडस आमच्यांत नाहीं, ही गोष्ट आम्ही कबूल करतों. त्यांचें संपूर्ण चरित्र छापून प्रसिद्ध करण्याचा आमचा हेतु आहे. पण त्यांची समक्ष भेट घेऊन परवानगी मिळविल्याशिवाय ती गोष्ट करणें म्हणजे त्यांना प्रथम दिलेल्या वचनाचा भंग करणें होय. त्या कारणामुळें महाराष्ट्रांतील वाचकवर्गास आणखी कांहीं दिवस तरी सौ. वत्सलावहिनींची ओळख पटवून घेण्यासाठीं तिष्ठत बसावें लागणार आहे. आमच्या असेंहि ऐकिवांत आहे कीं, त्यांनीं आत्मचरित्रपर अशीं कांहीं टिपणें केवळ आपल्या करमणुकीखातर लिहिलेलीं आहेत. तीं जर जगापुढें येतील तर त्यांचें रहस्यपूर्ण चरित्र जाणण्याची अनायासें सोय होईल, यांत शंका नाहीं.

---

# बालवीर

लेखकः डॉ. मोरेश्वर नारायण नातू, पुणें.

[हे बालवीर चळवळीचे पुणें डिस्ट्रिक्ट स्काउट कमिशनर म्हणून प्रसिद्ध असून यांच्या बी. एस्सी. व एम्. बी. बी. एस्. या परीक्षा झाल्या आहेत. सांप्रत हे पुणें मुक्कामीं डॉक्टरीचा धंदा करीत असून भोर संस्थानचे इनामदार आहेत.]

बालवीर चळवळीचा फैलाव गेल्या ८।१० वर्षांत सर्वत्र झालेला आहे. तथापि बालवीर म्हणजे कोण याची यथार्थ कल्पना व 'बालवीर' चळवळीच्या उद्देशांची माहिती फार थोड्यांना आहेसें दिसून येतें. 'बालवीरां'चा पोशाख, कवाईत, शिस्त इत्यादि पाहून कांहींना ही लष्करी शिक्षणाची एखादी संस्था आहे असें वाटतें. अडीअडचणींच्या प्रसंगीं लोकांस मदत करणें, आग वगैरे लागली असतां ती विझाविणें इत्यादि गोष्टी बालवीर करतात; म्हणून नागरिकांच्या उपयोगाकरितां काढलेलें हें एक स्वयंसेवक मंडळ असावें असें कांहींना वाटतें. ही संस्था विशेषतः शाळांमधूनच असल्यामुळें हा शाळेच्या शिक्षणापैकींच कांहीं भाग आहे; अगर इन्स्पेक्टरला दाखविण्याजोग्या बऱ्याचशा प्रदर्शनांपैकीं हीहि एक चीज आहे असा कांहींचा समज झालेला आहे. परंतु यां सर्वांपेक्षां बालवीर चळवळीचें स्वरूप अगदीं भिन्न आहे व तिचें ध्येय अधिक व्यापक स्वरूपाचें आहे. कांहींची तर अशी कल्पना दिसते कीं, ज्याप्रमाणें शरीराला कपड्यादागिन्यांनीं शोभा येते त्याप्रमाणेंच उत्सवप्रसंगीं अगर समारंभाच्या स्थलाला शोभा आणण्याकरतां 'बालवीर' हें एक उत्तम साधन होय!

बालवीर हा शब्द इंग्रजींतील स्काउट या शब्दाचा वाचक आहे. या शब्दाची इंग्रजींमधील व्युत्पत्ति अर्थ, 'सैन्याच्या अघाडीवर राहून शत्रुपक्षाची टेहेळणी करणारा हेर' असा होतो. हाच शब्द परमार्थ दृष्टीनें योजिला व त्याकडे अधिक व्यापक व तात्त्विक अशा दृष्टीनें पाहूं लागलों तर बालवीराच्या ध्येयाची व कर्तव्याची बरोबर कल्पना येईल. आपल्या बरोबरीचे आपल्या पक्षाकडील सर्व शिपाई निद्रिस्त असतां त्यांच्या सुखासाठीं स्वास्थ्यासाठीं, अघाडीवर राहून स्वतःचा जीव धोक्यांत घालून अनिमिष

नेत्रांनीं जो एकसारखा खडा पाहारा करतो तोच स्काउट होय. गीतेमध्यें 'या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी ' या वचनानें भगवान् श्रीकृष्णांनीं याच तत्त्वाचा उल्लेख केला आहे.

'सन्नद्धो भव ' हें बालवीरांचें ब्रीद आहे.

दोन शब्दांच्या या चिमुकल्या वाक्यांत केवढा गंभीर आणि विस्तृत अर्थ भरला आहे, याची कल्पना फारच थोड्यांना असेल. बालवीर हा नेहमीं सावध असतो. अचानकपणें येऊन कोसळलेल्या आपत्तीबरोबर वीराला साजेल अशा वृत्तीनें झगडण्याची त्यांची नेहमीं तयारी असते. भावी आयुष्यांतील जबाबदारी आपल्या हातून होईल तितक्या उत्कृष्ट प्रकारें पार पाडली जावी यासाठीं पूर्ववयामध्यें जरूर ती सर्व तरतूद तो आगाऊ करून ठेवितो. नुसती सदिच्छा व चांगलें अंतःकरण यांचा या जगांत कांहीं उपयोग होत नाहीं. ज्ञानाखेरीज या गोष्टी असूननसून सारख्याच. सदिच्छेला ज्ञानाची जोड असेल तरच कार्यसिद्धि होते, सांप्रतच्या परिस्थितींत या सिद्धांतावर जितका जोर द्यावा तितका थोडाच होणार आहे.

एखादा प्राणी पाण्यांत बुडत आहे व एक मुलगा तलावाच्या कांठीं त्या वेळीं उभा आहे, अशी कल्पना करा. त्या प्राण्याला बुडतांना पाहून कांठावर उभा असणाऱ्याच्या अंतःकरणाची कालवाकालव होते. त्यांच्या अंतःकरणांत सदिच्छा, त्यागबुद्धि, भूतदया इत्यादि सर्व भावना आहेत. तथापि पोहण्याच्या कलेचें जर त्याला ज्ञान नसेल तर या सर्व सद्भावनांचा त्या बुडणाऱ्या माणसास काय फायदा ? स्वतःचा जीव धोक्यांत घालून प्रसंगविशेषीं तो गमाहूनहि, त्या बुडणाऱ्या प्राण्याला वर काढण्याची त्याची इच्छा असली तरी नुसत्या इच्छेचा काय उपयोग ?

पोहतां येऊन, बुडणाऱ्या प्राण्याला कसा पकडावा, त्याला कशी मिठी मारावी, त्याला कसा ओढावा इत्यादि ज्ञान जर नसलें तर बुडणारा प्राणी व तो मुलगा दोघेहि एकदमच पाण्याचा ठाव काढण्यास जातील. या पलीकडे काय होणार ? थोडेंसें याच्याहि पुढें जाऊन अशी कल्पना करा कीं, कोणत्याहि उपायानें कां होईना तो मुलगा त्या प्राण्याला वर काढूं शकला व नाकातोंडांत पाणी गेलें असल्यामुळें जर तो अचेतन असला आणि

कृत्रिम श्वासोच्छ्वास कसा चालू करावा याबद्दल करावयाच्या प्राथमिक उपचारांचें ज्ञान त्याला असणें अगदीं जरूर आहे. नसल्यास सर्व प्रयत्न व्यर्थ! बालवीरानें हें सर्व ज्ञान पुढें येणाऱ्या प्रसंगासाठीं आगाऊच संपादलेलें असतें. घरास चोहो बाजूंनीं आग लागली असतां तिसऱ्या मजल्यावर आक्रोश करणाऱ्या एखाद्या अल्पवयी बालकाचे प्राण वांचविण्याची गोष्ट घेतली तरी त्यासच वरील सर्व दृष्टांत लागू पडेल. तलावांत बुडणाऱ्या माणसाची अथवा आगीच्या डोंबांत सांपडलेल्या बालकाची उपमा जर या हतभागी देशास लावली तर त्यांवरून हल्लींच्या ह्या परिस्थितींत पुष्कळ बोध घेतां येईल. देशाची हलाकीची स्थिति व दैन्यावस्था हीं पाहून ज्याचें अंत:करण भडभडून येत नाहीं, असा नष्टात्मा कोण असेल? परंतु ती स्थिति दूर करण्यास लागणारें जरूर तें सामर्थ्य, अंगीं आणण्याचा प्रयत्न करण्याचें सोडून देऊन उगाच तळमळत बसल्यानें देशाचा कांहींएक प्रत्यक्ष लाभ नाहीं. संकटाचा व विघ्नाचा भयंकरपणा पाहून, आपलें बलाबल न ओळखतां, बेभानपणें विकारवश होऊन पुरांत उडी ठोकणें, हें त्यागबुद्धीचें व सद्भावनांचें लक्षण तर खरेंच; पण त्यापासून इच्छित साध्य पूर्वींपेक्षां अधिक जवळ येऊं शकत नाहीं. उलटपक्षीं प्रसंगावधान ठेवून आपल्यामधील सर्व सामर्थ्य एकवटून संकटाबरोबर झुंजतां येईल अशी तयारी करीत रहाणें हाच खरा पुरुषार्थ व हेंच बालवीरांचें ब्रीद. बालवीर चळवळीस प्रथम १९०८ सालीं इंग्लंडांत सुरुवात झाली. व गेल्या २३–२४ वर्षांच्या अवधींत हजारों बालवीरांनीं अनेक लहानमोठ्या प्रसंगीं आपल्या प्राण्यांच्या आहुत्या दिलेल्या आहेत. यावरून न्यायबुद्धीची अथवा पराक्रमाची कसोटी लावण्याचे प्रसंग आले असतां बालवीर त्या वेळीं हार जातो, अशांतला भाग नाहीं. परंतु 'सन्नद्धो भव' हा ब्रीदमंत्र त्यांच्या रोमरंध्रांतून भिनलेला असतो व त्याचें खरें मर्म व स्वारस्य तो जाणतो इतकेंच.

सर बेडन पॉवेल (लॉर्ड गिलवेल) हे या चळवळीचे आद्य जनक होत. बालवीर म्हणजे कोण हें सांगण्याचें पूर्वीं या चळवळीचे कांहीं उद्देश संक्षेपानें येथें सांगितलें म्हणजे पुढील विवेचनास सोईचें होईल. देशाच्या सेवेस लायक व समर्थ असे नागरिक तयार करणें हें या संस्थेचें ध्येय

आहे. नागरिकत्वास लागणाऱ्या जरूर त्या सद्‌गुणांची जोपासना व संवर्धन हीं बालवयांत जेणेंकरून होतील त्या सर्व उपायांचा अवलंब करणें हा त्या चळवळीचा मुख्य उद्देश व याच पायावर तिच्या सर्व अंगांची आणि उपांगांची रचना व उभारणी करण्यांत आली आहे.

लहान मुलांचें शील बनविणें हा या चळवळीचा तिसरा उद्देश आहे. शील बनविणें ही गोष्ट उच्चारण्यास व उपदेशण्यास जितकी सोपी तितकीच ती प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्यास अवघड आहे. क्रमिक पुस्तकांमधील पाठ, उपदेश, व्याख्यानें इत्यादि गोष्टींचा या कार्यास व्हावा तसा उपयोग होत नाहीं. मुलाच्या भोंवतालची परिस्थिति, त्याची संगत, त्याचे नित्य व्यवसाय याच गोष्टी मुलाचें शील बनविण्यास कारणीभूत होतात. लहान मुलाच्या स्वभावाचें व मनोरचनेचें सूक्ष्म निरीक्षण करून स्काउटिंगमधील नियम व व्यवसाय हीं ठरविण्यांत आलेलीं आहेत.

आपल्या मुलांना शाळांमधून हल्लीं मिळणारें शिक्षण, आपल्या मुलांची परिस्थिति व हल्लींची आपली सुधारणा या सर्वांमध्यें अनेक उणीवा आहेत. कदाचित तीं सर्व अपरिहार्यहि असूं शकतील. परंतु त्या सर्वांवर 'स्काउटिंग' हा एकच रामबाण उपाय आहे. आपल्या सांप्रतच्या शिक्षणास जर स्काउटिंगची जोड देतां आली तर त्याविरुद्ध जी भयंकर हाकाटी चालू आहे ती पुष्कळशी कमी होईल. हल्लींच्या शिक्षणांत दोष आहे, असें म्हणण्यापेक्षां तें अपुरें आहे असें म्हणणेंच जास्त संयुक्तिक होईल. शिक्षणाच्या एका अंगावर जो फाजील भर देण्यांत येतो तो कमी करून दुसऱ्या अंगाची त्यांस जोड दिली म्हणजे या शिक्षणांतून बाहेर पडणारे विद्यार्थी उत्तम नागरीक होण्यास लायक असे निपजतील. मुलांनीं अभ्यासाखेरीज इतर कोणत्याहि भानगडींत पडूं नये, असें बऱ्याच जणांचें मत असतें, तें ग्राह्य धरलें तरी पण 'स्काउटिंग' ही अभ्यासाची बाब असल्यामुळें ती भानगडी, उठाठेवी, उपद्याप यांपैकीं कोठल्याहि सदरांत येत नाहीं. किंबहुना स्काउटिंगकडे लक्ष न पुरविल्यास अभ्यास करण्याचें कर्तव्य हातून व्हावें तसें होत नाहीं असें होईल. परीक्षेला चार विषय असले व त्यांपैकीं गणितासारख्या एखाद्या विषयाची हेळसांड केली, तर इतर विषयांतील गुण कितीहि चांगले असले तरी

गणित येत नाहीं म्हणून शेवटीं, गणना नापासच होणार. तसाच कांहींसा प्रकार या स्काउटिंगचा आहे. शिक्षणक्रम संपवून ज्या वेळीं एखादा आवडीचा व्यवसाय करण्यास सुरुवात होते, त्या वेळेस सर्वांगीण शिक्षण आहे कीं नाहीं, याबद्दल जग परीक्षा करतें. शाळाकॉलेजांमधून होणाऱ्या परीक्षेपेक्षां ही परीक्षा अत्यंत महत्त्वाची असते. या मोठ्या परीक्षेच्या निकालावर पुढील भवितव्य अवलंबून असतें. परंतु सरतेशेवटीं जग जी परीक्षा घेते त्या वेळीं असली लटपट किंवा पोपटपंची करितां यावयाची नाहीं. जगाच्या परीक्षेंत स्काउटिंग हा फार महत्त्वाचा विषय आहे व त्याला गुणहि पुष्कळ ठेवण्यांत आलेले आहेत. या परीक्षेंत जो तुमचा नंबर लागेल त्यावरून खरी किंमत ठरेल. म्हणून लहानपणापासून स्काउटिंग शिकण्यास आरंभ केला म्हणजे भावी आयुष्यांत हरघडी अडून बसावें लागत नाहीं. शाळेमधील बौद्धिक शिक्षण व स्काउटिंगमधील व्यावहारिक शिक्षण यांची मिळवणी केली म्हणजेच मनुष्याची पूर्ण वाढ झाली असें होईल. नाहींतर मेंदू कितीहि तरतरीत झाला आणि स्मरणशक्तीची केवढीहि वाढ झाली तरी मनुष्य शेवटीं पंगु तो पंगूच राहणार व प्रत्येक गोष्टीस निकामीं ठरणार.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बालवीरास प्रत्येक गोष्ट थोडी थोडी आली पाहिजे. या योगानें तो स्वावलंबी व व्यवहारदक्ष बनतो. कोणत्या गोष्टीची गरज लागेल याचा नियम नसतो, म्हणून व्यवहारांत उपयोगी पडतील व आपलें काम तात्पुरतें भागेल इतक्या बेताच्या शक्य तेवढ्या कला व धंदे ही बालवीरानें माहित करून घेतली पाहिजेत. आणि म्हणूनच "सन्नद्धो भव" हें त्याचें ब्रीद वाक्य ठेविलें आहे.

नेहमींचें शिक्षण शाळेंतील खोल्यांतून दिलें जातें, तर स्काउटिंगमधील शिक्षण उघड्या हवेंत, मोकळ्या मैदानावर, दाट जंगलांत, तळ्याच्या कांठीं अगर टेंकडीच्या माथ्यावर दिलें जातें. परमेश्वरनिर्मित सृष्टी हीच स्काउटची शाळा. तींत कृत्रिमतेस थारा नाहीं. शाळेंमधील शिक्षण पुस्तकावरून दिलें जातें. त्यांत प्रत्यक्ष व्यवहाराचा भाग आलाच तर तो फार थोडा. त्याच्या उलट स्काउटिंगला पाट्या, पेन्सिली, वह्या, पुस्तकें इत्यादि वस्तूंची गरज कधींहि लागत नाहीं व व्यवहारांत उपयोगी पडणार नाहीं अशी एकहि

गोष्ट बाल्वीराला शिकविण्यांत येत नाहीं. शाळेंमधील शिक्षणानें मुलांचा मेंदू तरतरीत होतो, स्मरणशक्ति वाढते; तर स्काउटिंगनें अंतःकरणांतील सद्भावना प्रबळ होतात. चांगल्या संवयींनीं व चांगल्या विचारांनीं मुलांचें शील बनतें. शरीर स्वच्छ निरोगी व सुदृढ कसें ठेवावें याचें ज्ञान त्यांना प्राप्त होतें. पुस्तकी शिक्षण व शील या उभयतांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. मोठमोठ्या परीक्षा देऊन विद्वान् म्हणून गाजणारे अनेक तीव्र बुद्धीचे लोकहि दुष्ट, लबाड व नीच वृत्तीचे असलेले आढळतात. उलटपक्षीं लिहितां आणि वाचतां न येणारा खेडवळ शेतकरीहि प्रामाणिक, दयाळू, उदार बुद्धीचा, थोर मनाचा असलेला आपण पाहातो. Head, Heart आणि Hand मेंदू, अंतः-करण व हात असे तीन घेतले तर पहिला शाळेकडे जातो, दुसरे दोन स्काउ-टिंगकडे येतात. शाळेंतील शिक्षण हें मुलास डोक्यावर लादलेल्या ओझ्या-प्रमाणें वाटतें. मुलें शिक्षकांच्या छडीकडे पाहून परीक्षांच्या धाकानें आप-आपले धडे तयार करितात व कष्टाखेरीज ही विद्या त्यास प्राप्त होत नाहीं. 'सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम्' या सुभाषिताचा अर्थ झाला तरी असाच आहे. सुख व विद्या या गोष्टी परस्परविरोधी असून त्यांची कायमची फारकत करण्यांत आली आहे. स्काउटिंगमधील विद्येस मात्र हा नियम लागूं नाहीं. लहानलहान सहली, मोठेमोठे प्रवास, निर-निराळे खेळ, गमती इत्यादिकांच्या द्वारें स्काउटिंगमधील विद्या साध्य होते. आगगाडींत सेकंड क्लास अथवा फर्स्ट क्लासच्या डब्यांत रात्रीचे वेळीं गाढ झोंपीं गेलों असतां ज्याप्रमाणें आपणांस प्रगतीची यत्किंचितहि वार्ता नसते तशीच गोष्ट स्काउटिंगमधील विद्येची आहे. सकाळीं उठल्यावर स्टेशन आल्याचें ज्याप्रमाणें प्रवाशाला कळते त्याप्रमाणें अमकी कला आज आपणांस आली व अमकी अमकी गोष्ट नवीन साध्य झाली, त्यांचा बोध आपणांस फार उशीरा होतो. मौज, गंमत, करमणूक, खेळ, आनंद यांखेरीज स्काउटिंगमधें दुसरी बोली नाहीं. शाळा मोठी असली, वर्गांत मुलांची संख्या जास्त असली, निरनिराळ्या विषयांस नवीन नवीन शिक्षक असले म्हणजे शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा परिचय फारसा दृढ होणें शक्य नसते. बांकावर बसून ऐकण्यापलीकडे व विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यापलीकडे मुलांचें

दुसरे कांहीं काम नसल्यामुळें निरनिराळ्या मुलांचे स्वभाव काय आहेत, त्यांच्या संवयी कशा आहेत, त्यांच्यांत कोणते गुणदोष आहेत, इत्यादि बारीक सारीक माहिती प्रत्येक शिक्षकास असणें संभवनीय नाहीं. जी गोष्ट मुलांच्या व शिक्षकांच्या ओळखीची तीच गोष्ट मुलामुलांमधीच परस्पर ओळखीची. बालवीरांच्या कॅंपमध्यें स्काउट मास्तर व त्याचीं मुलें यांचा संबंध प्रत्येक क्षणाला येत असल्यामुळें त्याला प्रत्येक मुलाची खडान् खडा माहिती असते. कॅंपमध्यें मुलांना एकमेकांचे स्वभाव जसे कळतात, तसें ते इतर फार थोड्या प्रसंगीं कळून येत असतील. खरा कोण, खोटा कोण, उदार कोण, स्वार्थी कोण आणि चुकार कोण याची निवड त्या ठिकाणीं अगदीं बरोबर होतें. स्काउटिंगमध्यें वननिवासावर भर आहे तोहि याच दृष्टीनें हें उघड आहे.

राष्ट्राचा भाग्योदय परमेश्वरानें देशांतील लोकांच्या संख्येवर न ठेवतां त्यांच्या गुणसमुच्चयांवर ठेवला आहे. नाहींतर ३३ कोट लोकसंख्या काय थोडी आहे ? यापैकीं जातीचे स्काउट किती आहेत हा मुद्याचा प्रश्न आहे. ज्याच्या जगण्यापासून देशाचा कोणताच फायदा नाहीं, तो असून नसून सारखाच. कुपुत्राच्यायोगें ज्याप्रमाणें जननीला प्रसववेदना होऊन जीव क्षीण मात्र होतो त्याचप्रमाणें असल्या लोकापासून प्रायः देशाला व्यर्थ भार तेवढा होतो. देशांत कुत्रीमांजरें काय थोडी जन्मास येतात ! माझा देश केवढा व त्याच्या उन्नतीसाठीं मी प्रयत्न तो काय करणार ! असला दुबळेपणाचा निराशावाद बालवीराच्या मनास कधींहि शिवत नाहीं. संसाराचे डोंगरावर डोंगर कोसळले असतां स्थितप्रज्ञाप्रमाणें स्थिर तो रहातो. देशासाठीं कांहींना कांहींतरी करण्यासाठीं मी आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीन, अशा प्रकारची दीक्षाविधीच्या वेळची बालवीराची पहिली प्रतिज्ञा असते, व मरेपर्यंत तो या आपल्या प्रतिज्ञेस जागतो. स्काऊट हा कांहीं आजकालचा नवा धर्म नाहीं. अनादिकालापासून ह्या नाहीं त्या स्वरूपांत आजपर्यंत तो चालत आलेला आहे. अनेक आदर्शभूत स्काऊट आपल्या इतिहासांत आजपर्यंत होऊन गेले, व आजमितीपर्यंत हा ओघ असाच अखंड चालू आहे. भारतभूमी ही पुण्यभूमि आहे. परमेश्वराचा तिजवर वरदहस्त आहे. सर्वांच्या

प्रयत्नावर तिचा भाग्योदय अवलंबून आहे. सांप्रत जरा मंद चाललेल्या या गाड्यास स्काउटिंगच्या चळवळीमुळें चांगली चालना मिळेल. राष्ट्रांमधील प्रत्येक विद्यार्थी स्काऊट झाला पाहिजे. अंतःकरणामधील भावना अत्यंत उत्कट आणि प्रबळ करण्यास शिकविणारी स्काउटिंगही शाळा आहे. नेभळ्या, कर्तृत्वशून्य आणि बावळट मुलांना हुशार, कर्तृत्ववान् व धीट करणारी स्काउटिंगची संस्था आहे. राष्ट्रसेवेचा संकल्प करणारी बालवीरांची हजारों पथकें सर्व देशभर ज्या दिवशीं चमकूं लागतील तोच आमचा खरा भाग्याचा दिवस ! स्काउटिंगचें स्वारसर्वस्व ज्या मंत्रांत आहे, अशा उपनिषदांतील एका मंत्रानें या विषयाची पूर्तता होणार आहे.

---

# युरोपांतील कांहीं मौजा

## लेखकः दिनकर दत्तात्रय क्षीरसागर, एफ्. डी.

[ जन्म १९०५ सालीं सातारा जिल्ह्यांतील नेलें गांवीं. मॅट्रिक भोर हायस्कूलमधून. नंतर बारामती व बेलापूर येथील साखरेच्या कारखान्यांत एक वर्षभर केमिस्टचें काम केलें. पुढें कानपूर येथील सरकारी औद्योगिक शाळेंतील दोन वर्षांचा रंगछपाईचा कोर्स पुरा केला. तेथें असतांनाच कृत्रिम रेशमावर प्रयोग चालू केलें व पुढें बनारस हिंदु युनिव्हर्सिटींत एक वर्षभर संशोधन करून ते प्रयोग यशस्वी केले. तदनंतर दहा महिने धुळें व अंमळनेर येथील प्रतापमिलसमध्यें रंगविभागांत काम करून १९२९ च्या मे महिन्यांत रंगकाम व कृत्रिम रेशिम शिकण्यास जर्मनीस प्रयाण केले. तीन वर्षांत जर्मनी, झेकोस्लोवाकिया, स्वीडन व हंगेरी वगैरे देशांतून निरनिराळ्या आठनऊ कारखान्यांत काम केलें. क्रेफेल्ड येथील वेबेशूले नांवाच्या औद्योगिक शाळेंतील कोर्सहि पुरा केला. आतां युरोपखंड पाहून येत्या ऑगस्टमध्यें स्वदेशीं परत येणार आहेत. ]

बुडापेस्ट, ( हंगेरी. )

प्रिय मित्रास—सा. न. वि. वि. तुझें साहित्य-तोरणाचें विनंतिपत्रक व खाजगी पत्र वाचून फार आनंद झाला. 'कांहींतरी' लेख लिहिण्याची जबाबदारी मजवर टाकली नसतीस तर तो आनंद निर्भेळ राहिला असता. युरोपच्या

प्रवासाचीं व शहराचीं वर्णनें पुष्कळांनीं लिहिलीं आहेत. व त्यास वेळहि बराच लागतो. म्हणजे मी वडा माणूस आहे असें मात्र समजूं नकोस. पण, नारायण ! खरोखरच काम इतकें असतें कीं, त्यांतून वर डोकें काढून घरीं पत्र लिहिण्यासहि सवड सांपडत नाहीं. पण आपल्या मंडळींनीं काढलेली ही योजना अगदीं अपूर्व असल्यामुळें तिचा फायदा करून घेतल्याशिवाय राहवत नाहीं. आपल्या संस्थाननें मारलेली ही अघाडी इतरांस उदाहरण म्हणून पुढें ठेवण्यासारखी असें मला वाटतें. तेव्हां एक लहानसें गप्पावजा पत्र तुला मीं पाठविण्याचें योजलें आहे. वर्णनांचें भारूड न लिहितां हिंदुस्थान सोडल्यापासून जे उद्बोधक, मजेदार व लक्षांत ठेवण्यासारखे प्रसंग घडले त्यांपैकीं कांहींची थोडक्यांत माहिती देणार आहें. म्हणजे खरोखरच तूं लिहिल्याप्रमाणें ‘ कांहींतरी ’ हाच मथळा माझ्या या लिखाणास शोभेल.

**इकडील विवाहसंस्थाः**—इकडील स्त्रीस्वातंत्र्य बंधनाच्या पलीकडे गेलें आहे. त्याचें विकृत रूप पाहून, ‘ देवा, नको हें स्त्रीस्वातंत्र्य ! ’ असें म्हणण्याची पाळी येथील स्त्रियांवरच आली आहे. कुटुंबपद्धतीचे धिंडवडे निघाले असून शहरांतून ‘ घर ’ हें पवित्र स्थान पहाण्यास मिळण्याची मुष्कील झाली आहे. नवरा कामावर जातो, बायकोहि ऑफिसांत जाते; दोघेहि निरनिराळ्या खानावळींत जेवतात व रात्रीं क्लबांत जातात. किती दिवसांत दोघांच्या गांठी पडत नाहींत. मग कसलीं मुलें आणि कसलीं बाळें ! सर्व धंद्यांत बायकांची संख्या पुरुषांच्या बरोबरीनें आहे व कारकुनीपेशांत आणि दुकानदारी करण्यांत बहुतेक सर्व बायकाच आहेत. औद्योगिक शाळांतहि मुलींचाच नंबर जास्त आहे. मी जेव्हां पहिल्यानेंच क्रेफेल्डच्या रंगशाळेंत ( Dyeing School ) गेलों तेव्हां मला पाहण्याकरितां सर्व विद्यार्थी बाहेर आले व मला त्यांनीं गराडा दिला. त्यांत मुलीच जास्त होत्या. त्यांच्या प्रश्नांच्या भडिमाराला कसेंबसें तोंड देऊन कांहींतरी सबबीवर तेथून सुटका करून घेतली. आमच्या वर्गांतील एक पंधरा वर्षांची मैत्रीण मेच्या सुट्टीमध्यें सायकलवरून १३०० किलोमिटरचा प्रवास करून आली; जर्मनी, फ्रान्स, स्वित्झरलंड वगैरे देश तिनें पाहिले. प्रवासांतील साहसाची हकीकत तिनें मोठ्या बहारीनें वर्णन करून मला सांगितली.

येथील विवाहसंस्थेचाहि सर्व विचका झाला आहे. लग्नाचा बाजार होऊन त्याचा सौदाहि केला जातो. शेंकडा ४० लोक अविवाहित आहेत. कारण त्यांना बायकांचे लाड पुरवणें निभावत नाहीं. अविवाहित मुलींची संख्या याहीपेक्षां जास्त आढळेल. सक्तीनें ब्रह्मचर्य पाळणाऱ्या या स्त्री-पुरुषांचीं मुलें अनाथालयांत भरलेलीं असतात. आमच्या गप्पांवरून मला असें कळलें आहे कीं, मुलींना मनांतून लवकर लग्न करण्यास पाहिजे असतें. पण समाजनीतीच अशी विलक्षण आहे कीं, बहुतेकींना आजन्म ब्रह्मचारीच ( ? ) राहण्याची पाळी येते. सांपत्तिक अडचण हीहि लग्नांत एक मोठी धोंड आहे. मी एकदां प्रेग पाहण्यास गेलों असतां माझा मित्र लिओपोल्ड कोइनिंग आपल्या आईबापांना व बहिणीला घेऊन हॉटेलांत मला भेटण्यास आला. त्याचे बहिणीचें नांव फ्राऊलिन ( कुमारी ) रोज; ही वयानें १५।१६ वर्षांची असून प्रेग विश्वविद्यालयांत शिकत होती. विशेष म्हणजे ती दिसण्यांत एकाद्या हिंदु मुलीप्रमाणें शांत, गंभीर व गरीब दिसे. हिंदु संस्कृतीबद्दल तिला अभिमान वाटे. आमचें तासभर बोलणें झालें. यावरून वाचकांची बरीच करमणूक होईल.

मी:--फ्राऊलिन रोज ! तुम्ही हुबेहुब एकाद्या हिंदु मुलीप्रमाणें दिसतां.

रोजः--आमच्या दृष्टीनें हिंदु मुली जरी शिक्षणांत मागसलेल्या असल्या तरी माझ्या माहितीवरून चारित्र्य व खरें संसारसुख त्यांनाच लाभतें. आम्ही कितीहि शिकलों तरी अंतःकरणांत समाधान म्हणून मिळत नाहीं. आणि राष्ट्रानें जर काळजी घेतली नसती तर मुलांचे हाल कुत्र्यानें खाल्लें नसते.

मी:--तुम्ही जर एकपतिव्रत स्वीकारलें तर तुम्हांसहि तसें सुख दुर्मिळ होणार नाहीं.

रोजः--नाहीं ! नाहीं ! आम्हांस तसें राहतां येत नाहीं. कारण पुरुषच फार संशयखोर वृत्तीचे असतात. एक तर मुलींना लग्न करावयाचें म्हटलें कीं स्वतः पैसा त्याकरितां सांठवून ठेवावा लागतो. तो आईबापांकडून ( बापाकडे वांकडया नजरेनें पाहात ) कचितच मिळतो. आणि संसारास पुरेल इतका पैसा जमल्याशिवाय कोणत्याहि पुरुषाशीं लग्नाचा करार करतां येत नाहीं. पैशाची ऊब जवळ असली म्हणजे तो संपेपर्यंत तरी निदान एकत्र

राहतां येते. पुन: पैशाची माया जमविण्यास दूर गेलें कीं, एकमेकांविषयीं संशयास सुरुवात होते; क्षुल्लक कारणावरून काडीमोड होते, किंवा प्रत्यक्ष लग्न झालें नसल्यास नियोजित नवरा दुसऱ्या मुलींच्या मागें लागतो. अशा स्थितींत एकच नवरा पत्करणें कसें शक्य आहे ?

**मीः**--एकंदरींत लग्न म्हणजे कांहीं दिवस नवराबायको एकत्र राहण्याच्या भागीदारीचा करारच म्हणावयाचा ?

**रोजः**--होय ! जवळ जवळ तसेंच !

**बापः**—खरें म्हटलें तर हा सर्व त्रास गेल्या वीस वर्षांपासून जास्त भासूं लागला आहे. आमच्या तरुणपणीं असें मुळींच नव्हतें. काडीमोडीचा नुसता कायदा असे; पण त्याचा उपयोग क्वचितच करीत. लढाईनंतर आर्थिक परिस्थिति इतकी खालावली कीं, त्यामुळें कुटुंबांवर फार दुर्धर प्रसंग आले आहेत. तरुणपणीं लग्नाची जरूरी भासत नाहीं व तें परवडतहि नाहीं. म्हणून नैतिक बंधनें फार शिथिल झालीं आहेत. परंतु चाळीस-पन्नास वर्षे वय झाल्यावर उतार वयांत आपल्या प्रकृतीची काळजी घेण्यास कोणीतरी घरचें असावें असें स्त्रीस व पुरुषासहि वाटूं लागतें. अगोदर पुष्कळ जुजबीं लग्नें झालीं असलीं तरी या वेळचा खरा टिकाऊ विवाह असतो. कारण भर ज्वानी निघून गेली असल्यामुळें दोघांचेंहि वांकडें पाऊल सहसा पडत नाहीं व संसारास स्थिरता येते. क्वचित् पडलेंच तर त्याकडे दुर्लक्ष केलें जातें.

**आईः**—पण या बाबतींत बायकांनाच नमतें घ्यावें लागतें. कारण एकतर बायकांची संख्या जास्त आहे; व एकदां बयस्क झाल्यावर व गालांवर सुरकुत्या पडल्यावर एका पुरुषास टाकून दुसरा मिळविणें कठीण जातें.

नंतर मी त्यांना आपलेकडील विवाहपद्धति व एकत्रित कुटुंबव्यवस्था समजावून सांगितली. ती ऐकून रोज तर आनंदानें नाचूं लागली व तिला समाधान वाटलें. 'असल्या देशांतील बायका कितीतरी सुखी असल्या पाहिजेत ! मला त्यांचा हेवा वाटतो ' असे सहजोद्गार तिनें काढले.

* * * *

**कष्टाची थोरवी:**—कोणतेंहि व कितीहि घाणेरडें काम स्वतःकरितां अगर

पाहुण्याकरितां करण्यास मोठमोठे लोकहि कमीपणा मानीत नाहींत. अंतः-करणाच्या मोठेपणासच येथें मान आहे. आमच्या बोटीवरच्या हेड लायब्ररि-यनचें काम पुस्तकें देणेंघेणें, कागद व स्टॅंप पुरवणें हें असें. पण हाच गंभीर दिसणारा बडा 'ऑफिसर' फावल्या वेळीं हातांत केरसुणी घेऊन कपाटें व पुस्तकें झाडीत सुटतो व लोकांनीं तेथें टाकून दिलेले दारूचे उष्टे पेले विसळून परत नेऊन ठेवतो. बोटींतून टूलोनवर उतरलों. तेव्हां लगेच एक स्त्री-टॅक्सी वाली पुढें येऊन तिनें आमचे सामान भराभर आपल्या मोटारींत भरलें व आम्हांस एका चांगल्या हॉटेलांत नेऊन सोडलें. हा धंदा करून ही बाई पॅरीस युनिव्हर्सिटींत शिकत असते व आपल्या दोन मुलांचाहि शिक्ष-णाचा खर्च चालवते; आणि ती उच्च कुलांतील आहे! फ्रॅंकफर्टच्या शाळेंत असतांना मी तेथील हेड पोस्टमनच्या घरीं भाडोत्री पाहुणा (Paying guest) म्हणून राहिलों होतों. तो घरचा श्रीमंत व सुखवस्तु होता. तरी त्याची बायको अगर मुलगी रोज माझे खोलींत केर काढणें, कपडे ब्रश करणें, विसकटलेलें सामान लावून ठेवणें, अंथरूण घालणें, भांडीं घासणें, इतकेंच नव्हें तर बूट पॉलिश करणें व मलमूत्राचीं भांडीं साफ करणें वगैरे कामें नित्य-नियमानें करीत असे. झीकोस्लोव्हाकियांत एका प्रोफेसराच्या घरीं राहिलों होतों. त्यांची पत्नीहि हीं कामें करीत असे; शिवाय स्वतः प्रोफेसरसाहेब पहाटें उठून सर्वांना उठवीत व खोलींतील शेगड्या पेटवून तोंड धुण्यास ऊन पाणी तापवून देत; नंतर काफी व न्याहारी आणून देत, इतकें करूनहि साहेब मजकूर वेळेवर कॉलेजांत जात. मी, प्रोफेसरीणबाईला शंकरपाळी, करंज्या, लाडू, कांदेभात व भाजा वगैरे करून दाखविल्या. त्या सर्वांना फारच आवडल्या. विशेषतः इंडियन बिस्कीट म्हणून खुसखुशीत शंकरपाळी त्यांना फार पसंत पडलीं. सर्वांचे 'फॉर्म्युले' बाईंनीं उतरून घेतले. मी त्यांच्या घरांतील एक माणूस झालों होतों.

**ही पहा सुधारणा!**—बाह्यांगसुंदर सुधारणेच्या नांवाखालीं समाजाला आंतून कशी कीड लागत चालली आहे याची कल्पना तुला येथील विवाह-संस्थेवरून झालीच आहे. मोठमोठ्या गांवांत रस्त्यानें बेकार व गरीब मुली बऱ्याच दिसतात. टूलोनला एक मुलगी फुलें विकण्याचें निमित्त करून

आमचे पाठीस लागली. तिनें आमचा पिच्छाच पुरवला. 'कालपासून कांहीं खाल्लें नाहीं.' म्हणून गयावया करूं लागली; शेंवटीं एक फूल विकत घेऊन तिची ब्याद टाळली. तूं तिला भिकारी म्हटलेंस तर तुझ्यावर खटला होईल. कारण भीक मागावयाची नाहीं असा येथें कायदा (?) आहे. नेपल्सच्या म्युझियममध्यें ख्रिस्ताचे पुतळे दिसले, त्यांना फुलें वाहिलीं होतीं व तेथें समयाहि लावल्या होत्या. इंपोल शहरांत व कांहीं देशांतहि अशा मूर्ती आढळल्या. आणि पाश्चात्य लोक मूर्तीपूजक नाहींत! इंपोल येथें रोमन कॅथॉलिक, ग्रीक कॅथॉलिक, प्रोटेस्टंट व ज्यू असे चार धर्मपंथ आहेत. त्यांच्यांत निवडणुकीच्या वेळीं रानटी लोकांना लाजवतील अशा भयंकर मारामाऱ्या होतात. आणि आमच्यांत जातिभेद नाहींत असें ते अभिमानानें सांगतात! पॅरिस येथें कापड खरेदी करण्यास एका दुकानांत गेलों. अवघ्या पांच मिनिटांत शेंदीडशें गठ्ठे मला दाखविले गेले; व पसंत केलेलें कापड लगेच दुसरीकडून बांधूनहि आलें. पायरीवर नुसते उभे राहिलें कीं, ती पायरीच आपोआप आपणांस दुसऱ्या मजल्यावर घेऊन जाते. विजेच्या केरसुणीनें दुकानांतील केर आपोआप काढला जाऊन पोत्यांतहि तो आपोआप भरला जात होता. मला वाटतें, कांहीं दिवसांनीं 'आपोआप'ची ही सुधारणा इतकी वाढेल कीं, सबंध दुकानांत एकाहि जिवंत माणसाची गरज लागणार नाहीं. सर्व कामें आपोआप (Auto-man) नांवाच्या विजेच्या माणसाकडून केलीं जातील. पण त्याबरोबरच बेकारीहि आपोआप वाढेल अशी भीति वाटते; आणि बेकारीवर उपाय धुंडून काढण्यास कमिशनें बसत आहेत.

**पाश्चात्यांचा आशावादः**—युरोपियन लोकांचे अंगीं शिकण्यासारखे असे पुष्कळ गुण आहेत. कसल्याहि संकटांत असले तरी आबालवृद्धांनीं हंसतमुख, आनंदी व आशावादी असावें हा जर्मनीचा विशेष गुण आहे. बोटीवर एक ७८ वर्षांचा जर्मन म्हातारा रोज पहांटे व्यायाम करतांना दिसे. मी त्यास एक दिवस विचारलें, 'कां हो आजोबा, या वयांत ईश्वरभजन करून कांहीं पारमार्थिक हित साधावयाचें टाकून तुम्ही हें आयुष्य वाढविण्याचे प्रयत्न कां चालवलेत?' यावर तो शांत चित्तानें हंसत म्हणाला, "हाच तर पूर्व व पश्चिम यांतील मोठा फरक आहे. व याचकरितां तुम्हांस

आम्ही मागसलेले समजतों. आम्हांस मरेपर्यंत आशा व शक्ति असते. यापुढें घरीं जाऊन मी पहिलेंच लग्न करणार आहें व सांठवलेल्या संपत्तीचा उपभोग घेणार आहें!" मी एकादे वेळेस जरा विचार करीत बसलों कीं, माझे मित्र मला म्हातारा राजकारणी म्हणून चिडवतात. म्हातारीं माणसें लहान मुलांत मिसळून हंसतखिदळत असतात. मग मीहि आपला खोटा मोठेपणा व फाजील मर्यादा सोडून त्यांच्यापैकींच एक झालों.

**माझी लोकप्रियता**:—माझ्या चार गोष्टी येथील लोकांना फार आवडतात. ( १ ) काळा रंग, ( २ ) काळे केस, ( ३ ) पांढरे शुभ्र दांत व ( ४ ) सरळ वागणूक. माझ्या काळ्या रंगाबद्दल त्यांना फार हेवा वाटतो. काळी कातडी ही आरोग्याची व दणकटपणाची खूण समजली जाते. त्याकरितां एथील लोक उन्हांत वाळवंटावर तासचे तास उघडे पडून राहतात. काळेभोर लकलकीत व कुरळे केस म्हणजे सौंदर्याची सीमा समजली जाते. आजपर्यंत शेंदीडशें मुलींनीं माझे डोक्यावरची बट कातरून घेतली. 'कृपाकरून एक तरी केस डोक्यावर शिल्लक ठेवा, असें शेवटीं स्वीडनमधील मुलींना सांगावें लागलें. त्या केस कुरळे करण्याकरितां बांकड्या नळींत घालून रात्रभर ठेवितात. मी यावर काय उपाय करतों, म्हणून मला विचारलें असतां, 'निगा न करी कुंतलांची' हा माझा रामबाण उपाय मी त्यांना सांगे. मी बोटीवर असतांना पहिल्या दोनतीन दिवसांतच जवळ जवळ ५० लोकांनीं माझ्या दांतांबद्दल प्रशंसोद्गार काढले. How beautiful, simply pearl like ! ( किती सुंदर, जणुं मोतींच! ) असें म्हणत. केसांप्रमाणें दांत उपटून मागीत नसत, हें उपकारच म्हणायचे ! युरोपियनांचे दांत पिवळे व मळकट असतात. दांतांची काळजी तुम्ही कशी घेतां, म्हणून पुष्कळांनीं मला विचारलें. मांस कमी खा व साधी राखुंडी वापरा, असें मीं त्यांना सांगितलें. लगेच या साध्या गोंवऱ्यापासून राखुंडी कशी करावी याची साद्यंत कृति उतरून घेतली; शेणीचें नांव काढतांच कित्येकांनीं नाकें मुरडलीं; इतक्यांत एक अमेरिकन डॉक्टर पुढें सरसावून म्हणाला कीं, सहाव्या इंटर नॅशनल डेंटिस्टच्या परिषदेंत एकानें असें सिद्ध करून दाखविलें कीं, रानशेणीच्या राखुंडीची बरोबरी करणारी दुसरी टुथपावडर नाहीं. मीहि उसळून म्हणालों

कीं, ' यांत नवीन शोध कांहीं नाहीं, आमच्या वैद्यकशास्त्रांत हजारों वर्षां-पूर्वींपासून ही गोष्ट नमूद करून ठेविली आहे व आजतागायत ती आचर-णांतहि आहे. म्हणूनच आमचे दांत पांढरे शुभ्र व बळकट असतात.' आतां माझी सरळ वागणूक म्हणजे काय? तर मी सरळपणानें राहतों, खोटें बोलत नाहीं, दारू व सिगारेट उपयोजीत नाहीं, कोणास फसवीत नाहीं, मुलींच्या भानगडींत पडत नाहीं, रागावत नाहीं, सर्वांशीं प्रेमानें वागतों वगैरे. इतके माझ्यावर आरोप आहेत Sio snd braf· (तुम्ही फार साधुवृत्तीचे आहांत) असें मला येथील लोक म्हणतात. नारायण! एक काम करशील काय? पांच तोळे तुसडेपणा कोठून तरी मिळवून एयर-मेलनें पाठवून दे; म्हणजे प्रत्येक वेळीं निरोप घेतांना अंतःकरण भरून येऊन रडारडी तरी होणार नाहीं. मी रस्त्यानें चाललों कीं, कांहीं लोक एक चमत्कारिक प्राणी समजून मजकडे आश्चर्यानें पहातात व मोठ्यानें हंसतात. पण त्यानें चिडून न जातां त्यांच्यापुढें जाऊन टोपी काढून गुटेन्-मार्गेन् (गुडमॉर्निंग) करतों व गोड शब्दांत हिंदु संस्कृतीचें अहिंसेचें तत्व सांगतों, तें त्यांना पटतें. या हंसणाऱ्यांपैकीं बरेचजण माझे जानी दोस्त बनले आहेत. भोरमध्यें मी उनाड व दणकट मानला जात असें. येथें माझें वजन १५ पौंडांनीं वाढलें आहे; तरी माझ्याइतका अशक्त मुलगा मी येथें एकहि पाहिला नाहीं. समुद्रस्नान करतांना अंगांतलें काढ-ण्याची लाज वाटते. इकडील मुलामुलींचीं शरीरें पिळदार व बांधेसूद असतात.

उपसंहार:—एकंदरींत आपण चांगलें वागलें म्हणजे इकडले लोकहि आपणांशीं प्रेमानें वागतात. कित्येक म्हाताऱ्या जोडप्यांनीं तर स्वतःच्या मुलांपेक्षांहि मजवर जास्त प्रेम केलें. गोरा म्हटला कीं, आपली जी एक कल्पना झालेली असते ती साफ चुकीची आहे, असें मीं अनुभवावरून सांगतों. आतां फक्त इंग्लंड पहावयाचें राहिलें आहे; पण तेथेंहि असाच अनुभव येईल अशी मला आशा आहे. हिंदी लोकांचा रंग, केस, दांत, वागणूक व संस्कृति पुष्कळांना पसंत आहे. मग ' हिंदु होणें आम्हांस आवडतें, असेंच कां नाहीं थोडक्यांत म्हणत?' असें मी एका हंगेरियन मुलास विचारलें असतां तो म्हणाला, " हो! तसेंच, पण हिंदु उणें दारिद्य!"

* * * * *

मला आतां या कृत्रिम सुधारणेच्या तुरुंगवासाचा अगदीं कंटाळा आला आहे. हिंदुस्थानांत येऊन केवळ सदराधोतरानिशीं केव्हां एकदां स्वतंत्रपणानें भरारी मारीन असें मला झालें आहे !

---

## विडंबन काव्य

लेखक: दिनकर विनायक देव, पुणें.

[ हे भोरचे रहिवासी होत. त्यांचा जन्म १९०३ मध्यें झाला. ते भोर हायस्कुलांतून प्रवेश परीक्षा पास झाले. त्यांच्या कविता ' महाराष्ट्र-शारदा ' व ' कुंदाच्या कळ्या ' या पुस्तकांतून आल्या आहेत. ते सध्यां पुण्यास राहतात. ]

धवलमेघ अंबरीं धांवती
हास्याचें संभार वाहती
धरेवरी बालके नाचती
हास्य तयाचें उडे संप्रति

—कोणी एक

प्रमिला नांवाची एक सुंदर मुलगी होती. ती नेहमीं आपले खांदे उडवीत चाले; तसेंच चालतांना व बोलतांना ती हनुवटी इतकी पुढें ढकलून मान वेळीत असे कीं, तें पाहणारास तिरस्कार वाटावा. ही चमत्कारिक खोड जावी म्हणून आई वारंवार म्हणे ' प्रमे, तूं लहान कां आहेस ? अशा माना करणं, खांदे उडविणं वाईट दिसतं बाळे ! ' परंतु तिची खोड कांहीं केल्या जाईना. शेवटीं तिच्या पित्यानें एक युक्ति केली. त्यानें बाजारांतून चिनीजपानी हालतीं बाळें व चित्रें खरेदी करून प्रमिला ज्या ठिकाणीं रोज अभ्यासास बसे त्या ठिकाणीं ती समोर लावून ठेविलीं. त्यांतील कांहीं माना वेळीत, कांहीं सारखी तोंडेंच पुढें करीत व कांहीं बाहुटे उडवीत. अभ्यासापेक्षां चित्रांच्या हालचालीकडे वारंवार तिचें लक्ष गेल्यामुळें प्रमिला मनांत खजील होऊन लवकरच सुधारली.

कवितेचें विडंबन म्हणजे तरी दुसरें काय ? हें विडंबन म्हणजे कवितेचें केवळ हास्यकारक पण मार्मिक दोषानुकरण होय. ही एक विनोदगर्भ व्यंग-

दर्शी कला आहे. ही कला उत्तमांचे विशेष, मध्यमांचे सामान्यत्व व अधमांचे दोष आपल्या प्रखर दृष्टीनें रसिकांपुढें मांडून विनोद व उपहास यांच्या सहाय्यानें त्यांचा आविष्कार करते, बुद्धिमान् लेखकांच्या व भावनाकुशल कवींच्या कृति धुंडाळून त्यांच्या दोषांचें प्रहसन मोठ्या उल्लसित वृत्तीनें करून दाखविते. मग मोठे प्रतिभावान् कवि देखील आपल्या दोषांचें कवित्व कसें बनलें म्हणून विस्मित होत्साते आपणच तें कौतुकानें वाचूं लागतात. लोकांनाहि पल्लेदार टीकालेखांपेक्षां अणिदार विडंबना आवडूं लागते. तेव्हां समाजांतील परंपरेचे दोष, निष्क्रीयता, नेभळटपणा, मानसिक दास्य वगैरेंचा उच्छेद करण्यासाठीं हें विडंबनाचें उपहासशस्त्र मोठें अमोघ नाहीं असें कोण म्हणेल? हें शस्त्र अहंमान्यास नमवील, हट्टी व धर्मवेड्यास शांती देईल व नालायक माणसास पुढें येण्यास सक्त मनाई करील.

संस्कृत वाङ्मयांत किंवा जुन्या मराठी वाङ्मयांत या काव्यप्रकारास मुळींच स्थान नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं. इंग्लिश वाङ्मयांत मात्र यांस बरेंच महत्त्वाचें स्थान आहे. तेथून हा काव्यप्रकार प्रथम वंग वाङ्मयांत उदित होऊन वाढीस लागला व मराठी वाङ्मयांत तर तो अगदीं नव्यानें चमकूं लागला आहे. अगदीं परवापर्यंत विडंबन काव्यें किंवा व्यंग-गीत ( Parody ) म्हणून उदाहरणादाखल दाखविण्यासहि कठीण गेलें असतें. मोगरे, चिपळूणकर, जोशी, चंद्रशेखर, परांजपे वगैरे लेखकांनीं थोडी उपरोधिक रचना केली आहे. पण ती व्यंग-गीतांचे सदरांत घालतां येणार नाहीं असें वाटतें.

" कमीअधिक प्रमाणांत मूळकृतीबरहुकूम जी गद्य वा पद्यरचना केली जाते व तिच्या गंभीर अभिप्रेत अर्थाचा मात्र नवीन रचनापद्धतीनें उपहासात्मक विपर्यास केला जातो " अशा रचनेस विडंबन-काव्य म्हणावें असें जुलै १८९५ च्या क्वार्टरली रेव्ह्यूमध्यें म्हटलें आहे. या व्याख्येवरून जर कोणी मूळच्या लिखाणाचें केवळ अनुकरण करील तर भागणार नाहीं. अनुकरणांत विडंबित कवीचें ठरीव शब्द, ठरीववृत्तें पुनरुच्चारित वाक्प्रदाय व अवतरणें, त्यांचें व्यक्तिविशेष व अर्थशून्य अगडबंब भाषा किंवा त्याची एकादी लकब अशी आली पाहिजे कीं, वाचकाचें लक्ष नेमकें

त्यांकडे वेधावें व व्यक्तीहि ध्यानीं यावी. ही नक्कल अगदीं हुबेहूब व वैय्यर्थक वठली पाहिजे. हुबेहूब म्हणजे शब्दशः नव्हे. पण मूळ कवीचा स्वराघात ( Accentuation ) त्यांत प्रतीत व्हावयास पाहिजे. स्वराघात हा व्यंगगीतांचा केवळ प्राणच असल्यामुळें तदभावीं विडंबन प्रभावी होणार नाहीं. हें अनुकरण कवींच्या साऱ्याच दोषांचें कडबोळें व्हावयास पाहिजे असें मात्र नाहीं. किंबहुना तसें झाल्यास मम्मटाच्या काव्यदोषकारिकेची प्रतिकृतीच तयार होईल. व्यंग एकादेंच, पण तें असें प्रामुख्यानें व खुबीनें पुढें मांडले पाहिजे कीं, वाचकांस विडंबित कवीचा साक्षात्कार व्हावा.

हें झालें कवींच्या काव्यासंबंधीं पण या विडंबन गीतांचे साहाय्यानें फक्त कवींचाच परामर्ष घेतां येतो असें नाहीं. कोणाची राजकीय मतें, तर कोणाचीं सामाजिक मतें, कांहीं दुष्ट चालीरीति तर कांहींचे स्वभावविशेष थोडक्यांत पण नेमके पुढें आणण्यांत ही विडंबनगीतें शस्त्र क्रियेच्या हत्यारांपेक्षां आयुर्वेदिक औषधींप्रमाणें उपयोगीं पडतात. उदाहरण म्हणून केशवकुमारांचा 'अरुण' 'दंवाचे थेंब' 'कषाय-पेय-पात्र पतित माक्षिका' प्रत, इ० पहावी.

आतां पॅरडी ही दोषदर्शक कला नाहीं असें निरंतर यांचें म्हणणें आहे ( ज्योत्स्ना पा. ९३ ) त्याचा थोडक्यांत विचार करूं. पॅरडी ही दोषदर्शी नसते किंवा नसावी असें म्हणणें म्हणजे पॅरडीचा एक पंख उपटून टाकण्यासारखें आहे. या पंखतुट्या पांखरानें कितीहि चिवचिवाट केला तरी लब्धप्रतिष्ठितांची झोंप संपणार नाहीं. हम्बर्ट वूल्फ यांचा पॅरडीच्या उपयुक्ततेसंबंधीं दिलेला अभिप्राय बहोत खुलासेदार आहे; ते म्हणतात :—

The Parody is only satire if it be destructive of what it imitates. Of crimes none is in its ultimate effect more pernicious than fustian in literature. For it debauches man in the church of the Spirit. It is a true object of satire to expose this blasphemy. Parody if overwhelms a hated and hateful original writing performs the same service as that of a successful attack on original sin." उपहासात्मक टीका-प्रकारापैकीं विडंबन हाच एक प्रकार असा आहे कीं, जो अनुकरण—संकेतानें विध्वंसनीय गोष्टी

दर्शवितो. वाङ्मयांत दांभिक अर्थशून्य व अगडबंब भाषा वापरणें या दोषाएवढा दुसरा अधिक विघातक दोष आढळणार नाहीं. कारण अशी भाषा अर्थभावनासंवाही नसल्यामुळें कोणताहि वाङ्मयप्रेमी अगतिक व कुंठितमति बनतो. वाङ्मयाच्या या पवित्र क्षेत्रांतील ही घाण झटकून टाकण्याचा उपहासात्मक टीकेचा खरा उद्देश असतो. विडंबन काव्य देखील योग्य तऱ्हेनें वापरल्यास तेंच कार्य करितें.

ज्या काव्य प्रकारास इंग्रजींत Parody म्हणून म्हणतात त्यासच समानार्थी शब्दविडंबन काव्य असें आम्ही वर म्हटलें आहे. परंतु पॅरडी म्हणजे बिडंबन किंवा उपहास नव्हे ( जोत्स्ना पा. ८७ ) असें श्री. निरंतर यांनीं नुकतेंच जाहीर केलें आहे हें पाहूं.

इंग्लिश वाङमयांत टीकेचे निरनिराळे प्रकार आहेत. उपहासात्मक टीका ( Satire )हा एक महत्त्वाचा भाग आहे. परंतु सदर टीका-प्रकाराचे आणखी सूक्ष्म भेददर्शक Lampoon, Burlesque Allegory, आणि Parody असे चार उपभाग आहेत. लँपूनमध्यें व्यक्तिमत टीका असते. कुटाळकी करण्याचाच फक्त त्यांत हेतू असतो बर्लेस्कमध्यें नुसता हास्यास्पद अनुवाद व मांडणी केलेली आढळेल. त्यास Satire without tears असें म्हटलें आहे. त्यांत रंजनापेक्षां अधिक हेतु नाहीं. अॅलेगरीमध्यें रूपकात्मक रचना असून विरोध व विसंगति यावर त्याची उभारणी केलेली असते. त्यांत दोषाविष्करणाचा व उपहासाचा हेतु प्रामुख्यानें असतो. आतां राहिली पॅरडी. पॅरडीचा सरळ अर्थ Carricature of a poem made by applying its words and ideas with burlesque effect असा आहे शिवाय पॅरडीची मान्य असलेली व्याख्या वर आलीच आहे. तसेंच विडंबन व विटंबना यांतहि फरक दाखविणें जरूर दिसते. विडंबन म्हणजे निरंतर म्हणतात त्याप्रमाणें " विटंबना किंवा वेडावण दाखविणें " नव्हे. उदाहरणार्थ द्रौपदीची विटंबना झाली म्हणजे बिडंबन झालें असें नाहीं. लहान मुलें एकमेकांना वेडावण दाखवितात. तेव्हां त्यांत खिजविण्याचा हेतु असतो व शिवाय विनोदहि संभवतो. विटंबनेंत परिहासविजल्पना तर नसतेच, पण दुसऱ्यास दिलेल्या अपमानास्पद दुःखाची परिसीमा असते.

या विवेचनावरून वरील चतुर्विध काव्यप्रकारांत कितपत उपहास व विडंबन आहे आणि पॅरडीस विडंबन काव्य म्हटल्यास अर्थांतर होईल किंवा कसें याचा खुलासा होईल. पॅरडी आणि विडंबन या दोन्ही शब्दांत मूळ कृतीची रचना, स्वराघात, व्यक्तिविशेष वगैरेंचें अनुकरणासंबंधीं साम्य आहे. म्हणजे दोन्हींचें साधन एक आहे. तसेंच त्यांचें साध्य किंवा परिणाम विनोद व उपहास असे एकच दिसून येतील. मग पॅरडी म्हणजे विडंबन किंवा उपहास नव्हे या म्हणण्यांत काय अर्थ आहे? विडंबन हा शब्द पॅरडी या काव्यप्रकारास त्याचे साधनावरून वापरला असला तरी तो साध्यसूचकहि असल्यामुळें त्यापेक्षां दुसरा योग्य शब्द दिसत नाहीं. श्री. निरंतरांनाहि तो सुचवितां आला नाहीं. Satireच्या उपभेदांत विडंबन व उपहास कमीअधिक प्रमाणांत येतोच कारण हे प्रकार त्याच्या समधर्मी ( Allied Arts ) कला आहेत. परंतु प्रत्येक प्रकाराचाही स्वतंत्र विशेष असल्यामुळें Satire पासून ते वेगळे कसे आहेत हें दाखविलें. पॅरडीचाहि स्वतंत्र विशेष लक्षांत घेऊन विडंबन काव्य ही संज्ञा तीस दिल्यास चूक होणार नाहीं क्वार्टरली रेव्ह्यूयतील पूर्ण व्याख्या देण्यांत निरंतरांनीं कुचराई केली नसती तर ती मधील [ ... but turning the serious sense of such original work into ridicule by its method of treatment ] दिलेल्या खुलाशावरून पॅरडी म्हणजे विडंबन व विडंबनांत उपहास आहे असे दिसून आले असते. तसेंच अर्थर सीमननें संभावनेवर ( Admiration ) जोर दिला म्हणून विडंबनाचा निषेध केला असाहि तर्क करण्यास त्याचें विवेचनावरून जागा दिसत नाहीं.

आतांपर्यंत केलेल्या खुलाशाचें संदर्भानें श्री. केशव कुमारांच्या विडंबन-गीतांकडे पाहिलें तर त्यांचे तूर्त वेगळें समर्थन करावयास पाहिजे असें वाटत नाहीं. त्यांचीं ' झेंडूचीं फुलें बाहेर पडल्यापासून मराठी काव्यलतेस नवीन धुमारे फुटू लागले हा त्यांच्या दोषदर्शी व विनोदी कलेचा प्रभाव नाहीं असें कोण म्हणेल ?

असा विडंबन करणारा कविटीकाकार इतर टीकाकारांपेक्षां मोठा चमत्कारिक वाटतो. ह्यास एकच छंद कीं, तुम्ही ज्या सुरांत बोलाल त्याच सुरांत त्यानें तुमच्यावर कवित्व करावें. वास्तविक तो खरा लोक-शिक्षक असतो, त्याचें

शिक्षणाचें काम मात्र एकाद्या सरकारनें मंजूर केलेल्या शाळेंतील शिक्षकाप्रमाणें ठरीव साच्याचें, रूक्ष व केवळ हमालीचें नसून एकाद्या निस्वार्थी धर्मोपदेशकाप्रमाणें सत्यप्रचारासाठीं, कलावंताप्रमाणें केवळ कलेसाठीं किंवा एकाद्या आषकाप्रमाणें आपल्या प्रियेसाठीं जी तीव्रतम भावना ( Savage attention of extreme love ) जागृत असते त्या भावनेनें केलें जातें. तो गुणग्राही व श्रेष्ठांबद्दल योग्य आदर बाळगणारा असतो. सकृद्दर्शनीं तो मोठा दीर्घद्वेषी व कठोर असावा असें वाटेल; परंतु त्याच्या इतका प्रेमळ व मृदूहि तोच म्हणावा लागेल. तो द्वेषी तर खराच पण तो द्वेष केवळ असत्य व अन्यायासंबंधीं. सत्यापुढें व न्यायापुढें तो सदा नम्र असतो. परंतु असें म्हणणें कित्येकांना पटावयाचेंहि नाहीं. कारण तो कोणाची स्तुति करून आपण मोठे रसिक असल्याबद्दल तोंडपुजेपणा करतांना आढळणार नाहीं. किंबहुना कोणाच्या विसंगत गोष्टी पुढें आण, तर कोणा वावदुकाचा खोटेपणा किंवा चौर्य उघडकीस आण, कोणाचा प्रछन्न दुष्टपणा त्याचें दांभिक स्वरूप विरोधानें व्यक्त करून वेशीवर टांग, तर कोणाची नालायकी पदरांत घाल, त्यानें केलेल्या विडंबनास कोणी मर्कट-चेष्टा म्हटलें तरी विडंबनाचा नवा विषय समजून त्यासहि हंसू लाग. अशा खट्याळ माणसास जर एकाद्या प्रेषिताचें गुण लाविलेले पाहिले तर साहजिकच त्यांना तें कसें पटावें ? आणि त्याचें कारण एकच. तें हें कीं, तो एखाद्या धिम्या पोक्त न्यायाधिशाप्रमाणें गंभीर निकाल जाहीर करीत नसून अन्याय्य बाजूची परा कोटीची निंदा व उपहास करतो. मग जरी या टीकाचूर्णात चवदार विनोदाचे बरोबरीनें मिश्रण असलें आणि त्यांतील सारक व कडवट औषधींची जिभेस जाणीवहि झाली नाहीं. तरी त्याचा खट्याळपणा लोकांच्या डोळ्यांत भरून न्यायप्रियता व हेतु मात्र तात्पुरता तरी त्यांच्या दृष्टीआड होतो.

कधीं कधीं त्याला विदूषकहि म्हणवून घ्यावें लागतें. परंतु थोडा विचार केला तर हा विदूषक प्रेक्षकांचे मनांत कधीं प्रेम, कुतूहल, निष्फळ भीति व कधीं आदरहि निर्माण करतो. सर्कशींत तारेवरील काम चालूं असतां तो खालीं संरक्षकाचें काम करीत राहील. नंतर आपणच तारेवर चढून मूळ काम करून दाखविण्याचें अवडंबर करील, पडतो असें दाखवील, परंतु तें सर्व

करतांना खरें काम यास येत असलें पाहिजे किंवा निदान त्यास त्याचा दृढ परिचय तरी असला पाहिजे असें सूक्ष्म पाहणारास दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. सिंहाचे जबड्यापुढें सर्कसवाला उभा असतां त्याचे जवळच उसन्या भीतीनें विदूषक हजर असतोच. तेव्हां या विडंबनकारास विदूषक म्हणवून घ्यावें लागलें तरी तो एखाद्या जातिवंत खेळाडूप्रमाणें धिम्मा व हंसतमुखच दिसून येईल.

विडंबनकाराचा मिस्किलपणा मान्य केला तरी त्याचेवरील जबाबदारी कांहीं कमी होत नाहीं. सुधारक मिशा काढतात म्हणून कोणी मिशा काढूं लागला किंवा इंग्लिश ' टॉकी 'मध्यें क्लबमधील 'कोरस' ऐकून देशी टोन कंपन्यांनीं उद्यां आरत्या व ' देवे ' सुरू केले तर तें जसें हास्यास्पद होईल तसें काव्य-सुधारकानें उपहास-कुठार घ्यावें असें म्हटल्याबरोबर वाटेल त्यानें उठून राणीचा बाग खच्ची करावा असें मात्र नाहीं. या सुधारकानें आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. आपण किती नाजूक गोष्टीस हात घालतों आहों हें समजून घेतलें पाहिजे. अस्पृश्यतानिवारणाच्या सुधारकी भावनेनें ग्राम्यता व अश्लीलता यांना हातीं धरून काव्यदेवतेच्या मंदिरांत प्रवेश करून देण्याचें महत्कार्य त्यानें करूं नये. सात्त्विक व पवित्र भावनांचा उपहास व व्यक्तिगत टीकेस सहसा थारा देऊं नये. कुचेष्टेनें प्रतिष्ठा मिळते तशी व्यक्ति-विषयक टीकेनें तात्पुरती प्रसिद्धि मिळेल हें खरें. परंतु परिणामीं ती दुधारी शस्त्राप्रमाणें ठरून विडंबनकाव्याचे मूळ हेतूस परिपोषक होणार नाहीं. खऱ्या टीकेस अन्यत्र बराच वाव असतो. म्हणून टीकाकारानें नेहमीं वस्तु-टीका करावी. कारण खरें कौशल्य व परीक्षा तेथेंच आहे.

तसेंच विडंबनकारास मूळ लेखकाचा दृढ परिचय असला पाहिजे. त्या-शिवाय त्याचें व्यंगचित्र रेखाटतां यावयाचें नाहीं असें कांहींचें मत आहे. व तें बऱ्याच अंशीं खरें आहे. त्याशिवाय निर्दोष व्यंग गीत निर्माण व्हाव-याचें नाहीं. तथापि चिकित्सक बुद्धीच्या व सूक्ष्म अवलोकनाच्या नकला-कार माणसास थोड्याबहुत व्यासंगानें तें शक्य आहे. मात्र त्यास चीड किंवा क्षोभ येणारी गोष्ट त्याचे नजरेस यावयास पाहिजे. कोणी एखादा डोंबकावळा, मयूर म्हणून मिरवीत आहे, असें त्यास दिसून आलें तर त्याची

खोटीं मोरपिसें उपटण्यासहि थोडीशी सामग्री देखील पुरेशी होईल. परंतु तें विडंबन नमुनेदार होईल किंवा नाहीं याची शंका आहे. हें सांगितल्या॰ वर विडंबनकारास सूचना म्हणून एवढें सांगणें जरूर वाटतें कीं, त्यानें आपल्या कार्यांत सदाभिरुची, सभ्यता व न्याय्यदृष्टी यांस फांटा देतां कामा नये; नाहींतर विडंबिताची केविलवाणी स्थिति झाली तरी विडंबनकार लोकांच्या दृष्टींतून उतरल्याशिवाय राहणार नाहीं; व या हीन वृत्तीमुळें मिळविलेली पत व सहानुभूति किंवा ती मिळविण्याची आकांक्षा त्यास गमवावी लागेल.

असो. येथवर विडंबन-काव्यप्रकाराचें स्वरूप, त्याचा इतिहास, उपयुक्तता, उपपत्ति, व परिभाषा तसेंच कवीचा स्वभाव व ज्ञान वगैरेंचें थोडक्यांत दिग्दर्शन झालें. हे व आणखी कांहीं मुद्दे सविस्तर उदाहरणें देऊन लेखाचे पूर्ततेसाठीं मांडणें जरूर होतें. तथापि विडंबन काव्याचें सामान्य स्वरूप जरी यावरून ध्यानीं आलें तरी तूर्त चालेल. विडंबन-काव्याबद्दल विनाकारण कोणाचा गैरसमज होत असतो किंवा कोणास वृथा. भय वाटत असतें, तसें होऊं नये हाहि या लेखनाचा एक उद्देश आहे. एकानें 'मेघदूत' पाठविला व दुसऱ्यानें काकदूत किंवा बल्लवदूत धाडला तर त्यांत एवढें काय बिनसलें? वीररसप्रधान काव्याची एकाद्यानें 'चिचुंद्रिकावध' लिहून थट्टा केली किंवा आंबराईसारख्या एकाद्या नीरस खंडकाव्याची 'बाभुळवन' लिहून कोणी विडंबन करूं लागला तर त्यांत हाय खाण्यासारखें काय आहे? वास्तविक या विनोदांच्या टिचक्यांच्या आवाजास बंदुकीचा आवाज समजून जर हे 'शब्दशूर' भयाकुल झाले तर त्यांचें भ्रमनिरसन होऊन त्यांना विनोदाचा व शुद्ध आनंदाचा आस्वाद कसा मिळावा? प्रसन्नवृत्ति व उमदेपणा सोडून मलूल व किरकिरें आयुष्य कंठण्यापेक्षां सर्वांनीं हसावें, खेळावें व सरळ स्पर्धा करावी यांतच खरा पुरुषार्थ आहे.*

---

* क्रिस्तोफर स्टोन व हॅमबर्ट वूल्फ यांच्या निबंधाचा आम्हांस उपयोग झाला आहे.

# भोर-संस्थान-परिचय

लेखक : सदाशिव महादेव भिडे, बी. ई. भोर.

[ यांचें घराणें भोरचें होय. त्यांचा जन्म भोरास ता. ८ फेब्रुवारी १९०४ रोजीं झाला. ते भोर हायस्कूलमधून १९२० सालीं प्रवेश परीक्षा उतरले. त्यांचा पुढील अभ्यास पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजांत होऊन ते १९२५ मध्यें बी. ई. झाले.]

भोर संस्थानचा सांगोपांग परिचय करून घ्यावयाचा तर तो त्रिविध मार्गांनीं करून दिला पाहिजे. हे त्रिविध मार्ग म्हणजे भौगोलिक, ऐतिहासिक व सद्यःकालिक होत. प्रस्तुत स्थळीं वरील तिन्ही दृष्टीनीं परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे.

**भौगोलिक**—भोर संस्थान हें राजकीय दृष्ट्या पुणें जिल्ह्यांत मोडत असलें तरी त्याचा विस्तार पुणें, सातारा व कुलाबा या जिल्ह्यांत झाला आहे. त्याच्या पूर्वेला पुणें जिल्हा, दक्षिणेस व पश्चिमेस सातारा व कुलाबा हे जिल्हे असून उत्तरेस कुलाबा व पुणें या जिल्ह्यांच्या हद्दी आहेत. हें संस्थान दक्षिणोत्तर १८° ते १८° ४५' अक्षांश व पूर्वपश्चिम ७०° १४' ते ७३° १५' रेखांश, यांमध्यें वसलें आहे. सातारा जिल्ह्याचे वायव्येकडील हद्दीपासून म्हणजे विचित्रगड तालुक्यापासून या संस्थानच्या प्रदेशास प्रारंभ होतो. त्या जिल्ह्याच्या उत्तरेस महादेवाच्या डोंगराची रांग असल्यानें संस्थानच्या प्रदेशाची दक्षिणोत्तर रुंदी पसतीस मैलांपासून पंधरा मैलांपर्यंत कमीजास्त प्रमाणानें होत गेली आहे. वायव्येपासून नैऋत्येच्या कोनापर्यंत सह्याद्रीचा जो खडकाळ भाग दृष्टीस पडतो, तो अग्निजन्य खडकाचा असल्यानें एकसंधि, कहारी व काळाकभिन्न आहे. या संस्थानचें क्षेत्रफळ ९२५ चौरस मैल असून त्यांत ५०२ गांवें आहेत यांची लोकसंख्या १९२१ च्या खानेसुमारी अन्वयें १४१५७० इतकी आहे. संस्थानचा तीन चतुर्थांश भाग डोंगराळ असून तेथल्या जमिनीचा रंग तांबडा आहे. बाकीच्या एक चतुर्थांश जमिनीपैकीं कांहीं जमीन काळी व कांहीं तांबूस-काळसर अशी दिसते. एकंदर संस्थानांत पाणथळ जमीन फार थोडी असल्याकारणानें पाणी-पुरवठयाच्या दृष्टीनें विहिरींचाच जास्त प्रमाणावर उपयोग केला


भोर संस्थानचा नकाशा
मुंबईकडे
खोपोली
मावळ तालुका
पुणे
मद्रासकडे
सोलापूरकडे
सुधागड
तालुका
पाली
कोळवण
पवन मावळ
प्रचंडगड
तालुका
सिंहगड
पुरंदर
तालुका
अंत्रोळी
वेल्हे
तोरणा
रायगड
रोहेकडून
गांगांव
तळेगांवकडून
महाड
महाड तालुका
भोर
शिरवळ
रोहिडखोरे
वाई
सातारा
जिल्हा
पंढरपूरकडे
सोलापूरकडे
प्रतापगड
चिपळूणकडून
कृष्णा नं.
निवागाकडून
पेण

C.S.P POONA

जातो. संस्थानचे एकूण पांच तालुके आहेत. त्यांपैकीं चार तालुके घाटमाथ्यावरील मावळांत असून एक घाटाखालीं आहे. विचित्रगड तालुक्याचा भाग सातारा जिल्ह्यांत आहे, तर राजगड, प्रचंडगड व पौन ऊर्फ पवनमावळ यांचा पुणें जिल्ह्यांत समावेश होतो. घाटाखालचा तालुका सुधागड हा कुलाबा जिल्ह्यांत मोडतो. म्हणजे साधारणपणें असें म्हणतां येईल कीं भोर संस्थानच्या सर्व प्रदेशापैकीं एक तृतीयांश भाग तळ कोंकणांत आहे व दोन तृतीयांश भाग घाटमाथ्यावर आहे. संस्थानचें वार्षिक उपन्न सुमारें सात लाखांचें आहे.

सह्याद्री पर्वताच्या दोन्ही कुशींना संस्थानी प्रदेश असल्यानें तेथून वाहणाऱ्या नद्या पूर्वाभिमुख व पश्चिमाभिमुख अशा आहेत. सुधागड तालुक्यामधून वाहात जाणारी नदी अंबा होय. हिचा प्रवाह सुरुवातीपासून संस्थानच्या हद्दीबाहेर पडेपर्यंत नैऋत्येकडे वाहातांना दिसतो. पण पुढें मात्र तो पूर्वाभिमुख होतो. घाटमाथ्यावरून वहात जाणाऱ्या मुख्य नद्या म्हणजे निरा, वेळवंडी, गुंजवणी, मुशी, मुठा व पवना या होत. त्यांपैकीं निरा नदी ही जशी संस्थानच्या दक्षिण दिशेला आहे तशी उत्तर दिशेला पवना नदी होय. हिरडस-मावळांत उगम पावून विचित्रगड तालुक्यांतून नीरेचा प्रवाह जातो तर वेळवंडी व गुंजवणी या नद्यांचीं उगमस्थानें वेळवंड खोरें व गुंजवण-मावळ हीं असून त्यांचा प्रवाह राजगड तालुक्यांमधून जातो. या दोन्ही नद्या पुढें नीरेला मिळून तिन्ही नद्यांचें पाणी संस्थानी मुलखांतून कांहीं वाट वहात जातें. मुशी नदी जशी प्रचंडगड तालुक्यांतील मोसे खोऱ्यांतून वहाते तशी पवनमावळ तालुक्यांतील मुठें खोरें व पवनमावळ यांतून मुठा व पवना या नद्या वहात जाऊन पुण्यानजीक मुळा नदीस मिळतात. यांशिवाय शिवगंगा, कांदी व वळकी या नद्या राजगड, प्रचंडगड व पौनमावळ तालुक्यांत आहेत.

हवामानाच्या दृष्टीनें पहातां घाटमाथ्यावरील प्रदेशाची हवा पुणें, सातारा जिल्ह्यासारखी किंचित् थंड पण बहुतांशीं समशीतोष्ण अशी आहे. व तळकोकणांतील प्रदेशाची हवा कुलाबा जिल्ह्यासारखी ऊष्ण भासते. घाटमाथ्यावरील पश्चिमेकडून पूर्वेकडच्या प्रदेशांत २०० पासून १० इंचांपर्यंत

पावसाचें मान उतरत जातें. सुधागडांत त्याचें प्रमाण १५० इंचांपर्यंत असतें. घाटावरील तालुक्यांत भात, नागली, वरी, जोंधळा व बाजरी हीं धान्यें मुख्यतः पिकतात. सुधागडाचें मुख्य पीक म्हटलें म्हणजे भात होय. संस्थानच्या जंगलांत साग, हिरडा, जांभूळ, आंबा, फणस या झाडांची लागवड होते. संस्थानांतून निर्गत होणारा माल भात, हिरडा व साग हा असून भाताखेरीज बहुतेक सगळीं धान्यें व इतर माल यांची येथें आयात होत असते. डोंगराळ मुलुखामुळें रानटी जनावरांचा विशेषतः रानडुकरांचा येथें बराच उपद्रव आहे. कित्येक प्रसंगीं वाघांचाहि या प्रांतास उपसर्ग लागतोच.

सह्याद्रिपर्वताचे बरेच लांबलांब फाटे या संस्थानच्या हद्दींत घुसले असल्यामुळें हा भाग दऱ्याखोऱ्यांनीं व्यापून गेला आहे. अनेक खोऱ्यांपैकीं रोहिड, वेळवंड, मुरूम, कानद, मुसे, मुठे व बळकी हीं खोरीं व बारा मावळांपैकीं हिरडस, गुंजण, नाणें व पवन हीं मावळें या संस्थानांत असून पर्वताच्या बहुतेक रांगांवरून किल्ले बांधलेले आहेत. विचित्रगड तालुक्यांत रोहिडा ( यास दुसरें नांव विचित्रगड असेंहि आहे ), राजगडांत राजगड ( त्यासच मुरुमगड म्हणतात ), प्रचंडगडांत प्रचंडगड ऊर्फ तोरणा, पौनमावळांत तुंग व तिकोना आणि सुधागडांत भोरप व सरसगड असे एकुण सात किल्ले आहेत. शिवाजीच्या पूर्वपराक्रमांशीं वरील किल्ले निगडित झालेले इतिहासांत आढळून येतात. वरील किल्ल्यांपैकीं राजगड किल्ल्याची बांधणी प्रेक्षणीय आहे, तर प्रचंडगड हा सर्व किल्ल्यांत उंच व बिकट असल्यानें नांवानें सार्थ ठरतो. राजगड किल्ला हा शिवाजीनें १६४२ मध्यें घेतला व पुढें वीस वर्षांनीं म्हणजे १६६२ सालीं त्याची बांधणी दुरुस्ती करून त्यास जास्त बळकटी आणली. भोरापासून दक्षिणेस सुमारें आठ मैलांवर भोर व वांई यांच्या दरम्यान अंबाडखिंड ऊर्फ विश्रामघाट असून तेथें एक अन्नछत्र आहे. सहावे सचिव शंकरराव रघुनाथ यांचें तिसरें कुटुंब राधाबाई ऊर्फ ताईसाहेब यांनीं तें सुरू केलें आहे. पांचगणीप्रमाणें तेथलीहि हवा बरीच थंड असल्याकारणानें थंड हवेचें ठिकाण म्हणून पुष्कळ वेळां या स्थळाचा उपयोग केला जातो.

घाटावरून तळकोंकणांत उतरण्याचे मार्ग या संस्थानांतून बरेच जातात.

विचित्रगड तालुक्यांत वरंध्या घाट व राजगड तालुक्यांत शेवता व मढे हे घाट होत. धामणवहाळ व आंबवणे हे घाट प्रचंडगड व पौनमावळ तालुक्यांत आहेत. वरीलपैकीं वरंध्या घाटामधून पंढरपूर-महाड रस्ता जातो. तर कोंकणांतून पायीं सरळ पुण्यास जातांना मढेघाट त्या दोघांच्या सरळ रेषेंत येतो. त्यामुळें दोन्हीहि घाटांचें विशेष महत्त्व आहे. पुणें-पौडावरून घाटाखालीं पाटणूसकडे जाणारा पिंपरीघाट हा जरी संस्थानच्या हद्दींत नसला तरी त्याचा उपयोग संस्थानी मुलुखाला पुष्कळ होतो. हा घाट पक्का बांधीव असून पूर्वी घोडदळ वगैरेसारख्या सैन्याची ने-आण करण्याच्या कामीं तो फार उपयोगीं पडे. शिवाय नागोठणें, रेवदंडा वगैरे आंग्र्यांच्या मुलुखांत जाण्यास हा घाट सरळ व सोयीचा होता. या दोन्ही कारणांनीं त्यास पूर्वी राजकीय महत्त्व प्राप्त झालें होतें. संस्थानांमधून जाणारे गाडी रस्ते म्हटले म्हणजे पुण्याहून बंगलोरकडे जाणारा रस्ता, पंढरपूर ते महाडपर्यंतचा रस्ता, नसरापूर ते वेल्यापर्यंतचा रस्ता, भोरपासून कापूरवहाळवरून पुरंदरकडे जाणारा रस्ता, पिरंगुटपासून कोळवणपर्यंतचा रस्ता, भोर ते आंबवडें रस्ता, खोपवली ते पाली शहर व पाली ते नागोठणें हे मुख्य रस्ते होत.

भोर हें संस्थानच्या राजधानीचें ठिकाण होय. तें पुण्याच्या दक्षिणेस ३० मैलांवर नीरा नदीच्या काठीं वसलेलें आहे. त्याच्या सभोंवार सह्याद्रीचे फांटे पसरलेले दिसतात. तिसरे सचिव श्रीमंत चिमणाजी नारायण यांनीं बरोडीहून आपल्या राजधानीचें ठाणें भोरास आणलें. सध्यां गांवची लोकवस्ती सुमारें पांच हजारांवर आहे. महाड, पंढरपूर रस्ता भोरावरूनच वरंध्या घाटानें गेला आहे. येथील राजवाडा भव्य, विस्तृत व जुन्या सातारी वाड्याच्या नमुन्यावर बांधलेला असल्यानें त्यांत मोंगली शिल्पाचें मिश्रण आहे. एकंदरीनें हें शहर लहानसेंच पण अतिशय टुमदार व सोईस्कर असून हवापाण्याच्या दृष्टीनें फार हितावह आहे. येथें दरसाल मोठा रामनवमीचा उत्सव साजरा होत असतो. त्याची मूळ सुरुवात १७२० सालापूर्वींची म्हणजे नारो शंकराचे वेळेपासून झाली असून तो आजतागाईत अव्याहतपणें चालू आहे. भोराच्या खालोखाल शिरवळ, नसरापूर, वेलें, कोळवण व पाली हीं अनुक्रमें विचित्रगड, राजगड, प्रचंडगड, पौनमावळ व सुधागड या

तालुक्यांचीं मुख्य ठाणीं होत. या संस्थानांत विशेषेंकरून हिंदूंचीच वस्ती आहे. त्यांत मुख्यतः ब्राह्मण, प्रभू, मराठे व मूळ रहिवासी, कातकरी, ठाकूर यांचा समावेश होतो.

संस्थानच्या घाटमाथ्यावरील भागांत प्राचीन व अर्वाचीन मिळून जीं कित्येक शिवालयें आहेत त्यांत रायरेश्वर, केदारेश्वर, नागेश्वर, भोरेश्वर हीं विचित्रगडांत; अमृतेश्वर, बनेश्वर, केळदेश्वर राजगडांत; तोरणेश्वर, धान्येश्वर, प्रचंडगडांत; वाघेश्वर, वेळणेश्वर पौनमावळांत व उद्धररामेश्वर, सिद्धेश्वर आणि बीरेश्वर हीं सुधागडांत विशेष प्रसिद्ध होत. त्यांपैकीं नसरापुराजवळ मोहरीस असलेलें अमृतेश्वराचें स्थान व भोराजवळील आंबवडें येथील नागेश्वराचें स्थान हीं दिव्य करण्याकरितां योजलीं जात असल्याविषयींचा शिवकालीन इतिहासांत दाखला मिळतो. दुर्गाडी व रोहिडा या डोंगरावरचीं देवीचीं स्थानें जाज्वल्य समजलीं जातात. दुर्गाडी हा डोंगर हिरडोशीजवळ असून त्याच्या चारी बाजूंना डोंगरांच्या ओळी आहेत. वरील शिवालयांपैकीं कांहीं शिवालयें केव्हां अस्तित्वांत आलीं याचा तपास लागत नाहीं. पाली येथील श्रीबल्लाळेश्वराचें स्थान अष्टविनायकांपैकीं आहे. यांशिवाय भोरापासून उत्तरेस सुमारें दोन मैलांवर वेळवंडी नदीस भाटघर येथें 'लॉइड् डॅम' नांवाचें जंगी धरण बांधलें असून त्या धरणाचा विस्तार या संस्थानच्या हद्दींतच वीस मैलांपर्यंत झाला आहे. त्याची लांबी सुमारें दोन मैलांची व उंची दीडशें फुटांवर आहे. भोरच्या नैऋत्येस आठ मैलांवर आंबवडें गांवीं या संस्थानचे मूळ उत्पादक शंकराजी नारायण यांची समाधि नागेश्वराच्या देवळासन्निध आहे. तें स्थान गर्द झाडीमुळें शांत व रमणीय भासतें. बनेश्वर हें स्थान पुण्यापासून बावीस मैलांवर नसरापुराजवळ असून तेथील मुळच्या वनश्रीमध्यें शेजारील शिवगंगेच्या धबधब्यानें अपूर्व शोभेचा भर घातली आहे. त्या ठिकाणची हवा थंड, पाणी स्वच्छ व पौष्टिक आहे. देवळाची रचना हेमाडपंती बळणाची असून तें १७४९ मध्यें नानासाहेब पेशव्यांनीं बांधलें. देवळाच्या प्रदेशद्वारीं जी मोठी घंटा आहे, तीवर १६८९ हा सन असून ती पोर्तुगीज लोकांपासून मराठ्यांनीं कोंकणांतील चौलप्रांत जिंकून घेतल्यानंतर तेथून इकडे आणली असावी. पौनमावळ तालुक्यांतील

बाघेश्वर हें प्राचीन काळापासून प्रख्यात असलेलें स्थान होय. तेथील तळ्यांत उगवलेलीं निळीं.कमळें फार शोभिवंत दिसतात. हें स्थान पुण्याहून बत्तीस मैलांवर आहे. सुधागड तालुक्यांतील नाणिवली व ठाणळ येथील बुद्ध-कालीन कोरीव लेणीं व उन्हून पाण्याचे झरे वहात असलेलीं उद्धर व उन्हेरें हीं प्रेक्षणीय स्थळें होत. पालीहून अनुक्रमें तीन व आठ मैलांवर असलेलीं उसर व रामेश्वर हीं देवालयें डोंगराच्या उंच शिखरावर असल्याकारणानें तेथील जंगलाची शोभा अप्रतिम दिसते.

## ऐतिहासिक

शिवाजीनें १६७४ सालीं स्वतःचा राज्याभिषेक करून घेतल्यानंतर राज्यव्यवस्थेच्या कार्यासाठीं ज्या नव्या अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली त्यांतच सुरनीस अथवा सचिव हें पद दुसऱ्या दर्जाचें ठरवून तें पद त्यानें प्रथमतः अण्णाजी दत्तो प्रभुणे यास दिलें. शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजीनें अण्णाजी दत्तो सचिव यास राजारामाचा पक्षपाती म्हणून प्रथम कैद व नंतर ठार केलें. तेव्हां सचिवपदाचा अधिकार रामचंद्र निळकंठ यांस मिळाला. पण संभाजीच्या दुर्वर्तनास कंटाळून त्यानें आपलें पद सोडलें. यानंतर १६९२ मध्यें राजारामानें सचिवपद शंकराजी मल्हार हेबळीकर यास दिलें. जिंजीला मोंगलांचा वेढा पडला असतांना या नव्या सचिवानें आपली अधिकारवस्त्रें टाकून काशीचा मार्ग धरला. पुढें तो अधिकार शंकराजी नारायण गांडेकर यांस मिळाला. तेव्हांपासून सचिवपद शंकराजी नारायण यांच्याच घराण्याकडे चालू आहे.

पंत सचिव यांचें मूळचें आडनांव गांडेकर असून तें घराणें निजाम हद्दींतील पैठणजवळच्या गांडापूर या गांवचे वतनदार देशपांडे होते. शंकराजीचा आजा मुकुंद प्रल्हाद हा गांडापूर सोडून रोजगाराकरितां आपला मुलगा नारो मुकुंद यासह इकडच्या प्रांतांत येऊन पुण्याच्या नैऋत्येस असलेल्या मांगदरी गांवीं राहिला. मांगदरी गांव राजगड तालुक्यांत राजगड किल्ल्याच्या पायथ्याजवळ आहे. नारो मुकुंद यास शिवाजीच्या लष्करांत १६४३ मध्यें कारकुनी मिळाली. पुढें पांचच वर्षांनीं त्यास भोरप किल्ल्यावरील ‘ सबनिशीचे दरक असामींची म्हणजे किल्ल्यासंबंधीं हिशेब ठेवणें,

धान्य दारूगोळा इत्यादींवर देखरेख करणें ही जागा मिळाली. नारोपंत हा आपला हिशेब देण्यासाठीं प्रतापगड मुक्कामीं मोरो त्रिमल पिंगळे पेशवे याजकडे गेला असतांना त्यानें बरोबर आपला मुलगा शंकराजी यास घेतला होता. मुलाची हुषारी पाहून मोरो त्रिमलनें शंकराजीस १६७७ मध्यें आपल्यापाशीं ठेवून घेऊन त्यास फौजेचे आणि मसलतीचे कामांत प्रवीण केलें. १६८६ मध्यें शंकराजीकडे मावळी प्रांतांतील खोऱ्यांचा बंदोबस्त ठेवण्याचें काम आलें. १६९० मध्यें त्यांस 'राजाज्ञा' पदाचा अधिकार मिळाला. राजाराम जिंजीकडे गेल्यानंतर शंकराजीच्या खऱ्या कर्तब-गारीस प्रारंभ झाला. सह्याद्रि, बांधोरी, व मावळ-मुऱ्हा यांत राहून त्यानें तेथील धनगर, मावळे, कंक, मालुसरे वगैरे शिवाजीच्या वेळचे सरदार व लोक जमविले व मोगली फौज मारण्याचा सपाटा चालविला. शंकराजीच्या हातून स्वराज्यसंरक्षणाची स्तुत्य कामगिरी होत असलेली पाहून राजारामानें १६९० अखेरच्या सुमारास पूर्वीचा शंकराजी मल्हार सचिव हा निघून गेल्यामुळें रिकामें झालेलें सचिवपद त्यास दिलें. शिवाय मावळ भागांतील जे जे किल्ले व प्रांत त्याजकडून पुढें जिंकले जातील ते ते सगळे कुलमुखत्या-रीनें आपल्याकडे ठेवण्याविषयींची सनद दिली.* १६९२ मध्यें शंकराजीनें

---

* यासंबंधींचा शंकराजी नारायणांचा पौष शु. २ श. १६१२ ( स. १६९० ) मधील एक लेख नुकताच उपलब्ध झाला आहे, तो भारत इतिहास संशोधक मंडळाचे ऐ. सं. साहित्य खं १ पा. ६६ वर छापला आहे. तो असाः–' साताऱ्या-पासून + + + पावेतों व पुढें जेथपर्यंत + + + स्वामीच्या पुण्यप्रभावेंकरून देश व दुर्गे कबज होतील तेथपर्यंत राजश्री स्वामीनें आमच्या स्वाधीन राज्यभार केलाच आहे. सांप्रत राजश्री स्वामी कृपाळू होऊन आम्हास सुरनिशीचा कार्यभाग सांगितला. रायगडापासून कोंकणपट्टीही स्वाधीन केली. सनदा व वस्त्रें व आलंकारभूषणें रा. म्हालोजी काशीद राजसेवक व संताजी पडवल याबरोबर पाठविली. राजश्री राम-चंद्रपंतास + + + सनदा, पत्रें व भूषणें + + + पाठविलीं लष्कर दुतर्फा वाटून दिल्हे. रा. धनाजी जाधव यांणीं आम्हाकडे असावें. रा. संताजी घोरपडे यांणीं रा. रामचंद्रपंताकडे आसावे. ऐसा तह केला. हें वर्तमान तुम्हां वतनदारांस कळावें याकरितां लिहिलें असे.'

राजगडाला घोरपड लावून तो किल्ला स्वतः सर केला. या विशेष कामगिरीदाखल त्यास राजारामाकडून 'मदारुलमहाम' म्हणजे विश्वासनिधि हा किताब व वस्त्रें बहाल करण्यांत आलीं. पुढच्याच वर्षी शंकराजीनें तोरणा व रोहिडा हे किल्ले जिंकून बहुतेक मावळ प्रांत शत्रूच्या हातून सोडविला. याप्रमाणें डोंगरी किल्ले, मावळप्रांत, सर्व दाक्षिण कर्नाटक व कोंकण यांचें स्वराज्य, वतनादाखल मोगलाई मुलुख व स्वराज्यांतील साहोत्रा अंमल, हीं सगळीं शंकराजीनें संपादन केलीं. शिवाय रोहिडखोऱ्याचें देशपांडेपण, व दुसरे इनाम इसाफत गांव हेहि त्या प्रसंगीं त्यास मिळाले. शंकराजी, सिंहगड, राजगड व रोहिडा या किल्ल्यांवर राहून वरील सर्व प्रांताची व्यवस्था आपल्या कामगारामार्फत ठेवीत असे. सचिवपद प्राप्त झाल्यावर 'श्री शंकराजी नारायण' असा त्यांच्या नांवाचा अष्टदली शिक्का सुरू झाला व तोंच आजतागाईत त्यांचे वंशजांकडे चालू आहे. शंकराजींच्या पश्चात् त्यांच्या नांवाचा उल्लेख 'पंत वैकुंठवासी' अशा गौरवयुक्त शब्दांनीं केला जात असे. इतका त्या पुरुषाबद्दलचा आदरभाव सर्वत्र वागत होता.

सचिव घराण्यांतील पदाधिकारी पुरुष खालीलप्रमाणें होत. १. शंकराजी नारायण ( १६९०–१७०७ ), २. नारो शंकर ( १७०७–१७३७ ), ३. चिमणाजी नारायण ( १७३७–१७५७ ), ४. सदाशिव चिमणाजी ( १७५७–१७८७ ), ५. रघुनाथ चिमणाजी ( १७८७–१७९१ ), ६. शंकरराव रघुनाथ ( १७९१–१७९८ ), ७. चिमणाजी शंकर ( १७९८–१८२७ ), ८. रघुनाथ चिमणाजी ( १८२७–१८३६ ), ९. चिमणाजी रघुनाथ ( १८३६–१८७१ ), १०. शंकरराव चिमणाजी ऊर्फ रावसाहेब ( १८७१–१९२२ ), ११. रघुनाथराव शंकर ऊर्फ बाबासाहेब ( १९२२ सालीं गादीनशीन झाले ).

सचिवपदाकडे चालत आलेलीं कामें व मानमरातब या बाबी अनेक तऱ्हेच्या आहेत. त्यांतील मुख्य कामें म्हटलीं म्हणजे दप्तर संभाळणें व सनदांची बारानिशीं ठेवणें हीं होत. तसेंच महाराज सरकारांतून कोणास सनदापत्रें करून दिलीं तर त्यावर 'रुजु सुरुनवीस' 'सुरू शुदबार' अशी नोंद करण्याचें काम सचिवांचें असे. महाराजांकडून आलेल्या पत्रावरील

मायना सुरुवातीस ‘ राजश्री ( शंकराजी ) पंडीत ’ असा लिहून शेवटीं ‘ बहुत काय लिहिणें सुज्ञ असा ’ असा मजकूर असे. सचिवपदाचा अधिकार मिळतांना प्रत्येक वेळीं महाराजसरकारांतून खालीं उल्लेखिलेलीं सचिवपदाचीं वस्त्रें व जवाहीरहि मिळत. वस्त्रें:—प्रथम भेटीसमयीं छडीदार चादर, पदाधिकाराचे वेळीं मंदील, छडीदार चादर, किनखाप व पटका, मोत्याची कंठी, मोत्याचा तुरा, चौकडा व शिरपेंच, शिक्किकट्यार, ढाल, तलवार, चौघडा, रुप्याच्या दांडीची चवरी, ताडीचें कलमदान, हत्ती व घोडा इतके जिन्नस महाराजसरकाराकडून मिळत असत. उलट सचिवांनीं प्रत्येक भेटीच्या वेळीं महाराजांस पंधरा मोहरा नजराण्यादाखल द्याव्या लागत. यानंतर १८६२ मध्यें राणीसरकाराकडून ‘ सचिव पंडित व त्यांचे वंशास आपले राज्यावर अधिकारी करण्यास जेव्हां औरस नसेल तेव्हां दत्तक घेण्यास परवानगी आहे आणि ही परवानगी निरंतर राहील ’ अशी सनद मिळाली.

भोर संस्थान हें विस्तारानें सध्यां जेवढें दिसत आहे त्यापेक्षां तें पूर्वी बरेंच मोठें होतें. शंकराजी नारायण यांस कुलमुखत्यारीनें मिळालेले प्रांत व किल्ले खालीलप्रमाणें होत. मावळ, जुन्नर, पुणें, कडेवळीत, इंदापूर, चौल, राजपुरी, कर्डे, पौडखोरें हे प्रांत व भोरप, तोरणा, पुरंदर, वर्धनगड, मनमोहनगड, राजगड, सिंहगड, मृगगड, कावेरीगड, विचित्रगड, घनगड असे मिळून नऊ प्रांत व अकरा किल्ले इतका विस्तृत मुलुख सुरुवातीला म्हणजे १७०७ चे सुमारास भोर संस्थानांत मोडत होता. त्यानंतर बाळाजी विश्वनाथानें दमाजी थोराताविरुद्ध सचिवास मदत केली म्हणून १७१९ मध्यें पेशव्यांना पुणें परगणा व पुरंदर किल्ला हे सचिवाकडून मिळाले. १७४० सालीं तालुके वेळवंड खोरें यांतील देशपांडेकुळकर्णपणाचें निमें वतन वंशपरंपरागत हक्कानें राघो अनंतापासून साडेचौदाशें रुपयांस चिमणाजी नारायणानें खरेदी केलें. १७५२ या वर्षी पेशव्यांनीं सिंहगड घेऊन त्या ऐवजीं तुंग, तिकोना हे किल्ले सचिवांच्या ताब्यांत दिले. पेशवाईनंतर १८२० मध्यें अल्पिष्टन साहेबामार्फत कुंपणीसरकारशीं जो तह झाला त्यांत सचिवांच्या हातचा मोंगलाईतील साहोत्रा व मोकासा अंम-

त्याचा हक्क नष्ट झाला. पुढें १८२९ सालीं तळकोंकण भागांत बरीच अदलाबदल झाली. याचें कारण हें कीं, त्या प्रांतांत कांहीं स्थळीं इंग्रज, आंग्रे व पंत सचिव यांपैकीं दोघादोघांचा, तर कांहींमध्यें तिघांचाहि अंमल चालू होता. त्यामुळें भानगडी उद्भवण्याचे प्रसंग वारंवार उद्भवत. ते टाळण्याकरतां कुंपणीसरकारकडून सचिवांनीं नागोठणें, अष्टमी, शिमहाल, हवेली, असरें व आतोणें येथील 'दुअमली गांव व तालुके सरमोबदला' करून घेतलीं व अशाप्रकारें आपला कोंकणी मुलूख एकसंधी केला. मोबदल्यांत आसरें, आतोणें वगैरे गांवें सचिवांचे ताब्यांत येऊन नागोठणें प्रांत इंग्रजाकडे गेला. पालीचा सरसगड वरील तहानेंच सचिवांना मिळाला. सचिवांच्या ताब्यांत असलेले किल्ले व मुलूख यांसंबंधींची १८८५ सालची नोंद सांपडते ती; रोहिडा, राजगड, भोरप, तोरणा, बितंडगड, सरसगड, कठीणगड हे किल्ले व विचित्रगड, राजगड, प्रचंडगड व सुधागड हे तालुके इतका मुलुख व वतनी, देशपांडे व कुलकर्णीपण, इनाम व इसाफत गांवें, शेऱ्या हें सर्व संस्थान सरकारच्या ताब्यांत असून त्याचें उत्पन्न कमाल तीन लक्ष रुपयांचें होतें. याखेरीज मोंगलाईत गेलेला साहोत्रा अंमल सोडून बाकी साहोत्र्याचें उत्पन्न पन्नास साठ हजारांचें होतें. ( अष्टप्रधानांचा इतिहास ).

येथल्या मावळ भागांत राहणाऱ्या लोकांना मावळे ही सामान्य संज्ञा असून पूर्वीपासून राहत असलेलीं मराठ्यांचीं घराणीं येथें बरींच आहेत. खोपडे, जेधे ( रोहिडखोरें ); बांदल ( हिरडसमावळ ); कंक मालुसरे, धुमाळ ऊर्फ ढोर ( वेळवंडखोरें ); शिंदे ऊर्फ शिळिमकर (गुंजणमावळ); मरळ (कानदखोरें ); पासलकर ( मोसेखोरें ); ढमाल ( पौडखोरें ); अशीं शिवपूर्वकालीन मराठ्यांचीं अव्वल घराणीं उदयास आलीं. प्रभूंपैकीं देसाई, वैद्य, गुप्ते, चित्रे, देशपांडे, प्रधान, दिघे; ब्राह्मणांपैकीं निमकर, लोहोकरे (रोहिखोरें ), विंझे ( वेळवंडखोरें ), पुरोहित (गुंजणमावळ), वगैरे प्राचीन घराण्यांचाहि उल्लेख करण्यासारखा आहे.

## सद्यकालिक

भोर संस्थान आकारानें लहान असलें तरी पुणें-मुंबई सारख्या आत्यंतिक

मायना सुरुवातीस ‘ राजश्री ( शंकराजी ) पंडीत ’ असा लिहून शेवटीं ‘ बहुत काय लिहिणें सुज्ञ असा ’ असा मजकूर असे. सचिवपदाचा अधिकार मिळतांना प्रत्येक वेळीं महाराजसरकारांतून खालीं उल्लेखिलेलीं सचिवपदाचीं वस्त्रें व जवाहीरहि मिळत. वस्त्रें:—प्रथम भेटीसमयीं छडीदार चादर, पदाधिकाराचे वेळीं मंदील, छडीदार चादर, किनखाप व पटका, मोत्याची कंठी, मोत्याचा तुरा, चौकडा व शिरपेंच, शिक्केकट्यार, ढाल, तलवार, चौघडा, रुप्याच्या दांडीची चवरी, ताडीचें कलमदान, हत्ती व घोडा इतके जिन्नस महाराजसरकाराकडून मिळत असत. उलट सचिवांनीं प्रत्येक भेटीच्या वेळीं महाराजांस पंधरा मोहरा नजराण्यादाखल द्याव्या लागत. यानंतर १८६२ मध्यें राणीसरकाराकडून ‘ सचिव पंडित व त्यांचे वंशास आपले राज्यावर अधिकारी करण्यास जेव्हां औरस नसेल तेव्हां दत्तक घेण्यास परवानगी आहे आणि ही परवानगी निरंतर राहील ’ अशी सनद मिळाली.

भोर संस्थान हें विस्तारानें सध्यां जेवढें दिसत आहे त्यापेक्षां तें पूर्वी बरेंच मोठें होतें. शंकराजी नारायण यांस कुलमुखत्यारीनें मिळालेले प्रांत व किल्ले खालीलप्रमाणें होत. मावळ, जुन्नर, पुणें, कडेवळीत, इंदापूर, चौल, राजपुरी, कर्डे, पौडखोरें हे प्रांत व भोरप, तोरणा, पुरंदर, वर्धनगड, मनमोहनगड, राजगड, सिंहगड, मृगगड, कावेरीगड, विचित्रगड, घनगड असे मिळून नऊ प्रांत व अकरा किल्ले इतका विस्तृत मुलुख सुरुवातीला म्हणजे १७०७ चे सुमारास भोर संस्थानांत मोडत होता. त्यानंतर बाळाजी विश्वनाथानें दमाजी थोराताविरुद्ध सचिवास मदत केली म्हणून १७१९ मध्यें पेशव्यांना पुणें परगणा व पुरंदर किल्ला हे सचिवाकडून मिळाले. १७४० सालीं तालुके वेळवंड खोरें यांतील देशपांडेकुळकर्णपणाचें निमें वतन वंशपरंपरागत हक्कानें राघो अनंतापासून साडेचौदाशें रुपयांस चिमणाजी नारायणानें खरेदी केलें. १७५२ या वर्षी पेशव्यांनीं सिंहगड घेऊन त्या ऐवजीं तुंग, तिकोना हे किल्ले सचिवांच्या ताब्यांत दिले. पेशवाईनंतर १८२० मध्यें अल्फिष्टन साहेबामार्फत कुंपणीसरकारशीं जो तह झाला त्यांत सचिवांच्या हातचा मोंगलाईतील साहोत्रा व मोकासा अंम-

लाचा हक्क नष्ट झाला. पुढें १८२९ सालीं तळकोंकण भागांत बरीच अदलाबदल झाली. याचें कारण हें कीं, त्या प्रांतांत कांहीं स्थळीं इंग्रज, आंग्रे व पंत सचिव यांपैकीं दोघादोघांचा, तर कांहींमध्यें तिघांचाहि अंमल चालू होता. त्यामुळें भानगडी उद्भवण्याचे प्रसंग वारंवार उद्भवत. ते टाळण्याकरतां कुंपणीसरकारकडून सचिवांनीं नागोठणें, अष्टमी, शिमहाल, हवेली, असरें व आतोणें येथील 'दुअमली गांव व तालुके सरमोबदला' करून घेतलीं व अशाप्रकारें आपला कोंकणी मुलूख एकसंधी केला. मोबदल्यांत आसरें, आतोणें वगैरे गांवें सचिवांचे ताब्यांत येऊन नागोठणें प्रांत इंग्रजाकडे गेला. पालीचा सरसगड वरील तहानेंच सचिवांना मिळाला. सचिवांच्या ताब्यांत असलेले किल्ले व मुलूख यांसंबंधींची १८८५ सालची नोंद सांपडते ती; रोहिडा, राजगड, भोरप, तोरणा, बितंडगड, सरसगड, कठीणगड हे किल्ले व विचित्रगड, राजगड, प्रचंडगड व सुधागड हे तालुके इतका मुलुख व वतनी, देशपांडे व कुलकर्णीपण, इनाम व इसाफत गांवें, शेन्या हें सर्व संस्थान सरकारच्या ताब्यांत असून त्याचें उत्पन्न कमाल तीन लक्ष रुपयांचें होतें. याखेरीज मोंगलाईत गेलेला साहोत्रा अंमल सोडून बाकी साहोत्र्याचें उत्पन्न पन्नास साठ हजारांचें होतें. ( अष्टप्रधानांचा इतिहास ).

येथल्या मावळ भागांत राहणाऱ्या लोकांना मावळे ही सामान्य संज्ञा असून पूर्वीपासून राहत असलेलीं मराठ्यांचीं घराणीं येथें बरींच आहेत. खोपडे, जेधे (रोहिडखोरें); बांदल ( हिरडसमावळ ); कंक मालुसरे, धुमाळ ऊर्फ ढोर ( वेळवंडखोरें ); शिंदे ऊर्फ शिळिमकर (गुंजणमावळ); मरळ (कानदखोरें ); पासलकर ( मोसेखोरें ); ढमाल ( पौडखोरें ); अशीं शिवपूर्वकालीन मराठ्यांचीं अव्वल घराणीं उदयास आलीं. प्रभूंपैकीं देसाई, वैद्य, गुप्ते, चित्रे, देशपांडे, प्रधान, दिघे; ब्राह्मणांपैकीं निमकर, लोहोकरे (रोहिखोरें ), विंझे ( वेळवंडखोरें ), पुरोहित (गुंजणमावळ), वगैरे प्राचीन घराण्यांचाहि उल्लेख करण्यासारखा आहे.

## सद्यकालिक

भोर संस्थान आकारानें लहान असलें तरी पुणें-मुंबई सारख्या आत्यंतिक

सुधारणेच्या बाबतींत अग्रेसरत्व पावलेल्या शहरांपासून फारसें दूर नसल्या-कारणानें सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व शैक्षणिक जीवनांतील नव्या आकांक्षा, नव्या उमेदी व अर्वाचीन काळच्या नव्या सुखसोई यांना अगदीं पारखें असणें शक्य नाहीं. त्या शहरांच्या सान्निध्यामुळें व अहर्निश संपर्कामुळें वरील गुणांचा थोड्याफार अंशांनीं येथें प्रादुर्भाव झाला आहे आणि म्हणूनच भोरास जसा प्रशस्त राजवाडा आहे, तसाच टुमदार रामबाग बंगलाहि आहे; जशी प्राथमिक मोफत शिक्षण देणारी शाळा आहे, तसा औषधोपचार करणारा धर्मार्थ दवाखाना पण आहे; उच्च शिक्षणाचें प्रवेशद्वार खुलें करणारी सार्वत्रिक शिक्षणसंस्था आहे, तसेंच ज्ञानवृद्धि करणारे सार्व-जनिक वाचनालयहि आहे; लोकशिक्षण देणारी स्थानिक स्वराज्यसंस्था आहे, तर त्या शिक्षणाची फलश्रुति संपादणारें कायदेमंडळ आहे; स्त्रीशिक्ष-णाचें कार्य अंगीकारणारी शाळा आहे, तर त्यांच्या धर्मभावना जागृत कर-णारीं पवित्र देवालयें आहेत. अशा तऱ्हेनें भोराहून इतर ठिकाणीं दृष्टि वळविली तरी तेथें देखील वरीलपैकीं बऱ्याच गोष्टी दृष्टोत्पत्तीस आल्याशिवाय राहत नाहींत. विशेषत: पालीमध्यें ‘ जनसेवा ही ईश्वरसेवा ’ हें ब्रीदवाक्य धारण करून सामाजिक कार्यास प्रवृत्त झालेला समाजसेवासंघ आहे, तर जन-तेला उत्तम विचारांची ओळख करून देणारी सुविचारमाला पण आहे. मनाची भूक शमविणारें वाचनालय आहे, तर शरीराची भूक वाढविणारें बल-संवर्धक मंडळ पण तेथें आहे. सारांश अर्वाचीन प्रगतिपर काळांत ज्या ज्या गोष्टीचें महत्त्व पटणारें आहे त्या त्या गोष्टी येथें प्रचलित झालेल्या दिसतात.

भोर संस्थानासंबंधीं वर जी थोडक्यांत हकिकत दिली आहे ती त्याचा परिचय होण्यास पुरेशी आहे, असें आम्हांस वाटतें. सरतेशेवटीं सदरहू लेख लिहितांना पहिल्या भागांत अनंत नारायण भागवतकृत भोर संस्थानच्या इतिहासाचा, दुसऱ्यांत आमचे चुलत आजे विष्णु गोपाळ भिडे यांच्या अष्ट-प्रधानांच्या इतिहासाचा व शेवटच्या भागांत महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचा आम्ही सढळ हातानें उपयोग केला या गोष्टींचा कृतज्ञताबुद्धीनें येथें उल्लेख करतों.

---

# खेडीं कशीं सुधारतील ?

## एक नमुनेदार प्रयोग

लेखक : गोविंद रामचंद्र लिमये, पाली.

[ हे सुधागड तालुक्यांतील पालीचे रहिवासी होत. त्यांचा जन्म शके १८०७ मध्यें झाला. त्यांचें इंग्रजी शिक्षण पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें झालें. भोर कायदेमंडळाच्या सभासदांत त्यांची नेमणूक झाली आहे. ते पाली येथील सुविचार-मालेचे मुख्य संपादक आहेत. ]

खेडीं कशीं सुधारतील या प्रश्नाकडे हल्लीं इंग्रज मुत्सद्यांपासून तों देशांतील सर्व पुढाऱ्यांचें लक्ष लागलेलें दिसतें; व जे ते आपापल्या विचारांप्रमाणें या बाबतींत कार्य करतांना दिसत आहेत.

हल्लीं शहरांतून सुशिक्षितांची बेकारी फार ऐकूं येऊं लागली आहे. तेव्हां अशा सुशिक्षितांचा खेड्यांत कांहीं उपयोग करून घेतां येईल का ? व शरीरानें सुदृढ, आचारसंपन्न व नीतिमान अशा माणसाला पडतील ते श्रम करण्याची तयारी असल्यास, उपजीविकेची फिकीर पडूं नये. अशा स्थितींत खरोखर उद्योग नाहीं म्हणून जर कोणी बेकार असतील तर त्यांस साधन-सामग्री पुरवून सल्लामसलत देण्याकरितां कांहीं प्रयत्न होणें जरूर आहे.

या बाबतींत मुंबईच्या व्यापारीपरिषदेसारख्या विचारविनिमयविषयक, किर्लोस्कर कारखान्यासारख्या कार्यप्रेरक व टेक्निकल इंस्टिटयूटसारख्या शिक्षणविषयक संस्थांशीं व समर्थ विद्यालयासारख्या राष्ट्रीय शिक्षणांत कार्य करणाऱ्या चालकांशीं व तज्ज्ञ व्यक्तींशीं चर्चा करण्यांत आली. या सर्वांनीं सुचविलेले मार्ग बहुतांशीं भांडवलाची गरज असणारे, यांत्रिक साहाय्यानें चालणारे व गिऱ्हाइकांकरितां मुख्यत्वेंकरून शहरीं लोकसंख्येवर अवलंबून असणारे आणि सामान्यत: प्रचलित राहणीला पोषक, चालू प्रवाहांतच बहावयास लावणारे आणि कोणत्याहि प्रकारें गिऱ्हाइकाच्या रहाणीवर अगर आवडीवर इष्ट परिणाम करण्याचा विचार सोडावयास लावणारे असेंच असल्यामुळें साहजिकच कित्येक मार्ग अशक्य म्हणून व दुसरे अनिष्ट म्हणून

त्याज्य ठरूं लागले. कांहीं विद्यार्थ्यांचा व कित्येक स्नेह्यांचा अभिप्राय जमेस धरून पाहतां, ही भावना बळावत जाऊन वर दिग्दर्शित केलेल्या मार्गांच्या त्याज्यतेबद्दल मनाचा निश्चय होऊं लागला.

इतक्यांत नवीन परीस्थति निर्माण होऊन शाब्दिक राजकारणावरील विचारी लोकांचा विश्वास उडाला आणि लोकसंग्रहाचा हव्यास वाढल्याचा देखावा दिसून जो तो खेडेगांवच्या सुधारणेचा विचार बोलूं लागला. यांतील कांहीं तत्त्वें लौकरच सर्वतोमुखीं झालीं; आणि तत्त्वतः तीं सर्वमान्य होऊन अनेक मंडळी कामास लागण्याचा आविर्भाव दर्शवूं लागली. **श्रमसार मंडळाची** कल्पना ही अशाच वातावरणांतील विचारांत जन्म पावली.

उच्च वर्णीयांपासून तों तहत नीच वर्णीयांपर्यंतचे लोक पाश्चिमात्यांच्या विवेकशून्य अनुकरणानें आपल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेची तहान भागवूं लागल्यामुळें सर्वत्र राहणी (Standard of living) इतकी प्रमाणाबाहेर पोषाकी व परावलंबी होऊन बसली आहे कीं, परदेशी वस्तु, परकी चैनीच्या आणि शोकाच्या पद्धति यांनीं थेट खेडेगांवांपर्यंत प्रवेश केला व त्यामुळें, खेडेगांवांतील स्थानिक उपयुक्ततेचे सुलभ धंदे, आनुषंगिक कलाकौशल्य, तदंतर्गत उद्योग-प्रियता, सहज वावरणारी परस्परांबद्दल सहानुभूति, परस्परावलंबनाची जाणीव असल्यामुळें प्रत्यहीं प्रतीत होणारें सहकार्य, स्वकीयांबद्दलचें प्रेम व अभिमान इत्यादि नैतिक गुणांचा त्वरेनें ऱ्हास होऊं लागून त्यावर अवलंबून असणारें आर्थिक स्वास्थ्य व पूर्वजांनीं अनुभवलेली सुबत्ता लय पावूं लागली शहरांनीं राज्यकर्त्यांचें, खेडेगांवांनीं शहरांचें, पांढरपेशांनीं नोकरमान्यांचें व इतरांनीं पांढरपेशांचें अनुकरण करण्याची ही अंधपरंपरा शिगेला पोहोंचल्यामुळें, झालेला व होणारा ऱ्हास थांबविण्याचा उत्तम मार्ग म्हणजे आपली संस्कृति सुबत्ता स्वास्थ्य आणि स्वत्त्व यांचे मानलेले बालेकिल्ले जीं खेडेगांवें त्यांचा बचाव करण्यास झटलें पाहिजे; आणि आमच्यापैकीं ज्या सुशिक्षितांचेंच अनुकरण अविचारानें केल्यामुळें तीं खेडीं अवनत स्थितीला जाऊन पोहोंचलीं त्या सुशिक्षितांनींच खेड्यामध्यें राहून उपदेशक किंवा प्रेरक अशा डौलाच्या भूमिका न चालवितां, केवळ आदर्श नागरिक म्हणून त्यांच्या शेजाराला राहून आत्मोन्नतीच्या स्वावलंबी, स्वाधीनसुलभ, सहजशक्य आणि उद्धारक मार्गांचे

अवलंबन करून, आपलें स्वत्त्व न गमावतां आर्थिक दृष्ट्या समाजाची सुधारणा करण्यास झटलें पाहिजे. समाजाचें धुरिणत्व बुद्धिप्रधान लोकांनींच चालविलें पाहिजे आणि इतर समाज जोरानें अवनतीच्या मार्गाला लागले असतांना अघाडी संभाळण्याचें अवघड काम करण्यास सुशिक्षितांनीं मागेंपुढें पाहतां कामा नये. कित्येकांनीं सुविचार बोलले पाहिजेत हें जसें खरें आहे, तसेंच दुसऱ्या कित्येकांनीं खेड्यांसंबंधीं प्रयोग करून ते अमलांत आणले पाहिजेत, हेंहि तितकेंच सत्य आहे. स्वतःकरितां परिश्रम करणें यांत कोणताच कमीपणा नसून एक प्रकारचें श्रेष्ठ दर्जाचें स्वावलंबन आहे. समाज सर्वच उद्योगी असला तर क्वचित अल्पसंख्याक ऐदी लोक पोसतां येतील; परंतु सर्वच ऐदी होण्याचा मान पटकावतील तर सर्वांचाच नाश होईल. समाजाच्या उपयोगी पडल्यास समाज त्याचा मोबदला देतो किंवा त्याच्या कडून तो घेतां येतो. तेव्हां समाजाची योग्य तऱ्हेची पहाणी करून प्रथम त्याच्या योग्य गरजा भागविण्याचें नम्र व्रत स्वीकारून त्याच्या उपयोगी पडणें व तसें करीत असतांना त्याच्या उन्नतीची काळजी घेऊन समाजाला योग्य वळण लावण्याची जबाबदारी पत्करणें त्याकरितां उत्सुकतेनें **परिश्रम करणें हें** उच्च ध्येय बाळगणार एकादा स्वाभिमानीवर्ग निर्माण करणें शक्य आहे.

याप्रमाणें या कल्पनांतच वाढलेला असा कार्यकर्त्यांचा मेळा एकत्र होऊन " श्रमसार " मंडळाला मूर्तस्वरूप येणें प्रथमदर्शनीं अशक्य कोटींतील आहे असें वाटलें. परंतु, समर्थ विद्यालयांत विद्यार्थिवृत्तीनें बरींच वर्षे राहिलेल्या मंडळींत अशा तऱ्हेची वृत्ति बाणविण्याचा प्रयत्न केला जातो. तेव्हां, समकालीन व एकत्र वाढलेल्या विद्यार्थ्यांनींच प्रथम सुरुवात करण्याचें ठरविलें. सारांश, **सुशिक्षित इसम खेड्यांत येऊन राहिल्याशिवाय, खेडीं सुधारणार नाहींत.** अशा सुशिक्षितांना खेड्यांत येऊन राहिल्यानंतर पुढील धंदे करितां येण्यासारखे आहेत; नव्हें ते त्यांनीं केलेच पाहिजेत.

शेती, पशुसंवर्धन, कुक्कुट-संवर्धन ( पोल्ट्री ) सुतारी, लोहारी यांशिवाय द्रोणपत्रावळी तयार करणें, काष्टौषधी जमविणें व त्यांची माहिती करून घेणें वगैरे सारखे आणखी कितीतरी किरकोळ उद्योग, खेड्यांत येऊन राहिल्यानंतर सुचण्यासारखे आहेत.

वर दर्शविल्याप्रमाणें निरनिराळ्या शाखा व त्यांचा कार्यविस्तार हा केवळ व्यावहारिक मार्गांनीं आक्रमण करावयाचा आहे. शांतपणें स्वतःचाच स्वार्थ प्रामाणिक मार्गांनीं साधून, साधेल त्याप्रमाणें शेजाऱ्यांना मदत देऊन त्यांची सहानुभूति संपादून आपल्याबद्दल आदर उत्पन्न करणें व हळुहळू त्यांच्या प्रेमांत भागीदार होऊन अशा मिळणाऱ्या हक्कानें त्यांची सुधारणा करण्यास झटणें हें या मंडळाचें ध्येय आहे.

स्वावलंबन, परिश्रम, स्वतःपुरतें किंवा कोणाकरितांहि श्रम करण्यांत लाज-लज्जा कोणतीहि नाहीं. अनालस्य, सततोद्योग इत्यादि गोष्टी लक्षांत ठेवून शक्य तेथें खेडेगांवीं राहणीला पोषक असें धार्मिक व सामाजिक वर्तन ठेवणें आणि प्रथम आपली स्थिति सुधारण्यास झटणें व अशा रीतीन लोकांना मदत आपल्या जबाबदारीवर करण्यास समर्थ होणें ही वरील श्रमसार मंडळाची सर्व-सामान्य कल्पना खरोखर व्यावहारिक स्वरूपाची व शक्यतेवर उभारलेली आहे.

---

## माझा प्रणाम

कवि : श्रीपाद केशव भिडे, बी. ए., भोर.

[ हे सूळ मिरजेचे राहणारे. १८९४ सालीं बी. ए. झाल्यानंतर भोर हायस्कूलचे मुख्यध्यापक म्हणून त्यांची नेमणून झाली. नंतर ते श्रीमंत सरकार बाबासाहेबांचे शिक्षक झाले. हल्लीं ते हुजूर खाजगी कामगार आहेत. ते आतां स्थायिक झाले आहेत. ]

( चालः—आनंद कंद ऐसा तो हिंद देश माझा )
पहिला प्रणाम माझा त्या श्रीगजाननाला
मग वंदु भक्तिभावें देवी सरस्वतीला ॥ धृ० ॥
वाग्देवि आर्य माते, हे शारदे 'प्रसीद,'
देईं सुबुद्धि सकलां मोहा न देइ थारा ॥ १ ॥
तुझिया कृपाकटाक्षें जगीं होति सर्व धन्य,
राया सदाशिवाला करि देवि सर्वमान्य ॥ २ ॥

सेवा तुझी घडावी मनिं आस फार त्याला,।
म्हणुनी प्रवर्तवी तो आपुल्या प्रजाजनांला ॥ ३ ॥
‘ साहित्य-तोरणा ’सी लावोनि मंदिराला,
प्रार्थीं चिरायु द्यावें या नम्र बालकाला ॥ ४ ॥

---

# पॅरिसजवळचे दोन इतिहासप्रसिद्ध राजवाडे

## व्हर्सेल व मालमेझान

लेखक : शंकर सदाशिव महाशब्दे, भोर

[ हे श्रीमंत युवराजांचे खाजगी सेक्रेटरी आहेत. त्यांच्या बरोबर हे सन १९३० सालीं युरोपला गेले होते ‘ युरोपांतील प्रवास ’ या त्यांच्या अप्रकाशित लेखांतून खालील भाग उद्‌धृत केला आहे. ]

श्रीमंत सरकार बाबासाहेब पंतसचिव यांच्या बरोबर युरोपच्या स्वारींत असल्यामुळें माझ्यासारख्या यःकश्चित् मनुष्याला फ्रान्समध्यें असतांना पॅरिस जवळ व्हर्सेल व मालमेझान हे दोन राजवाडे पहाण्याचा योग आला. तेव्हां त्याबद्दल त्यांचें प्रथम कृतज्ञतापूर्वक स्मरण करुन त्या इतिहासप्रसिद्ध वाड्यांची अल्पशी माहिती “ साहित्य-तोरणा ”च्या वाचकांकरितां लिहिली आहे.

व्हर्सेलचा राजवाडा हा पॅरिस शहरापासून सुमारें दहा मैलांवर असून तो चवदाव्या लुईच्या वेळीं वैभवाशिखरास चढला होता.

पॅरिसमधून बाहेर पडलों तों आम्हांस दोन मोठ्या उद्यानां( पार्क )-मधून जावें लागलें. त्यांपैकीं एकाचें नांव सेंटक्लोड व दुसऱ्याचें नांव बॉइसडी बोलान् असें आहे. या उद्यानांमध्यें मोठमोठीं तळीं आहेत व झाडी अतिशय गर्द आहे. पॅरिस हें इंद्रभुवन व त्या लगतच्या या सुंदर बागा. मग त्यांचें वर्णन काय करावें ? नंतर आम्ही व्हर्सेलला पोहोचलों. या राजवाड्याच्या भव्यपणाची कल्पना येण्यास आपणांस कल्पनाच करावयास पाहिजे. वाड्या-समोर भव्य पटांगण असून मध्यभागीं चवदाव्या लुईचा मोठा अश्वारूढ असा पुतळा आहे व सभोंवार ऐतिहासिक व्यक्तींचे बरेच पुतळे दृष्टीस पडतात. या

वाड्याच्या मागें 'नंदनवन' म्हणून जिला संबोधितां येईल, अशी रम्य बाग आहे. व्हर्सैलची बाग सर्व जगांत प्रसिद्ध आहे व सत्यसृष्टींत नंदनवनाचा भास उत्पन्न करून देणारी आहे. बागेमधील चित्रविचित्र आकारांच्या फुलोऱ्यांचीं कारंजीं पाहिलीं म्हणजे अपूर्वतेची कमाल वाटते. हल्लीं सुद्धां ही बाग पूर्वीच्या इतकी चांगलीं ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सभोंवार भव्य पटांगण व मागच्या बाजूस वरील बाग अशा दोहोंमध्यें या वाड्याची रचना झाली आहे. हा वाडा तेराव्या लुईनें बांधण्यास सुरुवात केली व चवदाव्या लुईनें त्याला हें स्वरूप आणलें.

फ्रेंच राज्यक्रांतीपर्यंत सर्व राजे येथेंच रहात असत. हल्लीं या वाड्याचा उपयोग म्युझियमसारखा करितात. सोळाव्या लुईचा शिरच्छेद होण्यापूर्वी तो तेथेंच रहात होता. हा राजा यंत्रकलेंत अतिशय निष्णात होता. तो स्वतः ज्या यंत्रांनीं काम करीत होता तीं यंत्रें येथें दृष्टीस पडतात. या वाड्यांत मोठमोठीं चित्रें लावलेलीं आहेत. एक चित्र तर सबंध दिवाणखान्यांत मावेल इतकें मोठें आहे. त्याची लांबी साठ फूट व रुंदी वीस फूट आहे. वरील सर्व चित्रें ऐतिहासिक व्यक्तींचीं व प्रसंगांचीं आहेत. या वाड्यांत Glass-Gallery सर्व दृष्टीनें प्रसिद्ध आहे. हिची लांबी दोनशें चव्वेचाळीस फूट असून येथेंच प्रशियाचा राजा पहिला वुइल्यम् यानें जर्मन युद्धानंतर १८७१ मध्यें आपणांस राज्याभिषेक करून घेतला; मौजेची गोष्ट ही कीं १९१६ सालीं त्याच दिवाणखान्यांत जर्मनीला तहावर सही करावयास लागली. या वाड्यांतील एका खोलींत ज्या टेबलावर तहाची सही झाली, तें टेबल प्रेक्षकांस दाखविण्यांत येतें. लुई व त्याची बायको मारी-अन्तोनियेत यांच्या खाजगी खोल्याहि आम्हीं पाहिल्या. या वाड्यांतल्या प्रत्येक दिवाणखान्याचें वर्णन करणें कठिण आहे. शिवाय त्याचीं सुंदर वर्णनें लिहिलेलीं अशीं पुष्कळ पुस्तकें आहेतच. नेपोलियन या वाड्यांत कांहीं काळ रहात होता. हा अपूर्व वाडा कसा बांधला गेला याची हकिगत आमच्या कोरियरनें (वाटाड्यानें) सांगितली. ती अशी. 'मॅडम रेसिमियर ही रेसिमियर प्रधानाची बायको होती. चवदाव्या लुईचें हिच्यावर मन गेलें; व तो तिच्यावर प्रेम करूं लागला. प्रधानानें एकदां राजास आपल्या ऐपतीच्या बाहेर अशी मोठ्या थाटाची मेजवानी

दिली. आपणहि त्याच्या बायकोस दाखविण्याकरितां असेंच कांहींतरी अपूर्व कृत्य करावें असें राजास वाटलें व त्यानें फ्रान्स देशांतील सर्व नामांकित कारागीरांना बोलावून हा वाडा बांधविला व तिला चकित केलें. ताजमहाल व्हर्सेलचा वाडा, वगैरे जगाला, ललामभूत होणाऱ्या वस्तूंचें मूळ नेहमीं प्रेमांतच आढळतें. या प्रेमाच्या तंतूंनेंच सृष्टीच्या गळ्यांत अशा तऱ्हेचीं मौक्तिकें आजवर गुंफिली गेलीं आहेत. हा वाडा पाहिल्यानंतर आम्ही मालमेशान नामक **जोसेफाईन राणीचा वाडा** पहावयास गेलों. काडीमोड झाल्यावर ज्या गाडींतून ती राणी या वाड्यांत आली. ती गाडी येथें ठेविली आहे. या इमारतीचा उपयोग म्युझियमसारखा केला जातो. या वाड्यांत नेपोलियनचीं लहानपणचीं अनेक तऱ्हांचीं खेळणीं ठेविलीं आहेत. त्या वीराचीं खेळणीं म्हणजे लहान तोफा, बंदुका, भाते, लहान सशस्त्र शिपाई अशींच आहेत. त्याच्या बसणाच्या खोलींतील हरएक वस्तू ह्या शस्त्रास्त्रांच्या आकारांच्या दिसतात. नेपोलियननें जें लहानपणीं पाहिलें व जे खेळ तो खेळला तेच खेळ त्यानें पुढें खेळले. येथें जोसेफाईनचें Gerard या चित्रकारानें काढलेलें एक मोठें काव्यचित्र दृष्टीस पडतें. त्यावरून ही या वाड्याची अधिष्ठात्री देवता कशी आहे या गोष्टीची चटकन् जाणीव होते. ज्या खोलींत व ज्या पलंगावर जोसेफाईन मृत्यु पावली ती खोली व तो पलंग हीं येथें दाखविण्यांत येतात. त्याचप्रमाणें सेंटहेलिनामध्यें असतांना नेपोलियन घालीत असलेले कपडे व तो ज्या पलंगावर मृत्यु पावला तो पलंग हीं येथें आणून ठेविला आहेत हा पलंग आपल्याकडील खाटेप्रमाणें आहे. जोसेफाईन वापरत असलेले तिचे झगे, वगैरे मौल्यवान सामान, तिच्या मुलाचा पाळणा व त्याचे कपडे येथें ठेविलेले आहेत. सेंटहेलेनामधील नेपोलियनचे कपडे व पलंग पाहिला म्हणजे जगज्जेत्या लोकांची सुद्धां दैवानें पड खाल्यावर कशी अवस्था होते हें लक्षांत येतें व मन उद्विग्न झाल्याशिवाय रहात नाहीं. ह्या वाड्याला "सगळ्या युरोपमधील सर्वांत दुःखी घर" (The saddest house in the whole of Europe) असें जें म्हटलें आहे तें किती यथार्थ आहे याचा आम्हांला प्रत्यय आला.

अशा प्रकारचा व्हर्सेल सारखा अफाट व एके काळीं वैभवशिखरावर

चढलेला राजवाडा व मातमेझानसारखा लहानच पण करुण कहाणी सांगणारा राजवाडा असे दोन्ही राजवाडे पाहून मनांत विरोधप्रचुर 'भावना उद्भुत झाल्या व हेच विचार पॅरिसला परत येतांना आम्हां सर्वांच्या मनांत प्रामुख्यानें येत होते.

---

# मद्रासची एक व्यायामसंस्था

लेखक: गोपाळ श्रीपाद नेने, मद्रास.

[ हे भोर संस्थानांतील नेरेपालें येथें राहणारे असून त्यांचा जन्म १९०५ मध्यें वांई येथें झाला. भोर हायस्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर त्यांनीं सर परशुराम भाऊ कॉलेजमध्यें इंटरपर्यंत अध्ययन केलें. यानंतर पुढील तीन वर्षें त्यांनीं विलेंपार्ल्यांच्या टिळकविद्यालयांत शिक्षकाची नोकरी केली. १९२८ मध्यें उमरावतीच्या-हनुमान-व्यायाम मंडळांत व्यायाम शिक्षण घेतलें. सध्यां ते मद्रास येथील वाय्. एम्. सी ए. संस्थेच्या 'कॉलेज ऑफ् फिजिकल एज्युकेशन' या संस्थेमध्यें व्यायाम शिक्षण घेत आहेत ]

हिंदी मुलांना शाळांतून पद्धतशीर रीतीनें शारीरिक शिक्षण देणारे असे उत्तम शिक्षक तयार करण्याकरितां या संस्थेनें मद्रास जवळ 'रॉयापेठ' येथें ही शाळा चालविली आहे. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या विभागांतून येथील शिक्षण घेण्याकरितां निदान मॅट्रिक परीक्षा पास झालेले असे तरुण विद्यार्थी येतात. हिंदुस्थानांतील बहुतेक संस्थानेंहि आपल्या खर्चानें येथें शिक्षण घेण्याकरितां दरवर्षी विद्यार्थी पाठवितात.

सबंध हिंदुस्थानांत अशा तऱ्हेचें शिक्षण देणारी ही एकच संस्था आहे. या संस्थेचा उद्देश शारीरशास्त्र, आरोग्यशास्त्र, व्यायामशास्त्र व तदनुषंगिक मानसशास्त्र यांचें शिक्षण देऊन सुसंस्कृत असे मार्गदर्शक तयार करावयाचे हें आहे. हे मार्गदर्शक प्राथमिक, माध्यमिक व उच्च अशा शिक्षणसंस्थांतून काम करण्यास लायक होतात. शिवाय सार्वजनिक उद्यानें व क्रीडांगणें यांची वाढ करून बहुजनसमाजाला खेळांमध्यें भाग घेतां येईल अशा तऱ्हेचे कार्यक्रम आंखण्यासहि हे लोक लायक होतात.

आपल्या देशांत योग्य नेतृत्वाखालीं देखरेख केलेलीं व नियमबद्ध अशीं क्रीडागणें फारच थोडीं आहेत, कारण, सार्वजनिक क्रीडांगणें हीं अशिक्षित समाजाला शिक्षण देणारीं केन्द्रस्थानें आहेत. त्यांमुळें लोकांनीं एकमेकांशीं मिळूनमिसळून वागण्याची संधि मिळते व त्यांना पुष्कळ आरोग्यसंवर्धक अशा चांगल्या संवयी लागतात. लोकांची कार्यक्षमता वाढते व त्यामुळें रांहणीहि सुधारते.

पुष्कळांचे पुष्कळ सुखहि यांत साधलें जातें. व्यक्तीला ज्याप्रमाणें घर, त्याप्रमाणें समाजाला क्रीडाभुवनें आवश्यक आहेत. अशीं क्रीडांगणें पुरविणें हा सार्वजनिक शिक्षणाचा एक मोठा भाग आहे. आणि तो भाग आपल्या लोकांनीं अगदीं वगळला आहे म्हणून अशीं क्रीडांगणें प्रत्येक खेडेगांवाला व शहराला झालीं पाहिजेत असें प्रांजलपणें माझें मत आहे.

येथील शिक्षणक्रम खराखेरा दोन वर्षांचा आहे. परंतु सध्यां तो सर्व एकाच वर्षात संपवितात. शरीरसंवर्धन व मानसिक उन्नति जेणेंकरून होईल असे सर्व प्रकारचे खेळ येथें शिकविले जातात. पळणें, लांब उडी मारणें, उंच उडी मारणें वगैरे नेहमींच्याच गोष्टी; पण त्या शिकवितांना आपल्या अवयवांचा पूर्णपणें फायदा करून घेऊन जास्तींत जास्त त्या चांगल्या कशा येतील इकडें लक्ष दिलें जातें. आम्हांला शनिवार व रविवार सबंध एवढीच सुट्टी मिळते. बाकी कोणत्याहि सुट्या मिळत नाहींत. सोमवार ते शुक्रवारपर्यंतचा कार्यक्रम बराच दगदगीचा असतो. रोज सकाळीं ६॥ ते ८॥ पर्यंत प्राथमिक शाळांतील, हायस्कूलमधील व कॉलेजमधील विद्यार्थ्यांकरितां जरूर असणारे असे विविध प्रकारचे खेळ व व्यायामपद्धति शिकविल्या जातात. यामध्यें स्नायुसंवर्धक व्यायाम, शरीराची उंची वाढविण्याचा व्यायाम वगैरेंचाहि अंतर्भाव होतो.

८॥ ते १० पर्यंत वेळ मोकळा असतो. नंतर १० ते १ पर्यंत ३ तास कॉलेजांतील प्रमाणें व्याख्यानें असतात. त्यांची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे.

( १ ) शारीरिक शिक्षणाचा इतिहास व तत्त्वें.

( २ ) क्रीडांगणें कशीं असावीत व तीं कशी चालवावींत याचें शास्त्र.

( ३ ) शरीरस्वास्थ्याचीं तत्त्वें ( Hygiene )
( ४ ) मानसशास्त्र, समाजशास्त्र व बालमानसशास्त्र.
( ५ ) शरीरशास्त्र ( मनुष्याच्या शरीराची रचना व त्याचीं कार्यें )
( ६ ) प्रथमोपचार व गृहशुश्रुषा.
( ७ ) निरनिराळ्या खेळांचे नियम व शास्त्र.
( ८ ) स्काउटिंग व कँपिंग

नंतर १ ते ३ जेवण, विश्रान्ति वगैरे. आठवड्यातून दोन तास मुलांना खेळ वगैरे शिकवितात. ४॥ ते ६ दुसऱ्या प्रकारचे खेळ शिकवितात. सहा वाजल्यानंतर मात्र मोकळा वेळ बराच असतो. परंतु सगळा दिवस काम केल्यानंतर मनुष्य अगदीं थकून जातो.

येथील संदर्भ ग्रंथालय फारच अप्रतिम आहे. त्यामुळें पुस्तकें विकत घेण्याचे बाबतींत विद्यार्थ्यांचे बरेच पैसे वांचतात. आमच्या संस्थेची ही माहिती व्यायामप्रेमी लोकांना उपयुक्त होईल अशी आशा आहे.

---

# रसामोद

## लेखक : प्रो. रंगाचार्य रड्डी, वांई

[ यांचा जन्म श्रीक्षेत्र वांई येथें १८७० सालीं झाला. वांई येथील रड्डी घराणें सुप्रसिद्ध असून त्यास धर्माधिकारित्वाचा मान आहे. या घराण्याचा भोर संस्थानशीं तीन पिढ्यांचा निकट संबंध आहे. रंगाचार्य यांचें संस्कृत व्याकरणशास्त्राचें अध्ययन त्यांचे वडील बाळाचार्य, सातारचे सुप्रसिद्ध विद्वान् बाळाचार्य गजेंद्रगडकर व महा म० वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांजपाशीं झालें. काव्यादर्श, मालविकाग्निमित्र, मृच्छकटिक या नाटकांवर टीका लिहिल्या असून छंदोमंजरी, न्यायसार, माध्वभाष्य वगैरे ग्रंथ त्यांनीं प्रकाशित केले आहेत. शिवाय विविधज्ञानविस्तार, लोकशिक्षण, साहित्यपत्रिका, चित्रमय जगत् वगैरेंमध्यें त्यांचे अनेक विद्वत्तापूर्ण लेख आले आहेत. हे डेक्कन कॉलेजमध्यें संस्कृतचे अध्यापक होते. सध्यां सरकारी नोकरींतून सेवानिवृत्त होऊन ते वांई येथें राहतात. ]

संस्कृत वाङ्मयांत ज्या विविध शास्त्रशाखा आहेत, त्यांत साहित्यशास्त्र, ही शाखा प्रगल्भ, विचारयुक्त व विद्वज्जनांनीं आदृत अशी आहे. या शास्त्रांत काव्यनाटकादिकांच्या स्वरूपाचें विवेचन केलें असून त्यांत काव्याचे गुणदोष, रीतिवृत्ति, शब्दार्थालंकार, ध्वनि व रस इत्यादि विषयांचें विवेचन सांगोपांग केलें आहे. यांपैकीं प्रस्तुत लेखांत काव्यांतील नवरसांचें विवेचन संक्षेपतः करणार आहोंत.

साहित्यकारांनीं शब्दाच्या अभिधा, लक्षणा व व्यंजना अशा तीन वृत्ति मानल्या आहेत. अमुक पदार्थांचा वाचक अमुक शब्द आहे, अशा संकेतानें तत्पदार्थाचें तत्तच्छब्दापासून जें ज्ञान होतें तें अभिधावृत्तीनें होतें. हा शब्दाचा अर्थ ( अभिधेयार्थ ) जर वाक्यांत अनुपपन्न होत असेल तर त्याच्याशीं संबंध असणाऱ्या अन्यार्थाची कल्पना करून वाक्यार्थ उत्पन्न करणें यांस लक्षणा म्हणतात व शब्दांच्या अभिधेयार्थापासून देश, काल, वक्ता, श्रोता इत्यादिकांच्या वैशिष्ट्यांमुळें जी अन्यार्थाची प्रतीति होते ती व्यंजनावृत्तीनें होते असें समजतात. उदाहरणार्थ 'घट' या शब्दापासून कंबुग्रीवादिमान् मृण्मय पदार्थाचा जो बोध होतो तो अभिधावृत्तीनें होतो. मी गंगेवर स्नानास जातों, येथें गंगातीरावर असा जो अर्थ प्रतीत होतो तो लक्षणेनें होय व 'सूर्य अस्तास गेला' या वाक्यापासून ब्राह्मणवर्गास संध्येची वेळ झाली, कामकरी वर्गास सुट्टीची वेळ झाली इत्यादि जे अर्थ प्रतीत होतात ते व्यंजनावृत्तीनें होतात. व्यंजनावृत्तीनें प्रतीत होणाऱ्या अर्थास व्यंग्यार्थ म्हणतात. हा व्यंगार्थ ज्या काव्यांत प्राधान्येंकरून प्रतीत होतो त्यास उत्तम काव्य असें म्हणतात शृंगार, हास्य, करुण रौद्र, वीर, भयानक, बीभत्स व अद्‌भुत असे आठ रस काव्य, नाटकें वगैरे यांत असतात. येथें रस म्हणजे प्रेम, हास्य, शोक, उत्साह वगैरे मनोवृत्ति पूर्ण विकसित झाल्या असतां जो आनंद होतो तो होय. हा आनंद केवळ शृंगार, हास्य वगैरे शब्द उच्चारले असतां प्रतीत होत नाहीं म्हणून, रस हा शब्दानें वाच्य समजला जात नाहीं. या रसानंदाचा अनुभव त्या त्या रसाचे विभाव ( प्रथम प्रतीति करून देणारीं कारणें ) अनुभाव ( रसोत्पत्ति झाली असतां उत्पन्न होऊन रसाची कल्पना करून देणारीं कार्यें ) व व्यभिचारि-

भाव ( रसप्रतीति सुरू झाली असतां मधूनमधून स्वप्रतीतीनें रसाचा परिपोष करणारे पदार्थ) यांच्या संयोगापासून होत असतो. म्हणजे हे पदार्थ दृष्टीस पडले असतां अथवा शब्दानें प्रतीत झाले असतां, प्रेक्षक अथवा वाचक यांस तो तत्तद्रसांचा आनंद अनुभवास येऊं लागतो. वस्तुतः रस हा शब्दच जर रसानंदाचा वाचक आहे तर रसानंद अथवा रसचर्वणा असें व्यवहारांत प्रयोग कसे करतात या शंकेचें विज्ञानवादाचा स्वीकार करून अलंकारिकांनीं समाधान केलें आहे. बौद्धांत विज्ञानवादी म्हणून एक पंथ आहे. त्यांच्या मतें ज्ञानावांचून इतर सर्व पदार्थ मिथ्या आहेत. व्यवहारांतील मृण्मय घट हा खरा पदार्थ नासून बुद्धींत जो संस्काररूपानें घटपदार्थ प्रतीत होत असतो तोच सत्य होय. 'मी घट जाणतों ' या ज्ञानांत जाणणें व घट हे दोन्ही पदार्थ ज्ञानस्वरूपींच आहेत व त्यांत विषयविषयीभाव आहे. म्हणजे ज्ञानस्वरूपी घट हा विषय व त्याचें ज्ञान हा विषयीं असें ज्ञानच विषयविषयीभावानें युक्त आहे. त्याप्रमाणेंच प्रस्तुत ठिकाणीं रसानंद हाच विषयीं व विषय अशी आनंदाचीच दोन स्वरूपें मानून उपपत्ति करतां येतें. रसानंद हा लौकिक आनंदाहून भिन्न आहे. उदाहरणार्थ, स्त्रीपुरुषांच्या व्यवहारांतील प्रणयलीलेपासून त्या परस्परांत जी प्रेमवृत्ति उद्भूत होते तीस शृंगाररस म्हणत नाहींत तर त्या प्रणयलीलेच्या अनुकरणदर्शनानें अथवा काव्यांतील त्या प्रसंगाच्या वर्णनानें प्रेक्षक अथवा वाचक यांची प्रेमवृत्ति उल्लसित झाली असतां जो आनंद होतो त्यास रस म्हणतात. अर्थात् रसाचा भोक्ता प्रेक्षक अथवा वाचकच होय. हा नायक शृंगारी आहे अथवा हें नाटक शृंगारपरिपूर्ण आहे हे प्रयोग लाक्षणिक आहेत. म्हणजे त्या नाटकाच्या प्रणयलीलेनें अथवा नाटकांतील वर्णनानें प्रेक्षक व वाचक यांच्या मनांत प्रेमानंद उद्भूत होतो म्हणून त्या नायकास अथवा नाटकास शृंगारयुक्त समजावयाचें. याच दृष्टीनें आणखी एक पायरी पुढें जाऊन कवीसहि शृंगारी म्हणण्याचा प्रघात पडला आहे. परंतु रसास्वादी हाच खरा रसानंदाचा अनुभव घेणारा म्हणून तोच शृंगारी होय.

आतां प्रेक्षक अथवा वाचक यांस या रसानंदाची प्रतीति कशी होते याचा थोडासा विचार करूं. भरताच्या नाट्यशास्त्रावरील नाट्य-विवृत्ति या

टीकेंत अभिनवगुप्तानें लोल्लट, शंकुक, भट्टनायक या तिघांच्या मतांचा गोषवारा देऊन शेवटीं आपलें मत सांगितलें आहे. " विभावानुभाव व्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पत्तिः " असें भरताचें रसाविषयींचें लक्षणसूत्र आहे. यांतील विभावादिकांचे वर अर्थ दिलेच आहेत. लोल्लटाच्या मतें विभावानें ( नायिकादिक जीं उत्पत्तिकारणें त्यांनीं ) नायकाचे ठिकाणीं रस उत्पन्न होतो. अनुभवानें ( नायकाच्या ठिकाणीं उद्भूत होणाऱ्या स्वेदादि विकारांनीं ) तो स्पष्ट केला जातो व चिंता उत्कंठा इत्याहि व्यभिचारी भावांनीं परिपुष्ट होतो. हा वर्ण्य जे रामादि नायक त्यांचे ठिकाणींच वस्तुतः असतो; परंतु त्यांचें अनुकरण करणारे जे नट वगैरे त्यांचे ठिकाणींहि अनुकरणकौशल्यानें तो भासतो व त्यामुळें सहृदय प्रेक्षकादिकांना चमत्कार वाटून आनंद होतो. अर्थात् रस हा मुख्यतः रामादिक नायिकांचे ठिकाणींच असतो. प्रेक्षकांना नटाचे ठिकाणीं तो पाहून चमत्कार वाटतो व त्यामुळें आनंद होतो.

या भट्टलोल्लटाच्या मतावर रामदिकांच्या ठिकाणीं असणाऱ्या शृंगारादि रसांनीं प्रेक्षक व वाचक यांच्या ठिकाणीं चमत्कारपूर्वक आनंद का व्हावा याची उपपत्ति बरोबर होत नाहीं. कारण लोकव्यवहारांत प्रेमोत्पत्ती एका व्यक्तीचे ठिकाणीं व आनंद दुसऱ्या व्यक्तीला असा अनुभव नाहीं. शिवाय कवीनें 'वर्णिलेल्या गोष्टी खऱ्या रामाच्या हातून घडलेल्या आहेत कीं नाहींत हें निश्चयानें सांगतां येत नसल्यामुळें खऱ्या रामाचें ठिकाणीं तरी या वर्णनाप्रमाणें रत्यादिभाव प्रकट झाले आहेत कीं, नाहींत याविषयीं वादच आहे. नटालाहि मूळ रामाची कृति माहित नसल्यामुळें तो रामाचें अनुकरण करतो या म्हणण्यांतहि अर्थ नाहीं. तेव्हां भट्टलोल्लटानें केलेला अर्थ भट्टशंकुकप्रभृतींस मान्य नाहीं. म्हणून शंकुक ' विभावानुभाव ' या सूत्राचा अर्थ पुढीलप्रमाणें करतो.

वास्तवज्ञान, मिथ्याज्ञान, संशयज्ञान व सादृश्यज्ञान हे जे ज्ञानाचे चार प्रकार त्याहून भिन्न अशा ज्ञानानें चित्रतुरगन्यायानें ( भिंतीवर काढलेलें घोड्याचें चित्र पाहून त्यास जसें आपण घोडा म्हणतो त्या पद्धतीनें ) रामादि अनुकार्य पदार्थांचा बुद्धीनें गृहीत जो नट ( अनुकरण करणारा पुरुष ) त्यानें काव्यांत वर्णन केलेल्या गोष्टींच्या अनुसंधानामुळें व अनु-

करणाच्या शिक्षणामुळें वाचकांस अथवा प्रेक्षकांस, दाखविलेलें जें कार्य-कारण-सहकारी-पदार्थ, ज्याला विभावानुभावव्यभिचारिभाव असें सूत्रकारांनीं ( भरतमुनींनीं ) म्हटलें आहे त्यांच्या संयोगापासून म्हणजे गम्यगमकभाव संबंधापासून ( साध्यत्वहेतु या संबंधामुळें ) रसाचें अनुमान होतें. आतां येथें कोणी शंका घेईल कीं, अनुमानानें रसानुभवानंद उत्पन्न होणें शक्य नाहीं. कारण धूमामुळें वन्हीचें अनुमान झालें तरी त्या अनुमित वन्हीपासून दाहकादि कार्यें होत नसतात. तसेंच अनुमित रसापासूनहि रसाचीं कार्यें जीं आनंदादिक तीं होणार नाहींत. परंतु प्रकृत स्थळीं तर सहृदयप्रेक्षकांला रसानंद प्रतीत होत असतो. तेव्हां ही गोष्ट नेहमींच्या अनुमानाविरुद्ध आहे, तर यावर उत्तर असें आहे कीं, या अनुमित होणाऱ्या रसाचें माहात्म्यच असें आहे कीं, तो अनुमित असूनहि अनुमात्याचे ठिकाणीं आनंद उत्पन्न करतो. हा रस वस्तुतः नटाचे ठिकाणीं नसतांनाहि सहृदयांनीं त्याचे ठिकाणीं तो आहे असे मानिलेले जे रत्यादिभाव त्यांस रस म्हणावें. तात्पर्य, नटाचे ठिकाणीं विभावादि पदार्थांनीं रतीचें अनुमान करून त्या चमत्कृतीचा अनुभव घेणें हाच रस होय असा शंकुकाचा अभिप्राय आहे.

अनुमानानें ज्ञात होणारे पदार्थ हे चमत्कृतीला ( स्वजन्य आनंदादि-काला ) कारण होत नसतात. प्रत्यक्ष असणाऱ्या पदार्थांच्या ठिकाणींच ती शक्ति आहे. तेव्हां नटाच्या ठिकाणीं अनुमितीनें ज्ञात होणाऱ्या रसापासून अनुमान करणाऱ्या रसिकाला रत्यादिकांचा आनंद होणें युक्त नाहीं, असा या अनुमानवादी शंकुकप्रभृतीवर भट्टनायकादिकांचा आक्षेप आहे. ते भरताच्या 'विभावानुभाव' या सूत्राचा पुढीलप्रमाणें अर्थ करतात:—रसास्वादाचे वेळीं रामादिनायक ( अनुकार्य ) नट ( अनुकर्ता ) व प्रेक्षक असे तीन पदार्थ प्रामुख्यानें उपस्थित असतात. त्यांत अनुकार्य रामादिक व अनुकर्ते नटादिक हे तटस्थ म्हणजे या वेळीं उदासीन असतात. कारण रसास्वाद ते अनुभवीत नसतात. आतां प्रेक्षक रसास्वादाचा अनुभव घेत असला तरी त्याला रसप्रतीति अनुमानानें अथवा उत्पत्तीनें किंवा व्यंजनेनें होते असें मानितां येत नाहीं. कारण विभावादि पदार्थ असत्य असल्यामुळें त्यांवरून सत्य रत्यादिभावाचे नटाचे ठिकाणीं अनु-

मान करतां येत नाहीं. आतां नटाच्या ठिकाणीं अनुकरणाभ्यासामुळें त्यांचें अनुमान होतें असें मानिलें तरी प्रेक्षकाच्या ठिकाणीं वस्तुतः तें नसल्यामुळें त्यापासून प्रेक्षकाला आनंद होणार नाहीं. म्हणून रसानंदाच्या विवेचनांत अनुमान व्यर्थ आहे. आतां विभावादिकानीं रस उत्पन्न होतो म्हणावा तर ते विभावादिक नायकासंबंधानें असल्यामुळ त्यापासून प्रेक्षकाला रसानंद होणें शक्य नाहीं. कारण विभाव एकाचे व आनंद तिसऱ्यालाच अशी उत्पत्ति-पक्षावर आपत्ति येते. आतां रसप्रतीति प्रेक्षकांना विभावादिकांनीं अभिव्यक्त केली जाते म्हणावें तर सिद्ध पदार्थच आभिव्यक्त होतात. असिद्ध पदार्थांची अभिव्यक्ति होत नसते. घटरूपी पदार्थ असेल तरच दीपादिकांनीं त्याची अभिव्यक्ति होईल. तोच जर मुळांत नसेल तर शेंकडो मशाली पेटवूनहि तो अभिव्यक्त होणार नाहीं. तसेंच येथें प्रेक्षकांच्या मनांत सीतादिनायिका-विषयीं रत्यादिक नाहींत तर सीतादिविभावांनीं ते प्रतीत होणार कसे? तात्पर्य, रस हा प्रेक्षकाचे ठिकाणीं अनुमित, उत्पन्न अथवा अभिव्यक्त होतो असें मानितां येत नाहीं. तेव्हां भट्टनायकाच्या मतें काव्यनाटकांमध्यें शब्दाचे अभिधा-व्यापाराप्रमाणें भावकत्व व भोजकत्व हे दोन विशेष व्यापार असतात. त्यांत अभिधाव्यापारानें अर्थाची प्रतीति होते. भावकत्व व्यापारानें नायकादि आलंबन पदार्थांचे देश, काल, वगैरे गोष्टींनीं असणारें जें वैशिष्ट्य तें जाऊन त्या पदार्थांस साधारण्य प्राप्त होतें. उदाहरणार्थ, दुष्यंताचा शकुंतलेविषयीं जो अनुराग कालिदासानें वर्णिला आहे तो वाचकानें वाचला असतां अभिधा-वृत्तीनें त्यांतील पदांचा व वाक्याचा अर्थबोध होतो पुढें भावकत्व-व्यापारानें दुष्यंतत्व, शकुन्तलात्व कण्वाश्रमरूपीं स्थलविशेषत्व व तत्कालीन विशिष्ट कालत्व हीं नष्ट होऊन साधारणपणें नायकत्व, नायिकात्व, सामान्यस्थल व काल अशीं साधारणभावानें प्रेक्षकांत भावना उत्पन्न होते व नंतर त्यांच्यांत सत्वोद्रेक होऊन त्यामुळें होणाऱ्या आनंदरूपी ज्ञानाच्या पूर्ण विकासानें त्याला केवळ आनंदानुभव होतो. येथें नटाचें ठिकाणीं अनुमितीनें अथवा अनुकार्यांच्या (रामादिकांच्या) ठिकाणीं विभावादिकामुळें रति अनुमित होते अथवा उत्पन्न होते असें न मानतां ती भावकत्व व्यापारानें विभावादि पदार्थांत साधारण्य आलें असतां भोजकत्वव्यापारानें प्रेक्षक तिचा आस्वाद घेतो असें

सांगितलें असल्यामुळें रतीचा आस्वाद अनुकार्य रामादिक अथवा अनुकर्ते नट यांच्या ठिकाणीं नसून तो प्रेक्षक व वाचक यांच्या ठिकाणीं असतो असें सिद्ध होत आहे व पूर्वी लोल्लटाच्या मतें अनुकार्याचे ठिकाणीं मुख्यतः रसोत्पत्ति, अनुकर्त्याच्या ठिकाणीं आरोपित रसोत्पत्ति व या ज्ञानानें प्रेक्षकास आनंद किंवा भट्ट शंकुकाच्या मतें नटाच्या ठिकाणीं अनुमानानें रत्यादि भावाची प्रतीति व त्यामुळें प्रेक्षकास आनंद अशी जी अव्यवस्थित परंपरा होती ती नष्ट होऊन शब्दाच्या भोजकत्वव्यापारानें प्रेक्षकासच रत्यानंद होतो असें म्हटलें आहे तें विशेष युक्त आहे.

या भट्ट नायकाच्या मतांत भावकत्व व भोजकत्व हे शब्दाचे ठिकाणीं दोन विशेष-व्यापार कोणीहि न मानलेले-मानावें लागत असल्यामुळें व भावकत्वव्यापारानें साधारणीभाव होतो म्हणून जें सांगितलें आहे तें अनुभवास कांहीं ठिकाणीं पटकारें नसल्यामुळें अभिनवगुप्तास भरतसूत्राचा हा अर्थ अभिप्रेत नाहीं. त्याच्या मतें लोकांमध्यें प्रमदादि पदार्थांच्या योगानें अंतःकरणांत प्रेमादिवृत्ति उद्भूत होतात हें अनुमानानें जाणण्याचें ज्यांच्यांत कौशल्य आहे अशा रसिकांच्या मनांमध्यें काव्यनाटकादिकांतील विभावादि पदार्थ हे साधारणपणें प्रतीत होतात. ( कारण ते विभावादि पदार्थ स्वसंबंधीं मानिले तर समाजांत स्वभार्येबरोबर विलास करण्यास जसा संकोच होतो तसा होऊं लागेल. ते विभावादिपदार्थ शत्रुसंबंधी समजावें तर त्याच्या दर्शनानें द्वेष उत्पन्न होईल. प्रेम तर दूरच राहील. त्यांच्या ठिकाणीं तटस्थ वृत्ति मानिली तर अशा प्रेक्षकांना रसास्वाद कसा मिळणार म्हणून त्या पदार्थांच्या ठिकाणीं प्रेक्षकांचा कोणताच संबंध दाखवितां येत नसल्यामुळें ते साधारपणें प्रतीत होतात असें म्हटलें आहे. ) नंतर त्या पदार्थांनीं प्रेक्षकांच्या मनांत वासनारूपानें असणारा जो रत्यादिभाव तो व्यक्त झाला म्हणजे त्यास रस म्हणतात. या ठिकाणीं रत्यादिभाव हे वर सांगितल्याप्रमाणें साधारणीभूत अशा विभावादीकापासून प्रतीत होते असल्यामुळें रसास्वेत्याच्या ठिकाणचेंहि परिमितत्व तेंहि नष्ट होऊन साधारण्यानेंच त्याचें त्याला भान होतें असा अभिनवगुप्ताचा आशय आहे. येथें विभावादि पदार्थांच्या ठिकाणीं जें साधारण्य मानिलें आहे तें त्यांचा प्रेक्षकांशीं कोणत्याहि प्रकारें संबंध दाखवितां येत

नाहीं म्हणून मानिलें आहे तें शब्दांच्या भावकत्वव्यापारानें मानिलेलें नाहीं. तसेंच प्रेक्षकाचे ठिकाणीं अपरिमितप्रमातृत्व जें मानिलें आहे, तेंहि साधारण विभावादिकांपासून व्यक्तिविशेषनिष्ट रत्यादिभावांची प्रतीति मानणें युक्त नव्हे म्हणून समजावें. तसेंच या मतांत प्रेक्षकांच्या ठिकाणींच सूक्ष्मरूपानें रत्यादिभावाची स्थिति मानिली आहे. भट्टनायकानें तशी मानिली नाहीं. भट्टनायक भोजकत्व-व्यापारानें रसाची प्रतीति मानितो. अभिनवगुप्त विभावादिकांमुळें व्यंजनावृत्तीनें रस प्रतीत होतो असें मानितो. याप्रमाणें भट्टनायकाच्या व अभिनवगुप्ताच्या मतांत फरक आहे.

जगन्नाथानें, काव्यांमध्यें किंवा नाटकांमध्यें वर्णिलेल्या विभावादि पदार्थांनीं शकुंतलादिकाविषयींचें प्रेम दुष्यंतादिकांच्या ठिकाणीं व्यंजनावृत्तीनें प्रतीत झालें असता नंतर पुढें सहृदयतेनें विकसित झालेली प्रेक्षकांच्या ठिकाणीं जी भावना त्या भावनादोषानें प्रेक्षक हा स्वतःच्या ठिकाणीं दुष्यंतत्वाची कल्पना करीत असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होणारा जो रत्यादिभाव त्यास रस म्हणावें असें रसाचें विवेचन करून त्याविषयीं बरीच चर्चा केली आहे. जगन्नाथ व अभिनवगुप्त हे रसोद्भूति नायक अथवा नट यांच्या ठिकाणीं न मानितां ती सहृदय प्रेक्षकांच्या ठिकाणींच मानितात. जगन्नाथानें ही गोष्ट "रसस्य सामाजिकवृत्तित्वेन नायकाद्यवृत्तित्वात्" अशा शब्दांनीं स्पष्ट सांगितली आहे.

आतां या रससंबंधानें एकदोन महत्त्वाच्या गोष्टींचें विवेचन करून हा लांबलेला निबंध संपवूं. कांहीं विद्वानांची अशी शंका आहे कीं, रस हे जर सुखात्मक आहेत तर करुण, बीभत्स व भयानक या रसांपासून दुःख, किळस व भीति हीं कशीं उत्पन्न होतात? कारण या भावना सुखावस्थेंत उत्पन्न होत नसतात. आतां याची उपपत्ति होण्याकरतां कांहीं रस दुःखादिभावांनीं युक्त आहेत असें कोणी म्हणेल तर अशा रसाच्या वर्णनाकडे सहृदयांची प्रवृत्ति कशी होते, याविषयीं प्राचीन विद्वानांनीं दोनतीन प्रकारें उपपत्ति केली आहे. त्यांतील एक उपपत्ति अशी आहे कीं, अशा वर्णनापासून प्रथमतः दुःखादि भावना जरी जागृत झाल्या तरी शेवटीं सुखोत्पत्तीच होते. तात्पर्य दुःखादि भावना स्वल्पकालावस्थायी व प्रसंगतः आलेल्या असतात. त्यांना

कवीनें प्राधान्य दिलेलें नसतें. व त्यांचें जें वर्णन केलेलें असतें त्याचें शेवटीं समुचित सुखांतच पर्यवसान केलेलें असतें म्हणून करुणादि रसास्वादाकडे सहृदयांची प्रवृत्ति होत असते. कांहीं विद्वान वेदांतमतप्रक्रियेनें या शंकेचें समाधान करतात. त्यांच्या मतें आत्मा हा आनंद व चैतन्यस्वरूपी आहे. परंतु अज्ञानोपाधीनें त्यांचें तें स्वरूप आपणांस प्रतीत होत नाहीं. विभावादि पदार्थांनीं आत्म्याच्या आनंदस्वरूपाचें आच्छादक जें अज्ञान त्याचा भंग होतो. त्यामुळें आनंदाची प्रतीति होते. करुणादिक रसांत त्यांच्या विभावादिकांनीं याप्रमाणें आवरणांशाचा भंग झाला असतां त्याचें आनंदस्वरूप प्रतीत होत असतें. काव्यांतील विभावादि पदार्थांपासून प्रतीत होणारा शोक हा लौकिक शोकाप्रमाणें द्वेष्य नसल्यामुळें त्याचीहि अंशतः प्रतीति होऊन अश्रुपातादि कार्यें होतात. असें होत असलें तरी आनंदांशाच्या अज्ञानावरणाचा भंग झाला असल्यामुळें प्राधान्येंकरून व आनंदच पार्यंतिक येथें प्रतीत होतो. तिसरी अशीहि उपपत्ति करतां येईल कीं, शोक हाहि कांहीं ठिकाणीं पार्यन्तिक दृष्टीनें सुखावह होत असतो. मुलीचें श्वशुरगृहीं गमन अथवा मुलाचें शिक्षणादि महत्त्वाच्या कार्याकरतां दूरदेशीं प्रयाण यावेळीं त्यांच्या मातापितरांस एक प्रकारें वियोगदुःख होत असतेंच. परंतु पार्यन्तिक सुखाच्या भावनेनें त्या कार्याविषयीं समाधान वृत्तिहि उद्भूत होत असते. शिवाय काव्यांत अथवा नाटकांत शोकादिकाचें स्वरूप असें कांहीं व्यवस्थित मांडलें असतें कीं, त्यामुळें प्रेक्षकांस अनुचित विह्वलीभाव प्राप्त न होतां योग्य रीतीनें त्यांचा आस्वाद घेतां येतो. कदाचित शोकाचें वर्णन झालें असेल तर त्या शोकाच्या आलंबनाविभावाच्या ठिकाणीं अद्वितीय कर्तव्य, उदात्तमनस्कता, अद्वितीय धैर्य, वगैरे गोष्टी दाखविल्या असल्यामुळें त्या आनंदापुढें शोकाची प्रखरता नष्टप्राय होते व त्यामुळें अशा काव्याकडे अथवा नाटकाकडे सहृदय जनांची प्रवृत्ति होते. यासंबंधानें पुष्कळ लिहिण्यासारखें आहे. परंतु विस्तार बराच झाल्यामुळें सध्यां येथेंच थांबून आणखी एखाद्या प्रसंगीं तें करूं एवढेंच वाचकांस सांगून हा विषय पुरा करूं.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मराठी वाचकांस रस व भाव याविषयीं बरीच भ्रांति असते ही होय. बरेच मराठी वाचक भावास रस समजतात. तेव्हां त्या

विषयीं थोडीशी चर्चा करूं. देवतादिकांविषयींचें प्रेम, विषयाच्या वर्णनप्रसंगानें रसाला प्राधान्य न देतां अंगत्वानें तो दाखविणें, इत्यादि ठिकाणीं संस्कृत साहित्यकार रत्यादि स्थायिभाव विभावादिकांनीं परिपुष्ट असले तरी त्यांस मानीत नाहींत तर भाव मानतात. उ. " हे हेरम्ब, किमम्ब, रोदिषि कथं, कर्णौलुठत्यग्निभूः, । किं ते स्कन्दाविचेष्टितं, मम पुरा संख्या कृता चक्षुषाम् ।। नैतत्तेऽप्युचितं गजास्य चरितं नासामिमीतेऽम्ब, मे । तावेवं सहसा विलोक्य हसित व्यग्रा शिवा पातु वः ।। " याचा अर्थ स्पष्टच आहे. येथें हास्यरसाचे स्थायिभाव, विभावानुभाव वगैरे सर्व आहेत परंतु हें हास्यरसाचें उदाहरण होत नाहीं. कारण ' शिवा पातुवः ' या वाक्यानें येथें कवीचा पार्वतीविषयींचा भाव स्पष्ट होत आहे. व त्या भावाचें हें हास्यरसात्मक वर्णन अङ्गभूत आहे. त्यामुळें त्यास गौणत्व आलें आहे. म्हणून हें हास्यरसाचें उदाहरण न समजतां हास्यभावाचें समजणें उचित होय. " श्रुत्वा षडाननजनुर्मुदितान्तरेण पञ्चाननेन सहसा चतुराननाय । शार्दूलचर्म भुजगाभरणं सभस्म दत्तं निशम्य गिरिजाहसितं पुनातु ।। " हें षडाननाच्या (कार्तिकस्वामीच्या) जन्मकाळीं शंकराची जी धांदल झाली त्याचें वर्णन आहे. याचा अर्थ ' आपल्याला षण्मुख पुत्र झाल्याचें ऐकून ज्याला आनंद झाला आहे अशा पंचाननानें ( शंकरानें ) चतुराननाला ( ब्रह्मदेवाला ) आपलें व्याघ्राजिन, नागभूषणें, भस्म वगैरे सर्व पदार्थ देऊन टाकिले ( पुत्रजन्मकालीं आनंदानें ब्राह्मणादिकांना भूषणें वगैरे देण्याचा सांप्रदाय आहे. त्यास अनुसरून हें वर्णन आहे. ) हें पाहून गिरिजेनें ( पार्वतीनें ) जें स्मित केलें तें तुमचें रक्षण करो, असा आहे हें समुचित हास्यरसाचें उदाहरण आहे. कारण येथें ' गिरिजाहसितं पुनातु ' असें हास्याला प्राधान्य दिलें आहे. याप्रमाणें शृंगारवीरादिकांची रसाचीं व भावाचीं भिन्न भिन्न दाखविलेलीं उदाहरणें रसगंगाधर, रसतरंगिणी वगैरे ग्रंथांत पहावींत.

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून वाचकांना संस्कृतांतील रसाचें स्वरूप, त्याचा आनंदानुभव कसा होतो या विषयीं भट्टलोल्लट प्रभृतींचीं मतें, करुणबीभत्सादि रसास्वादाविषयीं वाचकाची प्रवृत्ति कशी होते वगैरे गोष्टी थोड्याशा समजून येतील. वस्तुतः रसाची माहिती द्यावयाची म्हणजे त्या

प्रत्येकाचे विभावानुभवादि पदार्थ, त्यांचीं उदाहरणें कोणत्या रसापासून कोणत्या रसाची उत्पत्ति संभवते, त्यांच्यांतील शत्रुमित्रभाव, त्यांच्या वर्णनांतील उचितानुचितत्व, इत्यादि गोष्टींचें विवेचन करावयास पाहिजे होतें. या सर्व गोष्टींचें विवेचन करून लिहावयाचें म्हणजे तो एक ग्रंथच होईल. परंतु इतका कालस्थलावकाश सध्यां नसल्यामुळें सध्यां या चार ओळी लिहिल्या आहेत त्या वाचकांनीं गोड मानून घ्याव्या अशी नम्र विनंति आहे.

---

## विदुराच्या कण्या

लेखक : चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए. एल्एल्. बी., वकील

[ यांचा जन्म मांगदरी येथें १८८८ सालीं झाला. त्यांचा शिक्षणक्रम नूतन मराठी विद्यालय पुणें व फर्ग्यूसन कॉलेज पुणें येथें होऊन ते १९१४ सालीं बी. ए. व १९१९ सालीं एल्एल्. बी. पास झाले. सध्यां ते पुण्यास वकील आहेत. त्यांनीं श्री स्वराज्य कथा या नांवाचें एक ओवबिद्ध काव्य लिहिलें आहे. ]

चवदा विद्या व चौसष्ट कला अवगत असणाऱ्या व्यक्ती या युगांत पहावयास मिळत नाहींत. एक शाखा अगर शाखेची उपशाखा यांत प्रवीण असणाऱ्या व्यक्ति आढळतात. पोटापाण्याचा प्रश्नच हल्लीं इतका जाणवूं लागला आहे कीं, कोणच्याहि सरस्वतीभक्ताला प्रपंचाकडे कानाडोळा करून आपल्या आराध्यदेवतेची उपासना यथासांग करितां येत नाहीं. जे ग्रंथ प्रकाशित झालेले आपण पाहतों त्यांत डॉक्टर, वकील, व्यापारी वर्गानें लिहिलेल्या ग्रंथांचें प्रमाण अगदीं अल्प आहे. वर्तमानपत्रांचे संपादक, प्रोफेसर, शिक्षक यांचे हातून बरेच ग्रंथ लिहिले जातात. ज्ञानेश्वरी, दासबोध असे अलौकिक ग्रंथ ईश्वरप्रसादाशिवाय लिहिले जात नाहींत. उत्तम ग्रंथ हातून लिहिला जाणें हें पुत्रजन्मापेक्षांहि अधिक आनंददायक असतें. कालिदास, मुक्तेश्वर, मोरोपंत वगैरे कवि व ग्रंथकार चालू पिढीलाहि माहीत आहेत. परंतु कालिदासाच्या वेळेचा लक्षाधिपती कोणाच्याहि लक्षांत नाहीं. श्री आणि सरस्वती या एके टिकाणीं फार क्वचितच आढळतात.

श्रीचें प्राबल्य व शोभा तात्कालीन परिस्थितींत दिसते. पण सरस्वतीचें प्राबल्य व शोभा भविष्यकाळीं टिकणारीं असतात. उत्तम ग्रंथ लेखकाचें नांव अजरामर करितो. विद्यादेवीची आराधना करून ती प्रसन्न होण्यासहि खडतर तपश्चर्या लागते. निसर्गतः गोड आवाज जरी असला तरी संगीताच्या शास्त्रोक्त अभ्यासानें गायनाला जी माधुरी व ठेकेदारपणा येईल तो अनभ्यासानें येणार नाहीं. तसाच प्रकार उत्तम बुद्धिमत्ता, कल्पकता, दृढस्मृति, ग्राहकता व रचनाचातुर्य यांचा आहे. नित्य अभ्यासाशिवाय ग्रंथाला पैलू पडत नाहींत, व पैलूशिवाय ग्रंथाची शोभा उठावदार दिसत नाहीं. विश्वविद्यालयाचे पदवीधर झाल्यानंतर आजन्म विद्यार्थी रहाणारे पदवीधर कमी, त्यांतून लेखनव्यवसाय करणारे फारच कमी. आजन्म कोणत्या विद्येचा व्यासंग करावा, हा विचार मनांत येतो तेव्हां प्रत्येक ठिकाणीं मनाचा हिरमोड होतो. सर्वांना सर्व परिस्थितींत आराधना करण्यासारखी वेदांतविद्या होय. महाराष्ट्रीय साधुसंतांनीं ती समजण्यास सुलभ केली आहे. मी स्वतःच ब्रह्म आहे या भावनेनें ती रंकाला राज्यपदापेक्षांहि समाधान देण्यास समर्थ असते. दुःखांत ती त्याला सुखाचा आस्वाद देते. तसेंच नश्वर सुखापेक्षां शाश्वत सुखांकडे लक्ष्मीपुत्रांना व नृपपुत्रांना वळविण्यास व त्यांचे अंगी विनय आणण्यास व सर्व ईश्वराचेच अंश आहेत ही भावना त्यांच्यांत जागृत करण्यास वेदांतविद्येची आराधना उपयोगीं पडते. स्विच् दाबला म्हणजे विजेचा दिवा लागून प्रकाश मिळतो व विजेचा पंखा फिरावयास लागतो. परंतु स्विच् कोठें आहे हें समजलें पाहिजे. तें समजण्यास कधीं कधीं अडाणी माणसांस तज्ञ माणसांची जरूर लागते. तद्वतच वेदांतांत कांहीं व्यक्तींना गुरू करावा लागतो व मग वेदांताविद्येचा प्रकाश उपासकाला मिळतो. वद्य एकादशीला आळंदीला होणारी गर्दी पाहिली, साधूंचे उत्सवांतील भक्तिभाव पाहिले, ज्ञानेश्वरी व अभंग मुखोद्गत झालेले पाहिले म्हणजे पोटापाण्याच्या विद्येपेक्षां ती जास्त सुख देणारी विद्या आहे हें निराळें सांगणें नको. गुलाब, मोगरा अशीं सुवासिक फुले, आंबे व द्राक्षें अशीं मधुर फळें उत्पन्न करणारी जी भूमि तीच बाभळी व निवडुंग उत्पन्न करिते. तद्वतच मनोभूमींत निरनिराळ्या वासना निरनिराळीं फलें उत्पन्न करितात. व वासनेची जितकी

तीव्रता तितकी ती लौकर फलद्रूप होते. त्याचप्रमाणें विद्यादेवीच्या आराधनेचें आहे. पिंजऱ्यांत अडकलेल्या पक्षाला भरारी मारणें जसें शक्य नसतें, तसेंच विद्यादेवीची आराधना करणें पोटापाण्याच्या पिंजऱ्यांत अडकलेल्या सरस्वतीभक्तांस अशक्य असतें. प्रपंचव्यवसायांत पडलें म्हणजे जगाच्या त्या गोलार्धांतून निघून विद्यादेवीच्या प्रदेशांत येण्यास सुट्टीच मिळत नाहीं. अवकाश मिळालाच तर तो इतका थोडा मिळतो कीं, फक्त दर्शनसुखच मिळतें. आराधना केलीच तर यथासांग घडत नाहीं व घडलेल्या आराधनेचे अनुभव सांगण्यास पुनः संधि मिळत नाहीं. सरस्वतीदेवीचे भक्त आपली सुवासिक भक्तिफुलें अर्पण करून त्याचें तोरण गुंफीत असतांना माझ्या हातून पुष्प तर राहोच पण निर्गंध पान तरी प्रपंचव्यवसायामुळें वाहिलें जावूं नये हें मनाला बरें वाटेना म्हणून ही अल्पसेवा अर्पण केली आहे.

---

### बंगाली विशेषतः रवींद्रवाङ्मयांतील

## स्त्रीस्वभावपरिपोष

लेखक : रामचंद्र गोविंद कानडे, वाङ्मयविशारद पुणें.

[ यांचा जन्म ४-५-१९०० रोजीं भोर येथें झाला. यांचें घराणें मूळचें वाईचें, परंतु गेलीं कित्येक वर्षें श्रीमंत पंतसाचिवांचे आश्रित म्हणून तें भोर येथेंच आहे. यांचें दुय्यम शिक्षण भोर हायस्कूलमध्यें होऊन मॅट्रिक झाल्यावर ते पुण्यास न्यू पूना कॉलेजांत कांहीं काल होते. असहकारितेच्या पहिल्या चळवळींत त्यानीं कॉलेज सोडलें व पुढें राष्ट्रीय शिक्षणसंस्थेंत अभ्यास करून त्यांनीं टिळकविद्यापीठाची वाङ्मयविशारद ही पदवीपरीक्षा दिली. याच वेळीं खाजगी रीतीनें अभ्यास करून त्यानीं व्यापारविषयाच्याहि परीक्षा दिल्या. नंतर पुणें येथें निघालेल्या वृत्तपत्रशिक्षणाच्या संस्थेंत अभ्यास करून त्यांनीं १९२४-२५ मध्यें मुंबईच्या दैनिक लोकमान्यांत उपसंपादक म्हणून काम केलें. प्रकृति-अस्वास्थ्यामुळें त्यांना पुढें मुंबई सोडावी लागली. विजापुरकरांच्या नवीन समर्थ विद्यालयांत ते कांहीं काल शिक्षक होते. तेथें असतांना

रवींद्रनाथ ठाकूर व विजापुरकर चरित्र हीं दोन विस्तृत चरित्रें त्यांनीं लिहिलीं. गेल्या वर्षीं त्यांनीं लिहिलेलें इंग्रजी पुस्तक Library Handbook and Index हें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. लोकमान्य दैनिकांतून त्यांची वर्तमानपत्रें वर्तमानपत्र-कर्ते ही लेखमाला प्रसिद्ध झाली आहे. गेली चार पांच वर्षें ते पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश' पत्रांत उपसंपादक म्हणून काम करीत आहेत. कांहीं स्वतंत्र चारित्रपर व प्रवासवर्णनपर असे त्यांचे कांहीं लेख याच पत्रांत प्रसिद्ध झाले आहेत ].

बंगाली वाङ्मयाच्या अभ्यासकांना बंगाली वाङ्मयांत स्त्रीजातीसंबंधानें दिसून येणारा अत्यादर, आणि पुरुषांपेक्षां स्त्रीचे ठिकाणीं देवतत्त्व कल्पून 'आदिमाता' 'शक्ति' 'दुर्गा' वगैरे अनेकरूपांनीं तिचें भजन करण्याची प्रथा इत्यादि गोष्टी अवलोकनपथांत येतात. या महिलापूजनाचें मूळ कोणत्या तरी विशिष्ट काळच्या समाजरचनेंत असलें पाहिजे अशी शंका आल्यावांचून रहात नाहीं.

साहित्य हें तत्कालीन समाजाचें उठावदार चित्र असतें. साहित्य—प्रगति कशी झाली आहे हें पाहतांना आपणांस समाजाचीं निरनिराळीं वैशिष्ट्यें कसकशीं परिणत होत गेलीं याचीहि थोडीशी माहिती मिळते. प्रस्तुत स्थलीं बंगाली वाङ्मयाचें जें एक वैशिष्ट्य स्त्री-स्वभाव-परिपोष या संबंधीं विचार करावयाचा आहे.

[ १ ]

हिंदुस्थानांतील फार प्राचीन कालच्या अनार्य समाजांत मातृप्रधान कुटुंबपद्धति होती. त्या वेळच्या समाजरचनेस आचारविचार—परंपरेमुळें येणारी स्थिरता प्राप्त न झाल्यामुळें समाजस्थैर्य येण्यास फारच कालावधि लागत असे. त्या वेळेचा समाज वन्यवृत्तिप्रधान असल्यामुळें समाजांतील प्रमुख घटकावयांत नेहमीं भांडणें होत व पराभूत पक्षाची सर्व मालमत्ता विजयी वीरांच्याकडे सहज जात असे. अशा मालमत्तेंतच कुटुंबांतील स्त्रिया, मुलें वगैरेंचाहि समावेश होत असे हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. असें असलें तरी या छोट्या लढायांचा परिणाम विशेषेंकरून स्त्रीसमाजाचें स्वामित्व पालटण्यापलीकडे

झाला नाहीं. या संक्रमित परिस्थितींत स्त्री ही कुटुंबांतील स्वामिनी समजली जात असे. अशा वेळीं पुरुषापेक्षां स्त्रीस-पर्यायानें मातेस साहजिकच महनीयत्व प्राप्त झालें व नंतर कांहीं कालानें स्त्रीची मातृदेवतेच्या स्थानीं प्राणप्रतिष्ठा झाली. अद्यापि मातृदेवतार्चनाची पद्धति चीन, ब्रह्मदेश आणि मलबार कोचीन वगैरे भागांत अस्तित्वांत आहे. प्राचीन अनार्यांच्या समाजरचनेंतील एक वैशिष्ट्य अशा स्वरूपांत आजहि प्रत्येक खेडेगांवांत मरीआई, जानई, जोखाई अशा नांवानें मातृदेवतेचें एक प्राचीन प्रतीक अवशिष्ट राहिलें आहेत.

स्त्रीस या वेळीं प्राप्त झालेली हीचावस्था मात्र या पुढें आढळून येत नाहीं. यानंतर पुराणकालांत समाजव्यवस्था स्थिर झाली. पतिपत्नींचे संबंध ठरून समाजाचें स्थिरीकरण झालें. याच कालांत स्त्री-पुरुषांचे संबंध कसे आदर्शवत् असावेत त्याचा विचार होऊन पौराणिक कालांत अयोध्यावासी प्रभु रामचंद्र व जानकी, श्रीशिव आणि सती पार्वती यांचीं अनुकरणीय चरित्रें समाजासमोर आलीं. या कालांत स्त्रीचे ठिकाणीं एक प्रकारची पावित्र्यपूर्ण भावना निर्माण झाली.

या नंतरचा इ. सना पूर्वींचा व नंतरचा काळ बंगालच्या दृष्टीनें फारच क्रांतिकारक असा गेला. बंगालची मनोभूमी विशेष भावनाप्रधान असल्यामुळें धार्मिक चळवळींचे परिणाम मात्र फोटो काढण्याच्या कॅमेऱ्यांतील निगेटिव्ह काचेप्रमाणें बंगालच्या मनोभूमिकेवर स्पष्टपणें उमटल्याशिवाय राहिलें नाहींत प्रत्येक धर्म चांगला असून आपण त्याचे अनुयायी बनलें पाहिजे, ही उत्कट भावना प्रत्येक बंगवासीयाला असते. बंगालमध्येंच खुद्द बौद्धधर्माचा उदय झाल्यामुळें थोड्याच वेळांत बौद्ध धर्मानें बंगालवर आपलें पूर्ण आधिपत्य गाजविलें. पण कालांतरानें बुद्धाच्या असाधारण तत्त्वज्ञानाला मालिन्य येऊन एक हजार वर्षांनंतर या धर्मांतील मूळ पावित्र्य आणि तेज लोपलें आणि बुद्धप्रणित सात्विक आचारास आणि बंधनांस कंटाळलेल्या लोकांनीं बौद्ध-धर्मीय वामाचारी पंथाच्या निशाणाभोंवती जमण्यास प्रारंभ केला होता. या वेळीं बुद्धाचें तत्त्वज्ञान बाजूला पडलें. व विचित्र आणि अत्यंत गलिच्छ असा आचारधर्म प्रचारांत आला. हा आचारधर्म पूर्ण बंधनातीत होता. होम-हवन आणि पशुयज्ञ यांस तुच्छ लेखणारा हा बौद्धधर्मीयाचा वामाचारी पंथ

यावेळीं इतका अधोगतीस पोहोंचला होता कीं, एक वेळ यज्ञहिंसा पुरवली पण वामाचारी पंथाचा हा अनाचार व प्रेतसाधन यांची कल्पनाहि नको! हे आचार महाराष्ट्रांतील महानुभव पंथांत अगर अघोरीपंथांत प्रचलित असलेल्या कांहीं विचित्र चालीप्रमाणें होतें. त्यांच्या मताप्रमाणें जगांत कोठेंच अधर्म व अन्याय नाहीं, वाटेल तसें वागावें व वाटेल तें भक्षण करावें. या वामाचारापंथी यांनीं सडलेलें प्रेतहि भक्षण करण्यास योग्य ठरविलें!! वामाचारांच्या विधीनें वागणाऱ्या साधकानें वाटेल त्या सुरूप व तरुण परस्त्रीवर निर्व्याज प्रेम करावें, तिला आराध्य देवता समजून तिची भक्ति करावयाची असा परिपाठ असे. निर्व्याज प्रेमाची ही भाषा दिसावयाला किती गोड आहे? पण तिचे दुष्परिणाम बंगालमध्यें लागलीच दिसावयाला लागले. वामाचारांच्या या विधीस 'सहज' विधि असेंहि नांव आहे. या 'परकीय' रसाचा बंगाली वाङ्मयांत या वेळेपासून प्रवेश झाला.

वामाचारांच्या अनिष्ट आचारपरंपरेमुळें पौराणिक काळांत स्त्रीजातीस लाभलेलें पावित्र्य आणि उच्च ध्येयाचें आसन एकदम खालीं ढासळलें व स्त्रीपुरुषांतील पूर्वीच्या निर्हेतुक प्रेमाच्या जागीं स्त्रीविषयक विषयप्रेमाचा अवतार झाला. आपल्या गुप्तसाधनतंत्रांत तर त्यांनीं कमालीचा आचरटपणा केला आहे. कोणत्याहि मनुष्यानें वाटेल त्या जातीच्या कन्यकेवर प्रेम करावें व सिद्ध* बनावे. मग ही कन्यका ब्राह्मणी असो, शूद्रकन्या असो, नटी असो, कपालिका असो, वेश्या रजकी व नापितांगना असो, वामाचारीयाला त्याचा कांहींच विधिनिषेध नाहीं. स्त्रीजातीबद्दल इतकी अपवित्र भावना वामाचारीनीं कां करून घेतली याचें योग्य कारण मात्र अद्यापि सांपडत नाहीं. बौद्ध धर्माचा

* नटी कपालिका वेश्या रजकी नापितांगना ।
ब्राह्मणी, शूद्रकन्या च तथा गोपालकन्यका ॥
मालाकारस्य कन्या च नव कन्याः सकीर्तिताः ।
विशेषवैदग्ध्ययुताः सर्वा एव कुलाङ्गनाः ॥
रुपयौवनसंपन्नाः शीलसौभाग्यशालिनः ।
पूजनीयाः प्रयत्नेन ततः सिद्धः भवेन्नरः ॥

ऱ्हास आणि पौराणिक धर्माचें पुनरुज्जीवन यांमधील संधिकालांत बंगालमधील समाजांत स्त्रीस किती कनिष्ठस्थान दिलें गेलें हें प्रस्तुत स्थलीं दाखविण्यांत आलें आहे. या स्वैरवृत्तीच्या वामाचारामुळेंच या कालांतील काव्यांत स्त्रियांविषयींच्या नैतिक कल्पना भ्रष्ट झालेल्या दिसतात. म्हणून या कालांतील वाङ्मयांत स्वैरप्रेमाचें भडक चित्र उठावांत उमटलेलें दिसतें.

या कालांतील कुलांगनांची झालेली—अगर वामाचारीपंथीयांनीं केलेली असें आपण म्हणूं—अधोगती पाहून समाजांतील नेत्या आणि कर्त्या विद्यावंतांनीं वाङ्मयाच्या ओघास जरा निराळें वळण दिलें आणि भ्रष्टतेच्या गर्तेत लोटलेल्या स्त्रीस योग्य स्थानीं ठेवण्याकरितां तिला पुनः देवतास्वरूप देऊन उच्च स्थानीं तिची स्थापना केली; आणि त्यांनीं उच्च स्वरानें असें जाहीर केलें कीं, वाङ्मयांत ज्या ज्या ठिकाणीं स्त्रीविषयक प्रेम असा शब्द असेल, तेथें तो परमेश्वरस्वरुपी मातृप्रेमवाचक अगर ईशभक्तीपर असा आहे. अशा तऱ्हेची क्रांति करविणें या वेळीं वाङ्मयसेवकांना एका तऱ्हेनें जरूरच होतें. तसें केलें नसते तर मग पतित झालेल्या स्त्रियांचा उद्धार तरी कसा झाला असता ? समाजाच्या दृष्टीनें पतित झालेल्या स्त्रियांच्या संबंधानें ‘ या स्त्रिया पतित नाहींत, या पवित्र आहेत. ’ असें जगजाहीर करणें एका अर्थानें बरोबरच आहे. प्रातःस्मरणीय अशा ‘ अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी ’ पंचकन्यका पवित्र कां मानल्या गेल्या याचाहि उलगडा वरील गोष्टीवरून सहज होतो. यांना पवित्र माना असें जेव्हां सांगतां येतें, तेव्हां या सांगण्यांत ‘ वरील कन्यका कोणत्याना कोणत्या तरी कारणानें सदोष ठरल्या होत्या. परंतु त्यांना पवित्र माना, त्यांचे दोष विसरा, असेंच या ठिकाणीं मुद्दाम सांगितलें आहे असें मानावें लागतें.

बंगाली वाङ्मयाचा आढावा घेतला तर भक्तिरसप्रधान वैष्णव कविवृंदांनीं आपलीं एकापेक्षां एक अशीं सरस काव्यकुसुमें आदिजननीच्या चरणीं वाहिलीं आहेत. श्रीकृष्णचैतन्य, चंडीदास व विद्यापति वगैरे भक्तिमार्गप्रवण कवींनीं आपल्या आराध्यदेवतेचें स्तवन करून प्रेमभक्तीच्या ब्रह्मानंदांत अखंड अवगाहन केलें आहे. राधाकृष्णांच्या विलासलीलांचें वर्णन करून बंगदेशांत भक्तीची ध्वजा फडकाविणाऱ्या वैष्णव कवींची महती बंगाली वाङ्मयांत

फारच मोठी आहे. राधाकृष्णांच्या प्रेमविलासांचें वर्णनानें भक्तीचा प्रसार सुलभ करावा अशा कल्पनेचा उदय प्रथम कोणाच्याहि मनांत होवो. परंतु स्त्रीपुरुषसंबंधींच्या उच्च कल्पनांनीं प्रेरित होऊन असाधारण बुद्धिमत्तेचा मनुष्य आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर स्त्रीपुरुषप्रधान देवदेवता निर्माण करतो. समाजांतील ज्या व्यक्तीचें जास्त महत्त्व कवीस प्रतीत होईल तीस तो आपल्या ध्येयसिंहासनावर अधिष्ठित करीत असतो. अशा प्रकारें स्त्रीपुरुष. स्वरूपांत प्रगट होणाऱ्या परमेश्वरस्वरूपांत आपण एकरूप व्हावें आणि परमेश्वराचा निदिध्यास करावा अशी साहाजिक इच्छा होते. पतिपत्नींची एकरूपता जितकी उच्च दर्जाची व ध्येयानिष्ठ असते तितकीच किंबहुना त्यांहून जास्त ध्येयनिष्ठा परमेश्वर-भक्ताची असावी असें या भक्तिकवींनीं प्रतिपादन केलें आहे. तदनुरोधानें परमेश्वर पती व त्याचा भक्त हा त्याची पत्नी आहे, इतका पातिपत्नीभाव बंगाली कवींच्या काव्यांत भासमान होतो. त्यामुळें राधाकृष्णांच्या लीला वर्णन करीत असतां कवींची उच्च भूमिका थोडी घसरून राधाकृष्णलीलावर्णनांत प्रेमविलासचेष्टांना क्वचित् स्थलीं उत्तान स्वरूप व्याप्त झालेलें आढळून येतें.

राधाकृष्णांवर बंगाली भाषेंत या कालांत रचिलीं गेलेलीं पदें फारच गोड आहेत. पूर्वराग, दौत्य, अभिसार, संभोगमीलन, माथुर व भावसंमीलन इत्यादि प्रकारांनीं वैष्णवकवींचें काव्य रंगलें आहे. राधाकृष्णांच्या ठिकाणीं प्रेमाचा अविर्भाव झाल्यावर त्यांच्या निरनिराळ्या अवस्थांचें आविष्करण, नायकनायकांना एकत्र आणण्याचे कामीं दूतींचे प्रयत्न, राधाकृष्णांची प्रेमभेट, मथुरेस गेल्यानंतर राधेस होणारा विरह व अखेर दोघांचें होणारें मधुर-मीलन या गोष्टीच चंडीदास–विद्यापति–प्रभृतींच्या काव्यांत प्रामुख्यानें आल्या आहेत. या काव्यांत दिसून येणारें राधेचें चित्र अत्यंत उठावदार रंगांत रेखाटलेलें आढळतें. प्रमुख वैष्णव कवि विद्यापति यानें चित्रित केलेली राधा आपणांस परिचित अशा राधेप्रमाणें प्रौढ अशी नाहीं. या राधेनें नुकतीच आपली कौमार्यदशा संपवून तारुण्याच्या प्रान्तांत पदन्यास केला आहे. तिचा स्वाभाविक अल्लडपणा आता नाहींसा होऊन तिला आपल्या तारुण्याची चुणूक जाणवूं लागली आहे. त्यामुळें

ती आपल्याशींच लाजतमुरडत आहे. तिच्या शरीरावयवांना आतां कोठें कोठें पुष्टता व पूर्णता येत आहे. तिच्या तेजःपुंज मुखावर मधुरहास्याची छटा दृग्गोचर होत आहे. अशा प्रकारच्या तिच्या सहजसौंदर्यपूर्ण चेहऱ्यावर आलेली लाली जास्तच खुलून दिसत आहे. अशा या राधेनें आपल्या मनोमंदिरांत माधवाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली असल्यामुळें आपल्या प्रेमाकुल आणि भीरु स्वभावास अनुरूप अशी तिच्या मनाची अस्थिर स्थिति दिसत आहे. राधेच्या मनोव्यापाराचें यथार्थ वर्णन विद्यापतीनें आपल्या कलाकुशल लेखणीनें, इतकें हुबेहुब रेखाटलेलें आहे कीं, त्यामुळें कवीची लेखनशैली व मार्मिकताच मात्र व्यक्त होते. वैष्णव कवींनीं अशा प्रकारें आपल्या काव्यांत राधेची भूमिका इतक्या सफाईनें रेखाटलेली आहे कीं, तिच्याकडे पाहून मोठमोठ्या कवींची प्रतिभा निस्तेजच पडावी! बंगाली वाङ्मयांतील राधेच्या अभिनिवेशांत भासमान होणारें वंगललनेचें चित्र अनुपमेय व आकर्षक आहे असेंच कोणीहि म्हणेल.

[ ३ ]

बंगाली वाङ्यांतील स्त्रीची भूमिका बंगाली संत-कवींनीं कशी पूर्णत्वानें चितारली आहे आणि सर्वगुणसंपन्न स्त्री–आदिमाता–ही जगाची कशी आराध्यदेवता आहे, याचें थोडेसें दिग्दर्शन पूर्वी केलें आहे. आतां अर्वाचीन बंगाली वाङ्मयांत स्त्रीस्वभावपरिपोष कशा रीतीनं झाला आहे, हें येथें पहावयाचें आहे.

स्त्री ही जगाची स्वामिनी-देवता-आहे ही पूर्वीची कल्पना या काळांत बदललेली आहे. सध्यांच्या भारतवर्षीय वाङ्यावर सर्वस्वी इंग्रजी विराचारांचा पगडा बसला असल्यामुळें स्त्री ही अतिमानुष कोटींतील देवता आहे, या पूर्वींच्या बंगाली संतकवींच्या कल्पनेला मात्र कलाटणी मिळालेली आहे. अर्वाचीन बंगाली वाङ्याचे खरेखुरे प्रतिनिधि जे डॉ. रवींद्रनाथ ठाकूर यांच्या कवितांमध्यें स्त्रीचा अभिनव, गौरव आणि तत्संबंधीं अभिमानपूर्ण उद्गार दिसून येतात. रवीद्रनाथांच्या स्त्रीविषयक कल्पना सुंदर आणि कलाविकासपूर्ण अशा आहेत. स्त्रीच्या सौंदर्यांत, प्रेमांत आणि वात्सल्यभावनांत त्यांना परमेश्वराचें अव्यक्त स्वरूप भासमान होतें. निर्गुण, निराकार परमेश्वरास

उद्देशून केलेल्या प्रार्थनांत त्यांना निसर्गाचें स्वरूप आपल्या आराध्यदेवतेच्याच स्वरूपांत भासमान होतें.

रात्रींच्या प्रशांतसमयीं आकाशांतील लुकलुकणाऱ्या ताऱ्यांच्या तेजांत अगर प्रातःकालच्या अर्धोन्मीलित उषेच्या गुलाबी हास्याच्या लहरींत अगर चंद्रप्रकाशित केतकीवनांच्या शीतल वायुलहरींत अगर आम्रमंजरीजवळ बसून गीतालाप करणाऱ्या कोकिलांच्या स्वरमाधुर्यतेंत अगर जनसंमर्दापासून बाजूस असलेल्या रानावनांत वहाणाऱ्या निझराच्या सुमधुर संगीतांत रवींद्रनाथांना आपल्या अराध्यदेवतेची ओळख झालेली आहे. या आराध्यदेवतेउद्देशून रवींद्रनाथांनीं आपलीं बरीच गीतें गायिलीं आहेत.

वंगवाङ्मयांत अशा रीतीनें अखिलब्रह्मांडनिर्मात्र्या या 'आदिजननीस' अगर पर्यायानें जगदुत्पत्तिस्थितिलयकर्त्रीस—स्त्रीस—अशा रीतीनें अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालें आहे. वंगवाङ्मयसाम्राज्यांतील कुशल कारागीरांच्या कृतींकडे पाहतां आपणांस असें आढळून येतें कीं, स्त्रीभावनापरिपोषाकडे ज्या प्रमाणांत लक्ष देण्यांत आलें आहे, त्याच्या निम्म्यानेंहि लक्ष, पुरुषस्वभावचित्रीकरणाकडे गेलेलें नाहीं. बंगाली वाङ्मयांतील स्त्रियांच्या भावना जास्त कुशलतेनें, जास्त उदात्ततेनें आणि जास्त निर्विशेष भक्तीनें रेखाटण्यांत आल्या आहेत.

बंगाली वाङ्मयाचें हें वैशिष्ठ्य, बंगाली वाङ्मयाचें आधुनिक वाङ्मयप्रणेते रवींद्रनाथ ठाकूर यांच्याहि वाङ्मयांत पूर्णपणें प्रतीत झालें आहे.

मानवी आयुष्यांत ज्याप्रमाणें शैशव, यौवन, तारुण्य आणि वार्धक्य अशा चार अवस्था असतात. त्याप्रमाणें प्रत्येक साहित्यसेवकाच्या कृतींचा परिपोषहि त्या मानानें कमजास्त प्रमाणांत उठावानें दिसून येतो. प्रस्तुत चर्चाविषयक लेखांत आम्हांस रविबाबूंच्या वाङ्मयांतील नायिकांच्या स्वभाव परिपोषाचा थोडासा विचार करावयाचा आहे.

रवींद्रनाथांच्या प्रथम वयांतील-यौवनकालांतील कविता साधारपणें यौवनजात भावनोद्रेकामुळें उत्पन्न झालेल्या भावनांनीं युक्त-अर्थातच शृंगाररसात्मक आहेत हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. परंतु हा शृंगार उत्तान नाहीं. 'माझ्या अंतःकरणांत वास करणारी ही स्त्री कोण?' या सुंदर कवितेंत कवीनें

स्वार्थासाठीं स्त्रीवर प्रेम करणाऱ्या हीन मनुष्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. ' रात्रे ओ प्रभाते ' या कवितेंत केवळ सौंदर्यावर लुब्ध होऊन नायिकेवर प्रेम करणाऱ्या नायकाचा वरीलप्रमाणेंच निषेध व्यक्त करण्यांत आला आहे. या कवितेंतील नायिका ( नायकास उद्देशून ) म्हणते:—

" मला जर सुंदर रूप द्यावयाचें नव्हतें तर देवानें तुझ्यावर प्रेम करावयाला तरी मला कां लावलें?

जिचे कपोल सुकुमार व उत्फुल्ल आहेत तिचेच अश्रु चमकावयाचे? "

असा प्रश्न नायिकेनें केला आहे. नंतर सरळ शब्दांत नायिका पुढें म्हणते—

**आमि रूपसी नहि तब् आमारे मने,**
**प्रेमेर रूपसे तो सुमधुर ।**

" मी-तुझी प्रियतमा-जरी रूपवती नाहीं तरी माझ्या मनांत आपणां-विषयीं असलेल्या प्रेमाचें स्वरूप मात्र अत्यंत मधुर आहे. "

याच कवितेंत आदर्श स्त्रीची कल्पना कवीनें मोठ्या कुशलतेनें रेखाटलेली आहे. नायक आपल्या नायिकेस म्हणतो:—

" हे प्राणेश्वरी ! रात्रींच्या प्रशांत समयीं तूं प्रेममूर्तीच्या रूपानें माझ्याजवळ आली होतीस.

**पण प्रातःकाळीं एखाद्या देवीच्या स्वरूपांत तूं आतां प्रगट झाली आहेस.**

या वेळीं शीतल वायु वाहात आहे; प्रभातकालीची शांतता चोहोंकडे नांदत आहे. हा नदीचा किनाराहि निर्जन आहे.

**अशा वेळीं हे देवी ! आपला सन्मान करण्याकरितां मी येथें अवनतशिर असा उभा आहें. "**

आदर्श प्रेममूर्ति या नात्यानें प्रभातीच्या उषोदेवतेबरोबर अवनतशिरानें प्रस्तुत स्थळीं कवीनें नायकेस अभिवादन केलें आहे.

रवींद्रनाथांनीं आपल्या काव्यांत चार प्रकारच्या स्त्रियांची महती वर्णन केली आहे.

१. स्त्री अर्धी ईश्वरी व अर्धी मानवी शक्ति आहे ( मानसी )

२. स्त्री मनुष्यास विजय देण्याकरितांच निर्माण झाली आहे (विजायिनी)

३. स्त्री ही सर्व सुखदुःखांची भागीदारीण असून सेवा व कर्तव्यपालन या दोन्हीं साधनांनीं तिनें संसाररथ ओढला पाहिजे ( प्रिया )

४. स्त्रियांच्या अधोगतीला पुरुषहि कारणीभूत आहेत. अशा स्थितींत 'पतिता' स्त्रियांना पुरुषानें कायमच्या अधोगतीच्या गर्तेत लोटावें हें बरें नाहीं. (पतिता)

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे रवींद्रनाथांनीं आपल्या निरनिराळ्या कवितांत आणि संवादांत स्त्रीचें यथार्थ चित्र रंगविलें आहे. या चित्रांतील रंगांच्या निरनिराळ्या छटा कशा परिणामकारक आणि आल्हादकारक आहेत हें सांगण्यास कालाची व स्थलाची मर्यादा असल्यामुळें येथेंच हात आखडता घ्यावा लागत आहे. यासंबंधीं विस्तृत विवेचन पुढें कोठें तरी करतां येईल.

---

# शाहीर कवि व राष्ट्रीय कवि

## यांचीं कार्यें आणि आवश्यकता

लेखक : **नारायण महादेव भिडे**, बी. ए. भोर.

[ प्रकृत लेखक हे भोरचे रहिवासी होत. त्यांचा जन्म १८८४ सालीं भोरास झाला. त्यांचें सर्व शिक्षण भोरच्या शाळांत झालें. फर्ग्यूसन कॉलेजमधून ते बी. ए. झाल्यानंतर त्यांनीं भोर संस्थानांत नोकरी धरली. त्यांनीं 'प्रवासी' काव्य लिहिलें आहे. त्यांच्या कविता व काव्यविषयक चर्चात्मक लेख काव्यरत्नावलि, विविधज्ञानविस्तार, मनोरंजन, नवयुग या मासिकांतून आले आहेत. त्यांनीं 'काव्य-चर्चा' या पुस्तकाचें संपादन केलें आहे. ]

मराठी साम्राज्याच्या ऐन उमेदीमध्यें असा एक काळ प्राप्त झाला होता कीं, त्या वेळीं मराठ्यांनीं आपल्या तलवारीच्या जोरावर केलेल्या चौफेर मुलुखगिरीबरोबर महाराष्ट्र शाहीरगिरीनेंहि त्यांच्या उत्साहित मनांवर डफा-वरील थापेसरशी आपली छाप बसविली होती. याचें प्रत्यंतर 'तमास-गिरांचा चंग, रंग, दंग ऐकुनि हरदास पळाले घरीं' या धीट उद्गारांत सांपडणारें आहे. परंतु पुढें दुर्दैवाची जोड ही कीं, 'एक छत्र करूनी गेले

राव माधवराव । थरथरा कापत होते अष्ट उमराव ' असें त्या सत्तेच्या वैभवाचें स्वाभिमानानें व रसवंतीच्या मुक्तकंठानें वर्णन करीत सुटणारी तीच शाहीरगिरी जेव्हां लाचारून ' रातीं प्रभात कांनीं हिरवा लोलक चमके । कांतीचा सुवास अगेंजा सुगंध भबके। शिरीं पेज पगडीवर झमझमाट झमके ' अशा रीतीनें एका लक्ष्मीधराच्या रूपवर्णनांत दंग झालेली दिसूं लागली; तेव्हांच तिची इतिश्री होण्याची वेळ येऊन ठेपली असें कोणासही वाटल्यास त्यांत चुकीचें नव्हतें. अशा प्रकारें ह्या परंपरेमधील एकसारखा खालावत चाललेला शाहीरांचा वर्ग मराठी साम्राज्य व इंग्रजी साम्राज्य यांच्या सानुक्रम अस्तोदयाबरोबर जो एकदा लुप्तप्राय झाला तो पुढील बराच काळपर्यंत तसाच गडप होऊन राहिला होता. गेल्या शतकाच्या अखेरीस राष्ट्रीय चैतन्योदयामुळें राष्ट्रीय कवि निर्माण होऊं लागले. तथापि ' शाहीर ' या अभिधेनें ज्यांनीं आपणांस संबोधून घेतलें व ज्यांच्या कवितांवरून शाहीर हें नांव सार्थ दतां येईल असे कवि जन्मले नव्हते. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून मात्र ज्या नवजीवनाचा संचार सगळ्या देशभर जोमानें होऊं लागला त्याचेंच फल म्हणून शाहीरांचें पुनरुज्जीवन झालें. स्वदेशाभिमानी कविता सोडली तर रचनेच्या दृष्टीनें करंदीकरांचा ' टिळकावरचा पोवाडा ' व महाजनांचा ' कर्झनशाहीचा पोवाडा ' यांना पहिला मान आहे. त्यानंतर हरिभाऊ आपटे यांचा तान्हाजीच्या तोंडीं घातलेला सिंहगड घेण्याच्या वेळचा पोवाडा होय. त्यांत अव्वल जुन्या पोवाड्याचा थाट दृष्टीस पडतो. प्रासिद्धीच्या मानानें जो पहिला पोवाडा लोकांपुढें प्रामुख्यानें आला तो विनायकराव सावरकर ऊर्फ विनायक-शाहीराचा सिंहगडाचा पोवाडा होय. याच धर्तीवर नंतर बाजीप्रभु, मुरारबाजी, अफझुलखान वगैरे ऐतिहासिक देशभक्तिपरिप्लुत प्रसंगांवरचे पोवाडे भराभर बाहेर पडूं लागले. धुळ्याचे करंदीकर ऊर्फ विनायक कवीच्या ऐतिहासिक आर्यस्त्रियांच्या गीतांनीं शाहीरीवजा काव्यवाङ्यांस यापूर्वीच चालना मिळाली होती. व या वेळीं तर त्या कवीनें ऐतिहासिक कथात्मक गीतें लिहून राष्ट्रीय काव्यवाङ्मयांत भर टाकली. गोविंदाग्रजांनीं पानिपतचा प्रसंग रंगविण्याचा प्रयत्न केला पण त्यांत त्यांस यावें तसें यश आलें नाहीं. १९१८ चा सुमार

म्हणजे मराठेशाही दिवंगत होऊन एक शतकावधि लोटल्याचा काळ. अशा वेळीं त्याच्या शतसांवत्सरिक श्राद्धासाठीं इतरांप्रमाणें कवींची दृष्टी आपल्या गतेतिहासाकडे वळून कितीतरी अहमहमिकेनें त्यांनीं स्वाभिमानप्रेरक अशा अनेक पूर्वप्रसंगावर गाणीं गाइलीं. या वेळीं नेटानें झालेला प्रयत्न म्हणजे माधव व अनंततनय या कवींकडून होय. शाहीराचा बाह्य पेशाही स्वतः धारण करणारे खाडिलकर, देसाई, नानिवडेकर व मुळे यांच्या स्फूर्तिप्रद पोवाड्यांनीं शाहीरी कवितेला पूर्वीचें वळण प्राप्त होऊन ती लोकादरास पात्र झाली. विरकूड, ठाकरे, अरविन्द, वसंतविहार, मोरे इत्यादि कवींनीं शिवशाहींतील कित्येक उज्वल प्रसंग आपल्या पोवाड्यांनीं रंगविले आहेत. तिवारी यांनीं तर खऱ्या शाहीरी थाटाची संग्रामगीतें रचून त्या प्रकारच्या काव्यवाङ्मयाला महत्त्व आणलें. राष्ट्रीय व स्वाभिमानपर कवितांचें बाब-तींत नागपूरचे टेकाडे व चाफळचे यशवन्त यांचा उल्लेख करतां येईल. तिवारी, टेकाडे व यशवंत हे तिघेजण गायक असल्यानें त्यांना आपलीं गीतें लोकांपुढें मांडून तीं सर्वप्रिय व सर्वमान्य करण्याची अनायासें संधि मिळत असल्यानें त्यांच्या काव्यकृतीचा प्रसार सर्वत्र झपाट्यानें झाला. टेकाडे यांनीं स्वतःला राष्ट्रीय कवि व यशवंत व तिवारी यांनीं शाहीर कवि असें म्हणवून घेतलें आहे व त्यांच्या कविता पाहिल्या तर तो फरक तेव्हांच लक्षांत येतो.

राष्ट्रीय कवि व शाहीर कवि या दोघांचेंहि राष्ट्रोद्धार हें समान ध्येय असतें हें निर्विवाद होय; परंतु राष्ट्रीय कवि स्वकर्तव्याची ध्येयदर्शी दिशा दाखवून देतो व शाहीर स्वकर्तव्याविषयीं मनांत चैतन्य उत्पादितो. दोघा कवींचीं कार्यें अशा रीतीनें भिन्न असलीं, तथापि विचारानुसार त्यांचे परस्प-रांच्या क्षेत्रांत संक्रमण होतें. राष्ट्रीय कवि स्वकालीन समाजाच्या भावना काय आहेत, व त्यांना कोणतें इष्ट व अभिमत वळण दिलें पाहिजे, यासंबंधीं भवि-ष्यकाळाकडे दृष्टि रोंखून उठावदार काव्यपट तयार करतो, तर शाहीर सद्यः कालीन कर्तव्यच्युतीमुळें खालावलेल्या भावना उज्वल पूर्वेतिहास व ऊज्वल पूर्वपरंपरा याशीं किती विसदृश व विसंगत आहेत याचें तौलनिक चित्र वाचकां-पुढें धरतो. पूर्वसंस्कृतीचा विसर पडल्यामुळें अधोगतीस पोहोंचलेल्या समा-

जाच्या अंगीं मुरलेलें मालिन्य दूर करून त्यास पुन्हां पूर्वपदावर आणणें एवढेंच काम शाहीराकडून होण्यासारखें आहे. त्या कारणानें सद्यःस्थिति जेव्हां समाधानकारक किंबहुना प्रगतिप्रवण असते तेव्हां शाहीरीवर्गाची राष्ट्राला विशेष मातबरी वाटत नाहीं. अशा वेळीं शाहीरानें रंगविलेल्या गतेतिहासांतील काव्यचित्रापासून केवळ घटकाभर मनाचें रंजन होतें. राष्ट्राच्या भरभराटीच्या काळीं शाहिरीवर्गाचा इतकाच उपयोग होत असल्यानें त्या स्थितींत तो वर्ग फारसा उदयास येत नाहीं. व आलाच तर तो बहुशः स्तुतिपाठक ऊर्फ भाट बनून आपल्या कामिकवृत्तीमुळें शेवटीं आपल्या स्वतःला राष्ट्रीयदृष्ट्या हिणकसपणा आणतो. रामदासानें जे धीट कवीचें लक्षण दिलें आहे तें याच वृत्तीच्या कवींना लागू होणारें आहे. राष्ट्रीय कवीची स्थिति याहून भिन्न आहे. त्याची सर्वकाळीं सर्व प्रसंगीं स्वतंत्र राष्ट्राला आवश्यकता असते. किंबहुना त्याच्या अभावीं तें राष्ट्र आत्मतृप्त, प्रगतिशून्य व पंगु बनतें. ‘ विळाकोयतीच जयांचीं काय तीं हत्यारें । तेच वीर बनले समयीं मावळे मराठे ।’ ही स्फूर्तिदायी आशा पतित राष्ट्राच्या अंतःकरणांत अंकुरित करणारा जसा एकटा शाहीर तसा ‘ गुलामांचें राष्ट्र ब्रिटन कधिं होणार न जगीं ’ असें किंवा ‘ लिहिला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहला । चढता वाढता प्रेमा । आनंदवनभूवनीं ’ हे स्वाभिमानाचे उद्गार उल्लसितवृत्तीनें काढणारा राष्ट्रीय कविच आढळतो. यावरून असें दिसून येतें कीं, देशावरील एकाद्या तात्पुरत्या अकल्पित प्रसंगानें जर त्याच्या प्रगतीचा गाडा थबकला असला तर ‘ राष्ट्रा जागृति आणण्यास कविता जागीं कुणाची पुरी ! ’ अशी स्वदेशाभिमानी कवीची गर्जना करून राष्ट्रीय कवि आपल्या राष्ट्रास जशी त्या प्रसंगाची जाणीव करून देतो तसाच तो प्रगतिशील राष्ट्रासहि त्याचा भविष्यकालीन ध्येयमार्ग दाखवून ध्येयदर्शी असा प्रासादिक कवि होतो. कोणतेंहि राष्ट्र घेतलें तरी त्याचीं ध्येयें एकसारखीं तशींच टिकणें शक्य नाहीं. तीं वरचेवर बदलत असतात. म्हणून राष्ट्रानें अंगीकारलेल्या नव्या ध्येयाचा सर्वत्र प्रसार करण्याचेंहि काम राष्ट्रीय कवींचें आहे. एकोणिसाव्या शतकारंभीं बायरन व वर्डस्वर्थ हे दोन कवि इंग्रजी वाङ्मयांत निर्माण झाले. त्यांपैकीं बायरन पडला स्वातंत्र्याचा गरुड व इंग्लंड तर त्या वेळीं राजकीय स्वातंत्र्याचा

मनमुराद उपभोग घेत असलेलें राष्ट्र होतें. तेव्हां त्या गरुडास आपली स्वातंत्र्याचीं गाणीं गावयास इंग्लंडची भूमि काय कामाची? म्हणून राजश्रीनें त्या-वेळीं तुर्कांच्या ताब्यांत खिचपत पडलेल्या ग्रीस देशाची वाट धरून तेथील लोकांना तुर्कांविरुद्ध उठविण्याच्या कामीं आपल्या छातीठोक शाहीगिरीचा इतक्या शर्थीनें उपयोग केला आहे कीं, ग्रीस देश जरी सांप्रत स्वयंसत्ताक राष्ट्र झालें असलें तरी देखील कवींचे ते उद्गार वाचतांना अंग रोमांचित झाल्यावांचून रहात नाहीं. दुसरा कवि जो वर्डस्वर्थ त्यासंबंधानें विचार केला तर त्या राष्ट्रीय कवीनें त्या वेळीं इंग्रजी राष्ट्र चैनी, आपमतलबी व ऐहिक वैभवास लाचावलेलें व म्हणून आपल्या उच्च प्रवृत्तीपासून ढळलेलें असें पाहून त्यास उद्देशून 'गेलों अम्ही सकल गुंतुनिया भवांत' ही स्वदेशाभिमानी कविता लिहिली अशा रीतीनें डोळ्यांत अंजन घालून आपल्या राष्ट्रास त्याच्या अंगचें दोष निर्दिष्ट केले. राष्ट्रीय कवींच्या ध्येयमूलक कामगिरीचें असेंच आणखी एक उदाहरण देतां येईल. इंग्लंडमध्यें गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत जिकडे तिकडे साम्राज्याचें व त्याबरोबर वर्णद्वेषाचें बेसुमार वारें खेळत होतें. पौर्वात्य लोक जात्या केवळ पराधीन स्थितीलाच योग्य असे नादान आहेत. या कारणानें स्वयंसिद्ध पाश्चात्य व अनन्यगतिक पौर्वात्य यांचा कधींहि मिलाफ होणार नाहीं अशा प्रकारची ठाम भावना सर्व युरोपभर प्रसृत झाली होती. त्या भावनेचा ध्वनि रुडियार्ड किपलिंग या साम्राज्यवादी प्रसिद्ध इंग्रज कवीच्या काव्यांत अहंभावाचा दर्शक म्हणून जितका स्पष्ट घुमत आहे तितका तो इतरत्र कोठेंहि ऐकूं येत नसेल.

'पूर्वाच ती राहि पूर्वा सदा, पश्चिमा सर्वथा पश्चिमा ती सुधी;
टोंकें तयांचीं जुळूनी जनीं त्या द्वयाचा न संयोग होणें कधीं'

त्या कवीच्या वरील सर्वश्रुत पंक्ति वाचल्या म्हणजे त्या काळचें इंग्लंडचें राष्ट्रीय ध्येय काय होतें व तत्कालीन मुत्सद्याच्या मतें त्या ध्येयाचीं प्रगति पुढें कशी व्हावयास पाहिजे याची बरोबर कल्पना येते. साम्राज्यवाद जरी देशभर पसरला होता तरी तो सर्वाभिमत करण्याचें बरेचसें श्रेम किपलिंगच्या वरील काव्योक्तीलाच देणें उचित होईल. ही इंग्रज कवीची भावना हिंदी राष्ट्राच्या दृष्टीनें किंबहुना जागतिक शांतीच्या उदात्त भावनेच्या दृष्टीनें

कितीहि तिरस्करणीय, अप्रयोजक आणि अन्यायमूलक दिसत असली. तरी ती राष्ट्रध्येयानुसारी असल्यानें आम्ही तद्दर्शक कवितेला राष्ट्रीय कवितेचा दर्जा देतों. त्याच पुढें राष्ट्रांच्या ध्येयांत बदल झाल्यानंतर पूर्वीच्या विषयांवर रचलेल्या कवितेला राष्ट्रीय असें कदापि म्हणतां येणार नाहीं. जगाच्या वातावरणांत साम्राज्याविषयक पूर्वकल्पनेला आज कोठें फारसा थारा मिळत नाहीं म्हणून ती कल्पना सध्यां शिळी व बुरसलेली भासते.* अशा स्थितींत जर एखादा अर्वाचीन इंग्रज कवि साम्राज्यकल्पनेचा कैवारी होऊन त्याचें डौलदार अगर किपलिंगप्रमाणें पिळदार वर्णन करूं लागला तर त्या त्याच्या कृतीला मागील काळाप्रमाणें राष्ट्रीय कवितेचा मान कोणी देणार नाहीं. ती एक शाहीरी कविता होईल, व तिचा उपयोग श्रोत्यांस घटकाभर रिझविण्यावांचून दुसरा कांहीं होणार नाहीं. सारांश अमूक एका सुराच्या योगानें पूर्वी एकवेळ देशामध्यें राष्ट्रीय भावना उद्दीपित झाली म्हणून तसल्या प्रकारच्या सुरानें ती पुन्हां उदित होऊं शकेल अशी आशाळभूत अपेक्षा बाळगणें व्यर्थ आहे. अर्वाचीन शाहीरी वर्गांत मोडणारे मेकाले साहेब यांचा ‘ अजिंक्य आरमारा ’वरील पोवाडा व प्रत्यक्ष अनुभवलेल्या प्रसंगावर रचलेला ‘ लखनौचें रक्षण ’ हा टेनिसनचा पोवाडा असे दोन्ही पोवाडे घेतले तर ते ओज व प्रसाद या गुणांच्या बाबतींत इंग्रजी भाषेंत नांवाजण्याजोगे झाले आहेत. दोहोंतील वर्णनशैली हृदयंगम असून वीरसाचा उठावहि बहारीचा आहे याबद्दल वाद नाहीं. तथापि पहिला केवळ

---

* गेल्या शतकास साम्राज्यप्रवर्तक व चालू शतकास स्वयंनिर्णयात्मक असें जरी सामान्येंकरून म्हणतां आलें तथापि मधूनमधून साम्राज्यवाद्यांचाहि सूर जोरानें ऐकूं येतोच. एकादा साम्राज्यवादी हुजूरपक्षीय दिवाण आपल्या हटवादी दमदार वृत्तीचें मनमोकळेपणानें समर्थन करण्यासाठीं म्हणून खालील अलंकारिक उक्ति काढतांना अजूनहि दिसतोच.

‘ मार्गानें सारवान जाई सुखें बसुनि उंटावरतीं,
कुत्ते जमुनी बघुनि तयातें स्वैरपणें भुंकत सुटती. ’

यावरून साम्राज्यवाद इंग्रजांच्या अंगीं किती खोल मुरला आहे हें प्रत्ययास येतें.

रंजनाचा व दुसरा कृतकृत्याबद्दल कौतुकाचा विषय झाले आहेत. त्यांनीं इंग्रजी राष्ट्राच्या ध्येयांत कोणता बदल घडवून आणला किंवा ते कोणत्या ध्येयाचे दर्शक झाले? वरीलपैकीं कोणतेंहि कार्य त्यांच्या हातून झालें नाहीं. त्यांतील अभिमत विषय व अभियुक्त रचना या योगानें इंग्रज लोकांचीं मनें रिझवि-ण्यास त्यांचा उपयोग झाला इतकीच खरोखर त्यांची राष्ट्रीय दृष्ट्या काम-गिरी सांगतां येईल. पेशवाईच्यावेळीं देखील अशीच गोष्ट घडून आली. शाहीरी कवितेचा त्या काळीं केवळ जनतेचें मनोरंजन अगर कृतकृत्याबद्दल गौरव करण्याकडे उपयोग होत होता. शाहीरानें एकाद्या ऐतिहासिक नव्या जुन्या प्रसंगावर पोंवाडा रचून व तो स्वतः अगर दुसऱ्याकडून समाजापुढें गाऊन रात्रीं विश्रांतीच्या वेळीं त्याची शिणलेली वृत्ति उल्हासित करावी आणि उलटपक्षीं समाजानेंहि मोठ्या दिलदारपणानें त्याची वाहवा करून त्यास आर्थिक प्राप्ति करून द्यावी यापेक्षां राष्ट्रीय दृष्टीनें जास्त कामगिरी शाहीराकडून होण्यासारखी नव्हती व समाजहि त्यापासून अधिक अपेक्षा करीत नव्हता. 'पुण्यांतील रंग' व 'खर्ड्यांची लढाई' यांवर पोवाडे करतांना व अलोट जनसंमर्दाच्या फडांत स्फूर्तीनें व वैभवाच्या आनंदानें बेहोषून गातांना प्रभा-करासारख्या जातिवंत शाहीराला 'गजवार किनखाबा'ची किंवा 'चिन्डाकिल डागीन्या'ची हाव मागें सारतां येऊं नये हें कशाचें द्योतक बरें? शाहीरापुढें कोणतेंहि राष्ट्रीय ध्येय नव्हतें. त्याची यानें आकांक्षाहि धरली नव्हती. मनाचें रंजन करणें हाच त्याचा अंतर हेतु होता. यावरून असें म्हणता येयें कीं, राष्ट्राच्या उत्कर्षाच्या काळांत राष्ट्रीय कवीप्रमाणें शाहीराचा राष्ट्रहिताच्या दृष्टीनें विशेष उपयोग होत नाहीं. हेंच राष्ट्रीय कवि व शाहीर कवि यांच्या मधील मुख्यतः अंतर होय.

हीच गोष्ट आणखी स्पष्ट करण्यासाठीं शिवशाहीमध्यें उदयास आलेले अगीन-दास शाहीर व राष्ट्रीय कवि रामदास या जोडीचें उदाहरण देतां येईल. अगीनदासाचा एकच पोवाडा उपलब्ध आहे व त्यांत तो 'शूर मर्दांचा पोवाडा, शूर मर्दांनें ऐकावा' असें श्रोत्यांना निक्षून बजावतांना दिसतो. पण पुढें पहावें तों त्याची नजर किंचिन्मात्र दात्याच्या हाताकडे वळलेली. याचें कारण हेंच कीं, शिवसरजाचें स्वराज्य ही त्या वेळीं प्रत्यक्ष वस्तुस्थिति

होती व मुद्दाम सदरेला पाचारून आणलेल्या शाहीराकडून आपल्या कृतीचें कोडकौतुक होत असलेलें उत्कंठित मनानें ऐकून आनंदून गेलेल्या समोरच्या श्रोतृवर्गाच्या हातून त्याची योग्य संभावना होईल अशी खास परिस्थितीहि तेथें वागत होती. रामदास हा राष्ट्रीय ध्येयनिष्ठ कवि असला, तथापि जोंपर्यंत शिवशाहीचें साक्षित्व त्याच्या दृष्टिक्षेपांत आलें नव्हतें तोंपर्यंत त्याच्या उद्गारांत देशाभिमानी कवीचेच सूर ऐकूं येत होते. सभोवतालची हलाखीची स्थिति पाहून 'सकल जन सुखाव तो कसा काळ फावे। भजन जन उकावे सर्व आनंद पावे' म्हणजे सर्व लोक सुखी होतील असा सुदिन केव्हां उगवेल इतकीच त्या वेळीं कवीची चिंता होती. फारतर काळावर नजर देऊन 'धीर्धरा धीर्धरा तकवा। हडबडूं गडबडूं नका ॥ काळ देखोनी वताव। सांडावें भय पोटिचें' असें उत्तेजन देण्यापलीकडे त्याच्या कामगिरीस काय वाव मिळाला? त्यानें आपल्या ध्येयानुसार एका कल्पनानिर्मित राज्याची उभारणीहि केली होती. त्यांत आजार नाहीं, व्याधि नाहीं, अतिवृष्टि अगर अवृष्टि यांचें भय नाहीं. त्यांत अकालमरण नाहीं कीं स्वातंत्र्यहानीचें दुःखहि नाहीं. इतकेंच काय पण 'अद्‌भूत पिकती भूमि, वृक्ष देती सदा फळ, अखंड दुभती धेनू आरोग्यें वाहतीं जळें' असें तें रामराज्य होतें. पण राष्ट्रीय कवीच्या या ध्येयाला कल्पनेच्या प्रांतांतच त्या वेळीं अवसर मिळणारा होता. पुढें जेव्हां त्यास शिवशाहीचें प्रत्यक्ष दर्शन झालें तेव्हां मात्र त्याच्या राष्ट्रीय भावनेला जोम चढला. त्यानें आपल्या महाराष्ट्रास रामराज्याच्या तोडीचें आनंदभुवन करून सोडण्याचें ध्येय पुढें ठेवलें. या आनंदभुवनांत 'बुडाले सर्वहि प्राणी, हिंदुस्थान बळावलें, अभक्तांचा क्षयो झाला, आनंदवनभूवनीं' इतकीच आशा न करितां कवीनें 'सर्व सद्या, कला विद्या न भूतो न भविष्यती। वैराग्य जाहलें मोठें आनंदवनभूवनीं' अशी महत्तर आशा केली आहे. कवि या ध्येयभूत भुवनासंबंधीं 'जन्म दुःखें जरादुःखें नित्यदुःखें पुनः पुन्हा। संसार त्यागणें जाणें आनंदवनभूवना' म्हणजे आपल्या संसारांतील अडचणी बाजूला सारून एकदां तरी महाराष्ट्रांत जाऊन पहा तर खरें असा परकीय राष्ट्रांतील जनतेला अभिमानपूर्वक इषारा देतांना दिसतो.

राष्ट्रीयकवि व शाहीरकवि यांच्यामधील फरक लक्षांत घेतल्यानंतर जर आपण

हिंदुस्थानची आजची स्थिति पाहिली तर असें प्रत्ययास येईल कीं येथील राष्ट्रीय भावनेला अद्याप चांगला सुसंघटितपणा व सुस्थिरता हीं यावयाचीं आहेत. त्या दिशेनें नेटाचा प्रयत्न होत असून त्याला इष्टफलें लवकर येऊं लागल्याची ठाम चिन्हें दिसूंहि लागलीं आहेत. तथापि त्या भावनेची घटना घडून येत असतांना तिला पुढें अमूक एक दिशा लागेल हें निश्चितपणें सांगतां येणें कठीण आहे. राष्ट्रीय कवि झाला तरी त्याच्या नजरेनें भविष्यवाद्याप्रमाणें राष्ट्राच्या भवितव्यतेचा दीर्घ पल्ला गाठणें केव्हांहि शक्य नसते. त्याची दृष्टि फार तर इतरांहून थोड्याशा अधिक अंतरावर पोचते, इतकेंच काय तें. कोणत्याही कामाला विशिष्ट दिशा लागेपर्यंत सुरवातील जो 'मतामतांचा गलबला' होत असतो त्यांतील बीज हेंच कीं, कोणाचीच दृष्टि भविष्यकाळांतील दूरचा प्रांत आक्रमण करील इतकी तीव्र नसते. या गोष्टीचें प्रत्यंतर आज येथेंहि दिसून येतें. हिंदी राष्ट्रीय कवींच्या विचारांना एक दिशा लागून त्यांचें अजून केंद्रीभवन झालें नाहीं, व त्याला कारण परिस्थितीच्या बिकटपणामुळें येथील निश्चित ध्येयाचा अभाव हें होय. प्रत्येक कवीच्या दृष्टीनें स्वकर्तव्याचें क्षेत्र निरनिराळें पडल्यानें त्याच्या साधनरूपी होकायंत्राचीं टोकें निरनिराळ्या दिशा दाखवीत आहेत. केशवसुताचें राष्ट्रीय ध्येय पाहिलें तर तें निर्विशेष असलेलें दिसून येतें. याचें कारण त्यावेळीं राष्ट्राची एका शाहीरानें वर्णिल्याप्रमाणें,

'झाला इंग्रजी अंमल फिरली कुंपनीची ग्वाहि
सद्दी त्याची बळकट त्याला राम परसन होई'

अशी परकीय संस्कृतीनें दिपून गेल्या सारखीच वृत्ति होती. मग तेथें राष्ट्रीय भावना कशी पालवणार ! केशवसुतांच्या वेळीं वरील वृत्तीमध्यें फरक पडून राष्ट्रीय भावनेचा जरी प्रसार होत होता तथापि त्यास विवक्षितपणा अद्याप प्राप्त झाला नव्हता. म्हणूनच आरंभीं वरील कवीपुढें अमूक एक असा राष्ट्रीय कार्यक्रम होता असें दिसत नाहीं.

'आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळें हो
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळें हो'

असें केवळ अभावस्वरूपी कार्य त्याचेकडून चाललें होतें. परंतु पुढें मात्र स्त्रीशिक्षण, अंत्यजोद्धार, रूढिविंधन हा समाज–शुद्धिकरणाचा कार्यक्रम पटून

तोच त्या कवीनें आपली तुतारी फुंकून जाहीर केला. समाज-सुधारणेच्या पुढील पायरीवर म्हणजे पतितपरावर्तन व शुद्धिसंघटन यावर जेव्हां राष्ट्रीय ध्येय स्थिर होऊं लागलें तेव्हांच त्या तत्त्वाचा जोराचा पुरस्कार एका महाराष्ट्र भाटानें

'तंवि उठे ध्वनि प्रतिध्वनित "धर्मकी
—हिंदु धर्मकी जय ! जय रामचंद्रकी ! !"
प्रेमें जन पुनरागत त्या जनाप्रती
आलिंगू लागति चिरमिलित बंधुसे'

असा आपल्या वैनायक गतीनें एका महाकाव्याच्या कथानकांतून केला आहे. १९१८ सालापासून म्हणजे हिंदी स्वराज्य संघाची प्राणप्रतिष्ठा झाल्यापासून हिंदी राष्ट्राच्या ध्येयाचा काटा राजकीय कार्याकडे वळूं लागला. त्यावेळीं ध्येयाला थोडाफार पण निश्चितपणा येत चाललेला दिसूंहि लागला. पण साधनाच्या तपशिलांला इतकें कांहीं वैचित्र्य आलें कीं कर्तव्याच्या दृष्टीनें कवींची एकवाक्यता किंबहुना एकसूर होणें कठीण झालें. सुप्रसिद्ध बंग कविसम्राट हिंदी जनतेचें ऐक्य घडवून आणणाऱ्या 'भारत-भाग्य-विधात्या'स उद्देशून

'ऐकुनि वाणी तव होती त्या नित्य प्रचारित नादीं
हिंदु, बौद्ध, शिख, जैन, पारसिक, खिस्ति, मुसलमानादि'

अशा रीतीनें राष्ट्रीयत्वाची एक जिनसी घटना तयार करण्याविषयी सांगतो, तर दुसरा एक विदर्भवासी राष्ट्रीय कवि

'शठ-शाठ्य-नीति अनुसरे। तरिच रे फिरे तागडी ही।
उद्धार तरिच तव होई। भारता!'

असा 'शठासि असावें शठ' या गुरुमंत्राचा उपदेश करूं लागतो. तिसरा एकजण महाराष्ट्र सेनानी कवि

'उडी घेउनी सामसत्याग्रहांत। चला या चला आज कारागृहांत;
श्रमाचे सजेचे इथें भोग भोगा। पुढें सज्ज होऊनिया कर्मयोगा'

याप्रमाणें स्वतः आचरीत असलेला धडा जनतेला शिकवून त्यांतच राष्ट्रोद्धाराची वाट दाखवितो, तर आणखी एक राष्ट्रीय बाण्याचा पण हळुवार

मनाचा सत्कवि असहकारितेच्या युगांत हिंदी राष्ट्राची आज्ञा तुच्छ लेखण्याइतकी त्याच्या कांहीं सुपुत्रांची अनुदारवृत्ति दिसल्यामुळें हतबुद्ध होत्साता

'गडद रात्र अंधार अजूनी कां मग भारतराया !
आटापीटा करिसि जिवाचा असा उठाया वाया ?
* * * * * *
तपोनिष्ठ सद्विप्र असे जे झाले याया पाहीं
नीज भारता ! नीज तोंवरी असाचि दिन तूं कांहीं !'

असे निराशोद्गार तोंडावाटे काढतो. कोणी एक कवि तर गांधींच्या असहकारामध्यें देशाची हानि होत असलेली पाहून

'येशी बा टिळका पुन्हां कधिं महाराष्ट्रीं तुझ्या लाडक्या'

अशी मोठ्या काकुळतीची इच्छा धरतांना दिसतो. अशा प्रकारें हिंदी राष्ट्रीय कवींच्या बाबतींत वर दिग्दर्शित केलेली जी 'साधनानां अनेकता' प्रत्ययास येत आहे तिचें मुख्य कारण म्हणजे हिंदुस्थानांत मूळ इतस्ततः वाहत असलेले विविध भावनांचे लहान मोठे ओहोळ संगत होऊन त्यांतून एकरसाचा प्रचंड नद अद्याप उत्पन्न झाला नाहीं हेंच देतां येईल.

अशा स्थितीमध्यें राष्ट्रीय व शाहीर या दोन कविवर्गांपैकीं हिंदीस्थानाला सांप्रत कोणाची जास्त आवश्यकता आहे या संबंधींचा विचार करणें अवघड नाहीं. राष्ट्राच्या ध्येयाला सुस्थिरपणा आला नसतांना, तें कायम झालें नसतांना तत्सिध्यर्थ ज्या वेळीं देशांमध्यें जागृति होऊं लागते त्या वेळीं शाहीराचाच समाजाला विशेष उपयोग होतो. शाहीर आपल्या जोरदार व स्वत्वपूर्ण उद्गारांनीं जेव्हां निःसत्व समाजापुढें 'पूर्वी काय व आतां काय?' ही लाजिरवाणी स्थिति वर्णन करतो तेव्हां समाजालाहि आपल्या पूर्व-वैभवाची स्वाभिमानपूर्वक आठवण होऊन त्याच्या मनांत एक प्रकारें आत्मियतेची उच्च जाणीव उदित होते. राष्ट्रीयत्वाचे कामीं शाहीराची जी कांहीं बहुमोल मदत होते ती अशा प्रसंगींच होय. वास्तविक पाहतां ही कामगिरी विध्वंसक स्वरूपाची भासते. राष्ट्रीय कवीप्रमाणें ती विधायक होत नाहीं. पण विध्वंसक आणि विधायक यां कार्यांतील सूक्ष्मभेद पाहिला

म्हणजे पुष्कळ प्रसंगीं दोहोंतील विरोध नाहींसा होऊन तीं कार्यांच्या दृष्टीनें एकरूपच दिसतात. भाषा, समाज व राष्ट्र या संबंधीं चिपळूणकर, आगरकर व टिळक यांनीं अनुक्रमें जी कामगिरी केली ती प्रथमदर्शनीं विध्वंसक स्वरूपाची भासली तरी शेवटीं विधायकच ठरली नाहीं काय? समाजशुद्धीकरणाचें कार्य प्रथम केल्यावांचून त्यास प्रगतिपर करणें म्हणजे बागेंत विषवेली तशाच वाढत ठेऊन उत्तम झाडांची लागण करणें होय. हेंच काम शाहीराकरवीं होतें. शाहीर व राष्ट्रीय कवि यांच्या कर्तृत्वामधील फरक पाहिला म्हणजे कोणत्या राष्ट्राला कोणाची जास्त आवश्यकता आहे हें त्या राष्ट्राच्या परिस्थितीवर अवलंबून असते. ज्या वेळीं निकृष्ट दशेला पोहोंचलेल्या समाजाला मानव्याच्या पातळीवर वरती आणावयाचें असेल त्या वेळीं ती कामगिरी शाहीरांकडूनच तात्कालिकपणानें व यशस्वी रीतीनें पार पडणारी आहे. परंतु तें राष्ट्र मानव्याच्या पातळीवर आल्यानंतर त्याला पुढील उच्चप्रतीच्या ध्येयाची जाणीव करून देण्याची व त्या दिशेला राष्ट्रास वळविण्याची जबाबदारीची कामगिरी फक्त राष्ट्रीय कवींनाच साधणारी आहे. शाहीर पतित राष्ट्राला जोराजोरानें हलवून त्याच्या घोर निद्रेतून जागा करतो, तर राष्ट्रीय कवि उन्निद्र राष्ट्राला उच्च ध्येय दाखवून त्या मार्गानें चालवितो. गतकाळांतील अराष्ट्रीयत्वाचीं पापें निस्तरण्यास शाहीर पाहिजे तर पुढील काळची उच्च राष्ट्रीयत्वाची कल्याणकारक ध्येयें प्रतिपादण्यास व प्रस्थापिण्यास राष्ट्रीय कवि पाहिजे. अशा प्रकारें शाहीर व राष्ट्रीय कवि हे परस्परोपकारी असून देशोन्नतीच्या कामीं एकमेकांचे पूरक होतात. आपल्या हिंदी राष्ट्राची सद्यःकाळची स्थिति कशी आहे याचें चित्र रवींद्रनाथासारख्या विश्वव्यापी कवीनें त्याच्या अवनतीची नुकतीच जी शाहीरी थाटाची मीमांसा केली आहे तींत चांगलें व्यक्त होतें. ‘ आजवर भारतभूमीच्या मुखावर भीतीचा काळा बुरखाच ओढलेला होता. स्वतःविषयींच्या कमीपणाच्या भावनेन बहुजन समाजाची वृत्ति लुली पांगळी बनली होती. परकीयांची मर्जी संपादन करण्यासाठीं अर्ज-विनंत्यांची पायधरणी करण्याच्या आत्मविश्वासशून्य प्रवृत्तींतून जन्मास आलेली याचकवृत्ति आमच्या हाडीमासीं खिळून गेली होती. ’ ही कवीची मीमांसा पाहिली व वरील विवे-

चनाच्या धोरणानें हिंदी राष्ट्रास आज कोणत्या प्रकारच्या कवीची जरुरी आहे याचा विचार केला तर असें म्हणतां येईल कीं ज्या अर्थी हिंदी समाज अद्याप मानव्याच्या पातळीवर आला नाहीं, किंबहुना आला असल्याबद्दल इतर राष्ट्रांना खात्री पटवून देतां आली नाहीं, त्याअर्थी त्यास शाहीराचीच अजून आवश्यकता आहे. त्याला त्याच्या प्रदीर्घ झांपडांतून उठवून स्वकर्तव्याची जाणीव करून देणारे शाहीरच हवेत. महायुद्धाचे वेळीं 'बी' या शाहीरानें एका पोवाड्यांत

'विचार करणें कशास' म्हणती 'कवन म्हणायाचा?
काय शिरस्तां तुम्हां न ठावा शाहिरपेषाचा?
असे विषय गायाचा एकच अक्षयचा त्याचा
क्षात्रवृत्ति उत्पन्न, विवर्धन, रक्षण करण्याचा'

असा त्या वर्गाचा जो हेतु सांगितला आहे किंवा 'शाहीर का पाहिजेत?' या प्रश्नाला उत्तर देतांना बेहरे कवीनेंहि 'हवे शाहीर। दुबळ्यास वीर करतील' असें जें म्हटलें आहे तेंच हिंदी राष्ट्रासंबंधीं यथार्थतेनें सांगतां येईल. उलटपक्षीं इंग्लंडसारख्या मानव्याच्या स्वतंत्रशील मनुष्यत्वाच्या पातळीवर ठाकलेल्या व मानव-हक्कासाठीं सदैव जागरूक व अत्यंत दक्ष असलेल्या राष्ट्रास शाहीरापेक्षां राष्ट्रीय कवीचीच जास्त अपेक्षां आहे हें उघड होय.

---

## दोघां साधू पुरुषांच्या समागमांत

[ भोरचे रहिवासी श्री दत्तंभटमहाराज व केडगांवचे श्रीनारायणमहाराज यांच्या विषयींच्या आठवणी आमचेकडे प्रसिद्धीकरितां आल्या आहेत. श्रीदत्त महाराजांचें बहुतेक सर्व आयुष्य भोरास गेलें असून त्यांची समाधीहि भोरासच आहे. श्रीनारायण महाराज यांचेंहि बालपण भोर संस्थानांतच गेलें असल्याचें कळतें याच हेतूनें वरील दोघा सत्पुरुषांच्या कांहीं निवडक आठवणी प्रस्तुत ठिकाणीं दिल्यास अप्रस्तुत होणार नाहीं.—सं. ]

# ब्रह्मीभूत श्रीदत्तमहाराज ( भोर )

( १ )

भोरचे श्रीदत्तंभटमहाराज यांना मी कितीतरी वर्षे पहात असें. प्रथम ते जेव्हां भोरास दिसले तेव्हा ते अगदीं साधे-नव्हे तो कोणीतरी एक अर्धवट वेडसर माणूस आहे अशा स्थितींत दिसले. त्यांचें वास्तव्य हायस्कूलच्या मागील मुरलीधराचे देवळांत असें. पुढें मात्र थोरल्या हिज हायनेस श्रीमंत सरकारनीं त्यांना येथेंच एक स्वतंत्र खोली दिली होती. सकाळीं उठावे, निरेचे स्नान करावे, मध्यान्हीचे सुमारास माधुकरी मागावी व रात्री देवळांतील एका कोपऱ्यांत पडावें असा त्यांचा कितीतरी दिवस नित्यक्रम होता. ते फारसे कोणाजवळ बोलत नसत. तोंडानें मात्र सदासर्वदा त्यांची पुटपुट चाले त्यांचा हा क्रम बरींच वर्षे चालू होता. मात्र आश्चर्याची गोष्ट ही कीं त्यांच्या वयांत मला केव्हाही फरक पडलेला दिसून आला नाहीं. माझे परमपूज्य मित्र कै. रावबहादुर अण्णासाहेब सातभाई यांच्या तोंडून पुढें जेव्हां महाराजांच्या अनेक साधुत्वाच्या गोष्टी मला कळल्या तेव्हांपासून माझी त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टि बदलली व एक बालब्रह्मचारी निस्पृही साधुपुरुष म्हणून मला त्यांच्या विषयीं आदर वाटूं लागला. दरवर्षी उन्हाळ्याचे सुट्टींत मी भोरास येतोच व तेथें मुरलीधराचे दर्शन घ्यावयास जेव्हां जेव्हां जातो, तेव्हां ज्या एका गोष्टीचें मला नित्य स्मरण होतें. ती विषयींची माझी एक आठवण मी पुढें देत आहे. माझी नेहमींची इच्छा ही कीं मी भोरास असेपर्यंत दत्तमहाराजानीं एकदां तरी आमचे घरीं भोजनास यावें. त्याप्रमाणें मी त्यांना दोन तीन वेळां बोलावलेंहि. प्रत्येक वेळीं त्यांनीं येईन म्हणावे व तसें घडूं नये असें होत होतें. दोन तीन वेळां माझी अशी निराशा झाली तरी मी पुन्हां एकदां भोजनाचें आमंत्रण केलें. व त्यांनीं त्यास ताबडतोब अनुमती दिली. तेव्हां 'महाराज आतां तरी खात्रीनें येतील नां ? दोन तीन वेळां येईन म्हटले पण तसा योग आला नाहीं' म्हणून विचारतों. असें मी म्हणतांच माहाराजांनीं 'मी कबूल केलें

अन् गेलों नाहीं ' असें पुटपुटत भडाभडा तोंडांत मारून घेतल्या हें पाहून मी घाबरून तसाच परतलों. आपल्या हातून हा अपराध घडला असें वाटून माझें मन खाऊं लागलें परंतु पुढें चारपांच दिवसांनींच महाराज आपण होऊन आमच्याकडे जेवावयास आले. त्यांना पाहून मला आश्चर्य व आनंद वाटला. ते अभ्यंगस्नान करून (कारण तेल लावून अंग चोळून घेणें त्यांना भारी आवडे) व भोजन करून गेल्यावर मला खरोखर धन्यता वाटली. सद्गुरूच ते. त्यांची अवकृपा कोणावर होईल ?

—वि. गो. भिडे, अमळनेर

(२)

महाराजांच्या जशा विचित्रपणाच्या गोष्टी ऐकूं येतात तशाच त्यांच्या निस्पृहपणाबद्दलहि त्यांची ख्याती होती. एकदां त्यांच्या भक्तानें त्यांना पन्नास रुपये पाठविले. त्यांनीं ते रुपये घेतले व निरा नदीच्या घाटावर जाऊन बसले. हातांत सुटे रुपये होते. त्यांनीं एक एक रुपया घ्यावा व नदींत फेंकावा असा क्रम रुपये संपेपर्यंत चालविलेला आम्हीं पाहिला. त्यांना कोणीं धोतरें दिलीं तर त्या धोतरांच्या धांदोट्या करून शेकोटी करीत शेकत बसत. दुसऱ्यानें कांहीं दिलें तरी तें गंगार्पण करावयाचें असा त्यांचा स्वभाव होता.

—सौ. वत्सलाबाई कानडे, भोर.

(३)

एकदां दत्तंभट महाराज आमच्या घरीं आले त्या वेळीं उष्मा फार होत होता. परंतु महाराजांना मात्र त्या दिवसांतहि थंडी वाजत होती असें वाटलें. कारण ते आल्यावर त्यांनीं शेगडी पेटवून मागितली व रसरशीत निखाऱ्याजवळ येऊन बतले. शेकतां शेकतांच त्यांना कसली तरी आठवण झाली असावी अगर कांहीं भावी संकटाची सूचना आम्हांला मिळावी अशा हेतूनेंच कीं काय ते उठून मोठमोठ्यानें ओरडत पळूं लागले.

लोकांनीं त्यांना धरले तरी ते परत येईनात व ओरडणें थांबविनात. त्यांच्या या कृतीचा आम्हांला त्या वेळीं अर्थ कळला नाहीं. पण त्याच रात्रीं आम्हांला प्रत्यय आला. त्या रात्रीं आमच्या घरावर दरोडा पडला.

—वि. व. देशपांडे, भोर.

---

# श्रीनारायणमहाराज केडगांव

## ( १ )

एका जन्मतः मुक्या मनुष्याला मिठाच्या सत्याग्रहांत दीड महिना शिक्षा झाली होती. तो शिक्षा भोगून परत आल्यावर बेटांत श्रींचे दर्शनास आला त्या वेळीं श्रींनीं त्यास बोलावयास सांगितलें. त्यांनें 'मी जन्मतः मुका आहे' असें कळविलें. त्यावर श्रींनीं त्यास आंबा खावयास दिला. त्यानें रात्रीं तो आंबा खाल्ला. पहाटे त्यास वाचा फुटली व सकाळीं श्रींच्या दर्शनाचे वेळीं त्यांना रात्रीं घडलेला मजकूर सांगितला. ही हकीकत प्रभातच्या अंकांत आली ती मी वाचल्यावर समक्ष बेटांत गेलों व खरेपणा पाहिला.

—अ. कृ. गांडेकर, भोर.

## ( २ )

श्रीनारायणमहाराजांची कीर्ति त्यांच्या अंगच्या अलौकिक चमत्कारसामर्थ्यामुळें पसरली आहे. त्यांचे चमत्कार पाहून प्रस्तुत लेखक पुष्कळदां आश्चर्यभरित झाला आहे. ही विद्या काय आहे व ही आपण कोठें व कशी संपादन केली असें महाराजांना विचारलें असतां महाराज 'चमत्कारावांचून नमस्कार नाहीं,' असें म्हणाले. ते चमत्कार करून दाखवीत ते केवळ नाइलाजानें. कारण चमत्कार करून दाखविणें ही सत्पुरुषाची कसोटी नव्हे. ज्याला परमेश्वराची प्राप्ति करून घ्यावयाची असतें त्यानें चमत्कारांच्या नादीं

लागूं नये. चमत्कार करून लोकसंग्रह करणारा इसम अधोगतीस जातो असें जरी महाराज बोलत तरी तीं त्यांचीं उत्तरें मला उडवाउडवीची भासत. कारण महारांना गूढ विद्या गुप्त राखावयाची आहे, असें प्रस्तुत लेखकास वाटे. मिल वगैरे पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांच्या मतें जगांत चमत्कार होणें शक्य नाहीं. कारण कारणावांचून कार्यनिष्पत्ति होत नाहीं. परंतु चमत्कार शक्य आहेत, ही गोष्ट प्रमाणभूत मानली तर कार्यकारणभावार्थी उपपत्ती फोल ठरवावी लागेल. प्रस्तुत लेखकानें डोळ्यांनीं जर चमत्कार पाहिले नसते तर त्यास वरील उपपत्ती पटली असती; पण प्रत्यक्ष अनुभवलेल्याअनेक चमत्कारांपैकीं एक चमत्कार मी खालीं नमूद करतों.

प्रस्तुत लेखक मुंबईस महाराजांच्याबरोबर जाण्यापूर्वी आजारी होते. त्या वेळीं आजाऱ्यानें चार घांस खावेत, म्हणून प्रत्येक घासागणिक महाराज तीर्थ देत असत. त्या वेळीं महाराज खिशांत बाटल्या ठेवीत असत. चमत्कारानें आश्चर्यभरित झालेल्या इसमाच्या मनांत भ्रांति उत्पन्न व्हावी यासाठीं ते खिशांत हात घालून बाटली काढून दाखवीत व सांगत कीं, ‘खिशांतून मी तीर्थ काढून दिलें.’ नारायण या बाटल्या पाण्यानें भरून खिशांत बाळगतों. व लोकांची नजर चुकवून तीर्थ काढून दाखवितो.’ यावरून बाह्यत: साधे भोळे दिसणारे नारायणमहाराज अंतर्यामीं कसे पक्के होते हें दिसून येतें. त्याचप्रमाणें अत्तरांचा सुवास चोहोंकडे एकाएकीं पसरविणें, प्रसादादाखल नारळ तेथल्या तेथेंच काढून दाखविणें, कोठें पूर्वतयारी नसतांना पक्कान्नाचें ताट आणवून इतरांबरोबर आपण भोजन करणें वगैरे चमत्कार प्रस्तुत लेखकानें प्रत्यक्ष नजरेनें पाहिले आहेत.

—ग. मा. पानसे.

( ३ )

आमच्या घरीं शके १८२६ सालीं जेव्हां महाराज आले, त्या वेळीं त्यांचें वय सुमारें १३–१४ चे असावें असें दिसत होत. अंगावरील

कपडे अगदीं जीर्ण होते व डोकीवर जटा होत्या. आमचे येथें मुक्काम असले वेळीं निरा नदीवर पलीकडील वाळवंटावर स्नान करून भोलवडें येथील शंकराचे देवाळयांत संध्या करून येत असत. आमच्या येथें ते तीन वार होते. नंतर आमचे बहिणीबरोबर ते सुपें येथें परत गेले. ते आमचे बहिणीजवळ सुपें मुक्कामीं सुखवस्तु रहात असत. एके दिवशीं महाराजांची स्वारी झोंपाळ्यावर बसलेली होती. त्यांनीं एकदम दत्तनामाचा उच्चार करून तीर्थ काढलें व तें तीर्थ आमच्या घरांतील सर्व मंडळींस देण्यांत आलें.

* * *

महाराज मला बरोबर घेऊन एकदां बनेश्वराचें दर्शनाकरितां बनेश्वरला गेले होते; दहाबारा दिवस श्रींचें सान्निध्यांत असल्यानें मला अनेक चमत्कार पहावयास सांपडले. महाराजांची स्वारी समाधी लावून बसत असे. एकदां तर त्यांनीं अर्धरात्रीं लावलेली समाधि माझे पहाण्यांत आली.

—शंकर रंगनाथ दबडगे, भोर.

REFBK-0004605

समाप्त